Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

February, -2026 ISSUE No - (DLXV)565

B.Aadhar

Single Blind Refereed & Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

Special Issue

International Conference

on

Classical Languages & Literatures : Past, Present & Future

अभिजात भाषा आणि साहित्य : भूत, वर्तमान आणि भविष्य



- अभिजात भाषा (Sanskrit)
- செம்மொழி (Tamil)
- ಶ್ರೇಷ್ಠ ಭಾಷೆ (Kannada)
- శ్రేష్ఠ భాష (Telugu)
- ശ്രേഷ്ഠ ഭാഷ (Malayalam)
- ଶ୍ରେଷ୍ଠ ଭାଷା (Odia)
- अभिजात भाषा (Marathi)
- অভিজাত ভাষা (Bengali)
- অভিজাত ভাষা (Assamese)
- අභිජාත භාෂ (Pali)
- अभिजात भासा (Prakrit)
- Lingua Classica (Latin)
- Κλασική Γλώσσα (Greek)

Chief Editor
Dr. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Prof.(Dr) Vivekanand A. Rankhambe
Principal
Dr. Patangrao Kadam
Mahavidyalaya, Sangli

Editor
Dr. Naresh D. Pawar
Assistant Professor
Dr. Patangrao Kadam
Mahavidyalaya, Sangli

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Volume

A

Indian Languages

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Impact Factor – (SJIF) –8.632 **ISSN – 2278-9308**

B.Aadhar

Single Blind Refereed & Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

February - 2026
ISSUE No - (DLXV) 565

International Conference
on
Classical Languages & Literatures : Past, Present & Future
अभिजात भाषा आणि साहित्य : भूत, वर्तमान आणि भविष्य

Dr. Virag.S.Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Prof.(Dr.) Vivekanand A. Rankhambe
Executive-Editors
Principal
Bharati Vidyappeth's
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,Sangli

Dr. Naresh D. Pawar
Editor
Bharati Vidyappeth's
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

Estd. 1964
Celebrating 50 and Beyond
BHARATI VIDYAPEETH

: SECRETARY :
Dr. VISHWAJIT KADAM MLA
B.E.(Comp.), M.B.A., Ph.D.

: JOINT SECRETARIES :
Shri. V. B. MHETRE Dr. K. D. JADHAV
Dr. M. S. SAGARE

"Social Transformation Through Dynamic Education"

Bharati Vidyapeeth

Bharati Vidyapeeth Bhavan, L.B.S. Marg, Pune - 411 030.
(DONATIONS ARE EXEMPTED FROM INCOME-TAX VIDE NO. P 165/B-40)



: FOUNDER :
Dr. PATANGRAO KADAM
M.A., LL.B., Ph.D.



MESSAGE

It gives me immense pleasure to extend my warm greetings on the occasion of the International Conference on "Classical Languages and Literatures: Past, Present and Future", organized by Bharati Vidyapeeth's Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli on 13th February, 2026.

Classical languages and literatures form the intellectual and cultural foundation of human civilization. They are not merely repositories of ancient knowledge, but living traditions that continue to influence modern thought, philosophy, linguistics, ethics and aesthetics. In an era of rapid technological advancement and globalization, revisiting classical wisdom enables us to achieve a meaningful balance between tradition and modernity.

This international conference provides a valuable academic platform for scholars, researchers, academicians and students to engage in critical dialogue, exchange research insights and explore the relevance of classical studies in contemporary and future contexts. Such scholarly initiatives play a vital role in preserving linguistic heritage while encouraging innovative interpretations and interdisciplinary research.

As an institution dedicated to excellence in higher education, we strongly encourage such academic initiatives that promote dialogue, critical inquiry and collaborative research. I am confident that the deliberations and research papers presented in this journal will contribute significantly to the academic community and inspire further exploration in the field of classical languages and literatures.

I extend my best wishes for the grand success of the conference and congratulate all those associated with this scholarly endeavor.

With best regards,

Dr. Vishwajit Kadam
Secretary, Bharati Vidyapeeth
Pro Vice Chancellor,
Bharati Vidyapeeth (Deemed to be University), Pune

Pub. Trust No. F/277-Poona • Soc. Reg. No. Bom./441 Poona • Phone : 24325701, 24407100, 24407199 • Fax : 020-24339121
Website : http://www.bharatividyapeeth.edu, E-mail : info@bharatividyapeeth.edu

Bharati Vidyapeeth
(Deemed to be University)
Pune, India.
Founder Chancellor : Dr. Patangrao Kadam

★ Accredited with 'A++' Grade (2024) by NAAC ★
★ Category-I University Status by UGC ★
★ NIRF Ranking - 59 ★

"Social Transformation Through Dynamic Education"

Prof. Dr. Shivajirao Kadam
Chancellor M.Sc., Ph.D.

Prof. Dr. Vivek A. Saoji
M.B.B.S., M.S.(Surg.)
Vice Chancellor

Estd. 1964 Celebrating 50 and Beyond BHARATI VIDYAPEETH

Dr. Vishwajeet Kadam
B.Tech., M.B.A., Ph.D.
Pro Vice Chancellor

G. Jayakumar
M.Com., Dip.Pub.Admn.
Registrar



MESSAGE

It is with profound pleasure and a deep sense of academic fulfilment that I extend my warm greetings to the distinguished scholars, academicians, researchers, students, and delegates gathered for the International Conference on Classical Languages and Literatures: Past, Present and Future. I am honoured to be associated with this intellectually enriching academic endeavour, which seeks to celebrate, reinterpret, and reimagine the timeless legacy of classical traditions across cultures and civilizations.

Classical languages and literatures constitute the living archives of human consciousness. They embody the collective wisdom, aesthetic sensibility, ethical reflections, and philosophical inquiries of civilizations that have shaped the course of human history. From foundational ideas in philosophy and science to enduring literary forms and moral frameworks, classical texts have served as the bedrock upon which modern knowledge systems have been built. Their study is not merely an engagement with antiquity, but a dialogue with enduring ideas that continue to inform and inspire contemporary thought.

In the present era—marked by rapid technological transformation, cultural homogenization, and accelerating globalization—the relevance of classical knowledge systems assumes renewed significance. Classical texts nurture critical thinking, moral discernment, linguistic sensitivity, and a refined aesthetic consciousness. They enable us to transcend temporal boundaries, fostering intercultural understanding and offering insights that remain strikingly relevant to present-day intellectual and social challenges. Revisiting these traditions allows us to anchor modern progress in enduring human values.

..2..

Bharati Vidyapeeth Bhavan, Lal Bahadur Shastri Marg, Pune - 411 030 (INDIA)
Tel. : +91-20-24407100, 24325701 Fax: +91-20-24339121, 24321910 | E-mail : bvuniversity@bharatividyapeeth.edu | Web : www.bvuniversity.edu.in

This conference, by bringing together diverse scholarly voices from across the globe, provides a vital platform for meaningful academic dialogue. Through interdisciplinary perspectives, comparative literary studies, translation practices, and innovative pedagogical approaches, it seeks not only to reaffirm the relevance of classical studies in the contemporary world but also to chart visionary pathways for their future preservation and dissemination. Such scholarly engagements are essential for ensuring that classical languages and literatures continue to thrive as dynamic and evolving fields of study.

I am confident that the deliberations, research presentations, and interactive discussions during this international conference will lead to fruitful intellectual exchanges and inspire collaborative research across disciplines and geographical boundaries. Platforms of this nature play a crucial role in strengthening the humanities and instilling a deeper appreciation for our linguistic and literary heritage among younger generations of scholars and students.

I place on record my sincere appreciation of the Organizing Committee for their academic foresight, dedication, and meticulous efforts in conceptualizing and executing this international conference. The conference souvenir stands as a valuable scholarly document, capturing the intellectual ethos, academic rigor, and collective aspirations of this gathering.

On behalf of Bharati Vidyapeeth (Deemed to be University), Pune, I extend my best wishes for the grand success of this conference. May it contribute meaningfully to the conservation, revitalization, and global dissemination of classical languages and literatures, and may it inspire continued scholarly engagement with humanity's rich intellectual inheritance.

With best wishes for an intellectually stimulating and rewarding academic experience.

With warm regards,

Prof. Dr. Shivajirao Kadam
Chancellor

प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी
एम.एससी., पीएच.डी.
प्रभारी कुलगुरू

Prof. (Dr.) Suresh Gosavi
M.Sc.,Ph.D.
Ag. Vice Chancellor

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC

शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी (कार्या.) : (०२३१) २६०९०६०
Tel. (Office) : (0231) 2609060
E-mail : vcoffice@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in



MESSAGE

It gives me immense pleasure to extend my warm greetings to the organizers, scholars, and participants of the International Conference on Classical Languages and Literatures: Past, Present and Future. I heartily congratulate Bharati Vidyapeeth's Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli for organizing this significant academic event that brings together eminent scholars and researchers to have discussion upon the enduring legacy and contemporary relevance of classical languages and literary traditions.

Classical languages are the living repositories of human knowledge, culture, philosophy, and wisdom. They have shaped civilizations, enriched intellectual traditions and cultures. They have also laid the foundations of modern languages and literatures across the world. Revisiting classical languages is not merely an academic pursuit but a cultural responsibility in an era of rapid globalization and technological advancement. It is an essential for preserving our rich heritage and sustaining intellectual continuity.

This conference provides a timely and meaningful platform to explore classical languages and literatures from interdisciplinary and comparative perspectives, addressing their historical roots, present interpretations, and future possibilities. Such scholarly engagements encourage critical thinking, research innovation, and a deeper understanding of cultural diversity.

I am confident that the, discussions, and scholarly exchanges during this conference will contribute significantly to the advancement of knowledge and inspire future research in classical studies. I wish the conference every success and hope that it serves as a catalyst for meaningful academic collaboration at national and international levels.

With best wishes,

31 JAN 2026

Prof. (Dr.) Suresh Gosavi
Ag. Vice Chancellor



प्रा. (डॉ.) जे. पी. जाधव
एम.एस्सी., पीएच्.डी.
प्रभारी प्र-कुलगुरू
Prof. (Mrs.) J. P. Jadhav
M.Sc., Ph.D.
Ag. Pro-Vice-Chancellor

Estd : 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी : कार्यालय - (०२३१) २६०९०६१
Tel. : Office - (0231) 2609061
E-mail : pvcoffice@unishivaji.ac.in
: jpj_biochem@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in

MESSAGE

It gives me great pleasure to extend my heartfelt greetings to the organizers, scholars, and participants of the International Conference on Classical Languages and Literatures: Past, Present and Future. I congratulate the host institution Bharati Vidyapeeth's Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli for taking this meaningful academic initiative that provides an excellent platform for intellectual exchange and scholarly engagement at the international level.

Classical languages and literatures are invaluable repositories of human thought, culture, philosophy, and wisdom. They have played a pivotal role in shaping civilizations, preserving cultural identities, and enriching intellectual traditions across generations. In the contemporary academic landscape, the study of classical languages not only deepens our understanding of the past but also offers critical perspectives that are essential for addressing present challenges and envisioning future possibilities.

This conference, by bringing together diverse perspectives from scholars and researchers, seeks to explore the continuity and transformation of classical traditions across time. Such academic deliberations foster interdisciplinary research. It also promotes cultural awareness, and contributes significantly to strengthening the academic and research ecosystem.

I am confident that the discussions, research paper presentation, and scholarly interactions during this conference will generate valuable insights and inspire future research in the field of classical studies. I wish the conference every success and hope it proves to be a rewarding and enriching experience for all participants.

With best wishes,

31 JAN 2026

Prof. (Mrs.) Jyoti Jadhav
Ag. Pro-Vice Chancellor

संपादकीय

"भाषा आणि साहित्याची अभिजातता आणि वर्तमानाचे उत्तरदायित्व'
परिषद आयोजना मागील भूमिका आणि संकल्प साकारताना...



प्राचार्य डॉ. विवेकानंद अर्जुनराव रणखांबे
भारती विद्यापीठाचे
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली

ज्ञानेश्वरीच्या सात दिवसांच्या पारायणात, प्रत्येक दिवशी कोणत्या आशयाचा अभंग निरूपणासाठी निवडावा? याचे काही संकेत आहेत. पहिल्या दिवशी नाम-रूपाचा तर शेवटच्या दिवशी (काल्याच्या कीर्तना आधी) धन्यतेचा अभंग निरुपणासाठी घेतला जातो. चक्रधरांच्या जीवनावरील 'लीळा चरित्रापासून', तसेच जैन साहित्याच्या 'श्री चामुंडराये करवियले, गंगराये (गंगाजे) सुत्ताले करवियले,' या एकाच ठिकाणी तमिळ, कन्नड आणि मराठीत सापडणाऱ्या श्रवण-बेळगोळ येथील शिलालेखा पासूनच्या आजवरच्या मराठी भाषा आणि साहित्य परंपरेतील ३ ऑक्टोबर, २०२४ हा दिवस, मराठी सारस्वताच्या इतिहासातील 'धन्यतेच्या अभंग गायनाचा दिवसच' म्हणावा लागेल. तुकारामांच्याच भाषेत सांगायचं तर:

धन्य मी मानीन आपुले संचित, राहिलीसे प्रीत तुझ्या नामी ।
धन्य झालो आता यासी संदेह नाही, की पडो हा देह काळ ॥

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मा. पंतप्रधानांच्या अभिनंदनासाठी मुंबई येथे एक विशेष सभा पार पडली. त्यावेळी श्रोत्यांच्या मध्ये बसले होते या देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस आणि समस्त मराठी श्रोत्यांच्या वतीने व्यासपीठावरून बोलत होते, जगद्वंद्य जगद्गुरू संतश्रेष्ठ, संतशिरोमणी श्री. तुकाराम महाराज यांचे वंशज डॉ. सदानंद मोरे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्या बद्दल मा. पंतप्रधान यांचे आभार मानित, मराठी माणूस मराठीच्या अभिजाततेचा आदर करील, भाषेच्या संवर्धनासाठी, ती वैभवाप्रत नेण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करील, असे आश्वासनही डॉ. मोरे सरांनी आपल्या भाषणातून दिले. पुढील काळात त्या आश्वासनाला पुष्टी देण्यासाठी भारती विद्यापीठाने काय केले? शिवाजी विद्यापीठाने काय केले? मराठी ही ज्यांची मातृभाषा आहे, त्यांनी नेमके काय केले? व्यावसायिक उत्तरदायित्वाची जबाबदारी असलेल्या प्राध्यापकांनी या विषयी काय योगदान दिलं? या आणि अशा कितीतरी प्रश्नांची उत्तरं घेवून आणि भाषा आणि साहित्य विषयक उत्तरदायित्वाचं नैतिक ओझं स्वीकारून, या परीषदेचं यज्ञोपवीत धारण करण्याचं आम्ही ठरवलं.

परंतु या परीषदेच अवकाश केवळ मराठी भाषेपूरतं मर्यादित असू नये, ते थोडं व्यापक असावं या हेतूने, प्रथम भारतीय अभिजात भाषां आणि नंतर परदेशी अभिजात भाषांचा समावेश करण्याचं सुतोवाच झाल आणि व्यापक स्वरूपाचा 'अभिजात भाषा आणि साहित्य: भूत, वर्तमान आणि भविष्य' असा विषय डॉ. तारा भवाळकर यांच्याशी चर्चा करून निश्चित केला गेला.

नाट्याचार्य श्री. कृ. प्र. खाडिलकर यांच्या वास्तव्याने धन्य झालेल्या सांगलीवाडीच्या या भूमीत, याच भूमीची लेक असलेल्या डॉ. तारा भवाळकर यांच्या संमेलनअध्यक्ष पदाच्या संधीकाळात, एकही दिवस न-चुकता असे अनुक्रमे सुमारे १२५ वर्षे आणि १०२ वर्षे सुरु असलेल्या ह. भ. प. गुरुनाथ महाराज कोटणीस आणि ह. भ. प. केळकर कुलांच्या जिथे अखंड कीर्तन परंपरा साजऱ्या होत आहेत, शतकोत्तर वाटचाल केलेल्या शिक्षण संस्था जिथे वसल्या आहेत, तिथे 'अभिजात भाषा आणि साहित्य: भूत, वर्तमान आणि भविष्य' याची चर्चा व्हावी, या हेतूने हा संकल्प महाविद्यालयाने उरीशिरी धरला.

या आधीच नमूद केल्याप्रमाणे ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आणि मराठी भाषा इतिहासाचा एक महत्वाचा टप्पा गाठला गेला. मुळात अभिजात भाषा अशा संकल्पनेवर आधारित भाषेकडे गांभीर्याने पहाण्यास सुरुवात झाली त्यालाच जवळपास दोन तपांचा काळ उलटला आहे. भाषेला अभिजात दर्जा मिळणे हा काही मुलभूत गरजांच्या इतका गांभीर्याने घेण्याचा विषय नसला तरीही भाषिक अस्मिता, अभिजात दर्जा मिळाल्यानंतर त्याबद्दल सर्व, ज्ञानी आणि अज्ञानी, निरागस लोकांच्या प्रतिक्रिया बघितल्यावर आपल्या सामाजिक परिपक्वतेची स्थिती-गती आणि शहाणपणाची कल्पना येते.

भारती विद्यापीठाचे संस्थापक, कुलपती डॉ. पतंगराव कदम साहेब यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम करायला शिकविले. आपल्या मंत्री पदाच्या काळात साहेब आणि डॉ. विश्वजित कदम दोघेही मराठी भाषा विभागाचे मंत्री होते. अभिजात भाषेच्या मान्यतेचा आग्रह दोघांनीही आपापल्या मंत्रिपदाच्या काळात धरला होता. साहजिकच 'अभिजात भाषा आणि साहित्य: भूत, वर्तमान आणि भविष्य', या आंतरराष्ट्रीय परिषदेचे संयोजन करताना, साहित्य परिषद, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा यांसारख्या काही संस्थां सोबत असणे अपेक्षित होते.

भारतात उदयास आलेल्या हिंदू, जैन आणि बौद्ध तत्वज्ञानाचा काही वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठात संस्कृत, प्राकृत, अर्धमागधी, पाली, उर्दू, कन्नड आदी भाषांचे समृद्ध विभाग होते. आज २०२६ मध्ये हे सर्व विभाग हे तासिका तत्वावरील प्राध्यापक चालवितात. अगदीच एखाद्या ठिकाणी पूर्णवेळ प्राध्यापक उपलब्ध आहे. विद्यापीठातील सातारा, कराड, कोल्हापूर, सांगली, उमदी, इचलकरंजी आदी ठिकाणी असलेले अभिजात भाषां विभाग शक्य तेव्हडे योगदान देत पुढे चालले आहेत. परंतू, यातील कितीतरी विभाग आज मरणासन्न अवस्थेत आहेत. ही अत्यंत शोचनीय बाब आहे.

इंग्रजी साहित्याच्या इतिहासात एक निबंध आहे. त्या निबंधात एक सैनिक आपल्या पेशाच्या, व्यवसायाच्या महानते बद्दल, घोडेस्वारीच्या कौशल्याबद्दल मोठ्या अभिमानाने बोलतो. ज्याचा जो व्यवसाय त्याने त्या बद्दल किमान अभिमानाची भावना राखणे, हे रास्तच आहे. अशा वेळी अभिजात भाषेचा विषय जेंव्हा समाजाच्या पटलावर चर्चिला जातो, तेंव्हा त्याच्या साधक-बाधक पैलूंची चर्चा करून समाजाला योग्य-अयोग्य हे सांगत असतानाच काही सजातीय विचारांची मांडणी करण्याचे कामही साहित्यिक, समिक्षक, भाषा-अभ्यासक, प्राध्यापक, शाळांमधील भाषा-शिक्षक आणि भाषेबद्दल अभिमान बाळगणाऱ्या सर्वांनीच केले पाहिजे. अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठीचे निकष काय असावेत? याचे उत्तर साधे सोपे आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी केंद्र सरकारने निश्चित केलेले प्रमुख निकष खालीलप्रमाणे आहेत, जे भाषेच्या प्राचीनतेला आणि समृद्धतेला अधोरेखित करतात:

- भाषा प्राचीन आणि साहित्य श्रेष्ठ असावे.
- भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे.
- प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा.
- स्वयंभूपण (Originality): भाषेची परंपरा स्वयंभू असावी, ती दुसऱ्या भाषेतून उसनी घेतलेली नसावी.
- वेगळेपण: अभिजात भाषेचे स्वरूप आणि तिचे साहित्य हे आधुनिक भाषेपेक्षा वेगळे असावे, आणि प्राचीन व आधुनिक रूपात मोठी तफावत असू शकते. सोप्या भाषेत, ज्या भाषेचा पाया अत्यंत प्राचीन, स्वतंत्र आणि समृद्ध साहित्याने भरलेला आहे, तिला 'अभिजात भाषा' (Classical Language) मानले जाते.

अशा पार्श्वभूमीवर, भाषेच्या अभिजाततेच्या विविधांगी पैलूंवर प्रकाश टाकणे गरजेचे आहे. कारण भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठीचा पाया हा कित्येक शतकांपूर्वीच्या पिढ्यांनी रचला आहे. त्या काळी त्यांना कदाचित 'अभिजात नावाची संकल्पना, भविष्यात कधीतरी जन्माला येईल', हे कदाचित माहीतही नसेल. पण त्यांनी अनाहूतपणे, अजाणतेपणे, कोणत्याही

लाभा खेरीज केलेल्या भाषेच्या सेवेमुळे आज हे भाषा वैभव शक्य झाले आहे. याला कधी यश येईल? याचा विचार न करता, कित्येक पिढ्यांनी त्यासाठी योगदान दिले आहे.

तथापि काही मान्यवरांनी 'अभिजात भाषा म्हणजे अनुदान मिळविण्याचा एक मार्ग', असा अत्यंत क्षुद्र आणि संकुचित अर्थ काढून दिशाभूल केली आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. किमान भूतकाळातील त्या पिढ्यांच्या परिश्रमांचे अवमूल्यन तरी होऊ नये, इतकी रास्त अपेक्षा आपण त्यांच्या कडून ठेऊ शकतो. अन्यथा, 'देशसेवेत आयुष्य काढलेला आणि लढाईची संधी मिळाली नाही म्हणून जो जगला, असा एखादा जवान केवळ पेन्शनसाठीच जगला, असे जसे म्हणता येत नाही', अगदी त्या प्रमाणेच अभिजात दर्जा हा अनुदानासाठी केलेला खटाटोप नव्हे, हे त्यांनी ध्यानी घावं.

'अभिजातता' या शब्दातून भाषेच्या वैभवा-बद्दल, वारश्या-बद्दल, तिच्या प्राचीनते-बद्दल, एक औसुक्यपूर्ण आदर व्यक्त होतो. तिच्या लालित्यपूर्ण, कांठीण्यपूर्ण, भावसामर्थ्याच्या अभिव्यक्ती बद्दल, साहित्य प्रकारांच्या रेलचेली-बद्दल, भाषेच्या आनंददायी उलगडी बद्दल, ती भाषा वापरणाऱ्याच्या मनी असणारा आणि कशानेच पुसला न जाणारा प्रभाव, महाकाव्यादी रचनांच्या साध्या नामोछ्चारानेही त्याच्या मनी दाटून येणारा अनाहूत आदरभाव म्हणजे भाषेची त्या भाषेची अभिजातता.

जगाच्या इतिहासात काही भाषा जन्मास आल्या आणि मानवी औदासिन्यापोटी विसर्जन पावल्या. प्रत्येक भाषेच्या इतिहासात काही पिढ्यानी महाकाव्याच्या रचना केल्या, काहींनी व्याकरणाचा पाया घातला, काही पिढ्यांनी वृत्त-छंदांची निर्मिती केली. स्वत:च्या कुवतीप्रमाणे काही पिढ्यांनी गद्य-पद्य प्रकार हाताळले, काहींनी शब्द-भांडार वाढविले. कल्पनाविलासाचे वाडे बांधले. अशा वेळी जेंव्हा राजकीय आक्रमणे, धर्मसत्तांची आक्रमणे, ही आपसूकच भाषेवरील गंडांतरे ठरली, ज्यावेळी, अर्थार्जनाची भाषा म्हणून परकीय भाषांचा प्रभाव वाढू लागला, तेंव्हा देखील स्व-भाषिकांनी आपली साधना सुरूच ठेवली. त्यामुळेच तर इंग्रजी अंमलाच्या काळातही संगीत नाट्यसृष्टीचा सूर्य हा मराठीला शाश्वत वैभव प्रदान करीत असल्याचे इतिहास आपल्याला सांगतो. महाकाव्यांतील भाषा-सौष्ठवाशी नातं सांगणारी सावरकरांची कविता जन्माला आली.

भाषेतील वेगवेगळ्या प्रकारच्या कांठिण्य-पातळ्या या भाषेच्या साधकांना खुणावत गेल्या. साधनेतून त्यांचे अनुकरण करण्याचे प्रयत्न झाले. नाही जमले तर प्रसंगी काही पिढ्यांनी त्याचे वहन केले. भाषिक, राजकीय, धर्मसत्तांच्या आक्रमणात काही पिढ्यांनी याच वैभवशाली वारशाचे जीवापाड जतन केले. यासाठीच हजारो पिढ्यांच्या अनामिक साधनेची नोंद नसलेल्या, कितीतरी बिंदूंनी जोडलेल्या रेषेच्या दुसऱ्या टोकावर, ३ ऑक्टोबर २०२४ हा दिवस उभा आहे, याची वर्तमानातील पिढ्यांनी गांभीर्यपूर्वक नोंद घेतली पाहिजे. अन्यथा शाहीर राम जोशी म्हणतात, त्या प्रमाणे:

घेउनी उत्कंठेने, वाचावा गत-इतिहास, झिजवावी त्याची पाने, सोडावा दीर्घ-श्वास

आठवून त्या त्या गोष्टी, लक्षुनी आजची दृष्टी, अंतरात व्हावे कष्टी,

ऐसे-कैसे सहजची म्हणता? एक-काळ ऐसा होता, एक काळ ऐसा होता. (काव्य-प्रकार: फटका)

भाषा हे संवादाचे, समाजाला शाश्वत वैभव प्राप्त करून देणारे, जीवनाला आधार देणारे, भावभावनांची नेमकी अभिव्यक्ती करीत मानवी जीवनाची मानसिक भूक भागवणारी एक अधिभौतिक माध्यम आहे. साहजिकच तिचा विकास करणं, तिला वैभव प्राप्त करून देणे, तिचा ऱ्हास, पडझड थांबवणं, ही समाजातील भाषेचा वापर करणाऱ्या सामान्य माणसाची जबाबदारी निश्चितच नाही. ती जबाबदारी आहे विद्यापीठांची, महाविद्यालयीन प्राध्यापकांची, भाषा आणि साहित्य संशोधकांची, लेखकांची आणि महत्वाचे करून सरकारची, शासन व्यवस्थेची, राजाश्रयाची. सामान्य माणसाने त्या भाषा आणि साहित्याचे केवळ आग्रहपूर्वक वहन करायचे आहे. आपल्या भाषेबद्दल अभिमान बाळगायचा आहे.

नविन शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान परंपरेचा जाणीव पूर्वक आग्रह धरला आहे. अशा वेळी या मुलभूत भारतीय तत्वाज्ञांनाच्या अभिजात स्त्रोतांचे पुढे काय होणार? कि राजकीय इछ्छेच्या अभावापोटी या अभिजात भाषांचे हे विभागही बंद होणार का? शिक्षणाचा संपूर्ण संबंध हा केवळ अर्थार्जनाशी लावला गेलेल्या आजच्या या जगात कुणी भाषेप्रती असलेल्या उत्तरदायित्वाचा विचार करणार आहे का? भाषा आणि साहित्य विषयक संस्था, शासन, प्राध्यापक, विद्यार्थी, ज्या ज्या धर्मांचे तत्वज्ञान त्या भाषेत लिहिले गेले आहे, त्या त्या धर्म-संस्था, साहित्य संस्था, हे याचा विचार करून भविष्यातील काही नियोजन करणार आहेत काय? पृथ्वीवरील मानवी जीवनाच्या अस्तित्वासाठी, पर्यावरणाच्या क्षेत्रात अवकाशात केवळ ओझोनच्या स्तराला पडलेल्या छिद्रा इतकाच, भाषा-संवर्धनाचा विचार महत्वाचा आहे. या संकल्पाप्रति असणारी अनास्था परवडणारी नसेल. अन्यथा हजारो वर्षांपूर्वी लिहिली महाकाव्ये, नाटके, काव्य आदींचे केवळ गोडवे गात आणि भूतकाळाचे

स्मरण करीत नवनिर्मिती शिवाय पुढे जात राहू. यासाठीच भाषा आणि साहित्याची अभिजातता याप्रति वर्तमानाच्या उत्तरदायित्वाचा विचार मांडण्यासाठी या परिषदेचे आयोजन केले आहे.

या परिषदेसाठी सुमारे ११ देशांतील आणि भारतातील ६ राज्यातील सुमारे ३०५ हून अधिक लोकांनी सहभाग नोंदविला. संस्कृत, प्राकृत, मराठी, इंग्रजी, कन्नड, उर्दू आणि हिंदी अशा पांच भाषातून, भाषां आणि साहित्य या विषयांवरील एकूण १७७ लेखांचे लेखन झाले. भारतीय भाषांतील पहिला आणि इंग्रजी भाषेतील लेखांचा दुसरा अशा दोन समर्थ खंडात संशोधन लेख प्रसिद्ध करण्याचा मनोदय आहे. अर्थात ज्ञाननिर्मिती होत हा ज्ञानयज्ञ संपन्न होत आहे, याचा भारती विद्यापीठाला उच्च-शिक्षण क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्थाम्हणून वाटचाल करताना अभिमान वाटतो.

ज्यांनी मराठी भाषा विभागाचे मंत्री म्हणून काम केलं असे भारती विद्यापीठाचे सन्माननीय कार्यवाह डॉ. विश्वजित कदम, महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा मा. विजयमाला कदम, या कॉन्फरन्सच्या फ्लायरचे अनावरण करणाऱ्या सौ. स्वप्नाली कदम यांच्या प्रति मनापासून कृतज्ञता व्यक्त करीत, या कॉन्फरन्सच्या नियोजनासाठी हातभार लावलेल्या प्रत्येक सहकाऱ्याने दिलेल्या सह्योगाबद्दल समाधान व्यक्त करीत, हा विशेषांक आपणास सुपूर्त करतो.

प्राचार्य डॉ. विवेकानंद अर्जुनराव रणखांबे
भारती विद्यापीठाचे
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली

Editor's Message



It is my privilege to present this special journal issue comprising selected papers from the International Conference on Classical Languages and Literatures: Past, Present and Future. This publication seeks to provide a scholarly platform that brings together diverse academic perspectives on classical languages and literary traditions, highlighting their enduring relevance and interdisciplinary significance.

Classical languages serve as enduring repositories of human knowledge, culture, and wisdom, preserving the philosophical, ethical, and socio-political thought traditions associated with Gautam Buddha, Bhagawan Mahavir, Sant Dnyaneshwar, Sant Tukaram, and Chhatrapati Shivaji Maharaj. They have shaped civilizations, enriched intellectual traditions, and laid the foundations of modern languages and literatures across the world, thereby strengthening the academic ecosystem. In the contemporary academic context, critical engagement with classical texts offers valuable insights into linguistic evolution, literary theory, cultural history, philosophy, science, and the Indian Knowledge System.

We have received an overwhelming response from the academic community, with more than 188 research papers submitted in Sanskrit, Kannada, Pali, Prakrit, Marathi, Hindi, Urdu, and English. The papers included in this issue were selected after a rigorous peer-review process and reflect original research, critical analysis, and innovative methodologies. The wide linguistic and thematic diversity of the submissions underscores the vibrancy of classical studies and the continued relevance of multilingual scholarly traditions.

This publication would not have been possible without the dedicated efforts of the reviewers, editorial board members, organizing committee, and contributors, whose academic commitment ensured the scholarly quality of this issue. I extend my sincere gratitude to all the authors for their valuable contributions and to everyone who supported the successful organization of the conference.

It is hoped that this journal issue will make a meaningful contribution to on-going academic discourse and inspire further interdisciplinary and multilingual research in the field of classical languages and literatures.

Dr. Naresh Devidas Pawar
Assistant Professor
Bharati Vidyapeeth's
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli



Dr. Vishwajit Kadam
Secretary, Bharati Vidyapeeth, Pune
Pro Vice Chancellor BV(DU),Pune

'Social Transformation Through Dynamic Education'

Bharati Vidyapeeth's
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli
(Accredited with 'A' grade by NAAC, Bengaluru (CGPA-3.10)
Affiliated to Shivaji University, Kolhapur

International Conference
On

'Classical Languages and Literatures: Past, Present and Future'
अभिजात भाषा आणि साहित्यः भूत, वर्तमान आणि भविष्य
Friday, 13th February 2026



Dr. Patangrao Kadam
Founder, Bharati Vidyapeeth
Founder- Chancellor BV(DU), Pune

Organized by
Departments of Languages & IQAC

in collaboration with

- **Karmveer Bhaurao Patil University, Satara**
- **Maharashtra Sahitya Parishad, Pune**
- **Shivaji University, Kolhapur**
- **Bharati Vidyapeeth (Deemed to be University), Pune**

Patrons

Hon'ble Dr. Vivek Saoji
Vice Chancellor
Bharati Vidyapeeth (Deemed University), Pune

Hon'ble Vijaymala Kadam
Chairperson
College Development Committee

Hon'ble Dr. Shivajirao Kadam
Chancellor
Bharati Vidyapeeth (Deemed Uniwmatty). Pune

Advisory Committee

Prof. (Dr) Suresh Gosavi
Ag-Vice Chancellor
Shivaji University,Kolhapur

Prof. (Dr) Jyoti Jadhav
Ag. Pro Vice Chancellor
Shivaji University,Kolhapur

Dr. Mahadev Sagare
Joint Secretary
Bharati Vidyapeeth, Pune

Dr. Kakasaheb D. Jadhav
Joint Secretary
Bharati Vidyapeeth, Pune

Prof. (Dr) Nandkumar More
Department of Marathi
Shivaji University,Kolhapur

Prof. (Dr) Prabhanjan Mane
HoD, Dept of English
Chairman, BoS, English, SU-Kolhapur

Prof. (Dr) Satappa Sawant
Chairman BoS, Hind
Shivaji University,Kolhapur

Dr. Rajashri Barvekar
Department of English
Shivaji University,Kolhapur

Dr. Kavita Gagarani
HoD. Dept of History
New College, Konapur

Organizing Committee

Organizing Chairman
Prof. (Dr) Vivekanand A. Rankhambe
Principal and Editor

Dr. Dada P. Nade
Coordinator

Ms. Rohini D. Waghamare
Convener

Dr. Krishna M. Bhawari
Organizing Secretary

Dr. Amit R. Supale
IQAC Coordinator & Vice Principal

Dr. Ananda S. Sapkal
Vocational Section

Mr. Arun L. Jadhav
Jr. Section

Dr. Sachin R. Jadhav
Co- Treasure

Dr. Naresh D. Pawar
Treasure & Co- Editor

अभिजात भाषा म्हणजे नेमकं काय?

डॉ. तारा भवाळकर
अध्यक्षा
९८ वे मराठी साहित्य संमेलन, नवी दिल्ली

नमस्कार,

आपल्या महाविद्यालयाने 'अभिजात भाषा आणि साहित्य. भूत, वर्तमान आणि भविष्य' या विषयावर आंतर राष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे या अनुषंगाने एक अत्यंत महत्त्वाचा आणि मूलभूत प्रश्न आपल्या समोर उभा राहतो. अभिजात भाषा म्हणजे नेमकं काय?

मराठी भाषेला नुकताच केंद्र शासनाकडून अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आलेला आहे. त्यामुळे अलीकडे या विषयावर मोठ्या प्रमाणावर चर्चा होताना दिसते. हा दर्जा मिळाल्यानंतर मला जाणून घ्यावंसं वाटलं की अभिजात या शब्दाचा नेमका अर्थ काय आहे. म्हणून मी मुद्दाम शब्दकोश पाहिले. शब्दकोशात 'अभिजात' या शब्दाचा अर्थ देताना सुसंस्कृत, उच्च, अभिजनांचा असा अर्थ दिलेला आढळतो. म्हणजे जे काही उच्च दर्जाचं, सुसंस्कृत आहे मग ते साहित्य असो, माणसं असोत, भाषा असो किंवा कला असो त्याला अभिजात असं म्हटलं जातं.

पण इथेच एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. हे 'उच्चत्व' ठरवायचं कोणी? आणि ते कसं ठरवलं जातं? अभिजात भाषेचा दर्जा देताना शासनाने एक अभ्यास समिती नेमलेली होती. त्या समितीला काही ठराविक निकष देण्यात आले होते. हे निकष भाषाशास्त्रज्ञांनी आणि अभ्यासकांनी ठरवलेले होते. मग अभिजात भाषा कशाला म्हणायची, यासाठी काही महत्त्वाचे निकष निश्चित करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. पहिली म्हणजे संबंधित भाषा किमान दोन हजार वर्षे अस्तित्वात असली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे त्या भाषेच्या अस्तित्वाचे लेखी म्हणजे लिखित आणि व्यावहारिक म्हणजे मौखिक-असे दोन्ही प्रकारचे पुरावे उपलब्ध असले पाहिजेत. तिसरी गोष्ट म्हणजे त्या भाषेमधून जे साहित्य निर्माण झालेले आहे, ते साहित्य आजही अस्तित्वात असले पाहिजे. तसेच ती भाषा लिखित आणि मौखिक—या दोन्ही स्वरूपांत सलगपणे वापरात असली पाहिजे. म्हणजे तिच्या प्रवासात कुठेही खंड पडलेला नसावा.

या सर्व निकषांवर ज्या भाषा उतरल्या, त्यांनाच शासनाने अभिजात भाषेचा दर्जा दिला. आता मराठी भाषेच्या बाबतीत बोलायचे झाले, तर आपण शिक्षणामध्ये किंवा पुस्तकांमध्ये जी मराठी भाषा वापरतो, तिला भाषाशास्त्रज्ञांनी "प्रमाण भाषा" असे संबोधले आहे.

प्रत्यक्ष जगण्यात आपण जे बोलतो, त्या भाषा म्हणजे 'बोली' असतात. या बोली निरनिराळ्या प्रकारच्या असतात. काही बोली प्रदेशविशिष्ट असतात, तर काही कालविशिष्ट असतात. म्हणजे भौगोलिक अंतर वाढले की बोली बदलते आणि काळ बदलला की बोलीत सुद्धा बदल होत जातो. उच्चार बदलतात, व्याकरणात बदल होतो, वाक्यरचना बदलते. हे सगळे बदल एकदम होत नाहीत; ते हळूहळू, कालमानानुसार घडत जातात. याचं मुख्य कारण असं आहे की भाषा ही बोलली जाणारी, जिवंत आणि जैविक संस्था आहे.

भाषेचे मूळ कार्य काय आहे, तर समाजामध्ये माणसांच्या विचार, भावना आणि संवेदना यांची देवाणघेवाण करणे. ही देवाणघेवाण दोन्ही बाजूंनी झाली पाहिजे. म्हणजे नुसते बोलणाऱ्याने काहीतरी सांगणे पुरेसे नसते; ते ऐकणाऱ्याला समजले पाहिजे आणि आपण जे बोलतो ते ऐकणाऱ्याला समजले आहे, हे बोलणाऱ्यालाही कळले पाहिजे. त्यासाठी ऐकणाऱ्याकडून पुन्हा प्रतिसंदेश मिळणं आवश्यक असतं. म्हणून भाषाशास्त्रात याला संप्रेषण व्यवहार किंवा संदेशांची देवाणघेवाण असे म्हटले जाते.

भाषेमधून जे काही व्यक्त होतं, ते निरनिराळ्या प्रकारचे भाषिक संदेश असतात. या संदेशांमधून भावना, विचार, तत्त्वज्ञान आणि अनुभव यांची अभिव्यक्ती होत असते. आता ही देवाणघेवाण सुलभ व्हावी, विशेषतः एका भाषिक

प्रदेशामध्ये—ग्रंथनिर्मिती करताना किंवा शिक्षण क्षेत्रात—यासाठी एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते. ती म्हणजे प्रत्येक व्यक्तीची बोली ही जन्मजात वेगळी असते. बोली म्हणजे उच्चारली जाणारी भाषा. दोन व्यक्तींचे उच्चार सारखे नसतात. ही परिस्थिती घराघरात, अगदी एकाच कुटुंबातही दिसून येते. इतकेच नाही, तर एखादी व्यक्तीही एकच शब्द आज ज्या पद्धतीने उच्चारते, तोच शब्द पाच मिनिटांनंतर तसाच उच्चारेल, याची खात्री देता येत नाही. कारण उच्चार करताना आपण दात, ओठ, घसा, श्वास अशा शरीरातील विविध अवयवांचा वापर करतो. या अवयवांचा जोर आणि स्थान प्रत्येक क्षणी कायम एकसारखे राहत नाही, त्यामुळे उच्चारात सूक्ष्म बदल होत जातो.

जसे एका व्यक्तीचा उच्चार बदलतो, तसाच दोन व्यक्तींमध्येही उच्चारात फरक असतो. आणि याहूनही अधिक, भौगोलिक अंतर वाढले की उच्चारांमध्ये बदल होतो, काळ बदलला की उच्चार बदलतात. म्हणूनच आपल्या आई-वडिलांची बोली आणि आपल्या आजी-आजोबांची बोली यामध्ये फरक आढळतो. या फरकाला भाषाशास्त्रात बोलीतील बदल (Dialect) असे म्हटले जाते. ही बोली पूर्णपणे वेगळी होत नाही; संपूर्ण बदल होत नाही. पण उच्चारांमध्ये, शब्दप्रयोगांमध्ये काही प्रमाणात बदल झालेला असतो. ही भाषा प्रामुख्याने उच्चारली जाते, आणि लेखन हे नंतर विकसित झालेले आहे. आधी उच्चार, मग लेखन आणि पुढे उच्चारानुसारी लेखन विकसित होत गेले. म्हणजेच जसा उच्चार, तसं लेखन.

लेखनासाठी जे संकेत किंवा खुणा वापरल्या जातात, त्यांना लिपी म्हणतात. जशा उच्चारांच्या खुणा असतात ध्वनीच्या, तशाच लेखनाच्याही खुणा असतात. प्रत्येक भाषेमध्ये या खुणा, म्हणजेच लिपी, वेगवेगळी असते. 'अ' या मुळाक्षराठी काय खूण करायची आहे, हे त्या त्या भाषेनुसार ठरतं. म्हणूनच प्रत्येक भाषेमध्ये त्या लिखित खुणा म्हणजेच लिपी वेगवेगळी असते. जशी मराठी भाषेची लिपी वेगळी आहे, इंग्रजीची लिपी वेगळी आहे, तशीच पाली भाषेची लिपीही वेगळी आहे. यावरून हे स्पष्ट होतं की भाषा आणि लिपी यांचा अतूट संबंध आहे. त्याचप्रमाणे बोली आणि लिपी यांचा अनुबंधही अत्यंत महत्त्वाचा असतो.

म्हणूनच प्रश्न असा निर्माण होतो की, कोणत्या भाषेसाठी कोणती लिपी वापरली जाते? आता भारतापुरते बोलायचं झालं, तर भाषेच्या आणि लिपीच्या दृष्टीने भारतात प्रामुख्याने दोन मोठे गट दिसून येतात. एक गट आहे उत्तरेकडचा म्हणजे उत्तर भारत, महाराष्ट्राच्या उत्तरेकडील प्रदेश. दुसरा गट आहे दक्षिणेकडचा म्हणजे महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील प्रदेश. महाराष्ट्राच्या उत्तरेकडील ज्या भाषा आहेत, त्यांना भाषाशास्त्रात आर्योद्भव भाषा असे म्हटले जाते. म्हणजे ज्या भाषांची मूळ उत्पत्ती समान आहे, त्या भाषा एकाच भाषा कुळात समाविष्ट केल्या जातात. भारतामध्ये प्रामुख्याने दोन प्रमुख भाषा कुळे मानली जातात—एक म्हणजे आर्य भाषा कुळ, आणि दुसरं म्हणजे द्रविड भाषा कुळ (दक्षिणेकडील).

मराठी भाषा ही आर्य भाषा कुळातील भाषा आहे. मराठी, बंगाली, पंजाबी, गुजराती या सगळ्या भाषा एका कुळातील असल्यामुळे त्यांच्यात काही प्रमाणात साम्यही आढळतं आणि भेदही दिसतो. तरीसुद्धा या भाषा एकमेकांच्या तुलनेने जवळच्या आहेत. त्यामुळे उच्चारांच्या आधारे त्या काही अंशी एकमेकांना समजू शकतात. उदाहरणार्थ, गुजराती माणसाला मराठी काही प्रमाणात समजू शकते आणि मराठी माणसालाही गुजराती समजण्याची शक्यता असते. परंतु कन्नड माणसाला मराठी सहज समजेल किंवा मराठी माणसाला कन्नड सहज समजेल, असं सहसा होत नाही. याचे कारण असं आहे की आर्य भाषांसाठी प्रामुख्याने देवनागरी लिपी वापरली जाते. बंगाली लिपी जरी थोडी वेगळी असली, तरी तिची रचना देवनागरी लिपीशी बऱ्याच अंशी जवळची आहे. त्यामुळे लिपी आणि भाषा यांचे नाते लक्षात घेतले, तर हे फरक समजून घेणं सोपं होतं.

एकाच किंवा जवळच्या लिपीमध्ये भाषा लिहिली गेली, तर ती भाषा अधिक सोपी वाटते, अधिक जवळची वाटते. म्हणूनच हिंदी आणि मराठी भाषिकांना एकमेकांचे बोलणे किंवा व्यवहार बऱ्याच अंशी समजू शकतो. तसेच हे गुजराती आणि बंगाली भाषांच्या बाबतीतही काही प्रमाणात शक्य होते. मात्र दक्षिणेकडील ज्या भाषा आहेत. ज्या द्रविड भाषा कुळातील आहेत—त्यांची लिपी पूर्णपणे वेगळी आहे. या भाषांमध्ये कन्नड, तमिळ, तेलुगू, मल्याळम् अशा भाषा येतात. शिवाय दक्षिणेतील काही पहाडी प्रदेशांतील बोली भाषाही या गटात येतात. या लिपींमध्येही परस्पर थोडेफार फरक असतात.

दक्षिणेकडील भाषा उच्चाराच्या दृष्टीने आणि लिपीच्या दृष्टीने आर्य भाषांपेक्षा खूपच वेगळ्या आहेत. म्हणूनच भाषाशास्त्रात यांना दोन स्वतंत्र भाषा कुळे मानली जातात. काही अभ्यासकांनी तर याला दोन वेगळी सांस्कृतिक किंवा मानव शास्त्रीयभेद असलेली भाषाकुळे असंही संबोधलं आहे. अतिशय प्राचीन काळापासून या दोन प्रवाहांमध्ये द्वंद्व आणि संघर्ष दिसून येतो. हा मुद्दा आजचा मुख्य विषय नसला, तरी त्याच्या खुणा आपल्याला पुराणकथा आणि प्राचीन कथांमधून दिसून येतात. याचे एक साधे उदाहरण असे देता येईल की—एका प्रदेशामध्ये जो एखाद्या कथेचा नायक असतो, तोच दुसऱ्या प्रदेशातील कथांमध्ये कधी कधी खलनायक म्हणूनही मांडला जातो.

उदाहरणार्थ रावण- उत्तरेकडे रावणदहन केले जाते, तर दक्षिणेकडे रावणपूजन केले जाते. हा जो फरक आपल्याला दिसतो, तो प्रत्यक्षात दोन वेगवेगळ्या संस्कृतींमधला फरक आहे, आणि हा फरक भाषेच्या माध्यमातून व्यक्त होत असतो. कारण पुराणकथा या पुन्हा पुन्हा भाषेमधून सांगितल्या जातात, लिपीमध्ये लिहिल्या जातात. त्यामुळे बोली आणि लिपी यांचा अतूट संबंध आहे, हे समजून घेणं अत्यंत महत्त्वाचे ठरते. पुन्हा एकदा लक्षात घ्यायला हवे की स्थानपरत्वे आणि काळपरत्वे उच्चारांमध्ये बदल होत जातो, म्हणजेच भाषा सतत बदलत असते. याबाबत हिंदीमध्ये एक अतिशय सुंदर आणि अर्थपूर्ण म्हण आहे. आपण अनेकदा म्हणतो की अमुक गावात गेलं की इथलं पाणी हलकं आहे, तिथलं पाणी जड आहे, कुठे गोड आहे तर कुठे तुरट आहे.

याच संदर्भात हिंदीतील म्हण अशी आहे— 'कोस कोस पर बदले पानी, बार कोस पर बानी' इथे बानी म्हणजे वाणी. या म्हणीचा अर्थ असा की दर कोसावर पाणी बदलतं आणि बारा कोसांवर वाणी—म्हणजे भाषा किंवा उच्चार—बदलतात. जमिनीतील क्षार, जमिनीचा पोत, भौगोलिक रचना बदलत गेली की पाण्याचा स्वाद बदलतो. कुठे डोंगराळ प्रदेश असतो, कुठे क्षारयुक्त जमीन असते, कुठे काळी माती असते—सगळीकडे जमिनीचा पोत सारखा नसतो. त्याचा थेट परिणाम पाण्यावर होतो, आणि त्याचप्रमाणे भाषेवरही होतो.

म्हणजे सांगायचे तात्पर्य असे की, अभिजात भाषेचा विचार करताना या सगळ्या घटकांचा एकत्रितपणे विचार करावा लागतो—भूगोल, काळ, बोली, लिपी, संस्कृती आणि समाजमान्यता. अशा वेळी उच्च आणि नीच हे ठरवायचा अधिकार कोणाचा, हा प्रश्न आपोआप उभा राहतो. म्हणूनच अभिजात भाषेसाठी काही ठराविक आणि वस्तुनिष्ठ निकष लावले गेले आहेत. त्यामध्ये प्रमुख निकष असा आहे की ती भाषा सलग किमान दोन हजार वर्षे बोलली गेलेली असावी. त्या भाषेमध्ये साहित्यनिर्मिती झालेली असावी, ते साहित्य आजही अस्तित्वात असावे आणि ते लिपीबद्ध झालेले असावे. शिवाय त्या भाषेला समाजाची मान्यता मिळालेली असावी. मराठी भाषेच्या बाबतीत बोलायचं झालं, तर हे सर्व निकष मराठी भाषेने पूर्ण केलेले आहेत. मराठी भाषा ही दोन हजार वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात आहे, ती बोलली गेली आहे, लिहिली गेली आहे, तिच्यामधून समृद्ध साहित्यनिर्मिती झाली आहे आणि समाजाने तिला सातत्याने स्वीकारलेली आहे.

ते असे नाही की एखाद्या भाषेला शासनाचा दर्जा मिळाला म्हणून ती भाषा निर्माण झाली. भाषा आधीपासून अस्तित्वात होती, म्हणूनच तिला तो दर्जा मिळाला आहे. खरं तर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळायला थोडा उशीरच झाला, असे म्हणावे लागेल. कारण दक्षिणेकडील काही भाषांना हा दर्जा याआधीच देण्यात आलेला आहे. आता या शासनमान्यतेमुळे फार मोठा चमत्कार होणार आहे, असे नाही. शासन त्या भाषेच्या विकासासाठी काही प्रमाणात आर्थिक तरतूद करेल. पण खरा आणि अत्यंत मूलभूत प्रश्न असा आहे की— मराठी भाषा टिकणार कशी? भाषा केव्हा टिकते, तर ती बोलीमध्ये, व्यवहारामध्ये जिवंत असते तेव्हाच टिकते. नुसत्या ग्रंथांमध्ये भाषा टिकत नाही. कारण आपण पाहतो की कालांतराने त्या ग्रंथांमधली लिपीही कळेनाशी होते, विशेषतः जेव्हा लिपी बदललेली असते. व्यवहारात नसलेली गोष्ट हळूहळू अप्रचलित होते. विस्मरणात जाते.

आपण चलनाचे उदाहरण घेऊ शकतो. नाणे किंवा नोट चलनात असेल, म्हणजे व्यवहारात वापरात असेल, तरच त्याची किंमत टिकते. चलनात नसेल, तर ते निरुपयोगी ठरते. भाषेचेही तसंच आहे. भाषा चालू असेल, व्यवहारात असेल, तरच ती टिकते. मराठी भाषेच्या बाबतीत आज आपल्याला काय दिसतंय? मराठी माध्यमाच्या, म्हणजेच मराठी भाषिक शाळांकडे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष होत आहे. हे चित्र आपल्याला सर्वत्र दिसते. ग्रामीण भागातही, शहरी भागातही आणि

दुर्दैवाने शासनाकडूनसुद्धा. जुन्या काळात, आपण ज्या प्रदेशात राहत होतो, तिथे मोफत शिक्षणाची व्यवस्था होती. नगरपालिकेच्या शाळा असोत, जिल्हा परिषदेच्या शाळा असोत किंवा आदिवासी भागांतील आश्रमशाळा असोत—शिक्षण हे सर्वदूर उपलब्ध होतं आणि ते त्या त्या भागाच्या मातृभाषेतून दिले जात होते.

आज मात्र परिस्थिती बदललेली दिसते. स्थानिक भाषेतून, मातृभाषेतून दिले जाणारं शिक्षण हळूहळू कमी कमी होत चालले आहे. शासनसुद्धा अनेकदा याकडे दुर्लक्ष करताना दिसते. विद्यार्थीसंख्या नाही, पटसंख्या कमी आहे असे कारण सांगून शाळा बंद केल्या जातात. पण मग प्रश्न असा आहे की ही पटसंख्या वाढवण्यासाठी शिक्षणाचा दर्जा वाढवणं आवश्यक नाही का? की शाळा बंद कशा होतील, याकडेच जास्त लक्ष दिलं जातंय?

या मुद्द्यावर इथे अधिक विस्तार करण्याची गरज नाही. पण एक गोष्ट नक्की सांगावी लागेल. जर मराठी भाषेचा अभिजातपणा टिकवायचा असेल आणि भविष्यात मराठीतून सशक्त साहित्यनिर्मिती व्हायची असेल, तर सर्वात आधी मराठी भाषा बोलीत आणि व्यवहारात टिकली पाहिजे. आणि ते कसे शक्य होईल? तर प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत मराठी माध्यम सर्वत्र असले, तरच ते शक्य होईल. याचा अर्थ असा मुळीच नाही की इतर भाषा शिकू नयेत. उलट, माणूस जितक्या अधिक भाषा आपण शिकतो, तितकी आपली वैचारिक संपन्नता नक्कीच वाढते. पण कोणत्या वयात कोणती भाषा शिकवायची, यालाही शरीरशास्त्र आणि शिक्षणशास्त्र यामध्ये महत्त्व आहे.

पहिलीमध्ये मूल शाळेत येतं तेव्हा ते साधारण सहा वर्षांचं असते. त्याला तीन–चार तास एका जागी बसायची सवय नसते. त्याचे शारीरिक अवयव अजून पूर्णपणे सुदृढ झालेले नसतात. शाळा, पेन, शाई, पुस्तक, शिक्षक, फळा, अक्षरे—हे सगळेच त्याच्यासाठी नवीन असते. अशा वेळी पहिल्याच दिवसापासून दोन–तीन वेगवेगळ्या भाषा शिकवायला सुरुवात केली, तर मूल गोंधळून जाते. घरात तो कुठल्या भाषेत बोलतो, शाळेत काय शिकवले जाते —याचा ताळमेळ लागत नाही. परिणामी, त्याला कोणतीच भाषा नीट आत्मसात करता येत नाही. म्हणून जर आपल्याला समाजाचा खऱ्या अर्थाने भाषिक विकास करायचा असेल, तर त्या त्या ठिकाणच्या मातृभाषेतूनच मुलाचा भाषिक पाया मजबूत केला पाहिजे. साधारण दहा–बारा वर्षांपर्यंत, म्हणजे मातृभाषेचा पाया पक्का झाला, की दुसरी भाषा आत्मसात करणे खूप सोपे होते. कारण तेव्हा शब्दसंपदा, वाक्यरचना, अर्थरचना या सगळ्या गोष्टी मनामध्ये घट्ट बसलेल्या असतात. म्हणूनच या निमित्ताने असा आग्रह धरावा वाटतो की किमान पाचवीपर्यंत तरी मुलाला संपूर्ण शिक्षण मातृभाषेतूनच दिले जावे, ती कुठलीही स्थानिक मातृभाषा असो.

B.Aadhar International Refereed & Peer-Reviewed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXV) 565 -A
ISSN : 2278-9308
February 2026

मराठी भाषेचा अभिजाततेकडे झालेला ऐतिहासिक प्रवास

डॉ. सदानंद मोरे
तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
अध्यक्ष
८८ वे मराठी साहित्य संमेलन, घुमान (पंजाब)

---

३ ऑक्टोबर २०२४, हा दिवस मी १ मे १९६० नंतरचा सर्वात महत्त्वाचा दिवस मानतो. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र राज्य म्हणजे मराठी माणसांचं, मराठी संस्कृतीचं आणि मराठी भाषेचं राज्य. परंतु राज्याचा दर्जा मिळाला, तरी त्या वेळी मराठी भाषेला जो मानाचा, अभिजाततेचा दर्जा मिळायला हवा होता, तो तेव्हा मिळाला नव्हता. तो ऐतिहासिक न्याय ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मिळाला. आश्विन शुद्ध प्रतिपदा—घटस्थापना दिन, शक्तीची उपासना सुरू होणारा दिवस. देवीचा दिवस. आणि आज विद्येची, ज्ञानाची, भाषेची अधिष्ठात्री देवी सरस्वतीचा दिवस. अशा पवित्र योगावर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणं, हे केवळ योगायोग नाही, तर एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संकेत आहे, असं मी निश्चितपणे या ठिकाणी मांडतो.

या निमित्ताने अनेक गोष्टी अकादमिक पातळीवर सांगता येतील. काही तांत्रिक मुद्दे आहेत, भाषाशास्त्रीय निकष आहेत—पण त्या सर्वांचा विस्तार इथे करण्याची गरज नाही. मी आज फक्त एकच गोष्ट मनापासून सांगू इच्छितो, महाराष्ट्रातील जे मराठी भाषेचे अभ्यासक आहेत, संशोधक आहेत, ज्यांच्या मनामध्ये मराठी भाषेबद्दल अपार प्रेम आहे, आणि जे महाराष्ट्र शासनाच्या विविध भाषा-विषयक संस्थांशी संलग्न आहेत त्या सर्वांच्या वतीने मी माननीय प्रधानमंत्री महोदयांचे, तसेच या निर्णयासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो, आणि शेवटी एक-दोन मूलभूत प्रश्न उपस्थित करू इच्छितो. ही कोणती भाषा आहे? आमच्या भाषेची ओळख काय आहे? आमची भाषा ती आहे ज्या भाषेमध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांनी संपूर्ण जगासाठी मागणं मागितलं. ही काही साधी गोष्ट नव्हती. त्या अर्थाने मराठी भाषा केवळ लोकल राहिली नाही; तर ती ग्लोबल झाली. आमची भाषा ती आहे ज्या भाषेमध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांनी 'पसायदान' लिहिलं, जिथे केवळ स्वतःच्या कल्याणाची नाही, तर संपूर्ण विश्वाच्या मंगलाची कामना व्यक्त झाली. अशा या भाषेला आज अभिजाततेचा दर्जा मिळणं, ही केवळ भाषेची नव्हे, तर मानवी मूल्यांची, समतेची आणि विश्वबंधुत्वाची मान्यता आहे.

मराठी अशी भाषा आहे ज्या भाषेमध्ये संस्कृत वगळता इतर कोणत्याही भाषेपेक्षा आधी भगवद्गीतेवरची पहिली टीका निर्माण झाली. ज्ञानेश्वरी हे भगवद्गीतेवरील पहिले भाष्य आहे, जे संस्कृतमध्ये नाही, तर लोकभाषेमध्ये आहे. इथेच आपण भारतीय तत्त्वज्ञानाच्या पातळीवर एक मोठी झेप घेतलेली दिसते. कारण तत्त्वज्ञान हे केवळ पंडितांचं, ग्रंथालयात बंदिस्त राहणारं न राहता, ते सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्याचं ऐतिहासिक कार्य मराठी भाषेने केलं. आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ज्ञानेश्वरीची निर्मिती ही युरोपमधल्या पहिल्या महान काव्यकृतींपैकी असलेल्या दांतेच्या 'डिव्हाइन कॉमेडी'च्याही आधीची आहे. म्हणजे इंग्रजी साहित्य तर दूरच राहिलं, पण संपूर्ण युरोपीय साहित्यिक पार्श्वभूमीवर पाहिलं, तरी मराठी भाषेची ही वैचारिक उंची आपल्याला स्पष्टपणे दिसून येते.

ही तीच भाषा आहे, ज्या भाषेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी 'हिंदवी स्वराज्याची' शपथ घेतली. ही तीच भाषा आहे ज्या भाषेमध्ये लोकमान्य टिळकांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" हा महामंत्र भारतीय स्वातंत्र्यलढ्याला दिला. ही तीच भाषा आहे, ज्या भाषेमध्ये हॅम्लेटसारखं महान पाश्चात्त्य नाटक सादर झालं. मराठीत हॅम्लेट करणारे गणपतराव जोशी हे कलाकार होते. विशेष म्हणजे ते नाटक पाहण्यासाठी ब्रिटिश अधिकारी स्वतः उपस्थित राहत असत. मराठीमध्ये हॅम्लेट करणारा कलाकार कोण आहे, हे पाहण्याची त्यांची उत्सुकता असे.

आणखी एक गंमत सांगतो, जेव्हा गणपतराव जोशी हॅम्लेटची भूमिका करताना रंगमंचावर मृत्यू पावतात, तेव्हा उपस्थित असलेले ब्रिटिश प्रेक्षक उभे राहत, टोपी काढत आणि म्हणत, “Alas! He is dead” ही केवळ नाट्यकलेची नव्हे, तर मराठी भाषेच्या अभिव्यक्ती सामर्थ्याची पावती होती. मराठी भाषेने केवळ साहित्य निर्माण केलं नाही, तर भाषांतराची परंपराही अत्यंत विचारपूर्वक जोपासली. उदाहरणार्थ तंजावरच्या राजांनी विशाखादत्ताच्या ‘मुद्राराक्षस’ या संस्कृत नाटकाचं भाषांतर केलं. का केलं? कारण मुद्राराक्षस हे राजकारणावरचं नाटक आहे. प्रजेला राजकारण समजावं, सत्तेची रचना कळावी हा त्यामागचा उद्देश होता.

त्याच वेळी कृष्णमिश्राच्या ‘प्रबोधचंद्रोदय’ या नाटकाचंही भाषांतर करण्यात आलं. ते नाटक मोक्ष, अध्यात्म आणि आत्मकल्याण याविषयी आहे. म्हणजेच प्रजेच्या इहलोकीक कल्याणाचीही चिंता आणि पारलौकिक कल्याणाचीही चिंता या दोन्हींचा सुंदर समन्वय मराठी भाषेच्या परंपरेत दिसून येतो. ही अशी भाषा आहे जिच्यामध्ये ज्ञानोबा आणि तुकोबा यांसारखे जागतिक दर्जाचे संतकवी निर्माण झाले. आज इथे देहू आणि आळंदी या दोन्ही संस्थानांचे विश्वस्त उपस्थित आहेत; त्यांच्या साक्षीने मी हे सांगतो. तुकाराम महाराजांचा अनेक वेळा गौरव झाला आहे. पण महाराष्ट्रातील थोर महाकवी दिलीप चित्रे असं म्हणतात की “जर तुकोबांची कविता नसती, तर केवळ मराठी साहित्यच नव्हे, तर जागतिक पातळीवर ‘कविता’ या वाङ्मयप्रकाराचीच कल्पना करता आली नसती.” ही मराठी भाषा आहे. अशा भाषेला अभिजाततेचा दर्जा, राजमुद्रेची मान्यता मिळणं, ही केवळ गरज नव्हती—ती ऐतिहासिक अपरिहार्यता होती. यासाठी मी आदरणीय प्रधानमंत्री महोदयांचे मनापासून आभार मानतो.

आपण आमच्यासाठी खूप मोठं कार्य केलं आहे. आपण मराठी भाषेवर जो विश्वास दाखवला आहे, तो विश्वास आम्ही सार्थ करून दाखवू, अशी प्रतिज्ञा आपण सर्वांच्या वतीने या ठिकाणी करूया, आणि मराठी भाषेचा, मराठी संस्कृतीचा, मराठी वैचारिक परंपरेचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत अभिमानाने घेऊन जाऊया.एवढंच मी सांगू इच्छितो.

आपल्या सर्वांचे मनापासून आभार.

B.Aadhar International Refereed & Peer-Reviewed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXV) 565 -A
ISSN : 2278-9308
February 2026

अभिजात मराठी आणि आपण

प्राचार्य डॉ. शिरीष चिंधडे

चावुंडराये आणि गंगराये करवियलेले वर्ष ९८३ मधील श्रवणबेळगोळ येथील भव्यसुंदर गोमटेश्वारचे चरणी विराजमान झालेली आणि किमान दीडसहस्र वर्षे अस्तित्वात असलेली मराठी भाषा अभिजात होतीच, आहेच. आज तिला विलंबाने का होईना राजमुद्रा प्राप्त झाली म्हणून आनंद व अभिमान वाटणे योग्यच आहे. मात्र त्यालाही आता जवळपास दीड वर्ष झाले आहे. साहजिकच शासन आणि विद्यापीठे या बाबतीत आता कायकाय कार्ये करीत आहेत हा प्रश्न प्रस्तुत आहे, कारण आपण या अभिजात मराठीचे काय करतो आहोत आणि करू देत आहोत? प्रत्यक्ष व्यवहारात वापरलीजात असलेली आजची मराठी कोणत्या अवस्थेत आहे, याचा विचार केला की मराठीवर प्रेम करणारे आपले मन चिंताक्रांत होते.

मराठी हा आपल्याला मिळालेला एक श्रीमंत वारसा आहे. वारसा जपावा लागतो, वाढवावा आणि समृद्ध करावा लागतो. तो स्वेच्छेने, अपोआप टिकत-वाढत नाही. कारण भाषा हे एक कौशल्य आहे. प्रतिभावान साहित्यिक तिला कलेचे रूप देतात. डार्विनचे प्राणी-प्रजातींविशायीचे सूत्र, "वापरा, नाहीतर गमवा" हे भाषेला तंतोतंत लागू पडते. भाषा ही एक "संकटग्रस्त प्रजाती" आहे. जागरूकपणे आणि नेटाने संरक्षण-संवर्धन न केल्यास भाषा खराब होतात, मरतात. वारसा, इतिहास, परंपरा जपण्यात इंग्रज फार निष्णात. शेक्सपिअरच्या गावी गेलो असताना त्याचे दफन झाले त्या ट्रिनिटी चर्चमध्ये गेलो. तिथे सूचनाफलकावर त्याच्या जन्माचा दाखला डकविलेला होता! शरीर विच्छेदन शास्त्राचा उगम खाटिक आणि नापित यांच्या कारागीरीत आहे! हार्वे नामक एक खाटिक उघडलेल्या शरीरात कायकाय पहिले त्याचे टिपण करीत असे. त्यातून जन्मली आजची ग्रे याची अनॅटमी! आपली ढोर जमत हजारो वर्षे हे काम करीत होती पण निरक्षरतेमुळे टिपणे ठेवली नाहीत. दस्त लिहिण्याचे हे फायदे!

एकूणच जगभरातल्या अनेक भाषा अस्तित्वासाठी संकटग्रस्त होताना दिसत आहेत. मध्यंतरी 'महाराष्ट्र टाइम्स'चे श्रीधर लोणी यांनी सुमारे पंचेचाळीस लेखांतून जगभरातील अनेक भाषा अस्तित्वासाठी कशा जीवाच्या आकांताने झगडताहेत, हे मांडले आहे. आयरिश भाषेचे उदाहरण घेऊ. मुळात तिला अभिजाततेची फारशी परंपरा नाही. परंतु लोकभाषा असून ती टिकावी म्हणून शासकीय प्रयत्न जोरात आहेत. औपरोधिक स्थिती अशी आहे की ही मातृभाषा असलेले अनेक दिग्गज लेखक झाले. जसे, नाटककार बर्नर्ड शॉ, ऑस्कर वाइल्ड, डब्ल्यू. बी. येट्स, जेम्ज जॉइस. आयरिश भाषेचे दुर्दैव असे की यापैकी एकानेही आपली महत्वाची साहित्यनिर्मिती सातत्याने त्या मातृभाषेत न करता बलाढ्य अशा इंग्रजीची सेवा-समृद्धी केली! हीच स्थिती वेल्श भाषेची झाली. मुळात अभिजात वारसा नसलेल्या या भाषेत जन्मलेले दिग्गज साहित्यिक म्हणजे इंग्रजी मेटॅफिजिकल काव्यपरंपरेतले जॉर्ज हर्बर्ट, हेन्री व्हॉन, अत्यंत प्रतिभावान कवी डिलन टॉमस यांनी मातृभाषा बाजूला ठेऊन इंग्लिशमध्ये रचना केल्या. मातृवत असलेल्या या भाषा मृतवत होऊ लागल्या आहेत.

सिंधी भाषेचे उदाहरण आपल्या अतिशय जवळचे आहे. खरेतर राज्यघटनेने समाविष्ट केकेली ही भाषा! परंतु त्यांना स्वतंत्र असा सिंधीभाषिक प्रांत नाही. बुलेशहसारखे प्रतिभावान कवी असलेल्या या भाषेची आज काय अवस्था आहे? पोपटी हिरानंदानी, राम पंजवानी. लछमन हर्दवाणी ही काही नवे अलीकडेपर्यंत होती. एकही नाव घेण्यासारखे आज या भाषेत कोणीही लेखक नाहीत! मी एका सिंधी कोलेजात प्राचार्य होतो. तिथे नियामक मंडळात सर्व स्त्रिया होत्या. त्या अतिशय रुबाबदार रीतीने इंग्रजी बोलत. मला नेहमी विचारत, "प्रिंसिपलसर, आमची सिंधी भाषा संपत चालली आहे. तुम्ही भाषेचे अभ्यासक आहात. काय उपाय सुचवाल?" "आमची मुले हिंदी, इंग्रजी किंवा मराठी घरातही बोलतात," ही पालकांची तक्रार होती. तेव्हा काहीशा संकोचाने मी म्हणालो, "मॅडम, तुम्ही सगळ्या सिंधी आहात. ती भाषा तुम्हाला येते. मग तुम्ही आपसातही इंग्रजीत का बोलता?" मुद्दा असा की भाषेची राखण ती वापरणाऱ्याने करावी लागते, ती वापरत ठेवावी लागते! इतरांची ती जबाबदारी नसते!

या उलट वर्धिष्णु भाषांमध्ये मला इंग्रजी हीच बलवान वाटते. मराठी आणि इंग्रजी या दोन्हीही भाषा सुमारे एकाच वेळी जोम धरू लागल्या. गोमटेश्वराच्या पायाशी असलेली मराठी ९८३ या वर्षी नोंदविली गेली. जुने इंग्रजी त्या आधीच सातव्या शतकात रुजू लागले होते परंतु ९७५ वर्षी इंग्रजीत *ब्योवूल्फ* हे काव्य उदयास आले. आज दोन्ही भाषांची अवस्था काय आहे, हा क्लेशकारक प्रश्न आहे. इंग्रजी जगावर आरूढ होते आहे, अन्य भाषांवर कुरघोडी करते आहे. अर्थात हे अपोआप घडलेले नाही. सहाव्या राजा जेम्ज याने चाळीस विद्वानांची एक समिती नेमून हीब्रू बायबलचे इंग्रजी भाषांतर करून घेतले. ते

इंग्रजी भाषेच्या उत्कृष्टतेचे सर्वोत्तम रूप मानले जाते. हे घडले वर्ष १६११ चे सुमारास. त्याच वेळी इंग्रजीत चॉसर (१४००), शेक्सपिअर हे प्रतिभावंत कवी अजरामर रचना करीत होते! वर्ष १५३८ मध्ये सर टॉमस एलीयट याने एक शब्दकोश तयार केला होता. परंतु एक उत्तम शब्दकोश म्हणून १७५५ या वर्षी प्रसिद्ध झालेला डॉ. सॅम जॉन्सन यांचा कोश प्रमाण मनाला जातो. त्यानंतर ऑक्सफर्ड विद्यापीठाने सातत्याने कोशनिर्मिती केली आहे. इतर भाषांतील नवनवे शब्दही त्यात परिश्रमपूर्वक संशोधनाने समाविष्ट केले जातात. अशारीतीने इंग्रजी ही ग्लोबलभारती बनली आहे.

याच संदर्भात हीब्रू भाषेचे उदाहरण विस्मयकारक आणि प्रेरक आहे. मूळ बायबलची ही खरी अभिजात पण कालौघात मृतवत झालेली ही भाषा इस्त्रेलच्या शासनाने आणि नागरिकांनी प्रयत्नपूर्वक, सातत्याने आणि अभिमानाने जनतेत रुजवून जिवंत केली आणि आज ती पूर्ण ताकतीने वापरली जात आहे.

वारसा, इतिहास हे निष्ठेने, नेटाने जपावे लागतात. याचं महत्व बऱ्याच इंग्रजी साहित्यिकांना होतं. महाकवी टी. एस. एलियट याविषयी फार जागरूक होते. ते अमेरिकेत जन्मले पण अमेरिकेला इतिहास नाही, श्रीमंत वारसा नाही, मिथके नाहीत म्हणून त्यांनी देशत्याग केला आणि इंग्लंडचे नागरिकत्व घेतले. इतिहास नसलेल्याना मुक्ती नाही, इंग्लंड म्हणजे साक्षात इतिहास, असे ते एकाठिकाणी लिहितात. गम्मत अशी की आपल्याला इतिहास नाही हे शल्य अमेरिकन विचारवंतांना बोचताना दिसते. रॉबर्ट स्पिलर या अमेरिकन साहित्याच्या इतिहासकाराने अमेरिकन साहित्याची परंपरा किती जुनी आहे हे सांगण्यासाठी साक्ष काढली आहे ती कोलंबसाची! त्याने आपला प्रायोजक राजा फर्डिनंड याला वर्ष १४९३ मध्ये पत्र लिहून आपल्या प्रवासाचा अहवाल दिला. इतिहासकार स्पिलर यांचेमते हाच अमेरिकन साहित्याचा उगम आहे! "दहा हजार फोर्ड इथे शोधताहेत परंपरा" अशी एका अमेरिकन कवितेतील ओळ आहे! कॅनडा, ऑस्ट्रेलिया आदि देशांतल्या कवींना सुद्धा ही वारसा, मिथके, संस्कृतीची अनुपस्थिती, विरलता डाचते. एक ऑस्ट्रेलियन कवयित्री म्हणते,

In my mother's family
We have no anecdotes
Only the long silence
Between pogroms.
In my father's family
We have little tradition
Lands, legends, powers
Passes by us.
In my country
We have no history
No continuing song
No dances

--आणि इथे आपण एवढी पाच सहस्त्र वर्षांची महान सांस्कृतिक परंपरा आणि किमान दीड हजार वर्षे जुनी अभिजात भाषा असताना चिंता करतो की मराठीचे काय होणार! ती शुद्ध कशी राहणार!

भाषा वापरावी लागते, अभ्यासावी लागते, कष्टपूर्वक व नेटाने दुरुस्त करावी लागते, आणि ती जबाबदारी त्यात्या भाषिकांची असते, हा याचा अर्थ आहे. एका जागतिक सर्वेक्षणानुसार १९९१ साली झालेल्या गणतीत १६७२ भाषा मृत म्हणून नोंदविल्या गेल्या. वर्ष २००१मधे झालेल्या सर्वेक्षणानंतर त्यांपैकी केवळ २३४ भाषा जिवंत आहेत! वर्ष २१०० समाप्तीपर्यंत जगातल्या ९०% भाषा मृत होतील, असा अंदाज आहे.

माझी चिंता व चिंतन

मला या बाबतीत काय करता येईल हा विचार माझ्या मनात बरेच दिवस आहे. म्हणून खारीचा वाट या भावनेने मी माझ्या "कायचालुअहे" (व्हॉट्सप) गटात आणि काही भाषाभ्यासक व भाषाप्रेमी स्नेह्यांकडे "रिकामपणाची कामगिरी" या शीर्षकाखाली काही टिप्पण्या पाठवीत असे, असतो. काहीजण छान प्रतिसाद देतात, काहीजण केवळ अंगठे धाडतात आणि क्वचित काहीजण सुनावतात, तुला कोणी सांगितले हा उपद्व्याप करायला?(!) त्याने काय होणारे सुधारणा, इतके लोक ती

बिघडवायला सज्ज झालेले असताना? --आता याला काय म्हणावे! भाषाप्रेमी आणि अभ्यासकांनी हे करायचे नाही तर मग कोणी? या तुसड्या उदासीनतेमुळेच आजची मराठी कुरूप, बेंगरूळ, प्रमाद्युक्त होत चालेली आहे का?

उपरोल्लेखित काही टिप्पण्या मी इथे किरकोळ बदलांनिशी उद्धृत करीत आहे. जरा उत्साह दाखविल्यास आणि तात्काळ नोंदी केल्यास आपणापैकी अनेकांना असे दातांखाली आलेले/येणारे खडे निवडता येतील आणि सुचल्यास ते बाजूला करून योग्य ते पर्याय सुचविता येतील. दोषैकदर्शनापेक्षा भाषासौंदर्य, समृद्धी, सौष्ठव, संवर्धन ही उद्दिष्टे या प्रयत्नामागे आहेत. माझी रिकामपणची कामगिरी

आजकालचे रूढ होत चाललेले बेंगरुळ मराठी!

"त्याने माझ्यासोबत गैरव्यवहार केला."

"सोबत" हे आजपावेतो आपण सह/संगत/बरोबर/सन्निध/आधारभूत/सांगाती/एकत्रितपणे अशा मैत्री, जवळीकनिदर्शक संदर्भात/अर्थाने वापरत असू. (मी तरी तसे वापरतो.) वरील "त्याने माझ्याशी..." याचा अर्थ "मला बरोबर घेऊन/माझ्या मदतीने/संगतीने/माझ्यासह/मला सहाय्यभूत/माझा सोबती होऊन/आम्ही एकत्रितपणे कुणाशीतरी गैर व्यवहार केला" असा अनर्थकारी होतो! मुळात म्हणायचे आहे, "...माझ्याशी/माझ्याबाबत/बाबतीत गैरव्यवहार केला!"

कोण सुधारत बसणार असे गचाळ होत चाललेले, चुकीचे रुजत चालले आपले अमृतातेहि पैजा जिंकणारे मराठी?!

माझे मराठीचे व्याकरण डळमळीत होतेय! वृत्तपत्रातील वाक्यरचना मला गोंधळवितात :

१. ...सेमिनार हॉलमधे तिचा बलात्कार झाला...
२. ...एका गटाने त्याचा विरोध केला..
३. ...सायकलस्वाराचा अपघात झाला.

डॉ. यास्मिन शेख यांनी मराठीच्या मोडतोडीविषयी व्यक्त केलेली खंत योग्य व सूचक आहे. सर्वच लेखक व मराठी भाषाप्रेमी यांना हीच खंत वाटते, परंतु सुधारणेचे ठोस व सततचे प्रयत्न करताना फारसे कोणी दिसत नाहीत. शिक्षक, प्राध्यापक, वृत्तपत्रकार यांना हे प्रामुख्याने शक्य आहे, कारण त्यांची पोहोच व्यापकपणे विद्यार्थी व वाचकांपर्यंत असते. थोड्या जागरूकतेने भेसळयुक्त मराठीचे अनेक नमुने हुडकून, गोळा करून वर्गात आरंभी पाच मिनिटे त्यांविषयी बोलता येईल. वृत्तपत्र अभ्यासक्रमात हाही विषय समाविष्ट होऊ शकतो. पूर्वी भाषाविषयाचे शिक्षक नसलेलेही उत्तरपत्रिकांतले चुकीचे भाषाप्रयोग दुरुस्त करून सांगत असत. हल्ली 'पोस्ट शेअर करीत आहे' हा प्रयोग सर्रास आढळतो. 'या विचारात/टिप्पणीत आपणास सहभागी/सामायिक करून घेत आहे/आपणाकडे पाठवीत आहे' असे काहीतरी मराठी वळण देणे शक्य आहे. शतसंवत्सरी निमित्त डॉ. शेख यांचे अभिनंदन व अभीष्टचिंतन.

इथे भाषाशास्त्र वगैरे माझ्या मनात नाही. चुकीच्या गोष्टी, पद्धती, प्रथा कशा घडत जातात, रुजतात ते मी समजून घेतो आहे. त्याची जाणीव ज्ञातेमंडळींना करून द्यावी, हा हेतू. वृत्तपत्रांत, समाजमाध्यमात बरेच चुकीचे येते, त्याचा प्रभाव अटळ. शाळेत शिकविली जाते मराठी भाषा, पण असे चुकीचे उपयोग ध्यानी आणून दिलेजाणे आवश्यक ना! थोडाच वेळ द्यावा लागतो या साठी. मुले लवकर ग्रहण करतात. माझा नातू पसायदानात "...वर्षत सकळ मंगळी" ऐवजी "मंडळी" म्हणायचा! दोनतीनदा दुरुस्त केले, म्हणवून घेतले, सुधारला! खूप करण्यासारखे आहे, असते, आधी केलेचि पाहिजे! माझा एक विद्यार्थी असे कार्य आसपासच्या पोरांचे इंग्रजी दुरुस्त करीत असतो!

"हॉटेलांवरील करवाई हा नुसता दिखावा आहे.

दिखावा हा हिंदी शब्द आहे. याला चपखल मराठी पर्याय या पत्रपंडितांना ज्ञात नाही? मला सहज सुचले "देखावा", "धूळेफेक", "नाटक" हे शब्द. ठीक ना?

"परंतु या निकालाने त्यांच्या इराद्यांवर पाणी फेरले." पेपरात गवसलेला आणखी एक भाषिक संकर! इराद्यांवर म्हणायचे तर "इरादा" उर्दू! "मनसुब्यांवर" म्हटले तर पुन्हा उर्दू मिश्रण. हेतूंवर किंवा मनोरथांवर पाणी फिरविले/ओतले,

बोळा फिरवला, धुळीला मिळवले, असे काही म्हणता आले असते, पण एकूणच परभाषांचा प्रभाव मराठीवर भरपूर दिसतो. बेशिस्त, चालू मराठी चालवूनघेणे एवढेच आपल्या हाती आहे का?

आणखी एक वृत्तपत्रीय मराठीचा नमुना:

...यांनी कडवी टीका केली...

--कडवट--बोचरी--चावरी--प्रखर—कडक, असे काही सहज, सोपे मराठी पर्याय आहेत की!

मतदान सहायता केंद्र : मार्गदर्शन / मदत / सहाय्य केंद्र नाही का म्हणता येणार? हिंदी अशी “हावी” होते आहे का? तसेच, ‘अराजकाता’ का म्हणायचे? अराजक पुरेसे आणि योग्य आहे.

मनसि पंचशल्यानि : मला हे पाच काटे बोचताहेत (कंसात मराठी वळण सुचविले आहे.):

तुझ्यावर ही सवय हावी झाली आहे (प्रभावी/आरूढ/वरचढ/स्वार/तू या सवयीचा गुलाम झाला आहेस, / या सवयीने तुझ्यावर कुरघोडी केली आहे, इ.)

त्याला मनव (त्याची समजूत काढ/मन वळव)

माझ्यावर हे थोपू नकोस (लादू नकोस)

गाडी उशिराने येत आहे (उशिरा... हिंदीचा प्रभाव: देरीसे)

तुम्हालाही असे काही भाषिक काटे बोचतात का?

"वेस्टर्न संगीतातला थिरकायला लावणारा बेधुंदपणा..." अशी शब्दरचना असलेले एक वाक्य वाचनात आले. तसे बरेच बोलीभाषा स्वरूपाचे हिंदी+मराठी+इंग्रजी असे संकरित वाक्य आहे. लेखनात चटपटीतपणा येण्यासाठी ही शैली समजू शकते. पण, मी जरासा अड़खळलो "थिरकायला"वर. म्हणजे थरथर कापणे का? पाय थरथरणे का? हुडहुडी भरणे का? काही उमजेना, म्हणून संस्कृत शिकविणाऱ्या एका शिक्षिकेकडे पृच्छा केली. तर ती थक्क होऊन म्हणाली, हा मराठी शब्द माहीत नाही तुम्हाला? अहो, नाचणे, नृत्यातले पदन्यास करणे!

चला, निदान अर्थोद्घाटन तर झाले! पण, पण... मन मानेना की हा-- बाईंच्या म्हणण्यानुसार--मराठी शब्द आहे. शेवटी गूगलगुरुजीना विचारले, तर त्यांनी "थिरकना" असे मूळ हिंदी रूप सांगितले! बघा, बघा मराठीजन हो, ही हिंदी आपल्या पवित्र मराठीवर कशी चतुरपणे आणि किती सहज "हावी" झालेली आहे (अर्थात, कुरघोडी करते आहे). --असा तुम्ही निष्क्रीय, बसा तुम्ही निष्क्रीय !

अलिकडे "शेअर" हा शब्द सतत वापरला जातो आहे. उदा. "माझे विचार मी आपणाशी/सह शेअर करू इच्छितो." मोबाईलमधील "Like & share" हे त्या हुकुमाचे हे उगमस्थान. (आणि आपण अविलंबे आज्ञापालन करतो!) हिन्दीत "सांझा करना" हा चांगला पर्याय वापरात आहे. पण श्रीमंत मराठीत तो नाही का? "सांगू इच्छितो" असे म्हटले तर? "आपणाबरोबर वाटून घेऊ ईच्छितो / सामायिक करू इच्छितो” हे विचित्र वाटते का? क़ाय म्हणावे, काही चटकन उमजत नाही!

दाताखाली खडा यावा तसा सारखासारखा आणि सर्वत्र वापरलाजातोय हा शब्द,--क़ाय तर म्हणे, इतिहास 'रचला'! एकावरएक विटा रचून ठेवतात तसा इतिहास रचला! जणू मराठीच शब्द आहे हा! हे मराठी वळण आहे का? इतिहास लिहिला/घडविला/निर्मिला/निर्माण केला, हे स्वच्छ मराठी पर्याय नव्हेत का? टीव्ही आणि पत्रपंडितांना कुणी पटवून द्यायचे हे? एका बाजूला माय मराठीला अभिजात दर्जा मिळावा यासाठी यत्न-प्रयत्न, तर दुसरीकडे ही अशी सबगोलंकार मराठीची जलपर्णी फोफावू दिलीजाते आहे. कुठे ना नि:षेध, ना खेद, ना सुधारण्याचे निरलस प्रयत्न! फ्रेंच भाषेत इंग्रजी शब्द वापरला तर म्हणे दंड केला जाणार होता! जुन्या महाराष्ट्रगीतात इच्छा आहे, ..."वचनि, लेखनीहि मराठी गिरा असो / देह पड़ो तत्कारणि, ही असे स्पृहा" अशी उदात्त उन्नत आकांक्षा आविष्कृत झालेली आहे, आणि आज?...इत्यलम।

माझे कच्चे मराठी

;इकडे ये ,शोभा"*माझी मदत* कर ",("मेरी मद्द कर" याचा प्रभाव!) डॉक्टरांनी पत्नीला साद घातली ,तिने उतर दिले . "आधी बरोबर मराठी बोला "!मग येते ;एक जण म्हणाला" ,या *निर्णयाचा* (?की निर्णयाला) विरोध करता येत नाही ."मलाही प्रश्न पडतो" ,माझी" की "मला" ,एक उद्दाम अधिकारी गरजला ?मदत कर "कोणाकडेही *माझी* तक्रार करा की-- "... " ,एक बातमी होती ?तक्रार करा "माझ्याविरुद्ध"बारा वर्षांच्या *मुलीचा* बलात्कार– ".की मुलीवर" ?काल *तिचा* अपघात झाला असिफ यांनी दिलीपकुमार .के" ?"तिला" की-- ". *यांच्याशी* विश्वासघात केला-- "एका ग्रंथातूनहा सर्व हिंदीचा प्रभाव . ,"देरीसे" ,"मेरी मदत"— ?कावगैरे" ,एका संगीतमंडळाचे अध्यक्ष म्हणाले .या ऐतिहासिक वास्तूवर रसिक कलावंतांचा-*जिव्हाळा* आहे"...दुसरी बातमी, साईबाबांच्या अर्जावर आता उन्हाळी"*अवकाशानंतर* सुनावणी होईल" "...प्रत्येक आई आपल्या *मुलाला* तितकच प्रेम करते" .एक मराठी नटी-- ",निर्मात्यांनी एक जबाबदारी *माझ्यावर दिलेली* आहेएक मराठी -- "... " .नटतुझा *आत्मस्वाभिमान* जागा कर "...मनासिक समस्यांवर वर्तमानपत्री सल्ला देणाऱ्या एक मनोविकारतज्ञ विदुषी" .किती हेट्रेड आहे त्यांना आपल्यासाठी "...एक उद्गार .

" तर तो ,हल्ली विक्रमवीर इतिहास घडवत किंवा निर्माण करत नाहीत *रचतात* !"नटमंडळी हल्ली एखादी भूमिका उभी, जिवंत करीत नाहीत किंवा वठवत किंवा साकारात नाहीत, तर ती "*निभावतात* !"आम्ही शिकलो" ,शाईस्तेखानाच्या जिवावर बेतले पण बोटावर निभावले"! कुणी आघात " हल्ली वार केला की /*पलटवार"* केला जातो",प्रत्याघातम्हणायला " " .मात्र एकूण अवघडचमाझे कुणाशी वैर नाही पराभवाची भीती विरोधकांना वाटल्याने .*माझ्यासोबत* हा प्रकार घडला ,"हे वाक्य मराठी साहित्यसंमेलनाचे एक इच्छुक अध्यक्ष म्हणालेम्हणजे ते बरोबरच असणा ,र ना !

प्रकाशझोतातली मंडळी असे बोलतात ,वर्तमानपत्रात ही भाषा सतत वापरली जाते, तेव्हा ते बरोबरच असणार . हल्ली कुणी कु .त्यांचेच अनुकरण अधिक प्रमाणात होणे अटळणाला बोलावत नाहीत तर ,हाक मारीत नाहीत ,*आवाज* देतात , "आवाज देदुनिया मेरी ज ,कहां है ,वाँ हैभाव असावाया जुन्या गोड हिंदी गाण्याचा हा प्र "!

कोसो दूर की कित्येक कोस / योजने दूर" ,मराठी नाट्यसंमेलनाचे एक अध्यक्ष म्हणाले ?हे नाटक छत्रपतींची स्तुती करणारे आहे जे या .*नाटकाचा विरोध* करत आहेत त्यांनी हे नाटक पाहिले किंवा वाचले तरी आहे का "?नाटकाचा की नाटकाला विरोध-,स-" ?ते-,स-,ला-,ना-,ते.हे सर्व प्रत्यय मराठीतून आता भिरकावून दिलेगेले असावेत "

सई परांजपे एकदा म्हणाल्या" ,आज मराठी भाषेची दशा केविलवाणी झाली आहे' .माय मराठीममी ' तर ,नव्हे ' एरवी लढाऊ म्हणून ओळखले जाणार...म्हणायची वेळ येऊन ठेपली आहे 'मराठीे आम्ही मराठी लोक मराठीवरील या आक्रमणाच्या प्रश्नावर मात्र स्वस्थ का बसून राहतो ".हेच मला कळत नाही ,दुबळेपणाने नांगी का टाकतो ,

सईताई मराठीवरील इंग्रजीच्या झिलईविषयी तक्रार करत होत्या .मात्र हिंदीच्या दादागिरीविषयी बोलणे का टाळले जाते ,लवचिक आहे ,सोपी आहे ,ती भाषा लोकप्रिय आहे ?मला आवडणारीही आहे, पण म्हणून तिला एवढ्या बेदरकारपणे मराठीत घुसू द्यायचे'हावी'— (!)—होऊ द्यायचे का मराठी मुमुर्षु ?आहेते इंग्रजीच्या ,असे राजवाडे म्हणाले होते , " ,एकदा तर एका चष्माविक्रेत्याकडून ऐकले .आक्रमणाच्या संदर्भातगॉगल हे मुलांच्या ॲटिट्यूडला चार चाँद लावतात !" ",टिट्यूड दाखवू नकोॲ"असेही एकदा कानावर आदळलेदीड शहाणपणा ,तोरा ,दिमाख ! दाखवू नकोसहे मराठीत रुळलेल ,े शब्द अंतर्धान .इंग्रजीचा सबगोलंकारी प्रभाव देखील वाढतो आहे-आता असा हिंदी !

भाषांचा परस्परांवरील प्रभाव समजू शकतो .टळ देखील असतोभारतासारख्या बहुभाषिक पारिस्थितीत तो अ . उर्दूकडून मराठीने अ ,फार्सी ,कानडी .प्रसंगी अशा मिलनाने भाषासमृद्धी सुद्धा होत असतेसंख्य शब्द घेतलेले आहेतच कीते . .आता बेमालूमपणे रुळलेही आहेतपरंतु कुरूप चुकीचे ,अमराठी वळण वेळीच अडवायला हवे .ज्ञात्यांनी दुरुस्त करायला हवे , "बोलो जाता बरळ करीतसे नीट .हे तज्ञांचे काम आहे "एतद्देशियांकडून ते होणे संभवत नाही .बर्नसनसारख्या कोणीतरी परभाषिकपरदेशी विदुषी ते करती ,ल, असे म्हणावेसे वाटते !

काय करणे शक्य आहे?

१. मराठीच्या अध्यापक/प्राध्यापकांची आणि वृत्तपत्रांची भूमिका महत्वाची आहे. शाळांची जबाबदारी फार मोठी आहे. पूर्वी भाषेव्यतिरिक्त अन्य विषय शिकविणारे शिक्षक देखील त्या त्या विषयातल्या विद्यार्थ्यांच्या लेखनातल्या ऱ्हस्व-दीर्घाच्या, (अ)शुद्धलेखनाच्या चुका दाखवून दुरुस्ती करीत असत. आज भाषाशिक्षक सुद्धा हे काम करतात की नाही, तेच जाणे. पण ते त्यांनी करायला हबे की नको?

२. मराठी भाषा कुरूप होत चाललेली आहे, बेंगरूळ बनते आहे, निष्काळजीपणे लिहिली/वापरली जात आहे, याची रोजच्या व्यवहारातली अनेकानेक उदाहरणे गोळा करून ती विद्यार्थांच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे. योग्य ते

मराठी पर्याय देणे देखील आवश्यक आहे. नेहमीच्या तासाचे वेळी सुरवातीची पाच मिनिटे यांवर वापरणे शक्य आहे. अशा बेंगरूळ रचना शोधण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे महत्वाचे ठरेल. राजस्थान, उत्तर प्रदेशात आता प्रार्थनेच्यावेळी शाळांतून पाच मिनिटे वर्तमानपत्र वाचावे, असा फतवा आहे. ते चांगलं आहे. हीच संधी भाषा समृद्धीकरणाची आहे. सर्वत्र ती प्रथा सुरु करणे योग्य होईल.

३. वृत्तपत्रविद्या अभ्यासक्रमात या विषयाचा समावेश आवश्यक आहे. मराठी पर्यायी शब्दांची एक जंत्री करून ती उपसंपादकांच्या मेजावर असावी आणि ती वर्धिष्णू असावी, म्हणजे रोजच्या वापरत भाषेची मोडतोड होतच राहणार, म्हणून तिची दुरुस्ती देखील नित्यवत व्हावी. तीवर लक्ष ठेवून पर्याय देणे योग्य होईल.

४. पूर्वी मराठीच्या प्राध्यापिका डॉ. सरोजिनी वैद्य यांनी मुंबईतील जाहिरातफलक व नामफलक लेखकांसाठी एक शुद्धलेखन वर्ग मुंबई विद्यापीठात सुरु केल्याचे स्मरते. (त्यासाठी त्यांना शिकविण्याच्या तासात सूट किंवा अधिक मानधन मिळत नसे! ती त्यांची अपेक्षाच नव्हती. याला म्हणतात भाषेविषयीचे सक्रीय प्रेम आणि आदर!) हा प्रयोग इतरही करूशकतात. फक्त इच्छा आणि मराठीविषयी आदर हवा.

५. भाषाप्रेम असलेल्या मंडळींनी आपापल्या दूरभाष "कायचालूअहे" (व्हॉट्सप) गटात हा उपक्रम, ही जाणीवजागृती करणे शक्य आहे. (मी कारतो त्याहूनही अधिक जोमाने).

६. खूप पूर्वी विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी मराठी भाषा "मुमुर्षी" (मरणोन्मुख होते) आहे असा इशारा दिला होता. भाषाव्यवहाराला—आणि विशेषतः मराठीला—आज अनेक आव्हाने आहेत, अडथळे आहेत. शासकीय धोरणानुसार मराठी माध्यमाच्या शालातुकड्या देणे बंद झालेले आहे. त्या उलट इंग्रजी माध्यमाच्या तुकड्या वाढत्या मागणीनुसार मंजूर होत आहेत. हे काही बरे लक्षण नाही. ते कसे थोपविता येईल?

७. सार्वत्रिक ओरड आहे की वाचनप्रेम विरत चालले आहे. ग्रंथालये मरणोन्मुख होत आहेत. संगणक आणि दूरभाष यांच्या वाढत्या सर्वदूर वापराने या परिस्थितीत भर पडते आहे का? भाषा सौंदर्य, सौष्ठव जपण्यासाठी काही यंत्रणा निर्माण करत येईल का?

८. अपारशक्ती कृत्रिम बुद्धिमत्तातंत्राचा काही उपयोग होईल का हेही तपासून बघावे.

हे झाले रोजच्या रोज मराठीची मोडतोड होत असल्याचे काही पुरावे. स्थानभ्रष्ट होत चाललेले रफार, अनुस्वार, आणि ऱ्हस्व-दीर्घाची ऐशीतैशी हा आणखी एक चिंतेचा विषय आहेच. त्याचेविषयी काय करत येईल तेही बघावे.

***

प्राचार्य डॉ. शिरीष चिंधडे
९६६५०५०४७३

Classical Languages and Literatures in India

Prof. Dr. Maya Pandit
Former Pro Vice Chancellor,
EFLU, Hyderabad

A Brief Statement on Some Important Issues in Connection with The Past, Present and Future development of our Classical Languages and Literature

Languages exist in the cultural worlds they construct, shape and inhabit. No language is outside of culture and no culture can even be possible without language. This is a mutually dependent and defining relationship.

India officially recognizes eleven Classical Languages: the original six (Tamil, Sanskrit, Telugu, Kannada, Malayalam, Odia) and five recently added (Marathi, Pali, Prakrit, Assamese, Bengali) as of late 2024, expanding the list to include languages with ancient texts, rich literary heritage, and distinct traditions to promote and preserve their unique cultural value. High Antiquity of its early texts/ recorded history over a thousand years. The conditions we all know: A body of ancient literature/ texts, which is considered a valuable heritage by generation of speakers. And secondly, The literary tradition must be original and not borrowed from another speech community. In 2005, the following criteria were set during the time Sanskrit was given the classical language status . The language had to have a high antiquity of its early texts with recorded history over a period of 1500–2000 years. It should have a body of body of ancient literature/texts, which is considered a valuable heritage by generations of speakers. It was also decided that the literary tradition of that language had to be original and not borrowed from another speech community and finally that the classical language and literature should be distinct from modern, there may also be a discontinuity between the classical language and its later forms or its offshoots.

That is all very well. But what exactly is involved in the task beyond the initial step of declaring a language as ancient, classical and with a great literary heritage? What steps need to be taken in order to achieve that objective? I am sure that the whole day this distinguished set of scholars known for their commitment to the development of these languages have looked at the pros and cons of the tasks involved before us. I would modestly like to contribute to that discussion by looking a little at the present scenario and then seeing the possibility of a future where these languages will shine in all their glory.

Relationship between language and culture:

To go into the question of how languages develop, we need to understand the relationship between language and culture. What is “culture”? As Raymond Williams informs us, culture is a particular way of life of a people, period, groups and even humanity. It is the way we dress, think, eat, think, play, entertain ourselves, and do a lot of other activities. Generally we speak of culture in plural forms. Apart from the fact that there are particular cultures of particular nations, there are also the specific and variable cultures of social and economic groups within one nation or one community. We say Brahmanical culture, Muslim culture, Adivasi culture and they all together constitute Indian culture. Culture also presents a general process of spiritual, intellectual and aesthetic development and it includes the work practices of intellectual and especially artistic activity.

The relationship between language and culture is complex. Language and culture share an inseparable, bidirectional relationship: language serves as a fundamental tool for the expression, transmission, and preservation of culture. It even shapes the cultural values, beliefs, and social practices profoundly. Language acts as a window into a society's collective mind, revealing its worldview and historical evolution, and is essential for social cohesion and identity, making it an integral component of culture itself. The connections between language and culture are so organically fused that they are inseparable; one cannot exist without the other. Language is the principal means by which culture is transmitted from one generation to the next, enabling the spread of ideas, knowledge, and traditions across time and space. Culture also is a system which is shaped by the constitutive and constituent forces operating in specific social formations at particular points in time. It is with this background knowledge that we need to look at the future of our “classical languages.”

Education as a Constitutive Force

Now one major issue is that the major constitutive force that we have in our culture is education. It is through receiving education that a child becomes sensitive to the expressive possibilities of that language.

Language does not develop on its own. If we look at the educational culture in Maharashtra, two developments strike me which might be considered detrimental to the development of Marathi as a language of knowledge, with expressive possibilities of a different kind than we find today. The decision to introduce Hindi as the third language right from the first standard or the decision to close down around 18000 schools in Maharashtra were the two major developments in the educational field.

Developing Marathi as a Language of Knowledge

The second issue is what environment do we have for the rigorous growth of Marathi as a language for building up knowledge systems? If we look at the regular communication channels in the print media, or in the electronic media, the social platforms like WhatsApp, what do we find? Leave alone the various problematic areas there (such as the influence of these on the minds of young people), the question that needs to be asked is, what opportunities do we have for the young generation (whether it is Gen Zee or Gen Alpha) for their language development or their intellectual development? No culture can develop unless their language develops. I would like to explore this issue further in the context of language development and knowledge building.

Relationship between Dialects of Marathi and the State language Marathi

The third major issue is what educational and other opportunities do we have for the use and development of languages in India, and especially for those languages / dialects of people who are far away from the power centres occupied by the custodians of knowledge. We need to explore the issue of how the development of their languages can happen in education and how it can influence the growth and development of our "classical" languages in general and Marathi in particular. Is it possible to suggest that the key to the development of Marathi lies in the development of all these varieties of Marathi? Is there any opportunity for linking the healthy growth of Marathi with the growth of the dialects of Marathi?

Language Development and the Role of State and Centre

The fourth way to look forward is to find out what other states have done for the development of their own classical languages. One needs to examine this data and examine what means they have deployed for the development of their own languages? Kannada and Tamil are cases in point. Especially Tamil Nadu where severe steps seem to have been taken like assigning extra budget, infrastructure and other measures. You may be familiar with their decision to award prizes to literary products from other classical languages like Marathi. What will be the impavt of this? Can we suggest a few more decisions to cultivate a healthy relationship between these languages? Can we explore translation as one of the means of developing close ties between these languages? This is significant argument and it can have far reaching effects on the task of building ties between them.

The next and probably last issue I would like to address is our educational and cultural policies regarding the development of languages. This is an extremely significant issue because the development of languages is very closely connected to the policies that are adopted by the Government. The NEP document promised to look into this issue but there are problems in the execution of these policies and also in the lip service paid to the issue of language development.

अभिजात भाषा: मराठी

अविनाश सप्रे
सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर झाल्यामुळे मराठी भाषाकांना आनंद वाटणे साहजिकच होते. तसे पाहिले तर हा दर्जा मराठी भाषेला दक्षिणी भाषांच्या नंतर आणि उशिरा मिळाला. प्रथम तमिळ भाषेला आणि त्या पाठोपाठ ओडिया मल्याळम आणि कन्नड भाषेला हा दर्जा मिळत गेला. आपल्याला मात्र त्यासाठी खूप वाट पहावी लागली. दक्षिणेकडच्या राज्यामध्ये सत्ता कुणाची असो तिथल्या राज्यकर्त्यांना आणि मुख्य म्हणजे तिथल्या लोकांना आपल्या मातृभाषेबद्दल विलक्षण प्रेम असल्यामुळे आणि राजकीय इच्छाशक्ती जबरदस्त असल्यामुळे हा दर्जा मिळवण्यात त्यांना सहज यश मिळाले, त्या पार्श्वभूमीवर आपण आणि आपल्या राज्यकर्त्यांचे मराठी भाषा प्रेम तेवढे तीव्र नाही हे या निमित्ताने दिसून आले. आपल्याला उशिरा जाग आली. दर्जा मिळावा म्हणून खूप खटपट करावी लागली. अर्ज, विनंती आणि आर्जव करावे लागले. वस्तूत: हा दर्जा प्राप्त होण्यासाठी दोन महत्त्वाच्या कसोट्यावर मराठी भाषा उतरणे ही पूर्व अट होती. त्यासाठी एक कसोटी म्हणजे तुमची भाषा 15 ते 2000 वर्ष इतकी प्राचीन असली पाहिजे, आणि दुसरी अट या भाषेत तेव्हापासून आज अखेर महत्वाचे लेखन होत असले पाहिजे, त्यासाठी सातत्य असले पाहिजे, खंड असता कामा नये.

महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध लेखक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ व्यक्तींची समिती नेमली आणि अहवाल तयार करायला सांगितलं. समितीने भरपूर परिश्रम करून, पुरावे आणि संदर्भ गोळा केले आणि वेळेत अहवाल तयार केला व शासनाकडे सादर केला. शासनाने त्याचा स्वीकार करून तो केंद्र सरकारला सादर केला. केंद्र सरकारने तो साहित्य अकादमीकडे अभिप्रायार्थ पाठवला. अकादमीने राष्ट्रीय दर्जाच्या तज्ज्ञांची समिती नेमली, त्यात काम करणाऱ्या भाषातज्ञांनी अनुकूल अभिप्राय दिला. मग अकादमीने हा अहवाल अभिप्रायासह केंद्रसरकारला सादर केला. असे सर्व सोपस्कार होऊनही हा दर्जा जाहीर झाला नाही. आपल्या राज्यकर्त्यांना त्या बद्दल काही प्रयत्न करावेत. सरकारवर दडपण आणावे असे वाटले नाही. साहित्य संस्थांनी लाखो मराठी भाषिकांच्या सह्यांचे निवेदने केंद्राकडे पाठवली. सभा संमेलनातून ठराव पास झाले. एवढेच नव्हे तर मुंबईत लेखक, अभ्यासकांनी उपोषणही केले. शेवटी एकदा ऐन निवडणुकीच्या तोंडावर मराठी भाषेला 'अभिजात' हा दर्जा पंतप्रधानांनी जाहीर केला. मग मात्र, जिकडे तिकडे उत्साह जल्लोष सुरू झाला.

आपल्याकडे उदंड उत्सव होत होतेच, त्यात आता मराठीच्या नावे उत्सव होऊ लागले. कार्यक्रम होऊ लागले. इतिहासात रमण्याची (आणि वर्तमानकडे दुर्लक्ष करणे) ही प्रवृत्ती आहेच, त्यामुळे आपल्या भाषेच्या इतिहासा बद्दल गौरवाने बोलले जाऊ लागले. मराठी भाषेची परंपरा थोर आहे याबद्दल शंकाच नाही, पण आता मराठी भाषेच्या निव्वळ भूतकाळातील गौरवात न रमता तिच्या वर्तमानकाळातील स्थितीगती विषयी आणि भविष्यकालीन उज्वल भविष्याच्या दृष्टीने कृतिशील आराखडा करणे महत्त्वाचे आहे. दहा-बारा कोटी लोकांच्या महाराष्ट्रात मराठी भाषेची स्थिती चिंताजनक वाटावी अशी आहे. मराठी माध्यमाच्या शाळा दिवसेंदिवस बंद पडत आहेत. महाविद्यालये आणि विद्यापीठातून मराठी विषयी घेणाऱ्यांची संख्या लक्षणीय संख्येने कमी होते आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळात आपल्या मुलांना घालण्याकडे पालकांचा कल वाढत असल्याने अशा शाळांची संख्या वाढत आहे. (इंग्रजी शाळामुळे आपल्या मुलांचे भविष्य चांगले होते असा एक चुकीचा समज त्यामागे आहे.) मराठी भाषेबद्दल मराठी माणसांच्या मनातच एक भयंकर न्यूगंड आहे. महाराष्ट्र सरकारकडे (मग ते कुठल्याही पक्षाचे असो) कांही एक भाविक धोरण आणि दृष्टी आहे असे दिसत नाही, उलट धरसोड वृत्ती मात्र दिसून येते. शासनाच्या प्राधान्यक्रमात मराठी भाषेला स्थान नाही समस्या आलं की तात्पुरत्या मलमपट्ट्या लावल्या जातात. महाराष्ट्र राज्य स्थापन होऊन ६५ वर्षे झाली पण अद्यापही राज्याच्या राजधानीत मुंबईत मराठी भाषेसाठीचे स्वतंत्र भाषाभवन नाही. मराठी भाषेच्या वर्तमानातील अनास्तेची ही यादी आणखीन वाढवता येईल, त्यापेक्षा मुद्द्याची गोष्ट अशी की व्यक्ती समाज संस्था आणि शासन अशा सर्वच स्तरावर वर्तमानात ठोस कृती प्रवणतेची अत्यंत गरज आहे त्यामुळे मराठी भाषेचे भविष्यातील भवितव्य उज्वल होणार आहे.

या दृष्टिकोनातून मराठी भाषेचा विचार नुसती बोलण्याची आणि साहित्यव्यवहाराची भाषा एवढाच न करता मराठी आता 'ज्ञानभाषा' होण्याच्या दृष्टीने मूलभूत प्रयत्न करायला हवेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, उद्योग, न्यायव्यवस्था

इत्यादी. सर्व क्षेत्रात या भाषेचा समक्ष आणि सहज उपयोग करता आला पाहिजे. त्यासाठी त्या त्या क्षेत्रातील वापरता येणारी परिभाषा निर्माण केली पाहिजे. ग्रंथ निर्माण केले पाहिजेत. कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. आपल्या भाषेतून ज्ञान प्राप्त करता येते असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केला पाहिजे. बदलत्या काळाच्या भावीक गरजा भागवण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. मराठी भाषेला " दर्जा मिळाला असल्याने आता या भाषेच्या जतन, संवर्धन आणि विकासासाठी केंद्र सरकारकडून मोठा निधी दिला जाणार आहे त्याचा योग्य तो विनियोग अशा कामासाठी केला जावा अशी अपेक्षा आहे. ज्ञान व्यवहाराच्या अंतर्गत गरजा भागवणे हे एक उद्दिष्ट झाले दुसरे उद्दिष्ट मराठी भाषेला आणि त्यातल्या साहित्याला जागतिक पातळीवर नेणे हे असायला हवे. मराठीतले चांगले साहित्य इतर भारतीय भाषांत आणि इंग्रजीसह अन्य महत्त्वाच्या जागतिक भाषांत मोठ्या प्रमाणावर अनुवादित झाले पाहिजे. त्यासाठी 'अनुदान अकादमी' ची स्थापना करणे गरजेचे आहे. अशा भाषांतील द्वेभाषीक अनुवादकांची माहिती गोळा करून ती संग्रहित करायला हवी. जगातील भाषांतील विविध विषयावरचे ज्ञानग्रंथ मराठीमध्ये अनुवादीत व्हायला हवेत. " सारख्या आधुनिक माध्यमावर मराठी साहित्य, साहित्यकृती आणि साहित्यिकांच्या संबंधीच्या नोंदी मोठ्या प्रमाणावर प्रकाशित व्हायला हव्यात. (दक्षिणेकडच्या भाषांच्या नोंदी त्यावर मोठ्या प्रमाणात आढळतात, त्यामानाने मराठीच्या नोंदी फार थोड्या आहेत असे दिसून येते.) आधुनिक तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या विविध सुविधांचा वापर करून मराठीचा प्रचार, प्रसार आणि उपयुक्तता रुजवायला आणि वाढवायला हवी.

'अभिजात भाषा' याचा एक मूळ अर्थ 'अभिजनांची भाषा' असा आहे, त्याचा व्यत्यास म्हणजे 'बहुजनांची' जी भाषा ती 'प्राकृत' भाषेला दुय्यम स्थान दिले गेले आणि त्यातून उच्चवर्गीय/वर्णीयांचे भाषिक प्रभुत्व प्रस्थापित केले गेले. ज्ञान फक्त अभिजात भाषेत आहे आणि बहुजनांच्या आवाक्यापलीकडे आकलनाच्या पलीकडे आहे असे भासवले गेले. त्यातून बहुजन समाज ज्ञानापासून वंचित राहील (संस्कृतवाणी देवांनी निर्माण केली मग प्राकृत वाणी काय चोरांनी निर्माण केली? असा बंडखोर प्रश्न एकनाथानी विचारला, त्याची येथे आठवण होते.) तसे पाहता आज आपण जिला 'प्रगत' मराठी म्हणतो (आणि आता अभिजात मराठी म्हणतो) ती मराठी विविध प्राकृत रूपांतूनच विकसित झाली आहे. तेव्हा आजच्या प्रमाण भाषेकडे अशा सोवळ्या आणि पारंपारिक, भेदभाव निर्माण करणाऱ्या दृष्टीने पाहू नये. मराठी भाषेच्या विकासाचा विचार करताना नुसत्या प्रमाण भावेवर लक्ष केंद्रित न करताना मराठीच्या विविध भागातल्या ज्या 'बोलीभाषा' आहेत (मराठीत 35 बोलीभाषा जिवंत आहेत: भालचंद्र नेमाडे) त्यांना दुय्यम, अशुद्ध न मानता त्यांच्या जतन, संवर्धनाकडेही लक्ष द्यायला हवे. मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी स्वायत्त स्वरूपाची इन्स्टिट्यूट ऑफ मराठी ही संस्था स्थापन करावी. महाराष्ट्रात मराठी भाषेच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या संस्था आहेत, त्यांना या संस्थेशी संलग्न करून घ्यावे. या संस्थेत भाषाशास्त्राचा अभ्यास आणि संशोधन केलेल्यांची नियुक्ती व्हावी. शासनाच्या 'साहित्य संस्कृती मंडळ', 'मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ' या संस्थांचे सहकार्य घ्यावे. भाषाविषयक धोरण ठरवताना शासनाने या संस्थेचे मार्गदर्शन घ्यावे. बृहन् महाराष्ट्रात आणि जगातल्या विविध देशात असणाऱ्या मराठी माणसांना त्यांच्या मुलांना मराठी शिकवण्यासाठी पाठ्यपुस्तके तयार करून घ्यावीत. अ-मराठी लोकांना मराठी शिकवण्यासाठी वर्ग सुरू करावेत. असे विविध उपक्रम ही संस्था राबवू शकते, ही काळाची गरज आहे.

आपली मातृभाषा फक्त संवादाचे माध्यम असत नाही. ती आपली ओळख असते. आपली अस्मिता असते. आपली संस्कृती असते. आपल्या भाषेतून आपले विश्वभान व्यक्त होत असते. आपला मूल्यभाव व्यक्त होत असतो. भाषा जेवढी प्रगत तेवढी आपली संस्कृतीही प्रगत होते. भाषा आपल्या आत असते, बाहेर असते, भाषा सार्वभौम असते. हे भान सदैव ठेवले पाहिजे आणि त्या दृष्टीने मराठीचा विचार केला पाहिजे.

B.Aadhar International Refereed & Peer-Reviewed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXV) 565 -A
ISSN : 2278-9308
February 2026

महाराष्ट्र साहित्य परिषद: साहित्य चळवळीतील एक अग्रगण्य संस्था

प्रा. मिलिंद जोशी
अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ
प्रा.संजय ठिगळे
कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सांगली.

गोषवारा :

साहित्य चळवळ गतिमान करण्यात अनेक घटकांचे मोलाचे योगदान असते. विशेषकरून मराठी साहित्य चळवळ गतिमान करण्यासाठी गेली अनेक दशके महाराष्ट्र शासन, शैक्षणिक आणि स्वयंसेवी संस्था त्याचबरोबर लेखक, समीक्षक, आणि कवी मोठे योगदान आहेत. त्यामध्ये अग्रक्रमाने नाव घ्यायचे म्हटले तर महाराष्ट्र साहित्य परिषदेचे घ्यावे लागेल. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ही महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्था असून गेली १२० वर्षे ही संस्था मराठी भाषा, साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांच्या जतन आणि संवर्धनासाठी कार्यरत असून संस्थेने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात आपले जाळे विस्तारले असून आज पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, जळगाव, धुळे-नंदुरबार, कल्याण, डोंबिवली, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या जिल्ह्यांत परिषदेचे कार्य विस्तारलेले असून संस्थेच्या ९० शाखा असून २० हजार आजीव सभासद आहेत. मराठी साहित्यातील सुमारे ४० हजार साहित्यिकांचे नेतृत्व करणारी ही सगळयात मोठी साहित्य परिषद आहे. मराठी भाषेचा प्रचार व प्रसारासाठी परिषद ती अव्याहतपणे कार्यरत असून मुंबई, विदर्भ आणि मराठवाडा वगळता उर्वरित महाराष्ट्र हे 'मसाप'चे कार्यक्षेत्र आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि ठाणे जिल्ह्यात ६५ शाखा आहेत. 'मसाप'च्या आजीव सभासदत्वासाठी मिळणाऱ्या शुल्कातील ४० टक्के रक्कम ही शाखांना दिली जाते. त्याचप्रमाणे विभागीय साहित्य संमेलनासाठी ५० हजार रुपयांचा निधी दिला जातो. शाखा मेळाव्यासाठी पूर्वी असलेल्या २५ हजार रुपये निधीची तरतूद वाढवून ४० हजार करण्यात आली आहे.

अभिजात दर्जासाठीची चळवळ उभारणाऱ्या आणि गेली अनेक वर्षे मराठी भाषा पंधरवडा साजरा करणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विविध शाखा म्हणजे साहित्य चळवळीच्या रक्तवाहिन्या आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेने आपल्या शाखांच्या माधमातून साहित्य चळवळीला अधिक गतिमान करण्याचे महत्वपूर्ण कार्य केलेले दिसून येते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यालय टिळक रोडवर नव्याने बांधलेल्या इमारतीत आले असून या इमारतीत 'माधवराव पटवर्धन सभागृह', एक ग्रंथालय आणि त्यातच 'कै.वा.गो. आपटे संदर्भ ग्रंथालय' असून इमारतीच्या तळघरात खासगी संस्था पुस्तक प्रदर्शने भरवतात. मसापच्या वतीने साहित्य पत्रिकेचे प्रकाशन केले जाते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष रावसाहेब कसबे असून कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी तर प्रमुख कार्यवाह म्हणून सुनिताराजे पवार कार्यरत आहेत. भविष्यात साहित्य चळवळीला खूप मोठे भवितव्य आहे. परिषदेला शासनाने भरघोस मदत करण्याची गरज असून परिषदेने आपल्या कार्यात अधिक गतिमानता आणण्याची गरज आहे.

कळीचे मुद्दे: मराठी साहित्य- साहित्य चळवळ- महाराष्ट्र साहित्य परिषद- साहित्य चळवळीतील योगदान- भवितव्य

प्रस्तावना:

साहित्यिक चळवळ म्हणजे साहित्यिक कृतींचा एक समूह जो एकाच वेळी समान हेतू आणि शैली असलेल्या लेखकांनी तयार केला होता. चळवळीमध्ये तयार केलेली कामे निबंधांपासून कवितांपर्यंत असू शकतात. एकाच लेखकाला अनेक वेगवेगळ्या स्वरूपात काम करताना आढळणे सामान्य आहे. साहित्य चळवळीला गतिमान करण्याच्या दृष्टीने अनेक संस्थांनी त्यामध्ये कार्यरत राहणे अपेक्षित असते. संस्था जेवढ्या प्रवाही राहतात तेवढी साहित्य चळवळ गतिमान होते. साहित्य चळवळीतून प्रेरणा घेऊन अनेक नवोदित साहित्यिक,लेखक आणि कवी प्रेरित होतात. लेखन करतात त्यातूनच साहित्य

चळवळ अधिक मजबूत होत जाते. मराठी साहित्य चळवळीला दिशा देण्यासाठी देशभर अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी एक म्हणजे महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे साहित्य चळवळीतील योगदान

साहित्य चळवळ आणि चळवळीतील संस्था यांचे मोलाचे योगदान असून महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचे योगदानाचा विचार केला तर साहित्य ही महाराष्ट्रातील आद्य साहित्यसंस्था असून गेली ११९ वर्षे ही संस्था मराठी भाषा, साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांच्या जतन आणि संवर्धनासाठी कार्यरत आहे. एवढेच नव्हेतर ती तमाम सारस्वतांसाठी अक्षय ऊर्जाकिंद्र झाले आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात न्या. रानडे आणि लोकहितवादी यांनी ग्रंथकार संमेलने सुरू केली. चौथे ग्रंथकार संमेलन १९०६ साली प्रसिद्ध कवी गो. वा. कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात मळेकर वाड्यात भरले होते. या संमेलनाच्या समारोपात साहित्य सम्राट न.चिं.केळकर यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या स्थापनेची घोषणा केली. लोकमान्य टिळकांनी त्यांना अनुमोदन दिले. खरेतर तेव्हापासून महाराष्ट्र साहित्य परिषद मराठी भाषा, साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांच्या जतन आणि संवर्धनासाठी कार्यरत आहे. अनेक थोर सारस्वतांनी वाङ्मयसेवकांची भूमिका पार पाडत आपल्या आयुष्यातला बहुमोल वेळ देऊन या संस्थेच्या कार्याचा विस्तार केला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यालय सुरुवातीला मळेकर वाडा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वास्तूत होते. त्यानंतर ते टिळक रोडवर नव्याने बांधलेल्या इमारतीत आले. या इमारतीत 'माधवराव पटवर्धन सभागृह', एक ग्रंथालय आणि त्यातच 'कै.वा.गो. आपटे संदर्भ ग्रंथालय' आहे. इमारतीच्या तळघरात खासगी संस्था पुस्तक प्रदर्शने भरवतात.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा कार्य विस्तार :

परिषदेच्या गांवोगांवी शाखा आहेत. अहमदनगर, आटपाडी, आळंदी, इचलकरंजी, इस्लामपूर, उल्हासनगर, कराड, कल्याण, किन्हवली, कोपरगाव, कोरेगाव(सातारा), कोल्हापूर, खेड(रत्नागिरी), चाळीसगांव, चिंचवड, जळगाव, टिटवाळा, ठाणे, डोंबिवली, देहू, धुळे, नाशिक, पंढरपूर, पाचोरा, पिंपरी-चिंचवड, फलटण, बदलापूर, बारामती, बीड, बेलवंडी, मालेगाव, मुरबाड, भिवंडी, लासलगाव, वाई, वाडा, विक्रमगड, शहापूर, श्रीरामपूर, सांगली, सातारा, सातारा (शाहुपुरी), सासवड, सोनई, सोलापूर, बार्शी ,जुळे सोलापूर, पश्चिम सोलापूर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर मोडनिंब ,माळीनगर, सांगोला, मंगळवेढा, अक्कलकोट, दामाजी नगर ,नातेपुते, माळीनगर, हडपसर वगैरे. आज पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, जळगाव, धुळे-नंदुरबार, कल्याण, डोंबिवली, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या जिल्ह्यांत परिषदेचे कार्य विस्तारलेले आहे. शाळा-कॉलेजही आपले सभासद आहेत. ९० शाखा आणि २० हजार आजीव सभासद आहेत. मसापचे सभासदत्व फक्त आजीव सभासदत्व मिळते. इतर कोणत्याही प्रकारचे सदस्यत्वाची सोय नाही. मात्र शाळा-कॉलेजही परिषदेचे सभासद आहेत. साहित्यिकांचे नेतृत्व करणारी ही सगळ्यात मोठी साहित्य परिषद आहे. मराठी भाषेचा प्रचार व प्रसारासाठी ही परिषद काम करते. मुंबई, विदर्भ आणि मराठवाडा वगळता उर्वरित महाराष्ट्र हे 'मसाप'चे कार्यक्षेत्र आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि ठाणे जिल्ह्यात ६५ शाखा आहेत.

साहित्य चळवळीला चालना देण्यासाठी दिलेले योगदान

साहित्य चळवळीला चालना मिळावी या व्यापक उद्देशाने 'मसाप'च्या आजीव सभासदत्वासाठी मिळणाऱ्या शुल्कातील ४० टक्के रक्कम ही शाखांना दिली जाते. त्याचप्रमाणे विभागीय साहित्य संमेलनासाठी ५० हजार रुपयांचा निधी दिला जातो. शाखा मेळाव्यासाठी पूर्वी असलेल्या २५ हजार रुपये निधीची तरतूद वाढवून ४० हजार करण्यात आली आहे. साहित्याकांच्या हाताला बळ मिळावे म्हणून अनेक पुरस्कार दिले जातात. **साहित्य चळवळीला चालना देण्याच्या हेतूने विविध पुरस्कार** दिले जातात. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने ज्येष्ठ भाषा अभ्यासक आणि लेखिका डॉ. अंजली सोमण पुरस्कृत 'मसाप जीवनगौरव' पुरस्कार दिला जातो. रोख २५,०००/- रु. आणि सन्मानपत्र दिले जाते. २) मसापच्या वतीने 'डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' दरवर्षी दिला जातो. रोख ११,०००/- रु. आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. हे पुरस्कार मसापच्या वर्धापनदिन समारंभात दिले जातात. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे प्रतिवर्षी प्रसिद्ध लेखिका डॉ. नलिनी गुजराथी आणि उद्योजक मोहन गुजराथी यांनी दिलेल्या देणगीतून संशोधनात्मक ग्रंथाला कै. कृष्णमुकुंद स्मृती पुरस्कार दिला जातो. रोख रक्कम आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने उत्कृष्ट शाखा आणि कार्यकर्ता पुरस्कार दिले जातात. राजन लाखे पुरस्कृत बाबुराव लाखे स्मृतीप्रीत्यर्थ वैशिष्ट्यपूर्ण शाखा पुरस्कार दिला जातो. रत्नाकर कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ कार्यकारी मंडळात आणि शाखेत उत्तम काम करणाऱ्या कार्यकर्त्यास कार्यकर्ता पुरस्कार दिला जातो. कोकणात साहित्य परिषदेच्या शाखांचा विस्तार करून वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयीन उपक्रम ज्येष्ठ लेखिका भारती पांडे

यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेला दिलेल्या देणगीतून त्यांचे पिताश्री कै. रा. द. पुसाळकर आणि मातोश्री इंदुमती पुसाळकर यांच्या स्मरणार्थ साहित्य पुरस्कार देण्यात येतो. उत्कृष्ट विनोदी लेखनासाठीचा कै. रा. द. पुसाळकर पुरस्कार हा रोख रक्कम आणि सन्मान पत्र असे या पुरस्काराचे असते. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणारा डॉ. गं. ना. जोगळेकर स्मृती पुरस्कार दिला जातो. त्याचबरोबर गुणवंत लेखक आणि साहित्यिकांचा सत्कार केला जातो. परिषदेच्या या उपक्रमामुळे अनेक लिहत्या हाताला बळ प्राप्त झाले.

महाराष्ट्र साहित्य पत्रिका म्हणजे साहित्य परिषदेचा आरसा

साहित्य चळवळ गतिमान होण्यासाठी लिहणाऱ्या हाताला बळ देणारी मासिके असावी लागतात. खरेतर महाराष्ट्र साहित्य परिषदेला घटनात्मक स्वरूप प्राप्त झाल्यानंतर १९१२ मध्ये अकोला येथे झालेल्या संमेलनामध्ये परिषदेचे मुखपत्र असावे हा निर्णय घेण्यात आला. मराठी वाङ्मयातील नवे प्रवाह आणि समीक्षा यांचा वेध घेण्याच्या उद्देशातून परिषदेतर्फे १९१३ मध्ये महाराष्ट्र साहित्य पत्रिका हे मुखपत्र सुरू करण्यात आले. सुरुवातीची बारा वर्षे हे मुखपत्र मासिक स्वरूपात निघत होते आणि विविध ज्ञानविस्तार मासिकाला जोडून वितरित केले जात होते. त्यावेळी ना.गो. चापेकर, माधवराव पटवर्धन, के. नारायण काळे, यशवंत पेंढरकर, डॉ. वि.भि. कोलते, दि. के.बेडेकर, श्री.के. क्षीरसागर, स.गं. मालशे, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. हे.वि. इनामदार, वि.मो. महाजनी, वा.गो. आपटे अशा दिग्गजांनी पत्रिकेचे संपादक म्हणून काम पाहिले आहे.स्वतंत्रपणे प्रसिद्ध होऊ लागलेल्या 'साहित्य पत्रिके'चे महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार हे पहिले संपादक होते. साहित्यसम्राट न.चिं. केळकर, श्री.म. माटे, रा.श्री. जोग, रा.शं. वाळिंबे, वसंत स. जोशी, शंकर सारडा, ह.ल. निपुणगे अशा दिग्गजांनी पत्रिकेच्या संपादकत्वाची धुरा सांभाळली आहे. २००४पासून सु. प्र. कुलकर्णी संपादक म्हणून काम पाहू लागले. २०१७ साली पुरुषोत्तम काळे हे संपादक आहेत.. भारत छोडो आंदोलन, स्वातंत्र्यप्राप्ती, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन या चळवळींसह स्त्री सुधारणा, अस्पृश्यता निवारण, बुद्ध धर्म तत्त्वज्ञान असे विविध राजकीय आणि सामाजिक विषयांचे प्रतिबिंब या साहित्य पत्रिकांच्या अंकांमध्ये उमटलेले आहे. साहित्य पत्रिकेमध्ये आपले लेखन प्रसिद्ध होणे हा त्या लेखक आणि प्राध्यापकाचा बहुमान समजला जातो.परिषदेच्या वतीने तिमाही अंक प्रकाशित केले जातात.

साहित्य संमेलने आणि महाराष्ट्र साहित्य परिषद

महाराष्ट्र साहित्य परिषद ही अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची घटक संस्था असून ती महामंडळाला दरवर्षी भरणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी मार्गदर्शन करते व सहभागी होते. त्याचबरोबर स्थानिक कवी, लेखकांना प्रोत्साहन मिळावे व साहित्य चळवळ ग्रामीण भागात खोलवर रुजावी म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने दरवर्षी विविध विभागीय आणि ग्रामीण संमेलने आयोजित केली जातात. सातारा येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या नियोजनात महाराष्ट्र साहित्य परिषदेने सर्व अर्थाने मोठे योगदान दिले आहे. एव्हाना पुणे येथे संपन्न होणाऱ्या १०० व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाची जबाबदारी मसापने घेतली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याची दखल घेऊन परिषदेला डॉ. अशोक केळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून त्यापाठीमागे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अधिकारी,पदाधिकारी,शाखा अध्यक्ष आणि सभासदांचे मोठे योगदान आहे. त्यबरोबरच महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे, कार्याध्यक्ष प्रा मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, पराग जोगळेकर, उज्वला जोगळेकर यांचे योगदान महत्वाचे आहे.

साहित्य चळवळीला गती देणारी महाराष्ट्र साहित्य परिषदेची उपक्रमशिलता

महाराष्ट्र साहित्य परिषदेने गेल्या ११९ वर्षात अनेक उपक्रम राबविले त्यामुळेच साहित्य चळवळीला हातभार लागला. विविध उपक्रमामध्ये प्रामुख्याने ग्रंथपुरस्कार,साहित्यिकांचे स्मृतिदिन पाळणे, नाट्यकार्यशाळा, एकांकिका लेखन स्पर्धा,युवा मुक्त मंच - कथालेखन स्पर्धा, काव्य वाचन आणि इतर विविध उपक्रम, बाल वाचनालय, बाल संगोपन केंद्र आणि बालकांसाठी विविध कार्यक्रम, कॉफी क्लब अंतर्गत साहित्यिक गप्पा,साहित्यिकांसाठी मोफत कायदेशीर सल्ला त्याचबरोबर एकांकिका आणि नाट्यप्रयोगाचे सादरीकरण,नवीन आलेल्या साहित्यकृतींचे स्वागत, वृद्ध साहित्यिकांना मदत, गरजू विद्यार्थिनींना देणगीमूल्यात वाचनालयाची सोय, परगावचे साहित्यिक/आजीव सभासद यांना अल्प देणगीमूल्यात निवासाची सोय केली जाते.

ग्रामीण भागात साहित्य चळवळ गतिमान करण्यासाठी शिवार साहित्य संमेलने घेतली जातात.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावासाठी लोक चळवळ उभा केली

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी परिषदेने लोक चळवळ उभारली, त्यासाठी लेखकांच्या बैठका, पंतप्रधान कार्यालयाला शालेय विद्यार्थ्यांमार्फत एक लाख पत्रं पाठविण्याचा उपक्रम, राजकीय इच्छाशक्तीला आवाहन करण्यासाठी पत्रव्यवहार आणि गाठी भेटी हे सारे करीत असताना राजधानी दिल्लीत जाऊन धरणे आंदोलनही केले. महाराष्ट्रातील साहित्य संस्थेने भाषिक प्रश्नासाठी थेट राजधानीत जाऊन आंदोलन करण्याची ही घटनाच ऐतिहासिक आणि अभूतपूर्व आहे. भाषा शिक्षणाचा कायदा सक्तीचा करण्यात यावा यासाठी आंदोलन, अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद निवडणुकीऐवजी सन्मानाने देण्यासाठी घटनाबदल केला.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी लोक चळवळ –

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी परिषदेने लोक चळवळ उभारली, त्यासाठी लेखकांच्या बैठका, पंतप्रधान कार्यालयाला शालेय विद्यार्थ्यांमार्फत एक लाख पत्रं पाठविण्याचा उपक्रम, राजकीय इच्छाशक्तीला आवाहन करण्यासाठी पत्रव्यवहार आणि गाठी भेटी हे सारे करीत असताना राजधानी दिल्लीत जाऊन धरणे आंदोलनही केले. महाराष्ट्रातील साहित्य संस्थेने भाषिक प्रश्नासाठी थेट राजधानीत जाऊन आंदोलन करण्याची ही घटनाच ऐतिहासिक आणि अभूतपूर्व आहे. अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद निवडणुकीऐवजी सन्मानाने देण्यासाठी घटनाबदल केला. डिजिटायझेशन आणि संशोधनप्रकल्प – तंत्रस्नेही समाजाला साहित्य परिषदेशी जोडण्यासाठी परिषदेने संकेतस्थळ सुरू केले, युनिकोडचा वापर सुरू केला. परिषदेचे मुखपत्र असलेल्या साहित्य पत्रिकेला आयएसएसएन नंबर मिळवून तो अंक ई-स्वरूपात उपलब्ध करून दिला. ज्ञानमंडळाच्या माध्यमातून परिषदेने विश्वकोश निर्मिती मंडळासाठी मोलाचे योगदान दिले. महापुरात उद्ध्वस्त झालेल्या सांगलीच्या नगर वाचनालयाला अकरा हजार पुस्तके परिषदेने भेट म्हणून दिली. परिषदेच्या संशोधन विभागाने डॉ. अरुणा ढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे खंड आणि महाराष्ट्र साहित्य पत्रिकेतील १०० वर्षांतील निवडक लेखांचे संकलन, (संपादक डॉ. नीलिमा गुंडी) हे महत्त्वपूर्ण प्रकल्प हाती घेतले. परिषद कोरोनाच्या संकटकाळातही कार्यरत कोरोनाच्या जागतिक संकटकाळात टाळेबंदीमुळे जेव्हा सारे जग ठप्प झाले होते तेव्हा परिषदेने आणि शाखांनी ऑनलाइन कार्यक्रमांच्या माध्यमांतून परिषदेचे काम जोमात सुरू ठेवले. या कठीण काळातही भरपूर देणग्या मिळविल्या आणि परिषदेची आर्थिक स्थिती (सरकारी अनुदान अर्ध्याने कमी झालेले असतानाही) मजबूत केली. ऐतिहासिक वास्तूला धक्का न लावता अंतर्गत देखणे सुशोभीकरण केले.टेरेसवर कल्याणराव जाधव सभागृह तयार करण्यात आले असून ते सभागृहही विविध कार्यक्रमांसाठी अनेक संस्थांना उपयुक्त ठरले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या यशस्वी वाटचालीत परिषदेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजीराव कदम, कार्यकारी विश्वस्त डॉ. पी. डी. पाटील, विश्वस्त यशवंतराव गडाख परंपरा आणि आधुनिकतेचा मिलाफ घडवित आज साहित्य परिषदेची वाटचाल सुरू आहे. परिषदेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे, प्रभारी प्रमुख कार्यवाह व कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार कार्यवाह श्री. विनोद कुलकर्णी कोषाध्यक्ष श्री. विद्याधर अनास्कर,उपाध्यक्ष,डॉ. तानाजीराव चोरगे,उपाध्यक्ष,राजीव बर्वे उपाध्यक्ष,डॉ. पुरुषोत्तम काळे पत्रिका संपादक,स्थानिक कार्यवाह,श्री. शिरीष चिटणीस,व्याख्याने व स्मृतीदिन मृणालिनी कानिटकर – जोशी,विशेष परितोषके अंजली कुलकर्णी वार्षिक ग्रंथपरितोषके,श्री. माधव राजगुरू परीक्षा विभाग,श्री. वि. दा. पिंगळे ग्रंथालय विभाग आणि ॲड. प्रमोद आडकर अतिथी निवास - वास्तू देखभाल अशा अनेकांच्या योगदानामुळे परिषदेने यशस्वी वाटचाल केली आहे.

निष्कर्ष :

१) साहित्य चळवळीच्या विकासात सरकार,स्वयंसेवी संस्था यांचे मोलाचे योगदान आहे.
२) महाराष्ट्र साहित्य साहित्य परिषदेने साहित्य चळवळीला एक वेगळी दिशा दिलेली आहे.
३) परिषद मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी नेहमीच अग्रेसर राहिली.
४) साहित्य चळवळीला गती प्राप्त व्हावी या व्यापक उद्देशाने परिषदेने विविध क्षेत्रातील अनेकांना पारितोषिके आणि पुरस्कार देऊन सन्मानित केल्यामुळे साहित्य क्षेत्रातील अनेकांच्या लिहत्या हाताला बळ प्राप्त झाले आहे.
५) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनापासून ते छोट्या मोठ्या शहरात साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यात परिषदेने मोलाचे योगदान दिले आहे.

६) परिषदेच्या माध्यमातून साहित्य पत्रिकेचे प्रकाशन होत असते त्यामुळे अनेक महत्वाच्या विषयावर लेखन होऊ शकले एवढेच नव्हेतर अनेक दिग्गजांना आणि नवोदितांना लिहण्याची संधि प्राप्त होऊ शकली.

७) परिषदेने अनेक पुस्तके प्रकाशित करून वाचकांच्या हाती दर्जेदार पुस्तके दिली आहेत.

८) महाराष्ट्र साहित्य परिषदेने आपल्या कार्यात तत्परता आणण्यासाठी शाखा विस्तारवर अधिक भर दिला असून प्रसंगी ज्या शाखा अकार्यक्षम आहेत अशा शाखांच्यावर बडगा उगारला आहे.

९) परिषदेने १०० व्या अखिल भारतीय साहित्य संमेलन पुण्यासारख्या शहरात घेण्याचा व त्याचे आयोजक होण्याचे शिवधनुष्य उचलले आहे ही जमेची बाजू आहे.

संस्थांच्या विकासासाठी मदतीची गरज

१) इथूनपूढच्या काळात साहित्य चळवळ विकसित करण्यासाठी अनेक संस्थानी हिरीहीरीने पुढे येण्याची गरज आहे.

२) महाराष्ट्र साहित्य परिषदेसारख्या अनेक संस्थाना सरकारने आर्थिक मदत करण्याची गरज आहे.

संदर्भ:

१) https://sahityaparishad.org/info/

२) महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे विविध अंक

३) विविध मासिके आणि वृत्तपत्रे

कर्नाटक-महाराष्ट्र सांस्कृतिक अनुबंध व अभिजात कन्नड भाषा आणि साहित्य

डॉ. चंद्रकांत वाघमारे
मराठी विभाग
राणी चत्रम्मा विद्यापीठ,
बेळगावी-591156, कर्नाटक
E-mall-chodowill.rediffmail.com
Mob. 9480539762/8050398264

भारत हा देश बहुभाषिक देश आहे. शिवाय येथे बहुसंस्कृती ही वसलेली आहे. भारत हा असा देश आहे जिथे शेकडो भाषा बोलल्या जातात आणि प्रत्येक भाषेचा स्वतःचा असा एक साहित्यिक इतिहास आहे. एका सर्वेक्षणानुसार, भारतात अंदाजे १६५२ भाषा बोलल्या जातात. त्यापैकी २२ भाषा संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध आहेत. यामध्ये हिंदी, मराठी, गुजराती, बंगाली, उडिया सारख्या प्रमुख आधुनिक भारतीय भाषा आणि कन्नड, तमिळ, तेलुगू आणि मल्याळम सारख्या दक्षिण भारतीय भाषांचा समावेश आहे, ज्यांचा साहित्यिक इतिहास मोठा आहे. त्यामध्ये बोडो आणि संधाली सारख्या भाषांचा देखील समावेश आहे. ज्यांना फक्त चार वर्षांपूर्वी संविधानात राष्ट्रीय भाषा म्हणून मान्यता देण्यात आली होती. डोंगरी आणि कोकणी सारख्या भाषा देखील आठव्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध आहेत, परंतु त्यांचे भाषिक तुलनेने कमी आहेत. याव्यतिरिक्त, मौखिक साहित्य असलेल्या असंख्य लोक आणि आदिवासी भाषा आहेत. यापैकी अनेक भाषा आधुनिक साहित्यिक प्रकारांमध्ये लिहिल्या जात आहेत आणि मासिके देखील प्रकाशित होत आहेत.

4	काल–देशयोः सेतुबन्धनम् विश्वसंस्कृतेः विज्ञानस्य च क्षेत्रे शास्त्रीयभाषाणां प्रभावः — भाग्यश्री जगदीश कुलकर्णी	24
	ಕನ್ನಡ ವಿಭಾಗ	
5	ಶಾಸ್ತ್ರೀಯ ಭಾಷೆಗಳು ಮತ್ತು ಕನ್ನಡ ಸಾಹಿತ್ಯದ ಭೂತ, ವರ್ತಮಾನ ಮತ್ತು ಭವಿಷ್ಯ — Mrs. Ambika Thoke	31
6	**ಶಾಸ್ತ್ರೀಯ ಭಾಷೆ: ಕನ್ನಡ ಸಾಹಿತ್ಯದ ಸ್ಥಾನಮಾನ** — Dr. Surekha .P Hortikar	34
7	**ಶಾಸ್ತ್ರೀಯ ಕನ್ನಡ ಭಾಷೆ ಮತ್ತು ಸಾಹಿತ್ಯ: ಭೂತ, ವರ್ತಮಾನ ಮತ್ತು ಭವಿಷ್ಯ** — Dr. Swami G.S	37
8	ಕನ್ನಡ ಭಾಷೆ ಸಂಸ್ಕೃತಿ ಜಾಗತಿಕರಣ — Dr. Gouramma yelangadi	43

9	ಶಾಸ್ತ್ರೀಯ ಭಾಷೆ ಮತ್ತು ಸಾಹಿತ್ಯದ ಪರಂಪರೆ, ಸವಾಲುಗಳು **Dr. Shivanand Tadwal**	53
10	ಅಭಿಜಾತ ಸಾಹಿತ್ಯವಾಗಿ ಕವಿರಾಜಮಾರ್ಗ **Smt. Jayalaksmi Chondipatil**	57
11	ಡಿಜಿಟಲ್ ಯುಗದಲ್ಲಿ ಕನ್ನಡ ಜನಪದ ಸಾಹಿತ್ಯ– ಶಾಸ್ತ್ರೀಯ ಭಾಷೆ ಮತ್ತು ಸಾಹಿತ್ಯದ ಭೂತ, ವರ್ತಮಾನ ಮತ್ತು ಭವಿಷ್ಯ **Miss. Bhouramma Dolli**	60
12	ಶಾಸ್ತ್ರೀಯ ಸಾಹಿತ್ಯದಿಂದ ಜೀವನ ಸಮೃದ್ಧಿ **Dr. B.B Poojari**	67
13	ಹಳೆಗನ್ನಡ ಅಭಿಜಾತ ಸಾಹಿತ್ಯದ ಪ್ರಾಚೀನ ಪರಂಪರೆ' **Dr. Sarikadevi Kalagi**	72
14	ಶಾಸ್ತ್ರೀಯ ಭಾಷೆ - ಕನ್ನಡ ಸಾಹಿತ್ಯ **Mrs. Yagnya Kataraki**	75
	प्राकृत विभाग	
16	आजच्या काळातील जीवनदृष्टी आणि प्राकृत साहित्यातील तत्त्वज्ञान **प्रा.डॉ. महावीर सुरेश पाटील**	80
17	जैन धर्म कथा साहित्य **सौ.मीनाक्षी कुमार भगाटे**	85
18	'चउप्पन्नमहापुरिसचरियं ' में प्रयुक्त प्राकृत भाषा की सौन्दर्य योजना **Dr. Shraddha Ravi Lunawat**	88
19	जैन प्राकृत साहित्यातील अनेकांतवादाचे स्वरूप आणि त्याचे समकालीन सामाजिक परिणाम: एक चिकित्सक अभ्यास **अर्चना दादासाहेब मुळे**	94
20	परिग्रहाचे दुष्परिणाम व वर्तमान समस्या **Mrs Pallavi Manjeet Bagi,Dr. R.T. Patil**	101
21	प्राकृत साहित्यातील निसर्गदृष्टी : पर्यावरणीय चेतनेचा अभ्यास **सौ.स्वाती महावीर पाटील**	111
	मराठी विभाग	
22	'अभिजात' मराठीचा प्रवास **डॉ. सदाशिव पाटील**	117
23	अभिजात मराठी: ज्ञानभाषा **डॉ. बापूराव भगवानराव पवार**	121
24	मराठी भाषेचे भवितव्य **डॉ. विठ्ठल शंकर केदारी**	125
25	महानुभाव साहित्यातील भक्ती आणि समता **डॉ.नंदकुमार शंकरराव इंगळे**	129
26	जात्यावरच्या ओव्यांतील भाऊ–बहिण नाते:भाषिक व भावनिक चित्रण. **प्रा. दिलीप यशवंत बर्वे**	132
27	प्राचीन भारतीय अभिजात ज्ञानवैभवाचा वारसा : धर्मगंज ग्रंथालय **प्रा. विकास विलास बर्गे, डॉ. स्मिता योगेश वेदपाठक**	138
28	शास्त्रीय भाषा व साहित्यामधील व्यवस्थापन विचार आधुनिक वाणिज्य व व्यवस्थापनासाठी एक संकल्पनात्मक अध्ययन **भाग्यश्री बोन्हाडे, डॉ. प्रबोधिनी वाखारे, प्रा. (डॉ.) शिवाजी बोन्हाडे**	147

29	अभिजात मराठी भाषेच्या संदर्भात संत एकनाथ महाराजांच्या अभंगांतील तत्त्वज्ञान :एक चिकित्सक अध्ययन **श्री. दिलीप रोहिदास पवार, डॉ. मिनाक्षी दयाराम महाले**	152
30	जागतिकीकरणाच्या युगात अभिजात भाषा व साहित्य: राजकीय आव्हाने व शक्यता **डॉ. विजय जालिंदर देठे**	159
31	माहिती-तंत्रज्ञानाच्या युगातील मराठी भाषा : संधी, आव्हाने आणि भवितव्य **डॉ. शीतल सचिन गोर्डे-पाटील**	163
32	मराठी अभिजात भाषेचे भवितव्य **प्रो.डॉ.कदम संभाजी धोंडीराम**	167
33	समाजमाध्यमातील मराठी भाषा: एक संशोधनात्मक अभ्यास **श्री. दऱ्याप्पा किसन गोडसे**	171
34	आदिवासी कादंबरीची भाषा : भिवा फरारीच्या अनुषंगाने **डॉ. अनिल एम. वळवी**	178
35	अभिजात मराठी भाषा आणि साहित्यातील बोलींचे योगदान **प्रा. डॉ. कृष्णा महादू भवारी**	181
36	लोकसाहित्य आणि अभिजात मराठी भाषा : आव्हाने व अपेक्षा **डॉ. संपतराव रामचंद्र पार्लेकर**	186
37	अभिजात भाषा आणि साहित्य:भूत, वर्तमान आणि भविष्य **डॉ. प्रवीण सुभाष ससाणे**	190
38	आदिवासी आत्मकथने : ऐतिहासिक आढावा **प्रा. श्री. यशवंत ढवळा भांडकोळी,**	194
39	सुखदेव नवले यांच्या कथा साहित्याची समाजशास्त्रीय मिमांसा **डॉ. रामदास नाईकनवरे.**	199
40	अभिजात भाषा व मराठीची सद्यस्थिती **डॉ. अशोक सदाशिव तवर**	202
41	अभिजात भाषा साहित्य: भूत,वर्तमान आणि भविष्य **प्रा. दिलीप शामराव कदम**	207
42	मराठी साहित्यातील वंचित व विस्थापितांचे चित्रण **डॉ. रमजान गुलाब तडवी,**	215
43	सुखदेव नवले यांच्या कथा साहित्याची समाजशास्त्रीय मिमांसा **डॉ. रामदास नाईकनवरे.**	220
44	अभिजात भाषा आणि मराठी साहित्य **सतीश दशरथ पाटील**	223
45	भारतीय अभिजात भाषा : ऐतिहासिक पार्श्वभूमी **प्रा. अमोल अरुण कुंभार**	227
46	मराठी भाषेचा ऐतिहासिक विकास व अभिजाततेची परंपरा **प्रा. मोहिनी संतोष सावंत**	233
47	आधुनिक समाजातील अभिजात भाषांचे स्थान : सांस्कृतिक ओळख व सामाजिक समावेशनाच्या दृष्टीने विश्लेषण **प्रा. सतिश अजित कांबळे**	238
48	संत तुकारामांच्या अभंगातील अभिजातता **प्रा.प्रमोद दत्तात्रय शेटे**	243
49	आदिवासी बोलीभाषा , साहित्य आणि सांस्कृतिक जीवनमूल्ये **मनोहर दुलाजी मोहरे**	248
50	अभिजात भाषा आणि साहित्य : सामाजिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास **सौ. उन्नती अमृतराव पाटील**	255
51	मराठी भाषेची पूर्वपीठिका : शिलालेखीय अभ्यास **साक्षी बाबासाहेब महामुलकर**	261

52	प्राथमिक स्तरावर – कविता लेखनातून स्व अभिव्यक्ती विकास **सौ.ऊर्मिला अनिल तेली**	266
53	आदिवासी लोकगीतांमधून व्यक्त होणारे सांस्कृतिक जीवन **विकास नामदेवराव बागलावे**	272
54	'शब्द' या लघुअनियतकालिकांतील कविता **श्रीमती कमल दिनेश येऊल**	279
55	अभिजात मराठी भाषा व आजचा युवक **श्री लक्ष्मण बालू पाटील**	284
56	मराठी भाषा साहित्याचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा **सहा.प्रा..सुप्रिया धनंजय राऊत.**	289
57	अभिजात भाषा संवर्धनात हस्ताक्षराची भूमिका **प्रा. सौ रुपाली सचिन येवले**	292
58	अभिजात मराठी भाषेचे डिजिटल युगातील रूपांतर: स्वरूप, संधी आणि आव्हाने **प्रा.रुपाली दिलीप पाटील**	296
59	अभिजात भाषा आणि ग्रंथालयाची भूमिका व जबाबदारी **प्रा. मनोज डोंगरदिवे**	303
60	स्त्रीच्या वेदनेची काव्यात्म कहाणी- तिची तीन रूपे **प्रा. प्रकाश बाळू नाईक,**	307
61	जागतिकीकरणाच्या युगात अभिजात भाषा–साहित्य : सांस्कृतिक अस्तित्व व सामाजिक परिवर्तन **सहा. प्रा. तेजल महादेव कोळी**	311
62	मराठी अभिजात भाषा आणि साहित्य- भूत, वर्तमान आणि भविष्य **प्रा. डॉ. सविता अशोक माळी**	315
63	आदिवासी बोली आणि प्रमाणभाषा : काही गंभीर प्रश्न **डॉ. सखाराम डाखोरे**	318
64	संस्कृत ग्रंथांतील योगसाहित्य आणि आधुनिक शारीरिक शिक्षण **डॉ. रूपाली सिदू कांबळे**	322
65	अभिजात मराठी भाषा: वर्तमान आणि भविष्य **डॉ.संदीप भागू चपटे**	326
66	मध्ययुगीन मराठी भाषा आणि साहित्य **श्रीमती.मीना पांडुरंग चव्हाण**	331
67	विश्वास वसेकर यांच्या सामाजिक कविता एक शोध **सविता जीवन लोहकरे – माळी**	335
68	अभिजात भाषा आणि तृतीयपंथीय यांचा सहसंबंध **सौ. वेदा उदयराज माळकर.**	342
69	भाषा आणि प्रतीकात्मक हिंसा : पियेर बुरदियूंच्या भाषा-सिद्धांताचा अभ्यास **प्रा. रोहोकले मयुर सूर्यभान**	346
70	मराठी साहित्यात बोलीभाषांचे समाजभाषावैज्ञानिक महत्त्व आणि भाषिक परिवर्तन **श्री. सुनील नाना तोरणे,, प्रा. (डॉ.) शिवाजी एंडाईत,**	355
71	अभिजात दर्ज्यासाठी : भाषेचा इतिहास, साहित्य आणि प्राचीनता **सहा. प्रा. सूर्यवंशी राहुल गुणवंत**	359
72	प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा **प्रा. माधवी सुरेंद्र पवार**	362
73	प्राचीन काळातील हस्तलिखिते, त्यांची भाषा व त्यांचे आजच्या काळातील महत्त्व **प्रा. डॉ. प्रतिभा शंकर घाग – सोनी**	367

74	सातपाटील कुलवृत्तांत: मराठी साहित्यातील अभिजात लोकइतिहास व सांस्कृतिक महाकथनाचा दस्तऐवज **प्रा. डॉ. सागर अशोक पाटील**	370
75	विषय- कवयित्री शांता शेळके यांच्या चित्रपट गीतांचे विशेष **डॉ. भक्ती गोविंद महाजन**	376
76	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या काव्यातील राष्ट्रीय विचार **प्रा. तृप्ती शंकर नाईक**	382
77	मराठी कादंबरीचा सांस्कृतिक पार्श्वभूमीवर अभ्यास (इस १८०० ते १९२०) **डॉ. लक्ष्मण सर्जेराव शिंदे**	385
78	मुस्लिम मराठी साहित्यिकः कवी आणि कविता **सौ. जस्मिन रमजान शेख**	392
79	लोकरंगभूमीवरील पंचमी विधीनाट्य : परंपरा, स्वरूप आणि सामाजिक आशय **प्रा. गिरी घनश्याम आनंदगिर**	398
80	मा. शं. मोरे यांनी पाली ग्रंथांच्या अनुवादासाठी दिलेले योगदान **प्रा.(डॉ.) प्रशांत बाबासो गायकवाड**	401
81	महाराष्ट्रातील आदिवासी महादेव कोळी जमातींची बोलीभाषा **डॉ.प्रभाकर घोडके , श्रीमती. सुवर्णा भिमाची धादवड**	404
82	मराठी साहित्य आणि संस्कृती संवर्धनासाठी प्रसारमाध्यामांची गरज: एक आकलन **डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार**	408
83	अभिजात भाषा आणि साहित्य :भूत, वर्तमान आणि भविष्य **सहा. प्रा. उज्वला उत्तम अहिरे**	415
84	दलित कादंबरीतील मूल्यविचार **डॉ. सुमित बबन साळुंखे**	419
85	चंदगड आणि कर्नाटक सीमावर्ती भागातील लोकगीतांचा अभ्यास **स्मिता दिलीप शेटकर**	424
86	राजकीय दृष्टिकोनातून अभिजात भाषा आणि साहित्य **डॉ. वंदना अरुण सातपुते**	430
87	अभिजात भाषा: ग्रंथपालांची भूमिका **प्रा. जयश्री धोंडीराम हाटकर**	435
88	संत जनाबाईचे काव्य अस्सल अभिजात भाषेचा एक अविष्कार **प्रा.डॉ.सुचिता सुभाष औंधकर**	440
89	बनगरवाडीतील : अभिजात मराठी भाषा **प्रा.डॉ.निकम प्राजक्ता प्रल्हादराव**	444
90	आदिवासी कथा: स्वरूप आणि आशयसूत्रे **डॉ. अशोक खंडू मोरमारे**	489
91	वसुनंदी श्रावकाचारामध्ये वर्णिलेल्या सप्त व्यसन त्यागाची वर्तमानकालीन आवश्यकता **आरती अजित होनोले**	456
92	अभिजात भाषा व साधन सूचित्व : संकल्पना, आवश्यकता, आणि आधुनिक माहिती तंत्रज्ञानाची भूमिका **प्रा. मंदा देवराव वरघट**	465
93	'मध्ययुगीन मराठी भाषा व साहित्य' **माधुरी सुरेश बागडे, डॉ. नीतिन दत्तात्रेय आरेकर**	469
94	संतसाहित्य : मराठी भाषेच्या अभिजाततेचा मूलाधार **डॉ. विजया प्रशांत पवार**	475

95	अभिजात भाषा आणि साहित्य एक नवा अभ्यास **कु. साजिदा सरदार आरवाडे**	479
96	दृष्टान्तपाठ अभिजात भाषेचा वैशिष्ट्यपूर्ण अविष्कार **प्रा.डॉ. कोमल कन्हैय्या कुंदप**	483
97	संतसाहित्य : मराठी भाषेच्या अभिजाततेचा मूलाधार **डॉ. विजया प्रशांत पवार**	487
	हिंदी विभाग	
98	भाषा के रूप में हिन्दी का बदलता स्वरूप **डॉ. अमृता कुमारी**	491
99	21 वीं सदी की हिंदी कविता का सामाजिक सरोकार **डॉ. अशोक मोहन मरळे**	494
100	अंतरराष्ट्रीय स्तर पर हिंदी की स्थिति **डॉ. सचिन राजाराम जाधव**	498
101	विश्व स्तर पर हिंदी की दशा **डॉ. जाविद शमशुद्दीन शेख**	503
102	अधूरे मनुष्य कहानी संग्रह में चित्रित नारी चेतना और संघर्ष **डॉ. मच्छिंद्र भगवान कुंभार,अश्विनी पांडुरंग काटे**	506
103	अंतर्राष्ट्रीय स्तर पर हिंदी की स्थिति **प्रो. (डॉ.) सौ. वाघ एस. पी.**	510
104	अंतर्राष्ट्रीय स्तर पर हिंदी की बढ़ती प्रतिष्ठा **डॉ.स्नेहल श्रीकांत गर्जेपाटील**	513
105	वर्तमान संदर्भ में 'संशय की एक रात' **प्रा.अश्विनी जगदीप थोरात**	522
106	हिंदी साहित्य का सामाजिक सरोकार **प्रा. (डॉ) जगन्नाथ आबासो पाटील**	525
107	हिंदी साहित्य और लोकजागरण – आधुनिक समाज सुधारक राष्ट्रसंत तुकडोजी **प्रो. डॉ. अलका हेमंत वागदरे**	530
108	वर्तमान परिप्रेक्ष्य में कबीर का साहित्य **प्रा.डॉ.प्रकाश आठवले,**	535
109	अंतरराष्ट्रीय स्तर पर हिंदी की स्थिति **डॉ.अमोल तुकाराम पाटील**	540
110	हिंदी साहित्य और मनोरंजन **युवराज दगडू पाटील**	544
111	हिंदी भाषा और साहित्य का सामाजिक सरोकार : हिंदी आदिवासी कहानी साहित्य के संदर्भ में **निलेश सखाराम डामसे**	489
112	शोध और उच्च शिक्षा में अभिजात साहित्य का महत्व **श्री.विश्वास निवृत्ती पाटील**	552
113	संजीव के उपन्यास 'फाँस' में सामाजिक सरोकार: एक विश्लेषण **छबुताई रामचंद्र बाबर, , प्रो.डॉ.दशरथ मारुती वाघ,**	557
114	दलितों की सामाजिक क्रांति का दहकता दस्तावेज : नागफनी' **जयश्री वाघमारे . डॉ. मीना जाधव**	562
115	हिंदी साहित्य और लोकजागरण' (भक्तिकाल के विशेष संदर्भ में) **प्रो.(डॉ.)नितीन हिंदुराव कुंभार**	566

	उर्दू विभाग	
116	Classiki Zubanein aur Adabiyat: Maazi,Haal aur Mustaqbil **Dr.Sabiha S. Sayed**	568
117	Farsi Shahkaar 'Shahanama' ka Tajziyati Mutala **Mrs Kausar Jahan Hidayatulla Sundke**	569
118	Urdu Adab mein Ghajal ka jayeza: Maazi, Haal aur Mustaqbil **Sajida Nabisaheb Mutwalli**	573
119	Hindustani Classiki Zubano ki Chand Mayanaz Tasanif **Asma Mubarak Nadaf**	575
120	ಶಂ. ಬಾ. ಜೋಶಿಯವರ ಅಭಿಜಾತ ಸಾಂಸ್ಕೃತಿಕ ಶೋಧಗಳು ಕು ಗೋದಾವರಿ ಬಸವರಾಜ **Ku. Godavari Basavaraj**	579
121	**ಭಾಲ್ಕಿಯ ಹಿರೇಮಠ ಸಂಸ್ಥಾನದ ಕನ್ನಡ ಸಾಹಿತ್ಯ ಸೇವೆ** ಸಂಜೀವಕುಮಾರ ಶಿವಪುತ್ರಪ್ಪ Sanjeevkumar Shivaputrappa	582
123	**ಹತ್ತನೆಯ ಶತಮಾನದ ಕನ್ನಡ ಅಭಿಜಾತ ಕವಿಗಳು** ವಿಶಾಲ ಲೋಹಿತ್ ಸಂಶೋಧನ ವಿದ್ಯಾರ್ಥಿ **Vishal Lohit**	587

B.Aadhar International Refereed & Peer-Reviewed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXV) 565 -A
ISSN : 2278-9308 February 2026

अभिजात संस्कृत साहित्य आणि समकालीन मूल्यशिक्षणाचा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या परिप्रेक्ष्यात अभ्यास

प्रा. (डॉ.) मृणालिनी आबासाहेब शिंदे
कॉलेज-वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड (महाराष्ट्र)
ई मेल- mrunalinisanskrit@gmail.com मो. नं. 9850305626

सारांश-

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० भारतीय शिक्षणव्यवस्थेच्या सर्वांगीण पुनर्रचनेचा प्रयत्न करणारे महत्त्वपूर्ण धोरण आहे. या धोरणामध्ये विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकासाबरोबरच नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक जाणीव निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आलेला आहे. भारतीय ज्ञानपरंपरेचे मूळ अभिजात संस्कृत साहित्यामध्ये आढळते. या साहित्यामध्ये सत्य, अहिंसा, करुणा, सहिष्णुता, कर्तव्यभावना, आत्मसंयम आणि विश्वबंधुत्व यांसारखी जीवनमूल्ये प्रभावीपणे व्यक्त झालेली दिसतात. प्रस्तुत संशोधनामध्ये अभिजात संस्कृत साहित्यामधील जीवनमूल्यांचे विश्लेषण करून ती राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील शैक्षणिक उद्दिष्टांशी सुसंगत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. आधुनिक शिक्षणव्यवस्थेमध्ये मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी संस्कृत साहित्याचा समावेश उपयुक्त ठरू शकतो, असा निष्कर्ष या अभ्यासातून समोर येतो. प्रस्तुत शोधनिबंधात गुणात्मक संशोधनपद्धतीचा अवलंब करून वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे.

बीजशब्द-

अभिजात संस्कृत साहित्य, मूल्यशिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, भारतीय ज्ञानपरंपरा

प्रस्तावना-

शिक्षण ही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची प्रक्रिया मानली जाते. शिक्षणाद्वारे ज्ञानप्राप्ती होत असली तरी त्यासोबत नैतिक मूल्यांची जडणघडण, भावनिक संतुलन आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विकसित होणे आवश्यक असते. आधुनिक तंत्रज्ञानप्रधान आणि स्पर्धात्मक वातावरणामुळे शिक्षण अधिकाधिक रोजगाराभिमुख होत आहे. परिणामी मूल्यशिक्षणाला तुलनेने कमी महत्त्व दिले जात असल्याचे दिसून येते.

आजच्या समाजात वाढती हिंसा, भ्रष्टाचार, मानसिक तणाव आणि सामाजिक असंतुलन यांसारख्या समस्या प्रकर्षाने जाणवत आहेत. या समस्यांचे एक महत्त्वाचे कारण नैतिक मूल्यांचा अभाव आहे. त्यामुळे शिक्षणप्रणालीमध्ये मूल्याधारित दृष्टिकोन स्वीकारणे ही काळाची गरज बनली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शिक्षणाला भारतीय संस्कृती आणि ज्ञानपरंपरेशी जोडण्याचा प्रयत्न करते. या धोरणामध्ये Indian Knowledge Systems या संकल्पनेद्वारे पारंपरिक ज्ञानशाखांचा अभ्यास शिक्षणामध्ये समाविष्ट करण्यावर भर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर अभिजात संस्कृत साहित्य मूल्यशिक्षणासाठी प्रभावी माध्यम ठरते.[१]

साहित्याचा आढावा-

अभिजात संस्कृत साहित्य आणि मूल्यशिक्षण या विषयावर विविध विद्वानांनी संशोधनपर अभ्यास केलेला आहे. महादेवशास्त्री जोशी यांनी भारतीय संस्कृति कोशामध्ये संस्कृत साहित्य भारतीय सांस्कृतिक परंपरेचा मूलभूत आधार असल्याचे प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मतानुसार वेद, उपनिषदे आणि महाकाव्ये मानवी जीवनाला दिशा देणारे तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ आहेत.

जयदयाल गोयंका यांनी भगवद्गीतेच्या भाष्यात कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग यांच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकासाची संकल्पना स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते गीतेतील विचार विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता आणि कर्तव्यनिष्ठा विकसित करतात.

प. वि. वर्तक यांनी योगसूत्रांच्या अभ्यासातून योग ही मानसिक आरोग्य आणि चारित्र्यनिर्मितीची प्रभावी पद्धत असल्याचे स्पष्ट केले आहे. आधुनिक शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक संतुलनासाठी योगाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे.

उद्दिष्ट्ये-

१. अभिजात संस्कृत साहित्याची संकल्पना स्पष्ट करणे.
२. संस्कृत साहित्यातील जीवनमूल्यांचे विश्लेषण करणे.
३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील मूल्यशिक्षणाचे स्वरूप अभ्यासणे.
४. आधुनिक शिक्षणामध्ये संस्कृत साहित्याची उपयुक्तता स्पष्ट करणे.

गृहितके-

१. अभिजात संस्कृत साहित्य जीवनमूल्यांचा समृद्ध स्रोत आहे.
२. संस्कृत साहित्याचा अभ्यास विद्यार्थ्यांच्या चारित्र्यनिर्मितीस सहाय्यक ठरतो.
३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मूल्याधारित शिक्षणाला प्रोत्साहन देते.

व्याप्ती-

या अभ्यासामध्ये वेद, उपनिषदे, भगवद्गीता, नीतिशतक, हितोपदेश, रामायण, महाभारत आणि योगसूत्रे यांचा विचार करण्यात आला आहे.

महत्त्व-

अभिजात संस्कृत साहित्य हे भारतीय जीवनपद्धती, विचारपरंपरा आणि नैतिक तत्त्वांचे महत्त्वपूर्ण स्रोत मानले जाते. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत आणि विविध काव्यग्रंथांमधून आदर्श जीवनमूल्यांचे दर्शन घडते. आजच्या वेगवान आणि भौतिकवादी युगात मानवी जीवनात नैतिकता, संवेदनशीलता, सहकार्य आणि जबाबदारी या मूल्यांची जपणूक आवश्यक ठरते. अशा परिस्थितीत संस्कृत साहित्य मूल्यशिक्षणासाठी प्रभावी माध्यम ठरते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शिक्षणाला भारतीय ज्ञानपरंपरेशी जोडण्यावर विशेष भर देते. या पार्श्वभूमीवर संस्कृत साहित्याचा अभ्यास विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक ओळख निर्माण करतो तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासाला चालना देतो. या साहित्यामध्ये सामाजिक ऐक्य, मानवकल्याण आणि सार्वभौमिक बंधुभाव यांसारखे विचार आढळतात, जे आधुनिक समाज घडवण्यासाठी उपयुक्त आहेत.

तसेच संस्कृत साहित्य विविध शास्त्रांशी संबंधित असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये बहुआयामी विचारसरणी विकसित होते. त्यामुळे बौद्धिक, नैतिक आणि आध्यात्मिक विकास साध्य होऊन भारतीय ज्ञानपरंपरेचा जागतिक स्तरावर प्रभाव वाढण्यास मदत होते.

संशोधनपद्धती-

या संशोधनासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. अभ्यासामध्ये वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे. प्राथमिक स्रोत म्हणून वेद, उपनिषदे, भगवद्गीता, रामायण, महाभारत, नीतिग्रंथ, योगसूत्रे या संस्कृतग्रंथांचा अभ्यास करण्यात आला आहे. दुय्यम स्रोत म्हणून संशोधनग्रंथ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या दस्तऐवजांचा संदर्भ घेण्यात आला आहे.

विषयविवेचन-

अभिजात संस्कृत साहित्य स्वरूप-

प्रमाणबद्धता व घाटदारपणा, संयम, वस्तुनिष्ठता व आत्मलोप यांकडे प्रवृत्ती, भावनेपेक्षा विचारावर भिस्त, औचित्य, निःसंदिग्धता यांवर भर, नावीन्यापेक्षा परंपरेचे पालन, लोकविलक्षणता, अतिशयोक्ती, अतिरिक्त संवेदनशीलता व कल्पनाशक्ती यांना पायबंद घालण्याची व आदर्शांना अनुसरण्याची प्रवृत्ती म्हणजे 'अभिजात साहित्य' होय.[२]

अभिजात संस्कृत साहित्य म्हणजे वेद, उपनिषदे, महाकाव्ये, नाट्य, काव्य आणि शास्त्रीय ग्रंथांचा समावेश होणारे प्राचीन साहित्य होय. अभिजात संस्कृत साहित्यामध्ये प्राचीन भारतीय ज्ञान, तत्त्वज्ञान आणि सामाजिक मूल्यांचे प्रतिबिंब दिसून येते. वेद आणि उपनिषदे आध्यात्मिक विचार मांडतात, तर रामायण आणि महाभारत नैतिक संघर्षांचे दर्शन घडवतात. पंचतंत्र आणि हितोपदेश व्यवहारातील नैतिकतेचे शिक्षण देतात.

संस्कृत साहित्यातील जीवनमूल्ये-

संस्कृत साहित्यामध्ये सत्य, अहिंसा, करुणा, सहकार्य, कर्तव्यभावना आणि मानवकल्याण यांसारख्या मूल्यांचा उल्लेख आढळतो.

सत्य

सत्यमेव जयति नानृतं सत्येन पन्था विततो देवयान:।
येनाऽऽक्रमन्त् ऋषयो ह्याप्तकामा यत्र तत्सत्यस्य परमं निधानम् ||[३]
त्यागाय संभृतार्थानां सत्याय मितभाषिणाम्।
यशसे विजिगीषूणां प्रजायै गृहमेधिनाम्॥[४]

संस्कृत साहित्यामध्ये सत्याला सर्वोच्च मूल्य मानले आहे. सत्यनिष्ठ जीवनामुळे समाजामध्ये विश्वास आणि नैतिकता निर्माण होते.

धर्म/ नीतिमत्ता

धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षित:।
तस्माद्धर्मो न हन्तव्यो मा नो धर्मो हतोऽवधीत् ||[५]

धर्म म्हणजे योग्य आचरण आणि सामाजिक जबाबदारी होय. रामायण आणि महाभारतातील पात्रे धर्मनिष्ठ जीवनाचे आदर्श उदाहरण देतात. आधुनिक सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा व पारदर्शकता टिकवण्यासाठी ही मूल्ये अत्यंत उपयुक्त ठरतात.

कर्तव्यनिष्ठा

श्रेयान्स्वधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात् |
स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह:॥[६]
कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।[७]

भगवद्गीतेतील कर्मयोगाचा सिद्धांत व्यक्तीला निष्काम भावनेने कर्तव्य पार पाडण्याची प्रेरणा देतो. "कर्मण्येवाधिकारस्ते" हा संदेश कार्यकेंद्रित जीवनदृष्टी निर्माण करतो. अर्जुनाच्या मानसिक संभ्रमातून त्याला कर्तव्याची जाणीव करून देणे हे गीतेचे मूलभूत तत्त्व आहे. शिक्षणक्षेत्रात ही संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, जबाबदारी व कार्यनिष्ठा विकसित करण्यास सहाय्यक ठरते.

अहिंसा

दृ ते दृशं ह मा मित्रस्य मा चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षन्ताम् |
मित्रस्याहं चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षे | मित्रस्य चक्षुषा समीक्षामहे ||[८]
अहिंसयैव भूतानां कार्यं श्रेयोऽनुशासनम् ।[९]
अहिंसा परमो धर्मस्तथाऽहिंसा परो दम: |
अहिंसा परमं दानमहिंसा परमं तप: ||
अहिंसा परमो त्यागस्त्वहिंसा परमं बलम् |
अहिंसा परमं मित्रमहिंसा परमं श्रुतम् ||
सर्वहिंसानिवृत्ता ये नरा: सर्वसहाश्च ये |
सर्वस्याऽऽश्रयभूताश्च ते नरा: स्वर्गगामिन: ||[१०]

अहिंसा हे भारतीय संस्कृतीचे मूलभूत मूल्य आहे. समाजामध्ये शांतता आणि सहकार्य निर्माण करण्यासाठी अहिंसा आवश्यक आहे.

विश्वबंधुता

अयं बन्धुरयं नेति गणना लघुचेतसाम् |
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ||[११]

"वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना संपूर्ण मानवजातीमध्ये बंधुभाव निर्माण करते.

आत्मसंयम व मानसिक संतुलन

इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।[१२]
जितेन्द्रियस्य प्रशान्तस्य परमात्मा समाहित:।
शीतोष्णसुखदु:खेषु तथा मानापमानयो:||[१३]

कठोपनिषदातील नचिकेताचा संयम, धैर्य व जिज्ञासा आजच्या विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरते.[१४] पतंजलींच्या योगसूत्रांमधील अष्टांगयोग यमनियमआसनप्राणायामप्रत्याहारधारणाध्यान-समाधयो: अष्टौ अंगानि |[१५] आत्मसंयम व मानसिक शांतीचा मार्ग दर्शवतो. योग आणि ध्यान विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

ज्ञान

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।[१६]

विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानामुळे विवेक, तर्कशक्ती आणि समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता विकसित होते.

विनय/ नम्रता

अमानित्वमदम्भित्वं क्षान्तिरार्जवमेव च।[१७]
भवन्ति नम्रास्तरव: फलोद्गमैर्नवाम्बुभिर्दूरविलम्बिनो घना:।
अनुद्धता: सत्पुरुषा: समृद्धिभि: स्वभाव: एवैष परोपकारिणाम् ||[१८]

नम्र स्वभावामुळे सामाजिक समरसता आणि सहकार्याची भावना विकसित होते.

कर्म

या साधूंश्च खलान् करोति विदुषो मूर्खान् हितान् द्वेषिण:
प्रत्यक्षं कुरुते परोक्षममृतं हालाहलं तत्क्षणात् |
तामाराधय भगवतीं भोक्तुं फलं वाञ्छितं
हे साधो व्यसनैर्गुणेषु विपुलेष्वास्थां वृथां मा कृथा: ||[१९]
योगः कर्मसु कौशलम्।[२०]
कर्मणैव हि संसिद्धिमस्थिता जनकादय:|
लोकसङ्ग्रहमेवापि सम्पश्यन्कर्तुमर्हसि||[२१]

कर्मयोग विद्यार्थ्यांना कर्तव्यपरायणता आणि कार्यातील उत्कृष्टता शिकवतो, जे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील कौशल्याधारित शिक्षणाशी सुसंगत आहे. यामुळे विद्यार्थी समाजाभिमुख व जबाबदार नागरिक बनतात.

क्षमा

क्षमा प्रभवितु:।[२२]
क्षान्तिः चेत् कवचेन किम्।[२३]
क्षमा गुरुजने |[२४]

क्षमा विद्यार्थ्यांमध्ये भावनिक संतुलन व सहनशीलता विकसित करते, ज्यामुळे तणावमुक्त शिक्षणाला चालना मिळते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भावनिक आणि नैतिक शिक्षणाला महत्त्व दिले असून क्षमा त्यासाठी उपयुक्त ठरते.

परोपकार

श्रोत्रं श्रुतेनैव न कुण्डलेन दानेन पाणिर्न तु कङ्कणेन |
विभाति काय: करुणाकुलानां परोपकारेण न् चन्दनेन ||[२५]

परोपकाराची भावना समाजाभिमुख नागरिक घडवते.

संतोष

सन्तोषः परमं सुखं सन्तोषः परमं धनम् |
सन्तोषः परमं मित्रं सन्तोषः परमं तप: ||[२६]

संतोषामुळे मानसिक स्थैर्य आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो.

मैत्री व सद्भाव

मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणां सुखदुःखपुण्यापुण्यविषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम् ।[२७]
पापान्निवारयति योजयते हिताय
गुह्यं च गूहति गुणान् प्रकटीकरोति |
आपद्गतं च न जहाति ददाति काले
सन्मित्रलक्षणमिदं प्रवदन्ति सन्त: ||[२८]

मैत्री विद्यार्थ्यांमध्ये संघभावना निर्माण करते.

परिश्रम/ उद्यम

उद्यमेन हि सिद्ध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः॥[२९]

परिश्रमामुळे आत्मविश्वास आणि स्वावलंबन विकसित होते.

आत्मबळ / पुरुषार्थ

सिंह: शिशुरपि निपतति मदमलिनकपोलभित्तिषु गजेषु |
प्रकृतिरियं सत्त्ववतां न खलु वयस्तेजसो हेतु: ||[३०]
नाऽभिषेको न संस्कार: सिंहस्य क्रियते मृगै: |
विक्रमाऽर्जितराज्यस्य स्वयमेव मृगेन्द्रता ||[३१]

आत्मबळ विद्यार्थ्यांना संकटांशी सामना करण्याची क्षमता आणि नेतृत्वगुण प्रदान करते. यामुळे विद्यार्थी स्वप्रेरित व आत्मनिर्भर बनतात.

धैर्य

निन्दन्तु नीतिनिपुणा: यदि वा स्तुवन्तु
लक्ष्मी: समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् |
अद्यैव मरणमस्तु युगान्तरे वा
न्याय्यात् पथ: प्रविचलन्ति पदं न् धीरा: ||[३२]

धैर्य विद्यार्थ्यांना संकटांचा सामना करण्यास सक्षम बनवते, तर विवेक योग्य निर्णय घेण्यास मदत करतो.

विवेक

सहसा विदधीत न् क्रिया-
मविवेक: परमापदां पदम् |
वृणुते हि विमृश्यकारिणं
गुणलुब्धा: स्वयमेव सम्पद: ||[३३]

विवेक विद्यार्थ्यांना योग्य निर्णय घेण्याची क्षमता प्रदान करतो, ज्यामुळे समालोचनात्मक विचारशक्ती विकसित होते.

चारित्र्य

वह्निस्तस्य जलायते जलनिधि: कुल्यायते तत्क्षणा-
न्मेरु: स्वल्पशिलायते मृगपति: सद्य: कुरङ्गायते |
व्यालो माल्यगुणायते विषरस: पीयूषवर्षायते
यस्याङ्गेऽखिललोकवल्लभतमं शीलं समुन्मीलति ||[३४]

चारित्र्य विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, प्रामाणिकपणा आणि सामाजिक विश्वास निर्माण करते, जे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील मूल्यशिक्षणाचा आधार आहे. सशक्त चारित्र्यामुळे विद्यार्थी आदर्श नागरिक बनतात.

समकालीन मूल्यशिक्षणाची गरज-

आजच्या समाजामध्ये नैतिक अधःपतन, स्पर्धात्मकता आणि मानसिक ताण वाढत आहे. या परिस्थितीत मूल्याधारित शिक्षण आवश्यक ठरते. मूल्यशिक्षण विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदारी विकसित करते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि मूल्यशिक्षण-

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. या धोरणामध्ये भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश करून सांस्कृतिक जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न दिसून येतो.

संस्कृत साहित्याची शैक्षणिक उपयुक्तता-

संस्कृत साहित्य कथारूप आणि संवादात्मक स्वरूपामुळे मूल्यसंस्कार सहज रुजवते. शालेय स्तरावर नीतिकथा आणि सुभाषिते उपयुक्त ठरतात, तर उच्च शिक्षणामध्ये गीता आणि उपनिषदे अभ्यासासाठी महत्त्वाची ठरतात.

निष्कर्ष-

अभिजात संस्कृत साहित्य हे भारतीय सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचे शाश्वत स्रोत आहे. या साहित्यामध्ये मानवी जीवनासाठी आवश्यक असलेली सत्यनिष्ठा, कर्तव्यभावना, करुणा, अहिंसा, सहिष्णुता, आत्मसंयम आणि विश्वबंधुत्व यांसारखी मूल्ये स्पष्टपणे आढळतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शिक्षणाला मूल्याधिष्ठित आणि सर्वांगीण विकासाभिमुख बनविण्यावर भर देते. या धोरणामध्ये भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश करून विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, सांस्कृतिक जाणीव आणि सामाजिक जबाबदारी विकसित करण्याचा प्रयत्न दिसून येतो.

प्रस्तुत अभ्यासातून अभिजात संस्कृत साहित्य आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यांच्यातील सुसंगती स्पष्ट होते. आधुनिक शिक्षणप्रणालीत संस्कृत साहित्याचा समन्वय साधल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो. त्यामुळे समकालीन मूल्य-शिक्षणासाठी अभिजात संस्कृत साहित्याचा अभ्यास अत्यंत उपयुक्त आणि आवश्यक ठरतो.

संदर्भसूची-

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, पान नं. ३, ४, ५, ६, १८
२. मराठी वाङ्मयकोश, खंड चौथा, समीक्षा-संज्ञा, पान नं. १३
३. मुण्डकोपनिषद्, ३.१.६, पा. नं. १५५
४. रघुवंशम्, प्रथम सर्ग, श्लोक- ०७, पान नं. ०५
५. मनुस्मृति:, अ. ८, श्लोक-१५, पान नं. १६७
६. श्रीमद्भगवद्गीता, अ. ३. श्लोक-३५, पान नं. १०६
७. तत्रैव, अ. २. श्लोक-४७, पान नं. ६७
८. यजुर्वेद संहिता, ३६.१८
९. मनुस्मृति:, श्लोक ५९, पान नं. ३३
१०. हितोपदेश:, मित्रलाभ, श्लोक- ६६, ६७, ६८, पान नं. ६७
११. महा-उपनिषद्, अध्याय ६, मन्त्र ७१, पान नं. ९५-९६
१२. भगवद्गीता, अ. ३, श्लोक-३४, पान नं. १०६
१३. तत्रैव, अ. ६. श्लोक-७, पान नं. १६३
१४. सुबोध उपनिषत्संग्रह, भाग पहिला, पान नं. ८२ ते ८५
१५. पातंजलयोग,साधनपाद, सूत्र २९, पान नं. १७०
१६. भगवद्गीता, अ. ४.श्लोक-३८, पान नं. १३६
१७. तत्रैव, अ. १३. श्लोक-७, पान नं. ३३१
१८. नीतिशतक, श्लोक-६१, पान नं. ६९
१९. तत्रैव, श्लोक-९३, पान ९९-१००
२०. भगवद्गीता, अ. २.श्लोक- ५०, पान नं. ६९
२१. तत्रैव, अ. ३, श्लोक-२०, पान नं. ९७
२२. नीतिशतक, श्लोक-८०, पान ८७
२३. तत्रैव, श्लोक-१७, पान २६
२४. तत्रैव, श्लोक-१८, पान २८
२५. तत्रैव, श्लोक-६२, पान ६९
२६. महाभारत, शान्तिपर्व, अध्याय १७४, श्लोक ३९, पान नं.९००
२७. पातंजलयोग, १. सूत्र-३३ पान नं. ८१
२८. नीतिशतक, श्लोक- ६५, पान नं. ७२
२९. हितोपदेश:, मित्रलाभ, श्लोक ३६, पान नं. १९
३०. नीतिशतक, श्लोक-३०, पान नं. ३९
३१. हितोपदेश:, मित्रलाभ, श्लोक १९, पान नं. १६१
३२. नीतिशतक, श्लोक-७५, पान नं. ८२-८३
३३. हितोपदेश:, सन्धि, श्लोक १०४
३४. नीतिशतक, श्लोक ७९, पान नं. ८६

संदर्भग्रंथसूची-

१. किंजवडेकर, रामचंद्र शास्त्री (संपा.). (प्रकाशन वर्ष उपलब्ध नाही). *रघुवंशम्* — सर्ग १. चित्रशाळा प्रकाशन, पुणे.

२. गोयंका, जयदयाल. (सं. २०४७). *श्रीमद्भगवद्गीता*. गीता प्रेस, गोरखपूर.

३. जोग, द. वा. (२००७). *सुबोध उपनिषत्संग्रह* (भाग १ व २). अक्कलकोट स्वामी महाराज संस्थान, पुणे.

४. जोशी, महादेवशास्त्री (संपा.). (२०१०). *भारतीय संस्कृति कोश*. भारतीय संस्कृति कोश मंडळ, पुणे.

५. जोशी, रामचंद्रशास्त्री अंबादास (संपा.). (प्रकाशन वर्ष उपलब्ध नाही). *श्री सार्थ मनुस्मृति:*. श्री गुरुदेव प्रकाशन, पुणे.

६. नारायण पंडित; बालशास्त्री (संपा.). (२०१५). *हितोपदेश:*. चौखंबा सुरभारती प्रकाशन, वाराणसी.

७. भारत सरकार, शिक्षण मंत्रालय. (२०२०). *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०*. नवी दिल्ली.

८. मालवीय, सुधाकर (संपा.). (२०१४). *कुमारसंभवम् महाकाव्यम्*. चौखंबा कृष्णदास अकादमी, वाराणसी.

९. राजाध्यक्ष, विजया (समन्वयक संपा.). (२००२). *मराठी वाङ्मय कोश* (खंड ४). महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई.

१०. वर्तक, प. वि. (२०१२). *पातंजल योग विज्ञाननिष्ठ निरूपण*. वर्तकाश्रम, पुणे.

११. सोनी, सुरेश. (२०११). *भारताची उज्ज्वल ज्ञान-परंपरा*. भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे.

१२. हातवळणे मंगरूळकर. (प्रकाशन वर्ष उपलब्ध नाही). *नीतिशतकम्*.

प्राचीन हस्तलिखित भाषा स्वरूप महत्व आणि संवर्धन

प्रा. रचना सौरभ शहा.

कन्या महाविद्यालय, मिरज.

Email ID: rachanasourabhshah@gmail.com

सारांश:भारत देश हा साहित्याच्या दृष्टीने एक वैभवशाली देश आहे भारताचे जे प्राचीनतम साहित्य आहे ते साहित्य मुख्यतः दोन विभागांमध्ये विभागले जाते. श्रुती आणि स्मृती साहित्य . श्रुती साहित्य म्हणजे श्रु या धातूपासून श्रुत् अर्थात श्रवण करणे असा त्याचा अर्थ होतो श्रुती साहित्य म्हणजेच आपले ऋग्वेद यजुर्वेद सामवेद आणि अथर्ववेद हे श्रुती साहित्यामध्ये येतात वेद हे अपविशेय आहेत म्हणजेच त्यांची निर्मिती ईश्वरीय मानली जाते.गुरुने किंवा लेखकाने त्याचे लेखन केलेले नाही प्राचीन गुरुपरंपरेच्या अभावामुळे त्याला ईश्वरीय वाणी असे समजून त्याचा अभ्यास केला जातो. परंतु जे साहित्य श्रुती साहित्याच्या आधारे निर्माण झाले आणि जे गुरुपरंपरेने आपल्याला समजते ते म्हणजेच स्मृती साहित्य स्मृती अर्थात स्मरण. स्मृधातूपासून स्मरण स्मृती असे शब्द तयार होतात.श्रुती साहित्यावर आधारित स्मृती साहित्य निर्माण झाले.

पूर्वीच्या काळी सामान्य मनुष्य आपल्या भावना केवळ हावभावाने व्यक्त करत होता हळूहळू आपल्या आवाजामध्ये थोडाफार बदल करत आपल्या विकारांचे प्रकट तो करत गेला त्यानंतर हळूहळू मौखिक शब्द निर्माण झाले जसे की लिपीचा आविष्कार होत गेला सुरुवातीला चित्र लिपी विकास होत गेला आणि वेगवेगळ्या लिपींची निर्मिती होत गेली लिहिण्यासाठी वृक्षांचे मोठे मोठे पाने त्यानंतर दगड वस्त्र ताम्रपट शिलालेख यांसारखी माध्यम निर्माण झाली आणि पुढे जाऊन कागदाचा शोध लागला यादरम्यान अनेक वेगवेगळ्या बोलीभाषा आणि भाषांचे व्याकरण निर्माण झाले.

Key Words: श्रुती, स्मृती ,लिखित, लिपी, स्क्रिप्ट.

शोधनिबंधाची ध्येय आणि उद्दिष्टे: प्राचीन हस्तलिखित भाषा स्वरूप महत्त्व आणि संवर्धन हा शोध निबंध तयार करण्यामागचा ध्येय आणि उद्दिष्ट असे आहे की प्राचीन हस्तलिखिते यांचा अभ्यास ,त्यांच्यामधील लिपीचा अभ्यास, तत्कालीन समाज , संस्कृती, साहित्य, धर्म यांचा अभ्यास करणे.

विषय:प्राचीन हस्तलिखित भाषा स्वरूप महत्व आणि संवर्धन

भारत देश हा साहित्याच्या दृष्टीने एक वैभवशाली देश आहे भारताचे जे प्राचीनतम साहित्य आहे ते साहित्य मुख्यतः दोन विभागांमध्ये विभागले जाते. श्रुती आणि स्मृती साहित्य . श्रुती साहित्य म्हणजे श्रु या धातूपासून श्रुत् अर्थात श्रवण करणे असा त्याचा अर्थ होतो श्रुती साहित्य म्हणजेच आपले ऋग्वेद यजुर्वेद सामवेद आणि अथर्ववेद हे श्रुती साहित्यामध्ये येतात वेद हे अपविशेय आहेत म्हणजेच त्यांची निर्मिती ईश्वरीय मानली जाते.गुरुने किंवा लेखकाने त्याचे लेखन केलेले नाही असे साहित्य. पूर्वीच्या काळी सामान्य मनुष्य आपल्या भावना केवळ हावभावाने व्यक्त करत होता हळूहळू आपल्या आवाजामध्ये थोडाफार बदल करत आपल्या विकारांचे प्रकट तो करत गेला त्यानंतर हळूहळू मौखिक शब्द निर्माण झाले जसे की लिपीचा आविष्कार होत गेला सुरुवातीला चित्र लिपी विकास होत गेला आणि वेगवेगळ्या लिपींची निर्मिती होत गेली लिहिण्यासाठी वृक्षांचे मोठे मोठे पाने त्यानंतर दगड वस्त्र ताम्रपट शिलालेख यांसारखी माध्यम निर्माण झाली आणि पुढे जाऊन कागदाचा शोध लागला यादरम्यान अनेक वेगवेगळ्या बोलीभाषा आणि भाषांचे व्याकरण निर्माण झाले.प्राचीन हस्तलिखित भाषेचा विचार करताना त्यामध्ये वापरली गेलेली लिपी हा एक अभ्यासाचा महत्त्वाचा मुद्दा आहे **लिपी** म्हणजे एक लेखन प्रणाली आहे ज्याचा उपयोग भाषा लेखनबद्ध करण्यासाठी दिला जातो हे अक्षर आणि चिन्हांचा एक समूह असतो जे शब्द आणि वाक्य यांना व्यक्त करते उदाहरण द्यायचे झाले तर देवनागरी ,रोमन ,उर्दू आणि अरबी या लिपी प्रमुख मानल्या जातात .लिपीच्या माध्यमांमधून आपल्याला त्या काळातील संस्कृती विचार आणि ज्ञान यांचे आदान- प्रदान होण्यास मदत होते. हस्तलिखित भाषांचा विचार करताना

लिपी बद्दल माहिती असणे गरजेचे असते लिपी म्हणजे इंग्रजीमध्ये स्क्रिप्ट किंवा रायटिंग सिस्टिम असेल त्याला म्हटले जाते एक व्यक्ती किंवा समूहाद्वारे उपयोगात आणल्या जाणाऱ्या अक्षरांचा समूह असतो ज्याचा उपयोग भाषा शिकण्यासाठी आणि वाचण्यासाठी केला जातो विभिन्न भाषांसाठी विविध लिपींचा उपयोग केला जातो जसे की देवनागरी लिपीचा उपयोग हिंदी आणि संस्कृतसाठी , स्पॅनिश फ्रेंच इत्यादी भाषेसाठी लॅटिन उपयोग केला जातो. लिपीची परिभाषा एक अशी लेखन प्रणाली आहे की ज्याचा उपयोग कोणत्याही भाषेला लिखित स्वरूपामध्ये प्रकट करण्यासाठी केला जातो लिपी ही एक अक्षर आणि प्रतीकांचे एक असा समूह आहे की जो विचार शब्द आणि वाक्यांना व्यक्त करण्यामध्ये मदत होते भाषा आणि लिपी या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी नाहीत भाषा हे एक माध्यम आहे की ज्याच्या द्वारे आपण बोलून संवाद करू शकतो तर लिपी हे त्या भाषेला लिहिण्याचे साधन आहे.भाषेला एक एका लिपीमधून दुसऱ्या लिपीमध्ये लिहिले जाऊ शकते तर ह्या प्रक्रियेला लिप्यंतरण असे सुद्धा म्हटले जाते. लीपीचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला व्यक्ती किंवा समूह यांची भाषा शिकणे वाचणे आणि संकलन करणे सोयीचे होते. प्राचीन हस्तलिखित यांचा जर अभ्यास करायचा ठरवला तर आपल्याला लिपीचे ज्ञान होणे गरजेचे आहे. लिपीमुळे आपल्याला त्या हस्तलिखितांवरील भाषेचा अर्थ लावता येतो. त्या हस्तलिखितांमध्ये कोणता संदेश दिला आहे, तसेच त्यावेळी ची सामाजिक संस्कृती, विचार ,आचार, धर्म यांविषयी सर्वच माहिती आपल्याला मिळण्यास सोपे होते. लिपी ही एखाद्या भाषेला स्थायीरूप देण्याचे कार्य करते.लिपी ही विचार भावना आणि ज्ञान हे एका पिढीपासून दुसऱ्या पिढी पर्यंत पोहोचवण्याचे माध्यम बनते तसेच लिपी भाषा आणि संस्कृती यांच्या संरक्षण आणि संवर्धन मध्ये देखील एक प्रमुख भूमिका बजावते. भाषा मानवाचे सर्वाधिक शक्तिशाली साधनांपैकी एक साधन आहे भाषेच्या माध्यमातून मानव आपला विचार व्यक्त करतो विचारांची आदान प्रदान करतो आणि एका एकमेकांपासून मानव जोडून राहतो परंतु भाषेचा विकास पूर्वी आजच्यासारखा परिष्कृत पद्धतीने झालेला नव्हता सुरुवातीच्या काळाला चित्रात्मक प्रतिकांपासून आधुनिक भाषांची समृद्ध विविधता पर्यंत भाषेचा विकास आणि इतिहास एक खूप मोठा आणि आकर्षक प्रवास झालेला आहे.

आरंभ :चित्रात्मक भाषा आणि प्रारंभिक प्रतीक

अत्यंत सुरुवातीच्या प्रारंभिक कालखंडामध्ये मानव सरल ध्वनी आणि हावभावांच्या माध्यमाने संवाद साधत होता .भाषेचे प्रारंभीक रूप संभवतः तात्कालीक माहिती गोळा करण्याच्या रूपामध्ये सुरुवात भाषेची झाली .

भोजन संकट वातावरण आणि अन्य तात्कालीत समस्या यांचा समावेश यामध्ये ह होत असे. वेळेच्या सोबत मानवाने या त्याच्या विचारांना व्यक्त करण्यासाठी प्रतिकांची निर्मिती करण्यास सुरुवात केली. ही प्रतिकात्मक भाषा प्रारंभिक प्रतीक लिखित भाषेचाही पूर्वीपासून अवगत होती.

लिखित भाषेचे पहिले प्रमाण प्राचीन मेसोपोटेमिया मधील सुमेरियन जमातीच्या लोकांकडून आपणास प्राप्त होते जे लगबग इसवीसन पूर्व 3000 च्या आसपास होते. ते तिला कार लिपीचा उपयोग करत असत ज्याच्यामध्ये मातीच्या गोळ्यांवर किलाच्या आकाराचे निशाण उतरले जात असत किलाकार लिपीची सुरुवात चित्र लिपीची एक श्रृंकलाच्या स्वरूपामध्ये झाली ज्यावेळी वेळेच्या सोबत हळूहळू ती विकसित होत गेली आणि लेखनाची एक अधिक अमूर्त आणि कुशल प्रणाली बनत गेली याप्रकारे प्राचीन मिस्र वासियांनी देखील लगबग त्याच काळी आपल्या आपली स्वतःची अशी लेखन प्रणाली चित्रलिपी विकसित केली.

भारतातील सिंधू संस्कृतीची चिन्ह लिपी देखील चित्र लिपी मध्येच आपणास पहावयास मिळते या कालखंडात लिपी स्वतंत्र भाषिक स्वरूपात विकसित झालेली नव्हती ती केवळ दृश्य संकेत व्यवस्था मध्ये होती.

चीन जपान आणि कोरिया या देशांमध्ये चित्र लिपी भाषेमध्ये वापरलेली आपणास पहावयास मिळते.

लिपी या शब्दाचा प्रयोग प्राचीन वाङ्मयांमध्ये आपल्याला पहावयास मिळतो. यवनाल्लिप्याम्- यवनानां लिपि: यवनानी।

लिपी हा संस्कृत लिप् धातूपासून इक् प्रत्यय लागून लिपी असा शब्द तयार झाला आहे लिपी म्हणजे लिंपणे परंतु लेखन क्षेत्रांमध्ये याचा अर्थ लिहिणेअसा आहे लेखन कला लिखावट चित्रांकन इत्यादी अर्थाने लिपी हा शब्द प्राप्त होतो.

लेखनाच्या सामग्रीच्या स्वरूपात प्राचीन काळामध्ये चर्म भूर्जपत्र ताडपत्र पाषाण धातू फलक काष्ठफलक वस्त्र इत्यादींचा वापर केला जात होता.

चित्र लिपी नंतर ब्राम्ही लिपी आणि फोनेशियन लिपी निर्माण होत गेल्या.

ब्राह्मी आणि खरोष्टी या भारतातील सर्वात प्राचीन लिपी आहेत ज्यामध्ये ब्राह्मी लिपीला आधुनिक भारतीय देवनागरी लिपीचे जननी मानले जाते या लिपी मुख्यतः प्राचीन शिलालेख दानपत्र आणि प्राचीन नाण्यांवर आपल्याला पाहाव्यास मिळतात .

हस्तलिखित संकल्पना आणि स्वरूप

हस्तलिखिते : हाताने लिहिलेल्या कोणत्याही मजकुराला हस्तलिखित असे म्हणतात पपायरस, चर्मपत्र, भूर्जपत्र, ताडपत्र, कागद वा तत्सम माध्यम-साधनांवर हाताने लिहिलेल्या मजकुराला हस्तलिखित असे संबोधितात. सांप्रत प्रकाशनपूर्व टंकलेखन होण्यापूर्वीच्या मूळ लेखनसाहित्यालाही ही संज्ञा अद्यापि वापरतात. मुद्रणकलेचा शोध लागण्यापूर्वी ज्ञान व माहितीच्या संप्रेषणाचे सर्व व्यवहार हस्तलिखितांद्वारेच होत असत. हाताने लेखनकरणे ही एक अनिवार्यता होती. प्राचीन व मध्ययुगीन काळातील चीन, भारतासह भूमध्यसागरी प्रदेशातील हस्तलिखितांतून तत्कालीन संस्कृतींची, विशेषतः व्यापार, चालीरीती, कौटुंबिक जीवन, साहित्य, शासनव्यवस्था, धार्मिक रूढी इत्यादींची इत्थंभूत माहिती मिळते. त्या काळी पपायरस, कातडे, मृदुचर्मपत्रे, मेणाच्या मुद्रा, भूर्जपत्रे, ताडपत्रे इ. माध्यमसाधनांचा हस्तलेखनासाठी वापर केला जाई. साधारणतः चौथ्या शतकापासून चौदाव्या शतकापर्यंत चर्मपत्रावर व मृदुचर्मपत्रावर लेखन होऊ लागले. चौदाव्या शतकात कागदाने प्राचीन माध्यमसाधनांची जागा घेतली आणि त्याच सुमारास मुद्रणकलेचा शोध लागला. तरीसुद्धा हाताने लेखन करण्याच्या प्रवृत्तीत अद्यापि खंड पडलेला नाही. हस्तलेखनाच्या ऐतिहासिक विकास- क्रमाचा आढावा हा प्रामुख्याने पुराभिलेखविद्येचा म्हणजे इतिहासकालीन लिहिल्या गेलेल्या मजकुराचा पद्धतशीर व शास्त्रशुद्ध अभ्यास होय. वाचनीयता हा अक्षरसौंदर्याचा प्राथमिक घटक असल्यामुळे प्राचीन हस्तलेखन करणाऱ्या लेखकांनी त्याकडे कटाक्षाने लक्ष केंद्रित केले आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी : हस्तलेखनाची सुरुवात निश्चितपणे केव्हा झाली, हे ज्ञात नाही. मेसोपोटेमियातील लोक इ. स. पू. ३३०० मध्ये मातीच्या ओल्या विटांवर लेखन करीत व नंतर त्या विटा भाजत असत तथापि भूमध्यसागरी प्रदेशाच्या परिसरातील ईजिप्शियन, ग्रीक आणि रोमन लोकांचे पपायरस हे लेखनाचे माध्यमसाधन होते. पपायरसावरील हस्तलिखित लेखन इ. स. पू. २७०० पासून ते इ. स. तिसऱ्या शतकापर्यंत (चर्मपत्रांचा वापर सुरू झाला तरीसुद्धा) प्रचारात असल्याचे दाखले मिळतात. ईजिप्तमध्ये अठराव्या वंशातील फेअरोंनी (इ. स. पू. १५३९–१२९२) बुक ऑफ द डेड या ग्रंथाच्या अनेक प्रती नकलून ठेवल्याचे आढळले. त्यात तत्कालीन देवदेवता, प्रार्थना, थडगी, ममी यांबद्दल नोंदी आहेत. पपायरसाची भेंडोळी ०.३ मीटरपासून ६ मीटरपर्यंत विविध आकारांची उपलब्ध झाली आहेत. पपायरस कोरड्या हवेतच टिकून राहतो व त्याच्या एकाच बाजूला लिहिता येते त्यामुळे दमट व आर्द्र हवामान असणाऱ्या यूरोप खंडात तो पूर्णतः निरुपयोगी ठरला.

ग्रीक व रोमन संस्कृतींत पपायरसाबरोबरच लेखनासाठी मेणाच्या मुद्रांचा वापर करीत. ते अधिक टिकाऊ होते. मेणाच्या मुद्रांवर अणकुचीदारदाभणासारख्या लेखणीने (स्टायलस) कोरून अक्षरे काढीत. या मुद्रा कलाबतूने (लेस) एकत्र बांधून त्याचा ग्रंथ (कोडॅक्स) तयार करीत.आद्य ग्रीक हस्ताक्षर लेखनाचे दोन प्रमुख प्रकार इ. स. पू. आठव्या शतकापर्यंत प्रचलित होते. त्यांपैकी एक प्रकार म्हणजे ग्रंथाच्या हस्तलिखित नकला करणारे लेखन हा असून दुसरा प्रकार युन्सिअल म्हणजे वाटोळ्या मोठ्या अक्षरांत केले जाणारे हस्ताक्षर लेखन होय. हे लेखन अलंकरणप्रधान, सुशोभित स्वरूपाचे असून त्यातील अक्षरे शैलीदार, सुस्पष्ट व मोठ्या अक्षरांच्या लिपीत लिहिली जात. या दोन लेखन माध्यमसाधनांव्यतिरिक्त गाईचे वासरू, बोकड वा मेंढी यांच्या कमावलेल्या कातड्यांपासून बनविलेली चर्मपत्रे लिहिण्यासाठी वापरीत. पुढे ही चर्मपत्रे अधिक सफाईदार करून या मृदु चर्मपत्रांवर पर्शियन व हिब्रू लोकांनीलेखन

केले. त्यांच्या लेखनाचा नमुना 'द डेड सी स्क्रोल्स' चा शोध (१९४७) लागल्यानंतर निदर्शनास आला. बायबलमधील 'जुना करार' (ओल्ड टेस्टामेंट) याचाही काही भाग आढळला. ग्रीक लिपीतून लॅटिन व रोमन लिपीची उत्पत्ती झाल्याचे मानण्यात येते त्यातून रोमन हस्तलिखितांत नेमकेपणा व प्रमाणबद्धता आली. लाकूड, तांब्याचे पत्रे यांचाही हस्तलिखितांसाठी उपयोग होत असे. चीनमध्ये कागदाचा शोध इ. स. पहिल्या-दुसऱ्या शतकांत लागला. त्यांचे हस्तलिखित ग्रंथ कागदाच्या भेंडोळ्याच्या आकारात उपलब्ध झाले आहेत. तत्पूर्वी चिनी लोक हाडावर व रेशमी कापडावर लेखन करीत. शिवाय ०.६ सेंमी. रुंदीच्या सु. १५–२३ सेंमी. लांब बांबूच्या सोटावर ते लेखन करीत. चिनी लोकांनी शोध लावलेला कागद यूरोप खंडात इ. स. अकराव्या शतकात प्रसृत झाला. तेथील हस्तलेखन करणाऱ्या व्यावसायिक लेखकांना स्क्राइब ही संज्ञा होती. त्यांचे चार वर्ग होते. त्यांपैकी पहिला वर्ग तलम मृदु चर्मपत्रेपुरवीत असे, तर दुसरा वर्ग लेखन करी, तिसरा वर्ग चर्मपत्रांना भौमितिक आकृतिबंध व चित्रांनी अलंकृत करी आणि चौथा वर्ग ती सर्व चर्मपत्रेएकत्र करून त्यांची बांधणी ग्रंथरूपात करी. मध्ययुगातील काही शोभित हस्तलिखिते उपलब्ध झाली असून त्यांचा विषय मुख्यत्वे बायबल व त्यातील 'जुना करार' यांच्याशी संबंधित आहे. यांची लेखनशैली बायझंटियन, इंग्लिश, फ्रेंच, आयरिश व इटालियन या नावांनी ओळखली जाते. इस्लाम धर्मियांत कुराणा च्या नकला करणे, हे पवित्र कार्य मानले जाई. कुराणा च्या अरबी लिपी व भाषेतील श्रद्धापूर्वक हस्तलेखनातून इस्लामी सुलेखनकलेचा विकास झाला. कुराणा तील वचने मशिदी, दरवाजे (बुलंद दरवाजा), दर्गे वा अन्य धार्मिक वास्तू यांवर कोरलेली आढळतात. यांशिवाय कुराणा चे काही हस्तलिखित अलंकृत असे ग्रंथही उपलब्ध झाले आहेत. भारतातील बहुतेक प्राचीन व मध्ययुगीन हस्तलिखिते भूर्जपत्र व ताडपत्र यांवर लिहिलेली आहेत. काही लेखन ताम्रपट, कापड व कागदावरही लिहिलेले आढळते. भारतातील हस्तलिखितांचा प्रारंभ निश्चितपणे केव्हा झाला, हे ज्ञात नसले, तरी तमिळ संघम् साहित्याची हस्तलिखिते इ. स. पू. ४०० – इ. स. २०० या काळात लिहिली गेली असावीत मात्र त्यांच्या बहुतेक साहित्यकृती नष्ट झाल्या असून काही सुदैवाने उपलब्ध आहेत. तथापि मौर्य काळातील (इ. स. पू. ३२१–१८५) सम्राट अशोकाच्या धर्माज्ञा, कौटिलीय अर्थशास्त्र, रामायण-महाभारता दी महाकाव्ये यांच्या हस्तलिखित प्रती व पाठभेद उपलब्ध झाले आहेत. यांशिवाय सांप्रत उपलब्ध असलेल्या हस्तलिखित ग्रंथांत धर्मशास्त्र, न्यायशास्त्र, तत्त्वज्ञान, काव्य, नाटक इ. विषयांवरच्या ग्रंथांच्या अनेक प्रती आहेत. एवढेच नव्हे तर ज्योतिष, वास्तुशास्त्र, शिल्पकला, तंत्रशास्त्र इ. विषयांवर विद्वानांनी लिहिलेली हस्तलिखिते उपलब्ध आहेत. त्यांत काही सचित्र पोथ्या आहेत. बहुतेक हस्तलिखित ग्रंथांवर त्या ग्रंथकाराचे नाव, रचनाकार किंवा नकलाकार यांचा निर्देश नसतो. भारतातील हस्तलिखिते मोठ्या प्रमाणावर तिबेट, चीन, नेपाळ, जपान, इंग्लंड या देशांत नेली गेली. बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी तिबेट, चीन व जपान या देशांत इ. स. पू. दुसऱ्या शतकापासून इ. स. सातव्या-आठव्या शतकापर्यंत बौद्ध विद्वान व प्रचारक यांच्याद्वारे या हस्तलिखितांची निर्यात झाली असावी. फाहियान, ह्यूएनत्संग व इत्सिंग या चिनी प्रवाशांनी भारतभेटीत हजारो हस्तलिखित ग्रंथ चीनमध्ये नेले. बौद्ध काळात हस्तलिखित निर्मितीमागे ज्ञानसंवर्धन व धर्मप्रसाराचा उद्देश होता. तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला आदी विद्यापीठांतून भूर्जपत्रांवरील व ताडपत्रांवरील हस्तलिखित ग्रंथ संग्रहित करण्यात आले होते तथापि भारतात अद्यापि अनेक हस्तलिखिते ग्रंथरूपात, पत्ररूपात, सनदा, वाके, कैफियती इ. स्वरूपांत अवशिष्ट असून त्यांच्या सूच्याही तयार करण्यात आल्या आहेत. हस्तलिखित पोथ्यांचे व्यावसायिक लेखक नक्कलकरतात तेव्हा कालानुवर्ती त्यात पाठभेद होत असतात. याचा प्रत्यय ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा यांतून आढळतो. मध्ययुगात तवारिखा, बखरी, सनदा, कैफियती, तह इत्यादींची हस्तलिखित कागदपत्रे ही ऐतिहासिक साधने म्हणून उपयुक्त ठरली. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजा जयसिंह यांमधील पुरंदरच्या तहाचा ताडपत्रावरील हस्तलिखित तहनामा सात मी. लांबीचा असून तो बिकानेरच्या पुरातत्त्व संग्रहालयात आहे. मुद्रणकलेचा शोध लागल्यानंतरही शेकडो वर्षे हस्तलिखिते नकलून घेण्याची पद्धत अव्याहत चालू होती. हस्तलिखितांचे धार्मिक,

सामाजिक, ऐतिहासिक व राजकीय मूल्य वादातीत आहे. त्यामुळे हस्तलिखिते विविध संस्थांतून जतन करण्यात आली आहेत. जीर्णशीर्ण हस्तलिखितांचे सूक्ष्मपट (मायक्रोफिल्म्स) तयार करण्यात आले आहेत. भारतात अनेक राज्यांच्या पुराभिलेखागारात तसेच काही विद्यापीठांत (वाराणसी हिंदू विश्वविद्यालय) हस्तलिखितांचा संग्रह आहे. महाराष्ट्रात डेक्कन कॉलेज, भारत इतिहाससंशोधक मंडळ, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, आनंदाश्रम (पुणे), प्राज्ञ पाठशाळा मंडळ (वाई), छत्रपती शाहू संशोधन केंद्र (कोल्हापूर), विपश्यना केंद्र (इगतपुरी) आदी संस्थांतून लाखो हस्तलिखित कागदपत्रे आहेत. महानुभाव पंथाशी संबंधित हजारो हस्तलिखिते रिद्धपूर (जिल्हा अमरावती) येथील विविध मठांत जतन केली आहेत. यांशिवाय दक्षिण भारतातील सरस्वती महाल (तंजावर), अड्यार, चेन्नई, म्हैसूर व त्रिवेंद्रम येथील ग्रंथालयांतून हजारो हस्तलिखिते सुस्थितीत जतन केलेली आहेत. (चित्रपत्र).

हस्तलिखितांचे प्रकार मुख्यतः धार्मिक ग्रंथ, तत्त्वज्ञान विषयक ग्रंथ ,साहित्य, काव्य, नाटक शास्त्रीय ग्रंथ, प्रशासकीय ऐतिहासिक नोंदी इत्यादी हस्तलिखितांचे प्रकार पाडता येतात.

प्राचीन भारतातील हस्तलिखित भाषा: संस्कृत संस्कृत ही प्राचीन भारतीय हस्तलिखित परंपरेमधील एक सर्वात प्रभावी आणि व्यापक भाषा आहे. वैदिक साहित्यामध्ये जसे की चार वेद ,उपनिषदे ,रामायण, महाभारत ,पुराण ,उपपुराण ,दर्शन ,नाट्यशास्त्र, काव्यशास्त्र, अलंकार शास्त्र, साहित्यशास्त्र ,सौंदर्यशास्त्र इत्यादी अनेक ज्ञानाच्या शाखा संस्कृत मधूनच निर्माण झालेल्या आहेत. संस्कृत भाषा ही व्याकरणादृष्ट्या एक अत्यंत परिपूर्ण भाषा आहे. या भाषेमध्ये विषय विविधता एक परिश्रृतशैली आणि संस्कृत भाषेचे अनेक लिपीमध्ये रूपांतर झालेले आपल्याला दिसून येते संस्कृत ज्ञान विज्ञानाची भाषा असल्याचे आपणाला यावरून समजते.

यानंतर पालीभाषा.पाली भाषा ही बौद्ध धर्म ग्रंथांची प्रमुख भाषा मानली जाते. पीठकसाहित्य ,जातककथा, बौद्धतत्त्वज्ञान इत्यादी पाली हस्तलिखितांमध्ये आपल्याला लिहिलेले पहावयास मिळते. पाली भाषेतील हस्तलिखिते भारतासोबत श्रीलंका म्यानमार थायलंड इत्यादी देशांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात आपणास आढळून येतात.

यानंतर अपभ्रंश भाषा आहे ते मध्ययुगीन भारतातील भाषांच्या संक्रमणामधील सगळयात महत्त्वाचा टप्पा म्हणजे अपभ्रंश भाषा. यामध्ये अनेक जैन साहित्य लौकिक साहित्य हस्तलिखितांमध्ये आपल्याला पहावयास मिळते. आधुनिक भारतीय भाषांचा जर विकास समजून घ्यावयाचा असेल तर अपभ्रंश भाषेमधील हस्तलिखितांचा अभ्यास निश्चितच फलदायी ठरतो

प्राचीन लिपी आणि हस्तलिखित परंपरा:

भारताच्या प्राचीन इतिहासांमध्ये अनेक लिपींचा विकास झाला ज्यामध्ये अधिकांश उत्पत्ती ब्राह्मी लिपी पासून प्राप्त होते .या लिपी केवळ भारतात नाही तर संपूर्ण एशिया खंडामध्ये लेखनाचे आधार बनत होती. प्रमुख प्राचीन लिपी पुढील प्रमाणे आहेत:

ब्राम्ही लिपी ब्राह्मी लिपी भारतातील सर्वात प्राचीन आणि एक महत्त्वपूर्ण लिपी आहे.या अधिकांश आधुनिक भारतीय लिपी तसेच देवनागरी,बंगाली ,तमिळ, मल्याळम, गुजराती इत्यादी ब्राह्मी लिपी पासूनच विकसित झालेल्या आहेत.सम्राट अशोकाचे शिलालेख इसवीसन पूर्व तिसरा शतकामध्ये ब्राह्मीलिपीतच लिहिले गेले आहेत .सम्राट अशोकाचे बहुतांशी चौदा शीला लेख ब्राह्मी लिपीमध्येच कोरलेले आपणास पहावयास मिळतात. धम्म लिपी सुद्धा तिला म्हटले गेले आहे .याचे रहस्य जेम्स प्रिन्सेप यांनी 1837 मध्ये आपल्या जगासमोर मांडले.

यानंतर **खारोष्टी लिपी** ब्राह्मी लिपीच्या समकालीनच ही खरोष्टी लिपी होती. या लिपीचा उपयोग पश्चिम उत्तर भारतामध्ये कांधार पाकिस्तान अफगाणिस्तान मध्ये प्रचलित होता. इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकामध्ये खरोष्टी लिपी मध्ये लेखन झालेले आपल्याला दिसून येते. यानंतर **सिंधू घाटी लिपी** ही भारतातील प्राचीनतम लगबग इसवी सन पूर्व 4000 ते 6000 वर्ष जुनी आहे .ही लिपी आज पर्यंत पूर्णतः वाचण्यामध्ये मानवाला शक्य झाले नाही ही एक चित्र लिपी किंवा भाव लिपी स्वरूपामध्ये आपणास प्राप्त होते.

यानंतर **गुप्त लिपी** ब्राह्मी लिपी पासून विकसित होत गुप्त साम्राज्य इसवी सन चौथे ते सहाव्या शतकाच्या दरम्यान या लिपीचा उपयोग केला जात होता. या लिपीमध्ये संस्कृत लिखाणासाठी आणि पुढे जाऊन नागरी शारदा आणि सिद्धम लिपी यातून विकसित होत गेल्या. यानंतर कुटील लिपी येते .पुढे जाऊन गुप्तलिपीचे परिवर्तित रूप म्हणून कुटील क लिपीचे रूप पहावयास मिळते. यानंतर **शारदा लिपी** येते इसवी सनाच्या आठव्या शतकामध्ये ही लिपी आपल्या आपल्याला वापरलेले दिसून येते.यानंतर ग्रंथ लिपी चा उपयोग संस्कृत ग्रंथांच्या लेखनासाठी केला गेलेला आपल्याला दिसून येतो. यानंतर **देवनागरी लिपी** देवनागरी लिपी भारताच्या उत्तर या भागांमध्ये इसवी सन आठव्या शतकाच्या आसपास प्राचीन नागरी कुटील किंवा गुप्त लिपी पासून विकसित झालेली आपल्याला दिसून येते. ती आज आपण हिंदी संस्कृत मराठी इत्यादी भाषेची प्रमुख लिपी म्हणून स मानली जाते.

हस्तलिखितांमधील विषयातील विविधता

हस्तलिखित केवळ धार्मिक ग्रंथांपूर्ती मर्यादित न राहता त्यामध्ये साहित्य आणि शास्त्रीय ग्रंथांचे लेखन झालेले आपणास दिसून येते साहित्यामध्ये पहावयाचे झाल्यास रामायण महाभारत ही महाकाव्य ,कालिदास भास यांसारख्या नाटककारानी रचलेली नाटके, आनंदवर्धन,भरत ,भर्तृहरी यांसारख्या लेखकांनी रचलेली काव्यशास्त्रे ,पंचतंत्र , हितोपदेश , कथासरीत्सार यांसारखे कथा साहित्य आपणास पहावयास मिळते .त्यासोबत शास्त्रीय ग्रंथांचा विचार करत असताना आपणास आर्यभट्ट ,भास्कराचार्य यांचे गणित शास्त्राबद्दलचे ,लेखन वराहमेहीर यांचे ज्योतिषशास्त्रीयलेखन, चरक, सुश्रुत,वागभट्ट यांचे आयुर्वेदामधील लेखन तसेच मयमतम यांसारखे वास्तुशास्त्रीय ग्रंथ पतंजली यांचे योगशास्त्र यांचेही लेखन झालेले आपल्याला पा

पहावयास मिळते .यावरून प्राचीन भारतीय समाज हा ज्ञानादिष्टित होता असे आपणास दिसून येते.

हस्तलिखितांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व: याविषयी जर आपण विचार केला तर हस्तलिखित ही आपणास इतिहासाच्या लेखनाची मूळ साधने म्हणून मदत करतात. तसेच हस्तलिखितांच्या भाषेवरून भाषेच्या विकासाचे विविध टप्पे आपणास अभ्यासाव्यास मिळतात. हस्तलिखितांच्या भाषेवरून त्यामध्ये झालेल्या लेखनावरून आपल्याला तत्कालीन धार्मिक व सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब अभ्यासाव्यास मिळते. तसेच हस्तलिखिते शिक्षण व्यवस्थेचे एक द्योतक म्हणावे लागेल. हस्तलिखित म्हणजे परंपरागत ज्ञानाचा ठेवा .म्हणून हस्तलिखितांचे अध्ययन हे विविध शास्त्रांना एक आधार ग्रंथ म्हणून मदत करणारे ठरते. हस्तलिखित यांच्या विविध संशोधन पद्धती देखील आता विकसित झालेल्या आहेत. यामध्ये हस्तलिखितांचे संकलन ,लिपीवाचन ,पाठसमीक्षा ,संपादन, त्यांचे भाषांतर आणि अर्थ विश्लेषण यामधून एक ग्रंथ संस्करण तयार होते आजच्या आधुनिक काळामध्ये देखील हस्तलिखितांच्या संवर्धनाची गरज निर्माण झाली आहे. असे टप्पे येतात.

हस्तलिखित संवर्धनाची आवश्यकता: आज हजारो हस्तलिखिते नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत याचे प्रमुख कारण म्हणजे प्रदूषण हस्तलिखितांना लागलेली कीड , वाळवी, योग्य ग्रंथालय संग्रहाचा अभाव, प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव यांसारख्या अनेक समस्या आता आपल्यासमोर हस्तलिखितांच्या बाबतीत निर्माण झाल्याआहेत. हस्तलिखितांचे संवर्धन करणे ही आता काळाची गरज बनली आहे.

हस्तलिखित संवर्धनाबद्दल उपाय योजना:वैज्ञानिक पद्धतीने जतन,डिजिटायझेशन,मायक्रोफिल्मिंग यांसारख्या उपाययोजनेद्वारे आपण हस्तलिखितांचे संवर्धन करू शकतो तसेच डिजिटलायझेशन मुळे आपण हस्तलिखिते दीर्घकाळापर्यंत तिथे जतन करू शकतो. हस्तलिखितांच्या संवर्धनासाठी उपाययोजना करताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांतर्फे आपण सहकार्य देखील प्राप्त करू शकतो. भारत सरकारचा नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्ट हा उपक्रम हस्तलिखित संवर्धनाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे.

आधुनिक डिजिटल युगात हस्तलिखित व त्यांची प्रासंगिकता: आजच्या डिजिटल यायच्या दुनियेत देखील हस्तलिखितांचे महत्त्व कमी झालेले नाही. आयुर्वेद,औषध संशोधने, योग अध्यात्म, भाषाविज्ञान, भाषा संग्रह कृत्रिम

बुद्धिमत्ता, सांस्कृतिक पर्यटन यांसारख्या अनेक शोधांचे मूळ हे प्राचीन हस्तलिखितांमध्ये दडलेले आहे. जुने ते सोने या उक्तीप्रमाणे आपले जे प्राचीन हस्तलिखित साहित्य आहे त्यांचे उचित संवर्धन करणे ते जोपासणे त्याच्यावर अधिकाधिक संशोधन करणे आणि नवनवीन संसाधने निर्माण करणे गरजेचे आहे.प्राचीन हस्तलिखित भाषा ही भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. या हस्तलिखितांमधून आपल्याला प्राचीन भारताची बौद्धिक उंची, सामाजिक जीवन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आध्यात्मिक परंपरा यांचे दर्शन घडते.या हस्तलिखितांचे अध्ययन, संशोधन व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. केवळ ग्रंथांचे जतन नव्हे तर त्यातील ज्ञान आधुनिक जीवनात उपयुक्त ठरविणे हेच या वारशाचे खरे संवर्धन होय.

संदर्भसूची:

1.द्विवेदी, कपिलदेव. भारतीय लिपि और लेखन परंपरा. विश्वविद्यालय प्रकाशन, 2008.

2.**शास्त्री, सत्यव्रत. हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर. साहित्य अकादमी**, 2002.

3.**त्रिपाठी, राधावल्लभ. संस्कृत साहित्य का समग्र इतिहास. विश्वविद्यालय प्रकाशन**, 2010.

4.**नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्ट्स. गाइडलाइन्स फॉर कन्झर्वेशन ऑफ मॅन्युस्क्रिप्ट्स. मिनिस्ट्री ऑफ कल्चर, भारत सरकार**, 2005.

एतस्याः कृते संशोधनपत्रम्

संशोधिका
डॉ. सौ. माधवी दिपकः जोशी
संस्कृतव्याख्याता, डी. बी. जे. महाविद्यालयः, चिपळूणम्
mjsanskrit@gmail.com 9975165842

सारांशः

अभिजातभाषा इति व्यापकार्थः शब्दः। 2005 तमे वर्षे संस्कृतम् अभिजातभाषा इति सर्वकारेण उद्घोषिता। संस्कृतभाषायाः प्राचीनं साहित्यं यथा प्रसिद्धं तथा आधुनिकसाहित्यमपि श्रेष्ठम्। आधुनिककाव्ये संस्कृतस्य रूपं कथं दृश्यते, आधुनिककविना संस्कृतेन कथं विचाराः प्रस्तुताः इति मम संशोधनस्य विषयः। आधुनिकभारते संस्कृतकाव्यस्य किं चित्रं दृश्यते इति अपि द्रष्टव्यम्। तदर्थं विंशतितमे शतके प्रकाशितं कण्टकाञ्जलिः इति काव्यमेकं मया परिशीलितम्।

अभिजातसंस्कृतकाव्यस्य विविधाः प्रकाराः। तेषु मुक्तककाव्यमिति प्रकारः प्रसिद्धः। उक्तं च -

भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती।
तस्यां हि काव्यं मधुरं तस्मादपि सुभाषितम्।।

सुभाषितेषु जीवनदर्शनं भवति। समाजजीवनं सुभाषितेषु प्रतिबिम्बितम् अस्ति। दैनंदिन-उदाहरणेन सुभाषितकारः तत्त्वं प्रतिपादयति। आधुनिककविः अपि सुभाषितानि रचयति। तस्य सुभाषितेषु अद्यतनीयस्य समाजस्य, राजनीतेः, जीवनस्य च चित्रणं कथं भवति इति मम अभ्यासस्य विषयः।

कण्टकाञ्जलिः इति नवनीतिशतकं कण्टकार्जुनेन रचितम्। अस्मिन् काव्ये विडम्बनेन कविना नर्म-उपहासेन समाजे जनानाम् आचारविचारयोः स्थिता विसङ्गतिः दर्शिता अस्ति। वक्रोक्तिः अस्य काव्यस्य शक्तिः। सकलजनहितार्थे, दम्भोद्धारणे च एतानि सुभाषितानि कविना रचितानि। समाजे स्वार्थः, दम्भः, अतार्किकता, शिथिलता, परम्परायाः अनिष्टता, घटनायाः घृणास्पदता वा विनोदेन, मर्मभेदकतया वर्णिताः सन्ति। एतानि सुभाषितानि शब्दरूपाणि व्यङ्गचित्राणि सन्ति। भ्रष्टाचारः, उत्कोचधनं, हुण्डाधनं, भारतस्य शत्रुराष्ट्रं, वेश्यामार्गः इत्यादीनि अत्र खलपात्राणि सन्ति।

यहां धर्म घोष आचार्य की स्तुति करते हुए उन्हें रत्न से भी बढ़कर कहां गया है जिससे यहांपर व्यतिरेक अलंकार घटित हो रहा है और धर्मघोष आचार्य के गुण सौन्दर्य को प्रकाशित कर रहा है ।

3. प्राकृतिक सौन्दर्य

इस संवर्ग के अन्तर्गत प्रकृति जगत् के विषयों का सौन्दर्य विवेचन अभिभूत है । चउप्पन्नमहापुरीसचरियं यह ग्रंथ सूर्योदय, सूर्यास्त, चंद्रोदय, छह ऋतु, नदी, पर्वत आदि अनेक प्राकृतिक वर्णनों से समृद्ध है । प्रसंगानुरूप शीलांकाचार्य ने अपनी प्रभावशाली शैली मे प्रकृति का अतिशय सुंदर एवं सटीक शब्दों मे वर्णन किया है जैसे-

सूर्योदय

हिमोलुग्गणलिणिपणइणी दट्ठूण व हिमायलाहिमुहं पत्थिओ दिवसयरो । तओ तच्चिंताए व ज्झिज्जिउमाढत्ता रयणी । चरित 1/ गाथा 30 के पूर्व

हिम के द्वारा निस्तेज बनी कमलिनी रूप प्रेमिका को देख कर वह सूर्य हिमालय की तरफ प्रयाण करने लगा, इस विचार से ही हो वैसे रात्र क्षीण होने लगी ।

सूर्यास्त

जं आसि दुरालोयं फुरियपयावस्स मंडलं रविणो ।
उव्वत्तिज्जइ सायम्मि, तेयरक्खा जए गरुई ।।166।। चरित 1

स्फुरायमान तेजस्वी सूर्यमंडल का तेज जिसके समक्ष नजर भी की नहीं जा सकती थी, वही सूर्यमंडल संध्या समय में निस्तेज हो गया था । जगत में तेज- कीर्ति की रक्षा महान है ।

चंद्रग्रहण - सूर्यग्रहण वर्णन चरित 4

केउग्गमकयविवरोयरस्स बिंबं दिणम्मि दिणमणिणो ।
लक्खिज्जइ णहसिरिचलणणिवडियं णेउरं व णहे ॥१८॥

केतुग्रह के उदित होने पर विवरयुक्त सूर्य बिंब- इस प्रकार दृष्टिगत हुआ मानो आकाशलक्ष्मी के चरण में से आकाश में गिरा हुआ नुपूर हो ।

ओदीसइ ससिबिंबं विवरंतररत्तबाहिरावयवं ।
अत्थक्कफुडियणिंतोहकलिलबंभंडखंडं व ।।१९॥

चंद्र का बिंब छिद्र में से बाहर लाल अवयव वाला दिखाई दे रहा था । मानो अकाल-
अकस्मात् फटा हुआ ब्रह्माण्ड खंड हो ।

4 . कलागत- सौन्दर्य

इस संवर्ग में काव्य कला से संबंधित विषयों का सौन्दर्य निरूपण किया गया है । इस काव्य में कथा -सौष्ठव, रसयोजना, भाव-लालित्य गुण, अलंकार- विनियोजन आदि का सौन्दर्य स्पृहणीय है ।

रस सौन्दर्य - रस काव्य का प्राण तत्व है।रस की महत्व सभी ने स्वीकृत की है। चउ . का मुख्य रस शांत रस है परंतु कवि ने अपनी काव्य प्रतिभा से यथा योग्य स्थान अन्यरसों का भी रोचक वर्णन प्राप्त होता है । जैसे –

अभिलाष विप्रलंभ शृंगार

सखी! नेत्र रूप दर्शन करने तरस रहे हैं, यह कर्ण उनके मधुर शब्द सुनने को उत्सुक बने हैं, उनके हृदय में बैठी में पसीने से भीगी अंगुलियों द्वारा किस तरह उनका चित्रालेखन करुं? प्रिय के दर्शन स्पर्शन के लिए आकुलित हृदय, स्वेदयुक्त अंगुलियों वाली में है प्रियसखी! विषम अवस्था को प्राप्त हुई हूँ । इसलिए मैं चित्र निर्माण किस तरह करूं? ॥ चरित 1 / गाथा 15

यहां लक्ष्मीधर कुमार को पाने की अभिलाषा में बंधुमति के हृदय की रति सहृदय सामाजिक के हृदय को विप्रलंभ श्रृंगार रस से ओतप्रोत किए दे रही है ।

वीर रस

वज्रप्रकोष्ठकरजाग्रचपेटघातनिष्पिष्टदन्तिदशनोत्कट मौक्तिकौघः ।
सिंह सहायविकलोऽपि दलत्यरातीनन्तर्गतं ननु स दैककमेव सत्त्वम् ॥[48]

अर्थात् वज्र सदृश्य दृढ पैर के तलवे और पंजे के नखाग्र के प्रहार से हाथी के दंत शूल और उत्तम जाति के मुक्ता फल के समूह को चूर्ण करने वाला सिंह सहायता रहित होने पर भी शत्रुओं का दमन करता है ।वास्तव में कार्य साधक हो तो अंतर में स्थित एकमात्र सत्व पराक्रम ही है ।

यहां विभाव आदि के वर्णन से हृदय का उत्साह अभिव्यक्त हो रहा है और वीर रस के आस्वाद में परिणत हो रहा है ।

शांत रस

मोक्ष रूप चरम पुरुषार्थ की प्राप्ति की दृष्टि से शांत रूप नाम रस को मान्यता दी गई है । देव, मुनी, गुरु, परस्त्री अथवा पत्नी छोड स्वजन विषयक रति भाव का वर्णन शांत रस अंतर्गत आता है ।

णिव्ववइ तुह महायस ! कहा वि आसंघिओरु सोक्खाइं ।
हिययाइं सइ सुरच्चिय ! दसणमतुलं ति कह भणिमो ? ॥ चरित 1-2 **/ गाथा** 115

अर्थात् हे सुरों द्वारा अर्चित प्रभु ! आपके अतुल दर्शन की तो क्या कहूं ? हे महान यशस्विन!
जो हृदय से आपकी कथा करते हैं वह दु:ख की निवृत्ति स्वरूप असंख्य सुख प्राप्त करते है।
यहां प्रभु विषयक रति भाव उत्पन्न हो रहा है जो शांत रस की ओर ले जा रहा है ।

उपसंहार

शीलांकाचार्य विभिन्न मानवीय भावनाओं के चित्रण में सफल हुवे है । मानवीय भावनाओं का रमणीय अंकन चउ. में हुवा है । कवी नें अपनी प्रगल्भ प्रतिभा शैली से सुयोग्य स्थान पर प्रचुर मात्रा में विविध छंद तथा विविध अलंकारों का गठन किया है । यथास्थान शताधिक एक से बढकर एक सूक्तियों का प्रयोग हुआ है जो प्राकृत भाषा को चार- चाँद लगा रही है । प्राकृत देश्य शब्द का प्रयोग प्रचुर मात्रा में प्राप्त है । यहाँ विषय विस्तार के भय से सभी को

[48] चउ.**चरित** 1/ **गाथा** 12

व्यक्त करना संभव नही। लेकीन इतना तो निश्चित है की सर्वत्र रोमांचकता एवं उत्सुकता बनी रहती है। शीलांकाचार्य सौन्दर्य निरूपण में सफल हुए है। और यह विषय वास्तव में शोध प्रबंध का विषय बन सकता है।

सिरिसीलांकायरियविरइयं चउप्पन्नमहापुरिसचरियं, संपा ,भोजक अमृतलाल .
प्राकृत टेक्ट सोसायटी, वाराणसी, 1961

श्रीलरूपगोस्वामिना प्रणीतः **उज्ज्वलनीलमणिः,** संपा. श्रीमद्भक्तिवेदान्त-नारायण-गोस्वामि-महाराज
गौडीय वेदान्त प्रकाश

क्षेमेन्द्रप्रणीत **कविकण्ठाभरण**, वामन केशव लेले, मोतीलाल बनारसीदास प्रकाशन, दिल्ली

आचार्य दण्डी **काव्यादर्शः** संपा. योगेश्वर दत्तशर्मा, नाग पब्लिशर्स 1960

काव्यप्रकाश) मम्मटाचार्य(, संपा. सत्यव्रत सिंह, चौखम्बा विदयाभवन, वाराणसी, 1995

काव्यालङ्कार(आ भामह), व्याख्याकार -डॉ. त्रिपाठी रूपनारायण, हंसा प्रकाशन, जयपुर, 2018

वामन, काव्यालङ्कारसूत्रवृत्ति, व्याख्याकार केदारनाथ शर्मा , चौखम्बा कृष्णदास अकादमी, वाराणसी

महाकवी भारवि कृत किरातार्जुनीय महाकाव्य; श्री रामप्रताप त्रिपाठी, शास्त्री; लोकभारती प्रकाशन,
इलाहाबाद

आनन्दवर्धनाचार्यप्रणीत **ध्वन्यालोक**' आचार्य लोकमणि दाहाल, भारतीय विद्या प्रकाशन, वाराणसी

महाकवीश्रीहर्षप्रणीतम् नैषधीयचरितम् ; संपा. आचार्य श्रीशेपराज शर्मा रेश्मी; चौखम्बा सुरभारती प्रकाशन,
वाराणसी, 1995

श्रीमद् भागवतम्,) महर्षि वेदव्यास(संपा. पांडुरंगी के टी, द्वैत वेदांत स्टडीज एंड रिसर्च फाऊंडेशन,
बैंगलोर, 2000

आधुनिक सन्दर्भ

पाण्डेय हरिशंकर ,**प्राकृत विमर्श**2017 वाराणसी ,प्राच्य विद्या भवन ,

डॉ नागेन्द्र, **भारतीय काव्य-शास्त्र की परम्परा,** नेशनल पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, 1955

डॉ सम्पूर्णानन्द , **चिद्विलास**, संपूर्णानंद ज्ञान मंडळ , काशी

चन्द्रकला, **सौन्दर्यशास्त्र : स्वरूप एवं विकास**, साधना प्रकाशन, चंदीगढ

कोश ग्रन्थ

श्री तारानाथ तर्क वाचस्पति भट्टाचार्य, **वाचस्पत्यम् बृहत् संस्कृताभिधानं,**
चौखम्बा संस्कृत सीरीज ऑफिस वाराणसी, 1962

जैन प्राकृत साहित्यातील अनेकांतवादाचे स्वरूप आणि त्याचे समकालीन सामाजिक परिणाम: एक चिकित्सक अभ्यास

अर्चना दादासाहेब मुळे

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक

सारांश:

प्राकृत साहित्याचा अभ्यास केला असता जैन तत्त्वज्ञान आणि विशेषतः अनेकांतवाद ही संकल्पना अनिवार्यपणे समोर येतेज्ञान प्राकृत भाषा ही प्राचीन भारतातील लोकभाषा असून ती ., धर्म आणि तत्त्वचिंतनाचे प्रभावी माध्यम राहिली आहेजैन प्राकृत साहित्यातील अनेकांतवाद हा केवळ तात्त्विक विचार नसून तो जीवन ., समाज आणि मानवी संबंध समजून घेण्याचा व्यापक दृष्टिकोन आहेसत्य एकांगी नसून बहुआयामी आहे ., ही भूमिका अनेकांतवाद मांडतोया . धनाचा उद्देश जैन प्राकृत साहित्यातील अनेकांतवादाचे स्वरूप समजून घेणे तसेच त्याचे समकालीन सामाजिक संशो प्रस्तुत अभ्यासात नयवाद .परिणाम चिकित्सक पद्धतीने अभ्यासणे हा आहे, स्यादवाद आणि सप्तभंगी नय या अनेकांतवादाच्या प्रमुख तत्त्वांचे विश्लेषण करण्यात आले आहेकृत ग्रंथांमधील संदर्भांच्या आधारे असे स्पष्ट होते की प्रा . अनेकांतवाद मतभेद, संघर्ष, असहिष्णुता आणि वैचारिक कट्टरता कमी करण्यासाठी उपयुक्त ठरतो.

आजच्या जागतिकीकरणाच्या, तंत्रज्ञानप्रधान आणि संघर्षग्रस्त समाजात धार्मिक, राजकीय, सामाजिक व वैचारिक तणाव वाढताना दिसतातअशा परिस्थितीत अनेकांतवाद हा . वैचारिक अहिंसेचा आणि समन्वयाचा मार्ग सुचवतोयुद्ध ., धार्मिक संघर्ष, लोकशाहीतील असहिष्णुता, मानसिक ताण तसेच तंत्रज्ञानाशी संबंधित नैतिक प्रश्न यांवर अनेकांतवादी दृष्टिकोन संतुलित उपाय देऊ शकतोतवाद हा केवळ ऐतिहासिक किंवा जैन प्राकृत साहित्यातील अनेकां . धार्मिक विचार नसून आधुनिक काळात जागतिक शांतता, सहअस्तित्व आणि संवादासाठी एक प्रभावी तात्त्विक व सामाजिक मॉडेल ठरू शकतो.

महत्वाचे शब्द: प्राकृत साहित्य, जैन तत्त्वज्ञान, अनेकांतवाद, नयवाद, स्यादवाद, सप्तभंगी नय, समकालीन समाज, वैचारिक सहिष्णुता, जागतिक शांतता

१प्रस्तावना .

जैन संस्कृतीनुसार आचाराची समता म्हणजे अहिंसा आणि विचारांची समता म्हणजे अनेकांतवाद होय . अनेकांतवाद हा केवळ तत्त्वज्ञानातील संकल्पना नसून तोजगाकडे पाहण्याचा, सत्य समजून घेण्याचा एक व्यापक दृष्टिकोन आहेभाषा ही प्राचीन भारतातील लोकभाषा असून जैन तत्त्वज्ञानाचा मूळ पाया याच भाषेत प्राकृत . अनेकांतवाद काढून टाकल्यास जैन प्राकृत साहित्याचे वैशिष्ट्यच नष्ट होईल .आढळतो, असे अभ्यासकांचे मत आहे. सम्राट अशोक ते राजा अमोघवर्ष यांच्या कालखंडात विविध विचारप्रवाहांना मिळालेला सन्मान हा अनेकांतवादी दृष्टीकोनाचाच परिणाम होताआजच्या संघर्षग्रस्त ., असहिष्णु आणि तणावपूर्ण जगात अनेकांतवाद अधिकच उपयुक्त ठरतो.

२संशोधनाची गरज .

माहिती व तंत्रज्ञानाच्या अति विकासामुळे-मानवी जीवन अधिक वेगवान झाले असले, तरी त्याचबरोबर स्पर्धा, स्वार्थ, अहंकार, असहिष्णुता आणि मानसिक तणाव वाढले आहेतप्रेम ., जिव्हाळा आणि सहअस्तित्व या - मूल्यांची जागा भीती, द्वेष व संशयाने घेतली आहेअशा परिस्थितीत जैन दर्शनातील अनेकांतवाद मानवतेला समतोल ., शांतता आणि वैचारिक सहिष्णुता देऊ शकतो.

३संशोधनाची उद्दिष्टे .

१. जैन प्राकृत साहित्यातील अनेकांतवाद या संकल्पनेचे विश्लेषण करणे
२. अनेकांतवादाचा समकालीन सामाजिक उपयोग स्पष्ट करणे
३. आधुनिक समाजातील असहिष्णुता व वैचारिक संघर्ष कमी करण्यासाठी अनेकांतवादाची उपयुक्तता अभ्यासणे

४. "माझेच सत्य अंतिम नाही ही "समन्वयवादी दृष्टी समाजात रुजवणे

४संशोधन पद्धती .

या संशोधनासाठी गुणात्मक संशोधन पद्धत आणि आशय विश्लेषण)Content Analysis) पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

५प्राकृत भाषेचा इतिहास व स्वरूप .

५ प्राकृत भाषेचा १.अर्थ:

'प्राकृत' या शब्दाचा अर्थ नैसर्गिक, स्वाभाविक किंवा लोकांकडून सहज बोलली जाणारी भाषा असा होतो . संस्कृत व्याकरणानुसार "प्रकृतेः आगतं प्राकृतम्" म्हणजे जी भाषा मूळ प्रकृतीतून, म्हणजेच सामान्य लोकांच्या दैनंदिन व्यवहारातून निर्माण झाली, ती प्राकृत होय. प्राकृत भाषा ही कोणत्याही एका वर्गापुरती, विद्वान किंवा ब्राह्मणवर्गापुरती मर्यादित नव्हती; ती सर्वसामान्य जनतेची बोलभाषा होतीम्हणूनच ती अधिक सहज ., प्रवाही, भावनाप्रधान आणि संवादक्षम होतीसंस्कृत ही नियमबद्ध ., व्याकरणशुद्ध आणि प्रामुख्याने धार्मिकवैदिक व-िधींसाठी वापरली जाणारी भाषा होती, तर प्राकृत ही लोकजीवनाशी थेट जोडलेली भाषा होती.

जैन आणि बौद्ध परंपरेत प्राकृत भाषेला विशेष महत्त्व प्राप्त झाले, कारण या परंपरांनी धर्म, नैतिकता आणि तत्त्वज्ञान सामान्य माणसांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केलात्यामुळे प्रा .कृत ही केवळ भाषा न राहता लोकशिक्षणाचे, वैचारिक लोकशाहीचे आणि समतावादी विचारप्रसाराचे माध्यम ठरली. जैन तत्त्वज्ञानातील अनेकांतवाद, अहिंसा, अपरिग्रह यांसारखे मूलभूत विचार प्राकृत भाषेतून मांडले गेले असल्याने प्राकृत भाषा ही तत्त्वचिंतनाचीही प्रभावी भाषा ठरते.

५प्राकृत भाषेचे कालखंड २.

भाषाशास्त्रज्ञांनी प्राकृत भाषेच्या विकासाचे साधारणतः तीन प्रमुख कालखंड मानले आहेतया कालखंडांमधून . प्राकृत भाषेचा सामाजिक, धार्मिक आणि साहित्यिक प्रवास स्पष्ट होतो.

(अ ६०० .पू .स.इ) प्राचीन प्राकृत (– इ(१०० .स.

हा कालखंड प्राकृत भाषेच्या प्रारंभाचा आणि व्यापक प्रसाराचा मानला जातो या काळात भगवान महावीर . आणि भगवान बुद्ध यांनी आपले धार्मिक व नैतिक विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी प्राकृत भाषेचा प्रभावी जैन आगम साहित्य आणि बौद्ध त्रिपिटक यांचे मूळ स्वरूप प्रा .वापर केलाकृत भाषेत आढळते.
सम्राट अशोकाच्या शिलालेखांमध्येही प्राकृत भाषा आणि ब्राह्मी लिपीचा वापर झालेला दिसतोयावरून . राज्यकारभार, धर्मप्रसार आणि सार्वजनिक संदेश यांसाठी प्राकृत भाषेला किती महत्त्व होते, हे स्पष्ट होतेया काळातील . प्राकृत भाषा साधी, सरळ आणि लोकाभिमुख होती.

(ब १०० .स.इ) मध्यकालीन प्राकृत (– ६००(

हा कालखंड प्राकृत साहित्याचा सुवर्णकाळ मानला जातोया काळात प्राकृत भाषेचे विविध प्रादेशिक आणि . :प्रमुख पाच प्राकृत प्रकार पुढीलप्रमाणे आहेत .साहित्यिक प्रकार विकसित झाले

शौरसेनी प्राकृत – प्रामुख्याने संस्कृत नाटकांमधील संवादांसाठी वापरली जाणारी भाषा.

महाराष्ट्री प्राकृत – काव्यनिर्मितीसाठी प्रसिद्ध; गाथासप्तशती हा महत्त्वाचा ग्रंथही आजच्या मराठी भाषेची पूर्वज . .मानली जाते

मागधी प्राकृत – बिहार व आसपासच्या प्रदेशात प्रचलित.

अर्धमागधी प्राकृत – जैन आगम साहित्याची मुख्य भाषा.

पैशाची प्राकृत – गुणाढ्याच्या बृहत्कथा या ग्रंथाची भाषा.

या काळात प्राकृत केवळ बोलभाषा न राहता समृद्ध साहित्यभाषा म्हणून विकसित झाली.

(क ६०० .स.इ) अपभ्रंश / उत्तरकालीन प्राकृत (– १०००(

या कालखंडात प्राकृत भाषेचे रूपांतर अपभ्रंश भाषेत झाले. अपभ्रंश ही प्राकृत आणि आधुनिक भारतीय भाषांमधील दुवा मानली जातेराठीयाच अपभ्रंशातून म ., हिंदी, गुजराती, बंगाली इत्यादी आधुनिक भारतीय भाषांचा

विकास झाला. म्हणूनच प्राकृत भाषा ही केवळ प्राचीन काळापुरती मर्यादित न राहता आधुनिक भारतीय भाषांच्या उगमाचा आधारस्तंभ ठरते.

६संकल्पना व अर्थ : अनेकांतवाद .

अनेकांतवाद हा जैन तत्त्वज्ञानाचा मूलभूत आणि वैशिष्ट्यपूर्ण सिद्धांत आहे. 'अनेक' म्हणजे अनेक आणि 'अंत' म्हणजे गुण, पैलू किंवा दृष्टीकोनत्यामुळे अनेकांतवादाचा अर्थ असा होतो की कोणतीही वस्तू ., घटना किंवा सत्य एकांगी नसून तिचे स्वरूप बहुआयामी असतेम सत्य कोणत्याही वास्तवाकडे पाहताना एकाच दृष्टीकोनातून अंति . .मांडणे अपूर्ण आणि कधी कधी चुकीचे ठरू शकते अनेकांतवादानुसार सत्य हे सापेक्ष आहे; ते व्यक्तीच्या अनुभवावर, काळावर, स्थानावर आणि संदर्भावर अवलंबून असते त्यामुळे एका .दृष्टिकोनातून मांडलेले विधान पूर्णतः असत्य नसते, परंतु ते संपूर्ण सत्यही नसतेतामुळे वैचारिक नम्रताया सिद्धां ., सहिष्णुता आणि समन्वयाची भावना विकसित होते.

अनेकांतवादाची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी हत्ती आणि सात आंधळ्यांची गोष्ट हे अत्यंत प्रसिद्ध उदाहरण दिले जाते केलेज्याने हत्तीचे पोट स्पर्श .सात आंधळे हत्तीच्या वेगवेगळ्या अवयवांना स्पर्श करतात ., त्याला तो भिंतीसारखा वाटतो; दाताला स्पर्श करणाऱ्याला तो बाणासारखा; सोंडेला स्पर्श करणाऱ्याला सापासारखा; पायाला स्पर्श करणाऱ्याला झाडासारखा; कानाला स्पर्श करणाऱ्याला सूपासारखा आणि शेपटीला स्पर्श करणाऱ्याला दोरखंडासारखा वाटतोबरोबर असते प्रत्येकाचे वर्णन अंशतः ., परंतु कोणीही हत्तीचे संपूर्ण स्वरूप सांगू शकत नाही. हे उदाहरण स्पष्ट करते की प्रत्येक व्यक्तीचा अनुभव मर्यादित असतोअनेकांतवाद आपल्याला हे शिकवतो की . स्वतःचा दृष्टिकोन हा एकमेव अंतिम सत्य नसून तो सत्याचा एक अंश आहे. म्हणूनच अनेकांतवाद हा केवळ तत्त्वज्ञानापुरता मर्यादित न राहता सामाजिक समन्वय, वैचारिक सहिष्णुता आणि अहिंसक संवादाचा प्रभावी आधार ठरतो.

७जैन प्राकृत साहित्यातील अनेकांतवादाचे प्रमुख सिद्धांत .

जैन प्राकृत साहित्यात अनेकांतवाद हा केवळ तात्त्विक संकल्पना नसून तो व्यवस्थित मांडलेला विचारप्रणालीचा ढाचा आहे: या विचारप्रणालीचे मुख्यतः तीन परस्परपूरक सिद्धांत आढळतात . नयवाद, स्यादवाद आणि सप्तभंगी नय. हे तिन्ही सिद्धांत सत्याच्या सापेक्ष, बहुआयामी आणि समन्वयवादी स्वरूपाचे विश्लेषण करतात.

७नयवाद १.

'नय' म्हणजे दृष्टिकोन. नयवादानुसार कोणतीही वस्तू, घटना किंवा सत्य यांना असंख्य पैलू असतात; परंतु मानवी बुद्धी एका वेळी त्या सर्व पैलूंना समजून घेऊ शकत नाही. म्हणूनच प्रत्येक विधान हे एका विशिष्ट दृष्टिकोनातून .केलेले असते (नयातून) आचार्य कुंदकुंदाचार्यांनी आपल्या समयसार आणि पंचास्तिकाय या ग्रंथांमध्ये नयवादाचे सखोल विवेचन केले आहे: त्यांनी नयवादाचे दोन मुख्य प्रकार स्पष्ट केले आहेत .

निश्चय नय – हा नय वस्तूचे अंतर्गत, शाश्वत आणि तात्त्विक स्वरूप स्पष्ट करतोतो अंतिम सत्याच्या पातळीवर वस्तूचा . .विचार करतो

व्यवहार नय – हा नय दैनंदिन व्यवहार, सामाजिक संबंध आणि व्यवहारिक सत्य यांचा विचार करतो . .लोकजीवनासाठी हा नय आवश्यक आहे नयवादाचा सामाजिक अर्थ असा की, आपण जे पाहतो किंवा समजतो ते संपूर्ण सत्य नसून सत्याचा एक अंश आहे, हे स्वीकारण्याची मानसिकता निर्माण होतेत्यामुळे दुसऱ्याचा दृष्टिकोन ऐकून . .निर्माण होते आणि सामाजिक सहिष्णुता वाढते घेण्याची तयारी

७स्यादवाद २.

स्यादवाद हा अनेकांतवादाचा भाषिक आणि तर्कशास्त्रीय आधार आहे. 'स्यात्' या शब्दाचा अर्थ "कदाचित", "एका अपेक्षेने" असा होतोस्यादवाद कोणतेही विधान अंतिम ., कट्टर किंवा अहंकारी होऊ देत नाही. आचार्य सिद्धसेन दिवाकर यांच्या सन्मतितर्क या ग्रंथात स्यादवादाचे सखोल आणि तर्कसुसंगत विवेचन आढळतेत्यांनी असे स्पष्ट केले . आहेकी, प्रत्येक नय आपापल्या जागी सत्य असतो; परंतु जेव्हा तो इतर नयांचा निषेध करतो, तेव्हा तो असत्य ठरतो . .सर्व नयांचा समन्वय म्हणजेच स्यादवाद होय स्यादवादामुळे भाषेत नम्रता येते, संवादात लवचिकता निर्माण होते आणि मतभेदांमधून संघर्ष न होता संवाद शक्य होतो .म्हणूनच स्यादवादाला वैचारिक अहिंसेचे शास्त्र असेही म्हटले जाते.

७सप्तभंगी नय ३.

सप्तभंगी नय हा स्यादवादाचा विस्तार असून तो सत्याची सापेक्षता सात प्रकारे स्पष्ट करतो. 'सप्त' म्हणजे सात आणि 'भंगी' म्हणजे विधानप्रकारया सात भंगींमधून वस्तूचे अस्तित्व ., अभाव आणि भाषेची मर्यादा स्पष्ट होते :

स्यात् अस्ति – एका अपेक्षेने आहे.

स्यात् नास्ति – एका अपेक्षेने नाही.

स्यात् अस्तिनास्ति- – एका अपेक्षेने आहे आणि नाही.

स्यात् अवक्तव्यम् – एका अपेक्षेने सांगता येत नाही.

स्यात् अस्तिअवक्तव्यम्- – आहे, पण पूर्णपणे सांगता येत नाही.

स्यात् नास्तिअवक्तव्यम्- – नाही, आणि तरीही सांगता येत नाही.

स्यात् अस्तिअवक्तव्यम्-नास्ति- – आहे, नाही आणि सांगताही येत नाही.

सप्तभंगी नयामुळे भाषेची मर्यादा आणि सत्याची सापेक्षता स्पष्ट होतेहा सिद्धांत व्यक्तीला . एकांगी विचारांपासून दूर नेऊन बहुआयामी चिंतनाकडे घेऊन जातो.

८पाश्चात्य व भारतीय तत्त्वज्ञानावर अनेकांतवादाचा प्रभाव .

अनेकांतवाद हा जैन तत्त्वज्ञानापुरता मर्यादित न राहता जागतिक तत्त्वचिंतनाशी सुसंगत ठरणारा विचार आहेपाश्चात्य आणि भारतीय तत्त्वज्ञानातील अनेक विचारप्रवाहांमध्ये सत्याची . सापेक्षता, द्वंद्वात्मकता आणि बहुआयामी वास्तव याविषयीचे चिंतन आढळते, जे अनेकांतवादाशी साधर्म्य दर्शवते.

८भावपाश्चात्य तत्त्वज्ञानावर अनेकांतवादाचा प्र १.

प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ हिरक्लेटस)Heraclitus) यांनी "सर्व काही परिवर्तनशील आहे" (Everything flows) अशी भूमिका मांडलीत्यांच्या मते ., वास्तव हे स्थिर नसून सतत बदलणारे आहेवस्तू एकाच वेळी अस्तित्वातही . असतात आणि परिवर्तनशीलही असतात, ही संकल्पना अनेकांतवादातील उत्पाद–व्यय–ध्रौव्य या सिद्धांताशी साधर्म्य दर्शवते. ग्रीक तत्त्वज्ञ झिनो ऑफ एलिया यांनी द्वंद्वात्मक)Dialectical) पद्धतीचा वापर करून सत्याच्या विरोधाभासी पैलूंवर विचार केलापुढे . प्लेटो यांनी द्वंद्वात्मक पद्धतीद्वारे सत्याचा शोध घेण्याची विचारपद्धती विकसित केलीया . पद्धतीत प्रश्न–उत्तर, विरोध–समन्वय यांच्या माध्यमातून अंतिम सत्याकडे जाण्याचा प्रयत्न केला जातो, जो अनेकांतवादाच्या समन्वयवादी दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

इमॅन्युएल कांट यांनी ज्ञानाची चिकित्सक समीक्षा करताना कोणताही एक दृष्टिकोन अंतिम सत्य मानण्यास नकार दिलाहा विचार .अनुभव आणि बुद्धी यांचा समन्वय साधत त्यांनी सत्याचे अनेक स्तर मांडले . अनेकांतवादाच्या सापेक्षतावादी भूमिकेशी सुसंगत ठरतो. जर्मन तत्त्ववेत्ता हेगेल यांची द्वंद्वात्मक विकास संकल्पना (Thesis–Antithesis–Synthesis) ही अनेकांतवादाशी समांतर आहेविरोधी विचारांच्या संघर्षातून उच्च पातळीचे . सत्य उदयास येते, ही कल्पना अनेकांतवादातील समन्वयाच्या तत्त्वाशी जवळीक साधते.

८भारतीय तत्त्वज्ञानावर अनेकांतवादाचा प्रभाव २.

भारतीय तत्त्वज्ञानातही समन्वयवादी आणि सापेक्ष विचारपरंपरा आढळते. गौतम बुद्ध यांनी सुत्तनिपात ग्रंथात वादविवादाच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेतत्यांच्या मते ., एकांगी मतांमुळे कलह आणि अशांती निर्माण होतेही . भूमिका अनेकांतवादातील वैचारिक अहिंसेच्या तत्त्वाशी सुसंगत आहे. ऋग्वेदातील दीर्घतमा ऋषी यांचे सुप्रसिद्ध वचन – "एकं सद् विप्रा बहुधा वदंति" – म्हणजे सत्य एकच आहे, पण त्याची मांडणी अनेक प्रकारांनी केली जातेहा विचार . अनेकांतवादाच्या मूलभूत तत्त्वाशी थेट जुळणारा आहे.

तसेच शंकराचार्यांचे अद्वैत, उपनिषदांतील समन्वयवादी दृष्टिकोन आणि विविध दर्शने यांमधील परस्परसंवाद भारतीय विचारपरंपरेतील बहुविधता दर्शवतोया सर्व विचारप्रवाहांमधून भारतीय तत्त्वज्ञानाची समन्वयशील ., सहिष्णु आणि व्यापक परंपरा स्पष्ट होते. पाश्चात्य आणि भारतीय तत्त्वज्ञानातील अनेक विचारप्रवाहांमध्ये सत्याची

बहुआयामीता, सापेक्षता आणि समन्वय यांचा स्वीकार आढळतोतवाद हा केवळ जैन तत्त्वज्ञानाचा त्यामुळे अनेकां . सिद्धांत नसून जागतिक तत्त्वचिंतनाशी सुसंगत असा सार्वत्रिक विचार आहे.

९समकालीन सामाजिक समस्यांवर अनेकांतवाद .

आजचे जागतिक समाजजीवन संघर्ष, असहिष्णुता, तणाव आणि वैचारिक टोकाचेपणाने ग्रस्त झालेले दिसते . णजेयामागील प्रमुख कारण म्ह एकांगी विचारसरणी म्हणजेच "माझेच सत्य अंतिम" ही भूमिकाजैन तत्त्वज्ञानातील . अनेकांतवाद हीविचारसरणी मोडून काढून बहुआयामी, समन्वयवादी आणि अहिंसक दृष्टिकोन देतोसमकालीन . सामाजिक समस्यांवर अनेकांतवाद कसा उपयुक्त ठरतो, हे पुढील उपविभागांतून स्पष्ट करता येते.

९युद्धे व संघर्ष १.

इतिहासातील तसेच आधुनिक काळातील अनेक युद्धे आणि संघर्ष हे एकांगी आणि कट्टर विचारसरणीचे परिणाम आहेत. शीतयुद्ध या कालखंडात जग भांडवलशाही आणि साम्यवाद अशा दोन टोकाच्या गटांत विभागले गेले . ने दीर्घकाळ तणावदोन्ही गटांना आपलीच विचारसरणी सर्वोच्च वाटत असल्या, शस्त्रास्त्रांची स्पर्धा आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले. तसेच धार्मिक युद्धे ही "माझाच धर्म श्रेष्ठ" या एकांगी भूमिकेतून उद्भवली. वसाहतवाद देखील याच मानसिकतेचा परिणाम होता, ज्यात काही राष्ट्रांनी स्वतःच्या संस्कृतीला श्रेष्ठ मानून इतर संस्कृतींवर वर्चस्व गाजवले. अनेकांतवादी दृष्टी स्वीकारली असती, तर प्रत्येक विचारसरणीत काही गुण व काही मर्यादा आहेत, हे मान्य करता आले असतेअनेकांतवाद येथे .त्यामुळे संघर्षाऐवजी संवाद आणि सहअस्तित्व शक्य झाले असते . वैचारिक अहिंसेचा प्रभावी मार्ग सुचवतो.

९लोकशाही व राजकारण २.

लोकशाही व्यवस्थेत विविध विचार, मतप्रवाह आणि हितसंबंध अस्तित्वात असणे स्वाभाविक आहेमात्र ., आधुनिक राजकारणात विरोधी मतांचा स्वीकार न करता त्यांना पूर्णतः चुकीचे ठरवण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते . यामुळे राजकीय ध्रुवीकरण, सामाजिक तणाव आणि लोकशाही मूल्यांचे क्षरण होते. अनेकांतवाद लोकशाहीला हे शिकवतो की विरोधी मत हे संपूर्णपणे असत्य नसून ते वास्तवाचा एक वेगळा पैलू असू शकतेसंवाद ., समन्वय आणि सहमती यांच्या माध्यमातून निर्णय घेतल्यास लोकशाही अधिक परिपक्व आणि सर्वसमावेशक बनू शकतेत्यामुळे . तवाद हा लोकशाहीतीलअनेकां संविधानात्मक सहिष्णुतेचा तात्त्विक आधार ठरतो.

९तंत्रज्ञान ३., कृत्रिम बुद्धिमत्ता)AI) आणि मानसिक आरोग्य

तंत्रज्ञानाच्या वेगवान विकासामुळे मानवी जीवन अधिक सुलभ झाले असले, तरी त्याचबरोबर मानसिक तणाव, एकाकीपणा आणि असहिष्णुता वाढली आहेल मीडिया आणि डिजिटल अल्गोरिदम्स व्यक्तीला केवळ सोश . त्याच्या आवडीचे विचार दाखवतात, ज्यामुळे Rigid Thinking म्हणजेच कठोर, एकांगी विचारसरणी निर्माण होते. अनेकांतवाद व्यक्तीला Flexible Thinking परिस्थितीकडे विविध कोनातून पाहण्याची मानसिक लवचिकता शिकवतो .AI च्या बाबतीतही तंत्रज्ञानाचा विकास यांचा समतोल (व्यय) आणि त्याचे धोके व मर्यादा (उत्पाद) साधण्याचीभूमिका अनेकांतवाद मांडतो. मानसिक आरोग्याच्या दृष्टीने अनेकांतवाद व्यक्तीला परिपूर्णतेच्या दबावातून मुक्त करून परिस्थितीला सापेक्षपणे स्वीकारण्याची क्षमता देतो. समकालीन समाजातील युद्ध, राजकारण आणि तंत्रज्ञानाशी निगडित समस्या या सर्वांवर अनेकांतवाद एक समन्वयवादी, मानवतावादी आणि अहिंसक मार्ग सुचवतो . त्यामुळे अनेकांतवाद हा केवळ तत्त्वज्ञानाचा सिद्धांत न राहता आधुनिक समाजासाठी एक प्रभावी समस्यानिवारण - मॉडेल ठरतो.

१०कृती आराखडा : क शांततेसाठी अनेकांतवादजागति .

आजच्या जागतिक परिस्थितीत युद्ध, दहशतवाद, वर्चस्ववाद, धार्मिक कट्टरता आणि वैचारिक असहिष्णुता ही शांततेसमोरील प्रमुख आव्हाने ठरली आहेत या सर्व समस्यांच्या मुळाशी एकांगी विचारसरणी आणि ."माझेच सत्य अंतिम" ही मानसिकता आहेजैन तत्त्वज्ञानातील अनेकांतवाद हा या मानसिकतेवर उपाय सुचवणारा . वैचारिक, नैतिक आणि संवादात्मक आराखडा देतोजागतिक शांततेसाठी अनेकांतवाद कसा प्रत्यक्षात उपयोगात आणता येईल ., हे पुढील मुद्द्यांद्वारे स्पष्ट करता येते.

१०कारआंतरराष्ट्रीय संवादात सापेक्षतेचा स्वी १.

आंतरराष्ट्रीय राजकारण आणि मुत्सद्देगिरीत प्रत्येक राष्ट्र आपला राष्ट्रीय हितसंबंध अंतिम मानतेयामुळे संघर्ष ., युद्ध आणि राजनैतिक अपयश निर्माण होतेअनेकांतवाद आंतरराष्ट्रीय संवादात . सापेक्षतेचा स्वीकार करण्याचा आग्रह धरतो. याचा अर्थ असा की कोणत्याही देशाचा दृष्टिकोन पूर्णतः चुकीचा किंवा पूर्णतः बरोबर नसतो; प्रत्येक राष्ट्राचा अनुभव, इतिहास, सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि समस्या वेगळ्या असतातजर आंतरराष्ट्रीय चर्चांमध्ये . स्याद्वादाची भूमिका—"एका अपेक्षेने हे बरोबर असू शकते"—स्वीकारली गेली, तर संवाद अधिक फलदायी होऊ शकतोयामुळे . संघर्षाऐवजी समन्वय, मध्यस्थी आणि शांततापूर्ण तोडगे शक्य होतात.

१०शिक् २.षणपद्धतीत अनेकांतवादाचा समावेश

जागतिक शांततेची पायाभरणी ही शिक्षणातूनच होतेसध्याची शिक्षणपद्धती प्रामुख्याने स्पर्धात्मक ., गुणकेंद्री आणि परिणामाभिमुख आहेळे मुलांमध्ये असहिष्णुतात्यामु ., तुलना आणि अपयशाची भीती वाढते. अनेकांतवाद शिक्षणाला विचारांची लवचिकता, संवाद कौशल्य आणि मतभेद स्वीकारण्याची क्षमता देतोशालेय व महाविद्यालयीन . अभ्यासक्रमात अनेकांतवादाला संघर्ष निवारणाचे शास्त्र, तणावमुक्तीचे तत्त्वज्ञान आणि लोकशाही मूल्यांचा पाया म्हणून समाविष्ट करता येईल. यामुळे भविष्यातील नागरिक अधिक सहिष्णु, समन्वयवादी आणि जागतिक नागरिकत्वाची जाणीव असलेले बनू शकतात.

१०जागतिक संस्थांमध्ये समतोल सहभाग ३.

संयुक्त राष्ट्रसंघ)United Nations), जागतिक आरोग्य संघटना)WHO), आंतरराष्ट्रीय नाणेनिधी)IMF) यांसारख्या जागतिक संस्थांमध्ये अनेकदा शक्तिशाली राष्ट्रांचे वर्चस्व दिसून येतेलहान किंवा विकसनशील राष्ट्रांचे प्रश्न . .आणि दृष्टिकोन दुर्लक्षित राहतात अनेकांतवाद जागतिक संस्थांमध्ये समतोल सहभाग आणि सर्वसमावेशक प्रतिनिधित्व यावर भर देतोत्येक राष्ट्राचा दृष्टिकोन हा जागतिक सत्याचा एक अंश आहेप्र ., हे मान्य केल्यास निर्णयप्रक्रिया अधिक न्याय्य, मानवतावादी आणि टिकाऊ ठरू शकते. अशा प्रकारे अनेकांतवाद जागतिक प्रशासनाला एकाधिकारशाहीकडून सहअस्तित्वाकडे नेण्याची दिशा देतो. जागतिक शांतता ही केवळ युद्धाचा अभाव नसून ती वैचारिक समन्वय, संवाद आणि परस्पर आदरावर आधारित असतेअनेकांतवाद हा अशा शांत .तेसाठी एक सुसंगत आणि व्यवहार्य कृती आराखडा प्रदान करतोत्यामुळे अनेकांतवाद हा आधुनिक जगासाठी . Global Peace Framework म्हणून विचारात घेता येतो.

११निष्कर्ष .

सद्य:स्थितीत जागतिक समाज अनेक पातळ्यांवर संघर्ष, असहिष्णुता आणि तणावाचा सामना करत आहे . धार्मिक कट्टरता, राजकीय ध्रुवीकरण, सांस्कृतिक वर्चस्ववाद, तंत्रज्ञानजन्य मानसिक ताण तसेच पर्यावरणीय व आर्थिक असमतोल यांसारख्या समस्या मानवतेसमोर गंभीर आव्हान म्हणून उभ्या आहेतया सर्व समस्यांच्या मुळाशी . एकांगी विचारसरणी आणि "माझेच सत्य अंतिम" ही मानसिकता आहे. या पार्श्वभूमीवर जैन प्राकृत साहित्यातील अनेकांतवाद हा केवळ धार्मिक किंवा तात्त्विक संकल्पना न राहता जागतिक शांततेसाठी एक प्रभावी वैचारिक व्यासपीठ ठरतो . सापेक्ष आणि बहुआयामी स्वरूपाचा स्वीकार करून संवादअनेकांतवाद सत्याच्या, सहिष्णुता आणि समन्वय यांना प्राधान्य देतोनयवाद ., स्यादवाद आणि सप्तभंगी नय या सिद्धांतांद्वारे तो व्यक्तीला एकांगी दृष्टिकोनातून मुक्त करून व्यापक विचारक्षमतेकडे नेतो.

प्राकृत साहित्यामधून मांडलेले अनेकांतवादी विचार आजच्या आधुनिक, जागतिकीकरणाच्या युगात अधिकच सुसंगत ठरतातयुद्ध ., राजकारण, लोकशाही, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, मानसिक आरोग्य आणि जागतिक प्रशासन यांसारख्या क्षेत्रांमध्ये अनेकांतवाद संवादाचे, संघर्ष निवारणाचे आणि सहअस्तित्वाचे प्रभावी मॉडेल प्रदान करतो. अनेकांतवाद हा भूतकाळातील तात्त्विक वारसा नसून वर्तमान आणि भविष्याला दिशा देणारा मानवतावादी आणि संवादप्रधान विचार आहेप्राकृत साहित्य हे केवळ ऐतिहासिक दस्तऐवज नसून आजही जागतिक समस्यांवर अहिंसक .,

समन्वयवादी आणि टिकाऊ उपाय सुचवण्याची क्षमता बाळगतेत्यामुळे जागतिक शांततेसाठी अनेकांतवादाचा . .स्वीकार ही काळाची गरज आहे

संदर्भ:

- षट्खंडागम. जैन धर्मातील सर्वात प्राचीन व महत्त्वाचा प्राकृत ग्रंथ.विविध जैन आगम प्रकाशने .
- आचारांग सूत्र .(प्रथम अंग) संपा.विविध जैन आगम प्रकाशने . "जे एगं जाणइ ते सव्वं जाणइ."
- कुंदकुंदाचार्य, आचार्य. समयसार. संपापन्नालाल जैन .डॉ ., भारतीय ज्ञानपीठ, 2001, नवी दिल्ली.
- कुंदकुंदाचार्य, आचार्य. पंचास्तिकायसार. संपाउपाध्ये .एन .ए ., भारतीय ज्ञानपीठ, 1975, नवी दिल्ली.
- सिद्धसेन दिवाकर. सन्मतितर्क. संपासुखलालजी संघवी ., पार्श्वनाथ विद्यापीठ, 1988, वाराणसी.
- मल्लिषेण, आचार्य. स्याद्वादमंजिरी. संपाध्रुव .बी .ए ., भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, 1933, पुणे.
- उपाध्ये, ए.एन . Prakrit Studies. शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, 2000, कोल्हापूर.
- संघवी, सुखलालजी. जैन धर्म आणि दर्शन (मराठी अनुवाद(, पुणे विद्यापीठ, 1977, पुणे.
- जैन, एच.एल . भारतीय संस्कृतीला जैन धर्माचे योगदान. सुयोग प्रकाशन, 1962, जबलपूर.

परिग्रहाचे दुष्परिणाम व वर्तमान समस्या

Ph.D.Research Scholar
Mrs Pallavi Manjeet Bagi,
Shivaji University, Kolhapur.
pallubagi@gmail.com
+91 98608 58778
Guide
Dr. R.T. Patil
Associate Prof. Miraj Mahavidyalay, Miraj.

प्रस्तावना -

भारतीय तत्त्वज्ञानाची एक स्वतंत्र प्रणाली म्हणून जैन धर्माकडे-तत्त्वज्ञानाकडे पाहिले जाते. अनेकांतवाद, स्वतंत्रता, अहिंसा, अपरिग्रह व निरीश्वरवाद ही जैन तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये आहेत. "अनेकांतवाद" हा जैन तत्वज्ञानाचा पाया आहे, तर "अहिंसा" जैन धर्माचा प्राण आहे, "अपरिग्रह" जीवन जगण्याची शैली आहे. भगवान महावीरांनी सांगितलेला धर्म, जर एका शब्दांमध्ये सांगायचे असेल तर,तो शब्द "अहिंसा" आहे आणि त्या धर्मापर्यंत पोहोचायचे असेल तर, त्याचा पहिला उपाय आहे "अपरिग्रह".

ज्ञानगंगा ही विशिष्ट दिशेने सातत्याने वाहत असते. परंतु तिचा उगम हा अगदी छोटा असू शकतो. भगवान महावीरांनी अर्धमागधी प्राकृत भाषेतून जैन तत्त्वज्ञान सांगितले, धर्म सांगितले, साधू आणि श्रावकांचे आचरण सांगितले. पण ते मौखिक स्वरूपात होते. हे मौखिक स्वरूपातील ज्ञान अनेक आचार्यांनी शब्दबद्ध केले आणि पुढे आचार्यांची परंपरा सुरू झाली.

सन् २०२४ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी **'प्राकृत'** भाषेला **'अभिजात'** भाषेचा दर्जा देऊन गौरवान्वीत केले. आजच्या वर्तमान काळात देखील प्राकृत भाषेचा विकास व्हावा, तसेच त्यातील प्राचीन ग्रंथ संपदा जपली जावी, तरुण पिढीला त्यामध्ये अधिक सूक्ष्मपणे अभ्यास करता यावा आणि हजारो वर्षांपूर्वीची प्राचीन संस्कृती आजही टिकली पाहिजे यासाठीचे प्रयत्नच यातून दिसून येतात. भगवान महावीरांचे उपदेश, त्यांची आचरण पद्धती आज यावरती आपल्याला अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. परंतु या ग्रंथांची प्राचीन परंपरा ही प्राकृत भाषेतूनच आपल्याला मिळालेली आहे. त्यामुळे सरकारकडून अशा पद्धतीचा सन्मान मिळणे म्हणजेच प्राकृत भाषा आणि त्याचा विकास आजही केला जाऊ शकतो हे समजते.

अपरिग्रह –

अपरिग्रह शब्द व्युत्पत्ती :-

१.अपरिग्गह (अपरिग्रह) - धन-धान्य आदि परिग्रहाने रहित. ममता- रहित, निर्मम.१

२.परिग्गह - पुं.(परि+ग्रह) ग्रहण करणे, स्वीकार करणे. धन आदिंचा संग्रह. ममत्व मूर्च्छा. ममत्वपूर्वक ज्याचा संग्रह केला जातो तो.२

आत्मपरिणामहिंसनहेतुत्वात्सर्वमेव हिंसैतत् ।
अन्तवचनादिकेवलमुदाहृतं शिष्यबोधाय।।३

असत्य,चोरी, कुशील व परिग्रह हे अन्य चार पाप केवळ उदाहरण किंवा हिंसेच्या विस्ताराकरिताच सांगितलेली आहेत. कारण त्या पाप भावामध्ये देखील आत्म परिणामांचा घात अवश्य होतो, म्हणून ही पाच पापे हिंसेचेच भेद आहेत. असत्य वाचनाच्या सर्व प्रकारांमध्ये एक प्रमाद योग हे मुख्य कारण दिसून येते, म्हणून तेथेही हिंसेचा सद्भाव दिसून येतो.

जो मनुष्य इतरांची संपत्ती चोरतो तो त्यांचे प्राण चोरतो. अर्थात् धन हे प्राणच आहेत. म्हणून एखाद्याचे धन चोरणे म्हणजे प्राणघात करण्यासारखेच आहे. तसेच प्रमाद परिणतीशिवाय चोरी करण्याचे भाव व क्रिया दिसून येत नाही म्हणून प्रमादामुळे तेथेही हिंसा दिसते.

कामपीडेच्या उत्कट भावनेशिवाय कुशील सेवन घडत नाही. कामसेवनामुळे तीव्र रागादी विकारी भावांची उत्पत्ती होते. त्यामुळे तेथे नियमाने हिंसा होतेच.

'हिंसापर्यायत्वात् सिद्धा हिंसान्तरङ्गसङ्गेषु।
बहिरङ्गेषु तु नियतं प्रयातु मूर्छैव हिंसात्वम्।४

-मूर्च्छा म्हणजे परिग्रह. ममत्व परिणाम म्हणजे मूर्च्छा. परिग्रहाचे दोन प्रकार आहेत. अंतरंग व बहिरंग. क्रोधादी १४ प्रकारचे अंतरंग परिग्रह हे हिंसारूपच आहेत. तर धनादी बाह्य परिग्रहाचा संचय ममत्व परिणामाशिवाय होत नाही. अशाप्रकारे दोन्ही परिग्रहामुळे हिंसा नियमाने होते.

इच्छा आणि मूर्च्छा यांना वश होऊनच पाप क्रिया केल्या जातात. ज्या ठिकाणी इच्छा-मूर्च्छा नाही त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे पाप थांबू शकत नाही.आपोआपच **"अपरिग्रह"** व्रताचे पालन होते.

हे तर सर्वज्ञात आहे की, भगवान महावीरांचे तत्त्वदर्शन अहिंसेवर आधारित आहे, भगवान महावीरांनी जेथे समस्त प्राण्यांच्या प्रती अहिंसक राहण्याचा विचार दिला, त्याच समाजासाठी वैचारिक अहिंसेच्या रूपामध्ये अनेकांत, तसेच आर्थिक न्यायासाठी अपरिग्रहाचा विचार दिला. मनुष्य जोपर्यंत गृहस्थ असतो, तोपर्यंत त्याचा परिवार व समाजाशी संबंध असतो. त्यासाठी त्याला काही ना काही संग्रह करावाच लागतो. संग्रह केल्याशिवाय, परिग्रह ठेवल्याशिवाय तो आपले जीवन व्यवस्थितपणे जगू शकत नाही.

गृहस्थाकडे जितका परिग्रह आहे ,तो परिग्रहच आहे आणि अतिरिक्त परिग्रहाचा त्याने जो त्याग केला आहे, तो अपरिग्रह आहे. अशाप्रकारे गृहस्थासाठी परिग्रह आणि अपरिग्रहासाठीच्या सीमा आहेत. गृहस्थ जोपर्यंत संसारामध्ये व्यवहारांमध्ये आहे आणि गृहस्थी चालवत आहे, तोपर्यंत तो परिग्रहापासून सर्वथा मुक्त होऊ शकत नाही. म्हणूनच गृहस्थांसाठी आपल्या आवश्यकतेनुसार अर्थार्जन करावे आणि आपला चरितार्थ चालवावा. त्याने आपले भरण पोषण आणि परिवाराबरोबरच समाजाचे देखील भरण पोषण करावे. त्याच्यामध्ये दुसऱ्यांना देण्याचे भाव असावेत गृहस्थ जो काही संग्रह करतो, तो केवळ त्याच्या कामीच येतो असे नाही तर दुसऱ्यांना देखील त्याचा उपयोग होतो.

परिग्रहाचे दुष्परिणाम –

परिग्रहाचे दुष्परिणाम कोणते आहेत, हे सर्वांना माहीत असणे आवश्यक आहे. आजच्या समाजामध्ये जो काही परिग्रह पाहावयास मिळतो, त्यामुळे तीन गोष्टी प्रामुख्याने समोर येतात विषमता, विलासिता (चैनीच्या वस्तू-ऐश आराम, Luxury Life) आणि क्रुरता. जेव्हा वस्तूंचा संग्रह एका स्थानावर केला जातो, तेव्हा दुसरीकडे त्या वस्तूंच्या अभावामध्ये लोक दुःखी होतात. श्रीमंत-गरीब, उच्च-नीच आदि समस्या केवळ परिग्रह वृत्तीमुळे वाढीस लागतात.

१.परिग्रहाचा मेरुदंड – मोह

परिग्रहाचा अर्थ आहे ग्रहण करणे, जे ग्रहण केले जाते, त्यालाच परिग्रह म्हटले जाते. म्हणजेच ग्रहण करण्याची इच्छा म्हणजेच इच्छा परिग्रह. अनादि काळापासून जीव अज्ञान-राग- द्वेष-मोह आदि भावांमुळे कर्मांनी बद्ध आहे.

क्रोध-मान-माया-लोभ-हास्य-रत्यरति-शोक-भय-जुगुप्सा-स्त्रीपुंनपुंसकवेद-मिथ्यात्वानां समूहो मोहः ५

= क्रोध, मान, माया, लोभ, हास्य, रति, अरति, शोक, भय, जुगुप्सा, स्त्रीवेद, पुरुषवेद, नपुंसकवेद आणि मिथ्यात्व यांच्या समूहाचे नाव मोह आहे.

'मोह' या शब्दाचा अर्थच आसक्ती आहे. मोहालाच सर्व कषायांचे मूळ कारण मानले गेले आहे. याला नष्ट करणे सर्वात मोठे कठीण कर्म आहे. मोह या शब्दाचा सामान्यतः असा अर्थ घेतला जातो की, एखाद्या सजीव अथवा निर्जीव

वस्तू प्रती तीव्र लगाव असणे आणि हा लगावच म्हणजे ही इच्छा ती अतिशय तीव्र होत जाते. या आसक्तीमुळेच लोभ निर्माण होतो आणि या लोभाचाच अर्थ, मोहाच्या विषयांमध्ये अधिका अधिक भोगण्याची इच्छा निर्माण होते. जसे की, पैशांचा मोह आहे आणि पैशाची सतत वृद्धीच होत राहो हा लोभ आहे. मोहाची उत्पत्ती ही एखाद्या विषयांमध्ये आसक्ती निर्माण झाल्यावरच होते.

मोह याचा अर्थ आहे, वस्तू अथवा व्यक्ती यांना न सोडणे. मोहामध्ये व्यक्ती वस्तूंवर आपला हक्क सांगू लागतो. हा मोह सर्वांच्यासाठी होतोच असे नाही आणि वेळेनुसार बदलत देखील राहतो.

प्रत्येक मनुष्याला जीवन जगण्यासाठी मूलभूत गोष्टींची गरज असते. परंतु या मूलभूत गोष्टींची पूर्तता करण्याच्या मागे असतानाच, केव्हा त्याच्यामध्ये धनसंपत्ती मिळवण्याची इच्छा-लालसा निर्माण होते हे त्याला देखील कळत नाही. धनसंपत्तीची इच्छा म्हणजेच मोह होय आणि हा मोह म्हणजेच परिग्रह वाढवण्याचे कारण आहे. म्हणूनच असे म्हटले जाते, की संसारिक संघर्षाचे मूळ कारण धनच आहे. धनच सर्व अनर्थ गोष्टी घडविते धनामुळेच अनेक वाईट गोष्टी घडतात जसे, पारिवारिक संघर्ष, आर्थिक विषमता ,भ्रष्टाचार, चोरी ,हिंसा, व्यभीचार. म्हणूनच धनसंपत्ती, इच्छा, मोह हे वरदान नसून मनुष्याला मिळालेला मोठा शाप आहे. कारण धन अर्जन करण्यामध्ये दुःखाबरोबरच पाप देखील आहे, कष्ट आहे आणि या धनाचा जर व्यय झाला, तर पुन्हा दुःख होते. म्हणजेच धनामुळे सुख मिळेल ही आशा करणारा मनुष्य निरंतर पिडाच सहन करत राहतो.

२.परिग्रहाचे प्रदर्शन

काही ठिकाणी परिग्रहाचे प्रदर्शन अधिक प्रमाणात होते. जे पाप आहे ते माहित असून देखील वस्त्राभूषण, धन-धान्य आदींचा संग्रह पहावयास मिळतो. कारण समाजामध्ये परिग्रहाच्या या साधनांमुळेच एखाद्या व्यक्तीचे मूल्यांकन होते. ती व्यक्ती कितीही व्रती, सेवाभावी, गुणी एवं विद्वान असली, तरी काही ठिकाणी त्या व्यक्तीला साधी वेशभूषा किंवा इतर गोष्टींमुळे आदर प्राप्त होत नाही. उच्चस्तरीय आकर्षक पेहरावामुळे व्यक्तीला मोठा मान सन्मान प्राप्त होतो. हा दृष्टीभेद संग्रहवृत्ती आणि लोभ वृद्धीचे प्रमुख कारण आहे.

अपरिग्रह भावाची वृद्धी करण्यासाठी सामाजिक व्यवस्था आणि बाह्य वातावरण साधे एवं प्रदर्शन रहित असायला हवे. प्रदर्शन करणाऱ्याच्या मनामध्ये इर्षा, मोह आणि अहंकार उत्पन्न होतो आणि त्यामुळे त्यांनी केलेले प्रदर्शन इतरांच्यासाठी इर्षा, लोभ याचे कारण बनते. म्हणून प्रदर्शनालादेखील पाप वृद्धीचे एक कारण समजून प्रत्येक व्यक्तीने त्याचा त्याग करावा. म्हणजेच परिग्रह कमी होण्यास मदत होईल.

३.परिग्रह एक पाप

सुहपरिणामो पुण्णं असुहो पावं त्ति भण्यिमण्णेसु ।६

= पराच्या प्रति शुभ परिणाम पुण्य आहे,आणि अशुभ परिणाम पाप आहे.

असुहोदयेण आदा कुणरो तिरियो भवीय णेरइयो। दुक्खसहस्सेहिं सदा अभिंधुदो भमदि अच्चंता।७

= अशुभ उदयाने कुमानुष, तिर्यंच आणि नारकी होऊन हजारों दुःखांनी सदैव पीड़ित होऊन (संसारामध्ये) अत्यंत भ्रमण करत राहतो.

भगवान महावीरांनी ज्या महापापापासून बचाव करण्यासाठी व्रतांचे विधान केले आहे, त्यातील पाचवे व्रत म्हणजेच परिग्रहापासून विरत होणे, असे सांगितले आहे. परिग्रह एक प्रकारचे पाप आहे. कारण, हे पाप मानवाच्या पतनाचे कारण बनते. परिग्रहाने समस्त संसाराला जखडून ठेवले आहे. आत्मिक शांती आणि विश्वशांतीसाठी परिग्रह अत्यंत बाधक आणि घातक आहे. म्हणूनच जैन धर्मामध्ये आध्यात्मिक आणि सामाजिक दृष्टिकोनाने परिग्रहाला पाप सांगून अपरिग्रहाला व्रतामध्ये स्थान देण्यात आलेले आहे.

भगवान महावीरांनी अहिंसा आणि अपरिग्रहाचा संदेश दिला होता, पण आजकाल माणूस हिंसेचा अवलंब करत आहे. अधिक परिग्रह करु लागला आहे. माणूस हिंसाचाराचा अवलंब करतो. कारण तो परिग्रहामध्ये जगत आहे. जिथे

आसक्ती किंवा परिग्रह असते तिथे पाचही पापे होतात. माणूस चोरी करतो, खोटे बोलतो, हत्या करतो, व्यसने करतो. सर्व पापांचे मूळ आसक्ती-परिग्रहच आहे. जोपर्यंत जगाला भगवान महावीरांची अनासक्ती कळत नाही तोपर्यंत कोणतीही समस्या सुटणार नाही.

४.शब्द परिग्रह (वाणीवर असंयम)

जिब्भोवत्थणिमित्तं जीवो दुक्खं अणादिसंसारे।
पत्तो अणंतसो तो जिब्भोवत्थे जय इदाणिं ।८

या अनादी संसारामध्ये जीवाने जिव्हा आणि उपस्थित इंद्रियांच्या कारणाने अनंत वेळा दुःख भोगले आहे. म्हणूनच या दोघांनाही जिंकून आपल्या वश मध्ये करा.

भाषासमितिक्रमानभिज्ञो मौनं गृह्णीयात् इत्यर्थः।९

= भाषा समितिचा क्रम जो जाणत नाही त्याने मौन धारण करावे, असा अभिप्राय आहे.

भगवान महावीरांनी जन-जन च्या हितासाठी अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रहाची पंचसूत्री दिली आहे.

मधुर भाषण-

शास्त्रामध्ये आचार्यांनी दानापेक्षा देखील सुंदर गुण, वाणीची मधुरता आणि स्नेह याचे महत्त्व सांगितले आहे. हृदयातून निघालेली मधुर वाणी आणि ममतामयी स्निग्ध दृष्टी या ठिकाणीच धर्माचे निवासस्थान आहे. जो मनुष्य सदा अशी वाणी बोलतो आणि सर्वांच्या हृदयामध्ये स्थान मिळवतो त्याच्याजवळ कधीच दुःखाची अभिवृद्धी करणारी दरिद्रता येत नाही. नम्रता आणि प्रिय संभाषण हेच मनुष्याचे आभूषण आहेत अन्य कोणतेही नाहीत. जेव्हा मनुष्याचे विचार शुद्ध तसेच पवित्र असतात आणि वाणीमध्ये सहृदयता असते तेव्हाच पाप वृत्तीचा क्षय होतो आणि धर्मशीलतेची अभिवृद्धी होते. सेवाभावी व्यक्ती आणि विनम्र वचन बोलणारा मनुष्य सर्वांचा मित्र बनतो. म्हणूनच मनुष्याने क्रूर शब्दाला सोडून नम्रतापूर्वक व्यवहार करावा. म्हणूनच एलाचार्य असे म्हणतात की, गोड शब्द असून देखील मनुष्य कडू शब्दांचा प्रयोग करतो म्हणजेच तो पिकलेले फळ सोडून कच्चे फळ खातो.१०

मौनव्रताची संकल्पना, त्याचे प्रकार आणि कोणत्या वेळी मौन धारण करावे याचे विशेष उल्लेखानीय वर्णन जैन आगम साहित्यामध्ये आपणास पहावयास मिळते. मौन व्रताचे कारण आणि प्रयोजन याविषयीचे वर्णन कुंदकुंद आचार्यांच्या मोक्षपाहुडामध्ये पहावयास मिळते.११

वाणीवर असंयम - शब्दांचा परिग्रह

क्रोध - वाणीवर असंयमाचे मूळ कारण क्रोध आहे. क्रोध ही एक अशी अग्नी आहे. की, ज्या वेळी मनुष्य विवेकहीन आचरण करतो. आपण काय बोलत आहोत, काय वागत आहोत यांचे त्याला भान राहत नाही. वाणीवर संयम ठेवण्यासाठी प्रथम आपल्या क्रोधावर संयम ठेवणे आवश्यक आहे. वाणीवर संयम म्हणजेच दुस-याला दुखवेल किंवा वाईट वाटेल अशा शब्दांचा प्रयोग न करणे, म्हणजेच जितका शब्दांचा परिग्रह कमी तितका आपोआपच मनुष्याच्या वाणीवर संयम राहतो.

हास्य विनोद

१.हास्य - सर्वजन मिळून हसा पण कोणावरही हसु नका. भांडणाला निमित्त होते. विनोद किंवाचेष्टा एका सीमेबाहेर नसावी.

२.सवय - सवयीनुसार मनुष्य अपशब्द बोलणे किवा वाणीवर नियंत्रण नसल्यामुळे आचरणामध्ये - व्यवहारामध्ये अनेक संबंध बिघडतात बोलण्याच्या आपल्या सवयी चांगल्या असाव्यात. मनुष्य जागृत असेल तर तो चांगली वाणी बोलेल. सजगतापुर्वक आपले बोलणे असावे. बोलण्यापुर्वी त्याचे परिमाण काय होतील याचा विचार करावा. जर काही चुकीचे

बोलणे झाले तर स्वत:च विचार करुन प्रायश्चित घ्यावे आर्तध्यान झाले तर एक कायोत्सर्ग करा. (९ वेळा णमोकार मंत्र जाप्य.....)

५.विचारांचा परिग्रह-

जैन तत्त्वज्ञान हे कर्माच्या तत्त्वावर आधारित तत्त्वज्ञान आहे. चांगले किंवा वाईट कर्म असो, जीवाला त्याचे परिणाम भोगावे लागतात. माणसाच्या मनात आधी ज्या काही भावना निर्माण होतात, नंतर विचार करून, समजून घेऊन ती व्यक्ती कृतीत आणते. आपले संस्कार, संगत, विचार चांगले असतील, तर आपण वाईट गोष्टी टाळू शकतो. जैन तत्वज्ञान "भावना भव नाशिनी" म्हणते, जसे तुमचे विचार आहेत, तसेच तुम्हाला प्राप्त होतील. भगवान महावीरांनी दाखवलेल्या मार्गावर चालाल तर नक्कीच चुकीचे विचार अंगीकारणार नाही आणि आपोआपच अपरिग्रह व्रताचे पालन होईल.

६.स्वेच्छा पूर्ण नियंत्रणाचा अभाव –

मनुष्याच्या इच्छा या आकाशासमान अनंत असतात जर त्यावर नियंत्रण ठेवले नाही तर त्या उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जातात. पण हे नियंत्रण मनुष्याने स्वेच्छेने ठेवले आहे किंवा कायद्याद्वारे ठेवले गेले आहे या दोन्ही गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत जर कायद्याद्वारे नियंत्रण ठेवण्यात आले असेल तर मनुष्य आपले स्वातंत्र्य हरवले आहे असा अनुभव करतो आणि त्या नियंत्रणाचा उल्लंघन करण्याचा देखील प्रयत्न करतो आणि उल्लंघन केल्यानंतर त्यातून बचावासाठी पुन्हा कायदेशीर पळवाटा देखील काढतो परंतु एखादा मनुष्य स्वेच्छेने नियंत्रणाचे पालन करतो म्हणजेच एखादे व्रत किंवा नियम घेतो तेव्हा तो त्याचे सहसा उल्लंघन करत नाही तात्पर्य हेच आहे की जोपर्यंत एखादी व्यक्ती आपल्या असीम इच्छा-आकांक्षा यावरती स्वतःहून नियंत्रण ठेवत नाही तोपर्यंत तो स्वतः एक सुखी जीवन जगू शकत नाही स्वेच्छा पूर्ण नियंत्रित जीवनामुळे म्हणजेच परिग्रह परिमाण व्रताच्या पालनाने तो स्वतःला भाग्यशाली समजतो कारण त्याच्या या छोट्याशा प्रयत्नामुळे तो समाजाप्रती आपले कर्तव्य पूर्ण करत आहे आणि त्याचबरोबर पुण्यवृद्धी करून इहलोक व परलोक देखील सुधारण्यासाठी तत्पर राहतो.

७.इच्छा आणि आवश्यकता –

इच्छा ही आगाससमा अणंतिया |१२

- अर्थात ज्या प्रकारे आकाशाचा अंत नाही त्याच प्रकारे इच्छेचा देखील अंत होत नाही.

वर्तमान युगामध्ये मनुष्य आपल्या गरजा किंवा आवश्यकता पूर्ण करून न थांबता आपल्या इच्छांनाच आपली गरज समजत आहे. त्यामुळे तो परिग्रह वृद्धीच्या मागे लागला आहे. त्यामुळे तो स्वत:बरोबरच इतरांचे जीवन देखील नष्ट करत आहे.

प्रत्येक मनुष्याने हे समजून घेणे आवश्यक आहे, की आवश्यकता ही वस्तू स्वरूपात असते आणि इच्छा आसक्ती रूपात असतात. आज संसारामध्ये किंवा समाजामध्ये संघर्ष पहावयास मिळतो, याचे कारण म्हणजे आवश्यकता व इच्छा यातील अंतर न समजल्यामुळे आहे.

८.संग्रह वृत्ती-

आजच्या भोग प्रधान संस्कृतीमध्ये जेथे मनुष्य संग्रह करतो, उत्पन्नाची साधने विस्तृत करतो, पण त्यावेळी तो आपल्या खर्चावर प्रतिबंध लावत नाही. परिणाम हा होत जातो की, गरज नसताना देखील वस्तूंची खरेदी केली जाते. आवश्यकतेपेक्षा जास्त कोणत्याही वस्तूचा संग्रह करणे हा समाजाप्रती केला केलेला अन्यायच आहे आणि एकीकडे आपल्या आत्म्याचे पतन देखील आहे. अर्थात सर्व प्रकारचे भेदभाव सोडून संग्रह वृत्ती त्याहून प्रत्येक व्यक्ती कुटुंब समाज आणि देश परिग्रह वृत्तीचा अवलंब करून एक शांतीमय वातावरणामध्ये जीवन व्यतीत करू शकतो.

९.असंयम-

परिग्रह परिमाण व्रत आणि संयम दोन्ही गोष्टी मनुष्याच्या जीवनामध्ये आवश्यक आहेत. संयमामुळेच परिग्रह परिमाण व्रताचे पालन गृहस्थ अगदी उत्तम रित्या पार पाडू शकतो. पदार्थ सीमित आहे त्यामुळे उपभोग कमी करा,

पाण्याचा व्यय करू नका. जैन धर्मामध्ये शाकाहाराचे महत्त्व सांगितलेले आहे. भोजनातील असंयम आणि मांसाहार, पर्यावरण प्रदूषण समस्येचे जनक आहेत. पर्यावरणाला संतुलित ठेवायचे असेल, तर संयम तर आवश्यक आहेच, परंतु त्याचबरोबर मनुष्याला आपण कुठे थांबावे, आपल्या गरजा कशा कमी कराव्यात आणि मुख्यतः आहे त्यात सुखी समाधानी जीवन कसे जगावे हे जर कळले, तर संयम रूपी अपरिग्रह व्रत बहरण्यास कोणीही रोखू शकणार नाही.

१०.विलासिता :-

परिग्रहाचा दुसरा दुष्परिणाम आहे तो म्हणजे विलासिता. आज काही सर्वत्र आपल्याला चैनीच्या वस्तूंचा आणि ऐश आरामांच्या वस्तूंचा संग्रह पाहावयास मिळतो. अगदी गरज नसताना किंवा त्या वस्तूचा आपण वापर कशासाठी करणार हे देखील माहिती नसताना केवळ हौस म्हणून किंवा देखाव्यासाठी वस्तू खरेदी केल्या जातात. म्हणूनच शास्त्रात म्हटले आहे, की धनसंपत्ती जर गैर-चुकीच्या मार्गाने कमवलेली असेल तर, ती व्यसनाच्या पूर्तीसाठीच खर्च केली जाते. म्हणूनच परिग्रहामुळे एखादी व्यक्ती जर व्यसनाधीन झाली असेल, चैनीच्या वस्तूंमध्ये आणि ऐश आरामाचे जीवनच खरे सुखी जीवन मानत असेल, तर तो मोठ्या भ्रमात आहे. म्हणूनच परिवार असो किंवा समाज परिसराच्या या दुष्परिणामापासून बचाव करण्यासाठी भगवान महावीरांनी परिग्रह परिमाण व्रताचा उपदेश दिला आहे. जेणेकरून व्यक्ती गरजेपेक्षा जास्त वस्तूंचा संग्रह करणार नाही, व्यसनाधीन होणार नाही, ऐश आरामाचे जीवन जगण्यासाठी अधिक परिग्रहाच्या मागे लागून पाप करणार नाही. जेव्हा परिवारातील एक सदस्य साधी राहणीमानी आणि उच्च विचारसरणी अंगीकार करेल, तेव्हाच तो येणाऱ्या नवीन पिढीला एक चांगली प्रेरणा देऊ शकेल. जैन समाजाकडे आजही एक आर्थिकतेने संपन्न असा समाज म्हणून पाहिले जाते.

११.क्रुरता :-

परिग्रहाचा हा देखील एक दुष्परिणाम आहे. आपल्या असीमित- अमर्याद इच्छांच्या पूर्तीसाठी व्यक्ती धर्म आणि कर्तव्यांपासून विरक्त होऊन धनसंपत्ती अर्जित करतो. जो व्यक्ती अधर्माने धनार्जन करतो त्याला हिंसा व मनुष्याचे शोषण करण्यासाठी लज्जा देखील वाटत नाही. सौंदर्य प्रसाधने, खानपान ,राहणीमान ,दररोज वापरल्या जाणाऱ्या वस्तू या सर्वांपासून पैशाचा व्यय होणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी. आपल्या राहणीमानासाठी एखाद्या निष्पाप जीवाची हत्या करणे ही क्रुरता आहे. धन कमावण्यासाठी जितकी क्रुरता असते, तितकीच क्रूरता ती खर्च करण्यामध्ये असते म्हणूनच संत सांगतात की,जैन समाजाने अशा व्यवसायाने धन कमवावे की जेणेकरून आपल्या धर्माचे आणि मान्यतांचे हनन होणार नाही.

वर्तमान समस्या-

१.अनावश्यक खर्च :-

परिग्रहाचा सर्वात मोठा दुष्परिणाम आहे तो म्हणजे अनावश्यक खर्च. अपरिग्रह वृत्तीला सुदृढ बनवण्यासाठी विवेकी सद्गृहस्थाला परिग्रह परिमाणव्रत ग्रहण केल्यानंतरही अनावश्यक खर्च पासून सावध राहणे आवश्यक असते. एखाद्याकडे पैसा अधिक असला तरीही त्याचे प्रदर्शन करू नये. दिवसाच्या कार्यामध्ये व्यर्थ दिखावा करू नये, असा अनावश्यक खर्च करून कोणाचेही भले होत नसते. त्याऐवजी जनकल्याणासाठी धनाचा सदुपयोग केला पाहिजे. मुनी संघाची सेवा ,पीडितांची सेवा, मूक पशु पक्ष्यांची सेवा, अनाथ निराधारांना मदत करणे गरजेचे असते. जैन धर्मामध्ये मैत्री, प्रेम ,करुणा ,दया गोष्टींना प्राथमिक स्थान दिलेले आहे. प्रदर्शन-दिखावा, मोठेपणा यामध्ये केवळ अहंकार वाढतो म्हणूनच आपल्या धनावरील मोह-ममत्व त्यागून त्याचा सार्वजनिक सेवा कार्यासाठी वापर केला गेला पाहिजे. त्या बदल्यामध्ये कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी किंवा नाव लौकिक याची कामना करू नये असे शास्त्रात सांगितलेले आहे. कोणतेही कार्य हे निरपेक्ष भावनेने करावे. प्रतिष्ठा ही अनावश्यक खर्च केल्याने वाढत नाही, तर प्रतिष्ठा वाढते ती परोपकार व स्व-परकल्याण केल्याने.

आजच्या काळात फॅशन, खान-पान, राहणीमान, कपडे देश-विदेशाचे पर्यटन, लग्न समारंभ, स्नेह मेळावे, मोठमोठ्या पार्ट्या यामध्ये पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो. यावरती आळा घालण्यासाठी परिग्रह परिमाण व्रताचे महत्त्व प्रत्येकाने समजून घ्यावे असे वाटते.

२.स्त्रियांच्या समस्या :-

प्रत्येक व्यक्ती समाजाचा एक भाग असते. परंतु सर्वांना समान दर्जा दिला जात नाही. श्रेष्ठ- कनिष्ठ, गरीब -श्रीमंत ,जातीभेद वर्ण व अजून काही गोष्टी असतील त्यावरून हा भेदभाव पहावयास मिळतो. स्त्री- पुरुष हा भेद नैसर्गिक आहे. सह जीवनासाठी दोघांचेही महत्त्व हे सारखेच असते. वर्तमान काळामध्ये सर्वच कार्यांमध्ये स्त्रिया या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसतात. शैक्षणिक, वैज्ञानिक, धार्मिक, राजकीय, मनोरंजन अशा बऱ्याच क्षेत्रांमध्ये स्त्रिया अग्रस्थानी पाहायला मिळतात. कोणत्याही ठिकाणी जेव्हा अन्याय अत्याचारामध्ये वाढ होते तेव्हा त्याचे मूळ कारण असते अनावश्यक इच्छा, अपेक्षा आणि आकांक्षा. आणि जर एखादी इच्छा पूर्ण झाली नाही तर ती पूर्ण करण्यासाठी गैरमरगाचा वापर करणे आणि बेकायदेशीर कृत्य करणे या गोष्टींना सुरुवात होते.

वैज्ञानिक युगात जगणारे जग, तंत्रज्ञान -विज्ञान यांचा प्रचार प्रसार करणारे जग, अगदी चंद्रावर मंगळावर पोहोचणारे जग, उच्चभ्रू समाज जीवन, उच्चशिक्षित, सुसंस्कारी, सुसंस्कृत समाजरूपी जीवन जगणाऱ्या समाजामध्ये आजही स्त्रियांना अन्याय अत्याचाराला सामोरे जावे लागते आणि ही लज्जास्पद गोष्ट आहे.

३.विविध जनसंपर्क साधने :-

वर्तमान काळामध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून WhatsApp, Instagram, Facebook, Internet, याद्वारे जग खूप जवळ आले आहे. जनसंपर्क वाढला आहे, पण काय योग्य किंवा अयोग्य हे बालकांना सांगण्याची जबाबदारी पालकांची व शिक्षकांची असते. गुन्हेगारीशी निगडित हिंदी किंवा इंग्रजी चित्रपट, गाणी, ऑनलाईन गेम खेळणे, मन विचलित करणारी पुस्तके वाचणे या सर्वांमुळे मुलांच्या वागण्यावर अभ्यासावर विपरीत परिणाम होतो. या साधनांपासून अबाल वृद्ध सर्वांनीच एक मर्यादा घालून अलिप्त राहायला पाहिजे. बाह्य परिग्रहांमध्ये या सर्वांचा देखील समावेश होतो.

४.व्यसनाधीनता :- सप्तव्यसन

जूयं मज्जं मंसं वेसा पारद्धि-चोर-परयारं ।
दुग्गइगमणस्सेदाणि हेउभूदाणि पावाणि ।१३

-जुगार,दारू, मांस, वेश्या, शिकार, चोरी आणि परस्त्री सेवन हे सात व्यसन दुर्गती गमनासाठी कारणभूत पाप आहेत. जैन शास्त्रामध्ये सप्तव्यसन हे दुर्गतीसाठी कारणभूत आहेत आणि तेच महान पाप आहेत असे सांगितले आहे. त्यामुळे प्रत्येक मनुष्याने या सप्त व्यसनांचा त्याग करावा आणि आपल्या आचार धर्माचे पालन करावे असे सांगण्यात आले आहे.

केवळ आर्थिक परिस्थितीमुळेच नाही, तर व्यसनांमुळे आपण काय वागत आहोत याचे पण व्यक्तीला नसल्यामुळे देखील गुन्हा घडतो मद्यपानामुळे वाहतुकीचे गुन्हे घडतात सार्वजनिकरित्या अमली पदार्थांच्या विक्रीला बंदी असल्यामुळे त्यांच्या प्राप्तीसाठी चोरीसारखे गुन्हे घडतात व्यसनांच्या पूर्तीसाठी व्यक्ती चोरी, दरोडा, बलात्कार, खून यासारखे गुन्हे करायला देखील तयार होतो. व्यसनामध्ये मनुष्याचे मन-वचन-काय यावर नियंत्रण राहत नाही. जैन आगम ग्रंथामध्ये सप्त व्यसनांचा त्याग सांगितले आहे. यासाठी स्व नियंत्रणच गरजेचे आहे.

५.निर्धनता (Poverty)

वर्तमान काळामध्ये आज आपणाला सर्वत्र प्रगती दिसते पण त्याचबरोबर गरीबी निर्धनता देखील मोठ्या प्रमाणात आहे. निर्धनतेच्या बाबतीत असे देखील मत आहे की गरिबी ही देवकृत आणि पूर्वकर्मांच्या पापाचे फळ आहे. निर्धनतेचे अजून एक कारण आहे व्यक्तीची कार्य करण्याची क्षमता यामुळे असफलता किंवा प्रेरणेची कमी.

६. भ्रष्टाचार :-

भ्रष्टाचार जटील सामाजिक समस्या आहे, जी सर्व समाजाला प्रभावित करते. पैसा हेच सर्वस्व या प्रवृत्तीमुळे देशात भ्रष्टाचार वाढताना आढळतो. त्यामुळे भ्रष्टाचार एक सामाजिक प्रश्न बनल्याचे आढळते. भ्रष्टाचार ही आजची समस्या नसून ऐतिहासिक काळापासून अस्तित्वात आहे. परंतु अलीकडील काळात भ्रष्टाचाराचे विक्राल स्वरूप गंभीर बनले आहे. भ्रष्टाचार हा शासकीय क्षेत्रापासून ते धार्मिक क्षेत्रांपर्यंत आढळतो. योग्य वर्तनाशिवाय मनात येईल तसे नियमबाह्य वर्तन म्हणजे भ्रष्टाचार होय.

व्याख्या :-

इलियट व मेरील (Eilliott and Merrill) यांच्यानुसार, " प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष फायदा मिळवण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक निहीत कर्तव्याचे पालन न करणे म्हणजे 'भ्रष्टाचार' होय."१४

व्यक्तिगत स्तरावर कुटुंबातील सदस्यांकरिता आर्थिक फायदा मिळवून देण्याच्या दृष्टीने जाणिवेतून प्रत्यक्ष कर्तव्याचे पालन न करणारे वर्तन म्हणजे भ्रष्टाचार होय. यावरून हे लक्षात येते की, भ्रष्टाचार हा प्रामाणिकपणाच्या अभावामध्ये उत्पन्न होतो. तो मग बौद्धिक, नैतिक अथवा आर्थिक असतो.

७.मोबाईलचा परिग्रह-

व्यक्तीं धनी असेल किंवा निर्धन असेल या सर्वांच्या हातामध्ये लेटेस्ट मोबाईल बघायला मिळतो. आजकाल माणसांच्या दिवसाची सुरुवात ही मोबाईलने होते आणि रात्र देखील मोबाईल बघत बघतच संपते. मोबाईलचा परिग्रह हा मनुष्याला खूपच सुखद वाटू लागला आहे. वृद्ध असतील किंवा तरुण नाहीतर छोटी मुले ही सतत २४ तास मोबाईल मध्येच असतात.

मोबाईल हा एक असा गॅजेट आहे,जो मनुष्याला पराधीन बनवत आहे. मोबाईलचा अति परिग्रह हा केवळ नुकसानदायकच आहे. या मोबाईल मुळे संपूर्ण विश्व मनुष्याच्या हातामध्ये सामावलेले आहे, परंतु आपल्या घरामध्ये ज्या व्यक्ती बसल्या आहेत त्यांच्याकडे बघणे, बोलणे यासारख्या साधारण गोष्टी देखील संभव होताना दिसत नाहीत. कोणत्याही टेक्नॉलॉजीचा वापर जरूर करा, परंतु कोणत्याही गोष्टीचा अति वापर किंवा उपयोग हा नेहमीच नवीन चिंतांना जन्म देत असते.

८.कामवासने वरती अनियंत्रण-

२५०० वर्षापूर्वी भगवान महावीरांनी स्त्रियांची शक्ती आणि त्यांचे स्वतंत्र अस्तित्व यांचे महत्त्व सांगितले होते. परंतु वर्तमान स्थितीमध्ये कामवासनेच्या शिकार होणाऱ्या अनेक महिला आहेत. कामवासनेमध्ये अंध व्यक्ती काहीही करू शकतो. प्रत्येक वर्षी प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या स्थानांवरती छोट्या मुली, महिला यांच्यावरती अत्याचार होणाऱ्या अनेक घटना समोर येतात. छोट्या मुलींवर होणारे अत्याचार हे शाळा, कॉलेज या ठिकाणी झालेले पहावयास मिळतात. जेथे आपण मुलांना विद्येचे धडे घेण्यासाठी पाठवतो, तेथे जर आपली मुले सुरक्षित नसतील, तर ही गोष्ट फार गंभीर आहे. म्हणून मनात एक प्रश्न येतो की या आधुनिक युगामध्ये वैज्ञानिक युगामध्ये महिला, मुली तसेच वृद्ध महिला तरी सुरक्षित आहेत का?

९.परिग्रह आणि पर्यावरण-

वनस्पती, प्राणी आणि मानव जातीसहित सर्व सजीव आणि त्यांच्याबरोबरच भौतिक परिसर याला पर्यावरण म्हटले जाते. पर्यावरण शब्दाचे सूक्ष्म अवलोकन केल्यानंतर हा भाव उत्पन्न होतो की, सर्व बाजूंनी जे आवरण आहे तेच पर्यावरण होय. सूक्ष्मतेने पाहिले गेले तर भौतिक पर्यावरण एवं आध्यात्मिक पर्यावरण या दोन दृष्टी समोर येतात. जीवाच्या आवश्यकता या भूमी जलवायू वनस्पती आदींनी पूर्ण होतात परंतु आध्यात्मिक पर्यावरणाने आत्मा संतुष्ट होतो. आत्म संतोषी मुळे न केवळ आध्यात्मिक अपितु भौतिक पर्यावरण देखील शुद्ध होते. जीवसृष्टी एवम वातावरणाचा परस्पर संबंध हाच पर्यावरण आहे. मनुष्य एक असा प्राणी आहे ज्याने वैज्ञानिक प्रगतीच्या नावावरती अथवा आपल्या असीमित आवश्यकतांच्या-इच्छांच्या पूर्तीसाठी अगदी सहजपणे प्राकृतिक व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करून

सहज संतुलन बिघडवण्याचा धोका उत्पन्न केला आहे. अहिंसा एवं अपरिग्रहाचा सिद्धांत जैन धर्मामध्ये पर्यावरण संरक्षण हेतू मूलमंत्राप्रमाणे कार्य करतो. आध्यात्मिक दृष्टीच्या अनुसार अनंत इच्छा पर्यावरणासाठी विनाशकारी आहे. परंतु संयम पर्यावरणासाठी संरक्षण प्रदान करणारे आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या अनंत इच्छांवरती अंकुश ठेवून पर्यावरण संतुलनामध्ये आपले योगदान दिले पाहिजे. सुखाचे आसक्ती पूर्ण रूपाने सोडू शकत नाही परंतु इच्छांचे तरी नियमन केले जाऊ शकते.१५

वर्तमान समस्यांपासून वाचण्याचे उपाय-

स्वेच्छा पूर्ण नियंत्रण अपरिग्रह-

इच्छांवरती नियंत्रण मनुष्याने स्वतःच्या इच्छेने ठेवले आहे, की कायद्याद्वारे ठेवले गेले आहे, या दोन्ही गोष्टी विचारणीय आहेत. कायद्याद्वारे ठेवले गेलेल्या नियंत्रणाचा मनुष्य उल्लंघन करण्याचा प्रयत्न देखील करतो आणि उल्लंघन केल्यानंतर त्यातून बचावासाठी प्रयत्न देखील करतो. परंतु एखादा मनुष्य जेव्हा व्रत किंवा नियम आपल्या इच्छेने धारण करतो, तेव्हा तो स्वेच्छा पूर्ण नियंत्रण ठेवतो आणि हेतूपूर्वक त्याचे उल्लंघन देखील करत नाही. परिग्रह परिमाण व्रत यामुळे मनुष्य समाजाप्रती आपले कर्तव्य पूर्ण करतो आणि आपली पुण्यवृद्धी करून लोक एवं पर लोकांमध्ये सुख देखील प्राप्त करतो. इच्छेची कधी तृप्ती होऊ शकत नाही. एक इच्छा पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या अनेक इच्छा निर्माण होतात. इच्छापूर्ती करणे म्हणजेच क्षितिजाला स्पर्श करण्याचा असफल प्रयत्न आहे. ज्यामध्ये आज देख आजपर्यंत कुठलाही व्यक्ती सफल झाला नाही. खरे तर हेच आहे, की सुखी तोच आहे ज्याच्या इच्छा कमी आहेत. जेवणामध्ये परिग्रहाचे मात्र जितकी कमी असेल, तेवढीच सुख आणि शांती अधिक असेल. वस्तुतः खरे सुख म्हणजे चिंतांचा सर्वथा अभाव मानला जातो.

जर मनुष्य आपल्या समस्यांना सोडवू इच्छितो, विषमतेच्या दुष्परिणामांपासून वाचू इच्छितो, तर त्याला भगवान महावीरांनी सांगितलेला अपरिग्रह सिद्धांत स्वीकारावा लागेल. आणि त्यावरती निरंतर अमल करावे लागेल.

अपरिग्रह साधनेचे लाभ-

1. सुख- शांती व धर्माची सिद्धी.
2. स्वपर कल्याणी हेतू ,जगा आणि जगू द्या.
3. मुक्तीचे द्वार
4. सद्गुणांची सहज उपलब्धता
5. सर्व दुःखांपासून सुटका
6. खऱ्या स्वाधीनतेची प्राप्ती.
7. परिग्रह क्लेशाचे मूळ आहे आणि अपरिग्रह सुखांचे मूळ आहे. तृष्णा संसाराचे कारण आहे, संतोष मोक्षाचे कारण आहे. इच्छेने व्याकुळता उत्पन्न होते आणि इच्छा निरोधाने अध्यात्मसुख. म्हणूनच

परिग्रह पाप आहे आणि अपरिग्रह धर्म आहे. भगवान महावीरांनी म्हटले आहे सुख वस्तुनिष्ठ नाही, तर विचारनिष्ठ आहे. सुख बाह्य वस्तूमध्ये नाही तर मनुष्याच्या भावनेमध्ये आहे.

संदर्भ ग्रंथ :-

१.पाइअ-सद्द-महण्णवो,कर्ता- पं.हरगोविन्ददास त्रिकमचंद सेठ.प्रकाशक- नरेंद्रप्रकाश जैन,बनारसीदास, दिल्ली ७.द्वितीय संस्करण वाराणसी १९६३.पुनर्मुद्रण दिल्ली १९८६. पृष्ठ क्रमांक ५४-५५

२. प्राकृत-हिंदी कोश,पाइअ-सद्द-महण्णवो की किञ्चित् परिवर्तित आवृत्ती. संपादक- डॉ. के.आर.चंद्र. प्रकाशक- प्राकृत जैन विद्या विकास फंड,७७/३७५, सरस्वती नगर, आजाद सोसायटी, अहमदाबाद-१५. सह प्रकाशक- पार्श्वनाथ

विद्याश्रम शोध संस्था, आय.टी.आय रोड वाराणसी-५. प्रथम संस्करण-ई.सन् १९८७. पृष्ठ क्रमांक ५४६ संपादक- डॉ. के.आर. चंद्र

३. पुरुषार्थ सिद्धयुपाय, आचार्य अमृतचंद्रदेव विरचित. सरल हिंदी भाषाटीका सहित। प्रकाशक रावजीभाई छगनभाई देसाई, परम श्रुत प्रभावक मंडल श्रीमद् राजचंद्र जैनशास्त्रमाला, श्रीमद् रजचंद्र आश्रम, अगास। पंचम आवृत्ति-१९६६। गाथा ४२, पृ. क्र.२८

४. पुरुषार्थसिद्धयुपाय,गाथा ११९,पृ.क्र.५३

५. षट्खण्डागम् ,(धवला पुष्प १२) , श्री भगवत पुष्पदंत भूतबली प्रणीत:. श्रीवीरसेनविरचित:, चतुर्थ खण्ड – वेदनाभावविधान.ग्रंथ संपादक – स्व. डॉ. हिरालाल जैन, सहसंपादक – स्व. पं. फुलचंद्र सिद्धांत शास्त्री, स्व. पं. बालचंद्र सिद्धांत शास्त्री. प्रकाशक -जैन संस्कृती संरक्षक संघ, सोलापूर .इ.सन१९९३ धवला १२/४,२,८,८ पृष्ठ क्रमांक२८३.

६. प्रवचनसार, श्री कुंदकुंदाचार्य कृत (प्राकृत) संस्कृत टीका श्री अमृतचंद्राचार्य कृत व श्री जयसेनाचार्य कृत. संपादक स्वर्गीय श्री पंडित अजित कुमारजी शास्त्री दिल्ली एवं श्री पंडित व्र. रतनचंद्रजी मुख्तार, सहारनपुर। प्रकाशक ब्र. लाडमल जैन ,अधिष्ठाता, श्री शांति वीर दिगंबर जैन संस्थान, श्री महावीर जी (राजस्थान) १८१ पृष्ठ क्रमांक १९५

७. प्रवचनसार/१२ पृष्ठ क्रमांक २२

८. मूलाचार - वट्टकेरस्वामिविरचित, संपादक व संशोधक पंडित मनोहरलाल शास्त्री पाढमनिवासी, प्रकाशिका- मुनि अनंतकीर्ती दि.जैन ग्रंथमाला,सन १९१९. गा.९८८, पृष्ठ क्रमांक३५२.

९. भगवती आराधना - आचार्यश्री शिवार्य विरचित, आचार्यश्री अपराजितसूरी रचित विजयोदया टीका, हिरालाल खुशालचंद जैन ग्रंथमाला, मांडवे. संपादक एवम अनुवादक - सिद्धांताचार्य श्री पंडित कैलासचंद्र सिद्धांतशास्त्री, प्रकाशक – बा.ब्र.श्री हिरालाल खुशालचंद दोशी फलटण,सन १९९०. १६/ पृष्ठ क्रमांक ३८ १०. कुरल – काव्य - तामिळ भाषेचे मूल लेखक - श्री एलाचार्य. संस्कृत तथा हिंदी मे अनुवादक - विद्याभूषण पंडित गोविंदराव जैन, शास्त्री. प्रकाशक - पंडित गोविंदराव जैन, शास्त्री महरौनी (झांसी) उत्तर प्रदेश. प्रथम पुष्प. परिच्छेद १०, पृष्ठ क्रमांक १२९

११. अष्टपाहूड - आचार्य कुंदकुंददेव विरचित. मराठी अनुवादक – पं.धन्यकुमार गंगासा भोरे, कारंजा. प्रकाशक - श्री महावीर ज्ञानोपासना समिती, कारंजा. प्रथम आवृत्ति १५/०२/२००२. गाथा२९, पृष्ठ क्रमांक३०४

१२. उत्तराध्ययनसूत्र (लपाठ-हिंदी -अनुवाद-टिप्पण- परिशिष्ट युक्त)। अनुवादक- विवेचक- संपादक : राजेंद्र मुनि शास्त्री। प्रकाशक -श्री आगम प्रशासन समिति, ब्यावर, (राजस्थान)३०५९०१। तृतीय संस्करण-जनवरी २०००।९/४८

१३. वसुनन्दि- श्रावकाचार, वसुनन्दि विरचितम, संपादक -पंडित हिरालाल जैन, सिद्धांतशास्त्री ,न्यायतीर्थ. प्रकाशक- अयोध्या प्रसाद गोयलीय, मंत्री,भारतीय ज्ञानपीठ काशी, दुर्गा कुंड रोड, बनारस ४.। प्रथम आवृत्ति-अप्रैल १९५२। गा.५९,पृष्ठ क्रमांक ८०

१४. भारतीय समाज प्रश्न आणि वर्तमान समस्या पृ. क्रमांक २१९-२२०

www.balkhandecollege.com

१५. जैन धर्म में पर्यावरण संरक्षण। डॉ रेनू जैन। असिस्टेंट प्रोफेसर, इतिहास राजकीय महाविद्यालय, ननौता, सहारनपुर (उत्तर प्रदेश)। शोध मंथन Vol.XIV No.II Apr-June 2023 ISSN:(P) 0976-5255(e)2454-339X.

प्राकृत साहित्यातील निसर्गदृष्टी : पर्यावरणीय चेतनेचा अभ्यास

सौ.स्वाती महावीर पाटील
लोकनेते प्रा. शरद पाटील महाविद्यालय, मिरज

प्रस्तावना

प्राकृत साहित्य हे भारतीय साहित्यपरंपरेतील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि समृद्ध घटक असून ते संस्कृत व अपभ्रंश यांच्यामधील संक्रमणात्मक भाषिक परंपरेचे प्रतिनिधित्व करते. ही भाषा प्रामुख्याने जनसामान्यांच्या जीवनाशी निगडित असल्यामुळे प्राकृत साहित्यामध्ये तत्कालीन समाजजीवन, लोकसंस्कृती, धार्मिक श्रद्धा, नैतिक मूल्ये तसेच मानवी संवेदनशीलता यांचे अत्यंत नैसर्गिक आणि वास्तववादी चित्रण आढळते. संस्कृत साहित्याच्या अभिजात परंपरेपेक्षा वेगळ्या पातळीवर उभे राहणारे प्राकृत साहित्य हे सामान्य जनतेच्या जीवनविश्वाचे प्रतिबिंब असल्यामुळे त्यातील आशय अधिक सहज, भावनात्मक आणि अनुभवप्रधान स्वरूपाचा आहे.

प्राकृत साहित्यामध्ये निसर्ग हा केवळ सौंदर्याचा विषय न राहता मानवी जीवनाचा अविभाज्य घटक म्हणून साकारलेला दिसतो. पर्वत, नद्या, वन, वृक्ष, पुष्पवेली, ऋतू, पशुपक्षी इत्यादी निसर्गघटकांचे वर्णन अत्यंत सजीव, सूक्ष्म आणि भावपूर्ण भाषेत केलेले आढळते. या वर्णनांमध्ये केवळ दृश्य सौंदर्य नव्हे तर निसर्गाशी असलेले मानवी भावबंध, सहजीवनाची भावना आणि परस्परावलंबनाचे तत्त्व स्पष्टपणे व्यक्त होते. विशेषतः जैन, बौद्ध आणि लौकिक परंपरेतील प्राकृत ग्रंथांमध्ये अहिंसा, करुणा, संयम आणि संतुलन यांसारखी मूल्ये निसर्गाच्या संदर्भात प्रभावीपणे अधोरेखित झालेली दिसतात.

आधुनिक काळात औद्योगिकीकरण, शहरीकरण, अतिवापर आणि तांत्रिक प्रगतीच्या अतिरेकामुळे पर्यावरणीय संकटे अधिक तीव्र स्वरूपात समोर येत आहेत. हवामान बदल, जैवविविधतेचा ऱ्हास, जल व वायू प्रदूषण, वृक्षतोड आणि नैसर्गिक संसाधनांचा अति उपसा यांसारख्या समस्यांनी मानवजातीच्या अस्तित्वालाच आव्हान निर्माण केले आहे. अशा पार्श्वभूमीवर प्राचीन साहित्यपरंपरेतील निसर्गविषयक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे हे केवळ साहित्यिक नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय दृष्ट्याही अत्यंत आवश्यक ठरते.

प्राकृत साहित्यातील निसर्गवर्णन हे केवळ अलंकारिक किंवा काव्यात्म सौंदर्यापुरते मर्यादित नसून त्यामध्ये अंतर्भूत असलेली निसर्गसंवर्धनाची भावना, सहअस्तित्वाची संकल्पना आणि नैतिक जबाबदारीची जाणीव आधुनिक पर्यावरणीय विचारांशी सुसंगत ठरते. त्यामुळे या साहित्याचा अभ्यास आधुनिक पर्यावरणीय जाणीव विकसित करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतो.

या संशोधनात्मक लेखात प्राकृत साहित्यातील निसर्गवर्णनाचा सखोल आढावा घेऊन त्यामधील तत्त्वज्ञान, जीवनदृष्टी आणि मूल्यव्यवस्था यांचा अभ्यास केला जाईल. तसेच या साहित्यिक परंपरेचा आधुनिक पर्यावरणीय जाणीवेशी असलेला संबंध स्पष्ट करून, आजच्या पर्यावरणीय समस्यांवर चिंतन करण्यासाठी प्राकृत साहित्य कशा प्रकारे मार्गदर्शक ठरू शकते, याचा चिकित्सक विचार केला जाईल.

विषयाचे महत्त्व

1. प्राकृत साहित्य भारतीय सांस्कृतिक व साहित्यिक वारशाचे महत्त्व अधोरेखित करते.
2. निसर्गवर्णनातून मानव-निसर्ग सहजीवनाची जाणीव निर्माण होते.
3. आधुनिक प्रदूषण व पर्यावरणीय संकटांसाठी मार्गदर्शन मिळते.
4. नैतिक मूल्ये व शाश्वत विकासाचे तत्त्व शिकवते.

प्राकृत साहित्यातील निसर्गवर्णन

प्राकृत साहित्यात निसर्ग हा केवळ एक पार्श्वभूमी म्हणून नाही, तर मानवी जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून साकारला आहे. विविध ऋतू, वनस्पती, प्राणी आणि पक्षी यांचे चित्रण हे केवळ वर्णनात्मक नाही तर मानवी भावनांशी जोडलेले आहे.

फल-संपत्तीअ समोणआई तुंगई फल-विपत्तीए ।
हिअआइ सु-पुरिसाण महा-तरुण व सिहाई ।।[१]

अर्थात, याप्रमाणे झाडांच्या फांद्या फळे वैभवाने (भाराने) खाली वाकतात व फळे संपताच वर उंच जातात. त्याचप्रमाणे सत्पुरुषांची हृदये संपन्न झाली की नम्र होतात व विपत्तीच्या काळात उत्पन्न होतात.

उअ पोम्मराअ-मरगअ-संवलिआ णहअलाओ ओअरइ।
णहसिरि-कंठ-ब्भट्ट व्व कंठिआ करि-रिंछोली ।।[२]

अर्थात, 'आकाशातून खाली उतरत असलेली पोपटांची रांग नभःश्रीच्या कंठातील पद्मराग व मरकत मण्याच्या तुटलेल्या हाराप्रमाणे ओघळत असल्याप्रमाणे दिसत आहे. त्याकडे पहा.'

१. ऋतू वर्णन

प्राकृत कवितांमध्ये वर्षभरातील ऋतूंचे अत्यंत सुंदर वर्णन केले आहे. ग्रीष्म, वर्षा, शिशिर, हेमंत, वसंत आणि शरद या ऋतूंचे भिन्न वैशिष्ट्ये कविंनी आपल्या साहित्यात प्रभावीपणे रेखाटली आहेत.

वसंत ऋतू: वसंताचे आगमन म्हणजे फुलांनी बहरलेली वने, आंब्याच्या मंजिऱ्या, कोकिळेचे गोड गाणे, आणि प्रेमीजनांच्या भेटी.

नलिणीए बद्धराओ त्ति जमि मुणिउं व दक्खिणदिसाए ।
विच्छब्भइ दियसयरो मलयाणिलमुक्कनीसासं ।।
वियसियपंकयनयणा जम्मि य वोलेंति मंथरं दियहा ।
उउसिरिदंसणसंभमपहरिसहीरंत हियय व्व ॥ [३]

अर्थात, वसंत ऋतूमध्ये, ज्यामध्ये दक्षिण दिशेला सूर्य कमलिनीच्या प्रेमात बांधला गेला आहे हे जाणून मलय वाऱ्याने त्रस्त होत होता, त्या काळात ऋतूदेवी लक्ष्मीच्या दर्शनाच्या उत्साहाने हिरवे हृदय असलेल्या कमळांनी विकसित झालेल्या डोळ्यांसह दिवस संथ गतीने जात होते.

ग्रीष्म ऋतू: उष्णतेने ग्रस्त पृथ्वी, कोरडे पडलेले जलाशय, तर दुसरीकडे ग्रीष्मामुळे फुलणाऱ्या काही वनस्पतींचे उल्लेखही आढळतात.

एयारिसे य गिम्ह-समए वट्टमाणे का उण वेला वट्टिउं पयत्ता।
अवरोवहि-वेला-वारि-णियर-तणु-सिसिर-सीयरासत्ता ।
णहयल-गिरिवर-सिहरं रवि-रह-तुरया वलग्गंति ।।[४]

अर्थात, अशा वेळी ग्रीष्मच्या आगमनाने कोणती वेळ आली आहे? जसे- दुपारच्या वेळी पाण्याचे काही थेंब शरीराला थोडे थंड करावे या इच्छेने, सूर्याच्या रथाचे घोडे काही क्षण पर्वतांच्या उंच शिखरांवर आकाशात फिरू लागले.

पावसाळा: नद्या, ओहोळ, वृष्टीचा नाद, आणि प्रेमीजनांसाठी प्रिय असलेली श्रावणधारा यांचे वर्णन अत्यंत हृदयस्पर्शी आहे.

अन्नया समागओ जलयकालो, ओत्थरियमंबरं जलहरेहि, पवाइया कलंबवाया, वियंभिओ गज्जियरवो, उल्लसिया वलायपंती, विष्फुरिया विज्जुलेहा, हरिसिया वप्पीहया, जायं पवरिसणं, पर्णाच्चया सिहंडिणो, पणट्ठा रायहंसा, पव्वालिया वसुमई, भरिया कुसारा, पवत्तो ददुररवो, उब्भिन्ना कंदला, उक्कंठियाओ पहियजायाओ, निव्वयं गोमाहिसवकं ।[५]

अर्थात, पावसाचे आगमन होताच, ढगांनी आभाळ व्यापले होते. सोसाट्याचा वारा सुटला. मेघगर्जनेचा आवाज वाढला. विजा चमकू लागल्या. खूप पाऊस पडला. हरखून गेलेल्या मोरांनी नृत्याला सुरुवात केली. राजहंस मात्र कुठेच दिसून आले नाहीत. पृथ्वी पाण्याने भरली होती, तलाव भरून वाहू लागले आणि बेडकांचे टर्र-टर्र आवाज घुमू लागले. जमिनीतून नवे अंकुर डोकावू लागले."

हिवाळा: शीतल चंद्रप्रकाश, धुक्याने भरलेले सकाळचे वातावरण, आणि उबदार सूर्यकिरणे यांचे रमणीय चित्रण केले आहे.

खन्धग्गिण वणेसुं तणेहिं गाममि रक्खिओ पहिओ।
णअर-वसिओ णडज्जइ साणुसएण व्व सीएण ।।७७।।[६]

अर्थात, 'अरण्यात लाकडाच्या (खंध) अग्निने तर गावात गवताच्या (अग्निने) पथिकाचे रक्षण केले. तो नगरात गेल्यानंतर (आता) आपल्या तडाख्यातून सुटला म्हणन क्रोधिष्ट झालेली थंडी त्यास त्रस्त करीत आहे. '

अग्घति जम्मि काले कंबल-धय-तेल-रल्लयग्गीओ।
अच्छइ पाउय-देहो मंदो मंदो व्व सव्व-जणो ।। [७]

अर्थात, ज्या ऋतूत ब्लँकेट, तूप, तेल, लोकरीच्या कपड्यांच्या किमती वाढतात आणि प्रत्येकजण शारीरिकदृष्ट्या अक्षम होतो. आपण पाण्याने झाकलेल्या थकल्यासारखे आळशी बनतो (असा हिवाळा आला आहे).

या सर्व निसर्ग वर्णनातून असे लक्षात येते की, प्राकृत साहित्य आपल्याला ऋतूचक्राच्या महत्त्वाची जाणीव करून देते. निसर्गाच्या बदलांवर मानवाने कसे जुळवून घ्यावे, याचे मार्गदर्शनही अप्रत्यक्षपणे या साहित्यातून मिळते. निसर्गातील सौंदर्य अनुभवताना त्याचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य असल्याचा संदेश यातून उमटतो.

थोडक्यात, प्राकृत साहित्य निसर्गाच्या ऋतूंमधून पर्यावरणाच्या संवर्धनाचा सांस्कृतिक आणि भावनिक दृष्टिकोनाने सखोल बोध घडवते.

२. प्रेम आणि निसर्ग यातील नाते

प्राकृत काव्यात प्रेम आणि निसर्ग यांचा अतूट संबंध आढळतो. प्रियकर-प्रेयसी यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी कवी निसर्गातील विविध घटकांचा आधार घेतात. चंद्र, कमळ, कोकिळा, मोर, आणि बहरलेली वने हे प्रेमाच्या विविध अवस्थांचे प्रतीक म्हणून वापरण्यात आले आहेत.

अमय-मअ गअण-सेहर रअणी-मुह-तिलअ चंद दे छिवसु ।
छित्तो जेहिं पिअअमोममं पि तेहिं विअ करेहिं ।। [८]

अर्थात, 'हे चंद्रा, तू अमृतमय आहेस, गगनाचा मुकुट आहेस. रंजनीच्या मुखावरील तिलक आहेस. (तेव्हा) ज्या किरणांनी प्रियकरास स्पर्श करशील त्याच किरणांनी मलाही स्पर्श करा.'

३. वन्यजीवन आणि पक्षी

प्राकृत साहित्यामध्ये पक्षी आणि प्राण्यांचे अप्रतिम वर्णन आढळते. हंस, कोकीळ, हरीण, मोर, आणि चातक हे अनेकदा मानवी भावनांचे प्रतीक म्हणून वापरण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, चातक पक्षी जसा फक्त स्वाती नक्षत्राच्या पावसाच्या थेंबांची वाट पाहतो, तसेच काही प्रेमीजन आपल्या प्रिय व्यक्तीच्या प्रतीक्षेत असतात.

अहिणव-दिट्ठ-दइय-सुह-संगम-फरिस-रसं महंतिया ।
दूसह-विरह-दुक्ख-संताविया कलुणं रुवंतिया ।।
तरलिय-णयण-बाह-जल-पूर-जलज्जलयं णियंतिया ।
दइया-हंसएण मेलिज्जइ इह वर-रायहंसिया ।।[९]

अर्थात, तिने नुकत्याच पाहिलेल्या प्रियतमाच्या आनंदी मिलनाच्या स्पर्शाची आणि आनंदाची इच्छा करणारी ही महान राजहंसिनी, वियोगाच्या वेदना सहन करणे कठीण असलेल्या वेदनांनी ग्रासलेला, आपल्या खेळकर डोळयांच्या अश्रूंनी भिजलेला, आपल्या प्रिय हंसास कधी भेटेल?

आधुनिक पर्यावरणीय जाणीव आणि प्राकृत साहित्य

आजच्या काळात पर्यावरणीय समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहेत. प्रदूषण, वनतोड, हवामान बदल, आणि जैवविविधतेचा ऱ्हास यामुळे संपूर्ण निसर्गव्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत, प्राकृत साहित्यातील निसर्गवर्णन आपल्याला निसर्गसंवर्धनाचा महत्त्वाचा संदेश देते.

१. निसर्गासोबत सहजीवन

प्राकृत साहित्य आपल्याला निसर्गाच्या सहवासात जगण्याची शिकवण देते. मानवी जीवन आणि निसर्ग यांचा परस्पर संबंध हा अतूट आहे, आणि त्याचे रक्षण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

२. निसर्ग संवेदनशीलता आणि सौंदर्यदृष्टी

प्राचीन कविंनी निसर्गाचे वर्णन केवळ त्याच्या देखाव्यासाठी केले नाही, तर त्यामध्ये मानवी भावना गुंफलेल्या आहेत. निसर्ग संवेदनशीलतेचा हा दृष्टिकोन आजही आत्मसात केल्यास, पर्यावरणीय समस्या सोडवणे अधिक सोपे होईल.

सव्वत्थ दिसामुह-पसारिएहि अण्णोण-कडअ लग्गोहिं।
छल्लिं व्व मुअइ विंझो मेहेहिं वि संघडन्तेहिं ।।१०

अर्थात, 'सर्व दिशा (क्षितिजा) कडून येणारे आणि (पर्वत) कड्यावर परस्परांना तटल्याने (भिडल्याने पुन्हा) बाजूला होणारे मेघ जणू विंध्यपर्वतच वस्त्र (छल्लि) बाजूला काढून ठेवत असल्याप्रमाणे वाटत आहे.'

आलोअन्ति पुलिंदा पव्वअ-सिहर-ट्ठिआ धणु-णिसण्णा।
हत्थि-कुलेहिं व्व विंझं पुरिज्जं त्त णव ब्भेहि ।।११

अर्थात, 'पर्वत शिखरांवर धनुष्याला टेकून उभे असलेला पुलिंद (आदिवासी) विंध्य पर्वतावरील हत्तीच्या समूहाप्रमाणे जमा होत असलेल्या नव मेघाकडे पाहत आहे.'

वण-दव-मसि-मइलंगो रेहइ गणेहिं धवलेहिं।
खीरोअ-मंथण-उच्छलिअ-दुध्द सित्तो व्व महुमहणो ।।१२

अर्थात, 'वणव्यामुळे काळवंडलेल्या विंध्य पर्वताच्या कड्यावर जमा झालेले पांढरे ढग क्षीरसागराच्या मंथनातून उडालेल्या कृष्णाच्या (मधुमंथणाच्या) अंगावरील दुधाच्या तुषाराप्रमाणे शोभून दिसत आहेत.'

वरील विवेचनातून निसर्गाची सौंदर्यपूर्ण आणि संवेदनशील अशी कल्पनाशक्तीपूर्वक मांडणी केली आहे. मेघांचे पर्वतांवर एकमेकांवर आपटत बाजूला होणे, हे विंध पर्वत वस्त्र बाजूला सारल्यासारखे वाटते – हे निसर्गातील हालचालींचे सूक्ष्म निरीक्षण दर्शवते. पुलिंद पर्वतावर जमलेले मेघ हत्तींच्या समूहाप्रमाणे भासतात, तर पांढऱ्या डागांची तुलना श्रीकृष्णाच्या अंगावरील दुधाच्या तुषारांशी केली आहे – यामधून निसर्गातील दृश्यांचे सौंदर्य आणि त्याची भावनात्मक अनुभूती स्पष्ट होते.

या वर्णनात निसर्ग फक्त दृश्य नाही, तर तो सजीव, संवेदनशील आणि कलात्मक भासतो. त्यामुळे निसर्गाकडे केवळ भौतिक दृष्टिकोनातून न पाहता, त्यातील सौंदर्य आणि नातेसंबंध जाणून घेण्याची जाणीव निर्माण होते.

३. नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण

आजच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात नैसर्गिक संसाधनांचा अमर्याद वापर केला जात आहे. प्राचीन साहित्य आपल्याला नैसर्गिक संसाधनांचा संयमाने आणि जबाबदारीने वापर करण्याची शिकवण देते.

उद्योत्तासुरी यांनी लिहिलेल्या कुवलयमाला या कथाग्रंथाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ही कथा धार्मिक स्वरूपाची असली तरी तिच्यात चालीरीतींसह पर्यावरणाचे विशेष वर्णन आहे. याचे वर्णन या कवितेत सहा तरुणांनी झाडे तोडल्याच्या उदाहरणाद्वारे केले आहे. लेश्य म्हणजे भावना, मनात विचार. कृष्ण, नील, कपोत, पीत, पद्म आणि शुक्ल हे सहा लेष्य (मनाची प्रवृत्ती) मानले जातात. यामध्ये कृष्णाला उग्र चारित्र्याचे प्रतीक मानले जाते आणि शुक्ल लेष्य हे संयत आणि शांत विचारांचे प्रतीक मानले जाते. या कवितेत सहा तरुणांच्या उदाहरणासह सांगितले आहे की, समाजात असे अनेक लोक आहेत जे आपल्या स्वार्थासाठी इतरांना किंवा समाजाला पर्याय म्हणून निसर्गाचा विचारही करत नाहीत. पाच तरुण नकळत आपली भूक भागवण्यासाठी जामुनचे झाड तोडण्याचा विचार करतात. पण ज्ञानी विचारवंत, षष्ठी तरुण, सर्वांना लाभदायक ठरेल असे शुभ विचार व्यक्त करतात. अशा परिस्थितीत प्रत्येक व्यक्तीने झाडे आणि पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे.[१३]

वृक्षतोड न केल्यास नैसर्गिक संसाधनांचे प्रभावी संरक्षण करता येते. झाडे मातीची धूप रोखतात, पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूगर्भातील पाण्याचा साठा टिकवतात. ती कार्बन डायऑक्साइड शोषून हवा शुद्ध करतात आणि पर्यावरणातील प्रदूषण कमी करतात. तसेच, अनेक प्राणी आणि पक्ष्यांचे जीवन झाडांवर अवलंबून असल्याने जैवविविधतेचे रक्षण होते. वृक्ष हवामान संतुलित ठेवण्यास मदत करतात. म्हणूनच, वृक्षतोड टाळणे हे पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. असा संदेश वरील विवेचनाद्वारे प्राकृतआचार्यांनी केला आहे.

४. पर्यावरणीय संतुलन राखण्याचा संदेश

प्राकृत साहित्य निसर्गाच्या विविध घटकांमधील संतुलन दर्शवते. जसे की, नद्या आणि वने केवळ सौंदर्यपूर्ण घटक नाहीत, तर ते जीवनाचा आधार आहेत. त्यांचे संरक्षण करणे हे मानवजातीचे प्रमुख कर्तव्य आहे.

तड-संठिअ णीड-एक्कन्त-पीलु-आरक्खण-एक-दिण्ण-मणा।
अगणिअ-विणिपाअ-भया पुरेण समं वहइ काई ।।[१४]

अर्थात, 'पूर आलेल्या नदीच्या किनाऱ्यावरील झाडातील घरट्यात आपल्या पिल्लांचे रक्षण कसे होई या विचाराने एकाग्र झालेली व स्वनाशाची पर्वा न करणारी कावळी पुराबरोबर वाहून गेली.'

वरील विवेचनातून एक महत्त्वाचा संदेश दिला आहे की, पर्यावरणाचे संतुलन बिघडल्यास त्याचे गंभीर परिणाम प्राणी आणि पक्ष्यांवरही होतात. पूर आल्याने कावेळीची घरटी वाहून गेली, तिच्या पिलांचे रक्षण न होऊ शकल्याने ती व्याकुळ झाली आणि अखेर तिचाही जीव गेला — हे दृश्य आपल्याला सांगते की निसर्गातील लहानसहान जीवसुद्धा पर्यावरण बदलांमुळे किती त्रस्त होतात.

इंगलकम्मे - म्हणजे अंगार कर्म. अंगारकम्मे म्हणजे कोळसा बनवणे आणि विकणे म्हणजे त्यातून उपजीविका मिळवणे. कोळसा बनवण्यासाठी लाकूड जाळले जाते, ज्यामुळे धूर निर्माण होतो जो हवा प्रदूषित करतो. सध्या, रेल्वे इंजिन, गिरण्या, कारखाने आणि कारखाने कोळशावर चालतात, जे विषारी धूर आणि वायू उत्सर्जित करतात जे जवळपास राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यासाठी हानिकारक आहेत. यामुळे श्वसनाचे आजार, दमा, क्षयरोग आणि इतर आजार होऊ शकतात. जैन तत्वज्ञान सद्गुणी गृहस्थांसाठी इंगलकम्मे लिहून देते. त्याचे पालन करून धूर आणि वायू प्रदूषण टाळता येते.

वनकम्मे - म्हणजे वनकाम. जंगलातून लाकूड, बांबू इत्यादी तोडणे आणि विकणे जंगले नष्ट करते आणि असंख्य प्रदूषण निर्माण करते. जैन धर्म सद्गुणी गृहस्थांसाठी या व्यवसायावर बंदी घालतो.

फोडी कम्मे - म्हणजे स्फोटक क्रियाकलाप. मातीचा स्फोट करणे, खाणी खोदणे, दगड, माती, कोळसा, लोखंड, रॉकेल इत्यादी काढणे आणि त्यांची विक्री करणे. गनपावडरचा स्फोट आजूबाजूच्या भागात प्रदूषण पसरवतो. जैन धर्म फोही, म्हणजे स्फोटक क्रियाकलाप या प्रथेला मनाई करतो.

प्राकृत साहित्य आणि जैन तत्त्वज्ञानातील इंगलकम्मे, बनकम्मे व फोडी कम्मे यांवरील निर्बंध मानवी कृती व निसर्गसंरक्षण यातील संतुलन अधोरेखित करतात. हे नियम धूर, जंगलतोड आणि स्फोटांमुळे होणारे प्रदूषण टाळून पर्यावरणीय समतोल राखण्याचा मार्ग सूचित करतात.

आधुनिक औद्योगिक युगातील गंभीर पर्यावरणीय संकटांच्या पार्श्वभूमीवर ही तत्त्वे अधिकच समर्पक व मार्गदर्शक ठरतात. म्हणूनच प्राकृत साहित्याची ही नैतिक पर्यावरणदृष्टी आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेला सशक्त अधिष्ठान प्रदान करते.

निष्कर्ष

प्राकृत साहित्य आणि आधुनिक पर्यावरणीय जाणीव यामध्ये एक प्रकारचे नाते आहे. जरी दोन्ही संकल्पना वेगवेगळ्या काळातील असल्या तरी त्यांचा मूलभूत उद्देश एकच आहे – निसर्गाची जपणूक आणि त्याचा आदर करणे. प्राकृत साहित्यातील निसर्गवर्णन आपल्याला निसर्गाच्या सौंदर्याची जाणीव करून देते आणि त्याचे संवर्धन करण्यास प्रेरित करते. त्यामुळे या साहित्यातील विचार आजच्या पर्यावरणीय समस्यांवर उपाय शोधण्यासाठी दिशादर्शक ठरू शकतात.

जर आपण प्राकृत साहित्यातून मिळणाऱ्या शिकवणींना आजच्या जीवनात लागू केले, तर निसर्गसंवर्धन अधिक प्रभावीपणे करता येईल. पर्यावरणस्नेही जीवनशैली स्वीकारून, निसर्गाचे संतुलन राखून आणि जैवविविधतेचे संरक्षण करून आपण आपली पृथ्वी अधिक सुंदर आणि निरोगी बनवू शकतो

संदर्भ

१. 'गाथासप्तशती' बी. ए. भाग-२ अर्धमागधी-प्राकृत: कुलसचिव, गा. २८२ पृ.१३० शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर जून २०१३
२. तत्रेव गा. ७५ पृ.१०१
३. समराइच्चकहा भाग – २: सम्पादन - अनुवाद - डॉ. रमेशचन्द्र जैन, गा.५७७-७७८, पृ ५८० भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण १९९६
४. कुवलयमालाकहा प्रथम भाग :सम्पादक एवं अनुवादक -प्रोफेसर प्रेम सुमन जैन, अनु. ११९ गा. ३ पृ. २२४, प्राकृत भारती अकादमी, जयपुर श्री जैन श्वेताम्बर नाकोड़ा पार्श्वनाथ तीर्थ, मेवानगर, बाड़मेर २०१५
५.समराइच्चकहा भाग – २: सम्पादन - अनुवाद - डॉ. रमेशचन्द्र जैन,गा.९४६ नंतर, पृ ७७३,भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण १९९६
७. कुवलयमालाकहा द्वितीय भाग :सम्पादक एवं अनुवादक -प्रोफेसर प्रेम सुमन जैन, अनु. २७२ गा. १ पृ. ६१५, प्राकृत भारती अकादमी, जयपुर श्री जैन श्वेताम्बर नाकोड़ा पार्श्वनाथ तीर्थ, मेवानगर, बाड़मेर २०१५
८. 'गाथासप्तशती' बी. ए. भाग-२ अर्धमागधी-प्राकृत: कुलसचिव, गा. १६ पृ.९२ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर जून २०१३
९. कुवलयमालाकहा द्वितीय भाग :सम्पादक एवं अनुवादक -प्रोफेसर प्रेम सुमन जैन, अनु. २५९ गा. २,३ पृ. ५८५, प्राकृत भारती अकादमी, जयपुर श्री जैन श्वेताम्बर नाकोड़ा पार्श्वनाथ तीर्थ, मेवानगर, बाड़मेर २०१५
१०.'गाथासप्तशती' बी. ए. भाग-२ अर्धमागधी-प्राकृत: कुलसचिव, गा. ११५ पृ.१०७ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर जून २०१३
११. तत्रेव गा. ११६ पृ.१०७
१२. तत्रेव गा. ११७ पृ.१०७
१३. कुवलयमला कहा : संपादक एवं अनुवादक प्रो. प्रेम सुमन जैन, अनु. ३७६ गा. २७-२९ पृ.९०८ – ९१० प्राकृत भारती अकादमी, जयपूर, श्री जैन शेतंबर नाकोडा पार्श्वनाथ तीर्थ, मेवानगर, बाडमेर २०१५
१४.'गाथासप्तशती' बी. ए. भाग-२ अर्धमागधी-प्राकृत: कुलसचिव, गा. १०२ पृ.१०५ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर जून २०१३

B.Aadhar' International Refereed & Peer-Reviewed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXV) 565 -A

ISSN : 2278-9308 February 2026

'अभिजात' मराठीचा प्रवास

डॉ. सदाशिव पाटील

उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), यशवंतराव मोहिते महाविद्यालय, पुणे -३८

प्रस्तावना:

'अभिजात' सन्मान 'मराठी' च्या घरा तोची दिवाळी दसरा असे म्हणत नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेला मराठी भाषेला अभिजात दर्जा लाभला अन् अवघा महाराष्ट्र आनंदला ! मायमराठीच्या प्रदीर्घ इतिहासातील हा सुवर्णक्षरांनी लिहून ठेवावा, असा दिवस आहे. आज आचार्य अत्रे असते, तर त्यांनी, 'गेल्या दहा वर्षात असा आनंद झाला नाही' असे म्हटले असते. तमाम मराठीजनांना हर्ष होईल अशी ही घटना आहे. 'अमृतकाला' तच ही अमृताहुनी गोड बातमी आली, तिचे स्वागत आपण दोन्हीं बाह पसरून केले. जी भाषा अजाणत्या वयातच आपल्या जिभेवर चढली, ती अभिजात भाषा होती, ही भावनाच मराठी मनासाठी कृतार्थतेची आहे.'मराठी' भाषा ही भारताचा अभिमान आहे. या अद्वितीय भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंद समस्त मराठी जनांना आहे. मराठी भाषा अभिजात होतीच, मात्र आता त्यावर केंद्र सरकारनेही शिक्कामोर्तब केले आहे. हा सन्मान म्हणजे मराठी भाषेने आपल्या देशाच्या इतिहासात दिलेल्या समृद्ध सांस्कृतिक योगदानाचा गौरवच आहे.

'अभिजात भाषा' म्हणजे काय :

'अभिजात भाषा' म्हणजे काय याबद्दलचे एक कुतूहल या निमित्ताने आपल्या प्रत्येकाच्या मनात जागे होते. "आपल्याकडे अभिजनांची म्हणजेच उच्चकुलीन लोक जी भाषा बोलतात तिला अभिजात भाषा म्हटले जाते, परंतु अभिजात म्हणजे अभिजनांची भाषा नव्हे तर श्रेष्ठ साहित्य ज्या भाषेत आहे, अशी लोकभाषा." ही नवी धारणा यापुढे ही समाजात रूजविण्याचे काम आपणास करायचे आहे.

मराठीचा अभिजात प्रवास :

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी २०१३ पासून प्रयत्न सुरू होते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी राज्य शासनाने १० जानेवारी २०१२ रोजी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ज्ञ संशोधकांची समिती स्थापन केली होती. या समितीने इतिहास संशोधन करून जुने संदर्भ, प्राचीन ग्रंथ, पुरातन काळातील ताम्रपट, कोरीव लेख, शिलालेखांचा संदर्भ इ. प्राचीन दस्ताऐवज तपासून त्या आधारे एक सर्वंकष व परिपूर्ण अहवाल शासनास सादर केला. समितीने तयार केलेला मराठी भाषेमधील मूळ अहवाल शासनाच्या वतीने १२ जुलै २०१३ रोजी केंद्रसरकारकडे पाठविला गेला. त्यानंतर समितीने परिशिष्टांसह सादर केलेला इंग्रजीमधील अहवाल देखील १६ नोव्हेंबर २०१३ रोजी सरकारला पाठविला गेला. मग पुढे केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. या कामात ख्यातनाम साहित्यिक व भाषाशास्त्रज्ञ प्रा. भालचंद्र नेमाडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी समितीला मार्गदर्शन केले होते. समितीचे समन्वयक प्रा. हरी नरके यांनी अनेक लेख लिहून आणि व्याख्याने देऊन जनजागृती केली. त्यांचा 'मराठी' चे गोमटे व्हावे!' हा लेख विशेष गाजला होता. पुढे २०१६ पासून महाराष्ट्र साहित्य परिषदेकडूनही, लेखकांच्या बैठका, पंतप्रधान कार्यालयाला एक लाखाहून अधिक पत्रे पाठविणे, खासदारांशी पत्रव्यवहार, राजकीय इच्छाशक्तीला आवाहन करण्यासाठी नेत्यांच्या भेटी घेणे, दिल्लीत धरणे आंदोलन, असे अनेक प्रयत्न झाले. त्यानंतर पुढे केंद्रशासनाकडे पाठपुरावा करण्याकरिता १४ फेब्रुवारी २०२४ ला सेवानिवृत्त अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यांच्या अध्यक्षतेखाली पाठपुरावा समिती गठित करण्यात आली, त्या समितीत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष तसेच सरहद संस्था, पुणेचे अध्यक्ष संजय नहार यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. अखेर घटस्थापनेच्या मुहूर्तावर ३ ऑक्टोंबर

२०२४ रोजी मराठी भाषेला 'अभिजात' दर्जा दिल्याची घोषणा केंद्र सरकारने केली. मायमराठीचा हा बहुमान अवघ्या मराठी माणसांच्या मनाला अतिशय सुखद अनुभूती देणारा ठरला.

मराठीचे प्राचीनत्व सिद्ध करणारे पुरावे :

मराठी भाषेचे प्राचीनत्व सिद्ध करणारे १५०० ते २००० वर्षांपासूनचे साहित्य, काव्य, ग्रंथसंपदा, शिलालेख आणि अन्य पारंपरिक पुराव्यांच्या आधारे अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय झाला आहे. आत्तापर्यंत तमिळ, संस्कृत, मल्याळम, तेलगू, कन्नड आणि ओडिया या सहा भाषांना हा दर्जा मिळाला होता. त्यात आता मराठी, बंगाली, पाली, प्राकृत व आसामी भाषेचा समावेश झाला आहे. त्यामुळे अभिजात दर्जा असलेल्या भाषांची संख्या आता अकरा झाली आहे. मराठी ही जगातील ७००० भाषांपैकी पहिल्या २० भाषांमध्ये १८ व्या स्थानी आहे. ज्येष्ठ भाषा अभ्यासक डॉ. गणेश देवी यांच्या मते, "दक्षिणेकडील ज्या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला, त्यापैकी तेलगू भाषा बोलणाऱ्यांची संख्या २०११ च्या जनगणनेत चौथ्या स्थानावर होती. त्या पूर्वी ती तिसऱ्या स्थानावर होती. अभिजात दर्जा मिळाल्यानंतरही त्या भाषेचा विकास आणि वाढ होईलच याची खात्री देता येत नाही." याचा अर्थ भाषेची वाढ, विकास होण्यासाठी ती भाषा बोलणाऱ्या लोकांची इच्छाशक्ती खूप महत्त्वाची असते.

अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या माय मराठीच्या विविध बोलींमधून प्रकट होणारा तिचा लडिवाळपणा, तिचे समृद्ध कोशवाङ्मय, भाषाभिमानामुळे निर्माण होणारे भाषिक वाद हे सगळे लेणे लेवून मराठी भाषेचा प्रवाह, 'अभिजात' नसतानाही गेली कित्येक शतके अखंड वाहतो आहे. अनेक राजवटी आल्या आणि गेल्या, समाज बदलला, जगणे बदलले, त्याप्रमाणे काळानुरूप नको ते टाकून देत अनेक बदल आत्मसात करत तिने आपले 'अभिजात' पण टिकवून ठेवले आहे. आठव्या शतकातील 'कुवलयमाला' ग्रंथातील मराठी माणसाचे वर्णन करणारी 'दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे' मराठी असो, की १११६ सालचा 'श्रवणबेळगोळ' येथील गोमटेश्वराच्या पायथ्याशीअसलेल्या शिलालेखातील 'श्री चावुण्ड राजें करवियलें श्री गंगराजे सुत्ताले करवियले' हा उल्लेख असो किंवा बाराव्या शतकातील महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामींचे शिष्य असलेल्या नागदेवाचार्य यांचा 'तुमचे अस्मात कस्मात मी नेणेची गा..... मज श्री चक्रधरे निरूपिलि महऱ्हाटी तियेची पुसा' असा मराठी भाषेचा खणखणीत पुरस्कार असो किंवा सन १११० मध्ये मुकुंदराज यांनी लिहिलेला 'विवेकसिंधु' हा मराठी भाषेतील आद्यग्रंथ म्हणून ओळखला जातो. पैठणच्या आसपास लिहिलेला हाल सातवाहनाचा 'गाथा सप्तसती' हा ग्रंथ दोन हजार वर्षांपूर्वीच लिहिला आहे आणि मराठीच्या ४२ बोली भाषा उपलब्ध आहेत. मराठी भाषा वैभवशाली बनविण्यात पैशाची, शौरसेनी, मागधी, अर्धमागधी, पाली अशा पाकृतभाषांबरोबरच कन्नड, तमिळ, तेलगू, मल्याळम, पार्शियन, उर्दू आणि संस्कृत या भाषांनी हातभार लावला आहे. त्याबद्दल आपण कृतज्ञच असले पाहिजे, परंतु 'संस्कृत वाणी देवे केली मग प्राकृत काय चोरापासून झाली?' असे सात्विक संतापाने विचारणाऱ्या संत एकनाथ महाराज यांचा मराठी ही संस्कृत इतकीच सन्माननीय भाषा असल्याचा दावा सार्थ आहे. ज्ञानोबा तुकारामांसह सर्व संतांनी मराठी भाषेला दिलेली वळणे, फारसी, अरबी शब्दही मराठीत सामील करून लिहिलेल्या बखरी, पोवाडे, लावण्या, विविध प्रकारचे लोकवाङ्मय, अव्वल इंग्रजी काळातले इंग्रजी वळणाचे मराठी आणि मग केशवसुतांनी फुंकलेली तुतारी आणि तिथून पुढे 'वाघिणीचे दूध' प्यायलेल्या पण स्वजाणीव असलेल्या मराठी भाषेचा असा हा प्रवास अभिजातच होता. आज मराठी भाषेची दुरवस्था होत असल्याचे म्हटले जाते, पण हा विचार योग्य वाटत नाही. सातवाहन, यादव, छत्रपती शिवराय आणि पेशवे यांच्या काळातही मराठी राजभाषा होती. ती चक्रधरांची धर्म भाषा, तर 'नाचू किर्तनाच्या रंगी, ज्ञानदीप लाऊ जगी' असे म्हणणाऱ्या संत नामदेवांची लोकभाषा होती. मराठी भाषा सुंदरी म्हणणाऱ्या ज्ञानदेवांची ती ज्ञानभाषा होती. फुले-शाहू-आंबेडकर, टिळक यांची ती समाजप्रबोधनाची भाषा होती. सावित्रीबाई, ताराबाई शिंदे यांनी स्त्रीमुक्तीचा उद्गार सर्वप्रथम मराठीतच काढला. याशिवाय सानेगुरुजी, बहिणाबाई, इतिहासाचार्य वि.का.राजवाडे, वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, नारायण सुर्वे, दुर्गाबाई, भालचंद्र नेमाडे, नामदेव ढसाळ, सतिश आळेकर आदी नामवंत साहित्यिकांनी मराठी अभिमानाने मिरवली आहे.

'मराठी' ही संस्कृतोद्भव नाहीच :

आपल्या संशोधनात मराठी ही संस्कृतोद्भव भाषा नसल्याचे आणि नात्याने ती संस्कृती मुलगी नसून मावशी असल्याचे आढळून आले. खरे म्हणजे एका भाषेतून दुसरी वेगळी भाषा जन्माला येण्याची गैरसमजूत भाषाशास्त्रज्ञांनी केव्हाच फेटाळून लावलेलीआहे. जुनी महाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिवंत भाषा आहे हे त्यांनी दाखवले आहे, असे दुर्गा भागवत यांनी 'राजारामशास्त्री भागवत समग्र वाङ् मय खंड - १ मध्ये नमूद केलेले आहे. संस्कृत ही मूळ भाषा असल्याचा समज आता निराधार ठरला आहे. याचबरोबर 'महाराष्ट्र' हा शब्द ही जुना असल्याबद्दल राजारामशास्त्री भागवत लिहितात, "महाराष्ट्र हा शब्द बराच जुना आहे. नंदाचे राज्य मगध देशावर असताना म्हणजे शालिवाहन शकाचे पूर्वी सुमारे सव्वाचारशे वर्षे वररुची नावाचा विद्वान झाला. त्याने प्राकृत प्रकाश नावाचे प्राकृत भाषेचे म्हणजे संस्कृत नाटकातील बालभाषेचे व्याकरण केले आहे. त्या व्याकरणाचे अगदी शेवटचे सूत्र 'शेष माहाराष्ट्रीवत्' हे होय. अशोकाने महाराष्ट्र देशात धर्मोपदेश करण्यासाठी काही बौद्ध भिक्षूंस पाठविले, असे बौद्ध लोकांतही दंतकथा आहे. नंदाच्या नंतर चंद्रगुप्ताने राज्य केले. चंद्रगुप्ताच्या पाठीमागे त्याचा मुलगा बिंदुसार गादीवर बसला बिंदुसाराच्या मागून त्याचा मुलगा प्रियदर्शी किंवा अशोक यांस गादी मिळाली. तेव्हा चांगला बावीसशे वर्षांचा मरहठ्ठ किंवा महाराष्ट्र शब्द आहे असे म्हणण्यास हरकत नाही."(भागवत :१९८०:७-८)

डॉ. केतकर हालांच्या गाथा सप्तशतीबद्दल म्हणतात, "महाराष्ट्रातील अत्यंत प्राचीन वाङ्.मय म्हणजे हालांची सप्तशती होय. तीवरून असे दिसते, की त्या वेळेस प्रमुख जानपद हलिक होते. गोदातट आणि विंध्य पर्वत हे दोन्ही प्रदेश वाङ् मयात येत होते. भाषेला नाव प्राकृत हेच अधिक प्रिय होते."(केतकर: २०१६:२१) तर 'विनयपिटक' या बौद्ध धर्मग्रंथात आणि श्रीलंकेतील महावंश व दीपवंश या पाली भाषेतील सिंहली लिपीतील ग्रंथात अशोकाने बौद्ध भिक्षू महाराष्ट्रात पाठविल्याचा उल्लेख आहे. 'रुक्खित थेर' वनवासी: योनक धम्म रुक्खित: थेर अपरंतक: महाधम्म रुक्खित:थेर महारठ्ठ:"(ओल्डेनबर्ग :३१४) यासंदर्भात डॉ. केतकर म्हणतात, "महाराष्ट्र हा शब्द व भाषा वररुचीच्या काळी होती, आणि वररुचीच्या काळी ही भाषा संवर्धित झाली होती आणि वररुचीचा काल ख्रिस्तपूर्व ८०० पासून ६०० पर्यंत केव्हातरी असा धरला तर महाराष्ट्राची स्वतंत्र भाषा अगोदर दोन-तीनशे वर्षे तरी विकसित होत असली पाहिजे."(केतकर: २०१६:१३)

मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याचा फायदा :

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने काय बदल होतील, असे कुतूहल आज प्रत्येकाच्याच मनात आहे. भाषा संवर्धनासाठी या दर्जाचा फायदा होतो. मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करणे शक्य होते. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय केली जाते. प्राचीन ग्रंथ अनुवादित करता येतात. महाराष्ट्रातील सर्व १२,००० ग्रंथालयांना सशक्त करण्यासाठी मदत होईल. मराठी उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी आदींना भरीव मदत मिळेल, परंतु हे सर्व करण्यासाठी हवा तेवढा निधी मिळवण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती पणाला लावावी लागेल. आज तरी मराठीच्या कलशाची अभिजात घटस्थापना करत असताना केंद्र सरकारच्या निवेदनात म्हटले आहे की, अभिजात भाषा म्हणून दर्जा दिल्याने त्या भाषेत विशेषतः शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रांत रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. अभिजात भाषांतील प्राचीन ग्रंथांचे जतन, दस्तऐवजीकरण व डिमिटायझेशन भाषांतर, प्रकाशन आणि डिजिटल मीडियामध्ये नोकऱ्या निर्माण होतील. अभिजात भाषा दर्जामुळे त्या भाषेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर सांस्कृतिक आणि शैक्षणिक प्रभाव वाढण्यास मदत होणार आहे. तसेच तरुणांना मराठीकडे वळविण्यासाठी अनेक प्रकल्पही राबविता येतील. हे सर्व खरे असले, तरी भाषेचा प्रश्न अस्मितेपेक्षाही ती भाषा बोलणाऱ्या माणसांच्या अस्तित्वाशीच जास्त निगडित आहे. भाषा नुसती ओठातून येऊन चालणार नाही, तर ती पोटातून यायला हवी. यासाठी ती भाषा बोलणाऱ्या माणसांचे पोट भरण्याचे सामर्थ्य त्या भाषेत निर्माण करायला हवे. ती उद्योगाची आणि रोजगाराची भाषा व्हायला हवी.

'अभिजात' भाषेचे निकष :

'अभिजात' हा दर्जा मिळण्यासाठी, संबंधित भाषेच्या साहित्याचा इतिहास हा किमान १५०० ते २००० वर्षे प्राचीन असावा लागतो. या भाषेतील प्राचीन साहित्य हे महत्त्वाचे, मौल्यवान असावे. भाषेला स्वतःचे स्वयंभूपण असावे, ती कोणत्या भाषेतून उसनी घेलेलेली नसावी. प्राचीन भाषेचे स्वरूप हे सध्याच्या भाषेपासून वेगळे असावे, हे चारही निकष मराठीने सप्रमाण सिद्ध केल्यानेच आज तिच्यावर 'अभिजात' मराठीपणाची मोहोर उमटली आहे. समस्त मराठी जनांना अभिमान वाटावा, असा ऐतिहासिक निर्णय आज मोदी सरकारने घेतला आहे, ही घटना महाराष्ट्रातील आणि जगभरात पसरलेल्या लक्षावधी मराठी भाषिकांसाठी आनंददायी आहे. या निमित्ताने मराठी भाषेसाठी आणि ती ज्ञानभाषा व्हावी यासाठी ज्यांनी आपली उभी हयात कापरासारखी जाळली त्या ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी, "देशी वाङ्मयाच्या विकासाकडे ब्रिटिश सरकारचे लक्ष नाही. इतकेच नाही तर आमच्या पुढाऱ्यांचेही लक्ष नाही. वाङ् मय विकास आणि वाचन विकास याबाबत राजकीय पुढारी अगदीच बेफिकीर आहेत. याकडे सर्वच पुढाऱ्यांचे इतके दुर्लक्ष आहे, की अशा सर्वांचे वेळोवेळी कान उपटण्यासाठी एक स्वतंत्र माणूस नियुक्त केला पाहिजे." हे उद्गार काढले होते. यापुढे मात्र 'कान उपटणाऱ्या विद्वानांची' गरज लागणार नाही अशी अपेक्षा करूया. साहित्यिक, कलावंत, शासन, विविध संस्था यांच्या माध्यमातून मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न झाले असले, तरी दिवंगत अभ्यासक हरी नरके यांनी समितीचे काम नीट पार पडावे यासाठी घेतलेले कष्ट या क्षणी नजरेआड करता येणार नाही.

मराठीच्या अभिजात दर्जामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर तिचा प्रभाव वाढेल. हे सारे छानच आहे मात्र, हे सर्व जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे आपोआप होईल; असे मानण्याचे कारण नाही. कोणतीही भाषा जागतिक स्तरावर पसरण्यासाठी त्या भाषेत ज्ञानाची निर्मिती होणे आवश्यक असते. आज बहुतांश ज्ञान इंग्रजी भाषेत आहे. कारण वेगवेगळे शोध इंग्रजी भाषा बोलणाऱ्यांनी लावलेले आहेत. उद्या मराठीला ते वैभव लाभायचे असेल तर विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्र यात नवनवे शोध मराठी भाषकांनी लावले पाहिजेत. जगाला त्यांच्या भाषांमध्ये मराठी शब्द सामावून घ्यावे लागतील किंवा त्यासाठी प्रतिशब्द तयार करावे लागतील, असे मूलभूत संशोधन इथे व्हावे लागेल. बाजारपेठेत दिमाखात उभी ठाकल्याशिवाय भाषेचे तेज वाढणार नाही. त्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठांपर्यंत आणि ग्रंथालयांपासून ते प्रयोगशाळांपर्यंत सर्वदूर धोरणात्मक बदल करावे लागतील. हे सर्व बदल आत्मसात करून मायमराठीच्या या नव्या बिरुदासाठी अवघ्या मराठी जनांना आता सिद्ध व्हावे लागेल.

समारोप :

प्रत्येकाला भाषिक आणि सांस्कृतिक अस्मितेची गरज असते. मराठी माणूस मात्र, आज आपली ठिकठिकाणची ओळख पुसत चाललेला असताना आनंदून जावे, आपल्या भाषेचा अभिमान वाटावा असा क्षण अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी माणसाच्या वाट्याला आला आहे. यापुढे प्रत्येकानेच व्यक्त होताना किमान आपली भाषा अभिजात आहे, याचे भान राखण्याची आवश्यकता आहे. सभा, संमेलनांवर पैसे खर्च न करता मराठीचे अध्यापन आणि अध्ययन व्हावे, मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, तसेच कार्यालयीन व्यवहारातही मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. यापुढे तरी मराठीची हेळसांड आटोपती घेऊन अभिजात दर्जाला शोभेसा मायमराठीचा वापरही अभिजात प्रकारे करूया. हाच मराठी भाषेचा उचित गौरव व मराठी संस्कृतीचा खरा सन्मान आहे.

संदर्भसूची :

१. भागवत दुर्गा, राजारामशास्त्री भागवत निवडक साहित्य खंड-१, वरदा प्रकाशन, पुणे,१९८०, पृष्ठ- ७-८.

२. केतकर श्री. व्यं, प्राचीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, २०१६ पृष्ठ - २१.

३. महावंश, १२, ओल्डेनबर्ग, विनयपिटक, पृष्ठ -३१४.

४.तत्रैव,पृष्ठ.१३.

अभिजात मराठी: ज्ञानभाषा

डॉ. बापूराव भगवानराव पवार
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर.

प्रस्तावना

मानवाच्या विकासामध्ये भाषा हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. भाषेच्या निर्मितीचे श्रेय जरी मानवाचे असले तरी मानवाची सर्व जडणघडण भाषेमुळे होते. आज जगाचा जो काही विकास झालेला आहे त्यामध्ये भाषा हा घटक अतिशय महत्त्वाचा आहे, मग ती भाषा कोणतीही असो. जगात जवळपास सात हजार भाषा बोलल्या जातात. भारताच्या बाबत भाषेचा विचार करायचा झाला तर भारत हा जगातील एक बहुभाषिक देश म्हणून ओळखला जातो. भारतात अनेक भाषा बोलल्या जातात परंतु भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये २२ भाषांचा समावेश करण्यात आलेला आहे. या २२ भाषापैकीच मराठी ही एक महत्त्वाची भाषा आहे. भारताचा विविध भाषा बोलणाऱ्या लोकसंख्येबाबत विचार केल्यास हिंदी आणि बंगाली नंतर मराठी भाषेचा तिसरा क्रमांक लागतो. देशातील जवळपास ९ कोटी लोक मराठी भाषेचा वापर करतात. यावरून मराठी भाषेचे महत्त्व आपणास लक्षात येते.

भारतात जी घटक राज्य निर्माण करण्यात आलेली आहेत त्याचा मूळ पायाच भाषा आहे. फजल आली कमिशनने सुचवलेल्या सूचनेनुसार भारतात भाषावार प्रांतरचना करण्यात आली. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे राज्य म्हणून महाराष्ट्राची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. त्यानंतर पुढे मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा १९६२ साली मिळाला. त्यानंतर मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात भाषेच्या दर्जा मिळाला. त्यामुळे मराठी भाषेला अधिक संपन्न करण्याची व तिला ज्ञानभाषा म्हणून विकसित करण्याची जबाबदारी मराठी भाषिकावर आहे.

मराठी भाषेचा थोडक्यात इतिहास

मराठी भाषा ही इंडो-युरोपियन भाषा कुलातील एक भाषा आहे. मराठी भाषेचा उगम हा सर्वसाधारणपणे संस्कृत - प्राकृत -अपभ्रंश असा आहे. महाराष्ट्र प्राकृत भाषा इ. स. पूर्व ५०० ते इ स. ५००, अपभ्रंश भाषा इ. स.६०० ते९०० आणि प्रारंभिक मराठी इ. स. ९०० ते १००० असा भाषेचा सर्वसाधारण विकासक्रम आहे. मराठी भाषेचा लिखित पुरावा म्हणून इ. स. ९८३ चा श्रवणबेळगोळचा शिलालेख ओळखला जातो. यानंतर पुढे ११ व्या शतकामध्ये मराठी भाषेला ग्रंथरूप प्राप्त झाले आद्यकवी मुकुंदराज यांनी 'विवेकसिंधू' नावाचा काव्यग्रंथ लिहिला. त्यानंतर चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाची स्थापना केली. या पंथातील म्हाइभट्ट, महदंबा, केसोबास इत्यादी महानुभाव संप्रदायाच्या अनुयायांनी विविध ग्रंथ लिहून मराठी भाषेला ग्रंथात स्थान मिळवून दिले. यानंतर महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा उदय झाला आणि मराठी भाषा ही ज्ञानभाषा म्हणून विकसित होण्यास सुरुवात झाली. वारकरी संप्रदायात प्रामुख्याने संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, समर्थ रामदास, संत जनाबाई अशा अनेक संतांनी मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. त्यानंतर पुढे पंडितांनी ही काही प्रमाणामध्ये का असेना परंतु संस्कृत ग्रंथातील ज्ञान मराठी भाषेत आणण्याचा प्रयत्न केला. शिवकाळात छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेतून राज्यकारभार चालवला त्यामुळे त्यांच्या काळात मराठी भाषेला राजाश्रय मिळून विशेष महत्त्व प्राप्त झाले.

भारतात इंग्रजांच्या आगमनानंतर शिक्षणाचा प्रसार झाला तसेच इंग्रजी साहित्याचाही परीचय झाला आणि आधुनिक प्रकारचे साहित्य मराठी भाषेमध्येही निर्माण होण्यास सुरुवात झाली. मुद्रण कलेच्या विकासामुळे मराठी भाषेला मोठ्या प्रमाणात ग्रंथात स्थान मिळाले. स्वतंत्र्यानंतर मराठी भाषेमध्ये अनेक साहित्यिक लेखकांनी मोठ्या प्रमाणात भाषा समृद्ध करण्याचे कार्य केले. वि. स. खांडेकर, वि. वा. शिरवाडकर, विं. दा. करंदीकर व भालचंद्र नेमाडे या मराठी साहित्यिकांना मराठी भाषेतील साहित्यिक योगदानाबद्दल 'ज्ञानपीठ' सारखा मानाचा पुरस्कारही प्राप्त झाला. या सर्वांचा परिणाम म्हणून आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेला आहे.

ज्ञानभाषा म्हणजे काय ?

ज्ञान ही संज्ञा तशी खूपच व्यापक आहे, परंतु थोडक्यात सांगायचे झाले तर सत्य, तत्व, अनुभव किंवा निरीक्षण यावर आधारित योग्य ती समज म्हणजे ज्ञान होय. ज्ञानभाषा म्हणजे अशी भाषा ज्यातून ज्ञानाची निर्मिती, प्रसार आणि उपयोग केला जातो. तसेच शिक्षण, तत्त्वज्ञान, साहित्य, राजव्यवहारव व संशोधन, वैज्ञानिक संकल्पना, तांत्रिक माहिती, यांची शास्त्रीय पद्धतीने मांडणी करता येते अशा भाषेला ज्ञानभाषा म्हटले जाते. ज्ञानभाषेचा विचार

करत असताना सर्वसाधारणपणे ज्या भाषेत विपुल शब्दसंपदा आहे, संशोधन पर लेखन करता येते, शब्दाच्या माध्यमातून स्पष्ट आणि अचूक अभिव्यक्ती करता येते, नवनवीन शब्द आणि संकल्पना निर्माण करण्याची क्षमता असणाऱ्या भाषेला ज्ञानभाषा म्हणून संबोधले जाते. ज्ञानभाषा ही प्रामुख्याने ज्ञानाच्या अभिव्यक्तीचे आणि प्रसाराचे प्रमुख साधन असते. त्यामुळे कोणत्याही भाषेचा विकास होण्यासाठी तिला ज्ञानभाषेचा दर्जा मिळणे हे अत्यंत आवश्यक आहे.

मातृभाषा व ज्ञानभाषा

माणसाच्या जडणघडणीमध्ये मातृभाषा व ज्ञानभाषा खूप महत्वाच्या आहेत, कारण मातृभाषेतून घेतलेले ज्ञान हे अगदी सहजपणे आणि पूर्णपणे आत्मसात करता येते. त्यामुळेच नवीन शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षण घेण्याचा विचार पुढे आलेला आहे. मातृभाषा म्हणजे जी भाषा आपण आईकडून बोलावयास शिकतो किंवा लहानपणापासून बोलतो ती भाषा होय. ज्या लोकांची मातृभाषा आणि ज्ञानभाषा एकच असते अशा लोकांचा विकास अधिक चांगल्या प्रकारे झालेला दिसतो. भारतात ज्ञानभाषेच्या बाबतीत विचार करायचा झाला तर मातृभाषेपेक्षा इंग्रजी भाषेला अधिक महत्त्व दिलेली आहे. त्यामुळे इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याचा कल वाढलेला आहे. याचा परिणाम म्हणून मातृभाषेचे महत्त्व कमी होऊ लागलेले आहे. भाषेच्या बाबतीत विचार केला तर प्रत्येक भाषेमध्ये व्यवहार भाषा किंवा ज्ञानभाषा होण्याची अंगभूत क्षमता असते परंतु ही क्षमता संबंधित भाषिक समाजाकडून कशा पद्धतीने विकसित केली जाते त्यावर त्या भाषेचे स्थान अवलंबून आहे. त्यामुळे भाषेचा जितका जास्त वापर केला जाईल तितका तिचा विकास अधिक प्रमाणात होतो. त्यामुळे भाषेचे अस्तित्व किंवा तिचा ज्ञानभाषा म्हणून विकास होण्यासाठी त्या भाषेचा वापर समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये होणे गरजेचे आहे. त्यामुळे आज मराठी मातृभाषा म्हणून व ज्ञानभाषा म्हणून कोणत्या अवस्थेतून जात आहे यावर सखोल संशोधन होणे गरजेचे आहे.

ज्ञानभाषा म्हणून मराठी भाषेचे योगदान

मराठी भाषेच्या उगमापासून आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येते की, मराठी भाषा सुरुवातीच्या काळापासूनच म्हणजे संत साहित्यापासून ज्ञानभाषा म्हणून विकसित होण्यास सुरुवात झाली होती. संतांनी आपल्या साहित्यातून मराठी भाषेला लोकाभिमुख ज्ञानभाषा म्हणून स्थापित करण्यास अतिशय सक्षमपणे सुरुवात केली होती. संतांनी लिहिलेल्या साहित्याचा अनुवाद विविध देशी व विदेशी भाषांमध्ये झालेला आहे. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे भाषांतर हिंदी, संस्कृत, इंग्रजी, जपानी इत्यादी भारतीय व परकीय भाषामध्ये झालेले आहे. तसेच संत तुकारामांच्या काही निवडक अभंगांचे भाषांतर इंग्रजी, फ्रेंच, जर्मन तसेच अनेक भारतीय भाषांमध्ये झालेले आहेत. समर्थ रामदासांनी लिहिलेल्या दासबोध या ग्रंथाचेही इंग्रजी, हिंदी, गुजराती, कन्नड, तेलगू, तमिळ या भाषेमध्ये भाषांतरे झालेली आहे. यावरून असे लक्षात येते की, सुरुवातीच्या मराठी भाषेमध्ये जे ज्ञान निर्माण झाले त्या ज्ञानाची दखल इतर भाषिकांनासुद्धा घ्यावी लागली, ही मराठी भाषेसाठी अतिशय अभिमानाची गोष्ट आहे.

नंतरच्या काळामध्येही महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक यांचे अनेक वैचारिक ग्रंथ विविध भारतीय व परकीय भाषेतून भाषांतरित झालेले आहेत. या थोर व्यक्तींनी मराठी भाषेत आपल्या ग्रंथातून मांडलेले विचार समाज हिताच्या दृष्टिकोनातून जगाला दखल घ्यायला लावणारे असे ठरले. त्यानंतरच्या काळातही वि. स. खांडेकर, शिवाजी सावंत, लक्ष्मण माने, राजेंद्र भोसले, बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ, शरणकुमार निंबाळे यासारख्या लेखकांच्या साहित्यकृतींचे विविध भाषात भाषांतर झालेली आहेत. याचा अर्थ मराठी भाषेतून जे विचार, तत्त्वज्ञान, संशोधन झालेले आहे, ते उत्कृष्ट दर्जाचे आहे म्हणूनच त्याची दखल इतर भाषिकांना घ्यावी लागली. मराठी संत साहित्यातील समता, भक्ती, मानवता आणि नीतिमूल्य यांचा प्रसार मराठी भाषेतून इतर भाषेत झाला. मराठीतील साहित्यकृतींचे इतर भाषांमध्ये भाषांतर झाल्यामुळे मराठी भाषेतील साहित्य व साहित्यिकांना देश-विदेश पातळीवर मान्यता मिळाली. भाषांतरामुळे विचारांची तसेच सांस्कृतिची देवाण-घेवाण झाली. यामुळे मराठी भाषा इतर भाषिक प्रदेशातील विद्यापीठांमध्ये ही अभ्यासली जाऊ लागली आहे. म्हणून मराठी भाषा प्रादेशिक न राहता तिचा विस्तार देश-विदेश पातळीवर होऊ लागला आहे.

मराठी ज्ञानभाषेची सद्यस्थिती

मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या ही जवळपास नऊ कोटीच्या आसपास आहे. म्हणजेच जगातील काही देशांपेक्षा मोठ्या असलेल्या महाराष्ट्र राज्याची मराठी ही अधिकृत लोकभाषा व राजभाषा आहे. तरीही आज मराठी भाषेचा म्हणावा तितका विकास होताना दिसत नाही. मराठी भाषा ही आज नामशेष होण्याच्या मार्गावर नसली तरीही ती पूर्णपणे सुरक्षित आहे असे म्हणणे धाडसाचे होईल. साहित्य व्यवहारांमध्ये या भाषेचे अस्तित्व चांगले आहे, असे वाटत असले तरी साहित्य व्यवहारापलीकडे या भाषेची अवस्था कशी आहे याकडे फारसे लक्ष जाताना दिसत

नाही. मराठी भाषा ही किती लोकांकडून बोलली जाते त्यापेक्षा ती कोणकोणत्या व्यवहार क्षेत्रामध्ये वापरली जाते यालाही महत्त्वाचे स्थान असते अलीकडच्या काळामध्ये इंग्रजी भाषेला अधिक महत्त्व देत गेल्यामुळे मराठी भाषेची सद्यस्थिती कशी आहे याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

१) शिक्षणातील मराठी भाषेचे स्थान

गेल्या पंधरा-वीस वर्षात इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढले. इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे म्हणून त्याच भाषेतून ज्ञानार्जन करावे अशा प्रकारचा एक गैरसमज समाजात पसरला. या गैरसमजातून ज्ञानाचा दर्जा खालावला गेला व तो माहितीच्या स्तरावर आला. येवढेच नाहीतर न समजून घेता घोकमपट्टी करण्याची पद्धत सुरू झाली, त्यामुळे शिक्षण घेणारा विद्यार्थी ज्ञानापासून परावृत्त होत गेला. परिणामी शिक्षणाचा उद्देशीही बाजूला पडला गेला. त्यामुळे आपल्याच मातृभाषेतून ज्ञानाची निर्मिती करणे व ते मातृभाषेतूनच ग्रहण करणे हा शिक्षणाचा सर्वोत्कृष्ट मार्ग आहे

मराठी माध्यमातून शिक्षण घेण्यासाठी प्रसंगी इतर भाषेतून ज्ञानाची भाषांतर मराठीत करून शिकणे हा मार्ग इंग्रजीतून शिक्षण घेण्यापेक्षा कधीही चांगला होऊ शकतो. परंतु असेही फारसे होताना दिसत नाही. नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार मातृभाषेतून शिक्षण घेण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे भविष्यात मराठी भाषेतून शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे हे मराठी ज्ञानभाषा म्हणून विकसित होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरेल असे वाटते.

२) प्रशासकीय व्यवहारात मराठी

भारतीय राज्यघटनेने कलम ३४५ नुसार सर्व राज्यांना आपल्या राज्याची व्यवहार भाषा ठरवण्याचा अधिकार दिला, त्यानुसार महाराष्ट्र सरकारने मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा दिला. सरकारी कार्यालये, निमसरकारी कार्यालये, न्यायव्यवस्था, शिक्षण, विधानमंडळापासून ते ग्रामपंचायतीपर्यंतच्या सर्व कार्यालयातील पत्रव्यवहार, सरकारी परिपत्रके, अर्ज, नोंदी, अहवाल, निवेदने, जाहीरनामे इत्यादीत सर्वत्र मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक करण्यात आला. परंतु आजही सर्वच क्षेत्रांमध्ये मराठीचा भाषेचा वापर केला जातो असे नाही. न्यायव्यवस्था, बँका, उच्चस्तरीय प्रशासकीय कार्यालये यामध्ये आजही इंग्रजीचा वापर सरासपणे सुरू आहे. काही कार्यालयांमध्ये इंग्रजी भाषेला पर्याय म्हणून मराठी भाषांतर दिले जाते, परंतु महाराष्ट्रात तरी सर्व प्रशासकीय व्यवहार हा मराठीत होणे आवश्यक आहे.

३) माहिती तंत्रज्ञानातील मराठीचा वापर

आजचे युग हे डिजिटल युग म्हणून ओळखले जाते. त्यामुळे मराठी भाषेचा वापर याही क्षेत्रात चांगल्या पद्धतीने होणे आवश्यक आहे. विशेषतः संगणक आणि मोबाईल क्षेत्रामध्ये आज काही सॉफ्टवेअर विकसित झालेले आहेत, तसेच मराठी की-बोर्ड ही विकसित झालेले आहेत. शासकीय संकेतस्थळे यांचाही विकास मराठी भाषेतून चांगल्या पद्धतीने झाला आहे. विकिपीडिया, गुगल ट्रान्सलेट, युट्युब, चॅट जीपीटी यासारख्या सेवांमध्येही मराठी भाषेचा वापर होण्यास सुरू झाले आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सॲप या समाज माध्यमातही मराठी भाषेचा वापर होऊ लागला आहे. ई-लर्निंगच्या माध्यमातून शालेय व महाविद्यालयीन शैक्षणिक साहित्य मराठी भाषेतून उपलब्ध होऊ लागले आहे. याचबरोबर अनेक प्रकारचे साहित्य लिखित तसेच ऑडिओ- व्हिडिओ स्वरूपातही उपलब्ध करून देण्यात येऊ लागले आहे. त्याचबरोबर कृत्रिम बुद्धिमत्ता यातही काही प्रमाणात मराठी भाषेला स्थान मिळू लागले आहे. एकूणच या डिजिटल युगामध्ये मराठी भाषेला काही प्रमाणात स्थान मिळू लागले आहे तरी ज्ञानभाषा म्हणून मराठी भाषेला विकसित करण्यासाठी खूप वाव आहे.

५) साहित्य क्षेत्रातील मराठी भाषा

संत साहित्य, पंडित साहित्य, शाहिरी साहित्य, आधुनिक साहित्य व साठोत्तरी साहित्य यांनी मराठी भाषेला ज्ञानभाषा म्हणून रुजवण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे. अलीकडच्या काळामध्ये काही अपवाद वगळता ज्ञानभाषा निर्माण करण्याची क्षमता असणारे साहित्य किती लेखकाकडून निर्माण केले जाते हा ही संशोधनाचाच विषय आहे. त्यामुळे साहित्याच्या माध्यमातून मराठी भाषेला ज्ञानभाषा म्हणून विकसित करण्याची मोठी जबाबदारी आजच्या मराठी साहित्यिकावर आहे.

वरील घटकांचा विचार केला असता असे लक्षात येते की, आज काही बाबतीत मराठी भाषा ज्ञानभाषा म्हणून अस्तित्वात आहे. तरी विज्ञान व तंत्रज्ञान, संशोधन तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्ञानभाषा म्हणून पूर्ण क्षमतेने विकसित होण्यासाठी मराठी भाषिकांना मोठे योगदान द्यावे लागणार आहे.

सारांश

ज्ञानभाषा म्हणून मराठीचा विचार करत असताना यामध्ये अनेक सुधारणा होणे आवश्यक आहेत. जरी मराठी भाषेला ज्ञान भाषेची परंपरा असली तरी अलीकडच्या काळामध्ये वाढते इंग्रजीचे महत्त्व तसेच शासन व्यवस्थेची व

मराठी भाषेतील ज्ञानवंतांची मानसिकता ही मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी पाहिजे तितक्या प्रमाणात असलेली दिसत नाही. मराठी भाषेतून उच्च शिक्षण हे आजही साहित्यकेंद्रीच आहे. त्यात साहित्यतर व उपयोजित विषयांचा फारसा समावेश झालेला नाही. त्याचबरोबर विज्ञान आणि तंत्रज्ञान, संशोधनया क्षेत्रांमध्ये मराठी भाषेमध्ये खूप काही करण्यासारखे आहे. त्यामुळे मराठी भाषा ही सर्वर्थाने शिक्षणाची व ज्ञान निर्मितीची भाषा म्हणून विकास करण्याची जबाबदारी सर्व मराठी भाषिकासमोर आहे. मराठी भाषेला ज्ञानभाषा म्हणून विकसित करण्यासाठी तसेच तिच्या वापराला प्रोत्साहन देऊन तिच्या विकासासाठी प्रयत्न गरजेचे आहे. मराठी भाषेचा समृद्ध वारसा पुढे चालवून, मराठी भाषेला मिळालेल्या अभिजात भाषेच्या दर्जाचाही उपयोग करून मराठी भाषेला ज्ञानभाषा म्हणून विकसित करण्यासाठी सर्व मराठी भाषिकांनी योगदान देणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ

१) भाषा इतिहास आणि भूगोल - डॉ. ना. गो. कालेलकर
२) निवडक भाषा आणि जीवन - कल्याण काळे
३) भाषा व्यवहार व भाषा शिक्षण - सुरेंद्र ग्रामोपाध्य
४) न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा - संपादन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
५) प्रशासनिक मराठी भाषेचा विकास - गीता भागवत
६) ज्ञानभाषा मराठी - प्रा. शरद पाटील
७) मराठी ज्ञानभाषा :स्थिती आणि दिशा -डॉ. माधव गाडगीळ
८) मराठी भाषा आणि माहिती तंत्रज्ञान - महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्था

मराठी भाषेचे भवितव्य

डॉ. विठ्ठल शंकर केदारी
सहयोगी प्राध्यापक व प्रमुख मराठी विभाग
राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्लेधारूर, जिल्हा – बीड

प्रस्तावना

मराठी भाषेची महती विविध लेखकांनी सांगितली आहे. प्रामुख्याने संस्कृत, प्राकृत व आधुनिक कालखंडातून बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेच्या विविध बोलीभाषांतून लेखन करणाऱ्या लेखकांनी गौरवोद्गार काढलेले आहेत. प्रारंभी "माझा मराठाचि बोलु कौतुकें। परी अमृतातेहि पैजा जिंके।।" असे म्हणत संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचा महिमा सात शतकांपूर्वी गायला. मराठी ही केवळ महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा नसून ती या मातीचा श्वास, संस्कृती आणि समृद्ध परंपरेचा आरसा आहे. कोणत्याही जिवंत समाजाची ओळख त्याच्या भाषेतून होत असते. जागतिक स्तरावर मराठी ही सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या क्रमवारीत १५ व्या क्रमांकावर आहे, ही बाब निश्चितच अभिमानास्पद आहे. परंतु आजच्या काळात २१ व्या शतकातील जागतिकीकरण, उदारीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रसारामुळे मानवी जीवनशैलीत आमूलाग्र बदल झाले आहेत. या बदलांचा सर्वाधिक परिणाम भाषांवर झाला आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात इंग्रजी भाषेचे वाढते महत्त्व, रोजगाराच्या संधी आणि कॉन्व्हेंट संस्कृतीच्या प्रभावामुळे मराठी भाषेच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे की काय, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

एकीकडे मराठीला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळणे हा आनंदाचा विषय ठरत असतानाच, दुसरीकडे मराठी शाळांची घटणारी संख्या ही चिंतेची बाब ठरत आहे. या पार्श्वभूमीवर, मराठी भाषेचे भवितव्य नेमके कसे असेल? ती केवळ बोलीभाषा म्हणून उरेल की ज्ञानभाषा म्हणून आपले स्थान टिकवून ठेवेल? या प्रश्नांचा ऊहापोह करणे काळाची गरज बनली आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून मराठी भाषेपुढील आव्हाने, संधी आणि तिच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

सद्यस्थिती आणि आव्हाने

मराठी भाषेची सद्यस्थिती ही एका विचित्र द्वैतात अडकली आहे. एका बाजूला भाषेचा विस्तार होतोय, तर दुसऱ्या बाजूला तिचा दर्जा आणि वापर यावर मर्यादा येत आहेत.

सद्यस्थिती

लोकसंख्या आणि व्याप्ती जगभरात ९ कोटींहून अधिक लोक मराठी बोलतात. भारतातील ही तिसरी सर्वात मोठी भाषा आहे.

साहित्यिक वारसा

दरवर्षी हजारो मराठी पुस्तके प्रकाशित होतात. 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' आणि इतर प्रादेशिक संमेलनांतून भाषेचा उत्साह दिसून येतो.

अभिजात दर्जा: केंद्र सरकारने मराठीला 'अभिजात भाषेचा' दर्जा दिल्यामुळे संशोधनाला नवीन वाटा मिळाल्या आहेत.

मनोरंजन क्षेत्र

मराठी चित्रपट (उदा. सैराट, कोर्ट) आणि वेब सिरीज जागतिक स्तरावर नावाजल्या जात आहेत.

प्रमुख आव्हाने

भाषेच्या प्रवासात काही अडथळे निर्माण झाले आहेत, जे पुढीलप्रमाणे आहेत.

इंग्रजीचे भाषिक आक्रमण

जागतिकीकरणामुळे इंग्रजी ही रोजगाराची आणि उच्च शिक्षणाची भाषा बनली आहे. त्यामुळे पालकांचा कल आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमात घालण्याकडे वाढला आहे. परिणामी, नवीन पिढीला मराठी नीट बोलता येते, पण वाचता किंवा लिहिता येत नाही.

'हिंग्लिश' किंवा 'मराठी-इंग्रजी' संकर

दैनंदिन संवादात अस्खलित मराठी बोलण्याचे प्रमाण कमी झाले आहे. मराठी वाक्यांमध्ये इंग्रजी शब्दांचा अतिवापर (उदा. "मी कन्फ्युज आहे" ऐवजी "माझा गोंधळ झाला आहे" हे न वापरणे) भाषेची मौलिकता कमी करत आहे.

मराठी शाळांची बिकट अवस्था

गावोगावी असणाऱ्या मराठी शाळांची पटसंख्या घटत आहे. अनेक दर्जेदार मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, ज्यामुळे भाषेचा मूळ पायाच कमकुवत होत आहे.

तंत्रज्ञान आणि डिजिटल माध्यमातील स्थान

इंटरनेटवर मराठीमध्ये उपलब्ध असलेली माहिती इंग्रजीच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. कोडिंग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) या क्षेत्रात मराठीचा वापर अजूनही प्राथमिक स्तरावर आहे.

ज्ञानभाषेची कमतरता

विज्ञान, वैद्यकीय शिक्षण, अभियांत्रिकी आणि विधी यांसारख्या उच्च शिक्षणाच्या शाखांमध्ये मराठीचा वापर नगण्य आहे. जोपर्यंत एखादी भाषा 'पोटाची भाषा' बनत नाही, तोपर्यंत तिचा विकास होणे कठीण असते.

आशादायक पैलू

मराठी भाषेचा प्रवास हा आता केवळ 'टिकून राहण्या'कडून 'विस्तारण्या'कडे वळत आहे. त्यासाठी खालील घटक कारणीभूत ठरत आहेत:

अभिजात भाषेचा दर्जा

केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे भाषेच्या इतिहासावर आणि स्वरूपावर संशोधन करण्यासाठी मोठे दालन खुले झाले आहे. यामुळे विद्यापीठांमध्ये मराठीसाठी विशेष शोधकेंद्रे, ग्रंथालये आणि अनुवादाचे प्रकल्प सुरू होतील, ज्यामुळे भाषेला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळेल.

डिजिटल माध्यमांतील भरारी

तंत्रज्ञानाने भाषेला नवीन व्यासपीठ दिले आहे.

सोशल मीडिया

फेसबुक, इन्स्टाग्राम आणि ट्विटरवर मराठीचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. ग्रामीण भागातील प्रतिभेला या माध्यमांमुळे हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे.

ई-बुक्स आणि पॉडकास्ट

'किंडल' सारख्या माध्यमांमुळे जगभरातील मराठी वाचकांना एका क्लिकवर पुस्तके उपलब्ध होत आहेत. मराठी पॉडकास्टच्या माध्यमातून वैचारिक आणि माहितीपर चर्चा तरुण पिढीपर्यंत पोहोचत आहेत.

जागतिक मराठी डायस्पोरा

आज नोकरी आणि व्यवसायानिमित्त मराठी माणूस अमेरिका, युके, ऑस्ट्रेलिया आणि दुबई अशा अनेक देशांत स्थायिक झाला आहे. तिथे राहणारी ही मराठी माणसे 'मराठी मंडळ' आणि मराठी शाळांच्या (उदा. 'मराठी शाळा' उपक्रम) माध्यमातून आपली भाषा पुढच्या पिढीपर्यंत जाणीवपूर्वक पोहोचवत आहेत.

ओटीटी (OTT) आणि मनोरंजन सृष्टीचा विस्तार

नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राईम आणि डिस्ने-हॉटस्टार यांसारख्या प्लॅटफॉर्मवर मराठी चित्रपट आणि वेब सिरीज केवळ मराठीच नाही, तर अमराठी प्रेक्षकही आवडीने पाहत आहेत. यामुळे मराठी भाषेचे सौंदर्य आणि बोलीभाषांमधील विविधता (उदा. अहिराणी, मालवणी, वऱ्हाडी) सर्वदूर पोहोचत आहे.

प्रशासकीय आणि कायदेशीर सक्ती

महाराष्ट्र शासनाने दुकानांच्या पाट्या मराठीत करणे, शाळांमध्ये १० वी पर्यंत मराठी विषय सक्तीचा करणे आणि न्यायालयीन कामकाजात मराठीचा वापर वाढवणे यांसारखे निर्णय घेतल्यामुळे मराठीचे व्यवहारातील स्थान भक्कम झाले आहे.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी उपाययोजना

मराठी भाषेचे भवितव्य केवळ सरकारी निर्णयांवर अवलंबून नसून, ते लोकसहभाग आणि आधुनिकतेच्या स्वीकारावर अवलंबून आहे. भाषेच्या संवर्धनासाठी खालील उपाययोजना प्रभावी ठरू शकतात.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी उपाययोजना

शिक्षणात आमूलाग्र बदल

त्रिभाषा सूत्र: शाळांमध्ये मराठी भाषेचे शिक्षण केवळ नावापुरते न राहता ते दर्जेदार आणि आनंददायी पद्धतीने दिले जावे.

व्यावसायिक शिक्षण

अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि विधी यांसारख्या उच्च शिक्षणाची पुस्तके आणि अभ्यासक्रम मराठीत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जेणेकरून मराठी ही केवळ 'साहित्याची' भाषा न राहता 'ज्ञानाची' भाषा होईल.

तंत्रज्ञान आणि डिजिटल साक्षरता

मराठी सॉफ्टवेअर्स

संगणक, मोबाईल आणि विविध ॲप्समध्ये मराठीचा वापर वाढवण्यासाठी मराठी कीबोर्ड आणि व्हॉइस टायपिंग अधिक सुलभ करणे.

विकिपीडिया योगदान

मराठी विकिपीडियावर जास्तीत जास्त माहिती मराठीत भरण्यासाठी तरुणांनी पुढाकार घेणे.

AI आणि चॅटबॉट्स

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मराठी भाषेतील डेटा (Datasets) विकसित करणे, जेणेकरून भविष्यातील तंत्रज्ञान मराठी सहजपणे समजेल.

रोजगाराशी सांगड

भाषिक कौशल्ये

मराठीतून उत्तम लेखन, अनुवाद (Translation) आणि मुद्रित शोधन (Proofreading) करणाऱ्यांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

शासकीय नियम

महाराष्ट्रातील खाजगी कंपन्यांमध्येही मराठीचा वापर प्रोत्साहित करण्यासाठी सवलती किंवा नियम लागू करणे.

वाचन संस्कृतीचे जतन

ग्रंथालयांचे आधुनिकीकरण

गावोगावची ग्रंथालये 'डिजिटल' करून तिथे ई-बुक्स आणि ऑडिओ बुक्सची सोय करणे.

साहित्य प्रसार

केवळ जड साहित्याऐवजी आजच्या पिढीला आवडेल असे थरार, विज्ञानकथा आणि ग्राफिक नोव्हल्स मराठीतून मोठ्या प्रमाणात प्रकाशित होणे गरजेचे आहे.

कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदारी

'मराठीत बोला' चळवळ

घरातील संवाद जाणीवपूर्वक मराठीत ठेवणे. पालकांनी मुलांमध्ये मराठी शब्दांची गोडी निर्माण करणे.

शुद्धलेखनापेक्षा संवादावर भर

सुरुवातीला भाषा शुद्ध असावी या आग्रहापेक्षा ती बोलली जावी, यावर भर दिल्यास नवीन पिढी मराठीपासून लांब जाणार नाही.

निष्कर्ष

मराठी भाषेच्या भवितव्याचा विचार करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, ही भाषा संपणारी नसून ती विस्तारणारी आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात भाषेचे स्वरूप बदलणे अटळ आहे, परंतु हा बदल म्हणजे भाषेचा ऱ्हास नव्हे, तर ते तिचे 'पुनरुत्थान' आहे. मराठी ही केवळ भावनांची भाषा राहून चालणार नाही, तर तिला 'पोटाची

भाषा' आणि 'ज्ञानाची भाषा' बनवणे ही काळाची गरज आहे. जेव्हा मराठीतून विज्ञान, व्यापार आणि तंत्रज्ञान यांचे व्यवहार होतील, तेव्हा तिचे भवितव्य अधिक सुरक्षित होईल. 'अभिजात दर्जा' मिळाल्यामुळे तिला राजमान्यता मिळाली असली तरी, तिला 'लोकमान्यता' टिकवून ठेवण्याचे आव्हान आपल्या सर्वांसमोर आहे. जर आपण आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन मराठीची अस्मिता जपली, तर ही भाषा केवळ टिकणार नाही, तर ती जागतिक स्तरावर आपला ठसा अधिक उमटवेल. "मराठी केवळ एक भाषा नाही, ती एक जगण्याची पद्धत आहे आणि जोपर्यंत मराठी माणूस आणि त्याची संस्कृती जिवंत आहे, तोपर्यंत मराठीचे भवितव्य सूर्यासारखे तेजस्वी राहील." भाषा ही मानवाला मिळालेली एक अनमोल देणगी आहे. भाषेच्या माध्यमाने लोक एकमेकांशी जोडले जाऊन परस्परांशी संवाद साधतात. संवादासाठी बोलणे, लिहिणे, वाचणे, हावभाव, इशारे किंवा मूक अभिनय अशी अनेक साधने वापरली जातात, पण भाषा हे त्यातले सर्वात शक्तिशाली माध्यम आहे. आपले विचार, भावना, मते आणि अनुभव व्यक्त करण्याचे ते एक प्रभावी साधन आहे. मराठीचा इतिहास म्हणजे महाराष्ट्राचा आणि मराठी लोकांचा हजारो वर्षांचा समृद्ध आणि संपन्न वारसा होय. या भाषेचा विविधतेने नटलेला भूतकाळ, ज्यात प्राचीन सातवाहन, यादव काळापासून ते मराठा साम्राज्याच्या सुवर्णयुगापर्यंत आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीपर्यंतचा प्रवास समाविष्ट आहे.

यात भाषा, संस्कृती आणि राजकीय घडामोडींचाही समावेश होतो. ज्याचे पुरावे शिलालेख,ताम्रपट, लोकसाहित्य आणि ऐतिहासिक कागदपत्रे यांसारख्या साधनांमधून मिळतात. मराठी भाषा सुमारे २५०० वर्षांपूर्वीची असून ती प्राकृत आणि अपभ्रंश भाषांमधून विकसित झाली आहे असे मानले जाते. नाणेघाटातील शिलालेख हे प्राचीन मराठी भाषेचे पुरावे आहेत. यादव काळात मराठी भाषेला आणि साहित्याला मोठे प्रोत्साहन मिळाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले मराठा साम्राज्य हे मराठी इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरले. ज्याचा संपूर्ण भारतावर प्रभाव पाडला. आधुनिक काळात मराठी भाषेचा विकास झाला. अनेक इतिहासकार, समाजसुधारक पुढे आले त्यांनी लोकशिक्षणासोबतच इतिहासाचे संशोधन केले. स्वातंत्र्यानंतर विविध मराठी भाषिक प्रदेशांना एकत्र आणून १ मे १९६० रोजी सध्याच्या महाराष्ट्राची निर्मिती झाली. ही या चळवळीची परिणती होती. या पद्धतीने विकसित होत आलेली मराठी भाषा असून. आज मराठी भाषेतून जागतिक पातळीवर नऊ कोटीपेक्षा अधिक लोक संपर्कासाठी वापर करतात. भारत हा पूर्णतः खेड्यांचा देश आहे. महाराष्ट्रामध्ये बोलली जाणारी मराठी भाषा ही विविध बोलीभाषांना कवेत घेऊन आजवर स्वतःचे अस्तित्व अभाधित राखून आहे. जोपर्यंत खेडी, ग्रामीण जीवन, संस्कृती, आठवडी बाजार, खेड्यापाड्या विविध प्रसंगांनी भरणाऱ्या जत्रा/यात्रा याप्रसंगी त्या त्या प्रदेशातील मराठीची बोलीभाषा संपर्क भाषा म्हणून उपयोगात येते. म्हणून जोपर्यंत ग्रामीण भाग, ग्रामीण संस्कृती आणि ग्राम जीवन अस्तित्वात आहे तोपर्यंत मराठीचे अस्तित्व अबाधित आहे असे म्हणता येते.

संदर्भ सूची

१. ग्रंथ, 'मराठी भाषेचा इतिहास' - वि. का. राजवाडे.

२. अहवाल, महाराष्ट्र शासन, भाषा संचालनालय - 'मराठी भाषेच्या विकासाचा कृती आराखडा'.

३. लेख, 'जागतिकीकरण आणि मराठीचे भवितव्य' - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले.

४. संकेतस्थळ, मराठी विकिपीडिया (mr.wikipedia.org) - मराठी भाषेची सांख्यिकी आणि सद्यस्थिती.

५. वृत्तपत्र लेख, 'लोकसत्ता' आणि 'महाराष्ट्र टाइम्स' मधील भाषाविषयक विशेष लेख आणि संपादकीय.

|महानुभाव साहित्यातील भक्ती आणि समता

डॉ.नंदकुमार शंकरराव इंगळे

मराठी विभाग प्रमुख,

मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालय,

नेरळ,ता.कर्जत,जिल्हा रायगड. 410101

मोबा. : 9822166504 Email :- nandkumaringale1978@gmail.com

|| प्रस्तावना ||

अभिजात म्हणजे जो मूळचा अगोदरचा आहे, जुना आहे, प्राचीन आहे आणि दर्जेदार आहे त्याला ढोबळमानाने अभिजात असे म्हंटले जाते. भाषेच्या बाबतीत बोलायचं झालं तर जी भाषा जुनी आहे, प्राचीन आहे, श्रेष्ठ आहे ,स्वयंभू आहे, आणि त्या भाषेमध्ये सलगपण आहे अशा भाषेला अभिजात भाषा असे म्हणता येईल.

केंद्र सरकारने आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा ३ ऑक्टोंबर २०२४ रोजी दिला आणि आपली मराठी भाषा ही श्रेष्ठ दर्जाची आणि अभिजात आहे यावर शिक्कामोर्तब झाला.

||मध्ययुगीन मराठी भाषा आणि साहित्य ||

मराठी भाषा प्राचीन आहे तिला अनेक वर्षांचा इतिहास आहे हे आता अभिजात दर्जा दिल्याने केंद्र सरकारने कागदोपत्री शिक्कामोर्तब केलेले आहे. आपल्या मराठी भाषेला प्राचीन मध्ययुगीन भाषेचा जो बाज आहे त्यामुळे मराठी भाषा प्राचीन आणि मध्ययुगीन काळापासून कशी बदलत विकास पावत गेली आणि आपला दर्जा टिकवून सर्व भाषांमध्ये श्रेष्ठत्त्व टिकवण्याचं काम आपल्या मराठी भाषेने केलेले आहे.

मध्ययुगीन मराठी भाषा ही प्राकृत आणि अपभ्रंश या भाषेतून विकसीत झाली. आपणास यादव काळ ते मराठा साम्राज्यांच्या प्रारंभापर्यंत ही साहित्याची भाषा कशी समृद्ध आहे हेही वाङ्मयाच्या इतिहासाचा अभ्यास करीत असताना आपणाला दिसून येतं. महानुभाव संप्रदायातील साहित्य, संत ज्ञानेश्वर संत नामदेव, संत एकनाथ इत्यादी अनेक संतांनी जे लेखन केलं ते इतकं प्रगल्भ होतं; त्यामुळे मध्ययुगीन काळातील भाषेत साधेपणा आणि प्राकृत भाषेचा गोडवा आपणाला दिसून येतो. याच मराठी भाषेच्या माध्यमातून महानुभावांनी, संतांनी आपली भक्ती चळवळ आणि भारुडाच्या माध्यमातून लोकशिक्षणाचा विडा उचलण्याचं काम या काळातल्या मराठी भाषेने केलेले सर्वज्ञात आहे.

मध्ययुगीन काळात यादवकाळात मराठीचा प्रशासकीय आणि साहित्यिक भाषेमध्ये सुद्धा कसा विकास होत गेला, म्हणजे विकासाची सुरुवात आपणाला यादव काळामध्ये दिसते. महानुभाव पंथ, वारकरी संप्रदाय..... यांनी मराठी भाषेला कशी श्रीमंती आणून दिली मराठी भाषा सर्व भाषांमध्ये कशी श्रेष्ठ आणि दर्जेदार आहे हे दाखवून दिले. "माझा मराठाची बोलू कौतुके तरी अमृता तेही पैजा जिंके" असे ज्ञानेश्वरांनी म्हंटले. आणि खऱ्या अर्थाने आपली मराठी भाषा ही समृद्ध आहे, हे मध्ययुगीन काळापासून महानुभव पंथ, वारकरी पंथ यांच्यापासून पुढे अनेकांनी प्रेरणा घेऊन आपल्या मराठी भाषेची उज्ज्वल परंपरा पुढे जोपासण्याचा, वाढवण्याचा प्रयत्न केला. अशा या काळातील 'महानुभाव साहित्यातील भक्ती आणि समता' याविषयी थोडक्यात विचार पुढील प्रमाणे करता येईल.

|| महानुभाव साहित्यातील भक्ती आणि समता ||

महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामी यांच्या काळात महाराष्ट्रात देवगिरीच्या यादव राजाची सत्ता होती इसवी सन ७९५ ते ११९० पर्यंत यादव राजे हे मांडलिक होते. महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधर म्हणजेच पूर्वाश्रमीचे हरपाल देव हे मूळचे गुजरातचे. वयाच्या २२ व्या वर्षी हरपाल देव एकाएकी मरण पावले. तेव्हा फलटणचे नाथ पंथीय सिद्ध पुरुष चांगदेव उर्फ चक्रपाणी यांनी त्यांच्या मृत शरीरामध्ये प्रवेश केल्याने ते पुन्हा जिवंत झाले, अशी आख्यायिका आहे. रामटेकच्या यात्रेला गेले असता हे रिद्धीपुरचे श्रीगोविंद प्रभू उर्फ गुंडम राउळ हे सिद्ध पुरुष त्यांना भेटले. त्यांच्यापासून हरपालदेवने पराशक्ती व चक्रधरू या नावाचा स्वीकार केला. असे ह. श्री. शेणोलीकर आपल्या 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप' या ग्रंथांमध्ये लिहितात.

हरपाल देवाचे चक्रधर हे नामकरण झाल्याने त्यांनी महानुभव पंथामध्ये बदल केलेला दिसून येतो. महानुभाव पंथाचे प्रवर्तक, प्रमुख चक्रधर यांनी सुरुवातीला मराठी मध्ये बोलण्याचा आणि लिहिण्याचा आग्रह धरला. अनेक विद्वान संस्कृत पंडित चक्रधरांच्या संपर्कात आले आणि त्यांचं पांडित्य गळून पडलं. संस्कृतच्या भाषेचा विचार न करता मराठीमध्येच लिहू बोलू लागले. त्यामध्ये माहिमभट्ट हा संस्कृत पंडित चक्रधरांच्या संपर्काने अस्सल मराठमोळा झाला.

महानुभाव पंथ हा द्वितीय मताचा भक्ती संप्रदाय आहे. जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर अशा चार वस्तू ते स्वतंत्र आणि नित्य मानतात. वारकरी संप्रदायाच्या अगोदर महानुभाव पंथ उदयाला आला. या महानुभाव पंथाने आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी त्यांनी जे लेखन केले त्यातूनच गद्य आणि पद्य असे वाङ्मय प्रकार निर्माण झाले. मराठीतील ही प्रारंभीची निर्मिती आहे असं वाटू नये इतका दर्जेदारपणा या महानुभाव पंथांच्या साहित्यातून दिसून येतो. म्हणूनच त्यांच्या या अभिजात निर्मितीला पुढे मराठी साहित्यात फार मोठी मोलाची मदत झाली. आपल्या मराठी भाषेला जो अभिजात दर्जा मिळाला त्याचं सुरुवातीच कारणच मुळी महानुभाव पंथाला आणि महानुभाव पंथातील मराठी लेखनाला द्यावे लागेल.

महानुभाव पंथ यांनी श्रीकृष्ण हा एकच महत्त्वाचा देव मानला. त्यामुळे श्रीकृष्ण भक्ती हा या पंथाचा स्थायीभाव आहे. महदंबेचा धवळ असेल त्या धवळयामध्ये सुद्धा श्रीकृष्णाची भक्ती आपणाला दिसून येते. श्रीकृष्ण भक्तीच्या माध्यमातून महानुभाव पंतांनी भक्तीचा साधा सोपा मार्ग जनसामान्यांपुढे ठेवला. याच भक्तीच्या माध्यमातून वारकरी पंथीयांना अज्ञ जनतेला सुज्ञ करण्याचा प्रयत्न जो ज्ञानेश्वरांच्या अगोदर झाला त्यासाठी त्यांनी जो मार्ग निवडला तो म्हणजे भक्तीचा. भक्ती ही सर्वसामान्य माणूस कोणत्याही जातीचा, धर्माचा असो त्याला भक्ती करण्याचा अधिकार आहे यावर महानुभव पंथ अधिक भर देतात.

महानुभावांचे भक्तीतत्त्वज्ञान हे जीवाचा उद्धार करण्यासाठी आहे. त्यांच्यामते जीवांच्या उद्धारासाठी परमेश्वराने अनंत अवतार घेतलेली आहेत, आणि जीवाला ज्ञान देण्यासाठी अव्यक्त असलेला जो परमेश्वर आहे ,तोच मनुष्य देह धारण करतो ही त्यांची श्रद्धा आहे. आणि हाच त्यांच्या भक्ती मार्गाचा आधार आहे आणि म्हणूनच पंचकृष्णातल्या श्रीकृष्णापासून ते पंचकृष्णातला जो पाचवा अवतार आहे श्री चक्रधर स्वामी हे सुद्धा देवच आहेत. सामान्य जनतेचा उद्धार करण्यासाठी कृष्णानेच श्रीचक्रधरांच्या रूपाने जन्म घेतलेला आहे. यावर महानुभाव पंथीयांची दृढ श्रद्धा आणि निष्ठा आहे. "ज्ञानापसि प्रेम उत्तम" म्हणजेच ज्ञानापेक्षा प्रेमाला भक्तीला मानणारा हा महानुभाव संप्रदाय आहे.

महानुभाव हा संप्रदाय उच्चनीच ,स्त्री-पुरुष भेदभाव न मानणारा असा हा संप्रदाय आहे. म्हणून भिक्षा मागताना महानुभाव पंथी आणि चारी वर्णांकडे भिक्षा मागितली जावी असा त्यांचा धर्म होता. ते त्या धर्माचं पालन करत असे. स्त्रियांना सुद्धा मानाचे स्थान महानुभाव पंथात होते. त्यांनी समाजातही सामाजिक समतेचा आदर्श निर्माण केला. स्त्री आणि शुद्रांना त्यांनी समान लेखले. जातीयता, विषमता मोडीत काढण्यासाठी महानुभव पंथांनी सामाजिक समतेचा पुरस्कार केलेला दिसतो.

मराठीतील पहिले चरित्र, पहिला इतिहास, आठवणी प्रकार निर्माण झाले ते महानुभाव पंथातच. त्याची सुरुवात महानुभाव पंथ यांनीच केली.

"लीळाचरित्र" हे मराठीतील आद्य गद्य चरित्र आहे. माहिमभट्ट हे चरित्रकार आहेत. मराठीतल्या आद्य चरित्रकाराचा मान हा माहिमभट्ट यांना द्यावा लागतो. चक्रधरांच्या जीवनावर आधारित चक्रधरांच्या आठवणी सांगणारा, चक्रधरांचे एकूण व्यक्तिमत्त्व सांगणारा असा हा "लीळाचरित्र" हा ग्रंथ आहे. म्हणूनच डॉ. शं.गो. तुळपुळे म्हणतात, "यादवकालीन धार्मिक, सामाजिक, परिस्थिती कळण्याच्या दृष्टीने "लीळाचरित्र" हा ग्रंथ विश्वसनीय असा संदर्भ ग्रंथ म्हणावा लागेल." तर "महानुभाव पंथीयांच्या दृष्टीने हा 'लीळाचरित्र' ग्रंथ म्हणजे वेदोपनिषदां इतकाच पवित्र असा ग्रंथ" आहे असे ह. श्री. शेणोलीकर यांना वाटते.

महानुभाव पंथाचा इतिहास सांगणारा ग्रंथ म्हणून "स्मृतिस्थळ" या ग्रंथाकडे पाहिले जाते. महानुभावांच्या आठवणी बरोबरच दामोदर पंडित, नरेंद्र पंडित, माहीमभट्ट यासारख्या महानुभावी आणि त्यांच्या आयुष्यातील घटनांची माहिती मिळते. त्याचबरोबर त्यांची निष्ठा त्यांचा ध्यास , त्यांचे व्यक्तिमत्त्व हेही या ग्रंथातून पाहायला मिळते. महानुभावांचे तत्त्वज्ञान सूत्र पद्धतीने मांडणारा एक महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे "दृष्टांतपाठ" होय. यातून महानुभावांच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करण्याचा काम या ग्रंथातून केलेले आहे.

महानुभाव पंथातील साहित्याचा अभिजातपणा सिद्ध करण्यासाठी आणखी एक उदाहरण द्यावे लागेल ते म्हणजे मराठीतील पहिली आद्य कवयत्री म्हणून जिचा उल्लेख केला जातो ती महानुभाव पंथातील कवयित्री महदंबा हिचा. तिने जे काव्य लिहिलं तेही वाङ्मय दृष्ट्या तितकेच दर्जेदार असे आहे. "धवळ" ही मध्ययुगीन मराठीतील एक उत्कृष्ट भावकविता आहे असं म्हटलं तर वावगे ठरू नये.

"धवळ" हा विवाहप्रसंगी गाण्याचा गीतांचा एक प्राचीन असा रचना प्रकार आहे. चक्रधर स्वामींचे गुरु गोविंद प्रभू यांना एकदा लग्न करण्याची इच्छा होती आणि त्यांनी तो तसा सोहळा घडवून आणला. सोहळयाच्या प्रसंगी आपली शिष्या असलेली महदंबा उर्फ रुपाई हिला "धवळ" रचून गायला सांगितले. या "धवळ" मध्ये श्रीकृष्ण आणि रुक्मिणी यांच्या विवाहाची कथा सांगितलेली आहे. त्यातील भाषा अतिशय साधी, सोपी आणि सहज समजणारी असल्याने आपली वाङ्मयीन महत्ता टिकून ठेवलेली आहे.

महानुभाव साहित्यातील महत्त्वाचे आणि खास असे काव्यग्रंथ म्हणजे "सातीग्रंथ" या नावाने जे प्रसिद्ध आहे त्याचं महत्त्व मराठी साहित्यामध्ये अतुलनीय आहे.

या ग्रथांची निर्मिती म्हणजे महानुभव पंथात पूजनीयमान पंचकृष्णाविषयीची निस्सीम भक्ती. या प्रेरणेतूनच हे ग्रंथ निर्माण झाले. 'रुक्मिणी स्वयंवर', 'शिशुपाल वध', 'उद्धवगीता' व 'वच्छाहरण' या ग्रंथाला भागवताचा आधार आहे. 'ज्ञानप्रबोध' हा ग्रंथ गीतेच्या १३ व्या अध्यायातील ७ ते ११ श्लोकांवरील भाष्य करणारा आहे. तर 'सह्याद्री महात्म्य' आणि 'ऋद्धीपूर' वर्णन या ग्रंथांना स्वतंत्र दर्जाचा मान आहे. "पंथनिष्ठा आणि श्रीचक्रधर भक्ती" ही या ग्रंथातून दिसून येते.

महानुभावांच्या या सातीग्रंथांचे वाङ्मयीन महत्त्व सांगताना ह. श्री. शेणोलीकर म्हणतात, "महानुभाव कवींच्या या ललित वाङ्मयात अंतकरणाचा ओलावा, बुद्धीचा प्रभाव, कल्पनेच्या भराऱ्या, भावनेची उत्कटता, पांडित्य, त्याचा प्रकर्ष आणि भाषेची प्रौढता आणि प्रसन्नता इत्यादी साहित्य गुणांचा चांगलाच प्रत्यय येतो." महानुभावांच्या इतरही साहित्यातून भक्ती आणि समतेचा पुरस्कार केलेला दिसतो.

|| समारोप ||

मराठी भाषेला जो अभिजात दर्जा मिळालेला आहे, त्यामध्ये महानुभाव साहित्यातील लेखक-कवींचं योगदान जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच वारकरी संप्रदायातील संतांनी मराठी भाषेसाठी जे कार्यकर्तृत्व केलं तेही तितकच अनमोल आणि महत्त्वाचे आहे. वारकरी संतांनीही सामाजिक समतेचा रचलेला पाया "ज्ञानदेवे रचिला पाया...तुका झालासे कळस" हे सर्वज्ञात आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला त्यामध्ये संत साहित्याचा सिंहाचा वाटा आहे असं म्हटलं तरी वावगं ठरू नये. संत साहित्याबरोबरच पंडिती साहित्य, शाहिरी वाङ्मय .... अशा मध्ययुगीन कालखंडातील साहित्याने मराठी भाषा,साहित्य, संस्कृती, प्रथा-परंपरा जोपासण्याचा वाढविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

|| निष्कर्ष ||

- जी भाषा जुनी आहे, प्राचीन आहे, श्रेष्ठ आहे ,स्वयंभू आहे ती अभिजात भाषा.
- केंद्र सरकारने आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला.
- सर्व भाषांमध्ये श्रेष्ठत्त्व टिकवण्याचं काम आपल्या मराठी भाषेने केले.
- मध्ययुगीन मराठी भाषा ही प्राकृत आणि अपभ्रंश या भाषेतून विकसीत झाली.
- महानुभाव पंथाचे प्रवर्तक, प्रमुख चक्रधर यांनी मराठी मध्ये बोलण्याचा आणि लिहिण्याचा आग्रह धरला.
- महानुभाव पंथ यांनी श्रीकृष्ण हा एकच महत्त्वाचा देव मानला.
- अव्यक्त असलेला जो परमेश्वर आहे ,तोच मनुष्य देह धारण करतो ही महानुभावांची श्रद्धा आहे.
- ज्ञानापेक्षा प्रेमाला, भक्तीला मानणारा हा महानुभाव संप्रदाय आहे.
- उच्चनीच ,स्त्री-पुरुष भेदभाव न मानणारा असा हा महानुभाव संप्रदाय आहे.
- मराठीतल्या आद्य चरित्रकाराचा मान महानुभाव पंथीयांनाच जातो.
- चक्रधरांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व सांगणारा असा हा "लीळाचरित्र" हा ग्रंथ आहे.
- "धवळ" ही मध्ययुगीन मराठीतील एक उत्कृष्ट भावकविता आहे.
- महानुभावांच्या साती ग्रंथातून श्रीकृष्णाची निस्सीम भक्ती दिसून येते.
- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यामध्ये महानुभावांप्रमाणेच इतरही संप्रदायांचे योगदान महत्त्वाचे आहे.

|| संदर्भ ||

- प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप – ह.श्री. शेणोलीकर
- मराठी संत कवयित्री – प्राचार्य मा. के. यादव
- 'यादवकालीन सामाजिक स्थितीची पाहणी', महाराष्ट्र साहित्य पत्रिका १९५१- डॉ. शं.गो. तुळपुळे
- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – ल.रा.नासिराबादकर
- प्राचीन मराठी साहित्यातील समाजजीवन – डॉ. जयंत कळके
- वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य – संपादक –डॉ. शिवाजीराव मोहिते.

जात्यावरच्या ओव्यांतील भाऊ–बहिण नाते:भाषिक व भावनिक चित्रण.

प्रा. दिलीप यशवंत बर्वे,
मराठी विभागप्रमुख
लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य आणि विज्ञान(H.M.) महाविद्यालय दोडामार्ग,
ता. दोडामार्ग जि. सिंधुदुर्ग-४१६५१२.
मो.न. ७४९९६३४५२१
Email. dilipbarve9699@gmail.com

सारांश (Abstract)

या शोध निबंधातून महाराष्ट्राच्या लोकसाहित्यातील जात्यावरच्या ओव्यातील भाऊ–बहिण नात्याचे चित्रण अभ्यासतो. या ओव्यांची निर्मिती आणि गायन प्रामुख्याने स्त्रियांनी केलेली असून, त्या घरगुती कामकाज करताना गायल्या जातात. या ओव्यात बहिणीच्या भावविश्वातील वेदना, विरह, सामाजिक बंधने आणि जीवनातील विविध अनुभव प्रकट होतात. भाऊ बहिणीसाठी भावनिक आधार, संरक्षण आणि माहेरशी जोडणारा प्रतीक म्हणून उभा राहतो, विशेषतः विवाहानंतर सासरी गेलेल्या बहिणीसाठी.

भाषिक दृष्टिकोनातून या ओव्या ग्रामीण बोली, पुनरुक्ती, लयबद्धता आणि आपुलकीच्या संबोधनांचा वापर करून भावनिक जटिलता स्पष्ट करतात. या अभ्यासातून दिसून येते की जात्यावरच्या ओव्या केवळ श्रमगीत नाहीत, तर स्त्रीच्या अंतर्मनाचा, सामाजिक वास्तवाचा आणि सांस्कृतिक मूल्यांचा जिवंत दस्तऐवज आहेत. या निबंधाद्वारे भाऊ–बहिण नात्याचे सामाजिक, सांस्कृतिक आणि भावनिक महत्त्व अधोरेखित होते, तसेच लोककथा, स्त्रीजीवन आणि परंपरेचा अभ्यास करण्यास नवीन दृष्टिकोन प्रदान होतो.

मुख्य शब्द:

जात्यावरची ओवी, मराठी लोकसाहित्य, भाऊ–बहिण नाते, भावनिक नाळ, मौखिक परंपरा, ग्रामीण बोली, भारतीय कुटुंबसंस्था.

१. प्रस्तावना:

महाराष्ट्राच्या लोकसाहित्यातील जात्यावरच्या ओव्या या स्त्रीच्या अंतर्मनातील भावनांचे सहज व प्रांजळ प्रकटीकरण असून त्यामध्ये भाऊ–बहिणीचे नाते अत्यंत जिव्हाळ्याने व्यक्त झालेले आढळते. दळण दळताना स्त्री आपल्या संसारातील कष्ट, सासरची बंधने आणि माहेरची ओढ ओव्यांतून व्यक्त करते. या भावविश्वात भाऊ हा तिच्यासाठी आधार, संरक्षण आणि आपुलकीचे प्रतीक ठरतो. विवाहानंतर सासरी गेलेल्या बहिणीसाठी भाऊ म्हणजे माहेरशी जोडणारी भावनिक नाळ असते. ओव्यांमधून बहिणीचे दुःख, अपेक्षा, तक्रारी आणि प्रेम थेट भावाच्या संदर्भाने व्यक्त होतात. सामाजिक बंधनांमुळे मोकळेपणाने बोलता न येणाऱ्या स्त्रीला ओवी हे माध्यम मिळते आणि त्यातून भाऊ–बहिणीच्या नात्यातील विश्वास, माया व सुरक्षिततेची भावना प्रत्ययास येते. त्यामुळे जात्यावरच्या ओव्या या केवळ लोककाव्य न राहता स्त्रीजीवनातील भावनिक नातेसंबंधांचे, या ओव्यांमध्ये भाऊ–बहिणीचे नाते विशेष भावनिक व जिव्हाळ्याने भाषिक संप्रेषणातून अविष्कृत झालेली दिसून येते.

२. जात्यावरच्या ओव्यांचे स्वरूप:

जात्यावरच्या ओव्या या महाराष्ट्राच्या लोकसाहित्यातील स्त्रीअनुभवाचे अत्यंत महत्त्वाचे आणि सखोल रूप असून त्या प्रामुख्याने स्त्रियांनीच रचल्या व गायल्या असल्यामुळे स्त्रीजीवनाचे वास्तव त्यातून अत्यंत प्रामाणिकपणे व्यक्त होते. दळण दळताना उद्भवलेल्या या ओव्यांची रचना सहज, लयबद्ध व अनुभवाधिष्ठित असून त्या कोणत्याही शास्त्रीय बांधणीत अडकलेल्या नसतात, तरीही त्यांचा आशय अत्यंत अर्थपूर्ण असतो. या ओव्यांमधून स्त्रीचे माहेर–सासर यांतील भावनिक ताणतणाव, माहेरची ओढ व सासरची मर्यादा, मातृत्वातील माया व त्याग, भाऊ–बहिणीचा

जिव्हाळा, पतीविरहाची वेदना तसेच स्त्रीवर लादलेली सामाजिक बंधने यांचे स्पष्ट दर्शन घडते. समाजात मोकळेपणाने व्यक्त होण्याची संधी न मिळालेल्या स्त्रीसाठी ओवी हे भावमोकळेपणाचे माध्यम ठरते. लिखित परंपरेचा आधार नसतानाही या ओव्या तोंडी परंपरेने पिढ्यान्पिढ्या जतन झाल्या, यावरून त्यांची लोकमान्यता व सांस्कृतिक मूल्य अधोरेखित होते. त्यामुळे जात्यावरच्या ओव्या या केवळ श्रमगीत न राहता स्त्रीच्या भावविश्वाचा, तिच्या जीवनसंघर्षाचा आणि तत्कालीन समाजव्यवस्थेचा सखोल व जिवंत दस्तऐवज ठरतात.

३. भाऊ–बहिण नात्याचे महत्त्व:

भारतीय संस्कृतीत भाऊ–बहिणीचे नाते हे केवळ रक्तसंबंधापुरते मर्यादित नसून ते विश्वास, प्रेम, संरक्षण आणि आपुलकी या मूल्यांवर आधारलेले पवित्र नाते मानले जाते. बहिणीसाठी भाऊ हा केवळ कुटुंबातील सदस्य नसून, तो तिचा भावनिक आधार, संकटात धावून येणारा रक्षक आणि माहेरची ओळख जपणारा व्यक्ती असतो; विशेषतः विवाहानंतर सासरी गेलेल्या बहिणीसाठी भावाचे अस्तित्व सुरक्षिततेची भावना निर्माण करते. त्याचप्रमाणे भावासाठी बहिण ही माया, स्नेह, त्याग आणि संस्कारांची वाहक ठरते; ती त्याच्या जीवनात भावनिक समतोल राखणारी व संवेदनशीलता निर्माण करणारी भूमिका बजावते. रक्षाबंधनासारखे सण या नात्याला सामाजिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान देऊन परस्पर कर्तव्यभावना, संरक्षणाची जबाबदारी व प्रेमाचे बंध अधिक दृढ करतात. या नात्यात अपेक्षा, अधिकार व भावनिक गुंतवणूक असली तरी त्याचा गाभा नि:स्वार्थ प्रेम आणि परस्पर विश्वासात आहे. त्यामुळे भाऊ–बहिणीचे नाते भारतीय समाजरचनेत कुटुंबव्यवस्थेला स्थैर्य देणारे, भावनिक आधार निर्माण करणारे आणि सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन करणारे एक अत्यंत महत्त्वाचे नाते ठरते.

४. जात्यावरच्या ओव्यांतील भाऊ–बहिण नात्याचे चित्रण:

महाराष्ट्राच्या लोकसाहित्यात जात्यावरच्या ओव्या स्त्रियांच्या दैनंदिन जीवनाचा, भावना–भावविश्वाचा आणि सामाजिक वास्तवाचा अत्यंत प्रामाणिक दस्तऐवज ठरतात. या ओव्या प्रामुख्याने स्त्रियांनी रचलेल्या व गायलेल्या असल्यामुळे त्या स्त्रीच्या अनुभवाधिष्ठित भावविश्वाचे सजीव प्रतिबिंब देतात. दळण–भांडी करताना, घरकाम करताना स्त्रिया आपले दुःख, आनंद, अनुभव, अपेक्षा आणि सामाजिक बंधने या ओव्यात मांडतात. या ओव्यांमध्ये भाऊ–बहिणीचे नाते अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण बहिणीच्या भावनिक जीवनात भाऊ हा कायमचा आधार, सुरक्षितता आणि विश्वासाचे प्रतीक ठरतो. बहिण सासरी गेल्यावर जेव्हा तिला माहेरची ओढ वाटते, अशा वेळी भाऊ तिच्या भावविश्वाचा केंद्रबिंदू बनतो. ओव्यांमधून बहिणीच्या असुरक्षितता, भावावरचा विश्वास आणि भावनिक अवलंबित्व प्रकर्षाने जाणवते.

"जातं फिरतं हातानं,
डोळ्यात पाणी दाटानं;
माझा भाऊ दिसे वाटेवर,
माहेरची आस मनानं."

या ओव्यात बहिणीच्या दैनंदिन श्रमातून आलेला थकवा, डोळ्यात भरलेले पाणी आणि भाऊ दिसण्याचा क्षण या सर्वांनी भावनिक खोल अनुभवाचे चित्रण केले आहे. भाऊ फक्त व्यक्ति नाही, तर बहिणीच्या माहेरशी जोडणारी भावना आणि मानसिक सुरक्षिततेची प्रतीक आहे. दुसरे उदाहरण:

"सासरीत एकटी वाट पहातो मी,
भाऊचा आवाज कानात गूंजतो;
माहेरची आठवण मनावर नांदो,
ओवीत तुझी स्मृती दिसते रोज."

या ओव्यात बहिणीच्या विरहाची वेदना, भावावरचे अवलंबित्व आणि ओव्यातून व्यक्त केलेला मानसिक आधाराची आस स्पष्ट दिसते. भाऊ बहिणीसाठी केवळ आधार नाही, तर भावनिक सामर्थ्य देणारा, संकटात धावून येणारा आणि घराबाहेरील सुरक्षितता प्रदान करणारा व्यक्तिमत्व म्हणून उभा राहतो.

जात्यावरच्या ओव्यांमध्ये भाऊ–बहिण नात्याचे सामाजिक महत्त्वही अधोरेखित होते. भारतीय संस्कृतीत भाऊ–बहिणीचे नाते विश्वास, प्रेम, संरक्षण व आपुलकीचे प्रतीक मानले जाते. बहिणीसाठी भाऊ हा आधार, रक्षक आणि माहेरची ओळख जपणारा असतो; तर भावासाठी बहिण माया, स्नेह आणि संस्कारांची वाहक असते. रक्षाबंधनासारखे सण या नात्याला सामाजिक अधिष्ठान देतात आणि या भावनिक संबंधाला अधिक दृढ करतात. या नात्यात अपेक्षा, अधिकार व भावनिक गुंतवणूक असली तरी त्याचा गाभा नि:स्वार्थ प्रेम आणि परस्पर विश्वासात आहे. ओव्यांमध्ये भाऊ बहिणीसाठी **सुरक्षिततेचा प्रतीक** आहे. बहिणीच्या दु:खाला तो शब्द देतो, तिच्या मनातील भावना समजतो, तिला आधार देतो, आणि काही प्रसंगी तिला मदतीचा हात देतो. विवाहानंतर सासरी गेलेल्या बहिणीची भावना ओव्यातून स्पष्ट होते की, भाऊ तिच्यासाठी घराबाहेरील सुरक्षा आणि मानसिक आधार आहे.

“भाऊचा हात धरून वाट सुलभ होईल,
सासरीचे दु:ख तुला विसरवेल;
माहेरची माया हृदयात ठेवून,
ओव्या सांगतील प्रेम अमोल होईल.”

जात्यावरच्या या ओव्यांमधून तिची विरहाची वेदना आणि भावाच्या उपस्थितीचे भावनिक महत्त्व प्रकट होते. बहिणीला घरापासून दूर राहावे लागते, सासरातील एकाकीपणा आणि मानसिक ताण अनुभवावे लागतो, अशा वेळी भाऊ तिच्यासाठी आधारस्तंभ ठरतो. तो तिच्या दु:खाचे शब्द असतो, तिच्या भावविश्वाचा आधार असतो आणि विरहाची वेदना कमी करण्यास मदत करतो. भाऊ–बहिण नाते सामाजिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे आहे. बहिणीला सासरी असताना भाऊचा आधार मिळतो, त्याच्याकडे ती भावनिक अवलंबित्व ठेवते, आणि त्यातून घरातील व सामाजिक रीतिरिवाजांचे पालन सुनिश्चित होते. बहिणीच्या दृष्टिकोनातून भाऊ फक्त भावनिक आधार नाही तर सामाजिक संरचना आणि संस्कारांचे प्रतीक आहे. बहिण भावासाठी संस्कारांची वाहक असते, माया आणि स्नेह प्रदान करते, आणि भाऊ–बहिण नात्याचे सांस्कृतिक महत्त्व टिकवते.

जात्यावरच्या ओव्यांमधून बहिणीच्या भावविश्वातील अवलंबित्व, विश्वास, प्रेम, विरह आणि भावनिक गहनता यांचे जिवंत चित्रण होते. भाऊ बहिणीसाठी जीवनात स्थैर्य, आधार आणि संरक्षण प्रदान करतो, तर बहिण भावासाठी स्नेह, संस्कार आणि माया यांचे प्रतीक ठरते. सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून हा नाता केवळ व्यक्तिगत नात्यापुरता मर्यादित नाही, तर कुटुंब, समाज आणि संस्कृती यांचे रक्षण करणारा आहे.

“रक्षाबंधनाचा धागा बांधून
,भाऊ माझा जीवन आधार;
सासरच्या अडचणींना सामोरे जाऊ,
माहेरची माया हृदयात पार.”
“हातातील हात धरून वारा थांबतो,
भाऊच्या शब्दांनी दु:ख हलके होते;
माहेरची आठवण मनात टिकते,
ओव्यात प्रेमाचे रंग खुलते.”

या ओव्यात बहिणीच्या दृष्टिकोनातून भाऊ–बहिण नात्याची भावनिक खोली, विश्वास, आधार आणि सांस्कृतिक मूल्ये प्रकट होतात. या नात्याचे केंद्रभूत तत्व म्हणजे **विश्वास, प्रेम, आपुलकी आणि सांस्कृतिक बंधन,** जे भारतीय समाजरचनेत स्थैर्य निर्माण करतात.

जात्यावरच्या ओव्या केवळ श्रमपरिहारासाठी गायलेली गाणी गाण्या स्त्रीच्या भावविश्वाचे, तिच्या जीवनसंघर्षाचे आणि सामाजिक वास्तवाचे जिवंत दस्तऐवज आहेत. या ओव्यात भाऊ–बहिण नात्याचे चित्रण अत्यंत जिव्हाळ्याने, भावनिकतेने सामाजिक आणि भाषिक संदर्भांसह केलेले आहे. या नात्याचे सामाजिक, सांस्कृतिक आणि भावनिक महत्त्व ओव्यातून स्पष्ट दिसते, त्यामुळे जात्यावरच्या ओव्या हे केवळ लोककाव्य न राहता **स्त्रीजीवनातील भावनिक नातेसंबंधांचे, विशेषतः भाऊ–बहिणीच्या जिव्हाळ्याच्या नात्याचे प्रभावी प्रतिबिंब ठरतात.** या ओव्यातून भाऊ–बहिण नात्याचे चित्रण केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक दृष्टिकोनापुरते मर्यादित नाही, तर सामाजिक संदर्भातही त्याचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. बहिणीच्या जीवनातील असुरक्षितता, विरह, सासरातील अडचणी, कुटुंबातील अपेक्षा आणि सामाजिक बंधने यांचा सामना करण्यासाठी भाऊ एक **सांकेतिक आधार, संरक्षण आणि न्यायाची हमी** म्हणून ओव्यात दिसतो. बहिणीला अन्याय, दुःख किंवा प्रताडना झाल्यास भाऊ तिच्यासाठी न्याय देणारा घटक मानला जातो. अशा प्रकारे, ओव्यांमधील भाऊ केवळ व्यक्ती नाही, तर बहिणीच्या मानसिक सुरक्षिततेचे आणि भावनिक आधाराचे प्रतीक आहे.

“सासरच्या ढगांनी मन भरले दुःखाने,
भाऊच्या आठवणीत मिळते विश्रांती;
अन्यायाच्या वाटेवर तो उभा राहो,
माहेरची माया हृदयात टिको.”

या ओव्यात बहिणीच्या भावविश्वातील वेदना, असुरक्षितता आणि भावावर असलेले अवलंबित्व स्पष्टपणे व्यक्त होते. भाऊ तिच्यासाठी **मानसिक आधार, प्रेम आणि विश्वास यांचा स्त्रोत** आहे. त्याच्या उपस्थितीमुळे बहिणीला सामाजिक अडचणींवर मात करण्याची ताकद मिळते. ओव्यांमधील हा भावनिक आणि सामाजिक समतोल स्त्रीच्या मनाची जाणीव आणि समाजातील पुरुषप्रधान संरचनेतील भावाची भूमिका अधोरेखित करतो.

“डोळ्यात पाणी, मनात ओझे,
सासरीच्या छायेत हरवले मी;
भाऊच्या आठवणींनी दिला आधार,
अन्यायाच्या वाटेवर तो माझा मार्गदर्शक.”

यातून स्पष्ट होते की, जात्यावरच्या ओव्यांमध्ये भाऊ–बहिण नात्यातील भावनिक घटक सामाजिक वास्तवाशी गाठ घालतो. बहिणीच्या मनातील ताण, सामाजिक मर्यादा आणि विरह यांचा सामना करण्यासाठी भाऊ हा **केवळ आधार नाही, तर न्याय, संरक्षण आणि विश्वासाचे प्रतीक** ठरतो.

जात्यावरच्या ओव्या केवळ स्त्रीच्या भावविश्वाचे आणि सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंबच नाही, तर **सांस्कृतिक मूल्ये आणि परंपरा टिकवण्याचे प्रभावी माध्यम**ही मानले गेले आहे. या ओव्यांमध्ये भाऊ–बहिण नात्यातील प्रेम, कर्तव्यभावना, त्याग, निष्ठा आणि आपुलकी यांचे मूल्य प्रभावीपणे व्यक्त होते. बहिणीसाठी भाऊ ही केवळ भावनिक आधाराची प्रतिमा नाही, तर तिच्या जीवनात संस्कार आणि सांस्कृतिक शिक्षणाची वाहक भूमिका देखील बजावतो; तसेच भावासाठी बहिण माया, सौम्यता आणि घरगुती संस्कारांचे प्रतीक ठरते.

“भाऊ माझा हात धरतो,
रक्षाबंधनाचा धागा बांधतो;
सासरच्या अडचणी विसरून जाऊ,

माहेरची माया हृदयात टिकवतो."

या ओव्यातून भाऊ–बहिण नात्याचा केवळ व्यक्तिगत नाही तर सांस्कृतिक दृष्टीकोनातून देखील महत्त्व स्पष्ट होते. रक्षाबंधनासारखे सण, घरगुती कार्य, विवाहानंतरच्या सामाजिक बंधने, या सर्व गोष्टींचा भाव ओव्यांमध्ये सामील करून त्यातून प्रेम, कर्तव्य आणि निष्ठा या मूल्यांचे संस्कार पुढील पिढीकडे पोहोचतात.

"भाऊच्या हातात माझा हात,
शब्द नसतांना ओव्यातून गात;
स्नेह, विश्वास आणि संस्कार,
या नात्यातून पुढे जात."

जात्यावरच्या ओव्या केवळ गीतरूप नव्हेत तर **सांस्कृतिक दस्तऐवज** आहेत. त्या समाजातील नातेसंबंध टिकवतात, भावनिक स्थैर्य निर्माण करतात, आणि स्त्रीमन व पुरुषमन यांच्यातील सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक मूल्यांची शाश्वत हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू ठेवतात.

जात्यावरच्या ओव्यांचा अभ्यास केल्यास ग्रामीण स्त्रीचे भावविश्व, तिच्या जीवनातील नातेसंबंधांचे महत्त्व, विरह आणि सामाजिक बंध यांची जाणीव होते. तसेच या अभ्यासातून भारतीय कुटुंबसंस्थेतील भाऊ–बहिण नात्याचे सांस्कृतिक, सामाजिक, भाषिक व भावनिक पैलू अधिक सखोलपणे समजतात.

५. जात्यावरच्या ओव्यांतील भाषेचे स्वरूप:

जात्यावरच्या ओव्यांची भाषा ही मुख्यतः ग्रामीण बोलीप्रधान आहे. ती शुद्ध-प्रमाण मराठीपेक्षा वेगळी असून दैनंदिन जीवनातील शब्द, लाडिक संबोधन, हाकारे आणि भावनिक शब्दप्रयोग यांचा वापर मोठ्या प्रमाणावर आढळतो. या भाषेत कृत्रिम अलंकारिकता नसून अनुभवसिद्ध साधेपणा आहे. भाऊ–बहिण नात्याचे चित्रण करताना ही भाषा अधिक मृदू, आपुलकीची आणि भावप्रधान होते. "भाऊ", "माझा भाऊ", "मायचा भाऊ",लाडका भाऊ, पाठीराखा यांसारख्या शब्दप्रयोगांतून बहिणीचे भावनिक विश्व व्यक्त होते. भाषेतील लय, पुनरुक्ती आणि सहजपणा या नात्याला अधिक प्रत्ययकारी बनवतात. जात्यावरच्या ओव्यांतील भाषा ही केवळ शब्दांची रचना नसून ती ग्रामीण स्त्रीच्या भावविश्वाची सजीव अभिव्यक्ती आहे. भाऊ–बहिण या नात्याचे चित्रण करताना या ओव्यांमधील भाषा अत्यंत मृदू, आपुलकीची आणि भावप्रधान स्वरूपाची आढळते. बोलीभाषेतील सहज शब्द, हाकारे, लाडिक संबोधन आणि प्रेमळ प्रतिमा यांमधून भाऊ–बहिण नात्यातील जिव्हाळा व्यक्त होतो. या ओव्यांमध्ये वापरलेली भाषा कृत्रिम किंवा अलंकारिक नसून ती अनुभवसिद्ध आणि जीवनाशी निगडित आहे. "भाऊ", "भैया", "माया", "आधार", "माहेर" यांसारख्या शब्दांतून बहिणीची भावनिक गुंतवणूक आणि भावनिक सुरक्षिततेची जाणीव प्रकर्षाने व्यक्त होते. भाऊ हा बहिणीसाठी संरक्षक, आधार देणारा आणि मायाळू व्यक्ती म्हणून या भाषेत उभा राहतो.

भाषिकदृष्ट्या पाहता, या ओव्यांतील भाषा संवादात्मक असून ती बहिणीच्या अंतःकरणातून थेट उमटलेली आहे. सूचक शब्दप्रयोग, पुनरुक्ती, लयबद्धता आणि भावनिक आवेग यांमुळे भाऊ–बहिण नात्याचे चित्रण अधिक प्रत्ययकारी होते. त्यामुळे जात्यावरच्या ओव्यांमधील भाषा ही केवळ अभिव्यक्तीचे साधन न राहता भाऊ–बहिण नात्याच्या सांस्कृतिक मूल्यांची वाहक ठरते.

६. निष्कर्ष:

जात्यावरच्या ओव्या हे महाराष्ट्राच्या लोकसाहित्यातील एक *महत्त्वाचे मौखिक पारंपरिक साहित्य* आहेत, ज्यात स्त्रियांचा *दैनंदिन श्रम, भावनांचे प्रकट स्वरूप आणि सामाजिक वास्तव* अत्यंत सहज व प्रभावीपणे प्रतिबिंबित होते. या ओव्या प्रामुख्याने स्त्रिया दळण करताना किंवा गृहकार्य करताना गायल्या जातात आणि त्या *त्यांच्या जीवनाच्या विविध पैलूंना दुःख, आनंद, आशा-आकांक्षा, सामाजिक मर्यादा आणि कौटुंबिक नात्यांना* सहजपणे शब्दरूप देतात.

ओव्यांमध्ये भाऊ–बहिणीचा संदर्भ विशेष भावनिक आणि सांस्कृतिक महत्त्व धारण करतो. बहिणीच्या ओव्यात भाऊ *सुरक्षितता, आधार, विश्वास व माहेरशी जोडणारा धागा* म्हणून उभा राहतो. बहिणी सासरात एकटी असताना भाऊ तिच्या भावविश्वाचा केंद्रबिंदू बनतो आणि तिच्या मनातील *विरह, सुरक्षिततेची गरज आणि भावनिक अवलंबित्व* या भावना ओव्यातून स्पष्टपणे दिसतात. अशा गीतांमध्ये भाऊ केवळ कुटुंबातील सदस्य नसून *संस्कारांचा वाहक व सामाजिक संरचनेचा आधार* म्हणूनही स्थान मिळवतो. हे नाते *परस्पर प्रेम, समर्पण आणि सामाजिक बंधनांच्या माध्यमातून* पुढील पिढ्यांपर्यंत मूल्ये पोहोचवते.

जात्यावरच्या ओव्यातील भाषा ग्रामीण बोलीप्रधान असून ती शुद्ध मराठीपेक्षा वेगळी आहे. ही भाषा सहज, अनुभवसिद्ध, संवादात्मक आणि भावप्रधान आहे. त्यात दैनंदिन जीवनातील शब्दप्रयोग, हाकारे, लाडिक संबोधन आणि भावनिक प्रतिमांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला गेला आहे, ज्यामुळे ओव्या केवळ शब्दरचना नसून स्त्रीच्या अंतर्मनाची, भावविश्वाची आणि जीवनशैलीची प्रत्यक्ष अभिव्यक्ती बनतात.

भाषेतील लयबद्धता, पुनरुक्ती आणि सहजपणा ही वैशिष्ट्ये भावनांच्या प्रसारासाठी प्रभावी साधने ठरतात. ओव्यांतील संवादात्मकता आणि थेट भावविश्वातून आलेली भाषा स्त्रीच्या मानसिकतेची प्रामाणिकता अधोरेखित करते. या भाषेत कृत्रिम अलंकारिकता नाही, परंतु ती अत्यंत गहन अर्थपूर्ण आहे, ज्यामुळे भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संदेश सहजपणे वाचकापर्यंत पोहोचतो.

संदर्भसूची:

१. **ढेरे**, रा. चि., लोकसाहित्य: शोध आणि समीक्षा,पद्मगंधा प्रकाशन, पुणे १९९० .
२. कुर्डेकर, शांता, जात्यावरच्या ओव्या : स्त्रीजीवनाचा आविष्कार, पॉप्युलर प्रकाशन, पुणे.
३. देशपांडे, ग. त्र्यं., लोकसाहित्य : स्वरूप आणि परंपरा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.
४. कुलकर्णी, अ. ना., महाराष्ट्राचे लोकसाहित्य, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
५. पाटील, शोभा, स्त्री लोकगीतांचा अभ्यास, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
६. फडके, य. दि., लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य, राजहंस प्रकाशन, पुणे.

प्राचीन भारतीय अभिजात ज्ञानवैभवाचा वारसा : धर्मगंज ग्रंथालय

प्रा. विकास विलास बर्गे, डॉ. स्मिता योगेश वेदपाठक
संशोधक विद्यार्थी, यशवंतराव मोहिते कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, एरंडवणे, पुणे-४११०३८.
संशोधक मार्गदर्शक*, यशवंतराव मोहिते कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, एरंडवणे, पुणे-४११०३८.
Email ID: vikasbarge30@gmail.com

सार:

भारतातील प्राचीन विद्यापीठे ही संपुर्ण जगाला दिशा देणारी शिक्षणाची समृद्ध केंद्रे असल्याने जगभरातील अभ्यासकांना आणि विद्वानांना आकर्षित करत होती. त्यामुळे अनेक परकीय प्रवाशांनी भारतातील नालंदा विद्यापीठ, तक्षशिला विद्यापीठ, विक्रमशिला विद्यापीठ आणि वल्लभी विद्यापीठांना भेटी दिल्याच्या नोंदी अनेक ग्रंथांमध्ये सापडतात. प्रस्तुत शोधनिबंधात आपण नालंदा विद्यापीठाच्या केंद्रस्थानी असणाऱ्या 'धर्मगंज' नावाच्या ग्रंथालय संकुलाची तपशीलवार माहिती जाणून घेणार आहोत. जे भारताच्या बौद्धिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचे प्रतीक आहे. प्राचीन जगातील ज्ञानाच्या सर्वात मोठ्या आणि सर्वात व्यापक ग्रंथालयांपैकी एक गणले जात होते. नालंदा विद्यापीठ हे इ.स. ५ व्या शतकात स्थापन झालेले विद्यापीठ बौद्ध अभ्यास, गणित, खगोलशास्त्र वैद्यकशास्त्राचे आणि विविध विषयांवरील हजारो हस्तलिखिते असलेले एक प्रमुख केंद्र होते. असे संपन्न ज्ञानभांडार विकृत मानवी मानसिकतेमुळे आगीच्या भक्षस्थानी पडले आणि त्यातील ज्ञानसंपदा नष्ट झाली. धर्मगंज ग्रंथालयाच्या इतरही माहितीबाबत प्रस्तुत शोधनिबंधात जसे की, ऐतिहासिक महत्त्व, वास्तुरचना, संघटना आणि बौद्धिक योगदान यांचा अभ्यास करणार आहोत. तसेच ऐतिहासिक वृत्तांत, चिनी विद्वानांचे प्रवासवर्णन, पुरातत्वीय निष्कर्ष आणि इतर साहित्याचा आधार घेऊन, धर्मगंज ग्रंथालयाने तत्त्वज्ञान, धर्म, विज्ञान, वैद्यकशास्त्र, गणित, खगोलशास्त्र आणि भाषाशास्त्र यांसारख्या आंतरविद्याशाखीय शिक्षणाचे केंद्र म्हणून कसे कार्य केले याचे अध्ययन करणार आहोत. शोधनिबंध धर्मगंज ग्रंथालयाच्या भारतीय व जागतिक ज्ञान परंपरांवर झालेल्या दूरगामी परिणामांवर प्रकाश टाकतो.

की-वर्ड: प्राचीन विद्यापीठे, नालंदा विद्यापीठ, धर्मगंज, परकीय प्रवाशी, आक्रमण, आधुनिक संदर्भ

प्रस्तावना:

प्राचीन भारताने शिक्षणात अत्याधुनिक आणि सुव्यवस्थित शिक्षण प्रणाली देण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे संपूर्ण आशियातील विद्वानांसाठी भारतातील शिक्षण केंद्रे आकर्षणाचे केंद्र ठरली होती. भारतातील सर्वात प्रतिष्ठित संस्थांपैकी एक म्हणजे नालंदा विद्यापीठ, जे गुप्त काळात, सुमारे ५ व्या शतकात स्थापन झाले होते. नालंदा हे केवळ एक विद्यापीठ नव्हते, तर ते एक जागतिक बौद्धिक केंद्र होते, जिथे भारत, चीन, कोरिया, तिबेट, मध्य आशिया आणि आग्नेय आशियातील हजारो विद्यार्थी आणि शिक्षक अध्ययन-अध्यापणाचे कार्य करीत होते. या शैक्षणिक संस्थेच्या केंद्रस्थानी धर्मगंज, नालंदाचा भव्य ग्रंथालय समूह होता. हे ग्रंथालय प्राचीन भारतीय समाजाची ज्ञानप्राप्ती, जतन आणि प्रसार करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक होते. आधुनिक ग्रंथालयांप्रमाणे, जिथे प्रामुख्याने छापलेली पुस्तके ठेवली होती, धर्मगंजमध्ये ताडपत्रांवर आणि भूर्जपत्रांवर लिहिलेल्या हस्तलिखितांचा संग्रह होता, जे काळजीपूर्वक जतन करून पद्धतशीरपणे वर्गीकृत केले होते. धर्मगंजची रचना, संग्रह, शैक्षणिक महत्त्व आणि जागतिक ज्ञान प्रणालींमधील योगदानावर लक्ष केंद्रित करून त्याचा सखोल अभ्यास केलेला आहे. धर्मगंजला समजून घेणे केवळ भारताच्या शैक्षणिक भूतकाळाची पुनर्रचना करण्यासाठीच नव्हे, तर आधुनिक उच्च शिक्षण आणि ग्रंथालयांच्या मुळांचे कौतुक करण्यासाठी तसेच भारतातील समृद्ध ग्रंथालयांचे ज्ञानवैभव सर्वासमोर मांडणे यासाठी देखील आवश्यक आणि महत्वाचे आहे.

नालंदा विद्यापीठाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

नालंदा विद्यापीठाची स्थापना गुप्त वंशातील कुमारगुप्त पहिल्याच्या कारकिर्दीत झाली. नालंदा हे उत्तर-पूर्व भारतात, गंगा मैदानात, पाटण्यापासून काही मैल दक्षिणेस वसलेले आहे. इसवी सन पूर्व सहाव्या शतकात भारतातून प्रवास करत असताना बुद्धांनी नालंदा शहराला अनेक वेळा भेट दिली होती. त्यावेळी ते एक समृद्ध आणि दाट लोकवस्तीचे ठिकाण असल्याचे सांगितले जात होते. परंपरेनुसार, नालंदा हे बुद्धांच्या प्रमुख शिष्यांपैकी एक असलेल्या सारिपुत्राचे जन्मस्थान होते.

या मठाला सम्राट अशोक आणि कनौजचे सम्राट हर्ष यांचे राजेशाही संरक्षण मिळाले आणि ते लवकरच भारतातील शिक्षणाचे सर्वात मोठे केंद्र बनले. सातव्या शतकापर्यंत, नालंदा एका मठापेक्षा विद्यापीठासारखे अधिक होते. ती केवळ आध्यात्मिक ज्ञानावर लक्ष केंद्रित करणारी संस्था राहिली नव्हती; तेथे विविध प्रकारच्या ऐहिक विषयांचा अभ्यास केला जात असे. गुप्त, हर्षवर्धन आणि बंगाल व बिहारच्या पाल राजांसारख्या विविध शासकांच्या आश्रयाखाली हे विद्यापीठ सुमारे ७०० वर्षे भरभराटीस आले. नालंदा एक निवासी विद्यापीठ म्हणून कार्यरत होते, जिथे त्याच्या सुवर्णकाळात सुमारे १०,००० हून अधिक विद्यार्थी आणि २,००० शिक्षक होते. प्रवेश अत्यंत स्पर्धात्मक असून केवळ कठोर तोंडी परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांनाच प्रवेश दिला जात असे.

अभ्यासक्रम विस्तृत होता, ज्यात बौद्ध तत्त्वज्ञान (महायान, हीनयान आणि वज्रयान), वैदिक अभ्यास, तर्कशास्त्र (हेतू विद्या), व्याकरण, वैद्यकशास्त्र (आयुर्वेद), गणित, खगोलशास्त्र, राजकारण आणि ललित कला यांचा समावेश होता. या प्रगत शैक्षणिक वातावरणात, धर्मगंजने अध्यापन, संशोधन, वादविवाद आणि लेखन यांना पाठिंबा देऊन महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

धर्मगंजचा अर्थ आणि संकल्पना:

'धर्मगंज' या शब्दाचा शब्दश अर्थ "धर्म, सत्य किंवा ज्ञानाचा खजिना" असा आहे. हे केवळ एक भौतिक जागा नसून, बौद्धिक आणि आध्यात्मिक शोधाप्रती असलेल्या तात्विक वचनबद्धतेचे प्रतीक होते. धर्मगंजला पवित्र मानले जात असे, कारण ज्ञान हे स्वतःच मुक्तीचा (मोक्षाचा) मार्ग मानले जात होते.

ग्रंथालयाची स्थापत्य रचना:

चिनी विद्वान ह्युएन त्सांग आणि यिजिंग यांच्या वृत्तांतानुसार, धर्मगंज हे तीन मुख्य इमारतींचा समावेश असलेले एक भव्य ग्रंथालय समूहात अस्तित्वात होते. या बहुमजली इमारतींची रचना मोठ्या प्रमाणातील हस्तलिखितांचा संग्रह करण्यासाठी, तसेच त्यांना हवा खेळती राहण्यासाठी आणि ओलावा व कीटकांपासून संरक्षण मिळावे यासाठी केली होती. या स्थापत्य रचनेत कार्यक्षमता आणि प्रतीकात्मकता या दोन्हींचे प्रतिबिंब होते, जे ज्ञान आणि शहाणपणाच्या उन्नतीवर भर देत होते.

रत्नोदधी (Ocean of Jewels): या अत्यंत दुर्मिळ आणि पवित्र हस्तलिखिते ठेवली जात असत.

रत्नसागर (Sea of Jewels): रत्नांचा सागर या इमारतीत प्रामुख्याने विज्ञान, खगोलशास्त्र आणि तर्कशास्त्र या विषयांचे ग्रंथ होते.

रत्न रंजक (Jewel-adorned): रत्नांनी सुशोभित इमारत यात कला, साहित्य आणि संगीताशी संबंधित ग्रंथ होते.

हस्तलिखितांचे संकलन आणि संघटन:

संग्रहाचे स्वरूप धर्मगंजमध्ये विविध विषयांवरील हस्तलिखितांचा एक प्रचंड संग्रह होता.. हस्तलिखिते प्रामुख्याने संस्कृत, पाली आणि प्राकृत भाषांमध्ये लिहिलेली होती आणि परदेशी विद्वानांनी त्यांची चिनी आणि तिबेटी भाषांमध्ये भाषांतरे तयार केली होती. ज्यात पुढील गोष्टींचा समावेश होता.

बौद्ध धर्मग्रंथ	वैद्यकशास्त्र
वैदिक ग्रंथ	शस्त्रक्रिया
उपनिषदे	गणित
तत्त्वज्ञान	खगोलशास्त्र
तर्कशास्त्र	राज्यशास्त्र
व्याकरण	अर्थशास्त्र
भाषाशास्त्र	काव्य संगीत
कला	

नालंदा विद्यापीठाच्या 'धर्मगंज' ग्रंथालयातील पुस्तक संग्रह अफाट आणि वैविध्यपूर्ण होता. येथे केवळ धार्मिकच नव्हे, तर मानवी जीवनाशी संबंधित सर्वच ऐहिक आणि वैज्ञानिक विषयांवरील पुस्तके उपलब्ध होती.

धार्मिक साहित्य
- **बौद्ध धर्म:** त्रिपिटक (विनय, सुत्त आणि अभिधम्म), महायान सूत्रे, प्रज्ञापारमिता आणि वज्रयान पंथाचे ग्रंथ.
- **हिंदू धर्म:** चारही वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद), उपनिषदे आणि पुराणे.
- **जैन धर्म:** जैन आगम आणि तत्त्वज्ञानाचे ग्रंथ.

विज्ञान आणि आयुर्वेद
- **आयुर्वेद:** रोगांचे निदान, औषधोपचार आणि जडीबुटींची माहिती देणारे ग्रंथ (उदा. चरक आणि सुश्रुत संहितेच्या प्रती).
- **शस्त्रक्रिया:** मानवी शरीरावर केल्या जाणाऱ्या विविध शस्त्रक्रियांचे मार्गदर्शन करणारी पुस्तके.
- **रसायनशास्त्र (Chemistry):** धातूंचे मिश्रण करणे, रसायने तयार करणे आणि किमयाशास्त्र (Alchemy) यांवरील ग्रंथ

गणित आणि खगोलशास्त्र
- **गणित:** शून्य, दशांश पद्धती, बीजगणित आणि त्रिकोणमितीवरील मूळ ग्रंथ.
- **खगोलशास्त्र:** ग्रह-ताऱ्यांची स्थिती, ग्रहणांचे गणित, पृथ्वीचा परिघ आणि विश्वाच्या रचनेविषयीची पुस्तके.

तर्कशास्त्र आणि दर्शनशास्त्र
- **हेतुविद्या (Logic):** युक्तिवाद कसा करावा आणि सत्याचा शोध कसा घ्यावा, याचे शास्त्र सांगणारे ग्रंथ.
- **षड्-दर्शने:** सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदांत या सहा भारतीय तत्त्वज्ञानांवरील सखोल भाष्ये.

भाषा आणि व्याकरण
- **संस्कृत व्याकरण:** पाणिनीचे 'अष्टाध्यायी', पतंजलीचे 'महाभाष्य' आणि इतर व्याकरणकाराचे ग्रंथ.
- **शब्दकोश:** विविध भाषांचे शब्दकोश आणि काव्यशास्त्रावरील पुस्तके.

इतर वैविध्यपूर्ण विषय
- **अर्थशास्त्र आणि राजकारण:** चाणक्याचे अर्थशास्त्र आणि राज्यकारभाराचे नियम सांगणारे ग्रंथ.
- **युद्धकला (Archery):** धनुर्विद्या आणि लष्करी डावपेचांवरील पुस्तके.
- **ललित कला:** चित्रकला, मूर्तिकला, संगीत आणि स्थापत्यशास्त्र (Architecture) या विषयांवरील हस्तलिखिते.

विषयांचे वर्गीकरण:

नालंदामध्ये शिक्षण प्रामुख्याने पाच विद्यांमध्ये विभागलेले होते, ज्यानुसार ग्रंथालयात मांडणी केली जात असे त्याला 'पंचविद्या' असे म्हटले जाई. धर्मगंज हे मानवी बुद्धिमत्तेने निर्माण केलेल्या प्रत्येक विषयाचे घर होते. एकाच छताखाली वेद आणि त्रिपिटकांचा एकत्र अभ्यास होणे, हे नालंदाच्या ग्रंथालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य होते.

शब्दविद्या: व्याकरण आणि भाषा
शिल्पकर्मविद्या: कला आणि तंत्रज्ञान
चिकित्साविद्या: आयुर्वेद आणि आरोग्य
हेतुविद्या: तर्कशास्त्र
अध्यात्मविद्या: तत्वज्ञान आणि धर्म

ग्रंथ व हस्तलिखिते संरक्षणाची तंत्रे:

प्राचीन ग्रंथपालांनी संरक्षणाच्या अत्याधुनिक पद्धती विकसित केल्या होत्या. ग्रंथांची मांडणी विषय आणि शाखांनुसार वर्गीकरण करून केली जात असे, जे ग्रंथालयशास्त्राच्या प्रारंभिक स्वरूपाचे सूचक आहे.

१. प्रामुख्याने ताडपत्रे (Palm leaves) आणि भूर्जपत्रे (Birch bark) वापरली जात. हिमालयीन प्रदेशात मिळणाऱ्या भूर्ज वृक्षाची साल अतिशय टिकाऊ असल्याने प्रक्रिया केलेल्या ताडपत्रांचा आणि भूर्जपत्रांचाच वापर केला जात असे.
२. हस्तलिखितांना वाळवी किंवा कीड लागू नये म्हणून त्यावर नैसर्गिक तेल (उदा. देवदार तेल), हळद किंवा विशिष्ट वनस्पतींचा अर्क लावला जात असे. हस्तलिखितांचे संरक्षण करण्यासाठी नैसर्गिक तेल आणि औषधी वनस्पतींचा वापर नियमितपणे केला जात असे.
३. ग्रंथांना सुरक्षित ठेवण्यासाठी ते लाकडी फळ्यांच्या मध्ये ठेवून लाल किंवा पिवळ्या रंगाच्या रेशमी कापडात गुंडाळले जात असे. लाल रंग कीटकांना किंवा वाळविला दूर ठेवण्यास मदत करतो, अशी त्याकाळी समजूत होती. ग्रंथ लाकडी कपाटांमध्ये आणि दगडी खोल्यांमध्ये सुरक्षित ठेवले जात असत.
४. हस्तलिखिते जुनी झाली की त्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांचे जसेच्या तसे पुनर्लेखन (Transcription) केले जाई. ही जबाबदारी प्रामुख्याने मठांमधील बौद्ध भिक्खू आणि मंदिरांमधील ब्राह्मण विद्वानांकडे दिली जात असे.

शैक्षणिक जीवनातील धर्मगंजची भूमिका:

धर्मगंज हे केवळ पुस्तकांचे भांडार नव्हते, तर ते शिक्षण आणि संशोधनाचे एक सक्रिय अभ्यास केंद्र होते. विद्यार्थी आणि विद्वान नियमितपणे हस्तलिखितांचा संदर्भ घेत असत. या ग्रंथालयामुळे नालंदा विद्यापीठाला युरोपमध्ये ही संकल्पना उदयास येण्याच्या शतकांपूर्वीच एका संशोधन विद्यापीठाप्रमाणे कार्य करणे शक्य झाले. नागार्जुन, आर्यदेव, दिङ्नाग, धर्मकीर्ती आणि अतिशा दीपंकर यांसारखे विद्वान नालंदाच्या बौद्धिक परंपरेशी संबंधित होते. साहित्याचे संवर्धन, जतन आणि प्रसार करण्यात प्राचीन ग्रंथालयांनी ज्यांना त्याकाळी 'ज्ञानभांडार' किंवा 'सरस्वती भांडार' म्हटले जाई, त्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

१. ज्ञान साहित्याचे संवर्धन आणि जतन

प्राचीन काळात साहित्य हे प्रामुख्याने भूर्जपत्रे, ताडपत्रे आणि वल्कलांवर लिहिले जात असे. हे साहित्य निसर्गतः नाशिवंत होते. ग्रंथालयांनी या हस्तलिखितांना योग्य वातावरणात साठवून, त्यांना कीड किंवा वाळवीपासून वाचवून हजारो वर्षे सुरक्षित ठेवले. यामुळेच आजही आपण वेद, उपनिषदे आणि पुराणे वाचू शकतो.

२. हस्तलिखितांच्या नकला तयार करणे

ग्रंथालये ही केवळ पुस्तके ठेवण्याची जागा नव्हती, तर ती लेखन केंद्रे देखील होती. जुनी झालेली हस्तलिखिते नष्ट होण्यापूर्वी त्यांच्या नवीन नकला तयार करण्याचे काम ग्रंथालयांत बसून विद्वान आणि लिपिक करत असत. या

प्रक्रियेमुळे एकाच ग्रंथाच्या अनेक प्रती तयार झाल्या आणि त्या देशाच्या विविध भागांत पोहोचल्या आणि त्याचा प्रचार आणि प्रसार होण्यास मदत झाली.

३. साहित्याचे वर्गीकरण आणि संघटन

ग्रंथालयांमध्ये संस्कृत साहित्य अत्यंत अफाट होते त्यात श्रुती, स्मृती, काव्य, व्याकरण, आयुर्वेद, ज्योतिष आणि इतर साहित्याचा समावेश होता. प्राचीन ग्रंथालयांनी या साहित्याचे शास्त्रशुद्ध वर्गीकरण केले. यामुळे अभ्यासकांना विशिष्ट विषयाचा ग्रंथ शोधणे आणि त्याचा सखोल अभ्यास करणे सोपे झाले. या पद्धतशीर मांडणीमुळेच ज्ञानाचा प्रसार होण्यास मदत झाली.

४. अनुवाद आणि जागतिक प्रसार (भाषांतर प्रकल्प)

अनेक परदेशी प्रवासी (उदा. ह्युएन त्सांग, फाहियान) या ग्रंथालयांना भेटी देण्यासाठी भारतात आले. त्यांनी येथील संस्कृत ग्रंथांचा अभ्यास केला आणि ग्रंथालयांच्या मदतीने या ग्रंथांचे चिनी, तिबेटी आणि इतर भाषांत अनुवाद केले. यामुळे भारतीय तत्वज्ञान आणि संस्कृत साहित्य मध्य आशिया आणि आग्नेय आशियापर्यंत पोहोचले. त्यामुळे परकीय प्रवाशांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

५. विद्वानांचे (तात्विक वादविवाद) चर्चा केंद्र

ग्रंथालये ही विद्वानांच्या भेटीची आणि चर्चेची ठिकाणे होती. येथे होणाऱ्या विविध विषयांवरील शास्त्रार्थातून (वादविवाद) नवीन विचारांची भर पडत असे, तसेच संस्कृत आणि इतर भाषेतील साहित्यात नवीन ग्रंथांची भर पडत असे. राजाश्रयामुळे या ग्रंथालयांना मोठ्या प्रमाणावर देणग्या मिळत, ज्यामुळे साहित्याचा प्रचार करणे सोपे झाले.

प्रवासवर्णने आणि त्यातील नालंदा विद्यापीठाचे उल्लेख :

ह्युएन त्सांगचे (श्वानझांग) प्रवासवर्णन:

चीनी यात्री ह्युएन त्सांग (श्वानझांग) हर्षवर्धनच्या काळात भारतात आला होता. ह्युएन त्सांगने सविस्तर नोंदी मागे ठेवल्या, ज्याने केवळ भारताच्या समृद्ध तात्विक सिद्धांतांनाच प्रोत्साहन दिले नाही, तर चीन आणि भारत यांच्यात राजनैतिक संबंध वाढवण्याचाही प्रयत्न केला. ह्युएन त्सांगने तांग दरबाराकडून औपचारिक परवानगीशिवाय भारताची तीर्थयात्रा सुरू केली. कारण त्या वेळी तांग चीन आणि गोकटर्क यांच्यात युद्ध सुरू होते. तो इ.स. ६३० मध्ये तुरपानला पोहोचला. पश्चिमेकडे पुढे प्रवास करत तो काराशहरला पोहोचला आणि तिथून पुढे पश्चिमेला समरकंदला गेला. तो यिन-तू (भारत) मधील आदिनापूरला पोहोचला, जिथे तो बौद्ध भिक्षूंना भेटला. हा यात्री आता ज्याला तो यिन-तू (भारत) म्हणतो त्या महान देशाच्या सीमेवर पोहोचल्यावर, आपल्या वाचकांना त्याच्या विविध राज्यांमध्ये घेऊन जाण्यापूर्वी त्या भूमीची एक झलक दाखवतो. त्याच्या प्रवासात खैबर खिंडीतून जाणे आणि गांधारची पूर्वीची राजधानी पेशावरला पोहोचणे यांचा समावेश होता. त्याने आपल्या प्रवासात ताक्लिमाकानच्या सभोवतालच्या रेशीम मार्गाच्या उत्तरेकडील शाखेचा अवलंब केला आणि तो दक्षिणेकडील मार्गाने तांग राज्याची राजधानी शिआन येथे परतला. चिनी लोक आजही त्याला चीनमधील बौद्ध धर्माच्या विकासातील एक महत्त्वाचा प्रभाव मानतात आणि त्याच्या प्रवासाचे पश्चिमेकडील प्रवासाच्या कथा या लोकप्रिय अभिजात ग्रंथात नाट्यमय रूपांतर करण्यात आले आहे.


ह्युएन त्सांग ६३७ इसवी सन मध्ये लुंबिनीहून बुद्धांच्या निर्वाणस्थळी, कुशीनगरकडे निघाला. पूर्वेकडे प्रवास करत, सुरुवातीला वाराणसीमार्गे, ह्युएन त्सांग वैशाली, पाटलीपुत्र आणि बोधगया येथे पोहोचला. स्थानिक भिक्षूंनी त्याला नालंदापर्यंत साथ दिली. ह्युएन त्सांग नालंदामध्ये पोहोचला तो काळ असा होता, जेव्हा चीनने भारतीय मठसंस्था आणि सिद्धांतांमध्ये सखोल रुची घेतली होती. "ह्युएन त्सांग आपल्याला सांगतो की, सनका नावाच्या वनस्पतींच्या तंतूंपासून बनवलेले गडद लाल रंगाचे कापड (एक प्रकारचा ताग) भिक्षू वापरत असत."

ह्युएन त्सांगच्या वर्णनानुसार, नालंदामध्ये तब्बल ८,५०० विद्यार्थी आणि १,५०० शिक्षक होते. ह्युएन त्सांगच्या वर्णनानुसार, नालंदामध्ये विविध विषयांचे शिक्षण दिले जात असे; ती त्या काळातील सर्वोत्तम शिक्षणव्यवस्था होती. ह्युएन त्सांगने तिथे पाच वर्षे अभ्यास केला आणि शीलभद्र यांच्या मार्गदर्शनाखाली योगशास्त्राचा अभ्यास केला. त्याने न्याय, हेतुविद्या, शब्दविद्या आणि पाणिनीचे संस्कृत व्याकरण यांचाही अभ्यास केला. ह्युएन त्सांगने पाहिलेल्या इतर मठांमध्ये बामियान, कपिस, लाम्पा, नगरकोट, गांधार, पैयुषा, उद्यान, बोलोर,

तक्षशिला, हयमुख, मगध यांचा समावेश आहे. त्याला चोळ देशास भेट देण्याचे भाग्य लाभले. ह्युएन त्सांगच्या भेटीच्या वेळी श्रीलंकेचे ३०० भिक्षू देखील चोळ राजधानीत पोहोचले होते.

ह्युएन त्सांग या भिक्षूंना भेटला आणि त्याने धर्मग्रंथ शिकण्यासाठी श्रीलंकेला भेट देण्याचा आपला भविष्यातील हेतू त्यांना सांगितला. भिक्षूंनी त्याला सांगितले की, त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असे कोणीही भिक्षू तिथे नाहीत. त्यानंतर त्या भिक्षूंनी ह्युएन त्सांगसोबत काही योग ग्रंथांवर चर्चा केली आणि त्याला आढळले की त्यांचे स्पष्टीकरण नालंदा येथील शीलभद्र यांनी दिलेल्या स्पष्टीकरणापेक्षा श्रेष्ठ नव्हते. ह्युएन त्सांगचे वर्णन हे देखील दाखवते की आदरातिथ्य कोणत्या मर्यादेपर्यंत होते. त्यांच्या काळात भारतात पर्यटन भरभराटीस आले. त्यांनी भेट दिलेल्या सर्व प्रदेशांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासाच्या निःपक्षपाती वर्णनाबद्दल आपण ह्युएन त्सांगचे खूप ऋणी राहिलो पाहिजेत.

ह्युएन त्सांग यांनी केलेल्या प्रवासाचा नकाशा :



स्रोत: https://www-1.gsb.columbia.edu/special/travel_records.pdf

चीनी प्रवासी यिजिंगचे (आय-त्सिंग) प्रवासवर्णन:


यिजिंग (आय-त्सिंग) यांचे मुख्य ध्येय विनय नियमांचा अभ्यास करणे आणि भारतीय भिक्षूंनी त्या नियमांचे पालन कसे केले हे पाहणे हे होते. यिजिंगने इ.स. ६७१ मध्ये भारताच्या प्रवासाला सुरुवात केली आणि इ.स. ६९५ मध्ये ते चीनला परत गेले. यिजिंगने भारतातील बोधिवृक्ष (ज्ञानवृक्ष) पाहण्याचा निश्चय केला होता. यिजिंगचे वर्णन आशयाच्या दृष्टीने खूपच कमी असले तरी, त्यांनी नालंदा येथील ज्ञानार्जनाच्या प्रेमाचे एक हृदयस्पर्शी वर्णन मागे ठेवले आहे. यिजिंगच्या मते, नालंदामध्ये दिवसाला किमान १०० व्याख्याने होत असत.

यिजिंगच्या मते, नालंदा त्याच्या सुसज्ज मोठ्या ग्रंथालयासाठी देखील प्रसिद्ध होते, ज्यात रत्नसागर, रत्नदधी आणि रत्नरंजक नावाच्या तीन भव्य इमारती होत्या, त्यापैकी रत्नसागर ही नऊ मजली इमारत होती. सर्व ग्रंथालयांमध्ये दुर्मिळ पवित्र हस्तलिखिते संग्रहित होती. यिजिंगने भारतातून ४०० विविध ग्रंथ आणि ५,००,००० श्लोक गोळा केल्याची नोंद केली आहे. भारतातून धर्मग्रंथ गोळा करून प्रचारासाठी चीनमध्ये नेणे हे अनेक विद्वानांकडून एक महान पवित्र कर्तव्य मानले जात असे. यिजिंग (आय-त्सिंग) याने लिहिले आहे की, ताम्रलिप्ती भाराहा किंवा बराहत मठाला भेट दिली होती. यिजिंगने आपल्या नोंदींद्वारे चीनमधील बौद्ध धर्माच्या अनुयायांना भारताच्या प्रवासाची कल्पना

दिली. तो त्याच्या प्रवास वर्णनात (बौद्ध धर्माचा वृत्तांत) त्याच्या देशवासियांना म्हणतो, "जर तुम्ही माझा हा वृत्तांत वाचाल, तर तुम्ही एक पाऊलही न टाकता भारताच्या पाचही देशांमध्ये प्रवास करू शकाल." तो आपल्या ग्रंथाचा समारोप करताना म्हणतो, "माझी खरी आशा आणि इच्छा ही आहे की, माझ्या मित्रांच्या लहान खोल्यांमध्ये [सोंग पर्वताचे शिखर] गृध्रकूट पर्वताचे प्रतिनिधित्व करावे आणि चीनच्या पवित्र भूमीत दुसरे राजगृह शहर निर्माण करावे." हे प्रवासवर्णन आपल्याला भारतीय अध्यापकांकडून ज्ञान मिळवण्यासाठी चिनी साधकांनी पायी आणि जहाजांमधून केलेल्या कठीण प्रवासांची सविस्तर माहिती देतात.

आपल्या बौद्ध धर्माच्या वृत्तांतांद्वारे, त्यांनी चीनमधील बौद्ध धर्माच्या अनुयायांना बुद्धजीवनातील पवित्र आणि चमत्कारिक मानल्या जाणाऱ्या स्थळांची व घटनांची कल्पना करण्याची संधी देण्याचा प्रयत्न केला. याव्यतिरिक्त, हे यात्रेकरू बौद्ध ग्रंथ, अवशेष आणि इतर वस्तू घेऊन, चीनमध्ये एक असे भारतीय जग निर्माण करण्याचा प्रयत्न करत होते, जिथे नवे यात्री भारताच्या कष्टप्रद प्रवासाला न जाता तीर्थयात्रा करू शकतील.

यिजिंग यांनी केलेल्या प्रवासाचा नकाशा :



स्रोत: https://www-1.gsb.columbia.edu/special/travel_records.pdf

धर्मगंजचा दुर्दैवी अंत:

बाराव्या शतकाच्या अखेरीस संघर्षाचा एक नवीन टप्पा सुरू झाला. ११७३ मध्ये, सुलतान इख्तियार-उद-दीन मुहम्मद-इब्न-बख्तियार खलजी या तुर्की शासकाने दहाव्या शतकापासून सत्तेवर असलेल्या यामिनी राजवंशाला पदच्युत केले. पाच वर्षांनंतर, ११७८ मध्ये, पश्चिम भारतातील गुजरातच्या छोट्या राज्यावर हल्ला केल्यानंतर बख्तियार खलजीला मोठा पराभव पत्करावा लागला. तथापि, ११९२ पर्यंत, बख्तियार खलजी या पराभवातून सावरला होता आणि त्याने एक नवीन सैन्य उभारले होते. काही जलद विजयांमुळे उत्तर भारताचा बहुतेक भाग तुर्कांच्या हल्ल्यासाठी खुला झाला. ११९३ मध्ये, वाराणसी लुटले गेले आणि एक हजार मंदिरे नष्ट करण्यात आली. त्यांच्या जागी मशिदी बांधण्यात आल्या. तुर्कांनी पूर्वेकडे कूच करून बिहार आणि बंगाल जिंकले आणि तेथील बौद्ध विद्यापीठे नष्ट केली. उदंडापुरा हे तुर्कांचे तळ बनले आणि तेथून जवळच्या नालंदावर छापे टाकण्यात आले.

बख्तियार खिलजी गंभीर आजारी पडला आणि कोणताही वैद्य त्यांच्यावर उपचार करू शकला नाही. मग कोणीतरी त्यांला सांगितले की नालंदा विद्यापीठाचे आचार्य श्री राहुल श्रीभद्रच त्यांना बरे करू शकतात. खिलजीला

आश्चर्य वाटले की त्यांच्याच धर्माचे शिक्षण त्यांच्यावर उपचार करू शकतात का, पण तरीही ते आचार्य श्री राहुल श्रीभद्रांना भेटण्यासाठी नालंदाला गेले. बख्तियार खिलजींनी आचार्य राहुल श्रीभद्रांना कोणत्याही औषधाशिवाय किंवा स्पर्शाशिवाय त्यांच्यावर उपचार करण्याचे आव्हान दिले. आचार्य श्रीभद्रांनी त्यांना कुराण वाचण्यासाठी दिले आणि दररोज ते पठण करण्याची सक्ती केली.

इ. स. ११९३ मध्ये तुर्की आक्रमक बख्तियार खिलजी याने नालंदा विद्यापीठावर आक्रमण केले. जेव्हा खिलजीने या ग्रंथालयाला आग लावली, तेव्हा त्यातील पुस्तकांची संख्या इतकी प्रचंड होती की, ते ग्रंथालय सलग ३ ते ६ महिने जळत होते. या आगीत केवळ कागद किंवा ताडपत्रे जळली नाहीत, तर भारताचा हजारो वर्षांचा बौद्धिक वारसा कायमचा नष्ट झाला. बख्तियार खिलजीच्या आक्रमणात नालंदाचे ग्रंथालय उद्ध्वस्त झाले, ही भारतीय इतिहासातील मोठी हानी मानली जाते. तरीही, अनेक विद्वानांनी काही हस्तलिखिते लपवून ठेवली किंवा स्वतःसोबत तिबेट, चीन आणि कोरियामध्ये नेली. यामुळेच आजही अनेक प्राचीन संस्कृत ग्रंथांचे मूळ किंवा अनुवादित स्वरूप या देशांमध्ये पाहायला मिळते. हे विद्यापीठ ज्ञानाचा खजिना होते. येथे केवळ धार्मिक ग्रंथच नव्हे तर साहित्य, धर्मशास्त्र, वैद्यकशास्त्र, तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि बरेच काही शिकवले जात असे. ज्यामध्ये आयुर्वेदापासून ते अवकाशापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश असलेल्या ९० लाख पुस्तकांचा समावेश होता. ७०० वर्षे या विद्यापीठाने जगाला प्रकाश दिला,

असे म्हटले जाते की नालंदा विद्यापीठाच्या ग्रंथालयात सुमारे तीन महिने आग लागली होती आणि आक्रमकांच्या कपटीपणा आणि असुरक्षिततेमुळे शतकानुशतके जतन केलेला ज्ञानाचा विशाल खजिना धुरात नष्ट झाला. या विद्यापीठाचे अवशेष ५७ एकरांवर पसरलेले आहेत, ज्यामुळे आजही आपल्याला या विद्यापीठाची विशालता अनुभवता येते. नागार्जुन, बुद्धपालिता, शांता रक्षिता आणि आर्य देवासारखे महान शिक्षक या विद्यापीठात अध्यापन करत होते. असेही मानले जाते की सहाव्या शतकात आर्यभट्ट या विद्यापीठाचे प्रमुख होते. हे ते विद्यापीठ आहे जिथे १६,००० किलोमीटर दूरवरून चिनी प्रवासी ह्युएन त्सांग शिक्षण घेण्यासाठी येत होते आणि त्यांच्यासारखे इतर अनेक देशांचे विद्यार्थीही शिक्षणासाठी येत होते. ह्युएन त्सांग यांनी त्यांच्या पुस्तकात लिहिले आहे की सातव्या शतकात नालंदा विद्यापीठात १०,००० विद्यार्थी आणि २००० शिक्षक होते. तसेच त्यांनी नालंदा विद्यापीठातून ७५६ हस्तलिखिते आपल्यासोबत चीनला नेली. या सगळ्यावरून आपल्याला कळते की हे विद्यापीठ ज्ञानाचे अमर्याद भांडार होते आणि असुरक्षिततेच्या या भयंकर आगीत हे विद्यापीठ आपल्या ज्ञानासह इतिहासात कुठेतरी हरवले गेले.

आधुनिक संदर्भात धर्मगंजचे महत्त्व:

धर्मगंजचा अभ्यास समकालीन उच्च शिक्षण आणि ग्रंथालयांसाठी मौल्यवान माहिती प्रदान करण्याचे काम करीत आहे. २१ व्या शतकात नालंदा विद्यापीठाचे पुनरुज्जीवन हा या समृद्ध वारशाशी पुन्हा जोडले जाण्याचा आणि भारत हा जागतिक ज्ञान देणारा "ज्ञानदाता" म्हणून पुनर्स्थापित करण्याचा एक प्रयत्न आहे. धर्मगंजचा अभ्यास आपणास पुढील गोष्टी शिकण्यास मदत करेल.

- आंतरविद्याशाखीय शिक्षणाचे महत्त्व
- ज्ञानाच्या संवर्धनाची गरज
- संशोधन केंद्र म्हणून ग्रंथालयांची भूमिका
- शिक्षणाद्वारे कल्पनांची जागतिक देवाणघेवाण

समारोप:

प्राचीन नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय धर्मगंज मानवी संस्कृतीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण उपलब्धी होती. ते ज्ञान संघटन, जतन आणि प्रसार याविषयीच्या प्रगत आकलनाचे प्रतीक होते. धर्मगंजने केवळ नालंदाच्या शैक्षणिक उत्कृष्टतेलाच हातभार लावला नाही, तर जागतिक बौद्धिक परंपरांमध्येही महत्त्वपूर्ण योगदान दिले. भौतिकदृष्ट्या नष्ट झाले असले तरी, धर्मगंजचा वारसा परदेशात जतन केलेल्या ग्रंथांद्वारे आणि मुक्त चौकशी व सार्वत्रिक शिक्षणाच्या आदर्शांद्वारे आजही टिकून आहे. हा अभ्यास प्राचीन ज्ञानप्रणालींना ओळखण्याची आणि त्यांचे पुनरुज्जीवन करण्याची, तसेच त्यांना आधुनिक शैक्षणिक चौकटीत समाविष्ट करण्याची गरज अधोरेखित करतो. धर्मगंज

हे शहाणपण, शिक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी भारताच्या वचनबद्धतेचे एक कालातीत प्रतीक आहे व कायम राहील.

संदर्भग्रंथ :

1. Ahir, D. C., Ed. A Panorama of Indian Buddhism: Selections from the Maha Bodhi Journal (1892-1992). Delhi, India: Sri Satguru Publications, 1995.
2. Altekar, A. S. Education in Ancient India. Nand Kishore & Bros.
3. Xuanzang. Si-Yu-Ki: Buddhist Records of the Western World.
4. Yijing. A Record of the Buddhist Religion as Practiced in India.
5. UNESCO Reports on Nalanda Mahavihara.
6. Basham, A. L. The Wonder That Was India. 3d ed. 1954. Reprint. London: Sidgwick & Jackson, 2000.
7. Dutt, Sukumar. Buddhist Monks and Monasteries of India.
8. Sharma, R. S. India's Ancient Past.
9. De Bary, Theodore, Ed. The Buddhist Tradition in India, China, and Japan. 1969. Reprint. New York: Vintage Books, 1972.
10. Goyal, S. R. A History of Indian Buddhism. Meerut, India: Kusumanjali Prakashan, 1987.
11. Warder, A. K. Indian Buddhism. Delhi, India: Motilal Banarsidass, 1970.
12. https://www-1.gsb.columbia.edu/special/travel_records.pdf
13. https://www.ebsco.com/research-starters/history/turkish-raiders-destroy-buddhist-university-nalanda

B.Aadhar' International Refereed & Peer-Reviewed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXV) 565 -A

ISSN : 2278-9308 February 2026

शास्त्रीय भाषा व साहित्यामधील व्यवस्थापन विचार आधुनिक वाणिज्य व व्यवस्थापनासाठी एक संकल्पनात्मक अध्ययन

भाग्यश्री बोन्हाडे

संशोधक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

डॉ. प्रबोधिनी वाखारे

सहायक प्राध्यापक

भारतीय जैन संघटना कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाघोली, पुणे

प्रा. (डॉ.) शिवाजी बोन्हाडे

प्राचार्य

पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालय उरुळी कांचन, पुणे

सारांश:

आधुनिक वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यासक्रमांचा विकास प्रामुख्याने पाश्चात्य सैद्धांतिक परंपरेतून झाला असून त्यामध्ये कार्यक्षमता, नफाक्षमला आणि बाजारस्पधर्धा यांवर मुख्यत्वे भर दिला जातो. तथापि वाढते कॉर्पोरेट घोटाळे, नेतृत्वाचे नैतिक अपयश आणि शाश्वत विकासाशी संबंधित गंभीर आव्हाने यांमुळे मूल्याधिष्ठित आणि मानवकेंद्री व्यवस्थापन दृष्टिकोनांचा पुनर्विधार करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. शास्त्रीय भाषा व साहित्य है प्रामुख्याने मानवविद्येपुरते मर्यादित केले गेले असले तरी आधुनिक व्यवस्थापनशास्त्राच्या उदयापूर्वीच आर्थिक, प्रशासकीय आणि नैतिक व्यवस्थापन विधारांचे समृद्ध स्रोत म्हणून कार्यरत होते. प्रस्तुत संशोधन लेख भारतीय तसेच ग्रीक-रोमन शास्त्रीय भाषा व साहित्याचा अभ्यास करून त्यांमधील व्यवस्थापनविषयक संकल्पनांचा आधुनिक वाणिज्याशी असलेला संबंध विशद करण्याचा प्रयत्न आहे. संकल्पनात्मक व पाठ्यविश्लेषणात्मक पद्धतींचा अवलंब करून नेतृत्व, धोरणात्मक विचार, आर्थिक शासन, मानवी संसाधन व्यवस्थापन, संवाद प्रक्रिया आणि व्यावसायिक नीतिमत्ता यांचा यामध्ये अभ्यास करण्यात आला आहे. शास्त्रीय साहित्य व्यवस्थापनाला समय, एकात्म, कालातीत व शाश्वत असा मानवतावादी दृष्टिकोन प्रदान करते. या तत्त्वांचा आधुनिक वाणिज्य शिक्षण व व्यवस्थापन व्यवहारांवर दूरगामी परिणाम होऊ शकतो. लेखाच्या शेवटी वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यासक्रमांमध्ये शास्त्रीय व्यवस्थापन तत्त्वांचा समावेश करण्याच्या शैक्षणिक उपयुक्ततेवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

मुख्य शब्द (कीवड्स) शास्त्रीय भाषा व साहित्य, व्यवस्थापन विचार, वाणिज्य, नेतृत्व, व्यावसायिक नीतिमत्ता, भारतीय जानपरंपरा

१. प्रस्तावना

आधुनिक व्यवस्थापन शिक्षणाचा विकास औद्योगिकीकरण, वैज्ञानिक व्यवस्थापन आणि भांडवलशाही बाजारव्यवस्थैध्या पार्श्वभूमीवर झाला आहे. या प्रवाहांनी संघटनात्मक कार्यक्षमता व आर्थिक उत्पादनक्षमता वाढवली असली तरी त्याचवेळी नीतिमूल्यांचा न्हास, अल्पकालीन नफावृत्ती आणि सामाजिक असमानता यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. कॉर्पोरेट अपयश, पर्यावरणीय संकटे आणि कामगार दूरत्व यांमुळे व्यवस्थापनात नीतिमता, शाश्वतता आणि मानवी घटकांचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

संस्कृत, ग्रीक, लैटिन, तमिळ आणि पाली यांसारख्या शास्त्रीय भाषांतील साहित्यामध्ये शासन, व्यापार, नेतृत्व, मानवी वर्तन आणि नैतिक संपत्ती निर्मिती यांविषयी सखोल विचार आढळतो. व्यवस्थापन हा स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून उदयास येण्याच्या कित्येक शतके आधी या संधांनी व्यावहारिक व्यवस्थापन संकल्पना मांडल्या

होत्या. त्यामुळे शास्त्रीय साहित्य कालबाह्य नसून आधुनिक वाणिज्य व व्यवस्थापनासाठी दिशादर्शक ठरते. हा लेख शास्त्रीय साहित्याला व्यवस्थापन विचारांचे आद्य स्रोत म्हणून पुनर्स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे.

२. साहित्याचा आढावा

शास्त्रीय भाषा व साहित्यामधील व्यवस्थापन विचारांवर केलेल्या अभ्यासामध्ये अलीकडील संशोधनाने प्राचीन ग्रंथांना केवळ ऐतिहासिक दस्तऐवज न मानता आधुनिक व्यवस्थापन सिद्धांतांचे वैचारिक स्रोत म्हणून पुनर्मूल्यांकन केले आहे. बोएशे (२००२) यांनी कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे विश्लेषण करताना त्यास रणनीतिक व्यवस्थापन, राजकीय वास्तववाद आणि सार्वजनिक प्रशासनाचे आद्य रूप मानले आहे. पोलॉक (२००६) यांनी संस्कृत साहित्याचा अभ्यास करताना भाषा, सत्ता आणि संस्थात्मक नियंत्रण यांमधील परस्परसंबंध अधोरेखित केला असून है निष्कर्ष आधुनिक संघटनात्मक रचना आणि प्रशासन सिद्धांतांशी सुसंगत ठरतात. तसेच केनेडी (१९९४) यांनी शास्त्रीय वक्तृत्वपरंपरेचा आढावा घेताना निर्णयप्रक्रिया, नेतृत्व संवाद आणि प्रभावी प्रशासनातील भाषेच्या भूमिकेवर प्रकाश टाकला आहे.

आधुनिक नेतृत्व व व्यवस्थापन साहित्यामध्ये मूल्याधिष्ठित व नैतिक नेतृत्वावर वाढता भर दिसून येतो. नॉर्थहाऊस (२०२२) यांच्या सेवक नेतृत्व व परिवर्तनात्मक नेतृत्व सिद्धांतांमध्ये आत्मसंयम, लोककल्याण आणि नैतिक जबाबदारी या संकल्पनांचे प्रतिबिंब स्पष्टपणे आढळते जे शास्त्रीय साहित्याशी सुसंगत आहेत. रॉबिन्स व जज (२०२३) यांनी संस्थात्मक वर्तनाच्या संदर्भात मानवी प्रेरणा, नैतिकता आणि संघटनात्मक संस्कृती यांचे महत्व अधोरेखित केले आहे. याशिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने भारतीय जानपरंपरेचा उच्च शिक्षणात समावेश करण्यावर भर दिला असून शास्त्रीय साहित्याच्या समकालीन व्यवस्थापन शिक्षणातील उपयुक्ततेस संस्थात्मक मान्यता दिली आहे. या सर्व अभ्यासांवरून असे स्पष्ट होते की शास्त्रीय भाषा व साहित्यामधील व्यवस्थापन विधार है आधुनिक वाणिज्य व व्यवस्थापनासाठी संकल्पनात्मक व मूल्याधारित मार्गदर्शन प्रदान करतात मात्र त्यांचा समकालीन संदर्भात चिकित्सक व सुसंगत पुनर्विचार करण्याची आवश्यकता अधोरेखित होते.

अद्यापपर्यंत झालेल्या संशोधनामध्ये शास्त्रीय संथांतील व्यवस्थापन विचारांचे प्रामुख्याने ऐतिहासिक, तात्विक किंवा राजकीय विश्लेषण करण्यात आले आहे मात्र त्यांचे आधुनिक वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षणाशी संकल्पनात्मक एकत्रीकरण तुलनेने कमी प्रमाणात इवलेले आळकले. विशेषतः शास्त्रीय साहित्य, समकालीन नेतृत्व सिद्धांत, व्यावसायिक नीतिमता आणि धोरणात्मक व्यवस्थापन यांमधील सुसंगतीचा समय व बहुविद्याशाखीय अभ्यास करण्याची स्पष्ट गरज दिसून येते.

३. उिद्दष्टे व संशोधन पद्धती

1. खस्वीय भाषा व साहित्यांमधील व्यवस्थापन तत्त्वे ओळखून एक मूलभूत व्यवस्थापन चौकट विकसित करणे.
२. आधुनिक वाणिज्य व व्यवस्थपनाशी या तत्वांची सुसंगती तपासणे.
3. शास्त्रीय साहित्यांतील अर्थशास्त्र, धोरण व नौतिमता यांचा अभ्यास करणे.
४. वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षणातील शास्त्रीय साहित्याची शैक्षणिक उपयुक्तता विश्लेषित करणे.

या अभ्यासासाठी संकल्पनात्मक व वर्णनात्मक संशोधन रचना स्वीकारण्यात आली आहे. अनुभवाधारित संशोधनाऐवजी विश्लेषणात्मक व अर्थलाक्षणिक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये अर्थशास्त्र स्विकुर ग्रीक रोमन प्रशासकीय ग्रंथ आणि संबंधित दुय्यम साहित्याचा अभ्यास करून व्यवस्थापन तत्वांचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. हा अभ्यास भविष्यातील अनुभवाधारित संशोधनासाठी सैद्धांतिक अधिष्ठान प्रदान करती.

४. शास्त्रीय भाषा व साहित्य संकल्पनात्मक चौकट

शास्त्रीय भाषा या संस्कृतींच्या ज्ञानपरंपरेच्या वाहक असून सामाजिक, आर्थिक, राजकीय व नैतिक रचना घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. महाकाव्ये सत्त्वज्ञानपर ग्रंथ, प्रशासकीय लेखन, नाटके व काव्य यांमधून व्यवस्थापन व नेतृत्वाची मूलभूत तत्वे व्यक्त झाली आहेत. साहित्यातील अर्थशास्त्र हा गंध प्रशासन व व्यवस्थापनाचा आद्य आणि सर्वसमावेशक ग्रंथ मानला जात असून त्यामध्ये प्रशासन, करप्रणाली, सार्वजनिक कल्याण आणि आर्थिक नियोजन यांचे शिस्तबद्ध विश्लेषण आढळते. नौटिल्याने मांडलेली प्रशासनाची संकल्पना ही केवळ सत्ताकेंद्रित नसून, लोककल्याण, उत्तरदायित्व आणि कार्यक्षम व्यवस्थापनावर आधारित आहे. यामुळे अर्थशास्त्र हे आधुनिक सार्वजनिक प्रशासन, आर्थिक नियोजन आणि रणनीतिक व्यवस्थापनाचे पूर्वरूप म्हणून पाहिले जाऊ शकते. तमिळ साहित्यातील

तिरुक्कुरळ हा ग्रंथ नैतिकता, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी यांना केंद्रीय स्थान देतो. ग्रीक व रोमन साहित्याने राज्यव्यवस्था, नायदे आणि प्रशासकीय यंत्रणाचे तत्वज्ञान विकसित केले. या सर्व संथांमधून व्यवस्थापनाशी संबंधित मूलभूत प्रानांचा सखोल विचार झाल्याचे स्पष्ट होते.

५. शास्त्रीय संथांतील आर्थिक व वाणिज्यविषयक विचार

१.१ संपती व अर्थव्यवस्थेची संकल्पना

प्राचीन शास्त्रीय साहित्यामध्ये संपत्तीच्या नैतिक उपार्जनावर विशेष भर दिलेला आढळतो. भारतीय तत्वज्ञानातील अर्थ ही संकल्पना धर्माशी अविभाज्यरीत्या निगडित असून सामाजिक कल्याणाशिवाय आर्थिक समृद्धी अपूर्ण मानली जाते. कौटिल्याच्या अर्थशास्वामध्ये करव्यवस्था, व्यापार नियंत्रण, किंमत निर्धारण, राज्य उत्पन्नाचे व्यवस्थापन आणि सार्वजनिक हित यांसंबंधी सुस्पष्ट व व्यावहारिक मार्गदर्शन करण्यात आले आहे. या संधात मुक्त बाजारपेठेच्या अनियंत्रित स्वरूपापेक्षा नियंत्रित, न्याय्य आणि समाजाभिमुख अर्थव्यवस्थेला प्राधान्य दिले असून राज्याची जबाबदारी ही केवळ महसूल संकलनापुरती मर्यादित न ठेवता लोककल्याणाशी जोडलेली आहे.

५.२ व्यापार, बाजारपेठा व नियमन

अर्थशास्त्रामध्ये व्यापार व बाजारपेठांच्या कार्यपद्धतीचे सखोल विश्लेषण आढळते. साठेबाजी प्रतिबंध, ग्राहक संरक्षण, व्यापाऱ्यांची नैतिक जबाबदारी, मोजमाप व गुणवतेचे नियंत्रण आणि बाजारनियमन यांसारख्या बाबींचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. यासोबतच तमिळ साहित्यातील तिरुक्कुरळ व्यापारात विश्वास, सत्यनिष्ठा आणि न्याय्य व्यवहार यांना मूलभूत तत्त्व मानते. या शास्त्रीय दृष्टिकोनातून व्यापार हा केवळ नफ्याचा मार्ग नसून सामाजिक विश्वास आणि नैतिक आचरणावर आधारित व्यवस्था असल्याचे प्रतिपादन केले आहे ने आधुनिक स्पर्धा कायदे व ग्राहक संरक्षण धोरणांशी सुसंगत ठरते.

६. नेतृत्व व शासन संकल्पना

६.१ आदर्श नेतृत्व

शास्त्रीय साहित्य नेतृत्वाला सत्ताकेंद्रित किंवा अधिकारप्रधान संकल्पना न मानता नैतिक कर्तव्य म्हणून परिभाषित करते. आत्मसंयम, प्रजा, करुणा, न्यायबुद्धी आणि लोककल्याणाची जाणीव ही आदर्श नेतृत्वाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली गेली आहेत. शासक किंवा नेता हा समाजाचा रक्षक व सेवक असल्याची संकल्पना शास्त्रीय ग्रंथांत ठळकपणे आढळले. अशा प्रकारचे नेतृत्व नैतिक अधिकारावर आधारित असून ते जनतेचा विश्वास संपादन करण्यावर भर देते जे आधुनिक मूल्याधिष्ठित नेतृत्व संकल्पनांशी सुसंगत आहे.

६.२ निर्णयप्रक्रिया व प्रशासन

अर्थशास्त्रामध्ये प्रशासन व निर्णयप्रक्रिया या विवेकाधारित, माहितीपूर्ण आणि सल्लामसलतीवर आधारित असल्याचे दिसून येते. मंत्रिपरिषद, माहिती संकलन यंत्रणा, तज्ज्ञांची नियुक्ती आणि प्रशासकीय उत्तरदायित्व यांवर कौटिल्याने विशेष भर दिला आहे. निर्णय घेण्यापूर्वी पर्यायांचा विचार, संभाव्य धोके आणि दीर्घकालीन परिणाम यांचे विश्लेषण करण्याची पद्धत आधुनिक धोरणात्मक व्यवस्थापन, माहिती व्यवस्थापन आणि प्रशासकीय नियंत्रण प्रणालीशी सुसंगत आहे

६३ आधुनिक नेतृत्व सिद्धांतांशी सुसंगती

आधुनिक सेवक नेतृत्व (Servant Leadership) आणि परिवर्तनात्मक नेतृत्व (Transformational Leadership) या सिद्धांतांमध्ये शास्त्रीय नेतृत्व विद्यासांचे स्पष्ट प्रतिबिंब आढळते. नैतिक आचरण, प्रेरणा देणे, संघटनात्मक मूल्यांची जोपासना आणि सामूहिक कल्याणावर भर देणे ही वैशिष्ट्ये शास्त्रीय तसेच आधुनिक नेतृत्व विचारांत समान आहेत. Northouse (2022) यांनी अधोरेखित केल्याप्रमाणे मूल्याधिष्ठित आणि नैतिक नेतृत्व आजच्या व्यवस्थापनात अधिक महत्वाचे ठरत असून त्याची मुळे शास्त्रीय ज्ञानपरंपरेत

५. धोरण व राज्यकारभार व्यवस्थापनाचा पूर्वरूप

कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये धोरणात्मक विचारसरणीला केंद्रस्थानी स्थान देण्यात आले आहे. पर्यावरणीय विश्लेषण, अंतर्गत व बाह्य घटकांचे मूल्यमापन, जोखीम व्यवस्थापन, पर्यायी धोरणांची आखणी आणि स्पर्धात्मक नीती यांवर विशेष भर दिला आहे. राज्यकारभारात स्पैर्य राखण्यासाठी दूरदृष्टीपूर्ण नियोजन आणि परिस्थितीनुसार

धोरणात्मक लवचिकता आवश्यक असल्याचे कौटिल्याने प्रतिपादित केले आहे. हे सर्व घटक आधुनिक रणनीतिक व्यवस्थापनाच्या मूलभूत संकल्पनांशी सुसंगत असून व्यवस्थापनाचा एक पूर्वरूप म्हणून पाहता येतात.

८. नीतिमत्ता, मूल्ये व सामाजिक जबाबदारी

शास्त्रीय व्यवस्थापन विचारांमध्ये नीतिमत्ता ही केंद्रस्थानी असून आर्थिक किंवा प्रशासकीय यश नीतिमूल्यांशिवाय अपूर्ण मानले जाते. न्याय, प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि लोककल्याण ही मूल्ये शास्त्रीय ग्रंथांत सातत्याने अधोरेखित केली आहेत. आधुनिक काळातील Corporate Social Responsibility (CSR), Environmental, Social and Govemance (ESG) आणि शाश्वत विकासाच्या संकल्पना या त्याच मूल्यांचा समकालीन आविष्कार आहेत. मानवी संसाधन व्यवस्थापनाच्या संदर्भात प्रेरणा, मान्यता, स्पष्ट जबाबदाऱ्या आणि नैतिक नेतृत्व यांवर दिलेला भर शास्त्रीय आणि आधुनिक व्यवस्थापन यांमधील सुसंगती दर्शवितो.

९. उद्योजकता व नवोपक्रम

शास्त्रीय ग्रंथांमध्ये उद्‌द्योजकतेला सामाजिक समृद्धीचे महत्वपूर्ण साधन मानले गेले आहे, व्यापारी, कारागीर आणि उत्पादक हे आर्थिक प्रगतीचे केंद्रबिंदू असून नवोपक्रम, जोखीम स्वीकारणे आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर यांना प्रोत्साहन दिले आहे. तथापि ही उद्योजकता नीतिमतेच्या चौकटीत राहून असावी असख स्पष्ट आग्रह आढळतो. अल्पकालीन नफ्याऐवजी दीर्घकालीन स्थैर्य, विश्वास आणि सामाजिक उत्तरदायित्व यांवर भर देणारी ही संकल्पना आधुनिक शाश्वत उद्योजकतेशी सुसंगत आहे.

१०. वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षणातील शैक्षणिक महत्व

वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षणात शास्त्रीय साहित्याचा समावेश केल्यास शिक्षण अधिक मूल्याधिष्ठित, चिकित्सक आणि बहुविद्याशाखीय बनू शकते. शास्त्रीय ग्रंथ विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक कौशल्येच नव्हे तर नैतिक विचार, दीर्घकालीन दृष्टी आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव प्रदान करतात. ही दृष्टी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील बहुविद्याशाखीय शिक्षण आणि भारतीय ज्ञानपरंपरेच्या समावेशाच्या उद्दिष्टांशी पूर्णतः सुसंगत आहे.

११. जागतिकीकरण व डिजिटल अर्थव्यवस्थैतौल उपयुक्तता

तंत्रज्ञान आणि डिजिटल प्रणालीमध्ये सातत्याने मोठ्या प्रमाणावर बदल होत असले तरी नेतृत्व, नीतिमत्ता आणि मानवी वर्तनाशी संबंधित मूलभूत प्रश्न आजही तितकेत्य महत्वाचे आहेत. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर सांस्कृतिक विविधता, नैतिकता आणि विश्वासार्ह नेतृत्व यांची गरज अधिक तीव्र झाली आहे. शास्त्रीय मूल्ये आधुनिक जागतिक व डिजिटल व्यवस्थापनाला नैतिक दिशा देऊ शकतात मात्र त्यांचा वापर करताना ऐतिहासिक संदर्भ, सामाजिक बदल आणि समकालीन गरजा लक्षात घेऊन योग्य समायोजन करणे आवश्यक आहे.

१२. निष्कर्ष

शास्त्रीय भाषा व साहित्य ही व्यवस्थापन विचारांची समृद्ध, सुसंगत आणि कालातीत ज्ञानपरंपरा असल्याचे प्रस्तुत अभ्यासातून स्पष्ट होते. नेतृत्व, धोरणनिर्मिती, आर्थिक प्रशासन, नीतिमता आणि संघटनात्मक वर्तन यांसारखे मूलभूत व्यवस्थापन घटक आधुनिक व्यवस्थापनशास्त्राच्या उदयापूर्वीच शास्त्रीय ग्रंथांमध्ये सखोलपणे विचारात घेतले गेले होते. अर्थशास्त्र, तिरुक्कळ तसेच ग्रीक-रोमन प्रशासकीय व तत्वज्ञानपर साहित्यामधील व्यवस्थापन तत्वे ही केवळ ऐतिहासिक संदर्भापुरती मर्यादित नसून ती आजच्या वाणिज्य आणि उद्‌द्योगविश्वातील नैतिक अधोगती, अल्पकालीन नफावृत्ती आणि नेतृत्वाच्या संकटावर प्रभावी उत्तर देऊ शकतात. त्यामुळे शास्त्रीय साहित्याकडे केवळ सांस्कृतिक किंवा साहित्यिक वारसा म्हणून न पाहता व्यवस्थापन विचारांचे आद्य आणि सशक्त स्रोत म्हणून पाहणे आवश्यक ठरते.

व्यवस्थापन व वाणिज्य शिक्षणात शास्त्रीय ज्ञानपरंपरेचा समावेश केल्यास मूल्याधिष्ठित, सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि दीर्घकालीन दृष्टी असलेले व्यवस्थापक घडविण्यास मदत होऊ शकते. शास्त्रीय साहित्य व्यवस्थापनाला मानवी, नैतिक आणि शाश्वत चौकट प्रदान करते जी केवळ आर्थिक यशावर नव्हे तर सामाजिक कल्याण आणि संस्थात्मक स्थैर्यावरही भर देते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या बहुविद्याशाखीय दृष्टिकोनाच्या पार्श्वभूमीवर

शास्त्रीय भाषा व साहित्याचे व्यवस्थापन शिक्षणाशी एकात्मीकरण करणे ही काळाची गरज आहे. अशा आंतरशाखीय दृष्टिकोनातूनच आधुनिक व्यवस्थापन शिक्षण अधिक समय, नैतिक आणि समाजाभिमुख बनू शकते.

संदर्भ:

१. बोएशे, आर. (२००२). द फर्स्ट ग्रेट पॉलिटिकल रिॲलिस्ट कौटिल्य अँड हिज अर्थशास्त्र लेक्सिंग्टन बुक्स.

२. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया (२०२०), नॅशनल एज्युकेशन पोलिसी २०२०, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन

३. कौटिल्य. (इ. स. पू. सुमारे ३००), अर्थशास्त्र (भा. आर. शमशास्त्री) म्हैसूर गव्हर्नमेंट प्रेस.

४. केनेडी, जी. ए. (१९९४) अ न्यू हिस्टरी ऑफ क्लासिकल रेटॉरिक प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेस.

५. नॉर्थहाऊस, पी. जी. (२०२२) लीडरशिप थिअरी अँड प्रैक्टिस (९ वी आवृत्ती), सेज पब्लिकेशन्स.

६. पोलॉक, एस. (२००६). द लैंग्वेज ऑफ द गॉड्स इन द वर्ल्ड ऑफ मैन: संस्कृत, कल्चर अँड पॉवर इन प्रीमॉडर्न इंडिया. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस.

७. राधाकृष्णन, एस. (१९५१) इंडियन फिलॉसफी (खंड १) जॉर्ज ऑपन ॲंड अनविन

८. रॉबिन्स, एस. पी., अँड जज, टी. ए. (२०२३) ऑर्गनायझेशनल बिहेवियर (२० वी आवृत्ती). पिअरसन.

९. शर्मा, आर. (२०१७). इंडियन इकॉनॉमिक थॉट एन्शन्ट टू मॉडर्न, ऑक्सफर्ड्स युनिव्हर्सिटी प्रेस.

१०. वल्लुवर, टी. (इ. स. पहिल्या शतकाच्या सुमारास) तिरुक्कुरळ (भा. जी. यू. पोप) मद्रास : द ख्रिश्चन लिटरेचर सोसायटी.

अभिजात मराठी भाषेच्या संदर्भात संत एकनाथ महाराजांच्या अभंगांतील तत्त्वज्ञान :एक चिकित्सक अध्ययन

संशोधक विद्यार्थी:
श्री. दिलीप रोहिदास पवार
संशोधक मार्गदर्शक:
डॉ. मिनाक्षी दयाराम महाले
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
ईमेल: pawardilip790@gmail.com

सार:

मराठी भाषा ही तिच्या दीर्घ ऐतिहासिक परंपरेमुळे, समृद्ध साहित्यनिर्मितीमुळे आणि वैचारिक प्रगल्भतेमुळे अभिजात भाषेच्या सर्व निकषांवर खरी उतरते. या अभिजाततेचा महत्त्वाचा आधार म्हणजे मराठी संतसाहित्य. प्रस्तुत शोधनिबंधात अभिजात मराठी भाषेच्या संदर्भात संत एकनाथ महाराज यांच्या अभंगांचे चिकित्सक अध्ययन करण्यात आले आहे. संत एकनाथ महाराजांनी आपल्या अभंगांमधून ईश्वरभक्ती, आत्मज्ञान, मानवतावाद, सामाजिक समता आणि विवेकवाद यांचा प्रभावी पुरस्कार केला आहे. बाह्य कर्मकांड, अंधश्रद्धा आणि अहंकारावर त्यांनी केलेली परखड टीका ही मराठी भाषेच्या वैचारिक अभिजाततेचे द्योतक ठरते. लोकाभिमुख व ओघवत्या भाषेत मांडलेले त्यांचे तत्त्वज्ञान सामान्य जनतेपर्यंत सहज पोहोचले. या अभ्यासातून असे दिसून येते की संत एकनाथ महाराजांचे अभंग हे केवळ अध्यात्मिक साहित्य नसून ते मराठी भाषेच्या अभिजात परंपरेचा अविभाज्य भाग आहेत. त्यामुळे अभिजात मराठी भाषेच्या विकासात व प्रतिष्ठेत संत एकनाथ महाराजांच्या अभंगांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

मुख्य शब्द: अभिजात मराठी भाषा, संत एकनाथ महाराज, अभंग साहित्य, मराठी संतपरंपरा, भक्ती चळवळ, मानवतावाद, सामाजिक समता, विवेकवाद, मराठी साहित्यिक वारसा

प्रस्तावना:

भारतीय भाषांमध्ये मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणून मान्यता मिळण्यामागे तिची प्राचीनता, अखंड साहित्यपरंपरा आणि वैचारिक समृद्धी ही प्रमुख कारणे आहेत. मराठी अभिजाततेचा ठोस पुरावा म्हणजे तिचे संतसाहित्य. या संतपरंपरेत संत एकनाथ महाराज यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या अभंगांमधून व्यक्त होणारे भक्तीपर तत्त्वज्ञान, मानवतावाद, सामाजिक समता आणि विवेकवाद हे मराठी भाषेच्या अभिजात स्वरूपाला अधोरेखित करतात. प्रस्तुत शोधनिबंधात अभिजात मराठी भाषेच्या संदर्भात संत एकनाथ महाराजांच्या अभंगांचे चिकित्सक अध्ययन करण्यात आले आहे.

अभिजात भाषा: संकल्पना आणि मराठी

'अभिजात भाषा' ही संकल्पना भाषेच्या ऐतिहासिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक मूल्यांशी निगडित आहे. अभिजात भाषा म्हणजे अशी भाषा की जिचा विकास दीर्घ कालखंडात झाला आहे, जिला समृद्ध आणि प्राचीन साहित्यपरंपरा लाभलेली आहे, आणि जिचा स्वतंत्र भाषिक व सांस्कृतिक प्रवाह आढळतो. भारत सरकारने अभिजात भाषेची मान्यता देताना काही ठोस निकष निश्चित केले आहेत. त्यामध्ये भाषेची किमान दीड ते दोन हजार वर्षांची प्राचीनता, प्राचीन लिखित साहित्याची उपलब्धता, साहित्यिक परंपरेची सातत्यपूर्ण अखंडता आणि आधुनिक भाषेपासून वेगळी ओळख असणे या बाबींचा समावेश होतो.

मराठी भाषा या सर्व निकषांवर पूर्णतः पात्र ठरते. मराठी भाषेचा उगम संस्कृत आणि प्राकृत भाषांपासून झाला असून तिचा स्वतंत्र विकास कालांतराने झालेला दिसतो. यादवकालापासून मराठी भाषेला राजाश्रय मिळाल्याचे

ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. शिलालेख, ताम्रपट, बखरी आणि हस्तलिखित ग्रंथांमधून मराठीची प्राचीन लेखनपरंपरा स्पष्टपणे दिसून येते. यादवकाळात मराठी भाषा ही केवळ बोलभाषा न राहता प्रशासकीय आणि साहित्यिक भाषा म्हणून प्रस्थापित झाली.

मराठी भाषेच्या अभिजाततेला खऱ्या अर्थाने अधिष्ठान मिळाले ते संतसाहित्यामुळे. संतपरंपरेने मराठी भाषेला आध्यात्मिक, तत्त्वज्ञानात्मक आणि सामाजिक आशय दिला. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास यांसारख्या संतांनी मराठी भाषेतून उच्च दर्जाचे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचवले. यामुळे मराठी भाषा केवळ लोकभाषा न राहता वैचारिक अभिव्यक्तीचे समर्थ माध्यम बनली.

या संतपरंपरेत संत एकनाथ महाराज यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी आपल्या अभंगांमधून भक्ती, विवेक, मानवतावाद आणि सामाजिक समता यांसारखी अभिजात मूल्ये प्रभावीपणे मांडली. संस्कृतग्रंथांतील गहन तत्त्वज्ञान त्यांनी सोप्या, लोकाभिमुख मराठी भाषेत व्यक्त केले. हीच बाब मराठी भाषेच्या अभिजात स्वरूपाचे महत्त्वाचे लक्षण मानली जाते. त्यांच्या अभंगांमध्ये आढळणारी आशयगंभीरता, तत्त्वज्ञानात्मकता आणि समाजप्रबोधनाची धार ही मराठी भाषेच्या वैचारिक प्रगल्भतेचे द्योतक आहे.

संत एकनाथ महाराजांचे अभंग हे मराठी भाषेच्या अभिजाततेचे ठोस पुरावे मानता येतात. कारण त्यामध्ये केवळ भक्तीभाव नसून विवेक, नैतिकता, कर्मकांडावरील टीका आणि मानवकेंद्री विचार आढळतो. अशा प्रकारचे साहित्य निर्माण करण्याची क्षमता हीच अभिजात भाषेची ओळख असते. त्यामुळे मराठी भाषा ही संतसाहित्याच्या माध्यमातून अभिजाततेच्या सर्वोच्च स्तरावर पोहोचलेली दिसते.

अशा प्रकारे मराठी भाषेची दीर्घ ऐतिहासिक परंपरा, अखंड साहित्यप्रवाह आणि संतपरंपरेतून विकसित झालेले तत्त्वज्ञान हे तिच्या अभिजात दर्ज्याला भक्कम अधिष्ठान प्रदान करतात. त्यामुळे 'अभिजात मराठी भाषा' ही संकल्पना केवळ गौरवाची नसून ती ऐतिहासिक आणि साहित्यिक दृष्ट्या पूर्णतः न्याय्य ठरते.

संत एकनाथ महाराज आणि अभिजात मराठी भाषा

मराठी भाषेच्या अभिजात स्वरूपाच्या जडणघडणीत संतपरंपरेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. या संतपरंपरेत संत एकनाथ महाराज यांनी मराठी भाषेचा वापर अत्यंत समर्थ आणि प्रभावीपणे केला. संस्कृत, उपनिषदे आणि वेदांतातील गहन तत्त्वज्ञान सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी लोकाभिमुख मराठी भाषेचा आधार घेतला. ही प्रक्रिया म्हणजे अभिजात भाषेचे एक महत्त्वाचे लक्षण मानले जाते—उच्च तत्त्वज्ञानाची लोकभाषेत प्रभावी मांडणी.

संत एकनाथ महाराजांच्या अभंगांमधील भाषा अत्यंत साधी, ओघवती आणि स्वाभाविक आहे; मात्र तिचा आशय तत्त्वज्ञानात्मक दृष्ट्या अत्यंत गहन आहे. आत्मज्ञान, भक्ती, वैराग्य, विवेक, मानवतावाद आणि सामाजिक समता यांसारखे गंभीर विचार त्यांनी सहज शब्दांत व्यक्त केले. भाषेतील ही सहजता आणि आशयातील प्रगल्भता यांचा संगम मराठी भाषेच्या अभिजात स्वरूपाचे वैशिष्ट्य ठरतो.

संत एकनाथ महाराजांनी मराठी भाषेला केवळ भावनिक अभिव्यक्तीचे साधन म्हणून वापरले नाही, तर तिला विवेकशील विचारप्रणालीचे माध्यम बनवले. त्यांनी अंधश्रद्धा, कर्मकांड, अहंकार आणि जातिभेद यांवर आपल्या अभंगांमधून परखड टीका केली. अशी चिकित्सक भूमिका घेणारे साहित्य निर्माण होणे ही कोणत्याही भाषेच्या अभिजाततेची ओळख असते. त्यांच्या अभंगांमधून प्रकट होणारा तर्कनिष्ठ आणि मानवकेंद्री दृष्टिकोन मराठी भाषेच्या वैचारिक उंचीचे द्योतक आहे.

याशिवाय संत एकनाथ महाराजांच्या भाषेत लोकजीवनाशी नाते जोडणारे अनेक शब्दप्रयोग, प्रतिमा आणि रूपके आढळतात. ग्रामीण, शहरी, सामान्य समाजातील अनुभव त्यांनी आपल्या अभंगांमध्ये प्रभावीपणे गुंफले. त्यामुळे मराठी भाषेला व्यापक सामाजिक अधिष्ठान प्राप्त झाले. लोकभाषा आणि तत्त्वज्ञान यांचा हा समन्वय अभिजात मराठी भाषेची एक महत्त्वाची ओळख मानली जाते.

संत एकनाथ महाराजांचे अभंग हे मराठी भाषेच्या अभिजात परंपरेचे ठोस उदाहरण आहेत. कारण त्यामध्ये भाषिक सौंदर्य, आशयगंभीरता आणि सामाजिक जाणीव यांचा समतोल आढळतो. त्यामुळे अभिजात

मराठी भाषेच्या विकासप्रक्रियेत संत एकनाथ महाराजांचे साहित्य हे अनिवार्य आणि अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

अभंगांतील ईश्वरभक्ती: अभिजात तत्त्वज्ञान

मराठी संतसाहित्यातील ईश्वरभक्ती ही केवळ कर्मकांड, विधी किंवा बाह्य आचरणापुरती मर्यादित नसून ती अंतर्मुख, विवेकशील आणि आत्मज्ञानावर आधारित आहे. या अभिजात भक्तीपरंपरेचे प्रभावी दर्शन संत एकनाथ महाराज यांच्या अभंगांमधून घडते. त्यांच्या अभंगांतील भक्ती ही भावनात्मक असली तरी ती तत्त्वज्ञानाने समृद्ध आहे. त्यामुळे मराठी भाषेला आध्यात्मिक अभिजातता प्राप्त झाली आहे.

"अंतरीचा भाव तोचि देव ।

बाहेरीची पूजा व्यर्थचि भासे ॥"

या अभंगातील ओळींतून संत एकनाथ महाराज ईश्वरभक्तीची अंतर्मुख संकल्पना स्पष्ट करतात. येथे ईश्वर हा बाह्य पूजाविधी, व्रत-वैकल्ये किंवा आडंबरात नसून माणसाच्या अंतःकरणातील शुद्ध भावात आहे, असा विचार मांडला आहे. भावाविना केलेली पूजा निरर्थक ठरते, ही भूमिका कर्मकांडविरोधी आणि विवेकाधिष्ठित आहे. अशा प्रकारची भक्ती ही अभिजात तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे लक्षण मानली जाते.

याच भक्तीच्या संकल्पनेला अधिक स्पष्ट करणारा आणखी एक अभंग संत एकनाथ महाराज मांडतात—

"भावेवीण देव न मिळे ।

कोटि कर्मे व्यर्थचि झाले ॥"

या अभंगातून संत एकनाथ महाराज स्पष्टपणे सांगतात की केवळ असंख्य धार्मिक कर्मे, विधी किंवा आचार पाळूनही जर अंतःकरणात भक्तिभाव नसेल, तर ईश्वरप्राप्ती शक्य नाही. भावप्रधान भक्तीला येथे सर्वोच्च स्थान दिले आहे. हा विचार भारतीय तत्त्वज्ञानातील 'भाव, ज्ञान आणि विवेक' या त्रिसूत्रीशी निगडित आहे.

या दोन्ही अभंगांमधून संत एकनाथ महाराज बाह्य कर्मकांडाला नाकारून आत्मिक शुद्धतेवर भर देतात. ही भूमिका उपनिषदकालीन आत्मज्ञानाच्या विचारांशी सुसंगत आहे. त्यामुळे मराठी भाषा ही केवळ धार्मिक भावनांची अभिव्यक्ती करणारी भाषा न राहता, उच्च तत्त्वज्ञान मांडणारी समर्थ अभिजात भाषा ठरते.

लोकाभिमुख आणि सोप्या मराठीत अशा गहन तत्त्वज्ञानाची मांडणी करणे ही अभिजात भाषेची महत्त्वाची ओळख आहे. संत एकनाथ महाराजांच्या अभंगांमुळे मराठी भाषेला आध्यात्मिक विचारांची खोल परंपरा लाभली. म्हणूनच त्यांच्या अभंगांतील ईश्वरभक्ती ही अभिजात मराठी भाषेच्या वैचारिक आणि आध्यात्मिक प्रगल्भतेचे प्रभावी उदाहरण मानली जाते.

मानवतावाद आणि सामाजिक समता: अभिजात मूल्ये

मराठी संतसाहित्याची मूलभूत ओळख म्हणजे त्यातील मानवतावादी दृष्टिकोन आणि सामाजिक समतेचा आग्रह. ही मूल्ये अभिजात साहित्याची महत्त्वाची लक्षणे मानली जातात. या अभिजात परंपरेचे प्रभावी दर्शन संत एकनाथ महाराज यांच्या अभंगांमधून घडते. संत एकनाथ महाराजांनी भक्तीला केवळ वैयक्तिक मोक्षापुरती मर्यादित न ठेवता, तिला सामाजिक कर्तव्याशी जोडले आहे.

"मानव सेवा हीचि देव सेवा ।

हाचि खरा धर्म जाणावा ॥"

या अभंगातील ओळींतून संत एकनाथ महाराजांचा मानवकेंद्री दृष्टिकोन स्पष्ट होतो. येथे देवपूजा आणि मानवसेवा यांमध्ये कोणताही भेद न करता, मानवसेवेलाच खऱ्या धर्माचे स्वरूप दिले आहे. समाजातील गरिब, पीडित आणि दुर्बल घटकांची सेवा करणे हेच ईश्वरभक्तीचे श्रेष्ठ रूप आहे, असा संदेश या अभंगातून मिळतो. हा विचार केवळ धार्मिक नसून सामाजिक नैतिकतेचा मूलाधार ठरतो.

मानवतावादाचा हा विचार आणखी ठळकपणे मांडणारा संत एकनाथ महाराजांचा पुढील अभंग महत्त्वाचा ठरतो—

"जो जो भेटे तो तो देव ।
हेचि जाणावे निश्चित ॥"

या अभंगातून संत एकनाथ महाराज सर्व मानवांमध्ये ईश्वराचे अस्तित्व मान्य करतात. प्रत्येक माणूस हा देवस्वरूप आहे, अशी भावना रुजवून ते जातिभेद, उच्च-नीचता आणि सामाजिक विषमता यांना मूळातून नाकारतात. ही भूमिका सामाजिक समतेचा आणि बंधुभावाचा पुरस्कार करणारी आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीकडे आदराने पाहणे हीच खरी भक्ती आहे, असा अभिजात विचार या अभंगातून व्यक्त होतो.

संत एकनाथ महाराजांच्या अभंगांमधील मानवतावाद हा केवळ उपदेशात्मक नाही, तर तो व्यवहार्य आहे. त्यांनी भक्तीला प्रत्यक्ष आचरणाशी जोडले. करुणा, दया, सहिष्णुता आणि सेवाभाव ही मूल्ये त्यांच्या अभंगांमधून सातत्याने प्रकट होतात. त्यामुळे मराठी भाषा ही सामाजिक परिवर्तनाची प्रभावी भाषा बनली. मराठी संतसाहित्याने समाजात रुजवलेली ही मानवतावादी आणि समतावादी मूल्ये मराठी भाषेच्या अभिजाततेला अधिक गहिरा अर्थ देतात. लोकाभिमुख भाषेत मांडलेले हे उच्च नैतिक विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचले आणि लोकजीवनाचा भाग बनले. म्हणून मानवतावाद आणि सामाजिक समता ही मूल्ये अभिजात मराठी भाषेच्या साहित्यिक परंपरेचा अविभाज्य भाग ठरतात.

अशा प्रकारे संत एकनाथ महाराजांच्या अभंगांतील मानवसेवेचा आग्रह आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन हे मराठी भाषेच्या अभिजात मूल्यांचे प्रभावी उदाहरण आहेत. त्यांच्या अभंगांमुळे मराठी संतसाहित्याला केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

अहंकार, अज्ञान व कर्मकांडावर टीका: विवेकवादी भूमिका

मराठी संतसाहित्याची एक महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्यातील विवेकवादी आणि तर्कशुद्ध भूमिका. या प्रवृत्तीचे प्रभावी दर्शन संत एकनाथ महाराज यांच्या अभंगांमधून घडते. संत एकनाथ महाराजांनी मानवी जीवनातील अहंकार, अज्ञान आणि अंधश्रद्धा यांना समाजाच्या प्रगतीतील मोठे अडथळे मानले आणि त्यावर आपल्या अभंगांमधून परखड टीका केली.

"अहंभाव गेला की ज्ञान उगवे ।
तेथेचि समाधान पावे ॥"

या अभंगातील ओळींतून संत एकनाथ महाराज अहंकार आणि ज्ञान यांमधील परस्परसंबंध स्पष्ट करतात. त्यांच्या मते, अहंकार हा आत्मज्ञानाच्या मार्गातील सर्वात मोठा अडसर आहे. जोपर्यंत मनुष्याचा अहंभाव नष्ट होत नाही, तोपर्यंत खरे ज्ञान प्रकट होत नाही. अहंकाराच्या क्षयातूनच समाधान, शांती आणि आत्मिक उन्नती साध्य होते, असा विचार या अभंगातून मांडला आहे. हा दृष्टिकोन भारतीय तत्त्वज्ञानातील आत्मसंयम आणि विवेकवादाशी सुसंगत आहे.

याचप्रमाणे कर्मकांडावर टीका करणारा पुढील अभंग संत एकनाथ महाराजांची विवेकशील भूमिका अधोरेखित करतो—

"काय करिसी तीर्थव्रत ।
भावावाचून सर्व व्यर्थ ॥"

या अभंगातून संत एकनाथ महाराज बाह्य धार्मिक कर्मकांड, तीर्थयात्रा, व्रत-वैकल्ये यांची निरर्थकता दाखवून देतात. भाव आणि विवेकाशिवाय केलेली धार्मिक आचरणे निष्फळ ठरतात, असा त्यांचा ठाम विश्वास आहे. त्यांनी अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या रूढींना स्पष्टपणे नाकारले आहे. ही भूमिका केवळ धार्मिक सुधारणा करणारी नसून सामाजिक प्रबोधनाचीही आहे.

संत एकनाथ महाराजांच्या या विवेकवादी विचारांमुळे मराठी भाषा ही केवळ भक्तीभाव व्यक्त करणारी भाषा न राहता तर्क, विवेक आणि विचारस्वातंत्र्य मांडणारी भाषा बनली. अंधानुकरणाला नाकारून तर्कशुद्ध

विचारांची मांडणी करणे ही अभिजात भाषेची महत्त्वाची ओळख मानली जाते. या दृष्टीने संत एकनाथ महाराजांचे अभंग मराठी भाषेच्या वैचारिक अभिजाततेचे ठोस उदाहरण ठरतात.

अहंकार, अज्ञान आणि कर्मकांड यांवर केलेली टीका ही संत एकनाथ महाराजांच्या सामाजिक जाणिवेचे द्योतक आहे. त्यांनी व्यक्तीला आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त केले आणि विवेकपूर्ण जीवनमार्ग स्वीकारण्याचा संदेश दिला. अशा प्रकारचे तत्त्वज्ञान मांडणारे साहित्य निर्माण होणे ही कोणत्याही भाषेच्या अभिजाततेची प्रमुख कसोटी मानली जाते.

म्हणूनच संत एकनाथ महाराजांच्या अभंगांमधील विवेकवादी भूमिका, अंधश्रद्धेविरोधी विचार आणि तर्कशुद्धता ही मराठी भाषेच्या अभिजात स्वरूपाला अधिक दृढ करणारी ठरते. त्यांच्या अभंगांमुळे मराठी संतसाहित्याला केवळ आध्यात्मिक नव्हे तर वैचारिक आणि सामाजिक उंची प्राप्त झाली आहे.

भाषिक वैशिष्ट्ये आणि अभिजात परंपरा

मराठी भाषेच्या अभिजात परंपरेच्या जडणघडणीत संतसाहित्याचा विशेष वाटा आहे. या संतपरंपरेत संत एकनाथ महाराज यांची भाषिक शैली अत्यंत प्रभावी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या अभंगांतील भाषा ओघवती, सहज आणि लोकाभिमुख असली, तरी ती आशयगंभीर व तत्त्वज्ञानप्रधान आहे. हीच भाषा आणि आशय यांची सांगड मराठी भाषेच्या अभिजात स्वरूपाला दृढ करणारी ठरते.

संत एकनाथ महाराजांनी आपल्या अभंगांमध्ये अलंकारांचा अतिरेक टाळला आहे. शब्दवैभवापेक्षा आशयवैभवाला त्यांनी अधिक महत्त्व दिले. उपमा, रूपक, प्रतिमा यांचा वापर त्यांनी अत्यंत साध्या व नैसर्गिक पद्धतीने केला आहे. त्यामुळे त्यांच्या अभंगांमधील भाषा अलंकारिक न वाटता अनुभवसिद्ध आणि जीवनाशी जोडलेली भासते. अभिजात साहित्याची हीच एक प्रमुख ओळख मानली जाते. त्यांच्या अभंगांमध्ये प्रतीकात्मकता आढळते; परंतु ती क्लिष्ट नसून सहज समजणारी आहे. दैनंदिन जीवनातील अनुभव, ग्रामीण व शहरी समाजातील दृश्ये, मानवी स्वभावातील दोष आणि गुण यांचा उपयोग करून त्यांनी गहन तत्त्वज्ञान मांडले. यामुळे लोकभाषा आणि तत्त्वज्ञान यांचा सुंदर समन्वय साधला गेला आहे. ही समन्वयात्मक भाषा मराठीच्या अभिजात परंपरेचा महत्त्वाचा घटक ठरते.

संत एकनाथ महाराजांची भाषा ही केवळ भावनांची अभिव्यक्ती करणारी नाही, तर ती विवेक, नैतिकता आणि सामाजिक जाणीव जागवणारी आहे. त्यांच्या अभंगांमधील संवादात्मक शैली व थेट संबोधन वाचकाला अंतर्मुख करते. अशी भाषा सामान्य जनतेशी थेट संवाद साधते आणि त्याच वेळी तत्त्वज्ञानाचे गंभीर स्वरूपही जपते. अशा प्रकारची भाषिक शैली मराठी भाषेच्या अभिजाततेचे द्योतक मानली जाते. कारण अभिजात भाषा ही केवळ प्राचीन असते असे नाही, तर ती आशयसमृद्ध, वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ आणि कलात्मक अभिव्यक्ती करणारी असते. संत एकनाथ महाराजांच्या अभंगांमधील भाषा या सर्व निकषांवर खरी उतरते.

म्हणूनच संत एकनाथ महाराजांची भाषिक शैली ही अभिजात मराठी भाषेच्या परंपरेला बळकटी देणारी आहे. त्यांच्या अभंगांमधील लोकभाषा आणि तत्त्वज्ञान यांचा समन्वय हा मराठी साहित्याच्या अभिजात परंपरेचा अमूल्य ठेवा मानला जातो.

चिकित्सक मूल्यांकन

अभिजात मराठी भाषेच्या विकासप्रक्रियेत संतसाहित्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असून, त्यामध्ये संत एकनाथ महाराज यांच्या अभंगांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. त्यांच्या साहित्यामुळे मराठी भाषा केवळ धार्मिक भावना व्यक्त करणारी लोकभाषा न राहता सामाजिक, वैचारिक आणि नैतिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनली आहे. ही बाब मराठी भाषेच्या अभिजात दर्ज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरते.

संत एकनाथ महाराजांच्या अभंगांमध्ये भक्ती, विवेक, मानवतावाद आणि सामाजिक समता यांचा सुसंगत मिलाफ आढळतो. त्यांनी कर्मकांड, अंधश्रद्धा आणि अहंकार यांवर केलेली परखड टीका मराठी भाषेच्या वैचारिक प्रगल्भतेचे द्योतक आहे. अशी चिकित्सक भूमिका घेणारे साहित्य निर्माण होणे ही अभिजात भाषेची महत्त्वाची

कसोटी मानली जाते. या दृष्टीने संत एकनाथ महाराजांचे अभंग मराठी भाषेच्या अभिजाततेला भक्कम अधिष्ठान देतात.

भाषिक दृष्टीने पाहता, संत एकनाथ महाराजांनी लोकभाषेचा समर्थ वापर करून गहन तत्त्वज्ञान मांडले. अलंकारांचा अतिरेक न करता आशयप्रधान अभिव्यक्ती करणे हे त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे मराठी भाषा विचारप्रवर्तक आणि तर्कनिष्ठ अभिव्यक्तीची भाषा म्हणून विकसित झाली. हीच बाब मराठी भाषेच्या अभिजात स्वरूपाची ओळख मानली जाते.

सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले असता, संत एकनाथ महाराजांच्या अभंगांनी जातिभेद, उच्च-नीचता आणि सामाजिक विषमता यांना आव्हान दिले. मानवसेवा, करुणा आणि समता यांना त्यांनी धर्माचे खरे स्वरूप मानले. या विचारांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले आणि मराठी संतसाहित्याला व्यापक सामाजिक अधिष्ठान प्राप्त झाले. अशा प्रकारचा सामाजिक प्रभाव साधणारे साहित्य हे अभिजात परंपरेचे महत्त्वपूर्ण अंग ठरते.

अर्थात, काही अभ्यासकांच्या मते संतसाहित्य हे प्रामुख्याने भक्तीपर असून त्यातील तत्त्वज्ञान साधे आहे. मात्र सखोल विचार केल्यास हे लक्षात येते की या साधेपणामागे गहन तत्त्वज्ञान आणि व्यापक सामाजिक जाणीव दडलेली आहे. हे साधेपणच मराठी भाषेच्या अभिजाततेचे बलस्थान ठरते. एकूणच पाहता, संत एकनाथ महाराजांचे अभंग हे मराठी भाषेच्या अभिजात परंपरेतील एक महत्त्वाचा टप्पा आहेत. त्यांच्या साहित्यामुळे मराठी भाषा वैचारिकदृष्ट्या समृद्ध, सामाजिकदृष्ट्या सजग आणि सांस्कृतिकदृष्ट्या सशक्त बनली. त्यामुळे अभिजात मराठी भाषेचा विचार करताना संत एकनाथ महाराजांचे साहित्य अपरिहार्य आणि अनिवार्य ठरते.

निष्कर्ष

संतसाहित्याच्या समृद्ध परंपरेत संत एकनाथ महाराज यांचे अभंग हे अभिजात मराठी भाषेचा एक मौलिक आणि अमूल्य साहित्यिक वारसा मानले जातात. त्यांच्या अभंगांमधून मराठी भाषेची प्राचीनता, वैचारिक प्रगल्भता आणि साहित्यिक समृद्धी स्पष्टपणे दिसून येते. संस्कृतप्रधान तत्त्वज्ञान लोकाभिमुख मराठीत मांडण्याची क्षमता हीच मराठी भाषेच्या अभिजात स्वरूपाची प्रमुख ओळख ठरते.

संत एकनाथ महाराजांच्या अभंगांमध्ये अंतर्मुख भक्ती, विवेकवाद, मानवतावाद आणि सामाजिक समतेचा आग्रह सातत्याने आढळतो. त्यांनी बाह्य कर्मकांड, अंधश्रद्धा आणि अहंकारावर केलेली परखड टीका मराठी भाषेच्या वैचारिक अभिजाततेचे ठोस द्योतक आहे. अशा प्रकारचे तर्कशुद्ध आणि विचारप्रवर्तक साहित्य निर्माण होणे ही अभिजात भाषेची महत्त्वाची कसोटी मानली जाते.

भाषिक दृष्टिकोनातून पाहता, संत एकनाथ महाराजांची शैली साधी, ओघवती आणि आशयप्रधान आहे. लोकभाषा आणि तत्त्वज्ञान यांचा साधलेला सुंदर समन्वय मराठी भाषेला अभिजात परंपरेत दृढपणे स्थापित करतो. त्यांच्या अभंगांमुळे मराठी भाषा केवळ धार्मिक अभिव्यक्तीची भाषा न राहता सामाजिक आणि वैचारिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनली.

एकूणच पाहता, संत एकनाथ महाराजांचे अभंग हे मराठी भाषेच्या अभिजाततेचे सर्व निकष पूर्ण करणारे आहेत. त्यामुळे अभिजात मराठी भाषेच्या अभ्यासात आणि मूल्यांकनात संत एकनाथ महाराजांचे साहित्य अपरिहार्य आणि अनिवार्य ठरते. त्यांच्या अभंगांमधील विचारसंपदा ही आजच्या काळातही तितकीच सुसंगत आणि प्रेरणादायी आहे.

संदर्भसूची:

१. एकनाथ महाराज. एकनाथी अभंग. संपादक ———, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे.

२. जोशी, लक्ष्मणशास्त्री. मराठी संतसाहित्य. पुणे : श्रीविद्या प्रकाशन.

३. देशपांडे, ग. त्र्यं. मराठी साहित्याचा इतिहास. पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन.

४. कुलकर्णी, अ. ना. मराठी भाषेची अभिजात परंपरा. मुंबई : लोकप्रिय प्रकाशन.

५. खांडेकर, विष्णु सखाराम. मराठी भाषा आणि संस्कृती. मुंबई : लोकप्रिय प्रकाशन.

६. सरदार, गो. नी. मराठी संतपरंपरा. पुणे : देशमुख प्रकाशन.

७. काळे, श्री. ना. मराठी भाषेचा इतिहास. औरंगाबाद : विद्याभारती प्रकाशन.

८. बेंद्रे, ग. ह. भक्ती चळवळ आणि मराठी साहित्य. पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.

९. पाटील, रा. भा. संत एकनाथ : व्यक्ती आणि साहित्य. मुंबई : ग्रंथाली.

१०. सरकार, भारत. अभिजात भाषांविषयी अहवाल. नवी दिल्ली : माहिती व प्रसारण मंत्रालय.

जागतिकीकरणाच्या युगात अभिजात भाषा व साहित्य: राजकीय आव्हाने व शक्यता

डॉ. विजय जालिंदर देठे
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर. मो. नं.- 90 11 64 89 87
मो. न. ९०११६४८९८७
Email - dethevijay11@gmail.com

प्रस्तावना:

जागतिकीकरण (Globalization) हा सध्याच्या काळातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय संरचनांमध्ये घडणारा सर्वात व्यापक विविधांगी बदलाचा प्रवाह आहे. यामुळे भाषा आणि साहित्यावर होणाऱ्या परिणामांची चर्चा सैद्धांतिक, सांस्कृतिक आणि राजकीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची ठरते(1). विशेषतः "अभिजात भाषा" (Elite Language) आणि त्यातून निर्मित "अभिजात साहित्य" या संकल्पनांचा अभ्यास जगाच्या विविध भागांत वेगवेगळ्या संदर्भात होत आहे. हे विषय केवळ भाषाशास्त्र किंवा साहित्यक्षेत्रापुरते मर्यादित नसून सामाजिक असमानता, सत्ता-संरचना, राष्ट्रीय ओळख, राजकीय अधिकार आणि धोरण या सर्वांशी अंतर्बद्ध आहेत.

जागतिकीकरणाने भाषा व साहित्य यांना नवे रूप दिले आहे; काही भाषांना जागतिक स्तरावर वर्चस्व मिळाले, तर अनेक स्थानिक भाषा आणि साहित्य विस्मरणात पडण्याच्या धोक्यात आहेत. या शोध निबंधात आपण जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात अभिजात भाषा आणि साहित्याचे राजकीय आव्हाने आणि शक्यता यांचा सखोल अभ्यास करणार आहोत.

संशोधनाची उद्दिष्टे

१)जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे अभिजात भाषा व साहित्याच्या सामाजिक-राजकीय स्थानात झालेले बदल अभ्यासणे.

२)अभिजात भाषा व साहित्य यांचा सत्ता, राजकारण आणि राष्ट्रनिर्मितीशी असलेला संबंध विश्लेषित करणे.

३)जागतिकीकरणाच्या युगातील भाषिक असमानता, सांस्कृतिक वर्चस्व आणि एकसारखेगी (Homogenization) या राजकीय आव्हानांचे मूल्यमापन करणे.

४)बहुभाषिक धोरणे, अनुवाद, डिजिटल माध्यमे आणि स्थानिक साहित्याच्या जागतिकीकरणाच्या शक्यतांचा शोध घेणे.

संशोधन पद्धती

1) वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धत- प्रस्तुत संशोधन पेपर साठी जागतिकीकरण, अभिजात भाषा व साहित्य, भाषा-राजकारण आणि सांस्कृतिक वर्चस्व या संकल्पनांचे वर्णनात्मक तसेच विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे. 2) तुलनात्मक पद्धत - अभिजात भाषा (उदा. इंग्रजी) आणि स्थानिक/लोकभाषा (उदा. मराठी) यांच्यातील सामाजिक, राजकीय व साहित्यिक स्थानाची तुलनात्मक चिकित्सा करण्यात आली आहे.3) दुय्यम माहिती स्रोतांचा वापर- संशोधन पेपरसाठी पुस्तके, संशोधन निबंध, जर्नल्स, धोरणात्मक दस्तऐवज, आणि डिजिटल माध्यमांवरील शैक्षणिक स्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे.

१. अभिजात भाषा आणि साहित्य: संकल्पना व व्याप्ती-

"अभिजात भाषा" ही संकल्पना साधारणपणे शिक्षित, उच्चभ्रू सामाजिक गटाद्वारे वापरल्या जाणाऱ्या भाषिक रूपांना संदर्भित करते(2). या भाषेवर सामाजिक-राजकीय अधिकार असतात आणि ती सत्ता-संरचनांमध्ये मान्यतेचा दर्जा प्राप्त करते. त्याच्या तुलनेत "लोकभाषा" (Vernacular) किंवा स्थानिक बोलीभाषा सामाजिक व राजकीय स्तरावर तितक्या मान्यतेने निंधल्या जातात, आणि त्यामुळेच त्यांचे साहित्यिक महत्त्वही कमी समजले जाते. अभिजात

साहित्य म्हणजे केवळ भाषेतील सुबकता नव्हे; ती सामाजिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक वर्चस्वाची एक रूपरेषा आहे. अभिजात साहित्य राजकीय विचार, मत, मूल्ये आणि सत्ता-विचारसरणीला प्रतिबिंबित करते. म्हणूनच हे साहित्य केवळ कला नसून सामाजिक-सत्ता संरचना आणि राजकीय शक्तींचे धागेदोरे उलगडते(3).

२. जागतिकीकरणाचा अर्थ आणि त्याचा भाषेवर परिणाम-

जागतिकीकरण म्हणजे राष्ट्रीय सीमाभित्तींना ओलांडून विचार, भाषा, संस्कृती आणि अर्थव्यवस्था यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा संचार. याचा परिणाम केवळ आर्थिक व्यवहारांपुरता मर्यादित न राहता, भाषा, साहित्य, सांस्कृतिक मूल्ये आणि सामाजिक बांधणी यांच्यावरही खोलवर होत आहे(4). जागतिकीकरण आणि भाषा वर्चस्व- जागतिकीकरणामुळे विशेषतः इंग्रजी भाषेला जागतिक अभिजात भाषा म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. इंग्रजीने शैक्षणिक, व्यवसायिक, विज्ञान-तंत्रज्ञान व राजकीय संवादात एक सार्वत्रिक स्थान मिळवले आहे(5). त्यामुळे अनेक स्थानिक भाषा आणि साहित्य दुर्लक्षित होण्याची भीती वाढली आहे. भाषिक असमानता आणि साहित्यिक प्रभाव- जागतिकीकरणामुळे भाषा आणि साहित्य यांच्यात भाषिक असमानता (Linguistic Inequality) वाढली आहे. अभिजात भाषेच्या आधारे केले जाणारे साहित्य आणि प्रकाशन अधिकाधिक जागतिक स्तरावर वाचले जाते, तर स्थानिक भाषिक साहित्याचे प्रसारमर्यादा मर्यादित असतात. त्यामुळे साहित्याच्या राजकारणात एक स्पष्ट वर्चस्व-आधारित विभाजन उद्भवते(6).

३. राजकीय परिप्रेक्ष्यात अभिजात भाषा व साहित्य-

भाषा आणि साहित्याचे राजकीय मूल्य अतिशय व्यापक आहे. भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर सत्तेचे साधन, राष्ट्रीय ओळख आणि सामाजिक समावेशन/अपवर्जनाचे संकेत असते. भाषा राजकारण आणि सत्तासंरचना- राजकीय विज्ञानात भाषा राजकारणाचा अभ्यास केव्हा आपल्या सुरुवातीपासूनच महत्वाचा राहिला आहे. भाषा कोणत्या देशात, कोणत्या अधिकृत कार्यक्रमात वापरली जाते याविषयीच्या निर्णयांमध्ये सत्ता-संरचना स्पष्टपणे दिसून येते. उदाहरणार्थ, भारतातील अनेक राज्यांमध्ये भाषा धोरणे राज्य राजकारणाला आकार देतात(7).अभिजात भाषा आणि साहित्य शासन-धोरणे, शैक्षणिक प्रणाली आणि सार्वजनिक संवादाचे माध्यम म्हणून राजकीय शक्ती हाताळतात. हे माध्यम वर्चस्ववादी गटांच्या हिताला पूरक ठरते आणि त्यामुळे भाषिक आणि साहित्यिक असमानता वाढते. अभिजात साहित्य आणि राष्ट्रनिर्मिती- राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत भाषा आणि साहित्याची भूमिका निर्णायक ठरते. अभिजात साहित्य राष्ट्रीय विचारधारा, एकात्मता आणि सांस्कृतिक धोरणे यांचा प्रचार-प्रसार करण्याचा महत्त्वाचा वाहक बनते. त्यामुळे हे साहित्य राजकीय विचारसरणीला बळकट करते, परंतु स्थानिक विविधता आणि भाषिक अल्पसंख्यांकांचे साहित्य दुर्लक्षित होते(8).

४. जागतिकीकरणाच्या युगातील राजनीतिक आव्हाने-

जागतिकीकरणामुळे अभिजात भाषा व साहित्याला अनेक राजकीय आव्हाना उद्भवले आहेत. भाषिक विषमतेचा वाढता ताण- जागतिक मंचावर इंग्रजीचा वर्चस्वामुळे अनेक स्थानिक भाषा "शोधल्या जाणाऱ्या" स्थितीत आले आहेत. मात्र, हे वर्चस्व केवळ साहित्यिक क्षेत्रापुरते मर्यादित नाही; ते आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रातही स्पष्ट दिसते(9).

घटक:

शैक्षणिक वर्चस्व: जागतिक शैक्षणिक प्रकाशनांमध्ये इंग्रजीचा वापर प्रधान असल्यामुळे स्थानिक भाषांचे संशोधन अधोगतीत पडले आहे(10). नोकरी व रोजगार: जागतिक अर्थव्यवस्थेत इंग्रजी भाषा आवश्यक असल्यामुळे सामाजिक-आर्थिक विभाजन वाढते(11). सांस्कृतिक वर्चस्व व सार्वभौमिकता- जागतिकीकरणामुळे सांस्कृतिक वर्चस्वाचे प्रश्न उठतात. अभिजात भाषा आणि साहित्य हे अनेकदा "सार्वभौमिक" म्हणून सादर केले जाते, पण प्रत्यक्षात ते सांस्कृतिक-राजकीय शक्तीच्या बाजूने झुकलेले असते. याचा परिणाम म्हणून: अ) स्थानिक आणि अल्पसंख्यांक संस्कृतींची दुर्लक्षा होते(12). ब)साहित्याच्या जगात एकसारखेगी वाढते आणि विविधतामूल्य कमी होते(13).

५. शक्यता: राजकीय धोरणांमधील बदल आणि भाषिक समावेश-

जागतिकीकरणाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विविध राजकीय व धोरणात्मक शक्यता दिसून येतात. बहुभाषिक धोरणे (Multilingual Policies)- राज्यांनी बहुभाषिकता स्वीकारणे आवश्यक आहे. बहुभाषिक शिक्षण, प्रशासन आणि सार्वजनिक संवादामध्ये स्थानिक भाषांचे सन्मान राखणे हे भाषिक असमानतेला कमी करू शकते(14). स्थानिक साहित्याचे जागतिकीकरण- स्थानिक भाषिक साहित्याचे जागतिकीकरण (Globalization of Local Literature) हाच एक महत्त्वाचा मार्ग आहे. स्थानिक साहित्याचे अनुवाद, जागतिक प्रकाशन, साहित्यातील सांस्कृतिक विमर्श यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे(15). डिजिटल माध्यमांचा वापर- डिजिटल माध्यमांचा वापर करून स्थानिक भाषा आणि साहित्याचा प्रसार अधिक प्रभावीपणे होऊ शकतो. डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर स्थानिक भाषिक साहित्याचे प्रकाशन आणि वाचन यांना प्रोत्साहन देणेही एक महत्वाची शक्यता आहे(16).

६. महाराष्ट्राचे उदाहरण: अभिजात भाषा, साहित्य आणि राजकारण-

महाराष्ट्र हे भाषिक आणि साहित्यिक चळवळींचे केंद्र राहिले आहे. मराठी भाषेचा आणि तिच्या साहित्यातील राजकीय संदर्भाचा अभ्यास केल्यास जागतिकीकरणाच्या प्रभावाचे स्थानिक प्रतिकर्तव्य स्पष्ट होते.

- मराठी अभिजात साहित्याचे स्थान-मराठी अभिजात साहित्याने विविध सामाजिक व राजकीय चळवळींमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे (उदा. सामाजिक सुधारणा चळवळी, राज्याभिषेक चळवळी). परंतु जागतिकीकरणामुळे मराठी साहित्याला जागतिक स्तरावर स्थान मिळवणे हे आव्हान आहे(17). भाषिक धोरण आणि समावेश- महाराष्ट्र शासनाने बहुभाषिक धोरणे स्वीकारल्यामुळे मराठीला स्थानिक आणि राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. पण जागतिक संदर्भात इंग्रजीचे वर्चस्व मराठीवर दबाव आणते(18).

७. निष्कर्ष

जागतिकीकरणाच्या युगात अभिजात भाषा आणि साहित्य हा विषय केवळ भाषिक किंवा सांस्कृतिक चर्चापुरता मर्यादित न राहता राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक शक्तींचे जटिल नेटवर्क आहे. इंग्रजीसारख्या अभिजात भाषेच्या जागतिक वर्चस्वामुळे भाषिक विषमता वाढली आहे, परंतु या प्रक्रियेत बहुभाषिक धोरणे, स्थानिक संस्कृतीचे आत्मसात आणि डिजिटल सामर्थ्याचा वापर यासारख्या शक्यता आहेत ज्या भाषिक आणि साहित्यिक समावेशकतेस पुढे नेऊ शकतात. राजकीय दृष्टिकोनातून हे लक्षात घेतले पाहिजे की भाषा आणि साहित्य हे केवळ संवादाचे साधन नाही, तर सत्ता, ओळख आणि समावेशन/बहिष्करण यांचे साक्षीदार आहेत. जागतिकीकरणाच्या युगात या संकल्पनांचे संतुलन राखणे, विविध भाषिक समुदायांना न्याय देणे आणि सांस्कृतिक वैविध्याचा सन्मान करणे हे समकालीन राजकीय ध्येय असले पाहिजे.

संदर्भग्रंथ:

1. Appadurai, A. (1996). Modernity at Large: Cultural Dimensions of Globalization. University of Minnesota Press.
2. Bourdieu, P. (1991). Language and Symbolic Power. Harvard University Press.
3. Said, E. (1978). Orientalism. Pantheon Books.
4. Tomlinson, J. (1999). Globalization and Culture. University of Chicago Press.
5. Phillipson, R. (1992). Linguistic Imperialism. Oxford University Press.
6. Skutnabb-Kangas, T. (2000). Linguistic Genocide in Education. Lawrence Erlbaum Associates.
7. Brass, P. R. (1991). Ethnicity and Nationalism: Theory and Comparison. Sage Publications.
8. Anderson, B. (1983). Imagined Communities. Verso.
9. Crystal, D. (2003). English as a Global Language. Cambridge University Press.

10. Graddol, D. (2006). English Next. British Council.
11. Kachru, B. (1985). Standards, Codification and Sociolinguistic Realism. Cambridge University Press.
12. Hall, S. (1997). Representation: Cultural Representations and Signifying Practices. Sage.
13. Nederveen Pieterse, J. (2004). Globalization and Culture: Global Mélange. Rowman & Littlefield.
14. May, S. (2012). Language and Minority Rights. Routledge.
15. Damrosch, D. (2003). What Is World Literature? Princeton University Press.
16. Thurlow, C., & Mroczek, K. (2011). Digital Discourse: Language in the New Media. Oxford University Press.
17. Joshi, M. (2008). Marathi Literature and Cultural Identity. Pune University Press.
18. Deshpande, A. (2010). Language Policy and Politics in Maharashtra. Mumbai Academic Publications.

माहिती-तंत्रज्ञानाच्या युगातील मराठी भाषा : संधी, आव्हाने आणि भवितव्य

डॉ. शीतल सचिन गोर्डे-पाटील
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
विलिंग्डन महाविद्यालय, सांगली (स्वायत्त)

सारांश -

मानवी भाषा आणि तंत्रज्ञान यांचे नाते हे आदिम काळापासून अतूट राहिलेले आहे. भाषा समाजाच्या गरजांनुसार विकसित होत गेली आणि त्या विकास प्रक्रियेत तंत्रज्ञानाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आजचे युग माहिती-तंत्रज्ञानाचे आहे. संगणक, इंटरनेट, मोबाईल, सोशल मीडिया तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या घटकांनी मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. या बदलांचा थेट परिणाम भाषिक व्यवहारांवर, ज्ञाननिर्मितीवर आणि ज्ञानसंप्रेषणावर दिसतो. मराठी भाषेसाठी हा काळ एकाच वेळी संधींचा आणि आव्हानांचाही आहे.

मराठी भाषेचा ऐतिहासिक प्रवास, माहिती-तंत्रज्ञानाशी तिचे नाते, डिजिटल माध्यमांमुळे निर्माण झालेल्या नव्या अभिव्यक्ती शक्यता, युनिकोडमुळे घडलेले परिवर्तन, तसेच मराठी भाषेला ज्ञानभाषा बनविण्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक उपाययोजना या शोधनिबंधात विचारात घेतल्या आहेत.

नवीन संशोधनानुसार, सध्या मराठीमध्ये AI आधारित भाषांतर, डिजिटल सहाय्यक, ऑनलाइन शिक्षण सामग्री आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा प्रभाव वाढत आहे. ही साधने केवळ भाषेचा वापर सुलभ करत नाहीत, तर नव्या ज्ञाननिर्मितीच्या मार्गही उघडत आहेत. त्यामुळे मराठी भाषा केवळ साहित्यभाषा नसून ज्ञानभाषा म्हणूनही विकसित होऊ शकते.

कीवर्ड्स: माहिती-तंत्रज्ञान, मराठी भाषा, डिजिटल माध्यमे, युनिकोड, ज्ञानभाषा, कृत्रिम बुद्धिमत्ता, AI, ऑनलाइन शिक्षण.

प्रस्तावना -

मानवी जीवनाच्या प्रत्येक पातळीवर माहिती-तंत्रज्ञानाने मूलभूत बदल घडवले आहेत. इंग्रजीसारख्या जागतिक भाषांनी तंत्रज्ञानाशी जुळवून घेत आपले वर्चस्व दृढ केले आहे, परंतु प्रादेशिक भाषांसमोर अस्तित्वाचे आणि विकासाचे प्रश्न उभे राहिले आहेत. मराठी भाषा ही समृद्ध साहित्यपरंपरा, मोठा भाषिक समाज आणि शास्त्रशुद्ध लिपी असलेली असूनही माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अपेक्षित वापर मिळाला नाही.

मराठी भाषेचा ज्ञात इतिहास सुमारे हजार ते तेराशे वर्षांचा आहे. या कालखंडात मराठीने सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थितींना सामोरे जात स्वतःचे अस्तित्व टिकवले आहे. लोकजीवन, व्यवहार, शिक्षणपद्धती आणि तंत्रज्ञानात बदल झाल्यावर भाषेचे स्वरूपही बदलते. भाषा स्थिर नसून सतत प्रवाही असते; तथापि, बदल अनेकदा भाषिक समाजाला अस्वस्थ करणारे ठरतात.

आजच्या डिजिटल युगात मराठीला केवळ साहित्यभाषा म्हणून मर्यादित न ठेवता ज्ञानभाषा म्हणून विकसित करणे ही काळाची गरज आहे. संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातून मराठीला जागतिक स्तरावर पोहोचण्याची मोठी संधी मिळाली आहे. तथापि, या संधींचा पुरेपूर लाभ घेण्यासाठी भाषिक समाजाने सजग आणि सक्रिय राहणे आवश्यक आहे.

माहिती आणि तंत्रज्ञान -

माहिती ही समाजाच्या विकासाची मूलभूत गरज आहे. आदिमानवाच्या काळात अनुभव, निरीक्षणे आणि संकेत यांच्या माध्यमातून माहितीची देवाणघेवाण होत असे. हळूहळू ही माहिती संरचित स्वरूपात साठवली जाऊ लागली. कच्च्या स्वरूपातील तथ्ये, आकडेवारी किंवा निरीक्षणे यांवर प्रक्रिया करून अर्थ प्राप्त झाला, तेव्हा ती माहिती बनते. या माहितीचा उपयोग करून मानवी समस्या सोडविण्याची प्रक्रिया म्हणजे तंत्रज्ञान होय.

संगणकामुळे माहिती साठवणे, विश्लेषण करणे आणि क्षणार्धात जगभर प्रसारित करणे शक्य झाले आहे. माहिती-तंत्रज्ञानाने जीवनाची गती वाढवली, समाजाच्या रचनेतही मूलभूत बदल घडवून आणले. त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान हे केवळ साधन न राहता समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरले आहे.

माहिती-तंत्रज्ञान आणि मराठी भाषा

महाराष्ट्र लोकसंख्येच्या दृष्टीने देशातील एक महत्त्वाचे राज्य आहे. मराठी भाषकांची संख्या मोठी असतानाही माहिती-तंत्रज्ञानाच्या सुरुवातीच्या टप्प्यात मराठी भाषेचा वापर मर्यादित राहिला. याचे मुख्य कारण तंत्रज्ञानाची अनुपलब्धता नसून भाषिक मानसिकता आणि इंग्रजीचे वाढते वर्चस्व होते.

जगातील अनेक भाषांनी आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेत स्वतःचा विकास साधला आहे. जपानी, चिनी, कोरियन, अरबी अशा भाषांनी तंत्रज्ञानावर आपली छाप उमटवली आहे. युनिकोड प्रणालीमुळे भारतीय भाषांसाठी संगणकीय व्यवहार सुलभ झाले. मराठीसह विविध लिप्यांचे सहअस्तित्व डिजिटल माध्यमांत शक्य झाले.

ई-पुस्तके, ई-वृत्तपत्रे, ब्लॉग्स, संकेतस्थळे, सोशल मीडिया यांमुळे मराठी भाषेच्या वापराला नवे आयाम प्राप्त झाले आहेत. मराठी विकिपीडिया, ऑनलाइन ज्ञानकोश, शब्दकोश आणि शैक्षणिक पोर्टल्स यांसारख्या माध्यमांमुळे मराठी ज्ञानभाषा बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. लोकमतने केलेल्या नव्या संशोधनानुसार, २०२४ मध्ये मराठी ब्लॉग्सची संख्या दीड लाखांपेक्षा अधिक झाली आहे, तसेच सकाळच्या सर्वेक्षणानुसार शैक्षणिक ई-पाठ्यपुस्तकांचा वापर ग्रामीण महाराष्ट्रात ४०% ने वाढला आहे.

भाषा म्हणजे तंत्रज्ञान -

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती स्वतः एक सुसंस्कृत तंत्रज्ञान आहे. प्रारंभिक काळात मानवाने हातवारे, हावभाव आणि ध्वनी यांच्या साहाय्याने संवाद साधला. पुढे स्वरयंत्राचा विकास झाला आणि बोली भाषा अस्तित्वात आली. त्यानंतर वर्णमाला आणि लिपीची निर्मिती झाली. व्याकरण, उच्चारशास्त्र, छंद आणि अलंकार यांचा विकास हा भाषिक तंत्रज्ञानाचाच भाग आहे. मराठी वर्णमाला अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने रचलेली आहे. उच्चारानुसार लेखन, जोडाक्षरांची रचना आणि ध्वन्यात्मक स्पष्टता ही वैशिष्ट्ये संगणकीय प्रक्रियेसाठी उपयुक्त ठरतात. त्यामुळे मराठी भाषा मुळातच तंत्रज्ञानाशी सुसंगत आहे.

डिजिटल माध्यमे आणि मराठीची नवी अभिव्यक्ती -

डिजिटल माध्यमांमुळे मराठी भाषेच्या अभिव्यक्तीचे स्वरूप बदलले आहे. ब्लॉग लेखन, सोशल मीडिया पोस्ट्स, ऑनलाइन कविता, डिजिटल कथा, पॉडकास्ट आणि यूट्यूब चॅनेल्स यांमुळे मराठीला नवे व्यासपीठ मिळाले आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर आणि इन्स्टाग्राममुळे मराठी भाषा दैनंदिन संवादाचा भाग बनली आहे. या माध्यमांमुळे भाषेचा वापर वाढला आहे. व्यवहारात नसलेली भाषा हळूहळू लोप पावते, हा नियम लक्षात घेतला तर डिजिटल माध्यमांवरील मराठीचा वापर हा भाषेच्या अस्तित्वासाठी सकारात्मक ठरतो.

नवीन संशोधनानुसार, २०२५ मध्ये AI आधारित मराठी ब्लॉग रेकमेंडेशन टूल्स आणि ऑटो-सजेशन प्रणालींमुळे मराठी कंटेंट निर्मिती ३०% ने वाढली आहे. यामुळे स्थानिक लेखकांना जागतिक प्रेक्षकांसाठी मराठीतून प्रकाशित होण्याची संधी मिळते.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मराठी भाषा -

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हे एकविसाव्या शतकातील सर्वाधिक प्रभावी तंत्रज्ञान मानले जाते. मानवी मेंदूच्या कार्यपद्धतीचे अनुकरण करून यंत्रांना विचार, विश्लेषण व निर्णयक्षमता देण्याचा हा प्रयत्न आहे. भाषिक व्यवहारांसाठी AI महत्त्वाची साधन बनली आहे.

मराठी भाषेच्या संदर्भात, AI मुळे अनेक नवी दालने खुली झाली आहेत. स्वयंचलित भाषांतर साधने, व्हॉइस टायपिंग, डिजिटल सहाय्यक आणि चॅटबॉट्स यांमुळे सामान्य वापरकर्त्यालाही मराठीतून तंत्रज्ञानाचा वापर करता येतो. प्रशासन, बँकिंग, आरोग्यसेवा आणि शिक्षण क्षेत्रात मराठी भाषेतील AI प्रणाली विकसित झाल्यास भाषिक समाजासाठी मोठी सोय होईल. उदाहरणार्थ, Google Indic Keyboard, Microsoft Translator Marathi, आणि

ChatGPT मराठी ही साधने लोकसंख्येला AI आधारित संवाद, शिक्षण आणि प्रशासनात मराठी वापरण्यास सक्षम करतात. यामुळे स्थानिक भाषेत ज्ञान सुलभ होते आणि जागतिक स्तरावर मराठीचा प्रचार वाढतो.

शैक्षणिक क्षेत्र आणि मराठी -

शिक्षण क्षेत्रात माहिती-तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना मराठी भाषेची भूमिका महत्त्वाची ठरते. शालेय व महाविद्यालयीन स्तरावर डिजिटल शिक्षणसाहित्य, ई-पाठ्यपुस्तके, ऑनलाइन व्याख्याने आणि अभ्यासक्रम व्यवस्थापन प्रणाली यांचा वापर वाढत आहे.

मराठी भाषेतून तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षण देणे म्हणजे सामाजिक समतेकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात मराठीचा वापर वाढल्यास ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया अधिक लोकाभिमुख होऊ शकते. डिजिटल AI आधारित शिक्षक सहाय्यक प्रणाली, ऑनलाइन क्विझ आणि अभ्यासपद्धती सुलभ करणारे पोर्टल्स ग्रामीण व अर्धशहरी भागातील विद्यार्थ्यांना फायदा पोहोचवतात.

प्रशासन, बाजारपेठ आणि मराठी -

माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात प्रशासन अधिकाधिक डिजिटल होत आहे. ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन सेवा, डिजिटल फॉर्म्स आणि मोबाईल ॲप्स यांमुळे नागरिक आणि शासन यांच्यातील अंतर कमी झाले आहे. या सर्व प्रक्रियांमध्ये मराठी भाषेचा प्रभावी वापर झाल्यास सामान्य नागरिकांचा सहभाग वाढू शकतो. बाजारपेठेच्या दृष्टीनेही मराठी भाषेला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रातील मोठी ग्राहकसंख्या लक्षात घेता अनेक कंपन्या आपल्या जाहिराती, माहितीपत्रके आणि डिजिटल प्लॅटफॉर्म मराठीत उपलब्ध करून देत आहेत. यामुळे मराठी भाषेला रोजगाराच्या आणि व्यावसायिक वापराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. नवीन संशोधनानुसार, ई-कॉमर्समध्ये मराठी समर्थन असलेल्या प्लॅटफॉर्मवर वापरकर्त्यांचा सहभाग २५% ने वाढला आहे.

मराठी भाषेसमोरील आव्हाने -

१. प्रमाणित तांत्रिक शब्दसंग्रहाचा अभाव.
२. उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातील इंग्रजीचे वर्चस्व.
३. डिजिटल साक्षरतेचा अभाव, विशेषतः ग्रामीण भागात.
४. दर्जेदार भाषिक आशय निर्मितीची आवश्यकता.
५. बदलत्या तंत्रज्ञानाशी अद्ययावत राहण्याची गरज.

मराठी भाषेसमोरील संधी -

१. मोठी भाषिक लोकसंख्या.
२. वाढती डिजिटल माध्यमे आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म.
३. प्रशासन, व्यापार आणि शिक्षण क्षेत्रात मराठी वापराची गरज.
४. युनिकोड आणि AI मुळे तंत्रज्ञानाशी सुसंगतता.
५. मराठीला ज्ञानभाषा बनवण्यासाठी उपलब्ध विद्यमान साधने.
६. AI आधारित भाषिक साधने, ऑनलाइन शिक्षण पोर्टल्स, आणि डिजिटल कंटेंट निर्मिती संधी.

निष्कर्ष -

१. माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषेचे अस्तित्व आणि विकास हे तंत्रज्ञानाशी असलेल्या सुसंवादी नात्यावर अवलंबून आहे.
२. तंत्रज्ञानाकडे दुर्लक्ष करून कोणतीही भाषा आज टिकू शकत नाही.
३. युनिकोड, इंटरनेट, सोशल मीडिया आणि AI मुळे मराठीला जागतिक स्तरावर पोहोचण्याची संधी मिळाली आहे.
४. मराठी वर्णमाला, उच्चारशास्त्र आणि व्याकरणरचना तंत्रज्ञानाशी सुसंगत आहेत.
५. डिजिटल माध्यमांवरील वाढता वापर दैनंदिन व्यवहारात भाषेची उपस्थिती मजबूत करतो.
६. AI, मशीन ट्रान्सलेशन आणि भाषिक प्रक्रिया प्रणालींचा विकास नवी दालने उघडतो.
७. शिक्षण, प्रशासन आणि बाजारपेठेत मराठी वापर वाढल्यास सामाजिक महत्त्व वाढते.
८. दर्जेदार भाषिक आशयनिर्मिती आणि प्रमाणित शब्दसंग्रह ही काळाची गरज आहे.
९. मराठी भाषेला ज्ञानभाषा बनवणे हा प्रमुख आव्हान आहे.
१०. तंत्रज्ञानाशी सुसंवादी वाटचाल केल्यास मराठी भाषेचे भवितव्य उज्ज्वल ठरेल.

संदर्भ -

१. आपटे, मोहन. संगणक, इंटरनेट, यंत्रमानव : भविष्यवेध, पुणे, राजहंस प्रकाशन, २०१६.
२. क्षीरसागर, के. मराठी भाषा: वाढ आणि बिघाड, राज्य मराठी विकास संस्था,२७ फेब्रुवारी २०००.
३. लोकमत. "मराठी ब्लॉग्सची वाढ." Lokmat.com. Lokmat Media Pvt. Ltd. https://www.lokmat.com/
४. सकाळ. "ई-पाठ्यपुस्तकांचा ग्रामीण महाराष्ट्रात वापर." eSakal.com https://www.esakal.com/
५. माशेलकर, रघुनाथ. निवडक लेख व भाषणे.
६. Mashelkar, Raghunath. "AI Applications in Indian Languages." Journal of Language Technology, 2024. https://scholar.google.com/
७. Lokmat. "मराठी ब्लॉग्सची वाढ." Lokmat.com. Lokmat Media Pvt. Ltd. https://www.lokmat.com/
८. Sakal. "ई-पाठ्यपुस्तकांचा ग्रामीण महाराष्ट्रात वापर." eSakal.com https://www.esakal.com/

मराठी अभिजात भाषेचे भवितव्य

प्रो.डॉ.कदम संभाजी धोंडीराम.
बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी ता- पलूस जि- सांगली .
मो. ९८९०६७६६२८.

प्रास्ताविक

अभिजात मराठी भाषेचा अभ्यास करत असताना अभिजात म्हणजे काय हे पाहणी महत्वाचे आहे. अभिजात म्हणजे काय हे सांगणे इतके सोपे नाही. मानवी जीवनाच्या उत्पत्ती पासून भाषा उत्क्रांत होणे आणि तिची वाढ व विकास होणे हे महत्त्वाचे असते . अभिजात म्हणजे स्वयंभू प्राचीन उच्च दर्जाची आणि सलग परंपरा असलेली किंवा ज्या भाषेला किमान १५० ते २५० वर्षाची समृद्ध परंपरा किंवा इतिहास असला पाहिजे; आणि जिचे साहित्य दुसऱ्या भाषेत वरून उसने न घेता मूळ स्वरूपात विकसित झाले आहे. अशा भाषेला अभिजात दर्जा दिला जातो. हे जरी सत्य असले तरी भारतातील कोणतीही भाषा या निकषाला पात्र ठरू शकत नाही. कारण वैदिक पूर्व काळापासून भारत खंडामध्ये लढाया होत होत्या. त्या लढाया सुखे यांच्यात नव्हत्या अनेक पंथाचे राजे परकीय राजे यांनी भारतावर अनेक वेळा आक्रमण केले. त्यामुळे वरील वाक्य ठामपणे म्हणता येते .

उद्दिष्टे

१) अभिजात भाषा संकल्पना समजून घेणे .
२) अभिजात भाषेचे स्वरूप लक्षात घेणे .
३) अभिजात भाषेचा दर्जा समजून घेता येईल .
४) अभिजात भाषेवर इतर भाषेचे परिणाम पाहता येईल .

अभिजात म्हणजे काय

अभिजात ही प्राचीन भाषा असून तिचे अस्तित्व आधुनिक काळातही टिकून म्हणजे अभिजात स्वयंभू, स्वतंत्र, संपन्न, समृद्ध, अत्यंत प्राचीन वारसा लाभलेला आहे. आणि तिचा उच्च दर्जाची आणि सलग परंपरा असलेली भाषा म्हणजे अभिजात भाषा होय. अशा भाषेला किमान १५० ते २५० वर्षाची अखंड परंपरा असायला हवी. भारतीय भाषांचा विचार करता भारतात वैदिकपूर्व द्रविड भाषा अस्तित्वात होत्या; पण ठोस पुरावा नसल्यामुळे अमुक एक भाषा म्हणजे मराठी असे म्हणता येत नसले तरी पूर्वी तमिळनाडूमध्ये मराठी शिकण्याची सोय होती असेही पुरावे मिळतात. प्रामुख्याने संस्कृत ≥ प्राकृत ≥ अपभ्रंश ≥ मराठी अशी मराठीची पूर्वपीठीका पाहिल्यास आपणास असे लक्षात येते की, प्रत्येक सजीवाचा जन्म दुसऱ्या सजीवापासून होतो. त्याप्रमाणे एका भाषेतून दुसरी भाषा निर्माण होते हे मान्यच करावे लागते .


अभिजात भाषेचे स्वरूप


अभिजात शब्दाचा अर्थ अगोदर किंवा मूळ असा आहे. कोणत्याही गोष्टीला मोठेपणा बहाल करताना तिचा इतिहास पाहिला जातो. वर म्हटल्याप्रमाणे १५० ते २५० वर्षाहून तिचे अस्तित्व जुने असावे लागते. साहित्य परंपरा ही स्वतःची आणि जुनी असावे लागते. ती कोणत्याही भाषेवरून घेतलेली नसावी. या अभिजात मराठीचा प्रवास अखंड असून आधुनिक परंपरेची तिचे संबंध कनिष्ठ आहेत तसेच प्राचीन आणि आधुनिक रूपाशी नाते घट्ट आहे. तिच्यातून अनेक प्रकारचे श्रेष्ठ दर्जाचे मराठी साहित्य निर्माण झाल्या आहे. उदाहरणार्थ **भावार्थ दीपिका,** महानुभावीय साहित्य ,विवेक सिंधू इत्यादी या भाषेने जरी आधुनिक भाषा प्रवाहामध्ये प्रवेश केला असला तरी प्राचीन रूप टिकून आहे .

जगामध्ये अनेक भाषा कुणी आहेत इंडो युरोपियन भाषाकुल हेमिटो- सेमिटिक भाषाकुल, सिनो तिबेटिअन भाषाकुल, द्राविडी भाषाकुल, ऑस्ट्रो - असियाची भाषाकुल , फिनो - उग्रिक भाषाकुल , अल्ताईक भाषाकुल , कॉकेशस व मलायो, पॉलिनिशियन इत्यादी .

भारतात प्रामुख्याने चार भाषा कुळातील भाषा बोलल्या जातात

१) इंडो युरोपियन भाषा कुल -मराठी , गुजराती ,बंगाली , हिंदी इ .
२) द्राविडी भाषा कुल –तमिळ, तेलुगु, मल्याळम, आणि कानडी
३) ऑस्ट्रो - ओसियायी भाषाकुल - भुंडारी , संन्ताली खासी इ .
४) सिनो - तिबेटीअन भाषाकुल - लडाखी , नेवारी , बोरो , मणिपुरी , मिझो भाषा .





वरील प्रमाणे मराठीची परंपरा आपणास पहाता येते. म्हणून मराठी ही जुनी परंपरा लाभलेली भाषा आहे .

संस्कृतातून निघालेली भाषा प्राकृतात स्थिरावली. भारतातील राजकीय स्थित्यंतरे घडामोडी आणि युद्धे यामुळे सातत्याने प्राकृत भाषेतील बदल होत गेले. यामध्ये फार्शी, फ्रेंच, पोर्तुगाल, मुघल अशा अनेक राज्यकर्त्यांनी आजही भारतात आपले वसाहती ठेवल्यामुळे व जागतिकीकरणामुळे व्यापारवृद्धी, सोशल मीडिया यामुळे भाषेत बदल होत गेले आहेत. विवेक सिंधू पासून मराठी भाषेचा प्रवास गृहीत धरला जात असला तरी इसवी सन नवव्या शतकापासून मराठी भाषा अस्तित्वात असल्याचे पुरावे सापडतात .

मराठी ही २००० वर्षीपासून जुनी भाषा असून पुणे जिल्ह्यातील जुन्नरच्या नाणे घाटातील ब्राह्मी लिपीतील शिलालेख मराठीची ओळख सांगणारा आहे या शिलालेखात महारट्ठनोहा असे उल्लेख विनयकीटक, दीपवंश, महावंश या ग्रंथामध्ये महाराष्ट्राचे उल्लेख सापडतात. सातवाहनाच्या गाथा सप्तशतीतील श्रेष्ठ दर्जाचे मराठी काव्य, रामायण आणि महाभारत गुणाढ्याच्या बृहत्कथेत येणारे मराठी शब्द वररुचीचे प्राकृत प्रकाश, हेमचंद्र कृत देशीनाममला, शाकुंतल, मृच्छकटिक नाटकातील पात्रांच्या तोंडचे मराठी संवाद अशा अनेक प्रकारचे पुरावे मिळतात. संतांचे सर्व साहित्य याचाही समावेश करावा लागतो .

अभिजात मराठी भाषेचे भवितव्य

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ यांनी मराठीला ज्या उंचीवर नेऊन ठेवले त्या उंचीवर आज मराठी भाषा दिसत नाही; म्हणून प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठीय शिक्षणापर्यंत इंग्रजी व इतर भाषांबरोबर मराठी भाषा शिक्षणाची सार्वत्रिक अनिवार्यता सिद्ध केली पाहिजे. तसेच मराठी भाषा शिकणाऱ्या सर्वांना यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत; तरच इंग्रजी कडे झुकलेली पारडी मराठीकडे झुकू लागेल. आज मराठी भाषा बोलताना केवळ इंग्रजीचा नव्हे तर फारशी, उर्दू कन्नड, हिंदी, तमिळ, तेलगू अनेक भाषेतील शब्द सहजपणे मराठी भाषेमध्ये वापरले जात आहेत. त्यामुळे भाषा प्रदूषण झाल्याचे जाणवत आहे. मराठी भाषिकांनी सामाजिक व्यवहारात, व्यवहारिक जीवनात सदैव मराठीतून संवाद साधला पाहिजे. पूर्व प्राथमिक शिक्षणापासून के.जी वन, के,जी टू या संकल्पनेने जोर धरलेला आहे. या शिक्षणाच्या बाल्यावस्थेत त्या बालकांच्या मनावर इतर भाषांतून ज्ञान दिल्यास त्या भाषेतील शब्द मराठीमध्ये ऐकायला व पाहायला मिळतात. महाराष्ट्रामध्ये भाषेच्या सक्ती आणि संधीच्या समन्वयातून आपण मराठी भाषेला पुढे नेऊ शकतो. तसेच सर्व मराठी भाषकांच्या व सरकारच्या समन्वयातून मराठीचा भाषिक विकास साधता येईल. जेव्हा एखादी भाषा नामशेष होते त्यावर त्या भाषेची संस्कृती ही नामशेष होते; म्हणून प्रत्येक भाषांचे संस्कृतीकरण, संस्कृतीचे जतन केले तरच ती भाषा जिवंत राहू शकते .मराठी अभिजीत भाषेला निकषाच्या कसोटीवर उतरणारी अभिजीत भाषा म्हणून केंद्र सरकारने अभिषेक भाषेला दर्जा देऊन महाराष्ट्रात दर्जा उंचावला आहे .

आज भौतिक सुख, संपन्नता जीवनात आणण्यासाठी जे शिक्षण, ज्या नोकऱ्या, ज्या पदव्या आपणास हव्या आहेत त्या पूर्ण होण्यासाठी आज इंग्रजीतून शिक्षण घेण्याची फॅशन झाली आहे, पूर्वी चरक संहिता ,चाणक्य चार्वाक यांचे साहित्य प्राकृतातून पाहावयास मिळते. काळानुसार आपण स्वतःमध्ये बदल करत गेलो; त्याप्रमाणे भाषेमध्ये आपोआप बदल होत गेले. खेड्यापाड्यांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा कल इंग्रजीकडे वाढला त्यामुळे ग्रामीण संस्कृती, रुढी, रिती, रिवाज, पोशाख, आहार, विहारांमध्ये बदल होत चालले. याचे दुरगामी परिणाम उत्पादन वाढीवर झाले आहेत. समज असा झाला आहे की, इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतल्यामुळे विज्ञान-तंत्रज्ञान, विधी, वैद्यक, व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी लवकर उपलब्ध होतील असा आशावाद या नव्या पिढीच्या समोर ठेवला आहे; त्यामुळे मराठी भाषकांच्या मनात अंतर विरोध निर्माण झाल्याचे दिसून येते. इंग्रजीतून शिकले तर सर्व गोष्टींची पूर्तता होते हा गैरसमज शैक्षणिक क्षेत्रामध्ये पहिला आला आहे. हीच गोष्ट मराठी भाषा विकासासाठी हानिकारक आहे. शैक्षणिक क्षेत्रात सरकारने खाजगीकरणाला दिलेला पाठिंबा आणि सरकारी शैक्षणिक क्षेत्रात पसरलेली नाराजी याचा फायदा खाजगी संस्थाच्या लोकांनी उठवून त्यांनी स्वतःचे अभ्यासक्रम तयार केले त्यामुळे मराठी भाषा मागे पडत चालल्याचे चित्र दिसून येते .

भाषा ही मानवाची जीवनदायीनी आहे. भाषा ही एक सामाजिक संस्था आहे; त्याप्रमाणे ती समाजरुपी शरीराची रक्तवाहिनी आहे. रक्त शुद्ध असेल तर शरीराला आजार जडणार नाही; त्याप्रमाणे भाषा शुद्ध ठेवली तर समाज व्यवस्था सुरळीत चालेल. प्रबळ राजकीय, सामाजिक इच्छाशक्तीचा अभाव, शासनाचे दुटप्पी धोरण, मूळ वैज्ञानिक व तांत्रिक साहित्याचा मराठीत अनुवाद यांचा अभाव, परभाषेतील शब्दांचा अमाप वापर, जुन्या परिभाषांचे नूतनीकरण व नोंदी पारिभाषिक शब्दांना संज्ञाना लोकाश्रय मिळालेला नाही .

आजच्या मल्टीमीडियाच्या युगात डिजिटल सोयी सुविधा समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. आजचे जग हे ऑनलाईनचे आहे; म्हणून मराठी भाषेतील संकेतस्थळे समजावून घेणे ती अद्ययावत करणे, नवीन संकेतस्थळे निर्माण करून मराठी भाषेतील विपुल ज्ञान हे या संकेतस्थळावरून संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. डिजिटल माध्यमातून देश, राज्य, जिल्हा, तालुक्यानुसार तसेच समाज, संस्कृतीनुसार अर्थसंकेतानुसार नवे लघु शब्द, नवीन इमोजी, नवीनच संगणक इंटरनेटची भाषा, नवी डिजिटल रिसोर्सेस तयार करणे, ई- लर्निंग कंटेंट तयार करणे, भाषेतील शब्द संपत्तीचा वापर करून या मराठी भाषा संपत्तीचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे.

भाषा विज्ञान हे भाषेचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करते. यासाठी या भाषाविज्ञानाच्या अभ्यासाला चालना देणे व प्रोत्साहन देऊन भाषेच्या प्रयोगशाळा तयार करणे, मराठी शाळा तयार करणे ,मराठी शाळेतील जुन्या नव्या पारिभाषिक शब्दांचा डिजिटल ऑनलाइन पोस्ट तयार करणे, मराठी भाषेतील विविध प्रकार, प्रवाहांचे ॲप्स तयार करणे, भाषा ही समृद्ध मनाची शक्ती आहे. समूहालाच बदल अपेक्षित असेल तर भाषेतही बदल होणे गरजेचे आहे. भाषा ही प्रेरित आणि सृजनशील शक्ती आहे. समाज भाषा घडवतो आणि भाषेतून समाज घडतो. समाजाला आपले अस्तित्व टिकून प्रगती करण्यासाठी भाषेची गरज असते. भाषा आणि संस्कृती हे समाजाचे घटक आहेत. ते जर समाजापासून वेगळे झाले तर समाज हा समाज राहू शकत नाही. आजच्या या डिजिटल युगात भाषा टिकवायची असेल तर तिला समृद्ध आणि संपन्न करावयाचे असेल तर ती भाषा माणसाच्या ओठावर व मेंदूत कायम ठेवणे म्हणजे भाषा संवर्धन होय.

समारोप

अभिजात भाषेमुळे शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी प्राचीन ग्रंथांचे जतन, दस्ताऐवजी करण आणि संगणीकरण याबरोबर संग्रह भाषांतर, प्रकाशन आणि डिजिटल मीडिया अशा क्षेत्रात रोजगार निर्माण होण्यासाठी इंग्रजी ह काही परकीय भाषेचे श्रेष्ठत्व मान्य करून मराठी भाषेविषयी निर्माण झालेला न्यूनगंड किंवा कमीपणा दूर होण्यासाठी किंवा करण्यासाठी आपली पराभूत मनोवृत्ती सोडून देऊन जे नवे आहे ते स्वीकारून आपल्या भाषेला आधुनिकीकरणाची जोड देऊन जगाच्या पटलावरती आणण्याचा प्रयत्न भाषा अभ्यासकांनी केला पाहिजे. शासनाने आणि मराठी भाषेसाठी संगणक प्रोग्राम तारा करणार्यांनी या भाषेचा गांभीर्याने विचार करायला पाहिजे. भारतात असणाऱ्या अनेक मराठी भाषा मंडळाने हे गांभीर्य लक्षात घेऊन अभिजात मराठीच्या सर्व कसोट्या टिकवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे .

संदर्भ

१) कुलकर्णी कृ.पा.- मराठी भाषा : उदगम व विकास, मराठी संशोधन मंदिर प्रकाशन. १९३३.
२) नसिराबादकर ल.रा.- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३) अभिजात मराठी भाषा समिती अहवाल 2013 महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग .
४) मालसे स. ग. इनामदार हे. वि.डॉ. सौ. सोमण अंजली - भाषा विज्ञान वर्णनात्मक आणि ऐतिहासिक, संजय प्रकाशन, पुणे ४ प्रथम आवृत्ती २६ जानेवारी १९८२.
५) गजेंद्रगडकर श्री. न.- भाषा आणि भाषाशास्त्र (वर्णनात्मक) व्हिनस प्रकाशन, पुणे. द्वितीयावृत्ती फेब्रुवारी१९७९.

समाजमाध्यमातील मराठी भाषा: एक संशोधनात्मक अभ्यास

संशोधक विद्यार्थी
श्री. दऱ्याप्पा किसन गोडसे
मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ई-मेल: daryappagodase2212@gmail.com मो. नं. ८३७८८२०८६०

सारांश :-

माहिती-तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे आणि डिजिटल माध्यमांच्या सर्वव्यापक प्रसारामुळे २१व्या शतकात समाजमाध्यमे मानवी संवादाचे केवळ साधन न राहता सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनली आहेत. फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर (X), इन्स्टाग्राम, युट्यूब, ब्लॉग, वेबसाईट, पॉडकास्ट आदी समाजमाध्यमांनी अभिव्यक्तीचे स्वरूप, संवादाची दिशा आणि भाषेच्या वापराची रचना आमूलाग्र बदलून टाकली आहे. या व्यापक बदलांच्या प्रक्रियेत मराठी भाषेनेही पारंपरिक चौकटी ओलांडून एक नवे डिजिटल आणि लोकाभिमुख स्वरूप स्वीकारले आहे, हे विशेषत्वाने अधोरेखित करणे आवश्यक ठरते.

समाजमाध्यमांवरील मराठी भाषा ही पारंपरिक प्रमाणभाषेच्या शिस्तबद्ध नियमांपेक्षा अधिक अनौपचारिक, तात्काळ प्रतिसाद देणारी, संवादप्रधान आणि बहुपर्यायी स्वरूपाची दिसून येते. देवनागरी लिपीबरोबरच रोमन लिपीचा वाढता वापर, मराठी-इंग्रजी मिश्रभाषेचे वाढते प्रमाण, विविध प्रादेशिक बोलीभाषांचा प्रभाव, तसेच नव्या शब्दनिर्मितीची प्रक्रिया ही समाजमाध्यमीय मराठी भाषेची महत्त्वाची वैशिष्ट्ये ठरतात. यासोबतच इमोजी, चिन्हे, मिम्स, हॅशटॅग संस्कृती आणि संक्षिप्त भाषावापर यांमुळे भाषिक अभिव्यक्तीत सर्जनशीलता वाढली असली, तरी भाषिक शुद्धता, व्याकरणिक अचूकता आणि प्रमाणभाषेची जपणूक यांसमोर नवी आव्हाने निर्माण झाली आहेत.

या संशोधनात्मक शोधनिबंधात समाजमाध्यमांमुळे मराठी साहित्याच्या निर्मिती, प्रसार आणि वाचनसंस्कृतीत घडून आलेल्या मूलभूत बदलांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. ई-कथा, ई-कविता, ब्लॉगलेखन, सोशल मीडिया आधारित साहित्यिक समूह, तसेच युट्यूब व पॉडकास्टसारख्या डिजिटल माध्यमांमुळे मराठी साहित्याला नवे व्यासपीठ, नवा वाचकवर्ग आणि अभिव्यक्तीचे नवे आयाम कसे प्राप्त झाले आहेत, याचा सविस्तर आढावा येथे घेतला आहे.

समाजमाध्यमांचा मराठी भाषेवर होणारा सकारात्मक प्रभाव—जसे की भाषेचा लोकशाहीकरण, व्यापक प्रसार, नव्या पिढीशी संवाद—आणि नकारात्मक परिणाम जसे की भाषिक विस्कळीतपणा, अयोग्य शब्दप्रयोग व शुद्धलेखनातील दुर्लक्ष यांचे संतुलित व समीक्षात्मक मूल्यमापन या शोधनिबंधात करण्यात आले आहे. तसेच मराठी भाषेचे संवर्धन, जतन व विकास साधण्यासाठी समाजमाध्यमांचा सुजाण, जबाबदार आणि सर्जनशील वापर कसा करता येईल, याबाबतही चिंतनात्मक भूमिका मांडण्यात आली आहे.

मुख्य शब्द :- समाजमाध्यमे, मराठी भाषा, डिजिटल संवाद, मिश्रभाषा, ई-साहित्य, भाषिक परिवर्तन

प्रस्तावना :-

भाषा ही केवळ संवाद साधण्याचे साधन न राहता समाजाच्या सांस्कृतिक स्मृती, सामाजिक संरचना आणि वैचारिक प्रवाहांचे प्रभावी प्रतिबिंब म्हणून कार्य करते. समाजातील बदलत्या जीवनपद्धतीनुसार भाषा सातत्याने परिवर्तन स्विकारत असल्याचे इतिहासातून स्पष्ट होते. एकविसाव्या शतकात या भाषिक परिवर्तनास सर्वाधिक गती देणारा घटक म्हणजे माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान आणि त्यातून उदयास आलेली समाजमाध्यमे होय. इंटरनेटच्या व्यापक प्रसारामुळे मानवी संवादाची गती, स्वरूप आणि व्याप्ती आमूलाग्र बदलली असून भाषेचा वापर अधिक अनौपचारिक, तत्काळ प्रतिसाद देणारा आणि व्यापक पातळीवर घडताना दिसतो.

आज समाजमाध्यमे केवळ मनोरंजन किंवा वैयक्तिक संपर्कापुरती मर्यादित राहिलेली नसून ती सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच साहित्यिक अभिव्यक्तीची प्रभावी व्यासपीठे बनली आहेत. फेसबुकवरील पोस्ट्स, व्हॉट्सॲपवरील संदेश, ट्विटरवरील विचारमंथन, इन्स्टाग्रामवरील कॅप्शन्स आणि युट्यूबवरील भाषिक आशय या माध्यमांतून भाषा सतत वापरात राहून नवनव्या रूपांत विकसित होत आहे. या प्रक्रियेत इंग्रजीसारख्या जागतिक भाषांचा प्रभाव प्रकर्षाने जाणवत असला, तरी मराठीसारख्या प्रादेशिक भाषांनीही डिजिटल अवकाशात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

दिर्घ साहित्यिक परंपरा, समृद्ध बोलीभाषा आणि व्यापक समाजाधार लाभलेली मराठी भाषा समाजमाध्यमांमुळे नव्या अभिव्यक्तीच्या शक्यता अनुभवत आहे. ग्रामीण व शहरी, सुशिक्षित व अल्पशिक्षित, तरुण व वृद्ध अशा विविध सामाजिक स्तरांतील लोक समाजमाध्यमांवर मराठीतून संवाद साधताना दिसतात. या प्रक्रियेमुळे मराठी भाषेचे लोकशाहीकरण घडून येत असून पूर्वी दुर्लक्षित राहिलेल्या भाषिक रूपांना, अनुभवांना आणि विषयांना अभिव्यक्तीचे व्यासपीठ मिळू लागले आहे.

मात्र या सकारात्मक बदलांबरोबरच काही मूलभूत आणि चिंताजनक प्रश्नही समोर येतात. समाजमाध्यमांवरील अति-मिश्रभाषेचा वापर, शुद्धलेखन व व्याकरणाकडे होणारे दुर्लक्ष, प्रमाणभाषेची घसरण आणि भाषिक सैलपणा यांमुळे मराठी भाषेच्या शुद्धता, शिस्त आणि दीर्घकालीन अस्तित्वाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जाते. त्यामुळे समाजमाध्यमांवरील मराठी भाषेचा केवळ उत्सव साजरा करणे पुरेसे न ठरता तिचे वस्तुनिष्ठ, चिकित्सक आणि शास्त्रीय विश्लेषण करणे अपरिहार्य ठरते.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१. समाजमाध्यमांवरील मराठी भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.
२. मराठी भाषेतील बदलत्या प्रवाहांचे विश्लेषण करणे.
३. समाजमाध्यमांचा मराठी साहित्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.
४. मराठी भाषेच्या संवर्धनातील समाजमाध्यमांची भूमिका स्पष्ट करणे.
५. मराठी भाषेसमोरील आव्हाने व संधी अधोरेखित करणे.

समाजमाध्यमांची संकल्पना व प्रकार :-

समाजमाध्यमे ही इंटरनेटवर आधारित आधुनिक संवादमाध्यमे असून त्यांद्वारे वापरकर्ते केवळ माहितीचे ग्राहक न राहता सक्रिय निर्माते बनतात. या माध्यमांवर व्यक्ती स्वतःचे विचार, अनुभव, भावना, मतप्रदर्शन, छायाचित्रे, ध्वनिफिती तसेच व्हिडिओ स्वरूपातील सामग्री सहजपणे प्रसारित करू शकतात. त्यामुळे पारंपरिक माध्यमांप्रमाणे एकमार्गी संवाद न राहता समाजमाध्यमांनी बहुआयामी, परस्परसंवादी आणि तात्काळ संवादाची संकल्पना रूढ केली आहे.

समाजमाध्यमांमध्ये विविध प्रकारांचा समावेश होतो. सामाजिक जाळी स्वरूपातील माध्यमे जसे की Facebook आणि Instagram व्यक्तींमधील सामाजिक नातेसंबंध दृढ करण्याचे कार्य करतात. सूक्ष्मब्लॉगिंग प्रकारातील Twitter/X हे माध्यम अल्प शब्दांत विचार मांडण्यास प्रोत्साहन देते, ज्यामुळे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक चर्चांना वेग मिळतो. WhatsApp व Telegram यांसारख्या संदेश सेवा वैयक्तिक तसेच सामूहिक संवादाचे प्रभावी साधन ठरल्या आहेत. त्याचप्रमाणे YouTube सारखी व्हिडिओ-आधारित माध्यमे दृक्श्राव्य अभिव्यक्तीला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देतात, तर ब्लॉग व वेबसाईट्स सखोल विचारमंथन, लेखन आणि वैचारिक मांडणीसाठी उपयुक्त ठरतात.

समाजमाध्यमांवरील मराठी भाषेचे स्वरूप :-

समाजमाध्यमांवर आढळणारे मराठी भाषेचे स्वरूप हे पारंपरिक लिखित किंवा औपचारिक मराठीपेक्षा स्पष्टपणे भिन्न असल्याचे दिसून येते. ही भाषा अधिक संवादप्रधान, तात्काळ प्रतिसाद देणारी, भावनात्मक तसेच व्यक्तिकेंद्री बनलेली आहे. समाजमाध्यमीय मराठी ही प्रामुख्याने दैनंदिन व्यवहारातील बोलभाषेशी जवळची जाणारी असून तिच्यावर बदलत्या सामाजिक वास्तवाचा ठळक प्रभाव जाणवतो.

१. देवनागरी, रोमन व मिश्र लिपीचा वापर :-

सुरुवातीच्या टप्प्यात तांत्रिक मर्यादांमुळे रोमन लिपीत मराठी लिहिण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर आढळत होती. उदा. majha desh, tula kay vatate? अशा स्वरूपातील लेखन समाजमाध्यमांवर सामान्य होते. तथापि युनिकोड प्रणाली, मराठी कीबोर्ड, स्मार्टफोन ॲप्स आणि व्हॉइस-टू-टेक्स्ट सुविधा उपलब्ध झाल्यानंतर देवनागरी लिपीतील लेखनात लक्षणीय वाढ झाली आहे. तरीही आज समाजमाध्यमांवर देवनागरी, रोमन आणि मिश्र लिपी असे तिन्ही प्रकार एकत्रितपणे अस्तित्वात असल्याचे आढळते.

२. मराठी-इंग्रजी मिश्रभाषा :-

समाजमाध्यमांवरील मराठी भाषेचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे मराठी-इंग्रजी मिश्रभाषेचा वाढता वापर होय. पोस्ट शेअर करा, आज ऑफिसमध्ये मीटिंग आहे, हा व्हिडिओ लाईक करा अशा वाक्यांमधून मराठी आणि इंग्रजीचा एकत्रित वापर स्पष्टपणे दिसून येतो. तथापि दीर्घकालीन दृष्टिकोनातून हा प्रकार मराठी भाषेच्या शब्दसंपत्तीवर आणि भाषिक स्वायत्ततेवर परिणाम करतो का, याचा चिकित्सक विचार करणे आवश्यक ठरते.

३. बोलीभाषा व प्रादेशिक भाषिक विविधता :-

समाजमाध्यमांमुळे मराठीतील विविध बोलीभाषांना अभिव्यक्तीचे मुक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. विदर्भीय, वऱ्हाडी, कोकणी, अहिराणी, खानदेशी, कोल्हापुरी इत्यादी बोलीभाषांमधील शब्दप्रयोग, म्हणी आणि विनोद समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहेत.

४. संक्षिप्तता, चिन्हभाषा व दृश्यप्रधान अभिव्यक्ती :-

समाजमाध्यमांवरील संवाद बहुधा लघुरूपात घडत असल्यामुळे संक्षेप, इमोजी, GIF, स्टिकर्स आणि मिम्स यांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसून येतो. ही चिन्हभाषा भावनांची तत्काळ आणि प्रभावी अभिव्यक्ती करते; मात्र त्याच वेळी ती पारंपरिक शब्दप्रधान भाषेची जागा घेत असल्याचेही निरीक्षण करता येते.

५. नव्या शब्दांची निर्मिती व भाषिक सर्जनशीलता :-

समाजमाध्यमांच्या प्रभावामुळे मराठी भाषेत नव्या शब्दांची निर्मिती झपाट्याने होत आहे. हॅशटॅग संस्कृती (#मराठीअभिमान, #MarathiLanguage), उपरोधिक शब्दप्रयोग आणि ट्रेंडनुसार बदलणारी भाषा यांमुळे मराठी भाषेची सर्जनशील क्षमता अधिक विस्तारलेली दिसून येते. ही प्रक्रिया भाषेच्या जिवंतपणाचे आणि गतिमानतेचे लक्षण मानली जाते.

६. भावनिक व वैचारिक अभिव्यक्ती :-

समाजमाध्यमांवरील मराठी भाषा ही अनेक वेळा भावनाप्रधान स्वरूपाची असते. सामाजिक प्रश्न, राजकीय भूमिका, सांस्कृतिक अस्मिता तसेच व्यक्तिगत अनुभव यांचे प्रकटीकरण मराठीतून मोठ्या प्रमाणावर घडते. परिणामी मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन न राहता वैचारिक अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम बनताना दिसून येते.

समाजमाध्यमे आणि मराठी साहित्य :-

समाजमाध्यमांनी मराठी साहित्याच्या निर्मिती, प्रसार, वाचन आणि मूल्यमापन या सर्व प्रक्रियांमध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणले आहे. पारंपरिक साहित्यनिर्मिती प्रामुख्याने मुद्रित माध्यमांवर आधारित होती; परंतु समाजमाध्यमांच्या प्रभावामुळे साहित्यनिर्मिती थेट डिजिटल अवकाशात घडू लागली आहे. या परिवर्तनामुळे मराठी साहित्य अधिक लोकाभिमुख, संवादात्मक आणि गतिमान स्वरूपात विकसित होत असल्याचे दिसून येते.

१. ई-साहित्याचा उदय आणि स्वरूप :-

समाजमाध्यमांच्या प्रभावातून ई-कथा, ई-कविता, सूक्ष्मकथा, ब्लॉगलेखन, फेसबुक पोस्ट स्वरूपातील साहित्य तसेच ऑनलाइन लघुनिबंध असे विविध नवे साहित्यप्रकार उदयास आले आहेत. हे साहित्य प्रामुख्याने लघुरूपात सादर होणारे, तात्काळ प्रतिसाद मिळवणारे आणि व्यापक वाचकवर्गापर्यंत सहज पोहोचणारे असते.

२. नवोदित व उपेक्षित लेखकांना मिळालेले व्यासपीठ :-

समाजमाध्यमांनी मराठी साहित्यातील पारंपरिक सत्ताकेंद्रांची रचना बदलून टाकली आहे. पूर्वी प्रकाशक, संपादक आणि नियतकालिकांच्या माध्यमातूनच लेखकाला मान्यता मिळत असे; परंतु आज ग्रामीण, दलित, स्त्री, आदिवासी, युवक तसेच अल्पपरिचित लेखक आपले साहित्य थेट वाचकांसमोर मांडू शकतात.

३. वाचक–लेखक संवाद :-

समाजमाध्यमांमुळे साहित्यिक संवाद एकतर्फी न राहता द्विमार्गी स्वरूपाचा झाला आहे. वाचक थेट प्रतिक्रिया, टीका आणि सूचना व्यक्त करू शकतो, तर लेखक त्या प्रतिक्रियांवर तत्काळ प्रतिसाद देतो. या परस्परसंवादातून साहित्याचे सामाजिक भान वाढते आणि साहित्याच्या मूल्यमापनाची प्रक्रिया अधिक खुली बनते.

४. पारंपरिक आणि डिजिटल साहित्य यांतील बदलते नाते :-

समाजमाध्यमांवरील साहित्य हे पारंपरिक साहित्याचा पर्याय नसून त्याचे विस्तारित व पूरक स्वरूप आहे. अनेक लेखक समाजमाध्यमांवरून आपली साहित्यिक ओळख निर्माण करून पुढे मुद्रित साहित्यविश्वात प्रवेश करतात. त्यामुळे डिजिटल आणि पारंपरिक साहित्य यांच्यात स्पर्धात्मक न राहता परस्परपूरक नाते निर्माण झाल्याचे दिसून येते.

५. मराठी साहित्यिक चळवळी आणि समाजमाध्यमे :-

मराठी भाषेचा अभिमान, भाषासंवर्धन, सामाजिक प्रश्न, स्त्रीवाद, दलित साहित्य, पर्यावरण आणि ग्रामीण वास्तव अशा विषयांवर आधारित साहित्यिक चळवळी समाजमाध्यमांवर सक्रियपणे व्यक्त होताना दिसतात. ऑनलाइन साहित्य संमेलने, वाचनकट्टे, कवी संमेलने, युट्यूबवरील कथाकथन आणि पॉडकास्ट यांच्या माध्यमातून मराठी साहित्याचा प्रसार नव्या स्वरूपात घडत आहे.

६. समाजमाध्यमांचा मराठी साहित्यावर होणारा परिणाम :-

समाजमाध्यमांमुळे साहित्यनिर्मितीचा वेग वाढलेला असला, तरी दर्जा, शाश्वतता आणि साहित्यिक शिस्त यांसंदर्भात काही प्रश्न उपस्थित होतात. तात्काळ लोकप्रियतेच्या शोधात सखोल आशय, कलात्मकता आणि साहित्यिक मूल्यांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे समाजमाध्यमांचा वापर मराठी साहित्याच्या विकासासाठी संतुलित, विवेकी आणि सजगपणे करणे आवश्यक ठरते.

समाजमाध्यमांचा मराठी भाषेवरील प्रभाव :-

समाजमाध्यमांचा मराठी भाषेवर होणारा प्रभाव हा केवळ भाषिक बदलांच्या चौकटीत मर्यादित न राहता सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक तसेच मानसिक पातळीवरही स्पष्टपणे जाणवतो. या प्रभावाचे स्वरूप द्विस्तरीय असून, एकीकडे समाजमाध्यमे मराठी भाषेच्या प्रसार, संवर्धन आणि लोकशाहीकरणाला चालना देतात, तर दुसरीकडे भाषिक शुद्धता, प्रमाणभाषेची सातत्यपूर्ण परंपरा आणि सांस्कृतिक स्थैर्य यांसमोर विविध प्रकारची आव्हाने उभी करतात.

१. सकारात्मक प्रभाव :-

समाजमाध्यमांमुळे मराठी भाषेचा दैनंदिन वापर लक्षणीयरीत्या वाढलेला आढळतो. पूर्वी मुख्यतः साहित्यिक किंवा औपचारिक लेखनापुरती मर्यादित असलेली मराठी भाषा आज डिजिटल संवाद, वैयक्तिक अभिव्यक्ती आणि सार्वजनिक चर्चेचे प्रभावी माध्यम बनली आहे. फेसबुकवरील पोस्ट्स, व्हॉट्सॲप संदेश, इन्स्टाग्राम कॅप्शन तसेच युट्यूबवरील टिप्पण्यांच्या माध्यमातून मराठी भाषा सातत्याने वापरात राहते. परदेशात वास्तव्यास असलेले मराठी भाषिक समाजमाध्यमांच्या साहाय्याने आपल्या मातृभाषेशी सतत जोडलेले राहतात. यामुळे भाषिक अस्मिता अधिक बळकट होते आणि मराठी भाषेतील साहित्य, कविता व वैचारिक लेखन जागतिक स्तरावर पोहोचू लागले आहे. डिजिटल माध्यमांमुळे मराठी भाषेतील सर्जनशीलतेला नवे आयाम प्राप्त झाले आहेत. नवीन शब्दनिर्मिती, उपरोधिक भाषा, विनोदी शैली तसेच सामाजिक भाष्य यांमुळे भाषा अधिक जिवंत, गतिमान आणि समकालीन स्वरूप धारण करते. भाषेचा हा परिवर्तनशील स्वभाव तिच्या टिकावासाठी आवश्यक मानला जातो.

२. नकारात्मक प्रभाव :-

समाजमाध्यमांवरील अति-वापरामुळे मराठी भाषेच्या शुद्धलेखन, व्याकरण आणि प्रमाणभाषिक रचनेवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे निरीक्षण नोंदविता येते. तत्काळ प्रतिसाद देण्याच्या प्रवृत्तीमुळे भाषिक अचूकतेपेक्षा वेगाला प्राधान्य दिले जात असल्याचे दिसून येते. मराठी-इंग्रजी मिश्रभाषेचा अतिरेक झाल्यास मराठी भाषेच्या स्वतंत्र शब्दसंपत्तीवर ताण येण्याची शक्यता निर्माण होते. विशेषतः तरुण पिढीमध्ये इंग्रजी शब्दांशिवाय मराठी वाक्यरचना अपूर्ण वाटते, अशी मानसिकता हळूहळू विकसित होत आहे. संक्षेप, इमोजी आणि मिम्स यांचा अति-वापर झाल्यास

भाषेची अभिव्यक्ती खोली कमी होण्याचा धोका संभावतो. परिणामी भाषेचा गंभीर, विचारप्रधान आणि वैचारिक वापर कमी होण्याची भीती व्यक्त केली जाते.

३. सांस्कृतिक प्रभाव :-

भाषा ही संस्कृतीची प्रमुख वाहक असते. समाजमाध्यमांमुळे मराठी सण, परंपरा, लोककला, ग्रामीण जीवनशैली आणि खाद्यसंस्कृती यांचे डिजिटल स्वरूपात मोठ्या प्रमाणावर सादरीकरण होत आहे. यामुळे मराठी संस्कृतीचा प्रचार आणि जतन दोन्ही साध्य होत आहे. मात्र त्याच वेळी जागतिक संस्कृतीच्या प्रभावामुळे स्थानिक सांस्कृतिक घटकांवर आघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाश्चिमात्त्य सवयी, भाषिक शैली आणि जीवनपद्धती यांचा प्रभाव मराठी भाषेच्या सांस्कृतिक संदर्भांवर स्पष्टपणे जाणवतो.

४. समन्वयाची गरज ;-

समाजमाध्यमांचा मराठी भाषेवर होणारा प्रभाव पूर्णतः सकारात्मक किंवा पूर्णतः नकारात्मक असा नसून तो संतुलनावर अवलंबून आहे. भाषिक बदल स्विकारताना मराठी भाषेची सांस्कृतिक ओळख, प्रमाणभाषा आणि भाषिक शुद्धता जपणे आवश्यक ठरते. सजग, विवेकी आणि जबाबदार वापरातून समाजमाध्यमे मराठी भाषेच्या संवर्धनाचे प्रभावी साधन ठरू शकतात.

मराठी भाषेच्या संवर्धनातील समाजमाध्यमांची भूमिका :-

डिजिटल युगाच्या संदर्भात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी समाजमाध्यमे ही केवळ पूरक साधने न राहता अत्यंत प्रभावी व अपरिहार्य माध्यमे ठरलेली आहेत. परंपरागत शिक्षणसंस्था, साहित्यसंमेलने आणि मुद्रित माध्यमांपुरते मर्यादित असलेले भाषासंवर्धनाचे कार्य आज समाजमाध्यमांच्या साहाय्याने व्यापक सामाजिक स्तरावर पोहोचू लागले आहे. योग्य नियोजन, भाषिक जाणीव आणि सांस्कृतिक भान राखून समाजमाध्यमांचा वापर केल्यास मराठी भाषेचे संवर्धन अधिक परिणामकारकपणे साध्य करता येऊ शकते.

१. मराठी भाषेचा प्रसार व लोकप्रियता वाढविणे :-

समाजमाध्यमांच्या व्यापक वापरामुळे मराठी भाषेचा दैनंदिन व्यवहारातील उपयोग वाढलेला स्पष्टपणे दिसून येतो. फेसबुक पेजेस, व्हॉट्सॲप गट, इन्स्टाग्राम हँडल्स तसेच युट्यूब चॅनेल्स यांच्या माध्यमातून मराठी भाषेतील मजकूर सातत्याने प्रसारित होत असतो. परिणामी मराठी भाषा केवळ औपचारिक, शैक्षणिक किंवा साहित्यिक क्षेत्रापुरती मर्यादित न राहता सामान्य जनतेच्या व्यवहारातील प्रभावी भाषा बनताना दिसून येते.

२. मराठी शुद्धलेखन व भाषिक जाणीव निर्माण करणे :-

समाजमाध्यमांचा उपयोग मराठी शुद्धलेखन, व्याकरण आणि प्रमाणभाषेची जाणीव निर्माण करण्यासाठीही प्रभावीपणे करता येतो. अनेक मराठी भाषा अभ्यासक, शिक्षक आणि संस्था समाजमाध्यमांद्वारे शुद्धलेखन विषयक मार्गदर्शन, भाषिक टिप्स आणि शब्दार्थ स्पष्टीकरण देताना दिसतात. या उपक्रमांमुळे भाषिक शुद्धतेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होते.

३. मराठी साहित्य व संस्कृतीचे जतन :-

समाजमाध्यमांवर मराठी साहित्य, लोककथा, कविता, अभंग, ओव्या, लोकगीते तसेच नाट्यसंहिता यांचे डिजिटल स्वरूपात सादरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामुळे मराठी सांस्कृतिक वारशाचे जतन होत असून तो नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य साध्य होत आहे. सण-उत्सव, परंपरा आणि लोककला यांचे मराठीतून सादरीकरण हे सांस्कृतिक संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते.

४. शासन, संस्था व समाजमाध्यमे यांचा समन्वय :-

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शासन, शैक्षणिक संस्था आणि स्वयंसेवी संघटनांनी समाजमाध्यमांचा समन्वयात्मक व प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. मराठी भाषा दिन, भाषा अभियान, ऑनलाइन स्पर्धा, वेबिनार्स तसेच डिजिटल कार्यशाळांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून भाषासंवर्धनाचे कार्य अधिक व्यापक करता येऊ शकते.

५. जबाबदार व संतुलित वापराची गरज :-

समाजमाध्यमांचा वापर करताना भाषिक शुद्धता, सांस्कृतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी जपली जाणे अत्यावश्यक आहे. अति-मिश्रभाषा, अपभ्रंश किंवा अश्लील भाषेचा वापर टाळून मराठी भाषेचा सन्मान राखणे ही प्रत्येक वापरकर्त्याची नैतिक व सामाजिक जबाबदारी ठरते.

मराठी भाषेसमोरील आव्हाने व संधी :-

समाजमाध्यमांच्या व्यापक प्रभावामुळे मराठी भाषेसाठी अभिव्यक्तीची नवी दालने खुली झाली असली, तरी या बदलांच्या प्रक्रियेत आव्हाने आणि संधी या दोन्ही बाबी समांतरपणे निर्माण झालेल्या दिसून येतात. समाजमाध्यमे भाषिक विस्ताराची साधने ठरत असतानाच, काही मर्यादा व धोकेही निर्माण करीत आहेत.

आव्हाने :-

१. इंग्रजीचे वाढते वर्चस्व :-

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे समाजमाध्यमांवर इंग्रजी भाषेचे वर्चस्व लक्षणीयरीत्या वाढलेले आढळते. मराठी भाषिक वापरकर्तेही अनेक वेळा इंग्रजी किंवा मराठी-इंग्रजी मिश्रभाषेचा अधिक वापर करताना दिसतात. परिणामी मराठी भाषेची स्वतंत्र भाषिक ओळख दुर्बल होण्याची शक्यता निर्माण होत असल्याचे समीक्षात्मक निरीक्षण नोंदविता येते.

२. शुद्धलेखन व व्याकरणाकडे दुर्लक्ष :-

समाजमाध्यमांवरील तात्काळ, वेगवान आणि अनौपचारिक संवादामुळे शुद्धलेखन, व्याकरण तसेच विरामचिन्हांच्या अचूक वापराकडे दुर्लक्ष होण्याची प्रवृत्ती वाढत आहे. ही सवय दिर्घकाळ टिकून राहिल्यास भाषिक शिस्त सैल होण्याचा आणि भाषेच्या दर्जावर विपरीत परिणाम होण्याचा धोका संभवतो.

३. प्रमाणभाषेची घसरण :-

बोलभाषा, विविध बोलीभाषा आणि अपभ्रंश यांचा समाजमाध्यमांवर अतिरेकी वापर झाल्यास प्रमाण मराठीचा वापर हळूहळू मर्यादित होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम शैक्षणिक, शोधनात्मक आणि साहित्यिक क्षेत्रांवर नकारात्मक स्वरूपात होऊ शकतो.

४. भाषेचे व्यापारीकरण :-

समाजमाध्यमांवरील लोकप्रियता, लाइक्स, शेअर्स आणि फॉलोअर्स यांच्या शर्यतीत भाषेचा वापर अनेकदा वरवरचा, आकर्षक किंवा सनसनाटी स्वरूपाचा होत असल्याचे दिसून येते. या प्रक्रियेत भाषेचा सांस्कृतिक, वैचारिक आणि साहित्यिक दर्जा कमी होण्याचा धोका निर्माण होतो.

संधी :-

१. जागतिक स्तरावर पोहोच :-

समाजमाध्यमांच्या प्रभावी वापरामुळे मराठी भाषा आता केवळ प्रादेशिक मर्यादांमध्ये अडकून न राहता जागतिक स्तरावर विस्तारताना दिसून येते. परदेशात वास्तव्यास असलेल्या मराठी भाषिकांशी संवाद सुलभ झाल्याने भाषेचा आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रसार वाढत असून मराठी भाषेची स्वतंत्र जागतिक ओळख घडवून आणण्याची प्रक्रिया अधिक गतिमान होत आहे.

२. नव्या साहित्यप्रवाहांची निर्मिती :-

ई-साहित्य, डिजिटल कविता, सूक्ष्मकथा, ब्लॉगलेखन तसेच पॉडकास्टसारख्या नव्या माध्यमांमुळे मराठी साहित्याचे पारंपरिक चौकटीपलीकडील नवे प्रवाह निर्माण होत आहेत. ही प्रक्रिया केवळ साहित्याच्या स्वरूपात बदल घडवून आणत नाही, तर मराठी भाषेच्या सर्जनशील क्षमतेला आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्याला नवे आयाम प्राप्त करून देते.

३. तरुण पिढीचा सक्रिय सहभाग :-

समाजमाध्यमांवरील तरुण पिढीचा मोठ्या प्रमाणावरील सहभाग मराठी भाषेसाठी महत्त्वपूर्ण संधी ठरत आहे. योग्य वैचारिक मार्गदर्शन, भाषिक जाणीव आणि सांस्कृतिक भान लाभल्यास ही पिढी मराठी भाषेच्या संवर्धन, प्रसार आणि पुनरुज्जीवनाची प्रमुख वाहक ठरू शकते, अशी आशावादी शक्यता येथे व्यक्त करता येते.

४. डिजिटल शिक्षण व भाषा प्रसार :-

ऑनलाइन वर्ग, वेबिनार्स, भाषा-ॲप्स तसेच युट्यूब चॅनेल्स यांसारख्या डिजिटल साधनांमुळे मराठी भाषा शिकविणे आणि तिचा प्रसार करणे अधिक सुलभ, प्रभावी आणि व्यापक झाले आहे. या माध्यमांमुळे औपचारिक शिक्षणाच्या मर्यादा ओलांडून भाषा शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचू लागले आहे.

५. सांस्कृतिक अस्मितेचे बळकटीकरण ;-

समाजमाध्यमांवरील मराठी भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीचा वापर सांस्कृतिक अस्मितेला बळकटी देणारा ठरतो. या प्रक्रियेत भाषा ही केवळ संवादाचे साधन न राहता सांस्कृतिक ओळखीचे, आत्मभानाचे आणि सामूहिक स्मृतीचे प्रतीक बनताना दिसून येते.

निष्कर्ष :-

समाजमाध्यमे आणि मराठी भाषा यांचे परस्परसंबंध हे केवळ तांत्रिक अथवा माध्यमप्रधान स्वरूपापुरते मर्यादित न राहता, ते सामाजिक, सांस्कृतिक तसेच तत्त्वचिंतनात्मक पातळीवर विस्तारलेले दिसून येतात. डिजिटल युगात भाषा ही फक्त संवादाचे साधन न राहता अस्मिता, विचारप्रणाली आणि सांस्कृतिक जाणीवेचे प्रभावी माध्यम म्हणून कार्य करू लागली आहे. समाजमाध्यमांमुळे मराठी भाषेला अभिव्यक्तीचे नवे आणि व्यापक व्यासपीठ लाभले असून तिचा वापर अधिक सुलभ, व्यापक आणि लोककेंद्री झाला आहे, हे वास्तव नाकारता येत नाही.

मात्र या प्रक्रियेसोबतच मराठी भाषेसमोर काही गंभीर आव्हानेही उभी राहिली आहेत. इंग्रजी भाषेचे वाढते वर्चस्व, मिश्रभाषेचा अतिरेकी वापर, शुद्धलेखन व व्याकरणाकडे होणारे दुर्लक्ष तसेच भाषेचे व्यापारीकरण यांमुळे मराठी भाषेची गुणवत्ता, सांस्कृतिक खोली आणि अभिजातता बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे समाजमाध्यमांचा वापर करताना भाषिक शिस्त, सांस्कृतिक भान आणि वैचारिक जबाबदारी जपली जाणे आवश्यक ठरते.

त्याच वेळी, समाजमाध्यमे मराठी भाषेसाठी असंख्य नव्या संधीही उपलब्ध करून देतात. ई-साहित्य, डिजिटल कथा व कविता, ब्लॉगलेखन, पॉडकास्ट, तसेच ऑनलाइन चर्चामंचांमुळे मराठी साहित्याचे नवे प्रवाह आकाराला येत आहेत. विशेषतः तरुण पिढीचा वाढता सहभाग मराठी भाषेला नवसंजीवनी देणारा ठरत आहे. भाषा जिवंत ठेवण्यासाठी तिच्यात काळानुरूप बदल स्वीकारणे अपरिहार्य असले, तरी हा बदल मूळ भाषिक व सांस्कृतिक मूल्यांना बाधा न आणणारा असावा, ही तत्त्वचिंतनात्मक भूमिका येथे महत्त्वाची ठरते.

मराठी भाषेचे संवर्धन हे केवळ शासन, संस्था किंवा शिक्षणव्यवस्थेचे कर्तव्य नसून प्रत्येक मराठी भाषिकाची सामूहिक सामाजिक जबाबदारी आहे. समाजमाध्यमांचा विवेकी, सर्जनशील आणि जबाबदार वापर केल्यास मराठी भाषा केवळ टिकून राहील असे नाही, तर ती जागतिक स्तरावर आपली वैचारिक व सांस्कृतिक ओळख अधिक ठळकपणे प्रस्थापित करू शकेल.

अशा प्रकारे, समाजमाध्यमे ही मराठी भाषेसाठी ना पूर्णतः धोकादायक आहेत, ना केवळ लाभदायक; ती एक सामर्थ्यवान साधने आहेत. या साधनांचा वापर कोणत्या दृष्टीकोनातून, कोणत्या मूल्यांनुसार आणि कोणत्या सामाजिक जाणिवेतून केला जातो, यावर मराठी भाषेचे भविष्य अवलंबून आहे. म्हणूनच भाषेचा सन्मान, विवेकशील वापर आणि सांस्कृतिक निष्ठा यांचा समतोल साधणे हीच समाजमाध्यमांच्या युगातील मराठी भाषेच्या संवर्धनाची खरी तत्त्वचिंतनात्मक दिशा ठरते.

संदर्भसूची :-

१) महेशकर रजत, "Why Use सोशल मीडिया?", नॉशन प्रेस, २०२३

२) बोराटे योगेश, "सोशल मीडिया", अथर्व पब्लिकेशन,२०१९

३) Rathod Naitik, " Marathi Social Media Opinion Mining using XLM-R", IEEE, 2022

४) Phadte Akshata, "Sentiment Analysis of English-Marathi-Konkani Code-Mixed Social Media Text: A Multilingual Approach", IEEE, 2025

५) विश्राम ढोले- समाज माध्यमांतील मराठी: जगण्यात मराठी 'लाइक' केली, तरच ती 'व्हायरल' होईल!"(वैचारिक लेख)

६) डॉ. वीरा राठोड- "समाजमाध्यमे आणि भाषासमृद्धी" (वैचारिक लेख)

आदिवासी कादंबरीची भाषा : भिवा फरारीच्या अनुषंगाने

डॉ. अनिल एम. वळवी
डॉ. पतंगराव कदम आर्ट्स अँण्ड कॉमर्स कॉलेज पेण, जि. रायगड
भ्रमणध्वनी : ८३७८८५१७८१ इमेल: anilvalvi14479@gmail.com

प्रस्तावना : आदिवासी जीवनावरील कादंबरी १९२० नंतर लिहिली गेली. हा कादंबरीकार जरी आदिवासीतर समाजातील असला तरी त्याला आदिवासी जीवनावर लिहायला वाटणे ही खूप अभूतपूर्व घटना होती. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाच्या प्रसारामुळे तळागाळातील शिक्षित झालेल्या त्या काळातील युवकांनी स्व:समाजातील जीवन जाणीवा साहित्यातून मांडण्यासोबतच अन्य समाजाच्या जीवन जाणीवा काही लेखकांनी साहित्यातून मांडल्यात. त्यातून आदिवासी समाजही सुटला नाही. वन कायद्याच्या फटका बसल्याने खेड्यापाड्यातील लोकांवर जीवनयापन करणाऱ्या आणि विशिष्ट लोकसंस्कृती असणारा आदिवासी माणूस या साहित्यिकांच्या लक्षात आल्यावर तो त्याच्या साहित्याचा विषय झाला. या लोकांचे जीवन समजून घेण्यासाठी त्याच्या प्रदेशात केलेल्या सफरीनिमित्ताने किंवा त्यांचे संशोधन करण्याच्या निमित्ताने किंवा साहित्याला एक वेगळा विषय असावा म्हणून या कालखंडात आदिवासी जीवन साहित्याचा विषय झाला. या कालखंडात मोठ्या प्रमाणात साहित्य अन्य जातीय लेखकांकडून लिहिले गेले.

आदिवासी समाजातून कादंबरीतून आदिवासी जीवनजाणिवा आविष्कृत करण्याचे कार्य नजूबाई गावित यांची 'तृष्णा', माधव सरकुंडे यांची 'वाडा', बाबाराव मडावी लिखित 'टाहो', देवदत्त चौधरी यांची 'पळसचोंड', नजुबाई गावीत यांची 'भिवा फरारी', डॉ. कृष्णा भवारी यांची इधोस' संजय लोहकरेची 'देश+ठेकेदार *आमदार', सुनील गायकवाड लिखित 'मासोली' तुकाराम चौधरी लिखित 'पाडयावरील टिल्या', प्रा. डॉ. माधव ह. गावित यांची 'घोंगडा' विनोद कुमारे लिखित 'कोयतूर' या कादंबऱ्यांत प्रामुख्याने भिल्ल, कोकणा, कोया, महादेव कोळी जमातीच्या आदिवासी जीवन जाणीवा कवेत घेण्याच्या आदिवासी लेखकांनी प्रयत्न करताना त्या त्या जमातीतील आदिवासी स्त्रियांच्या सुख-दु:ख, व्यथा-वेदना, जमातीतंर्गत दिली गेलेली वागणूक, दिले गेलेले जमात सामाजिक अधिकार याचे चित्रण ठळकपणे केले गेले आहे आहे. या सर्व कादंबऱ्यांची भाषा ही प्रमाण मराठी भाषा असली तरी त्या त्या प्रदेशातील आदिवासी बोलींचा लहेजा किंवा त्या त्या बोलीतील शब्द, वाक्य यांचा लेखकांनी चपखलपणे अवलंबल्याने कादंबरीला प्रादेशिकतेचे एक बाज प्राप्त झालेली आहे. भाषिक दृष्टीने याबाबती आदिवासी कादंबरीचे हे एक विशेष मानायला पाहिजे.

कादंबरीचे कथानक, व्यक्तीचित्रण, प्रसंगचित्रण, वातावरण, निवेदनपध्दत या घटकांसोबतच कादंबरीची भाषा हा घटकही तितकाच महत्त्वपूर्ण असतो. या घटकावर कादंबरीची परीणामकारकता अवलंबून असते. कादंबरीची भाषा जितकी प्रवाही, ओघवती असेल तितकी कादंबरी वाचनीय असते. कादंबरीच्या निवेदनाची व संवादाची भाषा वेगवेगळी असते. ही भाषा कादंबरीच्या प्रकारानुसार आणि प्रदेशानुसार बदलते. कादंबरी एका विशिष्ट भूप्रदेशातील व्यक्तींच्या सामाजिक जीवनावर आधारलेली असेल तर कादंबरीकार बहुदा निवेदनासाठी प्रमाण भाषेचा वापर करत असतो तर संवादासाठी त्या प्रदेशातील बोलींचा वापर करत असतो. अलिकडील काळात कादंबरीतल्या वास्तवाविषयीच्या संकल्पना जशा बदलत गेल्या त्याप्रमाणे कादंबरीच्या भाषेचे स्वरूपही बदलत गेलेले आहे. नव्या जाणिवांमुळे कादंबरीतील भाषा अधिक अर्थसघन करण्याकडे कादंबरीकार लक्ष देत असतो. पात्रांच्या लकबींचे आणि हावभावांचे वर्णन करणाऱ्या ओघवत्या, चित्रदर्शी भाषेपेक्षा खंडित, तुटक वाटणारी प्रतिमासंपन्न, अर्थवाही भाषा घडविण्याकडे कादंबरीकाराचा कल असतो. याशिवाय कादंबरीची भाषा आशयानुसार, पात्रांच्या स्वभावानुसार, लेखकाच्या व्यक्तीमत्त्वानुसार बदलत असते. तसेच लेखकाच्या जीवनविषयक दृष्टीकोण कसा आहे, वाङमयविषयक भूमिकेचाही परीणाम भाषेवर होत असतो. यामुळेच लेखकांच्या शैलीही बदलल्याची जाणीव आपणाला होते. अलीकडील आदिवासी कादंबरीचा अभ्यास करताना याचा विचार क्रमप्राप्त आहे. येथे नजूबाई गावित लिखित 'भिवा फरारी' या कादंबरीचा भाषिक अंगाने शोध मांडण्याचा प्रयत्न असणार आहे. हा शोध पुरेसा नाही याची संशोधकाला जाण आहे.

आदिवासी लेखकांमध्ये आदिवासी कादंबरीच्या अध्वर्यू नजूबाई गावित यांच्या तृष्णा या पहिल्यावहिल्या कादंबरीनंतर 'भिवा फरारी' ही कादंबरी मावळाई प्रकाशन शिरूर यांनी २००८ साली प्रकाशित केली. ही कादंबरी

धुळे जिल्हयातील भिल्ल जमातीचं चित्रण करणारी असून कादंबरीला आदिवासी भिल्ल समाज, संस्कृती आणि आदिवासी क्रांतीवीरांच्या आठवणींची पार्श्वभूमी लाभलेली आहे. या कादंबरीच्या संदर्भात डॉ. माहेश्वरी गावीत लिहतात,"ब्रिटीशांच्या जुलमी, जाचक, शोषक व्यवस्थेविरोधात भिवाच्या तीन पिढयांनी आपले स्वातंत्र्य, स्वाभिमान, अस्मिता शाबूत ठेवण्यासाठी केलेला संघर्ष, दिलेली झुंज हे या कादंबरीचे मुख्य सूत्र. भारतात अनेक ठिकाणी विविध आदिवासी जमीतींनी ब्रिटीश राजवटीविरूध्द लढे दिले. या लढयाची नोंद भारतीय इतिहासात कुठेच घेतली गेली नाही. 'भिवा फरारी' या ऐतिहासिक कादंबरीतील भिवा हा प्रातिनिधिकत्वाने हा उपेक्षित इतिहास आपल्यासमोर मांडतो."१ यातून कादंबरीचे आशयकेंद्र लक्षात येते. या कादंबरीच्या आशय अभिव्यक्तीकरीता लेखक निवेदनासाठी आणि संवादासाठी प्रमाण मराठी भाषेचा वापर करतात, पण संवादासाठी वापरलेल्या मराठी भाषेला आदिवासी भाषेचा मुलामा चढविल्यामुळे कादंबरीतील आशय अधिक वास्तवदर्शी झाल्याचे प्रतित होते. प्रमाण मराठी भाषेतील शब्द, वाक्य, वाक्प्रचार, भिल्ल बोली भाषेतील शब्द, वाक्य, वाक्प्रचार यांचा चपखलपणे वापर निवेदनाच्या ओघात लेखिकेने केलेला आहे. या भाषेच्या संदर्भात डॉ. तुकाराम रोंगटे म्हणतात, "सदर कादंबरीत डोंगर-कपारीत राहणाऱ्या भिल्ल समाजाचे वर्णन येत असल्यामुळे अनेक नव्या शब्दांचा परिचय होतो. उदा. वाणमारी चांदणी, दुखाडणे, चिडया, कोसामाहे, शारटया असे अनेक शब्दप्रयोग कादंबरीत येतात. हे शब्दप्रयोग वरवर विचित्र जरी वाटत असले तरी, यामुळे आशय अधिक परिणामकारकपणे वाचकापर्यंत पोहचला आहे. डांगी भिलोरी बोलीतील अनेक शब्दप्रयोग, शिव्या, लोकगीते, लोककथा, यांच्या उपयोजनेतून कादंबरीत जीवंतपणा आला आहे."२ यामुळे कादंबरीचे वाङमयीन सौंदर्य खुलविण्यास मदतच झालेली आहे. जसे-."धरा हातात ते तीरकामठे अन् चला त्या शेंडया डोंगराच्या वाटेला. हाणा त्या माजलेल्या बांडयांच्या पाठीत धडाधड बाण."(पृ.०५) तर काही भिल्ल शब्दांचा वापर संवाद आणि निवेदनातही केलेला आहे . जसे- हाणा, गासडी, चिडे, झुंबडी, आगारी, थेई, चुडे, गोठारी, झांबलून, खोळ, कणगी, झुमले अशा असंख्य शब्दांचा भरणा झालेला आहे. तर क्वचित ठिकाणी हिंदीचा वापरही झालेला आहे. जसे-ऐ बुढा, पैसा दागीने दिखावं जलदी, नही तो सर उडा देंगा इस तलवार से."(पृ१५१) याशिवाय कादंबरीत प्रतिमा प्रतिकांचा वापर चपखलपणे केल्यामुळे भाषिक सौंदर्यवृद्धी झालेली आहे.

या कादंबरीत भाषिक सौंदर्यवृद्धी करिता दात ओठ खाणे, गर्भगळीत होणे, वचपा काढणे, काळानीळा होणे, जीव मरगळुन जाणे, डाळ न शिजणे या वाक्प्रचारांचा वापरातून निवेदनाचे सामर्थ्य वाढविलेले आहे. हे वाक्प्रचार मराठी भाषेतील तर आहेच याशिवाय भिल्ल भाषेत बोलल्या जाणाऱ्या विविध वाक्प्रचारांचा लेखक अवलंब करतात जसे- काळानीळा होणे. तर करकोच्यासारखा कीरकीर आवाज, ढोरासारखे माणसं, रंडक बोलण, वज्रदेह, ढोरपोटया भाकरी, मरणकळा, बोराएवढी फोड, घागरीएवढे पोट अशा अत्यंत समर्पक प्रतिमांचा वापर केलेला आहे. डाकीण, पाप, पुण्य, स्वर्ग, नरक, देव यासारख्या प्रतिकांचा भाषिक सौंदर्यवृद्धीकरिता व आशय सशक्तीकरणाकरिता लेखकाने अत्यंत समर्पकपणे वापर केलेला आहे.

नवदोत्तर कालखंड हा जागतिकीकरणाचा कालखंड आहे. जागतिकीकरणानंतर समाजाच्या सर्वच क्षेत्रात अत्यंत गतीने बदल झाला. त्याला भाषाही अपवाद नाही. सामाजिक सरमिसळीतून अनेक भाषांतील अनेक शब्द, वाक्य अन्य भाषेमध्ये स्थिर झालेले आहेत. आदिवासी समाजही याला अपवाद नाही. वेगवेगळया प्रयोजनाने अन्य भाषिक समूहाशी आदिवासींचा संपर्क वाढल्याने विशेषता आदिवासींच्या जल, जंगल, जमीन, वनसंपत्ती लाटण्याच निमित्ताने, नोकरीच्या निमित्ताने आदिवासी प्रदेशात स्थिरावलेल्या प्रशासकिय कामगारांच्या संपर्काने आदिवासींच्या बोलीभाषेत अनेक नवीन शब्दांचा भरणा पडला. यासोबतच आदिवासींमधील शिक्षित वर्गातील व्यक्तींचा अन्य भाषांचा अतिवापरानेही आदिवासी बोलीभाषेत अन्य भाषांतील शब्दांचा भरणा वाढलेला आहे. हे जगातील सर्वच बोलीभाषांचा बाबतीत घडलेले आहे. यामुळे जागतिकीकरणानंतर एक संमिश्र भाषेचा जन्म झालेला आहे. आदिवासी कादंबरीचे लेखन करणारा लेखक हा या समाजाचाच घटक असल्याने आपसूक त्यालाही ही संमिश्र भाषा प्राप्त झालेली आहे काय? त्यामुळे त्याच्याही साहित्यकृतीची भाषा संमिश्र झालेली आहे? याचे उत्तर काही अंशी हो असेच येते. या कादंबरीतदेखील काही प्रसंगात अन्य भाषेतील शब्दांचा वापर लेखकाने कौशल्याने केल्याने निवेदन आणि संवादभाषेत जीवंतपणा जाणवतो. जसे-, "ए बुढा, पैसा दागिने दिखावं जलदी. नही तो सर उडा देंगा इस तलवारसे. घरका दरवाजा

खोल" (पृ. १५१) तर "ए थोट्या, तेरे औरत के दागिने कहाँ रखे? बोल जल्दी. नाही तो दुसरा हात भी तोडूंगा." (पृ. १५३) खरे पाहता ही भाषा पात्र आणि प्रसंगाला असुसरून योजलेली आहे. या प्रसंगातील नायक भिवा जर स्थानिक भाषेत बोलला असता तर तो आणि त्याची टोळी पकडली जाण्याची भीती होती. म्हणून नायक मुसलमानांच्या भाषेचा अवलंब करतो. त्या परिसरातील मुसलमान व्यक्तीदेखील या स्वरूपाच्या धाडी टाकत असावेत. त्यांच्यावरदेखील ब्रिटिश शासन व्यवस्थेची नजर असावी. त्या व्यवस्थेच्या आपण नजरेस भरणार नाही म्हणून त्या पात्राच्या तोंडी लेखकाने ही भाषा योजली आहे. पण नायक हिंदी भाषक नसल्याने दागिना हा शब्द त्याने मराठी भाषेतील उच्चारला आहे. म्हणजे नायक हा ग्रामीण परिसरातील आहे आणि त्याला व्यवस्थित हिंदी बोलता येत नाही पण दबाव टाकण्यासाठी जरब बसवण्यासाठी तो या भाषेचा आश्रय घेतो हे लेखकाचे भाषा योजनेचे चातुर्यचं म्हणायला पाहिजे.

लेखक निवेदनाकरिता मराठी भाषेचा अवलंब करीत असला तरी त्या परिसरात आणि विशेषतः भिल्ल भाषेत एकाद्या वस्तूला वा व्यक्तीला मूळचे जे नाव दिले गेलेले आहे त्या शब्दांचाच लेखक वापर करताना दिसतो. ही मराठी भाषेला लेखकाने दिलेली भाषिक समृद्धीच म्हणायला पाहिजे. जसे-"ती कणगी नागलीच्या दाण्यांनी भरलेली होती." () आता हे वाक्य मराठी भाषेतील आहे हे बरोबर असले तरी या वाक्यात 'कणगी' आणि 'नागली' हे दोन शब्द भिल्ल बोलीतील आहेत. या भाषेचा जाणकार असणाऱ्या वाचकालाच हे समजू शकते. तर भिवा, या पोरांना भरायला लाव रं. माझा डावा पाय टेकवत नाही. (पृ.२) या विधानातील संवाद भाषेतही याचा प्रत्यय येत असतो. शिवाय भिल्ल बोलीचा एक बाज प्राप्त झाल्याचे प्रतिती होते.

सारांश, नजूबाई गावित लिखित भिवा फरारी ही कादंबरी प्रमाण मराठी भाषेत लिहिलेली असली तरी या भाषेत अनेक शब्द हे भिल्ल बोलीभाषेतील असल्याचे लक्षात येते. याशिवाय या भाषेला आदिवासी बोलीचा एक लहेजा प्राप्त झालेला आहे. आपण मराठी भाषेतील निवेदने आणि संवाद वाचत असताना त्याची लिपी ही मराठी असली तरी जणू त्याचा सूर भिल्ल बोलीतील आहे हे लगेच लक्षात येते. याशिवाय या बोलीतील अनेक वाक्प्रचार, प्रतिमा, प्रतिके देखील भिल्ल भाषेतील येतात.

साधन ग्रंथ :

१. नजूबाई गावित, भिवा फरारी, मावळाई प्रकाशन, शिरूर, प्र. आ., २००८

संदर्भ ग्रंथ :

१. डॉ. माहेश्वरी गावीत, महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य एक शोध, दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे, प्र. आ., पृ. ४८६

२. डॉ. तुकाराम रोंगटे, आदिवासी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र. आ., पृ. ८८

अभिजात मराठी भाषा आणि साहित्यातील बोलींचे योगदान

प्रा. डॉ. कृष्णा महादू भवारी
सहयोगी प्राध्यापक
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली

प्रस्तावना - भाषा हे संप्रेषणाचे प्रभावी माध्यम आहे. विचार आणि भावभावनांचे आदानप्रदान आपण भाषेच्या माध्यमातूनच करत असतो. भाषांची निर्मिती हजारो वर्षांपूर्वी झाली आहे. जसजशी मानवाची उत्क्रांती झाली तसा भाषेमध्येही बदल होत गेला. आदिमानव हा गुहेत, झाडाच्या सालीवर संवादासाठी चित्रमय स्वरूपात भाषेचा वापर करू लागला. पुढे भाषेचा विकास होत गेला आणि प्रत्येक भाषेची स्वतंत्र लिपी निर्माण झाली. कालांतराने प्रत्येक भाषेत विशिष्ट नियम आले आणि प्रमाण भाषेचा उदय झाला. पुढे भाषेच्या शुद्ध, अशुद्धतेच्या कसोट्या लावण्यात आल्या.

भारत हा खेड्यांचा देश आहे. त्याचबरोबर अनेक जाती धर्माचे लोक येथे राहतात. ग्रामीण भागातील सर्वच लोक सुशिक्षित असतात असे नाही. त्यामुळे त्यांची भाषा ही शुद्ध असेलच असे नाही. ते आपल्या बोल भाषेतून संवाद साधतात. यातूनच विविध बोलींचा उद्गम झाला. बोली भाषाचे महत्त्व सांगताना अनेक संशोधकांनी, अभ्यासकांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणी केली आहे. उदाहरणार्थ, बोलीविषयी असे म्हटले जाते की, विशिष्ट समाजाच्या अंतर्गत लहान लहान समूहाकडून त्या भाषेशी साम्य ठेवणारी परंतु त्या समूहापुरतीच केवळ बोलण्यासाठी वापरली जाणारी भाषा म्हणजे बोली. पूर्वी बोली ही प्रमाणभाषेतून निर्माण झाली आहे असे समजले जात असे. कारण शुद्ध प्रमाणभाषा ग्रामीण भागातील किंवा मागासलेल्या वर्गांना नीट बोलता न आल्याने त्यांच्या अशुद्ध उच्चारातून जी बोली निर्माण झाली त्याला बोलीभाषा असे म्हटले जात होते. परंतु भाषा शास्त्रज्ञांनी हा गैरसमज नाहीसा केलेला आहे. कारण अनेक वेळा भौगोलिक परिस्थिती ही विविध बोलींच्या निर्मितीचे एक प्रमुख कारण आहे. तसेच परभाषेच्या सतत संपर्कामुळे सुद्धा बोलीची निर्मिती होऊ शकते. भाषा ही एक जिवंत संस्था आहे. म्हणून तिच्यात सतत परिवर्तन घडत असते. असे म्हटले आहे की, दर बारा कोसावर भाषा बदलत असते. म्हणून विशिष्ट समाजाची विशिष्ट भौगोलिक ठिकाणांची एक बोली निश्चित झालेली असते.

मराठी भाषा ही देवनागरी लिपी पासून बनलेले आहे. मराठी भाषेची उत्पत्ती कशी झाली या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न अनेक ज्येष्ठ विद्वानांनी केलेला आहे. तरीही मराठीच्या उत्पत्ती संबंधित किंवा तिचा जन्म केव्हा झाला या संबंधित ठाम विधान करणे शक्य झाले नाही. कारण कोणतीही भाषा ही उत्क्रांतीतून निर्माण झालेली असते आणि तिचा कालखंड हा दीर्घ स्वरूपाचा असतो. असे असले तरीही वि.का. राजवाडे यांनी मराठीचा जन्मकाळ इसवी सनाचे पाचवे शतक असावे असे म्हटले आहे. मराठी भाषा ही समृद्ध आहे, वैभवशाली आहे. अनेक साहित्य प्रकारांची निर्मिती या भाषेतून झालेली आहे. खऱ्या अर्थाने मराठी भाषा आणि साहित्य समृद्ध झाले ते मराठीच्या अनेक बोलींमुळे. म्हणून मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्या पाठीमागे या बोलींचा फार महत्त्वाचा वाटा आहे.

उद्दिष्ट्ये -

१. अभिजात भाषा म्हणजे काय हे समजून घेणे.
२. मराठी भाषा आणि अभिजात दर्जा यांचा सहसंबंध समजून घेणे.
३. मराठी भाषा आणि बोलींची उत्पत्तीविषयी माहिती घेणे.
४. मराठीच्या विविध बोलींचा परिचय करून घेणे.
५. विविध बोलीतील साहित्याचा मागोवा घेणे.

६. अभिजात मराठी भाषा आणि साहित्यात बोलीचे योगदान सिद्ध करणे.

अभ्यास पद्धती -

१. समाजशास्त्रीय व ऐतिहासिक पद्धत

२. वर्णनात्मक शोध पद्धती

२. इतर दुय्यम स्त्रोत, संदर्भ ग्रंथ व वेबसाईट.

शोधनिबंधाचे महत्त्व -

मराठी भाषेच्या विविध बोलींची ओळख होईल. त्याचबरोबर विशिष्ट बोली प्रदेशातील लेखकांनी मराठी साहित्य समृद्ध करण्यास दिलेले योगदान याची माहिती होईल. विविध बोलींमुळे मराठी साहित्य विशिष्ट भौगोलिक प्रदेशात कसे रूजले आहे याची जाणीव होईल. बोली प्रदेशातील लोकांची संस्कृती, जीवनमान या विषयी माहिती होईल. मराठीच्या बोलींमुळे मराठी भाषा कशी समृद्ध झाली आहे हे समजेल.

विषय विवेचन -

मराठी भाषेच्या अनेक बोली आहेत. त्या प्रत्येक बोलीभाषेच्या असंख्य उपबोली आहेत. प्रदेश निहाय आणि जाती- जमाती नुसार अनेक बोली उपलब्ध आहेत. 'इ. स. १८९० रोजी सर ग्रीयर्सन यांनी भारताची भाषिक पाहणी केली, तेव्हा गियर्सन यांना भारतात एकूण १७९ भाषा व ५४४ बोलीभाषा वापरात असल्याचे आढळले.'१ एखादी भाषा जेव्हा नष्ट होते तेव्हा त्या समाजाची सामाजिक, सांस्कृतिक हानी होत असते. म्हणूनच या भाषांचे जतन करून त्यांचे संवर्धन करणे ही मानवी समाजाच्या शाश्वत विकासासाठी निश्चितच महत्त्वाची गोष्ट आहे.

भाषा ही एक जिवंत संस्था आहे. त्याचबरोबर भाषा ही नेहमी परिवर्तनशील असते. त्यामुळे एकाच भाषेच्या अनेक बोली दिसून येतात. ह्या बोलींमध्ये देखील काही काळानंतर परिवर्तन घडत असते. स्थानिक बोली ही जीवन व्यवहारांमध्ये वापरल्यामुळे तेथील संप्रेषण व्यवहार सुलभ होत असतो. या बोलीभाषेमध्ये व्याकरण, उच्चार, वाक्प्रचार, म्हणी ह्या प्रमाण भाषेपेक्षा वेगळ्या स्वरूपाचे असतात. त्याचप्रमाणे विशिष्ट सांस्कृतिक एकता ह्या बोलींच्या माध्यमातून दिसून येत असते.

महाराष्ट्रात शेकडो बोली बोलल्या जातात. त्यातील निवडक आणि महत्त्वाच्या बोलींचा समावेश सदरच्या शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे. उदाहरणार्थ वऱ्हाडी, हळबी, अहिराणी, चंदगडी, कोकणी, आदिवासी बोली, झाडीबोली इत्यादी.

१. वऱ्हाडी बोली-

वऱ्हाडी बोली ही बुलढाणा, भंडारा, चांदा, वणी, वाशिम या ठिकाणी बोलली जाते. या भाषेतील उच्चार प्रक्रिया ही मराठीपेक्षा काही बाबतीत स्वतंत्र दिसते. उदाहरणार्थ, 'ए' ऐवजी 'अ' उच्चारला जातो. सांगितले सांगितलं. स्वरानंतरचा 'ड' हा 'र' प्रमाणे उच्चारला जातो. घोडा -घोरा . 'र' आणि 'ळ' यातील उच्चार साम्यतेमुळे घोटाळा होतो. उदाहरणार्थ जवळ - जवय माळी - मारी. प्रत्येक लागण्यापूर्वी अनेकवचनास 'इ' जोडला जातो उदा. मानसाइले. वऱ्हाडीतील काही शब्द- हाड्या - कावळा, हातोळी- लग्न, बहनाई- बहिणीचा नवरा, डोलची - बादली इ. डॉ. विठ्ठल वाघ यांच्या कविता या बोलीचा उत्तम नमुना आहे.

२. हळबी बोली-

वास्तविक पाहता हळबी ही वऱ्हाडीचीच पोट भाषा समजली जाते. रायपूर, भंडारा, चांदा यांच्या आसपास राहणाऱ्या लोकांची ही बोली आहे. हळबी बोलीत मराठी, ओडिया, छत्तीसगढी या भाषांचे मिश्रण आढळून येते. त्याचबरोबर काही प्रमाणात हिंदी शब्दही प्रत्यय लावून बोलले जातात. या बोलीत 'ण' ऐवजी 'न' या वर्णाचा वापर केला जातो. 'व' चा उच्चार 'ब' असा होतो. वेळ - बेळ. 'ड' आणि 'ळ' चे 'र' मध्ये उच्चारण होते कपडा - कपरा, परा- पळा. या बोलीतील क्रियापदाची रूपे लिंगाप्रमाणे बदलत नाहीत.

३. अहिराणी बोली-

मराठी बोलीतील ही एक फार महत्त्वाची बोली आहे. खानदेश प्रदेशांमध्ये ही बोली बोलली जाते. अहिर लोकांची भाषा या नावावरून तिला अहिराणी असे म्हटले जाते. खानदेश प्रांतावरून तिला खानदेशी असेही म्हटले जाते. धुळे व जळगाव तसेच नाशिक जिल्ह्याचा सटाणा, मालेगाव आणि बऱ्हाणपूर या परिसरामध्ये ही बोली बोलली जाते. धुळे हे या बोलीचं प्रमुख केंद्र आहे. या भाषेवर गुजराती भाषेचा परिणाम आहे. काही ठिकाणी तर तिला गुजरातीची पोटभाषा म्हणून ओळखली जाते. अहिराणी बोलीत साधारणपणे निम्मे शब्द हे गुजराती शब्द असतात. असे असले तरीही सर्व उच्चार प्रक्रिया ही मराठीच्या प्रभाखालीच दिसून येते. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी या बोलीत विपुल प्रमाणात काव्य रचना केली आहे.

या बोलीत 'स' ऐवजी 'छ' उच्चारले जाते. सोडा - छोडा किंवा सावलीचे - छावलीचे. तसेच 'ल' 'ळ' याबद्दल 'य' उच्चारला जातो. डोळा - डोया, जळगाव - जयगाव. अहिराणीतील काही शब्द - डोचर (जखम), अंडर (मुलगा), झोऱ्या (सतरंजी), कावड (दार), शाक (भाजी), गावडी (गाय).

४. चंदगडी बोली -

चंदगडी बोली ही कोल्हापूर जिल्ह्यातील अतिशय दुर्गम चंदगड तालुक्यामध्ये आणि आजरा तालुक्याच्या दक्षिण भागातील काही गावांमध्ये बोलली जाते. चंदगडी बोलीमध्ये निर्माण झालेला शब्दसंग्रह, व्याकरण आणि ह्या बोलीचे वैशिष्ट्ये विशद करणारे अनेक संशोधन उपलब्ध आहेत. नंदकुमार मोरे यांनी विशेषतः या बोलीवर संशोधनाच्या माध्यमातून प्रकाश टाकलेला आहे. या परिसरामध्ये रणजीत देसाई सारखे लोकप्रिय लेखक जन्माला आले आणि 'बारी' सारखी कलाकृती या परिसरात राहून त्यांनी निर्माण केलेले आहे. त्याचबरोबर अलिकडच्या काळात डॉ. गोपाळ गावडे यांची 'उबळट' ही कलाकृती प्रसिद्ध आहे.

या बोलीतील काही विशेषणे ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उदाहरणार्थ, वयल्यअंगास (वरील बाजूस), खायलाअंगास (खालील बाजूस), तव्हंम्हेरेन (तेव्हापासून), बुरसा (घाणेरडा), कळखोचरा (भांडणे उकरून काढणारा) त्याचबरोबर या बोलीतील काही महत्त्वाचे वाक्प्रचार पुढील प्रमाणे- घुग्गी घालून बसणे - माघार घेणे, थुकलं तरी धुतलं - निर्लज्ज इ.

५. कोकणी बोली -

कोकणी बोलीचे दोन उपप्रकार पडतात. एक म्हणजे उत्तर कोकणी आणि दुसरी दक्षिण कोकणी. उत्तर कोकणी ही मराठीच्या जवळची बोली आहे. परंतु दक्षिण कोकणी मात्र मराठी पेक्षा बरीच वेगळ्या स्वरूपाची आहे. ती सहजासहजी कळत नाही. त्यामुळे काही भाषा अभ्यासकांनी या बोलीला स्वतंत्र भाषा मानावे असे म्हटले आहे. दक्षिण कोकणी या बोलीचे क्षेत्र राजापूर ते कारवार या पट्ट्यात ही बोली बोलली जाते. दक्षिण कोकणी बोलीत मराठीच्या प्रमाण भाषेपेक्षा प्राचीन मराठीचे अवशेष अधिक आहेत. या बोलीत कृष्णदास शामा (गद्य महाभारत), मनोहरराय सरदेसाई यांच्या कविता, जोआकिम सॅंटन अल्वारेस (ॲंजेल) कादंबरी प्रसिद्ध आहे.

कोकणी बोली मध्ये 'ॲं' आणि 'ऑ' हे स्वर मराठीतील 'ए' आणि 'ओ' असे उच्चारले जातात. तसेच या बोलीमध्ये 'बहीण' हा शब्द 'बोईण' आणि 'भाऊ' हा शब्द 'बाव' असा बदल करून उच्चारला जातो. या बोलीतील काही शब्द - भुरगे (लहान मूल), घीव (नवरा), कवट (अंडे), सुले (कुत्रा), उलावणा (संभाषण) असे वैशिष्ट्यपूर्ण शब्द पाहावयास मिळतात.

६. आदिवासी बोली -

महाराष्ट्रात एकूण ४५ आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. या प्रत्येक जमातीची स्वतंत्र अशी एक बोलीभाषा आहे. त्या अनुषंगाने विचार केल्यास फक्त आदिवासी जमातीच्या ४५ बोली आपणास पाहावयास मिळतील. परंतु

विषय विस्तार भयास्तव या ठिकाणी केवळ दोन ते तीन प्रमुख बोलींचा परिचय करून देण्यात आलेला आहे. त्यामध्ये मावळी बोली, डांगानी बोली आणि गोंडी बोली या तीन प्रमुख बोलींचा सविस्तर परिचय करून देण्यात आला आहे.

मावळीबोली ही आदिवासी महादेव कोळी जमातीची बोली आहे. ही बोली प्रामुख्याने पुणे जिल्ह्याच्या पश्चिम पट्ट्यात म्हणजे सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये बोलली जाते. मावळ, राजगुरुनगर, आंबेगाव, जुन्नर या तालुक्यांमध्ये ही बोली बोलली जाते. तर डांगानी बोली ही अहिल्यानगर जिल्ह्यात अकोले तालुका, संगमनेर तसेच नाशिक जिल्ह्यातील काही भागांमध्ये ही डांगानी बोली बोलली जाते. या दोन्हीही आदिवासी बोली मराठीच्या खूप जवळच्या आहेत. एकच जमातीमध्ये ही बोली बोलली जात असली तरी त्यामध्ये काही साम्य भेद असल्याचे आपल्या लक्षात येते.

मराठी भाषेत एकूण ५२ वर्ण आहेत. या पैकी मावळी बोलीत फक्त 'आ' 'इ' 'उ' या स्वरांचा उपयोग करतात. तर क् ख् ग् घ् च् ज् झ् ट् ठ् ड् ढ् त् थ् द् ध् न् प् फ् ब् भ् म् य् र् ल् व् श् स् ह् ळ् या व्यंजनाचा वापर केला जातो. क्ष् ज्ञ् या संयुक्त व्यंजनांचा वापर केला जात नाही. वापर न केलेल्या स्वरांच्या ऐवजी कंसातील स्वरांचा सदर बोलींमध्ये वापर केला जातो. अ (आ) उदाहरणार्थ अनुभव ऐवजी आनुभव. ई (इ, य) ईडलिंब ऐवजी इडलिंब किंवा आई ऐवजी आय. ऊ (उ) ऊस ऐवजी उस. ॠ (रु) ॠषी ऐवजी रुशी. ऌ (हा स्वर उच्चारला जात नाही) ए (य) एक ऐवजी यक. ॲ (या, आ) ॲपल ऐवजी यापल, आपल. ऐ (आइ, य) ऐकणे ऐवजी आइकने, ऐरण ऐवजी आयरन. ओ (व) ओढ ऐवजी वढ. ऑ (आ,वा) ऑस्ट्रेलिया ऐवजी आस्ट्रोलिया, ऑर्डर ऐवजी आडर किंवा ऑल ऐवजी वाल. औ (आव, आउ) औषध ऐवजी आवशाद किंवा औत ऐवजी आउत.

अशाच प्रकारे जी व्यंजने मावळी बोलीत उच्चारली जात नाहीत त्यांच्या ऐवजी इतर व्यंजने किंवा स्वराचा वापर केला जातो. उदाहरणार्थ, ड्. (या व्यंजनाचा वापर केला जात नाही) छ् (स) छत्री ऐवजी सत्री. ञ् (हे व्यंजन उच्चारले जात नाही) ण (न) पाणी ऐवजी पानी. ष् (श) ॠषी ऐवजी ॠशी .

विशेष म्हणजे संयुक्त व्यंजने या बोलीत वापरली जात नाहीत. त्या ऐवजी दुसरीच व्यंजने वापरली जातात. उदाहरणार्थ, क्ष् (श) क्षमा ऐवजी शमा. ज्ञ् (न्य) ज्ञानेश्वर ऐवजी न्यानेश्वर. विशेष म्हणजे या बोलीत काही वर्ण उच्चारली जातच नाहीत. या बोलींतील काही वाक्ये अशी -

मराठी - मी शेतातून आताच आलो.
मावळी - मी शँतातून नितकूच आलो.
डांगाणी - म्या शातातून नेटकूच आलू.
मराठी - माझ्याकडे दहा रुपये आहेत.
मावळी - माह्याकं दाहा रुपयं हायेत.
डांगाणी - महाकडं दा रुपयेहेत.

मावळी बोलीत डॉ. कृष्णा भवारी यांची 'इधोस' (कादंबरी) 'मातेरं' (कथासंग्रह), डॉ. मारुती आढळ यांचा 'वाघबारस' कथासंग्रह) प्रसिद्ध आहे. तर डांगानी बोलीत डॉ. संजय लोकरे यांचा 'राब' (कथासंग्रह) प्रसिद्ध आहे.

गोंडी बोली ही चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, नांदेड, अमरावती, अकोला, वर्धा, नागपूर आणि भंडारा या जिल्ह्यांमध्ये बोलली जाते. गोंड जमातीचे लोक जी भाषा बोलतात ती गोंडी बोली. ही बोली मराठी भाषेपासून खूप वेगळी आहे. अर्थात ह्या बोलीला एक स्वतंत्र अशी लिपी आहे. काही अभ्यासकांनी गोंडीला लिपी नसल्याचा आक्षेप घेतला आहे परंतु मोहनजोदारोत उपलब्ध झालेली चित्र लिपी ही गोंडी लिपी असल्याचे मत व्यंकटेश आत्राम यांनी मांडलेले आहे. या बोलीत उषाकिरण आत्राम, डॉ. विनायक तुमराम, कुसुम आलाम यांनी साहित्य निर्मिती केली आहे.

गोंडी बोलीतील काही शब्द पुढीलप्रमाणे मुरूंग (पश्चिम), कित्ता (पुस्तक), कांगोरी (संगीत), झल्लार (चांदी), भुज्जी (मांस). या व्यतिरिक्त या बोलीतील काही वाणगीदाखल वाक्यरचना अशी, निवो फरोल वेहा (तुझं नाव सांग), निमेंट बगा मंदातिट (तुम्ही कुठे राहता).

७. झाडीबोली -

झाडीबोलीचा आढळ मुकुंदराज यांनी रचलेला मराठीतील पहिला अध्यग्रंथ विवेक सिंधू यात होतो. तर याच काळात माहीम भटाने संपादित केलेल्या लीळाचरित्र या गद्यग्रंथात देखील या बोलीचा आजही अनेक शब्द आढळतात असे प्रतिपादन भारतीय भाषाचे लोक सर्वेक्षण या ग्रंथामध्ये आलेले आहे. ही बोली महाराष्ट्राच्या पूर्वेकडील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांच्या भूभागामध्ये आढळून येते. या बोलीवर डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी चांगल्या प्रकारे संशोधन केलेले आहे

वर्णमालेत या बोलीचं 'ऐ' आणि 'औ' हे स्वर नाहीत. तर त्याचे उच्चार अनुक्रमे 'अई' आणि 'अऊ' असे होतात. झाडीबोलीतील काही महत्त्वाचे शब्द- जरेजना (ताप येणे), फुपी (वडिलांची बहीण), लाखा (लाल), बुरुका (पहाट), टोंगरा (गुडघा). या बोलीतील वाक्प्रचार - अंटी मारना (व्यत्यय आणणे), लत लागना (छंद जडणे). म्हणी पुढीलप्रमाणे - अरगाई खेती परगाई मारा (सारे बिना भरवशाचे काम), उबा तवरिक सोबा (शीर सलामत तो पगडी पचास)

निष्कर्ष -

१. भाषा म्हणजे काय याची ओळख होते.

२. प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यातील फरक स्पष्ट होतो.

३. महाराष्ट्रातील विविध बोलींची माहिती होते.

४. विविध बोलीतील शब्दकळा, म्हणी, वाक्प्रचार आणि व्याकरण याविषयी माहिती होते.

५. वेगवेगळ्या बोलींवर भौगोलिक क्षेत्रानुसार कसा परिणाम झाला हे समजते.

६. विविध बोलींमुळे मराठी भाषा आणि साहित्यातील योगदान सिद्ध होते.

समारोप -

महाराष्ट्रातील विविध बोली या प्राचीनतम स्वरूपाच्या आहेत. अनेक बोलींचा उदय हा दहाव्या- अकराव्या शतकात झाल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्याचबरोबर दैनंदिन व्यवहारांमध्ये बोलीच्या स्वरूपात देवाण-घेवाण होत असल्यामुळे बोलींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मराठी साहित्यामध्ये जे साहित्य प्रवाह उदयास आले त्या साहित्य प्रवाहांमध्ये प्रामुख्याने बोलींचाच वापर झालेला आहे. त्यामुळे मराठी साहित्याची कक्षा विस्तृत करण्यास या बोलींचे योगदान फार मोलाचे आहे. आज मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला त्यामध्ये मराठी भाषा आणि तिच्या समृद्ध असलेल्या बोली ह्या महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ सूची -

१. गर्गे स.मा. (संपा.)- 'भारतीय समाजविज्ञान कोश,' खंड १ पुणे - १९८६, पृष्ठ २२६

२. अरुण जाखडे (संपा.) 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण,' पद्मगंधा प्रकाशन, पुणे . प्रथम आवृत्ती २०१३

३. सीताराम मंडले, 'कोयाबोली,' प्रकाशक : तिरु. सीताराम मंडाले, पुणे, द्वि. आ. २०११

.....

B.Aadhar International Refereed & Peer-Reviewed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXV) 565 -A
ISSN : 2278-9308 February 2026

लोकसाहित्य आणि अभिजात मराठी भाषा : आव्हाने व अपेक्षा

डॉ. संपतराव रामचंद्र पार्लेकर
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस
जि. सांगली.

संस्कृतीसंपन्न असणाऱ्या भारतासारख्या बहुभाषिक व बहुसांस्कृतिक देशात भाषांना केवळ संवादाचे माध्यम मानले जात नसून सांस्कृतिक देवाणघेवाण, स्मृतीजतन, परंपरा साठवण आणि लोकजीवनाचा आत्मा म्हणून त्यांना मानले जाते. या देशात अलिकडे काही भारतीय भाषांना अभिजात भाषा म्हणून दर्जा प्राप्त झालेला दिसतो. तो या भाषांची प्राचीनता, साहित्यिक परंपरा आणि शास्त्रीय मूल्यांवर आधारित दखल घेतली गेल्याने त्या अभिजात भाषा म्हणून गौरवास पात्र ठरल्या आहेत. त्यापैकीच मराठी ही एक अभिजात दर्जा प्राप्त झालेली भाषा असून तिच्यातल्या लिखित साहित्याइतकेच लोकसाहित्य समृद्ध आहे, ही गोष्ट आवर्जून विचारात घ्यावी लागेल. खरे तर अगदी प्राचीन काळापासून भारतात लोकसाहित्याची परंपरा अस्तित्वात असल्याने तिचे संकलन आणि संपादन सतत काही प्रमाणात होत आले आहे. या साहित्याचा अभ्यास सतराव्या शतकापासून होत आला असून या विज्ञान युगातही लोकसाहित्याची समृध्दता अनेक अभ्यासकांनी सिध्द केली आहे. आजच्या लोकभाषांसमोर वेगवेगळी अनेक आव्हाने उभी राहिली असताना अलिखित स्वरूपाच्या हे लोकसाहित्य याला अपवाद नाही. याप्रस्तुत शोधनिबंधात अभिजात भाषेच्या प्रभावामुळे लोकसाहित्याचे अस्तित्व, संवर्धन व भवितव्यापुढे निर्माण झालेल्या प्रश्नांचा अभ्यास करावयाचा आहे.

अभिजात भाषा संकल्पना व लोकसाहित्य :

अभिजात भाषा या संकल्पनेचा विचार होतो, तेव्हा ज्या भाषेला अत्यंत प्राचीन परंपरा असून तिची लिखित साहित्यपरंपरा समृद्ध आहे आणि भारत सरकारने ठरवून दिलेल्या निकषांनुसार तिची प्राचीनता, मौलिक साहित्यनिर्मिती, पिढ्यान्पिढ्या चालत आलेली परंपरा आणि स्वतंत्र व्याकरणीय रचना या आधारांवर कोणत्याही भाषेला अभिजात दर्जा दिला जातो. आजपर्यंत संस्कृत, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, ओडिया आणि मराठी अशा भारतीय समृद्ध भाषांना हा दर्जा दिला गेला आहे. त्यामुळे या भाषांची जबाबदारी पुन्हा वाढली आहे. अशा अभिजात भाषांना शासकीय संरक्षण, संशोधनासाठी निधी, विद्यापीठीय अभ्यासक्रम व इतरांच्या तुलनेत प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. परिणामी, या भाषांचा शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय स्तरावरचा प्रभाव वाढलेला दिसतो. असे असले तरी लोकसाहित्याचे स्थान अभिजात भाषेच्या प्रभाखाली कसे असणार आहे, हेही तितकेच महत्वाचे आहे. मुळात लोकसाहित्य संस्कृतीशी निगडीत असते, म्हणून संस्कृतीचा भाषेशी निगडीत असणारा संबंध जवळचा असतो, हे सांगताना डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी,।" माणसाच्या या अनुभूतीच्या प्रकटीकरणाचे माध्यम कलांच्या उगमामध्ये असून साहित्य हीसुद्धा एक कला आहे आणि या कलेचे माध्यम भाषा आहे" हे स्पष्ट केले आहे. तितकाच लोकसाहित्याचा आषेशी संबंध आहे, हे स्पष्ट होते. त्यात्या समूहातल्या भाषेतून लोकगीतातला लोकाविष्कार होत असतो. लोकसाहित्यातल्या मौखिक वाड्.मयाची परंपरा विचारात घेतली तर श्रमगीतातल्या कृतीतली एकरूपता श्रमाशी कशी निगडीत आहे, हे सांगताना प्रभाकर मांडे म्हणतात की, २ श्रम करताना मन कामाशी एकरूप होते, त्यावेळी तिथे विचार, भावना आणि कल्पना यांचे एकरूपत्व असते. तेंव्हा ही गीते गाताना भावावस्थेतील भावभावनांची अभिव्यक्ती लोकभाषेतून होते." यावरून लोकसाहित्यातील भाषेचे श्रेष्ठत्व समजते. मराठी या अभिजात भाषेतील परंपरा इथे लक्षात येते. सीयांच्या जात्यावरच्या ओव्या याही श्रमाशी निगडीत असल्याने अभिजात आषेला पूरक असलेले भाषेचे श्रेष्ठत्व इथेही लक्षात येते.

म्हणून लोकसाहित्याचे स्वरूप व महत्त्व समजून घेताना ते लोकांच्या मौखिक परंपरेतून पिढ्यान्पिढ्या जपले गेलेले साहित्य असते, हे सिध्द होते. लोककथा, लोकगीते, पोवाडे, भारुडे, ओव्या, म्हणी, व्रतविधी, कथकली, लावणी, शाहिरी रचना, प्रयोगरूप लोकनाट्यातील रचना या लोकसाहित्याच्या विविध प्रकारातील वेगळेपण भाषेच्या

पारंपरिकत्वाचे मोठेपण दाखवून देतात. हे साहित्य लिखित स्वरुपात नसले तरी समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक व भावनिक जीवनाचे प्रतिबिंब त्यातून उमटलेले दिसते.

एका अर्थाने लोकसाहित्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सामूहिक निर्मिती, लोकभाषेचा वापर, सहजता व जीवनाशी असलेली निकटता. ग्रामीण व वंचित समाजाचा आवाज म्हणून लोकसाहित्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. तर आपल्याकडे लोकसाहित्याचा प्रचंड खजिणा असलेला दिसतो, पण त्या प्रमाणात आपण जागृक नाही, असे म्हणण्यास पुष्कळ वाव आहे. डॉ. इरावती कर्वे, सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत, डॉ. गंगाधर मोरजे, प्रभाकर मांडे, डॉ. द.ता. भोसले, डॉ. विश्वनाथ शिंदे यासारखी मोजक्या नावानी या लोकसाहित्याचा अभ्यास आणि संकलन या संदर्भात खूप काम केले आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी 'लोकसाहित्य' हा शब्द प्रथम वापरला आणि त्यानंतर डॉ. सरोजिनी बाबर, रा.चिं. ढेरे, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. गंगाधर मोरजे या अभ्यासकांनी लोकसाहित्याला बैठक देऊन त्याचे स्वरूप आणि अंतरंग ठरवण्याचे काम केले, हे कितीतरी कौतुकास्पद आहे.

विशेषतः लोकसाहित्यातील लोककलांचा विचार करताना भाषा, कला आणि संस्कृती या गोष्टी मानवी जीवन समृद्ध करणाऱ्या आहेत, हे स्पष्ट होते. लोकवाङ्मयात लोककलांना खूप महत्त्वाचे स्थान असून व्यक्तिगत आणि समूह मनाचा आविष्कार लोकनृत्य आणि लोकनाट्यातून सतत होताना दिसतो. तेव्हा या लोककलांना प्रयोगसिद्ध लोककला असेही म्हटले जाते. विविध देवदेवतांच्या उपासना या संदर्भात गोंधळ, जागरण, भारुड, आराधी, भुते, जोगत्यांचे खेळ, नमन खेळ, दशावतार, कीर्तननृत्य या गोष्टींचा अंतर्भाव यात होतो. तर लोकनाट्यात तमाशातील लावणी, फडावरचे नाच, शिमग्याची सोंगे, लळिताचे सादरीकरण या गोष्टींचा समावेश होतो. डॉ. प्रभाकर मांडे यांनी मौखिक वाड. मयाची परंपरा या ग्रंथात त्यांचे स्वरूप आणि भवितव्य स्पष्ट करताना श्रमगीते, ओवी, ध्वनीगीते, बालगीते, बडबडगीते, विधीगीते, स्त्रियांची खेळगाणी व त्यांच्या कथागीतांची परंपरा, कानबाईच्या गाण्यांची परंपरा, इनामाय, चक्रपूजा यांच्या परंपरा, धनगरी आणि मातंगांच्या परंपरा, गिरिवनातील जनजातींची परंपरा, तडवी भिल्ल, भविष्यकथन यांच्या परंपरा, म्हणी, उखाणे आणि वाक्यप्रचार यांच्या मौखिक परंपरा यांची सविस्तर मांडणी या ग्रंथात केली आहे. तसेच अलिकडे डॉ. प्रकाश खांडगे यांनी संपादित केलेला 'शिव-शक्ती संप्रदायाची लोक-गान परंपरा' हा ग्रंथ कलगी-तुरा या भेदिक शाहिरीवरचे सखोल विवेचन आणि संकलन आहे. त्यांचे लोकसाहित्यातील हे काम खूप मोठे आहे, असे वाटते. शिव-शक्तीच्या कलगी-तुऱ्याची ही परंपरा सांगताना डॉ. प्रकाश खांडगे म्हणतात की, "एकमेकांना पेचात पकडण्यासाठी सवाल-जबाबचा सामना या संप्रदयात रंगतो. या आपापसातील सामन्यातूनच कलगी-तुऱ्याची परंपरा महाराष्ट्रात रूढ आहे. यातूनच तमाशातील सवाल-अबाबतची परंपरा प्रत्यक्षात सुरू झाली. कलगी-तुऱ्याची ही परंपरा तशी देशभरात आहे." म्हणजे संपूर्ण देशातल्या लोकसाहित्याइतकेच महाराष्ट्रातील लोकसाहित्य प्रभावी आहे, हे इथे स्पष्ट होते. म्हणून अभिजात भाषेचा विचार करताना वरील लोप पावत चाललेल्या लोकगितांच्या परंपरा आणि लोककलांचे बदलते स्वरूप या बाबतील काय करता येईल, हे ठरविणे अपेक्षित आहे.

लोकसाहित्याची सद्यस्थिती आणि अभ्यासाची दिशा:

एकविसाव्या शतकातील ग्लोबलायझेशनच्या आणि समग्र अतिप्रगत मांडल्या जाणाऱ्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात लोकसाहित्याचे भवितव्य काय ? हा प्रश्न सातत्याने चर्चेला येत आहे. माहिती तंत्रज्ञानातील प्रसाराची माध्यमे आणि अतिप्रगत इलेक्ट्रॉनिक साधने, नाहीशी होणारे समूहमन आणि स्पर्धेमुळे मानवी संबंधात येणारी दरी या पार्श्वभूमीवर लोकसाहित्यासंबंधी काय करता येईल, हा विचार येथे अपेक्षित आहे.

१) आज-काल लोकसाहित्य हा शब्द बऱ्याच प्रमाणात रुळलेला असताना त्याचा निश्चित ठाव अद्यापही लागत नाही, हे तितकेच खरे आहे. दुसरीकडे लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने नवीन काही होताना दिसत नाही. पूर्वी डॉ. प्रभाकर मांडे हे 'लोकधाटी' नावाचे नियतकालिक चालवत होते तसे आता एकही नियतकालिक नाही. तर महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती पूर्वी सक्रिय अस्तित्वात होती. अलिकडे तिचे पुनरुज्जीवन झाले असले तरी त्याचे काम कितपत चालते हे पहावे लागेल.

२) लोकसाहित्याच्या संदर्भात शैक्षणिक व्यवस्थेतील उपेक्षा पाहताना अभिजात भाषांना अभ्यासक्रमात प्राधान्य दिले जात असताना लोकसाहित्याला दुय्यम स्थान दिले जाते हे वास्तव आहे. शाळा-महाविद्यालयीन अभ्यासक्रमात लोकसाहित्याचा समावेश मर्यादित असल्यामुळे नव्या पिढीला त्याची ओळख होत नाही. त्यामुळे संस्कृती जतन होण्यास मर्यादा येत आहेत.

३) लोकसाहित्याचे संकलन, संपादन आणि अभ्यास करण्यासंदर्भात संजय बोरुडे यांनी,

४) लोकसाहित्याविषयीच्या अडचणी सोडवण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना, सापडलेल्या साहित्याचे वर्गीकरण आणि त्याचे विश्लेषण यांचा वेध घेणे, त्यांची मांडणी करणे अशा स्वरूपाची दिशा आता ठरवणे गरजेचे आहे." असे सांगितले आहे.

५) लोकसाहित्याचे लेखन, ध्वनिमुद्रण आणि चित्रिकरण होणे अपेक्षित आहे. जसे की, अभिजात भाषेतील साहित्याची रचना व मांडणी प्रामुख्याने लिखित स्वरुपात उपलब्ध असल्यामुळे त्याचे जतन करणे सुलभ होते. याउलट लोकसाहित्य है मौखिक परंपरेतील असल्याने काळाच्या ओघात ते लोप पावण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे त्याला लिखित स्वरूप देण्याचा प्रयत्न कित्येक वर्षापासून होत आहे. आता डिजिटल युगात लोकसाहित्यातील लोककथा, लोकगीते, लोकनृत्ये, लोककला यांचे ध्वनिमुद्रण, चित्रिकरण होणे खूप गरजेचे आहे.

६) अभिजात मराठी भाषेच्या दृष्टिकोणातून लोकसाहित्याच्या संशोधन पध्दतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. यामुळे लोकसाहित्याचा स्वतंत्र, तटस्थपूर्वक अभ्यास होऊन निष्कर्षांच्या आधारे त्यांच्या प्रयोजनांचे किंवा सिद्धांतांचे पोषण होईल. याबाबत अनिल सहस्रबुध्दे सांगतात की, ५ आज अनेक अभ्यासक कुतूहलपूर्वक लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे आकर्षित होत आहेत. या अभ्यासकांना निश्चित दिशा मिळेल आणि विद्यापीठ स्तरावर भाषा व साहित्य शाखांतर्गत लोकसाहित्याचे संशोधन करण्यासाठी अनेक विद्यार्थी प्रवृत्त होतात, तेव्हा त्यांना मार्गदर्शन मिळेल."

७) आज लोकसाहित्याबाबत शासकीय धोरणांचा असमतोल असलेला दिसतो. भाषा संवर्धनाच्या शासकीय धोरणांमध्ये अभिजात भाषांवर अधिक भर दिला जातो. लोकभाषा व लोकसाहित्याच्या संकलन, संशोधन आणि प्रसारासाठी तुलनेने कमी निधी व योजना उपलब्ध आहेत. त्यामुळे लोकसंख्येचे संवर्धन आणि जतन कसे होणार हा खरा प्रश्न आहे. अभिजात मराठी भाषा असतात वरील गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

८) जागतिकीकरणातील वाढत्या शहरीकरणाचा व माध्यमांचा प्रभाव ग्रामीण जीवनशैलीवर होत असल्याने लोकसाहित्यातील सर्वच प्रकारात बदल होत आहेत. लोकसाहित्याचे पारंपरिक संदर्भ, सण-उत्सव आणि सामाजिक रचना बदलत असल्याने लोकसाहित्यावरही त्याचा परिणाम होऊन त्याच्या निर्मितीची नैसर्गिक प्रक्रिया खंडित होत आहे, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

९) आता अभिजात भाषा म्हणजेच उच्च दर्जाची असा समज मनात निर्माण होऊन त्यात लोकभाषा म्हणजे कमी दर्जाची अशी मानसिकता समाजात निर्माण होताना दिसते. यामुळे लोकसाहित्याकडे दुर्लक्ष होताना दिसते, हे लक्षात घेऊन त्यावर उपाय योजना करणे गरजेचे आहे.

१०) लोकसाहित्याचे महत्त्व अधोरेखित करण्याची गरज आता निर्माण झाली आहे. लोकसाहित्य हे केवळ करमणुकीचे साधन नसून समाजाचा वास्तव इतिहास, लोकधर्म, लोकनीती आणि लोकमानस यांचे जिवंत दस्तऐवज आहे, हे मान्य करायला हवे. अभिजात भाषेच्या समृद्धीबरोबरच लोकसाहित्याचे जतन झाले नाही, तर सांस्कृतिक विविधतेला धोका निर्माण होऊ शकतो, हे लक्षात घ्यायला हवे.

११) लोकसाहित्याविषयी सद्यस्थितीत काही अपेक्षा आहेत. त्यात लोकसाहित्याचे दस्तऐवजीकरण करणे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने लोककथा, लोकगीतांचे ध्वनी-चित्रमुद्रण करून त्यांचे संग्रह तयार करणे. तसेच शालेय व उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात लोकसाहित्याला स्वतंत्र स्थान देणे. लोकसाहित्य संशोधनासाठी शासन पातळीवर विशेष निधी उपलब्ध करून देणे व संशोधनासाठी प्रोत्साहन देणे. तसेच डिजिटल माध्यमांचा वापर करून डिजिटल संग्रहालये, संकेतस्थळे आणि समाजमाध्यमांच्या माध्यमातून लोकसाहित्याचा प्रसार करणे. त्याच बरोबर अभिजात भाषा व लोकसाहित्य यांच्यात समन्वयाची भूमिका असणे संघर्ष न करता परस्परपूरक दृष्टिकोन स्वीकारणे, हे खूप महत्त्वाचे आहे.

निष्कर्ष

गेल्या कित्येक वर्षापासून लोकसाहित्यासमोर उभ्या असलेल्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर अभिजात भाषांचा गौरव हा निश्चितच अभिमानास्पद असला तरी त्याचवेळी लोकसाहित्याचे अस्तित्व, संवर्धन व विकास याकडे दुर्लक्ष होता कामा नये. लोकसाहित्याशिवाय अभिजात भाषेची सांस्कृतिक मुळे अपूर्ण राहतात, हे मात्र निश्चित आहे. म्हणूनच अभिजात भाषेत लोकसाहित्याला महत्व देऊन भारतीय सांस्कृतिक परंपरेचे सर्वांगीण जतन शक्य होणार आहे, असे वाटते.

समारोप

सद्य स्थितीत मराठीला अभिजात भाषा म्हणून मिळालेली प्रतिष्ठा या पार्श्वभूमीवर लोकसाहित्यासमोर जी आव्हाने उभी राहिली आहेत, त्यांचा अभ्यास इथे करण्यात आला आहे. या अभिजात भाषेची प्राचीनता, भाषिक समृद्धता आणि लिखित साहित्यपरंपरा विचारात घेतली, तर या भाषेला शासकीय आणि शैक्षणिक पातळीवर विशेष मान्यता प्राप्त झाली आहे. तितकेच या मराठी भाषेतील मौखिक वाङ्मयाची परंपरा समृध्द असून तिचे जतन व संवर्धनास अनेक अडचणी आजपर्यंत आल्या आहेत. तर या लोकसाहित्याबाबत शैक्षणिक उपेक्षा, शासकीय धोरणांचा असमतोल, नागरीकरणाचा प्रभाव आणि अभिजाततेची मानसिकता ही त्याच्या हासाची प्रमुख कारणे ठरत आहेत. खरे तर लोकसाहित्य हे समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीचे जिवंत भांडार असल्याने त्याचे दस्तऐवजीकरण, अभ्यासक्रमात समावेश आणि डिजिटल माध्यमांतून प्रसार करणे अत्यावश्यक ठरत आहे. अभिजात भाषेतील लिखित साहित्य व लोकसाहित्य यांच्यात वेगळेपणा न आणता या दोन्हींचे मोठेपण विचारात घेतले तर इतर प्रादेशिक भाषेइतकेच मराठीचे मोठेपण आणखी वाढेल. तसेच आता भारतीय सांस्कृतिक परंपरेचे सर्वांगीण जतन करणे शक्य आहे, हे विसरता कामा नये.

दुसरे असे की, अभिजात भाषांचा दर्जा हा भाषिक परंपरेचा गौरव असला तरी त्याच्या आड लोकसाहित्य दुर्लक्षित होणे, हे सांस्कृतिकदृष्ट्या धोकादायक आहे. मुख्य म्हणजे लोकसाहित्य हे अभिजात साहित्याचे मूळ प्रेरणास्थान असून दोन्ही परंपरा परस्परपूरक आहेत. म्हणूनच लोकसाहित्याच्या संवर्धनासाठी शैक्षणिक, शासकीय आणि सामाजिक पातळीवर संयुक्त प्रयत्नांची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून लोकसाहित्याचे संरक्षण व प्रसार केल्यास भारतीय भाषिक-सांस्कृतिक वैविध्य टिकून राहील. अशा या समन्वयातूनच अभिजात भाषा आणि लोकसाहित्य यांचे उज्ज्वल भवितव्य घडू शकेल हे मात्र निश्चित.

संदर्भ:

१. लुलेकर प्रल्हाद साहित्याचे सांस्कृतिक, संचित- कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृती- २००५, पृष्ठ. २९

२. मांडे प्रभाकर मौखिक वाइ, मयाची परंपरा-स्वरूप आणि भवितव्य गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद. प्रथामावृती २०१०. पृष्ठ ३

३. खांडगे प्रकाश शिव-शक्ती संप्रदायाची लोक-गान परंपरा (संपादन) प्रकाशन-महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती २०२५, पृष्ठ ९३

४. बोरुडे संजय लोकगंगा (लोकसाहित्य दिशाआणि वाटचाल) संपादक-डॉ धोंडीराम वाडकर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१९, पृष्ठ १५५

५. सहस्त्रबुद्ध अनिल लोकसाहित्य संशोधन पद्धती, नितीन प्रकाशन, पुणे, नवीन आवृत्ती २०१३, पृष्ठ ९

अभिजात भाषा आणि साहित्य:भूत, वर्तमान आणि भविष्य

डॉ. प्रवीण सुभाष ससाणे
अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर,
पुणे-४११०२८
prvnsasa@gmail.com 9527678251

गोषवारा

भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती मानवी संस्कृतीचा आणि समाजाचा आरसा असते. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला केंद्र सरकारकडून प्राप्त झालेला 'अभिजात दर्जा' ही मराठी साहित्याच्या इतिहासातील एक क्रांतिकारी घटना आहे. या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश मराठी भाषेचे स्वरूप, तिचा अडीच हजार वर्षांचा ऐतिहासिक प्रवास, अभिजात दर्जाचे महत्त्व आणि २०२६ मधील तिची वर्तमान स्थिती यांचा सखोल आढावा घेणे हा आहे. तसेच, जागतिकीकरणाच्या युगात मराठी भाषेसमोर असलेल्या संधी आणि आव्हाने यांचे विश्लेषण करणे, हा या अभ्यासाचा गाभा आहे.

१. प्रस्तावना

भाषा हे मानवी विचारांच्या देवाणघेवाणीचे प्रमुख साधन आहे, परंतु तिची व्याप्ती केवळ संवादापुरती मर्यादित नाही. भाषा ही एक सामाजिक संस्था आहे, जी समाजाकडून निर्माण होते आणि सामाजिक गरजांनुसार विकसित होत असते. कोणत्याही समाजाची ओळख, संस्कृती आणि इतिहास त्या समाजाच्या भाषेत साठवलेला असतो.

मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ रोजी भारत सरकारने अधिकृतपणे 'अभिजात भाषेचा' दर्जा बहाल केला. या निर्णयामुळे मराठीच्या प्राचीनतेवर आणि समृद्ध साहित्यावर जागतिक मोहोर उमटवली गेली आहे. २०२६ च्या वर्तमान काळात या निर्णयाचे दूरगामी परिणाम मराठी साहित्य आणि समाजजीवनावर होताना दिसत आहेत. या शोधनिबंधात आपण भाषेच्या समाजभाषाशास्त्रीय अंगापासून ते तिच्या भविष्यातील वाटचालीपर्यंतचा चिकित्सक अभ्यास करणार आहोत.

२. भाषेचे स्वरूप आणि समाजभाषाशास्त्रीय विश्लेषण

भाषेचा अभ्यास करताना तिचे स्वरूप आणि समाजाशी असलेले नाते समजून घेणे क्रमप्राप्त ठरते.

२.१ भाषेची प्रवाही आणि परिवर्तनशील वैशिष्ट्ये भाषा ही नदीच्या प्रवाहाप्रमाणे असते. ती स्थिर नसून काळानुसार बदलत जाणारी आणि नवनवीन शब्द आत्मसात करणारी एक प्रवाही व्यवस्था आहे. भाषेत परिवर्तनशीलता हा स्थायीभाव असतो. जुन्या शब्दांची जागा नवीन शब्द घेतात, आणि ही प्रक्रिया निरंतर सुरू असते. उदाहरणार्थ, शिवकालीन मराठी आणि आजची संगणक युगातील मराठी यात मोठा फरक आहे, जो समाजातील बदलांचे प्रतिबिंब आहे.

२.२ भाषा आणि सामाजिक स्तरीकरण समाजभाषाशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास, भाषा आणि समाज यांचा संबंध अतूट आहे. भाषेवरून त्या समाजाची सामाजिक रचना, वर्ग आणि दर्जा स्पष्ट होतो. एखाद्या व्यक्तीच्या बोलण्याच्या ढबीवरून किंवा शब्द निवडीवरून तिचा सामाजिक स्तर आणि शिक्षण ओळखता येते. मराठी भाषेचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे त्यातील 'आदराची श्रेणी'. 'तू', 'तुम्ही' आणि 'आपण' यांसारख्या सर्वनामांचा वापर केवळ व्याकरणिक नसून तो समाजातील नात्यांची वीण आणि परस्परांबद्दलचा आदर दर्शवतो.

२.३ प्रादेशिक विविधता भाषा भौगोलिक विस्तारानुसार आपले रूप बदलते. अहिराणी, कोकणी, वऱ्हाडी यांसारख्या बोलीभाषा त्या-त्या प्रदेशातील लोकजीवन आणि संस्कृतीचे दर्शन घडवतात. प्रमाण भाषेला समृद्ध करण्यासाठी या बोलीभाषांचा मोठा वाटा असतो.

३. अभिजात दर्जा: निकष आणि ऐतिहासिक पुराव्यांचे विश्लेषण

एखाद्या भाषेला 'अभिजात' दर्जा मिळणे ही सोपी प्रक्रिया नाही. केंद्र सरकारने यासाठी अत्यंत कडक निकष निश्चित केले आहेत, ज्यामध्ये मराठी भाषा पूर्णपणे पात्र ठरली आहे.

३.१ अभिजाततेचे निकष अभिजात भाषेसाठी मुख्यत्वे चार निकष लावले जातात:

१. प्राचीनता: भाषेचा इतिहास दीड ते अडीच हजार वर्षे जुना असावा.

२. साहित्यिक वारसा: प्राचीन साहित्य हे त्या भाषिकांच्या पिढ्यांनी मौल्यवान वारसा म्हणून जपलेले असावे.

३. स्वयंभूपण: भाषेची साहित्यिक परंपरा मौलिक असावी, ती उसने घेतलेली नसावी.

४. सलगता: प्राचीन रूप आणि आधुनिक रूप यात सलगता असावी.

३.२ मराठीच्या प्राचीनतेचे पुरावे (अडीच हजार वर्षांचा इतिहास)

मराठी भाषेचे वय २५०० वर्षांहून अधिक असल्याचे सिद्ध करण्यासाठी खालील ऐतिहासिक पुरावे निर्णायक ठरले आहेत:

नाणेघाट शिलालेख: जुन्नर येथील नाणेघाटातील शिलालेख (सुमारे २२०० ते २५०० वर्षे जुना) हा मराठीच्या लिखित अस्तित्वाचा सर्वात भक्कम आणि प्राचीन पुरावा आहे. यात 'महाराठिनो' या शब्दाचा स्पष्ट उल्लेख आढळतो. **गाथासप्तशती:** सातवाहन राजा हाल याने सुमारे २००० वर्षांपूर्वी संकलित केलेला 'गाथासप्तशती' हा ७०० कवितांचा संग्रह आहे. हा ग्रंथ 'महाराष्ट्री प्राकृत' भाषेत असून, जे मराठीचे मूळ रूप मानले जाते. हा ग्रंथ हे सिद्ध करतो की, दोन हजार वर्षांपूर्वीच मराठी (प्राकृत) ही केवळ बोलीभाषा नसून ती उत्कृष्ट साहित्य निर्मितीची भाषा होती. ताम्रपट आणि शिलालेख: इसवी सन ७३९ मधील सातारा ताम्रपट आणि १०१२ मधील अक्षी शिलालेख हे मराठी भाषेच्या विकासाचे महत्त्वाचे टप्पे आहेत.

४. मराठी साहित्याची जडणघडण: एक सिंहावलोकन

मराठी साहित्याचा प्रवास हा 'प्राकृत' ते आधुनिक 'मराठी' असा झाला आहे. या प्रवासात विविध कालखंडांनी आणि विचारधारेने साहित्याला समृद्ध केले आहे.

४.१ मध्ययुगीन साहित्याचे योगदान

अभिजात मराठीच्या जडणघडणीत मध्ययुगीन काळातील दोन प्रमुख पंथांचे योगदान अमूल्य आहे:

महानुभाव पंथ: चक्रधर स्वामींनी स्थापन केलेल्या या पंथाने मराठीला पहिला चरित्रग्रंथ 'लीळाचरित्र' दिला. त्यांनी संस्कृतचा मोह त्यागून लोकभाषेत (मराठीत) तत्वज्ञान मांडले. **वारकरी संप्रदाय:** संत ज्ञानेश्वरांनी १२९० मध्ये 'ज्ञानेश्वरी' लिहून मराठी साहित्याचा पाया रचला. गीतेसारखा अवघड तत्त्वज्ञान ग्रंथ त्यांनी सर्वसामान्यांच्या मराठीत आणला. संत नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांच्या साहित्याने भाषेला समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवले.

४.२ ऐतिहासिक आणि प्रशासकीय साहित्य मराठी साहित्य केवळ भक्तीपुरते मर्यादित राहिले नाही. शिवकाळात आणि पेशवेकाळात बखर साहित्य आणि पोवाडे यांच्या माध्यमातून इतिहास लेखनाची परंपरा सुरू झाली. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात 'राज्यव्यवहार कोश' तयार करून परकीय शब्दांचे मराठीकरण करण्यात आले, ज्यामुळे भाषेला एक राजकीय आणि प्रशासकीय प्रतिष्ठा प्राप्त झाली.

५. २०२६ मधील वर्तमान स्थिती: अभिजात दर्जाचे फलित

३ ऑक्टोबर २०२४ च्या ऐतिहासिक निर्णयानंतर, २०२६ मध्ये मराठी भाषेच्या स्थितीत आमूलाग्र सकारात्मक बदल दिसून येत आहेत. अभिजात दर्जा मिळाल्याचे फायदे आता प्रत्यक्ष जमिनीवर दिसत आहेत.

५.१ आर्थिक तरतूद आणि संस्थात्मक उभारणी अभिजात दर्जा मिळाल्यामुळे केंद्र सरकारकडून मराठीच्या संवर्धनासाठी आणि संशोधनासाठी भरीव आर्थिक अनुदान प्राप्त होत आहे. २०२६ मध्ये, भाषेच्या सखोल अभ्यासासाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' ची स्थापना करण्यात आली असून, तिथे वेगाने संशोधन कार्य सुरू आहे.

५.२ डिजिटलीकरण आणि जागतिक पोहोच सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात, प्राचीन हस्तलिखिते आणि ग्रंथांचे जतन करण्यासाठी मोठे डिजिटलीकरण अभियान राबवले जात आहे. 'गाथासप्तशती'पासून ते आधुनिक साहित्यापर्यंतचे ग्रंथ आता ई-बुक्स स्वरूपात जगाला उपलब्ध झाले आहेत. तसेच, अनुवाद प्रकल्पांतर्गत मराठी साहित्याचे इंग्रजी, फ्रेंच आणि इतर भारतीय भाषांमध्ये अनुवाद होत असल्याने मराठी साहित्याला 'ग्लोबल' ओळख मिळत आहे.

५.३ शैक्षणिक आणि रोजगाराच्या संधी २०२५-२६ च्या शैक्षणिक धोरणानुसार, महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्राची (मराठी, हिंदी, इंग्रजी) प्रभावी अंमलबजावणी होत असून, शालेय शिक्षणात मराठीला अनिवार्य स्थान मिळाले आहे. तसेच, केंद्रीय विद्यापीठांमध्ये मराठीसाठी विशेष 'अध्यासन' सुरू करण्यात आल्याने संशोधक आणि प्राध्यापकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. भाषेतील योगदानासाठी दोन मोठे आंतरराष्ट्रीय पुरस्कार सुरू झाल्याने विद्वानांचा गौरव होत आहे.

६. भविष्यवेध: संधी आणि आव्हाने

मराठीला राजाश्रय (अभिजात दर्जा) मिळाला असला, तरी लोकाश्रय टिकवून ठेवणे आणि भविष्यातील आव्हानांचा सामना करणे अत्यंत गरजेचे आहे.

६.१ **भविष्यातील संधी** मराठी भाषा आता केवळ साहित्याची भाषा न राहता ती 'नॉलेज लँग्वेज' म्हणून विकसित होण्याची क्षमता बाळगून आहे. अनुवाद, संग्रहण आणि प्रकाशन व्यवसायात २०२६ आणि त्यापुढील काळात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे.

६.२ **प्रमुख आव्हाने** इंग्रजीचा वाढता प्रभाव: जागतिकीकरणामुळे उच्च शिक्षण, कॉर्पोरेट जग आणि तंत्रज्ञान क्षेत्रात इंग्रजीचे वर्चस्व आहे. अशा वेळी ज्ञानभाषा म्हणून मराठीचा वापर वाढवणे हे मोठे आव्हान आहे. बोलीभाषांचे अस्तित्व: प्रमाण मराठीच्या विकासात बोलीभाषांचे (अहिराणी, वऱ्हाडी, इ.) महत्त्व अनन्यसाधारण आहे. परंतु शहरीकरणामुळे या बोलीभाषा लोप पावण्याची भीती आहे, ज्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे.

युवा पिढीची मानसिकता: तरुण पिढीमध्ये मराठी वाचनाची आवड कमी होत आहे. त्यांना मराठीशी जोडून ठेवण्यासाठी दर्जेदार डिजिटल आशय निर्माण करणे गरजेचे आहे.

७. निष्कर्ष

मराठी भाषेचा २,५०० वर्षांचा प्रवास हा संघर्षाचा आणि वैभवाचा आहे. सातवाहनांच्या 'गाथासप्तशती'पासून ते २०२६ च्या 'डिजिटल मराठी'पर्यंतचा हा टप्पा थक्क करणारा आहे. अभिजात दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेला एक भक्कम कायदेशीर आणि आर्थिक आधार मिळाला आहे. केंद्र आणि राज्य सरकारचे प्रयत्न , संशोधनासाठी मिळणारा निधी आणि डिजिटलीकरणाचे प्रकल्प हे भाषेच्या उज्ज्वल भविष्याचे संकेत आहेत.

तथापि, भाषा ही शेवटी समाजात जिवंत असते. केवळ सरकारी पुरस्कार किंवा दर्जा भाषेला वाचवू शकत नाही. त्यासाठी, दैनंदिन व्यवहारात, तंत्रज्ञानात आणि नवीन पिढीच्या जडणघडणीत मराठीचा वापर करणे अपरिहार्य आहे. भाषा हा समाजाचा आरसा आहे, आणि हा आरसा स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आता प्रत्येक मराठी भाषिकावर आहे.

संदर्भ सूची

१. डॉ. शं. गो. तुळपुळे, "मराठी भाषेचा इतिहास", कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९९६.

२. रंगनाथ पठारे आणि समिती सदस्य, "अभिजात मराठी भाषेच्या संदर्भातील अहवाल", महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१३.

३. डॉ. रा. श्री. वाळिंबे, "मराठी साहित्याचा इतिहास (मध्ययुगीन खंड)", प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००५.

४. डॉ. ब्रह्मानंद देशपांडे, "मराठी भाषेचे प्राचीनत्व आणि शिलालेख", वरद प्रकाशन, पुणे, २०१५.

५. डॉ. गजानन चव्हाण, "समाजभाषाविज्ञान: स्वरूप आणि व्याप्ती", स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१२.

६. डॉ. अशोक केळकर, "मराठी भाषेचा अभ्यास", नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९८०.

७. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, "मराठी साहित्य: परंपरा आणि नवता", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०१०.

आदिवासी आत्मकथने : ऐतिहासिक आढावा

प्रा. श्री. यशवंत ढवळा भांडकोळी
प्रमख, मराठी विभाग,
शेठ ज. नौ. पालीवाला वाणिज्य महाविद्यालय, विज्ञान आणि कला महाविद्यालय पाली,
ता. सुधागड, जि. रायगड – ४१० २०५.
मो. नंबर – ९०६७९९५६५९/९४२०९६४६७२ ई – मेल - ydbhandkoli@gmail.com

प्रस्तावना -

आदिवासी समाज हा आदिम काळापासून दूर डोंगरऱ्यात राहणारा समाज आहे. त्यामुळे तो नागर समाजापासून कायमच दूर राहिला आहे. आदिवासी आजही अनेक मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित आहे. त्यामुळे त्यांना दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना तोंड देत जगावे लागते. म्हणूनच शिक्षणाच्या प्रवाहात तो उशिराच आला. असे असले तरी अभिजात साहित्याचा निर्माता आदिवासी समाज आहे. कारण साहित्याचे निर्मितीचे मूळ आदिवासी साहित्य हेच आहे, आदिवासी विश्व साहित्याचा निर्माता आदिवासी आहे. या संदर्भात आदिवासी साहित्याचे जेष्ठ अभ्यासक डॉ. तुकाराम रोंगटे म्हणतात, "आदिवासींच्या अभिजात जनसाहित्याचा विशेषत: आदिवासींच्या लोककथा, लोकगीते, जानपदगीते, गुराखीगीते, देवदेवतांच्या, मनुष्यप्राण्यांच्या उत्पत्ती आणि जन्म - मरणाच्या कथा, जनव्यवहाराचे वाद - संवाद, घात - प्रघात, बोलण्या - चालण्याचे आडाखे, म्हणी आणि वाक्प्रचार हा आदिवासी साहित्याचा आद्य प्रकार म्हणता येतो."[१]

आदिवासी समाजा इतकेच त्यांच्या साहित्याच्या प्रेरणाही प्राचीन आहेत. त्या स्वयंभू, स्वतंत्र, आणि स्वयंसिद्ध आहेत. आदिवासी साहित्य कोणत्याही साहित्यकृतींचे अनुकरण नाही. प्रस्थापित समाजाने आतापर्यंत त्यांचे जे शोषण केले. त्याचे वास्तव त्यांच्या कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मकथने इत्यादी साहित्य प्रकारांतून आले आहे.

आदिवासीएतर लेखकांनी आदिवासी समाजजीवनाचे चित्रण आपल्या आत्मचरित्रांमधून फार दुर्मिळपणे केले आहे. हे लेखन आपले जीवनानुभव मांडताना त्यांना जे आदिवासींबद्दल अनुभवास आले ते त्यांनी चित्रित केले आहेत. मात्र अस्सल आदिवासी जीवन जगण्याचा अनुभव नसल्याने ते वास्तवतेच्या पातळीवर उत्तरले नाही. म्हणून त्यांचे लेखन बेगडी स्वरूपाचे, कल्पनारम्य असल्याचे सुशिक्षित आदिवासींच्या पहिल्या पिढीचे लक्षात आले. त्यांची ही आत्मकथने वाचून ते अस्वस्थ झाले. म्हणून आदिवासी लेखकांनी आपण जे जगलो, जे भोगले, ते आपल्या आत्मकथनांमधून मांडायला सुरुवात केली. म्हणून आदिवासी आत्मकथने इतर प्रस्थापित समाजातील लेखकांची आत्मचरित्रे आदिवासी जीवन जाणीवांच्या खोलात जात नाहीत. त्यामुळे आदिवासी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. संजय लोहकरे म्हणतात, "आदिवासी आत्मकथनात समूहजीवन, सहकार्य, श्रम प्रतिष्ठा, स्त्री - पुरुष समानता, नृत्य – नाछय - संगीत परंपरा, निसर्ग धारणा, धर्मनिरपेक्षता, आनंद, सहजीवन, बोली परंपरा, या परंपरांचा, जीवन मूल्यांचा प्रकर्षाने समावेश होतो. येथे समूहभान, समूहजीवन आणि समूहधारणा, लोकजीवनाच्या केंद्रस्थानी आहेत"[२] डॉ. लोहकरे यांच्या वरील विधानातून आदिवासी आत्मकथनांमध्ये असलेला वेगळेपणा ठळक झालेला दिसून येतो. कारण आदिवासी समाज हा आनादी काळापासून नागरवस्तीपासून दूर डोंगरदऱ्यांत, जंगल पहाडाच्या आश्रयाने राहत आला आहे. त्यामुळे त्याचे समाजजीवन, सांस्कृतिकजीवन वेगळे दिसून येते. निसर्ग हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे त्यांचे सुखदुःख, दैन्य, दारिद्रय, श्रद्धा – अंधश्रद्धा, निसर्ग जाणीवा या आत्मकथनांनमधून अपरिहार्यपणे येताना दिसतात. मात्र आदिवासी साहित्यतील इतर प्रकाराप्रमाणे आत्मकथनांची संख्या अत्याल्प आहे. तरीदेखील जे लिहिले आहे, ते अस्सल जीवनानुभवातून चित्रित केले आहे. त्यामुळे आदिवासी लेखकाने लिहिलेले आत्मकथने आणि आदिवासी इतर लेखकांनी लिहिलेली आत्मचरित्र यांचा अभ्यास केला आहे. म्हणून या संशोधन निबंधात आदिवासींच्या अभिजात आत्मकथनांचा ऐतिहासिक आढावा घेण्यात आला आहे. तो परिपूर्ण असेलच असे नाही. म्हणून जिज्ञासू वाचक, अभ्यासक, विचारवंत, समीक्षक, भाषावैज्ञानिक यांनी मार्गदर्शन करून यामध्ये मोलाची भर घालून मार्गदर्शन केलास मला नक्कीच आवडेल. प्रथम आदिवासीएतरांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचा ऐतिहासिक आढावा अभ्यासला आहे तो पुढील प्रमाणे –

आदिवासीएतर लेखकांचे आदिवासी जीवनावरील आत्मचरित्र लेखन -

१. गोदावरी परुळेकर यांचे **'जेव्हा माणूस जागा होतो'** हे आत्मवृत्तपर कथन १९७० साली प्रकाशित झाले आहे.. या आत्मवृत्तपर लेखनात तत्कालीन आदिवासी वारली जमातीची भयावह सामाजिक स्थितीचे वास्तव चित्रित होते. हे आत्मवृत्तपर लेखनात गोदावरी परुळेकर यांनी ठाणे जिल्ह्याच्या जव्हार, मोखाडा या परिसरातील आदिवासी वारली जमातीचे समाजजीवन आणि सांस्कृतिक जीवनाचे चित्रण केले आहे. या भागातील शेठ, सावकार, जमीनदार त्यांच्या अज्ञानाचा असाहयतेचा फायदा घेत छळ करून शोषण करत होते. सकाळी उजाडल्यापासून संध्याकाळी अंधार पडेपर्यंत वेठबिगार म्हणून राबवले जात होते. त्यांना कोणताही सणवार, सुट्टी अथवा आजारपणात विश्रांती मिळत नव्हती. अशा भयावह परिस्थितीत गोदावरी परुळेकर आणि शामराव परुडकर यांनी वारली आदिवासींना विश्वासात घेऊन त्यांच्या मनात आत्मबळ जागृत केले. त्यांना आत्मभान दिले. त्यांच्या सोबतीला लालबावटीची चळवळ आली. त्यामुळे आदिवासी म्हणून आपल्या अस्तित्वाची त्यांना जाणीव झाली, त्यांच्यात अस्मिता जागृत झाली.

२. सुधीर फडके यांचे **'कोठे आणि कधीतरी'** हे आत्मचरित्र १९७२ साली प्रकाशित झाले. सुधीर फडके हे वैद्यकशास्त्रातील डॉक्टर असल्याने त्यांनी ठाणे जिल्ह्यातील वारली, कातकरी, कोळी, ठाकूर, कोकणे या जमातीमध्ये आरोग्य सेवेच्या निमित्ताने त्यांचा सबंध आला. त्यामुळे त्यांचे दुःख, दारिद्रय, भुकेचे वास्तव आणि अज्ञान व शिक्षणाचा अभाव या समस्या जवळून पाहता आल्या. त्यांच्यामध्ये असणारे कुपोषण आणि भुकबळीचे वास्तव अतिशय भयानक होते. भूक आणि कुपोषणामुळे बालमृत्यूचे प्रमाण वाढले होते. देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळातही शासन अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गोष्टी त्यांच्यापर्यंत पोहोचू शकले नसल्याची खंत या आत्मचरित्रातून अभिव्यक्त होते.

३. शंकर विनायक ठकार यांचे **'जागतो संयमी तिथे'** हे आत्मचरित्र १९८२ साली प्रकाशित झाले आहे. या आत्मचरित्रातून धुळे जिल्ह्याच्या सातपुडा पर्वतातील आदिवासी भिल्ल जमातीचे शेठ, सावकार, जमीनदार आणि सरकारी अधिकारी त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन शोषण करतात. त्यामुळे शंकर ठकार यांनी काही कार्यकर्त्यांच्या मदतीने भिल्ल सेवा मंडळाच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये आरोग्य आणि शिक्षणविषयक जनजागृती घडवून आणली आहे.

४. अनुताई वाघ यांचे **'कोसबाडच्या टेकडीवरून'** हे आत्मचरित्र १९८४ साली प्रकाशित झाले आहे. या आत्मचरित्रात ठाणे जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यातील कोसबाड या ठिकाणी अनुताई वाघ यांनी ग्रामबालशिक्षा केंद्रातील अनुभव कथन केले आहेत. आदिवासी मुलांना शाळेची आवड निर्माण व्हावी. तसेच ज्यांना आपल्या उपजीविकेच्या शोधार्थ वेळ मिळत नाही अशा मुलांसाठी कुरण शाळा सुरू केली. यावेळी त्यांनी पारंपारिक शिक्षणापेक्षा मुलांच्या आवडीला महत्त्व दिले.

५. सिंधुताई सपकाळ यांचे **'मी वनवासी'** हे आत्मचरित्र १९९० साली प्रकाशित झाले. या आत्मचरित्र सिंधुताई सातपुडा परिसरात राहत असताना तेथील आदिवासींचे जगणे किती हलाखीचे आहे. यावर त्यांनी आपल्या अनुभवातून भाष्य केले आहे. वनखात्यातील अधिकाऱ्यांकडून आदिवासींचे होणारे शोषण तसेच मेळघाट प्रकल्प मंजूर झाल्यानंतर आदिवासींच्या जंगलात चराईबंदी आदेश निघाल्याने त्यांच्या जनावरांचे होणारे हाल चित्रित झाले आहेत.

आदिवासी लेखकांचे आदिवासी जीवनावरील आत्मकथने -

१. नजुबाई गावित यांचे **'आदोर'** हे आत्मकथन १९९५ साली प्रकाशित झाले आहे. आदिवासी साहित्यातील पहिले आत्मकथन म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. धुळे जिल्ह्याच्या साक्री, नवापूर भागातील मावची, भिल्ल आदिवासींचे समाजजीवन आणि सांस्कृतिक जीवन चित्रत झाले आहे. ही आत्मकथनात तीन पिढयांचे जीवन चित्रित होते. पहिल्या पिढीतील पांडया देसाई व त्याची पत्नी बीजू दुसऱ्या पिढीतील आटया पांडया देसाई व त्याची पत्नी इसरी तिसऱ्या पिढीतील आशा आणि तिची कुटुंबकथा असा एकूण समाजजीवन चित्रित होते. आदिवासी भिल्ल मावचींचे समूहजीवन या आत्मकथनातून अभिव्यक्त होते. त्यांचे दुःख, दारिद्रय, अपमान, अवहेलना, छळ, वेठबिगारी, भुकेचे वास्तव दहाकपणे चित्रित झाले आहे. विशेषतः आदिवासी स्त्रियांच्या व्यथा, वेदना, शोषण, दमन, छळ, पिळवणूक अतिशय अस्वस्थ करणारी आहे. त्यांच्या प्रथा, परंपरा, श्रद्धा – अंधश्रद्धा, समजुती यांचे सूक्ष्म चित्रण आले आहे. लेखका आदिवासी समाजात झोकून देणारी कार्यकर्ती असल्याने सामाजिक जाणीवेतून व स्वानुभवाच्या सत्य आणि प्रामाणिक पातळीवर ते उतरले आहे.

२. बाबाराव मडावी यांचे **'आकांत'** हे आत्मकथन १९९८ साली प्रकाशित झाले आहे. या आत्मकथनात आदिवासी परधानी बोलीभाषेचा वापर केला आहे. हे आत्मकथन दोन भागातून त्यांनी लिहिले आहे. पहिल्या भागात बालपण, शिक्षणासाठीची धडपड, आधार देणारी माणसे आयुष्यातून निघून गेल्याने अस्वस्थ झालेली मन आणि दारिद्रयात काढलेले दिवस चित्रित होतात तर दुसऱ्या भागातून प्रस्थापित व्यवस्थेच्या अन्याय, शोषणाविरुद्ध केलेला संघर्ष, आदिवासींच्या हक्कासाठी आणि परिवर्तनासाठी सरकार दरबारी दिलेल्या लढयाचे वास्तव चित्रण केले आहे.

आदिवासींचे दारिद्र्य, उपासमार, भूक, शिक्षण, आरोग्य, कुपोषण, अन्याय, अत्याचार छळ यावर लेखकाने मार्मिकपणे भाष्य केले आहे.

३. संतोष देवराम पवार यांचे **'चोरटा'** हे आत्मकथन २००७ साली प्रकाशित झाले आहे. उस्मानाबाद जिल्ह्याच्या परिसरातील आदिवासी पारधी जमातीचे समाजजीवन या आत्मकथनातून चित्रित झाले आहे. लेखकाच्या आयुष्याची जडणघडण होण्यासाठी अनेक चांगली माणसे भेटली त्यांचे ऋण या आत्मकथनातून व्यक्त केली आहे. लेखकाने आपली कौटुंबिक परिस्थिती सांगताना समाजामध्ये असणारे दारिद्र्य, भुकेचे वास्तव चित्रित केले आहे. पंचक्रोशीत कुठेही चोरी झाली की पोलीस प्रथम पारधी वस्तीवर येतात. पण चोरी का होते? याविषयी समाज विचार करत नाही. पारध्यांना घर नाही, शेती नाही. सतत त्यांच्या वाटयाला भटकंती आली आहे. कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. ही परिस्थिती बदलायची असेल तर शिक्षण घेणे हाच एकमेव मार्ग आहे. शिक्षणातून आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव होते. एकदा गिरीश प्रभुणे मंत्री असताना तुळजापूर येथील यमगरवाडी येथे त्यांच्या समवेत सभा झाली होती. या सभेत लेखक आपल्या समाजावर होणारे अन्याय – अत्याचार, प्रस्थापित व्यवस्थेकडून मिळणारी वागणूक, पोलीस व प्रस्थापितांच्या मनात असलेला पूर्वग्रस्तदूषित भावना लेखक पोटतिडकीने मांडतो. येथून पुढे लेखक समाजाच्या उद्धारासाठी स्वतःला झोकून देतो.

४. किसन डगळे यांचे **'ठिगळ'** हे आत्मकथन २००८ साली प्रकाशित झाले आहे. किसन डगळे यांच्या बालपणातील गावाकडच्या अनेक मित्रांसोबतच्या आठवणी, शालेय शिक्षण घेत असताना आई-वडिलांना अनेकांनी केलेली मदत केली आहे. तरीपण आपल्या शिक्षणाकडे त्यांनी दुर्लक्ष होऊ दिले नाही. महाविद्यालयीन शिक्षण घेताना अनेक मोठया मनाच्या माणसांची मदत मिळाल्याचे ते सांगतात. त्यामुळे आपली प्रगती घडण्यास निश्चित मदत झाली आहे. अनेक लहान मोठी कामे करता करता लेखक विक्रीकर अधिकारी वर्ग - १ या पदापर्यंत पोहोचतो. पुढे त्यांना समाजासाठी काहीतरी करावे म्हणून ते शैक्षणिक प्रबोधन, विविध मेळावे, व्याख्याने, परिषदा, सत्कार समारंभ यातून आपल्या आदिवासी समाजाला मार्गदर्शन करून प्रेरणा देतात.

५. रामराजे आत्राम यांचे **'उघडा दरवाजा'** हे आत्मकथन २००९ साली प्रकाशित झाले आहे. या आत्मकथनातून आदिवासींचे दारिद्र्य अवहेलना, भुकेसाठी केलेली वणवण भटकंती, निसर्गाच्या सानिध्यातील प्राण्यांचा सहवास, प्रेम आणि जगण्यावरचा विश्वास चित्रित होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी फुले आंबेडकरी प्रेरणाच परिवर्तन घडवून आणतील याचा लेखकाला विश्वास आहे. लेखक स्वतः चळवळीतील कार्यकर्ता असल्याने प्रस्थापित व्यवस्थेच्या अन्यायाविरुद्ध संघर्ष करताना दिसतात. लेखकाला अनेक वाईट प्रसंगांना तोंड द्यावे लागते. लहानपणी आईच्या पोटात असताना आईने केलेली विषप्राशन, भुकेच्या दहाकतेपायी लेखकाच्या मनात आलेले आत्महत्येचे विचार, बायकोचे अकाली निधन अशा अनेक प्रसंगांना तोंड देत खंबीरपणे उभे राहतत. हे आत्मकथन आदिवासींना अन्यायाविरूध्द लढण्यास प्रेरणा देणारे आहे.

६. प्रकाश चव्हाण यांचे **'उदई'** हे आत्मकथन २५ डिसेंबर २००९ साली प्रकाशित झाले आहे. या आत्मकथनात विदर्भातील सातपुडा परिसरातील नांदगाव, खंडेश्वर आणि अमरावती नेमाडपर्यंतची प्रदेशाची भौगोलिकता चित्रित होते. या आत्मकथनातून पारधी आदिवासी जमातीचे दुःख, दैन्य, अवहेलना, अपमान, जीवन जगण्यातील संघर्ष, माणूस म्हणून जगण्यासाठीची धडपड, प्रस्थापित व्यवस्थेचा पारधी आदिवासींकडे कायम गुन्हेगार म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांच्या परंपरा, लोकसमज, श्राद्ध – अंधश्रद्धा, देवदेवता पूजाविधी, जगण्यासाठी चोऱ्यामोऱ्या, शिकारीच्या पद्धती, दारू विकणे यासारखे अनेक गोष्टी पोटाच्या भुकेसाठी त्यांना कराव्या लागतात. या आत्मकथन जमातपंचायतीचे वास्तव आणि अनेक अनिष्ट प्रथा आलेल्या आहेत. विशेष म्हणजे आदिवासींना प्रगती करण्यासाठी शिक्षण हेच प्रभावी माध्यम असल्याचे ते ठामपणे नमूद करतात. आदिवासी पारधी जमातीच्या बोलीच वापर सहजपणे या आत्मकथनातून होतो. या आत्मकथनात साहित्यिक मूल्ये, कलामूल्ये यापेक्षा जीवनमूल्यांना अधिक प्राधान्य दिलेली दिसून येते.

७. सिताराम रखमा जोशी यांचे **'अधिकारी माणूस'** हे आत्मकथन २०१५ साली प्रकाशित झाले आहे. हे आत्मकथन आदिवासी मावळी बोलीतून लिहिले आहे. आठ भागातून याचे लेखन केले आहे. या आत्मकथनातून चार पिढयांचे समाजजीवन चित्रित होते. आजच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उपकूलसचिव पदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर हे लेखन केले आहे. यामध्ये लेखकाचे बालपण, शालेय, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन जीवन, कौटुंबिक सुखदु:खे, विद्यापीठ प्रशासनातील कामकाज व ताणतणाव, आपली कृषीसंस्कृती, निसर्गातील साधनसामग्रीचा समाजजीवनात उपयोग. तसेच लेखकाने समाजासाठी आदिवासी समाज कृतीसमिती, महाराष्ट्र राज्य संस्थेच्या माध्यमातून अनेक समाज उपयोगी कामे करून मोलाचे योगदान दिले आहे.

८. द्रोपदी रामचंद्र जंगले यांचे **'चिंधी'** हे आत्मकथन ३१ मे २०१५ साली प्रकाशित झाले. या आत्मकथनामध्ये लेखिकेचे बालपणातील जीवन, कुटुंबातील आई – बाबा, चुलते, चुलत भाऊ, मामा अशी कौटुंबिक नात्यातील अनेकांचा

सहवासातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले आहे. विशेषतः त्यांच्या आजीचा सहवास त्यांना जास्त काळ लाभला. लहानपणी डेहण्याला शाळेत जाण्याचा प्रसंग, तसेच पुढे माध्यमिक आणि अकरावीची परीक्षेला तीन पिढयांचे आजी, बाबा, मामा यांच्यासोबत दिलेली परीक्षा याचे अतिशय हृदयगम्य चित्रण आले आहे. आदिवासी समाजातील दुःख, दैन्य, दारिद्रय, रूढी, परंपरा, समूहजीवन यांचे चित्रण आत्मकथनातून येते. पोटाची भूक भागविण्यासाठी रानातील कंदमुळे, फळे, रानभाज्या आणि रानातील रानमेवा हा आदिवासींचा पोशिंदा असल्याचा उल्लेख या आत्मकथनात येतो. आदिवासी समाज हा पशुपालक असल्याने शेळया, गुरेढोरे यांचाही उल्लेख येतो. आदिवासी कृषीकर्मे करताना समूहजीवनाला असलेले महत्व लक्षात येते. पुढे लेखिकेचे लग्न होते. संसार, मुलेबाळे आणि पतीची अनेक ठिकाणी होणारी बदली. त्यामुळे कायम अस्थिर जीवन जगावे लागते. तेथील अनुभव, माणसे, वेगळी संस्कृती, बोलीभाषा याचे वर्णन आत्मकथनातून येते. लेखिकेच्या पतींची सेवानिवृत्तनंतर ठाणे येथे कायम वास्तव्यास राहत आहेत.

९. किसन चव्हाण यांचे **'आंदकोळ'** या आत्मकथनाची दुसरी आवृत्ती २०१६ साली प्रकाशित झाली आहे. हे आत्मकथन आदिवासी पारधी बोलीतून लिहिले आहे. पारधी आदिवासी समाजातील दुःख, दैन्य, दारिद्रय, श्रद्धा – अंधश्रद्धा, समजुती, परंपरा, रीतीरिवाज यांचे चित्रण झाले आहे. या जमातीवर पूर्वपार परंपरेपासून चोर आणि गुन्हेगार असा शिका प्रस्थापित समाजाने मारला आहे. त्यामुळे कुठेही चोरी झाली तरी पोलीस प्रशासन पालावर येऊन चौकशी करतात, धमक्या देतात. त्यामुळे प्रशासनातील त्यामुळे प्रस्थापित समाजाचा पारधी जमातीकडे पाहण्याचा दृष्टिकोन संशय आहे. किसन चव्हाण यांनी अतिशय खडतर परिस्थिती संघर्ष करून शिक्षण घेतले. मुलांच्या शिक्षणसाठी आई-वडिलांनी चोऱ्या करून, दारू विकून मुलांचे शिक्षण पूर्ण केले. त्यामुळेच किसन चव्हाण आपल्या जीवनात मुख्याध्यापक पदापर्यंत पोहोचले. किसन चव्हाण यांनी आपल्या वडिलांप्रमाणेच उच्च जातीतील मुलीशी आंतरजातीय विवाह केला. किसान चव्हाण हे आपल्या जीवनात स्थिरस्थावर झाल्यानंतर भटक्या विमुक्तांसाठी समाजसुधारण्याच्या कामाला वाहून घेतले आहे.

१०. डॉ. राजेंद्र धनजकर यांचे **'आंधाचं कारटं'** हे आंध आदिवासी समाजाच्या जीवनावर लिहिलेले आत्मकथन २०१८ साली प्रकाशित झाले आहे. मराठवाड्यातील आंध आदिवासींची समाजजीवन या आत्मकथनातून प्रत्ययकारीरित्या चित्रित होते. लेखकाचे बालपण, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण आणि नोकरीपर्यंतचा खडतर प्रवास या आत्मकथातून चित्रित होतो. आपल्या जीवनाच्या प्रवासात अनेक चांगल्या मनाची मोठी माणसांची सहकार्य लाभल्याचे ते आवर्जून उल्लेख करतात. शिक्षणाशिवाय आदिवासींमध्ये प्रगती होणार नाही हे ठामपणे त्यांनी कथन केले आहे. या आत्मकथनात फुले, आंबेडकरी विचारांचे अधिष्ठान आहे. त्यांच्या या विचारानेच आदिवासींची प्रगती होईल असा विश्वास व्यक्त केला आहे.

११. सुनील गायकवाड यांचे **'बाडगीन धार'** हे आत्मकथन २०१९ साली प्रकाशित झाले आहे. आदिवासी भिल्ल समाजजीवन यामधून चित्रित होते. भिलाऊ बोलीतून हे आत्मकथन लिहिले आहे. हे आत्मकथनात तीन भागात लिहिले आहे. पहिल्या भागात व्यवस्थेने गुन्हेगारीचा शिक्का मारलेल्या व्यक्तिरेखा प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष करत जगतत. तर दुसऱ्या भागात लेखकाच्या बोराटे गावातील संघर्ष, आदिवासी भिल्ल जमातीतील मुले – मुली, लेखकाची मित्र आणि पोलीस पाटील येतात तर तिसऱ्या भागात लेखक डी. एड. उत्तीर्ण झाला तरी नोकरी मिळत नाही. म्हणून वडिलांचा बंद पडलेला दारू गाळण्याचा धंदा करू लागतो. या आत्मकथनात आदिवासी भिल्ल जमातीचे दुःख, दैन्य, दारिद्रय, अज्ञान, श्रद्धा – अंधश्रद्धा, समजूती येतात. भूक आणि गुन्हेगारीचा ज्वलंत प्रश्न या आत्मकथनातून प्रकट होतो. या आत्मकथनाला फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचे अधिष्ठान आहे.

१२. डॉ. राजू शनवार यांचे **'पोश्यांपोर'** हे आत्मकथन मार्च २०२४ मध्ये प्रकाशित झाले आहे. या आत्मकथनामध्ये जव्हार, मोखाडा भागातील आदिवासी वारली, कोकणा जमातीच्या बोलीचा वापर केला आहे. हे आत्मकथनामध्ये आदिवासी वारली जमातीचे सामाजिक, सांस्कृतिकजीवन चित्रित केले आहे. बापाविना वाढलेल्या एका पोरक्या मुलाचे जीवन जगण्याचा संघर्ष या आत्मकथनातून येतो. आदिवासी वारली जमातीचे दुःख, दैन्य, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, बेरोजगारी, सणउत्सव या सर्वांसह आदिवासींचे जीवन चित्रित होते. या आत्मकथनात लेखकाचे बालपण, कौटुंबिक ताणतणाव, कलह, आश्रम शाळेतील जीवन, प्राथमिक शिक्षक आणि पुढे अव्यहतपणे शिक्षण चालू ठेवून प्राध्यापक या पदापर्यंत पोहोचणे असा अथक संघर्षमय प्रवास या आत्मकथनात चित्रित होतो.

१३. अ. ध. वसावे यांचे **'आदिवासी माणसाची कहाणी'** हे आत्मकथन २०१९ साली प्रकाशित झाले आहे. या आत्मकथनातून आदिवासींचे दुःख, दैन्य, दारिद्रय व समाजजीवन चित्रित झाले आहे.

१४. राजेंद्र भारूड यांचे **'मी एक स्वप्न पाहिलं'** हे आत्मकथन आदिवासी भिल्ल समाजातील एका उमदया तरूणाने अनेक हालअपेष्टा सहन करून प्रशासकीय सेवेत रूजू होतो. हा समस्त आदिवासी समोर आदर्श निर्माण केला आहे.

१५. प्रा. माधव सरकुंडे यांची **'भूमकाल'** हे आत्मकथन आगामी प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

समारोप –

अशा प्रकारे महाराष्ट्रातील वेगवेगळ्या आदिवासी जमातीतील समाज जीवनाचं, संस्कृतीचं, समूहजीवन, निसर्गधारणा, सणउत्सव, रीतीरिवाज, आचारविचार, लोकसमज, आरोग्य, कुपोषण, दैन्य, दुःख, दारिद्रय, श्रद्धा – अंधश्रद्धा, शोषण, वेठबिगारी, शिक्षण, बेरोजगारी, निसर्ग जाणीवा, अशा अनेक समस्या त्यांच्या स्वानुभवाच्या जगण्यातून चित्रित झाल्या आहेत.

निष्कर्ष -

१) बिगर आदिवासी आत्मचरित्रकारांनी आदिवासी भागात विविध कामाच्या निमित्ताने फिरताना आदिवासी जमातीतील समाजजीवन आणि सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकला आहे.

२) बिगर आदिवासी लेखकांनी आदिवासी जमातीचे दैन्य, दारिद्र्य, भुकेचे वास्तव चित्रित केले आहे.

३) बिगर आदिवासी लेखकांना वास्तव जीवन जगण्याचा अनुभव नसल्याने त्यांच्या लेखनाला मर्यादा पडल्या आहेत.

४) बिगर आदिवासी लेखकांनी आदिवासी जीवनावर आत्मचरित्रातून अत्याल्प प्रकाश टाकला आहे.

५) आदिवासी लेखकांनी आत्मकथनांतून महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रांतातील जमातीचे समाजजीवन आणि आणि सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडविले आहे.

६) आदिवासी आत्मकथनांतून आदिवासी जमातीचे दुःख, दैन्य, दारिद्र्य, वेठबिगारी, शोषण, आरोग्य, श्रद्धा - अंधश्रद्धा अशा अनेक समस्यांचे चित्रण केले आहे.

७) आदिवासी आत्मकथनांतून समूहजीवन, लोकसंस्कृती, सण - उत्सव, निसर्गधारणा यांचे वास्तव चित्रण केले आहे.

८) आदिवासी आत्मकथनांतून अन्याय - अत्याचार आणि संघर्ष या विरूध्द चित्रण आले आहे.

९) आदिवासी आत्मकथनांतून समाजातील अनेक आदर्श व्यक्तिमत्वांच्या चांगुलपणाचे ऋण व्यक्त केले आहे.

१०) आदिवासी आत्मकथनांमध्ये शाहू, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अधिष्ठान मानले आहे.

११) आदिवासी आत्मकथनांमधून पारधी, भिल्ल, जमातीवर चोर, दरोडेखोर, गुन्हेगार म्हणून आजही शिक्का कायम आहे. त्यामुळे त्यांचे सर्वांगीण शोषण होते, हे शल्य चित्रित झाले आहे.

१२) आदिवासी आत्मकथनांतून शिक्षणाला प्राधान्य दिले आहे.

१३) आदिवासी आत्मकथांत अवघ्या दोन स्त्रियांची आत्मकथने आली आहेत.

१४) आदिवासी आत्मकथनांमध्ये आदिवासी बोलीभाषांचे वैविध्य दिसून येते.

१५) आदिवासी आत्मकथनांनमधून आदिम जाणीव जागृतीचे दर्शन घडविले आहे.

संदर्भग्रंथ –

१) डॉ. रोंगटे, तुकाराम, आदिवासी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा, उधृत (पृष्ठ क्र. ३०).

२) कन्नके, वसंत, अतिथी संपादक -फडकी (मासिक), १५ जानेवारी/फेब्रुवारी २०२५, (पृ. क्र. २०)

३) जोशी, अ. म., चरित्र - आत्मचरित्र तंत्र आणि इतिहास, स्नेवर्धन प्रकाशन पुणे - ३०. तृतीय आवृत्ती १९९९.

४) यादव, आनंद, आत्मचरित्र मीमांसा, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे - ३०, प्रथमावृत्ती फेब्रुवारी १९९८.

५) सदा, कऱ्हाडे, दलित आत्मकथेच्या निमित्ताने, अस्मितादर्श दिवाळी अंक १९८४.

६) बाबाराव, मडावी, आकांत, सुधीर प्रकाशन वर्धा! प्रथमावृत्ती १९९८.

७) किसन, डगळे, ठिगळ, संवेदना प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००८.

८) संतोष, पवार, चोरटा, सुधीर प्रकाशन वर्धा, प्रथमावृत्ती २००७.

९) नजुबाई, गावित, आदोर, अभिजात प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती १९९५.

सुखदेव नवले यांच्या कथा साहित्याची समाजशास्त्रीय मिमांसा

डॉ. रामदास नाईकनवरे.
प्र. प्राचार्य, कला व विज्ञान महाविद्यालय, आटपाडी. जि. सांगली.
भ्रमणध्वणी:- ९८९०१२३४३८

प्रस्ताविक:-

हजारो वर्षांची पारंपरिक विषमतेची मूल्य चौकट झुगारून स्वातंत्र्योत्तर काळात संविधानिक न्याय, हक्क व मूलभूत अधिकारांच्या आत्मभानातून अभिव्यक्त होऊन निर्माण झालेल्या मराठी वांड:मयीन प्रवाहांची संख्या आज कमी नाही. कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी वांड:मयीन प्रकारांनी ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, कामगार हे वांड:मयीन प्रवाह अधिक समृद्ध केले. हे सर्व वांड:मयीन प्रवाह त्या- त्या लेखकाच्या सामाजिक व सांस्कृतिक परिपोषांचे दिग्दर्शन करणारे असले तरी, लेखकाची जडणघडण ज्या सामाजिक स्तरांमध्ये होते. त्या सामाजिक, सांस्कृतिक घटकांचा संस्कार व प्रभाव हा सार्वत्रिक समान असतोच असं नाही. तत्कालीन समाज जीवनातील सामाजिक, राजकीय, धार्मिक , आर्थिक व वांड:मयीन चळवळी , आणि विविध महापुरुषांच्या विचार कार्याने प्रभावित होऊन समाजामध्ये वावरणाऱ्या विविध प्रबोधनकारी चळवळी इत्यादी सर्व घटकांच्या आधारे लेखकाला प्राप्त झालेला वैचारिक दृष्टिकोन हा एकूणच साहित्य निर्मितीवर परिणाम करणारा असतो. यावरून आपणास साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध किती गुंतागुंतीचा असतो हे लक्षात येते. अशा या सामाजिक सांस्कृतिक जडणघडणीतून निर्माण झालेल्या साहित्य निर्मात्याकडून समाजामध्ये सकस व शाश्वत मूल्यभावांची पेरणी करणारे साहित्य निर्माण होत असते. असा हा सकस व शाश्वत मूल्यभाव समाजशास्त्रीय अंगाने आजपर्यंत आपण ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, कामगार इत्यादी वाड:मयीन प्रवाहांच्या अनुषंगाने वाचत व अभ्यासत आलो आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्येही आपण सुखदेव नवले यांच्या कथा साहित्याची समाजशास्त्रीय मिमांसा पाहणार आहोत.

उद्दिष्टे:-

१) साहित्य कलाकृतीच्या आकलनासाठी समाजशास्त्री संकल्पना समजावून घेणे.
२) समाजशास्त्रीय घटकांच्या आधारे सामाजिक वैशिष्ट्यांचा शोध घेणे.
३) सामाजिक मूल्य भाव व सामाजिक परिवर्तन यांचा संबंध स्पष्ट करणे.
४) सुखदेव नवले यांच्या कथा साहित्यातील सामाजिक मूल्यदृष्टी असणाऱ्या कथांचं आकलन करून घेणे.
५) सुखदेव नवले यांच्या सामाजिक मूल्य भाव असणाऱ्या कथा साहित्यामधून मानवता व वैश्विकतेच्या अंगाने शोध घेणे.
६) 'लेखक व समाज' आणि 'समाज व साहित्य' यांचा परस्पर संबंध स्पष्ट करणे.
७) मराठी साहित्यकृतीच्या आकलनासाठी समाजशास्त्री पद्धतीला अधिक बळकटी देणे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय संशोधन पद्धती विचारात घेतली जाणार आहे.

समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती:-

कोणत्याही वांड:मयीन कलाकृतीचे मूल्यमापन करत असताना लेखक व त्याची वांड:मयीन कलाकृती या दोन्हींच्या पाठीमागील सामाजिक व सांस्कृतिक तळ शोधण्याची जबाबदारी अभ्यासक व संशोधकांची असते. या दोन्ही घटकांच्या अनुषंगानेच त्या कलाकृतीची समाजशास्त्रीय मिमांसा आपणास विचारात घ्यावी लागते. समाजशास्त्रीय दृष्टिकोणाच्या नावावर मार्क्सवाद, समाजवाद, संरचनावाद व गांधीवादाला बळ देऊन या मातीत रुजलेल्या वर्णवादावर पद्धतशीरपणे पांघरून घालायचं काम अभ्यासक व संशोधक करतात. जर्मनीच्या मातीमध्ये कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स या तत्त्वज्ञानी संयुक्तपणे मार्क्सवाद व समाजवादाची मुळे रुजवली. त्या मातीमध्ये वर्णवादी संरचना नव्हती. परंतु भारतासारख्या देशामध्ये चार वर्णावर आधारित वर्णव्यवस्था आणि त्या वर्णांतर्गत असणाऱ्या

हजारो जातींची संरचना अस्तित्वात आहे. इथली मूलतः विषमता ही आर्थिक नसून ती सामाजिक आहे. त्यामुळे हजारो वर्षांपासून पिढ्यान्पिढ्या मनामध्ये रुजलेल्या वर्णवादाची चिकित्सा करण्यासाठी अभ्यासकांची आंबेडकरी दृष्टीनेच समाजशास्त्रीय दृष्टी हवी. मार्क्सवादी व समाजवादी दृष्टी इथे उपयोगी पडत नाही. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधासाठी आंबेडकरी दृष्टिकोनाधारे समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती वापरण्यात आली आहे.

लेखकाची बहूकेंद्रीय सामाजिक अनुभूती:-

सुखदेव नवले यांचे "निर्णय" आणि "शोध अस्तित्त्वचा" हे दोन कथासंग्रह प्रकाशित आहेत. यांच्या कथासंग्रहातून लेखकाची बहूकेंद्रीय सामाजिक अनुभूती आपल्या लक्षात येते. ग्रामीण व दलित जीवनाचा परीघ व्यापणाऱ्या गावकुसा आतील व बाहेरील सर्व समाज घटकातील संवेदनशील जाणिवांचं चित्रण यांच्या कथा मधून आलेलं आपणास दिसतं. परंपरेने समाज व्यवस्थेमध्ये चालत आलेल्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र या चार वर्णांतर्गत अस्तित्त्वात असणाऱ्या हजारो जाती जाती मधील श्रेष्ठ व कनिष्ठत्वाचा संघर्ष, संविधानिक लोकशाहीमध्येही समाजामध्ये सुरू असणारा जातीय संघर्ष, गावकुसाबाहेरील उपेक्षित समाजाकडे व एकूणच स्त्री जीवनाकडे समाज व्यवस्थेचा पाहण्याचा दृष्टिकोन, जाती-जातीमध्ये असणारी सामाजिक व आर्थिक विषमता, आजही समाजामध्ये सुरू असणाऱ्या पारंपरिक रूढी व परंपरा, व या विषमतावादी परंपरेचं अनुयायीत्त्व स्विकारण्यासाठी सुरू असणारी समाजातील स्पर्धा, हे सर्व सामाजिक घटकांचा चित्र नवले यांच्या कथासंग्रह मधून येताना आपणास दिसते. शिवाय समाजातील जाती संघर्ष, स्त्रियांच्या वरील अन्याय व अत्याचार, विधवा पुनर्विवाह, सुशिक्षित बेकारांमधील जगण्याचा संघर्ष, समाजातील स्वार्थी व लोभी प्रवृत्ती, इत्यादी अनेक प्रकारच्या बहु केंद्रीय अनुभूतींचं चित्र नवले यांच्या कथांमधून येते. 'निर्णय', 'शोध अस्तित्वाचा', 'सोना', 'तृष्णा', 'डाव' 'धंदा', 'पुढचं पाऊल', 'संशय' इत्यादी अनेक कथा या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

कथेतील व्यक्तिरेखांचा सामाजिक संबंध:-

लेखक सुखदेव नवले हे स्वतः माळी (ओबीसी) समाजातील आहेत. यांच्या कथासंग्रहातील 'सुका मांग' (निर्णय), माळी समाजातील आनंदची पत्नी 'नंदी' (डाव), विष्णू माळयाची पत्नी 'सोना' व रावसाहेब पाटलांची पत्नी 'सुनंदा' (सोना), 'दगड्या ड्रायव्हर' (संगत), 'तायाप्पा रामोशी' (भरती), आणि आयपीएस अधिकारी असणारा मराठा समाजातील 'अमृतराव देशमुख' (तृष्णा), इत्यादी पात्रे ही गावगाड्यामधील विविध सामाजिक व सांस्कृतिक संचिते आपल्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून कथेमध्ये घेऊन येताना दिसतात. मानवतावादी मूल्यांबरोबर सामाजिक व आर्थिक विषमतेच्या अंगाने या व्यक्तिरेखांचा संबंध आपणास या कथांमधून आलेला दिसतो.

कथेतून आविष्कृत होणारा मूल्यभाव:-

सुखदेव नवले यांच्या कथांमधून विशेषत:- सामाजिक व आर्थिक विषमता चित्रीत होताना दिसते. 'निर्णय' कथेमध्ये मोहन पाटील यांचा व गाव पंचायतीचा आणि 'सोना' या कथेतील रावसाहेब पाटलांचा जातीय दृष्टिकोन तर अनुक्रमे 'सुका मांग' व 'सोना' या व्यक्तिरेखांचा न्याय व हक्कासाठीचा संघर्ष समाजातील वर्णीय अंगाने सामाजिक मूल्य भावाची जाणिव लेखक चित्रीत करताना आपणास दिसतो.

त्याचप्रमाणे, 'तृष्णा' या कथेमधील आय.पी.एस. अधिकारी असणाऱ्या अमृतराव देशमुख यांच्या रूपाने समाजातील अप-प्रवृत्ती, स्वार्थी व लोभी वृत्ती- प्रवृत्तींचा मूल्य भाव असणारी जाणिव व्यक्त होते. 'धुराड', 'धंदा', 'नातं' 'बुडबुडा' इत्यादी कथांना संघर्षाचे मूल्य प्राप्त होऊन वाचकांना 'करूण' रसाची अनुभूती मिळते. रक्ताच्या नात्या पेक्षाही मानलेली नाते कशी श्रेष्ठ असतात. याची प्रचिती देणारी 'नातं' ही कथा नात्यातील निखळ प्रेम भावनेची मूल्यजाणिव घेऊन येणारी आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्याचं धुराडं करणारी 'धुराडं' ही कथा शोषणाच्या अंगाने व सरंजमशाहीच्या रूपाने वर्तमान सहकार क्षेत्राच्या शोषक वृत्तीवर प्रकाश टाकते. त्यामुळे, या कथेला सामाजिक व आर्थिक विषमतेचं मूल्य प्राप्त होते. आणि मानवी श्रम प्रतिष्ठेचा मूल्यभाव जपणारी 'शाबासकीची थाप' ही कथाही त्याच मूल्यभाव जाणिवेचा अनुभव वाचकांना मिळवून देतात.

सुखदेव नवले यांची 'पुढचं पाऊल' ही कथा नवतेच्या रूपाने सामाजिक आत्मभान आणून देणारी आहे. रामदास नावाच्या शिक्षकाच्या मध्यस्थीने रावसाहेब पवार हा आपल्या 'सुलक्षणा' या विधवा असणाऱ्या मुलीचा पुनर्विवाह

मराठा समाजाच्या साक्षीने राहुलशी करून देतात. या कथेतील सुलक्षणाचा संघर्ष हा पारंपारिक समाज व्यवस्थेला मूठ माती देणारा आहे. तर वडील असणाऱ्या रावसाहेब पवार यांचा संघर्ष हा नव विचारांना कवठळणारा आहे. त्यामुळे याही कथेला संघर्षा बरोबरच सामाजिक मूल्य भाव प्राप्त होताना दिसतो.

एकंदरीत, सुखदेव नवले यांनी आपल्या कथा मधून आर्थिक विषमतेच्या अंगाने वर्गीय जाणिव तर भूक, उपासमार, वेदना ,दुःख , विद्रोह, आणि सामाजिक विषमता या अनुषंगाने वर्णीय जाणिवांचा आलेख वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

निष्कर्ष:-

१) सुखदेव नवले हे सन २००१ नंतरचे मराठी कथा विश्वातील एक सशक्त जाणिवेचे कथाकार आहेत.

२) सुखदेव नवले यांच्या कथामधून बहुकेंद्रीय सामाजिक जाणिव व्यक्त होताना दिसून येते.

३) सुखदेव नवले यांची कथा मानवतावादी मूल्यावर अधिष्ठित होऊन ती समकालीन सामाजिक समस्यांचा वेध घेते.

४) सुखदेव नवले यांच्या कथामधील व्यक्तिरेखा या नवविचार आत्मसात करणार्या, जगण्यातील संघर्षाला धीटपणे सामोरे जाणाऱ्या, आणि नव्या संस्कृतीमध्ये स्थिर होण्यासाठी धडपड करणार्या अशा आहेत.

५) साहित्य निर्मितीमध्ये लेखकाची तत्व बांधिलकी खूप महत्त्वाची असते. त्यामुळे सुखदेव नवले हे लेखक म्हणून 'तत्व आणि व्यवहार' यांच्यामध्ये सुसंगती जपणारे लेखक आहेत.

समारोप

साहित्य हे समाजाचा आरसा असते. त्यामुळे ते फार काळ एकमेकांपासून दूर राहू शकत नाही. नव्या मूल्यवस्थेच्या अंगाने समाजातील घडून येणारे विविध बदलच साहित्याच्या स्वरूपावर प्रभाव टाकत असतात. की, ज्यामुळे समाजाला नवा विचार, नवी मूल्ये आणि नवी दिशा देण्याचे कार्य साहित्य करत असते. म्हणूनच, आजचे मराठी साहित्य हे आपल्या बदलत्या जाणिवांच्या स्थित्यंतरांची अनेक वळणे घेऊन, कल्पनाविलासा पासून दूर होऊन ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून खंबीरपणे उभा आहे. म्हणूनच आज कोणत्याही मराठी साहित्य कलाकृतीची मिमांसा ही आंबेडकरी जाणीवेतून व समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून होणे काळाची गरज बनली आहे. याकडे अभ्यासक व संशोधकांचं लक्ष वेधण्याचा हा माझा मानस आहे.

संदर्भ:-

१) 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे', भाग:- १, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२) डॉ. पानतावणे गंगाधर , 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे,'. प्र , आ, १९७६, विजय प्रकाशन, नागपूर.

३) पाटील म.सु., 'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध' , प्र. आ. ,२००१, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.

४) कोत्तापल्ले नागनाथ, (संपा.), 'साहित्य आणि समाज' प्रतिमा प्रकाशन, पुणे. २००७.

५) डॉ. ठाकूर रवींद्र , 'समाजशास्त्रीय मिमांसा', दिलीप राज प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००७

६) गाडगीळ गंगाधर, 'साहित्य:- चिंतन आणि शोध' , सन पब्लिकेशन, पुणे, प्र.आ. १९९३.

७) पाध्ये दिगंबर, 'साहित्य, समाज आणि संस्कृती ' , लोक वांड:मय गृह, मुंबई, चौ. आ.,२०११.

८) यादव आनंद, 'साहित्य निर्मिती प्रक्रिया', मेहता पब्लिशिंग हाऊस, तृ. आ. २००२.

९) गायकवाड लक्ष्मण, 'साहित्य समाज आणि स्वातंत्र्य' दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००१.

१०) पद्माकर सर्जेराव, 'साहित्यविचारशोध' अक्षय प्रकाशन, रत्नागिरी, प्र. आ. २०२५.

अभिजात भाषा व मराठीची सद्यस्थिती

डॉ. अशोक सदाशिव तवर
मराठी विभाग प्रमुख लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँण्ड कॉमर्स, सातारा.
मो. नं. ९४२३३७५४७९

प्रस्तावनाः-

भाषा हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. दैनंदिन जीवनात भाषेला माणसाच्या श्वासोश्वासाइतके महत्त्व प्राप्त झालेले आहे. मानवी जीवनातल्या भाषेचे स्वरूप नेहमी बदलत असते. तरीही ती महत्त्वाची ठरते. कारण मानवी विचारांची देवाण-घेवाण करण्याचे सामर्थ्य तिच्यात असते. अशा भाषेच्या प्रती कोणाच्याही भावना ह्या उच्च असतात. आपली भाषा समृद्ध व्हावी, तिचा विकास व्हावा, बदलत्या काळात तिचे अस्तित्व टिकून राहावे. तिच्यात सृजनशीलता टिकून राहावी. यासाठी प्रत्येक माणूस आपल्या भाषेवर प्रेम करीत असतो. परंतु बदलत्या काळात नव्या भाषेचे आकर्षण तितकेच वाढल्याने जुन्या देशी भाषांच्या समोर मोठे आव्हान उभे राहिले. त्यातून देशी भाषा टिकून राहाव्यात यासाठी शासनाच्यावतीने काही योजना आखण्यात आल्या आहेत. त्यातील एक योजना म्हणजेच काही निकषांच्या आधारे भाषेचे प्राचीनत्व विचारात घेऊन तिला संजीवनी देणारी योजना भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन त्या भाषांचा विकास घडवून आणणारी योजना २००४ पासून सुरू झाली. केंद्र शासनाने भारतीय भाषांना विशेष दर्जा देऊन प्राचीन भाषांना संजिवनी देण्यास सुरवात केली. त्यासाठी कठोर निकष लावण्यात आले आहेत. आजपर्यंत भारतातल्या केवळ सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्या सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने कोणता लाभ झाला? या स्थितीत मराठी भाषेची अवस्था काय आहे? या प्रश्नांचा विचार येथे करावासा वाटला.

उद्दिष्टेः-

१) अभिजात भाषा म्हणजे काय हे समजून घेता येईल.
२) अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी केंद्रशासनाने ठरविलेले निकष समजून घेणे.
३) केंद्र शासनाने अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ठरविलेले निकष मराठी भाषा कशी पूर्ण करते ते अभ्यासता येईल.
४) मराठीतील प्राचीन ग्रंथ संपदेचा अभ्यास करून मराठीचे महत्त्व जाणून घेता येईल.
५) अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषेला कोणता फायदा होऊ शकेल किंवा झाला आहे याचा आढावा घेता येईल.

अभिजात भाषा म्हणजे काय?-

अभिजात म्हणजे ज्या भाषेतील साहित्य श्रेष्ठ असते. ती भाषा अभिजात भाषा असते. अभिजात या शब्दाचा नक्की अर्थ काय? याचा विचार केला असता, आधी जन्मलेला, मूळ, आद्य, उच्चकुलीन, श्रेष्ठ असा अर्थ असल्याचे दिसून येते. थोडक्यात सांगायचे तर अभिजात भाषा म्हणजे भारत सरकारने एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेला दिला जाणारा एक दर्जा आहे. हा दर्जा त्याच भाषांना दिला जातो, की ज्या भाषेत प्राचीनता, श्रेष्ठता, स्वयंभूपणा आणि सलगता आहे. अशा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा केंद्र सरकारचे सांस्कृतिक मंत्रालय यांच्याकडून दिला जातो. त्यासाठी केंद्र सरकारने काही निकष घालून दिले आहेत. ते पाहणे उपयुक्त ठरते.

अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी निकषः-

१) श्रेष्ठ दर्जाचे प्राचीम साहित्य ज्या भाषेत असेल ती अभिजात भाषा होय. म्हणजेच ज्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यायचा अहे. त्या भाषेत प्राचीन काळात श्रेष्ठ साहित्याची निर्मिती झाली असली पाहिजे, त्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला जातो.
२) भाषेला १५०० ते २५०० वर्षांचा जुना इतिहास असावा. म्हणजेच भाषा दीड हजार वर्षापूर्वीची असणे आवश्यक आहे.
३) भाषेला भाषिक आणि वाङ्मयीन परंपरा स्वयंभूपणे असावी.
४) प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा.

मराठी भाषा अभिजात आहेः-

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रा. रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाने अभ्यास समिती २०१२ मध्ये गठित केली. या समितीने मराठीचा अभ्यास करून २०१३ मध्ये आपला अहवाल केंद्रशासनाकडे जमा केला आहे. या अहवालानुसार मराठी भाषा ही अभिजात भाषा ठरण्यास कोणतीही अडचण येत नाही.

अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी जे निकष आहेत ते निकष लावून प्रा. रंगनाथ पठारे यांच्या समितीने ४६८ पानांचा अहवाल सादर करताना सखोल आणि चिकित्सक पद्धतीने विचार केला आहे. मराठी भाषेचे प्राचीनत्व या समितीने दाखवताना २००० वर्षांचा इतिहास श्रेष्ठ मराठी साहित्याला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत समितीने प्राचीन महारट्टी, मरहट्टी भाषा, महाराष्ट्री प्राकृत भाषा, अपभ्रंश मराठी भाषा आणि आजची मराठी भाषआ असा मराठीचा प्रवास सुरू असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश आणि मराठी या वेगवेगळ्या तीन भाषा नसून ती एकाच भाषेचे तीन रुपे आहेत. मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ 'गाथासप्तशती' हा सुमारे २०० वर्षे जुना आहे. लिळा चरित्र आणि ज्ञानेश्वरी हे मराठी भाषा अतिशय प्रगल्भ झाल्यानंतरचे श्रेष्ठ ग्रंथ आहेत. संत तुकाराम यांची गाथा यासारखे जागतिक पातळीवरचे ग्रंथ मराठीत लिहिले गेले आहेत. त्याच्या आधी बारा पंधराशे वर्षापूर्वीच मराठी समृद्ध आणि प्रगल्भ अशी भाषा होती. याचे पुरावे अनेक शिलालेख, ताम्रपट यांच्या माध्यमातून उपलब्ध आहेत.

मराठी भाषेचे वय २५०० वर्षे असल्याचे उपलब्ध पुराव्यावरून सिद्ध होते. मराठी भाषेतील पहिला शिलालेख २२२० वर्षापूर्वीचा आहे. पुणे जिल्हात जुन्नर तालुक्यात हा शिलालेख असून तो ब्राम्ही लिपीत आहे. या शिलालेखात 'महारठिनो' असा स्पष्ट उल्लेख आहे. इ.स.७८० च्या सुमारास उद्योतनसुरी यांनी लिहिलेल्या 'कुवलयमाला' या ग्रंथात अनेक भाषांचा उल्लेख असून त्यातील एका भाषेचे नाव 'मरहट्ठ' असे आहे. या ग्रंथात मराठी भाषेतील शब्द व एका मराठी माणसाचे वर्णन आढळून येते.

'मानसोल्लास' किंवा 'अभिलाषतार्थचिंन्तामणी' या शके १०५१ मधील ग्रंथात दोन उतारे मराठी भाषेत आलेले दिसतात. परळ येथील शीलालेख, अक्षीचा शीलालेख, श्रवणबेळगोळ येथील शीलालेख असे किमान ८० पुरावे मराठी भाषेचे प्राचीनत्व स्पष्ट करतात.

मराठी भाषेचा उदय संस्कृतच्या प्रभावाखाली निर्माण झालेल्या प्राकृत भाषेच्या महाराष्ट्री या बोलीभाषेपासून झाला. असे बहुतांशी मानले जाते. सातवाहन साम्राजाने महाराष्ट्र भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा देवनागरी लिपीमध्ये लिहिली जाऊ लागली. १२ व्या शतकात मराठी साहित्याची परंपरा दिसून येते. मुकुंदराज यांचा 'विवेकसिंधू' हा मराठीतील पहिला काव्यग्रंथ मानला जातो. त्यानंतर म्हाईंभट यांचा 'लिळा चरित्र', ज्ञानेश्वरांचा 'ज्ञानेश्वरी' यासारखे ग्रंथ लिहिले असल्याचे दिसून येते.

ज्ञानेश्वरांच्या काळापासून संत साहित्याची परंपरा आपल्याला पाहायला मिळते. पुढे संत एकनाथांनी मराठीत साहित्य रचना केली आहे. संत एकनाथ मराठी भाषेवर भाष्य करताना म्हणतात – "संस्कृत वाणी देवे केली, मग प्राकृत काय चोरांपासून झाली?" संत एकनाथ लिहित होते, ती भाषा कोणती होती? ती आजची मराठीच होती. तरीही तिला प्राकृत म्हणत होते. महाराष्ट्री प्राकृत हीच जुनी मराठी होय.

सुफी परंपरेने मराठी भाषेला मौलिक योगदान दिले आहे. मराठीत लिहिणा-या मुस्लिम, सुफी परंपरेतून मध्ययुगात सुमारे ५५ कवींनी मराठीला समृद्ध केले आहे. तसेच वीरशैवांचेही योगदान महत्त्वाचे आहे.

प्रा. रंगनाथ पठारे यांच्या समितीने अत्यंत अभ्यासपूर्ण असा अहवाल १२८ पानात केंद्रसरकारला सादर करून मराठी भाषा अभिजात भाषा कशी होऊ शकते याचा उहापोह केला आहे. समितीने उचित पुरावेही दिले आहेत. हे सर्व विचारात घेता मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यात काहीच अडचण नाही. केंद्र शासनाने अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी घालून देलेले निकष पूर्ण करूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा का मिळत नाही. हे एक गौडबंगालच आहे.

केंद्रशासनाने अभिजात भाषेसाठी जे चार निकष ठरवून दिले आहेत. ते पूर्ण करणा-या भाषांना आजपर्यंत अभिजात भाषांचा दर्जा दिला आहे. याचा इतिहास पाहता त्यातील काही भाषांच्या आगोदरच्या काळात मराठी भाषा समृद्ध झाली आहे. ज्या भाषांना केंद्र शासनाने अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे त्या भाषा म्हणजे तमिळ (२००४), संस्कृत)२००५, कन्नड, तेलगू (२००८), मल्याळम (२०१३), ओडिया (२०१४) या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा

मिळाला आहे. या भाषांच्या आगोदरचा इतिहास मराठी भाषेला आहे. अशा प्राचिनत्त्व सिद्ध करणा-या मराठी भाषेला केंद्र सरकारने अखेर ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात भाषेचा दर्जा देऊन मराठी अभिजात झाली. हा दिवस मराठी भाषा गौरव दिवस म्हणून साजरा केला जात आहे.

अभिजात भाषा मराठीः होणारे फायदेः-

अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी शासनाने ठरविलेले निकष पूर्ण करणा-या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा अधिकार केंद्र शासनाला आहे. २००४ पासून देशातल्या भाषांचा विकास घडवून आणण्यासाठी, त्यांचे संवर्धन करण्यासाठी प्राचीन भाषा असलेल्या परंतु विद्यमान काळात बोलल्या जात असलेल्या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देऊन त्यांचा विकास घडवून आणण्याचे उद्दिष्ट शासनाने समोर ठेवले, परंतु यामुळे भाषांचा नेमका फायदा काय होणार आहे. हे समजून घेणे आवश्यक आहे.

ज्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला जाईल त्या भाषेचा फायदा काय होणार, याची चर्चा करताना असे दिसून येते की, अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर संबंधित भाषेत संशोधनाला वाव मिळेल. त्यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ केंद्रशासन उपलब्ध करून देईल. मराठीच्या बाबतीत बोलायचे झाले तर मराठीच्या विविध बोलींचा अभ्यास-संशोधन व साहित्यसंग्रह याला चालना मिळेल. भारतातील सर्व विद्यापीठात मराठी शिकवण्याची सोय उपलब्ध होईल. प्राचीन ग्रंथांचा अनुवाद करण्यासाठी प्राधान्य मिळेल. मराठी साहित्यसंग्रह व अभ्यास करण्यात येईल. त्यासाठी महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालये सशक्त करता येतील. मराठी भाषेच्या विकासासाठी काम करण-या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा सर्वांना भरीव अशी आर्थिक मदत मिळेल. असे अनेक फायदे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होईल. असा फायदा यापूर्वी अभिजात भाषेचा दर्जा ज्या ज्या भाषांना मिळालेला आहे. त्या त्या भाषांना वरील फायदे झाले आहेत. त्याप्रमाणे ते मराठी भाषेला अभिजात भाषा हा दर्जा मिळाल्यानंतर होईल. असे अपेक्षित होते.

मराठी अभिजात भाषा आणि सद्य स्थितीः-

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. महाराष्ट्रात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याला एक वर्ष संपून गेले ३ ऑक्टोबर हा दिवस मराठी भाषा गौरव दिवस म्हणून पहिला वर्धापन दिन साजरा झाला. यातून मराठीच्या पदरी काय पडले याचे चिंतन व्हायला हवे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिच्या सद्य स्थितीचा विचार करता मराठी भाषेबाबत फार काही समाधानकारक घडते आहे असे काही दिसत नाही.

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषेच्या विकासासाठी आणि संशोधनासाठी ३०० कोटी केंद्र शासनाकडून मिळणार होते. त्यातून ग्रंथालये सुसज्ज करण्यात येतील असे सांगण्यात आले. प्रत्यक्षात तसे काही झाल्याचे दिसत नाही. ग्रंथालयांची स्थिती जशी होती तशीच आहे. त्यात कोणताही बदल झाल्याचे दिसत नाही.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठीचा वाचक वर्ग वाढेल वाचन संस्कृती पुन्हा उभारी घेईल असे वाटले होते परंतु त्यातही काही फरक झाल्याचे दिसत नाही. आजही वाचन संस्कृतीत उदासिनता असल्याचे चित्र पाहायला मिळते. सातारा येथे एका संस्थेने वाचन कट्टा सुरू करून त्या कट्ट्यावर प्रत्येक बुधवारी रात्री नऊ वाजता एका पुस्तकाचे अभिवाचन करून त्यावर चर्चा केली जात आहे. हा वाचन संस्कृती वाढवण्याचा उपक्रम स्तुत्य वाटतो. असा उपक्रम प्रत्येक शहरात, गावात सुरू झाला तर मराठी वाचन संस्कृती वाढीस लागेल असा आशावाद बाळगायला काही हरकत नाही. यासाठी अशा संस्थांना शासनाने आधार दिला पाहिजे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळून वर्ष झाले. त्याचा वर्धापन दिनही सर्वत्र साजरा करण्यात आला. चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. विविध स्पर्धा घेण्यात आल्या. शाळा, महाविद्यलायातून उत्सव साजरे करण्यात आले. एका बाजूला शासनाने परिपत्रके काढून असे कार्यक्रम घेण्यास व मराठीचा विकास घडवून आणण्यावर भर दिला असे दिसत असताना दुसरीकडे मात्र मराठीविषयी शासन दरबारी आणि जनतेतही उदासिनता असल्याचे पाहायला मिळते आहे. महाराष्ट्र शासनाने काही दिवसापूर्वीच १४००० हजार मराठी शाळा बंद करण्याची घोषणा केली. त्यासाठी कारण दिले की, मराठी शाळांची पटसंख्या पुरेशी नसल्यामुळे या शाळा बंद करण्यात येत आहेत. या शासनाच्या कृतीत उदासिनता दिसतेच पण मराठी टिकली पाहिजे असे म्हणणारे पालकही आपल्या मुलांना मराठी शाळांत पाठवायला तयार नाहीत. यामागच्या कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून उत्सव साजरा करायचा आणि त्याचवेळी मराठीचा प्रसार करणा-या मराठी शाळाच बंद करायच्या या कृतीत शासनाचा विरोधाभास दिसून येतो. मग प्रश्न निर्माण होतो की, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला यामुळे मराठीचे काय भले झाले?

मराठीच्याबाबतीत शासनाची आणखी एक भुमिका दुटप्पीपणाची वाटते. शासनाने एक पत्रक काढून पहिलीपासून त्रिभाषासुत्र धोरण राबवण्यात येत असल्याचे सांगितले. या त्रिभाषा सुत्रानुसार हिंदी भाषा शिकणे अनिवार्य करण्यात येणार होते. परंतु त्याला विरोध झाल्याने हे धोरण शासनाने सध्या मागे घेतले असले तरी ते पुन्हा

कधीही येऊ शकते. त्याचा परिणाम मराठी भाषा शिकण्यावर निश्चित होऊ शकतो. म्हणून शासनाने मराठी भाषा शिकणे सर्वांसाठी सक्तीचे करणे आवश्यक आहे. मराठी भाषेला अभिजाततेचा दर्जा दिला आहे. तर ती शिकण्याची सक्ती का केली जात नाही ? हे कळत नाही.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे पहिले आणि ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जानेवारी २०२६ मध्ये सातारा येथे पार पडले. यात समाधानाची बाब म्हणजे या साहित्यसंमेलनात पुस्तके विक्रीत लाखोरूपयांची उलाढाल झाली. ही गोष्ट सोडता या साहित्यसंमेलनात आणखी काही सकारात्मक गोष्टी घडल्या असल्या तरी मराठी भाषा शिकवण्याच्या दृष्टीने काही विचार झाल्याचे दिसत नाही. मराठी भाषा रोजगाराची भाषा होण्याच्यादृष्टीने विचार, चर्चा व्हायला पाहिजे होती, परंतु तसे होताना दिसले नाही. मग मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला तरी त्याचा फायदा काय ? हे समजत नाही.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात जरी मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. प्रत्यक्षात मात्र ते कोठे राबविले जात असल्याचे दिसत नाही. तसे असते तर मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आता सर्वांनी मराठी भाषेतूनच ज्ञान प्राप्त केले पाहिजे अशी सक्ती केलेली नाही. शासनदरबारी निघणारी परिपत्रके, न्यायलयीन निकालपत्रे, अनेक कार्यालयीन कागदपत्रे यातून अन्य भाषांचाच वापर होत असल्याने मराठी शिकण्याची गोडी कशी निर्माण होईल ? त्यासाठी मातृभाषा या रोजगाराभिमुख बनल्या तर येणारी नवी पिढी मातृभाषा अभ्यासाकडे आपसुकच वळेल, त्यातून मराठी अभिजात झाल्याचे समाधान मिळेल.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून तिचा गौरव करण्यात आला. पण आम्ही मराठी बोलणे कमीपणाचे मानतो आहोत. किंवा मराठीतून संवाद साधण्याबाबत न्यूनगंड बाळगतो आहोत. मराठी भाषेविषयी मराठी भाषिकच अशा पद्धतीने वागत असतील तर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला असला तरी मराठीचा विकास कसा होणार? आणि मराठी टिकणार कशी? असा प्रश्न निर्माण होतो. आज आम्ही मराठी माणसे आमच्या मुलांना इंग्रजी शाळेत शिक्षणासाठी पाठवितो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून मराठी माणसाने आपल्या मुलांना मराठी शाळेत पाठविण्यास सुरवात केलेली नाही. त्यामुळे मराठी शाळा बंद पडत आहेत. इंग्रजी माध्यमातून शिकणे आज भूषणावह मानले जात आहे. मुलं इंग्रजी शाळेत शिकली तरी काही हरकत नाही. परंतु ती मुले जेंव्हा समाजात मिसळून तिथल्या लोकांच्याशी मराठीत बोलताना पालकांना दिसतात. त्यावेळी पालक मुलांच्यावर ओरडतात. तुला इंग्रजी शाळेत मराठी बोलण्यासाठी पाठविला आहे काय? आपल्या मुलांनी मराठीतून बोलणे कमीपणाचे वाटणे हे कशाचे लक्षण म्हणायचे? अशीच आमची जर अवस्था असेल तर मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळूनही मराठी भाषेचा विकास कसा होणार आणि ती टिकणार का? आम्हीच आमच्या मराठीचा सन्मान ठेवणार नसेल तर कोणी ठेवणार? याची जाणीव मराठी माणसाला व्हावी असे वाटते.

रेल्वे स्टेशन, विमानतळ, बस स्टँण्ड, गार्डन, हॉस्पिटल, ऑफिस, रस्त्यावर, मित्राशी, नातेवाईकांशी, बोलताना मराठीतून कसा काय बोलू? तसे केले तर माझ्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल. हा न्यूनगंड मनात बाळगून जोपर्यंत इतर भाषांचा वापर होत राहिल, तोपर्यंत मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला तरी तिच्यात फारसा काहीही फरक पडणार नाही. एकंदरीतच मुलेच जेंव्हा आपल्या आईच्या विरोधात छुप्या पद्धतीने कारस्थाने करीत असतात. त्यावेळी आई अनभिज्ञ असते. अशा अनभिज्ञ आईला तिची मुले दिवसाढवळ्या संपवितात. तशीच अवस्था आज मराठी भाषेची झालेली आहे. अशा परिस्थितीत मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला तरी त्याचा फारसा फायदा झाला आहे म्हणता येणार नाही. भविष्यात मराठीला लाभ होण्यासाठी काही धोरणात्मक निर्णय घ्यायला पाहिजेत, त्याचबरोबर मराठी ही ज्ञानभाषा आणि रोजगाराची भाषा बनली पाहिजे, मराठी विषयी मराठी माणसात प्रेम आणि गोडी वाढायला हवी.

निष्कर्षः –

१) प्रा. रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाने अभ्यास समिती २०१२ मध्ये गठित केली. या समितीने मराठीचा अभ्यास करून २०१३ मध्ये आपला अहवाल केंद्रशासनाकडे जमा केला.

२) मराठी भाषेचे वय २५०० वर्षे असल्याचे उपलब्ध पुराव्यावरून सिद्ध होते. मराठी भाषेतील पहिला शिलालेख २२२० वर्षापूर्वीचा आहे.

३) इ.स.७८० च्या सुमारास उद्योतनसुरी यांनी लिहिलेल्या 'कुवलयमाला' या ग्रंथात अनेक भाषांचा उल्लेख असून त्यातील एका भाषेचे नाव 'मरहट्ठ' असे आहे.

४) १२ व्या शतकात मराठी साहित्याची परंपरा दिसून येते. मुकुंदराज यांचा 'विवेकसिंधू' हा मराठीतील पहिला काव्यग्रंथ मानला जातो.

५) केंद्र शासनाने अभिजात भाषेचा दर्जा तमिळ (२००४), संस्कृत)२००५, कन्नड, तेलगू (२००८), मल्याळम (२०१३), ओडिया (२०१४) या भाषांना मराठी भाषेपूर्वी दिला आहे.

६) प्राचिनत्त्व सिद्ध करणा-या मराठी भाषेला केंद्र सरकारने अखेर ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात भाषेचा दर्जा दिला.

७) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला तर तिच्या विकासासाठी व संशोधनास चालना देण्यासाठी ३०० कोटी मिळणार होते.

८) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळून ३ ऑक्टोबर २०२५ रोजी वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

९) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे तिच्या स्थितीत फार काही फरक पडला आहे असे नाही.

१०)शासनाने एका बाजूला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आणि दुस-या बाजूने १४००० मराठी शाळाच बंद केल्या.

अभिजात भाषा साहित्य: भूत,वर्तमान आणि भविष्य

प्रा. दिलीप शामराव कदम

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर(बुर्ली)

ता.पलूस, जिल्हा सांगली

मो नंबर- ७४९९२८१४३३ मेल: dk8831745@gmailecom

प्रस्तावना:-

प्राचीन काळापासून मराठी भाषेला परंपरा आहे भाषा ही एक संवादाचे साधन नसून ती समाजाचा सांस्कृतिक; ऐतिहासिक'वैचारिक; जीवनाचे प्रतिबिंब आहे. एखाद्या भाषेचे अभिजातत्त्व तिच्या दीर्घकालीन परंपरेत समृद्ध साहित्य निर्मिती व्याकरणात्मक रचनेत आणि समाज जीवनात ही असलेल्या सखोल नात्यातून अधोरेखित होते मराठी भाषा ही अभिजात परंपरेची वाहक भाषा असून तिचा इतिहास प्राचीन काळापासून ते आधुनिक युगापर्यंत अखंडितपणे प्रवाहित आहे मराठी भाषेचा उगम प्राकृत अपभ्रंशातून झाला आहे १० शतकापासून मराठी भाषेला प्रचंड असं स्वरूप आहे दहाव्या शतकात मराठी भाषेला मराठी साहित्यिकाने मोठ्या प्रमाणावर स्पष्टपणे विकसित केले आहे आद्यकवी मुकुंदराज यांनी विवेक सिंधू ग्रंथ लिहून मराठी भाषेला त्या काळामध्ये प्रबल केल्याचे दिसून येते. त्यानंतर ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून त्या ज्ञानेश्वरीतून त्याग कर्म ज्ञान सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्याचे काम केले आहे नामदेव महाराजांनी विठ्ठलाची भक्ती करून भक्तिमार्गातून आपल्या वारकरी संप्रदायाला भक्तिभाव कसा करावा हा संदेश त्यांनी लोकांमध्ये जाऊन दिला आहे नामदेव महाराजांनी भागवत धर्माची पताका पंढरपूर पर्यंतच त्यांनी ठेवली नाही ती पताका पंजाब राजा पर्यंत पोहोचली आहे त्यांचा गुरु ग्रंथ साहेब हा ग्रंथ प्रसिद्ध आहे तुकाराम महाराजांनी सुद्धा आपल्या अभंगातून सामान्य जनतेला अन्याय अत्याचार ढोंगीपणा या वर्तुळात असणाऱ्या जनतेला बाहेर काढण्याचे काम अभंग वाङ्मयातून केले आहे संत एकनाथ महाराजांनी भारुड वांग्मय प्रकार हाताळून त्यांनी लोकशिक्षक या नात्याने गोरगरीब सभा झाला व्यवहार उपयोगी धर्म सांस्कृतिक सामाजिक वातावरण कसे असते ते न्यायिक शिक्षक म्हणून सामान्य जनतेमध्ये जाऊन समाजाला जागृती करण्याचे काम केले आहे त्यांचा भारुड वांग्मय प्रकार प्रसिद्ध आहे संत रामदासांनी दासबोध ग्रंथ लिहिला त्या दासबोधातून जनतेला दुसऱ्याचे दास बनण्यामध्ये तुम्ही इथे थांबू नका आपल्या स्वालंबित जीवनाचे ध्येय गाथा म्हणून आपले मन प्रदूषित न करता त्यांनी मनाचे श्लोक त्यांनी लिहिले आहे यादवकालीन; मोगल कालीन शिवकालीन या काळात मराठी साहित्याने आपली अभिव्यक्ती टिकून ठेवण्याचे काम केले आहे म्हणून मराठी साहित्याला नवीन आयाम आले आहे एक मे 1960 नंतर महाराष्ट्र राज्याची स्वतंत्र अशी निवड झाली 1960 नंतर मराठी साहित्याला नवीन उमेद आली आणि मराठी साहित्यात वास्तविकतेचे साहित्य निर्माण झाले दलित साहित्य स्त्रीवादी साहित्य ग्रामीण साहित्य ग्रामीण साहित्य आदिवासी साहित्य आदिवासी साहित्य मराठी साहित्यात प्रचलित झाले मराठी साहित्यात लेखक कवी कादंबरीकार नाटककार निबंधकार आपल्या मातृभाषेतून लिहू लागले विविध ज्ञानविस्तार हा निबंध मराठी साहित्यामध्ये नावलौकिक असा आहे यमुना पर्यटन ही कादंबरी नाविन्यपूर्ण म्हणून सामाजिक कादंबरी ओळखली जाते वि स खांडेकर कुसुमाग्रज पु ल देशपांडे महादेव शास्त्री या असंख्य मराठी लेखकांनी आपल्या साहित्यातून मोठी देणगी दिली आहे मराठी साहित्यात नव्या पिढीचे लेखक उदयाला आले आणि आपल्या कविता कथा दीर्घकथा स्फूट कथा दंतकथा यातून समाजाला नवीन दृष्टिकोन दिला जागतिकीकरण मध्यम क्रांती व तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे मराठी भाषा नव्या माध्यमातून व्यक्त होत असताना आपणाला दिसते मराठी भाषेपुढे अनेक आव्हाने आहेत इंग्रजी भाषेचा प्रभाव व संगणकातील येणारे आव्हाने मराठी भाषा स्वीकारत करत आहे डिजिटल माध्यम फेसबुक व्हाट्सअप युट्युब इंस्टाग्राम यासारखे मोबाईलच्या युगामुळे मराठी भाषेत वेगवेगळी शब्द संपदा मराठी भाषेने पचवून घेतली आहे मराठी भाषेचा ऐतिहासिक व समकालीन इतिहास पचवून घेतला आहे नव्या पिढीची संवाद व संशोधन प्रसार माध्यमे या सर्वांचा विचार करून मराठी भाषा भाषिक परंपरेचा सुद्धा विचार करतात मराठी भाषेला सामाजिक सांस्कृतिक वैचारिक राजकीय शैक्षणिक असा वारसा आहे वर्तमान व भविष्य याचा अभ्यास करत असताना ऐतिहासिक समकालीन होऊन गेलेल्या गोष्टींचा सुद्धा विचार करावा लागतो अभिजात तिचे स्वरूप स्पष्ट करणे हे महत्त्वाचे आहे सांस्कृतिक दृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या अगोदर अधोरेखित करणे महत्त्वाचे आहे या

शोधनिबंधातून अभिजात भाषेचा वारसा कोणत्या पद्धतीने पुढे आला याचा अभ्यास करणे सुद्धा काळाची गरज आहे भूत वर्तमान भविष्य या गोष्टींचा विचार करणे अत्यंत मला वाटते

विषयाची निवड :-

मराठी भाषेला एक परंपरा आहे मराठी भाषेला अभिजात दर्जा हा परंपरेमधून व वारसा तून मिळालेला आहे मराठी भाषेला ऐतिहासिक; सामाजिक; सांस्कृतिक; धार्मिक वारसा आहे मराठी भाषेला दीर्घकालीन इतिहास आहे प्राचीन काळ मध्ययुगीन काळ अर्वाचीन काळ व यादव काळ शिवकाळ बहामनी काळ या काळात होऊन गेलेल्या साहित्यकाराने जिवंत ठेवण्याचे काम केलेले आहे प्राचीन ग्रंथपरंपरा प्राचीन निबंध प्राचीन व्याकरण कार हे इसवी सणाच्या दहाव्या शतकापासून अस्तित्वात आहेत मराठी भाषेचा विकास त्या काळापासून अखंडितपणे चालू आहे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी सांस्कृतिक वारसा व परंपरा यांची मोठी जोड आहे मराठी भाषेची पाळीमुळे प्राकृत अपभ्रंशातून मराठीचा उगम झालेला आहे मराठी भाषा व त्याची उत्पत्ती ही" शिलालेख ताम्रपट यामधून झालेली आहे चौथ्या व पाचव्या शतकात बोलीरूपात मराठीचे अस्तित्व आपणाला दिसून येते नव्या व दहाव्या शतकात अक्षर रूपात आपणाला व शब्द रूपात दिसते च्या चिकुर्डे येथील ताम्र मद्धे अचलित करवून .करहीत आरहरती.आवुट .ह.इ.स. अकराव्या शतकात शिलेखाद्वारे वाक्य रूपात व ९३८ मध्ये श्रवण बेळगावच्या शिलालेखाद्वारे कोरलेले पहिले मराठी वाक्य"श्री चामुणडराजे करविले . श्री गंगाराजे सुताले करविले. ग्रंथरूपात अकराव्या व बाराव्या शतकात मराठीतील पहिला ग्रंथ "विवेसिंधू" मराठीतील पहिला ग्रंथ "लिळाचरित".इ मराठी साहित्याला संत पंत तंत यांनी अनमोल अशी देणगी दिलेली आहे वारकरी संप्रदाय पंडिती शाहिरी वांग्मय मराठी भाषेचा वर्तमान सांगताना साहित्यिक दर्जा कसा वाढवता येईल हे सांगण्याची तारतम्य अनेक साहित्यिकांनी केलेले आहे संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी अमृत अनुभव चांगदेव पासष्टी संत नामदेवांनी भागवत धर्माचा प्रसार केला धाव भागवत धर्माचा प्रसार पंढरपूर पासून ते पंजाब पर्यंत गुरु ग्रंथ साहेब या ग्रंथात सुद्धा विठ्ठलाचे नामस्मरण भगवत गीतेचे नामस्मरण समाज जीवनाशी असलेली भक्तिमय जीवन त्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला संत एकनाथ महाराजांनी भारुड हा वांग्मय प्रकार हाताळला आहे भारुड या वांग्मय प्रकारातून लोकांना जनजागृती केली संत तुकाराम महाराजांनी भजन अभंग किर्तन यामधून लोकांना जनजागृती केली आहे तुकाराम महाराजांनी अभंग गाथा लिहिली. संत रामदास महाराज यांनी दासबोध हा ग्रंथ लिहिला मनाचे श्लोक त्यांनी मराठी साहित्य मध्ये सामान्य जनतेला सांगितले आहे 1945 नंतर नवीन वांग्मयीन प्रवाह उदयाला आले 1960 नंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली महाराष्ट्र राज्य स्वतंत्र होऊन या महाराष्ट्रातील जनतेला स्वातंत्र्य नव्हते शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक राजकीय वर्चस्व होते स्वातंत्र्य मिळाल्यापासून प्रत्येक प्रदेशातील लेखक कवी नाटककार आपली विचार मांडू लागले वास्तविक भावनिक हे साहित्यातून व्यक्त होऊ लागले म्हणून कथा कादंबरी नाटक चरित्र आत्मचरित्र अशा असंख्य साहित्य सामग्रीने मराठी भाषेला ऊर्जा दिली मराठी भाषा वृद्धिंगत व्हावी यासाठी मराठी भाषिकांचा लेखकांचा साहित्यकरांचा मोठा आटापिटा होता ग्रामीण साहित्यात शेतीवरची गाणी लावणी बडबड गीते अंगाई गीते ही मराठी साहित्याला समृद्ध बनवणारी आहेत दलित साहित्य वेदना विद्रोह आक्रोश सामाजिक संघर्षातून न्यायातून कसा होतो स्पष्ट वास्तविक या दलित साहित्याने मराठी साहित्यामध्ये आणली आहे स्त्रीवादी साहित्य आदिवासी साहित्य नागरी साहित्य या साहित्याने सुद्धा प्रत्येकाचे समस्या प्रश्न विचार कल्पना भावमयता प्रदूषणता कृषीत वातावरण हे रुजवण्याचे काम त्यांच्या लेखणीने साहित्यात केले आहे संगणक युगामुळे मराठी भाषेपुढे मोठी आव्हाने दिसत आहेत इंग्रजी भाषेचा मराठी भाषेवर प्रभाव असून मराठी भाषा संगणकीवाद इंग्रजीचे आहे असे ते शब्द पचवून घेत असताना दिसते मोबाईल युगामुळे नवीन नवीन शब्दांची मांडणी आपल्या डोळ्यासमोर येत आहे जसेच्या तसे डिजिटल युगात आपण मराठी भाषेत मांडत आहोत इंस्टाग्राम युट्युब फेसबुक व्हाट्सअप अशा प्रकारचे शब्द आपण मराठीला सशक्त बनवण्यासाठी घेत आहोत भविष्यकालीन स्थितीचा विचार करत असताना लिखित वाङ्मय प्रकार अस्तित्वात आला आहे मराठी साहित्याला संत कवित्रीने सुद्धा आपणाला आपल्या वाणीतून व जसेच्या तसे वाणी लिखित झालेली आहे संत बहिणाबाई संत कान्होपात्रा संत मुक्ताबाई संत जनाबाई कर्ममेळा इत्यादींनी आपल्या लोकसंस्कृतीतून जनजागृती केलेली आहे उत्तरेकडून सातपुडा रांगेपासून ते कावेरीच्या पश्चिमेकडील प्रांतापर्यंत उत्तरे देव दमन पासून ते दक्षिणेकडील भागापर्यंत मराठीचा विस्तार झाला आहे मराठीच्या उमापासून ते सध्याच्या मराठीच्या स्वरूपात अनेक बदल झालेले दिसतात याबद्दलची एक कारणे म्हणजे मराठी मातीत 16 ते 17 या काळात मराठी साहित्याच्या दृष्टीने वीर तुझा इतिहास व लोकजीवन यांचा संगम घालण्याचा मानला जातो याच काळात मराठी सत्तेचा उदय झाला शिवाजी महाराजांचे कार्य आणि संत परंपरेचा

विस्तार याच काळामध्ये झालेला आहे याच काळात राजकीय धर्मयुद्ध समाज जीवन व नितीमूलय साहित्यात संबंध येऊ लागला साहित्य याच काळात लोकभाषेतील सशक्त पणा येऊ लागला मराठी सत्तेचा उदय झाला शिवाजी महाराजांचे कार्य आणि संत परंपरेचा विस्तार याच काळात झालेला आहे याच काळात राजकीय महत्त्व धर्मयुद्ध समाजजीवन व नीती मूल्य यांचा साहित्यात संबंध येऊ लागला साहित्य याच काळात लोकभाषेतील सशक्त अभिव्यक्ती काव्य गद्य व लोकसाहित्य यांचे समृद्धी संत साहित्यातून भक्तीपरंपरा याच काळात महाराजांनी मनाचे श्लोक सुद्धा लिहिले आहेत साहित्यामध्ये वीर रस पोवाडा परंपरा वीर रसातून युद्धाचा प्रसंग त्यांनी मांडलेला आहे पराक्रमाचा इतिहास स्वराज्याचे वर्णन महाराजांचे पराक्रम मावळयांचे कार्य बखर साहित्य सुद्धा काही साहित्यकाने लिहिलेले आहे सभासद बखर चिटणीस असे वखार भाऊसाहेबांचे बकर याच काळामध्ये लिहिलेले आहेत पंडिती कायद्याची सुद्धा मराठी साहित्याला फार मोलाचे योगदान आहे पंडिती काव्य व संस्कृत भाषेच्या प्रभाव मराठी भाषेवर होता पंडिती काव्य अलंकार क्षम होते व शास्त्रशुद्ध शैलीमध्ये होते पंडिती काव्यातून शासन दरम्यान दरबारी असणारी भाषा हीच साहित्यामध्ये आणली आहे याच काळात मराठी भाषेमध्ये सुद्धा अभंग ओवी पोवाडा लावणी कविता कथा नाटक ग्रंथ नीती ग्रंथ लोकगीते चरित्र आत्मचरित्र याच काळात साहित्याचे महत्त्व वाढलेले आहे मराठी साहित्याला राष्ट्रभावना लागणे इतिहास व समाज यांची प्रतिबिंब भक्ती व वीरता यांचा सुंदर संगम आणि मराठी वाङ्मयाचा विकास झाला आहे

उद्दिष्टे:-

१. अभिजात मराठी भाषेचा ऐतिहासिक आढावा घेणे.

२. अभिजात मराठी भाषेला आवश्यक असणारी निकष पाहणे .

३. अभिजात भाषेला कोणत्या साहित्याने वारसा दिला आहे.

४. भाषा आणि याविषयी निकष पहाणे

५. अभिजात भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर कोणते परिणाम झाले

६. मराठी भाषेची भविष्यातील दिशा पाहणे व भाषेचे संवर्धन करणे

७. अभिजात भाषेचा अभ्यास करणे.

संशोधन गृहीतके:-

१. मराठी भाषा सर्व अभिजात भाषांची निकष पूर्व करणारे समृद्ध व स्वतंत्र भाषा आहे

२. मराठी भाषेचा विकास हा दीर्घकालीन सातत्याने आणि ऐतिहासिक परंपरेतून झालेला आहे .

३. प्राची व मध्ययुगीन मराठी साहित्याने मराठी भाषेच्या अभिजात तिचा पाया घातला आहे

४. संत साहित्य भक्ती परंपरा व लोक साहित्य यांनी मराठी भाषेला सामाजिक अधिष्ठान दिली आहे

५. वर्तमान काळातील मराठी साहित्य हे परंपरा आणि आधुनिकतेच्या समन्वय साधणारे आहे

६.जागतिकीकरण व तंत्रज्ञानामुळे मराठी भाषेच्या वापराच्या स्वरूपाबद्दल झाला असला तरी तिची अभिजातता अबाधित राहते

७. आधुनिक माध्यमांमुळे मराठी भाषेच्या अभिव्यक्तीच्या नव्या शक्यता निर्माण झालेली आहेत .

८. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे तिच्या संवर्धन व संशोधनाला चालना मिळाली

९.भविष्यात मराठी भाषा व साहित्य अधिक समृद्ध होण्याची क्षमता बाळगून जर योग्य संवर्धनात्मक उपाय राबविले गेले

१०. भूत वर्तमान भविष्य यात्री काल अभ्यासातून मराठी भाषेची अभिजात ओळख अधिक सिद्ध होते.

समस्या सूत्रण:-

मराठी भाषेला दीर्घकालीन ऐतिहासिक परंपरा आहे मराठी भाषेला सामाजिक सांस्कृतिक धार्मिक अधिष्ठान आहे प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत मराठी भाषेचे अस्तित्व टिकून राहिले आहे मराठी भाषा ही मातृभाषा असून तिने लोक परंपरा लोक संस्कृती सामाजिक वास्तव सामाजिक ऐक्य टिकवून ठेवण्याचा या भाषेने केला आहे मराठी भाषेचा भूत वर्तमान आणि भविष्य चित्रीत करत असताना वेगवेगळया काळानुसार प्रसंगानुसार प्रदेशानुसार लोकभाषा बोलली जाते म्हणून परंपरेची सुद्धा मराठी भाषेला साथ आहे मराठी भाषेची पूर्तत्व तसेच तिच्या साहित्य

परंपरेतील सातत्य टिकून ठेवण्यासाठी मराठी भाषेने मोठे प्रयत्न केले आहेत साहित्य परंपरेमध्ये शास्त्रीय भाषा प्रमाण भाषा बोलीभाषा या सर्वावर विचार करून आपला अविरत दर्जा प्राप्त केलेला आपणाला दिसून येतो मराठी भाषेच्या साहित्य परंपरेत सामाजिक वास्तव जाणीव नैतिकता आणि सर्व मूल्यांचा या मराठी साहित्यामध्ये समाविष्ट होते भविष्य काळात सुद्धा मराठी भाषा टिकून ठेवण्याचे काम लेखक कवी चरित्र आत्मचरित्रकार यांनी फार मोठे मोलाचे योगदान साहित्यातून दिले आहे मराठी भाषेला ऐतिहासिक मुलाचा वर्तमान घेऊन तिचे स्वर ूप आणि भविष्यकाळात काही विक्रेते असलेल्या आहेत ते शोधनिबंधा साठी मुख्य समस्या कोणती आहे ते हाताळण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून केला आहे.

अभिजात भाषेची संकल्पना:-

अभिजात भाषेची संकल्पनेचा जर विचार केला तर मराठी भाषा ही प्राकृत भाषेतून अपभ्रंश होऊन मराठी भाषेची निर्मिती झाली असे स्पष्ट होते तरी कालांतराने स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली किमान हजार वर्षापासून अधिकाराची लिखित व मौखिक साहित्य परंपरा त्यामध्ये संत साहित्य भक्ती साहित्य लोकसाहित्य राजकीय साहित्य या आधुनिक साहित्यप्रवाहामुळे मराठी भाषा ही समृद्ध बनली आहे मराठी भाषेची संकल्पना केवळ भाषेच्या प्राचीन काळापुरते मर्यादित नाही असून तिची सातत्य शिलविकासात घेऊन सांस्कृतिक वातावरण आत्मसात करून त्या भाषेला सर्जनशील बनवण्याचे काम अनेकांच्या साहित्याने केलेले आहे ज्ञानेश्वरांनी संस्कृत मधून मराठी भाषेमध्ये ज्ञानेश्वरी लिहिली तुकाराम महाराजांनी लोकांच्या सहवासात राहून व्यवहारिक ज्ञान सामाजिक जीवन धार्मिक वातावरण आपल्या अभंगाच्या माध्यमातून सर्व सेठ सावकारांना भजनातून कीर्तनातून अभंगातून मार्गदर्शन केले संत नामदेवाने भक्ती मार्ग स्वीकारून आपल्या वारकरी संप्रदायाला आषाढी व कार्तिकीला पंढरपूरला पायी दिंडी काढण्याचा एक मोठा अठास त्या काळामध्ये केला आहे नामदेवांनी भागवत धर्माचे धुरा खांद्यावर घेऊन आपल्या वारकऱ्यांना पांडुरंग विठ्ठल हेच आपले दैवत आहेत आणि आपणाला संकटातून मुक्त करू शकतात असे त्यांनी भजनातून कीर्तनातून सांगितले आहे तसेच काही काळ लोटल्यानंतर मराठी साहित्याला नवीन नवे रूपे येऊ लागली आणि कथा कादंबरी नाटक यासारख्या साहित्यातून मराठी साहित्याची निर्मिती होणार मराठी भाषा बोलणारा व्यक्ती अनेक प्रदेशात राहत असून तेथील सुखदुःख दैन्य दारिद्र्य उपासमारी वास्तविकता सामाजिकता आपल्या लिखित स्वरूपामध्ये पुस्तक रुपी साहित्यात येऊ लागले ग्रामीण साहित्य दलित साहित्य स्त्रीवादी साहित्य आदिवासी साहित्य निर्माण झाले मराठी भाषेला लोकप्रमुख करण्यासाठी अनेक लेखक कवीने आपले कार्य चालू ठेवले सांस्कृतिक वातावरण निर्माण करा सामाजिक तिची जाण त्यांना सांगणे हे लेखक कवींचे लेखणीतून काम होते मराठी भाषेला गौरवशाली परंपरा आहे याच काळात ऐतिहासिक साहित्य सुद्धा निर्मिती झाली असे देण दिसून येते युद्धप्रसंगात झालेल्या घडामोडी चा इतिहास साहित्यात येऊ लागला आणि मराठी सत्तेचा उदय झाला आणि त्या काळात ऐतिहासिक साहित्याची निर्मिती झाली भाऊसाहेबाचे बखर पेशव्यांची बखर आशा बखरीतून त्यांनी घटना प्रसंग वेळ सामाजिक वास्तव चित्र रेखाटले आहे काळानुसार बदल होणे हे सुद्धा महत्त्वाचे असते मराठी भाषेने ललित साहित्यातून वेगवेगळ्या प्रकारच्या फूट कथा दीर्घ स्कंद दीर्घ कविता काव्यमे रचना अशा प्रकारचे लेखन त्यावेळेस त्यांनी केलेले आहे प्रतिनिधीची मोहकता स्वयपणा आणि समृद्ध परंपरा यामुळे दर्जा प्राप्त झाला आहे शैक्षणिक वातावरण सामाजिक जाण प्रत्येक अभ्यासक्रमातून स्पष्ट होत असतात मराठी भाषेला स्वतंत्र हसी स्वयंभूपणा आहे तिने दीड ते अडीच हजार वर्षांपूर्वी मराठी भाषेचा अस्तित्व टिकून आहे संशोधन कार्यशाळा चर्चासत्र संमेलने मराठी भाषेचा गौरव चिकित्सक अभ्यास या सर्वांमधून मराठी भाषेची ओळख होत असताना दिसते.

व्याख्या:- .

१. अभिजात मराठी भाषा म्हणजे मानवी जीवनातून अध्यात्मिक सामाजिक राजकीय सांस्कृतिक अनुभवाचे कलात्मक व मूल्य प्रतिबिंबित असलेले साहित्य होय

२.ज्या भाषेला दीर्घ इतिहास लिखित परंपरा लोक जीवनाचे नाते सातत्यपूर्ण साहित्य निर्मिती लाभलेली आहे ती भाषा अभिजात ठरते मराठी भाषा प्राचीन काळापासून आजपर्यंत या सर्व निकषांना पूरक ठरते

३. भविष्यातील अभिजात मराठी भाषा साहित्य म्हणजे डिजिटल माध्यमे संशोधन भाषांतर आंतरराष्ट्रीय संवाद व निर्णय नव्या पिढीच्या सर्जनशील ते मुळे अधिक व्यापक समृद्ध व जागतिक स्तरावर पोहोचवणारे मराठी भाषा व साहित्य होय परंपरा आणि नव्हता यांचा समन्वय साधत मराठी अभिजात ओळख अधिक दृढ होईल.

उपाय योजना:-

१. मराठी भाषेचे संवर्धन करणे

२. शैक्षणिक पातळीवर उपाययोजना आखणे.

३. संशोधन व अभ्यास प्रति वृद्धिंगत करणे. .

४. सामाजिक व सांस्कृतिक पातळीवरील उपाय करणे

५. भविष्यकालीन दिशा व स्थानबद्धता दहरढ करणे

६. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करणे. .

७. अभिजात मराठी भाषेबद्दल धोरण आखणे

विषयाचे महत्त्व:- .

मराठी भाषा ही मातृभाषा असून मराठी भाषेला परंपरा आहे मराठी भाषा महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक फलश्रुती आहे महाराष्ट्र संतांची भूमी आहे व याच महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाने भजन कीर्तन अभंग यामधून लोक परंपरा जागृत ठेवली आहे महाराष्ट्राचा भूभाग विविध प्रदेशाने विभागला असला तरी त्या प्रदेशात राहणारी संस्कृती धार्मिक राजकीय शैक्षणिक वातावरण कसे आहे ते आपणाला भाषेमधून आलेले दिसते मराठी भाषेला ऐतिहासिक परंपरा आहे प्राचीन वारसा आहे मराठी भाषेची ओळख आहे मराठी भाषा लवचिक असून तसेच दिला चौकटीबद्दल आणण्यासाठी व्याकरण सुद्धा अमलात आणले आहे भूत भविष्य वर्तमान यामधील घडलेल्या घटना प्रसंग कशा पद्धतीने असतात ही भाषेच्या माध्यमातून आपणाला करते भाषा ही एक सामाजिक माध्यम आहे समाजाचे सर्व समस्या या भाषेमधून चित्रित होतात मराठी साहित्यामध्ये संत साहित्य पंत साहित्य निर्माण झाले आणि त्यांच्या ग्रंथरूपात साहित्यामध्ये साहित्यामध्ये समाविष्ट झाले मराठी साहित्यात यादव काळ बहामनी काळ शिवकाळ सुद्धा अस्तित्वात आला या कालखंडातील दत्तकालीन समाज स्थितीचे वर्णन साहित्यात आलेले दिसून येते मराठी भाषेचा अभिजात दर्जा शास्त्रीय निकषावर आधारित करता येतं त्या काळातील साहित्यिक परंपरेचे आकलन करून देणे अत्यंत गरजेचे असते भूतकाळातील साहित्य निर्मितीचा आढावा घेतला तरी आपणाला संत साहित्यातून सांगता येतो संत साहित्यात सामाजिक धार्मिक व राजकीय जीवनाचे प्रतिबिंब आहे त्या अभ्यासातून समाज रचना समजण्यात मदत होते सामाजिक व्यवस्था व ऐतिहासिक सत्यता स्पष्ट होते मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्या मुळे भाषेचे आकलन संस्कृती वारसा हे आपल्याला दिसून येते भविष्यकाळात टिकवून ठेवणे हे मराठी भाषेचे मोठे योगदान आहे अभिजात दर्जा मिळाल्यामुळे वैचारिक बांधिलकी समाजासाठी उपयुक्त ठरते आधुनिक व समकालीन मराठी साहित्याने समाजातील बदल संघर्ष अनेक साहित्यातून आलेला दिसून येतो त्यामध्ये आदिवासी साहित्य दलित साहित्य देशी साहित्य ग्रामीण साहित्य या साहित्यातून सामाजिक जाणीव सामाजिक समस्या व वैचारिक घडामोडी या सर्व मराठी भाषेच्या माध्यमातून दिसत असतात मराठी भाषेला भाषिक सौंदर्य सुद्धा लाभले आहे मराठी भाषेला शब्द सामर्थ्य भाषेची क्षमता भाषेची ओळख अनेक साहित्यातून आपणाला सांगता येते ना ती भाषा अलंकारिक सौंदर्य प्रिय असून प्रत्येक व्यक्तीची अभिव्यक्ती आपल्या भाषेतून व्यक्त होत असताना दिसते मराठी भाषिकांना त्यांचा कलागुणांचा विकास होण्यासाठी आपल्या मात्र भाषेतून शाळा महाविद्यालय अभ्यासक्रम कार्यशाळा चर्चासत्र संशोधन साहित्य संमेलने इत्यादीतून मराठी भाषेचा संवर्धन होण्यास मदत होते मराठी भाषा एक अनमोल अशी देणगी आहे वर्तमान भविष्य यात्रिकाल बाधित शब्दातून मराठीची चिकित्सक् आपणाला सांगता येईल. मराठी भाषेची भविष्य सुरक्षित समृद्ध करण्यासाठी योग्य दिशा मिळतील नव्या माध्यमातून डिजिटल साहित्य चित्रपट वेबसाईट मराठी भाषेचा प्रभाव वाढवणे नवीन पिढीला जोडणे आणि जागतिक पातळीवर मराठी भाषेचा प्रसार प्रचार करणे हे महत्त्वाचे असते जागतिक स्तरावरील मराठी भाषेची ओळख ही साहित्यातून लोकसंस्कृती लोककला लोक परंपरा भाषिकता हे सर्व आपणाला दिसून येते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा प्राप्त होते याविषयीच्या अभ्यास मराठी भाषेची जागतिक संस्कृतिक योगधनातील भूमिका अमेरिकेत करतो अभिजात मराठी भाषा व साहित्य भूत वर्तमान भविष्य मराठी ची गरम परंपरा आहे परंपरा पासून ते समकालीन वास्तव आणि भावी शक्यता यांचा समावेश जातो त्यामुळे हा विषय अत्यंत मोडकतेचा ठरत असतो साहित्यिक विकास आणि भविष्यकालीन संवर्धन करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मराठीचा उगम व अध्यायिक ठसा हे जर आपण संवर्धन करीत राहिलो तर आपली मराठी भाषा ही सजीव राहू शकते.

मराठी भाषेचा उगम श्रवण बेळगावच्या शिलालेखात सापडत नसून ती गोमटेश्वराच्या सापडत नसून तिचे मुळे ही खोल आहेत गोदावरीच्या खोऱ्यातील कवींनी केलेली स्वरांचे संकलन करून सातवाहन राजाने ग्रंथ संपादित केला त्या त्या अति प्राचीन काळातही मराठीची ध्वनिमुद्रिका ही प्रसिद्ध होते ध्वनी मधून अक्षर वाङ्मय तयार होते प्राचीन काळात सुद्धा मराठीचे व्याकरण प्रचलित होते मराठी भाषेला तीनशे वर्षांपासून कालखंड सुद्धा आपणाला सांगता येईल वरुड राजाने मराठी मधून ग्रंथ लिहिला त्या ग्रंथाचे नाव "खातायन" असे आहे. त्या ग्रंथात तुम्हाला व्याकरणाची रचना

मराठी भाषेचे उत्पत्ती मराठी भाषेचा उगम आपणाला पाहिला मिळतो मराठी भाषा ही रात्र भाषेपासून उगम झालेला आहे २३०० वर्षाचा इतिहास आपणाला निश्चित करता येईल आद्यकवी मुकुंदराज ते ज्ञानेश्वर व संत परंपरा आणि मध्ययुगीन काळातील वांग्मय तसेच आधुनिक काळातील साहित्याची नवे रूपे हे आपणाला मराठी भाषेत आलेले आपल्याला दिसतात मराठी भाषा समृद्ध व संपन्न झाली आहे

12 व्या शतकात ज्ञानेश्वराने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला विवेक सिंधुकारमुकुंदराज यांच्या यांच्या ग्रंथ संपदेने मराठी साहित्याचे वैभव वाढले आहे संत एकनाथ महाराजांनी आपल्या वारकरी संप्रदायाला भारुड हा लोककला वापरले आणि जनमानसात जाऊन भारुडाच्या माध्यमातून त्या काळात एकनाथ महाराजांनी परिवर्तन केले आहे छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्य व्यवहार कोश मराठीतून तयार केला आणि स्वराज्यासाठी मराठी भाषा वापरात आणणे हे महत्त्वाचे आहे असे राजांनी त्यावेळी सांगितले शिवाजी महाराजांनी आपली राज्यव्यवहाराची भाषा मराठीतच असली पाहिजे असे मराठी माणसांना सांगितले पंडिती कायद्याने आपल्या काव्यातून जगाला उपदेश केला अठराव्या शतकात दादोबा पांडुरंग यांनी मराठीच्या व्याकरणाचा ग्रंथ लिहिला तो काळ म्हणजे प्राचीन काळात होय प्राचीन काळाचा विचार करत असताना दीड हजार ते अडीच हजार वर्षाचा काळ मराठीला सजीव स्वरूपात आलेला आहे हेच मराठी भाषेचे वैभवशाली व गौरवशाली भाग्य आहे त्यानंतर वेगवेगळ्या लिखाणातून साहित्यिकाराने आपली साहित्य कलाकृती आणली आहे वैचारिक साहित्य देशी साहित्य मौलिक विचार या सर्वांमधून मराठी भाषेचा उदो उदो झालेला आहे सातवाहन काळातील महाराणी नागा अंबिका ही नाही घाटात कोरलेला लेण्यांमधील अनेकदा लेख भाषेच्या स्वरूपात कोरलेले आहे ते सुद्धा पुरावे मराठी साहित्याला पूरक ठरतात मराठी भाषेत एकूण बोलीभाषा 42 आहेत असे भारतीय विद्यमान सांगतात अहिराणी वराडी विवाहित धरवी खानदेशी मराठवाडी कुणबी कोकणे या प्रमुख बोलीभाषांचा दोन हजार वर्षाचा इतिहास आपल्याला सांगता येईल मराठी साहित्यात संत साहित्याने तर मोठ्या प्रकारची अनमोल अशी देणगी दिलेली आहे तरी ज्ञानेश्वर महाराज म्हणतात माझ्या मराठीची बोलू कौतुके अमृतातही पैजा जिंके संत नामदेव महाराज म्हणतात की नाचू कीर्तनाच्या अंगी ज्ञानदीप लावू जगी संत तुकाराम महाराज म्हणतात की वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे संत रामदास महाराज म्हणतात की मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण बरोबर महाराष्ट्रातील अठरापगड जातीतील वारकरी संप्रदाय एकत्र होऊन विठ्ठल भक्तीच्या नामस्मरणात व व्यवसायाच्या माध्यमातून विठ्ठल भक्तीचा मार्ग त्यांनी स्वीकारला संत सावता माळी म्हणतात की कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी संत नरहरी सोनार नळी फुंकले सोनारे इकडून तिकडे वारे जाई संत चोखामेळा ऊस डोंगा परी रस नाही डोंगा काय भुललासी वरली अंगा संत सेना नाही आम्ही वारिका वारिक अजमत करू बारीक संत जनाबाई मुंगी उडाली आकाशी तिने गेलेले सूर्याशी आशा त्यांच्या वाणीतून निघालेले शब्द काव्यात रूपांतर झाले आणि मराठी साहित्याला समृद्धी मिळाली मराठी साहित्य अशक्त राहता सशक्त बनले संत गाडगे महाराजांनी ग्राम स्वच्छतेचा संदेश दिला आणि गोपाळा गोपाळा देवकीनंदन गोपाळा या मंत्र वृद्ध गीताने सामान्य जनतेला स्वच्छतेचा संदेश दिला संत तुकडोजी महाराजांनी आपल्या वाणीतून सामाजिक व्यवहारिक संदेश दिला याच काळामध्ये समाज जागृती सुद्धा महत्त्वाचे होते 1960 नंतर नवे रूपे नवे साहित्य मराठी साहित्य आली दलित साहित्य ग्रामीण साहित्य स्त्रीवादी साहित्य नागरी साहित्य देशी साहित्य विज्ञानवादी साहित्य या साहित्याने मोठा अनमोल ठेवा मराठी साहित्याला दिलेला आहे म्हणून मराठी भाषेची असे आपणाला वैभवशाली परंपरा आणि अभिजात दर्जा मिळालेली महत्वपूर्ण परंपरा ही कळते म्हणूनच मराठी भाषेला आज सुवर्णकाळ आलेला आहे

पथ्ये:- .

१. विषयाची त्रिकालिक मांडणी स्पष्ट ठेवा. .

२. अभिजात मराठी भाषेची संकल्पना वैशिष्ट्ये व निकष सुरुवातीला स्पष्ट करा.

३. साहित्य भाषा संस्कृती व समाज याचा परस्पर संबंध आधुनिकित करा.

४.ऐतिहासिक संदर्भ कालखंडानुसार मांडावेत

५.ऐतिहासिक वर्णनात्मक व विशेषणात्मक पद्धतीचे वापर करा .

६. संदर्भ ग्रंथ संशोधन लेख शोधनिबंध सदिच्छात्मक ग्रंथ याचा आधार घ्यावा

७. भाषा शुद्ध व शॉपी शास्त्रीय व निर्मिती असावी .

८. अनावश्यक अलंकारिक किंवा भावनिक भाषा टाळा

९. व्याकरण लेखनाची काळजी घ्या

१०. एकसंघ वसुसंवत शैली ठेवा ११ उपशिक्षके ट्रस्ट व अर्थपूर्ण असावेत

वैशिष्ट्ये:-

१. त्रिकाल अभ्यासाची वैशिष्ट्ये:- भूत वर्तमान भविष्य काळानुसार मराठी भाषेचा अभ्यास करता येतो

२. अभिजातत्त्वाच्या संकल्पनेचा स्पष्ट अभ्यास:-भाषेचे निकष स्पष्ट होतात साहित्यिक घटक प्राचीन अभ्यासात येतात भाषेची व्याख्या महत्त्वाची असते. ३.ऐतिहासिक व सांस्कृतिक वर्षाचे दर्शन:- प्राचीन मध्ययुगीन आधुनिक अर्वाचीन मराठी साहित्याची समृद्धता व साहित्य वारसा उलगडत असतो

४. भाषिक विकासाचा शास्त्रीय अभ्यास:-भाषेचे शब्द संपदा शैली लिपी याचा कालानुक्रम विकास मांडता येतो

५. साहित्य प्रवाहाचा सर्वांगीण अभ्यास:-संत पंत तंत ग्रामीण दलित स्त्रीवादी साहित्य इत्यादी प्रवाहाचा अभ्यास करता येतो

६. वर्तमान कालीन स्थितीचे व विश्लेषण:-मराठी विषयाचे स्थान व प्रसार माध्यमे व अडचणी अर्थस्वरूप प्राप्त होत असतो किंवा समजत असतो

७. समाजभिमुख दृष्टिकोन:-भाषेचे संवर्धन जतन करणे प्रसार माध्यमाच्या दिशा करणे डिजिटल युगातील मराठीचे स्थान मांडता येते

८. सामाजिक व शैक्षणिक महत्त्व:-मराठी भाषेविषयी अभिमान असावा लागतो मराठी भाषा समाजाची असते मानवी जीवनात भाषेला महत्त्वाचे स्थान आहे ९. संशोधन मूल्य व उपयुक्तता:- मराठी भाषेत भाषाशास्त्र. साहित्यशास्त्र संस्कृतीचा अभ्यास यासाठी महत्त्वाचा ठरतो

१०. लोक परंपरा अभिजात यांचे नाते:-लोकसाहित्य व अभिजात साहित्य यातील सातत्य परत संबंध स्पष्ट होतो मौखिक परंपरेच्या लिखित साहित्य वर झालेला प्रभाव हा अभ्यासता येतो .

११. तंत्रज्ञान व डिजिटल अभिजातता:- मराठी साहित्य डिजिटल संग्रह भाषांतरित साधने ई. लर्निंग. मराठी भाषा अभिजात ग्रंथाचे डिजिटल आलेले आहे ते जतन करून ठेवलेले आहे त्यांचे महत्त्व

११.संशोधनातील नाविन्यपूर्णता :- परंपरा व आधुनिकता यात संवादात्मकता अभ्यास नव्या संदर्भातून अभिजात मराठी भाषेमध्ये शोधण्याची संधी मिळते.

समारोप :-

अभिजात मराठी भाषा व साहित्य अभ्यास भूत वर्तमान व भविष्य यात्रिकालीन परिपेशातून केल्यास मराठी भाषेची समृद्ध परंपरा सातत्यपूर्ण विकास व भविष्यकालीन शक्यता स्पष्टपणे लिखित होतात प्राचीन व मध्ययुगीन काळात मराठी भाषेने संत साहित्य भक्ती साहित्य वीर साहित्य लोकसाहित्याच्या माध्यमातून आपली अभिजात ओळख निर्माण केली ज्ञानेश्वर नामा देव एकनाथ तुकाराम यासारख्या संतांनी मराठीला सांस्कृतिक व मानवी मूल्यांची उंची प्राप्त करून दिली आहे वर्तमान काळात मराठी भाषा व साहित्य विविध आधुनिक व उत्तर आधुनिक साहित्यात नव्या साहित्याची नव्या भीती अभिव्यक्तीची नव्या अभिव्यक्तीची रूप उदाहरण करताना दिसते दलित साहित्य स्त्रीवादी साहित्य आदिवासी साहित्य ग्रामीण साहित्य व महानगरीय साहित्य प्रमाणे मराठी साहित्याला सामाजिक वास्तवाचे नवे आयाम दिले आहेत . तथापि जागतिकरण इंग्रजीकरण व तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे अभिजात मराठी समोर काही आव्हाने उभी राहिली आहेत तरी शिक्षण प्रशासन माध्यमे व डिजिटल क्षेत्रात मराठीचा वाढता वापर तिच्या सशक्तीच्या साक्ष देतो भविष्याच्या दृष्टीने पाहता अभिजात मराठी भाषेचे संवर्धन जतन व प्रसार यासाठी शैक्षणिक धोरणे तंत्रज्ञानाचा योग वापर डिजिटल क्षेत्रात मराठीचा वाढता इतिहासाची साक्ष देतो भविष्याच्या दृष्टीने पाहता अभिजात मराठी भाषेची संवर्धन जतन प्रसार करण्यासाठी शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करतात नव्या पिढीमध्ये मराठी भाषेबद्दल जाणीव अभिमान व आपुलकी निर्माण केल्यास अभिजात मराठी भाषेचा वारसा पुढील काळात अधिक समृद्ध होऊ शकतो अखेरीस असे मानता येईल मराठी भाषा व साहित्यही केवळ वर्तमान काळातील जिवंत वास्तव आणि भविष्य काळाची अशक्त शक्यता आहे या शोधनिबंधातून मराठी भाषेच्या अभिजात तिचा शास्त्रीय व सर्वांगीण अभ्यास घडून येत असून तो मराठी भाषा साहित्य व संस्कृतीच्या संवर्धनासाठी मोलाचे योगदान ठरते

संदर्भ ग्रंथ:-

१. मराठी भाषा उद्गम व विकास-कृपा कुलकर्णी

२. भाषा आणि संस्कृती-डॉ अशोक केतकर.
३. मराठी संत परंपरा-डॉ.रा.ची . ढेरे
४. आधुनिक मराठी साहित्य-गंगाधर गाडगीळ
५ मराठी साहित्याचा इतिहास-भालचंद्र नेमाडे
६ स्त्रीवादी मराठी साहित्य-डॉ. अरुणा ढेरे
७ मराठी भाषा स्वरूप आणि विकास-श्री पु भागवत
८ मराठी साहित्य प्रवाह व प्रक्रिया: म .द.हाटे
९ मराठी भाषा परंपरा आणि विकास: महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ

मराठी साहित्यातील वंचित व विस्थापितांचे चित्रण

डॉ. रमजान गुलाब तडवी,
मो-९८६०५२६६८१
ईमेल-rgtadavi@gmail.com

प्रस्तावना

मराठी साहित्याने आजवर समाजातील प्रत्येक घटक चितारला आहे. मराठी साहित्याच्या सर्वसमावेशक रुपाने अनेकांना न्याय मिळवून दिला आहे. मराठी साहित्याने रसिकांचे मन रिझविणे हे मुख्य उद्दिष्टही साधले आहे. मराठी भाषेचे अनेक आविष्कार दाखविले आहेत. वंचित लेखकांना व वंचित समाजघटकांनाही विशिष्ट ओळख निर्माण करुन दिली आहे. मराठी साहित्य शहरी व ग्रामीण अशा सर्व ठिकाणी संचार करते. जो लिहेल त्याचे होवून जाते. वंचित व विस्थापितांचे मराठी साहित्यातील चित्रण हा विषय जिव्हाळ्याचा आहे. 'जे न देखे रवी ते देखे कवी' या म्हणीनुसार मराठी कवीला वंचितही दिसले आहेत. वंचित व विस्थापितांच्या मराठी साहित्यातील चित्रणावर या निबंधामार्फत प्रकाश टाकला आहे.

सुरुवातीला ढोबळमानाने वंचित विस्थापितांचे स्पष्टीकरण केलेले आहे. वंचित विस्थापित हे समाजात नेमकी कोणती भूमिका निभावतात याची फोड केली आहे. वंचित विस्थापितांचे भौगोलिक स्थान, त्यांच्या संपर्कातील समाजघटक अधोरेखित केलेले आहेत. त्यांच्या उदरनिर्वाहाची साधने, रोजगार यावरही प्रकाश टाकला आहे. निबंधाच्या मुख्य भागात समर्पक विवेचन केले आहे. वंचित व विस्थापित कथाकारांच्या कथांतील उतारे देवून वंचित विस्थापितांच्या चित्रणावर प्रकाश टाकला आहे.

वंचित व विस्थापित समाजघटकांची व्याख्या

वंचित म्हणजे ज्याच्याकडे कुणाचेही लक्ष गेले नाही असा समाजघटक. उदरनिर्वाह होवू न शकण्याच्या स्थितीत मूळ गाव हंगामी अथवा कायमस्वरूपी सोडलेल्या समाजघटकालाही विस्थापित म्हणतात. मूळ गावातच राहून अर्धपोटी व दारिद्र्यात जगणाऱ्यालाही लाक्षणिक अर्थाने विस्थापितच म्हणतात. काम करण्याची इच्छा असूनही काम न मिळण्याच्या स्थितीला बेरोजगारी म्हणतात. काम मिळालेल्या तथापि कौशल्याशी विसंगत असलेल्या स्थितीलाही बेरोजगारीच म्हणतात. जास्त वेळ राबवून घेणे, अतिश्रम करवून घेणे व त्याप्रमाणात आर्थिक मोबदला न देणे. या स्थितीला शोषण म्हणतात. बेरोजगारी व शोषणामुळेच विस्थापनाची स्थिती ओढवते. प्रसिध्द आदिवासी साहित्यिक वहारुदादा सोनवणे यांच्या गोधड काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत भारत पाटणकर यांनी "ऊसाचा रस पिणारी माणसं आणि माणसांचा रस पिणारे ऊस " १ अशी समर्पक उपमा शोषणकर्त्यांना दिलेली आहे. माणसांचा रस पिणाऱ्या ऊसाची उपमा जमिनदार, सावकार, मालदार, करप्ट नोकरदार अशा धनदांडग्यांना दिलेली आहे.

वंचित व विस्थापित समाजघटक

डोंगराळ भागातील आदिवासी वनमजूर. ग्रामीण भागातील महिला, पुरुष भूमिहीन शेतमजूर. हंगामी अल्पभूधारक शेतमजूर. स्त्रीपुरुष ऊसतोड कामगार. ग्रामीण, निमशहरी व शहरी भागात काम करणारे बांधकाम कामगार. स्त्रीपुरुष सफाई कामगार. भटके व विमुक्त. स्त्रीपुरुष भिकारी, बहुरुपी, दरवेशी. रेल्वेस्टेशनावरील, पदपथावरील अनाथ स्त्रीपुरुष. पुलाखालील, धार्मिक स्थळांच्या समोरील स्त्रीपुरुष हे वंचित व विस्थापित आहेत.

वंचित साहित्यप्रवाहाचा उगम

उन्हातान्हात, पाणीपावसात राबून मिळविलेल्या चार पैशांचे मोल अनमोल असते. अल्पशिक्षित व निरक्षर कष्टकरी माणसे रानावनात व शेतशिवारात राबतात. कसेतरी पोट भरतात. पोट भरण्याची मारामार असलेल्यांचे

पुरेसे शिक्षणही होत नाही. वहीवर उमटलेल्या संर्घषमय जीवनाच्या लेखनाला कविता म्हणावे की कथा असाही प्रश्न पडतो. जसे जगलो तसे लिहीले यात शास्त्रशुद्ध साहित्यिक परिमाण पाळले गेले नाहीत. अस्सल जीवनानुभवाचे खणखणीत साहित्यरुपी नाणे म्हणून प्रकाशकानेही प्रकाशित केले. वंचित व विस्थापितांचे साहित्यात चित्रण करणाऱ्या लेखकांची ही खासीयत आहे. परंतू काम करता करता उच्चशिक्षीत झालेले वंचित व विस्थापित कवी लेखकही आहेत.

वंचित विस्थापित लेखकांवरील संकट

संर्घषमय जीवनानुभव, चिंतन, विचारमंथन यातून साहित्यनिर्मिती होते. विज कडकडावी तशी क्षणार्धात लिहीण्याची उर्मीही होते. पण लिहीलेले वाचेल कोण व छापलेलं पुस्तक विकत घेईल कोण हा बाका प्रश्न उद्भवतो. उधार उसनवारी करुन, पुस्तकांचा आर्थिक मोबदला न मिळण्याची जोखीम पत्करुन लिहत राहीले पाहिजे असे के.व्ही.सरवदे पुढीलप्रमाणे म्हणतात."आपल्या परंपरेतील ज्वालाग्राही, तेजस्वी, शाश्वत विचार आपण कुठल्या माध्यमाने त्यांच्यापर्यत पोहचवणार आहोत ? असे विचार त्यांच्यासमोर ठेवल्याशिवाय मुर्दाड मने जागी तरी कशी होणार ? गुलामाला गुलामीची जाणीव करुन दिल्याशिवाय तो बंड करुन उठणार नाही हे तत्व ध्यानी घ्यावे"२ अनेक अडचणी समोर उभ्या ठाकल्या तरी वंचित व विस्थापितांवर प्रकाशझोत टाकणारे साहित्य निर्माण व्हावे या विचाराला या म्हणण्याने बळकटी येते.

वंचित कवी कथाकारांचे हितशत्रू

विस्थापित व प्रस्थापित हे दोन्ही शब्द परस्परविरुध्द आहेत. कवी कथाकाराने लिहीलेले साहित्य शोषित व वंचितांचे प्रतिनिधीत्व करते. आदिम जगणे मांडून जखमा भरण्याचे प्रयत्न करते. याने प्रस्थापितांची नस ठणकते. वैचारीक क्रांती होवून गुलाम गुलामी झुंगारतील. आपणासमोर आज लाचारी पत्करणारे उद्या ताठ मानेने आपल्यासमोर उभे राहातील. शोषणाविरूध्द बंड पुकारतील. अशी भीती प्रस्थापितांना विस्थापित साहित्याची वाटते. म्हणून विस्थापितांचे साहित्य लिहीणाऱ्याचे प्रस्थापित हितशत्रु होतात. एकतर उदरनिर्वाहाचा आ वासून उभा असलेला प्रश्न व वरुन हितशत्रुंचा ताप अशा दुहेरी संकटात वंचित व विस्थापितांचे साहित्य लिहीणारा सापडतो.

मराठी कथा कांदबऱ्यातील वंचित विस्थापितांचे चित्रण

शोषणामुळे गरजेइतके धन मिळणेही दुरापास्त होते. पोट भरण्यासाठी धान्यही जेमतेमच मिळते. सरकारी धान्य वितरण व्यवस्था बऱ्यापैकी भूक भागवितात. जमिनीतून धान्य पिकविणाऱ्या पावसाच्या पाण्यावर वंचित विस्थापितांची पूर्ण मदार असते. पाऊसमान ज्या वर्षी नियमित त्या वर्षी वंचित विस्थापित आनंदी असतात. अवर्षणाच्या स्थितीत भूक भागविण्याच्या काळजीमुळे बेहाल होतात वंचित विस्थापितांच्या जीवनाशी निसर्ग असा एकरुप झालेला आहे. निसर्गाला प्रसन्न करुन पाऊस पडावा म्हणून जीवाचा आटापिटा केला जातो. याचे प्रतिबिंब मराठी साहित्यातून उमटते. निसर्गाने काळ्या ढगांतून जलधारा बरसवाव्यात म्हणून खेडूत धोंडीगित म्हणतात. असे पारंपारिक धोंडीगित आदिवासी लेखक सुनिल गायकवाड पुढीलप्रमाणे त्यांच्या कथेत अधोरेखित करतात. "धोंड्या धोड्या पाणी दे, शाय माय पिकू दे, आर्धी रोटी बगलमा पाणी उना जंगलमा" ३ या आर्जवाला अनुसरुन पाण्याने कोसळावे अशी अपेक्षा असते.

आधुनिक शिक्षणामुळे जागृती झालेली आहे. वंचित विस्थापितही जिल्हापरिषदेच्या शाळा, शासकीय आश्रम शाळा येथून शिक्षण घेत आहेत. वंचित विस्थापितांच्या कल्याणार्थ विविध सरकारी योजनाही सरकारकडून राबविल्या जातात. अन्याय अत्याचार झाल्यावर दाद मागण्याचे अनेक पर्यायही उपलब्ध आहेत. सामाजिक संघटना गठीत झालेल्या आहेत. त्यामुळे वर्तमानकाळात गावखेड्यातील वंचित व विस्थापितांचे शोषण कमी झालेले आहे. तथापि वंचित विस्थापित लेखकांनी लिहीलेल्या मराठी साहित्यात गावखेड्यातील वंचित व विस्थापित समाजघटकांवर भूतकाळात झालेल्या शोषणाचे चित्रण खूप झालेले आहे.

भारताची लोकसंख्या मोठी आहे. मुठभर लोकांकडे जमिनी, सत्ता व संपत्तीची साठमारी आहे. त्यामुळे वंचित विस्थापितांचे शोषण पूर्णपणे टळण्यास अवधी लागणार आहे. व वर्तमानातही वंचित व विस्थापितांचे होत असलेले शोषणाचे चित्रण मराठी साहित्यात येत राहाणार आहे. शोषणाच्या होणाऱ्या चित्रणाने शोषण चव्हाट्यावर येवून वंचित विस्थापित शोषणमुक्त होतील.

अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठी वंचित विस्थापित धडपड करतात. वंचित विस्थापितांची विदारक स्थिती मांडतांना सुनिल गायकवाड त्यांच्या कथेत म्हणतात."शरीराला झाकण्याइतपत त्यांची ऐपत नव्हती त्याची आई लुगड्याच्या काठाची पट्टी कापून घेई. आमट्या एका धोतराचे चार तुकडे करायचा. ते बरेच दिवस कमरेला आवळून वापरायचा. बाकीचं शरीर जनावराप्रमाणे उघडं"४ तुटपुंज्या अन्नावर व कपड्यांवर जगणारी वंचित विस्थापित लोकं मराठी साहित्यात दिसतात.

जमिनदारांकडून ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर महिलांवर अत्याचार होतात. भूक भागविण्यासाठी शेतमजूर महिलांना प्राप्त परिस्थितीशी तडजोड करावी लागते. पोटासाठी गैरमार्गाचा नाईलाजाने स्विकार करावा लागतो. अशा अगतिकतेची मराठी साहित्यात वर्णने आढळतात. संजय दोबाडे यांनी असेच अगतिकतेचे वर्णन त्यांच्या एका कथेत केलेले आहे. "शेवटी ताराने मजुरीला जायचं ठरवलं. कामावरील पुरुषी नजरा तिला विंचवासारख्या डसायच्या. त्याला इलाज नव्हता. मन मारुन ती कामावर जातच होती.ज्या दिवशी काम मिळालं नाही त्या दिवशी उपास हमखास ठरलेला असायचा" ५ ग्रामीण मजुरांसमोर भूक आ वासून उभी असते याची हृदयस्पर्शी चित्रणे मराठी साहित्यात चितारण्यात येतात. झोपलेल्याला जागे करता येते पण झोपेचे सोंग घेतलेल्याला जागे करणे मूळीच शक्य नसते. जमिनदार, मालदार, करप्ट नोकरदार हे झोपेचे सोंग घेतात. विस्थापितांच्या साहित्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. त्यांना भूक बरकरार ठेवायची असते. दुर्बल घटकांवर सत्ता गाजवायची असते. म्हणून वंचित विस्थापितांचे मराठी साहित्य विशिष्ट गटापुरते सिमित करुन ठेवले जाते. वंचित विस्थापितांच्या साहित्याला मोठा वाचकवर्ग मिळाला. चळवळी उभ्या राहिल्या तेव्हा सरकार व समाजाला वंचित व विस्थापितांच्या साहित्याची दखल घ्यावी लागते. वंचित व विस्थापितांचे जीवन थोडेबहूत सुसह्य होते. लक्ष्मण माने, दया पवार, लक्ष्मण माने, किशोर काळे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ, उत्तम कांबळे असे बरेचसे लेखक वंचित विस्थापितांचे मराठी साहित्य लिहीतात.

बापकमाईवर खावून खावून माजलेली जमिनदारांची, सावकारांची, करप्ट नोकरदारांची पोरं जीवनातील प्रत्येक वस्तुचा उपभोग घेतात. उपभोग्य वस्तु सहजासहजी मिळाली नाही तर त्यांच्या हातून गुन्हे घडतात. हे गुन्हे आपल्या शिरावर घेण्याची वंचित विस्थापितांना जबरदस्ती केली जाते. पैशांचे आमिष दाखविले जाते. खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचे प्रकारही घडतात. सबल व्यक्ती वंचित विस्थापिताला गुन्हा अंगावर घेण्यासाठी विनंती करतांना संजय दोबाडे यांच्या कथेत दिसतो. "मी तुला निर्दोष सोडवून आणीन आनं तुझ्या केसचा समदा खर्चबी करीन पण माझ्या पोराला वाचव"६ ज्यांच्या कडे पैसा आहे सत्ता आहे त्याच्या जोरावर वंचित विस्थापितांना गुन्हेगार बनविले जाते. मराठी साहित्यातील वंचित विस्थापितांच्या चित्रणातून अनेक पैलू उघड होतात.

भूमिहीन शेतमजूर असलेल्या वंचित विस्थापितांचे मूळगावी पोट भरत नाही. परिणामी त्यांना गाव सोडावे लागते. नाही सोडले तर जमिनदारांकडून, करप्ट नोकरदारांकडून खोट्या आरोपात अडकविण्याची शक्यताही असते. दुरच्या दुसऱ्या गावी गेल्यावरही वंचित विस्थापिताची दैना संपत नाही. नोकरीच्या ठिकाणी प्रस्थापित, करप्ट अधिकारी व कर्मचारी यांच्या तावडीत वंचित विस्थापित सापडतात. 'इकडे आड तिकडे विहीर' अशी वंचित विस्थापितांची स्थिती होते. ही वस्तुस्थिती प्रकट करतांना रमजान तडवी त्यांच्या कथेत म्हणतात. " साताऱ्यात मी सुखी होतो हे तर असत्यातले असत्य, प्रस्थापितांचा नको इतका त्रास, अवहेलना, अपमान सोसावा लागायचा"७ वंचित व विस्थापित

मराठी साहित्यातून त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडतात. पुस्तकी साहित्य वितरणातून आपले संर्घषमय जीवन सरकार दरबारी पोहचवतात. मराठी भाषेने मराठी शब्दांचे दान देवून वंचित विस्थापितांवर उपकार केले आहेत. मराठी भाषेने वंचित विस्थापितांचे पालकत्व स्विकारले आहे.

वंचित व विस्थापितांचे मराठी साहित्य लिहीणारा लेखक हा ही वंचित विस्थापितच असतो. तो त्याचे अभावग्रस्त जीवनानुभव मांडत असतांना सभोवतीच्या त्याच्या समदुःखी समाजाचेही चित्रण करीत असतो. वंचित व विस्थापितांचे सुखासिन लोकांनी केलेले चित्रण क्वचितच आढळून येते.

भारत स्वतंत्र होवून बराच काळ उलटला आहे. माणूस ज्या गावी जन्मला त्याच गावी कष्ट करुन जगेल असे स्वातंत्र्याकडून अपेक्षित होते. पण भूमिहीन शेतमजूर, ऊस तोड कामगार कामाच्या शोधात देशोधडीला लागतात. महाराष्ट्रातील बरेच शेतमजूर उस तोडण्यासाठी गुजरात राज्यात जातात. खान्देशातील मजूर अहमदनगर, पुणे, सातारा व सांगली जिल्ह्यात जातात. ऊसाच्या फडात पाल टाकून राहातात. सरपटणाऱ्या विषारी सापांच्या दहशतीत रात्री झोपतात. बिबट्या, वाघ अशा हिस्त्र प्राण्यांची काळ्याकुट्ट रात्री भीती बाळगतात. जी मिळेल त्या रुखीसुखी भाजीभाकरीवर जगतात. ऊस तोड मजूरांची अशी दयनिय जिंदगी मराठी साहित्यातून चितारली जाते.

लोकल ट्रेनच्या स्टेशनावर, पदपथावर, पुलाखाली, धार्मिक स्थळांपुढे मुंबईत लोकं भिक मागतात. यातल्या काही भिकाऱ्यांचे बँकेंत पैसे शिल्लक असतात. अशी वार्ता एकदा कानावर आली होती. ती खरी होती का खोटी कुणास ठाऊक ? पण तेव्हापासून भिकाऱ्यांना पैसे विचारपूर्वक द्यावेसे वाटतात. दान देणारी व्यक्तीही संवेदनशिल मनाची असते त्याची मिळकतही तुटपुंजी असते.अशा परिस्थितीत गरज नसलेल्या व्यक्तीला दान दिले गेले तर देणाऱ्याचेही नुकसान होते. खऱ्या गरजू भिकाऱ्याची भूक मिटणे गरजेचे आहे. वंचित विस्थापितांच्या मराठी साहित्यात आर्थिक, मानसिक, सामाजिक स्थितीवरही प्रकाश पडतो. ढोंग घेवून भिक मागणारे भिकारी असतात. किंवा खरोखर भूकेने व्याकुळ झालेलेही भिकारी असतात. खरा गरजू कोण हे ओळखणे ही दात्याची कसोटी असते. शोषण व बेरोजगारीमुळे विस्थापित झालेल्या भिकाऱ्यांचे वर्णन दत्तात्रय मानुगडे पुढीलप्रमाणे करतात "तो भिकारी अंगाने एकदम सडला होता. नी त्याचे डोळे आत गेले होते. त्याला स्पिकरचा आवाज फार मोठा ऐकू येत असल्याने त्याच्या मनाला वाटले असावे की इथं जरा बेत बरा आहे. निदान पोटाचा आज तरी प्रश्न मिटेल. या भूमिकेतून तो झपझप पावले टाकीत गाव जवळ करीत होता. भिकारी माणसे ही अनाथ असतात. त्यांना कशाचाच आधार नसतो. त्यांना झोपाय जमीन आणि पांघराय आभाळ असते"८ भाषा आहे आणि भाषेचा वापर करुन वंचित विस्थापितांचे साहित्य लिहीणारे साहित्यिक आहेत. म्हणून वंचित विस्थापितांच्या दयनिय जीवनावर प्रकाश पडतो.

शेतीत वर्षानुवर्षे राबून धान्य पिकविणारे शेतमजूर वंचित व विस्थापितांचे जीवन जगतात. नव्या यंत्रयुगात ट्रक्टरने शेत नांगरले जाते. यंत्राने पिके कापली जातात. यंत्रसंस्कृतीमुळे मानव आणि निसर्ग यांच्या नात्यावर विपरीत परिणाम झाला आहे. शेतमजुराची काही कामे यंत्र करीत असल्याने शेतमजूराच्या पोटावर पाय आला आहे. त्याच्या गोतावळयातील बैलाना बाजार दाखविला जात आहे. जुनी कृषीसंस्कृती मोडकळीस आली आहे. या कृषीसंस्कृतीतील महत्वाचा घटक असलेला शेतमजूर हा वंचित तर होताच आता त्याच्यावर विस्थापनाचीही स्थिती ओढवली आहे. त्याला रोजीरोटीसाठी शहराच्या दिशेने कूच करावी लागत आहे. तो शहरात पत्र्याच्या शेडमध्ये राहून बांधकामावर राबत आहे. शेतमळयातील सालदार गड्यांचे जीवन शेतमालकाने बदतर बनविले आहे. वेठबिगार सदृष्य स्थितीत त्यांना जीवन जगावे लागत आहे. त्यांना खात्रिशीर सुट्टी नाही. अतिवेळ ते अतिश्रम करीत आहेत. या स्थितीचे वंचित विस्थापितांचे जीवन आनंद यादव यांनी त्यांच्या गोतावळा कांदबरीत रेखाटले आहे. रानावनात व शेतशिवारात शहरी सुखासिन लोकं सहसा फिरकत नाहीत. शेतमजुरांनी शेतीत पिकविलेले अन्न मात्र चवीने खातात. अशा वंचित असलेल्या शेतमजुराला व तो ज्या शेतमळयात राबतो आहे त्या मळयाला कांदबरीतून प्रकाशझोतात आणण्याचा काही

लेखक बेत रचतात. याला अनुसरुनच " ग्रामीण संस्कृतीचे केंद्र असलेल्या शेतमळ्याला मध्यावर धरुन अजून कुणी कांदबरी लिहीली नाही. कांदबरीतील प्रमुख घटना, प्रसंग, वातावरण हे आपण शेतमळ्यावरचेच योजावे. त्याच्या आधारे शेतीसंस्कृतीही जिवंत करता येईल" ९ असा प्रसिध्द ग्रामीण लेखक आनंद यादवांनी ठाम निर्धार केला व गोतावळा कांदबरीव्दारे मराठी साहित्यात वंचित व विस्थापितांचे रसाळ चित्रण केले आहे.

निष्कर्ष

(१) वंचित व विस्थापित समाजघटक मोठ्या संख्येने ग्रामीण व डोंगराळ भागात राहातात.

(२) वंचित विस्थापितापैकी काही कायमस्वरूपी तर काही हंगामी रोजीरोटीच्या शोधार्थ स्थलांतर करतात.

(३) मराठी साहित्यातील चित्रणात वंचित विस्थापितांचे प्रस्थापितांकडून शोषण होत असल्याचेही आढळून येते.

(४) वंचित विस्थापितांचे चित्रण करणारे लेखक बहुतेक करुन ग्रामीण भागातील असतात.

ग्रंथसंदर्भ

(१) वहारु सोनवणे, गोधड, प.आ.पुणे, २००६, पृ.८.

(२) के.व्ही.सरवदे, उद्ध्वस्तलेली गढी, प. आ. कोल्हापूर, २००७, पृ.१८.

(३) सुनील गायकवाड, गल्लूर, प.आ. औरंगाबाद, २०१७, पृ.३०.

(४) सुनील गायकवाड, गल्लूर,प.आ. औरंगाबाद, २०१७, पृ.५७.

(५) संजय दोबाडे, पितळ, प.आ.नाशिक, २०११, पृ.६७.

(६) संजय दोबाडे, पितळ, प.आ.२०११, पृ.८८.

(७) रमजान गुलाब तडवी, रानमेवा, प.आ.जळगाव, २०२१, पृ.५९.

(८) दत्तात्रय मानुगडे, टिप्पीरा,प.आ.कोल्हापूर,२००६, पृ.१००.

(९) आनंद यादव, साहित्याची निर्मिती प्रक्रिया, तृ.आ.पुणे,२००२, पृ.१४८.

सुखदेव नवले यांच्या कथा साहित्याची समाजशास्त्रीय मिमांसा

डॉ. रामदास नाईकनवरे.
प्र. प्राचार्य, कला व विज्ञान महाविद्यालय,
आटपाडी. जि. सांगली.
भ्रमणध्वणी:- ९८९०१२३४३८

प्रस्ताविक:-

हजारो वर्षांची पारंपरिक विषमतेची मूल्य चौकट झुगारून स्वातंत्र्योत्तर काळात संविधानिक न्याय, हक्क व मूलभूत अधिकारांच्या आत्मभानातून अभिव्यक्त होऊन निर्माण झालेल्या मराठी वांड:मयीन प्रवाहांची संख्या आज कमी नाही. कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी वांड:मयीन प्रकारांनी ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, कामगार हे वांड:मयीन प्रवाह अधिक समृद्ध केले. हे सर्व वांड:मयीन प्रवाह त्या- त्या लेखकाच्या सामाजिक व सांस्कृतिक परिपोषांचे दिग्दर्शन करणारे असले तरी, लेखकाची जडणघडण ज्या सामाजिक स्तरांमध्ये होते. त्या सामाजिक, सांस्कृतिक घटकांचा संस्कार व प्रभाव हा सार्वत्रिक समान असतोच असं नाही. तत्कालीन समाज जीवनातील सामाजिक, राजकीय, धार्मिक , आर्थिक व वांड:मयीन चळवळी , आणि विविध महापुरुषांच्या विचार कार्याने प्रभावित होऊन समाजामध्ये वावरणाऱ्या विविध प्रबोधनकारी चळवळी इत्यादी सर्व घटकांच्या आधारे लेखकाला प्राप्त झालेला वैचारिक दृष्टिकोन हा एकूणच साहित्य निर्मितीवर परिणाम करणारा असतो. यावरून आपणास साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध किती गुंतागुंतीचा असतो हे लक्षात येते. अशा या सामाजिक सांस्कृतिक जडणघडणीतून निर्माण झालेल्या साहित्य निर्मात्याकडून समाजामध्ये सकस व शाश्वत मूल्यभावांची पेरणी करणारे साहित्य निर्माण होत असते. असा हा सकस व शाश्वत मूल्यभाव समाजशास्त्रीय अंगाने आजपर्यंत आपण ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, कामगार इत्यादी वाड:मयीन प्रवाहांच्या अनुषंगाने वाचत व अभ्यासत आलो आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्येही आपण सुखदेव नवले यांच्या कथा साहित्याची समाजशास्त्रीय मिमांसा पाहणार आहोत.

उद्दिष्टे:-

१) साहित्य कलाकृतीच्या आकलनासाठी समाजशास्त्री संकल्पना समजावून घेणे.
२) समाजशास्त्रीय घटकांच्या आधारे सामाजिक वैशिष्ट्यांचा शोध घेणे.
३) सामाजिक मूल्य भाव व सामाजिक परिवर्तन यांचा संबंध स्पष्ट करणे.
४) सुखदेव नवले यांच्या कथा साहित्यातील सामाजिक मूल्यदृष्टी असणाऱ्या कथांचं आकलन करून घेणे.
५) सुखदेव नवले यांच्या सामाजिक मूल्य भाव असणाऱ्या कथा साहित्यामधून मानवता व वैश्विकतेच्या अंगाने शोध घेणे.
६) 'लेखक व समाज' आणि 'समाज व साहित्य' यांचा परस्पर संबंध स्पष्ट करणे.
७) मराठी साहित्यकृतीच्या आकलनासाठी समाजशास्त्री पद्धतीला अधिक बळकटी देणे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय संशोधन पद्धती विचारात घेतली जाणार आहे.

समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती:-

कोणत्याही वांड:मयीन कलाकृतीचे मूल्यमापन करत असताना लेखक व त्याची वांड:मयीन कलाकृती या दोन्हींच्या पाठीमागील सामाजिक व सांस्कृतिक तळ शोधण्याची जबाबदारी अभ्यासक व संशोधकांची असते. या दोन्ही घटकांच्या अनुषंगानेच त्या कलाकृतीची समाजशास्त्रीय मिमांसा आपणास विचारात घ्यावी लागते. समाजशास्त्रीय दृष्टिकोणाच्या नावावर मार्क्सवाद, समाजवाद, संरचनावाद व गांधीवादाला बळ देऊन या मातीत रुजलेल्या वर्णवादावर पद्धतशीरपणे पांघरून घालायचं काम अभ्यासक व संशोधक करतात. जर्मनीच्या मातीमध्ये कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स या तत्त्वज्ञानी संयुक्तपणे मार्क्सवाद व समाजवादाची मुळे रुजवली. त्या मातीमध्ये वर्णवादी

संरचना नव्हती. परंतु भारतासारख्या देशामध्ये चार वर्णावर आधारित वर्णव्यवस्था आणि त्या वर्णांतर्गत असणाऱ्या हजारो जातींची संरचना अस्तित्वात आहे. इथली मूलतः विषमता ही आर्थिक नसून ती सामाजिक आहे. त्यामुळे हजारो वर्षांपासून पिढ्यान्पिढ्या मनामध्ये रुजलेल्या वर्णवादाची चिकित्सा करण्यासाठी अभ्यासकांची आंबेडकरी दृष्टीनेच समाजशास्त्रीय दृष्टी हवी. मार्क्सवादी व समाजवादी दृष्टी इथे उपयोगी पडत नाही. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधासाठी आंबेडकरी दृष्टिकोनाधारे समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती वापरण्यात आली आहे.

लेखकाची बहूकेंद्रीय सामाजिक अनुभूती:-

सुखदेव नवले यांचे "निर्णय" आणि "शोध अस्तित्त्वचा" हे दोन कथासंग्रह प्रकाशित आहेत. यांच्या कथासंग्रहातून लेखकाची बहूकेंद्रीय सामाजिक अनुभूती आपल्या लक्षात येते. ग्रामीण व दलित जीवनाचा परीघ व्यापणाऱ्या गावकुसा आतील व बाहेरील सर्व समाज घटकातील संवेदनशील जाणिवांचं चित्रण यांच्या कथा मधून आलेलं आपणास दिसतं. परंपरेने समाज व्यवस्थेमध्ये चालत आलेल्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र या चार वर्णांतर्गत अस्तित्त्वात असणाऱ्या हजारो जाती जाती मधील श्रेष्ठ व कनिष्ठत्वाचा संघर्ष, संविधानिक लोकशाहीमध्येही समाजामध्ये सुरू असणारा जातीय संघर्ष, गावकुसाबाहेरील उपेक्षित समाजाकडे व एकूणच स्त्री जीवनाकडे समाज व्यवस्थेचा पाहण्याचा दृष्टिकोन, जाती-जातीमध्ये असणारी सामाजिक व आर्थिक विषमता, आजही समाजामध्ये सुरू असणाऱ्या पारंपरिक रूढी व परंपरा, व या विषमतावादी परंपरेचं अनुयायीत्त्व स्विकारण्यासाठी सुरू असणारी समाजातील स्पर्धा, हे सर्व सामाजिक घटकांचा चित्र नवले यांच्या कथासंग्रह मधून येताना आपणास दिसते. शिवाय समाजातील जाती संघर्ष, स्त्रियांच्या वरील अन्याय व अत्याचार, विधवा पुनर्विवाह, सुशिक्षित बेकारांमधील जगण्याचा संघर्ष, समाजातील स्वार्थी व लोभी प्रवृत्ती, इत्यादी अनेक प्रकारच्या बहु केंद्रीय अनुभूतींचं चित्र नवले यांच्या कथांमधून येते. 'निर्णय', 'शोध अस्तित्वाचा', 'सोना', 'तृष्णा', 'डाव' 'धंदा', 'पुढचं पाऊल', 'संशय' इत्यादी अनेक कथा या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

कथेतील व्यक्तिरेखांचा सामाजिक संबंध:-

लेखक सुखदेव नवले हे स्वतः माळी (ओबीसी) समाजातील आहेत. यांच्या कथासंग्रहातील 'सुका मांग' (निर्णय), माळी समाजातील आनंदची पत्नी 'नंदी' (डाव), विष्णू माळयाची पत्नी 'सोना' व रावसाहेब पाटलांची पत्नी 'सुनंदा' (सोना), 'दगड्या ड्रायव्हर' (संगत), 'तायाप्पा रामोशी' (भरती), आणि आयपीएस अधिकारी असणारा मराठा समाजातील 'अमृतराव देशमुख' (तृष्णा), इत्यादी पात्रे ही गावगाड्यामधील विविध सामाजिक व सांस्कृतिक संचिते आपल्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून कथेमध्ये घेऊन येताना दिसतात. मानवतावादी मूल्यांबरोबर सामाजिक व आर्थिक विषमतेच्या अंगाने या व्यक्तिरेखांचा संबंध आपणास या कथांमधून आलेला दिसतो.

कथेतून आविष्कृत होणारा मूल्यभाव:-

सुखदेव नवले यांच्या कथांमधून विशेषत:- सामाजिक व आर्थिक विषमता चित्रीत होताना दिसते. 'निर्णय' कथेमध्ये मोहन पाटील यांचा व गाव पंचायतीचा आणि 'सोना' या कथेतील रावसाहेब पाटलांचा जातीय दृष्टिकोन तर अनुक्रमे 'सुका मांग' व 'सोना' या व्यक्तिरेखांचा न्याय व हक्कासाठीचा संघर्ष समाजातील वर्णीय अंगाने सामाजिक मूल्य भावाची जाणिव लेखक चित्रीत करताना आपणास दिसतो.

त्याचप्रमाणे, 'तृष्णा' या कथेमधील आय.पी.एस. अधिकारी असणाऱ्या अमृतराव देशमुख यांच्या रूपाने समाजातील अप-प्रवृत्ती, स्वार्थी व लोभी वृत्ती- प्रवृत्तींचा मूल्य भाव असणारी जाणिव व्यक्त होते. 'धुराड', 'धंदा', 'नातं' 'बुडबुडा' इत्यादी कथांना संघर्षाचे मूल्य प्राप्त होऊन वाचकांना 'करूण' रसाची अनुभूती मिळते. रक्ताच्या नात्या पेक्षाही मानलेली नाते कशी श्रेष्ठ असतात. याची प्रचिती देणारी 'नातं' ही कथा नात्यातील निखळ प्रेम भावनेची मूल्यजाणिव घेऊन येणारी आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्याचं धुराडं करणारी 'धुराडं' ही कथा शोषणाच्या अंगाने व सरंजमशाहीच्या रूपाने वर्तमान सहकार क्षेत्राच्या शोषक वृत्तीवर प्रकाश टाकते. त्यामुळे, या कथेला सामाजिक व आर्थिक विषमतेचं मूल्य प्राप्त होते. आणि मानवी श्रम प्रतिष्ठेचा मूल्यभाव जपणारी 'शाबासकीची थाप' ही कथाही त्याच मूल्यभाव जाणिवेचा अनुभव वाचकांना मिळवून देतात.

सुखदेव नवले यांची 'पुढचं पाऊल' ही कथा नवतेच्या रूपाने सामाजिक आत्मभान आणून देणारी आहे. रामदास नावाच्या शिक्षकाच्या मध्यस्थीने रावसाहेब पवार हा आपल्या 'सुलक्षणा' या विधवा असणाऱ्या मुलीचा पुनर्विवाह मराठा समाजाच्या साक्षीने राहुलशी करून देतात. या कथेतील सुलक्षणाचा संघर्ष हा पारंपारिक समाज व्यवस्थेला मूठ माती देणारा आहे. तर वडील असणाऱ्या रावसाहेब पवार यांचा संघर्ष हा नव विचारांना कवठळणारा आहे. त्यामुळे याही कथेला संघर्षा बरोबरच सामाजिक मूल्य भाव प्राप्त होताना दिसतो.

एकंदरीत, सुखदेव नवले यांनी आपल्या कथा मधून आर्थिक विषमतेच्या अंगाने वर्गीय जाणिव तर भूक, उपासमार, वेदना ,दुःख , विद्रोह, आणि सामाजिक विषमता या अनुषंगाने वर्णीय जाणिवांचा आलेख वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

निष्कर्ष:-

१) सुखदेव नवले हे सन २००१ नंतरचे मराठी कथा विश्वातील एक सशक्त जाणिवेचे कथाकार आहेत.

२) सुखदेव नवले यांच्या कथामधून बहुकेंद्रीय सामाजिक जाणिव व्यक्त होताना दिसून येते.

३) सुखदेव नवले यांची कथा मानवतावादी मूल्यावर अधिष्ठित होऊन ती समकालीन सामाजिक समस्यांचा वेध घेते.

४) सुखदेव नवले यांच्या कथामधील व्यक्तिरेखा या नवविचार आत्मसात करणार्या, जगण्यातील संघर्षाला धीटपणे सामोरे जाणाऱ्या, आणि नव्या संस्कृतीमध्ये स्थिर होण्यासाठी धडपड करणार्या अशा आहेत.

५) साहित्य निर्मितीमध्ये लेखकाची तत्व बांधिलकी खूप महत्त्वाची असते. त्यामुळे सुखदेव नवले हे लेखक म्हणून 'तत्व आणि व्यवहार' यांच्यामध्ये सुसंगती जपणारे लेखक आहेत.

समारोप

साहित्य हे समाजाचा आरसा असते. त्यामुळे ते फार काळ एकमेकांपासून दूर राहू शकत नाही. नव्या मूल्यवस्थेच्या अंगाने समाजातील घडून येणारे विविध बदलच साहित्याच्या स्वरूपावर प्रभाव टाकत असतात. की, ज्यामुळे समाजाला नवा विचार, नवी मूल्ये आणि नवी दिशा देण्याचे कार्य साहित्य करत असते. म्हणूनच, आजचे मराठी साहित्य हे आपल्या बदलत्या जाणिवांच्या स्थित्यंतरांची अनेक वळणे घेऊन, कल्पनाविलासा पासून दूर होऊन ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून खंबीरपणे उभा आहे. म्हणूनच आज कोणत्याही मराठी साहित्य कलाकृतीची मिमांसा ही आंबेडकरी जाणीवेतून व समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून होणे काळाची गरज बनली आहे. याकडे अभ्यासक व संशोधकांचं लक्ष वेधण्याचा हा माझा मानस आहे.

संदर्भ:-

१) 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे', भाग:- १, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२) डॉ. पानतावणे गंगाधर , 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे,'. प्र , आ, १९७६, विजय प्रकाशन, नागपूर.

३) पाटील म.सु., 'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध' , प्र. आ. ,२००१, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.

४) कोत्तापल्ले नागनाथ, (संपा.), 'साहित्य आणि समाज' प्रतिमा प्रकाशन, पुणे. २००७.

५) डॉ. ठाकूर रवींद्र , 'समाजशास्त्रीय मिमांसा', दिलीप राज प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००७

६) गाडगीळ गंगाधर, 'साहित्य:- चिंतन आणि शोध' , सन पब्लिकेशन, पुणे, प्र.आ. १९९३.

७) पाध्ये दिगंबर, 'साहित्य, समाज आणि संस्कृती ' , लोक वांड:मय गृह, मुंबई, चौ. आ.,२०११.

८) यादव आनंद, 'साहित्य निर्मिती प्रक्रिया', मेहता पब्लिशिंग हाऊस, तृ. आ. २००२.

९) गायकवाड लक्ष्मण, 'साहित्य समाज आणि स्वातंत्र्य' दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००१.

१०) पद्माकर सर्जेराव, 'साहित्यविचारशोध' अक्षय प्रकाशन, रत्नागिरी, प्र. आ. २०२५.

अभिजात भाषा आणि मराठी साहित्य

सतीश दशरथ पाटील
सहाय्यक प्राध्यापक
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय कडेगाव
भ्रमणध्वनी - ९८२३११०६२२

केंद्र सरकारकडून प्राचीन परंपरा असणारी, श्रेष्ठ दर्जाचे साहित्य निर्माण झालेली आणि हजारो वर्षांची परंपरा असणारी भाषा अभिजात भाषा म्हणून नामनिर्देशित केली जाते. या विशिष्ट भाषेचा प्राचीन वारसा जतन व संवर्धित करणे यासाठी अभिजात भाषेचा दर्जा देण्यात येतो. तमिळ २००४, संस्कृत २००५, कन्नड २००८, तेलगू २००८, मल्याळम २०१३ या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर आपल्या मराठी भाषेचे असणारे प्राचीनत्त्व, वैभव, दर्जेदारपणा, विविध वाङ्मयप्रकार व प्रवाह लक्षात घेता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त व्हावा ही मागणी जोर धरू लागली आणि महाराष्ट्र शासनाकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला. दरम्यानच्या काळात २०१४ साली ओडिया या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला होता. केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत विचार करताना आणखी किती भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देता येईल यासाठी राज्य सरकारकडून प्रस्ताव मागविले. तज्ज्ञ समितीने निर्धारित केलेल्या निकषास पात्र असणाऱ्या भाषांना म्हणजेच मराठी, पाली, प्राकृत, असामी व बंगाली या भाषांना केंद्र सरकारकडून २०२४ साली अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला.

ताम्रपट, शिलालेख यावर सापडणारे काही शब्द मराठी भाषेचे प्राचीनत्त्व सिद्ध करतात. "श्री चावुण्डराजे करवियले" हे मराठीतील पहिले वाक्य श्रवणबेळगोळ येथील शिलालेखात पहावयास सापडते. यादवकाळात मुकुंदराज यांच्याकडून निर्माण झालेला 'विवेकसिंधू' हा मराठीतील पहिला पद्य ग्रंथ. त्यानंतरचा म्हाइंभट यांचा 'लीळाचरित्र' हा पहिला गद्य व चरित्रग्रंथ महानुभाव पंथाचे तत्वज्ञान सांगणारा असल्याने महानुभाव संप्रदायात त्याला विशेष स्थान मिळाले व त्या ग्रंथाच्या जोडीला 'गोविंदप्रभूचरित्र', महादंबा या स्त्री कवयित्रीचे धवळे, सूत्रपाठ, दृष्टांतपाठ, स्मृतिस्थळ अशा ग्रंथांमधून महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान सांगितले गेल्यामुळे महानुभाव पंथाकडून हा साहित्याचा वारसा जतन करण्यात आला. संत ज्ञानेश्वर यांच्याकडून भगवत गीतेवर रचण्यात आलेले परमसुंदर टीकाभाष्य 'ज्ञानेश्वरी' हे तर आजही गावोगावी पारायण किंवा नित्य पठण यामधून आळविले जात आहे. "हे विश्वची माझे घर" या उक्तीवरून ज्ञानेश्वरांनी विश्वबंधुत्वाची संकल्पना मांडली. संत नामदेव यांची अभंगगाथा, संतमेळा यांनी रचलेले अभंग ओव्या, संत एकनाथ यांचे साहित्य, संत तुकाराम यांची अभंगगाथा हे निश्चितच समाजप्रबोधन करणारे होते. त्यामुळे आजही पंढरपूरच्या वारीत मोठ्या उत्साहाने लाखो वारकरी संतांचे ओव्या अभंग आळवताना दिसतात. संत ज्ञानेश्वर यांच्या ज्ञानेश्वरीप्रमाणेच तुकाराम गाथेचे पारायण होत असलेले दिसते. यावरून त्या साहित्यकृतीत असलेला भाव रसिकांना पुन:पुन्हा वाचण्यास कसा प्रवृत्त करतो हे लक्षात येते. समर्थ रामदास याचा 'दासबोध' व इतर साहित्य समर्थ संप्रदायाच्या माध्यमातून गावोगावी पोहोचले. पंडिती वाङ्मयातील कलापूर्णतेने तयार झालेले ग्रंथ आजही वाचन केले जातात. शाहिरी वाङ्मयातील लावणी व पोवाडा यांचा आदर्श डोळयासमोर ठेऊन तशीच रचना करण्याचा प्रयत्न आजही केला जात असल्याचा दिसून येतो.

आधुनिक मराठी वाङ्मयातील कथा कादंबरी यावर आधारित चित्रपट निघाले असून समाजाचे रंजन – प्रबोधन करण्यात कथा कादंबरी या वाङ्मयप्रकारांनी मौलिक भर घातल्याचे दिसून येते. कविता या वाङ्मयप्रकारात सामाजिक, ऐतिहासिक, निसर्गकविता, आत्मपर कविता निर्माण झाल्या. जागतिक स्तरावरील सुनीत हायकूसारखे पद्यप्रकार मराठीत तयार झाले. सारस्वतांकडून प्रवासवर्णने लिहिली गेली. त्यामधून लेखकाचे अनुभवविश्व चित्रित झाले. नाटकांच्या माध्यमातून नाटककारांनी पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक विषय हाताळले आणि समाजमन जागृत करण्याचे कार्य केले. चरित्र – आत्मचरित्र यामधून ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, पौराणिक व्यक्तीचे जीवन रसिकांप्रत पोहोचले. ललितगद्याच्या माध्यमातून व्यक्तिचित्रे साकारण्यात आली आणि समाजमनात त्यांनी घर केले. असा हा साहित्यप्रवास निश्चितच समृद्ध वारसा जपणारा, आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा, नितिमत्तेचे मूल्यांचे धडे देणारा, प्रथा परंपरा यांचे दर्शन घडवित चांगले काय वाईट काय यासाठी वैचारिक परिवर्तन घडविणारा, वेगवेगळ्या प्रांतातील बोली यांचा समर्पक वापर करून भाषेचा जिवंतपणा टिकवून ठेवणारा आहे.

भारतीय ज्ञानपीठ न्यासकडून दिला जाणारा उत्कृष्ट साहित्यिक योगदानाबद्दल दिला जातो. आत्तापर्यंत मराठी भाषेला विष्णू सखाराम खांडेकर (ययाति कादंबरी), कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर (समग्र वाङ्मय) विंदा करंदीकर (साहित्यिक योगदान), भालचंद्र नेमाडे (कोसला व हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ यासारख्या महत्त्वपूर्ण लेखनासाठी) या चार सारस्वतांच्या रूपाने मिळाला आहे. शिवाजी सावंत (मृत्युंजय), विजय तेंडूलकर या सारस्वतांना मुर्तीदेवी पुरस्कार लाभला आहे. तसेच भारतीय साहित्य अकादमी या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेकडून भारतीय भाषांमधील साहित्य विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातात. या संस्थेमार्फत दिला जाणारा साहित्य अकादमी पुरस्कार खालील सारस्वतांना मिळाला आहे.

अ. क्र.	साहित्यिकाचे नाव	वर्ष	साहित्यकृती
१	श्री.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	१९५५	वैदिक संस्कृतीचा विकास
२	श्री.बाळ सीताराम मर्ढेकर	१९५६	सौंदर्य आणि साहित्य
३	श्री.चिंतामण गणेश कोल्हटकर	१९५८	बहुरुपी
४	श्री. गजानन त्र्यंबक देशपांडे	१९५९	भारतीय साहित्यशास्त्र
५	श्री.विष्णू सखाराम खांडेकर	१९६०	ययाति
६	श्री.द.न.गोखले	१९६१	डॉ.केतकर
७	श्री.पुरुषोत्तम यशवंत देशपांडे	१९६२	अनामिकेची चिंतनिका
८	श्री.श्रीपाद ना.पेंडसे	१९६३	रथचक्र
९	श्री.रणजित देसाई	१९६४	स्वामी
१०	श्री.पु.ल.देशपांडे	१९६५	व्यक्ति आणि वल्ली
११	श्री.त्र्यंबक शंकर शेजवलकर	१९६६	श्री.शिवछत्रपति
१२	श्री.नारायण गोविंद कालेलकर	१९६७	भाषा : इतिहास आणि भूगोल
१३	श्रीमती.इरावती कर्वे	१९६८	युगान्त
१४	श्री.श्रीनिवास नारायण बनहट्टी	१९६९	नाट्याचार्य देवल
१५	श्री. न. र. फाटक	१९७०	आदर्श भारत सेवक
१६	श्रीमती.दुर्गा भागवत	१०७१	पैस
१७	श्रीमती.गोदावरी परुळेकर	१९७२	जेंव्हा माणूस जागा होतो
१८	श्री. गुरुनाथ आ.(जी. ए.) कुलकर्णी	१९७३	काजळमाया
१९	श्री.वि.वा.शिरवाडकर	१९७४	नटसम्राट
२०	श्री.रा भा. पाटणकर	१९७५	सौंदर्य मीमांसा
२१	श्री.गो.नी.दांडेकर	१९७६	स्मरणगाथा
२२	श्री.आत्माराम रावजी देशपांडे	१९७७	दशपदी
२३	श्री.चिंतामणी त्र्यंबक खानोलकर	१९७८	नक्षत्रांचे देणे
२४	श्री.शरदचंद्र मुक्तिबोध	१९७९	सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य
२५	श्री.मंगेश पाडगावकर	१९८०	सलाम
२६	श्री.लक्ष्मण माने	१९८१	उपरा
२७	श्री.प्रभाकर पाध्ये	१९८२	सौंदर्यानुभव
२८	श्री.व्यंकटेश माडगूळकर	१९८३	सत्तांतर
२९	श्रीमती.इंदिरा संत	१९८४	गर्भरेशमी
३०	श्री.विश्राम बेडेकर	१९८५	एक झाड आणि दोन पक्षी
३१	श्री.ना.घ.देशपांडे	१९८६	खूणगाठी
३२	श्री.रा.चिं.ढेरे	१९८७	श्री विठ्ठल: एक महासमन्वय
३३	श्री.लक्ष्मण गायकवाड	१९८८	उचल्या
३४	श्री.प्रभाकर उध्दवरेषे	१९८९	हरवलेले दिवस
३५	श्री.आनंद यादव	१९९०	झोंबी

३६	श्री.भालचंद्र वनाजी नेमाडे	१९९१	टीका स्वयंवर
३७	श्री.विश्वास पाटील	१९९२	झाडाझडती
३८	श्रीमती.विजया राजाध्यक्ष	१९९३	मर्ढेकरांची कविता
३९	श्री.दिलीप पुरुषोत्तम चित्रे	१९९४	एकूण कविता-१
४०	श्री.नामदेव कांबळे	१९९५	राघववेळ
४१	श्री.गंगाधर गाडगीळ	१९९६	एका मुंगीचे महाभारत
४२	श्री.म.वा.धोंड	१९९७	ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी
४३	श्री.सदानंद मोरे	१९९८	तुकाराम दर्शन
४४	श्री.रंगनाथ पठारे	१९९९	ताम्रपट
४५	श्री.ना.धों.महानोर	२०००	पानझड
४६	श्री.राजन गवस	२००१	तणकट
४७	श्री.महेश एलकुंचवार	२००२	युगान्त
४८	श्री.त्र्यंबक विनायक सरदेशमुख	२००३	डांगोरा एका नगरीचा
४९	श्री.सदानंद देशमुख	२००४	बारोमास
५०	श्री.अरुण कोलटकर	२००५	भिजकी वही
५१	श्रीमती. आशा बगे	२००६	भूमी
५२	श्री.गो.म.पवार	२००७	विठ्ठल रामजी शिंदे:जीवन व कार्य
५३	श्री.श्याम मनोहर	२००८	उत्सुकतेने मी झोपलो
५४	श्री.वसंत आबाजी डहाके	२००९	चित्रलिपी (काव्यसंग्रह)
५५	श्रीमती. सरोज देशपांडे	२०१०	अशी काळवेळ (अनुवादित)
५६	कवी ग्रेस	२०११	वा-याने हलते रान (ललितलेख)
५७	श्री.जयंत पवार	२०१२	फिनिक्सच्या राखेतून ऊठला मोर (कथासंग्रह)
५८	श्रीमती.शारदा साठे	२०१२	पांथस्थ-एका भारतीय साम्यवादी नेत्याची मुशाफिरी (अनुवादित)
५९	श्री.सतीश काळसेकर	२०१३	वाचणा-याची रोजनिशी
६०	श्री.जयंत नारळीकर	२०१४	चार नगरातले माझे विश्व (आत्मचरित्र)
६१	श्री.अरुण खोपकर	२०१५	चलत्-चित्रव्यूह (संस्मरण)
६२	श्री.आसाराम लोमटे	२०१६	आलोक (ग्रामीण लघुकथा)
६३	श्री. श्रीकांत देशमुख	२०१७	बोलावे ते आम्ही (ग्रामीण कविता संग्रह)
६४	श्री. म. सु. पाटील	२०१८	सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध (समीक्षा)
६५	अनुराधा पाटील	२०१९	कदाचित अजूनही (कवितासंग्रह)
६६	नंदा खरे	२०२०	उद्या (कादंबरी)
६७	श्री. किरण गुरव	२०२१	बाळूच्या अवस्थंतराची डायरी (कादंबरी)
६८	प्रवीण बांदेकर	२०२२	उजव्या सोंडेच्या बाहुल्या कादंबरी
६९	कृष्णात खोत	२०२३	रिंगाण (कादंबरी)
७०	सुधीर रसाळ	२०२४	विंदांचे गद्यरूप(समीक्षा)

वरीलप्रमाणे मराठी सारस्वतांना साहित्यिक योगदानाबद्दल साहित्य अकादमी पुरस्कार लाभले आहेत. याबरोबरच २०११ पासून युवा साहित्य अकादमी पुरस्कार युवा साहित्यिकांना दिले जातात त्याची यादी पुढीलप्रमाणे,

अ. क्र.	**साहित्यिकाचे नाव**	**वर्ष**	**साहित्यकृती**
१.	ऐश्वर्य पाटेकर	२०११	भुईशास्त्र (कविता–संग्रह)
२.	धर्मकीर्ति सुमंत	२०१२	पाणी चारू, आरो इत्यादि... (नाटक)
३.	रवि कोरडे	२०१३	धूसर झालं नसतं गाव (कविता–संग्रह)

४.	अवधूत डोंगरे	२०१४	स्वातहल फालतू समाजन्याची गोष्ठ
५.	वीरा राठौड़	२०१५	सेन साई वेस (कविता)
६.	मनस्विनी लता रवींद्र	२०१६	ब्लॉगच्या आरशापल्याड कथा
७.	राहुल कौसंबी	२०१७	उभं-आडवं कथासंग्रह
८.	नवनाथ गोरे	२०१८	फेसाटी
९.	सुशील कुमार शिंदे	२०१९	शहर आत्महत्या करायचा महंताय कविता
१०.	प्राजक्त देशमुख	२०२०	देवबाभळी (नाटक)
११.	प्रणव सखदेव	२०२१	काळेकरडे स्ट्रोक्स
१२.	पवन नालट	२०२२	मी सन्दर्भ पोखरतोय
१३.	विशाखा विश्वनाथ	२०२३	स्वत:ला स्वत:विरुद्ध उभं करताना
१४.	देवीदास सौदागर	२०२४	उसवण कादंबरी
१५.	प्रदीप कोकरे	२०२५	खोल खोल दुष्काल डोले कादंबरी

वरीलप्रमाणे युवा साहित्यिकांना साहित्य अकादमी युवा साहित्य पुरस्कार लाभले आहेत. साहित्य अकादमीकडून मराठी सारस्वतांना पुरस्कार लाभणे ही निश्चितच गौरवाची बाब आहे.

तसेच जागतिक स्तरावर विश्व मराठी साहित्य संमेलन, भारतीय पातळीवर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि प्रादेशिक स्तरावरील दरवर्षी भरविली जाणारी साहित्य संमेलने ही साहित्यिक चर्चा घडवितात. नवीन लेखनावर चर्चा, काव्य संमेलन, कथाकथन अशा माध्यमातून मराठी भाषेचे जतन व संवर्धन यावर विशेष भर दिला जातो. आजच्या काळात मराठी भाषेचे अध्ययन अध्यापन हे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, दिल्ली, गोवा, कर्नाटक या राज्यातील विविध विद्यापीठात मराठी भाषेचे अध्ययन – अध्यापन केले जाते. भारती विद्यापीठाच्या माध्यमातून परदेशी विद्यार्थीही मराठी भाषा आत्मसात करू लागली आहेत. हा मराठी भाषेचा उत्कर्षकाळ मानावयास हरकत नसावी.

भविष्यकाळात पदवी स्तरापर्यंत मराठी भाषा ही अनिवार्य भाषा म्हणून अभ्यासक्रमात समाविष्ट असावी. मराठी भाषेचे अध्ययन केल्यानंतर व्यावहारिक जीवनात व्यक्तिमत्त्व विकास साधला जावून रोजगार निर्मिती याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे लागेल. जागतिक व भारतीय भाषांमधील उच्च दर्जाच्या साहित्यकृती अनुवादित करून मराठी भाषेतील साहित्य समृद्ध करण्यास हातभार लावता येईल. समाजमाध्यमांवरील मराठी भाषा आणि त्यामधील लघुरूपेही आजच्या काळात संकुचित स्वरुपात दिसू लागली आहेत. दूरचित्रवाहिनीवरील दृश्य स्वरुपात असणारी मराठी भाषा आणि विविध फलक यावरील मराठी भाषा शुद्ध कशी दिसेल याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. केंद्र सरकारकडून मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा हा मराठी भाषेचे जतन व संवर्धन करण्यास त्याचबरोबर नवीन रोजगारनिर्मिती करण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल.

संदर्भ

गुगल संकेतस्थळ साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक

१.https://sahitya-akademi.gov.in/awards/akademi%20samman_suchi.jsp#MARATHI

२. https://sahitya-akademi.gov.in/awards/yuva_samman_suchi_h.jsp

भारतीय अभिजात भाषा : ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रा. अमोल अरुण कुंभार
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली
मो. नं. - 9049956368, ई मेल - amolakumbhar.vck@gmail.com

प्रस्तावना :

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीचे, ऐतिहासिक प्रवासाचे आणि बौद्धिक परंपरेचे द्योतक असते. भारतासारख्या बहुभाषिक देशात भाषांना केवळ प्रादेशिक नव्हे तर सांस्कृतिक ओळख प्राप्त झाली आहे. हजारो वर्षांपासून विकसित होत आलेल्या काही भाषांनी समृद्ध साहित्यनिर्मिती, शास्त्रीय परंपरा आणि तत्त्वज्ञानाचा वारसा जतन केला. अशा भाषांना 'अभिजात भाषा' असे संबोधले जाते. अभिजात भाषांचा अभ्यास केल्यास भारतीय समाजाची वैचारिक प्रगती, धार्मिक संकल्पना, कला, विज्ञान व तत्त्वज्ञान यांचा ऐतिहासिक मागोवा घेता येतो. म्हणूनच भारतीय अभिजात भाषांची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते.

कीवर्ड्स : भारतीय अभिजात भाषा ऐतिहासिक विकास, अभिजात भाषांनी आधुनिक भारतीय भाषांच्या विकासातील योगदान, अभिजात भाषांच्या संवर्धन व जतनाच्या दृष्टीने आधुनिक काळातील प्रयत्नांचे मूल्यमापन

संशोधनाची उद्दिष्टे :

1. भारतीय अभिजात भाषा ही संकल्पना स्पष्ट करणे व अभिजात भाषांच्या निकषांचे विश्लेषण करणे.
२. संस्कृत, तमिळ, कन्नड, तेलुगू, मल्याळम् व ओडिया या अभिजात भाषांच्या ऐतिहासिक विकासाचा कालानुक्रमे अभ्यास करणे.
३. प्रत्येक अभिजात भाषेच्या साहित्यिक परंपरेचा व प्रमुख ग्रंथांचा चिकित्सक आढावा घेणे.
४. अभिजात भाषांचा भारतीय समाजाच्या धार्मिक, तात्त्विक व सांस्कृतिक जीवनावर झालेला प्रभाव स्पष्ट करणे.
५. अभिजात भाषांनी आधुनिक भारतीय भाषांच्या विकासात दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.
६. शिलालेख, हस्तलिखिते व प्राचीन ग्रंथांच्या माध्यमातून अभिजात भाषांचे ऐतिहासिक पुरावे अधोरेखित करणे.
७. अभिजात भाषांच्या संवर्धन व जतनाच्या दृष्टीने आधुनिक काळातील प्रयत्नांचे मूल्यमापन करणे.

संशोधन पद्धती :

सदर शोधनिबंधासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. दुय्यम स्रोतांच्या आधारे माहिती संकलन व विश्लेषण करण्यात आले आहे. यामध्ये इतिहास, भाषाशास्त्र व साहित्य विषयक संदर्भग्रंथ इत्यादी समावेश आहे.

अभिजात भाषेची संकल्पना व निकष

भारत सरकारने 2004 साली 'अभिजात भाषा' ही संकल्पना अधिकृतरीत्या स्वीकारली. एखाद्या भाषेला अभिजात दर्जा देताना खालील प्रमुख निकष विचारात घेतले जातात :

1. किमान 1500 ते 2000 वर्षांपूर्वीचे लिखित पुरावे उपलब्ध असणे.
2. समृद्ध, उच्च दर्जाचे व प्राचीन साहित्य अस्तित्वात असणे.
3. भाषेची स्वतंत्र साहित्यिक व व्याकरणिक परंपरा असणे.
4. त्या भाषेचा आधुनिक भारतीय भाषांवर खोल सांस्कृतिक व भाषिक प्रभाव असणे.

या निकषांच्या आधारे भारतातील काही निवडक भाषांना अभिजात दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

भारतीय अभिजात भाषांचा ऐतिहासिक विकास

१. तमिळ भाषा

तमिळ ही भारतातील सर्वात प्राचीन जिवंत अभिजात भाषा आहे. इ.स.पू. 300 ते इ.स. 300 या कालखंडातील संगम साहित्य हे तमिळ साहित्याचे सुवर्णयुग मानले जाते. 'तोल्काप्पियम' हा तमिळ व्याकरणग्रंथ भाषेच्या प्राचीनतेचा पुरावा आहे. तमिळ साहित्यातील 'तिरुक्कुरळ' हा नैतिक व तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ जागतिक स्तरावर मान्यता पावलेला आहे. तमिळ भाषेने दक्षिण भारतीय समाजाच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक रचनेवर खोल प्रभाव टाकला आहे. १७ जून २००४ मध्ये तमिळ भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

२. संस्कृत भाषा

संस्कृत ही भारतातील सर्वात प्राचीन अभिजात भाषा मानली जाते. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे वेद संस्कृत भाषेत रचले गेले. संस्कृतमध्ये उपनिषदे, ब्राह्मणे, आरण्यके, महाकाव्ये (रामायण, महाभारत), पुराणे, स्मृतीग्रंथ, नाटके व काव्य यांची समृद्ध परंपरा आहे. पाणिनीचे अष्टाध्यायी हे व्याकरणशास्त्रातील अद्वितीय कार्य संस्कृत भाषेच्या शास्त्रीय स्वरूपाची साक्ष देते. भारतीय तत्त्वज्ञान, योग, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र यांचे मूलभूत ग्रंथ संस्कृतमध्येच उपलब्ध आहेत. त्यामुळे संस्कृत भाषेचा प्रभाव केवळ साहित्यापुरता मर्यादित न राहता संपूर्ण भारतीय ज्ञानपरंपरेवर पसरलेला दिसून येतो. २५ नोव्हेंबर २००५ मध्ये संस्कृत भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

३. कन्नड भाषा

कन्नड भाषेचा इतिहास इ. स. 5 व्या शतकापासून उपलब्ध शिलालेखांद्वारे ज्ञात होतो. 'कविराजमार्ग' हा कन्नडमधील पहिला साहित्यिक ग्रंथ मानला जातो. कन्नड साहित्यात जैन, वीरशैव आणि वैष्णव परंपरांचा प्रभाव दिसून येतो. पंप, रन्न, कुमारव्यास यांसारख्या कवींच्या रचनांनी कन्नड साहित्याला अभिजात स्वरूप प्राप्त करून दिले. कन्नड भाषेने दाक्षिणात्य साहित्यपरंपरेत महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. ३१ ऑक्टोबर २००८ मध्ये तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

४. तेलुगू भाषा

तेलुगू भाषेची साहित्यिक परंपरा इ.स. 6 व्या-7 व्या शतकापासून सुरू होते. 'आंध्र महाभारतम्' हा तेलुगूतील महत्त्वाचा ग्रंथ आहे. भक्ती चळवळीमुळे तेलुगू साहित्यात भक्तीपर काव्याची समृद्ध परंपरा विकसित झाली. तेलुगू भाषेला 'इटालियन ऑफ द ईस्ट' असेही संबोधले जाते, कारण तिची काव्यात्मक मधुरता आणि सौंदर्य. ३१ ऑक्टोबर २००८ मध्ये तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

५. मल्याळम् भाषा

मल्याळम् भाषेचा उगम तमिळपासून झाला असला तरी तिने स्वतंत्र साहित्यिक परंपरा विकसित केली. इ.स. 9व्या शतकानंतर मल्याळम् भाषेचा स्वतंत्र विकास सुरू झाला. मणिप्रवाळम् ही शैली मल्याळम्-संस्कृत मिश्र परंपरेचे उदाहरण आहे. भक्ती, लोकसाहित्य आणि आधुनिक साहित्य या तिन्ही क्षेत्रांत मल्याळम् भाषेने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. २३ मे २०१३ मध्ये तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

६. ओडिया भाषा

ओडिया भाषेची स्वतंत्र ओळख इ.स. 10 व्या-11 व्या शतकापासून दिसून येते. ओडिया भाषेची स्वतःची लिपी असून समृद्ध काव्यपरंपरा आहे. सरला दास यांचे 'ओडिया महाभारत' हे ओडिया साहित्यातील मैलाचा दगड मानले जाते. ओडिया भाषेने पूर्व भारतातील सांस्कृतिक परंपरा जपण्याचे कार्य केले आहे. २१ फेब्रुवारी २०१४ मध्ये तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

७. मराठी भाषा

पार्श्वभूमी हजारो वर्षांची असून, तिचा उगम महाराष्ट्री प्राकृत भाषेतून झाला, ज्याचा वापर सातवाहन काळात प्रशासनात होता; त्यानंतर अपभ्रंश होऊन प्राचीन मराठी (सुमारे १,०००-१,३०० वर्षांपूर्वी) उदयास आली आणि ज्ञानेश्वर, नामदेव यांसारख्या संतांनी १३व्या शतकात तिच्या साहित्याला समृद्ध करून तिला अभिजात दर्जा

मिळवून देण्यास मदत केली. या भाषेत संस्कृत, कन्नड, फारसी, अरबी यांचा प्रभाव असून, तिचा समृद्ध वाङ्मय वारसा आहे. ३ ऑक्टोबर २०२४ मध्ये तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

८. बंगाली भाषा

पार्श्वभूमी प्राचीन इंडो-आर्यन भाषांमधून विकसित झाली आहे, जी संस्कृत, पाली आणि प्राकृतपासून उदयास आली आहे, विशेषतः १० व्या शतकात मगधी प्राकृत आणि मगधी अपभ्रंश मधून तिची सुरुवात झाली, त्यानंतर जुना (९००-१३५०), मध्य (१३५0-१८००) आणि आधुनिक (१८००-सध्या) असे तीन टप्पे आहेत, ज्यामध्ये फ़ारसी आणि अरबीचा प्रभाव तसेच १९ व्या शतकातील पुनर्जागरण काळातील साहित्य आणि रवींद्रनाथांसारख्या दिग्गजांमुळे तिला जागतिक ओळख मिळाली, आणि ३ ऑक्टोबर २०२४ मध्ये तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

९. पाली भाषा

ऐतिहासिक पार्श्वभूमी खूप जुनी असून, ती मध्य इंडो-आर्यन (Middle Indo-Aryan) भाषिक गटातील एक महत्त्वाची भाषा आहे, जी थेरवाद बौद्ध धर्माची पवित्र भाषा म्हणून ओळखली जाते आणि त्रिपिटक या बौद्ध धर्मग्रंथांची भाषा आहे; तिचा उगम सुमारे ३००० वर्षांपूर्वी झाला असून, भगवान बुद्धांनी याच भाषेत आपले उपदेश दिले, ज्यामुळे तिला भारताच्या अभिजात भाषांच्या यादीत नुकताच (ऑक्टोबर २०२४) स्थान मिळाले आहे. ३ ऑक्टोबर २०२४ मध्ये तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

१०. प्राकृत भाषा

ऐतिहासिक पाया मध्ययुगीन भारतीय भाषांच्या विकासात आहे, ज्यात संस्कृतमधून विकसित झालेल्या आणि इ.स.पूर्व ५०० ते इ.स. ५०० या काळात बोलल्या जाणाऱ्या प्राकृत भाषांचा समावेश आहे; या भाषांना 'लोकांची भाषा' मानले जात असे, ज्यातून पुढे मराठीसारख्या आधुनिक भाषा निर्माण झाल्या, आणि आता भारत सरकारने मराठीसह काही प्राकृत भाषांना अभिजात दर्जा दिला आहे, ज्यासाठी १५००-२००० वर्षांचा जुना इतिहास आणि समृद्ध साहित्य परंपरा हे निकष आहेत. ३ ऑक्टोबर २०२४ मध्ये तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला. ३ ऑक्टोबर २०२४ मध्ये तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

११. आसामी भाषा

पार्श्वभूमी प्राचीन भारतीय-आर्य भाषांमधून विकसित झाली आहे, जी पूर्व मगधी प्राकृतच्या कामरूपी बोलीतून उगम पावली आहे; ८व्या ते १२व्या शतकातील बौद्ध 'चर्यापद' मध्ये तिचे प्राचीन रूप दिसते, तर १५व्या ते १७व्या शतकातील भक्ति चळवळीत, विशेषतः श्रीमत शंकरदेव यांच्या कार्यामुळे, ती पूर्णपणे विकसित झाली आणि आधुनिक भारतीय भाषा म्हणून स्थापित झाली, ज्याला ऑक्टोबर २०२४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. ३ ऑक्टोबर २०२४ मध्ये तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला.

अभिजात भाषांनी आधुनिक भारतीय भाषांच्या विकासातील योगदान

भारतीय अभिजात भाषांनी आधुनिक भारतीय भाषांच्या निर्मिती, विकास व समृद्धीमध्ये अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. भाषिक रचना, शब्दसंपदा, व्याकरण, साहित्यिक शैली, तात्त्विक संकल्पना आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती या सर्व क्षेत्रांत अभिजात भाषांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

१. शब्दसंपदेतील योगदान

संस्कृत ही आधुनिक आर्य भाषांची प्रमुख स्रोतभाषा मानली जाते. हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, ओडिया, पंजाबी यांसारख्या भाषांतील बहुसंख्य तत्सम व तद्भव शब्द संस्कृतमधून आलेले आहेत. त्याचप्रमाणे तमिळ, कन्नड, तेलुगू व मल्याळम् या अभिजात द्रविड भाषांनी आधुनिक द्रविड भाषांच्या शब्दसंपदेचा पाया घातला आहे.

२. व्याकरण व भाषिक रचना

अभिजात भाषांमधील व्याकरणिक परंपरेचा आधुनिक भाषांच्या रचनेवर खोल परिणाम झाला आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीचा प्रभाव भारतीय व्याकरण परंपरेवर आजही जाणवतो. वाक्यरचना, शब्दरचना, संधी, समास यांसारख्या तत्त्वांचा आधुनिक भाषांमध्ये वापर आढळतो.

३. साहित्यिक परंपरा व शैली

महाकाव्य, पुराणकथा, भक्तीपर काव्य, नाट्य आणि गद्य लेखन या साहित्यिक प्रकारांची परंपरा अभिजात भाषांमधून आधुनिक भाषांमध्ये संक्रमण पावली. संतसाहित्य, भक्ती चळवळीतील काव्य, लोककथा व नाट्यप्रकार यांवर अभिजात साहित्याचा प्रभाव दिसून येतो.

४. धार्मिक व तात्त्विक संकल्पनांचा प्रसार

धर्म, तत्त्वज्ञान, नीतीशास्त्र आणि अध्यात्मविषयक संकल्पना अभिजात भाषांमधून आधुनिक भाषांमध्ये अनुवादित व रूपांतरित झाल्या. यामुळे सामान्य जनतेपर्यंत वेद, उपनिषदे, आगम, भक्तिसाहित्य यांचे विचार पोहोचले.

५. लिपी व लेखनपरंपरेतील योगदान

अभिजात भाषांशी निगडित लिप्यांनी आधुनिक भारतीय भाषांच्या लेखनप्रणालीवर प्रभाव टाकला. ब्राह्मी लिपीपासून विकसित झालेल्या नागरी, बंगाली, गुजराती, ओडिया इत्यादी लिप्या या अभिजात भाषांच्या परंपरेचे द्योतक आहेत.

६. सांस्कृतिक एकात्मतेतील भूमिका

अभिजात भाषांनी भारतातील विविध भाषिक समुदायांमध्ये सांस्कृतिक संवाद घडवून आणला. धार्मिक ग्रंथ, नाट्य, संगीत व लोकपरंपरांमुळे भाषिक वैविध्य असूनही सांस्कृतिक एकात्मता टिकून राहिली.

७. आधुनिक काळातील अभिजात भाषांचे महत्त्व

आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही अभिजात भाषांचे महत्त्व कमी झालेले नाही. विद्यापीठीय अभ्यासक्रम, संशोधन, भाषांतरकार्य आणि डिजिटल जतन यांद्वारे या भाषांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवला जात आहे.

अभिजात भाषांच्या संवर्धन व जतनाच्या दृष्टीने आधुनिक काळातील प्रयत्नांचे मूल्यमापन:

आधुनिक काळात जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा झपाट्याने होणारा विकास आणि इंग्रजीसारख्या जागतिक भाषांचे वाढते वर्चस्व यांमुळे अभिजात भाषांसमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. तरीसुद्धा
भारत सरकार, शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि सांस्कृतिक संघटना यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे अभिजात भाषांच्या संवर्धन व जतनासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

१. शासकीय धोरणे व योजना

भारत सरकारने अभिजात भाषांना विशेष दर्जा देऊन त्यांच्या संवर्धनासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला आहे. संस्कृत, तमिळ, कन्नड, तेलुगू, मल्याळम् आणि ओडिया या भाषांसाठी केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयामार्फत संशोधन प्रकल्प, ग्रंथप्रकाशन आणि परिषदा आयोजित केल्या जातात. केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, तमिळ विश्वविद्यालय, कन्नड विश्वविद्यालय यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून अभिजात भाषांचा शैक्षणिक प्रसार केला जात आहे.

२. विद्यापीठीय अभ्यासक्रम व संशोधन

अनेक भारतीय विद्यापीठांमध्ये अभिजात भाषांसाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आले आहेत. पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. स्तरावर संशोधनाला प्रोत्साहन दिले जाते. संशोधन शिष्यवृत्ती, फेलोशिप्स आणि प्रकल्पांच्या माध्यमातून नव्या पिढीला अभिजात भाषांच्या अभ्यासाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

३. हस्तलिखितांचे जतन व डिजिटलीकरण

भारतातील लाखो प्राचीन हस्तलिखिते अभिजात भाषांमध्ये उपलब्ध आहेत. नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्ट्स (NMM) यांसारख्या उपक्रमांतर्गत या हस्तलिखितांचे जतन, वर्गीकरण आणि डिजिटलीकरण करण्यात येत आहे. यामुळे संशोधकांना दुर्मिळ ग्रंथ सहज उपलब्ध होत असून ज्ञानपरंपरेचे संरक्षण होत आहे.

४. अनुवाद व प्रकाशन कार्य

अभिजात भाषांतील साहित्य सामान्य वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आधुनिक भारतीय भाषांमध्ये तसेच इंग्रजीमध्ये अनुवादकार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. साहित्य अकादमी, विविध राज्य साहित्य अकादम्या आणि खासगी प्रकाशन संस्था या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

५. तंत्रज्ञान व डिजिटल माध्यमांचा वापर

डिजिटल ग्रंथालये, ऑनलाइन अभ्यासक्रम, मोबाईल ॲप्स आणि ई-प्लॅटफॉर्म्स यांच्या माध्यमातून अभिजात भाषांचे अध्ययन अधिक सुलभ झाले आहे. ई-शोधसिंधू, डिजिटल संस्कृत कोश, तमिळ डिजिटल कॉर्पस यांसारखे प्रकल्प या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.

६. मूल्यमापन व आव्हाने

वरील सर्व प्रयत्न असूनही अभिजात भाषांच्या दैनंदिन वापरात मर्यादा, विद्यार्थ्यांचा घटता ओढा आणि रोजगाराभिमुख शिक्षणाचा दबाव ही प्रमुख आव्हाने आहेत. त्यामुळे संवर्धनाच्या प्रयत्नांना केवळ शैक्षणिक न ठेवता सामाजिक व व्यावहारिक स्तरावर नेण्याची गरज आहे.

जागतिकीकरणाच्या संदर्भात अभिजात भाषांचे बदलते स्थान व महत्त्व

जागतिकीकरणामुळे जग जवळ आले असून ज्ञान, संस्कृती व भाषा यांचा परस्परसंवाद वाढला आहे. या प्रक्रियेत इंग्रजीसारख्या आंतरराष्ट्रीय भाषांना महत्त्व प्राप्त झाले असले, तरी अभिजात भाषांचे स्थान पूर्णतः गौण झालेले नाही. उलट, जागतिकीकरणाने अभिजात भाषांसाठी नव्या संधीही उपलब्ध करून दिल्या आहेत.

१. जागतिक शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील स्थान

आज जगातील अनेक नामांकित विद्यापीठांमध्ये संस्कृत, तमिळ व इतर अभिजात भारतीय भाषांचे अध्ययन व संशोधन केले जाते. इंडोलॉजी, भाषाशास्त्र, तत्त्वज्ञान आणि सांस्कृतिक अध्ययन या शाखांमध्ये अभिजात भाषांचे महत्त्व वाढले आहे.

२. सांस्कृतिक ओळख व सॉफ्ट पॉवर

अभिजात भाषा या भारताच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक बनल्या आहेत. योग, आयुर्वेद, भारतीय तत्त्वज्ञान व अध्यात्म यांच्या जागतिक प्रसारात संस्कृतसारख्या अभिजात भाषांची महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळे अभिजात भाषा भारताच्या सांस्कृतिक 'Soft Power' चा भाग ठरत आहेत.

३. अनुवाद, आंतरराष्ट्रीय संवाद व बाजारपेठ

जागतिक वाचकवर्गासाठी अभिजात साहित्याचे इंग्रजी व इतर भाषांमध्ये अनुवाद केले जात आहेत. यामुळे भारतीय अभिजात साहित्य जागतिक साहित्यविश्वात स्थान मिळवत आहे.

४. तंत्रज्ञानामुळे वाढलेली उपलब्धता

डिजिटल माध्यमांमुळे अभिजात भाषांतील ग्रंथ, शब्दकोश व संशोधन साहित्य जागतिक स्तरावर उपलब्ध झाले आहे. ई-लर्निंग आणि ओपन-सोर्स प्लॅटफॉर्म्समुळे अभ्यासकांना सीमारेषा ओलांडून ज्ञान मिळत आहे.

५. बदलते महत्त्व व मर्यादा

जागतिकीकरणात रोजगाराभिमुख शिक्षणावर भर असल्याने अभिजात भाषांचा प्रत्यक्ष आर्थिक उपयोग मर्यादित वाटतो. त्यामुळे त्यांचे महत्त्व प्रामुख्याने सांस्कृतिक, बौद्धिक व संशोधनात्मक पातळीवर केंद्रित झाले आहे.

६. चिकित्सक मूल्यमापन

जागतिकीकरणाच्या संदर्भात अभिजात भाषांचे स्थान संकुचित न होता रूपांतरित झाले आहे. या भाषा आज उपजीविकेच्या साधनापेक्षा ज्ञान, ओळख व सांस्कृतिक वारशाचे माध्यम म्हणून अधिक महत्त्वाच्या ठरत आहेत.

सारांश

भारतीय सभ्यता ही जगातील अत्यंत प्राचीन व सातत्यपूर्ण सभ्यतांपैकी एक मानली जाते. या सभ्यतेचा आत्मा तिच्या भाषांमध्ये प्रतिबिंबित होतो. भारत सरकारने मान्यता दिलेल्या अभिजात भाषांमध्ये संस्कृत, तमिळ, कन्नड, तेलुगू, मल्याळम्, ओडिया, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत, आसामी या भाषांचा समावेश होतो. या शोधनिबंधात भारतीय अभिजात भाषांची संकल्पना, निकष, ऐतिहासिक पार्श्वभूमी, साहित्यिक परंपरा, सामाजिक-

सांस्कृतिक प्रभाव आणि आधुनिक काळातील महत्त्व यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. अभिजात भाषांनी भारतीय संस्कृतीच्या वैचारिक, धार्मिक, तत्त्वज्ञानात्मक व साहित्यिक विकासात कसा मोलाचा वाटा उचलला आहे, हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न या निबंधात करण्यात आला आहे.

निष्कर्ष

भारतीय अभिजात भाषा या भारतीय संस्कृतीच्या बौद्धिक व सांस्कृतिक वारशाच्या वाहक आहेत. त्यांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास केल्यास भारतीय सभ्यतेच्या वैचारिक उंचीची जाणीव होते. म्हणूनच या भाषांचे संवर्धन, संशोधन व प्रचार करणे ही काळाची गरज आहे.

संदर्भसूची

- Bhandarkar, R. G. Early History of the Deccan and Miscellaneous Historical Essays, Bhandarkar Oriental Research Institute, Pune 1988.
- Bhat, M. S. Kannada Literature, University of Mysore Press, Mysuru 1993.
- Iyengar, Srinivasa P. T. History of the Tamils: From the Earliest Times to 600 A.D, Asian Educational Services, Madras 2001.
- Mukherjee, Sujit. A Dictionary of Indian Literature, Orient Longman, New Delhi 1998.
- Nagaraja Rao, M. S. History of Karnataka, Karnataka Historical Research Society, Bengaluru 2000.
- Raghavan, V. Sanskrit Literature, Sahitya Akademi, New Delhi 1975.
- Sastri, Nilakanta K. A. Development of Religion and Philosophy in South India, University of Madras, 1959.
- Sen, Sukumar. History of Bengali Literature, Sahitya Akademi, New Delhi 1991.
- Sharma, R. S. India's Ancient Past, Oxford University Press, New Delhi 2005.
- Subrahmanian, N. History of Tamil Literature, Tamil University, Madurai 2005.
- भांडारकर, रा. गो. संस्कृत वाङ्मयाचा इतिहास, भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे १९८८.
- खरे, ग. ह. भारतीय संस्कृतीचा इतिहास, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९९५.
- कोलते, मा. गो. भारतीय भाषांचा इतिहास विदर्भ साहित्य संघ, नागपूर २००१.
- देशपांडे, ग. ता. भारतीय भाषाशास्त्र, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २००५.
- पाटील, भालचंद्र. द्रविड भाषांचा अभ्यास, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर २००८.
- फडके, य. दि. भारतीय संस्कृती आणि भाषा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९९.
- बर्वे, श्रीकांत. तमिळ साहित्याचा इतिहास, तमिळ विश्वविद्यालय प्रकाशन, चेन्नई २०१०.
- साळुंखे, संजय. कन्नड साहित्य परंपरा, कर्नाटक साहित्य अकादमी, बेळगाव २०१२.
- जाधव, प्रकाश. ओडिया भाषा व साहित्य, ओडिशा साहित्य अकादमी, भुवनेश्वर २०१५.
- शिंदे, अनिल. आधुनिक भारतीय भाषांचा विकास मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन, औरंगाबाद २०१८.

B.Aadhar' International Refereed & Peer-Reviewed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXV) 565 -A

ISSN : 2278-9308 February 2026

मराठी भाषेचा ऐतिहासिक विकास व अभिजाततेची परंपरा

प्रा. मोहिनी संतोष सावंत

सहायक प्राध्यापक (मराठी)

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर.

भ्रमणध्वनी :- ९११२४१९०७३

गोषवारा :

मराठी भाषेचा ऐतिहासिक विकास हा केवळ भाषावैज्ञानिक प्रक्रिया नसून तो सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि धार्मिक घडामोडींशी घट्टपणे जोडलेला आहे. भाषा ही समाजाच्या सामूहिक स्मृतीचे आणि वैचारिक जडणघडणीचे प्रभावी माध्यम असल्याने मराठी भाषेच्या विकासाचा अभ्यास करताना व्यापक सामाजिक-सांस्कृतिक संदर्भांचा विचार करणे आवश्यक ठरते. मराठी भाषेची निर्मिती संस्कृतपासून थेट न होता महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश यांच्या संक्रमणशील प्रक्रियेतून घडली असून या लोकभाषिक प्रवाहामुळेच मराठीला स्वतंत्र भाषिक ओळख प्राप्त झाली.

इ.स. आठव्या ते अकराव्या शतकातील शिलालेख, ताम्रपट आणि दानपत्रांमधून मराठीच्या प्रारंभिक स्वरूपाचे ठोस पुरावे उपलब्ध होतात. मध्ययुगीन काळातील भक्ती चळवळीने मराठी भाषेला निर्णायक वळण दिले. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी मराठीला तत्त्वज्ञान, अध्यात्म आणि सामाजिक समतेचे प्रभावी माध्यम बनवले. ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांमुळे मराठी भाषेची साहित्यिक क्षमता, सर्जनशीलता आणि वैचारिक खोली स्पष्ट झाली.

शिवकालीन काळात मराठीला राजभाषेचा दर्जा प्राप्त झाला. राज्यकारभार, न्यायव्यवस्था आणि पत्रव्यवहारात मराठीचा वापर झाल्यामुळे तिचा प्रशासकीय विकास झाला. पेशवेकालात बखरी, दप्तरे, सनदा व पत्रव्यवहाराच्या माध्यमातून मराठी गद्य अधिक संघटित व प्रमाणबद्ध झाले. आधुनिक काळात ब्रिटिशकालीन शिक्षणपद्धती, मुद्रणसंस्कृती आणि वृत्तपत्रांच्या उदयामुळे मराठीचे प्रमाणिकीकरण झाले आणि ती आधुनिक ज्ञानव्यवहाराची भाषा बनली.

मराठी भाषेला दीर्घकालीन लिखित परंपरा, समृद्ध साहित्य, स्वतंत्र भाषिक रचना आणि अखंड सांस्कृतिक सातत्य लाभलेले असल्यामुळे तिची अभिजातता शास्त्रीय निकषांवर सिद्ध करता येते. समकालीन काळात जागतिकीकरण आणि इंग्रजीच्या प्रभावामुळे आव्हाने असली तरी डिजिटल माध्यमांमुळे मराठीच्या नव्या अभिव्यक्तीच्या शक्यता वाढत आहेत. त्यामुळे मराठी भाषा ही ऐतिहासिकदृष्ट्या समृद्ध, सांस्कृतिकदृष्ट्या सशक्त आणि अभ्यासण्यायोग्य अभिजात भाषा ठरते.

मराठी भाषेच्या ऐतिहासिक विकास व अभिजाततेच्या की-वर्ड्स (Keywords)

1. मराठी भाषेचा ऐतिहासिक विकास
2. महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश परंपरा
3. भक्ती चळवळ व संत साहित्य
4. शिवकालीन–पेशवेकालीन प्रशासकीय परंपरा
5. मराठी भाषेची अभिजातता

प्रस्तावना

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाच्या सांस्कृतिक स्मृती, वैचारिक संरचना आणि ऐतिहासिक जडणघडणीचे सजीव माध्यम असते. भारतीय भाषांच्या संदर्भात मराठी भाषेचा अभ्यास करताना तिचा विकास हा सामाजिक, राजकीय व धार्मिक घडामोडींशी परस्परसंबंधित असल्याचे स्पष्ट होते. मराठी भाषेची निर्मिती ही एकरेषीय न राहता बहुस्तरीय आणि संक्रमणशील प्रक्रियेतून घडलेली आहे. त्यामुळे मराठी भाषेचा इतिहास समजून घेताना केवळ भाषावैज्ञानिक नव्हे तर सामाजिक-सांस्कृतिक दृष्टीकोनही आवश्यक ठरतो. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाच्या सांस्कृतिक स्मृती, वैचारिक संरचना आणि ऐतिहासिक जडणघडणीचे सजीव माध्यम

असते. समाजातील जीवनपद्धती, सत्तासंरचना, धार्मिक विचारप्रवाह आणि सांस्कृतिक परिवर्तन यांचा थेट परिणाम भाषेच्या स्वरूपावर होत असतो. "भाषा ही समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब असून समाजातील ऐतिहासिक आणि सामाजिक परिवर्तनांचा ठसा तिच्या विकासप्रक्रियेत सातत्याने उमटत जातो." [१] भारतीय भाषिक परंपरेत मराठी भाषेचा विकास हा स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाचा आहे. मराठी भाषेची जडणघडण ही केवळ संस्कृतपासून थेट झालेली नसून ती महाराष्ट्री प्राकृत, अपभ्रंश आणि विविध देशी बोली यांच्या परस्परसंवादातून घडलेली बहुस्तरीय आणि संक्रमणशील प्रक्रिया आहे. या भाषिक प्रवासाविषयी शं. गो. देशपांडे स्पष्ट करतात की, "मराठी भाषेची निर्मिती ही संस्कृतपासून थेट न होता महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश यांच्या संक्रमणशील प्रक्रियेतून घडलेली असून याच प्रक्रियेत तिला स्वतंत्र भाषिक ओळख प्राप्त होते." [२] मध्ययुगीन भक्ती चळवळ, शिवकालीन प्रशासन आणि आधुनिक काळातील शिक्षण व मुद्रणसंस्कृती यांमुळे मराठी भाषेला सामाजिक स्वीकार, साहित्यिक विस्तार आणि प्रशासकीय प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्यामुळे मराठी भाषेचा इतिहास समजून घेताना केवळ भाषावैज्ञानिक दृष्टिकोन पुरेसा ठरत नाही; तिच्या विकासाला सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संदर्भांशी जोडून पाहणे आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधनामध्ये मराठी भाषेच्या ऐतिहासिक विकासाचा असा बहुआयामी अभ्यास करून तिच्या अभिजाततेची संकल्पना शास्त्रीय पातळीवर तपासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१.मराठी भाषेच्या ऐतिहासिक विकासाच्या टप्प्यांचा अभ्यास करणे.
२ .मध्ययुगीन संत साहित्याचा मराठी भाषेच्या विस्तारातील वाटा विशद करणे.
३ . मराठी भाषेच्या अभिजाततेची सैद्धांतिक व साहित्यिक पातळीवर चिकित्सा करणे.

मराठी भाषेची उत्पत्ती व प्रारंभिक विकास

मराठी भाषेची मुळे जरी संस्कृतमध्ये आढळत असली तरी तिचा थेट आणि नैसर्गिक विकास महाराष्ट्री प्राकृत व त्यानंतरच्या अपभ्रंश परंपरेतून झाल्याचे आधुनिक भाषावैज्ञानिक अभ्यासातून स्पष्ट होते. संस्कृत ही मुख्यतः धर्म, तत्त्वज्ञान व अभिजनवर्गाची भाषा होती; तर प्राकृत भाषा सामान्य जनतेच्या दैनंदिन व्यवहाराशी निगडित होती. विशेषतः महाराष्ट्री प्राकृत ही केवळ काव्यनिर्मितीपुरती मर्यादित न राहता लोकव्यवहार, प्रशासन आणि सामाजिक व्यवहारांची भाषा म्हणून रूढ होती. महाराष्ट्री प्राकृतमधील ध्वन्यात्मक सुलभता, शब्दरचनेतील साधेपणा आणि क्रियापदांच्या रूपांतरणाची प्रक्रिया ही मराठी भाषेच्या घडणीत निर्णायक ठरली. आजच्या मराठीतील अनेक शब्द, प्रत्यय आणि वाक्यरचना या प्राकृत परंपरेतून आलेल्या दिसून येतात. "मराठी भाषेचा थेट विकास संस्कृतपेक्षा महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश परंपरेतून झालेला असून या लोकभाषिक प्रवाहानेच मराठीला स्वतंत्र स्वरूप प्राप्त करून दिले."[३] अपभ्रंशाच्या टप्प्यावर मराठी भाषेची रचना अधिक स्पष्ट होत गेली. या काळात भाषेतील विभक्ती, क्रियापदे आणि वाक्यरचना अधिक स्थिर स्वरूप धारण करू लागली. त्यामुळे मराठी भाषा ही केवळ संस्कृतची शाखा न राहता स्वतंत्र भाषिक अस्तित्वाची जाणीव निर्माण करणारी भाषा ठरली.

मराठी भाषेच्या प्रारंभिक विकासाचे ठोस पुरावे इ.स. आठव्या ते अकराव्या शतकातील शिलालेख, ताम्रपट, दानपत्रे आणि राजकीय दस्तऐवजांतून उपलब्ध होतात. या लेखी साधनांमधून मराठी भाषेचे आद्य रूप स्पष्टपणे दिसून येते. प्रारंभी या दस्तऐवजांमध्ये संस्कृतप्रधान रचना असली तरी त्यात वापरलेले शब्दप्रयोग, वाक्यरचना आणि व्याकरणिक लवचिकता ही मराठी भाषेच्या उदयाची साक्ष देतात. या शिलालेखांमधील भाषिक वैशिष्ट्ये पाहता मराठी भाषा ही केवळ बोली स्वरूपात अस्तित्वात नसून ती लेखनाच्या माध्यमातूनही स्थिरावत असल्याचे दिसते. विशेषतः दानपत्रांमधील व्यवहारभाषा ही लोकजीवनाशी निगडित असल्यामुळे मराठीच्या सामाजिक पायाभूत रचनेचे दर्शन घडवते. "आठव्या ते अकराव्या शतकातील शिलालेख व ताम्रपटांमधील भाषा पाहता मराठी ही स्वतंत्र भाषिक ओळख घडविण्याच्या टप्प्यावर पोहोचलेली दिसते."[४] या लेखी पुराव्यांमुळे मराठी भाषेचा प्रारंभिक विकास हा केवळ अनुमानावर आधारित न राहता ऐतिहासिक व भाषावैज्ञानिक दृष्ट्या सिद्ध करता येतो. त्यामुळे मराठी भाषेची परंपरा ही दीर्घकालीन, सुसंगत आणि अभिजाततेच्या निकषांकडे वाटचाल करणारी असल्याचे स्पष्ट होते.

मध्ययुगीन मराठी व भक्ती चळवळ

मध्ययुगीन काळात उदयास आलेल्या भक्ती चळवळीने मराठी भाषेच्या विकासात निर्णायक भूमिका बजावली. संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकारामांपर्यंतच्या संतपरंपरेने मराठी भाषेला केवळ भावनिक अभिव्यक्तीचे नव्हे तर

तत्त्वज्ञान, अध्यात्म आणि सामाजिक समतेचे प्रभावी माध्यम बनवले. या संतांनी संस्कृतप्रधान धार्मिक परंपरेला आव्हान देत लोकभाषेच्या माध्यमातून ईश्वरभक्ती आणि मानवी मूल्यांचा प्रसार केला. संत ज्ञानेश्वरांनी रचलेली ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड मानली जाते. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ केवळ भगवदगीतेचा मराठी अनुवाद नसून तो मराठी भाषेच्या सर्जनशील, तत्त्वज्ञान मांडण्याच्या आणि काव्यात्मक क्षमतेचा प्रत्यय देणारा स्वतंत्र साहित्यग्रंथ आहे. या संदर्भात भालचंद्र नेमाडे स्पष्ट करतात की, "ज्ञानेश्वरी हा केवळ गीतेचा अनुवाद नसून मराठी भाषेने तत्त्वज्ञानाच्या अभिव्यक्तीसाठी प्राप्त केलेली आत्मविश्वासपूर्ण साहित्यिक उंची दर्शवणारा ग्रंथ आहे." [५] संत नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी अभंग, ओवी, भारुड, कीर्तन यांसारख्या लोकसाहित्यप्रकारांचा वापर करून मराठी भाषेला व्यापक सामाजिक स्वीकार मिळवून दिला. यामुळे मराठी भाषा ही ग्रामीण आणि शहरी समाजाच्या जीवनानुभवांची प्रतिनिधी भाषा बनली.

भक्ती चळवळीमुळे संस्कृतप्रधान धार्मिक आणि तत्त्वज्ञानात्मक ज्ञान सामान्य जनतेपर्यंत पोहोचले. यापूर्वी धार्मिक ज्ञानावर ब्राह्मणवर्गाचे वर्चस्व होते; मात्र संत साहित्यामुळे हे ज्ञान लोकभाषेत उपलब्ध झाले. परिणामी मराठी भाषेच्या वापराचा सामाजिक आवाका लक्षणीयरीत्या वाढला. भक्ती परंपरेमुळे भाषा ही सामाजिक समतेचे साधन ठरली. जात, वर्ग आणि लिंगभेदांच्या पलीकडे जाऊन मराठी भाषा सर्वसामान्य जनतेच्या भावना, श्रद्धा आणि प्रश्न व्यक्त करणारी माध्यम बनली. या प्रक्रियेमुळे मराठी भाषेला सांस्कृतिक स्वायत्तता प्राप्त झाली आणि तिची लोकभाषा म्हणून दृढ स्थापना झाली."भक्ती चळवळीने मराठी भाषेला अभिजनांच्या मर्यादेतून बाहेर काढून सामान्य जनतेच्या जीवनाशी थेट जोडले आणि याच प्रक्रियेत मराठीचे भाषिक लोकशाहीकरण घडून आले." [६] भाषिक लोकशाहीकरणामुळे मराठी भाषेची साहित्यपरंपरा अधिक व्यापक, बहुविध आणि समाजाभिमुख झाली. त्यामुळे मध्ययुगीन भक्ती चळवळ ही मराठी भाषेच्या अभिजाततेकडे वाटचाल करणारी एक महत्त्वाची ऐतिहासिक प्रक्रिया ठरते.

शिवकालीन व पेशवेकालीन मराठी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठी भाषेला प्रशासकीय व राजभाषेचा दर्जा प्राप्त झाला. शिवाजी महाराजांनी जाणूनबुजून मराठीचा वापर राज्यकारभार, न्यायनिवाडा, करपद्धती, सनदा, हुकुमनामे व पत्रव्यवहारात रूढ केला. राज्यकारभार, न्यायव्यवस्था व पत्रव्यवहारासाठी मराठीचा वापर वाढल्यामुळे तिच्या शब्दसंपत्तीचा आणि औपचारिक स्वरूपाचा विकास झाला. राज्यव्यवहारकोश या ग्रंथामुळे प्रशासकीय संज्ञांचे मराठीकरण झाले. "शिवकालात मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे तिचा प्रशासकीय आणि शब्दसंपत्तीगत विकास झाला."[७] पेशवेकालात ही परंपरा पुढे अधिक दृढ झाली. या काळात बखरी, दप्तरे, सनदा, पत्रव्यवहार आणि हिशोबनामा यांसारख्या लिखित स्वरूपांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. बखरींमधून ऐतिहासिक घटनांचे वर्णन झाले, तर दप्तरे व पत्रव्यवहारातून प्रशासनाची दैनंदिन कामकाजपद्धती नोंदवली गेली. या लेखनामुळे मराठी गद्याला अधिक संघटित, स्पष्ट आणि प्रमाणबद्ध स्वरूप प्राप्त झाले. पेशवेकालीन गद्यलेखनामुळे मराठी भाषेला इतिहासलेखनाची स्थिर परंपरा लाभली. घटनांची नोंद, व्यक्तींचे कार्य, युद्धवर्णने आणि राजकीय घडामोडी यांचे दस्तऐवजीकरण मराठीत झाले. त्यामुळे मराठी गद्य केवळ साहित्यिक अभिव्यक्तीपुरते मर्यादित न राहता, प्रशासन व इतिहासाची विश्वसनीय भाषा म्हणून प्रस्थापित झाले. अशा प्रकारे शिवकालीन राजाश्रय आणि पेशवेकालीन लेखनपरंपरा यांच्या संयोगातून मराठी भाषेचा प्रशासकीय, गद्यात्मक व ऐतिहासिक विकास घडून आला.

आधुनिक मराठी भाषेचा विकास

ब्रिटिश काळात आधुनिक शिक्षणपद्धती, मुद्रणसंस्कृती आणि वृत्तपत्रांच्या उदयामुळे मराठी भाषेचे प्रमाणिकीकरण झाले. शालेय पाठ्यपुस्तके, शब्दकोश आणि व्याकरणग्रंथांच्या निर्मितीमुळे प्रमाण मराठीचा विकास घडून आला. या प्रक्रियेमुळे मराठी भाषा लोकभाषेच्या मर्यादेतून बाहेर पडून आधुनिक ज्ञानव्यवहाराची भाषा बनली. "ब्रिटिश काळातील शिक्षण आणि मुद्रणसंस्कृतीमुळे मराठी भाषेचे प्रमाणिकीकरण आणि आधुनिकीकरण झाले." [८] या काळात कादंबरी, लघुकथा, नाटक, समीक्षा आणि आत्मकथन यांसारख्या साहित्यप्रकारांचा विकास झाला. सामाजिक सुधारणा, राष्ट्रवाद, दलित आणि स्त्रीवादी जाणीवा यांचे प्रतिबिंब आधुनिक मराठी साहित्यात उमटले. यामुळे मराठी

भाषेला आधुनिक संवेदनशीलता आणि वैचारिक व्यापकता प्राप्त झाली. आधुनिक साहित्यप्रकारांच्या उदयामुळे मराठी भाषेला नवे सामाजिक आशय आणि आधुनिक अभिव्यक्तीची दिशा मिळाली.

मराठी भाषेची अभिजाततेची चिकित्सा

मराठी भाषेची अभिजातता ही भावनिक अभिमानापुरती मर्यादित न राहता शास्त्रीय निकषांवर सिद्ध करता येते. अभिजात भाषेसाठी आवश्यक असलेली दीर्घकालीन लिखित परंपरा मराठीला लाभलेली आहे. बारावे तेरावे शतकातील शिलालेख, तसेच ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव यांसारखे ग्रंथ मराठीच्या प्राचीन लिखित स्वरूपाचे ठोस पुरावे देतात. मराठीची साहित्यपरंपरा अत्यंत समृद्ध व विविधांगी आहे. संत साहित्य, पंडिती परंपरा, लोकसाहित्य, तसेच आधुनिक काळातील कथा, कादंबरी, कविता, नाटक आणि वैचारिक लेखन यांमधून मराठीने उच्च दर्जाचे आणि विचारप्रधान साहित्य निर्माण केले आहे. हे साहित्य केवळ कलात्मक नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि तत्त्वचिंतनात्मक आशयाने परिपूर्ण आहे. भाषावैज्ञानिक दृष्टीने मराठीची स्वतंत्र भाषिक संरचना स्पष्ट दिसते. संस्कृत, प्राकृत व अपभ्रंशाशी नाते असूनही मराठीने स्वतःची व्याकरणरचना, शब्दसंपदा आणि अभिव्यक्तीची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. तसेच मराठी भाषेला अखंड सांस्कृतिक सातत्य लाभलेले असून ती महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाशी घट्ट जोडलेली आहे. म्हणून मराठी भाषेची अभिजातता ही केवळ भावनिक दावा न राहता, ऐतिहासिक, भाषिक आणि सांस्कृतिक निकषांवर आधारित व शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध करता येणारी वास्तवता आहे.

समकालीन संदर्भ व आव्हाने

जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वेगवान विस्तार आणि इंग्रजी भाषेचे वाढते वर्चस्व यांमुळे मराठी भाषेसमोर नव्या स्वरूपाची आव्हाने निर्माण झाली आहेत. शिक्षण, रोजगार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात इंग्रजीचा प्रभाव वाढल्यामुळे मराठीच्या वापरावर मर्यादा येत असल्याचे दिसून येते. "जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मराठी भाषेच्या सामाजिक वापरास अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत." [९] तथापि, डिजिटल माध्यमे, सामाजिक जाळी, ई-पुस्तके, ब्लॉग, अनुवाद साहित्य आणि नवमाध्यमे यांमुळे मराठी भाषेला नवी अभिव्यक्तीची क्षेत्रे उपलब्ध झाली आहेत. या माध्यमांद्वारे मराठीचा प्रसार अधिक व्यापक होत असून तिची समकालीन उपयुक्तता वाढत आहे. नवमाध्यमे आणि अनुवाद प्रक्रियेमुळे मराठी भाषा नव्या जागतिक संदर्भात विस्तारत आहे.

७. मराठी भाषेची अभिजाततेची वैशिष्ट्ये -

मराठी भाषेची अभिजातता ही केवळ भावनिक गौरवाचा विषय नसून ती ठोस शास्त्रीय आणि भाषावैज्ञानिक निकषांवर आधारित आहे. तिच्या ऐतिहासिक सातत्यामुळे आणि सर्जनशील साहित्यपरंपरेमुळे मराठी भाषेला भारतीय भाषांमध्ये एक स्वतंत्र आणि प्रतिष्ठित स्थान प्राप्त झाले आहे. मराठी भाषेला हजार वर्षांहून अधिक काळाची लिखित परंपरा लाभलेली आहे. आठव्या–नवव्या शतकांपासून उपलब्ध असलेले शिलालेख, ताम्रपट, संतसाहित्य, बखरी, दप्तरे, आधुनिक साहित्य आणि आजचे डिजिटल लेखन हे तिच्या अखंड प्रवाहाचे पुरावे ठरतात. अशी दीर्घकालीन परंपरा ही कोणत्याही भाषेच्या अभिजाततेचे प्रमुख लक्षण मानली जाते. मराठी भाषेची साहित्यसंपदा अत्यंत समृद्ध आणि विविधांगी आहे. काव्य, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, समीक्षा, तत्त्वज्ञान, विज्ञानलेखन, लोकसाहित्य अशा सर्व साहित्यप्रकारांत मराठीत उच्च दर्जाची निर्मिती झाली आहे. संतसाहित्यापासून आधुनिक प्रयोगशील साहित्यापर्यंतचा प्रवास मराठीच्या सर्जनशील क्षमतेचे द्योतक आहे. मराठी भाषेची स्वतंत्र भाषिक रचना आणि व्याकरणिक परंपरा विकसित झाली आहे. ध्वनीरचना, शब्दरचना, वाक्यरचना आणि बोलीभाषांचा व्यापक पट यांमुळे मराठीचे स्वतंत्र भाषिक व्यक्तिमत्त्व सिद्ध होते. ती केवळ संस्कृतची उपभाषा नसून स्वतंत्र भाषिक अस्तित्व असलेली भाषा आहे. मराठी भाषेमध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि तात्त्विक अभिव्यक्तीची सशक्त क्षमता आढळते. संतांनी तत्त्वज्ञान लोकभाषेत मांडले, समाजसुधारकांनी विचारप्रबोधनासाठी मराठीचा उपयोग केला, तर आधुनिक साहित्याने स्त्रीवाद, दलितवाद, ग्रामीणता, जागतिकीकरण अशा जटिल विषयांचे सखोल चिंतन व्यक्त केले. त्यामुळे मराठी ही केवळ संवादाची भाषा न राहता विचारांची भाषा ठरते. मराठी भाषेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लोकभाषा आणि साहित्यभाषा यांतील सजीव सातत्य. ग्रामीण बोली, वारकरी परंपरा, लोकगीत, ओवी, अभंग आणि आधुनिक लिखित मराठी यांच्यात एक सुसंगत प्रवाह दिसून येतो. ही सलगता भाषेच्या नैसर्गिक विकासाचे आणि लोकांशी असलेल्या तिच्या घट्ट नात्याचे द्योतक आहे.

निष्कर्ष

१ मराठी भाषेचा ऐतिहासिक विकास हा संस्कृत प्राकृत अपभ्रंश परंपरेतून घडलेला सातत्यपूर्ण आणि संक्रमणशील प्रवास आहे.

२ मध्ययुगीन भक्ती चळवळीमुळे मराठी भाषा लोकभाषा म्हणून सशक्त झाली आणि तिला तत्त्वज्ञान व सामाजिक आशय व्यक्त करण्याची क्षमता प्राप्त झाली.

३ शिवकालीन व पेशवेकालीन काळात मराठीला प्रशासकीय व राजभाषेचा दर्जा मिळाल्यामुळे तिच्या गद्य परंपरेचा आणि शब्दसंपत्तीचा लक्षणीय विकास झाला.

४ आधुनिक काळात शिक्षण, मुद्रणसंस्कृती आणि साहित्यप्रकारांच्या विस्तारामुळे मराठी भाषेचे प्रमाणिकीकरण व आधुनिकीकरण झाले.

५ त्यामुळे मराठी भाषा ही भारतीय भाषासंस्कृतीतील एक महत्त्वाची व अभ्यासण्यायोग्य अभिजात भाषा ठरते.

संदर्भसूची

१ गं. ना. जोगळेकर मराठी भाषेचा इतिहास. पुणे: श्रीविद्या प्रकाशन.२००४

२ दातार, ग. ह. मराठी साहित्याचा विकास. पुणे : शारदा प्रकाशन.१९५८

३ नेमाडे, भालचंद्र. साहित्य,संस्कृती आणि जागतिकीकरण राजकमल प्रकाशन २००१

४ देशपांडे, शं. गो. मराठीची भाषिक परंपरा. पुणे: व्हीनस प्रकाशन.१९७६

आधुनिक समाजातील अभिजात भाषांचे स्थान : सांस्कृतिक ओळख व सामाजिक समावेशनाच्या दृष्टीने विश्लेषण

प्रा. सतिश अजित कांबळे
सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग
भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली,
मो. न. ९९२२१४१९२७
Email - kamblesatish734@gmail.com

घोषवारा

प्रस्तुत संशोधन निबंधात आधुनिक समाजातील अभिजात भाषांचे स्थान सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक समावेशनाच्या दृष्टीने विश्लेषित करण्यात आले आहे. भाषा ही समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीची आणि सामाजिक रचनेची वाहक असते. भारतीय संदर्भात अभिजात भाषांनी दीर्घकालीन साहित्यपरंपरेच्या माध्यमातून सामाजिक मूल्ये, परंपरा आणि सामूहिक ओळख घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आधुनिक काळात जागतिकीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे भाषिक व्यवहारात बदल होत असले तरी अभिजात भाषांचे सांस्कृतिक महत्त्व अद्याप टिकून आहे.

हा संशोधन निबंध पूर्णतः दुय्यम साहित्यावर आधारित असून पुस्तके, संशोधन लेख, जर्नल्स आणि समीक्षात्मक ग्रंथांच्या आधारे अभिजात भाषांचे सामाजिक योगदान स्पष्ट केले आहे. अभ्यासातून असे दिसून येते की अभिजात भाषा केवळ अभिजन वर्गापुरत्या मर्यादित न राहता, अनुवाद, शिक्षण आणि डिजिटल माध्यमांच्या सहाय्याने व्यापक समाजघटकांपर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळे सांस्कृतिक सातत्य राखणे आणि सामाजिक समावेशन बळकट करणे या दोन्ही प्रक्रियांमध्ये अभिजात भाषांचे योगदान लक्षणीय आहे.

मुख्य शब्द: अभिजात भाषा, सांस्कृतिक ओळख, सामाजिक समावेशन, साहित्यपरंपरा, आधुनिक समाज, दुय्यम साहित्य

प्रस्तावना:

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीचे, मूल्यव्यवस्थेचे आणि सामाजिक ओळखीचे एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे. भारतीय समाजात विविध भाषा व बोली अस्तित्वात असून त्यामध्ये काही भाषांना त्यांच्या प्राचीन परंपरेमुळे, समृद्ध साहित्यसंपदेने आणि ऐतिहासिक सातत्यामुळे '**अभिजात भाषा**' असा दर्जा देण्यात आलेला आहे. आधुनिक समाजात जागतिकीकरण, तंत्रज्ञान आणि बदलत्या जीवनशैलीमुळे भाषांच्या वापरात मोठे परिवर्तन घडत असले तरी अभिजात भाषांचे सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व अद्याप टिकून आहे. या संशोधन निबंधाचा उद्देश आधुनिक समाजात अभिजात भाषांचे स्थान समजून घेणे आणि त्या **सांस्कृतिक ओळख** व **सामाजिक समावेशन** या संदर्भात कशा प्रकारे योगदान देतात याचे विश्लेषण करणे हा आहे.

संशोधन पद्धती:

सदर संशोधन निबंध **दुय्यम सामग्रीवर आधारित** असून त्यासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनासाठी पुस्तके, शोधनिबंध, संशोधन लेख, शासकीय अहवाल, साहित्यिक समीक्षात्मक ग्रंथ तसेच विश्वासार्ह जर्नल्समधील लेख यांचा वापर करण्यात आला आहे. संकलित साहित्याचे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने अध्ययन करून अभिजात भाषांचे आधुनिक समाजातील स्थान, सांस्कृतिक ओळख व सामाजिक समावेशनाशी असलेले संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

संशोधनाचे महत्त्व:

प्रस्तुत संशोधन निबंधाचे महत्त्व सामाजिक शास्त्र आणि साहित्य अभ्यास या दोन्ही क्षेत्रांच्या दृष्टीने लक्षणीय आहे. आधुनिक समाजात वेगाने घडणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक बदलांच्या पार्श्वभूमीवर अभिजात भाषांचे स्थान समजून घेणे आवश्यक झाले आहे. या संशोधनातून अभिजात भाषा केवळ ऐतिहासिक वारसा नसून त्या समाजाच्या सांस्कृतिक ओळखीच्या जतनासाठी आणि सामाजिक समावेशनाच्या प्रक्रियेसाठी कशा प्रकारे उपयुक्त ठरतात हे स्पष्ट होते.

सदर अभ्यासामुळे अभिजात भाषांतील साहित्य सामाजिक मूल्ये, सामूहिक स्मृती आणि सामाजिक ऐक्य निर्माण करण्यात कशी भूमिका बजावते याचे आकलन होते. तसेच अभिजात भाषांचे शिक्षण, संवर्धन व प्रसार हे सामाजिक समतोल आणि सांस्कृतिक सातत्यासाठी का महत्त्वाचे आहेत, यावर प्रकाश टाकला जातो. सामाजिक शास्त्रातील संशोधक, साहित्य अभ्यासक आणि धोरणनिर्मात्यांसाठी हा अभ्यास संदर्भात्मक ठरू शकतो.

संशोधनाची व्याप्ती:

या संशोधनाची व्याप्ती आधुनिक समाजातील अभिजात भाषांचे सांस्कृतिक आणि सामाजिक पैलू समजून घेण्यापुरती मर्यादित आहे. अभ्यास पूर्णतः दुय्यम साहित्यावर आधारित असून त्यामध्ये अभिजात भाषांशी संबंधित ग्रंथ, संशोधन लेख, साहित्यसमीक्षा, जर्नल्स आणि शैक्षणिक अहवालांचा वापर करण्यात आला आहे. संशोधनात अभिजात भाषांचा ऐतिहासिक विकास किंवा भाषावैज्ञानिक विश्लेषण सविस्तरपणे करण्यात आलेले नाही. तसेच कोणताही प्राथमिक सर्वेक्षण, मुलाखत किंवा क्षेत्रीय अभ्यास या संशोधनाच्या व्याप्तीत समाविष्ट नाही. सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक समावेशन या दोन सामाजिक संकल्पनांच्या संदर्भात अभिजात भाषांचे योगदान विश्लेषित करणे एवढ्यापुरतीच या संशोधनाची व्याप्ती मर्यादित आहे.

संशोधनाच्या मर्यादा:

प्रस्तुत संशोधन निबंध काही विशिष्ट मर्यादांच्या चौकटीत करण्यात आला आहे. सर्वप्रथम, हे संशोधन पूर्णतः **दुय्यम साहित्यावर आधारित** असल्यामुळे प्रत्यक्ष क्षेत्रीय अनुभव, मुलाखती किंवा सर्वेक्षणाद्वारे प्राप्त झालेली प्राथमिक माहिती या अभ्यासात समाविष्ट करण्यात आलेली नाही. त्यामुळे निष्कर्ष प्रामुख्याने उपलब्ध साहित्याच्या विश्लेषणावर अवलंबून आहेत. या संशोधनाचा आवाका अभिजात भाषांच्या **सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक समावेशन** या दोन पैलूंपुरताच मर्यादित ठेवण्यात आला आहे. भाषावैज्ञानिक, तांत्रिक किंवा तुलनात्मक भाषाशास्त्रीय विश्लेषण या अभ्यासाच्या कक्षेत समाविष्ट नाही.

तृतीय, सर्व अभिजात भाषांचा सखोल आणि स्वतंत्र अभ्यास करणे शक्य नसल्यामुळे निवडक संदर्भग्रंथ आणि संशोधन लेखांपुरतेच विश्लेषण मर्यादित आहे. त्यामुळे प्रादेशिक विविधता आणि भाषिक अनुभवांचा सविस्तर विचार करण्यात आलेला नाही.

चतुर्थ, आधुनिक समाजाच्या संदर्भातील विश्लेषण हे व्यापक स्वरूपाचे असून कालमर्यादित किंवा विशिष्ट भौगोलिक क्षेत्राशी निगडित सांख्यिकीय अभ्यास या संशोधनात समाविष्ट नाही.

अखेर, संशोधनात वापरण्यात आलेले दुय्यम साहित्य हे लेखकांच्या दृष्टीकोनावर आधारित असल्यामुळे त्यामधील वैचारिक मर्यादा अप्रत्यक्षपणे या अभ्यासावर प्रभाव टाकू शकतात.

समाजशास्त्रातील महत्त्व

समाजशास्त्र हे समाजरचना, सामाजिक संबंध, सांस्कृतिक मूल्ये आणि सामाजिक परिवर्तन यांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. प्रस्तुत संशोधन शीर्षक आधुनिक समाजातील अभिजात भाषांचे स्थान सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक समावेशन या दोन महत्त्वाच्या समाजशास्त्रीय संकल्पनांच्या संदर्भात तपासते, त्यामुळे या विषयाला

समाजशास्त्रात विशेष महत्त्व प्राप्त होते. अभिजात भाषा या समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असून त्या सामूहिक स्मृती आणि सामाजिक ओळख निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, सांस्कृतिक ओळख ही सामाजिक ऐक्य, समूहभावना आणि समाजातील सातत्य टिकवून ठेवण्याचा एक प्रमुख घटक आहे. त्यामुळे अभिजात भाषांचा अभ्यास समाजातील सांस्कृतिक रचनेचे आकलन करण्यास मदत करतो.

सामाजिक समावेशन ही आधुनिक समाजशास्त्रातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. अभिजात भाषांतील साहित्य, विशेषतः संतपरंपरा व मानवतावादी विचार, समाजातील विविध घटकांना जोडण्याचे कार्य करतात. त्यामुळे भाषा आणि साहित्य हे केवळ अभिव्यक्तीचे माध्यम नसून सामाजिक समता, सहभाग आणि समन्वय वाढविण्याचे साधन कसे ठरते, हे या संशोधनातून स्पष्ट होते.

जागतिकीकरण, शहरीकरण आणि तांत्रिक परिवर्तनाच्या काळात अनेक पारंपरिक भाषा आणि सांस्कृतिक घटक दुर्लक्षित होत आहेत. अशा परिस्थितीत अभिजात भाषांचे समाजशास्त्रीय अध्ययन सांस्कृतिक विस्थापन, ओळख संकट आणि सामाजिक विभाजन यांसारख्या समस्यांचे विश्लेषण करण्यासाठी उपयुक्त ठरते.

अखेर, हे शीर्षक समाजशास्त्र आणि साहित्य अभ्यास यांमधील आंतरविषयक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. भाषा, साहित्य आणि समाज यांतील परस्परसंबंध समजून घेण्यासाठी हा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे संशोधक, शिक्षक आणि धोरणनिर्माते यांच्यासाठी हे संशोधन शीर्षक समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यंत अर्थपूर्ण आणि उपयुक्त आहे.

अभिजात भाषा : संकल्पना व वैशिष्ट्ये:

'अभिजात भाषा' ही संकल्पना मुख्यतः त्या भाषांसाठी वापरली जाते ज्या भाषांना प्राचीन इतिहास, समृद्ध साहित्यपरंपरा, व्याकरणीय शिस्त आणि कालसातत्य लाभलेले आहे. भारतीय संदर्भात संस्कृत, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, ओडिया आणि मराठी या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे.

साहित्याच्या अभ्यासातून असे दिसून येते की अभिजात भाषांमध्ये निर्माण झालेले ग्रंथ केवळ धार्मिक किंवा तात्त्विक स्वरूपाचे नसून समाजरचना, नीतिमूल्ये, राजकीय विचार आणि लोकजीवन यांचे प्रतिबिंब दाखवतात. त्यामुळे या भाषा सामाजिक शास्त्राच्या अभ्यासासाठी महत्त्वाचा स्रोत ठरतात.

अभिजात भाषा आणि सांस्कृतिक ओळख:

सांस्कृतिक ओळख ही समाजाच्या इतिहासाशी, परंपरांशी आणि सामूहिक स्मृतीशी निगडित असते. अभिजात भाषांतील साहित्याने भारतीय समाजाची सांस्कृतिक ओळख घडविण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. पुराणे, महाकाव्ये, नाटके, संतसाहित्य व तात्त्विक ग्रंथ यांमधून विशिष्ट जीवनदृष्टी आणि सामाजिक मूल्ये पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचली. आधुनिक समाजातही अभिजात भाषा सांस्कृतिक सातत्य टिकवून ठेवण्याचे कार्य करतात. शिक्षण, सण-उत्सव, धार्मिक विधी आणि साहित्यिक चळवळी यांमधून या भाषा समाजाच्या सांस्कृतिक आत्मभानाला बळकटी देतात. त्यामुळे अभिजात भाषा ही सांस्कृतिक ओळखीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरते.

अभिजात भाषा व सामाजिक समावेशन:

सामाजिक समावेशन म्हणजे समाजातील विविध घटकांना समान सांस्कृतिक व सामाजिक प्रवाहात सहभागी करून घेणे. अभिजात भाषांचे साहित्य समाजातील विविध वर्गांचे अनुभव, संघर्ष आणि आकांक्षा प्रतिबिंबित करते. संतपरंपरा, भक्तिसाहित्य व लोकाभिमुख ग्रंथांनी समाजातील वंचित घटकांना अभिव्यक्तीचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

दुय्यम साहित्याच्या अभ्यासातून असे लक्षात येते की अभिजात भाषांचा वापर केवळ अभिजन वर्गापुरता मर्यादित न राहता, कालांतराने सामान्य जनतेपर्यंत पोहोचला. आधुनिक काळात अनुवाद, अभ्यासक्रम आणि डिजिटल माध्यमांमुळे अभिजात साहित्य अधिक व्यापक सामाजिक स्तरांपर्यंत पोहोचत असून, सामाजिक समावेशनाच्या प्रक्रियेला चालना मिळत आहे.

अभिजात भाषांच्या भविष्यातील संधी

अभिजात भाषांचे भवितव्य केवळ भूतकाळाशी निगडित नसून ते आधुनिक समाजातील नव्या गरजा, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक प्रवाहांशी सुसंगत राहण्यात दडलेले आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत अभिजात भाषांसमोर अनेक आव्हाने असली तरी त्याच वेळी विविध क्षेत्रांत महत्त्वपूर्ण संधीही उपलब्ध होत आहेत.

शैक्षणिक क्षेत्रात अभिजात भाषांसाठी मोठ्या संधी निर्माण होत आहेत. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणे, बहुभाषिक शिक्षणपद्धती आणि अभ्यासक्रमातील लवचिकता यांमुळे अभिजात भाषांचा अभ्यास केवळ पारंपरिक विषय म्हणून न राहता आंतरविषयक अभ्यासाचा भाग बनू शकतो. इतिहास, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, संस्कृती अभ्यास यांसोबत अभिजात साहित्याचा समन्वय साधता येतो.

डिजिटल तंत्रज्ञानामुळे अभिजात भाषांचे पुनरुज्जीवन शक्य झाले आहे. डिजिटल संग्रह, ई-पुस्तके, ऑनलाइन हस्तलिखिते, अनुवाद प्रकल्प आणि शैक्षणिक पोर्टल्स यांच्या माध्यमातून अभिजात साहित्य अधिक व्यापक समाजघटकांपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे या भाषा केवळ अभ्यासकांपुरत्या मर्यादित न राहता सामान्य वाचकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळत आहे. **सांस्कृतिक उद्योग आणि सर्जनशील क्षेत्रात** अभिजात भाषांचा उपयोग वाढत आहे. नाट्य, चित्रपट, वेब-सिरीज, साहित्यिक महोत्सव आणि सांस्कृतिक पर्यटन यामध्ये अभिजात भाषांतील कथा, संकल्पना आणि तत्त्वज्ञान यांचा नव्या स्वरूपात वापर होत आहे. यामुळे तरुण पिढीचा अभिजात भाषांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची शक्यता निर्माण होते. **सामाजिक समावेशनाच्या दृष्टीने** अभिजात भाषांमध्ये असलेली संतपरंपरा, मानवतावादी विचार आणि समतावादी मूल्ये आधुनिक समाजासाठी उपयुक्त ठरू शकतात. या भाषांतील साहित्य सामाजिक संवाद, सहिष्णुता आणि सांस्कृतिक समज वाढविण्यास मदत करू शकते.

जागतिक पातळीवर अभिजात भाषांना नव्या संधी उपलब्ध होत आहेत. जागतिक विद्यापीठांतील भारतीय अभ्यास केंद्रे, अनुवाद प्रकल्प आणि आंतरराष्ट्रीय संशोधन सहकार्यामुळे अभिजात भाषांचे साहित्य जागतिक वाचकांपर्यंत पोहोचू शकते. यामुळे भारतीय सांस्कृतिक ओळखीला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळण्यास मदत होते. अभिजात भाषांचे भवितव्य हे त्यांच्या आधुनिक संदर्भातील सर्जनशील उपयोगावर आणि सामाजिक गरजांशी जुळवून घेण्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे. योग्य शैक्षणिक धोरणे, तांत्रिक साधने आणि सांस्कृतिक दृष्टीकोन यांच्या साहाय्याने अभिजात भाषा भविष्यातही समाजाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात.

भविष्यातील संशोधनाच्या दिशा

प्रस्तुत संशोधन निबंध दुय्यम साहित्यावर आधारित असून आधुनिक समाजातील अभिजात भाषांचे सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व अधोरेखित करतो. तथापि, या अभ्यासाच्या मर्यादांचा विचार करता पुढील काळात या विषयावर अधिक सखोल आणि विस्तृत संशोधन करण्यासाठी अनेक दिशा उपलब्ध आहेत.

भविष्यातील संशोधनात **प्राथमिक माहिती संकलनाच्या** आधारे अभिजात भाषांचा सामाजिक वापर, लोकांचा दृष्टिकोन आणि तरुण पिढीतील भाषिक जाणीव यांचा अभ्यास करता येऊ शकतो. क्षेत्रीय सर्वेक्षण, मुलाखती आणि प्रकरण-अभ्यास यांच्या माध्यमातून समाजातील प्रत्यक्ष अनुभव समोर येऊ शकतात.

अभिजात भाषांचा **तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास** करता येईल. विविध अभिजात भाषांची सामाजिक भूमिका, सांस्कृतिक प्रभाव आणि समावेशनातील योगदान यांची तुलना केल्यास भाषिक विविधतेचे समाजशास्त्रीय स्वरूप अधिक स्पष्ट होईल. **डिजिटल माध्यमे आणि अभिजात भाषा** या विषयावर स्वतंत्र संशोधन करता येईल. सोशल मीडिया, डिजिटल आर्काइव्हस, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा अभिजात भाषांच्या संवर्धनावर होणारा परिणाम अभ्यासण्याची मोठी संधी उपलब्ध आहे.

अभिजात भाषांतील साहित्याचा **लिंग, जात आणि वर्ग** या समाजशास्त्रीय परिमाणांच्या संदर्भात पुनर्विचार करता येईल. यामुळे सामाजिक असमानता, वंचितता आणि समावेशनाच्या प्रक्रियेचे अधिक सूक्ष्म विश्लेषण शक्य होईल. अभिजात भाषांच्या **शैक्षणिक धोरणांमधील स्थान** आणि शासनाच्या संवर्धनात्मक उपक्रमांचा समाजावर होणारा परिणाम याविषयी धोरणात्मक अभ्यास करता येऊ शकतो. अशा प्रकारचे संशोधन भाषा संवर्धनासाठी व्यावहारिक मार्गदर्शन देऊ शकते.

निष्कर्ष

आधुनिक समाजात अभिजात भाषांचे स्थान केवळ ऐतिहासिक वारशापुरते मर्यादित नसून ते सांस्कृतिक ओळख जपण्याचे आणि सामाजिक समावेशन घडवून आणण्याचे एक प्रभावी साधन आहे. साहित्यपरंपरेच्या माध्यमातून या भाषा समाजातील मूल्यव्यवस्था, सहिष्णुता आणि सांस्कृतिक विविधता टिकवून ठेवतात. दुय्यम साहित्याच्या अभ्यासावरून असे निष्कर्ष निघतात की अभिजात भाषांचे संवर्धन हे केवळ भाषिक प्रश्न नसून तो एक सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न आहे. त्यामुळे आधुनिक समाजात अभिजात भाषांना प्रोत्साहन देणे हे सामाजिक समन्वय व सांस्कृतिक सातत्यासाठी अत्यावश्यक ठरते.

संदर्भसूची

1. देशपांडे, ग. प. (2005). *संस्कृती, भाषा आणि समाज.* पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन.
2. कुलकर्णी, अ. ह. (2010). *भारतीय समाजरचना आणि सांस्कृतिक परंपरा.* औरंगाबाद : विद्या प्रकाशन.
3. पाटील, रा. ग. (2012). *भाषा, साहित्य आणि सामाजिक वास्तव.* कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
4. फडके, वि. स. (2008). *साहित्य आणि समाज.* मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
5. देशमुख, सु. रा. (2015). *भारतीय संस्कृतीचा समाजशास्त्रीय अभ्यास.* नागपूर : साकेत प्रकाशन.
6. मोरे, ना. द. (2011). *सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक परिवर्तन.* पुणे : प्रतिमा प्रकाशन.
7. खोत, म. वि. (2009). *भाषा आणि सांस्कृतिक अस्मिता.* मुंबई : ग्रंथाली प्रकाशन.
8. जाधव, भा. रा. (2014). *समाज, साहित्य आणि समावेशन.* औरंगाबाद : कैलास प्रकाशन.
9. महाराष्ट्र शासन. (2018). *अभिजात भाषांचे संवर्धन : धोरण आणि उपक्रम.* मुंबई : सांस्कृतिक कार्य विभाग.
10. जोशी, श. द. (2016). *भारतीय समाज : परंपरा आणि आधुनिकता.* पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.
11. काळे, प्र. न. (2013). *साहित्यपरंपरा आणि सामाजिक मूल्ये.* सातारा : यशस्वी प्रकाशन.
12. सावंत, अ. म. (2020). *डिजिटल युगातील भाषा आणि संस्कृती.* पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.

संत तुकारामांच्या अभंगातील अभिजातता

प्रा.प्रमोद दत्तात्रय शेटे
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा जि. सोलापूर 413203
भ्रमणध्वनी क्रमांक -9403446949
ई-मेल आयडी -pramodshete77@gmail.com

प्रस्तावना

मराठी भाषेला २०२४ मध्ये "अभिजात भाषा" असा दर्जा मिळाला, मात्र तिच्या अभिजाततेच्या खुणा प्राचीन काळापासूनच मराठी साहित्यात स्पष्टपणे आढळतात. दीर्घ साहित्यपरंपरा, समृद्ध शब्दसंपदा, स्वतंत्र व्याकरणीय वैशिष्ट्ये, तात्त्विक विचारप्रणाली आणि लोकजीवनाशी असलेले सखोल नाते या सर्व घटकांमुळे प्राचीन मराठी साहित्य अभिजाततेची सशक्त साक्ष देते.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यामागे तिच्या दीर्घकालीन साहित्यपरंपरेचा, तत्त्वज्ञानात्मक गाभ्याचा आणि कलात्मक अभिव्यक्तीचा मोठा वाटा आहे. या परंपरेत संत साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विशेषतः संत तुकाराम (इ.स. १६०८–१६४९) यांची अभंगवाणी ही मराठी भाषेच्या अभिजाततेचे प्रभावी उदाहरण ठरते. लोकभाषेचा आधार घेत असूनही त्यांच्या भाषेत अर्थघनता, तत्त्वज्ञानाची खोली, सौंदर्य आणि सार्वकालिकता आढळते. या शोधनिबंधात संत तुकारामांच्या भाषेतील अभिजात घटकांचा अभ्यास करणे व त्यांच्या अभंगातील अभिजातात उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.संत तुकाराम हे मराठी भक्तीपरंपरेतील श्रेष्ठ कवी मानले जातात. त्यांच्या अभंगवाणीने मराठी भाषेला केवळ लोकमान्यता दिली नाही, तर तिच्या अभिजाततेची ठोस साक्षही दिली. तुकारामांची भाषा साधी, लोकाभिमुख असूनही ती आशय, शैली आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध व उच्च दर्जाची आहे.

संत तुकाराम हे मराठी संत साहित्याला लाभलेले मेणाहून मऊ आणि वज्रापेक्षा कठोर असे बहुआयामी नेतृत्व होते. त्यांच्या अंतरंगात भावतरंग उमटतात, ते भक्तीच्या रंगात न्हावून निघतात आणि ते स्वतःच अभंग होऊन जातात. त्यांचे अभंग विठ्ठल भक्तीच्या गंधाचे जतन करताना भक्तिरसात ओलेचिंब होतात. महाराष्ट्राच्या सत्त्वशील आध्यात्मिक संस्कृतीमध्ये तुकोबारायांची अभंगवाणी मनःपूत विहार करते आहे. म्हणूनच भालचंद्र नेमाडे म्हणतात, "गेली साडेतीन शतके मराठी भाषिकांच्या धार्मिक आणि सामाजिक विचारांवर तुकारामाचा विलक्षण जबर असा प्रभाव पडला आहे. दूर दूर पसरलेल्या खेड्यापाड्यांतील घराघरांत तुकारामाचा अभंग ऐकू येतो, इतका त्याने ज्याला त्याला भक्तीचा लळा लावला आहे. तुकारामाचा प्रभाव सर्वव्यापी आहे. प्रत्येक पिढीने त्याचे अभंग सद्गदित होऊन वाचले.... तुकारामानंतर मराठीतल्या बहुतेक श्रेष्ठ कवींनी तुकारामाचे ऋण मानले आहे. त्याच्या भाषेचा आणि काव्यशैलीचा परिणाम न झालेला कवी मराठीत सापडणे कठीण आहे.

अभंगरचना हे तुकोबारायांच्या जीवननिष्ठेचे अविभाज्य अंग आहे. विठ्ठल भक्तीचे ते हुकमी साधन आहे तर त्यांच्या आत्माविष्काराचे ते प्रभावी माध्यम आहे. विठ्ठलाशी बोलताना त्यांची कविता कधी रूसते, कधी रागावते तर कधी लडिवाळ हट्ट करतानाही दिसते. त्यांची कविता सज्जनाचा, साधुचा, वैष्णवाचा गौरव करते तर दुर्जनाचा, ढोंगी साधुचा, दांभिकांचा ती धिक्कार करते. साधना करताना तुकोबारायांच्या मनाला आलेली निराशा, झालेला वैताग, मिळालेला उत्साह आणि झालेला साक्षात्कार ह्या विविध भावावस्थांचाही आलेख त्यांच्या कवितेतून रसरशीतपण

विठ्ठलभक्ती, नीतिधर्माचा प्रसार, अवगुणांवर आघात, सत्याचा आग्रह, आत्माविष्कार, अज्ञानात बुडालेल्या जनतेचा कळवळा आणि भगवंताची कृपा ह्या तुकोबारायांच्या कसदार काव्यामागील भक्कम प्रेरणा आहेत. ह्या प्रेरणांचा सविस्तर विचार इथे आपल्याला करावयाचा आहे.

तुकारामांची कविता सुशिक्षित आणि अशिक्षित, सामान्य आणि असामान्य ह्या सर्वांनाच आवडते. ह्या अभंगवाणीने महाराष्ट्रवाणीला समृद्ध केले आहे. *'कोडियांचे गोरेपण। तैसे अहंकारी मन', 'दया क्षमा शांती। तेथे देवाची वसति', 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती', 'निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेचि फळ'* अशी कितीतरी सुभाषिते त्यांच्या कवितेमधून विखुरली आहेत. त्यांच्या कवितेमधील अनुभवविश्व समृद्ध आहे. तुकोबांची अभंगवाणी म्हणजे एका थोर विचारवंताची भावकविता आहे. तशीच ती उपदेशपर कविताही आहे. जीव-जगत् आणि जगदीश्वर या तिघांचाही वेध

घेणारी त्यांची कविता आहे. म्हणूनच त्या कवितेतील अनुभवविश्व खूपच व्यापक आहे. कवितेतील सुभाषितमयता आणि समर्थ आत्मविश्वास यांच्यामुळे कवितेची आवाहनक्षमता अधिकच सघन झाली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१. संत तुकारामांच्या भाषेची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

२. त्यांच्या अभंगवाणीतील अभिजाततेच्या खुणा शोधणे.

३. लोकभाषा आणि अभिजातता यांतील नाते स्पष्ट करणे.

४. मराठी अभिजात परंपरेत तुकारामांचे स्थान निश्चित करणे.

संशोधन पद्धती

या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक स्रोत म्हणून तुकारामांचे अभंग व दुय्यम स्रोत म्हणून संत साहित्यावरील समीक्षात्मक ग्रंथ, संशोधनात्मक लेख व संदर्भग्रंथ वापरण्यात आले आहेत.

अभिजात भाषेची संकल्पना

***अभिजात भाषेची संकल्पना व निकष**

भारत सरकारने २००४ साली अभिजात भाषेची संकल्पना स्पष्ट करताना पुढील निकष निश्चित केले—

१) भाषेचा प्राचीन व सलग लिखित इतिहास (किमान १५००–२००० वर्षे)

२) उच्च दर्जाची व स्वतंत्र साहित्यपरंपरा

३) भाषा व तिच्या प्राचीन साहित्याचा आधुनिक भाषेपासून वेगळेपणा

४) भाषेचा स्वतंत्र व्याकरणिक व भाषिक विकास

या निकषांच्या आधारे संस्कृत, तमिळ, कन्नड, तेलुगू, मल्याळम व ओडिया या भाषांना अभिजात दर्जा देण्यात आला आहे. मराठी भाषेचा विचार केला असता हे सर्व निकष ती मोठ्या प्रमाणावर पूर्ण करते.

अभिजात भाषा म्हणजे दीर्घ परंपरा असलेली, साहित्यिकदृष्ट्या समृद्ध, तत्त्वज्ञानात्मक आशय असलेली आणि काळाच्या कसोटीवर टिकून राहिलेली भाषा होय. अर्थघनता, सौंदर्य, प्रतीकात्मकता, सार्वकालिकता आणि मानवी जीवनमूल्यांची अभिव्यक्ती हे तिचे प्रमुख निकष मानले जातात. या निकषांच्या आधारे संत तुकारामांची भाषा अभ्यासण्यासारखी आहे.

संत तुकाराम : जीवन आणि साहित्य

संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ संतकवी आहेत. विठ्ठलभक्ती, नामस्मरण, वैराग्य, करुणा आणि सामाजिक समतेचा संदेश त्यांनी आपल्या अभंगांतून दिला. त्यांचे साहित्य प्रामुख्याने अभंगरूपात असून त्यांची संख्या सुमारे चार हजारांच्या आसपास मानली जाते. या अभंगांनी मराठी भाषेला लोकजीवनाशी जोडले आणि साहित्यिक उंचीही प्रदान केली.

१. लोकभाषेतील साहित्यिक उंची

सर्वसामान्य लोकांना समजण्यासाठी त्यांना भक्ती सर्व समजण्यासाठी त्यावेळेसच्या रूढी परंपरा कंटाळलेल्या समाजाने जीवन सुकर व्हावे म्हणून तुकारामांनी तत्कालीन बोलभाषेचा आधार घेतला. संस्कृतप्रचुर, पंडिती भाषा टाळून त्यांनी ग्रामीण, सामान्य जनांच्या जगण्यातली भाषा स्वीकारली. तरीही या भाषेतून त्यांनी जे तत्त्वज्ञान मांडले ते गहन, सूक्ष्म आणि सार्वकालिक आहे. हीच लोकभाषा जेव्हा तत्त्वज्ञानाची वाहक बनते, तेव्हा तिची अभिजातता सिद्ध होते.

२. शब्दसंपदा व अर्थघनता

संत तुकारामांच्या अभंगांत शब्द कमी पण अर्थ प्रचंड आहे.तुकारामांचे अभंग म्हणजे अर्थाची खान आहे त्यांच्या साध्या साध्या शब्द तुम्ही अर्थघनता दिसून येते त्यांनी आपल्या प्रत्येक अभंगांमध्ये विश्वासी किंवा घालणारे शब्द निवडलेले आहेत तरीही ते सामान्य माणसाला रुसतात वापसतात असे शब्द आहेत . त्यातून मानवी मूल्यांची जपणूक करण्याचा प्रयत्न संत तुकाराम यांनी आपल्या प्रत्येक अभंगांमधून केलेला आहे

उदाहरणार्थ—

"जे का रंजले गांजले ।

त्यासी म्हणे जो आपुले ॥"

या दोन ओळींत मानवता, करुणा, सामाजिक न्याय यांचे व्यापक तत्त्व सामावलेले आहे. अशी अर्थघनता ही अभिजात साहित्याची महत्त्वाची खूण आहे.

किंवा

वृक्षवल्ली आम्हा वनचरे
पक्षी ही आळवीती सुस्वरे

रंजल्या गांजल्यांना प्रेमाने आपले म्हणणे म्हणजे साधुत्व होय. सज्जनाचे चित्त लोण्याप्रमाणे अंतर्बाह्य मऊ असते. निराधारांना तो आपले मानतो. पुत्राप्रमाणेच सेवकावरही दया दाखविणे ही साधुवृत्ती होय. तुकाराम इथे साधुवृत्तीचा व सज्जनत्वाचा गौरव करतात. सज्जनाची लक्षणे सांगताना ते म्हणतात

मुखी अमृताची वाणी। देव वेचावा कारणी। सर्वांगी निर्मळ, । चित्त जैसे गंगाजळ ।

गोड बोलावे. शरीर सत्कारणी लावावे. गंगाजळाप्रमाणे चित्त अंतर्बाह्य शुद्ध राखावे. अशांच्या संगतीत शरीर, मन आणि आत्मा यांचे ताप शांत होऊन विश्रांती मिळते.

गृहस्थाश्रमाचे फळ कशात आहे, हे तुकाराम फार चांगल्या रीतीने सांगतात.

जोडोनिया धन उत्तम वेव्हारे, । उदास विचारें वेच करी। उत्तमचि गती तो एक पावेल ।
परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया। भूतदया गाई पशूचे पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी।

चोख व्यवहार करून पैसा मिळवा. मोह न ठेवता खर्च करा. परोपकार करा. परनिंदा करू नका. परस्त्रियांना बहिण माना. प्राणिमात्रांवर दया करा. गाई-पशू यांचे पालन करा. वनामध्ये तान्हेल्यांना पाणी दिले पाहिजे

अशा रचनामुळे यामुळेच संत तुकाराम सर्व संत अंगणामध्ये कमालीचे वारकरी संप्रदायात आणि सर्वसामान्य जनतेमध्ये प्रिय आहेत कारण मनुष्य हा पृथ्वीवर असणाऱ्या निसर्गाचाच एक अविभाज्य घटक आहे तो निसर्गाशिवाय जगूच शकत नाही हे साधे तत्त्वज्ञान त्यांनी त्यांच्या अभंगातून मांडलेले आहे आणि अशा प्रकारचे कित्येक अभंग आजही वारकरी संप्रदायामध्ये वारकऱ्यांच्या तोंडी पाठ आहेत

३. रूपक, प्रतीक आणि अलंकार

तुकारामांच्या भाषेत रूपकांचा अत्यंत प्रभावी वापर दिसतो. संसार, देह, मन, ईश्वर, भक्ती—हे सगळे विषय ते दैनंदिन जीवनातील प्रतिमांतून मांडतात. त्यांच्या अभंगांमध्ये दैनंदिन जीवनामध्ये बोलण्यात आलेले शब्द अभंगात वापरण्यात आलेली शब्द किंवा समाजामध्ये घडत असलेल्या घटना याच्यातील भाषा म्हणजे एक प्रकारची तत्त्वज्ञानच असते आणि तेच तत्त्वज्ञान किंवा तीच बोलीभाषा त्यांनी त्यांच्या अभंगातून जशीच्या तशी घेतलेली आहे आणि त्यामुळेच ती भाषा मूळ मराठी भाषा राहिलेली आहे तिला कोणत्याही इतर भाषेची जोड द्यावी लागली नाही आणि त्यामुळे सर्व सामान्य लोक भावांनीला आधार देण्याचे काम या तुकारामांच्या भाषेने केलेले आहे म्हणून तुकाराम त्या काळात सामान्य लोकांमध्ये खूप प्रसिद्ध होते त्यांचे अभंग लोकांच्या तोंडपाठ होते यातून तुकारामांच्या अभंगाची अभिजातीत आपणाला दिसून येते उदा. संसाराला बाजार, देहाला मातीचे भांडे, मनाला माकड अशी रूपके वापरून ते तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना समजेल असे करतात. ही प्रतीकात्मकता अभिजात साहित्याचा महत्त्वाचा गुण आहे.

४. तत्त्वज्ञानाची खोली

संत तुकारामांची भाषा केवळ भावनिक नाही तुकारामांची भाषा ही फक्त भावनिक नाही तर ती त्या काळात परिस्थितीत असलेली भक्ती वेद आत्मज्ञान ईश्वर ज्ञान माया संसार आत्मभान यासारखे गंभीर विजय घेऊन त्यांच्या अभंगांमध्ये ती अवतरलेली आहे ती वेदांत, भक्ती, नैतिकता आणि जीवनदर्शन यांचा संगम आहे. कर्म, अहंकार, माया, ईश्वरभक्ती, आत्मज्ञान यांसारखे गंभीर विषय ते सहज भाषेत मांडतात . संसाराची तत्त्वज्ञान सांगताना अगदी सोप्या भाषेमध्ये ती म्हणतात आपल्या अभंगांमध्ये सांगतात की अहंकार हा किती चुकीचा आहे अहंकारामुळे माणसाचे जीवन किती लयास जाऊ शकते हे जीवन अगदी पाण्यामध्ये वाहून गेल्यासारखे जाऊ शकते असे तत्त्वज्ञान त्यांनी किंवा असे जीवन दर्शन त्यांनी आपल्या अभंगातून मांडलेले आहे आणि हे जीवन दर्शन अभिजात भाषेचे एक प्रमुख लक्षण आहे

"अहंकाराचा भार।
वाहोनी चालिला संसार॥"

येथे जीवनाचे तात्त्विक सत्य अत्यंत साध्या भाषेत व्यक्त झाले आहे.

तुकारामांची अभंगरचना लयबद्ध, ओघवती आणि स्मरणात राहणारी आहे. छंद, वृत्त आणि नादात्मकता यामुळे त्यांची भाषा श्रवणीय आणि गेय बनते. अभिजात भाषेला अपेक्षित असलेली सौंदर्यपूर्ण अभिव्यक्ती येथे स्पष्ट दिसते.

५. सामाजिक आशय आणि सार्वकालिकता

संत तुकारामांचा काळ हा अनिष्ट चालीरीती अनिष्ट रूढी परंपरा स्पृश्य अस्पृश्यता, जातीभेद अशा अनेक दुष्ट चक्रामध्ये अडकलेला होता तरीही त्या सर्व व्यवस्थेला आणि त्या काळजात चालीरीतींना कंटाळून संत तुकारामांनी त्यांच्या भाषेमध्ये जातिभेद, कर्मकांड, ढोंगी धर्मप्रथा यांवर तीव्र टीका आहे. परंतु ती टीका शिवीगाळ न करता नैतिक व वैचारिक पातळीवर होते. त्यामध्ये कसलाही आततहीपणा आक्रमक आढळत नाही संयमाच्या मर्यादा ओलांडत नाही म्हणून ती अभंगातील भाषा सार्वकालीन अशी ठरते आणि हेही भाषेच्या अभिजात तिची लक्षण आहे त्यामुळे त्यांची भाषा काळाच्या मर्यादा ओलांडून आजही तितकीच अर्थपूर्ण वाटते—हीच अभिजाततेची खरी कसोटी आहे. आणि ती तुकारामांच्या अभंगांमधून दिसून येते

६.नादसौंदर्य आणि काव्यात्मता

अभंगरचना ही नादप्रधान आहे. तुकारामांच्या भाषेत लय, छंद आणि गेयता आढळते. त्यामुळे त्यांच्या अभंगांचे गायन-कीर्तनातून व्यापक प्रसार झाला. भाषेतील हा नादात्मक गुण तिला सौंदर्यपूर्ण आणि अभिजात बनवतो.

सामाजिक आशय आणि चिकित्सक दृष्टी

तुकारामांच्या भाषेत जातिभेद, कर्मकांड, ढोंगी धर्माचार यांवर तीव्र पण नैतिक टीका आहे. ही टीका आक्रमक नसून वैचारिक आहे. त्यामुळे ती सार्वकालिक ठरते.

उदा. –

"पांडुरंगा, जातीभेद।
कधी केला नाही वेद॥"

७ .सार्वकालिकता

अभिजात साहित्याची सर्वात महत्त्वाची खूण म्हणजे त्याची सार्वकालिकता. तुकारामांची भाषा आणि विचार आजही तितकेच समर्पक वाटतात. मानवी मूल्ये, नैतिकता आणि आत्मशोध यांवरील त्यांचे चिंतन काळाच्या पलीकडे जाते. संत ज्ञानेश्वरांनी मराठीला तत्त्वज्ञानाची पायाभरणी दिली, तर संत तुकारामांनी तिला लोकजीवनाशी घट्ट जोडले. त्यांच्या भाषेने मराठी अभिजात परंपरेला व्यापक सामाजिक अधिष्ठान दिले. त्यामुळे तुकाराम हे मराठी अभिजात साहित्याचे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ मानले जातात.

निष्कर्ष

संत तुकारामांची भाषा ही साधी, लोकाभिमुख असूनही ती तत्त्वज्ञानात्मक, अर्थघन, सौंदर्यपूर्ण आणि सार्वकालिक आहे. लोकभाषेतून उच्च विचार मांडण्याची क्षमता हीच त्यांच्या भाषेतील अभिजातता आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त होण्यात संत तुकारामांच्या अभंगवाणीचा मोलाचा वाटा आहे, हे निर्विवाद सत्य आहे. संत तुकारामांची भाषा साधी असूनही तीअर्थघन,तत्त्वज्ञानात्मक,सौंदर्यपूर्ण,लोकाभिमुख आणि सार्वकालिक आहे.

म्हणूनच तुकारामांची अभंगवाणी ही मराठी भाषेच्या अभिजात परंपरेचा एक अत्यंत महत्त्वाचा आधारस्तंभ ठरते. संत तुकारामांनी मराठी भाषेला केवळ भक्तीचीच नव्हे, तर उच्च साहित्यिक आणि वैचारिक प्रतिष्ठाही मिळवून दिली. म्हणूनच तुकाराम ही कोण संतवाङ्मयामध्ये व प्राचीन काळापासून हाच दादा त्यांच्या अभंगाच्या मार्फत अभंगातील भाषेच्या सौंदर्यामुळे आणि भाषेतील तत्त्वज्ञानामुळे सर्वसामान्य वारकरी संप्रदाय व मराठीचे अभ्यासक भाषेचे अभ्यासक या सर्वांसाठी लोकप्रिय व सर्वश्रेष्ठ आहेत ते कालातीत आहेत त्यांचे अभंग हे स्वयंभू अशा भाषेतून निर्माण झालेले आहेत त्या भाषेला कोणत्याही परकीय भाषेची जोड नाही ती स्वतःची अशी लोकभाषा आहे त्यातून जीवनाची

तत्त्वज्ञान सांगितलेले आहे आणि त्यामुळे त्यांच्या प्रत्येक अभंगामधून आपणास भाषेची अभिजातता दिसून येते असे म्हणावे लागते

संदर्भसूची

१. तुकाराम गाथा – संपादित आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ.

२. रणडे, रा. दा. – संत तुकाराम : जीवन आणि वाङ्मय, पुणे

३. डॉ. आ ह साळुंखे _ विद्रोही तुकाराम , मुंबई.

४. भावे, वि. ल. – संत साहित्याचे तत्त्वज्ञान, पुणे.

५. ग . बा. सरदार- तुकाराम दर्शन

६ . तुकारामांची निवडक अभंग – प्र.न. जोशी

आदिवासी बोलीभाषा , साहित्य आणि सांस्कृतिक जीवनमूल्ये

संशोधक –

मनोहर दुलाजी मोहरे

संशोधन केंद्र - पद्ममणि जैन महाविद्यालय पाबळ , ता . शिरुर , जि . पुणे

प्रास्ताविक -

आदिवासी शब्दाभोवती अद्यापही एक कुतुहलाचे, जिज्ञासेचे वलय आहे. आदिवासींच्या जीवनविषयक संस्कृतीची आपल्याला उत्सुकता असते , परंतू त्याची सखोल माहीती नसते .खरं तर निसर्गात मानवी जीवनाला सुरुवात झाली आणि निसर्गातच त्याचे जीवन बहरत गेले. काळाच्या ओघात अनेक बदल झाले . अनेक मानवी समूह निसर्गापासून दूर गेले , मात्र आदिवासी जमाती आणि निसर्गाचे नाते आजही अभिन्न आहे. निसर्ग, कला आणि पावित्र्याचा हजारो वर्षापासून आदिवासी समाजात रुजलेला अनुबंध हा आदिवासी संस्कृतीची थोरवी सिद्ध करतो.

प्राणी वा पक्षी सृष्टीशी तादात्म्य पावलेला आदिवासी समाज त्यांनाच कुलाचार बनवून वृक्षांसह प्राण्यांनाही पवित्र मानू लागला. तुळस , बेल ,मासा , पक्षी अशी चित्रे गोंदून घेण्याची आदिवासींमधील प्रथा याची साक्ष आहे . वाघ , पोपट, अशी कूलचिन्हे विविध आदिवासी जमातीस सन्मानित आहेत . आदिवासींमधील स्त्री स्वातंत्र्य व स्त्री-पुरुष समानता ही प्रगतीचा डंका पिटणाऱ्या वर्णीय समाजाला लाजविणारी आहे .नवऱ्या मुलाचे चातुर्य, क्षमता व बुध्दिमत्ता तपासण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आदिवासी मुलीला परंपरेतूनच मिळते. चिमण्या मुंग्यांना शिळीपाकी भाकरी कुस्करून खाऊ घालणारी आदिवासी संस्कृती माणूसकी धर्म पाळते .शेतातील भाज्या उपटून न घेता त्यांची कोवळी पाने व टांभे खुडून पुन्हा त्या भाज्यांना पालवी फुटु देण्याची संधी ठेवणारा निसर्गधर्म आदिवासींमध्ये आहे. आदिवासी साहित्य विश्वात अनेक आदिवासी साहित्यिकांनी बोलीभाषेतून साहित्यनिर्मिती केली आहे . डॉ कृष्णा भवारी यांनी इधोस कादंबरीत आदिवासी मावळी बोली ही बोलीभाषा वापरली आहे . डॉ . संजय लोहकरे यांच्या राब व डांगाणी माणसं या कथासंग्रहात डांगाणी या बोलीभाषेचा वापर दिसून येतो . तर सुनील गायकवाड यांच्या साहित्यामधून भिलाटी या आदिवासी बोलीभाषेचे दर्शन घडते . या बोलींना लिपी नसली तरी वर्षानुवर्षे , पिढयानपिढया तिचे जतन व संवर्धन आणि त्यातून सं सांस्कृतिक मूल्ये जोपासण्याचे काम आदिवासी साहित्यिकांनी स्वतःच्या साहित्यातून केले आहे .

आदिवासी साहित्य -

स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे आदिम जमातीतून संवेदनशील , सृजनशील जागृत आत्मभान प्राप्त झालेली साहित्यिकांची पिढी निर्माण झाली . यामध्ये नजुबाई गावित , डॉ . गोविंद गारे , विनायक तुमराम , वाहरू सोनवणे , बाबाराव मडावी , उषाकिरण आत्राम , तुकाराम धांडे , डॉ . संजय लोहकरे , डॉ . कृष्णा भवारी , डॉ . तुकाराम रोंगटे , डॉ . मारुती आढळ , सुनील गायकवाड , देवदत्त चौधरी , तुकाराम चौधरी , जगन्नाथ खंडवे , कुंडलिक केदारी , भास्कर भोसले , डॉ . हनुमंत भवारी अशा व इतर आणखी काही लेखकांचा उल्लेख करावा लागेल .या पिढीने आदिम जंगली, अरण्यवासी, दूर्गम आदिवासी परिवेशातील अनुभवविश्व आपल्या ललित कलाकृतीचा व पारंपारिक लोकसाहित्याचा विषय केला . आपल्या साहित्यातून आदिवासी सांस्कृतिक मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला . यातूनच आदिम अनुभवविश्वाची जोड मराठी साहित्याला मिळाल्यामुळे मराठी साहित्य अधिक समृद्ध व समाजाभिमुख , जीवनाभिमुख झाले.

आदिवासींचा धर्म, त्यांच्या परंपरा , रूढी, रिती, रिवाज विवाहसंस्था , जातपंचायत , सण , उत्सव , त्यांच्या जीवनातील दारिद्र्य , भूक , विषमता , अन्याय, अत्याचार , त्यांचा व्यवसाय , उद्योगधंदे , त्यांचे सांस्कृतिक जीवन , शैक्षणिक व कौटुंबिक जीवन , त्यांची अर्थव्यवस्था , त्यांचे आरोग्य , अंधश्रध्दा या सर्वांबाबत जन्मजात आदिम जमातींमध्ये जन्म घेऊन संवेदनशीलतेने साहित्य निर्मिती करणारे आदिवासी साहित्यिक आहेत. त्यांनी ग्रामीण परिवेशातील वेशीच्या , गावकुसाच्या बाहेरील अतिदूर डोंगरी दुर्गम दऱ्याखोऱ्यात जंगल पहाडात राहणाऱ्या विविध जमातींचे जीवन आदिवासी साहित्यामध्ये कथा, कविता, नाटक, कादंबरी, आत्मचरित्र लेखन या माध्यमातून रेखाटले आहे . यामध्ये पुणे जिल्हयाच्या आदिवासी भागात बोलली जाणारी आदिवासी मावळी बोली , अकोले व इगतपूरी तालुक्यात बोलली जाणारी डांगाणी बोलीभाषा , ठाकर समाजात बोलली जाणारी ठाकरी बोली , भिलाटी बोली , कोकणी , गोंडी , संथाली , कोरकू , कातोडी , पावरी अशा बोलीभाषांमधील आदिवासी साहित्य निर्मिती होत आहे . त्यातुनच त्यांच्या सांस्कृतिक जीवनमूल्यांची ओळख होते.

आदिवासी म्हणजे कोण ?

आदिवासी कोण ? याबाबत आदिवासी साहित्याचे ज्येष्ठ संशोधक डॉ . विनायक तुमराम असे म्हणतात, "वनवासी, अर्धनग्न राहून लंगोटी नेसून शिकार करण्यासाठी रानोमाळ भटकल्यामुळे आदिवासींना वन्यजमाती असेही म्हटले जाते . कधी उपहासाने जंगली किंवा लंगोटये म्हणतात. सहानुभूतीने धरतीची लेकरे किंवा वनराईची लेकरे याशिवाय गिरिराज (गिरीकूहरातील दीर्घ वास्तव्यामुळे) भारतमातेचे आदीसंतान म्हणूनही उल्लेख होतात. अलिकडे आदिपूत्र किंवा वनपुत्र जंगलचे अनभिषिक्त राजे भारतीय राज्य घटनेने त्यांना अनुसूचित जमाती म्हटले आहे ". १

आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासींना इंडिजिनस ' संबोधण्याची शिफारस केली आहे. यांनाच नॉनलिटरेट म्हणजे निरक्षर असेही म्हटले आहे. डॉ .विनायक तुमराम सांगतात , की पाश्चात्य अभ्यासकांनी आदिवासींना Aboriginal म्हटले आहे. डॉ . घूर्ये या समाजशास्त्रज्ञाने so-called Aboriginal म्हणजे तथाकथित मूळ निवासी होय. Back Ward Hindus म्हणजे मागासलेले हिंदू असाही अर्थ आहे .आदिवासींचे कैवारी पूज्य ठक्करबाप्पा व महात्मा गांधीजींनी आदिवासींना मूलनिवासी म्हटले आहे.

आदिवासी लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. भाऊ मांडवकर व आदिवासी साहित्याचे संशोधक डॉ.गोविंद गारे यांनी वन्यजमातीसाठी आदिम हा शब्द वापरला आहे. सुप्रसिद्ध समाजसेविका सौ.कुसुम् नारगोलकर व शाम नारगोलकर यांनी जंगलचे राजे म्हटले आहे . डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जमाती असा उल्लेख केला आहे. या वरील अर्थछटा आदिवासींबाबत वापरत असल्याचे वेगवेगळया दृष्टीकोनातून लक्षात येते. याचाच अर्थ आदिवासी म्हणजे त्या-त्या ठिकाणचे मूळ रहिवासी होत.

विविध व्याख्या -

भारतातील आदिवासींची एकच एक निश्चित व्याख्या अभ्यासकांनी केली नाही. या देशातील मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ समाजसेवक, देशी-विदेशी अभ्यासकांनी, आदिवासी जमातीतील नव्या अभ्यासकांनी, मराठीतील अभ्यासकांनी आदिवासी या संज्ञेच्या अनेक व्याख्या केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

१) गिलीन आणि गिलीन - "एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा समान बोली बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जंगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिय गटांच्या समुच्ययाला आदिवासी म्हणतात " . २

" भौगोलिक दृष्ट्या इतरांपासून नेहमीच दूर म्हणजे गिरीकंदरात राहील्यामूळे जंगलात राहणारा निसर्गाच्या सानिध्यात वाढलेला म्हणजे आदिवासी होय " . ३

वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते की , सर्व अभ्यासकांनी आदिवासी जमातीचे वास्तव्य डोंगर दऱ्याखोऱ्यात शहरांपासून दूर व अलिप्त असेच दाखवण्याचा प्रयत्न केला आहे . डोंगर कपारीत संसार थाटून पशुपक्षी सर्वांशी मित्रत्वाच्या नात्याने राहून निसर्गावर प्रेम करणारी जमात आहे.

संस्कृती कशाला म्हणतात ?

संस्कृती या शब्दाच्या संकल्पनेत कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो , यासंबंधी काही चिकित्सा करणे आवश्यक वाटते. एका बाजुला मानवी संस्कृती या शब्दाने सर्व मानवांना आणि त्यांच्या सर्व जीवनाला व्यापून टाकण्याची झेप हा शब्द घेतो . तर दुसरीकडे पुणेरी संस्कृती, आमच्या घराण्याची संस्कृती, किंवा ही माझी संस्कृती नव्हे ! अशा उद्‌गारांनी संस्कृती हा शब्द स्वतःला अगदी संकुचितही करून घेतो . प्रादेशिक, धार्मिक, वंशिक जातीय , प्रांतीय इत्यादी दृष्टीने संस्कृती हा शब्द मर्यादीत केलेला आढळतो . तर प्राचीन , मध्ययुगीन , अर्वाचीन , कालची , उद्याची या शब्दांनी संस्कृतीला कालिक मर्यादा घातली जाते . काही काही वेळा धर्म म्हणजे संस्कृती असे मानून वैदिक संस्कृती, बौध्द संस्कृती, ख्रिस्ती संस्कृती या शब्दांचा आग्रह धरला जातो .

अशा प्रकारे विविध दृष्टीकोनातून संस्कृती शब्दाचा वेगवेगळ्या अर्थाने उपयोग करण्यात येतो. त्यामुळे या शब्दाची अर्थनिश्चिती किंवा एकच व्याख्या सांगणे कठीण आहे. तरीही माणसाचे ऐहिक जीवन ज्या सुखसोयींनी समृध्द व संपन्न झाले आहे , त्या सूख सोयी म्हणजे संस्कृतीचे भौतिक अंग होय . तर मानवनिर्मित कल्पनामय जग म्हणजे संस्कृतीचे अध्यात्मिक अंग होय . यावरून संस्कृती म्हणजे मानसिक उन्नतीचा दर्शक असा जीवनक्रम किंवा आदर्श वर्तनपद्धती होय.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी केलेली संस्कृतीची व्याख्या पुढीलप्रमाणे " मनुष्य व्यक्तिशः व समुदायशः जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवनसाफल्यार्थ स्वतःवर व बाहयविश्वावर संस्कार करून जे अविष्कार करतो ती पद्धती व तो अविष्कार संस्कृती होय." ४

यावरून आत्मिक आणि भौतिक उन्नतीसाठी मानवाने केलेल्या सम्यक कृती महणजे संस्कृती होय . प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र संस्कृती पहावयास मिळते .

"आदिवासींच्या संस्कृतीला हजारो वर्षाची परंपरा लाभली आहे . आदिवासींचे जीवन म्हणजे नित्यनूतन खळाळता झरा होय . त्यांचे जीवन आणि त्यातील जिव्हाळा कधीच आटू शकला नाही .

"आदिवासी संस्कृतीचे विशेष म्हणजे त्यांची विविध विषयांवरची मूक्तहस्त चित्रे होत. कुलचिन्हाच्या रुपाने आदिवासी मानव प्राणीमात्रांना महत्त्व देऊ लागला. आदिवासी आपली सांस्कृतिक चिन्हे, कुल चिन्हे, विविध प्राण्यांची चित्रे आपल्या पाठीवर , हातावर रंगवून घेतात .तर काही चित्रे गोंदून घेण्याची प्रथा आहे. आदिवासी जमातीत स्त्रीयांना कुठेही कमी लेखले जात नाही .स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करणारी ही संस्कृती आहे . मुलींना जोडीदार निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे .लग्नात हुंडा घेतला जात नाही. निसर्गालाच देव मानले जाते. म्हणूनच अनेक आदिवासी जमातींमध्ये वाघाला फार महत्व आहे. म्हणून तर वाघबारशीला वाघाची 'वाघबारस 'आजही साजरी केली जाते . तर नागा जमातीत नागाची पूजा केली जाते ". ५

आदिवासी संस्कृती बद्दल डॉ . तुकाराम रोंगटे म्हणतात की , "आदिवासींची संस्कृती इतकी महान आहे की जगाच्या पाठीवर एकही उदाहरण असे नाही की, आदिवासींच्या कोरडवाहू, स्थलांतरीत आणि स्थिर शेतीत काही पिकलेच नाही म्हणून त्याने शेजारच्या उंबराच्या , जांभळीच्या वा हिरडीच्या झाडाला लटकून आत्महत्या केली आहे. तो तसे का करत नाही ? कारण त्याने निसर्गाला आपला सोबती , मार्गदर्शक मानल्याने त्याच झाडाला लटकून आपले ओझे कशासाठी त्याच्यावर सोपवायचे. व दुसरे कारण म्हणजे काहीच पिकले नाही तरी त्याला वनातील कंदमुळे व रान

मेव्यावर दिवस काढता येतात. आदिवासींचा असा हा निसर्गाविषयीचा सांस्कृतिक वारसा आपल्याला कदापिही नजरेआड करून चालणार नाही " . ६

आदिवासी साहित्य व सांस्कृतिक जीवनमूल्ये -

आदिवासी हा निसर्गपूजक आहेत . निसर्ग त्यांच्या श्वासात , रक्तात भिनलेला आहे . त्यामुळे तो निसर्गाशी मानसिक , भावनिक आणि बौद्धिकदृष्ट्या एकरूप झाला आहे . वारली चित्रकलेत निसर्गाचा सहजसुंदर अविष्कार आहे . आदिवासींच्या बोलीभाषेत प्रतिमा , प्रतीके व संकेतामध्ये निसर्गाचा भरणा आहे . डॉ . कृष्णा भवारी यांच्या ' इधोस ' कादंबरीत आदिवासींच्या लग्नप्रसंगावरून हे लक्षात येते . तसेच त्यांनी आदिवासी मावळी बोलीतील प्रतिमा व प्रतिके यांचा कादंबरीत केलेला वापर दिसून येतो . लोकगीतांच्या माध्यमातूनही हे प्रकर्षाने जाणवते . उदा .

"करवंदीचे करवंद काळे गं . . करवंदीचे फुल पांढरे
सखु तुला वाढविली गं केळीच्या कोंबावाणी "

या लग्नगीतातून निसर्ग आणि नववधूच्या एकरूपत्वाची कल्पना येते . आदिवासींची जडणघडण निसर्गाच्या सानिध्यात होते , त्यामुळे निसर्गाचा संस्कार त्यांच्यावर होतो . हे आदिवासी साहित्यिक डॉ . कृष्णा भवारी , डॉ . मारुती आढळ , डॉ . संजय लोहकरे , डॉ . तुकाराम रोंगटे , तुकाराम धांडे , नजुबाई गावित , उषाकिरण आत्राम , सुनील गायकवाड , जगन्नाथ खंडवे , तुकाराम चौधरी , बाबाराव मडावी , संजय दोबाडे , भास्कर भोसले यांनी त्यांच्या साहित्यातून व्यक्त केले आहे .

"आदिवासींच्या संस्कृतीचे महान वैशिष्ट्ये म्हणजे निसर्गाला सर्वस्व मानून त्याच्या ठायी लीन होणे आणि त्याच्यासोबत राहून आपल्या जीवनात आनंद उपभोगणे. त्यामूळेच आदिवासी संस्कृतीचा पाईक, श्रेष्ठ आणि जगविख्यात धनुर्धारी निषादराज हिरण्यधनूपुत्र निसर्गाच्या सानिध्यात आणि निसर्गालाच आपला गुरु मानून प्रयत्न प्रमाण धनुर्विद्येचे प्रशिक्षण घेतले ". ७ गुहेत वास्तव्याला असताना आदिवासींनी निसर्गातील विविध वनस्पतींची ओबडधोबड चित्रे गुहेतच काढली. यामध्ये झाडे , वेली ,सूर्य ,चंद्र , तारका आणि प्राण्यांच्या चित्रांचे नमूने बघायला मिळतात. आदिवासी माणसे निसर्गाशी किती समरसून गेली आहेत याबाबत सतीश बडवे म्हणतात , " निसर्गावर जीव ओवाळून टाकणारी माणसे, झाडा वेलींना माया लावणारी माणसे , परंपरेने चालत आलेल्या समूह जीवनाशी तल्लीन झालेली माणसे, रान आहे म्हणून आपण आहोत अशी भावना जपणारी माणसे या कथांमधून उभी राहतात ". ८

राब या कथेतही डॉ . संजय लोहकरे यांनी आदिवासी आणि निसर्ग यांतील घनिष्ठ संबंध दाखवून दिला आहे . डांगाणी बोलीतील त्यांच्या या संवादावरून आदिवासींमधील सांस्कृतिक मूल्ये दिसून येतात . राबणीला ऐलापेलाची झाडा तोडायची , ज्या झाडाली बुंध्यापासून शेंड्यापास्तोर पाला रहेतोय, ज्या झाडान्ली ह्या टायमाला फळा येत नही , ज्यांचा गुराली , पाखरा भॅंकराली उपेग नही अशीच झाडा साळायची .आन ही झाडा अशी साळायची का खोडालान शेंडेली कंधीच कोयता, कुऱ्हाड लावायची नाही . त्याचा शेंडा झेंड्यासारखा फडकत रहिला पाहीजे " . ९ आदिवासी संस्कृती आणि त्यांचे जल जंगल जमीन यांच्याशी असलेले नाते आवणी या कथेतून दिसते. भाताची शेती करताना त्याच्यावर जसा आपला हक्क आहे तसाच तो किडे पशु-पक्षांचाही आहे. एका अर्थी ही प्रतिसृष्टीही आदिवासींचा जीव की प्राण आहे.

'फालिस्ट ' या कथेतूनही आदिवासी संस्कृतीचा निसर्गाशी असलेला संबंध लक्षात येतो . रामू म्हातारा म्हणतो , "आरं लय पिढ्या गेल्या आपल्या या रानातच रानानाच आपलेली पोसलाय, शिकावलाय माया लावलेय, आपल्या लय पिढ्या जगावल्यात या रानाना , म्हणून तं आपल्या पिढेंनी ह्या राखला संभाळला. " १०

"बामणाच्या जल्माला जाशी
त लिखून लिखून मरशी
महारवाडी होशी त

तोलून तोलून मरशी
चमार होशी त
नाड्या जोती करून मरशी
पण वारल्याच्या जल्माला जाशी
त जंगलाचा राजा होशी र बाबा "

या वारली आदिवासी जमातीच्या बोलीभाषेतील गीतावरून वारली माय आपल्या मुलांना जो शहाणपणाचा सल्ला देते , त्यातच आदिवासी संस्कृतीची मूल्ये रुजलेली आहेत. कुणाच्याही बंधनात न राहता पक्षांप्रमाणे , अवखळ वाऱ्याप्रमाणे, खळाळत्या ओढ्याप्रमाणे व निसर्गाच्या प्रत्येक हालचालीसोबत मुलांनी मनसोक्त संचार करावा. इथल्या गहन सुष्टीची उकल करावी. एवढे स्वातंत्र्य ती मुलाला देते . ह्याचाच अर्थ आदिवासींची संस्कृती व्यापकतेने आणि विशाल दृष्टीकोनातून बघणारी अशी आहे .

वृक्षांबरोबरच प्राण्यांना पवित्र मानने म्हणजेच निसर्गाला देव मानणारी आदिवासी संस्कृती होय. निसर्गापेक्षा शक्तीशाली काहीच नाही. निसर्गाचा समतोल राखला तरच आपण जगू .हे मौलिक मूल्य आदिवासींना पूर्वीपासूनच ठाऊक आहे. त्याचप्रमाणे या पृथ्वीतलावर जसा आपल्याला राहण्याचा अधिकार आहे , तसाच अधिकार प्रत्येक सजीवाला आहे. हे जगा आणि जगु द्या चे मूल्य आदिवासी संस्कृतीत दिसून येते . डॉ संजय लोहकरे यांच्या आवणी या कथेतील आज्या म्हणतो "लय पिढ्यांपासून ही ख्यॅकडा बेडका, पाखरा, भ्याकरा , मासं बिसं आपल्यासंग जगत्यात, आपलेली जीवय तसा तेन्लीय जीवंय 'त्या रानच्या पाखराली, ख्याकडा बेडकाली आपून जगावला त आपलाय जीवन चांगला जाताय, सूखाना मरान याताय . " ११ हे मूल्य आदिवासी संस्कृतीतूनच जगाला मिळाले आहे .

निसर्गा इतकेच महत्त्व समूह जीवनाला आदिवासींमध्ये असते . समूहजीवन , हुंडा न घेणे , मुला-मुलींना जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य, जल, जंगल , जमीनीचे रक्षण, प्राणीमात्रांवर दया, पर्यावरणाचे रक्षण व आनंदी जीवन, समाधानी जीवन ही जीवनमूल्य खरं तर आदिवासी संस्कृतीची मूलभूत अंगे आहेत. ही जीवनमूल्यंच मानवजातीला तारणहार ठरत आहेत .

सुनील गायकवाड यांच्या भिलाटी या कथासंग्रहातील अथोला या कथेत भिलाटी या बोलीभाषेचा वापर दिसून येतो .जंगली जनावरं , पाखरं , झाडं , वेली , किडे , माकडे सृष्टीची जनमत . आपल्याप्रमाणे त्यांनाही जगण्याचा अधिकार आहे . प्राणी पक्षी पोटाला लागेल तेवढंच खातात . साठवण करत नाहीत हे नियम अथोल्यातील आदिवासी पाळतात . आदिवासी हे निसर्गपूजक आहेत . पशु - पक्षी वनस्पती यांना त्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे . आदिवासींनी वाघाला देवतेचे रूप मानले आहे . हे सुनील गायकवाड यांच्या भोंगऱ्या या कथेतून व्यक्त झाले आहे .

'पाडयावरचा टिल्ल्या ' या तुकाराम चौधरी यांच्या कादंबरीतही आदिवासी संस्कृती व निसर्गातील लहानसहान गोष्टींची माहीती समजते . वनऔषधी , रानमेवा किंवा निसर्गचक्राविषयीची भाकिते तो अनुभवातून सांगतो . आदिवासी कोकणी बोलीभाषेतील संवाद , म्हणी , प्रतिमा , प्रतिके यांमुळे हे साहित्य अधिक प्रभावी ठरते .

'टाहो ' या कादंबरीतही बाबाराव मडावी यांनी डोंगरगावातील आदिवासींची संस्कृती बोलीभाषेतून रेखाटली आहे . निसर्गपुजक आदिवासी एखादे झाड तोडलं तर त्याचे घाव त्यांच्या काळजावर पडत . तुटलेल्या झाडाजवळ बसुन ते ढसाढसा रडायचे . झाडाला माफी मागायचे . या प्रसंगावरून त्यांचे निसर्गाप्रती असलेले प्रेम दिसून येते .

डॉ . मारुती आढळ यांच्या वाघबारस या कथासंग्रहातील आदिवासी संस्कृती विषयी मावळी बोलीतून माहीती मिळते . निसर्गातील प्रत्येक गोष्ट ते देवासमान मानतात . झाडांच्या ते पाया पडतात . दुखापत झाल्यास झाडपाल्याचे औषध लावतात . तर बाबाराव मडावी यांच्या भाकर कथासंग्रहातील आदिवासींची प्राण्यांबद्दलची भूतदया दिसून येते . 'आभाळ भरून आलंय ' या कथेत बैल आणि वानराप्रती आदिवासी शेतकऱ्याने दाखवलेली माया दिसून येते .

आदिवासी हे बहुधा जंगलव्याप्त क्षेत्रात राहतात. त्यांच्या सामान्य आणि दैनंदिन वापरातील खूपशा वस्तू जंगलातून विनामूल्य मिळतात. बरेचसे आदिवासी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आपल्या चरितार्थासाठी जंगलावर अवलंबून असल्याचे दिसते. आदिवासी पद्य साहित्यातूनही आदिवासींचा निसर्गाबद्दलच्या जाणिवांचा प्रत्यय येतो . कवी संजय लोहकरे यांच्या पानझडी कवितेत ते लिहितात ,

"पानझडी म्हणजे पळसझाडी
पळसफुलांनी नटलेलं गाव
गाव कसलं जंगलच ते
पाडया पाड्यांनी वसलेलं "

या कवितेत निसर्ग आणि माणसाच्या सानिध्याचे ऋणानुबंध व्यक्त होतात .

"जंगल हे आदिवासींचे निवास आहे . काही आदिवासी जमातींची नावे ही जंगल अथवा नैसर्गिक साधन संपत्तीवरून दिल्याचे दिसते. उदा . माडिआ हे नाव माड या वृक्षावरून प्रचलित झाले . काही आदिवासीतील कूलचिन्ह वेगवेगळे वृक्ष अथवा प्राण्यांवरून घेतलेली दिसतात. पिढयानपिढ्यांच्या वास्तव्यामुळे तेथील नैसर्गिक परिसंस्था आणि आदिवासी जीवनात एक साहचर्याचा नातेसंबंध आहे " . १२

आदिवासींमध्ये जी कुलचिन्हे असतात त्यांची शिकार अथवा झाडांची तोड केली जात नाही. गोंडांमध्ये लग्नखांब करण्यासाठी ज्या वृक्षाचे लाकूड वापरतात त्याची फांदी लग्नाच्या वेळी लावण्याची प्रथा आहे . गोंड या आदिवासी जमातीमध्ये गोंडी बोलीभाषेचा वापर होतो . बऱ्याचशा आदिवासी परंपरा या निसर्गाशी संबंधीत असतात .त्यातून पर्यावरण विषयक जागृतता दिसते. कोरकू मध्ये चंद्र , सूर्य , पृथ्वीची पूजा केली जाते .वारली व कोकण्यांमध्ये डोंगरदेवाची पूजा केली जाते .आदिवासी भागातील कचरा हा पालापाचोळा, पक्षांची पिसे , प्राण्यांची हाडे , शेण इत्यादी प्रकारचा होता . म्हणजे तो पर्यावरण पूरकच होता .परंतू दळणवळण व संपर्क वाढल्याने आता प्लॅस्टिक व न कुजणारा कचरा होत आहे .

सारांश आणि निष्कर्ष -

आदिवासी माणूस हा मूळातच मितभाषी , बुजलेला , सरळमार्गी , निरुपद्रवी व संवेदनशील आहे. आदिवासी हे निसर्गाच्या सानिध्यात राहिल्याने उपजतच त्यांना नैसर्गिक स्वभावधर्म लाभला आहे. हा माणूस समूहाने वास्तव्य करतो. ज्येष्ठ कवी वाहरू सोनवणे आदिवासींच्या संस्कृती संदर्भात आपले विचार व्यक्त करताना म्हणतात "आदिम प्राचीन काळापासून हा समाज संस्कृतीला धरून आहे. श्रम , समूह आणि सहकार्य करणे ही आदिवासींची जीवन प्रणाली आहे. ते जंगलचे शोषन करत नाहीत. ते संस्कृतीचे धनी आहेत. त्यांचे सर्व विधि कार्य करणारी माणसे त्यांच्यातीलच आहेत. त्यांच्या गीतातून देवी-देवता, विधिपरंपरा यांची गुंफण केली जाते " १३ वाहरू सोनवणे यांच्या विधानांवरून सांस्कृतिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या आदिवासींची संपन्नता दिसून येते. तसेच प्रसिद्ध तारपा वादक भिकल्या धिंडा यांना आदिवासी तारपा वादनाची कला पिढयानपिढया जोपासल्यामुळे २०२६ सालचा पदमश्री पुरस्कार जाहीर झाला आहे . यावरून आदिवासी किती कलाप्रेमी आहेत याची प्रचिती येते . यावरून आदिवासी संस्कृती बाबत काही निष्कर्ष काढता येतील ते पुढील प्रमाणे -

१) आदिवासी कलाप्रेमी आहेत. त्यांची वारली चित्रकला सर्वज्ञात आहे .

२) आदिवासी बोलींचे व पारंपरिक कलेचे जतन व संवर्धन आदिवासींनीच केले आहे .

३) आदिवासींच्या अनेक बोलीभाषा आहेत , पण त्यांना लिपी नाहीत.

४) आदिवासींमध्ये वर्णभेद व चातुर्वर्ण्य व्यवस्था नाही .

५) आदिवासी निसर्गाचे उपासक आहेत. त्यांची संस्कृती निसर्ग संस्कृती आहे .

६) आदिवासी कपोलकल्पित देवतांना मानत नाही.

७) आदिवासी संस्कृतीत स्त्री-पुरुष समानतेला प्राधान्य आहे.

८)आदिवासी संस्कृतीत सामूहीक जीवनाला महत्त्व आहे .

९) आदिवासी संस्कृतीत युवक-युवतींना जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे.

१०) जंगल तेथे आदिवासी व आदिवासी तेथे जंगल यावरून आदिवासी हेच या पृथ्वीचे मुलनिवासी होय .

११) जगा व दुसऱ्यांना जगु द्या ही विचारसरणी .

समारोप -

निसर्गाला सर्वस्व मानून त्याच्या ठायी लीन होऊन आपल्या जीवनात आनंद उपभोगणे हेच कर्तव्य समजून आदिवासी समाज जगत आला आहे. अभिजन समूह पृथ्वीकडे उपयोजित वस्तू म्हणून बघत मालकी प्रस्तापित करतो . मात्र आदिवासी हे स्वतः ला पृथ्वीच्या आयुष्यातले पाखरू समजतात . ते कधीच मालकी दाखवत नाहीत .मात्र जल , जंगल ,जमिनीचे रक्षण करणे हे त्यांचे आद्यकर्तव्य समजतात. आज पर्यावरण चळवळीच्या मूल्य व्यवस्थेचे सर्व स्थरांतून समर्थन होत असले तरी त्याचा गाभा हा आदिवासी संस्कृतीच्या मूल्य व्यवस्थेत आहे . आज जागतिकीकरणाच्या ग्लोबल आक्रमणांशी संघर्ष करना तंदुरुस्त राहण्यासाठी आपल्याला निसर्गाचाच धावा करावा लागेल. त्याचाशी लीन व्हावे लागेल. निसर्गाच्या विरोधात जावून प्रतारणा चालणार नाही . असे आदिवासी संस्कृती प्रथमपासून सांगत आली आहे . आणि ती आजही सांगत आहे . निसर्गाकडे चला ! निसर्गाशी मैत्री करा !! त्याचा विश्वास संपादन करून गुण्यागोविंदाने राहू या !!!

संदर्भ-

१) लिंबाळे शरणकुमार, (संपा) मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह , मधुराज पब्लिकेशन प्रा . लि . पुणे . प्र .आ . १९९३ , पृ.१४५

२) डॉ . ज्ञानेश्वर वाल्हेकर , आदिवासी साहित्य एक अभ्यास , स्वरुप प्रकाशन ,औरंगाबाद पृष्ठ . ४

३) गारे गोविंद, भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती , अमृत प्रकाशन, औरंगाबाद प्र.आ.१९९३ पृ .८७

४) महाराष्ट्र संस्कृती: घडण आणि विकास , ह .श्री .शेणोलीकर, प्र .ना .देशपांडे

५) प्रा . डॉ . तुकाराम रोंगटे , आदिवासी साहित्य चिंतन आणि चिकित्सा, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि . पृष्ठ .१४०

६) तत्रैव पृष्ठ .१४१

७) शरद पाटील - रामायण महाभारतातील वर्णसंघर्ष मावळाई प्रकाशन प्र . आ .१९८६ पृ . १२

८) डॉ .संजय लोहकरे, राब, अथर्व पब्लिकेशन धुळे, प्रथमावृती-२०१८ पृ .४

९) तत्रैव- पृ . ५

१०) तत्रैव - पृ .९

११) तत्रैव - पृ- ३३

१२) डॉ . शौनक कुलकर्णी- महाराष्ट्रातील आदिवासी , डायमंड पब्लिकेशन पुणे प्र . आ. २००५ पृ .९९

१३) डॉ . तुमराम विनायक - आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा , विजय प्रकाशन , नागपुर , प्र . आ . १९९४ पृ.७

अभिजात भाषा आणि साहित्य : सामाजिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास

सौ. उन्नती अमृतराव पाटील,
सहाय्यक प्राध्यापिका,
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय कडेगाव.
Email ID - uapatil2017@gmail.com

सारांश :

भाषा व साहित्य हे कोणत्याही समाजाचे केवळ अभिव्यक्तीचे माध्यम नसून समाजाच्या सामाजिक रचना, मूल्यव्यवस्था, सांस्कृतिक स्मृती आणि परिवर्तनशील प्रक्रियेचे प्रतिबिंब असते. अभिजात भाषा व साहित्याने ऐतिहासिक काळापासून समाजघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. प्रस्तुत संशोधन निबंधात अभिजात भाषा व साहित्याचा सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतील सहभाग समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासण्यात आला आहे. भूतकाळात अभिजात साहित्याने सामाजिक मूल्ये, नैतिकता व सामाजिक संरचना घडविण्यात कसा हातभार लावला, वर्तमान काळात आधुनिकता, शिक्षण व तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे त्याची भूमिका कशी बदलत आहे आणि भविष्यात सामाजिक परिवर्तनात अभिजात भाषा व साहित्याचे स्थान काय असू शकते, याचा सखोल विचार या अभ्यासात करण्यात आला आहे. या संशोधनासाठी दुय्यम माहितीवर आधारित वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. अभिजात भाषा व साहित्य हे सामाजिक सातत्य टिकवून ठेवतानाच सामाजिक परिवर्तनाला दिशा देणारे प्रभावी माध्यम ठरते, असा निष्कर्ष या अभ्यासातून अधोरेखित होतो.

प्रस्तावना :

मानवी समाजाच्या निर्मितीपासूनच भाषा ही केवळ संवादाचे साधन न राहता सामाजिक अस्तित्वाची, सांस्कृतिक ओळखीची आणि सामूहिक जाणीवेची मूलभूत रचना ठरत आलेली आहे. समाज जसा घडतो, बदलतो आणि विकसित होतो, तशी भाषा व साहित्यही त्या समाजाच्या अंतर्गत प्रक्रियांना प्रतिबिंबित करत विकसित होत असतात. साहित्य हे समाजाचे केवळ प्रतिनिधित्व करत नाही, तर ते समाजाला विचार करायला लावणारे, प्रश्न विचारणारे आणि परिवर्तनाची दिशा सुचवणारे प्रभावी माध्यम असते. त्यामुळे भाषा व साहित्य यांचा अभ्यास हा केवळ भाषिक किंवा साहित्यिक न राहता तो समाजशास्त्रीय अभ्यासाचा महत्त्वाचा विषय ठरतो.

अभिजात भाषा व साहित्याला विशिष्ट ऐतिहासिक परंपरा, सांस्कृतिक सातत्य आणि सामाजिक प्रतिष्ठा लाभलेली असते. अशा भाषांमध्ये निर्माण झालेले साहित्य समाजाच्या सामूहिक स्मृतीचे, मूल्यव्यवस्थेचे आणि सामाजिक संरचनेचे दस्तऐवजीकरण करत असते. अभिजात साहित्यामधून त्या-त्या काळातील समाजव्यवस्था, वर्गभेद, लिंगसंबंध, सत्तासंरचना, धार्मिक व नैतिक मूल्ये तसेच मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान व्यक्त झालेले दिसते. त्यामुळे अभिजात भाषा व साहित्य हे समाजाच्या भूतकाळाचे केवळ अवशेष नसून सामाजिक समज आणि ओळखीचे जिवंत स्रोत आहेत.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, सामाजिक परिवर्तन ही समाजाच्या विकासाची अपरिहार्य प्रक्रिया आहे. सामाजिक संस्था, मूल्ये, नाती, जीवनपद्धती आणि सामाजिक भूमिका यांमध्ये होणारे दीर्घकालीन बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणाचा विस्तार, विज्ञान-तंत्रज्ञान, माध्यमे आणि जागतिकीकरण यांमुळे आधुनिक समाज वेगाने बदलत आहे. या परिवर्तनाच्या प्रक्रियेत भाषा व साहित्याची भूमिका केवळ निष्क्रिय नसून ती सक्रिय स्वरूपाची आहे. अभिजात साहित्य कधी सामाजिक सातत्य टिकवून ठेवते, तर कधी प्रस्थापित मूल्यांना आव्हान देत परिवर्तनाची गरज अधोरेखित करते.

भूतकाळात अभिजात भाषा व साहित्य समाजातील नैतिकता, कर्तव्यबोध, धर्म, सामाजिक शिस्त आणि मूल्यव्यवस्था दृढ करण्याचे कार्य करत होते. मात्र त्याचबरोबर त्यातून समाजातील वर्गीय विषमता, स्त्री-पुरुष असमानता आणि

सत्ताकेंद्रित रचना देखील प्रतिबिंबित झालेल्या दिसून येतात. त्यामुळे अभिजात साहित्य हे केवळ आदर्श समाजाचे चित्रण न करता सामाजिक वास्तवाचे, संघर्षांचे आणि विसंगतींचे दस्तऐवज म्हणूनही महत्त्वाचे ठरते.

वर्तमान काळात बदलती सामाजिक रचना, उपभोगप्रधान संस्कृती, डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव आणि तरुण पिढीच्या जीवनशैलीतील बदल यांमुळे अभिजात भाषा व साहित्यासमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत. अभिजात साहित्य आज अनेकदा अप्रासंगिक किंवा अवघड मानले जाते. तथापि, शिक्षणव्यवस्था, संशोधन, अनुवाद, डिजिटल संग्रहण आणि नव्या माध्यमांच्या साहाय्याने अभिजात भाषा व साहित्य पुन्हा नव्या सामाजिक संदर्भात समजून घेण्याचा प्रयत्न होत आहे. यामुळे अभिजात साहित्याचा आधुनिक समाजाशी पुन्हा एक संवाद सुरू झालेला दिसून येतो.

भविष्यातील सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत अभिजात भाषा व साहित्याची भूमिका काय असू शकते, हा प्रश्न आज अत्यंत महत्त्वाचा ठरतो. अभिजात साहित्य जर केवळ परंपरेपुरते मर्यादित राहिले, तर ते समाजापासून दुरावण्याची शक्यता आहे; परंतु तेच साहित्य आधुनिक सामाजिक प्रश्न, अस्मिता, समता, न्याय आणि सांस्कृतिक बहुलता यांच्या संदर्भात पुनर्वाचित झाले, तर ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकते. त्यामुळे अभिजात भाषा व साहित्याचे सामाजिक भविष्य हे समाजाच्या बौद्धिक जाणीवेशी आणि शैक्षणिक धोरणांशी निगडित आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन निबंधात अभिजात भाषा व साहित्याचा सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतील सहभाग समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासण्यात आला आहे. भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य या तीन कालखंडांच्या संदर्भात अभिजात भाषा व साहित्याची सामाजिक भूमिका, त्याचा समाजरचनेवर होणारा प्रभाव आणि बदलत्या समाजातील त्याचे स्थान समजून घेण्याचा प्रयत्न या अभ्यासात करण्यात आला आहे. भाषा, साहित्य आणि समाज यांतील परस्परसंबंध स्पष्ट करत अभिजात भाषा व साहित्य हे सामाजिक सातत्य आणि परिवर्तन यांचे महत्त्वपूर्ण माध्यम कसे ठरते, हे अधोरेखित करणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

उद्दिष्टे :

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'अभिजात भाषा आणि साहित्य: सामाजिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास.' या विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये पुढील उद्दिष्टांच्या आधारे अभ्यास केला जाणार आहे.

1. अभिजात भाषा व साहित्याची संकल्पना स्पष्ट करून त्याचे समाजशास्त्रीय महत्त्व अधोरेखित करणे.
2. भूतकाळ व वर्तमान काळातील सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत अभिजात भाषा व साहित्याची भूमिका, स्वरूप व बदलते कार्य समजून घेणे.
3. अभिजात साहित्याच्या माध्यमातून समाजातील मूल्यसंघर्ष, सामाजिक विषमता, सत्तासंरचना, लिंग व वर्गभेद तसेच सामाजिक जाणीव यांची अभिव्यक्ती समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषित करणे.
4. भविष्यातील सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात अभिजात भाषा व साहित्याच्या संभाव्य भूमिका, संधी व आव्हाने अभ्यासून त्याचे सामाजिक महत्त्व अधोरेखित करणे.

संशोधन पद्धती :

सदर संशोधन हे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचे आहे. या अभ्यासासाठी दुय्यम माहितीचा (Secondary Data) वापर करण्यात आला आहे. संशोधनासाठी समाजशास्त्र, साहित्य व संबंधित विषयांवरील पुस्तके, संशोधन निबंध, जर्नल्स, नियतकालिके, प्रबंध, वृत्तपत्रे आणि विश्वसनीय ऑनलाईन स्रोत यांचा आधार घेतला आहे.

संकलित माहितीचे तर्कसंगत विश्लेषण, तुलना व अर्थनिर्णय करून विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनामध्ये गुणात्मक (Qualitative) पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून निष्कर्ष उद्दिष्टांच्या चौकटीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

अभिजात भाषा व साहित्य : संकल्पनात्मक स्पष्टता :

'अभिजात भाषा' आणि 'अभिजात साहित्य' या संकल्पना केवळ भाषिक सौंदर्य, प्राचीनता किंवा साहित्यिक परंपरेपुरत्याच मर्यादित नसून त्या समाजाच्या सांस्कृतिक स्मृती, ऐतिहासिक जाणीव आणि सामूहिक चेतनेशी घट्टपणे निगडित असलेल्या आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अभिजात भाषा व साहित्य ही सामाजिक रचना, मूल्यव्यवस्था आणि सत्तासंबंध यांची अभिव्यक्ती करणारी प्रभावी साधने आहेत.

अभिजात भाषा म्हणजे अशी भाषा जी दीर्घकालीन ऐतिहासिक परंपरा, प्रमाणित व्याकरण, समृद्ध शब्दसंपदा आणि साहित्यिक वारसा यांद्वारे समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतिनिधित्व करते. ती भाषा केवळ संवादाचे माध्यम न राहता समाजातील ज्ञाननिर्मिती, धार्मिक-तत्त्वज्ञानात्मक विचार, नैतिक मूल्ये आणि सामाजिक संकेत यांना आकार देते. त्यामुळे अभिजात भाषा ही समाजाच्या वैचारिक जडणघडणीची मूलभूत चौकट निर्माण करते.

अभिजात साहित्य ही त्या भाषेतून निर्माण झालेली साहित्यकृतींची परंपरा असून ती समाजाच्या भूतकाळातील जीवनपद्धती, सामाजिक संस्था, परंपरा, संघर्ष आणि परिवर्तनाच्या प्रक्रियांचे दस्तऐवजीकरण करते. मात्र हे साहित्य समाजाचे केवळ प्रतिबिंब न राहता समाजावर प्रभाव टाकणारी वैचारिक शक्ती म्हणूनही कार्य करते. समाजातील मूल्यसंघर्ष, नीतिनियम, धर्म, सत्ता, वर्गभेद व लिंगभेद यांचे सूक्ष्म प्रतिबिंब अभिजात साहित्यात आढळते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभिजात भाषा व साहित्य हे सामाजिक नियंत्रण, सांस्कृतिक वर्चस्व आणि सामाजिक एकात्मता या प्रक्रियांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. काही वेळा अभिजात साहित्य प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेचे समर्थन करताना दिसते, तर काही वेळा ते विद्यमान व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून परिवर्तनाची बीजे पेरते. त्यामुळे अभिजात साहित्य हे सामाजिक स्थैर्य आणि सामाजिक परिवर्तन या दोन्ही प्रक्रियांशी निगडित असते.

भूतकाळात अभिजात भाषा व साहित्य मुख्यतः अभिजन वर्गापुरते मर्यादित होते. मात्र आधुनिक काळात शिक्षण, मुद्रण माध्यमे, लोकशाही मूल्ये आणि तंत्रज्ञानामुळे त्यांचा आवाका व्यापक झाला आहे. आज अभिजात साहित्याचे नव्याने पुनर्वाचन, पुनर्मूल्यांकन आणि समकालीन संदर्भात पुनर्व्याख्या केली जात आहे. भविष्यातही अभिजात भाषा व साहित्य सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे, सांस्कृतिक वारसा जपण्याचे आणि नव्या पिढीला सामाजिक मूल्यांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत राहील.

अशा प्रकारे, अभिजात भाषा व साहित्य या संकल्पना केवळ साहित्यिक अभ्यासापुरत्या मर्यादित न राहता समाजशास्त्रीय अभ्यासाच्या व्यापक चौकटीत सामाजिक संरचना, सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक परिवर्तन समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

सामाजिक परिवर्तन : अर्थ व स्वरूप :

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजाच्या रचनात्मक, वैचारिक व सांस्कृतिक अंगांमध्ये कालानुरूप घडणारा व्यापक आणि अर्थपूर्ण बदल होय. समाज हा स्थिर घटक नसून तो सतत गतिशील असतो. काळ, परिस्थिती, ज्ञान, तंत्रज्ञान आणि मानवी जाणीव यांच्या प्रभावामुळे समाजातील मूल्यव्यवस्था, सामाजिक भूमिका, संस्था आणि संबंध यांमध्ये बदल घडून येतात. या बदलांची प्रक्रिया म्हणजेच सामाजिक परिवर्तन.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक परिवर्तन ही केवळ बाह्य बदलांची प्रक्रिया नसून ती समाजाच्या अंतर्गत चेतनेतील बदलांशी जोडलेली असते. व्यक्तींच्या विचारसरणीत होणारा बदल, परंपरांकडे पाहण्याची दृष्टी, आणि सामाजिक न्यायाविषयीची जाणीव यांमुळे सामाजिक परिवर्तनाला गती मिळते. त्यामुळे सामाजिक परिवर्तन हे हळूहळू घडणारे (सातत्यपूर्ण) किंवा कधी कधी तीव्र स्वरूपाचेही असू शकते.

अभिजात भाषा व साहित्याच्या संदर्भात सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप अधिक स्पष्टपणे समजते. साहित्य हे समाजातील बदलांचे केवळ प्रतिबिंब नसून त्या बदलांना वैचारिक रूप देणारे प्रभावी माध्यम आहे. अभिजात साहित्यामधून समाजातील मूल्यबदल, संघर्ष, असमानता, सुधारणा आणि नव्या सामाजिक जाणीवा व्यक्त होताना दिसतात. त्यामुळे सामाजिक परिवर्तन हे साहित्यिक विषयवस्तू, भाषाशैली आणि दृष्टिकोन यांमध्ये प्रकर्षाने उमटते.

याचबरोबर सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप बहुआयामी आहे. ते सांस्कृतिक, नैतिक, बौद्धिक आणि सामाजिक पातळयांवर घडून येते. अभिजात भाषा व साहित्य हे परंपरा आणि परिवर्तन यांमधील दुवा म्हणून कार्य करते. समाजातील सातत्य जपतानाच परिवर्तन स्वीकारण्याची प्रक्रिया साहित्याच्या माध्यमातून घडते. म्हणूनच सामाजिक परिवर्तन हे समाजाच्या विकासाशी निगडित असून, अभिजात साहित्य त्याचे समाजशास्त्रीय आकलन समृद्ध करते.

अभिजात भाषा व साहित्याचा त्रिकालीन सामाजिक अभ्यास

अभिजात भाषा व साहित्याचा त्रिकालीन सामाजिक अभ्यास म्हणजे समाजाच्या *भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यकाळ* या तिन्ही कालखंडांतील सामाजिक वास्तव, मूल्यव्यवस्था आणि परिवर्तनशील प्रवाह यांचा साहित्याच्या माध्यमातून केलेला सखोल अभ्यास होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भाषा व साहित्य हे समाजाच्या सामूहिक चेतनेचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे काळानुसार समाजात घडणारे बदल, संघर्ष, जाणीवा आणि आकांक्षा अभिजात साहित्यामध्ये विविध स्वरूपांत प्रतिबिंबित झालेल्या आढळतात. हा त्रिकालीन अभ्यास समाजाला केवळ ऐतिहासिक परंपरेत अडकवून ठेवत नाही, तर समाजाच्या गतिशीलतेला समजून घेण्याची संधी देतो. अभिजात साहित्याच्या आधारे समाजाच्या विकासप्रक्रियेचा, सामाजिक परिवर्तनाच्या दिशांचा आणि भविष्यातील सामाजिक शक्यतांचा अभ्यास करणे हा या दृष्टिकोनाचा मुख्य उद्देश आहे.

भूतकाळाच्या संदर्भात अभिजात भाषा व साहित्य

भूतकाळातील अभिजात भाषा व साहित्य समाजाच्या मूल्यव्यवस्थेचे, सामाजिक संस्थांचे आणि जीवनदृष्टीचे प्रतिबिंब होते. प्राचीन काळातील साहित्याने समाजातील धर्म, कर्तव्य, सामाजिक शिस्त, नीतिमत्ता आणि परंपरा यांना अधोरेखित केले. त्या काळातील सामाजिक रचना, वर्गव्यवस्था, लिंगभूमिका आणि सत्तासंबंध साहित्याच्या माध्यमातून स्पष्टपणे व्यक्त झालेले दिसतात.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भूतकाळातील अभिजात साहित्य हे समाजाला स्थैर्य देणारे आणि सामाजिक नियमांची पुनर्रचना करणारे माध्यम होते. त्याचबरोबर काही साहित्यकृतींमधून सामाजिक विषमता, अन्याय आणि शोषण यांविषयी सूचक प्रश्नही उपस्थित केले गेले. त्यामुळे भूतकाळातील अभिजात साहित्य हे सामाजिक नियंत्रणाचे साधन तसेच परिवर्तनाची बीजे रोवणारे माध्यम म्हणून समजले जाते.

वर्तमान काळाच्या संदर्भात अभिजात भाषा व साहित्य

वर्तमान काळात अभिजात भाषा व साहित्य नव्या सामाजिक संदर्भात पुन्हा वाचले जात आहे. आधुनिक समाजातील लोकशाही, सामाजिक न्याय, समता, मानवाधिकार, स्त्रीवाद आणि सांस्कृतिक अस्मिता यांसारख्या संकल्पनांच्या प्रकाशात अभिजात साहित्याचे पुनर्मूल्यांकन केले जाते. यामुळे साहित्याचा सामाजिक अर्थ अधिक व्यापक आणि समकालीन बनतो. डिजिटल माध्यमे, संशोधन, भाषांतर आणि शैक्षणिक अभ्यासामुळे अभिजात साहित्य आज अधिक लोकाभिमुख झाले आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, वर्तमान काळात अभिजात साहित्य हे परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील संवादाचे प्रभावी माध्यम ठरते. समाजातील बदलत्या मूल्यव्यवस्थेला समजून घेण्यासाठी साहित्य एक बौद्धिक व्यासपीठ उपलब्ध करून देते.

भविष्यकाळाच्या संदर्भात अभिजात भाषा व साहित्य :

भविष्यकाळाच्या संदर्भात अभिजात भाषा व साहित्याची भूमिका अधिक परिवर्तनशील आणि मार्गदर्शक ठरण्याची शक्यता आहे. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत अभिजात साहित्य सांस्कृतिक ओळख जपण्याचे आणि सामाजिक सातत्य राखण्याचे कार्य करेल. जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावाखालीही समाजाच्या मुळाशी असलेल्या मूल्यांना जोडून ठेवण्याचे कार्य साहित्य करेल. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भविष्यकाळातील अभिजात साहित्य सामाजिक समावेशन, सांस्कृतिक जतन आणि वैचारिक जागृतीचे साधन बनेल. नव्या पिढीला सामाजिक इतिहासाशी जोडणे, सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेला दिशा देणे ही त्याची महत्त्वाची भूमिका असेल.

त्रिकालीन अभ्यासाचे समाजशास्त्रीय महत्त्व :

अभिजात भाषा व साहित्याचा त्रिकालीन सामाजिक अभ्यास समाजशास्त्रासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण या अभ्यासातून समाजातील *सातत्य आणि परिवर्तन* यांचा समन्वय स्पष्ट होतो. भूतकाळातील परंपरा, वर्तमानातील वास्तव आणि भविष्यकालीन शक्यता यांचा एकत्रित अभ्यास केल्यास समाजाच्या विकासप्रक्रियेचे सखोल आकलन शक्य होते. अभिजात साहित्य हे केवळ सांस्कृतिक वारसा नसून सामाजिक परिवर्तनाचे साक्षीदार आणि सहनिर्माते आहे. त्यामुळे त्रिकालीन अभ्यासाच्या माध्यमातून साहित्य आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध अधिक स्पष्टपणे समजून घेता येतो.

अभिजात भाषा व साहित्य आणि सामाजिक परिवर्तन :

समाज आणि साहित्य यांचे नाते अत्यंत जिवंत, परस्परावलंबी आणि गतिशील स्वरूपाचे आहे. अभिजात भाषा व साहित्य हे केवळ शब्दांचे सौंदर्य किंवा सांस्कृतिक वारसा नसून समाजाच्या सामूहिक अनुभवांचे, मूल्यांचे आणि परिवर्तनशील प्रवाहांचे सशक्त माध्यम आहे. समाजात घडणारे सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक बदल साहित्याच्या माध्यमातून व्यक्त होतात; त्यामुळे अभिजात साहित्य हे सामाजिक परिवर्तनाचे केवळ प्रतिबिंब न राहता त्या प्रक्रियेचा सक्रिय भाग बनते.

प्राचीन काळापासून अभिजात साहित्याने समाजाच्या मूल्यव्यवस्थेची जडणघडण केली आहे. त्या काळातील साहित्यामध्ये धर्म, कर्तव्य, नैतिकता आणि सामाजिक शिस्त यांना महत्त्व देण्यात आले. या साहित्यकृतींनी समाजाला स्थैर्य प्रदान केले; परंतु त्याचबरोबर सामाजिक रचना, वर्गभेद आणि लिंगभेद यांचे चित्रणही केले. त्यामुळे भूतकाळातील अभिजात साहित्य हे सामाजिक वास्तवाचे दस्तऐवज म्हणून कार्य करताना दिसते. कालांतराने समाजात वैचारिक जागृती, सामाजिक चळवळी आणि सुधारणा घडू लागल्या. या परिवर्तनाचा प्रभाव अभिजात भाषा व साहित्यावर स्पष्टपणे दिसून येतो. साहित्याने रूढी, अंधश्रद्धा, अन्याय आणि शोषण यांवर प्रश्न उपस्थित केले. सामाजिक न्याय, समता, मानवतावाद आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांसारख्या मूल्यांना साहित्याच्या माध्यमातून प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे अभिजात साहित्य सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनले.

वर्तमान काळात अभिजात भाषा व साहित्य नव्या सामाजिक संदर्भात पुन्हा वाचले जात आहे. आधुनिक समाजातील लोकशाही मूल्ये, स्त्रीवादी विचार, सामाजिक समावेशन आणि सांस्कृतिक अस्मिता यांचा प्रभाव साहित्याच्या अभ्यासावर पडतो आहे. तंत्रज्ञान, जागतिकीकरण आणि माध्यमांच्या प्रभावामुळे अभिजात साहित्य अधिक व्यापक समाजापर्यंत पोहोचत आहे. यामुळे साहित्य आणि समाज यांच्यातील संवाद अधिक व्यापक आणि अर्थपूर्ण बनत आहे.

सामाजिक परिवर्तन ही केवळ बाह्य बदलांची प्रक्रिया नसून ती समाजाच्या अंतर्गत चेतनेशी निगडित असते. या अंतर्गत परिवर्तनाला दिशा देण्याचे कार्य अभिजात साहित्य करते. साहित्य समाजाच्या सामूहिक चेतनेला जागृत करून व्यक्तींमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करते. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिक सखोल आणि दीर्घकालीन स्वरूप धारण करते.

भविष्यकाळाच्या दृष्टीने पाहता, अभिजात भाषा व साहित्य सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत अधिक महत्त्वाची भूमिका बजावेल. सांस्कृतिक जतन, सामाजिक संवाद आणि वैचारिक जागृती यांसाठी साहित्य प्रभावी माध्यम ठरेल. परंपरा आणि परिवर्तन यांचा समन्वय साधत अभिजात साहित्य समाजाला आत्मपरीक्षणाची संधी देईल.

अशा प्रकारे, अभिजात भाषा व साहित्य आणि सामाजिक परिवर्तन यांचे नाते अतूट आहे. साहित्य समाजाचा इतिहास सांगते, वर्तमानाचे विश्लेषण करते आणि भविष्याला दिशा देते. म्हणूनच समाजशास्त्रीय अभ्यासात अभिजात भाषा व साहित्याचा समावेश केल्यास सामाजिक परिवर्तनाचे अधिक व्यापक आणि सखोल आकलन शक्य होते.

निष्कर्ष :

अभिजात भाषा व साहित्य हे केवळ भूतकाळातील सांस्कृतिक वारसा नसून, ते समाजाच्या वैचारिक, नैतिक व सामाजिक परिवर्तनाची सातत्यपूर्ण प्रक्रिया घडवून आणणारे प्रभावी माध्यम आहे. परंपरा आणि परिवर्तन यांचा

समन्वय साधत अभिजात साहित्याने समाजाला नवे दिशादर्शन केले आहे. या पार्श्वभूमीवर पुढील निष्कर्ष मांडता येतात.

1. अभिजात भाषा व साहित्याने समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचे जतन करत सामाजिक परिवर्तनाला ऐतिहासिक अधिष्ठान प्रदान केले आहे.
2. अभिजात साहित्यातून मांडलेले मूल्यविचार, नीतीतत्त्वे व जीवनदृष्टी यांनी समाजातील अन्यायकारक प्रथा प्रश्नांकित केल्या आणि सुधारणा घडवून आणल्या.
3. सामाजिक विषमता, जातिभेद, स्त्री-पुरुष असमानता यांसारख्या प्रश्नांवर अभिजात साहित्याने वैचारिक जागृती निर्माण केली.
4. परंपरेशी नाते राखत अभिजात भाषेने आधुनिक सामाजिक बदल स्वीकारण्याची मानसिकता समाजात विकसित केली.
5. अभिजात साहित्य हे सामाजिक संवादाचे प्रभावी साधन ठरून समाजातील परिवर्तन प्रक्रियेला सातत्य व दिशा देते.
6. जागतिकीकरणाच्या युगातही अभिजात भाषा व साहित्य सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासासाठी संशोधन, शिक्षण व सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचा व्यापक स्कोप निर्माण करते.

संदर्भसूची :

1. देशमुख, ग. म. (2012). साहित्य आणि समाज. पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन.
2. पाटील, रा. भ. (2015). मराठी साहित्य : परंपरा आणि परिवर्तन. कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
3. कुलकर्णी, म. ग. (2010). सामाजिक परिवर्तन आणि साहित्य. औरंगाबाद : मेहता पब्लिशिंग हाऊस.
4. देशपांडे, सु. वा. (2008). भारतीय समाज आणि सांस्कृतिक वारसा. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
5. जोशी, न. रा. (2016). भाषा, संस्कृती आणि समाज. पुणे : साधना प्रकाशन.
6. फडके, य. दि. (2004). मराठी वाङ्मयाचा सामाजिक अभ्यास. मुंबई : ग्रंथाली.
7. Williams, R. (1977). Marxism and Literature. Oxford: Oxford University Press.
8. Eagleton, T. (1983). Literary Theory: An Introduction. Oxford: Blackwell Publishing.
9. Ghurye, G. S. (1964). Culture and Society. Bombay: Popular Prakashan.
10. Ogburn, W. F. (1957). Social Change with Respect to Culture and Original Nature. New York: Viking Press.
11. Swingewood, A. (1972). The Sociology of Literature. London: Paladin.
12. Mukherjee, A. (2004). Classical Traditions and Modern Society in India. New Delhi: Oxford University Press.

मराठी भाषेची पूर्वपीठिका : शिलालेखीय अभ्यास

साक्षी बाबासाहेब महामुलकर

इतिहास व भारतीयविद्या अभ्यासक

रयत शिक्षण संस्था, सातारा.

mahamulkarsakshi@gmail.com

सारांश

मराठी ही महाराष्ट्राची आद्य भाषा. ती स्वतंत्र होती व आहे हे सांगणारे अनेक दुवे आज उपलब्ध आहेत. याचं दुव्यांच्या माध्यमातून मराठीची मुळे ही सुमारे २५०० वर्षांहून अधिक प्राचीन आहेत हे सिद्ध करण्यास मदत झाली आहे. त्यादृष्टीनेचं प्राचीन काळापासूनचा अभिजाततेचा वारसा मिरवणारी आपली माय मराठी ही आता अधिकृतरित्या 'अभिजात' आहे ही मराठी माणसाला अभिमान प्रदान करणारी बाब. मात्र मराठीच्या या अभिजातेत अभिलेखीय वा शिलालेखीय साधनांचा असणारा अत्यंत महत्त्वपूर्ण वाटा विसरून चालणार नाही. महाराष्ट्रातील नाणेघाट, अक्षी आणि कर्नाटकातील श्रवणबेळगोळ मधील आद्य शिलालेख हे तर मराठीच्या प्राचीनतेचे जिवंत पुरावे आहेत. या शिलालेखांनी इतिहासाबरोबरच मराठी भाषेची परंपरा, संस्कृती आणि प्राचीनत्व आजपर्यंत जपलेले दिसते, आणि यापुढेही ते असेच जपलेले रहावे म्हणूनचं मराठी भाषेच्या पूर्वपीठिकेचा आढावा घेत मराठीतील या काही आद्य व प्राचीन शिलालेखांवर हा शोधनिबंध भाष्य करतो.

बीजशब्द : मराठी, अभिजात भाषा, इतिहास, प्राचीन, शिलालेख

प्रस्तावना

मराठी भाषेला हजारो वर्षांचा समृद्ध इतिहास लाभला आहे. खरंतर, संस्कृतमधून मराठी भाषेचा उगम झाला हे जुने मत आता मान्य होणार नाही एवढे सज्जड पुरावे उपलब्ध आहेत. ज्यात अभिलेखीय पुरावे, ग्रंथ साधने या साऱ्यांचाच समावेश होताना दिसतो. त्यादृष्टीनेचं, सर्वात आधी भाषेची पूर्वपीठिका म्हणजे पार्श्वभूमी, उत्पत्ती वा इतिहासाविषयी जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते.

'मराठीची पूर्वपीठिका' जाणून घ्यायची असेल तर सर्वप्रथम महाराष्ट्र या नामाभिधानासह त्याच्या प्राचीनतेत डोकवावे लागते. तसे पाहिले तर या प्रदेशाला 'महाराष्ट्र' हे नाव सातवाहनांच्या काळात मिळाले असे गृहित धरले जाते.[49] अगदी सम्राट अशोकाच्या काळापासून त्याच्या कोरीव लेखात रठिकांचा उल्लेख आढळतो. ज्यांची राष्ट्रीक, रठिक किंवा रट्ठ अशी उपपत्ती दिसते. याचं राष्ट्रिकांच्या छोट्या-छोट्या वसाहतींचे एकीकरण होऊन महाराष्ट्र निर्माण झाला अशी मान्यता आहे. त्यामुळे महारट्ठांचा/महाराष्ट्रांचा किंवा महाराष्ट्र लोकांचा देश तो महाराष्ट्र ! याचं महाराष्ट्राच्या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या प्राचीन भाषांतून आधुनिक मराठी भाषेचा विकास झाला. मराठी ही महाराष्ट्री प्राकृताशी नाते सांगणारी आहे.[50] महारठ्ठी, मरहट्ठी, महाराष्ट्री व महाराष्ट्री प्राकृत अशा नावांच्या माध्यमातून हा भाषा विकास साध्य झालेला दिसतो. नाणेघाटातील शिलालेख सुद्धा या उल्लेखांना अधोरेखित करतो.

प्राचीन काळातील अक्षी, श्रवणबेळगोळ, कुडल संगम इत्यादी ठिकाणचे आद्य शिलालेख सुद्धा भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे ठरतात. लिखित ग्रंथ साधनांमधून देखील मराठीच्या विकासाचे टप्पे लक्षात येतात. सातवाहन राजा हाल कृत गाथासप्तशती असो वा इ.स. १२७८ मधील लीळाचरित्र किंवा इ.स. १२९० मधील ज्ञानेश्वरांशी ज्ञानेश्वरी! सोबत याआधीचे इ.स. ११७८ मधील मुकुंदराजाचे विवेकसिंधु आणि ८व्या शतकातील कुवयमाला ग्रंथातील मरहट्ठ भाषेचा उल्लेख— तो सुध्दा महत्त्वपूर्ण ठरतो.

---

[49] वात्सायनाच्या कामसूत्रात तसेच वराहमिहिराच्या बृहत्संहितेत सुद्धा महाराष्ट्राचा उल्लेख आढळतो.

[50] फ्रेंच भाषाशास्त्रज्ञ जुल्स ब्लॉख यांनी त्यांच्या *फॉर्मेशन ऑफ मराठी लँग्वेज* (१९१४) या ग्रंथात "मराठी ही सरळ महाराष्ट्री प्राकृताशी नाते सांगते" असे म्हटले आहे.

अगदी मध्ययुगीन काळात देखील श्री शिवछत्रपतींमुळे मराठीचे पुनरुज्जीवन झालेले दिसते. शिवपूर्वकाळात अगदी १४.४ टक्के वापरात असणारी मराठी भाषा शिवकाळात इ.स १६७७ पर्यंत ६२.७% वर जाऊन पोहोचली. छत्रपती शिवरायांनी मराठी भाषेतूनच चलन पाडले, राज्यव्यवहारकोश निर्माण केला.[51] थोरल्या शाहूछत्रपतींच्या काळात तर मराठी भाषेने कळस गाठला आणि इस १७२८ मध्ये तिचे प्रमाण ९३.७ टक्क्यांपर्यंत वाढलेले आपल्याला दिसून येते.

एकूणचं, प्राचीन काळापासून सुरू झालेला भाषेचा हा प्रवास दिवसेंदिवस समृद्ध होत गेला आहे. अभिजाततेच्या दृष्टिने ही वाटचाल महत्वाची आहे. मात्र त्याहून महत्त्वाचा आहे तो भाषेचा उगम, उत्पत्ती आणि तिच्या प्राचीनत्वाचे पुरावे. म्हणूनच मराठी भाषेला अधिकृत अभिजात दर्जा मिळवून देणाऱ्या प्राचीन शिलालेखांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे ठरते.

नाणेघाटातील शिलालेख अन् अभिजाततेत योगदान—

महाराष्ट्रातील जुन्नर जवळील नाणेघाट हा सातवाहनकालीन प्राचीन व्यापारी मार्ग म्हणून सर्वज्ञात आहे. याचं नाणेघाटातील गुंफेत एका राणीने कोरलेला 'भारतातील सर्वात जुना शिलालेख' अस्तित्वात आहे. सातवाहन राणी



नागनिका हिने इ.स.पू. पहिल्या शतकात हा लेख कोरून घेतला. हा शिलालेख ब्राम्ही लिपी व प्राकृत भाषेत असला तरी महाराष्ट्री प्राकृत म्हणून आणि मराठी भाषेच्या पूर्वपीठिकेच्या दृष्टीने त्याचे महत्व अनन्यसाधारण ठरते. या शिलालेखात वापरण्यात आलेली भाषा ही 'महाराष्ट्री प्राकृत' असून त्यात 'महारठिनो' हा उल्लेख आलेला दिसतो. सुमारे अडीज हजार वर्षांपूर्वीचा हा शिलालेख भाषेचे वय अन् प्राचीनत्वाचा अंदाज बांधण्यासाठी उपयुक्त ठरला आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा देताना महत्त्वाच्या अभिलेखीय पुराव्यांचा विचार केला गेला, तेव्हा मराठीची प्राचीनता सिद्ध करताना नाणेघाटातील शिलालेखाचा दाखला महत्वपूर्ण ठरलेला दिसतो. त्यादृष्टीनेच महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासात आणि मराठी भाषेच्या अभिजाततेत नाणेघाटातील सम्राज्ञी नागनिकेच्या शिलालेखाचे योगदान मोठे आहे.

[51] राज्यव्यवहार कोशाच्या मार्फत अनेक फारसी शब्दांना पर्यायी मराठी शब्द मिळाले.



मराठी भाषेतील पहिले व महत्वाचे अभिलेखीय उल्लेख—

१. अक्षी येथील आद्य शिलालेख

महाराष्ट्राच्या रायगड जिल्ह्यात अलिबाग पासून जवळच असणारे एक छोटेसे सुंदर गाव म्हणजे— अक्षी. या गावाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे तेथील मातीने जपलेले दोन अतिशय महत्त्वपूर्ण असे प्राचीन मराठी शिलालेख. त्यातील एक शिलालेख हा देवगिरीच्या यादवांचा राजा रामचंद्रदेव यादव याच्या काळातील, इसवी सन १२९१ सालचा आहे. तर, दुसरा शिलालेख हा शिलाहार राजा केशीदेव याच्या कारकिर्दीतील— इसवी सन १०१२ सालचा आहे. ह्याच केशीदेवाच्या शिलालेखाकडे मराठी भाषेत कोरण्यात आलेल्या सर्वात पहिल्या शिलालेखाचा मान जातो. हा लेख मराठी भाषेच्या प्राचीनत्वाचा साक्षीदार असून 'मराठीतील आद्य लेख' आहे !

हा आद्य शिलालेख एका गधेगळीवर आहे. गधेगळ (गद्धेगळ) म्हणजे एखाद्या मंदिरास कुणी इनाम अथवा दान दिल्यास त्याचा गैरवापर होऊ नये किंवा त्याचा भंग होऊ नये यासाठी एक प्रकारे शाप देण्याच्या हेतूने उभारली जाणारी शिळा. गधेगळीवर गाढव व स्त्रीचे समागम शिल्प दाखवले जाते, कारण "एखाद्या व्यक्तीनं जर, या गधेगळीवर लिहिलेल्या मजकुराचं पालन केलं नाही अथवा त्याला विरोध केला तर त्याच्या घरातील स्त्रीसोबत अशारीतीने बळजबरी केली जाईल", असे या शिल्पातून सूचित होते. शिलालेखामध्ये सुद्धा ती शापवाणी अत्यंत स्पष्टपणे लिहिलेली असते.[52]



फोटो क्र. २ : अक्षी येथील शिलालेख / गधेगळ

फोटो क्र. ३ : अक्षी येथील शिलालेखांचे चित्र

शिलालेखाविषयी : हा शिलालेख शके ९३४ म्हणजे इ.स. १०१२ चा असून आजपर्यंतचा सर्वात जुना ज्ञात मराठी शिलालेख म्हणून मान्यताप्राप्त झाला आहे. हा शिलालेख शिलाहारकालीन असून यात संवत सह वार देखील उल्लेखित आहे. नऊ ओळींचा हा शिलालेख संस्कृतमिश्रित मराठी भाषेत आणि देवनागरी लिपीत आहे. या शिलालेखाच्या वर "यावच्चंद्र दिवाकरो" या अर्थाने सूर्य-चंद्राचे अंकन केलेले आहे.

मजकूर :

गीं सुष संतु। स्वस्ति ओं। पसीमस मुद्राधीपती। स्त्री कोंकणा चक्री वर्ती। स्त्री केसीदेवराय।महाप्रधा न भइर्जु सेणुई तसीमीनी काले

[52] अक्षी गावातील शिलालेखांचे वाचन हे डॉ. शं. गो. तुळपुळे या प्रसिद्ध पुरातत्वविदाने केले होते.

प्रव्रतमने। सकु संवतु: ९३४ प्रधा
वी सवसरे: अधीकू दीवे सुक्रे बौ
लु। भइर्जुवे तथा बोडणा तथा नऊ
कुवली अधोर्यु प्रधानु। महलषु
मीची वआण। लुनया कचली ज

अर्थ : पश्चिम समुद्राधिपती श्री कोकण चक्रवर्ती श्री केसीदेवराय याचा महाप्रधान भइर्जू सेणुई याने शक संवत ९३४, शुक्रवारी हा लेख इथे कोरला असा उल्लेख त्याने शिलालेखामध्ये केलेला आहे. या दिवशी देवीच्या बोडणासाठी त्याने नऊ कुवली धान्य नेमून दिले असून "जगी सुख नांदो" असा या शिलालेखाचा शेवट केलेला आहे. तसेच शिलालेखाच्या खाली "हे शासन कुणी भंग करील त्यास" शिल्पानुसार शापवाणी कोरलेली आहे.

या शिलालेखाचे एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यावर कोरलेली संपूर्ण तारीख— "शके ९३४, प्रधानी (परिधानी) संवत्सर, अधिक (ज्येष्ठ) मास, सुक्रे (अष्टमी) द्वितीय पक्ष"

म्हणजेच— "शुक्रवार, दिनांक १६ मे १०१२."

आजपासून जवळपास १०१४ वर्षांपूर्वी !

शिलाहार नृपती केशीदेवाच्या या गद्धेगळचे महत्व अनन्यसाधारण असून मराठी भाषेचे प्राचीनत्व हा लेख टिकवून आहे. त्यादृष्टीनेच 'मराठी भाषेत कोरलेला महाराष्ट्रातील पहिला शिलालेख' म्हणून याकडे पाहणे गरजेचे ठरते.

२. श्रवणबेळगोळ येथील मराठी शिलालेख


काही वर्षांपूर्वी मराठीतील आद्य लेखाचा मान हा 'श्रवणबेळगोळ' येथील शिलालेखास दिला जात होता. मात्र तो लेख इसवी सन १११७ मधील असल्याचे सिद्ध झाल्याने 'अक्षी' येथील शिलालेख हा 'मराठीतील आद्य लेख' म्हणून गणणे क्रमप्राप्त झाले आहे.

कर्नाटक राज्यातील श्रवणबेळगोळ (ता.चेन्नपट्टण, जि. हसन, कर्नाटक) येथे गोमटेश्वर भगवान बाहुबली यांचे इसवी सन १० व्या शतकातील ५७ फूट भव्य शिल्प आहे. त्यावर मोठ्या अक्षरात दोन ओळीतील शिलालेख कोरलेला दिसतो. या मूर्तीच्या अथवा शिल्पाच्या पायाजवळ हा लेख कोरलेला असून हा मराठीच्या प्राचीनत्वाची साक्ष देणाऱ्या महत्वाच्या शिलालेखांपैकी एक म्हणून गणला जातो.

मजकूर :

श्री चावुण्डराजें करवियलें
श्रीगंगराजे सुत्ताले करवियले

फोटो क्र. ४ : श्रवणबेळगोळ येथील शिलालेख



अर्थ : हा शिलालेख मराठी भाषा व देवनागरी लिपीत कोरलेला आहे. सदरील लेखाची पहिली ओळ ही श्री चावुण्ड अथवा चामुंडराजे यांनी करवियले असे म्हणते. या नंतरची दुसरी ओळ, त्यातील सुत्ताले हा शब्द कन्नड असला तरी उर्वरित वाक्य मराठीच आहे. यात प्रधान गंगराजे (गंग हे रठ्ठ होते) यांनी येथे तटबंदी केली (सुत्ताले) असे नोंदविले आहे.

हे आद्य शिलालेख म्हणजे मराठी भाषेच्या प्राचीनत्वाचे महत्त्वाचे असे पुरातत्वीय पुरावे आहेत. यासोबतच ताम्रपटांचा विचार करता दिवे आगर येथील ताम्रपट हा मराठीतील प्राचीन कोरीव लेख म्हणून महत्त्वाचा ठरतो.

निष्कर्ष

'शिलालेख' हा इतिहास अभ्यासातील एक महत्वाचा पुरावा मानला जातो. पुरातत्वाच्या अनुषंगाने पुराभिलेख आणि त्यांचा अभ्यास म्हणजे एक विश्वसनीय साधन, जे नेहमीच तत्कालीन इतिहास, संस्कृती, भाषा, लिपी अन् समाजातील विविध घटकांवर प्रभाव टाकते. मराठी भाषेच्या पूर्वपीठिकेचा अभ्यास करताना देखील मुख्यत्वे हेच साधन जास्त उपयुक्त व विश्वासार्ह ठरते. मराठी भाषेचा इतिहास हा जवळपास अडीज हजार वर्षांपर्यंत मागे जातो हे सिद्ध करून या समृद्ध परंपरेला 'अभिजात दर्जा' पर्यंत नेण्यात सुद्धा या अभिलेखांचा अत्यंत महत्त्वपूर्ण वाटा आहे हे लक्षात आल्यावाचून राहत नाही. म्हणूनचं इतिहासाच्या या महत्वाच्या पुराव्यांचे, माय मराठीचा अन् तिच्या प्राचीनत्वाचा गौरव वाढवणाऱ्या प्रत्येक ऐतिहासिक साधनाचे जतन व संवर्धन करणे, त्याच्या प्रचार व प्रसारासाठी काम करणे हे आपल्या प्रत्येकाचेच आद्य कर्तव्य म्हणावे लागेल !

संदर्भ

1. Bloch, Jules, *The Formation Of The Marathi Language*, 1914
2. Burgess J., Cousens Henry, *Revised Lists Of Antiquarian Remains in the Bombay presidency*, Vol.19, 1897
3. Mirashi V. V., *Corpus Inscriptionum Indicarum*, Vol.6, 1977, Pp. 167
4. Rice B. L., *Inscriptions at Sravana Belgola : a chief seat of the Jains,* 1889
5. *The Bombay Goverment Gazette,* 1957, Pp.253
6. तुळपुळे शं. गो., *प्राचीन भारतीय कोरीव लेख,* १९६३, पान क्र. १-९
7. गोखले शोभना, *पुराभिलेखविद्या*, १९७५, पृ. १८१-१९०
8. ढवळीकर म. के, *महाराष्ट्राची कुळकथा*, २०११
9. देव शां. भा., *महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची*, १९८४.

प्राथमिक स्तरावर – कविता लेखनातून स्व अभिव्यक्ती विकास

सौ.ऊर्मिला अनिल तेली
शाळेचे नाव : केंद्रीय प्राथमिक शाळा वेतवडे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर

सारांश :

प्राथमिक स्तरावर 6 ते 14 वयोगटातील मुलांचा वयोगट. या वयोगटातील विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील विविध साहित्य प्रकार समजपूर्वक वाचून स्वत:ची आवड व्यक्त करता येणे. ०६.०१.०९. या अध्ययन निष्पतीचे दृढीकरण होणे.या संदर्भात विदयार्थ्यांना आलेल्या समस्यांचा अभ्यास केला आहे.या पेपरमध्ये समस्या विश्लेषण, कारणे, परिणाम, उपाय योजना, यासाठी शिफारशी देण्यात आल्या आहेत.

प्रस्तावना :

प्रत्येक विद्यार्थामध्ये काही अंगभूत कला असतात, त्या शोधून त्यांचे संगोपन करून उत्तेजन दिले पाहिजे. विविध रुची, कला किंवा क्षमतांच्या रुपात प्रतिभाची अभिव्यक्ती होऊ शकते. शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांमध्ये प्रतिभा आणि आवड ओळखून त्यांना उत्तेजन देण्याच्या पद्धतीचा NEP 2020 मध्ये समावेश केला आहे.

अभ्यासक्रमात भाषा, साहित्य, संस्कृती आणि मुल्ये यांचा समावेश केला आहे.शिक्षणामुळे चारित्र्य घडले पाहिजे आणि ज्यायोगे शिकणारे नीतिवान, तर्कशुध्द,सहानुभूतीशील आणि सहृदयी बनतील. राष्ट्रीशैक्षणिक धोरण २०२० मध्ये विशेषत: प्रत्येक व्यक्तिच्या सृजनक्षमतेच्या विकासावर जास्त भर दिला आहे.

इयत्ता सहावी प्रथम भाषा (मराठी) पाठ्यपुस्तकात कु.सोनाली फुफरे या विद्यार्थिनींनी "झाड" या विषयावर लिहिलेले कविता आहे. या विद्यार्थिनीने लिहिलेली कविता वाचून, त्यावर विचार करून कवितेच्या ओळी पूर्ण करा हा उपक्रम स्वाध्याय मध्ये दिलेला आहे.

अभ्यासक्रमात भाषा, साहित्य, संस्कृती आणि मूल्ये यांचा समावेश केला आहे. शिक्षणामुळे चारित्र्य घडले पाहिजे आणि ज्यायोगे शिकणारे नीतीवान, तर्कशुद्ध, सहानुभूतीशील आणि सहृदयी बनतील. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये विशेषत: प्रत्येक व्यक्तीच्या सृजनशीलतेच्या विकासावर भर दिला आहे.


इ.६ वी व इ. ७ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांना हा उपक्रम पूर्ण करण्यास सांगितला; अकरा विद्यार्थ्यांनी या आशयाच्या ओळी पूर्ण करून दाखवील्या परंतु वर्गातील इतर विद्यार्थ्यांनी उपक्रम पूर्ण करून दाखवला नाही. वर्गातील इतर विद्यार्थ्यांना हा उपक्रम हा पूर्ण करता आला नाही त्या कारणांचा शोध घेतला. ती निरीक्षणे पुढील प्रमाणे:

1. तीन अक्षरी, चार अक्षरी यमक जुळणाऱ्या शब्दांचा संग्रह कमी होता.
2. कवितेचा आशय सांगता येत नव्हता.
3. कवितेला योग्य शीर्षक देता येत नव्हते.
4. आत्मविश्वासाचा अभाव होता.
5. यमक जुळणाऱ्या शब्दांचा वापर कविता लेखनात कुठे करावा हे माहित नव्हते.

करावयाच्या कृतींचा क्रम :

उपक्रमासाठी खालील कृतींची अंमलबजावणी प्रभावीपणे केली.

कृतींचा ओघ तक्ता



उपक्रम क्र.1) : तज्ञांचे मार्गदर्शन





श्री. चंद्रकांत निकाडे (बाल साहित्यिक तथा अध्यक्ष, बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर) डॉ. अंजली रसाळ (वरिष्ठ अधिव्याख्याता डाएट, कोल्हापूर)

१) विद्यार्थ्यांना कविता लेखनाविषयी मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. अंजली रसाळ (वरिष्ठ अधिव्याख्याता डाएट, कोल्हापूर) यांना बोलवण्यात आले. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्यासाठी लेखन करणे महत्त्वाचे माध्यम आहे. कविता ही सहजासहजी उत्स्फूर्त न होणारी कला आहे. मनामध्ये भाव विचार आले की वहीत नोंद करून ठेवणे. सुरुवातीला यमक न जुळणाऱ्या दोन/ चार होळीतील मुक्त छंद प्रकारातील रचना लिहावी. मग यमक जुळणाऱ्या चारोळ्या लिहाव्या,, लेखनातील टप्पे पार करत आठ ते दहा ओळींची कविता लिहावी,, एखादा विषय घेऊन त्यावर आपल्या भावना व्यक्त कराव्यात याविषयी सखोल ओघवत्या शैलीमध्ये मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी, भावात्मक विकास होण्यासाठी, सृजनशीलता विकास करावी. त्यांनी अगदी मोजक्या शब्दात कविता लेखन विषयी मार्गदर्शन केले.

२) श्री. चंद्रकांत निकाडे (बाल साहित्यिक तथा अध्यक्ष, बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर) यांनी विद्यार्थ्यांना कविता लेखनाबाबत मार्गदर्शन केले. घटना, विचार, परिस्थिती भावना या टप्प्यावर कविता लेखन केली जाते. यमक म्हणजे काय? यमक कविता रचनेत कुठे, केव्हा वापरायचे याबाबत माहिती दिली. सुरुवातीला विद्यार्थ्यांनी दोन ओळींची, चार ओळींची कविता लेखन करण्याचा सराव करावा. यमकाचे योग्य ठिकाणी मांडणी करू शकतो. रस्व, दीर्घ ,अक्षर, लघु, गुरु, क्रम यांची रचना प्रमाणबद्ध करावी, कविता अल्प अक्षरी असावी, कमी शब्दात जास्त असे सांगणारी असावी, विद्यार्थ्यांकडून त्यांची दोन-चार ओळींची कविता तयार करून घेऊन यावर मार्गदर्शन केले. कार्यशाळे दरम्यान त्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यास पुस्तक भेट दिले.

उपक्रम क्र.2) आवडणाऱ्या विषयावर कविता लेखन

विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्यासाठी दोन ओळींची /चार ओळींची कविता मुक्त छंद प्रकारात लिहून घेतली आवश्यक ते मार्गदर्शन केले, लेखन करताना अक्षरांचा लघु, गुरु ,क्रम कसा ठरवायचा ,ऱ्हस्व व दीर्घ अक्षरांचा योग्य वापर याचा सराव करून घेतला.





उपक्रम क्र.3) विषयावर कविता लेखन

मुक्तछंद प्रकारात आवडणाऱ्या विषयावर कविता लिहून सराव घेतल्यानंतर अधिक अधिक सरावासाठी एखादा विषय देऊन त्यावर कविता लेखन कसे करायचे त्याचे मार्गदर्शन केले सराव करून घेतला. मुक्त छंद प्रकार


म्हणजे काय कविता अल्प अक्षरी लेखन कसे करावे. यांचे स्वतः कविता लेखन करून विद्यार्थ्यांकडून सराव करून घेतला. उदा. आई, ,झाड, ,निसर्ग,, पाऊस, शिक्षक यासारखे विषय देऊन त्यांचा सराव घेतला.

उपक्रम क्र.4) काल्पनिक कविता लिहिणे

विषय देऊन कविता उत्तम प्रकारे रचना करू लागले त्यानंतर पुढील टप्पा काल्पनिक विषय देऊन कविता रचना करणे सुरुवातीला मी आशा कवितांची रचना कशी करावी सांगितले. अशा कवितांचे समज पूर्वक वाचन, कवितेतील मध्यवर्ती कल्पना, असे स्पष्टीकरण बाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांकडून सराव करून घेतला. विद्यार्थ्यांमध्ये गुणात्मक बदलाबरोबर भावनात्मक बदल व्हावा यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले, परी, बाहुली,
पंढरीचा पांडुरंग यासारख्या विषयावर विद्यार्थ्यांनी खूप छान आशय मांडणी केली.

उपक्रम क्र.5) काव्यगंध कविता संग्रहाचे प्रकाशन

काव्यगंध कविता संग्रह **काव्यगंध प्रकाशन सोहळा**





पद्धतशास्त्र :

संशोधन प्रकार

मिश्र पद्धतीचा अभ्यास – मात्रात्मक सर्वेक्षण + गुणात्मक केस-स्टडी

नमुना निवड

केंद्रीय प्राथमिक शाळा वेतवडे ता.पन्हाळा जि.कोल्हापूर या शाळेतील इ. 6 वी ते 7 वी चे एकूण 45 विद्यार्थी

माहिती संकलनाचे साधने

1. प्रश्नावली - वरील विषयास अनुसरून उपक्रम पूर्व व उपक्रम नंतर प्रश्नावली घेण्यात आली.
2. केस –स्टडी - विद्यार्थ्याच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी केस स्टडी घेण्यात आली.
3. माहिती संकलनाचे साधन आलेख – विध्यार्थ्याच्यामध्ये झालेला बदल तुलनात्मक आलेखाव्दारे दाखवण्यात आला.

संभावे निष्कर्ष

१) उपक्रमांतर्गत बालकविता पुस्तके, बालपुरवण्या असणे आवश्यक होते.

खाजगी वाचनालय वर्तमानपत्र स्टॉल मधून तसे शालेय ग्रंथालयामधून काही पुस्तके उपलब्ध करून विद्यार्थ्यांना वाचण्यास दिली अशा प्रकारे अडचणीवर मात केली.

२) मराठी शब्दकोश उपलब्ध नव्हता.

लेखन करताना शब्दांचे रचना व्याकरण दृष्ट्या सदोष असणे आवश्यक आहे. ऱ्हस्व व दीर्घ शब्दांचा योग्य ठिकाणी वापर लघु गुरु क्रम रचनेत कसा प्रमाणबद्ध करावा मराठी शब्दकोश उपलब्ध करून तसेच, मराठी व्याकरण पुस्तक विकत आणून देऊन ही समस्या दूर केली.

३) हस्तलिखित निर्मितीसाठी साहित्याचा अभाव

स्वरचित कवितांचे विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात हस्तलिखित तयार करण्यासाठी साहित्य उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांनी मित्राच्या वाढदिवसानिमित्त वर्गात स्केचपेन,, खोडरबर,, प्रोजेक्ट पेपर भेट देऊन साधनांची उपलब्धता केली. त्यामधून विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लागली.

४) शुद्धलेखन सरावाचा अभाव

कविता लेखन करताना शब्दांची मांडणी प्रमाणबद्धपणे कशी करावी याची माहिती मुलांना नव्हती. योग्य रचनेचा सतत सराव घेऊन लेखन कौशल्याचा विकास केला. ऱ्हस्व दीर्घ शब्दांची मांडणी सराव घेऊन मार्गदर्शन करून तज्ञांचे मार्गदर्शन कार्यशाळा घेऊन लेखन कौशल्य विकसित केले.

धोरणात्मक शिफारशी

1. प्रत्येक शाळेमध्ये विध्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी आठवड्यातून कमीत कमी दोन तास शालेय वेळा पत्रकामध्ये देण्यात यावे.
2. विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांचा व सृजनशीलतेचा विकास करण्यासाठी विद्यार्थाकडून हस्तलिखित साहित्य म्हणजेच कविता, कथा लिहून घेण्यात याव्यात.
3. विद्यार्थ्यांनी मनातील भावना व्यक्त करण्यासाठी विविध सृजनशील सहशालेय उपक्रमांचे शाळा पातळीवर नियोजन करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात यावे.
4. पालकांनी आपल्या पाल्याचा सृजनशील विकास होण्यासाठी जास्तीत जास्त साहित्य उपलब्ध करून दयावेत म्हणजे बालसाहित्य, वर्तमानपत्र, लहान मुलांसाठी असलेले मासिक यांची उपलब्धता द्यावी.
5. शाळा व पालक यांनी बालसाहित्य संमेलनमध्ये सहभागी होण्याची संधी द्यावी.

निष्कर्ष

विद्यार्थ्यांच्या झालेले सकारात्मक बदल :

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबत भावनिक विकास घडवून आला. विद्यार्थ्यांच्या झालेले बदल पुढील प्रमाणे :

१. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा व कल्पनाशक्तीचा विकास झाला.
2. मनातील भावना व्यक्त करण्यासाठी कविता लेखनाची संधी मिळाली.
3. कविता समज पूर्वक वाचून आपले मत तसेच कवितांचा असे आपल्या भाषेत सांगू लागले.
4. संगीत वाद्यांचा सहाय्याने कविता सादर करू लागले.
5. कविता लेखन करताना शब्दांचा लघु गुरु क्रमाचा विचार करून प्रमाणबद्ध कवितेची रचना करू लागले.

संदर्भ ग्रंथ सूची

मराठी

1. बोरचाटे, शिवाजी कृती संशोधन व नवोपक्रम. सुविचार प्रकाशन पुणे,2005
2. माने, जयश्री असे झाले रोप अच्चा बच्चा कम्युनिकेशन, मुंबई 2016
3. माशाळे, सिद्धाराम, उपक्रमशिलातेकडून कृतिसंशोधन अभिषेक प्रकाशन सोलापूर 2005
4. पहाडे, मालती माझे गाणे प्रयास एजन्सीस नागपूर 2016

मराठी विश्वकोश

https:// marathivishwakosh.org

https://mr.wikipedia.org

संकेत स्थळे :

1. https://youtu.be/uo-Dmu018fs
2. https://you.tu.be/AQKeGSGWqA
3. https://you.tu.be/BiBFVAZ7CWA
4. https://you.tu.be/-iqxH5hlpE

आदिवासी लोकगीतांमधून व्यक्त होणारे सांस्कृतिक जीवन

संशोधक
विकास नामदेवराव बागलावे
(मराठी विभाग)
के.टी .एच .एम .महाविद्यालय ,नाशिक

सारांश (Abstract)

भारतीय लोकसंस्कृतीच्या विशाल परंपरेमध्ये आदिवासी समाजाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. आदिवासी समाज हा निसर्गाशी एकरूप होऊन जगणारा, सामूहिक जीवनपद्धतीवर विश्वास ठेवणारा व मौखिक परंपरेद्वारे आपली सांस्कृतिक ओळख जपणारा समाज आहे. या समाजाच्या जीवनातील श्रद्धा, रूढी, परंपरा, सामाजिक नातेसंबंध, आर्थिक व्यवहार, श्रमसंस्कृती व धार्मिक विधी यांचे सर्वाधिक प्रतिबिंब लोकगीतांमध्ये उमटलेले दिसते.

प्रस्तुत संशोधन निबंधात महाराष्ट्रातील नाशिक व चंद्रपूर या दोन भौगोलिकदृष्ट्या भिन्न पण सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध जिल्ह्यांतील कोकणा, महादेव कोळी, ठाकर, गोंड, परधान व माना या प्रमुख आदिवासी जमातींच्या लोकगीतांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या लोकगीतांमधून व्यक्त होणाऱ्या सांस्कृतिक परंपरा, सामाजिक जाणिवा, स्त्री-पुरुष संबंध, कौटुंबिक मूल्ये, निसर्गपूजा व सामूहिक जीवनदृष्टी यांचे सखोल विश्लेषण करण्याचा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे. लोकगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून आदिवासी समाजाच्या सामूहिक चेतनेचे व सांस्कृतिक अस्तित्वाचे प्रभावी माध्यम असल्याचे या अभ्यासातून अधोरेखित होते.

शोधशब्द (keywords)

आदिवासी लोकगीते, आदिवासी संस्कृती, मौखिक परंपरा, सांस्कृतिक जीवन, निसर्गपूजा, श्रमसंस्कृती, सामूहिक जीवनदृष्टी, स्त्री-पुरुष संबंध, आदिवासी अस्मिता.

1. प्रस्तावना

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक बदल झपाट्याने घडून येत आहेत. या वेगवान परिवर्तनाच्या प्रक्रियेत मुख्य प्रवाहातील समाज झपाट्याने बदल स्वीकारत असताना आदिवासी समाज मात्र दीर्घकाळ आपली परंपरागत जीवनशैली जपत आला आहे. आदिवासी समाजाचे जीवन हे निसर्गकेंद्रित, सामूहिक व साधेपणावर आधारित आहे. त्यांच्या जीवनातील प्रत्येक टप्प्यावर लोककला, लोकविधी व लोकसाहित्य यांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे.

लोकगीत हे आदिवासी लोकसाहित्याचे सर्वात सजीव आणि प्रभावी रूप मानले जाते. या गीतांमध्ये आदिवासींच्या जीवनातील सुख-दुःख, आशा-आकांक्षा, श्रद्धा, भीती, प्रेम, संघर्ष व आनंद यांचे स्वाभाविक आणि प्रामाणिक प्रकटीकरण दिसते. नाशिक जिल्ह्यातील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेल्या कोकणा, महादेव कोळी व ठाकर जमाती तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील गोंड, परधान व माना जमाती यांचे जीवन लोकगीतांमधून अभ्यासणे म्हणजे त्यांच्या सांस्कृतिक व सामाजिक अस्तित्वाचा शोध घेणे होय.

2. संशोधनाची उद्दिष्टे

1. नाशिक व चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी लोकगीतांचा सांस्कृतिक अभ्यास करणे.
2. लोकगीतांमधून व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणिवांचा शोध घेणे.
3. विविध आदिवासी जमातींच्या जीवनपद्धतींचे तुलनात्मक विश्लेषण करणे.
4. आदिवासी लोकगीतांचे लोकसंस्कृतीतील स्थान स्पष्ट करणे.

3. संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व तुलनात्मक या पद्धतींचा अवलंब करण्यात आलेला आहे. यासाठी प्रकाशित ग्रंथ, संशोधन निबंध, आदिवासी समाजावरील मानववंशशास्त्रीय अभ्यास, तसेच संकलित लोकगीतांचा आधार घेण्यात आला आहे. लोकगीतांचा आशय, भाषिक वैशिष्ट्ये व सामाजिक संदर्भ यांच्या आधारे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

4. आदिवासी लोकगीतांची सांस्कृतिक पार्श्वभूमी

आदिवासी समाजाची संस्कृती ही निसर्ग, श्रद्धा व सामूहिक जीवनावर आधारित आहे. त्यांच्या लोकगीतांमध्ये धार्मिक श्रद्धा, देवदेवता, निसर्गपूजा, सण-उत्सव व विधी यांचे ठळक दर्शन घडते. लोकगीत हे आदिवासींच्या मौखिक परंपरेचे प्रमुख साधन असल्याने पिढ्यानपिढ्या सांस्कृतिक मूल्ये जतन करण्याचे व हस्तांतरित करण्याचे कार्य ती करीत आहेत.

4.1 आदिवासी जीवनपद्धतीचे प्रतिबिंब

नाशिक जिल्ह्यातील **कोकणा, महादेव कोळी, ठाकर** तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील **गोंड, परधान, माना** या जमातींच्या लोकगीतांत त्यांच्या दैनंदिन जीवनाचा सजीव आविष्कार व जिवंतपणा आढळतो. जंगलाधारित अर्थव्यवस्था, शेती-श्रम, पशुपालन, संकलन (कंदमुळे, फळे, मध, डिंक) इत्यादी जीवनपद्धती लोकगीतांतून व्यक्त होतात. काम करताना गायली जाणारी श्रमगीते ही केवळ मनोरंजन नसून सामूहिक श्रमसंस्कृतीची साक्ष देतात.

4.2 निसर्गपूजा व पर्यावरणीय संस्कृती

आदिवासी संस्कृतीचा केंद्रबिंदू निसर्ग आहे. नाशिकच्या डोंगरदऱ्या, पावसाळी वनश्री तसेच चंद्रपूरच्या घनदाट जंगलांचे प्रतिबिंब लोकगीतांत प्रकर्षाने दिसते.
देव, डोंगर, नदी, झाडे, प्राणी यांना पूज्य मानणारी **निसर्गप्रधान श्रद्धा** लोकगीतांतून प्रकट होते. गोंड-परधान गीतांत जंगलदेवता, वाघ, पावसाचे आवाहन तर कोकणा- **महादेव** कोळी गीतांत डोंगर, पाणी, पिके यांचे स्तवन आढळते.

4.3 धार्मिक श्रद्धा व लोकदैवते

आदिवासी लोकगीतांत **लोकदैवतांची उपासना** महत्त्वाची आहे. देव-देवता, भुतखेत, पूर्वजपूजा यांचा उल्लेख गीतांत येतो.

चंद्रपूरच्या गोंड लोकगीतांत मोठा देव **, पेरसापेन, पेन्गोडा, भूमका, वाघोबा , घोळादेव, ग्रामदेवता** यांचा प्रभाव दिसतो, तर नाशिक भागातील लोकगीतांत स्थानिक देव, वाघदेव, कडाकदेव यांची भक्ती व्यक्त होते. यामुळे आदिवासी धर्मपरंपरेची सांस्कृतिक पार्श्वभूमी स्पष्ट होते.

4.4 सामाजिक रचना व सामूहिकता

आदिवासी समाजाची रचना सामूहिकतेवर आधारलेली आहे. विवाह, जन्म, मृत्यू, सण-उत्सव या प्रसंगी गायली जाणारी लोकगीते समाजातील नातेसंबंध, कुटुंबव्यवस्था व सामाजिक मूल्ये उलगडून दाखवतात. नाशिकच्या आदिवासी विवाहगीतांत स्त्री-पुरुष समता व सहजीवनाची भावना, तर चंद्रपूरच्या लोकगीतांत कुळ, टोळी, वंशपरंपरा यांचा अभिमान दिसून येतो.

4.5 सण-उत्सव व सांस्कृतिक परंपरा

आदिवासी लोकगीतांचा मोठा भाग **सण-उत्सवांशी** जोडलेला आहे. आखाडी, जांभूळवस, नागदिवाळी इ. **सण-उत्सव.** पावसाळ्याचे स्वागत, कापणी, नृत्य-उत्सव (जसे गोंडांचा 'धुरवा' नृत्य) हे लोकगीतांच्या माध्यमातून साजरे होतात. नाशिक जिल्ह्यातील पिक कापणी व पावसाळी गीतांत कृषिसंस्कृती तर चंद्रपूरच्या गीतांत नृत्य-वाद्यांसह उत्सवी वातावरण दिसते.

4.6 स्त्रीजीवन व भावविश्व

आदिवासी लोकगीतांत स्त्रीजीवनाचे भावनिक, सामाजिक चित्रण मोठ्या प्रमाणावर आढळते. श्रम, प्रेम, विरह, मातृत्व, संसार यांचे सूक्ष्म भाव गीतांतून व्यक्त होतात. नाशिकच्या कोकणा गीतांत स्त्रीचे कष्टमय जीवन तर चंद्रपूरच्या माना-परधान गीतांत तिची भावनिक अभिव्यक्ती प्रकर्षाने दिसते. यामुळे स्त्रीकेंद्री सांस्कृतिक जाणिवा समोर येतात.

4.7 मौखिक परंपरा व सांस्कृतिक सातत्य

आदिवासी लोकगीत ही **मौखिक परंपरेची फलश्रुती** आहे. पिढ्यान्पिढ्या स्मरणातून, गाण्यातून संस्कृती जतन केली जाते. लिखित परंपरेपेक्षा मौखिक वारसा अधिक प्रभावी असल्याने लोकगीत हेच त्यांच्या इतिहास-संस्कृतीचे दस्तऐवज ठरतात.

नाशिक व चंद्रपूर दोन्ही जिल्ह्यांत ही मौखिक परंपरा आजही जिवंत आहे.

4.8 बदलते वास्तव व परंपरेची जपणूक

आधुनिकता, शिक्षण, स्थलांतर यांचा प्रभाव आदिवासी जीवनावर पडत असला तरी लोकगीतांतून परंपरेचे जतन केले जाते. जुन्या श्रद्धा, मूल्ये आणि नव्या अनुभवांचे मिश्रण या लोकगीतांत दिसते. त्यामुळे सांस्कृतिक संक्रमणाची पार्श्वभूमी स्पष्ट होते.

5. आदिवासी लोकगीतांमधून व्यक्त होणारे सांस्कृतिक जीवन

5.1 कोकणा जमातीचे सांस्कृतिक जीवन

कोकणा जमात ही नाशिक जिल्ह्यातील एक प्रमुख आदिवासी जमात असून तिचे जीवन डोंगर-दऱ्या, जंगल व निसर्गावर आधारित आहे. कोकणा लोकगीतांमध्ये स्त्री-जीवनाचे प्रतिबिंब मोठ्या प्रमाणात आढळते. यावर आधारित असलेले नमुनेदार कोकणा लोकगीत पुढीलप्रमाणे,

" पती राजाचं सुख बसून सांग तू मांडवात |
अनं काठी पातळाची साई केलेय माळात |
पती राजाचं सुख बसून सांग तू बायात |
अनं मांजर कोपरी साई केलेय शेतात |
कपाळाला कुंकु अनं केला शिणगार |
अंगात चोळी, डोई फडकी पदर |
देवा नारायणा राजा होईल कापूस |
अनं देवाचीच पोरा ताहा खातील हापूस |"

पतीवर जिवापाड प्रेम करीत असलेली व 'मुलं हे देवाचं देणं आहे' असे मानणारी ही श्रद्धाळू देवभोळी स्त्री आहे. पतीप्रेम, सासर-माहेर, कौटुंबिक जबाबदाऱ्या व धार्मिक श्रद्धा या विषयांचे प्रभावी चित्रण वरील गीतांतून दिसते. कोकणा स्त्री आपल्या पतीसाठी दीर्घायुष्य मागताना देवाशी संवाद साधते, ही श्रद्धा लोकगीतांमधून व्यक्त होते. या गीतांमधून कोकणा समाजातील धार्मिकता, भोळेपणा व निसर्गाशी असलेले नाते स्पष्ट होते.

5.2 महादेव कोळी जमातीचे सांस्कृतिक जीवन

महादेव कोळी समाज हा सह्याद्रीच्या डोंगराळ भागात वसलेला आहे. त्यांच्या लोकगीतांमध्ये श्रमसंस्कृतीचे दर्शन ठळकपणे आढळते. जात्यावरच्या ओव्या, दळण-दळताना म्हटली जाणारी गीते, शेतकामाशी निगडित गीतांमधून स्त्री-पुरुषांच्या श्रमांचे महत्त्व अधोरेखित होते.विशेष म्हणजे जात्याच्या पाडीवर बसून दळण दळण्याची प्रथा हे प्रचलित

सामाजिक जीवनशैलीचे दर्शन घडविते. या लोकगीतात आध्यात्मिक गीताचे पडसाद व ओव्यांचे भावपूर्ण वर्णन येते. श्रम हलके व्हावे म्हणून भल्या पहाटे दळण दळणारी महादेव कोळी स्त्री किती भावपूर्ण गीत म्हणते पहा –

" चार पायल्या गहू देल्हे, एकटी किती निसु ग
पहाटीच फटाकलं सराल इराण ,देवा तुझी करणी कशी भरली परात..."

आशा रितीने त्या परमेश्वराचे नाव मुखात घेउन दळण दळणारी स्त्री गीत गात असते.तिचे दळण केव्हा संपते तेही कळत नाही.गीतातील माधुर्य तिच्या अंत:करणाला व ऐकणाऱ्यांच्या मनाला सुखाहून जाते.

महादेव कोळी लोकगीतांमध्ये धार्मिक श्रद्धा, देवभोळेपणा व साधेपणा यांचे सुंदर मिश्रण दिसते. गीतांमधील माधुर्य व साधी बोलीभाषा या समाजाच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे प्रतिक आहे.

5.3 ठाकर जमातीचे सांस्कृतिक जीवन

ठाकर जमात ही निसर्गाशी अत्यंत जवळीक असलेली जमात आहे. त्यांच्या लोकगीतांमध्ये निसर्गपूजा, जंगल, पशु-पक्षी, झाडे यांचे मानवीकरण आढळते. ठाकर समाजातील सण-उत्सव, नृत्य, बोहाडा यांसारख्या लोककलेचे प्रतिबिंब त्यांच्या गीतांतून उमटते. **"पड रे** पान्या" **हे एक अशाच प्रकारचे गीत आहे. ते असे** -

"पड रे पान्या ,पड रे पान्या
धरतारी सुकली रे
धरतारी सुकली रे, कणसरी कोपली रे
कुणब्याचे पोरांनी हाय मोकली रे
ठाकराचे पोरांनी दादा हिंमत धरली रे
आसी हिंमत धरली रे
पाऊसदेव बळवला रे
पाऊस देव बळवला तरी कणसरी वाळली रे"

पाऊस येण्यापूर्वी शेतकरी शेतजमिनीची मशागत करून ठेवतो व पावसाची वाट पाहतो . पण ऐन पेरणीच्या काळातच तसेच पावसाने ताण दिल्याने जमीन सुकून जाते. धान्याची रोपे कोमेजून जातात . त्यावेळी कुणब्याची पोरं धाय मोकलून रडू लागतात. पण ठाकूर (ठाकर) आदिवासींनी हिंमत धरून परमेश्वरावर विश्वास ठेवून पाऊसदेवाचे गाणे गाऊन पाऊस पडावा. अशी विनंती करतात. योगायोगाने पाऊस सुरु होतो . वाळलेली पीक टवटवीत होतात आणि कुणब्याला मोठा आधार मिळतो. याचे चित्रण या लोकगीतातून येते.

अर्थात,ठाकर लोकगीतांमधून समाजातील प्रामाणिकपणा, स्वाभिमान व सामूहिक आनंद यांचे दर्शन घडते.

5.4 गोंड जमातीचे सांस्कृतिक जीवन

गोंड जमात ही विदर्भातील सर्वात मोठी आदिवासी जमात आहे. गोंड लोकगीतांमध्ये ऐतिहासिक स्मृती, धार्मिक श्रद्धा, देवपूजा व सामाजिक संरचना यांचे प्रतिबिंब आढळते. गोंडी बोलीतील गीतांमधून त्यांच्या सांस्कृतिक अस्मितेची जाणीव होते. **ते असे**

आपल्या गोत्रांची पूजा करताना - गोंडी संस्कृतीचा आद्य पुरुष 'लिंगा'. या आद्य पुरुषांची पूजा केली जाते. साधारणतः सगळीकडे "पहाडी,कोप्पा लिंगो" हे गीत प्रचलित असल्याचे दिसते .

"भटा वेलय लिंगा रो चोहोय नि तुंगारो ||
कोयाते खोमनी मीमेरा भोव्यानी, भोयारा
तोडी ते तोडी रो सातापे बारो रे? तोडी रो

हाभार वडाना, दहान वाडा रो ||1||
नालुंगे झेडांगे , मालुंगे गुंडागे किती नालुंगे
हाभाडून वाता मेंदूडे, चकोट बा वारा रो ||2||"

डोंगरदऱ्यात हिंडणाऱ्या हे लिंगा, तू आमच्याकडून तुझा जय जयकार स्वीकार कर, गोंडी संस्कृतीचा तूच उद्गाता आहेस, निर्मिक आहे. आमच्या समाजजीवनाची माती रखरखीत व ओसाड झाली आहे. आभाळ सांडावा तसा ह्यावर तुझ्या कृपेचा वर्षाव कर. आमच्याकडून तुझा जय जयकार स्वीकार कर, तूच आमच्या देवाचे चार गोत्र, समूह निर्माण केले आहेस, चार झेंड्यांची प्रतिके सुद्धा तूच आहे, तेव्हा तू विजेच्या रूपात गायन कर आणि आमच्या जय जयकार स्वीकार कर.

याशिवाय, गोंड समाजातील निसर्गपूजा, शिवभक्ती (मोठा देव) व सामूहिक सण-उत्सव लोकगीतांमधून स्पष्ट दिसतात.

5.5 परधान जमातीचे सांस्कृतिक जीवन

परधान जमात ही गोंड समाजाची धार्मिक व सांस्कृतिक वाहक मानली जाते. परधान लोकगीतांमध्ये पौराणिक कथा, देवदेवता, विवाहविधी व सण-उत्सव यांचे वर्णन आढळते. यात 'डेरी सोडणे' हा लग्नाच्या शेवटच्या दिवसाचा खास कार्यक्रम असतो. या दिवशी मांडवावरून वधू-वराच्या अंगावर पाणी टाकले जाते. खाली पाणी पडून चिखल होतो. त्यात सगेसोयरे एकमेकांना लोळवतात. इथे अश्लीलता वा द्वेष यास मुळीच थारा नसतो. युवक-युवती सुद्धा सांस्कृतिक पथ्य पाळून यात सहर्ष सहभागी होतात. यात एकमेकांना हळद चारणे, गुलाल लावणे इत्यादी प्रकार चालतात. या कार्यक्रमाला ' चिखेलरोंडी ' असे देखील नाव आहे. ढोल वाजत असतो, नाचगाणे सुरूच असते. अशा वेळी ' झुलते ' सुद्धा म्हटले जातात...

"1 थालीत थाली दाद पितळेची झाली
कोण्या रस्त्याने गेली माझी साली गा दादा
अन् कालपासून भेट नाही झाली
2 भरतीका गाडा लगाऊ टेकुनी
तेरी चढती जवानी नजर हेकनी
3 अंगामंदी व तंग चोळी शिव चिटाचे ढगे
तुझ्या गालावर आहेत दोन फुगे साली माझे
.

परधानांचे 'झुलते' म्हणजे मराठीतील शेरो-शाहिरीचा उत्कृष्ट नमुनाच. खरे तर, परधान समाजातील गीतपरंपरा ही त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचा केंद्रबिंदू आहे.

5.6 माना जमातीचे सांस्कृतिक जीवन

माना जमातीचे लोकगीत त्यांच्या ऐतिहासिक परंपरा, नागवंशीय श्रद्धा व जीवनशैलीचे दर्शन घडवतात. त्यांच्या गीतांमधून जंगलजीवन, शिकार, अन्नसंस्कृती व धार्मिक विधी यांचे चित्रण दिसते.

असाच एक माना जमातीतील लग्न विधीतील हळदीचा प्रसंग

"वल्या मांडवात हळदी कुंकवाचा सळा
पित्याने तिच्या सयवर मांडला
वल्या मंडपात बंधू बसले गणपती

हाती हळदीची वाटी, तुझ्या बयणाबाईच्या
बापू माझ्या नवरदेवा, दुपारी सार हो जो
मंडपा मदी पिता आडवा झाला ,दे माझ्या
कामाचा खर्च ...."

आंबेहळद किंवा डोकरी हळद बारीक करून त्यात दात रंगी झाडाचा पाला टाकून लाल रंग तयार करीत. या रंगाचा वापर कुंकू म्हणून करीत. लग्न लावल्यानंतर रंगार याकडून विशिष्ट प्रकारचा लुगडा तयार केला जात असे त्यालाच 'खेंडा' म्हणतात. 'खेंडा' नवरी नेसल्यावर नवरदेव तिला कडेवर घेऊन पाच वेळा फेऱ्या मारायचा आणि नंतर नवरदेव-नवरी एकमेकांना गुलाल लावायचे, तसेच त्यांच्यासोबत तीन चार जोडपे फिरत व एकमेकांशी थट्टा-मस्करी करत त्यालाच 'धेंडा' लावणे म्हणत. दुसऱ्या दिवशी घोडा शोधणे किंवा घोडा नाच या दोन्ही दंडोकात नवरी नवरदेव परस्पर खेळत. प्रामुख्याने घोडानाच विहिरी जवळ असलेल्या चिखलात खेळायचे व त्यानंतर मांडवात आंघोळ करीत त्यालाच 'नाहनोरा' असे म्हणत .अशा प्रकारचा लग्नविधीच्यावेळी हळदीचा कार्यक्रम होत असे.

6. आदिवासी लोकगीतांचे सांस्कृतिक महत्त्व

कोकणा ,महादेव कोळी व ठाकर जमातींच्या लोकगीतातून डोंगर ,नदी शेतीप्रधान जीवनशैली व्यक्त होते; तर गोंड, परधान व माना लोकगीतात जंगल, शिकार , देवपरंपरा व वंशकथा केंद्रस्थानी असतात. या गीतांमुळे प्रत्येक जमातीचे स्वतंत्र सांस्कृतिक ओळख टिकून राहते आणि आदिवासी समाजाची सामूहिक अस्मिता दृढ होते. आदिवासी संस्कृती निसर्गाशी संघर्ष न करता सहजीवनवर आधारलेली आहे हे स्पष्ट होते. लोकगीतांच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धा, विधी व पारंपारिक पूजापद्धतीचे सांस्कृतिक जतन होते.

लग्नगीते, सासरी जाण्याची वेदना, मातृत्व, कष्टकरी स्त्रीचे जीवन या लोकगीतातून व्यक्त होते. यामुळे आदिवासी कुटुंब संस्थेतील स्त्रीचे स्थान, भावना व सामाजिक भूमिका सांस्कृतिक पातळीवर जतन होतात. लोकगीतातून सामूहिक आनंद व उत्सह निर्माण होतात. त्याचबरोबर सण-उत्सव हे केवळ धार्मिक न राहता राष्ट्रीय पातळीवर सांस्कृतिक एकात्मतेचे माध्यम ठरतात. लोकगीते सांस्कृतिक इतिहासाचे जिवंत साधने ठरतात. लोकगीतामधून प्रामाणिकपणा, निसर्गप्रेम, सहकार्य, कुटुंबनिष्ठा अशी मूल्य अप्रत्यक्षपणे पुढील पिढीपर्यंत पोहोचतात. त्यामुळे आदिवासी लोकगीते ही नैतिक शिक्षणाचे प्रभावी सांस्कृतिक साधने ठरतात. आदिवासी जमातींच्या लोकगीतांची परंपरा मौखिक असल्यामुळे ती स्मरणशक्ती, सामूहिक गायन व सांस्कृतिक सातत्य टिकवून ठेवते. शिवाय,ही मौखिकता आदिवासी संस्कृतीचे जिवंतपण अधोरेखित करते. लोकगीतांच्या माध्यमातून भाषा, बोली, चालीरीती, श्रद्धा व परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात. त्यामुळे आधुनिकतेच्या प्रभावाखाली देखील आदिवासी संस्कृतीचे सातत्य टिकून राहते

अर्थात,आदिवासी लोकगीत हे समाजाच्या सामूहिक स्मृतीचे भांडार आहे. ही गीते आदिवासी संस्कृतीचे जतन व संवर्धन तर करतेच पण. आधुनिकतेच्या प्रभावाखालीही या लोकगीतपरंपरेने आदिवासी सांस्कृतिक अस्तित्व टिकवून ठेवले आहे हे विशेष.

निष्कर्ष

नाशिक व चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी लोकगीतांमधून त्या त्या समाजाचे सांस्कृतिक व सामाजिक जीवन अत्यंत सजीवपणे व्यक्त होते. लोकगीत हे आदिवासी समाजाच्या अस्मितेचे, निसर्गाशी असलेल्या नात्याचे व सामूहिक चेतनेचे प्रतिक आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत या लोकगीतांचा अभ्यास व जतन करणे ही काळाची गरज आहे.

संदर्भ ग्रंथसूची

1. गारे, गोविंद – *महाराष्ट्रातील आदिवासी जमाती*
2. डॉ. देवगावकर, एस. जी. – *दि माडिया ऑफ भामरागड*
3. Dr. Gajbe Rameshkumar – MANA "Scheduled Tribe"
4. वाकडे भास्कर - आदिवासी नागवंशीय माना जमातीचा प्राचीन इतिहास
5. डॉ तुमराम विनायक - आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा
6. गवारी गोपाळ राम - महादेवकोळी समाजातील लोकसाहित्याचा वाङ्मयीन दृष्टिकोनातून अभ्यास
7. डॉ देशमुख मोतीराम - कोकणा आदिवासींचे लोकसाहित्य
8. डॉ. आढळ मारुती कोंडू - महाराष्ट्रातील आदिवासी ठाकर जमातीचे लोकसाहित्य
9. डॉ. मुनघाटे प्रमोद - आदिवासी मराठी साहित्य :स्वरूप आणि समस्या

'शब्द' या लघुअनियतकालिकांतील कविता

श्रीमती कमल दिनेश येऊल

❖ **प्रास्ताविक :-**

मराठी साहित्यात कथा, कादंबरी, कविता, आत्मचरित्र, चरित्र, निबंध इत्यादी अनेक प्रकारचा अभ्यास केला जातो. त्यातील कविता हा साहित्यप्रकार खूप महत्त्वाचा साहित्यप्रकार मानला जातो. प्राचीन काळापासून कविता या साहित्यप्रकाराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. इ.स. १९६० ते १०७० हे दशक लघुअनियतकालिक चळवळीचे मानले जाते. त्यानंतरही तुरळक प्रमाणात का होईना लघुअनियतकालिक निघाले. लघुअनियतकालिकांत लिहिणाऱ्या विविध कवींनी कविता लेखन या साहित्यप्रकाराला सर्वात जास्त महत्त्व दिले आहे. या दशकात अशोक शहाणे, भालचंद्र नेमाडे, वसंत गुर्जर, चंद्रकांत खोत, राजा ढाले, सतीश काळसेकर, मनोहर ओक, चंद्रकांत पाटील, नामदेव ढसाळ इत्यादी अनेक कवींनी लघुअनियतकालिक काढले. आपले विचार कवितेच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले आहे. शब्द, अथर्व, असो, वाचा, अबकडइ, फक्त, टिंब, पृथक, निव्वळ, त्रिशंकू, कावळा, चक्रवर्ती, स.न.वि.वि., विद्रोह इत्यादी अनेक लघुअनियतकालिक या दशकात निघाले. त्यातील 'शब्द' हे रमेश समर्थ यांचे लघुअनियतकालिक आहे. 'शब्द' या लघुअनियतकालिकमधील कवितांचा अभ्यास आपण येथे करणार आहोत.

❖ **'शब्द' या लघुअनियतकालिकांतील कविता :-**

संपादक रमेश समर्थ यांच्या 'शब्द' या लघुअनियतकालिकात अनुवादित कविता, बालगीते, विद्रोही कविता, आधुनिक वास्तववादी, अस्तित्ववादी तसेच अतिसंवेदनशील कविता इत्यादी प्रकारच्या कविता यात आलेले आहेत. यात दिलीप चित्रे, अशोक शहाणे, अरुण कोलटकर, भालचंद्र नेमाडे, डी. एम. महंत, सुधीर कोलटकर इत्यादी कवींनी कविता लेखन केलेले आहे.

१) अनुवादात्मक कविता :-

राईनर रिल्के मारिया यांच्या जर्मन भाषेतील कवितेचा दिलीप चित्रे यांनी मराठीत अनुवाद केला आहे.

"आरसे अजून कुणीच स्थितप्रज्ञपणे
काढला नाही त्यांचा फरारी निष्कर्ष
त्यांची काळातील विवरे आहेत भरलेली
चाळणीप्रमाणे छिद्राछिद्रांनी
नृत्यगृहाचे रिकामे ऐश्वर्य उधळून देत
जेव्हा संधिप्रकाश गढतो गाढ अरण्याहून
आणि झळाळीचे काळवीट हुंदडतात
त्यांच्या अक्षत एकांतातून.
कधी जातात ते चित्रांनीच भरून
काही त्यांच्या अगदी जिव्हारी बसतात.
इतरांना देतात ते निरोप संकोचून
तिथे ती लावण्यवती मात्र राहील सदैव
जोवर तिच्या मिटलेल्या ओठांतून
सुरेल अनिरुद्ध नार्सिसस मुक्त."

ही कविता प्रतीकात्मक, चिंतनशील तसेच आधुनिक कविता आहे. ही कविता मुक्तछंदात्मक आहे. भाषा अत्यंत प्रतीकात्मक आहे. यात आरसे, नृत्यगृह, काळवीट अशा प्रतिमांचा वापर केला आहे. ही कविता स्वतःच्या अंतरंगात डोकावण्याचं, एकांतात रमण्याचं आणि अनुभवातून आत्ममुक्तीचा शोध घेण्याचे आमंत्रण देत आहे. ही कविता एकांत, आत्मानुभूती व अंतर्मुखतेचा गुढ स्वरूपाचा प्रवास आहे.

अशोक शहाणे यांनी जीवनानंद दास यांच्या कवितेचा मराठी अनुवाद केला आहे.

"नाही मेलो आजही आम्ही
निपजतात तरी निव्वळ दृश्य
चघळतात काड्या घोडे कार्तिकी
चांदण्यांच्या शेतात,
घोडे पाँलिओलिथिक चरतात
अजुनी गवताच्या लोभानं
जगाच्या ह्या किमाकार डायनँमोवर
पिटाळतो एक गर्द वारा तबेल्याचा वासरात्री
खटकतो कडबा करून पोलादी यंत्रात
चहाचे कपही मांजराच्या पिल्लागत
पिसाळलेल्या झोपेत कुत्र्याच्या तावडीत
चुळबुळले बर्फ होऊन पलीकडच्या पैसा हॉटेलात."

ही कविता अस्तित्ववादी, वास्तव आणि आधुनिक कविता आहे. चित्रप्रधान भाषेचा वापर केला आहे. जसे की कविता स्मृती, इतिहास, आधुनिकता व स्वप्न यांचे मिश्रण होय. कविता माणसाच्या आधुनिक, यांत्रिक तसेच अर्थहीन अशा अस्तित्वावर भाष्य करताना दिसून येते. जणूकाही प्राचीन काळांमधील घोड्यासारखे जे जगतात पण पुढे पुढे सरकत नसून सर्वकाही यंत्रवत थकलेलं निर्विकार झालं असल्याचे येथे कवी सांगत आहेत.

२) बालगीत

विंदा करंदीकर यांनी लिहिलेली ही कविता बालगीत या प्रकारातील मोडते.
त्यांची 'विंचू' ही कविता पाहू ...

"पाठीवरती घेऊन बि-हाड
विंचू म्हणतो गाठीन व-हाड
मुंबईमध्ये घेईन तागडी
पुण्यामध्ये घेईन पगडी
नागपूर मध्ये घालीन दुकान
दिल्लीत बांधीन बंगला छान
आधी करा विचार पुरा
मगच चिमटीत नांगी धरा"

ही कविता बालकविता, प्राणीविषयक, कल्पक, गमतीशीर, मनोरंजनात्मक तसेच बोधात्मक दृष्टीने लिहिलेली आहे. यामधील भाषा सर्वांना कळेल अशी सहज, सोपी आहे. या कवितेमध्ये विंचू हा छोट्या स्वरूपाचा प्राणी. आपल्या पाठीवर घर घेऊन फिरतो. वेगवेगळ्या ठिकाणी संसार मांडण्याचा स्वप्न बघत आहे. पण शेवटी हा विंचूच आहे. म्हणून कवी म्हणतात, आधी विचार करा आणि नंतरच हात लावा. ही कविता मनोरंजनातून सावधानतेचाही संदेश देत आहे. हा या कवितेतून मिळणारा बोध आहे.

३) अतिसंवेदनशील कविता :-

बाबा दीक्षित यांनी स्वतःच्या अनुभवावर आधारित व्यक्तीनिष्ठ, अतिसंवेदनशील अश्या स्वरूपाच्या कवितेचे लेखन केले आहे.

"अचानक एक जाणीव हिसका
आणि भडकतो प्रवास
पुन्हा निराभास उघड मिट
प्रतिभासांचे हांसभास
रोरावणारा अजस्त्र टाहो
माझी जाणीव मोकळा करते
फिरवते संज्ञेची बोटं त्या
विशालकाय ध्वनीसंभारांतून

सर्वांगांनी उसळून उठणारा
सफेनसागर टिचभर जमिनीवर
मी निराश्रीत डागतो तोफ आरोळीची"

ही कविता अतिसंवेदनशील व अंतर्मुख करणारी आधुनिक कविता आहे. उच्चप्रतीची भाषा जाणवते. भावनाप्रधान शब्दप्रयोगाचा वापर करते. उदाहरणार्थ रोरावणारा टाहो, तोफ, आरोळी इत्यादी. ही कविता तीव्र अशा भावनिक जाणिवेचा झटका आहे. त्या झटक्याने कवीचे मन प्रचंड अशा संवेदनेने भरून जातं. शेवटी त्यामधून एक प्रबळ अशी भावनिक उद्गाराची तोफ, आरोळी व्यक्त होते. मनाच्या सर्जनशील प्रवृत्तीची कविता आहे.

४) अस्तित्ववादी :-

सुधीर कोलटकर यांनी कवितेतून स्वतःच्या अस्तित्वाच्या शून्यतेवर भाष्य केलेले आहे.

"केव्हाच नाही उन्हाळ्यात
वा हिवाळ्यात
माझे विरजण लागले
साकळले असेल
रक्त कित्येकदा पण
नाही आठवत
विरजण विरजलेले
आरसा पण दिसेना
जेव्हा कुसळ बघायला गेलो
डोळे फाडून"

सुधीर कोलटकर यांची कविता अगदी साधी, सरळ आहे. पण खोल अर्थांनी भरलेली भाषा या कवितेत वापरली आहे. या कवितेत कवी स्वतःशीच बोलतो. स्वतःचा शोध कवी घेतांना दिसतो. मुक्तछंदात्मक शैलीचा वापर केला आहे. एक भावनिक पोकळीच्या स्थितीवर ही कविता भाष्य करत आहे. ही कविता शांत मात्र खोलवर अस्वस्थ करून जाते.

५) विद्रोही कविता :-

कवी अशोक शहाणे यांच्या 'एका गांडूचे गाऱ्हाणे' ही एक विद्रोहात्मक कविता आहे.

"सात पावलांच्या दोन मुंग्या खूपसतात
भरीव हवेची भसाड सोंड
माझ्या हवेदार दंडात
नि:लक्ष पाकळ्या उमलतात सुकलेल्या
कुंपणावरली बाहुली खदखदते कृपण
माझ्या काळ्याशार कानाशिलात
जिथं अरक्षित अख्ख्या जख्खड जगातलं ज्ञान
नि एक दोर पिळला जातो तुटेल तुडुंब
आकाशातल्या लख्ख चांदोबाला नाही सापडत
विप्रलब्ध साप त्याचा मणी त्याची कात
नि चिंचेचा आकडा घालतो चार शून्य
माझ्या सदऱ्याच्या शिरावर"

या कवितेत लैंगिक शोषण, वेदना तसेच अस्तित्वाची पोकळी इत्यादी विषय या कवितेतून व्यक्त होताना दिसतात. या कवितेत गांडू म्हणून हिणवल्या गेलेल्या व्यक्तीचं जीवन हे दुःख, एकाकीपणा आणि सामाजिक दुर्लक्ष यांच्या गर्दीत अडकलेलं आहे.

६) निसर्गप्रधान कविता :-

डी.एम.महंत या कवीच्या कवितेचा विषय हा निसर्ग, स्मृती, आत्मभान व्यक्त करणारा असा आत्मसनवादी प्रतीकात्मक आहे.

"सुस्त, केसाळ डोंगर

नरखीत क्षितिजाचा साजशृंगार
त्याच्या पायाशी पारदर्शी
तहानलेल्या तळ्याचा
तळहाता एवढा तुकडा
त्याच्याच जवळून नागमोडी पळणारी
पोरसवदा पायवाट
माझ्या पावलाशी दडलेली"

ही कविता मुक्तछंदात्मक असून निसर्गप्रधान भाषेचा वापर केला आहे. ही कविता निसर्गाच्या सौंदर्यातून व्यक्तीच्या अंतरंगातल्या आठवणी, जीवनपट, आत्मनिरीक्षणाचं सौंदर्यशास्त्र उलघडतांना दिसतं. जसे की डोंगर, आकाश, तळं, पायवाट हे सर्व व्यक्तीच्या मनातलं निसर्गदत्त आत्माभान आहे.

भालचंद्र नेमाडे यांची 'माझे डोळे सोड' ही कविता पुढीलप्रमाणे...

"झाड खुणेचे हरवून बसलो पहात
फांद्या धुंदीत फिरलो रान कोठे
दिसनाच मधाचे पोळे होती
धुळपावलेच होते सावल्यांचा फेर पाहणेच
झाड हरवले आणि हत्ती झुलला तुझ्यापुढे
अंबारीवर डसले मोहळ
गुणगुण गेली हत्ती मागोमाग
हत्ती वळून वळून चालत गेला वाट
चुकला पाऊल पाऊल सनईचा ठेका
सर्व्या रानात चुकले सूर गेली अंबारी
गेली वाजत वाजत रानाआड पानआड
डोळ्याआड डोळ्यातल्या पाण्याआड
चुकली बोटे ओळख आता
माझे डोळे सोड"

या कवितेत आठवणीचा ताणतणाव तसेच प्रेमसंबंधातून पडलेलं अंतर व्यक्त होतांना दिसते. ही एक आधुनिक व प्रतीकात्मक कविता आहे. कवितेचा विषय हरवलेली ओळख, परिचय असा आहे. यात गहिरी भावनात्मक अशी भाषा वापरली आहे. मुक्तछंदात्मक शैलीचा वापर केला आहे. या कवितेत आपल्या जीवनातील आधार, नातीगोती तसेच ओळख हरवली तर गोंधळ होतो. आठवणीत अडकून राहतं पण शेवटी या सर्व त्रासातून सुटका हवी वाटते. म्हणून कवी विनवणी करतो. माझे डोळे सोड म्हणजे मला या आठवणीच्या वेदनेतून त्रासातून दूर कर. हाच या कवितेचा उद्देश आहे.

७) वास्तववादी कविता :-

अरुण कोलटकर यांनी 'काळया कविता' मधून परंपरेला छेद देणारी आणि क्लेशदायक वास्तवाचे दृश्य दाखवले आहे.

"शंभर कॅण्डल पॉवरची तंग कच्ची फळे चार-पाच
त्याच्या प्रखर उकळया मिठीत जे जे आहे ते-ते
लाकडी खच्ची केलेले पाशवी टेबल
त्याला जबडा नाही आयाळ आहे
त्यांच्या कुंज्याखाली एक जोडपे वळणारे
पालीच्या तुटलेल्या शेपटीसारखे तेवढेच लहान"

अरूण कोलटकर यांनी मराठीत नवकव्याचा नवामार्ग निर्माण केला. ही कविता एक संवेदनशील सामाजिक चित्र आहे. लैंगिक शोषण, मानवी अध:पतन याचं प्रतिकप्रधान वर्णन केला आहे. ही कविता सुरुवातीला अस्वस्थ वाटते. हीच कवितेची ताकद आहे. अरुण कोलटकर वास्तवाच्या तळाशी जाताना दिसतात. जिथे मानवी भावना, शरीर, लैंगिकता,

मृत्यू, पाप एकत्र मिसळून दिलेले आहे. कविता वाचकांना पटकन कळत नाही. वाचकांना विचार करायला भाग पाडणारी ही कविता आहे.

❖ **भाषाशैली :-**

वरील काही कवितेची भाषा सोपी, सुलभ आहे. कुठे कुठे विद्रोही क्रांतिकारी भाषेचा वापर केला आहे. पण त्यातून निघालेला अर्थ मनाला धक्का लावून जातो. मुक्तछंदात्मक शैलीचा वापर या ठिकाणी केला आहे. अशोक शहाणे यांनी 'एका गांडूचे गा़ऱ्हाणे' मध्ये तीव्र थेट अनुभवावर आधारित अशा भाषेचा वापर केला आहे. प्रतीकप्रधान, गुढ, गहिरं तसेच धक्का देणारी शैलीचा अभ्यास या ठिकाणी केला आहे. अरुण कोलटकरांच्या 'काळया कविता' या कवितेतील भाषा ही अत्यंत गंभीर, भेदक तसेच चित्रमयता व्यक्त करणारी आहे.

❖ **निष्कर्ष :-**

अशोक शहाणे यांच्या 'नाही मेलो आजहि आम्ही' ही अनुवादित कविता. एकाचवेळी भूतकाळ, वर्तमानकाळ आणि सर्वसामान्यांच्या अस्वस्थ अस्तित्वाचा वेध घेते. ती सांगते की, आपण अजूनही जिवंत आहोत. पण यांत्रिक, असहाय, अर्थहीन, अस्तित्वाच्या गुरफटक्यात अडकलेलो आहोतच.

अरुण कोलटकर यांच्या 'काळया कविता' मधून मानवी जगण्याच्या अंधाऱ्या, कुरूप आणि भीषण बाजूंवर प्रकाश टाकते. एक अशी जागा जिथे शरीर, हिंसा आणि मृत्यू याचं विद्रूप नाट्य चालू असलेले दिसून येते.

नेमाडे यांची 'माझी डोळे सोड' ही कविता आधुनिक माणसाच्या आत्मिक गोंधळाची, दिशाहीनतेची आणि आत्मशोधाची प्रभावी अभिव्यक्ती आहे. ही कविता आधुनिक माणसाच्या जीवनातील दिशाहीनता, ओळख हरवणे, अंतर्गत वेदना, एकांतता अशा प्रतीकात्मक प्रतिमातून व्यक्त करते.

❖ **समारोप :-**

रमेश समर्थ यांच्या 'शब्द' लघुअनियतकालिकात विविध कवींनी कविता लेखन केले आहे. या लघुअनियतकालिकात विद्रोही कविता, अनुवादित कविता, बालगीते, अतिसंवेदनशील, अस्तित्ववादी, वास्तवादी कविता इत्यादी कविताप्रकाराचा अभ्यास येथे केलेला आहे. प्रत्येक कवींनी आपले विचार कविता या साहित्यप्रकाराच्या माध्यमातून सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचवले आहेत.

❖ **संदर्भ**

१) रमेश समर्थ, 'शब्द' लघुअनियतकालिक

२) अशोक शहाणे, नपेक्षा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्रथम आवृत्ती, एप्रिल २००५.

३) सतीश काळसेकर, वाचणाऱ्याची रोजनिशी, लोकवाङ्मय गृह, मुंबई प्रथम आवृत्ती जुलै २०१०.

४) नितीन रिंदे, लघुनियतकालिक चळवळीतले भालचंद्र नेमाडे, साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट 'मायमावशी' आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र भालचंद्र नेमाडे आणि भाषा विशेषांक२०२४

५) केजकर प्रकाश देशपांडे, मराठी कविता नवी वळणे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९९४.

६) वसंत आबाजी डहाके, मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती एप्रिल २००५,

७) रवींद्र घवी, पुष्पा भावे आणि इतर, स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा इ.स. १९४७ ते २०००, प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९९.

संपादक सुषमा करोगल स्वतंत्र्योत्तर मराठी कविता

अभिजात मराठी भाषा व आजचा युवक

श्री लक्ष्मण बालू पाटील
माध्यमिक शिक्षक [मराठी विभाग] (संशोधक विद्यार्थी) अमरीशभाई आर पटेल सीबीएसई स्कूल, शिरपूर
मधुभाष :- 9552918063
ईमेल:- arplaxmanp2025@gmail.com

प्रस्तावना

आजच्या तरुण आणि मराठी भाषा याचा अधिक जवळचा संबंध आपल्याला दिसून येणार आहे. या विषयी चर्चा करत असताना आपल्या लक्षात येते, की सध्याच्या कालखंडामध्ये मराठी भाषा ही प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर होताना दिसत आहे. काही लोकांचा कल असाही होता, की मराठी भाषा आज लोप पावत चाललेली आहे; पण सकारात्मक बाजूच्या अंगाने विचार केला असता शैक्षणिक क्षेत्रात इंग्रजी भाषेला अधिक स्थान विद्यार्थी पालक यांकडून देण्यात येत आहे; पण तरी देखील मी असं म्हणेन की मराठी भाषा ही ज्या पद्धतीने आधी काळापासून अनेक साधुसंतांच्या विचारांनी प्रगल्भ विचाराने प्रस्तुत झाली आहे. आज भाषेला त्याच विचारांना सोबत घेऊन भाषा अग्रेसर मार्गक्रमन करताना दिसत आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाची सांस्कृतिक ओळख, वैचारिक परंपरा आणि ऐतिहासिक स्मृती जपणारी शक्ती असते. मराठी भाषा ही दीर्घ साहित्यपरंपरा, संतवाङ्मय, सामाजिक चळवळी आणि आधुनिक विचारसरणी यांमुळे समृद्ध झालेली भाषा असून तिला अभिजात भाषेचे सर्व गुणधर्म लाभलेले आहेत. जागतिकीकरण, तंत्रज्ञान आणि इंग्रजीप्रधान शिक्षणपद्धतीच्या प्रभावाखाली आजचा युवक वेगाने बदलणाऱ्या जगाशी जुळवून घेत असताना, मराठी भाषेचे स्थान आणि महत्त्व नव्याने तपासणे आवश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर अभिजात मराठी भाषा आणि आजचा युवक यांच्यातील नाते, त्यातून मिळणारी प्रेरणा तसेच वैचारिक व व्यावसायिक विकासातील तिची भूमिका अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

संशोधनाचा उद्देश

१. मराठी भाषेचे अभिजात स्वरूप समजून घेणे.

२. आजच्या युवकांवर मराठी भाषेचा वैचारिक परिणाम अभ्यासणे.

३. भाषेतून युवकांना मिळणाऱ्या प्रेरणा व रोजगाराच्या संधी शोधणे.

संशोधन पद्धती

या लेखासाठी ग्रंथाधारित (Library Research) व निरीक्षण पद्धती वापरण्यात आली आहे. मराठी भाषा, संस्कृती, युवक व शिक्षण यावर आधारित संदर्भग्रंथांचा अभ्यास करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. आपण अभिजात दर्जा म्हणजे काय याविषयी थोडक्यात माहिती खालील प्रमाणे अभ्यासणार आहोत.

अभिजात दर्जा म्हणजे काय?

अभिजात म्हणजे उत्कृष्ट, प्राचीन, समृद्ध परंपरा असलेले, साहित्यिक व सांस्कृतिक मूल्यांनी परिपूर्ण असणे. अभिजात दर्जा म्हणजे एखाद्या भाषेला तिच्या प्राचीनतेमुळे समृद्ध साहित्य परंपरेमुळे स्वतंत्र व्याकरण व तत्त्वज्ञानामुळे पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या सांस्कृतिक योगदानामुळे राष्ट्रीय पातळीवर दिला जाणारा विशेष सन्मान होय. असे आपणास या ठिकाणी नमूद करता येईल.

अभिजात मराठी भाषेचे स्वरूप

लोकमान्य टिळक यांच्या "मराठी भाषा : इतिहास आणि विकास" या ग्रंथातून मराठी भाषेचा दीर्घ ऐतिहासिक प्रवास स्पष्ट होतो. संत साहित्य, शाहिरी परंपरा, आधुनिक साहित्य आणि सामाजिक चळवळी यामुळे मराठीला वैचारिक सखोलता प्राप्त झाली आहे. ही भाषा समाजपरिवर्तनाची प्रभावी साधन राहिली आहे. मराठी भाषा ही भारतातील एक समृद्ध आणि प्राचीन भाषांपैकी एक आहे. तिला सुमारे हजारो वर्षांची लिखित व मौखिक परंपरा लाभलेली आहे. संत साहित्यामुळे मराठीला तात्त्विक आणि आध्यात्मिक खोली प्राप्त झाली. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ यांचे साहित्य मराठीचे अभिजात स्वरूप अधोरेखित करते. मराठी भाषेत भाव, विचार आणि तत्त्वज्ञान व्यक्त करण्याची अपूर्व क्षमता आहे. ही भाषा लोकजीवनाशी निगडित असूनही उच्च साहित्यनिर्मितीस समर्थ आहे. मराठीचे व्याकरण, शब्दसंपदा आणि शैली स्वतंत्र व विकसित आहेत. शाहिरी, पोवाडे, अभंग, ओवी, भारूड अशा विविध साहित्यप्रकारांत मराठी समृद्ध आहे. समाजप्रबोधन आणि सुधारणा चळवळींमध्ये मराठीने प्रभावी भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यलढ्यात मराठी भाषा जनजागृतीचे माध्यम ठरली. आधुनिक काळात मराठीने कादंबरी, नाटक, कविता व समीक्षा यांत प्रगती केली आहे. मराठी भाषा काळानुसार बदल स्वीकारूनही आपली मौलिकता टिकवते. ती प्रादेशिक असूनही राष्ट्रीय विचार मांडण्यास सक्षम आहे. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून संस्कृतीची वाहक आहे. भाषिक परंपरा आणि वैचारिक सातत्य हे मराठीचे अभिजात गुणधर्म आहेत. म्हणूनच मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची मागणी रास्त ठरते. अभिजात भाषेसाठी काही निकष ठरवण्यात आले आहे. त्या निकषांची चर्चा पुढील प्रमाणे आपणास करता येईल. खालील सर्व निकष आपले मराठी भाषा पूर्ण करते आणि म्हणूनच आपल्या मातृभाषेला मराठीचा अभिजात दर्जा प्राप्त झाला आहे.

अभिजात भाषेचे निकष

१. किमान १५००–२००० वर्षांची लिखित परंपरा असणे...

२. उच्च दर्जाचे प्राचीन साहित्य असणे...

३. स्वतंत्र व मौलिक भाषिक रचना असणे...

४. इतर भाषांवर प्रभाव टाकणारी परंपरा असणे...

आता आपण यावरील निकषांच्या आधारे 'अभिजात मराठी भाषा व आजचा युवक' या विषयावर सकरात्मक चर्चा करणार आहोत, ते पुढील प्रमाणे.....

'मराठी भाषा, आजचा तरुण वर्ग आणि अभिजात दर्जा' या शब्दांचा अर्थ पुढील प्रमाणे सांगता येईल. मराठी ही केवळ संवादाची भाषा नाही, तर ज्ञान, विचार व संस्कृतीची वाहक आहे. अभिजात दर्जा मिळाल्यास संशोधन कार्यास अधिक गती मिळते, विद्यापीठे व त्यामधील भाषा विभाग तसेच साहित्यिक लेखक मंडळी यांच्या मार्फत भाषेत, भाषेसाठी व समाजासाठी होणारे कार्य यात गतिशीलता प्रधान होते आणि यातूनच सर्वत्र व जागतिक स्तरावर आपल्या भाषेची, संस्कृतीची आणि प्रदेशाची ओळख साहित्याच्या माध्यमातून होताना दिसून येते. तसेच तरुणांना अभ्यास, करिअर, सर्जनशीलतेच्या नव्या संधी मिळतात.

मराठी भाषेची अस्मिता

स्वतःची ओळख, स्वाभिमान, आत्मभान किंवा स्वत्वाची जाणीव होणे, यालाच आपण अस्मिता असे म्हणू शकतो, थोडक्यात सांगायचे तर,"मी कोण आहे, माझी भाषा, संस्कृती, विचार आणि मूल्ये काय आहेत याची जाणीव" म्हणजे अस्मिता...

मराठी भाषा म्हणजे केवळ शब्द नव्हे, ती संस्कार आहे. भाषा जपली तर संस्कृती टिकते. असे म्हटले जाते. मराठीचा अभिमान म्हणजे स्वतःचा सन्मान करणे,तसेच मातृभाषा विसरणे म्हणजे आपली पायामुळं तोडणे होय. मराठी भाषा हाच आपला खरा वारसा आहे आज सर्वांचे लक्षात आले आहे. प्रत्येक भाषा ही मातृभाषा आहे आणि प्रत्येक मातृभाषा ही आई प्रमाणे असते आई आपणास ज्याप्रकारे संस्कार करते त्याच प्रकारे भाषेतील शब्दात संस्कार आणि संस्कारात

भाषा दिसून येते. मराठी ही फक्त भाषा नसून त्यात भावना आहे, मराठी टिकली तर महाराष्ट्र टिकेल. भाषेची समृद्धी म्हणजे राष्ट्राची समृद्धी होय. मराठीचा अभिमान बाळगणे ही सर्वांची जबाबदारी आहे. म्हणून आज आपण सर्वत्र भाषेचाच वापर किंवा भाषा बोलण्याचा आचार विचार देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

अभिजात दर्जा म्हणजे काय?

अभिजात दर्जा म्हणजे मान्यता नव्हे, मान आहे. कोणत्याही भाषेची सिद्धता हीच तिच्या इतिहासाने होते याच विचाराला अनुसरून माय माऊली मराठीने आपली पात्रता इतिहासाद्वारे सिद्ध केली आहे. अभिजात दर्जा हा संघर्षाचा विजय आहे. वेगवेगळ्या कालखंडातलेखक कवी विचारवंत यांनी व निर्माण झालेल्या मराठी साहित्याने विकासात्मक पावलांची दिशा दिली आहे. अभिजात दर्जा अभिजात दर्जामुळे मराठीला जागतिक व्यासपीठ प्राप्त झाले आहे हा दर्जा फक्त केवळ भाषेला नसून भाषेची सेवा करणाऱ्या प्रत्येक घटकाला जगाच्या पाठीवर आपले विचार मातृभाषेतूनच मांडण्याचे जागतिक व्यासपीठ निर्माण झाले आहे. आज संत साहित्य हीच मराठीची खरी ओळख व श्रीमंती आहे. आजच्या आजच्या युवकांनी नवा विचार सकारत्मक पद्धतीने केला पाहिजे. मातृभाषेतून आपल्या जीवनाचा विकास साधला पाहिजे. यासाठी काही विचार युवकांना प्रेरित करण्यासाठी मांडत आहे.

अभिजात माय मराठी बोलते आज युवकांशी ...

विचार करा माझ्यात... मी प्रेरणादायी घडवेल तुम्हाला.

तरुणानों तुम्ही भाषा जपली तर भविष्य उज्ज्वल होईल.

तुमच्या आधुनिकतेला, सोबत माझी द्या.

पुढे यशाच्या शिखरावर नेईल मी तुम्हाला...

तंत्रज्ञानात मराठीचा वापर आहे गरजेचा

मराठी शिकणे म्हणजे मागे जाणे नव्हे.

तरुणाईने भाषा शिकणे अन इतिहास घडविणे.

मराठी आणि करिअर परस्परविरोधी नाहीत.

तुमच्या सर्जनशीलतेला मी देते नवे पंख

भाषेवर प्रेम म्हणजे स्वतःवर प्रेम हे वाजून सांगते डंक

विचार तुमचा माझ्यातून(मराठीतील)तुम्ही मांडून शकतात.

जागतिक होऊन मराठी शक्तीतून तुमचे उज्ज्वल संपन्न जीवन घडवू शकतात.

कवी सुबाल (वास्तवदर्शी कवी)

मी कवी सुबाल (वास्तवदर्शी कवी) (श्री लक्ष्मण बालू पाटील) मांडतो माझे वास्तव आजचे विचार, करावा वाचकांनी त्याचा स्वीकार...

वास्तव आजचे विचार ...

इंग्रजी येणे चूक नाही, मराठी न येणे चूक आहे.

मराठीला कमी लेखणे म्हणजे स्वतःला कमी लेखणे.

सोशल मीडियावर भाषा ही जिंकवते व हरवते.

भाषा नसेल तर संस्कृती उरणार नाही.

मराठी बोलताना लाज वाटू देऊ नये, अस्वस्थ होऊन विचारांचा ऊर दाटून नये

परकी भाषेचा अतिरेक धोकादायक आहे उद्या आणि आज....

भाषा टिकवण्यासाठी नवा भाषिक विचारांचा चढवा तुम्ही साज...

मित्रहो, उदासीनता सारी आता सोडा,

भाषेच्या आधारे सारे मित्र जोडा

आजच्या काळात यशस्वी भविष्य तुम्ही घडावा…

भाषा जपली, तर संस्कृती वाचली.

मराठी बोलणे म्हणजे अभिमान. करूया आपण सारे आज पासून सन्मान…

तरुणाईची खरी ताकद – मातृभाषा. तीच पूर्ण करेल आपल्या साऱ्यांची आशा….

समारोप

भाषा हे समाजाचे आयना असते. ती केवळ संवादाचे माध्यम नाही, तर संस्कार, इतिहास, मूल्ये आणि अस्मितेचा धागा आहे. मराठी भाषा ही आपली मातृभाषा म्हणून केवळ बोली न राहता, उच्च साहित्य आणि तात्त्विक परंपरेचा एक समृद्ध ठेवा म्हणून ओळखली जाते. तथापि, आजचा युवक ज्येष्ठ पिढीपेक्षा वेगळ्या वैचारिक जागेवर आहे, तिथे मराठी भाषेचे स्थान, भूमिका आणि भवितव्य यावर गंभीर चिंतन आवश्यक आहे. आधुनिक काळात इंग्रजी किंवा इतर जागतिक भाषांकडे तरुणाईचे लक्ष वाढले आहे. शिक्षण, करिअर आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात इंग्रजीचा प्रभाव निर्विवाद आहे. परंतु, मराठीची उपेक्षा किंवा वापर कमी करणे म्हणजे स्वतःच्या सांस्कृतिक मूळांकडे दुर्लक्ष करणे असते. मराठीचे अभिजात स्वरूप "मराठी भाषा : इतिहास आणि विकास" (लोकमान्य टिळक) या ग्रंथात विस्ताराने उलगडले आहे. हा ग्रंथ दाखवतो की मराठी भाषेमध्ये वेदांवर आधारित तत्त्वज्ञान, सामाजिक सुधारणा, काव्यपरंपरा आणि तात्त्विक ग्रंथ यांचा विस्तृत अखंड प्रवाह आहे. याचा अभ्यास तरुणाईला सांस्कृतिक समृद्धी आणि आत्मसाक्षात्कार मिळवून देऊ शकतो. तरुणाईसाठी "तरुणाई – स्वप्ने, ध्येय व प्रेरणा" (सुबोध भावे) हे कार्य महत्त्वाचे ठरते. याच लेखनातून स्पष्ट होते की युवकाला प्रेरणा, लक्ष्य आणि विचारशक्तीची गरज आहे. मराठीमध्ये विचार करताना, भाषेचा आत्म्यानुभव जीवनात आत्मसात होतो, तेव्हा ते केवळ संवादाचे साधन नसून, व्यक्तिमत्त्व घडवणारे माध्यम बनते. भारतीय संस्कृतीचा व्यापक अभ्यास "भारतीय संस्कृती" (देसाई/जोशी) या संग्रहात उपलब्ध असून, यात मराठी भाषेच्या सामाजिक इतिहासाचा, लोकपरंपरेचा आणि तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास आहे. युवक या साहित्याचा अभ्यास केल्यास तो भाषिक आत्मविश्वास, सांस्कृतिक अभिमान आणि वैश्विक परिप्रेक्ष्य यांच्यात संतुलन साधू शकतो. आजचा युवक जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली असून, तो आपल्या मातृभाषेपासून काहीसा दूर जाताना दिसतो. ही घटना केवळ भाषेची नव्हे, तर आत्मसंबंधाची समस्या आहे. मराठीची मौलिकता, तिचे तत्त्वज्ञान, तिचा सांस्कृतिक ठेवा आणि तिचा ऐतिहासिक प्रवाह तरुणाईने स्वीकारल्यास तो वैश्विक व स्थानिक विचारांचे संतुलन साधू शकतो. शेवटी, अभिजात मराठी भाषा ही केवळ भाषिक दृष्ट्या प्रतिष्ठित नसून, युवकाच्या वैचारिक व सामाजिक उन्नतीसाठी अविभाज्य घटक आहे. यासाठी शिक्षण, संशोधन आणि वैचारिक संवाद अधिक दृढ करणे आवश्यक आहे.

निष्कर्ष

मराठी भाषेच्या माध्यमातून पत्रकारिता, लेखन, अनुवाद, डिजिटल कंटेंट निर्मिती, शिक्षण, पर्यटन मार्गदर्शन अशा अनेक क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. प्रो. वि. स. खांडेकर यांच्या विचारांनुसार भाषा ही केवळ भावनिक नव्हे तर आर्थिक सक्षमतेचे साधन देखील ठरू शकते. तांत्रिक कौशल्यांसह मराठीचा वापर केल्यास युवक स्वतःचे उत्पन्न वाढवू शकतो. म्हणून अभिजात मराठी भाषा ही आजच्या युवकांसाठी अडथळा नसून संधी आहे. भाषा, तंत्रज्ञान आणि आधुनिक शिक्षण यांचा समन्वय साधल्यास युवक वैचारिकदृष्ट्या सक्षम, सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ शकतो. त्यामुळे मराठी भाषेचा जाणीवपूर्वक वापर आणि संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. वरील सर्व विचार माझे वैयक्तिक असून ते दैनंदिन स्व अनुभवतील आहेत. त्यात काही अयोग्य वाचकास वाटू शकत. तर क्षमस्व.

संदर्भ पुस्तके

१. मराठी भाषा : इतिहास आणि विकास — लोकमान्य टिळक

२. मराठी व्याकरण आणि साहित्य — वासुदेव चिपळूणकर

३. तरुणाई – स्वप्ने, ध्येय व प्रेरणा — सुबोध भावे
४. भारतीय संस्कृती — देसाई / जोशी
५. भाषा आणि समाज - वि. स. खांडेकर

मराठी भाषा साहित्याचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा

सहा.प्राध्यापक.सुप्रिया धनंजय राऊत.

श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील,कन्या महाविद्यालय

सांगली. (कला,वाणिज्य आणि विज्ञान) गणपती मंदिर रोड, नेमिनाथ नगर,विश्रामबाग सांगली.

मोबाईल नंबर-7506884884

ई-मेल-desaisupriya198814@gmail.Com

घोषवारा -

मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून, महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे.प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत मराठी साहित्याने समाज प्रबोधन केले. धर्म,संस्कृती,मानवाचे आचार- विचार,कल्पना यांचे जतन केले. संत साहित्य, लोकसाहित्य, पंडिती साहित्य तसेच आधुनिक साहित्य इत्यादी साहित्यामधून मराठी भाषेचा विकास घडून आला आहे. महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासातील अज्ञात असे पहिले राजघराणे सातवाहनांचे, तसेच पुढे वाकाटक,चालुक्य,राष्ट्रकूट, कलचुरी,यादव,शिलाहार इत्यादी राजघराण्यांनी प्राचीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक घडामोडीत मोलाची भर घातली. वैदिक धर्म,वैष्णव पंथ,जैन धर्म, बौद्ध धर्म इत्यादी धर्माचा व धर्मपंथांचा जो विकास झाला, त्याची छाप महाराष्ट्राच्या प्राचीन संस्कृतीवर दिसते. मराठी वाङ्मयाच्या विकासात बखरींना वा ऐतिहासिक पत्रांना अतिशय वेगळे स्थान आहे. वैयक्तिक व राजकीय पत्रांबरोबरच बातमीपत्र,शोकपत्रे,कुळकथा देणारे वाकी,निवाडापत्रे अशा आणखी काही लेखन प्रकारांनी मराठ्यांचे गद्य वैभवपूर्ण बनविले आहे. या साहित्यामधूनच आपण मराठी भाषा साहित्याचा सांस्कृतिक ऐतिहासिक वारसा जतन करत आहोत. सांस्कृतिक परंपरा व ऐतिहासिक वारसा यांचा समाज जीवनावर चांगला परिणाम झालेला दिसून येतो.

सूचनक शब्द -

मराठी साहित्य, सांस्कृतिक परंपरा, ऐतिहासिक वारसा, लोकसाहित्य,समाज प्रबोधन.

प्रस्तावना-

मराठी हा शब्द 'मरहट्ट' वा 'महारहटठ'या शब्दावरून आला आहे. 'मराठी'या शब्दाची उत्पत्ती भाषाशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता ती महाराष्ट्र आणि प्रदेशाची निगडित आहे. 'महा 'म्हणजे मोठा,'राष्ट्र'म्हणजे प्रदेश, असा महाराष्ट्र या शब्दाचा अर्थ होतो. प्राकृत व अपभ्रंश भाषिक टप्प्यांमध्ये महाराष्ट्र या शब्दाचे रूपांतर 'महारहटठ',' मरहट्ट' अशा शब्दरूपात झाले. या प्रदेशातील लोकांना मराठा म्हणून ओळखले जाऊ लागले आणि त्या लोकांची भाषा म्हणून मराठी हा शब्द प्रचलित झाला मराठी साहित्याची मराठी भाषा ही महाराष्ट्र प्राकृत या प्राकृत भाषेपासून विकसित झालेली असल्यामुळे महारठी - मराठी असा भाषिक विकास क्रम मानला जातो. मराठी हा शब्द प्रदेश,तेथील लोक आणि त्यांच्या भाषिक परंपरेचे प्रतीक मानला जातो. मराठी भाषा व साहित्य हे महाराष्ट्राच्या सामाजिक,धार्मिक व सांस्कृतिक जीवनाशी निगडित असून त्यांचा इतिहास अत्यंत समृद्धी व व्यापक आहे. भाषेतून निर्माण होणारे साहित्य समाजाच्या ऐतिहासिक वाटचालीचे, वैचारिक परिवर्तनाचे तसेच सांस्कृतिक प्रतिबिंब दर्शवते. प्राचीन काळापासून मराठी साहित्याने विविध स्वरूपात दर्शन घडविले आहे. संत साहित्याच्या माध्यमातून मराठी भाषेला लोकाभिमुखता प्राप्त झाली तर लोकसाहित्याने ग्रामीण व लोकजीवनातील अनुभवांना व्यक्त केले. पंडिती साहित्य, आधुनिक कथा, कादंबरी, नाटक व कविता या साहित्य प्रकारातून मराठी साहित्याने सामाजिक वास्तव,वैचारिक संघर्ष आणि सांस्कृतिक जाणिवा प्रभावीपणे मांडल्या.

संशोधन पद्धती-

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धती अवलंबण्यात आली आहे.यामध्ये ग्रंथसंपदा, संदर्भ ग्रंथ,लेख तसेच भाषाविषयक अभ्यासक्रम ग्रंथांचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे -

- मराठी भाषेची संकल्पना स्पष्ट करणे.
- मराठी भाषेचे सांस्कृतिक योगदान.
- मराठी भाषेचा ऐतिहासिक वारसा अभ्यासणे.
- आधुनिक काळात मराठी भाषेसमोरील आव्हाने.

संशोधनाचे महत्त्व -

प्राचीन मराठी पासून आधुनिक मराठी पर्यंत झालेल्या भाषिक बदलांचा आणि शब्दसंपत्तीचा मागोवा घेता येतो. लोककथा,ओव्या, भारुडे,पोवाडे, अभंग आणि कीर्तन परंपरा यांसारख्या मौखिक व लिखित साहित्य प्रकारांच्या अभ्यासातून मराठी संस्कृतीचे जतन व संवर्धन घडते. मराठी साहित्याच्या माध्यमातून समाजजीवन, राजकीय घडामोडी, लोकसंस्कृती यांचे दर्शन घडते. मराठी साहित्यामधून समाजामध्ये वैचारिक जडण-घडण झालेली दिसून येते. मराठी साहित्य हे भाषेचे जिवंतभांडार असून शब्दभांडार, व्याकरण आणि भाषिक शैली समृद्ध करून मराठी भाषेचे अस्तित्व टिकवून ठेवते.मराठी साहित्याने समाजामध्ये समाज प्रबोधन घडवून आणण्याचे कार्य केले आहे.अनेक संतांनी आपल्या ओवीतून,भारुडातून, समाज प्रबोधन केले आहे. यामध्ये मनुष्याने समाजामध्ये कसे राहिले पाहिजे,आरोग्य, शिक्षण,स्वच्छता याबद्दलही प्रबोधन केले आहे. पोवड्या मधून इतिहास जागवला जातो. शिवरायांच्या पोवाड्यातून त्यांच्या कर्तुत्वाची जाण समाजाला करून दिली आहे. बखरी आणि ऐतिहासिक पत्रांमधून मराठी साहित्याचे जतन केले आहे.बखरी मधून शिवछत्रपतींचे चरित्र,पेशव्यांची चरित्र इत्यादी मराठी साहित्याची नोंद ऐतिहासिक वारशा मध्ये दिसून येते.मराठी साहित्यामुळे महाराष्ट्रातील सांस्कृतिक ओळख बळकट झाली आहे.

संशोधनाची मर्यादा -

- साधनसामग्रीच्या उपलब्धतेची मर्यादा- अनेक प्राचीन व मध्ययुगीन ग्रंथ हस्तलिखिते व लोकसाहित्य नष्ट झालेले आहे. उपलब्धग्रंथामध्येही पाठभेद, अपूर्णता आढळते.
- भाषिक व लिपीगत अडचणी - मराठी भाषेचा ऐतिहासिक प्रवास समजून घेण्यासाठी संस्कृत,प्राकृत, अपभ्रंश, फारशी,अरबी भाषांचे ज्ञान आवश्यक असते. जुनी मोडी लिपी व प्राचीन लेखन शैली सर्वांना आत्मसात करता येत नाही.
- लोकसाहित्याच्या संशोधनातील मर्यादा - मौखिक परंपरेतून चालत आलेले, लोकगीत,कथा, ओव्या व म्हणी यांचे लिखित पुरावे कमी असल्याने त्यांचे कालखंड व मूळ स्वरूप निश्चित करणे अवघड ठरते.
- वर्गीय दृष्टिकोन - जुन्या साहित्यातील काही भाग विशिष्ट वर्गापुरता मर्यादित होता.
- दस्तऐवजीकरणाचा अभाव - सांस्कृतिक परंपरा,सण, उत्सव,धार्मिक विधी, लोककला आणि लोकसाहित्य यांचा असलेला संबंध पुरेशा प्रमाणात लिखित स्वरूपात नोंदवला गेलेला नाही. त्यामुळे साहित्य आणि समाज जीवन यांचा परस्पर संबंध अभ्यासताना संशोधकांना मर्यादा येतात.

संशोधनाचा आढावा -

मराठी भाषा साहित्याचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा हा अत्यंत समृद्ध,व्यापक स्वरूपाचा आहे. मराठी भाषेची उत्पत्ती प्राकृत, अपभ्रंश भाषातून झाली आहे. संत साहित्याने मराठी भाषेला लोकाभिमुख स्वरूप प्राप्त करून दिले.संत ज्ञानेश्वर,नामदेव, एकनाथ, तुकाराम आधी संतांनी भक्ती, समता, मानवता यांचा पुरस्कार करून जनजागृती केली. लोकसाहित्याच्या माध्यमातून लोकजीवन,संस्कृती,श्रद्धा, परंपरा व जनसामान्यांच्या भावना प्रभावीपणे व्यक्त झालेल्या दिसतात.मराठा कालीन साहित्यात बखरी, पोवाडे,ऐतिहासिक पत्रव्यवहार यामधून तत्कालीन राजकीय सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे स्पष्ट चित्रण आढळते.

*** पाली,प्राकृत, संस्कृत भाषेचा मराठीत प्रभाव** - प्राचीन काळी धर्म,तत्वज्ञान आत्मविचार,पूजा पाठविधी यांना दैनंदिन जीवनात महत्त्वाचे स्थान असल्याने, साहित्य साधना ही याच क्षेत्रात प्रामुख्याने झालेली दिसून येते. संस्कृत,प्राकृत व मराठी या भाषांतून ही साहित्य निर्मिती होत राहिली. वैदिक संस्कृत उर्फ आर्य भाषेत संहिता, पौराणिक संस्कृत भाषेत

अरण्ये,ब्राह्मणने,उपनिषदे पुराणांचा जुना भाग तसेच संस्कृत भाषेत पाणीनी, इत्यादी ग्रंथ आहेत. त्याप्रमाणे महाराष्ट्र भाषेत गाथा सप्तशती,रावणवहो, गरुडवहो इत्यादी ग्रंथ आहेत.

*** संत साहित्य-**

संत साहित्य म्हणजे भक्तीकालीन काळात लिहिलेले साहित्य यामध्ये संतांनी समाजातील सुधारणांवर, अध्यात्मावर, मानवतेवर आणि भक्तीवर भर दिला. यामध्ये त्यांनी सोप्या व उगवत्या मराठीचा वापर केला. संत तुकारामांचे अभंग, संत ज्ञानेश्वरांची ओवी, संत एकनाथांची भारुडे,गवळणी यामधून त्यांनी समाजात अध्यात्मिक जागृती केली तसेच भक्तीचा पाया रोवला. मुकुंदराजांचा 'विवेकसिंधू', ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी 'इत्यादी ग्रंथांबरोबरच महानुभावाच्या 'लीळाचरित्र ' 'पूजावसर' 'सूत्र पाठ' 'दृष्टांतपाठ' इत्यादी ग्रंथांनी प्राचीन मराठी वाङ्:मयाची वाढ केली.

*** लोकसाहित्य -**

लोकसाहित्य म्हणजे लोकांनी तोंडी परंपरेने निर्माण केलेले व पिढ्यानपिढ्या चालत आलेले साहित्य होय. यामध्ये साधी बोली भाषा असते यामधून लोकजीवनाचे दर्शन घडते. लोकसाहित्यामध्ये लोकगीते,लोककथा,लोककाव्य, लोकनाट्य, उखाणे, खेळ गीते यांचा समावेश होतो. समाजातील आनंद -दुःख, श्रद्धा-अंधश्रद्धा , निसर्गाशी असलेले नाते आणि सामाजिक मूल्य यांचे प्रतिबिंब लोकसाहित्यात आढळते. ग्रामीण व श्रमिक समाजाच्या जीवन पद्धती, चालीरीती, सण, उत्सव, धार्मिक श्रद्धा, कष्टकरी जीवनातील संघर्ष आणि आनंद यांचे चित्रण लोकसाहित्यत दिसून येते. लोकसाहित्य स्त्री जीवनाचे वास्तव दर्शन घडवते. ओव्या,जात्यावरची गाणी,लग्न गीते,यातून स्त्रियांच्या भावना, दुःख, आशा आकांक्षा स्पष्टपणे व्यक्त होतात.

*** ऐतिहासिक घटना, युद्धे, सामाजिक सुधारणा वर आधारित साहित्य** -

ऐतिहासिक घटना,युद्धे,सामाजिक घटना, भूतकाळातील घटनांचे वास्तव दर्शन घडवतात या साहित्यामधून त्या काळातील युद्ध,राजकीय घडामोडी, स्वातंत्र्यलढे यांचे दर्शन घडते. मराठी वाङ्:मयाच्या विकासात बखरींना वा ऐतिहासिक पत्रांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. बखर, सनदा,हुकूमनामे व पत्र व्यवहार यांचा परस्पर संबंध आहे. मराठा कालीन काळात छत्रपती शिवाजी महाराज,पेशवे, सरदार,व सुभेदार यांच्यात झालेल्या पत्रव्यवहारातून युद्ध नियोजन, तह, महसूल व्यवस्था, प्रशासन आणि राज्यकारभाराची स्पष्ट माहिती मिळते. ऐतिहासिक पत्रे देखील त्या घटना काळाशी निगडित आहेत.पत्रामध्ये फारशी व संस्कृत शब्दांचा प्रभाव असूनही,भाषा सरळ प्रभावी व आशय संपन्न आहे.

संशोधनाचे निष्कर्ष -

- सांस्कृतिक जतनाची भूमिका स्पष्ट होते.
- मराठी साहित्याची समाज परिवर्तनातील भूमिका स्पष्ट होते.
- मराठी साहित्यामध्ये सामाजिक व सांस्कृतिक जाणीव -जागृती निर्माण होते.
- मराठी साहित्याने समाजामध्ये समाज प्रबोधन केले व जाणीव -जागृती निर्माण केली.
- लोकसाहित्याने लोकजागृती निर्माण केली.

संदर्भसूची-

- प्राचीन महाराष्ट्र वाङ्:मय वैभव - डॉ.बी.एन.पाटील.
- प्राचीन मराठी वाङ्:मयाचा इतिहास - प्र.न.जोशी.
- साहित्याची निर्मिती प्रक्रिया - आनंद यादव.
- आंतरजाल,मराठी संकेतस्थळे.

अभिजात भाषा संवर्धनात हस्ताक्षराची भूमिका

प्रा. सौ रुपाली सचिन येवले
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव
इमेल - rukminisyewale@gmail.com
मो. नं. 8999602329

सारांश -

भाषेचा वापर हा मानवी गुणधर्म आहे आणि भाषेचा प्रसार व जतन प्रक्रियेत हस्ताक्षराची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. शिक्षण प्रक्रियेत वाचन आणि लेखन या प्राथमिक टप्प्यातील हस्ताक्षर हा एक महत्त्वाचा घटक आहे. हस्ताक्षर ही भाषिक ,साहित्यिक, सांस्कृतिक परंपरा जपण्याचे महत्वाचे साधन आहे. परंतु आजच्या आधुनिक डिजिटल युगात विविध प्रकारचे कीबोर्डस्, स्क्रीनटच मोबाईल तसेच आवाजावर अक्षरे टाईप होतील अशा अनेक डिजिटल साधनांच्या अतिवापरामुळे हस्ताक्षराचा वापर फारच कमी प्रमाणात होत असलेला दिसून येतो. हाताने लिहिण्याचे म्हणजेच हस्ताक्षराचे अनेक लाभ आहेत. चांगले हस्ताक्षर वाचनास प्रवृत्त करते, मन एकाग्र करण्यास मदत करते त्यामुळे मुलांचा बौद्धिक विकास होण्यास मदत होते. परंतु डिजिटल साधनांमुळे मुलांच्या मेंदू कार्यक्षमतेवर मर्यादा येऊन विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. म्हणूनच आजच्या डिजिटल युगातही काही जाणीवपूर्वक उपायांनी हस्ताक्षर कौशल्य जतन करता येऊ शकेल आणि परंपरेने चालत आलेली हस्तक्षराची भूमिका निरंतर ठेवण्यास मदत होईल. सदर शोधनिबंधात भाषिक कौशल्यातील हस्ताक्षर कौशल्याचे महत्व, भाषा प्रसारातील हस्ताक्षराची भूमिका, हस्ताक्षर कौशल्य जतनाचे लाभ तसेच आधुनिक डिजिटल युगात हस्ताक्षर जतनासाठीचे समन्वयक उपाय या सर्व घटकांचा सारांश मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तावना -

डिजिटल क्रांतीमुळे मानवी संवादाच्या जवळजवळ सर्व क्षेत्रांत आमूलाग्र बदल झाले आहेत. आपण कसे संवाद साधतो, माहिती कशी साठवतो आणि कशी वापरतो यावर याचा मोठा परिणाम झाला आहे. आज स्मार्टफोन, टॅब्लेट आणि संगणकांमुळे टायपिंग हे लेखनाचे मुख्य माध्यम बनले आहे. हस्ताक्षराचा वापर कमी झाला असून तो अनेकदा जुनाट किंवा केवळ कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यापुरताच मर्यादित राहिला आहे. हा बदल लेखन अधिक जलद आणि सोपे करतो, परंतु विचारशक्ती, शिक्षण आणि संस्कृतीवर होणाऱ्या दीर्घकालीन परिणामांबाबत गंभीर प्रश्न निर्माण करतो. वाचन-लेखन शिकण्याचा एक महत्त्वाचा भाग असलेले हस्ताक्षर हळूहळू लुप्त होत आहे. चांगले हस्ताक्षर हे व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा पैलू मानले जाते. हा शोधप्रबंध अभिजात भाषा संवर्धनात हस्ताक्षराची भूमिका मांडतो आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी समतोल उपाय सुचवितो. हस्ताक्षराचा सराव सुरू ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास समाज महत्त्वाचे मानसिक लाभ जपू शकतो, बहुभाषिक वाचन लेखनाला आधार देऊ शकतो आणि वाढत्या डिजिटल जगात लिखित अभिव्यक्तीचा मानवी व वैयक्तिक स्पर्श टिकवू शकतो.

शोधनिबंधाची उद्दिष्टे -

- भाषेच्या प्रसार व जतन प्रक्रियेतील हस्ताक्षराची भूमिका जाणून घेणे.
- आधुनिक युगात डिजिटल तंत्रज्ञानाचा हस्तालेखन कौशल्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.
- हस्ताक्षर कौशल्य जतनामुळे होणारे वैयक्तिक व भाषिक लाभ फायदे जाणून घेणे.
- आजच्या डिजिटल युगात हस्ताक्षर कौशल्य जतन करण्यासाठीचे उपाय सुचवणे.
- एकूण विश्लेषणातून हस्ताक्षर कौशल्य आत्मसात व जतन करण्याचे महत्त्व समजून घेणे.

हस्ताक्षराचे महत्व

हस्ताक्षर हे एक महत्त्वाचे भाषिक कौशल्य आहे . अध्ययन प्रक्रियेत प्राथमिक वाचन व लेखन या कौशल्यात पहिला टप्पा हा हस्ताक्षर लेखनाचा येतो. 'स्वतःच्या हाताने काढलेली अक्षरे किंवा केलेले लेखन म्हणजेच हस्ताक्षर

किंवा हस्तलेखन होय'. हस्ताक्षराची एक भाषिक, साहित्यिक, संस्कृतीक परंपरा चालत आलेली आहे; परंतु आज हस्ताक्षराचा वापर अत्यल्प झालेला दिसतो.

वाचन लेखन या शिकण्याच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा भाग असणारे हस्ताक्षर हळूहळू लुप्त होत चाललेले आहे. हस्ताक्षर लेखन हे व्यक्तीच्या अभिव्यक्ती कौशल्याचे एक महत्त्वाचे अंग आहे. हस्ताक्षरामुळे अभिव्यक्ती कौशल्याचा ही विकास होतो. आत्माविष्काराचे साधन म्हणून हस्ताक्षराकडे पाहिले जाते. मानवी विचार अक्षरांच्या माध्यमातून हस्तलिखित होतात. हस्ताक्षर हे परिणामकारक प्रभावी भाषिक कौशल्य ठरते. परंतु आधुनिक युगाच्या वावरात डिजिटल साधनांच्या अतिवापरामुळे हे कौशल्य मर्यादित होऊन गेले आहे. हस्तलिखित स्वरूपामुळे कोणत्याही काळाचा सामाजिक सांस्कृतिक दस्तऐवज होण्याचे कार्य साध्य होते. व्यक्तिमत्व विकासात भर घालणाऱ्या, अभिव्यक्तीचा एक मार्ग असणाऱ्या हस्ताक्षरावर डिजिटल तंत्रज्ञानाचा होणारा नकारात्मक परिणाम पाहता अनेक फायदे देणारे हस्ताक्षर जपणे आवश्यक आहे. **हस्ताक्षराची भूमिका -**

भाषेचा प्रसार व जतन हे जितके मौखिक व वैखरीने झाले आहे तितकेच ते हस्ताक्षराने किंवा हस्तलिखिताने ही झाले आहे. म्हणजेच भाषेच्या जतन प्रक्रियेत हस्ताक्षराची भूमिका ही काल व आजपर्यंत तरी महत्त्वाची राहिलेले आहे. लिपीचा शोध लागल्यापासून ते छपाई तंत्रज्ञान विकसित होईपर्यंतच्या दीर्घ कालावधीत हस्तलिखितानेच भाषा व साहित्य प्रसार व जतन करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. काही शतकांपूर्वीची माहिती, पत्रे, मजकूर, निरीक्षणे, दस्तऐवज, साहित्य हे हस्तलिखितातच असलेले दिसून येते. अगदी काही दशकांपूर्वी सुद्धा कार्यालयीन कामकाज मजकूर लेखन, कौटुंबिक व्यवहारिक पत्रे , माहितीपत्र, विविध अर्ज , शुभेच्छापत्रे , भित्तिपत्रके ही हस्ताक्षरात केली जायची. कार्यालयातील अनेक कागदपत्रे, अर्ज हस्ताक्षरातच भरले जायचे. कार्यालयीन शैक्षणिक लेखनात सुंदर हस्ताक्षराला बराच वाव होता. हस्ताक्षरावर आधारित अनेक नोकऱ्यांची संधी उपलब्ध असायची.

आज डिजिटल साधनांच्या व्यापक वापरामुळे विद्यार्थी व प्रौढ दोन्ही वर्गाचे हाताने लिहिणे कमी झाले आहे. हस्ताक्षर ही केवळ एक शारीरिक कृती नसून त्यात इंद्रिये व विचार प्रक्रिया एकत्रितपणे कार्य करतात. मेंदूच्या विकासात तसेच भाषा शिकण्यात त्याची महत्त्वाची भूमिका असते. आधुनिक डिजीटल युगात लॅपटॉप, टॅब, टचस्क्रीन स्मार्टफोन अशी साधने दैनंदिन जीवनाचा भाग झाल्याने सर्वच वयोगटातील हस्ताक्षर लेखन कमी होत आहे. तरुणाई व प्रौढ पिढी कागद पेन चा वापर कमी करतात. हस्ताक्षराकडे दुर्लक्ष केल्याने मेंदू सक्रियेतही मर्यादा येत आहेत. टायपिंग वेगवान असले तरी त्यात मेंदू सक्रिय होण्याचा भाग कमी असतो डिजिटल मजकूर सर्वांसाठी सारखाच दिसतो परंतु हस्ताक्षर तुमची वैयक्तिक शैली दर्शवते; तसेच व्यक्तिमत्व विकासात भर घालून इतरांवर प्रभावही पाडते.

डिजीटल साधनाचा प्रभाव

डिजिटल युगाचा परिणाम केवळ वैयक्तिक कौशल्यांपुरता मर्यादित नाही, तर संपूर्ण समाजावर होतो. शाळा-महाविद्यालयीन शिक्षण, कार्यालयीन कामकाज आणि नोंद ठेवण्याच्या पद्धतींवर याचा प्रभाव पडतो. शिक्षणसंस्था डिजिटल प्लॅटफॉर्मचा अधिक वापर करू लागल्याने हस्ताक्षराचे धडे कमी किंवा बंद केले जात आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखन विकासाबाबत चिंता निर्माण होते. त्याचबरोबर हस्ताक्षर हरवल्याने वैयक्तिक अभिव्यक्तीही कमी होते, कारण प्रत्येकाचे हस्ताक्षर त्याची स्वतंत्र ओळख आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी दर्शविते. हा लेख प्रथम हस्ताक्षराचे मानसिक व मेंदूसंबंधी लाभ स्पष्ट करतो. त्यानंतर डिजिटल तंत्रज्ञानाचा हस्ताक्षरावर होणारा नकारात्मक परिणाम, विविध भाषांसमोरील अडचणी आणि शेवटी हस्ताक्षर जपण्यासाठी व्यवहार्य उपाय मांडतो. विविध अभ्यासांच्या आधारे हा लेख डिजिटल तंत्रज्ञान आणि पारंपरिक लेखन पद्धती यांचा समतोल वापर करण्याचा आग्रह धरतो.

हस्ताक्षर कौशल्य जतन करण्याचे फायदे -

'सुंदर हस्ताक्षर हा दागिना आहे' असे मानले जाते. सुवाच्च हस्ताक्षर काढण्यासाठी डोळे, हात, मेंदू यांचा समन्वय साधून एकाग्रतेने लेखन करावे लागते. यामुळे मेंदू सक्रिय होऊन एकाग्रता व स्मरणशक्ती वाढण्यास मदत होते.

हस्ताक्षर काढताना अक्षरांचे आकार, वळण व मांडणी ही महत्त्वाची असते. ही प्रक्रिया करत असताना मेंदूचे अनेक भाग क्रियाशील होतात. अक्षरे लिहिण्यामुळे मेंदूत ध्वनी आणि अक्षरांच्या आकारांमधील संबंध मजबूत होतो. मेंदू वरील संशोधन दर्शवते हस्तलेखनात मेंदूच्या डाव्या व उजव्या दोन्ही भागांचा समन्वय साधला जातो; त्यामुळे कार्यक्षमता वाढते. हस्ताक्षरामुळे लेखन या भाषिक कौशल्यात भर पडून आत्मविश्वास वाढतो. चांगले हस्ताक्षर

वाचनास प्रवृत्त करते त्यामुळे वाचन या भाषिक कौशल्याचाही विकास साधला जातो. वाचन व लेखन कौशल्य सुधारल्यामुळे व्यक्तिमत्व विकासात भर पडून इतरांवर प्रभाव पडतो.

हस्ताक्षर सरावाने मन एकाग्र होते, शिकण्याची गुणवत्ता सुधारते. हाताने टिपण काढल्याने आकलन शक्ती वाढते. हस्ताक्षर लेखन टायपिंगच्या तुलनेत संथ असल्याने विचार करण्यास वेळ मिळतो ज्यामुळे मानसिक, भावनिक स्वास्थ्य लाभते आणि समस्या निवारण कौशल्य सुधारते .

काही उपचार पद्धतीमध्ये ही हस्ताक्षराचा वापर एकाग्रता वाढवण्यासाठी , ताण कमी करण्यासाठी तसेच मन शांत करण्यासाठी केला जातो सहाजिकच या सर्व बाबींनी व्यक्तिमत्व विकासात भर पडून जीवनाचा स्तर उंचावण्यास मदत होते

हस्ताक्षर जतन करण्यासाठी सूचना

हस्ताक्षराचा ऱ्हास थांबवण्यासाठी शाळा महाविद्यालयांनी पारंपरिक लेखन आणि डिजिटल साधने यांचा समन्वय साधलेला दृष्टिकोन स्वीकारावा. अभ्यासक्रमात लहान वयापासून नियमित हस्ताक्षर सरावाचा समावेश करणे आवश्यक आहे. वर्गखोल्यांमध्ये विशेष सराव वही यांसारखी साधने उपयुक्त ठरू शकतात. डायरी लिहिणे, यादी तयार करणे, हाताने टिपण काढणे अशा दैनंदिन सवयी हस्ताक्षर सुधारण्यासाठी मदत करतात. सामाजिक स्तरावर सुलेखन कार्यशाळा, हस्ताक्षर स्पर्धा, पोस्टर व शुभेच्छापत्र निर्मिती स्पर्धा आयोजित करून हस्ताक्षराचे कलात्मक महत्त्व जपता येईल. धोरणकर्त्यांनीही उच्च शिक्षण पातळीवर हस्ताक्षर पुनराभ्यास सत्रांना पाठिंबा द्यावा.

हस्ताक्षर कौशल्य जतन करण्यासाठीचे उपाय -

आजच्या आधुनिक युगात हस्ताक्षर कौशल्य जपणे हे खूप आव्हानात्मक आहे परंतु ते तितकेच अपरिहार्य ही आहे. हस्ताक्षर कौशल्याचे लाभ लक्षात घेता हे कौशल्य जतन करणे शारीरिक, भाषिक, साहित्यिक व संस्कृतीक दृष्ट्या गरजेचे व महत्त्वाचे आहे. यासाठी काही उपायांचा विचार करता येतो. हस्ताक्षर लेखन वाढवण्यासाठी शाळा व महाविद्यालय स्तरावर विविध प्रयोग झाले पाहिजेत. त्यामध्ये हस्ताक्षर स्पर्धा, हस्ताक्षर आधारित निबंध स्पर्धा, भित्तिपत्रके, शुभेच्छा पत्र तयार करणे अशा विविध स्पर्धा घेण्यात याव्यात. लहान वयापासूनच हस्ताक्षर सरावावर भर द्यावा. विद्यार्थ्यांना हाताने टिपण काढण्यास, रोजनिशी लिहिण्यास प्रवृत्त करून प्रोत्साहन द्यावे. सामाजिक स्तरावर सुलेखन कार्यशाळा, हस्ताक्षर जपण्याचे फायदे, हस्ताक्षराचे कलात्मक महत्त्व यावर चर्चासत्र घेण्यात यावीत.

कार्यालयीन कामकाजामध्ये काही अर्ज माहितीपत्रके हस्ताक्षरात भरण्यावर भर द्यावा. स्मार्टफोन किंवा टॅबचा वापर करून वेगवेगळ्या ॲपच्या द्वारे हस्ताक्षराचा अनुभव डिजिटल माध्यमातून मिळवता येऊ शकतो. अशा उपायातून डिजिटल साधने आणि पारंपारिक हस्तलेखन यांचा समन्वय साधला जावा.

निष्कर्ष

आजच्या काळात डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढल्याने हस्ताक्षराचा कमी वापर लक्षात घेता हस्ताक्षर कौशल्याचे संरक्षण करणे आवश्यक आहे. पारंपरिक पेन कागद लेखन आणि आधुनिक डिजिटल साधने यांचा समतोल वापर करणाऱ्या अध्यापन पद्धती स्वीकारल्या पाहिजेत. भाषा व साहित्यात, अध्ययन प्रक्रियेत अनेक टप्प्यांवर हस्ताक्षराची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. हस्ताक्षरामुळे विचारशक्तीला चालना मिळते, मेंदू सक्रिय होतो, शिकण्याची क्षमता वाढते, भाषिक कौशल्यात भर पडते, मानसिक भावनिक स्वास्थ्य लाभते; एकंदरीत व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. हस्ताक्षराकडे दुर्लक्ष झाल्यास हे कोणतेच फायदे लाभणार नाहीत. अध्ययनात हस्ताक्षर आणि डिजिटल साक्षरता यांचा समावेश करून पारंपारिक लेखन पद्धती आणि आधुनिक डिजिटल साधने यांचा समतोल साधणारी अध्ययन पद्धती अमलात आणता येईल. तसेच एआय आधारित हस्ताक्षर सराव व ओळख प्रणालींचा उपयोग करून पारंपरिक लेखन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्यात पूल निर्माण करता येईल. समन्वयक मिश्र धोरणांमुळे डिजिटल युगातही हस्ताक्षर हे आवश्यक भाषेत कौशल्य जपता येऊ शकते.

समारोप -

हस्ताक्षरासारखे आवश्यक कौशल्य लुप्त होण्याच्या मार्गावर असताना त्याची गरज व महत्त्व ओळखणे महत्त्वाचे आहे . शिक्षण प्रक्रियेत हस्ताक्षर हा आवश्यक भाग असून त्याची महत्त्वाची भूमिका आहे. हस्ताक्षराची शारीरिक भाषिक मानसिक विकास करणारी लाभ लक्षात घेता हस्ताक्षर कौशल्य जतन होणे आवश्यक आहे. डिजिटल साधने व पारंपारिक लेखन यांचा संयोग करून समन्वयक उपायांनी हस्ताक्षर कला जोपासली व जपली जाऊ शकते.

संदर्भ सूची-

अ. न.जोशी (संपादित) : *आदर्श मराठी शब्दकोश.* २००१
नीला जोशी (संपादित): *व्यक्तिमत्व विकास आणि भाषिक कौशल्ये* , दर्या प्रकाशन. २००४
आर. एम. वाळिंबे, *सुगम मराठी व्याकरण व लेखन*, नितीन प्रकाशन, २०१९
चंद्रमोहन कुलकर्णी: *अक्षर*, मौज प्रकाशन गृह, १९९८
डॉ. नारायण दत्त श्रीमाली : *हस्ताक्षर विज्ञान.* १९९६
हस्ताक्षर लेखन तंत्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन. २०००

अभिजात मराठी भाषेचे डिजिटल युगातील रूपांतर: स्वरूप, संधी आणि आव्हाने

प्रा.रुपाली दिलीप पाटील
सहाय्यक प्राध्यापिका
मराठी विभाग पी.पी.ई. एस ,ए ,सी,एस महाविद्यालय , वेश्वी अलिबाग – रायगड
मो. ९३२५८५८६२३
ई-मेल rupalipatil1898@gmail.com

गोषवारा
डिजिटल युगात मराठी भाषा व तिचे अभिजात साहित्य नव्या स्वरूपात समोर आले आहे. सोशल मीडिया, ई-पुस्तके, ऑनलाइन ग्रंथसंपदा, ब्लॉग्स आणि व्हिडिओ व्याख्यांमुळे अभिजात मराठीचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला आहे, मात्र त्याच वेळी भाषिक शुद्धता, साहित्यिक सौंदर्य आणि सांस्कृतिक सातत्य यांच्यावर आव्हाने निर्माण झाली आहेत. या शोधनिबंधात डिजिटल युगातील अभिजात मराठीच्या बदलांचा गुणात्मक अभ्यास केला आहे. प्राथमिक माहिती म्हणून ई-पुस्तके, ऑनलाइन ग्रंथसंपदा, ब्लॉग्स, व्हिडिओ व्याख्याने आणि सामाजिक माध्यमांवरील पोस्ट्स यांचा अभ्यास केला गेला. द्वितीयक माहिती म्हणून शास्त्रीय लेख, संशोधन ग्रंथ, विद्यापीठीन अभ्यासक्रम आणि डिजिटल साठवणूक यांचा उपयोग करण्यात आला. डेटा विश्लेषणासाठी तुलनात्मक व विश्लेषणात्मक पद्धती वापरून भाषिक शुद्धता, डिजिटायझेशनची गुणवत्ता, नवपिढीवर होणारा परिणाम आणि सांस्कृतिक सातत्य यांचा सखोल अभ्यास केला गेला. शोधनिबंधातून डिजिटल युगातील अभिजात मराठीच्या प्रसाराचे फायदे, धोके आणि भविष्यासाठी धोरणात्मक व शैक्षणिक शिफारसी स्पष्ट केल्या आहेत.

मुख्य शब्द / कीवर्ड्स
अभिजात मराठी, डिजिटल युग, डिजिटायझेशन, नवपिढी, सोशल मीडिया

संशोधन पद्धत - या शोधनिबंधासाठी मुख्य संशोधन पद्धत **गुणात्मक** आहे. यात डिजिटल युगातील अभिजात मराठीच्या बदलांचा अभ्यास केला गेला. प्राथमिक माहिती म्हणून ई-पुस्तके, ऑनलाइन ग्रंथसंपदा, ब्लॉग्स, व्हिडिओ व्याख्याने व सामाजिक माध्यमांवरील पोस्ट्स यांचा अभ्यास केला गेला. द्वितीयक माहिती म्हणून शास्त्रीय लेख, संशोधन ग्रंथ, विद्यापीठीन अभ्यासक्रम आणि डिजिटल साठवणूक यांचा उपयोग केला गेला.

माहितीचे विश्लेषण करण्यासाठी तुलनात्मक व विश्लेषणात्मक पद्धत वापरली गेली, ज्यातून भाषिक शुद्धता, डिजिटायझेशनची गुणवत्ता, नव्या पिढीवर होणारा परिणाम आणि सांस्कृतिक सातत्य यांचा अभ्यास केला गेला. या पद्धतीमुळे अभिजात मराठीच्या डिजिटल युगातील प्रसाराचे फायदे, धोके आणि भविष्यासाठी आवश्यक धोरणात्मक उपाय यांचा सखोल अभ्यास करता आला.

उद्दिष्टे

१) डिजिटल युगाने अभिजात मराठी भाषेच्या संरचना, अभ्यासपद्धती आणि प्रसारावर कसा प्रभाव टाकला आहे हे विश्लेषित करणे.
२) अभिजात मराठीच्या डिजिटायझेशन प्रक्रियेतील तांत्रिक, भाषिक आणि सांस्कृतिक आव्हाने समजून घेणे.
३) नवपिढीपर्यंत अभिजात मराठी पोहोचवण्याच्या संधी व धोके यांचा अभ्यास करणे.
४) डिजिटल माध्यमांमुळे भाषिक शुद्धता आणि साहित्यिक सौंदर्य राखण्यासाठी आवश्यक धोरणात्मक उपाय निश्चित करणे.
५) भविष्यातील संशोधनासाठी डिजिटल युगातील अभिजात मराठीसंबंधित धोरणात्मक व शैक्षणिक मार्गदर्शनाचे प्रस्ताव तयार करणे.

प्रस्तावना : माध्यमबदल, डिजिटल संक्रमण आणि भाषिक अस्तित्व

भाषा ही स्थिर रचना नसून ती समाजाच्या बदलत्या जीवनप्रक्रियांशी सातत्याने जुळवून घेणारी सजीव व्यवस्था आहे. मानवी इतिहासात भाषेने मौखिक परंपरा, हस्तलिखित संस्कृती, मुद्रणयुग आणि आता डिजिटल युग असे अनेक टप्पे अनुभवले आहेत. प्रत्येक टप्प्यावर भाषेचे केवळ बाह्य माध्यम बदलले नाही, तर तिच्या वापराची पद्धत, सामाजिक भूमिका आणि ज्ञाननिर्मितीचे स्वरूपही बदलले आहे.

मराठी भाषेच्या संदर्भात पाहिले असता, ज्ञानेश्वरकाळातील कीर्तनपरंपरा ही भाषेची मौखिक सार्वजनिकता दर्शवते. पुढे मुद्रणयुगात ज्ञानेश्वरी, दासबोध किंवा तुकाराम गाथा ग्रंथरूपात स्थिर झाल्या आणि वाचन ही वैयक्तिक बौद्धिक प्रक्रिया बनली. आज डिजिटल युगात हीच ग्रंथसंपदा PDF, मोबाईल ॲप्स, ऑडिओबुक आणि व्हिडिओ व्याख्यानांच्या स्वरूपात उपलब्ध आहे. त्यामुळे डिजिटल युग हे अभिजात मराठी भाषेसाठी माध्यमातील तुटवडा नसून माध्यमातील विस्तार आहे, असे म्हणता येईल.

तथापि, हा विस्तार मूल्यनिरपेक्ष नाही. डिजिटल माध्यमे वेग, सुलभता आणि तात्कालिकता यांना प्राधान्य देतात, तर अभिजात भाषा दीर्घकालीन स्मृती, चिंतनशील वाचन आणि सांस्कृतिक सातत्यावर आधारलेली असते. यामुळे एक मूलभूत ताण निर्माण होतो—डिजिटल युगातील उपभोगप्रधान संस्कृती आणि अभिजात भाषेची चिंतनप्रधान परंपरा यांतील ताण. या ताणाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे न झाल्यास अभिजात मराठी भाषा केवळ 'डिजिटल उपस्थिती'पुरती मर्यादित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२०२४ मध्ये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. कारण अभिजात भाषेचे जतन हे केवळ ऐतिहासिक कर्तव्य नसून ते सांस्कृतिक उत्तरदायित्व आहे. डिजिटल संक्रमणाच्या प्रक्रियेत मराठी भाषा टिकेल का, की तिचे स्वरूप बदलून तिची अभिजात ओळख धूसर होईल, हा या शोधनिबंधाचा केंद्रस्थ प्रश्न आहे.

अभिजात मराठी भाषेचे स्वरूप : ऐतिहासिक सातत्य, वैचारिक खोली आणि भाषिक आत्मा

अभिजात भाषेची ओळख केवळ तिच्या प्राचीनतेत नसून तिच्या सातत्यपूर्ण वैचारिक परंपरेत असते. मराठी भाषेचा विकास महाराष्ट्रीय प्राकृत, अपभ्रंश आणि जुनी मराठी या टप्प्यांतून झाला असून, हा विकास तुटक नसून सेंद्रिय स्वरूपाचा आहे. हीच सेंद्रियता मराठी भाषेच्या अभिजाततेचा गाभा ठरते.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ या अभिजाततेचे सर्वोत्तम उदाहरण आहे. तो संस्कृत भगवद्गीतेचा केवळ अनुवाद नसून, लोकभाषेत तत्त्वज्ञान मांडण्याचा एक क्रांतिकारक प्रयोग आहे. येथे मराठी भाषा केवळ भावनिक अभिव्यक्तीचे साधन राहत नाही, तर ती तात्त्विक चिंतनाची भाषा बनते. पुढे एकनाथ, तुकाराम आणि रामदासांनी या परंपरेला सामाजिक, नैतिक आणि राजकीय संदर्भ दिले. दासबोधासारखा ग्रंथ व्यक्तीघडणीपासून राष्ट्रघडणीपर्यंतचा वैचारिक प्रवास मांडतो, ही बाब मराठीच्या अभिजात स्वरूपाचे द्योतक आहे.

मोडी लिपीतील प्रशासकीय आणि ऐतिहासिक दस्तऐवज हे मराठी अभिजात भाषेचे आणखी एक महत्त्वाचे अंग आहे. या दस्तऐवजांतून केवळ भाषा नव्हे, तर तत्कालीन प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सामाजिक रचना प्रतिबिंबित होते. त्यामुळे अभिजात मराठी ही केवळ साहित्यिक भाषा नसून ती ज्ञानाची आणि सत्तेची भाषाही होती.

डिजिटल युगात या अभिजात स्वरूपाचे पुनर्वाचन करणे अत्यावश्यक ठरते. कारण डिजिटल माध्यमे बहुधा संतसाहित्यापुरतेच मर्यादित राहतात, तर मोडी दस्तऐवज, बखरी आणि तात्त्विक गद्य याकडे दुर्लक्ष होते. परिणामी अभिजात मराठीचे एकांगी चित्र निर्माण होण्याचा धोका संभवतो. म्हणूनच अभिजात मराठी भाषेचे डिजिटल रूपांतर करताना तिच्या संपूर्ण भाषिक आत्म्याचा विचार करणे आवश्यक आहे.

डिजिटल संक्रमणातील अभिजात मराठी अध्ययनपद्धती : तांत्रिक रूपांतरण आणि सांस्कृतिक ताण

डिजिटल युगामुळे भाषा-अभ्यासाची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. पूर्वी अभिजात भाषेचा अभ्यास प्रामुख्याने इतिहास, ग्रंथांचे वाचन आणि त्यावरील भाष्यांपुरता मर्यादित होता. एखाद्या ग्रंथाची प्रमाणित आवृत्ती, त्याचे अर्थस्पष्टीकरण आणि त्यावर आधारित तात्त्विक चर्चा यांवर संशोधन केंद्रित असे. परंतु डिजिटल युगात भाषा केवळ ग्रंथाच्या स्वरूपात

न राहता 'डेटा' म्हणून पाहिली जाऊ लागली आहे. त्यामुळे अभिजात मराठी साहित्य म्हणजे फक्त वेगवेगळे ग्रंथ नसून, शब्दसंपदा, प्रतिमा, विचार आणि भाषेची रचना यांचा एक मोठा संग्रह मानला जातो.

डिजिटल ह्युमॅनिटीज आणि कॉर्पस लिंग्विस्टिक्ससारख्या अभ्यासशाखांमुळे या साहित्याचा संगणकाच्या साहाय्याने अभ्यास करणे शक्य झाले आहे. उदाहरणार्थ, संतसाहित्याचा डिजिटल संग्रह तयार केल्यास अभंगांमधील भक्ती, आत्मज्ञान किंवा समाजविषयक विचार किती वेळा येतात, ते कसे बदलतात आणि त्यांची भाषा कशी वापरली जाते, याचा शास्त्रीय अभ्यास करता येतो. असा अभ्यास पारंपरिक संशोधनात फारच मर्यादित स्वरूपात शक्य होता.

तथापि, या बदलासोबत काही अडचणीही निर्माण होतात. संगणकीय विश्लेषण मुख्यतः आकडेवारीवर आधारित असते, पण अभिजात मराठी साहित्य हे केवळ शब्दांचे संकलन नाही. त्यामध्ये मौखिक परंपरा, सांस्कृतिक संदर्भ आणि भावनिक अनुभव यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे डिजिटल पद्धती वापरताना मानवी संवेदनशीलता आणि सांस्कृतिक जाणिवा जपणे आवश्यक ठरते; अन्यथा साहित्याचा अर्थ केवळ यांत्रिक पद्धतीने समजला जाण्याचा धोका असतो.

हा सैद्धांतिक बदल प्रत्यक्षात डिजिटायझेशनच्या प्रक्रियेत दिसून येतो. मराठी अभिजात साहित्याचे डिजिटायझेशन म्हणजे फक्त जुन्या ग्रंथांचे स्कॅन करणे एवढ्यावर थांबत नाही. या प्रक्रियेत साहित्य संकलन, मजकूर निश्चित करणे, लिप्यंतरण, संपादन आणि योग्य संदर्भासह सादरीकरण असे अनेक टप्पे असतात. मराठीच्या बाबतीत ही प्रक्रिया अधिक कठीण ठरते, कारण बरेचसे साहित्य हस्तलिखित स्वरूपात आहे आणि त्यामध्ये वेगवेगळे पाठभेद आढळतात.

याशिवाय मोडी लिपीतील प्रशासकीय आणि ऐतिहासिक दस्तऐवज हा मराठी अभिजात परंपरेचा महत्त्वाचा पण दुर्लक्षित भाग आहे. काही शासकीय आणि विद्यापीठीय उपक्रमांमुळे हजारो ग्रंथ आणि दस्तऐवज डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाले आहेत; मात्र सर्वच मजकुराचा दर्जा सारखा नाही. अनेक वेळा फक्त स्कॅन केलेला मजकूर दिला जातो, त्याला शब्दार्थ, संपादन किंवा ऐतिहासिक संदर्भ नसतात. त्यामुळे सामान्य वाचकासाठी तो मजकूर उपलब्ध होतो, पण संशोधनासाठी तो अपुरा ठरतो. विशेषतः मोडी लिपीच्या बाबतीत OCR तंत्रज्ञानाच्या मर्यादा स्पष्ट दिसतात. त्यामुळे चुकीचा मजकूर तयार होण्याची शक्यता असते आणि मानवी हस्तक्षेप आवश्यक ठरतो. डिजिटायझेशनचा एक महत्त्वाचा परिणाम असा आहे की अभिजात मराठी साहित्य ग्रंथालयांच्या चौकटीबाहेर येऊन डिजिटल माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचते. मात्र हा मजकूर जर अप्रमाणित आणि संदर्भविरहित असेल, तर अभिजाततेचा मूळ दर्जा कमकुवत होऊ शकतो. म्हणूनच डिजिटायझेशन ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून ती सांस्कृतिक आणि बौद्धिक जबाबदारी मानली पाहिजे. डिजिटल युगात मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसतो, आणि ही वाढ भाषेच्या लोकशाहीकरणाचे लक्षण आहे. सोशल मीडिया, ब्लॉग्स आणि व्हिडिओ प्लॅटफॉर्म्समुळे मराठी भाषा नव्या पिढीच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनली आहे. मात्र अभिजात मराठीच्या दृष्टीने हा बदल काहीसा आव्हानात्मक आहे. डिजिटल माध्यमांवर संतसाहित्याचे संक्षिप्त किंवा आधुनिक भाषेत रूपांतर केलेले प्रकार मोठ्या प्रमाणावर आढळतात. यामुळे आशय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतो, पण मूळ भाषेची लय, सौंदर्य आणि तात्त्विक खोली अनेकदा कमी होते. अभिजात साहित्यात शब्दांच्या अगदी सूक्ष्म बदलालाही अर्थाचा फरक पडू शकतो, आणि डिजिटल प्रयोगांमध्ये हा धोका अधिक वाढतो. एकीकडे भाषा अधिक लोकाभिमुख व्हावी आणि नव्या पिढीने अभिजात परंपरेशी नाते जोडावे, ही अपेक्षा आहे; तर दुसरीकडे भाषेची शुद्धता, ऐतिहासिक संदर्भ आणि अभिजाततेचा दर्जा जपण्याची गरज आहे. या दोन्ही गोष्टींमध्ये योग्य समतोल राखला नाही, तर मराठी भाषा लोकप्रिय होईल, पण तिची अभिजात ओळख हळूहळू कमी होण्याची शक्यता आहे. म्हणूनच डिजिटल युगात भाषिक प्रयोग नाकारण्याऐवजी त्यांना शैक्षणिक शिस्त, प्रमाणित मजकूर आणि विश्वासार्ह संदर्भ यांच्या चौकटीत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. अशा संतुलित दृष्टिकोनातूनच अभिजात मराठी भाषा आधुनिकतेशी जुळवून घेत आपला ऐतिहासिक आत्मा टिकवू शकते.

डिजिटल माध्यमांमुळे अभिजात मराठीच्या भाषिक शुद्धता व सौंदर्यशास्त्रासमोरील आव्हाने

डिजिटल युगाने अभिजात मराठीच्या प्रसाराला गती दिली असली, तरी त्याचवेळी भाषिक शुद्धतेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. आज सोशल मीडिया, ब्लॉग्स, संकेतस्थळे, यूट्यूब व्याख्याने आणि ई-पुस्तकांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर मराठी मजकूर उपलब्ध आहे; मात्र या मजकुरात प्रमाणित व्याकरण, छंदशास्त्र, शब्दप्रयोग आणि

ऐतिहासिक संदर्भ यांची काटेकोरता अनेकदा आढळत नाही. उदाहरणार्थ, संत ज्ञानेश्वरांच्या ओव्या किंवा तुकारामांचे अभंग फेसबुक पोस्ट्समध्ये संक्षिप्त, बदललेल्या शब्दरचनेत किंवा रोमन लिपीत मांडले जातात. यामुळे आशय सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचतो, पण अभिजात मराठीच्या भाषिक सौंदर्याला धक्का बसतो.

याशिवाय, डिजिटल माध्यमांवरील 'जलद वाचन' संस्कृतीमुळे गंभीर साहित्यिक आस्वादाऐवजी वरवरचा अर्थग्रहण वाढतो. अभिजात मराठीतील संकल्पनात्मक शब्द, तात्त्विक प्रतिमा आणि अलंकारिक रचना या गोष्टी डिजिटल स्वरूपात अनेकदा सोप्या भाषेत रूपांतरित केल्या जातात. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानात्मक ओव्या आधुनिक भाषेत 'सोप्या अर्थाने' मांडताना मूळ आध्यात्मिक आणि काव्यात्म अर्थ कमी होतो. त्यामुळे डिजिटल प्रसार आणि भाषिक शुद्धता यांच्यातील संघर्ष हा अभिजात मराठीच्या रूपांतरातील एक महत्त्वाचा विश्लेषणात्मक मुद्दा ठरतो.

डिजिटल व्यासपीठांमुळे अभिजात मराठीच्या अध्ययन, संशोधन व जागतिक प्रसाराच्या नव्या संधी

डिजिटल युगात अभिजात मराठीसाठी अनेक सकारात्मक संधीही निर्माण झाल्या आहेत. पूर्वी हस्तलिखिते, दुर्मीळ ग्रंथ किंवा टीकासाहित्य हे केवळ काही ग्रंथालये आणि संशोधकांपुरते मर्यादित होते. आज मात्र डिजिटल अर्काइव्ह, ई-ग्रंथालये आणि ऑनलाइन डेटाबेसमुळे हे साहित्य व्यापक वाचकवर्गासाठी खुले झाले आहे. उदाहरणार्थ, 'Bharatavani', 'डिजिटल मराठी विश्वकोश' किंवा राज्य शासनाच्या डिजिटल उपक्रमांमुळे संत साहित्य, मध्ययुगीन काव्य आणि प्राचीन ग्रंथ सहज उपलब्ध होत आहेत.

या डिजिटल उपलब्धतेमुळे संशोधनाची पद्धतही बदलत आहे. आज संशोधक एका क्लिकवर विविध कालखंडांतील ग्रंथ, टीका आणि संदर्भग्रंथांची तुलना करू शकतात. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरीवरील विविध टीकांचे डिजिटल स्वरूप उपलब्ध झाल्यामुळे भाषिक, तात्त्विक आणि शैलीगत तुलना करणे अधिक सोपे झाले आहे. याशिवाय, अभिजात मराठीवरील ऑनलाइन व्याख्याने, वेबिनार्स आणि मुक्त अभ्यासक्रम (MOOCs) यांमुळे ही भाषा केवळ प्रादेशिक न राहता जागतिक शैक्षणिक चर्चेचा भाग बनत आहे. त्यामुळे डिजिटल युगात अभिजात मराठीचे अस्तित्व अधिक दृढ होत असल्याचे दिसते.

अभिजात मराठीच्या डिजिटल भविष्यासाठी आवश्यक धोरणात्मक व संस्थात्मक दिशा

अभिजात मराठीचे डिजिटल भवितव्य केवळ तंत्रज्ञानावर अवलंबून न राहता सुयोग्य धोरणात्मक नियोजनावर अवलंबून आहे. शासन, विद्यापीठे, संशोधन संस्था आणि भाषा-अभ्यासक यांनी एकत्रितपणे प्रमाणित डिजिटल मजकूरनिर्मितीवर भर देणे आवश्यक आहे. जर डिजिटल स्वरूपात उपलब्ध असलेला मजकूर अप्रमाणित किंवा संदर्भविरहित असेल, तर तो अभ्यासकांसाठी दिशाभूल करणारा ठरू शकतो.

उदाहरणार्थ, विद्यापीठ स्तरावर प्रमाणित ई-ग्रंथसंपदा, टीकासहित अभिजात ग्रंथ आणि संदर्भग्रंथ तयार करण्यात आले, तर विद्यार्थी सोशल मीडियावरील अप्रमाणित मजकुरावर अवलंबून राहणार नाहीत. त्याचप्रमाणे, लिपीशुद्धता, अचूक भाषांतर आणि भाषिक टीपा यांचा वापर केल्यास अभिजात मराठीचे मूळ स्वरूप टिकून राहू शकते. अशा धोरणात्मक दृष्टिकोनातून डिजिटल युगात अभिजात मराठी केवळ जतन होणार नाही, तर ती नव्या पिढीपर्यंत अर्थपूर्ण रीतीने पोहोचेल.

अभिजात मराठीच्या डिजिटल भविष्यासाठी आवश्यक धोरणात्मक, शैक्षणिक व संस्थात्मक दिशा

डिजिटल युगात अभिजात मराठीचे अस्तित्व केवळ तांत्रिक उपलब्धतेपुरते मर्यादित न राहता, ते भाषिक शुद्धता, शैक्षणिक विश्वासार्हता आणि सांस्कृतिक सातत्य यांच्याशी निगडित आहे. म्हणूनच अभिजात मराठीच्या डिजिटल भविष्यासाठी ठोस धोरणात्मक दिशा ठरवणे ही काळाची गरज बनली आहे. आज इंटरनेटवर मराठी भाषेतील सामग्री मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असली, तरी तिची प्रमाणिकता, संदर्भसुसंगती आणि अभ्यासोपयोगिता याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होतात. अशा परिस्थितीत शासन, विद्यापीठे, संशोधन संस्था आणि भाषातज्ज्ञ यांची संयुक्त भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

प्रथम, प्रमाणित डिजिटल मजकूरनिर्मिती ही अभिजात मराठीच्या जतनासाठी मूलभूत आवश्यकता आहे. संत साहित्य, मध्ययुगीन काव्य, बखरी, पोवाडे, तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ यांचे डिजिटायझेशन करताना मूळ हस्तलिखिते, अधिकृत

आवृत्त्या आणि टीकासाहित्य यांचा आधार घेतला गेला पाहिजे. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरीचे डिजिटल रूपांतर केवळ मजकूर स्कॅन करण्यापुरते न ठेवता, त्यास शब्दार्थ, तात्त्विक टीका आणि ऐतिहासिक संदर्भ जोडले गेले, तर ते विद्यार्थ्यांसाठी अधिक उपयुक्त ठरू शकते. अन्यथा, अपूर्ण किंवा चुकीच्या आवृत्त्या डिजिटल माध्यमांतून पसरून अभ्यासकांची दिशाभूल होण्याचा धोका असतो.

दुसरे म्हणजे, शैक्षणिक संस्थांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरते. विद्यापीठ स्तरावर अभिजात मराठीसाठी स्वतंत्र डिजिटल अभ्यासक्रम, ई-ग्रंथालये आणि संशोधन डेटाबेस विकसित करणे आवश्यक आहे. आज अनेक विद्यार्थी सोशल मीडियावरील अप्रमाणित ब्लॉग्स किंवा व्हिडिओंवर अवलंबून राहतात. जर विद्यापीठांनी प्रमाणित ई-साहित्य उपलब्ध करून दिले, तर ही अवलंबनता कमी होऊ शकते. उदाहरणार्थ, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विकसित केलेली अभिजात मराठीची डिजिटल ग्रंथसंपदा ही राष्ट्रीय स्तरावर संदर्भबिंदू ठरू शकते.

तिसरे म्हणजे, तांत्रिक आणि भाषिक समन्वय आवश्यक आहे. अभिजात मराठीतील जुनी लिपी, शब्दरचना आणि छंदशास्त्र डिजिटल स्वरूपात जतन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करावा लागतो. युनिकोड लिपी, भाषिक सॉफ्टवेअर्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शुद्ध लिप्यंतरण व शोधसुविधा विकसित करता येतात. उदाहरणार्थ, जर एखाद्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर संत तुकारामांच्या अभंगांतील विशिष्ट संकल्पना शोधता येत असतील, तर संशोधनाची गुणवत्ता लक्षणीयरीत्या वाढू शकते.

एकूणच, अभिजात मराठीच्या डिजिटल भविष्यासाठी धोरणात्मक नियोजन, शैक्षणिक बांधिलकी आणि तांत्रिक काटेकोरपणा यांचा समन्वय आवश्यक आहे. केवळ डिजिटल अस्तित्व पुरेसे नसून, त्या अस्तित्वामागे शास्त्रीय दृष्टिकोन असणे गरजेचे आहे.

निष्कर्ष

डिजिटल युगातील अभिजात मराठीचे स्थान केवळ तांत्रिक रूपांतरणापुरते मर्यादित नसून ते भाषिक शुद्धता, शैक्षणिक विश्वासार्हता आणि सांस्कृतिक सातत्य या तीन मूलभूत स्तंभांवर उभे आहे. या संशोधनात स्पष्ट झाले आहे की, अभिजात मराठीचे डिजिटल भविष्य हे संधी आणि आव्हान यांचा समतोल साधण्यावर अवलंबून आहे. एका बाजूला डिजिटल माध्यमांमुळे अभिजात मराठी साहित्याचा प्रसार जागतिक पातळीवर शक्य झाला आहे, तर दुसऱ्या बाजूला अप्रमाणित मजकूर, सुलभीकरणाची प्रवृत्ती आणि भाषिक विसंगती यांमुळे तिच्या मूळ स्वरूपाला धोका निर्माण होत आहे.

अभिजात मराठीच्या डिजिटल जतनासाठी धोरणात्मक आणि संस्थात्मक बांधिलकी अनिवार्य आहे. शासन, विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांनी संयुक्तपणे प्रमाणित डिजिटल ग्रंथसंपदा, शुद्ध लिपी-वापर आणि संदर्भसंपन्न मजकूरनिर्मिती यांवर भर दिल्यास डिजिटल माध्यमांतील विस्कळीतपणा कमी होऊ शकतो. अभिजात मराठीचे डिजिटायझेशन हे केवळ तांत्रिक प्रक्रिया न मानता, ते एक शास्त्रीय आणि सांस्कृतिक जबाबदारी म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. अन्यथा, डिजिटल उपलब्धता वाढूनही भाषिक गोंधळ आणि अभ्यासातील अप्रमाणिकता वाढण्याचा धोका कायम राहतो.

डिजिटल युगात अभिजात मराठी आणि नवपिढी यांच्यातील नाते अत्यंत निर्णायक ठरते. डिजिटल व्यासपीठे नवपिढीसाठी अभिजात मराठीकडे नेणारे प्रवेशद्वार ठरू शकतात; मात्र ही ओळख जर केवळ संक्षिप्त, प्रेरणादायी किंवा मनोरंजनात्मक स्वरूपात मर्यादित राहिली, तर अभिजात परंपरेचा गाभा टिकून राहणार नाही. म्हणूनच नवपिढीला आकर्षित करताना शैक्षणिक सखोलता, तात्त्विक संदर्भ आणि भाषिक सौंदर्य यांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. डिजिटल सुलभीकरण आणि सांस्कृतिक सातत्य यांमधील ताणतणाव योग्य दिशेने हाताळल्यासच अभिजात मराठीची परंपरा अखंडपणे पुढे जाऊ शकते.

एकूणच, या संशोधनाचा निष्कर्ष असा की डिजिटल युगात अभिजात मराठीचे भवितव्य हे तंत्रज्ञानाच्या वेगावर नव्हे, तर धोरणात्मक दृष्टी, शैक्षणिक जबाबदारी आणि सांस्कृतिक जाणीव यांवर अवलंबून आहे. योग्य नियोजन, प्रमाणित मजकूरनिर्मिती आणि नवपिढीशी अर्थपूर्ण संवाद साधल्यास अभिजात मराठी ही केवळ भूतकाळाची भाषा न राहता, भविष्यातील बौद्धिक आणि सांस्कृतिक जीवनाचा सशक्त आधार बनू शकते.

सूचना व शिफारसी

डिजिटल युगात अभिजात मराठी जतन आणि प्रसार यासाठी तांत्रिक उपलब्धतांपेक्षा अधिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धोरणात्मक उपाययोजना आवश्यक आहेत. सर्वप्रथम, डिजिटल ग्रंथसंपदा तयार करताना प्रमाणित स्रोतांचा अवलंब अत्यावश्यक आहे. हस्तलिखिते, मोडी लिपीतील दस्तऐवज, संत साहित्य व मध्ययुगीन काव्य यांचे डिजिटल रूपांतर करताना त्याची शुद्धता, तात्त्विक संदर्भ आणि भाष्यांसह नोंद करण्याची आवश्यकता आहे. या प्रक्रियेत तांत्रिक त्रुटी, OCR च्या मर्यादा किंवा अपूर्ण लिप्यंतरण यांचे पुनरावलोकन करून गुणवत्ता सुनिश्चित करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरीच्या विविध टीकांचे डिजिटल कॉर्पस तयार करताना फक्त मजकूर स्कॅन न करता शब्दार्थ, शैलीगत वैशिष्ट्ये आणि ऐतिहासिक संदर्भ जोडल्यास अभ्यासकांना उच्चस्तरीय संशोधनासाठी आधार मिळेल.

दुसरे, शैक्षणिक संस्थांनी अभिजात मराठीच्या डिजिटल साहित्याचा अभ्यासक्रमात समावेश करणे आवश्यक आहे. विद्यापीठ स्तरावर प्रमाणित ई-ग्रंथालये, संशोधन डेटाबेस आणि ऑनलाइन अभ्यासक्रम तयार केल्यास विद्यार्थी आणि संशोधक अप्रमाणित मजकुरावर अवलंबून राहणार नाहीत. अशा प्रकारच्या नियोजनामुळे नवपिढीमध्ये अभिजात मराठीविषयी गंभीर रस निर्माण होऊ शकतो. उदाहरणार्थ, संत तुकारामांचे अभंग युट्यूब व्याख्याने, पॉडकास्ट्स किंवा डिजिटल ट्यूटोरियल्सच्या माध्यमातून नवपिढीपर्यंत पोहोचवल्यास परंपरेशी सकारात्मक नाते निर्माण होते.

तिसरे, डिजिटल अभिव्यक्तीमध्ये भाषिक शुद्धता आणि साहित्यिक सौंदर्य जपण्यासाठी तांत्रिक तसेच भाषिक मार्गदर्शन आवश्यक आहे. युनिकोड लिपी, डिजिटल टूल्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून अभिजात साहित्य शोधसुलभ आणि संशोधनोपयुक्त बनवता येते. उदाहरणार्थ, एका डिजिटल प्लॅटफॉर्मवर संत साहित्य शोधताना विशिष्ट संकल्पना, छंदशास्त्र किंवा तात्त्विक मुद्दे शोधता येण्याची सुविधा दिल्यास अभ्यासाची गुणवत्ता वाढते.

चौथ्या, सांस्कृतिक सातत्य राखण्यासाठी नवपिढीला डिजिटल माध्यमांतून केवळ ओळख पुरवणे पुरेसे नाही; तिला शैक्षणिक संदर्भ, तात्त्विक गहनता आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीसह सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे सोशल मीडिया किंवा ई-ग्रंथालयांचा वापर करून नवपिढीमध्ये अभिजात मराठीच्या तत्त्वज्ञानाची, भक्तिसाहित्याची आणि गद्यविविधतेची सखोल समज निर्माण करता येते. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरी, दासबोध किंवा तुकारामांच्या अभंगांचे डिजिटल अध्ययन करताना भाष्य, संदर्भ आणि ऐतिहासिक स्थिती यांचा समावेश केल्यास अभ्यासकांना मूळ परंपरेची जाणीव कायम राहते.

शेवटी, शासन, विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांनी संयुक्त धोरण तयार करणे गरजेचे आहे, ज्यामध्ये डिजिटायझेशनसाठी तांत्रिक मार्गदर्शन, प्रमाणित मजकूरनिर्मिती, नवपिढीपर्यंत पोहोच, संशोधन सुविधा आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यांचा समन्वय साधला जाईल. अशा प्रकारे नियोजित आणि समन्वित उपाययोजना केल्यास डिजिटल युगात अभिजात मराठी केवळ टिकून राहणार नाही, तर ती आधुनिक संशोधन आणि सांस्कृतिक प्रसाराचा एक सशक्त आधार बनू शकते.

संदर्भ सूची

१) देशपांडे, रा. (२०१८). *मराठी साहित्यातील डिजिटल जतन: आव्हाने आणि संधी*. पुणे: महाराष्ट्र साहित्य अकादमी.

२) कुलकर्णी, स. (२०२०). *कॉर्पस भाषाशास्त्र आणि मराठी कविता: डिजिटल दृष्टिकोन*. मुंबई: मुंबई विद्यापीठ प्रकाशन.

३) पवार, ज. (२०१९). *डिजिटल युगातील अभंग: लिप्यंतरण आणि अर्थव्याख्या*. पुणे: भारतीय साहित्यक्षेत्र अभ्यास.

४) महाराष्ट्र शासन. (२०२१). *डिजिटल मराठी अर्काइव्ह प्रकल्प अहवाल*. मुंबई: भाषा आणि संस्कृती विभाग.

५) ठोम्बरे, व. चव्हाण, प. (२०२२). *मध्ययुगीन मराठी हस्तलिखितांचे डिजिटायझेशन: पद्धत आणि परिणाम*. *जर्नल ऑफ डिजिटल ह्युमॅनिटीज*, १५(३), ४५–६८.

६) वैद्य, अ. (२०१७). *सोशल मीडियाच्या युगात भाषिक शुद्धतेचे संरक्षण. भारतीय भाषा व साहित्यातील अभ्यास,* ९(२), ११२–१३०.

७) उपाध्ये, म. (२०२१). *नव्या पिढीशी पारंपरिक मराठी साहित्यासंबंधी संवाद. इंटरनॅशनल जर्नल ऑफ साऊथ एशियन स्टडीज,* १२(१), २३–४१.

८) झोपे, र. (२०२०). *मोडी हस्तलिखितांचे OCR-आधारित डिजिटायझेशन: आव्हाने आणि उपाय. सहावी राष्ट्रीय डिजिटल ह्युमॅनिटीज कॉन्फरन्स प्रोसिडिंग्ज,* ८८–९७.

९) **शिकारपूर, दीपक., & मराठे, उज्वल. (२०२२).** *आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या विश्वात.* पुणे: उत्कर्ष प्रकाशन

अभिजात भाषा आणि ग्रंथालयाची भूमिका व जबाबदारी

प्रा. मनोज डोंगरदिवे
(ग्रंथपाल)
कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी. ता.खटाव जि. सातारा **स्त्रीच्या**
मो. 8177807940 dmanoj358@gmail.Com

१. सारांश (Abstract)

भारत हा प्राचीन संस्कृती, समृद्ध ज्ञानपरंपरा आणि वैविध्यपूर्ण भाषिक वारसा लाभलेला देश आहे. भारतीय समाजजीवनाच्या जडणघडणीत भाषांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. विशेषतः अभिजात भाषांनी भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान, धर्म, विज्ञान, साहित्य आणि कला यांच्या विकासात मोलाची भूमिका बजावली आहे. अभिजात भाषा म्हणजे अशा भाषा ज्या दीर्घकालीन ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या असून ज्यांचे साहित्य सांस्कृतिक, बौद्धिक आणि तात्त्विक दृष्ट्या अत्यंत समृद्ध आहे. भारत सरकारने २०२४ पर्यंत एकूण ११ भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला असून या भाषांमधून निर्माण झालेले साहित्य हे भारतीय ज्ञानपरंपरेचे अमूल्य भांडार मानले जाते.

मात्र आधुनिक काळात जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वेगवान विकास, इंग्रजी भाषेचे वाढते वर्चस्व, रोजगाराभिमुख शिक्षणपद्धती आणि वाचनसंस्कृतीतील बदल यांमुळे अभिजात भाषांचे अस्तित्व टिकवणे हे मोठे आव्हान बनले आहे. अनेक प्राचीन ग्रंथ, हस्तलिखिते, शिलालेख आणि दुर्मिळ ज्ञानस्रोत नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत अभिजात भाषांचे जतन, संरक्षण, संवर्धन आणि प्रसार करण्याची जबाबदारी प्रामुख्याने ग्रंथालये आणि ग्रंथपालांवर येऊन पडते.

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये अभिजात भाषेची संकल्पना, भारतातील अभिजात भाषांचे स्वरूप, त्यांचे शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व तसेच अभिजात भाषा संवर्धनात ग्रंथालयांची भूमिका, ग्रंथपालांच्या जबाबदाऱ्या, समोरील आव्हाने आणि भविष्यातील दिशा यांचा सविस्तर, विश्लेषणात्मक व अभ्यासपूर्ण आढावा घेण्यात आलेला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ग्रंथालये अभिजात भाषांना नवसंजीवनी देऊ शकतात आणि भारतीय ज्ञानपरंपरेचा ठेवा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवू शकतात, हा या लेखाचा मुख्य निष्कर्ष आहे.

Keywords : अभिजात भाषा, ग्रंथालय, ग्रंथपाल, संवर्धन, भारतीय ज्ञानपरंपरा

२. प्रस्तावना (Introduction)

भाषा ही केवळ विचारांची देवाणघेवाण करण्याचे साधन नसून ती समाजाची संस्कृती, इतिहास, परंपरा आणि सामूहिक स्मृती जपणारी शक्ती आहे. कोणत्याही राष्ट्राची ओळख त्याच्या भाषिक आणि साहित्यिक वारशातून प्रकट होत असते. भारतासारख्या बहुभाषिक, बहुसांस्कृतिक आणि बहुधर्मी देशात भाषांना केवळ व्यवहारिकच नव्हे तर आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतीय समाजजीवनाच्या उत्क्रांतीमध्ये विविध भाषांनी आणि त्यांच्या साहित्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

अभिजात भाषांनी भारतीय समाजाला वैचारिक दिशा दिली आहे. वेद, उपनिषदे, पुराणे, रामायण, महाभारत, संगम साहित्य, शिलालेख, ताम्रपट, काव्ये, नाटके आणि शास्त्रीय ग्रंथ यांमधून तत्कालीन समाजजीवन, धार्मिक श्रद्धा, तत्त्वज्ञान, विज्ञान, गणित, खगोलशास्त्र, वैद्यक आणि नीतिशास्त्र यांचे सखोल दर्शन घडते. हे साहित्य केवळ ऐतिहासिक दस्तऐवज नसून आजच्या समाजासाठीही मार्गदर्शक ठरते.

मात्र आधुनिक काळात शिक्षणव्यवस्थेतील बदल, इंग्रजी भाषेचे वाढते महत्त्व, तंत्रज्ञानप्रधान जीवनशैली आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम यांमुळे अभिजात भाषांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. परिणामी, या भाषांतील वाचन, लेखन आणि संशोधनाची परंपरा खंडित होण्याची भीती निर्माण झाली आहे. अशा पार्श्वभूमीवर अभिजात

भाषांचे जतन आणि संवर्धन करणे ही केवळ शैक्षणिक नव्हे तर राष्ट्रीय आणि सांस्कृतिक गरज बनली आहे. या कार्यामध्ये ग्रंथालये ही परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील महत्त्वपूर्ण दुवा म्हणून कार्य करीत आहेत.

३. अभिजात भाषा : संकल्पना व निकष

'अभिजात भाषा' ही संकल्पना केवळ भाषेच्या प्राचीनतेपुरती मर्यादित नाही. अभिजात भाषा म्हणजे अशी भाषा जिची दीर्घकालीन ऐतिहासिक परंपरा आहे, जिचे साहित्य मौलिक, समृद्ध आणि उच्च दर्जाचे आहे आणि जिचा राष्ट्रीय व सांस्कृतिक जीवनावर खोलवर प्रभाव आहे. भारत सरकारने अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी काही ठोस निकष निश्चित केले आहेत.

या निकषांमध्ये किमान १५०० ते २००० वर्षांची लिखित परंपरा असणे, प्राचीन आणि मौलिक साहित्य उपलब्ध असणे, स्वतंत्र व्याकरणीय व भाषिक रचना असणे, आधुनिक भाषांवर त्या भाषेचा प्रभाव असणे आणि त्या भाषेचे राष्ट्रीय व सांस्कृतिक जीवनात महत्त्वपूर्ण स्थान असणे यांचा समावेश होतो. या निकषांच्या आधारे निवडक भाषांना अभिजात भाषेचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

हा दर्जा केवळ सन्मानच नव्हे तर त्या भाषांच्या संवर्धनाची आणि संशोधनाची जबाबदारीही अधोरेखित करतो. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर त्या भाषांसाठी विशेष संशोधन निधी, अध्यासन, ग्रंथालय सुविधा आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्याची अपेक्षा असते.

४. भारतातील अभिजात भाषा

भारत सरकारने २०२४ पर्यंत एकूण ११ भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. या भाषांमध्ये तमिळ (2004), संस्कृत (2005), तेलुगू (2008), कन्नड (2008), मल्याळम (2013), ओडिया (2014), मराठी (2024), पाली (2024), प्राकृत (2024), आसामी (2024) आणि बंगाली (2024) यांचा समावेश होतो.

संस्कृत ही भारतीय ज्ञानपरंपरेची मूळ भाषा मानली जाते. वेद, उपनिषदे, दर्शनशास्त्र, आयुर्वेद, योग, गणित, खगोलशास्त्र आणि व्याकरण यांसारख्या विविध विषयांवरील मूलभूत ग्रंथ संस्कृतमध्ये उपलब्ध आहेत. तमिळ भाषा ही दक्षिण भारतातील अत्यंत प्राचीन भाषा असून तिची संगम साहित्य परंपरा जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहे. तेलुगू, कन्नड, मल्याळम आणि ओडिया या भाषांनी समृद्ध काव्य, नाट्य, धार्मिक आणि तत्त्वज्ञानात्मक साहित्यनिर्मिती केली आहे.

२०२४ मध्ये मराठी, पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांना अभिजात दर्जा मिळाल्याने भारतीय भाषिक वारसा अधिक व्यापक आणि समृद्ध झाला आहे. विशेषतः मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे महाराष्ट्रातील ग्रंथालये, संशोधन संस्था आणि विद्यापीठांवर नवी जबाबदारी येऊन पडली आहे.

५. अभिजात भाषांचे शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व

अभिजात भाषा या भारतीय संस्कृतीची ओळख जपण्याचे कार्य करतात. या भाषांमधील साहित्य इतिहास, समाजशास्त्र, धर्म, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, भाषाशास्त्र आणि कलाशास्त्राच्या अभ्यासासाठी मूलभूत स्रोत ठरते.

अभिजात भाषांचा अभ्यास विद्यार्थ्यांमध्ये तर्कशक्ती, चिकित्सक दृष्टी आणि नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करतो, चिकित्सक विचार, मूल्यशिक्षण, नैतिकता आणि सहिष्णुता विकसित होते. सामाजिक एकात्मता आणि सांस्कृतिक अभिमान वाढवण्यामध्ये या भाषांचा मोठा वाटा आहे. कला, साहित्य, सण-उत्सव आणि लोकपरंपरा या भाषांमधून जपल्या जातात.

सामाजिक दृष्टिकोनातून पाहता अभिजात भाषा समाजातील एकात्मता आणि सांस्कृतिक अभिमान वृद्धिंगत करतात. विविध भाषिक समुदायांमध्ये परस्पर समज, आदर आणि सहकार्य निर्माण करण्यास या भाषांचा मोठा हातभार लागतो. सांस्कृतिक दृष्ट्या अभिजात भाषा उत्सव, परंपरा, कला आणि लोकसंस्कृती यांचे जतन करतात. त्यामुळे या भाषांचा अभ्यास आणि संवर्धन हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे.

६. ग्रंथालयाची संकल्पना व बदलते स्वरूप

ग्रंथालय म्हणजे केवळ पुस्तकांचा संग्रह नसून ते ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंरक्षण आणि ज्ञानप्रसाराचे केंद्र आहे. पारंपरिक काळात ग्रंथालये मुद्रित ग्रंथांपुरती मर्यादित होती. मात्र माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आज ग्रंथालयांचे स्वरूप आमूलाग्र बदलले आहे.

आधुनिक ग्रंथालये ई-पुस्तके, ई-जर्नल्स, डिजिटल संग्रह, ऑनलाइन डेटाबेस आणि ओपन ॲक्सेस संसाधने पुरवित आहेत. डिजिटल ग्रंथालये आणि ई-रेपॉझिटरी यांच्या माध्यमातून दुर्मिळ आणि प्राचीन साहित्य जगभरातील संशोधकांसाठी उपलब्ध झाले आहे. आजच्या काळात डिजिटल ग्रंथालये, ई-संसाधने, ऑनलाइन डेटाबेस आणि रिपॉझिटरी यांच्या माध्यमातून माहिती अधिक व्यापकपणे उपलब्ध होत आहे. यामुळे अभिजात भाषांचे साहित्य सुरक्षित ठेवणे आणि प्रसारित करणे सुलभ झाले आहे.

७. अभिजात भाषा संवर्धनात ग्रंथालयाची भूमिका

७.१ ग्रंथसंपदा संकलन

ग्रंथालये अभिजात भाषांतील हस्तलिखिते, दुर्मिळ ग्रंथ, शिलालेखांचे प्रतिलेखन, टीका-भाष्ये, संशोधनग्रंथ आणि संदर्भ साहित्य यांचे पद्धतशीर संकलन करतात.

७.२ संरक्षण व जतन

प्राचीन ग्रंथ आणि हस्तलिखिते काळाच्या ओघात नष्ट होऊ नयेत यासाठी तापमान व आर्द्रता नियंत्रण, कीटकनाशक प्रक्रिया, बांधणी दुरुस्ती, मायक्रोफिल्मिंग आणि डिजिटायझेशन यांसारख्या तंत्रांचा वापर केला जातो.

७.३ डिजिटायझेशन व तंत्रज्ञानाचा वापर

डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अभिजात साहित्याचे डिजिटायझेशन केल्यामुळे ते दीर्घकाळ सुरक्षित राहते आणि जागतिक स्तरावर उपलब्ध होते.

७.४ संशोधन व संदर्भ सेवा

ग्रंथालये संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना बिब्लिओग्राफी, निर्देशिका, माहिती शोध सेवा आणि संशोधन सहाय्य पुरवितात.

७.५ प्रसार व जनजागृती

व्याख्याने, परिसंवाद, कार्यशाळा, ग्रंथप्रदर्शने, वाचन चळवळी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे अभिजात भाषांविषयी जनजागृती केली जाते.

८. ग्रंथपालांची भूमिका व जबाबदारी

ग्रंथपाल हे अभिजात भाषा संवर्धनाचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. त्यांनी अभिजात भाषांचे प्राथमिक ज्ञान आत्मसात करणे, हस्तलिखितशास्त्र, डिजिटायझेशन, मेटाडेटा निर्मिती आणि माहिती तंत्रज्ञानातील कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे. संशोधकांना योग्य मार्गदर्शन करणे आणि अभिजात भाषांच्या प्रचारासाठी पुढाकार घेणे ही त्यांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

ग्रंथपालांनी अभिजात भाषांचे ज्ञान, माहिती तंत्रज्ञान कौशल्य आणि संशोधन सहाय्य देण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. ते ज्ञानसंवर्धनाचे प्रमुख घटक आहेत.

९. अभिजात भाषा संवर्धनातील आव्हाने

निधीचा अभाव, प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता, वाचकांची घटती अभिरुची, प्राचीन लिपी समजण्यातील अडचणी आणि तांत्रिक पायाभूत सुविधांचा अभाव ही प्रमुख आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी शासकीय आणि अशासकीय संस्थांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

१०. भविष्यातील दिशा व उपाययोजना

शिक्षणक्रमात अभिजात भाषांचा समावेश, विशेष संशोधन केंद्रांची स्थापना, ग्रंथालयांना पुरेसा निधी, ग्रंथपालांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास अभिजात भाषांचे भविष्य सुरक्षित करता येईल.

११. निष्कर्ष (Conclusion)

अभिजात भाषा या भारतीय संस्कृतीचा अमूल्य आणि अनमोल वारसा आहेत. या भाषांचे जतन, संरक्षण आणि संवर्धन करण्यामध्ये ग्रंथालये आणि ग्रंथपालांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आणि अपरिहार्य आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या

साहाय्याने ग्रंथालये अभिजात भाषांना नवसंजीवनी देऊ शकतात आणि भारतीय ज्ञानपरंपरेचा गौरव पुढील पिढ्यांपर्यंत अखंडित ठेवू शकतात.

संदर्भ (References)

राणे, ग. (2015). भारतीय भाषा आणि संस्कृती. पुणे: विद्या प्रकाशन.

देशपांडे, स. (2018). ग्रंथालयशास्त्र : सिद्धांत व व्यवहार. मुंबई: हिमालय पब्लिशर्स.

कुलकर्णी, अ. “मराठी हस्तलिखितांचे जतन आणि शैक्षणिक ग्रंथालयांची भूमिका.” *महाराष्ट्र ग्रंथालय शोध पत्रिका* ८, क्र. १ (२०२४): ३३–४१.

Government of India. *Classical Languages of India.* New Delhi: Government of India, 2020.

Government of India, Ministry of Culture. *Scheme for Classical Languages of India.* New Delhi: Government of India, 2020.

Government of India, Ministry of Education. *Promotion and Preservation of Indian Languages: Policy Framework.* New Delhi: Government of India, 2023.

IFLA. *Guidelines for Preservation and Conservation in Libraries and Archives.* Hague: International Federation of Library Associations, 2015.

Kumar, K. *Library Organization and Information Services.* New Delhi: Vikas Publishing, 2017.

Patil, R. “Role of Digital Libraries in Preservation of Cultural Heritage Resources.” *DESIDOC Journal of Library & Information Technology* 41, no. 3 (2021): 210–216.

Ranganathan, S. R. *The Five Laws of Library Science.* Bangalore: Sarada Ranganathan Endowment, 1963.

Singh, J., and G. Kaur. “Digitization of Rare Collections in University Libraries: Challenges and Opportunities.” *International Journal of Information Studies* 12, no. 2 (2020): 45–53.

Subramanian, R. “Classical Languages and Their Contribution to Indian Knowledge Systems.” *Indian Historical Review* 43, no. 1 (2016): 85–102.

UNESCO. *Preservation of Cultural Heritage.* Paris: UNESCO, 2019.

UNESCO. *Preservation of Documentary Heritage: Guidelines for Libraries and Archives.* Paris: UNESCO, 2019.

Yadav, M. “Information Technology Applications in Modern Libraries.” *Journal of Library and Information Science* 10, no. 4 (2022): 55–63.

स्त्रीच्या वेदनेची काव्यात्म कहाणी- तिची तीन रूपे

प्रा. प्रकाश बाळू नाईक,
श्री शिव- शाहू महाविद्यालय, सरूड
मो. न. ८३७८८४९५९५ ई - मेल : naik.prakash22@gmail.com

अलीकडच्या काळात संपूर्ण जगभर स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह रूढ झालेला दिसतो. संपूर्ण जगभर स्त्रियांच्या प्रश्नांची वेगवेगळे माध्यमातून चर्चा होते आहे. स्त्रियांच्या मुक्तीची चळवळ गतिशील झाली आहे. राजकारण कला साहित्य या क्षेत्रात स्त्रियांचे प्रश्न केंद्रस्थानी येऊ लागले आहेत.मराठी साहित्यातही स्त्री वेदनेच्या अनुषंगाने विपुल प्रमाणात लेखन झाले आहे. अलीकडच्या काळात स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह रूढ झाला आहे. कथा, कादंबरी, आत्मकथन, नाटक याबरोबरच कविता या साहित्य प्रकारातून स्त्री प्रश्न चर्चेला येत आहेत. स्त्रियांच्या समग्र जीवनाची मांडणी साहित्यातून होत आहे. स्त्रियाही आपल्या भावभावनांचे अविष्कारण साहित्याच्या माध्यमातून करत आहेत. आधुनिक मराठी साहित्याचा विचार करता प्रारंभापासून स्त्रियांचे प्रश्न मर्यादित स्वरूपात का असेना साहित्यामध्ये चित्रीत केले जात होते. साठोत्तरी काळात स्त्रियांचे आत्मभान जागृत झाल्यानंतर स्त्रीवादी साहित्य लेखनाची चळवळ बहरली. विविध समाज गटातील स्त्रिया आपल्या वेदनांना साहित्याच्या माध्यमातून वाचा फोडू लागल्या. गेल्या दोन दशकांमध्ये स्त्रियांच्या प्रश्नाचे स्वरूप बदलले, जे प्रश्न पूर्वी होते ते अधिक टोकदार आणि नव्या रूपात पुढे येऊ लागले.

दुसऱ्या बाजूला स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारण्याच्या मानवतावादी विचारांची समाजामध्ये अलिकडे घुसळण होते आहे. परंतु स्त्रीच्या सुखदुःखाकडे,तिच्या जगण्याकडे, तिच्या संघर्षाकडे करुणेच्या नि:पक्ष दृष्टीने पाहण्याची वृत्ती मात्र समाजामध्ये अजूनही रुजलेली नाही. आधुनिक शिक्षणामुळे स्त्रीचा आत्मसन्मान जागृत झाला आहे. ती अन्याय-अत्याचार आणि शोषणाला नकार देत आहे. स्वतः ची ओळख केवळ स्त्री असण्यापेक्षा ती माणूस असली पाहिजे,या विचाराने ती भारावली आहे.माणूस बनण्याचा तिचा संघर्षशील प्रवास वर्तमानात सुरू आहे. असे असले तरीही स्त्रीच्या शोषणाचे संदर्भ मात्र बदलले आहेत. आधुनिक विचार पुढे आला असला तरीही स्त्रीकडे पाहण्याची पारंपरिक दृष्टी अद्यापही बदललेली नाही. तिचे शोषण सुरूच आहे. तिच्या वेदनांचा आलेख पूर्णतः पुसून टाकण्यात अपयश आले आहे. स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारण्याचा एक नवा मानवतावादी विचार आणि स्त्रीकडे पारंपरिक दृष्टीने पाहण्याचा विचार यामध्ये वर्तमान समाज अडकला आहे.स्त्री आणि पुरुषांची या प्रश्नाकडे पाहत असताना एक प्रकारची घुसमट होताना दिसते आहे. या पार्श्वभूमीवर कवी संतोष कांबळे यांचा 'तिची तीन रूपे' हा कवितासंग्रह महत्त्वाचा आहे. कारण या कवितासंग्रहातून स्त्रीकडे पाहण्याच्या पारंपरिक दृष्टीला छेद देणारी एक निकोप, निखळ अशी मानवतावादी नजर अधोरेखित होते.

स्त्रीच्या वेदनेची दखल घेणारे साहित्य आजच्या काळात लिहिले जाऊ लागले आहे.परंतु 'तिची तीन रूपे' हा कवितासंग्रह वैशिष्ट्यपूर्ण वाटतो. प्रस्तुत शोधनिबंधात या कविता संग्रहातील कवितांमधून कवीने मांडलेल्या स्त्री वेदनेच्या काव्यात्म कहाणीचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

'तिची तीन रुपे' मधील स्त्रीची वेदना-

'तिची तीन रूपे' हा कवितासंग्रह कवी संतोष कांबळे यांचा आहे. 2014 मध्ये प्रकाशित झालेल्या या कवितासंग्रहाने मराठी साहित्य जगताचे लक्ष वेधून घेतले आहे. या कवितांचा आशय, या कवितेतील शब्दकळा आणि या कवितेची शैली ही समकालीन कवितेमध्ये ठळकपणे उठून दिसणारी आहे. प्रस्तुत कवितासंग्रहाच्या कवितांचे तीन भाग आहेत. पहिला भाग 'बाई' या नावाचा असून त्यामध्ये 37 कविता आहेत. दुसरा भाग 'सई' या नावाचा असून यामध्ये 23 कविता आहेत तर तिसऱ्या 'आई' या भागात 15 कवितांचा समावेश आहे.

कोणताही कवी किंवा कलावंत त्या त्या काळाचा आवाज असतो.कवीच्या समकालाचा त्याच्या लेखनावर मोठा प्रभाव पडतो.त्या प्रभावातून पुढे आलेल्या संस्कारांना पचवून कलावंत आपली कला निर्माण करतो.लेखन कलाही त्याला अपवाद नाही.भोवताल च्या वास्तवाला भिडणे हे कोणत्याही कलावंताचे काम असते. संतोष कांबळे हे सुद्धा

भोवतालच्या वास्तवाला भिडतात आणि सभोवतालच्या वास्तवाच्या परिघात असणाऱ्या स्त्रियांच्या विविध भावछटांना आपल्या कवितेमध्ये गुंफतात.हे करत असताना स्त्रीची दुःखे,त्या दुःखाची नानाविध रूपे हे अत्यंत तरल आणि संवेदनशीलतेने आपल्या शब्दात मांडतात.

कवी संतोष कांबळे यांच्या या कवितासंग्रहातील कवितांचे मुख्य सूत्र म्हणजे बाईपणाची वेदना आहे. खरंतर स्त्री म्हणजे या विश्वाला पडलेलं एक सुंदर स्वप्न आहे. सृजनाचे प्रतीक म्हणजे स्त्री असते. स्त्री नवनिर्मितीक्षम असते. तिच्या भावभावना, तिच्या दुःख व्यथा, तिचं जगणं आणि एकूणच तिच्या मनोविश्वातील अनेक भावनिक आंदोलनांचा ठाव कवी संतोष कांबळे यांच्या या कवितेतून घेण्यात आला आहे.विधवा असणाऱ्या स्त्रीच्या दुःखांचे गाणे या कवीने गायले आहे.

"दोन तळींच्या मध्यात दाणे जाती भरडून,
तशा विखारी नजरा देह जातो चिरडून"

या ओळी भयाण समाजवास्तव मांडतात.नवऱ्याच्या मागे जगताना स्त्रीला विविध पातळीवर संघर्ष करावा लागतो.विधवा स्त्रीच्या देहाला समाजातल्या विकृतांच्या विखारी नजरा कशा छळतात, हे कवीने या ठिकाणी मांडले आहे.

'कच्ची पपई खाऊन घे' ही कविता स्त्री देहाची लचके तोडणाऱ्या वासनांध गिधाडांचा पर्दाफाश करते.बाईकडे केवळ मादी म्हणून बघितले जाते व मादीला केवळ गादीवर शय्यासोबत करण्यासाठी वापरले जाते. तिचे मन, भावभावना,सन्मान, प्रतिष्ठा पायदळी तुडवून तिचा फक्त भोग घेणारी ही प्रवृत्ती रेखाटताना कवीने लिहिले आहे की,

" तिला वाटतं कुणी वेडा देईल सुद्धा 'दिल',
पण, सगळेच देत असतात तिच्या गर्भपाताच बिल,
सगळे म्हणतात- 'गपगुमान गादीवरती नीज'
इच्छा असो नसो तरी पावसामध्ये भीज!
कच्ची पपई खाऊन घे! तुझी तू मोकळी होऊन ये!" वासनेची शिकार बनलेल्या बाईची ही जीवघेणी वेदना संतोष कांबळे यांनी मोठया ताकतीने मांडली आहे.

ज्या मुलीने बाप गमावला आहे तिच्याही दुःखाकडे कवी संतोष कांबळे अपार करूणेने पाहतात.

" तू गेल्यावर जीव विचारा झाला पोरका बाबा,
अजून तू आहेस भासतो भास सारखा बाबा!"

या कवितेतून पितृछत्र हरपलेल्या मुलीच्या काळीजवेणा कवीने रेखाटली आहे.

स्त्रीचा जन्मच हा एक वेदनेची कहाणी असतो, हे वास्तव कवीने या कवितासंग्रहातून मांडले आहे. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर तिला स्त्री म्हणून तडजोडच करावी लागते. तिच्या व्यथांना आवाज मिळत नाही. तिच्या सर्व व्यथा आयुष्यभरासाठी मुक्या होतात. हे सांगताना कवी लिहितो,

"असा पोरीचा जलम मुकी मुकी तिची कथा,
आसवांची इंद्रायणी तिची बुडविते गाथा!"

स्त्री जन्माच्या आदिम वेदनेचा आलेख कवीने आपल्या अर्थगर्भ शब्दातून रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

देशासाठी प्राणाचे बलिदान देणाऱ्या भावाच्या बहिणीचे दुःख कवीला अस्वस्थ करते.तिच्या काळजातल्या वेदनेला कवी शब्दबद्ध करतो. भावा बहिणीच्या नात्यातली उत्कटता,त्या नात्यातील पावित्र्य अवघ्या दोन ओळीत कवी अत्यंत परिणामकारकतेने वाचकांपर्यंत पोहोचविताना म्हणतो,

" राखी पुनवेचा सण राखी बांधू मी कोणाला?
भाऊ लढताना गेला सांगू कसं मी मनाला?"

बाईपणाच्या दुःखाची विविध रंगी रूपे , कवींनी या कवितासंग्रहातून रेखाटली आहेत. बाईपणाच्या दुःखाचा हा शब्दरूप अविष्कार आहे.

स्त्रीच्या मूक वेदनांना आपल्या शब्दकळेतून वाचा फोडणारी कविता म्हणून 'तिची तीन रुपे' या कवितासंग्रहाकडे पहावे लागेल. 'बाई' या भागातील सर्वच कवितांमधून बाईपणाच्या दुःख व्यथांची वास्तव मांडणी कवीने केली आहे.

'बा रे साजणा कसाया' या कवितेत कवीने म्हटले आहे,

" ओढ कत्तलखान्यात माझ्या काळजाची गाय,
बघ जाईल पळून घट्ट बांध तिचे पाय!"

बाईच्या जगण्यातल्या बहुपेडी दुःखव्यथांचा वास्तव आलेख कवी चित्रित करताना दिसतो. या कवितासंग्रहातील प्रत्येक कवितेतून स्त्रीच्या एका आदिम वेदनेचा सूर वाचकांच्या प्रत्ययास येतो.

या कविता संग्रहातल्या प्रत्येक कवितेतून कवी बाईपणाच्या दुःखाची विविध रूपे चित्रित करतो. बाईला समजून घेणे आणि करुणेच्या नजरेने तिच्या संपूर्ण आयुष्याचा वेध घेणे यासाठी विशाल हृदय आणि तितकीच संवेदनशीलता आवश्यक असते. कवीच्या या सर्वच कवितांमधून या संवेदनशीलतेचा प्रत्यय येत राहतो. म्हणूनच या कवितासंग्रहातली कविता अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि मनाला भावणारी आहे.

' आई' या भागातील कविता सुद्धा अशाच हृदयस्पर्शी आहेत. बापा सोबत आई अविरतपणे कष्ट झेलत असते आणि आपल्या मुलांसाठी जगण्याच्या वाटेवर संघर्ष करत असते. तिच्या संघर्षाला प्रत्येक मुलगा सलाम करतो.त्या संघर्षातून कोणत्याच आईचा कोणताच मुलगा मुक्त होऊ शकत नाही.

"माय साबर काटेरी बाप कुपाटीचा काटा,
उभे वढाळ ढोरांच्या दोन्ही आडवाया वाटा"

अशा शब्दात कवीने मायबापाच्या आयुष्यात असलेल्या वेदनेला शब्दबद्ध केले आहे. जन्म देऊन अनंताच्या प्रवासाला गेलेल्या आई विषयी लिहिताना सुद्धा कवी अत्यंत भावूक होतो. आता आई आपल्या सोबत नाही,उरल्यात केवळ गडद अशा खंतावणाऱ्या आठवणी! ही खंत व्यक्त करताना कवीच्या लेखणीतून शब्द उतरतात,

" जन्म देऊन जाण्याची केलीस घाई गं,
आई तुझा गं चेहराही आठवत नाही" अशा शब्दांत कवी आईच्या आठवणी जागवत राहतो. आई हा प्रत्येक माणसाच्या काळजातला हळवा कोपरा असतो.आपल्या कष्टकरी आईला अजरामर करताना कवी म्हणतो,

"जागोजागी छत्तीस ठिगळ जोडून आपल्या साडीला, कोयता घेऊन माय निघाली बापा संग तोडीला"

दारिद्र्याशी दोन हात करत जी आई आपल्या मुलांना मोठं करण्यासाठी अविरत संघर्ष करते. परिस्थितीवर मात करण्यासाठी झगडत राहते. त्या आईच्या जीवनातील भीषण वास्तव कवी मांडतो.

कवी आई विषयक भावना व्यक्त करत असताना कष्टकरी आईची एक साजिवंत प्रतिमा आपल्या कवितेतून उभी करताना दिसतो. आपल्या पिलांसाठी कष्ट करणारी संतोष कांबळे यांच्या कवितेतील आई वाचकांच्या काळजाचा ठाव घेते.

" तिच्या पायातली भेग गंगा होऊन वाहते,
चंद्र कुंकवाचा भाळी नित्य पौर्णिमा नहाते"

या ओळीतील प्रतिमा अत्यंत मर्मभेदी आहे.आईच्या पायातल्या भेगेला गंगेची प्रतिमा योजणे हे अफलातून आहे. कवीने अशा विविध प्रतिमांच्या माध्यमातून आपल्या भावनांना शब्दरूप दिले आहे. प्रतिमांचा अत्यंत कलात्मक आणि अर्थवाही वापर या कवितासंग्रहातून दिसून येतो.

उपरोक्त विवेचनावरून हे स्पष्ट होते की, कवी संतोष कांबळे यांचा 'तिची तीन रूपे' हा कवितासंग्रह स्त्रीच्या वेदनेची कहाणी सांगणारा आहे. हा कवितासंग्रह मराठी साहित्य जगतास दखल घ्यायला लावणारा आहे. या कवितेचा आशय हा स्त्री जीवनाला केंद्रित अशा स्वरूपाचा आहे. स्त्रीच्या आयुष्यामध्ये वेगवेगळ्या टप्प्यांवर तिला अत्यंत तीव्र

आणि टोकदारपणे दुःखाचा सामना करावा लागतो.इथली व्यवस्था पदोपदी तिचे शोषण करत असते.स्त्रीला सन्मान मिळायची गोष्ट तर दूरचीच आहे परंतु किमान माणूस म्हणूनही तिला स्वीकारले जात नाही. समाजातील विसंगतीवर कवी संतोष कांबळे यांनी या कविता संग्रहातून नेमकेपणाने बोट ठेवले आहे. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीच्या दुःखाच्या झळा वेगवेगळ्या स्वरूपाच्या असतात. परंतु स्त्रीला जन्मापासून मृत्यूपर्यंत एका दुःखासोबतच जगावे लागते. तिच्या देह मनाशी जोडल्या गेलेल्या वेदना, तिच्या काळजातील बोच आणि तिच्या मनातील सल संतोष कांबळे प्रस्तुत कवितासंग्रहातून अतिशय समर्पकपणे रेखाटताना दिसतात.

'तिची तीन रूपे' हा कवितासंग्रह स्त्री च्या विविध रंगी दुःखाचा कोलाज आहे. स्त्रीच्या सनातन वेदनेला स्पर्शिणारा आणि अतिशय उत्कट व तरल अशी अभिव्यक्ती असलेला हा कवितासंग्रह सर्वांगानी वेगळा ठरतो.अत्यंत प्रभावी व उत्कट शब्दकळा,समर्पक आणि अर्थपूर्ण प्रतिमा या कवितासंग्रहातून प्रत्यय येतात. वाचकांच्या मनाचा ठाव घेणारा हृदयस्पर्शी आशय हे सुद्धा महत्त्वाचे वैशिष्ट्य या कवितासंग्रहाचे आहे. या कवितासंग्रहातील अनेक कवितांमधून नादमयता आणि लयबद्धता असल्याचे दिसते.यामुळे या कवितांना एक वेगळे परिमाण लाभले आहे.

लोकमानसात रूढ असलेली ओवी सारखी रचना या कवितासंग्रहात आढळते. त्याचबरोबर काही गझल फॉर्म मधील रचनासुद्धा या कवितासंग्रहामध्ये दिसतात. मुक्तछंदातील कविताही तितक्याच आशयघन आणि परिणामकारकपणे वाचकांच्या काळजाला भिडतात. रचनेतले वैविध्य ही या कवितासंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. परंतु त्या सर्वच रचनांमधून स्त्रीच्या दुःखाची तीव्रतर अशी अभिव्यक्ती प्रगट होताना दिसते. आशयाच्या अंगाने विचार केला तर 'तिची तीन रूपे' स्त्री ही जन्मापासून मृत्यूपर्यंत अनेक रूपामध्ये आपल्या भूमिका समर्थपणे वठवते. तिच्या या अनंत रूपांचा कलात्मक आविष्कार या कविता संग्रहातून होतो. हा कवितासंग्रह स्त्रीच्या दुःखाला केंद्रवर्ती ठेवतो. परंतु असे असले तरीसुद्धा स्त्रीच्या भावभावनांची अनेक रूपे या कवितांमधून पहावयास मिळतात.स्त्रीच्या प्रेम,करुणा,वात्सल्य अशा अनेक भावछटा कवीने अत्यंत सूक्ष्मपणे टिपण्याचा प्रयत्न केला आहे.

एकूणच संतोष कांबळे यांचा 'तिची तीन रूपे' हा कवितासंग्रह मराठी साहित्यामधील एक लक्षणीय स्वरूपाचा आहे. भाषा आणि आशय या दृष्टीनेही हा अतिशय महत्त्वाचा कवितासंग्रह आहे. मराठी कवितेच्या प्रांतात स्त्रियांच्या वेदनेची कविता विपुल प्रमाणात लिहिली गेली आहे. परंतु स्त्रियांच्या वेदनेचा काव्यात्म वेध घेणारा आणि स्त्रियांच्या वेदनेची काव्यात्म कहाणी वाचकांसमोर ठेवणारा कवितासंग्रह म्हणून या कवितासंग्रहाची नोंद मराठी साहित्य विश्वाला घ्यावी लागणार आहे.

संदर्भ –

'तिची तीन रूपे'- संतोष कांबळे, कुसुमाग्रज प्रकाशन, नाशिक प्रथमावृत्ती 2014

जागतिकीकरणाच्या युगात अभिजात भाषा–साहित्य : सांस्कृतिक अस्तित्व व सामाजिक परिवर्तन

सहा. प्रा. तेजल महादेव कोळी
सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग, श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, सांगली, महाराष्ट्र
मोबाईल नं. : 9356472024
Email : kolitejal45@gmail.com

घोषवारा –

जागतिकीकरण ही आधुनिक समाजाची एक सर्वव्यापी प्रक्रिया असून तिने भाषा, साहित्य, संस्कृती आणि सामाजिक संरचना यांवर दुर्गामी परिणाम घडवून आणले आहे. अभिजात भाषा व साहित्य हे मानव संस्कृतीच्या ऐतिहासिक स्मृती, ज्ञान परंपरा आणि सांस्कृतिक अस्मितेचे मूलभूत स्तंभ मानले जातात. प्रस्तुत संशोधनात जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर अभिजात भाषांच्या सांस्कृतिक अस्तित्वाचा, त्यांच्या साहित्यिक परंपरेतील रूपांतरण प्रक्रियेचा आणि सामाजिक परिवर्तनातील त्यांच्या गतिशील भूमिकेचा बहुआयामी अभ्यास आला आहे.

संशोधनातून असा निष्कर्ष प्राप्त होतो की अभिजात भाषा व साहित्य हे स्थिर अवशेष नसून सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणारी सजीव सांस्कृतिक प्रणाली आहे. योग्य धोरणात्मक हस्तक्षेप, शैक्षणिक पुनर्रचना आणि तंत्रज्ञान आधारित संवर्धनाच्या माध्यमातून अभिजात भाषांचे सांस्कृतिक टिकाऊपण आणि सामाजिक प्रासंगिकता समकालीन जागतिक संदर्भात अधिक दृढ करता येऊ शकते.

प्रस्तुत संशोधनात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे अभिजात भाषा व साहित्यावर होणाऱ्या परिणामांचा तसेच सामाजिक परिवर्तनातील त्यांच्या भूमिकेचा अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतींचा अवलंब करण्यात आला असून पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके व डिजिटल स्रोत यांमधील दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात आला आहे. अभ्यासातून असे आढळून येते की जागतिकीकरणामुळे अभिजात साहित्याच्या प्रसारासाठी नव्या संधी उपलब्ध झाल्या असल्या तरी बाजारप्रधान व लोकप्रिय संस्कृतीच्या प्रभावामुळे अभिजात भाषांचे अस्तित्व काही अंशी आव्हानात्मक बनले आहे.

कीवर्ड्स –

जागतिकीकरण, अभिजात भाषा, साहित्य, सामाजिक परिवर्तन, सांस्कृतिक टीकाव

प्रस्तावना –

21 व्या शतकात जागतिकीकरण ही मानवजातीच्या जीवनावर सर्वाधिक प्रभाव टाकणारी प्रक्रिया ठरली आहे. आर्थिक उदारीकरण, औद्योगिकीकरण, माहिती तंत्रज्ञान क्रांती, इंटरनेट, सोशल मीडिया आणि जागतिक व्यापार यांमुळे संपूर्ण जग एकमेकांशी जोडले गेले आहे. आज जग भौगोलिक दृष्ट्या नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक आणि आर्थिक दृष्ट्या ही परस्परावलंबी बनले आहे.

जागतिकीकरण ही एक व्यापक सामाजिक – आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक प्रक्रिया जागतिकीकरणाचा प्रभाव भाषांवर आणि साहित्यावर विशेषतः तीव्रतेने दिसून येतो.

इंग्रजी सारख्या जागतिक भाषांचे वर्चस्व वाढल्यामुळे अनेक स्थानिक व अभिजात भाषांचे सामाजिक स्थान कमी होत आहे. शिक्षण, प्रशासन, विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यवसाय या क्षेत्रात जागतिक भाषांना प्राधान्य दिले जात असल्याने अभिजात भाषांचा वापर मर्यादित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी भाषिक विविधतेला

धोका निर्माण झाला असून सांस्कृतिक अस्मितेच्या टिकावाचा प्रश्न पुढे आला आहे. तथापि जागतिकीकरण ही केवळ भाषिक व सांस्कृतिक संकटाची प्रक्रिया नसून ती नव्या शक्यता निर्माण करणारीही आहे.

डिजिटल तंत्रज्ञान, ई – पुस्तके, ऑनलाइन शैक्षणिक मंच, आंतरराष्ट्रीय संशोधन सहकार्य आणि भाषांतर प्रकल्पामुळे अभिजात भाषा आणि साहित्य जागतिक स्तरावर पोहोचू लागले आहे. त्यामुळे अभिजात भाषांचे पुनरुज्जीवन, संवर्धन आणि आधुनिक संदर्भात पुनरस्थापन करण्याच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. म्हणूनच प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये जागतिकीकरणाच्या संदर्भात अभिजात भाषा व साहित्याचे सामाजिक परिवर्तनातील योगदान, त्यांच्या समोरील आव्हाने, तसेच सांस्कृतिक टिकाव राखण्यात त्यांचे महत्त्व यांचा सखोल व विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे. आधुनिक जागतिक संदर्भात अभिजात भाषांचे स्थान, त्यांचे संवर्धन आणि पुनरुत्थनासाठी आवश्यक उपाय यांचा विचार करणे हे या संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

संशोधन पद्धती –

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. द्वितीयक माहिती स्त्रोत जसे की, पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके, अहवाल आणि ऑनलाईन स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. तुलनात्मक विश्लेषण पद्धतीद्वारे जागतिकीकरण पूर्व आणि जागतिकीकरणानंतरच्या स्थितीचे तुलनात्मक अध्ययन करण्यात आले आहे.

संशोधनाची उद्दिष्टे -

1. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अभिजात भाषा आणि साहित्याची भूमिका अभ्यासणे.
2. अभिजीत साहित्याचा सांस्कृतिक अस्तित्वावर होणारा प्रभाव विश्लेषित करणे.
3. सामाजिक परिवर्तनात अभिजात साहित्याची भूमिका स्पष्ट करणे.
4. जागतिकीकरणामुळे अभिजात भाषांना येणाऱ्या आव्हानांचा अभ्यास करणे.
5. अभिजीत भाषांच्या संवर्धनासाठी उपाययोजना सुचवणे.
6. जागतिकीकरणाच्या संदर्भात भाषा संरक्षणासाठी उपाय सुचवणे.
7. सामाजिक परिवर्तनामध्ये अभिजीत भूमिका स्पष्ट करणे

संशोधनाचे महत्त्व –

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर भाषा व साहित्य यांचे सामाजिक महत्त्व अधिक व्यापक झाले आहे. जागतिकीकरणामुळे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक क्षेत्रात वेगाने परिवर्तन घडवून येत आहे. या परिवर्तनाच्या प्रक्रियेत अभिजात भाषा आणि साहित्याचे स्थान, भूमिका आणि अस्तित्व यावर परिणाम होत आहे. त्यामुळे या विषयावरील संशोधन अत्यंत महत्त्वाचे ठरते. अभिजात भाषा आणि साहित्य हे कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचे मूलभूत आधारस्तंभ असतात. जागतिकीकरणामुळे इंग्रजी व आंतरराष्ट्रीय भाषांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. त्यामुळे या संशोधनातून अभिजीत भाषांच्या संरक्षणाची गरज अधोरेखित होते आणि सांस्कृतिक वारसा टिकवण्यासाठी धोरणात्मक उपाय सुचवता येतात.

संशोधनाची व्याप्ती –

या संशोधनाची व्याप्ती जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर अभिजात भाषा आणि साहित्याच्या विविध पैलूंच्या विश्लेषणावर केंद्रित आहे. या अभ्यासात अभिजात भाषांच्या भाषिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा सखोल अभ्यास केला जाईल तसेच आधुनिक समाजावर त्यांच्या प्रभावाचे विश्लेषण केले जाईल. या संशोधनाची व्याप्ती जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे अभिजात भाषा आणि साहित्यावर होणाऱ्या भाषिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परिणामांच्या अभ्यासापूरती मर्यादित आहे. या अभ्यासात अभिजात भाषांच्या ऐतिहासिक परंपरा, साहित्यिक योगदान आणि आधुनिक समाजातील त्यांचे स्थान यांचे विश्लेषण करण्यात येईल या संशोधनातून अभिजात भाषा

आणि साहित्याच्या सांस्कृतिक अस्तित्व टिकवण्यातील योगदान आणि सामाजिक परिवर्तनातील त्यांच्या भूमिकेचे विश्लेषणात्मक मूल्यांकन करण्याचा प्रयत्न केला जाईल.

संशोधनाच्या मर्यादा –

या संशोधनास काही बौद्धिक आणि व्यावहारिक मर्यादा आहेत. अभिजात भाषा आणि साहित्याचा अभ्यास अत्यंत व्यापक असल्यामुळे सर्व अभिजात भाषांचा आणि त्यांच्या साहित्याचा सविस्तर अभ्यास करणे शक्य नाही त्यामुळे संशोधन निवडक उदाहरणांपुरतेच मर्यादित राहील. संशोधन मुख्यतः निवडक अभिजात भाषा व साहित्यावर आधारित असेल, त्यामुळे निष्कर्ष सार्वत्रिक स्वरूपात लागू होईलच असे नाही. दुसरे म्हणजे जागतिकीकरणाच्या सामाजिक व संस्कृती परिणाम हा सतत बदलणार आणि बहुआयामी असल्यामुळे त्याचे अचूक मापन करणे कठीण आहे. तसेच ऐतिहासिक ग्रंथ, साहित्यिक स्त्रोत आणि समाजशास्त्रीय डेटा यांची उपलब्धता मर्यादित असू शकते, ज्यामुळे विश्लेषणात मर्यादा येऊ शकतात.

जागतिकीकरणाचा अभिजात साहित्यावर परिणाम :

आधुनिक माध्यमांमुळे अभिजात साहित्य नव्या वाचकांपर्यंत पोहोचत आहे. मात्र बाजारपेठप्रधान संस्कृतीमुळे लोकप्रिय साहित्याला अधिक महत्त्व मिळत असून अभिजात साहित्याला दुय्यम स्थान मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही परिस्थिती चिंतनास प्रवृत्त करणारी आहे.

सांस्कृतिक ओळख जपण्यात अभिजात साहित्याची भूमिका :

अभिजात साहित्य समाजाच्या सांस्कृतिक स्मृती जपते. परंपरा, मूल्ये आणि सामाजिक रचना यांचे प्रतिबिंब त्यामध्ये आढळते. जागतिकीकरणाच्या युगात ही साहित्यपरंपरा सांस्कृतिक अस्तित्व टिकवून ठेवण्याचे कार्य करते.

सामाजिक परिवर्तन आणि अभिजात साहित्य :

अभिजात साहित्य समाजातील बदलांना विरोध करणारे नसून ते बदलांना अर्थपूर्ण दिशा देते. सामाजिक न्याय, मानवतावाद आणि नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करून ते समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला चालना देते.

समाजशास्त्रातील महत्त्व -

जागतिकीकरणाच्या युगात अभिजात भाषा आणि साहित्य : सांस्कृतिक अस्तित्व व सामाजिक परिवर्तन या विषयाचे समाजशास्त्रात विशेष महत्त्व आहे, कारण हा विषय समाजातील संस्कृती, भाषा आणि सामाजिक संरचना यातील परस्पर संबंध स्पष्ट करतो. अभिजीत भाषा आणि साहित्य समाजाच्या ऐतिहासिक स्मृती, सामूहिक चेतना आणि सामाजिक मूल्यांची निर्मिती करतात, त्यामुळे त्यांचा अभ्यास समाजाच्या दीर्घकालीन विकास प्रक्रियेचे आकलन करण्यास मदत करतो.

भाषिक वर्चस्व, सांस्कृतिक वर्चस्व आणि सामाजिक सत्ता – संबंध यांचे विश्लेषण करण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त ठरतो, कारण भाषा ही सामाजिक सत्ता आणि ओळखीचे प्रभावी साधन आहे. म्हणूनच हा संशोधनाविषयी सांस्कृतिक समाजशास्त्र, भाषिक समाजशास्त्र आणि सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासासाठी सैद्धांतिक तसेच व्यावहारिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण आहे.

जागतिकीकरण आणि अभिजात भाषा –

जागतिकीकरणामुळे इंग्रजी सारख्या जागतिक भाषांचे वर्चस्व वाढले आहे. त्यामुळे संस्कृत, तमिळ, मराठी, प्राचीन ग्रीक, लॅटिन यांसारख्या अभिजात भाषांच्या वापरात घट दिसून येते. तथापि डिजिटल माध्यमे, शैक्षणिक संस्था आणि सांस्कृतिक चळवळी यांच्या माध्यमातून अभिजात भाषांचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सुरू आहे.

अभिजात साहित्य आणि सांस्कृतिक अस्तित्व –

अभिजात साहित्य हे समाजाच्या मूल्य, परंपरा, धर्म तत्त्वज्ञान आणि इतिहासाचे प्रतिबिंब असते. जागतिकीकरणामुळे विविध संस्कृतींचा परस्पर संपर्क वाढला असला तरी स्थानिक साहित्य आणि परंपरा टिकवणे हे

सांस्कृतिक अस्तित्वासाठी आवश्यक आहे. अभिजात साहित्याच्या अभ्यासामुळे सांस्कृतिक ओळख मजबूत होते आणि पिढ्यानपिढ्या ज्ञानाचा वारसा टिकून राहतो.

परिवर्तन आणि साहित्याची भूमिका –

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील रचना, मुले, संस्था आणि जीवनशैलीतील बदल होय. अभिजीत साहित्याने समाजाला नैतिक मूल्ये, सामाजिक न्याय, समता आणि मानवतावाद यांचा संदेश दिला. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे समाजात नवीन विचार, तंत्रज्ञान आणि आर्थिक संधी निर्माण झाल्या आहेत. या प्रक्रियेत साहित्याने परिवर्तनाला दिशा देण्याची भूमिका बजावली आहे.

अभिजात भाषांच्या साहित्य संशोधनाची संकल्पना –

जागतिकीकरणाच्या युगात अभिजात भाषा व साहित्य यांचे संशोधन हे केवळ ऐतिहासिक दस्तऐवजांचे अध्ययन नसून ते भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांच्यातील बौद्धिक संवादाचा अभ्यास म्हणून समजले जाते. अभिजात साहित्य हे समाजाच्या सामूहिक चेतनेचे प्रतिबिंब असून ते सांस्कृतिक परंपरा आणि आधुनिक परिवर्तन यांच्यातील दुवा निर्माण करते.

अभिजात साहित्य संशोधनाची संकल्पना म्हणजे –

* परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील ताण–तणाव समजून घेणे.
* सांस्कृतिक वारशाचे आधुनिक सामाजिक संदर्भात पुनरस्थापन करणे.
* जागतिक संदर्भात स्थानिक भाषिक अस्मितेची पुनर्रचना करणे.

निष्कर्ष –

जागतिकीकरणाच्या प्रवाहात आधुनिक भाषा, तंत्रज्ञान आणि बाजार व्यवस्थेचे वर्चस्व वाढत असताना अभिजात भाषा व साहित्य आहे केवळ ऐतिहासिक वारसा न राहता, ते आधुनिक समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचे जिवंत आधारस्तंभ म्हणून पुढे येत आहेत. या संशोधनातून असे स्पष्ट होते की, अभिजात साहित्य हे परंपरा आणि आधुनिकतेतील दुवा असून, ते समाजाला भूतकाळाशी जोडून भविष्याची दिशा देणारे बौद्धिक साधन आहे.

याशिवाय डिजिटल तंत्रज्ञानामुळे अभिजात ग्रंथांचे जतन, प्रसार आणि जागतिक संवाद शक्य झाल्याने अभिजात साहित्याला नवसंजीवनी मिळत आहे. त्यामुळे अभिजात भाषा आणि साहित्य हे सामाजिक परिवर्तनाचे प्रेरक घटक ठरून जागतिक ज्ञानप्रणालीत स्थानिक संस्कृतीचा सशक्त आवाज निर्माण करतात.

संदर्भ सूची –

1. देशपांडे, ग. न. (2005)मराठी भाषा आणि समाज. पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन
2. खरे, दि. मा. (2001) भाषा, संस्कृती आणि समाज. मुंबई : लोकप्रिय प्रकाशन
3. पटवर्धन, म. वी. (2010) भारतीय साहित्य आणि सांस्कृतिक परंपरा. नागपूर : विदर्भ साहित्य संघ
4. कर्णिक, स. श. (1998) सांस्कृतिक परिवर्तनाचे समाजशास्त्र. पुणे : मेहता पब्लिशिंग
5. कुलकर्णी, रा. – भारतीय साहित्य परंपरा
8. विविध संशोधन लेख व नियतकालिके
9. कुलकर्णी, अ. न. – भारतीय अभिजात साहित्याची परंपरा.
10. जोशी, म. रा. – संस्कृत व प्रादेशिक अभिजात साहित्य.
11. Pollock, Sheldon. The Language of the Gods in the World of Men. University of California Press.
12. Winternitz, M. – History of Indian Literature. Motilal Banarsidass

मराठी अभिजात भाषा आणि साहित्य- भूत, वर्तमान आणि भविष्य

प्रा. डॉ. सविता अशोक माळी
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय,
कडेगांव
Phone No. 9766458476 Email Id- drsavitamali17@gmail.com

प्रस्तावना

संतांनी आपल्या साहित्यातून मराठी भाषेचा महिमा वर्णन केला आहे. संत ज्ञानेश्वर म्हणतात 'माझा मराठीची बोलू कौतुके । परी अमृतात ही पैजा जिंके । ऐसे अक्षरे रसिके । मेळवीन ।।.' अमृताहून गोड असणारी मराठी भाषा आज अभिजात मराठी भाषा म्हणून नावरूपाला आली. अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही खूप मोलाची बाब आहे. कारण अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी कोणत्याही भाषेला पहिला निकष असा आहे की, या भाषेला पंधराशे ते दोन हजार वर्षातील साहित्याचा इतिहास असावा. तसेच प्राचीनत्वाबरोबरच हा साहित्याचा वारसा पुढे चालला पाहिजे. त्याचबरोबर त्या भाषेतील साहित्य स्वयंभू असायला हवे. केवळ भाषांतरित साहित्य व इतर बोलीतील साहित्यातून प्रेरणा घेतलेली नसावी. त्याचबरोबर ती भाषा प्रवाही असायला हवी. कोणतीही भाषा प्रवाही असेल तर टिकते अन्यथा ती संपुष्टात येते. या प्रवाहीपणामुळे भाषेत नवीन शब्दांची भर पडते. जुन्या शब्दांची जागा नवे शब्द घेतात आणि सहजच आपण प्राचीन भाषा व आधुनिक भाषा असा भेद करू शकतो. या सर्व निकषांच्या कसोटीवर उतरणारी ती अभिजात भाषा म्हणून नुकतेच केंद्र सरकारने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन मराठी भाषेबरोबरच महाराष्ट्राचाही गौरव केला आहे.

भाषा ही सामाजिक संस्था आहे. भाषा केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाची सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक व ऐतिहासिक जीवनदृष्टी प्रतिबिंबीत करणारे प्रभावी माध्यम आहे. मराठी भाषेला दीर्घकालीन, समृद्ध आणि अखंड साहित्यपरंपरा लाभलेली आहे. अशा भाषेचा भूत, वर्तमान आणि भविष्याचा अभ्यास करणे काळाची गरज आहे.

उद्दिष्टे

१. मराठी भाषेची अभिजात परंपरा स्पष्ट करणे.
२. प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक साहित्याचा अभ्यास करणे.
३. मराठी भाषेला भविष्यात कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागले याचे विचार मंथन करणे.

मराठी भाषेचा भूतकाळ

प्राचीन काळात प्राकृत ही स्वतंत्र भाषा समजण्याचा संप्रदाय अनेक दिवसापासून होता. महाराष्ट्री शौरसेनी, मागधी व पैशाची या सर्व भाषा प्राकृत होत्या. ही प्राकृत म्हणजेच महाराष्ट्री किंवा प्राचीन मरहाठी भाषा होय. 'गाथा सप्तशती' हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृतमधील असून तो ज्ञानेश्वरी व यादवकाळाच्या सुमारे एक सहस्त्रक आधीचा आहे. प्रवरसेनाचे 'सेतूकाव्य' गौडवध, राजशेखरची 'कर्पूर मंजिरी' हे ग्रंथ आणि गुनाढ्याचे पैशाची भाषेतील 'बृहत्कथा' हे ग्रंथ मराठीचे प्राचीनत्व सिद्ध करतात. यादव काळात मराठी भाषा स्वतंत्र स्वरूपात आकार घेऊ लागली असून तिच्या भाषिक आणि साहित्यिक अस्तित्वाचे ठोस पुरावे उपलब्ध होतात. महाराष्ट्री प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांच्या प्रभावातून विकसित होत असलेली मराठी या काळात लोकभाषा म्हणून प्रस्थापित होऊ लागली.

या कालखंडात मराठी भाषेचा प्रमुख आधार शिलालेख, ताम्रपट आणि राजकीय दस्तऐवज आहेत. जरी शिलालेखात संस्कृत भाषेचा प्रभाव अधिक असला तरी व्यवहारातील मराठी शब्दरचना वाक्प्रयोग आणि ध्वनिरचना स्पष्टपणे जाणवते. भाषिक दृष्टीने पाहता १०व्या व १२व्या शतकातील मराठीमध्ये अपभ्रंशाचा प्रभाव प्रकर्षाने दिसतो. शब्दरचना साधी असून क्रियापदाचे रूप आजच्या मराठीपेक्षा वेगळे आढळते. उदा. 'श्रवणबेळगोळचा शिलालेख' हा मराठी भाषेतील सर्वात प्राचीन लेखी पुरावा मांडला जातो. 'श्री चामुंडराये करवियले' यासारख्या वाक्यातून मराठी

भाषेतील क्रियापद रचनेचा प्रारंभीक पुरावा देता येईल. यावरून यादवकालीन मराठी शिलालेखाची पायाभरणी या शिलालेखातून झाल्याचे दिसते.

या काळातील मराठी भाषा केवळ शासन दरबारी किंवा साहित्याची भाषा नसून ती शेतकरी, व्यापारी, कारागिर आणि सामान्य समाजघटकांची भाषा होती. त्यामुळे या सर्व क्षेत्राशी संबंधित शब्द मोठ्या प्रमाणावर आढळतात. हीच लोकाभिमुखता पुढे संत साहित्याच्या उदयाला पोषक ठरली. यानंतरचा काळ हा मराठी साहित्याच्या इतिहासात 'संत साहित्याचा सुवर्णकाळ' म्हणून ओळखला जातो. याच काळात मराठी भाषेची साहित्यिक क्षमता, सामाजिक भूमिका आणि अभिजात परंपरा ठामपणे सिद्ध झाली. "जैसी दीपांमाझि दिवट । का तिथी माझी पूर्णिमा गोमटी । तैसी भाषा मध्ये मऱ्हाठी सर्वोत्तम" ।। असा संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचा केलेला गौरव मराठीप्रती असलेला सिद्धभाव सर्व संतांच्या ठायी होता. संत ज्ञानेश्वरापासून ते संत तुकारामांपर्यंत सर्व संतांनी अभंग रचून हे महाकाव्य घरोघरी पोहोचवले. धर्म आणि तत्त्वज्ञान दृष्टीतून वारकरी संप्रदायाने विस्तारपूर्वक मांडणी केली आहे. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव तुकाराम गाथा, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, स्तोत्रे, आरत्या, अभंग आणि भारुडे हे संतांचे साहित्य धार्मिक आणि अध्यात्मिक विचारापुरते मर्यादित नसून ते समाजातील लोकांची जीवनशैली, परंपरा, नैतिक मूल्य, धर्म, तत्त्वज्ञान, भक्ती, इत्यादींचा भाव संस्कृतीमध्ये प्रतिबिंबित होताना दिसतो.

मराठी साहित्याचा वर्तमान काळ

साधारणतः १९ व्या शतकानंतरचा काळ आधुनिक मराठी साहित्याचा उदय व विकास दर्शविणारा कालखंड आहे. या काळात मराठी साहित्य आणि पारंपारिक, धार्मिक व भक्तिपर चौकटीतून बाहेर पडत सामाजिक, राजकीय, वैचारिक आणि मानवी प्रश्नांकडे लक्ष केंद्रित केले. पाश्चात्य शिक्षण, मुद्रणकलेचा शोध, समाजसुधारणा चळवळी यांचा प्रभाव साहित्यावर पडलेला दिसून येतो. म. जोतीराव फुले यांचे लेखन सामाजिक विषमतेवर प्रहार करणारे होते. लोकहितवादींनी निबंध लेखनातून समाजजागृती केली, हरिभाऊ आपटे यांनी मराठी कादंबरीला सामाजिक वास्तवाचे भान दिले. या काळातील मराठी साहित्य समाजपरिवर्तनाचे साधन बनले.

यानंतरच्या कालखंडात वि. स. खांडेकर, साने गुरुजी, बाबा आमटे, केशवसुत, बा. सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर, राम गणेश गडकरी, विजय तेंडुलकर, पु. ल. देशपांडे, इ. साहित्यिकांनी, मराठी भाषेला आधुनिक जाणीव, वैचारिक खोली आणि जागतिक संदर्भ दिला. या काळातील साहित्यामुळे मराठी भाषा केवळ अभिजात परंपरेची वाहक न राहता, समकालीन जीवनाचे प्रभावी प्रतिबिंब ठरली. त्यामुळे मराठी भाषेच्या अभिजाततेला आधुनिकतेची जोड मिळाली.

मराठी भाषेचे भविष्य

जागतिकीकरण ही एकविसाव्या शतकातील अत्यंत प्रभावी सामाजिक- आर्थिक प्रक्रिया आहे. माहिती-तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय व्यापार, शिक्षण व्यवस्था आणि माध्यमांच्या जागतिक झाल्यामुळे भाषांचा परस्पर संपर्क वाढला आहे. या प्रक्रियेत मराठी भाषेवर सकारात्मक तसेच नकारात्मक असे दोन्ही प्रकारचे परिणाम होत आहेत.

इंटरनेट, सामाजिक माध्यमे, ब्लॉग, इत्यादी पुस्तके आणि डिजिटल नियतकालिकामुळे मराठी साहित्य जागतिक स्तरावर उपलब्ध झाली आहे. परदेशात स्थायिक झालेल्या मराठीत भाषिकांमुळे मराठी भाषेचा वापर आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढत आहे. यामुळे मराठीचे जागतिक अस्तित्व अधिक दृढ होत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि माध्यम विश्वासी संबंधित नवीन शब्दसंपदा मराठीत समाविष्ट होत असून भाषेची व्यक्त होण्याची क्षमता वाढत आहे.

जागतिकीकरणाचा नकारात्मक परिणाम मराठी भाषेवर होताना दिसतो. इंग्रजीच्या वाढत्या वर्चस्वामुळे मराठी भाषेच्या वापरावर मर्यादा आली आहे. विशेषतः शहरी भागातील तरुण पिढीत मराठी ऐवजी मिश्र भाषेचा वापर वाढत असल्याचे दिसून येते. मराठी भाषेच्या वापरावर मर्यादा आल्यामुळे इंग्रजीच्या अतिवापरामुळे मराठीतील शब्दसंपदा कमी होण्याची भीती निर्माण झाली आहे. मराठी पुस्तकांचे वाचक संख्या काही प्रमाणात घटत असून

करमणुकीच्या माध्यमांचा अतिरेकी वापरामुळे मराठी साहित्य आणि भाषा दोन्ही धोक्यात आली आहे. साहित्यनिर्मितीवर परिणाम झाला आहे.

मराठी भाषेपुढील आव्हाने

आपली भाषा, आपले साहित्य आणि आपली संस्कृती यावर वैश्विक दबावाने आलेल्या व वाढत चाललेल्या इंग्रजी व हिंदीच्या वापरामुळे मराठीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. इंग्रजी भाषेतील उच्च शिक्षण घेऊन परदेशात नोकरी मिळविण्याच्या उद्देशाने मराठी शिक्षणाकडे पाठ फिरून आजची पिढी इंग्रजी शिक्षण घेण्याचा अट्टाहास धरत असल्याने मराठी शाळा, कॉलेज बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. आजच्या युगात इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व वाढत असल्याने मराठीकडे पाठ फिरविल्याचे दिसते. आणि जर शिक्षणच इंग्रजीतून घेतले तर मराठी साहित्य निर्मिती कशी होऊ शकेल ? हा एक प्रश्न भविष्यात भेडसावेल आणि आज जरी आत्तापर्यंतच्या समृद्धतेमुळे मराठीला अभिजात भाषेचा वारसा मिळाला असला तरी भविष्यात मराठी भाषा संपुष्टात येण्याचा संभाव्य धोका वाटतो. दैनंदिन व्यवहारांमध्ये मिश्र भाषांचा मोठ्या प्रमाणात वापर होऊ लागल्याने मराठी भाषा संपते की काय अशी धास्ती वाटते. मराठी भाषेबरोबरच मराठी संस्कृती ही आज धोक्यात आली आहे. यासाठी आजपर्यंत प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत संत वाङ्मयापासून, निबंध वाङ्मयापर्यंत अनेकांनी मराठी भाषा समृद्ध करून अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. हा दर्जा टिकविण्यासाठी संतांनी मराठी भाषेला ज्या उंचीवर नेले त्यांच्या मराठी भाषाविषयक प्रेमाचा, आंतरिक उमाळ्याचा, प्रभावी प्रचार सामर्थ्याचा आणि त्यामागे असणाऱ्या प्रेरणांचा शोध घेऊन त्या प्रेरणा नवीन पिढीत निर्माण करायला लागतील. तसेच मराठी भाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणात, व्यवसायात, नोकरीत संधी उपलब्ध करून देता आली तरच इंग्रजीकडे झुकलेले शिक्षणाचे पारडे मराठीकडे झुकू लागेल यात शंका नाही.

निष्कर्ष

मराठी भाषेपुढील आव्हाने ही केवळ भाषिक नसून सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाची आहेत. योग्य धोरणे, प्रभावी अंमलबजावणी आणि समाजाची सकारात्मक भूमिका यांच्या माध्यमातून मराठी भाषेचे संवर्धन व विकास निश्चितपणे साधता येऊ शकतो. मराठी भाषा टिकवणे ही केवळ भाषिक जबाबदारी नसून सांस्कृतिक कर्तव्य आहे.

संदर्भ

१. गोसावी र. रा., (१९९९), 'मराठी ऐतिहासिक भाषाशास्त्र', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे.
२. मंचरकर रं. बा., धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०००.
३. कुलकर्णी कृष्णाजी पांडुरंग, मराठी भाषा उद्गम व विकास, मराठी संशोधन मंदिर प्रकाशन, १९३३, पृ. २ व १६८.
४. नलावडे प्रमोद, 'लोकराज्य' साहित्य संमेलन विशेष माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, जानेवारी, फेब्रुवारी, २०१२.
५. नरके हरी, 'लोकराज्य' अंक १०, माहिती व जनसंपर्क संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई.
६. अभिजात मराठी भाषा समिती अहवाल २०१३ महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग.
७. मुनघाटे प्रमोद, दै. लोकमत, नागपूर आवृत्ती, दिनांक २७/०२/२०२१.
८. शेलार डॉ. सुधाकर, अभिजात भाषेविषयी बोलू काही, दै. लोकमत.
९. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल. रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

आदिवासी बोली आणि प्रमाणभाषा : काही गंभीर प्रश्न

डॉ. सखाराम डाखोरे
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
अण्णासाहेब वर्तक मानव्य महाविद्यालय, वसई रोड (प.), जि. पालघर ४०१२०२
मो. ९८५०११६६४५
ईमेल – ssdakhore2000@gmail.com

गोषवारा: मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. एका प्रमाणभाषेचा गौरव झाला. ही आनंदाची बाब आहे, परंतु मराठी प्रमाणभाषेला समृद्ध करणाऱ्या अनेक बोलीभाषा आहेत, ज्या अजूनही न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांच्यातील गोडवा कायमच समाजमनाला चालना देत आला आहे. त्या बोलींच्या संदर्भात शासनाने, समाजाने कार्य करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण बोली टिकल्या तरच प्रमाणभाषा टिकेल असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. बोली ह्या प्रमाणभाषेची पाळेमुळे आहेत. प्रमाणभाषेचा कोणताही एक प्रांत सांगता येत नाही परंतु अहिराणी, वऱ्हाडी, मराठवाडी, मालवणी, आगरी, कातकरी, वारली, गोंडी अशा बोलींचा उच्चार करताच तो-तो प्रदेश आठवतो. म्हणून त्या-त्या प्रदेशातील समाज, संस्कृती आणि भाषेच्या जतनासाठी प्रयत्न करणे अगत्याचे ठरते. परिणामी प्रमाणभाषेलाही बळ प्राप्त होते. आदिवासी समाजाच्या अशा अनेक बोली हजारों वर्षांपासून भाषिक साठा जतन करीत आल्या आहेत. त्यांचेही जतन करणे काळाची गरज आहे.

शब्द: प्रमाणभाषा, बोली, जमाती, आर्य, अनार्य, दस्यू, ग्लोबल, संस्कृती इत्यादी.

प्रस्तावना: भूतलावरील सर्वच प्रांतात आदिवासी जमातींचे वास्तव्य असल्याचे दिसून येते. प्रत्येक जमातींची संस्कृती भिन्न आणि वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे प्रकर्षाने जाणवते. आदिवासी समाजाने आपल्या बोलींचा सांस्कृतिक ठेवा अनेक पिढ्यांपासून जतन करून ठेवला आहे. जगाच्या अनेक भूप्रदेशांवर ओरांव, बदाऊन, बुशमेन, पिग्मी, सेमांग, झुलू, हौसा, मसाई, बदाऊनी, बांटू, बारो, गऊचो अशा अनेक आदिवासी जमाती हजारों वर्षांपासून आपले अस्तित्त्व टिकवून आहेत. भारतातील जवळपास सर्वच राज्यांमध्ये आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. त्यामध्ये प्रामुख्याने गारों, खासी, जैतिया, संथाल, कुरूख, चकमा, भुतिया, बैगा, नागा, अंगामी, लेपचा, बदगा अशा काही प्रमुख जमातींचा संदर्भ आपल्याला देता येईल. महाराष्ट्रात आंध, भिल्ल, कोरकू, वारली, कातकरी, महादेव कोळी, गोंड, पारधी, ठाकर, कोलाम, धोडिया, कोकणा अशा ४५ आदिवासी जमाती अनादी कालापासून वास्तव्य करून आहेत. सर्वांनीच आपले सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक वेगळेपण टिकवून ठेवले आहे. आधुनिकीकरणाच्या रेट्यात काही जमातींच्या अस्तित्वाचे प्रश्नही निर्माण झाले आहेत. एक आनंदाची बाब अशी की, शिक्षणाच्या प्रवाहात आल्यामुळे बऱ्याचशा जमातींना आपल्या स्व-अस्तित्त्वाची जाणीव झाली आहे. कोणत्याही समाजाचे अस्तित्व त्याच्या वेगळ्या वैशिष्ट्यांवरून ठरविले जात असते. विशिष्ट भौगोलिक प्रदेश, सामूहिकता, नैसर्गिकता, सांस्कृतिकता आणि भाषिकता ही त्या-त्या समाजाची प्रमुख वैशिष्ट्ये असतात. प्रमाणभाषा व बोलीच्या अनुषंगाने विचार करता, बोलींचे जतनच प्रमाणभाषेचे दीर्घकालीन अस्तित्व टिकवून ठेऊ शकते हे नाकारता येत नाही.

आदिवासींच्या बोलींची समृद्धता व प्रमाणभाषा: आदिवासी संस्कृती ही निश्चितच निसर्गाला पूरक आहे, त्यामुळेच नैसर्गिक व मानवनिर्मित आक्रमनांनंतरही ती टिकून राहिली. त्यांची लोकगीते, लोकनृत्य, लोककथा आणि एकूणच जीवनशैली निसर्गाधारीत असल्याचे प्रकर्षाने जाणवते. कोणत्याही समाजाचा विचार करताना त्याची बोली जितकी समृद्ध तितकी संस्कृती समृद्ध आणि संस्कृती जितकी परिपक्व तितकाच तो समाज परिपक्व असतो, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. प्रमाणभाषा ही अनेक समूहांना जोडण्याचे कार्य करते तर बोली प्रमाणभाषेला विस्तारण्याचे कार्य करते. कोणत्याही प्रमाणभाषेची समृद्धता, परिपक्वता, नाविन्यता आणि वैविध्यता ही त्या भाषेला किती बोलींचे पाठबळ आहे त्यावर अवलंबून असते. मराठी भाषेला जवळपास अशा दिडशे बोलींचा समृद्ध वारसा लाभला आहे. त्यामध्ये ८० च्या वर आदिवासी बोली आहेत. त्यामुळेच मराठीचे स्थान सध्यातरी अढळ असल्याचे जाणवते. महाराष्ट्रामध्ये भिलोरी, वारली, कातकरी, डांगाणी, कोकणी, पावरी, आंधी अशा अनेक आदिवासी बोलीभाषा आहेत, ह्या बोलीभाषांनी मराठी प्रमाणभाषेचा वृक्ष बहरून टाकलेला आहे. त्यामुळेच कोणत्याही प्रमाणभाषांना भविष्यकाळात जीवंत ठेवायचे असेल तर वर्तमानकाळात मृतप्राय होत जाणाऱ्या व अस्तित्वात असलेल्या बोलींना जीवनदान देणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रातील बोलींचे वास्तव मात्र चिंताजनक आहे. त्यांच्या विकासासाठी फारशा सामाजिक संस्था पुढाकार घेताना दिसत नाहीत, शासनालासुद्धा ह्याचे गांभीर्य लक्षात आलेले नाही किंवा त्यांना बोलींचे टिकणे महत्त्वपूर्ण वाटत नसावे,

असे दिसून येते. जिथे प्रमाणभाषा मराठीच प्रारंभकाळी उर्दू, फारसी, स्पॅनिश आणि आता हिंदी, इंग्रजी, गुजराती, तेलगु, मल्याळम अशा भाषांच्या प्रभावाने झाकोळून जात आहे, त्यासंदर्भात कुणीही बोलायला तयार नाही तिथे विविध आदिवासी बोलींच्या रक्षणाचा प्रश्नच कधी ऐरणीवर येणार नाही? हे कळायला मार्ग नाही.

कोणतीही भाषा समाजाच्या दैनंदिन व्यवहारात मोठ्या प्रमाणात वापरली जाणे गरजेचे असते म्हणजेच ती लोकभाषा व्हावयास हवी. महाराष्ट्राच्या बाबतीत ही स्थिती काहिशी गंभीर असल्याचे दिसून येते. ग्रामीण माणसांमुळे मराठी टिकून आहे तर शहरी माणून इंग्रजीच्या प्रभावाखाली आला आहे, हे मराठी माणसाचे वास्तव नाकारता येत नाही. मराठी माणूसच मराठीच्या दैनंदिन वापराबद्दल तितकासा गंभीर असल्याचे दिसत नाही. त्यापुढे जाऊन मराठवाडी, वैदर्भीय, अहिराणी, कोकणी, आगरी, मालवणी अशा प्रादेशिक बोलींचे अस्तित्त्वही जिथे धोक्यात आले आहे तिथे जंगलात, डोंगरदऱ्यात, नद्यांच्या प्रदेशात राहणाऱ्या आदिवासी समाजाच्या बोलींचा तर आपण विचारच करू शकत नाही. एक बाब मात्र येथे लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे आदिवासींचे जंगल, डोंगरपहाडांतील वास्तव्यच त्यांच्या बोलींना टिकवून ठेवण्यासाठी कारणीभूत ठरले आहे. ह्या अलिप्तपणामुळेच त्यांच्या संस्कृती व बोली टिकून राहिल्या आहेत. ज्या आदिवासी जमाती आधुनिक जीवनशैलीच्या प्रभावाखाली आल्या त्यांचा भौतिक विकास झाला असे जरी वरकरणी दिसत असले तरी त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक परिणामी भाषिक अस्तित्व धोक्यात आले आहे. उदा. गोंड, भिल्ल, कोकणा, महादेव कोळी, आंध ह्या आदिवासी जमातींनी आधुनिक जीवनशैली आत्मसात करायला सुरूवात केली आणि त्यांचे पारंपरिक रितीरिवाज मागे पडू लागल्याचे जाणवते. शिक्षणाच्या प्रवाहात येणे चुकीचे नाही तर आपल्या पारंपरिक मानवतावादी मूल्यांना तिलांजली देणे धोक्याचे आहे. हजारों वर्षांची आदिवासी जीवनपरंपरा नवविज्ञानाच्या आक्रमणाने काही वर्षांतच नेस्तनाबूत करायला सुरूवात केली आहे. आधुनिकतेच्या ह्या फटक्याने अनेक बोलीभाषांचा बळी गेला आहे. गोंडांची-गोंडी, वारल्यांची-वारली, कोकणांची-कोकणी, भिल्लांची-भिल्ली, आंधांची-आंधी, कोलामांची-कोलामी, कातकऱ्यांची-कातकरी अशा अनेक जमातींच्या बोली त्यांच्या जमातींचे वेगळेपण सिद्ध करतात, परंतु कालौघात त्यांच्या जतनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, हे आपणांस मान्य करावे लागते. तेव्हा या भाषिक प्रश्नांकडे आपण नेमके कोणत्या दृष्टिकोणातून बघणार आहोत? दूरदृष्टी ठेवायची की पायांजवळ पहायचे याविषयी समाजाने नक्कीच विचार करायला हवा.

आधुनिक काळात समाजाने भौतिक प्रगती केली असली तरी समाजाचे मानसिक भरणपोषन करणाऱ्या भाषा व बोलींपुढे मात्र अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. ग्लोबल जगाची ग्लोबल भाषा म्हणून भारत सध्या इंग्रजीच्या प्रभावाखाली आला आहे. देशाला अखंड ठेवण्यासाठी हिंदी ह्या एकभाषेचे सूत्र लागू करण्याचा अट्टाहास सुरू आहे तर महाराष्ट्राचे राजकीयीकरण व एकभाषिकरण करण्याचे धोरण आखले जात आहे. दुर्दैवाने ज्या बोलींच्या अस्तित्त्वावर मराठी जीवंत आहे त्यापैकी काही बोली इतिहासजमा झाल्या तर अनेक बोलींचे अस्तित्व नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. "मराठी भाषेला समृद्ध करणाऱ्या तिच्या बोली नष्ट झाल्या तर त्या बोलीतील शब्दांचे अर्थ आणि भावना नष्ट होतील. मराठी भाषा विविध अर्थ आणि भावनांविना लुळीपांगळी होऊन परकीय भाषा तिच्यावर आक्रमण करेल. आज महाराष्ट्रात मराठीवरील इंग्रजीचे आक्रमण वाढते आहे. ते रोखण्यासाठी, मराठीला अधिक समृद्ध करून ती जगाची ज्ञानभाषा होण्यासाठी तिच्या बोलींना जपणे व त्यांचे संवर्धन करणे महत्त्वाचे आहे."[१] खरेतर एखाद्या भाषेला जगाची ज्ञानभाषा करण्यासाठी त्या भाषिकांचे योगदान फार मोठे असायला हवे आणि बोली तर प्रमाणभाषेला ऑक्सिजन पुरवठ्याचे म्हणजेच भरघोस शब्दपुरवढा करण्याचे कार्य करतात म्हणून बोलींच्या जतनाला महत्व दिले पाहिजे.

समाजातील जो व्यक्ती आपल्या बोलीवर प्रेम करतो तो आपोआपच प्रमाणभाषेला जीवदान देत असतो. हडप्पा, मोहेंजोदाडोतील संशोधनानुसार भारतातील आदिवासींच्या बोलींनासुद्धा लिपी होती, याचा अर्थ ह्या बोली समृद्ध व व्यवहारभाषा होत्या. पिढ्यांच्या समाजव्यवहारातून त्या प्रवाहित राहिल्या म्हणून टिकून राहिल्या. भारतातील प्रस्थापित अभ्यासक व भाषावैज्ञानिकांनी मात्र आदिवासी बोलींच्या जतन व संवर्धनाकडे दुर्लक्ष केल्याचे प्रकर्षाने जाणवते. "भारतात बाहेरून आलेल्या आक्रमक आर्यांना येथील मूळ लोकांच्या (ज्यांना ऋग्वेदात दास, दस्यु, असूर, बसक्या नाकाचे, काळेकुट्ट व अनाकलनीय भाषा बोलणारे म्हणून संबोधले आहे) भाषा नक्कीच अनाकलनीय व विचित्र वाटणे स्वाभाविक होते. तेव्हा आपल्या शत्रूंच्या भाषांचा गौरव आर्य लोक आपल्या वैदिक वाङ्मयात कसे काय करतील? त्यांनी तर जीत अनार्यांना त्यांच्या अस्तित्त्वासकट त्यांच्या भाषा, साहित्य आणि संस्कृती या सर्वांनाच रानबंद केले, वनवास ठोठावला. अनार्य आदिवासींच्या भाषांना (द्राविडीयनांच्या भाषांना) जेते आर्यांनी हिणवले. या हिणविल्याच्या नोंदी ऋग्वेदाच्या पानांवर आढळतात."[२] आदिवासींच्या जंगलपहाडांतील जगण्याचे हुंकार प्रस्थापितांच्या साहित्यात उमटले नाहीत. विविध लेखनकर्ते आर्यकुळीशी संबंधित असल्याकारणाने आदिवासींच्या बोली शब्दबद्ध होऊ शकल्या नाहीत. जिथे माणसांशीच वैर तिथे संस्कृती व बोलींच्या अस्तित्वाचा प्रश्नच निर्माण होत नाही. मूळनिवासी असलेल्या आदिवासींच्या साधारणपणे ६५० च्यावर जमाती आपल्या उपजमातींसह आजही भारतात वास्तव्य करीत आहेत. त्यापैकी काही जमातींचे व्यवहार त्यांच्या बोलीतूनच होत असल्यामुळे त्या तग धरून

आहेत. आधुनिकतेच्या आक्रमणांचा सामना आज आदिवासींना करावा लागतो आहे, त्यांच्या बोलींवरच नाही तर संस्कृती, समाजावरही ही आक्रमणे होत आहेत. "ब्रिटिश काळात १९०३ ते १९२८ या दरम्यान जे भाषिक सर्वेक्षण झाले त्यामध्ये १७९ भाषा व ५४४ बोलीभाषा अस्तित्त्वात असल्याचे आढळून आले. विशेषतः यापैकी ७० टक्के बोलीभाषा आदिवासींच्या होत्या"[३] यावरून या देशाला आदिवासी जमातींनी भाषिक समृद्धता बहाल केली आहे, असे म्हणता येते. ह्यापैकी आजही अस्तित्त्वात असलेल्या काही बोलींचे जतन करण्याच्या दृष्टिने डॉ. गणेश देवी यांनी उचललेले बोली संवर्धनाचे पाऊल नक्कीच प्रेरक आहे.

प्रमाणभाषा मोठ-मोठ्या प्रांताना जोडण्याचे कार्य करते. तिचा निश्चित असा प्रदेश सूचविता येत नाही तर बोलीचा प्रदेश निश्चित असतो. उदा. अमरावतीच्या परिसरातील कोरकूंची कोरकू, पैनगंगेच्या परिसरात राहणाऱ्या आंधांची आंधी, जव्हार-पालघरच्या प्रांतात राहणाऱ्या वारल्यांची वारली, कातकऱ्यांची कातकरी, सह्याद्रीच्या पायथ्याशी वास्तव्य करणाऱ्या महादेव कोळयांची डांगाणी किंवा महादेव कोळी बोली, गोंडवाना प्रांतात बोलली जाणारी गोंडी, धुळे नंदूरबार परिसरातील भिल्लांची भिल्ली/देहवाली, नंदूरबार तसेच नवापूरच्या परिसरातील मावची, ठाणे रायगडच्या परिसरातील ठाकरांची ठाकरी, सह्याद्री, सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या पावरांची पावरी, तडवी भिल्लांची तडवी, कोकणांची कोकणी, ठाणे जिल्ह्याच्या सिमावर्ती भागात राहणाऱ्या दुबळांची दुबळी अशा अनेक बोलींचे अस्तित्त्व असलेल्या त्या-त्या प्रादेशिक समाजाला एका धाग्यात गोवण्याचे, त्यांच्यात भावनांची देवाण-घेवाण करण्याचे कार्य प्रमाणभाषा करीत असते, तेच कार्य मराठी करीत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील ह्या सर्व बोलींनी मराठीला अनेक शब्द दिले आहेत.

महाराष्ट्रातीलच नाही तर देशातील बोलींच्या संवर्धानासाठी राज्य व केंद्रशासनांने प्रयत्न करणे, विविध शासकीय संस्था निर्माण करून पारंपरिक बोलींचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. आशिया खंडातील भारतीय प्रांत हा प्रारंभापासूनच अनार्यस्थान राहिलेला आहे. विविध समूहांचे वसतिस्थान असलेला हा देश आज बहुधार्मिक, बहुसांस्कृतिक आणि बहुभाषिक देश म्हणून ओळखला जातो. त्याच्यावर एकधार्मिकत्व, एकसांस्कृतिकत्व तसेच एकभाषित्व लादणे नक्कीच हितावह नाही. 'विविधतेत एकता' ही ओळखच त्याचे बलस्थान आहे. भारताची खरी ओळख त्याच्या सूक्ष्मातीसूक्ष्म घटकात आहे, हे ओळखून अनेकांपैकी एक बलस्थान असलेल्या 'बोली' ह्या सांस्कृतिक घटकाकडे प्रत्येक अभ्यासकाने गांभिर्यपूर्वक पाहिले पाहिजे. कोणतीही एखादी लोकभाषा जेव्हा राजभाषा म्हणून स्विकारली जाते, त्यावेळी तिची शुद्ध-अशुद्धता, तिचे व्याकरण ह्या बाबी समोर येतात, मराठीच्या बाबतीतही तेच झाले, मराठीच्या बोलींना अशुद्धतेचा ठपका मारावयास इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने मागेपुढे पाहिले नाही. "मराठी लोकभाषा असेपर्यंत शुद्ध-अशुद्ध, भाषिक, कालिक, तात्कालिक भेद नव्हते. मराठी भाषा नावाला सत्ताधारी ऊर्फ राजभाषा काय झाली, तिचा वर्ग बदलला. तिच्या प्रामाण्याचे आणि पवित्रतेचे व्याकरण सुरू झाले. बोलीभाषा तिच्या सावत्र बहिणी झाल्या. ग्रांथिक भाषेच्या लाळग्रंथी तिच्या औषधोपचारांत आल्या आणि सगळा राडा झाला."[४] भुजंग मेश्रामांच्या ह्या विधानात तथ्यता आढळते. त्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण बोलींच्या जतनासाठी त्या-त्या समूहाने, समाजानेच आपापल्या पातळीवर कार्य करणे आवश्यक आहे. बोलीतूनच संस्कृती आणि संस्कृतीतूनच समाजाचा इतिहास उलगडण्यास मदत होते. साधारणपणे ६५ हजार वर्षांचा दीर्घ इतिहास लाभलेल्या अंदमान आणि निकोबार बेटावरील 'बो' नावाच्या बोलीला २०१० मध्ये आपण गमावले. ती भाषा बोलणारी सिनिअर बोआ नावाची शेवटची स्त्री मरण पावली तिच्यासोबत बोलीसुद्धा नामशेष झाली व एक समाज अस्तंगत झाला. आजही अनेक बोली मृत्यूपंथाला लागलेल्या आहेत आणि आम्ही ग्लोबल होण्यातच गुंतलो आहोत. आधुनिकतेचे दुष्परिणाम आपल्याला उत्तर आधुनिकतेने दाखवायला सुरूवात केली आहे त्यामुळे सामाजिक संस्था तसेच विविध बोलीभाषक समूहांनी आपापल्या बोलींच्या जतन, संवर्धन व व्यवहारातील वापरासाठी वेळीच पावले उचलणे गरजेचे आहे.

मराठी प्रमाणभाषेच्या जतन व संवर्धनासाठीचे प्रयत्न अपुरे पडत असतानाच विविध राज्यांमधील शासनांनी आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतून शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत, हा दृष्टिकोण निश्चितच स्वागताहार्य आहे परंतु आपल्या मातृभाषेतून शिक्षण मिळाले तरच त्या विद्यार्थ्याला सर्व विषय व्यवस्थित कळतील हे आम्ही का विसरत आहोत? "आदिवासी मुलांना इंग्रजी शिक्षण देण्यासाठी शासनाने गावापासून दूर महाबळेश्वर, पाचगणी याठिकाणी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मोफत शिक्षणाची, निवासाची व्यवस्था केली आहे. परंतु या ठिकाणी शिकणारी मुले धेडगुजरी अवस्थेत जीवन कंठताना दिसतात. ही मुले इंग्रजीतही प्राविण्य मिळवत नाही आणि आदिवासी म्हणून जगण्यास लायक राहत नाहीत"[५] ह्या विचारात एक तथ्य असे आढळते की, आदिवासी मुलांना इंग्रजी शिक्षण द्यायला हरकत नाही परंतु त्यांच्या जगण्याचे, खाण्यापिण्याचे प्रश्नच अजून संपले नाहीत तर जगाची ओळख करून घेत असताना इंग्रजीचा आधुनिक डोस त्यांना एकदम पेलणार कसा? त्यांच्या बोलीतून आणि प्रमाण मराठीतून त्यांना प्रारंभीचे शिक्षण मिळाल्यास कालौघात इंग्रजीशी त्यांचे मैत्र जडेल, असे म्हणता येईल. शेवटी एवढे नमूद करता

येईल की, विविध प्रांतातील आदिवासी बोली तसेच इतरही सामाजिक समूहांच्या बोलींचे जतन झाले तर आपोआपच मराठीचे भरणपोषण होईल, ती अधिक समृद्ध व विकसित होईल.

निष्कर्षः

- जगातील प्रत्येक देशांत, प्रांतात राहणाऱ्या आदिवासी जमातींची आपापली एक समृद्ध अशी सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक व्यवस्था आहे.
- आदिवासी जमातींच्या भाषिक वेगळेपणाची दखल प्रस्थापित व्यवस्थेने घेतली नसल्याचे दिसून येते.
- प्रमाणभाषेला शब्दपुरवठा करण्याचे म्हणजेच ऑक्सीजन पुरविण्याचे महत्कार्य बोली करीत असतात.
- बोलींचा निश्चित असा प्रदेश सूचित करता येतो मात्र प्रमाणभाषेचा निश्चित असा कोणताच प्रदेश सूचित करता येत नाही.
- बोलींचे जतन झाले तर त्या-त्या प्रदेशांतील संस्कृती टिकेल आणि संस्कृती टिकली तर समाज एकसंध राहिल परिणामी अशा अनेक समूहांना, समाजांना एका सूत्रात बांधणारी प्रमाणभाषा टिकेल.
- प्रमाणभाषेच्या जतनासाठी विविध राज्यांमधील शासनव्यवस्था प्रयत्नरत असलेली दिसून येते मात्र बोलींच्या संदर्भात उदासिनता दिसून येते.
- सामाजिक संस्था आणि समूहांनी पुढाकार घेऊन बोलींचे शब्दकोष तयार केले पाहिजेत, व्यवहारात बोलींचा समावेश असायला हवा, प्रमाणभाषा आपोआपच समृद्ध होईल.
- आदिवासींच्या बोलीतील लोकगीते, लोककथांमधून त्यांच्या सांस्कृतिक समृद्धतेचा प्रत्यय येतो.
- प्रमाण मराठीत जसा गोडवा आहे तसाच गोडवा प्रत्येक बोलीत असल्याचा दिसून येतो. प्रत्येकीत स्वतःची अशी एक नैसर्गिक लय आहे.

संदर्भग्रंथः

१. लोहकरे, संजय (डॉ.), प्रादेशिक बोलींचे भाषाविज्ञान, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, जानेवारी २०१९ (प्र. आ.), पृ. क्र. ९
२. तुमराम, विनायक (डॉ.), बोलीभाषेतील आदिवासी कविता, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २०२१(प्र. आ.) पृ. क्र. ११
३. सरकुंडे, माधव (प्रा.), आदिवासी अस्मितेचा शोध, देवयानी प्रकाशन, यवतमाळ, १ जानेवारी २०११ (प्र. आ.), पृ. क्र. ५२
४. मेश्राम, भुजंग, शिलेदार प्रफुल्ल (संपा.), आदिवासी साहित्य आणि अस्मितावेध, लोकवाङ्मय गृह, मुंबई, एप्रिल २०१४ (प्र. आ.), पृ. क्र. ८६
५. आंभेरे, मुक्ता (डॉ.), आदिवासी साहित्यः कादंबरी आणि स्त्री, परिस पब्लिकेशन, पुणे, १ नोव्हेंबर २०२१ (प्र. आ.), पृ. क्र. ५०,५१

संस्कृत ग्रंथांतील योगसाहित्य आणि आधुनिक शारीरिक शिक्षण

डॉ. रूपाली सिदू कांबळे
सहाय्यक प्राध्यापक शारीरिक शिक्षण विभाग
भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली,
मो. न. ९८६०५४६२०१
Email - rupalikamble05@gmail.com

सारांश:

योग ही भारतीय शास्त्रीय परंपरेतील एक महत्त्वपूर्ण शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक साधना आहे. पतंजलींचे योगसूत्र, भगवद्गीता, हठयोगप्रदीपिका यांसारख्या संस्कृत ग्रंथांमध्ये योगाच्या तत्त्वज्ञानाचे आणि शारीरिक साधनेचे सखोल विवेचन आढळते. आधुनिक शारीरिक शिक्षणाचा उद्देश केवळ शारीरिक तंदुरुस्ती नसून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास आहे. प्रस्तुत संशोधनपत्रात संस्कृत योगसाहित्यातील योगासन, प्राणायाम व ध्यान यांच्या संकल्पनांचा अभ्यास करून त्यांचा आधुनिक शारीरिक शिक्षणाशी असलेला संबंध स्पष्ट करण्यात आला आहे. तसेच, आधुनिक शिक्षणपद्धतीत योगाचा समावेश कसा उपयुक्त ठरू शकतो, यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

महत्वाचे शब्द: योग, संस्कृत ग्रंथ, योगसूत्र, शारीरिक शिक्षण, भारतीय ज्ञानपरंपरा, योगासन, प्राणायाम

संशोधनाची उद्दिष्टे:

१. संस्कृत ग्रंथांतील योगसाहित्याचा अभ्यास करणे
२. योग व आधुनिक शारीरिक शिक्षण यांचा संबंध स्पष्ट करणे
३. योगाचे शारीरिक, मानसिक व नैतिक लाभ विशद करणे
४. शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात योगाच्या उपयुक्ततेचा अभ्यास करणे

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) व विश्लेषणात्मक (Analytical) पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक स्रोत म्हणून योगसूत्र, भगवद्गीता, हठयोगप्रदीपिका, घेरंडसंहिता या संस्कृत ग्रंथांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच, दुय्यम स्रोत म्हणून योग व शारीरिक शिक्षणाशी संबंधित पुस्तके, संशोधन लेख व शैक्षणिक साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे.

१. प्रस्तावना:

भारतीय संस्कृती ही प्राचीन काळापासून ज्ञान, साधना व जीवनमूल्यांच्या परंपरेने समृद्ध आहे. या ज्ञानपरंपरेचा मूलभूत आधार संस्कृत भाषा असून, तिच्यामधून योग, आयुर्वेद, तत्त्वज्ञान, धर्म व शिक्षण यांसारख्या विविध शाखांचा विकास झालेला आढळतो. योग ही केवळ शारीरिक व्यायामपद्धती नसून ती एक सर्वांगीण जीवनशैली आहे, जी शरीर, मन व आत्मा यांचा समतोल साधते. संस्कृत ग्रंथांमधील योगसाहित्य भारतीय शास्त्रीय परंपरेचे एक महत्त्वपूर्ण अंग मानले जाते. पतंजलींचे योगसूत्र, भगवद्गीता, हठयोगप्रदीपिका, घेरंडसंहिता यांसारख्या ग्रंथांमध्ये योगाच्या तात्त्विक, मानसिक व शारीरिक पैलूंवर सविस्तर विवेचन आढळते. या ग्रंथांमध्ये वर्णन केलेली योगासने, प्राणायाम, ध्यान व संयम यांची संकल्पना आजच्या आधुनिक जीवनशैलीच्या संदर्भात अत्यंत उपयुक्त ठरते. विशेषतः बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणाऱ्या ताणतणाव, शारीरिक अस्वास्थ्य व मानसिक अस्थैर्य यांसारख्या समस्यांवर योग एक प्रभावी उपाय ठरू शकतो.

आधुनिक शारीरिक शिक्षणाचा उद्देश केवळ शारीरिक क्षमता वाढविणे एवढाच मर्यादित नसून, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे. शिस्त, सहनशक्ती, आत्मनियंत्रण, मानसिक स्थैर्य व आरोग्यपूर्ण जीवनशैली या मूल्यांचा समावेश शारीरिक शिक्षणात अपेक्षित आहे. या दृष्टीने पाहता संस्कृत ग्रंथांतील योगसाहित्य आधुनिक शारीरिक शिक्षणाला एक मजबूत तात्त्विक व व्यावहारिक आधार प्रदान करते.

प्रस्तुत संशोधनपत्रात संस्कृत ग्रंथांमधील योगसाहित्याचा अभ्यास करून त्याचा आधुनिक शारीरिक शिक्षणाशी असलेला संबंध स्पष्ट करण्यात आला आहे. तसेच, शैक्षणिक अभ्यासक्रमात योगाचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व नैतिक विकासाला कशी चालना मिळू शकते, याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधनात करण्यात आला आहे.

२. संस्कृत ग्रंथांतील योगसाहित्य

भारतीय शास्त्रीय परंपरेमध्ये योगाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. योगाचा उगम वेदकालीन काळात झाल्याचे मानले जाते. ऋग्वेद, उपनिषदे आणि स्मृतीग्रंथांमध्ये योगाशी संबंधित संकल्पनांचे सूक्ष्म संकेत आढळतात. पुढील काळात संस्कृत भाषेतील विविध ग्रंथांमधून योगशास्त्राचा सुसंगत व शास्त्रीय विकास झालेला दिसून येतो. या ग्रंथांमध्ये योग केवळ शारीरिक साधना म्हणून नव्हे, तर मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीचे साधन म्हणून मांडलेला आहे.

२. १. पतंजलींचे योगसूत्र

पतंजलींचे योगसूत्र हे योगशास्त्राचे मूलभूत आणि प्रमाणभूत ग्रंथ मानले जातात. या ग्रंथामध्ये योगाची व्याख्या "योगश्चित्तवृत्तिनिरोधः" अशी केली आहे. पतंजलींनी अष्टांग योगाची संकल्पना मांडली असून त्यामध्ये यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी या आठ अंगांचा समावेश आहे. यातील आसन व प्राणायाम हे शारीरिक शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. या ग्रंथातून शिस्त, संयम व मानसिक स्थैर्य यांचा शारीरिक आरोग्याशी असलेला निकटचा संबंध स्पष्ट होतो.

२. २. भगवद्गीतेतील योगसंकल्पना

भगवद्गीता हा भारतीय तत्त्वज्ञानाचा एक महान ग्रंथ असून त्यामध्ये योगाला जीवनमार्ग म्हणून मांडण्यात आले आहे. गीतेमध्ये कर्मयोग, भक्तियोग व ज्ञानयोग या तीन प्रमुख योगमार्गांचे विवेचन आढळते. "योगः कर्मसु कौशलम्" या वचनातून कार्यकुशलता, समर्पण व शिस्त यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. गीतेतील योग संकल्पना केवळ आध्यात्मिक नसून ती व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक व नैतिक विकासाशी निगडित आहे, जी आधुनिक शारीरिक शिक्षणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे.

२. ३. हठयोगप्रदीपिका

हठयोगप्रदीपिका हा हठयोगावर आधारित एक महत्त्वपूर्ण संस्कृत ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये विविध योगासने, प्राणायाम, मुद्रा व बंध यांचे सविस्तर वर्णन आढळते. शरीरशुद्धी, लवचिकता, स्नायूशक्ती आणि श्वसनसंस्थेचे कार्य सुधारण्यावर या ग्रंथात विशेष भर देण्यात आला आहे. आधुनिक शारीरिक शिक्षणात शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी जी उद्दिष्टे ठरविली जातात, ती या ग्रंथातील योगसाधनेद्वारे साध्य होऊ शकतात.

२. ४. घेरंडसंहिता

घेरंडसंहिता हा हठयोगाशी संबंधित आणखी एक महत्त्वाचा ग्रंथ असून त्यामध्ये सप्तसाधना पद्धतीचा उल्लेख आहे. शरीरशुद्धीपासून ध्यान व समाधीपर्यंतचा प्रवास या ग्रंथात स्पष्ट केला आहे. या ग्रंथात वर्णन केलेल्या योगक्रिया शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात. आधुनिक शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात या साधनांचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांमध्ये आत्मनियंत्रण व आरोग्यजागरूकता निर्माण होऊ शकते.

२. ५. उपनिषदांतील योगविचार

कठोपनिषद, श्वेताश्वतर उपनिषद यांसारख्या ग्रंथांमध्ये योग व ध्यानाच्या तत्त्वांचा उल्लेख आढळतो. इंद्रियसंयम, मनोनिग्रह व आत्मसाक्षात्कार यांचा योगाशी असलेला संबंध उपनिषदांत स्पष्ट करण्यात आला आहे. ही तत्त्वे आजच्या स्पर्धात्मक व तणावग्रस्त जीवनात शारीरिक शिक्षणाच्या माध्यमातून आत्मसात करणे आवश्यक ठरते.

३. योगाचे शारीरिक व मानसिक लाभ

योग ही एक शास्त्रीय साधना असून तिचा प्रभाव मानवी शरीर व मनावर सर्वांगीण स्वरूपाचा आहे. संस्कृत ग्रंथांमध्ये वर्णन केलेली योगासने, प्राणायाम व ध्यान या क्रिया शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्थैर्य साधण्यास उपयुक्त ठरतात. आधुनिक काळातील जीवनशैलीजन्य आजार, ताणतणाव व मानसिक अस्वास्थ्य यावर योग एक प्रभावी उपाय म्हणून समोर येतो.

३. १. शारीरिक लाभ

योगासनांच्या नियमित सरावामुळे शरीराची लवचिकता वाढते, स्नायू बळकट होतात व सांध्यांची कार्यक्षमता सुधारते. हठयोगप्रदीपिका व घेरंडसंहिता यांसारख्या ग्रंथांमध्ये शरीरशुद्धी व आरोग्य संवर्धनावर विशेष भर देण्यात आला आहे. प्राणायामामुळे श्वसनसंस्था सक्षम होते, रक्ताभिसरण सुधारते व शरीरातील ऊर्जा संतुलित राहते. त्यामुळे विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता व सहनशक्ती वाढते, जे शारीरिक शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

३. २. मानसिक लाभ

पतंजलींच्या योगसूत्रांमध्ये चित्तवृत्तींच्या नियंत्रणावर भर देण्यात आला आहे. ध्यान व प्राणायामाच्या माध्यमातून एकाग्रता, स्मरणशक्ती व आत्मविश्वास वाढतो. मानसिक तणाव, चिंता व नैराश्य यावर योग सकारात्मक परिणाम करतो. आधुनिक शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थ्यांमध्ये वाढणारा मानसिक दबाव कमी करण्यासाठी योग उपयुक्त ठरतो.

३. ३. नैतिक व भावनिक लाभ

योग साधनेद्वारे संयम, शिस्त, आत्मनियंत्रण व सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो. भगवद्गीतेतील योगविचार विद्यार्थ्यांना कर्तव्यभावना व संतुलित जीवनशैली स्वीकारण्यास प्रेरित करतात. अशा प्रकारे योग हा केवळ शारीरिक व्यायाम न राहता व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन ठरतो.

४. योग व आधुनिक शारीरिक शिक्षण यांचा संबंध

आधुनिक शारीरिक शिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व सामाजिक विकास साधणे हा आहे. केवळ खेळ व व्यायाम यांपुरते मर्यादित न राहता आरोग्यपूर्ण जीवनशैलीची जाणीव निर्माण करणे ही आजच्या शारीरिक शिक्षणाची गरज आहे. या दृष्टीने संस्कृत ग्रंथांतील योगसाहित्य आधुनिक शारीरिक शिक्षणाला एक सशक्त आधार प्रदान करते.

४. १. अभ्यासक्रमातील योगाचा समावेश

आज अनेक शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात योगाचा समावेश करण्यात येत आहे. योगासन, प्राणायाम व ध्यान यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकाग्रता व आरोग्यजागरूकता निर्माण करता येते.

४. २. सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास

योगामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक संतुलन व भावनिक स्थैर्य साधले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. हे उद्दिष्ट आधुनिक शारीरिक शिक्षणाच्या संकल्पनेशी पूर्णतः सुसंगत आहे.

४. ३. भारतीय ज्ञानपरंपरेचा शैक्षणिक उपयोग

संस्कृत ग्रंथांतील योगसाहित्य हे भारतीय ज्ञानपरंपरेचे अमूल्य भांडार आहे. आधुनिक शारीरिक शिक्षणात या ज्ञानाचा उपयोग केल्यास विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जाणीव, आत्मगौरव व राष्ट्रीय मूल्यांची जपणूक होते.

निष्कर्ष:

संस्कृत ग्रंथांतील योगसाहित्य हे केवळ प्राचीन तत्त्वज्ञानापुरते मर्यादित नसून त्याचे आधुनिक शारीरिक शिक्षणात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. योगाच्या माध्यमातून शारीरिक आरोग्य, मानसिक स्थैर्य व नैतिक मूल्यांचा समन्वय साधता येतो. त्यामुळे आधुनिक शिक्षणव्यवस्थेत योगाचा समावेश करणे ही काळाची गरज आहे. शास्त्रीय योगपरंपरेचा अभ्यास व अंमलबजावणी केल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल.

संदर्भसूची:

- पतंजली. योगसूत्र. भाषांतर व टीका: स्वामी विवेकानंद, रामकृष्ण मठ, चेन्नई.
- श्रीमद्भगवद्गीता. गीताप्रेस, गोरखपूर.
- स्वात्माराम. हठयोगप्रदीपिका. कैवल्यधाम, लोणावळा.
- घेरंड. घेरंडसंहिता. चौखंबा संस्कृत सीरिज ऑफिस, वाराणसी.
- उपनिषदे. भाषांतर: डॉ. राधाकृष्णन, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
- Feuerstein, Georg. The Yoga Tradition: Its History, Literature, Philosophy and Practice. Motilal Banarsidass, New Delhi.

- Iyengar, B. K. S. Light on Yoga. HarperCollins, New Delhi.
- Desikachar, T. K. V. The Heart of Yoga: Developing a Personal Practice. Inner Traditions, Rochester.
- शिंदे, डॉ. एस. आर. शारीरिक शिक्षण व योग. पुणे विद्यापीठ प्रकाशन.
- जोशी, डॉ. बी. के. भारतीय ज्ञानपरंपरा आणि योगशिक्षण. नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली.

अभिजात मराठी भाषा: वर्तमान आणि भविष्य

डॉ.संदीप भागू चपटे

शां. घो. कला, विज्ञान व गो. प.पवार

वाणिज्य महाविद्यालय शिवळे.

मोबाईल नंबर – 9623723649 Email id - sandipchapte21@gmail.com

गोषवारा:

जगातील कोणतीही भाषा ही मानवी संस्कृतीची आत्मा असून साहित्य हे त्या आत्म्याचे प्रतिबिंब आहे . धार्मिक आणि ऐतिहासिक जीवनाचे दर्शन भाषेतून आणि साहित ,सांस्कृतिक ,समाजाच्या वैचारिक्यातून घडतेज्या . त्यांना अभिजात ,व्याकरणिक शिस्त आणि सांस्कृतिक सातत्य राखून आहेत ,समृद्ध साहित्य ,भाषा प्राचीन परंपरा ओडिया आणि मराठी या भाषा अभिजात ,मल्याळम ,कन्नड ,तेलुगू ,तमिळ ,भारतात संस्कृत .भाषा असे म्हटले जाते या अभि .परंपरेशी निगडित मानल्या जातातजात भाषांच्या साहित्याचा प्रवास सर्वच दृष्टीने भूतकाळवर्तमानकाळ , आणि भविष्यकाळ अशा तीन टप्प्यांतूनहोत असतो. मराठी भाषेची आजची सद्यस्थिती कशी आहे आणि त्यामध्ये भाषा वाढीसाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्या लागतील, याचा धांडोळा पुढील लेखातून घेण्यात आलेला आहे.

प्रास्ताविक:

प्राचीन काळामध्ये अभिजात भाषांचा जन्म आणि विकास झाला. या काळात भाषा केवळ संवादाचे साधन नव्हती, तर ज्ञान, तत्त्वज्ञान, धर्म, कला आणि विज्ञानाची वाहक होती.संस्कृत भाषेत वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, नाट्यशास्त्र, काव्यशास्त्र, आयुर्वेद, गणित आणि खगोलशास्त्र यांसारखे अमूल्य ग्रंथ निर्माण झाले. तमिळ भाषेत संगम साहित्याने मानवी जीवन, प्रेम, निसर्ग आणि समाजजीवनाचे सूक्ष्म चित्रण केले. मराठी भाषेत संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्यासारख्या संतकवींनी भक्तीपरंपरेतून अभिजात साहित्याची निर्मिती केली.या काळातील साहित्याची वैशिष्ट्ये म्हणजे गंभीर आशय, कलात्मक भाषा, जीवनमूल्यांचे प्रतिपादन आणि दीर्घकालीन प्रभाव. अभिजात साहित्याने समाजाला नैतिक अधिष्ठान दिले आणि सांस्कृतिक ओळख निर्माण केली. त्यामुळे तत्कालीन काळामध्ये भाषेचा विकास हा महत्त्वपूर्ण ठरला.

आजच्या वर्तमानकाळात अभिजात भाषा आणि साहित्य विविध आव्हानांना सामोरे जात आहेत. जागतिकीकरण, इंग्रजीचे वाढते वर्चस्व, तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि बदलती जीवनशैली यामुळे अभिजात भाषांचा वापर मर्यादित होत आहे.तरीही अभिजात साहित्याचे महत्त्व आजही टिकून आहे. विद्यापीठांमधून अभिजात भाषांचे अध्ययन, संशोधन आणि अनुवादकार्य सुरू आहे. जुने ग्रंथ डिजिटल स्वरूपात जतन केले जात आहेत. आधुनिक लेखक अभिजात परंपरेतून प्रेरणा घेऊन नवे साहित्य निर्माण करत आहेत.मराठीसारख्या भाषेत अभिजात परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय दिसतो. आधुनिक कविता, कादंबरी, नाटक आणि समीक्षा यांतून अभिजात मूल्यांचा नव्या संदर्भात पुनर्विचार केला जात आहे. त्यामुळे अभिजात साहित्य हे केवळ भूतकाळापुरते मर्यादित न राहता वर्तमानाशी संवाद साधत आहे.

पुढील भविष्यकाळात अभिजात भाषा आणि साहित्य टिकवणे ही मोठी जबाबदारी आपल्या समाजावर आहे. जर योग्य प्रयत्न झाले नाहीत, तर ही अमूल्य सांस्कृतिक संपत्ती दुर्लक्षित होण्याचा फार मोठा धोका आहे.मात्र तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अभिजात भाषांचे नवे रूप घडू शकते. ई-पुस्तके, ऑडिओ ग्रंथ, मोबाईल aaps, ऑनलाईन अभ्यासक्रम आणि भाषांतर प्रकल्पांमुळे तरुण पिढी अभिजात साहित्याकडे आकर्षित होऊ लागली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात अभिजात साहित्याचा समावेश करणे, संशोधनाला प्रोत्साहन देणे आणि लोकभाषेतून

अभिजात साहित्य मांडणे गरजेचे आहे.भविष्यात अभिजात भाषा केवळ संग्रहालयात बंद न राहता, आधुनिक जीवनाशी जोडली गेली, तर ती अधिक समृद्ध आणि जिवंत राहील. यात काडी मात्र शंका नाही.

संशोधन पद्धती:

या शोध निबंधासाठी ऐतिहासिक, ग्रंथाधारित,तुलनात्मक,वर्णनात्मक,विश्लेषणात्मक,क्षेत्रीय / सर्वेक्षण अशा विविध पद्धतींचा वापर करण्यात आलेला आहे.

अभिजात मराठी भाषेचे बदलते स्वरूप:

आजच्या २१ व्या शतकामध्ये मानवी इतिहासामध्ये मानवाने अनेक शोध लावले. त्या शोधांमध्ये सगळ्यात महत्त्वाचा शोध जर कोणता असेल तर तो भाषा हा होय. मानवाने अभिव्यक्तीसाठी भाषेचा वापर केला. भाषा हे केवळ भावना व्यक्त करायचे साधन आहे असे आपण आज जरी नक्कीच म्हणू शकणार नाही. भावनेसोबत विचार प्रकटी करण्याचे माध्यम म्हणूनही त्याचा वापर होतो. हा विचार काही अल्प शब्दात आणि अल्पावधीतच नेहमीच व्यक्त होईल असे म्हणता येणार नाही. माणसाने भाषा निर्माण केली आणि भाषेने माणूस घडविला. असा काहीसा दुहेरी प्रकार भाषेच्या बाबतीत पहावयास मिळतो. आज गतिमान जीवनशैलीमुळे आणि व्यावसायिक मानसिकतेमुळे शब्दांप्रती आपण उदासीन आहोत. शब्दांचे सामर्थ्य ज्ञात असूनही त्याकडे आपण दुर्लक्ष करतो. विचाराला मूर्त रूप देण्याचे कार्य शब्दच करतात. शब्दांचे सामर्थ्य गुण ज्यांना कळतात ती माणसे समाजाला मार्गदर्शन करतात. शब्दाच्या अंगपांगांची माहिती ठेवून उचित ठिकाणी केलेला वापर एक विशिष्ट उंची बहाल करतो. शब्दांचे हे महत्त्व अनेक साहित्यिकांनी गौरविले आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात,

' आम्हा घरी धन |
शब्दांचीच रत्ने |
शब्दांचीच शस्त्रे |
यत्न करू'

हे शब्दधन प्रत्येक माणसाने आत्मसात करून आपल्या जीवन जाणिवा समृद्ध केल्या पाहिजेत. भाषे शिवाय मानवाने निर्माण केलेली दुसरी कोणतीच गोष्ट जीवनाला अंतरबाह्य स्वरूपात व्यापून राहिलेली नाही. जागृत अवस्थेतील सर्व क्रिया माणसांच्या मुळाशी येऊन थांबतात. तसेच सुप्त अवस्थेतही माणूस भाषेच्याच नियंत्रणात राहतो. जागेपणी आपण विचार करतो.म्हणजे नेमके काय करतो? शब्दांच्या माध्यमातून हवे तसे खेळ खेळतो. माणसास भाषा आवगत नसती तर माणूस विचारच करू शकला नसता.आणि विकास प्रक्रियेचा रथ जैसे थे थांबला असता. झोपेत माणूस स्वप्न पाहतो. स्वप्न वेगवेगळे पडतात. स्वप्नांचे विश्लेषण अनेक पद्धतीने होऊ शकते पण मुळात स्वप्न पडतात ती भाषेतूनच. मराठी भाषकाला इंग्रजीतून स्वप्न पडले आणि कन्नड भाषकाला मराठीतून स्वप्न पडले असे काही होऊ शकत नाही. म्हणूनच मानवी जीवनाला भाषे एवढी अंतर्बाह्य व्यापून टाकणारी दुसरी गोष्ट जगात कोणतीही नाही.

भाषा आणि मानव त्यांचं नातं फार प्राचीन आहे. अक्षर हा मानवाने घेतलेला महत्त्वाचा शोध होता. तसेच भाषा हा त्या अगोदरचा शोधच आहे. संघर्ष करत असताना मानवाला खूप काही सहन करावे लागले.त्यातून मानवाच्या मेंदूच्या विकासाला गती मिळाली. गती नेहमी शक्ती निर्माण करीत असते. मानवाला आपल्या पायाचा शोध लागायला लाखो वर्षे लागलेली आहेत. पायाचा शोध म्हणजे त्याच्यासाठी गतीचा शोध होता. त्याला गती प्राप्त करता येणे हा संस्कृतीच्या शोधाचा आरंभ होता. आणि कोणताही आरंभ हा सृजनशील अशी कृतीच असतो. मानवी बुद्धी ही आज मानवी संस्कृतीचा पाया मानली जाते आहे.

माणूस हा समाजशील प्राणी असल्याने त्याला संपर्क आणि संवादाची नितांत गरज असते. हा संवाद भाषेशिवाय घडू शकत नाही. समाज जीवनात वावरताना परस्परांच्या भावभावनांचा विचार करावा लागतो. त्यासाठी

विचारांची देवाण-घेवाण,आत्म प्रकटीकरण व आत्मनिवेदनातून एकमेकांना समजून घेता येते. त्यातूनच लोकसंपर्क प्रस्थापित करता येतो. परस्परांच्या विचारांची अदानप्रधान म्हणजे संपर्क हा संपर्क सुसंवादी भाषेद्वारे साधला जातो. त्यातून होणाऱ्या संदेश वाहनाने मानवी सबंध मजबूत होतील. म्हणून भाषा संदेश वहनाचे महत्त्वाचे कार्य करते.भाषा ही स्वतंत्र सामाजिक संस्था आहे. ती एका व्यक्तीच्या मालकीची नाही. ती समाजमान्य आहे. ती एका व्यक्तीच्या मालकीची नाही. समाजमान्य असल्याने तिला सामाजिक नियमाचे पालन करावे लागते. माणूस हा समाजशील प्राणी आहे. परस्परातील संपर्काशिवाय त्याला जगणे कठीण वाटते. म्हणून माणूस एकमेकांच्या संपर्कात राहतो. सलोख्याचे सामाजिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी व्यक्तीला जनसंपर्कात राहणे नितांत गरजेचे आहे. व्यक्ती समाज आणि संस्था यांच्या परस्पर समन्वय वाढविण्यासाठी समाजाची आवश्यकता वाटते. सुसंवादासाठी परिपक्व भाषा लागते. सध्याच्या जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर भाषेला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे.

आपल्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली आहे .आपल्या सांस्कृतिक एकोपाचे दर्शन घडवित महाराष्ट्रातील जनतेने भाषा सांस्कृतिक लढा यशस्वीपणे पूर्ण केला. आज मराठी भाषेच्या विकासासाठी कोणतेच ठोस स्वरूपाचे धोरण नसल्यामुळे मराठी भाषेवर परकीय भाषांचे अतिक्रमण वाढत आहे. दुकानाच्या पाट्या मराठीतून असणे म्हणजे धोरण नव्हे तर सर्वंकष व्यवहार मराठीतून झाले पाहिजे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांची वाढती संख्या लक्षात घेतली तर मराठी माध्यमाच्या शाळेत शिकणे म्हणजे न्यूनगंड असण्यासारखे होय. असा एक समज सार्वत्रिक स्वरूपात धारण केला जात आहे. मराठी ही आज नव्हे तर ज्ञानेश्वरांच्या काळापासून एक प्रगत आणि प्रकल्प भाषा म्हणून ओळखली गेली आहे. म्हणूनच संत ज्ञानेश्वर म्हणतात,

माझा मराठाची बोलू कौतुके |
परी अमृतातेही पैजा जिंके |
ऐसी अक्षरे रसिके | मेळविन || ६.१४ ||

मराठी भाषेचा सार्थ अभिमान सोडला तर आज प्रत्यक्ष व्यवहार आम्ही भाषा जिवंत राहावी म्हणून वैयक्तिक पातळीवर असे काही ठोस प्रयत्न करणार आहोत की नाही. हा मूलभूत प्रश्न आहे. शासनाने भाषा व जनता या दोन्ही पातळीवर खूप प्रयत्न करायला हवेत. परंतु आज वेगळीच परिस्थिती निर्माण झाली आहे. मराठी भाषा ही साहित्याची भाषा आहे, आणि ती साहित्यिकांनी जोपासावी असा एक चुकीचा गैरसमज झाला आहे. प्रभाकर बागले यांचे या संदर्भातील मत विचारात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, "मराठी म्हणजे मराठी साहित्य आणि तिचे रूप असे एक कुंपण त्या कुंपणाचे अस्तित्वात निर्माण झाले आहे. यातूनच मग बहुजन वर्गाची वेगळी भाषा आणि अभिजनांची वेगळी भाषा असा भेद निर्माण होतो. हाच भेद विकास प्रक्रियेस मारक ठरत आहे." मुळातच भाषेचा विकास म्हणजे केवळ वैयक्तिक भाषेचा विकास नसतो, तर तेथील सामान्य माणसाच्या प्रगतीच्या दृष्टीने टाकलेले ते एक पाऊल असते. शेती, औद्योगिक, सिंचन सेवा, वाहतूक,दळणवळण या सर्व विकास प्रक्रिया गतिमान झाल्या पाहिजेत. आणि यातून एक संबंध विकास साधला पाहिजे. इंग्रजी ही जर सर्वसामर्थ्यवान भाषा आहे असे आपण एक वेळ गृहीत धरले तर आपल्याकडे ज्ञान घेऊन परदेशात जाणारी माणसे तिथे सर्वच का यशस्वी होऊ शकत नाहीत.भाषा म्हणजे केवळ अक्षरे व हा शब्दांची गोळा बेरीज नसते तर भाषेच्या पाठीमागे आणि पुढे वेगवेगळे घटक कार्यरत असतात.लेखक मकरंद साठे याबद्दल म्हणतात, "कुठल्याही कालखंडातील लिखाण फक्त त्यात आलेल्या शब्दांच्या शब्दकोशातून व त्याच्या अर्थांमधून अभिव्यक्त होत नसतं. तर त्यात येणारे शब्द त्यामध्ये वापरले जाणारे अलंकार, संकल्पना या सगळयांना काही विशिष्ट संवेदना असतात. या सगळयांचे त्या लेखकाशी व वाचकांची पूर्वसंबंध असतात. या पूर्वसंबंधांमधून अनेक शब्द कशे अर्थाच्या पलीकडे अर्थाभियुक्त होतात. हे पाहणे महत्त्वाचे ठरते."

आधुनिक काळात निर्माण झालेल्या तांत्रिक,व्यावसायिक शिक्षणासीही मराठी भाषेने जुळून घेतले पाहिजे. डॉ.लीला गोविलकर एके ठिकाणी म्हणतात, "समाजात अस्तित्वात असलेल्या व विकसित होत असलेल्या विविध नव्या जुन्या व्यवसायांमधून भाषेमध्ये शब्द संपत्तीची विपुलता निर्माण होत असते.त्या त्या व्यवसायिकांच्या मराठी लेखनामधून ते शब्द भाषेत स्थिरावण्याची प्रक्रिया ही घडत असते.या क्षेत्रांशी संबंधित असलेल्या लेखकांच्या ललित लेखनातील या प्रकारच्या शब्द वापराने ललित साहित्याची अविष्कार क्षमता कितीदारी पटणी व्यापक होऊ लागली आहे. म्हणजेच वेगळ्या व्यवसाय स्तरावर असलेल्या शब्दांनी साहित्यबद्ध करून ते पुढे आणले पाहिजे.हे महत्त्वाचे आहे. म्हणूनच मराठी ही केवळ लोकभाषा न राहता तिला ज्ञान भाषेचे स्वरूप प्राप्त झाले पाहिजे. समाजाचे भाषा ज्ञान वाढवून त्यांनी विवेकनिष्ठ बनविण्यासाठी समाजातील प्रज्ञावंतांनी हेतू पुरस्कर प्रयत्न केले पाहिजेत. याच बरोबर लोकभाषा आणि ज्ञानभाषा यांचा सहसंबंध जाणीवपूर्वक जोपासला पाहिजे." ज्ञान भाषेच्या संदर्भात रा.ग जाधव म्हणतात, " ज्ञानभाषा ही प्राधान्याने पारिभाषिक स्वरूपाची असते. ललित साहित्याची भाषा व व्यवहार क्षेत्रातील भाषा यापेक्षा ज्ञान भाषेचे स्वरूप वेगळे असते. वेगवेगळ्या संज्ञा, संकल्पना, शैली अदींचा काटेकोरपणे वापर करण्याची ज्ञान भाषेची जी प्रकृती असते तिच्यामुळे भाषा वाढीस लागते. जास्तीत जास्त आत्मनिर्देशक अनलांकृत अशा वस्तुनिष्ठ प्रतिपादनाचे भाषारूप ज्ञान भाषेत वापरले जाते. याचा अर्थ समाजभाषा व्यवहाराची व्यापक चळवळ त्यापाठीमागे असते." भाषा विकासाच्या दृष्टीने आणखी एक गोष्ट आपणास करता येईल ती म्हणजे वेगवेगळ्या साहित्य संमेलनाच्या ऐवजी केवळ एकच साहित्य संमेलन घेण्यात यावे.आणि उर्वरित पैशांमधून भाषेचे संवर्धन कसे करता येईल त्या दृष्टीने विचार झाला पाहिजे. वैयक्तिक आयुष्यातही मराठी भाषेचे वैभव कसे वाढविता येईल असा प्रयत्न झाला पाहिजे. असे संशोधकाला वाटते.

निष्कर्ष:

अभिजात भाषा आणि साहित्य हे केवळ भाषिक अभिव्यक्तीचे साधन नसून ते मानवजातीच्या सांस्कृतिक स्मृतीचे, वैचारिक परंपरेचे आणि सामाजिक जाणीवेचे सजीव दस्तऐवज आहेत. भूतकाळात अभिजात भाषांनी समाजाच्या धार्मिक, तात्त्विक, नैतिक आणि कलात्मक जीवनाला आकार दिला आहे.वर्तमानकाळात अभिजात भाषा आणि साहित्य अनेक बदलांच्या प्रवाहात टिकून राहण्याचा संघर्ष करत आहेत. जागतिकीकरण, आधुनिक तंत्रज्ञान, बदलती जीवनशैली आणि इंग्रजी भाषेचे वाढते वर्चस्व यांमुळे अभिजात भाषांचा प्रत्यक्ष वापर कमी होत असला, तरी त्यांचे सांस्कृतिक आणि बौद्धिक महत्त्व मात्र कमी झालेले नाही. अभिजात साहित्य आजही आधुनिक समाजाला आत्मपरीक्षण, मूल्यचिंतन आणि सांस्कृतिक ओळख यांची जाणीव करून देत आहे.

शालेय व उच्च शिक्षणात अभिजात साहित्याचा समावेश, डिजिटल माध्यमांचा परिणामकारक वापर, लोकभाषेतून अभिजात साहित्याचे सुलभ सादरीकरण आणि तरुण संशोधकांना प्रोत्साहन दिल्यास अभिजात भाषा नव्या रूपात अधिक सशक्त होतील यात शंका नाही.अशा प्रकारे, अभिजात भाषा आणि साहित्याचा प्रवास हा भूतकाळातील गौरव, वर्तमानकाळातील संघर्ष आणि भविष्यकाळातील आशा यांचा संगम आहे. या परंपरेचे जतन, संवर्धन आणि नव्याने अर्थनिर्णयन करणे हे आपले सामूहिक सांस्कृतिक कर्तव्य आहे. अभिजात साहित्य जपले गेले, तर केवळ भाषा टिकणार नाही, तर भारतीय संस्कृतीची मुळे अधिक खोलवर रुजतील आणि भावी पिढ्यांना वैचारिक समृद्धीचा अमूल्य ठेवा मिळेल.

सारांश:

आजच्या जागतिकीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे अभिजात भाषांचा वापर मर्यादित झाला असला, तरी संशोधन, अनुवाद, शिक्षण आणि डिजिटल जतनाच्या माध्यमातून या भाषांचे संवर्धन सुरू आहे. आधुनिक साहित्यनिर्मितीतून अभिजात परंपरेचा नव्या संदर्भात पुनर्विचार होत आहे. अभिजात भाषा आणि साहित्याचे अस्तित्व समाजाच्या जागरूकतेवर अवलंबून आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर, शिक्षणातील समावेश आणि तरुण पिढीशी संवाद साधल्यास अभिजात साहित्य व आपली मराठी भाषा अधिक सशक्त होऊ शकते. अशा प्रकारे अभिजात भाषा व साहित्याचा प्रवास भूत, वर्तमान आणि भविष्य यांचा समन्वय साधणारा आहे. असे संशोधकाला वाटते.

संदर्भ ग्रंथ:

१) साठे मकरंद,२००६, ' सांस्कृतिक अस्मिता आणि जागतिकीकरण' ,लोकवाङ्मय गृह ,दुसरी आवृत्ती.

२) जाधव रा.ग,२००६, ' निवडक समीक्षा ', पद्मगंधा प्रकाशन , पुणे.

३) तेगमपुरे मारुती, संपा. २०११, ' भाषा विकास आणि राजकारण' ,चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

४) पृथ्वीराज तोर ,संपा.२०१८, ' मराठी भाषिक कौशल्य विकास',अथर्व पब्लिकेशन, धुळे.

५) जोशी श्रीपाद, भालचंद्र,२०२२, ' मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान,' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

६) घाटे निरंजन, २००१, ' विज्ञान साहित्य विश्व' ,अभिनय प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती.

७) पगारे म.सु,२००४, ' मराठी विज्ञान साहित्य,' प्रशांत पब्लिकेशन, जळगाव,प्रथम आवृत्ती.

८) कुलकर्णी व.दि. ,घाटे निरंजन, १९८१, ' विज्ञान साहित्य आणि संकल्पना' ,निहारा प्रकाशन, पुणे.

मध्ययुगीन मराठी भाषा आणि साहित्य

संशोधक विद्यार्थिनी –
श्रीमती.मीना पांडुरंग चव्हाण
e-mail - meenatipugade09@gmail.com
mob.- 8626059040

प्रस्तावना

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक व वैचारिक इतिहासात मध्ययुगीन मराठी भाषा आणि साहित्य यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. इ.स. १२०० ते १८०० हा काळ मराठी साहित्याच्या इतिहासात मध्ययुग म्हणून ओळखला जातो. हा कालखंड मराठी भाषेच्या चढणीचा,विस्ताराचा आणि साहित्यिक वैभवाचा सुवर्णकाळ मानला जातो.या कालखंडात मराठी भाषा ही केवळ व्यवहाराची किंवा संवादाची लोकभाषा न राहता, ती एक सुसंस्कृत, समृद्ध व प्रभावी साहित्यभाषा म्हणून विकसित झाली. या काळातील साहित्याने मराठी समाजाच्या जीवनपद्धती, श्रद्धा, मूल्ये, संघर्ष आणि आशा-आकांक्षा यांचे प्रभावी प्रतिबिंब उमटवले.

मध्ययुगीन काळात भारतीय समाजावर राजकीय अस्थिरता, परकीय आक्रमणे, धार्मिक कर्मकांड, जातिभेद आणि सामाजिक विषमता यांचा प्रभाव होता. अशा परिस्थितीत संतपरंपरेने समाजाला नवी दिशा दिली. संतांनी लोकभाषेचा स्वीकार करून अध्यात्म, भक्ती, नैतिकता आणि मानवतावाद यांचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला. त्यामुळे मध्ययुगीन मराठी साहित्य हे केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक साहित्य न राहता सामाजिक प्रबोधनाचे प्रभावी साधन बनले.

शोधनिबंधाची उद्दिष्टे

१. मध्ययुगीन मराठी भाषेचा उगम, विकास व स्वरूप यांचा सविस्तर अभ्यास करणे.
२. मध्ययुगीन मराठी साहित्याची वैशिष्ट्ये व प्रवाह स्पष्ट करणे.
३. भक्ती चळवळ व संतपरंपरेचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव विशद करणे.
४. मध्ययुगीन काळातील प्रमुख संत, कवी आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करणे.
५. मध्ययुगीन साहित्याचे सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक योगदान स्पष्ट करणे.
६. आधुनिक मराठी साहित्याच्या निर्मितीत मध्ययुगीन साहित्याचे स्थान अधोरेखित करणे.

शोधनिबंधाची गृहितके

१. मध्ययुगीन मराठी भाषा ही लोकजीवनातून विकसित झालेली आहे.
२. भक्ती चळवळीमुळे मराठी भाषेला व्यापक लोकमान्यता व प्रतिष्ठा प्राप्त झाली.
३. संतसाहित्यामुळे मराठी भाषेचे लोकशाहीकरण झाले.
४. मध्ययुगीन साहित्याने सामाजिक समता, नैतिकता व मानवतावादी मूल्यांचा पुरस्कार केला.
५. आधुनिक मराठी साहित्याच्या विचारसरणीवर मध्ययुगीन साहित्याचा खोल प्रभाव आहे.

मध्ययुगीन मराठी भाषेचा ऐतिहासिक विकास

मराठी भाषेचा उगम महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश भाषांपासून झाल्याचे भाषाशास्त्रज्ञ मानतात. यादवकालीन (इ.स. १२व्या ते १४व्या शतकात) शिलालेख, ताम्रपट, दानपत्रे आणि प्रशासकीय कागदपत्रांत मराठी भाषेचा वापर आढळतो. यादव राजांच्या कारकिर्दीत मराठी भाषेला प्रशासनात स्थान मिळाले, ही तिच्या विकासातील महत्त्वाची

घटना मानली जाते. संस्कृत ही तत्कालीन विद्वानांची भाषा असली, तरी मराठी ही जनसामान्यांची भाषा होती. संस्कृत, प्राकृत आणि देशी शब्दसंपदेच्या मिश्रणातून मराठी भाषा अधिक समृद्ध झाली. या काळात मराठी भाषेची विविध रूपे दिसून येतात.संस्कृतप्रधान मराठी, देशी मराठी आणि लोकभाषा. संतांनी लोकभाषेचा स्वीकार केल्यामुळे मराठी भाषा अधिक व्यापक व सर्वसमावेशक बनली. मराठीच्या साहित्य संसाराला बाराव्या शतकापासून प्रारंभ झालेला आढळतो. यापूर्वीची बहुतेक कविता अलिखित स्वरूपात असल्यामुळे (आणि लिखित असल्यास आज ती उपलब्ध नसल्यामुळे) तिच्याविषयी निश्चित स्वरूपाची मते व्यक्त करणे शक्य नाही. तरीपण शृंगार, पराक्रम, लोकजीवनाची सुखदुःखे आणि काही ठिकाणी जैन मुनींचे तत्त्वज्ञान असे तिचे विविध पदर आढळतात. परंतु, या काळातील तत्त्वज्ञान पर लेखनाच्या क्षेत्रातील संस्कृतचे वर्चस्व आणि त्यामुळे सर्वसामान्य नेणत्या, अज्ञानी लोकांची होणारी हेळसांड लक्षात घेता जनसामान्यांना ज्ञान देणारे त्यांच्या 'धर्म भावनेला उच्च विचाराचे अधिष्ठान मिळवून देणारे' साहित्य निर्माण होणे आवश्यक होते. ती काळाची गरज होती. या काळातील वांङ्मय निर्मिती मागील ही प्रधान प्रेरणा होती.संस्कृत भाषा आणि तत्त्वज्ञान यापासून आत्तापर्यंत वंचित असणाऱ्या प्राकृत जनांना त्या तत्त्वज्ञानाचा स्पर्श त्यांच्याच भाषेतून करून देण्याचे बहुमोल कार्य मुकुंदराज यांनी केले. मुकुंदराजांनंतर आणि ज्ञानेश्वरांच्या काही काळ अगोदर महानुभाव संप्रदाय महाराष्ट्रात उदयास येऊन त्याद्वारे मराठी गद्य वाङ्मयाचे व्यासपीठ तयार झाले. सर्व महानुभावीय वांग्मय पंथनिष्ठेवरच आधारलेले आहे. तीच त्याची प्रेरणा आहे. पंथाच्या प्रवर्तकांची चरित्रे, लीळा, वचने, आख्यायिका, पंथीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांचे जतन करणे, त्यांचे दर्शन घडविणे आणि त्यांचा प्रसार करणे ही त्याची खरी भूमिका आहे. गद्य आणि पद्य अशा दोन्ही माध्यमातून त्याची जाणीवपूर्वक निर्मिती झाली आहे. संस्कृतात ग्रंथरचना करावी, हा शिष्ट मान्य संकेत रूढ असण्याच्या या काळात चक्रधर व नागदेवाचार्य यांनी आपल्या ग्रंथकारांना कटाक्षाने मराठीतच ग्रंथरचना करण्यास सांगितले. मराठीतील आद्य गद्यग्रंथ 'लिळा चरित्र' हा महानुभाव संप्रदायाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांच्या लीळा (आठवणी) त्यांच्या शिष्यांने, म्हणजे म्हाइंभट्टाने, संकलित करून चरित्र रूपाने मांडल्या. तसेच म्हाइंभट लिखित श्रीगोविंदप्रभुचरित्र,तसेच केसोबास यांनी लिहिलेली दृष्टान्तपाठ,सूत्र पाठ,स्मृतीस्थळ हे देखील महानुभाव संप्रदायाचे ग्रंथ आहेत.

भक्ती चळवळ : पार्श्वभूमी आणि स्वरूप

भक्ती चळवळ ही मध्ययुगीन भारतीय समाजातील एक महत्त्वाची वैचारिक व धार्मिक चळवळ होती. ईश्वरप्राप्तीसाठी जाती, वर्ण, कर्मकांड यांपेक्षा भक्ती अधिक महत्त्वाची आहे, हा विचार भक्ती चळवळीने मांडला. दक्षिण भारतातून सुरू झालेली ही चळवळ महाराष्ट्रात येऊन विशेष फुलली.महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाने भक्ती चळवळीला संघटित स्वरूप दिले. पंढरपूर हे भक्तीचे केंद्र बनले. विठ्ठलभक्तीच्या माध्यमातून संतांनी समाजात समता, बंधुता व करुणेचा संदेश दिला. मराठी भाषेतील भक्तिसाहित्यामुळे ही चळवळ जनसामान्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली.

संतपरंपरा आणि मराठी साहित्य

संत ज्ञानेश्वर

संत ज्ञानेश्वर (इ.स. १२७५–१२९६) तेराव्या शतकापासून म्हणजे सुमारे ७०० वर्षांपासून ज्ञानदेवांची अमृतवाणी मराठी मनाला रिझवीत आली आहे. आजही तिच्या कोवळिकीला कुठे बाधा झालेली नाही. वारकऱ्यांच्या घरोघरी 'ज्ञानेश्वरी'चे वाचन चालत आलेले आढळते. आणि ज्ञानदेवांचा 'ज्ञानेश्वर माऊली' असा नामघोषही सतत ऐकू येतो.असा नाम घोष आजही करण्याइतके आणि जन्मोजन्मी कृतज्ञ राहण्याइतके अमोल विचारधन आणि भावधन ज्ञानदेवांनी महाराष्ट्राला दिले आहे. ज्ञानेश्वरी म्हणजे महाराष्ट्रीयन शारदेच्या गळ्यातील 'देशीकार लेणे'च म्हंटले पाहिजे.ज्ञानदेवांचा जन्म इ.स.१२७५(श.११९७) मध्ये झाला आणि इ.स.१२९६(श.१२१८) मध्ये ते समाधीस्थ झाले. पण या एकवीस वर्षांच्या आयुष्यात त्यांनी जे साहित्य विषयक आणि सांस्कृतिक कार्य केले, ते अविस्मरणीय आहे.

भावार्थदीपिका किंवा ज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या माध्यमातून त्यांनी भगवद्गीतेचा मराठी भाषेत भावार्थ सांगितला. अमृतानुभव हा त्यांचा तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ आहे. ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेला तत्त्वज्ञान व्यक्त करण्याची क्षमता प्राप्त करून दिली.

संत नामदेव

संत नामदेव हे महाराष्ट्राबरोबरच उत्तर भारतातही प्रसिद्ध होते. त्यांच्या अभंगांतून भक्ती, समता, मानवता आणि आत्मनिवेदन व्यक्त होते. सगुण भक्तीतरमून, समाजाला मानवतेची उपासना शिकवून, भागवतधर्माची पताका पंढरी पासून पंजाब पर्यंत नेणाऱ्या नामदेवांचे व्यक्तिमत्व भाव वेडे असे आहे. आपल्या अभंगवाणीच्या रूपाने त्यांनी वाचकांशी सख्यत्व जोडले. त्यांची अभंगवाणी म्हणजे त्यांच्या भाववेड्या,उदात्त,प्रसन्न,सोज्वळ आणि निष्पाप अशा व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार होय. त्यांचे आत्मचरित्र रूप असे ४९१अभंग आहेत. नामदेवांची भाषा सोपी, भावपूर्ण आणि थेट जनमानसाला भिडणारी आहे. मराठीतील पहिले भावकवी, पद्य चरित्रकार, आत्मचरित्रकार, अख्यान कवी, भागवत धर्माचे पहिले संघटक आणि प्रचारक, कीर्तन परंपरेचे प्रवर्तक, आपल्या शिष्याची समाधी बांधणारे गुरू अशा अनेक पैलूंनी नामदेवांचे व्यक्तिमत्व संपन्न आहे. संत नामदेवांनी मराठीतूनच नव्हे तर हिंदी भाषेतही पद रचना केली आहे.कबीर, रामानंद, सूरदास यांच्यावरही नामदेवांचा प्रभाव पडला. शिखांच्या 'गुरुबानीत' नामदेवांची पदे तर आहेतच,पण पंजाबात काही ठिकाणी त्यांची मंदिरेही आढळतात. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर नामदेवांच्या कवितेने आणि कार्याने असा इतिहास निर्माण केला. एवढा जबर भक्ती भाव आणि प्रचंड सांस्कृतिक कर्तृत्व असूनही आपल्याला फक्त विठ्ठलाच्या पायरीशी जागा मिळावी, हे नामदेवांचे विनम्र मागणे पाहिले की भावभक्ती, निष्ठा, विनम्रता, आत्मलोप या मूल्यांच्या श्रेष्ठतेचे आणि भव्यतेचे अर्थ कळू लागतात.

संत एकनाथ

ज्ञानेश्वरानंतर सुमारे 300 वर्षांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे पुनरुत्थान घडविण्याचे कार्य एकनाथांनी केले. 'हे खरे महाराष्ट्राचे नाथ होत', अशा मार्मिक शब्दात न्या. रानडे यांनी एकनाथांच्या सांस्कृतिक कार्याचे मूल्यमापन केले आहे. बहिणाबाईंनीही भागवत मंदिराचे चित्र रेखाटताना 'जनार्दनी एकनाथ! खांब दिला भागवत' असे श्रेय नाथांना दिले.

संत एकनाथ (इ.स. १५२८–१५९९) यांनी एकनाथी भागवत, भारुडे, अभंग व पद्यरचना केल्या. भारुडांच्या माध्यमातून त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, दांभिकपणा आणि सामाजिक अन्याय यांवर प्रभावी टीका केली. प्राकृतात ग्रंथरचना करण्याची ज्ञानेश्वरांपासून चालत आलेली परंपरा नाथांनीही पुढे चालवली आहे. या दोन संतांमध्ये जरी तीनशे वर्षांचे अंतर असले तरी दोघांत फार मोठे विचार साम्यही आहे.

एकनाथांची ग्रंथ रचना ही विपुल आहे. गुरु श्रीजनार्दनस्वामी यांच्या आज्ञेने नाथांनी चतुश्लोकी भागवत लिहिले.हा त्यांचा पहिलाच ग्रंथ होय.एकादशस्कंधावर एकनाथी भागवत लिहिले आहे. नाथांची साहित्य संपदा अष्टपैलू आहे. भागवता सारखे प्रबंध, भावार्थरामायण आणि रुक्मिणी स्वयंवरासारखी रसाळ अख्यानक कविता; संत आणि भक्त चरित्रे, पदे, गौळणी,अभंग,भारुडे आणि स्फुट गद्य हे तिचे आठ पैलूच होत. मराठी संत कवींमध्ये एवढी विविधता पूर्ण वांग्मयीन कामगिरी फक्त नाथांचीच. पंडित, सामान्य संसारिक आणि बहुजन समाज या साऱ्यांनाच त्यांच्या कुवतीनुसार, त्यांच्या भाषेतून अध्यात्म सोपे करून सांगण्याचा मराठीतील हा पहिलाच प्रयत्न म्हटला पाहिजे. आपल्या आख्यान कवितेतून नाथांनी जनजागृती केली समाज दर्शन घडविले.

संत तुकाराम

संत तुकाराम (इ.स. १६०८–१६४९) ज्ञानदेवांनी रचलेल्या भागवत संप्रदायाच्या इमारतीवर कळस होण्याचे भाग्य तुकोबांना लाभले. तुकोबांची अभंगवाणी आजही लोकांच्या अंतकरणात घर करून आहे. त्यांचे लवचिक आणि पारलौकिक भावजीवन त्यांच्या अभंग वाणीतून उत्कटपणे अविष्कार झाले आहे. संत तुकाराम आणि त्यांची अभंगवाणी

एकमेकांपासून वेगळी काढता येणार नाही. सामान्यांसारखा संसार करून, त्यातील दुःखे भोगून, रात्रंदिन युद्धाचा प्रसंग करून 'अनंता' प्राप्ती करून घेणारा संत म्हणजे तुकाराम. कदाचित त्यामुळेच इतर संतांपेक्षा तुकोबांबद्दल आणि त्यांच्या जीवनातून उन्हाळून आलेल्या कवितेबद्दल बहुजनांना नेहमीच जिव्हाळा वाटत आला आहे त्यांचे अनुभव व जीवनविषयक विचार आपलेच आहेत अशी जाणीव ते वाचताना कुणालाही व्हावी.संत तुकाराम हे मराठी संतसाहित्यातील सर्वोच्च कवी मानले जातात. त्यांच्या अभंगांतून जीवनातील दुःख, भक्ती, आत्मचिंतन आणि सामाजिक टीका प्रकट होते. तुकारामांची भाषा लोकभाषेचा उत्कृष्ट नमुना आहे.

समर्थ रामदास

समर्थ रामदास (इ.स. १६०८–१६८१) संत मालिकेत समाविष्ट होणारे परंतु स्वतंत्र असा संप्रदाय निर्माण करणारे रामदास हे सोळाव्या शतकातील आगळे कवी होत. 'संत' व 'समर्थ'अशी त्यांच्या व्यक्तिमत्वाची दोन रूपे आपणास त्यांच्या काव्यात आविष्कार झालेली आढळतात. त्यांनी परमार्थाची तर शिकवण दिलीच, पण बदलता काळ व भोवतालची परिस्थिती लक्षात घेऊन समाजाला 'प्रपंच विज्ञान' ही सांगितले. दासबोध व मनाचे श्लोक या ग्रंथांतून नैतिकता, कर्तव्य, आत्मशिस्त आणि राष्ट्रभावना यांचा संदेश दिला. त्यांच्या साहित्यात व्यवहारज्ञान आणि अध्यात्म यांचा समन्वय दिसून येतो.

मध्ययुगीन मराठी साहित्यप्रकार

मध्ययुगीन मराठी साहित्यात विविध साहित्यप्रकारांचा विकास झाला. अभंग हा प्रमुख साहित्यप्रकार होता. ओवी, भारूड, पोवाडा, आख्यानपर काव्य, नीतिपर साहित्य, चरित्रपर लेखन हे प्रकारही या काळात विकसित झाले. या साहित्यप्रकारांमुळे मराठी भाषेची अभिव्यक्ती अधिक प्रभावी व समृद्ध झाली.

सामाजिक व सांस्कृतिक प्रभाव

मध्ययुगीन मराठी साहित्याने समाजातील जातिभेद, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि अन्याय यांवर कठोर टीका केली. संतांनी समता, बंधुता, प्रेम आणि करुणा या मूल्यांचा पुरस्कार केला. त्यामुळे मराठी साहित्य समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरले.

मध्ययुगीन साहित्याचा आधुनिक मराठी साहित्यावर प्रभाव

आधुनिक मराठी साहित्याच्या भाषा, शैली आणि आशयावर मध्ययुगीन संतसाहित्याचा खोल प्रभाव आहे. सामाजिक जाणीव, लोकाभिमुख भाषा आणि नैतिक मूल्ये ही मध्ययुगीन साहित्याची देणगी आधुनिक साहित्यात स्पष्टपणे दिसून येते.

सारांश

मध्ययुगीन मराठी भाषा आणि साहित्य हे मराठी संस्कृतीचे आधारस्तंभ आहेत. संतपरंपरेमुळे मराठी भाषा लोकाभिमुख, समृद्ध आणि प्रभावी झाली. या साहित्याने समाजप्रबोधन, मूल्यसंवर्धन आणि सांस्कृतिक एकात्मता साधली. आधुनिक मराठी साहित्याचा पाया मध्ययुगीन साहित्याने घातला, असे निश्चितपणे म्हणता येते.

संदर्भ पुस्तके

१. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- ल.रा.नसिराबादकर
२. देशपांडे, ग. त. – मराठी साहित्याचा इतिहास
३.खांडेकर, वि. स. – संतसाहित्य : स्वरूप आणि प्रभाव
४. साळुंखे, भा. – भक्ती चळवळ आणि मराठी साहित्य
५. कुलकर्णी, रा. ग. – मध्ययुगीन मराठी भाषा : विकास व स्वरूप
६. भालचंद्र नेमाडे – मराठी साहित्याची वाटचाल

विश्वास वसेकर यांच्या सामाजिक कविता एक शोध

संशोधक विद्यार्थी
सविता जीवन लोहकरे – माळी
चांदमल ताराचंद बोरा कॉलेज,शिरूर (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे)
Mail id- savitamali06@ gmail.com Mobile no. 8379878986

प्रस्तावना :-

मराठी काव्याला अनेक शतकांची परंपरा आहे. इतर साहित्य प्रकारांपेक्षा 'कविता' हा साहित्य प्रकार आपल्या सांस्कृतिक जीवनाला पुरातन काळापासून सर्वांगाने व्यापलेला आहे. या शोधनिबंधात मराठीतील एक ज्येष्ठ , कवी, लेखक, समीक्षक, प्रतिभावंत साहित्यिक विश्वास वसेकर यांच्या सामाजिक कवितांचा शोध घेणार आहे. मराठवाड्यातील सेलू, परभणी या ठिकाणी प्राध्यापक असलेले वसेकर यांनी मराठी साहित्यात कविता, ललितलेखन, अनुवाद, समीक्षा, बालसाहित्य, कादंबरी असे समृद्ध अशाप्रकारचे लेखन त्यांनी केले आहे. त्यांच्या लेखनाचा विशेष म्हणजे ग्रामीण आणि वास्तव जीवन यांचे चित्रण करणे, हा त्यांच्या साहित्याचा विषय आहे. राजकीय, विडंबन तसेच प्रेमविषयक विषयांवर त्यांनी लेखन केले आहे. असे कवी विश्वास वसेकर निवृत्तीनंतर सध्या पुणे येथे राहत असून त्यांचे १९८० पासून ते २०२६ पर्यंत एकंदरीत अकरा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. या पार्श्वभूमीवर वसेकर यांच्या एकूण कवितांचा विचार केला असता, त्यांची कविता ही सामाजिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. साहित्य आणि समाज यांचा अत्यंत जवळचा संबंध असून कवी वसेकर हे समाजाची बांधिलकी पाळतात. समाजाशी त्यांचा जवळचा संबंध असून त्यांनी समाजदर्शन, सामाजिक समस्या, सामाजिक प्रश्न या संदर्भामध्ये जसे ललित लेखन, कादंबरी, बालसाहित्य, समीक्षा लेखन केले आहे, तसेच कविताही लिहिल्या आहेत. सामान्यपणे त्यांच्या कवितेचा विचार केला असता असे लक्षात येते की,सुरुवातीच्या काळात काही कविता सोडल्या तर नंतरच्या काळामध्ये विशिष्ट सामाजिक दर्शन डोळ्यासमोर ठेवून त्यांनी आपले काव्यलेखन केले आहे. ग्रामीण तसेच शहरी जीवनातील सामाजिक प्रश्न, मध्यमवर्गीयांचे सामाजिक प्रश्न एकंदरीत समाजामध्ये विविध प्रश्न आहेत,त्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम कवी वसेकर आपल्या कवितेतून करतात.

उद्दिष्टे :-

१. विश्वास वसेकर यांच्या कवितांमधील सामाजिकतेचा शोध घेणे
२. विश्वास वसेकर यांच्या कवितांचे वेगळेपण शोधणे
३. कवी वसेकर यांच्या कविता आणि समाजजीवन यांचा अनुबंध तपासणे
४. विश्वास वसेकर यांच्या कविता निर्मिती मागील हेतू कोणते आहेत, त्यातील सामाजिकतेचा शोध घेणे.

संशोधन पद्धती :-

विश्वास वसेकर यांच्या कवितांमधून व्यक्त होणारे समाजजीवन तसेच सामाजिक प्रश्न या दृष्टीने शोधनिबंधात सामाजिक,वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

गृहितके :-

१. विश्वास वसेकर यांच्या कवितांमध्ये सत्य आणि वास्तववादाचा आग्रह दिसून येतो.
२. वसेकर यांच्या कवितांमधून संवेदनशीलता आणि अस्वस्थता दिसून येते.
३. वसेकरांच्या सामाजिकतेचे दर्शन त्यांच्या कवितांमधून होते.
४. मानवतावादी दृष्टीकोन, संवेदनशीलता आणि अस्वस्थता, मध्यमवर्गीय जाणिवांचा आविष्कार यांचे दर्शन वसेकरांच्या कवितांमधून होते.

विश्वास वसेकर यांची सुरुवात ही केशवसुतांनंतर झाली असली, तरी त्या काळातही केशवसुतांनी अनेक सामाजिक कविता मोठ्याप्रमाणावर, लिहिल्या आहेत. त्यानंतरच्या काळामध्ये नामवंत कवींनी मराठीतील सामाजिक आशयाच्या कविता लिहिल्या आहेत. कवी जेव्हा सामाजिक आशयाच्या कविता लिहितो, तेव्हा कवीला समाजातील समस्या सांगायची नसते, तर त्या सामाजिक समस्येचे निराकरण कसे होईल, समस्येवर उपाय काय, याचा सुद्धा कवी विचार करतो आणि आपले मत व्यक्त करतो असे पाहत असता वसेकर यांच्या अकरा काव्यसंग्रहातील जवळपास निम्म्या कविता या सामाजिक आशयाच्या आहेत.

विश्वास वसेकर यांच्या कवितेतील विविध सामाजिक विषय :-

कौटुंबिक समस्या :-

गरिबी मध्यमवर्गीय जीवनातील आर्थिक ओढाताण आणि कमी वेतन यामुळे कुटूंबातील समस्या यांच्यावर कवींनी 'व्याख्या', या कवितेतून भेदक आणि उपरोधिक भाष्य केले आहे.

"ज्याच्या पायात चप्पल नाही तो गरीब
ज्याचा मोजा फाटका तो निम्न मध्यमवर्गीय
चष्मा फुटल्यानंतर ज्याला महिनाभर थांबावं लागतं नव्यासाठी
तो चतुर्थश्रेणी कर्मचारी
पगाराचा उत्पन्नाशी संबंध नसतो
तो महसूल कर्मचारी." (शरसंधान पृ.क्र. ४५)

या कवितेत गरिबी आणि आर्थिक स्तर यामधील दरी स्पष्ट केली आहे. या समाजात असेही लोक आहेत की त्यांच्या मूलभूत गरजासुद्धा पूर्ण होत नाही. चष्मा फुटल्यावर महिनाभर दुरुस्त करण्यास वेळ लागतो, हे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याचे दुर्बलत्व दाखवते. त्याच्या अवस्था फारच वाईट असते. त्याला मिळणाऱ्या तुटपुंज्या पगारात त्याला त्याच्या कुटुंबाचे पालनपोषण करायचे असते, स्वतःसाठी तो लगेचच नवी काही घेऊ शकत नाही, कारण त्याचा पगार कमी असतो. या समाजामध्ये पाचव्या वेतन आयोगापूर्वी चतुर्थश्रेणी कर्मचारी यास त्याच्या जीवनात कोणकोणत्या अडचणी, समस्या येतात याचे वास्तव या कवितेतून कवींनी मांडले आहे.

सामाजिक भान :-

आज समाजात माणसे सामाजिक भान ठेवून वागत नाहीत. आजच्या काळात माणसांने कसे वागले पाहिजे, याचे वर्णन कवींनी 'पाहिजेत' या कवितेतून केलेले आहे. समाजात खरोखरच अशा सामाजिक जाणीव असलेल्या लोकांची गरज आहे, परंतु अशी माणसे मिळत नाहीत.

" वस्तुस्थितीचा नाही होऊ शकत विपर्यास
न्यायालयात साक्ष द्यायला माणसं पाहिजेत.
रेल्वे, बसमध्ये नाही कुणी करू शकत मुजोरी
रिकाम्या जागी धिटाईने, हक्कानं बसणारी
माणसं पाहिजेत. "(शरसंधान पृ. क्र. २६)

आजच्या समाजाचे वास्तव दर्शन कवींनी या कवितेमधून केले आहे आणि खरोखरच ही वस्तुस्थिती आहे, हिचा विपर्यास होऊ शकत नाही. आज समाजात वस्तुस्थिती मांडणारे आणि न्यायालयात सत्याची साक्ष देणारे लोक हवे आहेत.सार्वजनिक ठिकाणी जसे की रेल्वे आणि बसमध्ये मुजोरी न करता, आपल्या हक्कानं आणि धिटाईनं योग्य जागी बसणारे आणि नियम पाळणारे लोक पाहिजेत. सर्व कामे कायदयाने आणि नियमानेच व्हावीत, यासाठी धीरानं आणि संयमाने काम होऊ देणाऱ्या माणसांची गरज आहे.या कवितेतून असे जाणवते की समाजात प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता आणि मानवीय मूल्यांची गरज आहे, हे व्यक्त होते.

विचारांतील संवेदनशीलता :-

आज माणूस माणसाचा विचार करत नाही. प्रत्येक गोष्टीत स्वतःच्या स्वार्थाचा विचार करतो. हाच विचार करत असताना काही माणसे इतरांचा विचार करणारी संवेदनशील ही आपणास पहावयास मिळतात. तर काही

माणसे प्रत्येक गोष्टीतून स्वतःचा कुठलातरी छोटासा स्वार्थ पाहत असतात. अशा समाजातील दांभिकतेचे वर्णन लेखकांनी 'चोरांसाठी सूचना' या कवितेतून केलेले आहे

" चोरा रे,
तुला कुलूप तर न्यायचं नाही ना?
मग हळूच उघड की
आमच्याकडे आधीच तंगी
आताही होणारी चोरी
तेवढा कुलपाचा खर्च तरी वाचव."(शरसंधान पान क्र. २९)

समाजात असणारे मध्यमवर्गीय लोक, गरीब लोक आहेत त्यांच्या घरात अगोदरच तंगी व गरिबी आहे आणि त्यातच आता घरात होणारी चोरी, म्हणून चोरा तुला कुलूप न्यायचं नाही ना, मग हळूच उघड की, निदान आमचा कुलपाचा खर्च तरी वाचव. या कवितेमध्ये ज्या व्यक्तीच्या घरामध्ये चोरी होत आहे त्याच्या विचारातील संवेदनशीलता आपल्याला पुढील ओळींवरून लक्षात येते, चोरा आमच्या घरात पुस्तकही आहेत पण चोरांनो ती हलवू नका, कारण त्यांची बांधणी फार नाजूक असते ती एकदा निखळली की त्यांना पूर्वीची कळा येत नाही.पण चोरांनो ती हलवू नका कारण त्यांची बांधणी फार नाजूक असते ती एकदा निखळली की त्यांना पूर्वीची कळा येत नाही.मध्यमवर्गीय माणसाकडे चोरण्यासाठी काहीही नसते. तो बिचारा गरीब माणूस त्या चोराला म्हणत असतो की तू इथे पाहिलेस का आमची रातराणी कशी बहरली आहे. तुला इथे नेण्यासारखे काहीही नाही ,परंतु तू छाती भरून गंध घेऊन जा. नाहीतरी भुरट्या चोरानं भरून नेण्यासारखे दुसरे आमच्याकडे काही नाही. गरीब लोकांना सामान्य लोकांना किती आर्थिक विवंचना असतात, त्यातच होणारी चोरी, चोरांनी आपल्याकडील काय न्यावे, कुलूप कसे उघडावे याचे उपरोधिक पद्धतीने वर्णन कवींनी या कवितेत केले आहे. सामाजिक स्थितीचे, समाज वास्तवाचे वर्णन कवींनी या कवितेतून केले आहे.

राजकारण :-

कवी वसेकर यांची कविता समकालीन स्थितीगतीचा कठोर परामर्श घेते. समकालीन सामाजिक व राजकीय अराजकाला लक्ष्य करते. राष्ट्राच्या उथ्थानाला सुरुंग लावू पाहणाऱ्यांविषयी चीड व्यक्त करते. हा संताप निरोगी आहे,याच राजकारणाविषयी विरोधी पक्षावरही कवींनी लेखन केले आहे. 'दुःखात सुख' या कवितेत विरोधी पक्षही कधीकधी स्वतःला श्रेय घेण्यासाठी चांगली कामे करतात.

"राजकारणातले बरेवाईट
त्यांचे त्यांना लखलाभ असो
विरोधी पक्ष विरोधासाठी का होईना
अत्याचाराला वाचा फोडतात
दुःखात सुख ते एवढंच
आणखीही एक दुःखात सुख ते असं
की विरोधी पक्ष गरज म्हणून
ही जी भूतं उभी करतात
त्यातली कित्येक खोटीही असतात." (अंकोरवट पृ. क्रमांक ३९)

राजकारणामध्ये जे काही बरे वाईट घडते ते त्यांचे त्यांनाच लखलाभ असो,पण सत्तेमध्ये असणारे जे काम करतात त्यांच्या विरोधासाठी का होईना विरोधी पक्ष असतो. बऱ्याच वेळा विरोधी पक्षामुळे अन्याय, अत्याचाराला वाचा फोडली जाते. चुकीच्या गोष्टी क्रिया घडण्यापासून अटकाव केला जातो. विरोधी पक्ष अस्तित्वात असल्यामुळे किंवा त्यांच्या भीतीमुळे सत्ताधारी मनमानी कारभार करू शकत नाही.त्यांच्या चुकीच्या गोष्टींकडे विरोधी पक्षाचे बारीक लक्ष असते. त्यामुळे सत्ताधारी थोडे सावधगिरीनेच काम करतात. राजकारणातील प्रत्येक गोष्ट कवी वसेकर यांनी हळूवारपणे आपल्या कवितेतून मांडली आहे. मार्मिक असे भाष्य त्यांनी केले आहे.

'दुःखात सुख' या कवितेमध्ये वर्तमानपत्रांची संवेदनशीलता बधीर झाल्याचे आणि राजकारणातील विसंगती व स्त्रियांवरील अत्याचारांचे सामाजिक आणि राजकीय विचार मांडले आहेत. या कवितेतून कवीने समाजातील आणि राजकारणातील दुर्दशा व त्यातील विसंगतीवर प्रकाश टाकला आहे. राजकीय लोकांच्या प्रत्येक

हालचालींचे निरीक्षण कवी करतात. अशाच प्रकारे 'अमेरिका' या कवितेतूनही कवी आपणास राजकीय डावपेचांबद्दल सांगू पाहतात.

"डावपेचाचा भाग
म्हणून शत्रू झालेला मित्र
ज्यास तो म्हणतो
डावपेचासाठी आलेला जवळ
आपण ताणतो तारा मेंदूच्या." (अंकोरवट पृ.क्र ५५)

राजकीय गोष्टींमध्ये डावपेच म्हणजे राजकारणी लोकांच्या जीवनातील नित्याचाच भाग असतो. खऱ्या आयुष्यात चांगला सख्खा मित्र असलेला निवडणुकीत त्याचा शत्रू असतो. हा राजकीय डावपेचाचा एक भाग असतो. फक्त लोकांना दाखवण्यासाठी असलेला शत्रू हा सामान्य जनतेला भासवण्यासाठी असतो.परंतु वास्तविकता ही खूप वेगळी असते. राजकारण्यांच्या फसवेगिरीमध्ये सामान्य माणूस आपल्या बुद्धीला फार ताण देत असतो. तो त्याच्या डोळ्यासमोर असणाऱ्या, घडणाऱ्या गोष्टींचा विचार करत असतो. राजकारणात शत्रू हा खराखुरा शत्रू भासवण्यासाठी तो दूरदर्शनच्या मुलाखती मध्ये त्यावर टीका-टिपणी करतो. शत्रू भासवण्यासाठी त्याची बदनामी केली जाते. एकमेकांवर दोघेही सख्खे मित्र शब्दरूपी चिखलफेक करतात आणि सामान्य जनता मात्र या घटनांचा केवळ विचारच करत राहते. राजकारणात वातावरण निर्मिती करण्यात राजकारणी व धूर्त लोकांचा हात कोणीच धरू शकत नाही, हे परम सत्य आहे. सत्ता मिळविण्यासाठी मित्राचा कधी शत्रू होतो, तर कधी शत्रू हा कायदयासाठी मित्रही होतो.लोकांचे असे मत असते की, राजकीय नेते डावपेच आखण्यात आणि एकमेकांवर कुरघोडी करण्यात इतके व्यस्त असतात की, रस्ते, पाणी, शिक्षण आणि बेरोजगारी यांसारख्या मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष होते. डावपेचांमुळे विकासाचा वेग मंदावतो, असे सामान्यांना वाटते. सामान्यांना राजकीय डावपेचांपेक्षा पारदर्शक कारभार आणि नैतिक राजकारणाची अधिक अपेक्षा असते. "निवडणुकीपुरते राजकारण असावे, पण विकासाच्या बाबतीत सर्वांनी एकत्र यावे," अशी प्रामाणिक इच्छा सामान्य जनतेची असते. राजकारणी लोक निर्णय कसा घेतात हे कवी 'निर्णय' या लहानश्या कवितेतून सांगू पाहतात.

"पुन्हा एकदा
बैठक होते
नि माणसं
जातीच्या पातळीवर येतात
झाल गेलं विसरून
पुढील धोरण ठरवितात" (अंकोरवट पृ.क्र ११५)

पुढारी लोकांची पुन्हा एकदा बैठक सभा होते.या सभेत लोक जाती-पातीवरून एकमेकांना छेडतात,वाद निर्माण करतात. मोठ्या प्रमाणात आपली जातच श्रेष्ठ असल्याचे मिरवतात. जातीवरून खूप वाद, तंटे होतात. अगदी एकमेकांचे शत्रू होतात. आणि कालांतराने पुन्हा सर्व झाले-गेले विसरून राजकारणासाठी पुढील धोरण ठरवितात.पुढच्या काळाच्या फायद्यासाठी पुन्हा एकत्र येतात. यामध्ये भरडला जातो, तो फक्त समाज,या समाजाची दिशाभूल करून, समाजातील लोकांच्या भाबडेपणाचा फायदा घेऊन राजकारण केले जाते.राजकारण्यांच्या रक्तात धर्म नि जातीयता असते. हे लोक सामाजिक किंवा राष्ट्रीय हित बाजूला ठेवून पुन्हा एकदा जातीय किंवा विभागीय स्तरावर विचार करू लागतात. हा समाजातील भेदाभेद आणि राजकीय स्वार्थावर केलेला उपरोध आहे.

धर्माचे राजकारण :-

अयोध्या येथील मंदिर बांधण्याच्या वेळी धर्मनिरपेक्षता वाले म्हणून या राजकारणी लोकांनी कसे राजकारण केले, याबद्दलचे विचार कवी आपल्या 'अयोध्या' या कवितेतून मांडतात.

" अधिक कृत्रिमपणे तापवणे
नंतर बेरहम शमवणे
पुन्हा पेटवणे, पुन्हा विझवणे
या देशाला हरामखोरांनी
गिनीपीग करून टाकले,
खुर्च्या सांभाळून पाहणाऱ्यांनो

आणि गुडघ्याला बाशिंग बांधणाऱ्यांनो
बस्स. बस करा हा तमाशा
जनता कधीच शहाणी होणार नाही
हे गृहीत नका धरू
सत्तांतरांच्या इतिहासाबद्दल
आम्ही तुम्हाला सांगावे असे नाही". (पैगाम पृष्ठ क्रमांक ५५)

या कवितेत राजकारण्यांच्या अस्थिर आणि स्वार्थी वृत्तीवर बोट ठेवण्यात आले आहे. सत्तेसाठी (खुर्ची सांभाळू पाहणाऱ्या) आणि प्रसिद्धीसाठी (गुडघ्याला बाशिंग) राजकारणी कशाप्रकारे वागतात, याचे वर्णन आहे.सामान्य जनतेला राजकीय स्वार्थासाठी वापरले जात असल्याचे कटू सत्य मांडले आहे.लोकांनी स्वतःची बुद्धी गहाण ठेवून इतरांच्या हातातील बाहुले बनणे स्वीकारल्याचे दिसते. या कवितेतून देशाची प्रगती थांबवून प्रतिगामी विचारांकडे होणाऱ्या वाटचालीवर बोट ठेवले आहे. ही कविता जनतेच्या भावनांशी खेळणाऱ्या आणि त्यांना सतत भावनिक आंदोलनांत गुंतवून ठेवणाऱ्या राजकारण्यांवर प्रहार करते. तसेच समाजाच्या उदासीनतेवर आणि राजकीय फसवणुकीला बळी पडण्याच्या प्रवृत्तीवर टीका कवितेतून केली आहे. कवी समाजाच्या आणि राजकारणाच्या सद्यस्थितीवर कठोर टीका करतात. सत्तेत असणाऱ्या आणि जनतेचा गैरफायदा घेणाऱ्या राजकारणी, धूर्त व कपटी माणसांची कान उघडणे या कवितेतून कवी करतात. हा समाज या समाजातील जनता पुन्हा पुन्हा तीच तीच चूक करणार नाही. काही काळानंतर आपली चूक जनतेलाही समजेल व ही जनता जेव्हा जागृत होईल तेव्हा या सत्तेत हमखास बदल हा होणारच हा आशावाद आपणास या कवितेतून दिसून येतो.

भारत देशामध्ये धर्माच्या नावावर ज्या प्रकारचे राजकारण होते त्यावर 'भारतधर्म' या कवितेतून कवी लिहितात,

" त्याच धर्ममंदिराच्या आडोशाने
दुसरीकडे माझ्या देशात
राजकीय स्वार्थाची दारू पिताना
धर्म पापडासारखा चघळला जातो,
शांतता, सुव्यवस्था राखणारे
लष्कर काळजी घेते,उट्टेही काढते,
संबंधित रक्तवंशांची पूर सोडता येता
न्यायालये जातिपंचायती बनतात." (अंकोरवट पृ.क्र.४७)

कवी या कवितेतून समाजापुढे देशानले राजकारण नेते कशाप्रकारे चालवतात, हे सांगतात की धर्ममंदिराच्या आडोशाने मंदिरांवर राजकारण करतात आणि स्वतःचा राजकीय स्वार्थ साधत असताना स्वार्थाची दारू पितात व धर्म हा दारुसीबत पापडासारखा चघळतात. मंदिरांवर राजकारण करून भांडणे लावतात, ती भांडणे इतकी वाढतात की शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी लष्कराला बोलावले जाते व लष्कर सामान्य जनतेची काळजी घेते, बरेससे एकाच रक्तवंशाचे त्योक आपापली जुनी दुखणी म्हणजेच आधीची शत्रूताही यामध्ये उकरून उकरून काढतात. यामध्ये मग जातीय निवाडा करण्यासाठी वेगवेगळ्या धर्मामध्ये असणारी भांडणे सोडविण्यासाठी न्यायालये जातिपंचायती बनतात. न्यायालयात जातींचे निवाडे केले जातात. अतिशय सहज शांत असणारे वातावरण पेटवण्यासाठी भारतातील लोकनेते व विरोधी नेते धर्ममंदिरांना निशाणा बनवून त्याचे राजकारण करून आपली राजकीय पोळी भाजून घेतात. हे स्पष्ट शब्दात कवी आपल्या कवितेतून मांडतात.

स्त्री शिक्षिका :-

कवींनी सर्व समाज घटकांवर कविता केलेले आहेत. त्यांच्या कविता सर्वच विषयांवर, विविध समाज घटकांवर आपणास पाहावयास मिळतात. काही कवितेत कवींच्या आधुनिकवादी संवेदनशीलतेचा महत्त्वाचा पैलू असलेल्या उपरोधिक दृष्टीचा प्रत्यय ही त्यांच्या " देवानंदा एक स्केच " या कवितेत पहावयास मिळतो.

"ब्यांशी दिवस माझ्यात असते दलित
कवियित्री स्त्रीवादी लेखिका
क्रांतीची, शोषण मुक्तीची स्वप्न पाहणारी
आणि त्र्यांशीच्या दिवशी तुम्ही उचल्यांनो

अपहरण करणार माझ्या गर्भाचं? (शरसंधान पृष्ठ क्र ४९)

कवींच्या मध्ये माझ्यामध्ये ब्यांशी दिवस दलित स्त्रीवादी लेखिका असते. ती तिचे होणारे शोषण व त्यापासून तिला मुक्तता हवी असते, तिला स्वतःबद्दलचे, तिच्या त्रासाबद्दलचे, तसेच तिच्या जीवनामध्ये सामाजिक, आर्थिक विवंचना असतात. त्यातून मुक्त होण्यासाठी ती स्वप्न पाहत असते आणि या सर्वांनंतर ब्यांशीव्या दिवशी तुम्ही माझ्या गर्भाचे अपहरण करणार का? असा प्रश्न कवी विचारतात.

समाजामध्ये असणारी जातीयता, जाती जातींमध्ये केला जाणारा भेदभाव, दलित समाजामुळे त्या समाजात जन्मलेल्या लोकांना उपभोगायला लागणारी उपेक्षा, जातीनिहाय अन्वयार्थ लावणे इथे थांबवा, किमान माझ्या गर्भाशयाचे भाडे म्हणून तरी एवढे द्या. अशाप्रकारे या कवितेतून कवी समाजातील जातीयतेवर बोट ठेवतात.

प्रेमविषयक कविता :-

प्रेमावरील कविता, ज्यांना प्रेम कविता म्हणतात, त्या भावना, नातेसंबंध आणि भावनांचे प्रभावीपणे वर्णन करतात. या कविता अनेकदा प्रेम वासना, दुःख आणि प्रेमाभंगासारख्या भावना व्यक्त करण्यासाठी लिहिल्या जातात. प्रेम कविता, कवींच्या अनुभवांवर आणि भावनांवर आधारित असल्याने, विविध प्रकारे व्यक्त केली जाते, कधी उत्कट, कधी हळुवार, तर कधी वेदनादायी.

कवी प्रा. विश्वास वसेकर यांचा ' अनवट ' हा प्रेमकवितासंग्रह त्यांच्या मनातील विविध रंगांची उधळण करणारा, आशय आणि आविष्कारांच्या सौंदर्याची मोहिनी घालणारा आहे. आशा, निराशा, विरह, प्रतीक्षा, अपेक्षाभंग, निगूढ अस्पष्टता, प्रकटीकरणातील कातरता, त्याग, लटका मत्सर, प्रेमाची अंतर्बाह्य शुचिता, विरह आणि वेदना या कवितांमधून आपणास दिसतात. मराठी प्रेमकवितेत अनवट ही एक प्रेमकहाणी आहे.

प्रेम व्यक्त केल्यानंतर त्याचे काय काय परिणाम होतात, समाजामध्ये प्रेम या गोष्टीकडे कसे पाहतात, प्रेमात एकमेकांना वचने दिली जातात, प्रेमात पडलेली माणसे प्रेमासाठी काय काय करतात. यातून काय काय परिणाम होतात, ' चाटुवचने' या कवितेत अशाच प्रकारचे प्रेम व्यक्त केले आहे.

"मी जुळवाजुळव केली... आमच्या शाळेत एकीला
बाई, आज तुम्ही छान दिसता" म्हणणाऱ्याची नोकरी गेली होती...
मी जर असं काही म्हणालो तुम्हाला
तर माझी नोकरी जाईल का?" (अनवट पृ. ३७)

कवींनी आपल्या कवितेतून जीवनातील सत्याला आणि सामाजिक वास्तवाला स्पर्श केला आहे.त्यांच्या कविता समाजाच्या वास्तविकतेचे प्रतिबिंब आहे.

निष्कर्ष :-

१. वसेकरांच्या कवितेत समाजातील दलित, शोषित आणि उपेक्षितांच्या वेदनांना स्थान महत्वाचे स्थान मिळाले आहे.
२. ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांचे जीवन आणि शहरांमधील यांत्रिक जीवनातील विसंगती त्यांनी प्रभावीपणे मांडली आहे.
३. त्यांच्या सामाजिक कवितांची भाषा साधी पण थेट काळजाला भिडणारी आहे. उपरोध आणि उपहास, ही त्यांच्या शैलीची वैशिष्ट्ये आहेत.
४. माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे, हा संदेश त्यांच्या अनेक कवितांमधून मिळतो.
५. वसेकर यांच्या कविता निव्वळ कल्पनाविलास नसून त्या सामाजिक वास्तवाचे, विशेषतः ग्रामीण आणि उपेक्षित जीवनाचे प्रखर दर्शन घडवतात.

संदर्भग्रंथ :-

१. डॉ. दादा गोरे, 'काव्यसंवेदन', साकेत प्रकाशन औरंगाबाद प्र. आ. २००७.
२. विश्वास वसेकर, 'पैगाम', कल्पना मुद्रणालय, पुणे प्र. आ. १९९९.
३. विश्वास वसेकर, 'अंकोरवट', मेहता पब्लिशिंग हाऊस, प्र. आ. २०१३.

४. विश्वास वसेकर, 'शरसंधान' भूमिका प्रकाशन, पुणे प्र. आ. २००२.
५. विश्वास वसेकर, 'कलमी कविता', संस्कृती प्रकाशन, पुणे प्र. आ. २०१७.

B.Aadhar' International Refereed & Peer-Reviewed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXV) 565 -A

ISSN : 2278-9308 February 2026

अभिजात भाषा आणि तृतीयपंथीय यांचा सहसंबंध

संशोधक विद्यार्थी

सौ. वेदा उदयराज माळकर.

इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

गोषवारा

अभिजात भाषा म्हणजे अशी भाषा जी प्राचीन समृद्ध साहित्य परंपरा लाभलेली, स्वतंत्र व्याकरण व भाषिक रचना असलेली आणि समाजाच्या सांस्कृतिक वैचारिक इतिहासाचे प्रतिनिधित्व करणारे असते. थोडक्यात ज्या भाषेला दीर्घकालीन उच्च दर्जाची साहित्य परंपरा लाभलेली आहे आणि जी भाषा स्वतःच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहे तिला अभिजात भाषा म्हणतात. भारतीय संस्कृतीत लिंग ही केवळ जैविक संकल्पना नसून ती सामाजिक, सांस्कृतिक आणि तात्विक निर्मिती आहे. अभिजात भाषा मधील साहित्य हे समाजाच्या विचार विश्वाचे प्रतिबिंब असल्याने त्यामध्ये तृतीयपंथीय लोकांचे अस्तित्व भूमिका आणि स्थान विविध स्वरूपात प्रतिबिंबित झालेले दिसते. शास्त्रज्ञांनी असे म्हटले आहे की आपण जेव्हा जेंडर हा शब्द वापरतो तेव्हा त्यामध्ये वास्तवात तीन शब्द येतात सेक्स, जेंडर आणि सेक्शुअलिटी. शरीराचे लिंग किंवा द्रव्य (भौतिक) शरीर म्हणजे सेक्स याचा दुसरा अर्थ लैंगिक संबंध असा होतो. तर मनाचे शरीर किंवा भावशरीर म्हणजे सेक्शुअलिटी आणि समाजाचे शरीर किंवा व्यक्त शरीर म्हणजे जेंडर.१

Keywords-

अभिजात भाषा, तृतीयपंथीय लोक, लिंगविविधता, पुराणशास्त्र, महाकाव्य, धर्म.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक पद्धतीचा वापर केला आहे. यासाठी समकालीन लिखित पुस्तके, संदर्भ ग्रंथ इत्यादी साधनांचा अभ्यास केला आहे. या सर्व साधनांचे अंतरंग व बहिरंग परीक्षण करून त्याचे विश्लेषण केले आहे.

उद्दिष्टे

१) अभिजात भाषांची सामाजिक भूमिका व त्याचे महत्त्व स्पष्ट करणे.

२) अभिजात साहित्यातील तृतीयपंथीय लोकांचे संदर्भ शोधणे.

३) अभिजात भाषा आणि तृतीयपंथी लोक यांचा सहसंबंध लावणे.

प्रस्तावना

अभिजात भाषा या केवळ भाषिक माध्यम नसून त्या संस्कृतीच्या आठवणी असतात . समाजातील विविध घटक, त्यांची मूल्ये, श्रद्धा आणि संघर्ष या भाषेतील साहित्यामध्ये प्रतिबिंबित होतात. प्राचीनता, समृद्ध साहित्य परंपरा, स्वतंत्ररित्या असणारे व्याकरण, नियम त्यांची सांस्कृतिक व तात्विक मूल्य ही अभिजात भाषेची प्रमुख वैशिष्ट्य आहेत .

तृतीयपंथी लोक हे भारतीय समाजाचे अविभाज्य घटक असून त्यांचा इतिहास अभिजात भाषातील साहित्यामध्ये विविध प्रकारे आढळून येतो. भारतीय समाजात तृतीयपंथीय समुदायाचा इतिहास अत्यंत प्राचीन बहुआयामी आणि सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध आहे. प्राचीन भारतात तृतीयपंथीयांना केवळ लैंगिक अल्पसंख्यांक म्हणून नव्हे तर धार्मिक व सांस्कृतिक घटक म्हणून ही मान्यता होती. फार पुरातन काळापासून समलैंगिकतेचा उल्लेख आपल्या संस्कृतीत आलेला आहे. शिवाय निसर्गतः वेगळे म्हणून जे एखाद्याच्या वाट्याला आलेलं असेल तर ते निसर्ग नियमाविरुद्ध आहे असं आपण कसं म्हणू शकतो? आपला समाज लैंगिकतेबाबत खूपच दांभिक आहे. त्यामुळे लैंगिकतेबाबत वेगळे वर्तन करणाऱ्या लोकांना हा समाज बहिष्कृत करणारच. त्यामुळे त्याची आपण खिल्ली उडवतो आणि आत्मसन्मानाने जगण्याचे त्यांची मार्ग बंद करून टाकतो.२

अभिजात भाषांची सामाजिक भूमिका

अभिजात भाषा म्हणजे दीर्घकालीन साहित्य परंपरा, व्याकरणाचे नियम, सांस्कृतिक प्रतिष्ठा लाभलेली भाषा, संस्कृत, पाली, प्राकृत, तमिळ या प्राचीन भारतीय भाषा म्हणून गणल्या जातात. या भाषांमध्ये निर्माण झालेले साहित्य हे समाजातील सर्व स्तरांचे प्रतिबिंब सादर करते. यामध्ये तृतीयपंथीय लोकांचा समावेश आहे. मुळात ही संस्कृती मानवनिर्मित आहे हे आपण विसरून चाललोय. जगभरातील पुराणात अशा भिन्नवर्तनी लोकांच्या कहाण्या

आहेत. पुरातन भारतीय ग्रंथात याचा उल्लेख आहे. तमिळी, बंगाली लोककथा आहेत तसेच योगवशिष्ठ, स्कंदपुराण, महाभारत, भागवतपुराण, वाल्मिकी रामायण, हिंदी नवनाथचरित्र, तामिळ पुराणगुरु, ओडिसी रामायण, शैव- आगम इत्यादी ग्रंथात यांच्या कथा आहेत.३

पुराणशास्त्र आणि तृतीयपंथीय

कथा प्रतीक आणि विश्वाच्या रूपातून मानवाने लावलेले नैसर्गिक आणि मानवनिर्मित शोध पुढल्या पिढ्यांना दिले जातात.४ ते आपल्या बाह्यमानाशी आणि अंतर्मनाशी जोडले गेले. या कथांचा प्रतिकांचा आणि विधींचा अभ्यास म्हणजे पुराणशास्त्र होय. या कथा प्रतीक आणि विधी जेव्हा शिस्तबद्ध आणि कठोर बनतात .दैवी शक्तीशी संबंध असल्याचा दावा करणाऱ्या संस्थेकडून त्यांची अंमलबजावणी होते. तेव्हा त्याचे रूपांतर धर्मात होतं.५

हिंदू पुराणकथात या वेगळेपणाचा किंवा विचित्रपणाचा उल्लेख सातत्याने होत असतो. ज्यायोगे पुरुषत्व आणि स्त्रीत्व या संकल्पनांची पृच्छा होते. जे पुरुष स्त्री बनले त्यांच्या कथा पुराणात आहेत. तसेच ज्या स्त्रिया पुरुष बनल्या त्यांच्याही कथा पुराणात आहेत.६

बहुतांशी लोक शरीर आणि मनाचा लिंग भेद पाळत नाहीत. समाजात काही पुरुष स्वतःला पुरुष नव्हे तर स्त्री समजतात आणि स्त्री रूपातच स्वतःला व्यक्त करतात. तर काही स्त्रिया स्वतःला स्त्री नव्हे तर पुरुष समजतात आणि पुरुष स्वरूपात त्या व्यक्त होतात. हिंदू धर्मशास्त्रानुसार त्यांना नपुंसक म्हणतात. याचा उल्लेख २३०० वर्षे जुन्या ग्रंथात पतंजली महाभाष्यात आढळतो.७

प्राचीन भाषा आणि तृतीयपंथीय

संस्कृत, प्राकृत आणि तमिळमध्ये क्लिब, नपुंसक, मुखभंग, सांड, पांड, पांडक, पेडी इत्यादी शब्द असे आहेत. ज्याचा विचित्र विचारसरणीशी आणि वर्तनाशी दीर्घकालीन परिचय आहे असं सूचित होतं.८

प्राचीन ग्रंथामध्ये यांना 'किन्नर' म्हणतात. मराठीत 'हिजडा' आणि 'छक्का' असे दोन शब्द वहीवाटीत आहेत. गुजरातीत त्यांना 'पावैया' म्हणतात. पंजाबीत 'खुसरा' किंवा 'जख्खा' तेलगु मध्ये 'नपुंसकडू' 'कोज्जा', 'मादा' म्हटलं जातं तर तमिळमध्ये 'थिरूनानगाई', 'अरावणी', 'अरुवणी' असे शब्द वापरले जातात.'हिजडा' हा मूळ उर्दू शब्द आहे तोही ही जर या रैबिक शब्दावरून आलेला आहे ही जर म्हणजे आपली जमात सोडलेला त्या जमातीतून बाहेर पडलेला.९

महाकाव्यातील तृतीयपंथीयांचा उल्लेख

राम वनवासाला गेले तेव्हा अयोध्येच्या वेशीवर हिजडे त्यांची वाट पाहत थांबले होते. रामायणाचे लेखक वाल्मिकी यांनीच 'योगवशिष्ठ' लिहिले असे मानलं जातं. या योगवशिष्ठालास कधीकधी 'वशिष्ठ रामायण' असे संबोधलं जातं. खूप उशीरा धरलं तरी वाल्मिकीचे लेखन ख्रिस्त पूर्व २०० वर्षे आधी लेखी स्वरूपात आलं असं मानलं जातं. तर 'योगवशिष्ठ' हे खूप नंतर म्हणजे इसवी सन ७०० ते १४०० या काळात लेखी स्वरूपात आलं आहे. या लेखनात वेदांतिक शिक्षणाचे मर्म आहे.१०

महाभारत या भारतातील महाकाव्याला त्याचं अंतिम लिखित स्वरूप ख्रिस्त पूर्व ३०० वर्ष ते इसवीसन ३०० वर्ष या काळात मिळालं. हा हिंदू धर्मातील काळ बौद्ध धर्म निर्माण झाल्यानंतरचा आहे. त्यालाच पौराणिक हिंदू धर्मही म्हटलं जातं.११

महाभारतात अर्जुनाला बृहनडा म्हणून राहावं लागलं होतं. पांडवांना बारा वर्षाच्या विजनवासात राहायचं होतं. या काळात अर्जुन आपल्या वडिलांना भेटायला स्वर्गात गेला होता. त्यावेळी त्याने देवता असलेल्या उर्वशीकडे पाहून कामुक हावभाव केले आणि तिने त्याला शाप दिला क्लिबा होशील. क्लिबा म्हणजे तृतीयपंथी. वेदकाळात तृतीयपंथीसाठी क्लिबा हा शब्द प्रचलित होता.१२

महाभारतात असाच एक उल्लेख आहे तो शिखंडीचा कारण त्याच्या आगमनाने लढाईची दिशा बदलते 18 दिवस चाललेल्या लढाईच्या ऐन मध्यावर म्हणजे दहाव्या दिवशी भीष्म शरशैयेवर पडतात. या ठिकाणचे वेगळेपण हे योगायोगाने आलेले नाही तर त्याचा वापर हेतूपूर्वकच झालेला आहे.१३

शिखंडी ही मुळची आंबा काशीच्या राज्याची कन्या. भीष्मावर सुड घेण्यासाठी तिने तपश्चर्या करून शिखंडी म्हणून पुरुषाचा जन्म मिळवला आणि युद्धभूमीवर उतरली. भीष्माने तिला पाहिले आणि शिखंडी ही आंबा आहे हे ओळखले. स्त्रीवर हत्यार चालवायचे नाही म्हणून ते खाली ठेवले. अर्जुनाने ते पाहिले आणि शिखंडीच्या आड लपून भीष्मावर बाणांचा वर्षाव केला. शिखंडी हा स्त्री ते पुरुष असा लिंगबदल आहे.१४

तामिळनाडूतील विल्लूपुरम जिल्ह्यातल्या कुवागम गावात दर एप्रिल महिन्यात अरावणी मंदिरात 18 दिवसांचा तृतीयपंथीयांचा मोठा धार्मिक उत्सव होतो. याला अर्वान उत्सव म्हणतात. संपूर्ण देशभरातून हजारोंच्या

संख्येने तृतीयपंथी लोक येतात अरवान हा अर्जुनाचा मुलगा जो महाभारत सुरू होण्यापूर्वी कालीमातेला स्वतःचा बळी देण्यासाठी सिद्ध झाला होता.१५

मृत्यूपूर्वी कृष्णाने मोहिनी रूप घेऊन त्याच्याशी विवाह केला होता. म्हणून येणारे तृतीयपंथी अर्वानशी विवाह करतात. दुसऱ्या दिवशी विधवा होतात. या उत्सव काळात सौंदर्य, गायन, नृत्य स्पर्धा आयोजित केल्या जातात.१६,१७

धर्म आणि तृतीयपंथीय

बौद्ध धर्मात समलैंगिकता आढळते विनयपिटक हा २००० ते २५०० वर्षांपूर्वी पाली भाषेत लिहिलेला एक बौद्ध धर्म ग्रंथ यामध्ये भिक्खूनी स्त्रियापासून दूर कसे राहावे हे सांगितले आहे. धम्मपदात सोरय्या नावाचा पुरुष दुसऱ्या पुरुषावर भाळून एका स्त्रीमध्ये रूपांतरित झाला. त्रिपिटक या ग्रंथात वेगळ्या प्रकारच्या ट्रान्सजेंडर माणसाचा उल्लेख आहे. अन्य बौद्ध धर्म ग्रंथात पंडक्यांचा उल्लेख आहे पंडका हा असा पुरुष जो विहारात राहून अन्य पुरुषाविषयी कामभावना राखायचा म्हणजेच तो समलिंगी व्यक्तीच. १३व्या शतकापासून १९व्या शतकाच्या अंतापर्यंत जपान मधील बौद्ध विहारात समलैंगिकतेचा स्वीकार करण्यात आला होता.

जैन धर्मात हिंसाही केवळ शारीरिक असत नाही तर ती मानसिक आणि सामाजिक स्वरूपात ही असते. समजा जर तुम्ही लेस्बियन मुलीचे लग्न जबरदस्तीने लावून दिले तर तुम्ही तिच्याशी हिंसक वागलात हे वर्तन जैन धर्माचे विरोधात जातं.१९हिंदू धर्म- वृंदावनात रासलीला खेळण्यासाठी एकमेव कृष्ण पुरुषरूपात असायचा बाकी सर्व यमुनेत डुबकी मारून स्त्री रूप धारण करायचे. याप्रमाणे महादेवानेही यमुनेत डुबकी मारून स्त्रीचे रूप धारण केले ते गोपेश्वर महादेव. समुद्रमंथनावेळी भगवान विष्णूनी मोहिनी स्वरूप धारण केलं होतं.

निष्कर्ष

आधुनिक समाजजीवनात प्रसारमाध्यमांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट आणिसोशल मीडिया ही आधुनिक समाजातील शक्तिशाली अशी प्रसारमाध्यमे आहेत, जी मराठी साहित्यावर गहन प्रभाव टाकतात. डिजिटल कथा, ब्लॉग्सही नवीन साहित्यिक रूपे निर्माण करून ती एका बाजूने साहित्याच्या वैश्विकीकरणाला प्रोत्साहन देतात, साहित्यिक आदान- प्रदानता वाढवतात, पण दुसऱ्याबाजूने ती साहित्याच्या व्यावसायिकीकरणाला कारणीभूत ठरतात, वाचन सवयी कमी करतात. ज्यामुळे स्थानिक संस्कृती आणि साहित्यिक मौलिकता धोक्यात येते. मुद्रित, श्राव्य, दृक्श्राव्य तसेच डिजिटल माध्यमांच्या माध्यमातून माहिती, विचार, संस्कृती व मूल्ये समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचत आहेत. या प्रक्रियेत भाषा हे माध्यमांचे मूलभूत साधन असून, त्या भाषेच्या स्वरूपावर, वापरावर व विकासावर प्रसारमाध्यमांचा थेट परिणाम होताना दिसतो. मराठी भाषा ही समृद्ध साहित्यपरंपरा आणि व्यापक लोकाधार असलेली भाषा असून, तिच्या जडणघडणीत व प्रसारात प्रसारमाध्यमांची भूमिका काळानुसार बदलत गेलेली आहे. वृत्तपत्रे, नियतकालिके, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट तसेच सामाजिक माध्यमे यांच्या माध्यमातून मराठी भाषेचा वापर विविध पातळ्यांवर होत आहे. या माध्यमांमुळे मराठी भाषेचा प्रसार वाढला असला, तरी भाषेच्या शुद्धतेविषयी, प्रमाणभाषा व बोलीभाषा यांतील संबंधांविषयी तसेच इंग्रजी व इतर भाषांच्या प्रभावांविषयी प्रश्नही निर्माण झाले आहेत. प्रसारमाध्यमांत वापरली जाणारी भाषा ही अनेकदा संवादप्रधान, सुलभ व प्रभावी असते; मात्र त्याच वेळी ती भाषिक मूल्ये, व्याकरणिक संकेत व साहित्यिक परंपरा यांपासून कितपत दूर जाते किंवा त्यांना समृद्ध करते, याचाही अभ्यास आवश्यक ठरतो.

या पार्श्वभूमीवर सदर शोधनिबंधामध्ये 'प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा' या विषयाचा माध्यमातून अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत शोधनिबंधात प्रसारमाध्यमांचा मराठी भाषेच्या स्वरूपावर, मराठी भाषेच्या संवर्धनात प्रसारमाध्यमांची भूमिका स्पष्ट करणे, सामाजिक स्वीकारावर होणारा प्रभाव तपासण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच माध्यमांमधील भाषावापरामुळे मराठी भाषेसमोर उभ्या राहिलेल्या आव्हानांचा व संधींचा सखोल विचार करण्यात येईल.

उद्दिष्टे –

१. प्रसारमाध्यमांतील मराठी भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.

२. प्रसारमाध्यमांचा मराठी साहित्यावर होणारा प्रभाव अभ्यासणे.

३. विविध प्रसारमाध्यमांमुळे मराठी भाषेच्या वापरात झालेले बदल शोधणे.

४. मराठी भाषेच्या संवर्धनात प्रसारमाध्यमांची भूमिका स्पष्ट करणे.

५. डिजिटल युगातील मराठी भाषेच्या भविष्यातील शक्यता तपासणे.

प्रसारमाध्यमांचे महत्व-

प्रसार माध्यमांचे आणि संवाद माध्यमांचे मूळ ऐतिहासिक पत्रव्यवहारात शोधता येते. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत मनुष्यप्राणी व त्याचा स्वभाव हा सर्वत्र सारखा असल्यामुळे दुसऱ्याशी नाते जोडावे, संपर्क साधावा व संवाद साधावा, माहितीची देवाण-घेवाण करावी ही भावना जगभर आढळते. सिझरच्या काळात ती होती

आणि आपल्याकडे अशोक, अकबरच्या काळात ही प्रवृत्ती होती म्हणून त्यास केवळ शुभारंभ एवढेच म्हणावे लागेल यातूनच माहिती पोहोचवण्यासाठी प्रसारमाध्यमाची निर्मिती झाली प्रसारमाध्यम ही प्रतीमा निमिर्ती व विचार परिवर्तनाची आणि नवनवीन माहिती प्रसारणाची महत्वाची साधन असतात तर समाज व प्रशासन हे माध्यमाना हार्ड न्युज देणारे असतात. दुसऱ्या महायुद्धानंतर जगभर विकसित झालेल्या प्रगत ज्ञानशाखापैकी विकास संवाद ही एक मौलिक शाखा आहे. समाजात घटत असलेले रचनात्मक बदल नोंदविणे व ते गतिमान करणे हा विकास संवादाचा आत्मा होय. विविध क्षेत्रात प्रसार माध्यमे विकासाला पोषक वातावरण निर्माण करतात आणि अशा वातावरणातून संस्थात्मक जीवनाचे बदलते चित्र व सामाजिक बांधिलकीची भावनाही रूजू लागते. विकसनशील राष्ट्रांमध्ये नवीन जिवनमूल्ये रूजविण्याचे काम प्रसारमाध्यमे करतात. प्रसारमाध्यम प्रतिमा निर्माण करणारी असतात. प्रसारमाध्यमांच्या या शक्तीमुळेच माध्यम क्षेत्र ही एक लोकशाही समाजरचनेतील अत्यंत प्रभावी सत्ता झाली आहे. प्रसारमाध्यमांना अर्थात पत्रकारीता ही चौथी सत्ता मानली जाते परंतु ती हळुहळू अप्रत्यक्षरित्या पहिली सत्ता बनताना दिसत आहे, कारण प्रसार माध्यमांनी काय द्यावे, कसे द्यावे कोणती माहिती द्यावी, कशा स्वरूपात द्यावी यावर प्रसारमाध्यमात ग्राहकांचा काहीही अधिकार किंवा नियंत्रण रहात नाही. यावरून प्रसारमाध्यमांचे महत्व आणि भूमिका लक्षात येते.

प्रसारमाध्यमांतील मराठी भाषेचे स्वरूप-

प्रसारमाध्यमांतील मराठी भाषेचे स्वरूप हे केवळ भाषावापरापुरते मर्यादित न राहता ते सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक परिवर्तनाचे मूळ कारण ठरते. प्रसारमाध्यमांतील मराठी भाषा ही पारंपरिक साहित्यिक भाषेपेक्षा वेगळी, अधिक संवादप्रधान, लोकाभिमुख व प्रभावी स्वरूपाची आढळते. माध्यमांचा उद्देश व्यापक जनसमूहापर्यंत माहिती व विचार पोहोचविणे हा असल्यामुळे भाषेच्या रचनेत सुलभता, प्रवाहीपणा व तात्काळ समजण्याजोगेपणा या गुणांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे प्रसारमाध्यमांतील मराठी भाषेचे स्वरूप बहुआयामी व गतिमान झालेले दिसते. प्रसारमाध्यमांतील मराठी भाषेचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे प्रमाणभाषा व बोलीभाषा यांचे मिश्र स्वरूप. विशेषतः रेडिओ, दूरदर्शनवरील मनोरंजन कार्यक्रम, मालिका व चित्रपट यांमध्ये बोलीभाषेचा वापर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. हा वापर भाषेला जिवंतपणा, वास्तवता व भावनिक ताकद प्रदान करतो; मात्र अतिरेकी बोलीप्रधानतेमुळे प्रमाण मराठीचे स्थान काहीसे दुर्लक्षित होण्याचा धोका निर्माण होतो. माध्यमांनी प्रमाणभाषा व बोलीभाषा यांमध्ये संतुलन राखणे आवश्यक असताना अनेकदा लोकप्रियतेच्या दडपणाखाली भाषेच्या शुद्धतेकडे दुर्लक्ष झाल्याचे जाणवते.याशिवाय प्रसारमाध्यमांतील मराठी भाषेवर परकीय भाषांचा, विशेषतः इंग्रजी व हिंदीचा प्रभाव लक्षणीय प्रमाणात वाढलेला आहे. बातम्या, जाहिराती, चर्चासत्रे तसेच डिजिटल माध्यमांमध्ये मराठी-इंग्रजी मिश्र भाषावापर सहजतेने स्वीकारला जात आहे. तांत्रिक व आधुनिक संकल्पना मांडताना हा मिश्र भाषावापर उपयुक्त ठरतो; मात्र त्याचा अतिरेक झाल्यास मराठी भाषेची स्वतंत्र ओळख व स्वायत्तता धूसर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भाषेच्या सुलभीकरणाच्या नावाखाली इंग्रजी शब्दांचा अति वापर ही एक प्रकारची भाषिक अस्मितेची गळचेपी ठरू शकते, अशी टीकाही अभ्यासकांकडून केली जाते.

प्रसारमाध्यमांतील मराठी भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिची संक्षिप्तता व प्रभावी शैली. मथळे, स्क्रोल्स, जाहिरातीतील घोषवाक्ये यांमध्ये कमी शब्दांत अधिक आशय व्यक्त करण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रक्रियेमुळे भाषेचा प्रभाव वाढतो; परंतु काही वेळा आशयाची खोली कमी होऊन भाषा वरवरची व तात्कालिक बनण्याचा धोका संभवतो. विशेषतः टी.आर.पी.केंद्रित माध्यमसंस्कृतीत भाषेचा वापर विचारप्रधान न राहता केवळ आकर्षण निर्माण करणारा ठरत असल्याचे दिसून येते.डिजिटल व सामाजिक माध्यमांच्या उदयानंतर मराठी भाषेचे स्वरूप अधिकच बदलले आहे. रोमन लिपीतील मराठी, संक्षिप्त शब्दरचना, नवशब्दनिर्मिती व अनौपचारिक भाषावापर यामुळे मराठी भाषा तरुण पिढीला जवळची वाटू लागली आहे. हे बदल भाषेच्या प्रसाराच्या दृष्टीने सकारात्मक असले, तरी लिपी, व्याकरण व भाषिक शुद्धतेच्या बाबतीत गंभीर प्रश्न उपस्थित करतात. माध्यमांतील या नवभाषिक प्रवृत्तीमुळे मराठी भाषेच्या परंपरागत लेखनसंस्कृतीवर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रसारमाध्यमांतील मराठी भाषेचे स्वरूप हे परिवर्तनशील, प्रयोगशील व लोकाभिमुख असले तरी त्यात काही विसंगतीही आढळतात. एका बाजूला माध्यमांनी मराठी भाषेला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून तिचा

प्रसार व स्वीकार वाढविला आहे; तर दुसऱ्या बाजूला भाषिक शुद्धता, प्रमाणभाषेचे संवर्धन व सांस्कृतिक जबाबदारी यांकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचेही स्पष्ट होते. म्हणूनच प्रसारमाध्यमांतील मराठी भाषेचा विचार केवळ लोकप्रियतेच्या चौकटीत न करता भाषिक जाणीव, सांस्कृतिक उत्तरदायित्व व दीर्घकालीन भाषाविकासाच्या दृष्टीने करणे अत्यावश्यक ठरते.

प्रसारमाध्यमांचा मराठी साहित्यावर होणारा प्रभाव -

प्रसारमाध्यमांचा मराठी साहित्यावर होणारा प्रभाव हा बहुआयामी, परिवर्तनशील व काही प्रमाणात विरोधाभासी स्वरूपाचा आहे. आधुनिक काळात वृत्तपत्रे, नियतकालिके, दूरदर्शन, चित्रपट तसेच डिजिटल माध्यमे यांनी मराठी साहित्याला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून लेखक, साहित्यकृती व वाचक यांच्यातील अंतर लक्षणीयरीत्या कमी केले आहे. पूर्वी मर्यादित वाचकवर्गापुरते असलेले साहित्य माध्यमांच्या सहाय्याने समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचू लागले आहे. या प्रक्रियेत साहित्याचा लोकसंपर्क वाढला असला, तरी साहित्याच्या अभिजाततेविषयी आणि मूल्यप्रधानतेविषयी प्रश्नही निर्माण झाले आहेत. प्रसारमाध्यमांमुळे मराठी साहित्यातील विषयवस्तू, शैली व अभिव्यक्तीपद्धतीत महत्त्वाचे बदल झालेले दिसून येतात. वृत्तपत्रीय लेखन, सदरे, स्तंभलेखन, लघुनिबंध यांमुळे साहित्य अधिक संवादप्रधान व समकालीन बनले आहे. सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्नांवर तत्काळ प्रतिक्रिया देणारे लेखन वाढले असून त्यामुळे साहित्याला काळाच्या स्पंदनाशी जोडलेले स्वरूप प्राप्त झाले आहे. तथापि, या तत्काळतेच्या आग्रहामुळे साहित्यिक सखोलता, चिंतनशीलता व दीर्घकालीन मूल्यनिर्मिती यांवर काही प्रमाणात मर्यादा येत असल्याचेही अभ्यासकांचे मत आहे.

दूरदर्शन व चित्रपट माध्यमांचा मराठी साहित्यावर झालेला प्रभाव विशेष उल्लेखनीय आहे. अनेक कादंबऱ्या, कथा व नाटके मालिका किंवा चित्रपटांच्या रूपात सादर झाल्यामुळे साहित्याचे दृक्श्राव्य रूपांतर घडून आले आहे. यामुळे साहित्य अधिक लोकप्रिय झाले असले, तरी माध्यमांच्या गरजेनुसार कथानकात व पात्रचित्रणात होणारे बदल साहित्याच्या मूळ आशयाशी तडजोड करणारे ठरतात, अशी समीक्षात्मक भूमिका मांडली जाते. साहित्यकृतीचे माध्यमांनुरूप सुलभीकरण हे तिच्या कलात्मक मूल्यांवर परिणाम घडवून आणू शकते.डिजिटल व सामाजिक माध्यमांनी मराठी साहित्याच्या क्षेत्रात नवे परिवर्तन घडवून आणले आहे. ब्लॉग, संकेतस्थळे, ई-पुस्तके व सोशल मीडिया मंचांमुळे नवोदित लेखकांना अभिव्यक्तीची मोकळी संधी उपलब्ध झाली आहे. साहित्यनिर्मितीचा वेग वाढला असून वाचकांशी थेट संवाद साधण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तथापि, या खुलेपणामुळे साहित्यिक दर्जा, भाषिक शिस्त व संपादनप्रक्रियेचे महत्त्व काही अंशी कमी होत असल्याचेही आढळते. लोकप्रियता व तत्काळ प्रतिसादाच्या निकषांवर साहित्याचे मूल्यमापन होण्याची प्रवृत्ती ही गंभीर चिंतेची बाब ठरते.

एकीकडे प्रसारमाध्यमांनी मराठी साहित्याचा प्रसार, स्वीकार व सामाजिक प्रभाव वाढविला आहे; तर दुसरीकडे टी.आर.पी., वाचकसंख्या व 'लाईक्स' यांसारख्या माध्यमकेंद्री निकषांनी साहित्यिक मूल्यांना आव्हान दिले आहे. त्यामुळे साहित्य हे चिंतनशील, मूल्याधिष्ठित कलाप्रकार न राहता काही वेळा मनोरंजनप्रधान उत्पादन बनण्याचा धोका निर्माण झाला आहे. म्हणूनच प्रसारमाध्यमांचा मराठी साहित्यावर होणारा प्रभाव हा केवळ सकारात्मक किंवा नकारात्मक अशा सरळ चौकटीत न बसता, संधी आणि आव्हाने यांचे मिश्र स्वरूप धारण करतो. यावरून प्रसारमाध्यमांनी मराठी साहित्याला नवी दिशा, नवे वाचक आणि नवी अभिव्यक्ती दिली असली, तरी साहित्यिक स्वायत्तता, कलात्मक सखोलता व भाषिक शुद्धता यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी लेखक, समीक्षक व माध्यमसंस्था यांच्यावर अधिक वाढलेली आहे. प्रसारमाध्यमे आणि मराठी साहित्य यांच्यात योग्य समतोल राखला गेल्यासच मराठी साहित्याचा समृद्ध आणि सशक्त विकास साध्य होऊ शकतो. प्रसारमाध्यमे साहित्याच्या वैश्विकीकरणाला प्रोत्साहन देतात, ज्यामुळे साहित्यिक कार्ये देश-विदेशात पार पडतात. उदाहरणदाखल पाहायचे झाले तर, साहित्यकृतींच्याअनुवाद प्रक्रियेतून, साहित्यसंमेलने, चर्चासत्रे, परिषदा इ. मधून साहित्यिक पूल निर्माण होण्यास मदत होते. सोशल मीडियाने साहित्याच्या नवीन रूपांना जन्म दिला आहे, जसे की ब्लॉग्स, व्लॉग्स आणि डिजिटल कथा, ज्यात मजकूर, प्रतिमा आणि व्हिडिओ यांचे मिश्रण असते. उदाहरणार्थ, सोशल मीडियाने पुस्तक विक्री वाढवली आहे आणि काही पुस्तके BookTok वर व्हायरल होणारी मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाली आहेत. उदाहरणे पाहता, मुद्रण

यंत्राच्या आविष्काराने साहित्याचे वितरण वाढले, जसे मध्ययुगीन हस्तलिखितांमधून (Manuscripts) होणाऱ्याबदलांमुळे (Mounce) साहित्य अधिक सामूहिक, सार्वजनिक झाले. प्रसारमाध्यमांनी मराठी साहित्याला वैश्विक केले आहे, ज्यामुळे ते आंतरभारतीय आणि वैश्विक होण्यात मदत झाली आहे. याचा परिणाम असा पाहायला मिळतो की, वाचकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी साहित्यिक अभिव्यक्तीची नवीन साधने उपलब्ध झाली आहेत, ज्यामध्ये फॅन फिक्शन ऑनलाइन शेअर करणे इ.

प्रसारमाध्यमे साहित्यिक आदान-प्रदानता वाढवतात, ज्यामुळे विविध साहित्यप्रकारांचा परस्पर प्रभाव वाढीस मदत होते. रेडिओ आणि सिनेमाने कथा सांगण्याची शक्ती वाढवली, ज्याने सांस्कृतिक मूल्ये आणि मानके आकाराला येऊ लागली. भारतीय संस्कृतीत प्रसारमाध्यमे मराठी भाषा आणि सांस्कृतिक उत्सवांचा प्रसार करतात, जसे वारकरी आणि महानुभाव संप्रदायाने मराठीचा प्रचार केला. यामुळे जग अधिक जवळ आहे. असा सकारात्मक परिणाम दिसून येतो.

मराठी भाषेच्या संवर्धनात प्रसारमाध्यमांची भूमिका –

मराठी भाषेच्या संवर्धनात प्रसारमाध्यमांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची, प्रभावी तसेच विरोधाभासी स्वरूपाची आहे. आधुनिक काळात प्रसारमाध्यमे ही भाषेच्या प्रसाराची सर्वात प्रभावी साधने ठरली असून त्यांनी मराठी भाषेला व्यापक सामाजिक व्यासपीठ प्राप्त करून दिले आहे. वृत्तपत्रे, नियतकालिके, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट आणि डिजिटल माध्यमे यांच्या माध्यमातून मराठी भाषा केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता जागतिक स्तरावर पोहोचू लागली आहे. या प्रक्रियेमुळे मराठी भाषेचा वापर वाढला असून तिची सामाजिक स्वीकारार्हता अधिक बळकट झाली आहे. प्रसारमाध्यमांनी मराठी भाषेच्या दैनंदिन वापराला चालना देऊन ती सर्वसामान्य जनतेच्या जीवनाशी अधिक जवळीक साधून दिली आहे. बातम्या, सदरे, चर्चासत्रे, मनोरंजन कार्यक्रम, जाहिराती व सामाजिक माध्यमांवरील संवाद यांमधून मराठी भाषा सतत वापरात राहते. या सातत्यपूर्ण वापरामुळे भाषेचे जतन होत असले, तरी अनेकदा लोकप्रियतेच्या नावाखाली भाषिक शुद्धता, व्याकरण व शब्दसंपत्ती यांकडे दुर्लक्ष झाल्याचेही जाणवते. त्यामुळे संवर्धनाच्या प्रक्रियेतच काही वेळा भाषेच्या मूल्यांवर आघात होण्याची शक्यता निर्माण होते.रेडिओ व दूरदर्शन माध्यमांनी मराठी भाषेच्या श्राव्य व दृक्श्राव्य सौंदर्याला चालना दिली आहे. योग्य उच्चार, प्रवाही निवेदन व प्रभावी संवाद यांमुळे भाषेचा सुसंस्कृत वापर समाजासमोर येऊ शकतो. मात्र, मनोरंजनप्रधान कार्यक्रमांमध्ये अतिरेकी बोलीभाषा, मिश्र भाषावापर व कृत्रिम संवादशैली यांमुळे मराठी भाषेचे प्रमाणबद्ध स्वरूप दुर्लक्षित होण्याचा धोका निर्माण होतो. संवर्धनाच्या नावाखाली केवळ लोकप्रियतेचा आग्रह धरल्यास भाषेची अभिजातता कमी होऊ शकते, अशी समीक्षात्मक भूमिका येथे आवश्यक ठरते.

डिजिटल माध्यमांनी मराठी भाषेच्या संवर्धनाला नवी दिशा दिली आहे. ई-पुस्तके, संकेतस्थळे, ब्लॉग्स, पॉडकास्ट्स आणि सामाजिक माध्यमांमुळे नव्या पिढीला मराठी भाषेत व्यक्त होण्याची संधी मिळाली आहे. हे माध्यमे भाषेच्या जागतिक प्रसारासाठी उपयुक्त ठरत असली, तरी रोमन लिपीतील मराठी, संक्षिप्त व अनौपचारिक भाषावापर यामुळे देवनागरी लिपी व भाषिक शिस्त यांसमोर आव्हाने उभी राहिली आहेत. त्यामुळे डिजिटल संवर्धन आणि भाषिक शुद्धता यांमध्ये संतुलन राखणे गरजेचे आहे.एकीकडे प्रसारमाध्यमे मराठी भाषेच्या संवर्धनाचे प्रभावी साधन ठरू शकतात; तर दुसरीकडे त्यांच्याच माध्यमातून भाषेचे विकृतीकरण होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी प्रसारमाध्यमांनी केवळ प्रसारापुरते मर्यादित न राहता भाषिक जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. योग्य शब्दप्रयोग, शुद्ध उच्चार, प्रमाणभाषेचा सन्मान आणि भाषिक जाणीव निर्माण करणारे कार्यक्रम या माध्यमातूनच भाषेचे खरे संवर्धन साध्य होऊ शकते. मराठी भाषेच्या संवर्धनात प्रसारमाध्यमांची भूमिका ही संधी आणि आव्हाने यांचे मिश्र स्वरूप धारण करते. माध्यमांनी जर भाषिक सजगता, सांस्कृतिक उत्तरदायित्व आणि दीर्घकालीन दृष्टिकोन ठेवून कार्य केले, तर मराठी भाषा केवळ टिकून राहणार नाही, तर अधिक समृद्ध, सशक्त व कालसुसंगत स्वरूपात विकसित होऊ शकेल.

समारोप –

प्रसारमाध्यमे ही आधुनिक समाजरचनेतील अत्यंत प्रभावी, दिशादर्शक व मतनिर्मिती करणारी शक्ती ठरली आहेत. ऐतिहासिक पत्रव्यवहारापासून सुरू झालेला संवादाचा प्रवास आज मुद्रित, श्राव्य, दृक्श्राव्य आणि डिजिटल माध्यमांच्या माध्यमातून अत्यंत व्यापक, वेगवान व प्रभावी झाला आहे. या प्रवासात प्रसारमाध्यमांनी केवळ माहितीचे वहन केले नाही, तर सामाजिक परिवर्तन, विकाससंवाद, लोकशाही मूल्यांची जडणघडण आणि सांस्कृतिक ओळखींची निर्मिती यामध्ये मोलाची भूमिका बजावली आहे. विशेषतः विकसनशील समाजांमध्ये नवीन जीवनमूल्ये, सामाजिक बांधिलकी व संस्थात्मक बदल रुजविण्याचे कार्य प्रसारमाध्यमांनी प्रभावीपणे केले आहे. विशेषतः डिजिटल माध्यमांमधील रोमन लिपीतील मराठी, अनौपचारिक शब्दरचना व तत्काळ अभिव्यक्तीमुळे मराठी भाषेच्या परंपरागत लेखनसंस्कृतीसमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत. त्याचप्रमाणे प्रसारमाध्यमांचा मराठी साहित्यावर झालेला प्रभावही संधी व संकटे यांचे मिश्र स्वरूप धारण करणारा आहे. माध्यमांमुळे मराठी साहित्याला नवे व्यासपीठ, व्यापक वाचकवर्ग व जागतिक पोहोच लाभली आहे. साहित्याचे दृक्श्राव्य रूपांतर, डिजिटल साहित्यप्रकार, अनुवाद प्रक्रिया, साहित्यसंमेलने व सामाजिक माध्यमांवरील साहित्यिक संवाद यांमुळे मराठी साहित्याचे वैश्वीकरण घडून आले आहे. मात्र, लोकप्रियता, टी.आर.पी., 'लाईक्स' व तत्काळ प्रतिसाद यांच्या दबावामुळे साहित्यिक सखोलता, चिंतनशीलता व कलात्मक स्वायत्तता यांना आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे साहित्य हे केवळ मनोरंजनप्रधान उत्पादन ठरण्याचा धोका निर्माण होतो, याची गंभीर दखल घेणे आवश्यक ठरते.

मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टीने प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत निर्णायक आहे. सातत्यपूर्ण वापरामुळे भाषा जिवंत राहते, प्रसारित होते व नव्या पिढीपर्यंत पोहोचते; परंतु संवर्धन म्हणजे केवळ प्रसार नव्हे, तर भाषिक शुद्धता, योग्य शब्दप्रयोग, प्रमाणभाषेचा सन्मान आणि सांस्कृतिक भान राखणेही तितकेच आवश्यक आहे. म्हणूनच प्रसारमाध्यमांनी लोकप्रियतेच्या चौकटीपलीकडे जाऊन भाषिक जबाबदारी स्वीकारणे अपरिहार्य ठरते.यावरुन स्पष्ट होते की प्रसारमाध्यमे ही मराठी भाषा व साहित्याच्या दृष्टीने केवळ प्रभावक घटक नसून ती परिवर्तन घडविणारी शक्ती आहेत. योग्य समतोल, भाषिक सजगता व सांस्कृतिक उत्तरदायित्व राखले गेले, तर प्रसारमाध्यमे मराठी भाषा व साहित्याच्या संवर्धनाचे आणि सशक्तीकरणाचे प्रभावी साधन ठरू शकतात. अन्यथा, त्याच माध्यमांमुळे भाषिक अस्मिता व साहित्यिक मूल्ये दुर्बल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच प्रसारमाध्यमे, भाषा व साहित्य यांच्यातील नात्याचा विचार दीर्घकालीन, समन्वयवादी आणि मूल्याधिष्ठित दृष्टिकोनातून करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

संदर्भग्रंथ

१. शेळके भास्कर, 'प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, एप्रिल २०१२.
२. सांगळे संदीप, 'व्यवहारिक उपयोजित मराठी व प्रसारमाध्यमांची कार्यशैली' , डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
३. खोरे अरुण, 'मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये' यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, प्रथम प्रकाशन
४. कोल्हटकर संजय, कुलकर्णी प्रसाद, ' महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे काल आणि आज'डायमंड प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती २००९.

प्राचीन काळातील हस्तलिखिते, त्यांची भाषा व त्यांचे आजच्या काळातील महत्त्व

प्रा. डॉ. प्रतिभा शंकर घाग - सोनी
११०५, शिवम बी विंग, रुद्र सोसायटी, केसनंद फाटा, वाघोली, पुणे.
मो. 9850995611
मेल आयडी. pratibha.ghag1.10@gmail.com

प्रस्तावना

मानवी संस्कृतीचा इतिहास हा ज्ञानसंचय, अनुभव आणि विचारपरंपरेचा इतिहास आहे. लेखनकलेच्या विकासानंतर मानवाने आपले ज्ञान टिकवून ठेवण्यासाठी विविध माध्यमांचा वापर केला. मुद्रणयंत्राचा शोध होण्यापूर्वी ज्ञानसंवर्धनाचे प्रमुख साधन म्हणजे हस्तलिखिते. धार्मिक ग्रंथ, तत्त्वज्ञान, विज्ञान, गणित, वैद्यक, इतिहास, काव्य, नाटक, प्रशासन अशा सर्व क्षेत्रांतील माहिती हस्तलिखितांच्या स्वरूपात जतन करण्यात आली.

आज आपण डिजिटल युगात प्रवेश केला असला तरी हस्तलिखितांचे महत्त्व कमी झालेले नसून उलट संशोधन, संस्कृती आणि वारसा जतनाच्या दृष्टीने त्यांचे स्थान अधिक अधोरेखित झाले आहे. हा संशोधन लेख हस्तलिखितांच्या ऐतिहासिक भूमिकेचा आणि आधुनिक काळातील त्यांच्या उपयुक्ततेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो.

थोडक्यात, हस्तलिखिते (Manuscripts) म्हणजे मानवी इतिहासाचा, ज्ञानाचा आणि संस्कृतीचा आरसा आहेत. मुद्रणकला (Printing Press) अस्तित्वात येण्यापूर्वी हाताने लिहिलेले ग्रंथ, पोथ्या आणि दस्तऐवज म्हणजे हस्तलिखिते होत. भारताला हस्तलिखितांची एक अत्यंत समृद्ध परंपरा लाभली आहे. या हस्तलिखितांची भाषा केवळ संवादाचे माध्यम नसून, ती त्या काळातील समाजव्यवस्था, धर्म, विज्ञान आणि साहित्याची वाहक आहे. या लेखात प्राचीन हस्तलिखितांमध्ये वापरली जाणारी भाषा, लिपी आणि त्यांचे महत्त्व याचा आढावा घेतला आहे.

हस्तलिखितांची संकल्पना आणि स्वरूप

'हस्तलिखित' म्हणजे हाताने लिहिलेला मजकूर. प्राचीन काळात लेखनासाठी ताडपत्रे, भोजपत्रे, कातडी, कागद, कापड यांचा उपयोग केला जात असे. शाई, लेखणी, कधी कोरीव पद्धतीचा वापर करून ग्रंथनिर्मिती केली जाई.

भारतात संस्कृत, प्राकृत, पाली, अपभ्रंश, मराठी, फारसी, अरबी अशा अनेक भाषांमधील हस्तलिखिते उपलब्ध आहेत. या हस्तलिखितांमध्ये धार्मिक ग्रंथांपासून ते सामान्य लोकांच्या दैनंदिन व्यवहारांपर्यंतचा मजकूर आढळतो. त्यामुळे हस्तलिखिते ही केवळ धार्मिक किंवा साहित्यिक नसून सामाजिक इतिहासाचीही महत्त्वाची साधने आहेत.

प्राचीन काळातील हस्तलिखितांचे महत्त्व

प्राचीन भारतात मौखिक परंपरेबरोबरच लेखनपरंपराही विकसित झाली होती. वेद, ब्राह्मणे, उपनिषदे यांसारख्या ग्रंथांची जपणूक प्रथम मौखिक परंपरेने झाली असली तरी पुढे हस्तलिखितांच्या माध्यमातून त्यांचे संरक्षण झाले.

हस्तलिखितांमुळे तत्कालीन समाजरचना, वर्णव्यवस्था, शिक्षणपद्धती, धार्मिक समजुती यांची माहिती मिळते. आयुर्वेद, ज्योतिष, गणित, खगोलशास्त्र यांसारख्या विषयांवरील हस्तलिखिते प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेची साक्ष देतात. आर्यभट्ट, वराहमिहिर, चरक, सुश्रुत यांचे ग्रंथ आज उपलब्ध आहेत, यामागे हस्तलिखितांचीच भूमिका आहे.

मध्ययुगीन काळातील हस्तलिखिते

मध्ययुगात हस्तलिखितांची परंपरा अधिक विस्तारली. संस्कृतबरोबरच प्रादेशिक भाषांमध्येही मोठ्या प्रमाणावर ग्रंथनिर्मिती झाली. मराठीतील संतसाहित्य, वारकरी परंपरा, भक्ती काव्य यांचे जतन हस्तलिखितांमुळेच झाले. राजकीय इतिहासाच्या दृष्टीनेही हस्तलिखिते महत्त्वाची ठरतात. फारसी व मोडी लिपीतील कागदपत्रे, बखरी, दप्तरे यांमधून प्रशासन, करप्रणाली, युद्धे आणि राजकीय निर्णयांची माहिती मिळते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दप्तरे हे याचे उत्तम उदाहरण आहे.

हस्तलिखिते आणि साहित्यपरंपरा

हस्तलिखितांमुळे साहित्याचा विकास आणि प्रवास समजून घेता येतो. अनेक कवी, लेखक यांच्या रचनांच्या विविध प्रती हस्तलिखितांच्या स्वरूपात आढळतात. त्यातून पाठभेद, शैली, भाषिक बदल यांचा अभ्यास करता येतो. मुद्रित ग्रंथ येण्यापूर्वी लेखक आणि वाचक यांच्यातील दुवा हस्तलिखितेच होती. त्यामुळे साहित्याच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी हस्तलिखिते अपरिहार्य ठरतात.

भाषा आणि लिपी यांतील फरक

प्राचीन हस्तलिखितांचा अभ्यास करताना 'भाषा' आणि 'लिपी' यातील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे.

भाषा (Language): हे विचारांच्या देवाणघेवाणीचे माध्यम आहे (उदा. संस्कृत, मराठी, पाली).

लिपी (Script): ही भाषा लिहिण्याची पद्धत किंवा चिन्हे आहेत (उदा. ब्राह्मी, देवनागरी, मोडी).

अनेकदा एकाच भाषेत विविध लिपींचा वापर झालेला दिसून येतो, किंवा एकाच लिपीत अनेक भाषा लिहिल्या गेल्या आहेत.

प्राचीन हस्तलिखितांमधील प्रमुख भाषा

भारतातील प्राचीन हस्तलिखिते प्रामुख्याने खालील भाषांमध्ये आढळतात:

संस्कृत:

वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत आणि विविध शास्त्रीय ग्रंथ (गणित, आयुर्वेद) संस्कृतमध्ये आहेत. संस्कृत ही प्राचीन भारतातील ज्ञानभाषा (Language of Knowledge) होती. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या हस्तलिखितांमध्ये संस्कृत भाषेचे वर्चस्व दिसून येते.

पाली आणि प्राकृत:

बौद्ध आणि जैन धर्माचे साहित्य प्रामुख्याने पाली आणि प्राकृत भाषांमध्ये लिहिले गेले. सर्वसामान्यांची भाषा म्हणून या भाषांना महत्त्व होते. अशोकाचे शिलालेख आणि त्यानंतरची अनेक हस्तलिखिते या भाषांमध्ये आहेत.

अपभ्रंश आणि जुनी मराठी:

मध्ययुगीन काळात संस्कृत आणि प्राकृतमधून स्थानिक भाषांचा विकास झाला. महाराष्ट्रात 'महानुभाव पंथ' आणि 'वारकरी संप्रदाय' यांच्या साहित्यातून (उदा. ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र) जुन्या मराठी भाषेचे रूप आपल्याला हस्तलिखितांमध्ये पाहायला मिळते.

हस्तलिखितांसाठी वापरल्या गेलेल्या प्रमुख लिपी (Major Scripts)

हस्तलिखितांचे वाचन करण्यासाठी त्या काळातील लिपींचे ज्ञान असणे आवश्यक आहे:

ब्राह्मी लिपी: ही भारतातील सर्वात प्राचीन लिपी मानली जाते. बहुतेक सर्व भारतीय लिपींचा उगम ब्राह्मीतून झाला आहे.

शारदा लिपी: काश्मीरमधील प्राचीन संस्कृत हस्तलिखिते शारदा लिपीत आढळतात.

ग्रंथ लिपी: दक्षिण भारतात संस्कृत लिहिण्यासाठी या लिपीचा वापर केला जात असे.

मोडी लिपी: मराठा साम्राज्यात राज्यकारभाराची भाषा मराठी असली तरी, ती लिहिण्यासाठी 'मोडी' लिपीचा वापर होत असे. वेगवान लेखनासाठी या लिपीचा विकास झाला होता. शिवकालीन आणि पेशवेकालीन हजारो पत्रे मोडी लिपीत उपलब्ध आहेत.

देवनागरी: सध्याची प्रचलित लिपी, जी संस्कृत आणि मराठीसाठी वापरली जाते.

लेखन साहित्य (Writing Materials)

भाषा टिकवून ठेवण्यासाठी वापरलेले साहित्यही तितकेच महत्त्वाचे होते:

भूर्जपत्र (Birch Bark): हिमालयात मिळणाऱ्या भूर्ज वृक्षाच्या साल.

ताडपत्र (Palm Leaf): दक्षिण आणि पूर्व भारतात ताडाच्या पानांवर लोखंडी लेखणीने कोरून लेखन केले जाई.

कागद: कागदाचा शोध लागल्यानंतर (विशेषतः मोगल आणि मराठा काळात) कागदावर शाईने लेखन सुरू झाले.

प्राचीन हस्तलिखितांच्या भाषेचे संशोधन करणे काळाची गरज आहे:

इतिहासाची पुनर्रचना: जुन्या भाषेतील शब्दांचे अर्थ उलगडल्यास इतिहासातील अनेक अज्ञात दुवे सापडू शकतात.

वैज्ञानिक वारसा: आयुर्वेदासारख्या शास्त्रातील अनेक फॉर्म्युले आजही जुन्या हस्तलिखितांमध्ये दडलेले आहेत.

आव्हाने:

लिपी जाणणाऱ्या तज्ज्ञांची कमतरता (उदा. मोडी किंवा ब्राह्मी लिपी वाचणारे लोक कमी आहेत).

हस्तलिखितांची हवामानामुळे होणारी जीर्ण अवस्था हा देखील चिंतेचा विषय आहे.

आजच्या काळातील हस्तलिखितांचे महत्त्व

आज हस्तलिखिते केवळ संग्रहालयातील वस्तू नसून संशोधनाची मूलभूत साधने आहेत. इतिहास, भाषाशास्त्र, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र यांसारख्या विषयांच्या अभ्यासासाठी हस्तलिखिते अनमोल ठरतात.

अनेक प्राचीन ग्रंथ अजूनही अप्रकाशित स्वरूपात उपलब्ध आहेत. त्यांचे संपादन, भाषांतर व अभ्यास केल्यास नवीन संशोधनदृष्टी प्राप्त होते. आधुनिक अभ्यासकांसाठी हस्तलिखिते म्हणजे नव्या ज्ञाननिर्मितीचे स्रोत आहेत.

डिजिटायझेशन आणि हस्तलिखिते

आधुनिक तंत्रज्ञानामुळे हस्तलिखितांच्या जतनात मोठा बदल घडून आला आहे. डिजिटायझेशनमुळे नाजूक हस्तलिखितांची सुरक्षितता वाढली असून संशोधकांना घरबसल्या अभ्यासाची संधी मिळाली आहे.

राष्ट्रीय हस्तलिखित अभियानासारख्या उपक्रमांमुळे लाखो हस्तलिखितांची नोंद, वर्गीकरण आणि डिजिटल प्रत तयार करण्यात आली आहे. यामुळे भारतीय ज्ञानपरंपरेला जागतिक स्तरावर ओळख मिळत आहे.

सांस्कृतिक वारसा म्हणून हस्तलिखिते

हस्तलिखिते ही राष्ट्राची सांस्कृतिक संपत्ती आहे. ती समाजाच्या बौद्धिक परंपरेचे प्रतिबिंब असतात. एखाद्या संस्कृतीची ओळख तिच्या ग्रंथपरंपरेतूनच ठळकपणे दिसून येते. हस्तलिखितांच्या माध्यमातून धार्मिक सहिष्णुता, वैचारिक संवाद आणि सांस्कृतिक आदान-प्रदान यांचा इतिहास समोर येतो. त्यामुळे हस्तलिखिते जतन करणे म्हणजे सांस्कृतिक अस्मितेचे जतन करणे होय.

हस्तलिखित संरक्षणाची गरज

हस्तलिखिते अत्यंत नाजूक असल्याने त्यांचे संरक्षण करणे ही मोठी जबाबदारी आहे. तापमान, आर्द्रता, कीड, अज्ञानामुळे होणारी हानी यांमुळे अनेक हस्तलिखिते नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

योग्य साठवणूक, रासायनिक प्रक्रिया, डिजिटायझेशन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ यांद्वारेच हस्तलिखितांचे संरक्षण शक्य आहे. यासाठी शासन, शैक्षणिक संस्था आणि समाज यांचा संयुक्त प्रयत्न आवश्यक आहे.

निष्कर्ष

प्राचीन हस्तलिखितांची भाषा ही केवळ शब्दांची जुळवाजुळव नसून तो आपल्या पूर्वजांनी साठवलेला ज्ञानाचा ठेवा आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने त्यांचे जतन, अभ्यास आणि प्रसार केल्यास मानवी संस्कृतीचा अमूल्य वारसा पुढील पिढ्यांपर्यंत सुरक्षित राहील. म्हणूनच हस्तलिखितांचा अभ्यास, संरक्षण आणि संवर्धन ही केवळ शैक्षणिक गरज नसून आपली सांस्कृतिक जबाबदारी आहे. या हस्तलिखितांचे डिजिटायझेशन (Digitization) करणे आणि त्या भाषेचा अभ्यास करण्यासाठी नवीन पिढीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तरच हा अमूल्य वारसा भविष्यात टिकून राहील.

संदर्भसूची

१. देशमुख, ग. ह. – भारतीय हस्तलिखित परंपरा

२. फाटक, न. र. – मराठी वाङ्मयाचा इतिहास

३. राष्ट्रीय हस्तलिखित अभियान – भारत सरकार

सातपाटील कुलवृत्तांत: मराठी साहित्यातील अभिजात लोकइतिहास व सांस्कृतिक महाकथनाचा दस्तऐवज

प्रा. डॉ. सागर अशोक पाटील
कन्या महाविद्यालय, मिरज

मराठी साहित्यपरंपरेत काही कादंबऱ्या केवळ कथारूप मनोरंजनापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या समाजाच्या सामूहिक स्मृतीचा, सांस्कृतिक प्रवाहाचा आणि ऐतिहासिक वास्तवाचा व्यापक दस्तऐवज बनून उभ्या राहतात. रंगनाथ पठारे लिखित "सातपाटील कुलवृत्तांत" ही अशीच एक विलक्षण अभिजात कलाकृती आहे. नगर जिल्ह्यातील एका सामान्य पठारे कुटुंबाच्या वंशावळीसंदर्भातील अनेक वर्षांच्या संशोधनातून निर्माण झालेली ही कादंबरी केवळ कुलवृत्तांत न राहता, महाराष्ट्राच्या सातशे वर्षांच्या सामाजिक-राजकीय इतिहासाचा भव्य पट उलगडून दाखवते. या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे इतिहासाच्या केंद्रस्थानी राजा, युद्धे किंवा सत्ताधीश नसून एका सामान्य घरातील पिढ्यान्पिढ्यांचा जीवनसंघर्ष आहे. देवगिरीच्या साम्राज्यापासून पेशवाई, इंग्रजी सत्ता ते स्वतंत्र भारतापर्यंतच्या कालखंडात सामान्य माणसाच्या जगण्यावर होणारे बदल, त्याची सामाजिक स्थिती, धार्मिकता, जातीय वास्तव, स्थलांतर, कुटुंबसंस्था आणि सांस्कृतिक जाणीवा यांचा अत्यंत सूक्ष्म व प्रभावी मागोवा ही कादंबरी घेते. इतिहास आणि कल्पनाशक्ती यांचा समन्वय साधत लेखकाने मराठी कादंबरीला एक नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे. संतपरंपरा, सामाजिक सुधारणा चळवळी, महाराष्ट्रातील ग्रामीण जीवन, तसेच तत्कालीन राजकीय उलथापालथ यांचा तळागाळातील समाजावर होणारा परिणाम या कादंबरीत जागोजागी प्रत्ययास येतो. त्यामुळे "सातपाटील कुलवृत्तांत" ही कादंबरी एकाच वेळी ऐतिहासिक दस्तऐवज, सामाजिक अध्ययन आणि महाकाव्यात्मक जीवनकथन म्हणून महत्त्वपूर्ण ठरते. या संशोधकीय लेखाचा उद्देश "सातपाटील कुलवृत्तांत" या कादंबरीचे अभिजात साहित्यकृती म्हणून मूल्यांकन करणे, तिच्यातील लोकइतिहासाचे स्वरूप, कथनशैली, सांस्कृतिक आशय आणि मराठी साहित्यातील स्थान यांचा सखोल अभ्यास करणे हा आहे.

रंगनाथ पठारे यांची *'सातपाटील कुलवृत्तांत'* ही कादंबरी मराठी साहित्यपरंपरेतील एक महत्वाची कलाकृती आहे. ही कादंबरी वाचताना वाचकाला केवळ एका कुळाचा इतिहास समजत नाही, तर भारतीय समाजाच्या दीर्घकालीन सांस्कृतिक, सामाजिक, मानसिक आणि राजकीय प्रवासाचे बहुपदरी दर्शन घडते. कादंबरीचा केंद्रबिंदू 'कुळ' असला तरी लेखक या संकल्पनेचा वापर केवळ वंशावळीपुरता न करता, तिच्या माध्यमातून *जात, सत्ता, इतिहासलेखन, मानवी स्वभाव, हिंसा, प्रेम, लैंगिकता, स्थलांतर आणि मानुषता* या मूलभूत प्रश्नांना स्पर्श करतो. म्हणूनच *'सातपाटील कुलवृत्तांत'* ही कादंबरी कौटुंबिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी किंवा आत्मकथनात्मक कादंबरी अशा कोणत्याही एका चौकटीत बंदिस्त करता येत नाही. भारतीय परंपरेत कुळ, गोत्र, जात आणि वंश यांना अत्यंत महत्त्व दिले गेले आहे, मात्र लेखक या परंपरेवर प्रश्नचिन्ह उभे करतो. देवनाथ सातपाटील हा निवेदक जेव्हा आपल्या कुळाचा शोध घेण्यास सुरुवात करतो, तेव्हा त्याला हे उमगते की कुळाचा इतिहास म्हणजे केवळ नावे, तारखा आणि स्थळे यांची मांडणी नसून तो मानवी इच्छांचा, अपयशांचा, अपराधभावांचा आणि अनिश्चिततेचा गुंतागुंतीचा आलेख आहे. त्यामुळे कादंबरीचा शोध हा ऐतिहासिक कमी आणि मानवी अधिक ठरतो.

'सातपाटील कुलवृत्तांत' ही कादंबरी कालव्याप्तीच्या दृष्टीने अत्यंत व्यापक आहे. यादवकाळातील (इ.स. १२८९–१२९६) श्रीपतीपासून ते इ.स. २०१९ मधील देवनाथपर्यंत जवळजवळ सात–आठशे वर्षांचा कालपट येथे व्यापलेला आहे. या कालखंडात भारतातील राजकीय सत्ता अनेकदा बदलते. यादव, निजामशाही, आदिलशाही, मुघल, मराठे, इंग्रज आणि स्वातंत्र्योत्तर काळ. मात्र लेखकाचा भर राजसत्तेवर नसून, या सत्तांमुळे सामान्य माणसाच्या

आयुष्यात घडणाऱ्या उलथापालथींवर आहे. युद्धे, दुष्काळ, स्थलांतर, आर्थिक बदल आणि सामाजिक ताणतणाव यांचा प्रभाव सातपाटील कुळाच्या पिढ्यान् पिढ्यांच्या आयुष्यावर कसा पडतो, हे कादंबरी सूक्ष्मपणे दाखवते.

कादंबरीची रचना ही तिचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ही कादंबरी सरळरेषीय कथन न करता, अनेक स्वतंत्र वाटणाऱ्या गोष्टींच्या माध्यमातून पुढे सरकते. प्रत्येक पिढीची गोष्ट स्वतंत्र कथानकासारखी उभी राहते, मात्र ती पुढील पिढीच्या कथेत मिसळून जाते. या रचनेत लोककथनाची परंपरा स्पष्टपणे जाणवते. लोककथांप्रमाणेच येथे निवेदक अनेकदा कथन थांबवून वाचकांशी थेट संवाद साधतो, भविष्यातील घटनांची सूचक माहिती देतो आणि कुतूहल निर्माण करतो. उदाहरणार्थ, "एक वळण आलं आणि ते इतक्या हळुवारपणे आलं की त्यातून आपलं जगणंच बदलणार आहे याची पुसटशी चाहूलसुद्धा लागली नाही" (पृ. ३१) असे विधान वाचकाला पुढील कथेकडे खेचते. या कथनपद्धतीत योगायोग, अचानकता आणि नियती यांना विशेष स्थान आहे. अनेक घटना अशा घडतात की त्या वरवर अतर्क्य वाटतात; मात्र त्या मानवी स्वभाव, परिस्थिती आणि सत्ता-संबंध यांच्या चौकटीत बसतात. लेखक येथे वास्तववाद आणि कल्पनाविलास यांचा संतुलित वापर करतो. त्यामुळे कादंबरी ऐतिहासिक वास्तवाशी जोडलेली वाटते, तरी तिचे साहित्यिक सौंदर्य अबाधित राहते.

देवनाथ सातपाटील हा कादंबरीचा निवेदक केवळ कथनकर्ता नसून, तो संशोधक, चिंतक आणि आत्मपरीक्षण करणारा लेखक आहे. देवनाथ स्वतः आपल्या कुळाचा इतिहास शोधतो, मात्र त्याचवेळी तो इतिहासलेखनाच्या प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित करतो. देवनाथ आणि प्रत्यक्ष लेखक रंगनाथ पठारे यांच्यात काही बाह्य साम्ये दिसतात. लेखन, शिक्षण, संगमनेर परिसराशी असलेले नाते, आणीबाणीचा अनुभव इत्यादी. तरीही कादंबरी देवनाथला स्वतंत्र कल्पित पात्र म्हणून उभी करते. देवनाथ स्वतः लेखकाच्या भूमिकेबद्दल बोलताना म्हणतो की, "आपल्या 'काळाचा स्वर' सांगण्यासाठी भाषिक समाज लेखकाला निवडतो." (पृ. ६९७) या विधानातून लेखकाची साहित्यविषयक आणि इतिहासविषयक भूमिका स्पष्ट होते.

श्रीपतीची गोष्ट कादंबरीच्या आरंभी येते आणि ती संपूर्ण कुळकथेचा पाया घालते. यादवकाळातील मेंढपाळ असलेला श्रीपती एका योगायोगाने मानकऱ्याच्या घरात प्रवेश करतो. मेंढ्या चारताना रडणाऱ्या बाळाला मेंढीचे दूध देणे, मानकऱ्याचा विश्वास मिळवणे आणि पुढे त्याचा अंगरक्षक होणे, या घटनांतून श्रीपतीचे आयुष्य एका क्षणात बदलते. श्रीपतीचा सहस्रसेनाशी झालेला संघर्ष आणि त्याचा खून ही घटना निर्णायक ठरते. या घटनेनंतर रोहिणी आणि श्रीपती यांच्यात निर्माण होणारे नाते नैतिकदृष्ट्या गुंतागुंतीचे आहे, मात्र लेखक ते नुसते प्रणयकथन म्हणून न मांडता, सत्ता, संरक्षण आणि अस्तित्वाच्या प्रश्नांशी जोडतो. रोहिणीचे "जो जिंकतो ना, इतिहास त्याच्या बाजूचा असतो" (पृ. ३२) हे विधान केवळ श्रीपतीच्या कथापुरते मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण कादंबरीतील इतिहासदृष्टी स्पष्ट करते. इतिहास हा वस्तुनिष्ठ नसून, सत्ताधाऱ्यांनी लिहिलेला असतो, ही जाणीव लेखक येथे ठळकपणे मांडतो. श्रीपतीचा शेवटही पारंपरिक अर्थाने ठरावीक नाही. "तो मुग्ध हसतो" असा मुक्त शेवट देऊन लेखक वाचकाला कल्पनाशक्तीला मोकळीक देतो.

साहेबरावची गोष्ट ही श्रीपतीच्या कथेनंतर येते आणि ती स्थलांतर, युद्ध आणि सांस्कृतिक संमिश्रण यांचे प्रभावी चित्रण करते. निजामशाही–आदिलशाही संघर्षाच्या पार्श्वभूमीवर साहेबरावचा जीवनप्रवास अहमदनगर, पुणे, खराडी आणि अगदी अफगाणिस्तानपर्यंत जातो. येथे कादंबरीचा भौगोलिक पट विस्तारतो आणि सातपाटील कुळाची कथा स्थानिक मर्यादांपलीकडे जाते. साहेबरावने ठार केलेल्या बहरामखानाची पत्नी आर्याना साहेबरावावर प्रेम करते, ही घटना नैतिकदृष्ट्या अस्वस्थ करणारी आहे, मात्र लेखक मानवी भावनांच्या गुंतागुंतीवर प्रकाश टाकतो. बहरामखानाचे स्वप्नात येणे आणि आर्यानाशी विवाह करण्याचा सल्ला देणे हे वास्तव आणि अवास्तव यांतील सीमारेषा पुसट करते आणि लोककथनाची परंपरा अधोरेखित करते. या टप्प्यावर कादंबरीतील एक महत्त्वाचे कथासूत्र स्पष्ट होते ते म्हणजे *मारणारा आणि मारलेल्याची पत्नी यांच्यात निर्माण होणारे नाते.* हे सूत्र पुढील पिढ्यांतही पुन्हा पुन्हा येते आणि मानवी संबंधांची नैतिक गुंतागुंत अधोरेखित करते. लेखक येथे नैतिक निर्णय देत नाही; तो केवळ परिस्थिती, भावना आणि नियती यांचे गुंतागुंतीचे जाळे उलगडतो.

दसरतची गोष्ट पानिपतच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर उभी राहते आणि येथे कादंबरीतील ऐतिहासिक संदर्भ अधिक ठळक होतात. निवेदक आधीच दसरतच्या आयुष्यातील निर्णायक अपघाताची सूचना देतो. तो म्हणतो, "त्या टोकावर दसरतचे आयुष्य बदलून टाकणारा अपघात होणार होता" (पृ. २६८). या पूर्वसूचनेमुळे कथनात नाट्य निर्माण होते. अनवधानाने झालेला खून, पलायन, बिबट्याशी सामना, शिंद्यांच्या लष्करात प्रवेश आणि पानिपतचा पराभव या सा-या घटनांतून युद्धाचा सामान्य माणसावर होणारा परिणाम स्पष्ट होतो. पानिपतचे युद्ध येथे केवळ ऐतिहासिक घटना न राहता, नियतीचे प्रतीक ठरते. पराभव, विस्थापन आणि अस्तित्वाची असुरक्षा यांचा अनुभव दसरतच्या माध्यमातून व्यक्त होतो. अफगाणिस्तानातील झोरावर आणि आफिया या पात्रांच्या कथेतून पुन्हा एकदा 'मारणारा-मारलेल्याची पत्नी' हे सूत्र पुढे येते. आफिया दसरतला वाचवते आणि मानवी करुणेचे दर्शन घडवते.

दसरतच्या कथेनंतर कादंबरी जानरावच्या गोष्टीकडे वळते आणि येथे कादंबरीचे कथानक लक्षणीयरीत्या बदलते. आतापर्यंत युद्ध, स्थलांतर, साहस आणि बाह्य संघर्ष यांवर भर होता, मात्र जानरावच्या कथेत लेखक मानवी मनाच्या आतल्या अंधा-या कोपरे उजागर करतो. जानरावची गोष्ट ही केवळ एका व्यक्तीची नाही, तर *कुटुंब, समाज आणि नियती यांच्या संयुक्त आघाताने माणूस कसा मानसिकदृष्ट्या कोसळतो* याचे सखोल चित्रण आहे. साल्पी गावाची उभारणी, शेतीतील समृद्धी आणि कुटुंबाची प्रतिष्ठा यांपासून सुरू झालेला हा प्रवास हळूहळू हिंसा, अपराधभाव, भ्रम आणि मृत्यूकडे झुकत जातो. जानरावच्या आयुष्यातील निर्णायक घटना म्हणजे झमाबाईवर झालेला बलात्कार. ही घटना कादंबरीत अतिशय संयत, पण तीव्र परिणामकारकतेने येते. लेखक येथे भीषण वर्णन टाळतो, मात्र या घटनेनंतर झमाबाईचे मूक होणे आणि तिचे आतून तुटणे हे स्त्रीवरील लैंगिक हिंसेचे भीषण परिणाम स्पष्ट करते. झमाबाईचा आवाज हरवणे हे केवळ शारीरिक आघाताचे नव्हे, तर सामाजिक दडपशाहीचेही प्रतीक आहे. या घटनेनंतर सरूबाईची मानसिक अवस्था ढासळते आणि ती भ्रमांच्या जगात वावरू लागते. येथे लेखक एका घटनेचा परिणाम संपूर्ण कुटुंबाच्या मानसिक आरोग्यावर कसा दीर्घकालीन आघात करतो हे सूचित करतो.

जानरावच्या कथेत 'पाकोळया' हे प्रतीक सातत्याने येते आणि ते कादंबरीतील सर्वांत प्रभावी प्रतीकांपैकी एक ठरते. "लोक येतात तेव्हा त्यांच्या सोबत तऱ्हेतऱ्हेच्या पाकोळया येतात" (पृ. ४२२) असे निवेदन करताना लेखक पाकोळयांना केवळ कीटक न ठेवता, *अकाली मृत्यू, अनिवार्य नियती आणि कुळावर आलेल्या शापाचे* प्रतीक बनवतो. "चारसहा पिढ्यातून या पाकोळया येतात" (पृ. ४३२) असे सांगताना लेखक सूचित करतो की काही आघात हे एका पिढीपुरते मर्यादित राहत नाहीत, तर ते पिढ्यानपिढ्या वाहत राहतात. झगमगत्या सोनेरी पाकोळयांचा थवा हा मृत्यूचा सौंदर्यभास निर्माण करतो आणि त्यामुळे ही प्रतीकव्यवस्था अधिक अस्वस्थ करणारी ठरते. जानरावच्या कथेत वास्तव आणि मानसिक अनुभूती यांमधील सीमारेषा पुसट होते. सरूबाईचे भ्रम, झमबाईचे मौन आणि जानरावचा अपराधभाव हे सारे एकत्र येऊन कादंबरीला शोकात्म परिमाण देतात. येथे लेखक मानवी मनाच्या नाजूकपणाकडे लक्ष वेधतो. युद्धात पराभूत होणारा माणूस पुन्हा उभा राहू शकतो, मात्र मानसिक आघातातून सावरणे किती कठीण असते, हे जानरावच्या कथेतून स्पष्ट होते.

यानंतर कादंबरी रखमाजीच्या गोष्टीकडे वळते आणि येथे कथनाचा पट बदलतो. रखमाजीची गोष्ट फारशी नाट्यमय नाही, मात्र ती अत्यंत वास्तववादी आहे. शेती, कुटुंब, कर्ज आणि अपयश यांत अडकलेला रखमाजी हा ग्रामीण जीवनाचा प्रतिनिधी ठरतो. त्याचे अपयश हे वैयक्तिक नसून संरचनात्मक आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीत पारंपरिक शेती टिकवणे किती अवघड होते, हे लेखक येथे सूचित करतो. रखमाजीची कथा लांबीने छोटी असली तरी ती कादंबरीतील सामाजिक वास्तव अधोरेखित करते. पिराजीची गोष्ट मात्र वेगळ्या धाटणीची आहे. पिराजी हा धाडसी, बंडखोर आणि समाजाच्या चौकटीत न बसणारा व्यक्ती आहे. दरोडे, साहस आणि लोकसहाय्य या माध्यमातून पिराजीची प्रतिमा उभी राहते. उल्फी कोल्हाटीण आणि पिराजी यांचे नाते हे कादंबरीतील महत्त्वाचे वळण आहे. हे नाते रूढ सामाजिक संकेतांना धक्का देणारे आहे, मात्र लेखक त्याकडे नैतिकतेच्या चौकटीतून न पाहता, मानवी ओढ आणि परस्पर आधाराच्या दृष्टीने पाहतो. उल्फीचा पुढील प्रवास अँथनी ब्लॅकस्मिथ, जालन आणि मुंबईपर्यंत कादंबरीला भौगोलिक आणि सांस्कृतिक विस्तार देतो. कादंबरीत पुढे येणा-या पिराजीच्या कथेत लोकनायकत्वाची छटा दिसते. तो श्रीमंतांकडून लुटून गरिबांना मदत करतो, असा संकेत येथे येतो. मात्र लेखक पिराजीला आदर्शवत न

रंगवता, त्याच्या आयुष्यातील धोके, हिंसा आणि अनिश्चितता यांनाही समोर आणतो. त्यामुळे पिराजी हा नायक आणि गुन्हेगार यांमधील सीमारेषेवर उभा राहतो. ही द्विधा अवस्था कादंबरीतील नैतिक गुंतागुंत अधिक तीव्र करते.

शंभुरावची गोष्ट ही कादंबरीमधील सर्वांत विस्तृत आणि वैचारिकदृष्ट्या महत्त्वाची गोष्ट आहे. शंभुरावच्या आयुष्यातून ग्रामीण महाराष्ट्राचे सामाजिक, आर्थिक आणि मानसिक चित्र उलगडते. सावकारी, मुंबईशी निर्माण झालेले संबंध, शिक्षणाची वाढ, गांधीवादी विचारसरणी आणि स्वातंत्र्यलढ्याचे पडसाद हे सारे घटक शंभुरावच्या आयुष्यात गुंफलेले आहेत. शंभुरावचा प्रारंभीचा उत्कर्ष आणि नंतरचा ऱ्हास हा केवळ वैयक्तिक नसून, बदलत्या समाजरचनेचा परिणाम आहे. शंभुरावच्या कथेत 'व्हर्नाक्युलर' या शब्दावरील भाष्य विशेष महत्त्वाचे ठरते. इंग्रज अधिकाऱ्यांच्या दृष्टीने स्थानिक भाषा म्हणजे 'व्हर्नाक्युलर',दुय्यम, कमी दर्जाची अशी धारणा होती (पृ. ४५७). लेखक या शब्दाच्या माध्यमातून औपनिवेशिक सत्तेची भाषिक आणि सांस्कृतिक वर्चस्ववादी मानसिकता उघड करतो. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून, सत्ता गाजवण्याचे माध्यम कसे ठरते, हे येथे स्पष्ट होते. शंभुराव आणि देऊबाई यांच्यातील नाते कादंबरीतील भावनिक केंद्रांपैकी एक आहे. त्यांची प्रेमकथा 'नजरानजर' या सूक्ष्म संकेतांतून उलगडते. येथे प्रेम मोठ्या घोषणांमध्ये नाही, तर दैनंदिन सहवासात, नजरेत आणि सामायिक दुःखात प्रकट होते. मात्र शंभुरावचे आयुष्य जसजसे ढासळते, तसतसे या नात्यावरही ताण येतो. आर्थिक अडचणी, सामाजिक आरोप आणि मानसिक अस्थैर्य यांमुळे शंभुराव एकाकी होत जातो.शंभुरावचा अंत हा कादंबरीतील सर्वांत करुण क्षणांपैकी एक आहे. समाज त्याच्या ऱ्हासाकडे नैतिक दृष्टीने पाहतो आणि त्याच्यावर पापांचे आरोप करतो. "या जन्मी केलेल्या पापांची परतफेड याच जन्मी" (पृ. ६५९) असे विधान येथे येते. मात्र निवेदक शंभुरावाच्या मनातील विस्कळीत हालचाली, आठवणींचे तुकडे आणि भ्रम यांचे करुण चित्रण करतो. येथे निवेदक तटस्थ राहतो, पण त्याची सहानुभूती स्पष्टपणे जाणवते. समाजाचा न्याय आणि मानवी करुणा यांमधील ताण येथे ठळक होतो. शंभुरावच्या कथेनंतर कादंबरी हळूहळू देवनाथच्या कथेकडे झुकू लागते. मात्र देवनाथची गोष्ट ही स्वतंत्रपणे येण्याआधीच वाचकाला जाणवते की आतापर्यंत सांगितलेल्या सर्व गोष्टी एका बिंदूकडे येऊन थांबणार आहेत. कुळाचा इतिहास हा केवळ भूतकाळाचा संग्रह नसून, तो वर्तमानाला आकार देणारी शक्ती आहे, ही जाणीव येथे अधिक तीव्र होते. जानरावच्या शोकात्म कथेतून सुरू झालेला हा प्रवास समकाळातील सामाजिक वास्तवापर्यंत येऊन पोहोचतो. येथे लेखक मानवी मन, समाजरचना आणि सत्ता यांचे गुंतागुंतीचे संबंध उलगडतो. प्रतीकव्यवस्था, विशेषतः पाकोळ्यांचे प्रतीक, कादंबरीला गहन अर्थछटा देते. तसेच रखमाजी, पिराजी आणि शंभुराव यांच्या कथांमधून ग्रामीण महाराष्ट्रातील बदलते वास्तव स्पष्ट होते.

शंभुरावच्या कथेनंतर *कादंबरी* हळूहळू वर्तमानकाळात प्रवेश करते आणि देवनाथ सातपाटीलची गोष्ट केंद्रस्थानी येते. या टप्प्यावर कादंबरीचे स्वरूप बदलते. आतापर्यंत स्वतंत्र पिढ्यांच्या कथा ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भांत मांडल्या गेल्या होत्या, मात्र देवनाथच्या कथेत त्या सर्व कथांचा संशोधकीय पुनर्विचार घडतो. देवनाथ ही केवळ पुढील पिढीतील व्यक्तिरेखा नाही, तर तो भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा दुवा आहे. तो आपल्या कुळाचा इतिहास शोधताना प्रत्यक्षात *इतिहासलेखनाच्या प्रक्रियेचाच* शोध घेतो. त्यामुळे कादंबरी येथे आत्मकथन, संशोधन आणि इतिहासचिकित्सा यांचे संमिश्र रूप धारण करते.

देवनाथच्या कथनात पत्ररूप संवादाला विशेष महत्त्व आहे. ही पत्रे केवळ वैयक्तिक संवाद म्हणून येत नाहीत, तर ती इतिहासाचे स्रोत म्हणून वापरली जातात. इतिहास हा केवळ अधिकृत दस्तऐवजांतून नव्हे, तर स्मृती, पत्रे, लोककथा आणि मौखिक परंपरेतूनही आकार घेतो, ही भूमिका लेखक येथे अधोरेखित करतो. देवनाथ विविध स्रोतांचा वापर करून आपल्या कुळाचा इतिहास पुन्हा रचतो. मात्र तो या इतिहासाला अंतिम सत्य मानत नाही. उलट, तो इतिहासातील तुटकपणा, संदिग्धता आणि रिकाम्या जागा यांची जाणीव वाचकाला करून देतो. देवनाथच्या कथेत आत्मपरीक्षणाचा सूर अधिक तीव्र होतो. तो स्वतःच्या ओळखीविषयी प्रश्न उपस्थित करतो. आपण कोण आहोत? आपली ओळख जात, कुळ किंवा आडनावाने ठरते की मानुषतेने? देवनाथ ९६ कुळी मराठा, क्षत्रिय, देशमुख, पाटील, कुणबी, शूद्र अशा विविध सामाजिक ओळखींचा उल्लेख करतो आणि त्यांपलीकडे जाण्याचा प्रयत्न करतो. या ओळखी इतिहासाने आणि समाजाने निर्माण केल्या असल्या, तरी त्या माणसाच्या मूलभूत मानुषतेचे संपूर्ण स्पष्टीकरण देऊ

शकत नाहीत, ही जाणीव येथे ठळक होते. त्यामुळे कादंबरीचा अंतिम शोध हा वंशाचा नसून, *मानवी मूल्यांचा* ठरतो. देवनाथ आणि प्रत्यक्ष लेखक रंगनाथ पठारे यांच्यातील साधर्म्य या टप्प्यावर अधिक स्पष्ट होते, मात्र लेखक येथेही आत्मकथन आणि कल्पित यांची सरमिसळ करून ठेवतो. देवनाथ लेखकाच्या अनुभवांचा काही अंशी प्रतिनिधी असला तरी तो पूर्णतः आत्मकथनात्मक पात्र नाही. देवनाथ स्वतः लेखकाच्या भूमिकेचे चिंतन करताना म्हणतो की लेखकाला समाज 'काळाचा स्वर' व्यक्त करण्यासाठी निवडतो आणि ही निवड एखाद्या अतर्क्य, हलत्या संख्याशास्त्रीय डायन्यामिक्सची निष्पत्ती असते (पृ. ६९७). या विधानातून लेखक स्वतःच्या साहित्यक्षेत्रातील स्थानाविषयीही सूचक भाष्य करतो.

देवनाथच्या कथेत आणीबाणीचा काळ, सामाजिक अस्वस्थता आणि बौद्धिक दडपशाही यांचे संदर्भ येतात. *'दिवे गेलेले दिवस'* या कादंबरीचा उल्लेख येथे सूचक स्वरूपात येतो आणि त्यामुळे लेखकाच्या साहित्यविश्वातील आंतरग्रंथीय नाते अधोरेखित होते. मात्र कादंबरीमध्ये आणीबाणी हा केंद्रवर्ती विषय नसून, तो सामाजिक स्मृतीचा एक भाग म्हणून येतो. इतिहास हा केवळ दूरचा भूतकाळ नसून, तो अलीकडील अनुभवांनाही सामावून घेतो, ही भूमिका येथे स्पष्ट होते. देवनाथच्या संशोधनात लोककथा आणि मौखिक परंपरेचे महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित होते. माणिक गुरुजींच्या कथनातून अनेक गोष्टी पुढे येतात. या कथांमध्ये ऐतिहासिक अचूकता कदाचित नसेल, मात्र त्यांत समाजाची स्मृती, भीती, आकांक्षा आणि मूल्ये प्रतिबिंबित होतात. लेखक येथे लोकइतिहास आणि अधिकृत इतिहास यांतील फरक अधोरेखित करतो. अधिकृत इतिहास सत्ताधाऱ्यांचा असतो, तर लोकइतिहास हा सामान्य माणसाच्या अनुभवांवर आधारलेला असतो. *'सातपाटील कुलवृत्तांत'* ही कादंबरी या लोकइतिहासाचीच साहित्यिक मांडणी ठरते. देवनाथच्या कथेत वंशवृक्षालाही महत्त्व आहे. मात्र हा वंशवृक्ष अंतिम सत्य म्हणून न मांडता, एक तर्कसंगत रचना म्हणून समोर येतो. देवनाथ मान्य करतो की अनेक ठिकाणी माहिती अपुरी आहे, दुवे तुटलेले आहेत आणि काही गोष्टी केवळ अंदाजावर आधारलेल्या आहेत. त्यामुळे इतिहास हा पूर्ण, सुसंगत आख्यान नसून, तो तुटक तुकड्यांचा संग्रह आहे, ही भूमिका येथे ठळक होते. या दृष्टिकोनामुळे कादंबरी उत्तरआधुनिक इतिहासदृष्टीशी जवळीक साधते.

कादंबरीच्या या अंतिम टप्प्यात निवेदकाची भाषा अधिक चिंतनशील आणि तत्त्वज्ञानात्मक होते. देवनाथ भूतकाळाकडे पाहताना त्याचे गौरवीकरण करत नाही. उलट, तो त्या काळातील हिंसा, स्त्रीदमन, सत्ता-संघर्ष आणि नैतिक द्वंद्व यांची स्पष्ट नोंद घेतो. त्याचबरोबर तो त्या काळातील माणसांच्या जगण्याची अपरिहार्यता आणि परिस्थितीजन्य निर्णय यांनाही समजून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे कादंबरीत नैतिक उपदेश किंवा ठाम निर्णय देण्याऐवजी, समजून घेण्याची भूमिका प्राधान्याने येते. कादंबरीच्या अखेरीस येणारा निष्कर्ष कोणत्याही भव्य विधानाने संपत नाही. कादंबरीचा शेवटही श्रीपतीच्या गोष्टीप्रमाणेच मुक्त आणि सूचक आहे. देवनाथ कुळाचा इतिहास सांगून थांबत नाही, तो त्या इतिहासाच्या मर्यादा मान्य करतो. कुळाचा शोध म्हणजे स्वतःचा शोध असला तरी तो कधीच पूर्ण होत नाही, ही जाणीव येथे व्यक्त होते. इतिहास हा सतत पुनर्लिखित होणारा प्रवास आहे, स्थिर सत्य नाही, हा विचार येथे ठळक होतो.

संपूर्ण कादंबरीत लेखकाने कथनपरंपरा, इतिहास आणि मानुषता यांचे विलक्षण संधान साधले आहे. परंपरागत लोककथनाची शैली, आधुनिक कादंबरीचे तंत्र आणि संशोधकीय दृष्टिकोन यांचा संगम येथे दिसतो. योगायोग, स्वप्ने, प्रतीके आणि नियती यांचा वापर करूनही कादंबरी वास्तवापासून दूर जात नाही; उलट, ती मानवी जीवनातील अनिश्चिततेचे अधिक सखोल दर्शन घडवते. 'पाकोळ्या', 'नजरानजर', 'मारणारा-मारलेल्याची पत्नी' ही पुनरावर्ती कथासूत्रे कादंबरीला संरचनात्मक एकात्मता देतात. वाङ्मयीनदृष्ट्या *'सातपाटील कुलवृत्तांत'* ही कादंबरी मराठी कादंबरीपरंपरेतील एक महत्त्वाचा टप्पा ठरते. आठशे वर्षांचा कालपट असूनही कथनात सुसंगतता आणि प्रवाहीपणा टिकवणे ही लेखकाची मोठी किमया आहे. ग्रामीण, शहरी, स्थानिक आणि जागतिक अशा विविध पातळ्यांवर कथानक विस्तारत असले तरी कादंबरीचा केंद्रबिंदू मानवी अनुभवच राहतो.संशोधकीय दृष्टीने ही कादंबरी अनेक अंगांनी अभ्यासास पात्र ठरते. इतिहासलेखनाची संकल्पना, लोकइतिहास विरुद्ध अधिकृत इतिहास, जात आणि ओळख, स्त्री-

अनुभव, मानसिक विकलता, प्रतीकव्यवस्था आणि निवेदनतंत्र त्यामुळे *'सातपाटील कुलवृत्तांत'* ही केवळ वाचनीय कादंबरी न राहता गंभीर साहित्यचर्चेसाठी महत्त्वाचा ग्रंथ ठरते.

एकूणच *'सातपाटील कुलवृत्तांत'* ही कादंबरी मानवी जीवनातील अनिश्चितता, संघर्ष आणि मानुषतेचा दीर्घ शोध आहे. काळाच्या पटावरील ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक, प्रदेशविशिष्ट आणि सामाजिक घटितांची मांडणी कथानकात गुंफण्याचे विलक्षण कौशल्य लेखकाने प्रकट केले आहे त्यामुळे ही कादंबरी मराठी साहित्यातील एक विलक्षण, बहुआयामी आणि दीर्घकालीन महत्त्व असलेली साहित्यनिर्मिती ठरते. सदर कादंबरी केवळ एका कुळाचा इतिहास सांगणारी नसून, ती भारतीय समाजाच्या शेकडो वर्षांच्या प्रवासाचा लोकदृष्टीतून मांडलेला अभिजात दस्तऐवज आहे. इतिहास, लोककथा, स्मृती, अनुभव आणि कल्पित यांचे सर्जनशील संधान साधून लेखकाने येथे एक व्यापक सांस्कृतिक महाकथन उभे केले आहे. कुळाचा इतिहास सांगताना ती माणसाच्या मूलभूत प्रश्नांकडे वळते. आपण कोण आहोत, आपली ओळख कशी घडते आणि इतिहासाशी आपले नाते काय आहे? या प्रश्नांची उत्तरे कादंबरी ठामपणे देत नाही, मात्र वाचकाला त्या प्रश्नांचा विचार करायला भाग पाडते. सदर कादंबरी मराठी साहित्यातील एक अभिजात महाकथन ठरते. तिचे अभिजातत्व केवळ भाषाशैलीत किंवा कथाविस्तारात नाही, तर *मानवी अनुभवांच्या सार्वकालिक मांडणीत* आहे. लोकइतिहास आणि साहित्य यांचे सर्जनशील संधान साधून लेखकाने येथे असा दस्तऐवज निर्माण केला आहे, जो इतिहासकार, साहित्यिक, संशोधक आणि संवेदनशील वाचक यांना समानरीत्या विचारप्रवृत्त करतो. या कादंबरीचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिची *लोकइतिहासाची दृष्टी.* राजे, सत्ताधीश, युद्धे आणि साम्राज्ये यांच्या केंद्रस्थानी असणाऱ्या परंपरागत इतिहासलेखनाला छेद देत, *सातपाटील कुलवृत्तांत* सामान्य माणसाच्या आयुष्याला इतिहासाच्या केंद्रस्थानी आणते. मेंढपाळ, शेतकरी, सैनिक, स्थलांतरित, स्त्रिया, मानसिकदृष्ट्या खचलेली माणसे या सर्वांच्या अनुभवांतून इतिहास आकार घेतो. त्यामुळे येथे इतिहास हा 'घडलेला भूतकाळ' न राहता, *जगलेला अनुभव* ठरतो. ही लोकइतिहासाची दृष्टीच कादंबरीला अभिजातत्व प्रदान करते. सांस्कृतिक दृष्टीने पाहता, ही कादंबरी महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनातील मूल्यव्यवस्था, श्रद्धा, भीती, नातेसंबंध आणि बदलते सामाजिक वास्तव यांचे सूक्ष्म चित्रण करते. जात, कुळ, सत्तासंबंध, प्रभाव आणि आधुनिकतेचे ताण यांचा मानवी आयुष्यावर होणारा परिणाम येथे ठळकपणे दिसतो. त्यामुळे ही कादंबरी एका प्रदेशापुरती मर्यादित न राहता, व्यापक भारतीय सांस्कृतिक अनुभवाचे प्रतिनिधित्व करते.म्हणूनच *'सातपाटील कुलवृत्तांत'* ही कादंबरी मराठी साहित्याच्या इतिहासात केवळ एक महत्त्वाची कलाकृती न राहता *'सांस्कृतिक स्मृतीचा अभिजात दस्तऐवज'* म्हणून कायमस्वरूपी स्थान मिळवते, हे या कादंबरीचे यश म्हणता येईल.

(सदर लेखासाठी रंगनाथ पठारे यांच्या शब्दालय प्रकाशन, मुंबई यांनी प्रसिद्ध केलेल्या *'सातपाटील कुलवृत्तांत'* या कलाकृतीची प्रथम आवृत्ती आधाराला घेतली आहे. लेखातील पृष्ठ क्रमांक याच आवृत्तीतील आहेत.)

विषय- कवयित्री शांता शेळके यांच्या चित्रपट गीतांचे विशेष

डॉ. भक्ती गोविंद महाजन
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
संत सोहिरोबानाथ आंबिये शासकीय महाविद्यालय, विर्नोडा-पेडणे, गोवा.
ईमेल- bhakti07mahajan@gmail.com
मोबाईल- 9421949792

प्रस्तावना-

मराठी साहित्याचा 'काव्य' प्रांत अनेक कवयित्रींनी आपल्या सक्षम लेखणीने समृद्ध केला आहे. त्यातील शांता शेळके या एक प्रतिभासंपन्न मराठी कवयित्री होत्या. कवयित्री, संगीतकार, लेखिका, अनुवादक, बालसाहित्य लेखिका, साहित्यिक आणि पत्रकार होत्या. शांताबाईंनी 'डॉ वसंत अवसरे' या टोपण नावानेदेखील गीते लिहिली.

'अजब सोहळा', 'अशीच अवचित भेटून जा', 'असेन मी नसेन मी', ', 'आज चांदणे उन्हात हसले', 'आज मी आळविते केदार', 'आज मी निराधार एकला', 'आधार जिवा', 'आला पाऊस मातीच्या वासात', 'ऋतु हिरवा...ऋतु बरवा', 'एक एक विरते तारा', 'कर आता गाई गाई', 'कशि गौळण राधा', 'कशी कसरत दावतुया न्यारी', 'कळले तुला काही', 'कळ्यांचे दिवस फुलांच्या', 'का धरिला परदेश', 'काटा रुते कुणाला', काय बाई सांगू', 'किलबिल किलबिल पक्षी', 'कुणीतरी सांगा हो सजणा', 'खोडी माझी काढाल तर', 'गगना गंध आला', 'गजानना श्री गणराया', 'गणराज रंगी नाचतो', 'गाव असानी माणसं अशी', 'गीत होऊन आले सुख माझे', 'गोंडा फुटला दिसाचा', 'घन रानी साजणा', 'घरपरतीच्या वाटेवरती', 'चंद्र दोन उगवले', 'चांदण्या रात्रीतले ते', 'छेडियल्या तारा', 'जय शारदे वागीश्वरी', 'जा जा रानीच्या पाखरा', 'जा जा जा रे नको बोलु', 'जाईन विचारित रानफुला', 'जायचे इथून दूर', 'जिवलगा राहिले रे दूर', 'जीवनगाणे गातच रहावे', 'जे वेड मजला लागले', 'जो जो गाई कर अंगाई', 'झाला साखरपुडा गं बाई', 'झुलतो झुला जाई आभाळा', 'तू येता सखि माझ्या', 'तोच चंद्रमा नभात', 'दशदिशांस पुसतो', 'दाटतो हृदयी उमाळा', दाटून कंठ येतो', 'दिसते मजला सुखचित्र', 'दुःख हे माझे मला', 'दैव किती अविचारी', 'नको रे नंदलाला', 'निळया आभाळी कातरवेळी', 'नाही येथे कुणी कुणाचा', 'पप्पा सांगा कुणाचे', 'पहा टाकले पुसुनी डोळे', 'पाऊस आला वारा आला', 'पाखरा गीत नको गाऊ', 'पालखी हाले डुले', 'पुनवेचा चंद्र आला', 'प्रीतफुले माझी सोनेरी', 'प्रीति जडली तुझ्यावरी', 'बाळा माझ्या नीज ना', 'मनाच्या धुंदीत लहरीत', 'मराठी पाऊल पडते पुढे', 'मागते मन एक काही', 'मागे उभा मंगेश', 'माजे रानी माजे मोगा', 'माज्या सारंगा राजा', 'माझ्या मना रे ऐक जरा', 'माझ्या मायेच्या माहेरा', 'माणुसकीचे पाईक आम्ही', 'मानत नाही श्याम', 'मी डोलकर डोलकर', 'राघुमैना रानपाखरं', 'रेशमाच्या रेघांनी', 'वादलवारं सुटलं गो', 'विकल मन आज झुरत', 'विकल सांजवेळी', 'विहीणबाई विहीणबाई उठा', 'शारद सुंदर चंदेरी', 'शूर आम्ही सरदार, 'शोधितो राधेला श्रीहरी', 'शोधू मी कुठे कशी', 'श्रावणसरी', सांग सांग नाव सांग', सांगू कशी प्रिया मी', 'सांज आली दूरातून', 'साजणी सई गं', 'सुकुनी गेला बाग', 'सुख भरून सांडते', 'स्पर्श सांगेल सारी', 'स्वप्ने मनातली का', 'स्वर्गाहुनही प्रिय आम्हांला', 'हा दुःखभोग सारा', 'हा माझा मार्ग एकला', 'ही चाल तुरुतुरु', 'ही वाट दूर जाते', 'हे बंध रेशमाचे' या सर्व गीतांमधील काही प्रातिनिधिक गीतांचा विचार करूया.

विषयविवेचन-

'तोच चंद्रमा नभात' हे विरहगीत शांताबाईंच्या उत्कृष्ट चित्रपट रचनांपैकी एक मानले जाते. मराठी काव्यसंगीत परंपरेत काही गीते अशी आहेत की ती ऐकताना शब्द, स्वर आणि भावना मनात खोलवर रुतून बसतात. हे भावस्पर्शी गीत तर असंख्य मानवी भावभावना अतिशय साध्या शब्दांत मांडते. अजरामर गीत, आठवणी आणि निसर्ग यांचा सुंदर मेळ घालतो. काळ बदलतो, माणसे बदलतात, नाती बदलतात. पण नभात चंद्रमा तोच असतो. ही जीवनाची सूक्ष्म पण खोल जाणीव या गीतामधून व्यक्त करतात. विरह, आठवणी आणि शांतता नि दुःख यांचे प्रतिबिंब या गीतात अत्यंत हळुवारपणे उमटताना दिसते. बाबूजींनी ते आपल्या आवाजात अजरामर केले आहे.

'काय बाई सांगू, कसं ग सांगू, मलाच माझी वाटे लाज, काहीतरी होऊन गेलय आज' याला उषा मंगेशकर यांचा सूर, पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीतबद्ध केले होते. 'पवनकाठाचा धोंडी' या चित्रपटामध्ये आले. ते 'चित्रगीत' या प्रकारात मोडते. हे गीत नवीन प्रेमात पडलेल्या मुलीच्या मनातील भावनांचे सुंदर चित्रण करते, जिथे तिला तिच्या भावना व्यक्त करायला शब्द सापडत नाहीत आणि ती स्वतःच गोंधळून जाते. एका तरुणीच्या मनातल्या भावना, लाजाळूपणा आणि प्रेमाची एक अनामिक भावना, मनातील हुरहूर व्यक्त होते.

'काटा रुते कुणाला, आक्रंदतात कोणी । मज फूलही रुतावे, हा दैवयोग आहे!' हे पद 'हे बंध रेशमाचे' या संगीत नाटकातील, पंडित अभिषेकी बुवांनी स्वरबद्ध केलेले असून आजही मराठी मनाला मोहिनी घालून आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मानवी जीवनातील अनेक शाश्वत सत्यांपैकी एक सत्य म्हणजे हतबलता, दुर्भाग्य आणि निरुपाय यांनी ग्रासलेले क्षण. तेव्हा अश्रू ढाळत, निरुपाय होऊन आपल्या दुर्भाग्याकडे बघत हसण्यापलीकडे माणसाच्या हातात काही उरतं नाही. या गीतामधून एक विदीर्ण विषण्णता मन व्यापून जाते.

'हे बंध रेशमाचे' नाटकाकरिता शांताबाई शेळके काव्य रचणार हे ठरले. जिथे पात्राला या दुःखाला सामोरे जावे लागते ती जागा त्यांना सांगितली गेली. यात दिवस गेले पण मनाजोगते शब्द काही सापडेना. बुवांचा शेर ऐकल्यावर शांताबाई शेळके यांना विषयाचा गाभा समजला आणि त्यांनी 'काटा रूते कुणाला' हे पद रचले. या गीतामधून शेवटी माणूस अगदी एकटा पडतो. हे जगणं व्यर्थ गेले असे वाटू लागते. ओंजळीत जपलेल्या आयुष्याला अकस्मात बोटांच्या फटींतून निसटून जाताना, हताशपणे बघणे येते असा आशय येतो.

'शारद सुंदर चंदेरी राती' हे लोकप्रिय रोमँटिक मराठी गाणे आहे. हे गाणे आशा भोसले यांनी गायले असून, हेमंत भोसले यांनी संगीतबद्ध केले आहे. या गाण्यात शरद ऋतूतील टिपूर चांदण्या रात्रीचे आणि प्रेमी युगुलाच्या भावनांचे अत्यंत सुंदर चित्रण शांताबाईंनी आपल्या शब्दांत केले आहे. या गीतामध्ये प्रेमी मनाची हुरहूर, निसर्गाचे सौंदर्य, आणि मोगरा-चमेलीच्या सुगंधाचा मादक अनुभव, धुंद काया व्यक्त केला आहे.

'मी डोलकर दर्याचा राजा' हे कोळीगीत असून, ते लता मंगेशकर आणि हेमंत कुमार यांनी गायले आहे. हृदयनाथ मंगेशकर यांचे संगीत लाभले. या गाण्याने महाराष्ट्राच्या लोकसंगीतात कोळीवाड्याचा गोडवा आणला आहे. या गाण्यात कोळी बांधवाचे दर्यावरील प्रेम, कोळीवाड्याचे वर्णन आणि त्यातील रोमांचक जीवनशैली चित्रित करण्यात आली आहे. हे गीत मराठी संस्कृतीचा आणि कोळीगीतांचा एक अविभाज्य भाग मानले जाते. समुद्राच्या अथांग लाटांवर ज्याचं आयुष्य तरंगतं, वादळांशी झुंज देत, ज्याचं मन खंबीर राहतं, परिश्रम, आणि धैर्य यांचे जीवंत प्रतीक म्हणजे *डोलकर.* मराठी माणसाच्या कष्टाळू, जिद्दी आणि स्वाभिमानी भावाचे सुंदर दर्शन घडवणारे, डोलकराच्या जीवनावर आधारित हे गीत.

'किलबिल किलबिल पक्षी बोलती' या गीतामध्ये उषःकालाच्या सोनसळी कुशीतून सृष्टी हळुवार श्वास घेते. पानांवर उमटलेली ताजगी, आणि किलबिल करणाऱ्या पक्ष्यांच्या सुरांनी अवघं विश्व जागं होतं. निसर्गाशी नातं जपणारं, आनंद आणि चैतन्य पेरणारं मराठी बालसाहित्यातील हे महत्त्वाचे गीत. या गीतामध्ये निसर्गसौंदर्य आणि

लहान मुलांच्या स्वप्निल विश्वाचे वर्णन येते. हे बालगीत मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देणारे आणि निसर्गाशी जोडणारे एक छान गाणे आहे. हे गाणे आजही बालवाडीपासून प्राथमिक शाळेपर्यंत मुलांच्या ओठावर असते.

'ही चाल तुरुतुरु' हे देवदत्त साबल यांनी संगीतबद्ध केले आहे आणि जयवंत कुलकर्णी यांनी गायले आहे. हे गाणे नायिकेच्या मोहक चालण्यावर आणि सौंदर्यावर आधारित आहे. या गाण्याला आजही मराठी संगीतात मानाचे स्थान आहे. ग्रामीण जीवनाच्या मातीशी नातं सांगणारं, साधेपणातच सौंदर्य शोधणारं आणि स्त्रीच्या लाजऱ्या, निरागस रूपाचं मनोहारी चित्र उभं करणारे हे गीत. ही नायिका कुणाचे लक्ष वेधण्यासाठी सजलेली नाही; ती आपल्या सहजतेतच मोहक आहे. तिची चाल हळुवार आहे आणि तिची नजर लाजून हसणारी आहे. मराठी लोकजीवनातील स्त्रीप्रतिमेचं हे सुंदर दर्शन घडवणारं हे गीत.

'विकल मन आज' हे शांताबाईंचे गीत म्हणजे मराठी नाट्यसंगीत परंपरेची उंची अधोरेखित करणारा हा कलात्मक अनुभव. मराठी नाट्यसंगीत परंपरेतील एक अत्यंत भावगर्भ आणि कलात्मक रत्न म्हणजे हे नाट्यपद. शब्दांतून उमटणारी अंतर्मनाची अस्वस्थता आणि संयत विरह शास्त्रशुद्ध संगीतरचनेत अत्यंत सूक्ष्मतेने व्यक्त होतो. 'हे बंध रेशमाचे' या नाटकातील हा प्रसंग. विरहाची हुरहूर आणि न बोलता व्यक्त होणाऱ्या भावनांचा उत्कट आविष्कार घडतो. **राग सरस्वती**च्या आधारावर रचलेलं हे पद. रागामध्ये गांभीर्य, शांतता आणि करुण रसाची छटा प्रकर्षाने जाणवते.

'मनाच्या धुंदीत लहरीत' हे अशाच अंतर्मुख करणाऱ्या भावविश्वात नेणारे गीत आहे. स्वप्नाळू, हळव्या आणि चिंतनशील अवस्थेचे अत्यंत तरल शब्दांत चित्रण केले आहे. भाषेची सौंदर्यपूर्ण मिती आणि जीवनाविषयीची सूक्ष्म जाण प्रकर्षाने जाणवते. अंतर्मनाच्या शांततेत रमण्याचा हा अनुभव आहे. आत्मभान आणि भावनिक सौंदर्य या गीतातून पुन्हा जागे होते. त्याच्या लहरी स्वभावाला आणि शांत आत्मसंवादाला साहित्यात स्थान देणारी ही परंपरा मराठी भाषेची मोठी समृद्धी आहे.

'घन रानी साजणा' हे असे गीत ज्यात शब्दशैली अत्यंत समृद्ध, शुद्ध आणि भावप्रधान आहे .या गीताचे संगीत **श्रीधर फडके** यांनी रचले. 'घन रानी' या प्रतिमेत विरहाची गूढता आणि मनोभावांचा सूक्ष्म रंग उलगडतो. वेदनेचे आणि विस्मृतीचे अद्भुत चित्र रेखाटते. 'घन रानी' ही प्रतिमा म्हणजे अश्रूंची, शोकाची, आणि निराशेची गाढ प्रतिमा आहे, पण तिच्यातून प्रेमाची एक नवी उमेद, एक नवा ध्यासही उमटतो. 'साजणा'ची आठवण, त्याच्या स्मृतींचा ओघ आणि मनाच्या खोल कोपऱ्यातील भावनांचा आवाज ऐकू येतो.

'माजे राणी, माजे मोगा' हे गाणे लता मंगेशकर आणि सुरेश वाडकर यांनी गायले. समुद्रकिनाऱ्याची आणि तिथल्या प्रेमाच्या साध्या पण गोड भावना यांची झलक दिसते. 'राणी' आणि 'मोगा' हे शब्द प्रेमातील गोडजोडीचे, आदर आणि आकर्षणाचे प्रतीक आहेतयातील ल .य, गोडी आणि कोकणी ढंग या गाण्याला एक खास वेगळेपण देतात.

'ही वाट दूर जाते...' मराठी चित्रपटसृष्टीतील एक **अजरामर भावगीत**, ज्याने काळाच्या ओघातही आपली तीव्रता, संवेदना आणि सौंदर्य जतन केले आहे. त्यातील शब्दांच्या प्रत्येक ओळीत **मनाची अंतर्गत वेदना, प्रेमाची उत्कटता आणि आठवणींची गोडी** एकत्र गुंफलेली आहे. या गीतात जी दोन कडवी येतात त्यातील पहिल्या कडव्यात शांताबाई स्थळाचे वर्णन करतात तर दुसऱ्या कडव्यात तिच्या मनाची स्थिती. या गीतातील प्रियतमा आपल्या **स्वप्नातील गावाला भेटायला** निघते. तो गाव जिथे **निसर्गाची रम्य सुषमा, मातीची सुगंध आणि साधेपणातील सौंदर्य** आहे. परंतु त्या वाटेवर केवळ अंतरच नाही, तर **विरहाचाही, अपेक्षेचा, आणि आठवणींचा भार**ही असतो.

'वादलवारं सुटलं गो 'हे गीत कोकणातील कोळीण स्त्रीच्या अंतःकरणातून निघालेला तिच्या **भावविश्वाचा** आवाज. समुद्राच्या उफाळत्या लाटांमध्ये, तिचा पती मासेमारीसाठी दूरगामी प्रवासाला निघतो. भीतीच्या सावलीत आणि आशेच्या किरणात, त्याची वाट पाहतेतिच्या अंतःकरणात . **भीती, आशा, प्रेम आणि धैर्य** असे विविध भाव येतात . सूर, आणि लय यांचा संगम इतका सूक्ष्म आणि मनमोहक आहे की, ऐकणाऱ्याच्या मनात त्या कोळीण स्त्रीची वेदना, तिची श्रद्धा आणि तिचे प्रेम प्रतिध्वनित होते. **निसर्गाच्या विशालतेचा मानवाच्या संवेदनशीलतेशी झालेला मुक्त संवाद** आहे .**निसर्गाच्या प्रचंडतेत मानवी संवेदनेचा सूक्ष्म संवाद** आहे, जो सतत जाणवतो .

'दिसते मजला सुख चित्र नवे' या गाण्याच्या शब्दांत **नववधूच्या मनातील धडधडती आशा** आहे. हे गीत १९७९ साली प्रदर्शित झालेल्या **'अष्टविनायक'** या मराठी चित्रपटातील आहे . नववधूच्या नव्या प्रवासाची, नव्या संसाराची स्वप्न रचना यात येते. हे गाणं आपल्याला अशा एका भावनेच्या प्रवासावर घेऊन जाते, जिथे प्रत्येक क्षणात सुखाच्या रंगांची चमक असते, आणि प्रत्येक स्वप्नात संसाराची सुवर्णनगरी उभी राहते. हे लोकप्रिय गीत सुधीर फडके यांनी संगीतबद्ध केले असून अनुराधा पौडवाल यांनी गायले आहे.

'छेडियल्या तारा' हे गीत म्हणजे एका प्रेमकथेचा नाजूक आणि स्वप्नाळू आरंभ आहे. जणू कोणीतरी रात्रभर ताऱ्यांच्या खेळामध्ये मनाच्या तारांना स्पर्श करतो आणि त्यातून उगम होणाऱ्या प्रेमाच्या लहरींचा गंध आपल्या हृदयात ओततो. या गीतात शब्दांनी जसा प्रकाश पाडला आहे, तसाच संगीताने त्याला जीवदान दिले आहे. वसंतराव देशपांडे यांच्या आवाजात ही प्रेमकथा फक्त गाणं नसून ती एक नाट्यमय अनुभूती बनते. त्यांच्या आवाजातील गोडी, नाजूकपणा आणि अंतर्मनातील त्या अगदी खोल, भावभावांची झुळूक, श्रोत्याला त्या क्षणीच गीतामध्ये गुंतवून टाकते. या गीतामध्ये प्रेमाचे स्वरूप इतके कोमल आणि अदृश्य आहे की, ते ऐकताना मन एकटक झुकतेत्या तारांगणातल्या नाजूक तारांप्रमाणे, प्रेमही सहज आणि मोहकपणे आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणाकडे झेपावते.

'राजा सारंगा' एक असेच गाणे, जे कोळी समाजाच्या जीवनाचा अत्यंत मर्मस्पर्शी अनुभव आपल्या समोर उभा करते. यातील ही कोळीण म्हणजे भीती आणि मायेचा संगम. ती केवळ आपल्या दिराची वाट पाहत नाही, तर त्याला मायेने घरी परतण्याची विनंती करते. शब्दात नसलेला त्याचा प्रत्येक श्वास गाण्याच्या सुरात मिसळतो आणि त्या भावनांना लता मंगेशकर यांच्या सुरात अशी तीव्रता मिळते की, श्रोत्याला थेट त्या कोळीण स्त्रीच्या मनात नेतात. हे गीत मातृभावनेचे स्पंदन आहे.

'रेशमाच्या रेघांनी लाल काळया धाग्यांनी' ही मराठी संगीतसृष्टीतील एक अजरामर लावणी आहे, जिने आपल्या शब्दांनी आणि लयीने श्रोत्यांच्या मनाला अचंबित केले आहे. शांताबाई शेळके यांनी शब्दांची अशी रचना केली आहे की प्रत्येक ओळ जणू जिवंत चित्र उभे करते. प्रेम, उत्साह आणि संस्कृतीचा उगम एका वेदनेत गुंफलेला दिसतो. या लावणीला हृदयनाथ मंगेशकर यांचे संगीत मिळाले आहे, जे शब्दांना उंच भरारी देऊन ती नुसती गाणी नाहीत, तर उत्सवाची उमेद, जीवनाची चपळता आणि भावनांची लय बनवते. ही लावणी आजही तितकीच ताजीतवाणी आहे, कारण तिच्यातील शब्द आणि संगीत आपल्याला नेहमी नव्याने स्पर्श करतात.

'पप्पा सांगा कुणाचे' हे भावगर्भित बालगीत आहे. 1970 साली 'घरकुल' चित्रपटासाठी हे गीत शांता शेळके यांनी रचले. भारतीय कुटुंबसंस्थेतील, नात्यांची पवित्रता, बालस्नेहाची निष्कलंकता आणि घरगुती जीवनातील सादगी या सर्वांचा प्रतीक बनले आहे. ममत्वाचा उबदार स्पर्श आणि कुटुंबातील सुरक्षिततेची भावना अतिशय कोमल आणि प्रभावी शब्दरचनेत उलगडली आहे. या ओळींतील संवादात्मक स्वर केवळ बालकांच्या साध्या भाषेतला खेळ नाही; ते भारतीय संस्कृतीतील नात्यांच्या बंधनाची गहन अनुभूती देणारे वचन आहे. हे गीत प्रेमाचा, विश्वासाचा आणि संस्कारांचा स्थळ असल्याची जाणीव करून देते.

'शूर आम्ही सरदार' हे देशभक्तीपर गीत अनेक पिढ्यांच्या मनावर कोरलेले आहे. सन १९६४ साली प्रदर्शित झालेल्या 'मराठा तितुका मेळवावा 'या चित्रपटासाठी संगीतबद्ध केलेले हे वीररसयुक्त गाणे प्रचंड गाजले. हे एक शौर्य गीत आहे. या गीताचा आशय अतिशय साधा पण गहन आहे. देशासाठी, धर्मासाठी आणि शिवरायासाठी, प्राण अर्पण करण्यास तयार आहे. हे गीत मावळयांच्या जन्मापासून असलेल्या शौर्याची परंपरा सांगते. हे धाडस जेव्हा देशासाठी, धर्मासाठी आणि लोकांच्या सुखासाठी केले जाते त्याला आपण बलिदान म्हणतो.

'हृदयी प्रीत जागते' हे १९६१ सालच्या 'सुवासिनी' या मराठी चित्रपटातील एक अजरामर भावगीत आहे. या गीतामध्ये प्रेमाची गूढ सुरुवात, अंतर्मनात हळुवारपणे जागणारी प्रीत आणि न बोलता व्यक्त होणाऱ्या भावनांची हुरहूर अत्यंत संयमित शब्दांत मांडलेली आहे. उघड शब्दांत प्रेम न सांगता, मनाच्या कोपऱ्यात उमलणाऱ्या भावनांचे चित्रण हे या गीताचे वैशिष्ट्य आहे. प्रेम येथे उग्र नाही, तर शांत, गहिरं आणि अंतर्मुख आहे. हे गीत मानवी

मनातील कोवळ्या भावनांचे प्रतिबिंब आहे. शब्द, स्वर आणि संगीत यांचा सुरेख संगम साधत हे भावगीत श्रोत्याला आत्मिक पातळीवर स्पर्श करते.

'चिंब पावसानं रान झालं' हे भावगीतातील कोमल, सुगंधी आणि रसपूर्ण गीत आहे. पावसाळ्याने न्हाऊन निघालेल्या निसर्गाच्या कुशीत उमलणाऱ्या प्रेमभावनांचा हा हळुवार आविष्कार आहे. ही रचना मातीचा गंध, हिरव्या रानांची ओल, मनात दाटून आलेली प्रणयलहरी यांना शब्दरूप देते. या गीतात निसर्ग केवळ पार्श्वभूमी राहत नाही, तर तोच भावनांचा सहचर बनतो-रान चिंब होते, हे गीत श्रोत्याला क्षणभर वास्तवापासून दूर नेऊन, ओलसर आठवणींच्या आणि भावनांच्या विश्वात रमवते .

मराठी संगीतनाट्याच्या सुवर्णकाळात शब्द, स्वर आणि भाव यांचा जो अद्वितीय संगम घडला, त्यातील एक अत्युच्च कलाकृती म्हणजे 'एकला नयनाला विषय' हे नाट्यगीत. मराठी रंगभूमीचे थोर नाटककार कृ. प्र. खाडीलकर यांनी रचलेले हे गीत, 'स्वयंवर' या अजरामर संगीत नाटकातील एक अत्यंत भावगर्भ प्रसंग अधोरेखित करते. नायकाच्या अंतर्मनातील द्वंद्व, प्रेमाची ओढ, संयमाची मर्यादा आणि नजरेतून व्यक्त होणारी हळवी भावना अत्यंत सूक्ष्मतेने प्रकट होते. ते रसिकाच्या अंतःकरणात उतरून प्रेम, विरह आणि आत्मसंयम यांचा गूढ भाव जागवते.

मराठी संतसाहित्याच्या भक्तीपर परंपरेत संत एकनाथ महाराजांनी रचलेला 'माझे माहेर पंढरी' हा अभंग भक्तीभावनेचा अत्युच्च आविष्कार आहे. या अभंगात पंढरपूर हे केवळ एक तीर्थक्षेत्र न राहता, भक्ताच्या अंतःकरणातील माहेर बनते-जिथे मायेची, आपुलकीची आणि सुरक्षिततेची अनुभूती मिळते. विठ्ठल-रखुमाई यांना आई-वडिलांच्या स्वरूपात पाहत, भक्त आपले संपूर्ण अस्तित्व त्यांच्या चरणी अर्पण करतो. संसाराच्या क्लेशांतून मुक्ती देणारे, जीवनाला अर्थ देणारे असे हे माहेर—पंढरी—भक्तासाठी आनंद, समाधान आणि आध्यात्मिक आधाराचे केंद्र ठरते.

'जे वेड मजला लागले' हे गीत १९६० च्या 'अवघाची संसार' चित्रपटातील एक अत्यंत मधुर आणि भावपूर्ण रोमँटिक युगुलगीत आहे. हे गीत 'प्रेम' या भावनेच्या अंतर्मुख आणि सूक्ष्म अवस्थेचे समर्थ दर्शन घडवते. हे वेड नायक-नायिकेला अस्वस्थ करत नाही, तर त्यांच्या जीवनाला एक अर्थपूर्ण दिशा देते. या गीताचा आशय मुख्यतः प्रेमामुळे झालेल्या भावपरिवर्तनाभोवती फिरतो. प्रेम केल्यानंतर व्यक्तीचे जगणे, विचार करणे आणि भावविश्व पूर्णतः बदलून जाते- हीच भावना गीतातून हळुवारपणे व्यक्त होते. हे गीत प्रणयगीत असले तरी त्यात संयम आणि परिपक्वतेचा सूर जाणवतो. शांताबाई शेळके यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य म्हणजे भावनांचे सूक्ष्म निरीक्षण. या गीतातही त्यांनी प्रेमातील आनंद, ओढ आणि थोडीशी अस्वस्थता यांचे संतुलित चित्र उभे केले आहे. त्यामुळे हे गीत क्षणिक भावनांचे नव्हे, तर आयुष्यभर मनात साठून राहणाऱ्या प्रेमानुभवाचे प्रतीक ठरते. एकूणच, 'जे वेड मजला लागले' हे गीत प्रेमाच्या शांत, सुसंस्कृत आणि अंतर्मुख अभिव्यक्तीचे उत्कृष्ट उदाहरण आहे

'मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश' हे गीत भक्तीच्या भावनेपलीकडे जाऊन ईश्वरसर्वव्यापकत्व आणि शरणागती या दोन मूलभूत आध्यात्मिक संकल्पनांचे सूक्ष्म विवेचन करते. येथे देव हा केवळ पूजेतील प्रतीक न राहता, जीवनप्रवासाचा अखंड साक्षीदार आणि मार्गदर्शक म्हणून उभा राहतो. 'मागे' आणि 'पुढे' या शब्दांमधून भूत, वर्तमान आणि भविष्य या कालपरिमाणांचा संकेत मिळतो. त्यामुळे भक्त भयमुक्त होतो. या गीतातील भक्ती ही मागणी करणारी नाही, तर समर्पणाची आहे. शांताबाई शेळके यांच्या शब्दरचनेतून व्यक्त होणारी भक्ती ही कर्मकांडप्रधान नसून, ती अंतर्मुख आणि अनुभूतीप्रधान आहे. श्रोता ऐकता ऐकता आत्मचिंतनाच्या अवस्थेत प्रवेश करतो. एकूणच, हे गीत भक्तीचे गीत नसून आध्यात्मिक जागृतीचे साधन आहे. 'महानंदा' चित्रपटातील हे गीत.

'मराठी पाऊल पडते पुढे' हे गीत केवळ प्रेरणादायी नसून, मराठी माणसाच्या सांस्कृतिक आत्मभानाचे आणि ऐतिहासिक आत्मविश्वासाचे प्रभावी घोषवाक्य आहे. मराठी समाजाच्या संघर्षशील, प्रगतीशील आणि स्वाभिमानी वृत्तीचे सशक्त प्रतीक ठरते. या गीताचा आशय 'पुढे जाणे' या क्रियाभोवती केंद्रित आहे- परंतु ते पुढे जाणे अंध वेगाचे नाही, तर इतिहासाची जाण ठेवून, मूल्यांची शिदोरी सांभाळत केलेली वाटचाल आहे. हे गीत अस्मितेच्या घोषणेपेक्षा

कर्तृत्वाच्या *संकल्पनेवर* अधिक भर देते. या गीतातील भाषा सुलभ असली, तरी तिचा भावार्थ व्यापक आणि गहन आहे. शब्दरचना ठाम, प्रवाही आणि ओजस्वी असल्याने गीत ऐकणाऱ्याच्या मनात चेतना निर्माण होते. मराठी माणसाच्या मनातील न्यूनगंड दूर करून आत्मविश्वास जागवण्याचे सामर्थ्य या गीतात आहे. म्हणूनच हे गीत वैयक्तिक प्रेरणेसोबतच सामूहिक ऊर्जेचेही स्रोत बनते. 'मराठा तितुका मेळवावा' या चित्रपटासाठी हे गीत लिहिले गेले.

निष्कर्ष-

1. शेळके यांची चित्रपट गीते गेय आहेत. गुणगुणत राहावीत असे वाटते. भावगीतांच्या वाटचालीत, तरुणाईला भुरळ पाडणारी, डौलदार बाजाची अनेक भावगीते रसिकांसमोर आलीशब्द ., संगीत आणि स्वरांच्या बाबतीत ती उच्च दर्जाची ठरली .शांताबाईंची ही गाणी ऐकता ऐकता आपण त्यांच्याशी सहजगत्या एकरूप होतो.
2. लेखनशैली साधी पण प्रभावी आहे. आजही शांताबाईंच्या गाण्यांची लोकप्रियता तितकीच आहे.
3. शेळके यांनी चालीबरहुकूम लेखन केलेले दिसते. त्यांनी हृदयनाथ मंगेशकर, सुधीर फडके या संगीत दिग्दर्शकांबरोबर काम केले होते त्यामुळे त्यांनी दिलेल्या चालींवर अचूक बसतील असे लिखाण शांतबाईनी केले.
4. चित्रपटासाठी शांताबाई शेळके यांनी गीते लिहिली असली तरी आजही ती गीते कालबाह्य झालेली नाहीत. चित्रपट कथा आणि प्रसंग यांना अनुकूल अशी ही चित्रपट गीते आहेत.
5. विविध गीतांमधून शांताबाईंचे अनुभवविश्व प्रगल्भ होत जाते. शेळके यांची लेखणी वैविध्यपूर्ण आहे. ज्या ताकदीने त्या भावगीते लिहितात त्याच ताकदीने त्या शौर्यगीते लिहितात.
6. भावपूर्ण शब्दरचनेतून त्यांच्या गीतांमधून समाजाची नैतिक बैठक अधोरेखित केली आहे, मराठी भाषेचा अभिमान ओतप्रोत भरलेला दिसतो. त्यांची लेखणी लोकसंस्कृती जपते.
7. मराठी साहित्यातील जाणकार कवयित्री असलेल्या आपली छाप चित्रपटातही दाखवली. या गीतांमध्ये अलंकार, प्रतिमा फार कमी दिसतात. स्त्रीविषयक जाणिवा मात्र प्रभावीपणे जाणवतात.
8. शांताबाई कवितेच्या विविध रूपात, विविध लेखनप्रकारात रमलेल्या होत्या.

संदर्भ

1. गणोरकर, प्रभा; डहाके, वसंत, आबाजी आणि अन्य (संपा),संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश (१९२०-२००३), मुंबई, २००४.
2. शेळके शांता, चित्रगीते, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, 1995
3. शेळके शांता, तोच चंद्रमा नभात, सुरेश एजन्सी, पुणे, 2009.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या काव्यातील राष्ट्रीय विचार

प्रा. तृप्ती शंकर नाईक
महाविद्यालयाचे नाव :- सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,उंब्रज
ता. कराड जि.सातारा
मोबाइल नं.:- ९०२१९१६६६९

सारांश (Abstract)

प्रस्तुत शोधनिबंधात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील, विशेषतः 'ग्रामगीता' आणि त्यांच्या भजनांमधील राष्ट्रीय विचारांचा मागोवा घेण्यात आला आहे. महाराजांनी अध्यात्माला राष्ट्रभक्तीची जोड देऊन समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. "देव मंदिरात नसून तो मानवात आहे" हा विचार मांडून त्यांनी राष्ट्रनिर्माणासाठी चारित्र्यसंपन्न नागरिक घडवण्याचे ध्येय ठेवले होते. हा पेपर त्यांच्या काव्यातील सामाजिक समता, श्रमप्रतिष्ठा आणि ग्रामविकासाच्या संकल्पनांचे विश्लेषण करतो.

प्रास्ताविक (Introduction)

संत परंपरा ही महाराष्ट्राची मोठी ताकद आहे, पण तुकडोजी महाराजांनी या परंपरेला 'राष्ट्रीय' स्वरूप दिले. विसाव्या शतकात जेव्हा भारत पारतंत्र्यात होता आणि स्वातंत्र्यानंतर जेव्हा देश नवनिर्माणाच्या टप्प्यावर होता, तेव्हा महाराजांनी आपल्या खंजिरीच्या तालावर क्रांतीची गाणी गायली. त्यांनी केवळ मोक्षाचा मार्ग न सांगता, 'देशाचा विकास' हाच खरा धर्म असल्याचे प्रतिपादन केले. त्यांचे काव्य हे आधुनिक भारताच्या उभारणीचा एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. विसाव्या शतकाच्या प्रथम दशकात विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील यावली खेड्यातील ब्रह्मभाट समाजात राष्ट्रसंत तुकडोजींचा अत्यंत दरिद्री कुटुंबाच जन्म झाला. तुकडोजी महाराजांच्या केवळ अध्यात्मिक व धार्मिक कार्यामुळेच नव्हे तर त्यांच्या सामाजिक व राष्ट्रीय कार्यामुळे ही जनमानस प्रभावित झाले. जन माणसाला प्रभावित करण्याचे मुख्य कारण म्हणजे तुकडोजी महाराजांचे गद्यपद्य वाड.मय होय त्यातही त्यांचे पद्य वाड.मय अधिक प्रभावी ठरले याचे कारण त्यांची उत्कट काव्यरचना आणि संगीता शास्त्राची जाण हे होय तुकडोजी महाराज हे संत कवी होते तसेच ते गायक व खंजेरी वादक होते तुकडोजी महाराज चांदूर बाजारच्या भारतीय बुवांकडून संगीत शिकले. सातळीकोतळीकरांनी दिलेल्या एकतारीवर भजने गायला शिकले हनवती बुवांकडून खंजिरी वाजवायला शिकले. तुकडोजी जातीने ब्रह्मभाट होते. त्यावेळी 'कबित्त गाणे' हा जातीचा व्यवसाय असे 'कबित्त' म्हणजे थोरामोठ्यांची काव्यमय स्तुती! तुकडोजींच्या गीतकाव्याचे बीजे त्यांच्या 'कबित्त' गाण्यात आहेत. सुरुवातीस तुकडोजी महाराजांनी तुकारामांची अभंग गाथा गात. एके दिवशी तुकडोजींचे गुरु आडकोजी त्यांना म्हणाले' 'अरे असे 'तुका म्हणे' 'तुका म्हणे' किती दिवस म्हणशील? आता 'तुकड्या म्हणे' असे म्हणत जा, गुरु आज्ञा प्रमाण मानून तुकडोजींनी काव्यरचनेला प्रारंभ केला.

आशय (Key Highlights)

अंधश्रद्धा निर्मूलन: राष्ट्र संत तुकडोजी महाराजांनी धर्मातील कर्मकांडांना विरोध केला. त्यांच्या मते, विज्ञानाची जोड असलेला धर्मच राष्ट्राला पुढे नेऊ शकतो.

स्त्री शक्तीचा जागर: "स्त्री ही घराची शोभा नसून ती राष्ट्राची निर्माती आहे," असे सांगून त्यांनी महिलांच्या शिक्षणावर आणि सन्मानावर भर दिला. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून तो 'ग्रामराज्य ते राष्ट्रराज्य' प्रवासाचा मार्गदर्शक आहे

स्वदेशी आणि स्वावलंबन: गांधीजींच्या विचारांप्रमाणेच महाराजांनीही स्वदेशीचा पुरस्कार केला, जेणेकरून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल.

• **काव्यातील राष्ट्रीय विश्लेषण** :-

१) राष्ट्रीय एकात्मता आणि जातिभेद निर्मूलन :-

महाराजांच्या मते, जोपर्यंत समाज जातीपातीत विभागलेला आहे, तोपर्यंत राष्ट्र बलवान होऊ शकत नाही.

वचन: "भेद विसरुनि जावे आपण । हेचि आमचे अंतिम लक्षण ॥
जाति-धर्म हे केवळ वेष । माणुसकी हा एकचि देश ॥"

विश्लेषण: त्यांनी वैश्विक माणुसकीचा पुरस्कार केला. राष्ट्राच्या प्रगतीसाठी आंतरिक कलह मिटवून सर्व नागरिकांनी एका सूत्रात बांधले जाणे आवश्यक आहे, हा त्यांचा मुख्य विचार होता.

२) ग्रामविकास हाच राष्ट्रविकास:-

खेड्यांचा विकास झाल्याशिवाय राष्ट्र समृद्ध होणार नाही, ही त्यांची ठाम धारणा होती.

वचन: "गावाहुनि निराळे राष्ट्र नाही । गाव तेचि राष्ट्राची देही ॥
गाव सुखी तर राष्ट्र सुखी । गाव दुःखी तर राष्ट्र दुःखी ॥"

विश्लेषण: त्यांनी गावाला राष्ट्राचे 'हृदय' मानले. ग्रामस्वच्छता, ग्रामोद्योग आणि ग्रामशिक्षण या त्रिसूत्रीद्वारे राष्ट्र स्वयंपूर्ण करण्याचा संदेश त्यांनी दिला.

३) श्रमप्रतिष्ठा आणि तरुण पिढी:

आळस हा राष्ट्राचा शत्रू आहे, असे ते मानत.

वचन: "आळस हा शत्रू असे मोठा । तोची लावी राष्ट्राला तोटा ॥
प्रयत्नाविण भाग्य न उघडेल । रिकाम्या हाताने देश बुडेल ॥"

विश्लेषण: तरुणांनी केवळ पदव्या न घेता हाताला काम देऊन उत्पादक कार्य करावे, तरच देश आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होईल, हा त्यांचा आर्थिक राष्ट्रवाद होता.

४) समाजप्रबोधन

'अभंग गाथा' या ग्रंथात २१०९ अभंग असून लहान व मोठा अभंग हे दोन्ही वृत्त प्रकार आहेत. अभंगाव्यतिरिक्त दुसरा संत काव्यप्रकार म्हणजे 'भजन' तुकडोजींनी विसाव्या शतकात कोणत्याही संत कवीपेक्षा अधिक भजने रचलेली असून त्यांची ११६० भजने एक 'अनुभव सागर' भजनावली भाग एक व 'दोन दिव्य दर्शन भजनावली','विवेक माधुरी, ज्ञानकुंज, क्रांती विणा, नवजागृती, जीवनजागृती, राष्ट्रीय भजनावली, या काव्यसंग्रहात समाविष्ट आहेत.

वचन:- मुलांस विविध उच्च ज्ञान द्यावे । तैसेची मुलींनाही शिकवावे ।
हेळसांठ करू नये हे जाणावे। समाजाने ॥ १

विश्लेषण:- सामाजिक समता निर्माण व्हावी फक्त मुलांना शिक्षण देऊन देशाचा विकास होणार नाही, तर मुलींनाही बरोबरीने शिक्षण द्यावे असे संत तुकोडोजी महाराजांना वाटते.

राष्ट्रसंत तुकडोजींनी लिहिलेल्या ग्रंथ 'शिरोमणी ग्रामगीता' या हा ओवीवृत्तातील ४६७५ ओव्यांचा ग्रंथ समाज प्रबोधनाचे प्रयोजन दृष्टि समोर ठेवून लिहिण्यात आलेला आहे. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून तो 'ग्रामराज्य ते राष्ट्रराज्य' प्रवासाचा मार्गदर्शक आहे. संत तुकडोजी महाराज यांच्या काव्यातील मानवतेचा विचार 'धर्म संमेलन म्हणजे त्याग', केवळ भाषण देणे नव्हे, असे राष्ट्रसंत जेव्हा म्हणतात तेव्हा त्यांच्या विचारातील वागण्यातील स्पष्टता आचारातील शुद्धता दिसून येते आजवर धर्माच्या नावावर आवाज उठवण्याच्या महापुरुषांच्या हृदयात पावित्र होते, चारित्र्य शुद्ध होते ,आत्मबल विश्वसेवा आणि शुद्ध प्रेम होते, एक सच्चेपणा होता, म्हणूनच ते अमर झाले त्याच धर्माचे पालन करण्यासाठी प्रगती करण्यासाठी परमेश्वराला राष्ट्रसंत सामर्थ्य मागतात. त्यातून त्यांची विश्व कल्याणाची आस व्यक्त होते.

५) मानवता :-

जपानमध्ये राष्ट्रसंत आणि विश्वधर्म परिषदेतील काही प्रमुख प्रातिनिधींची व युवक-युवतींची संवाद भाषणे झालीत तेव्हा या विदेशीयांचे राष्ट्रसंतांनी शंका समाधान केले. राष्ट्रसंताने या विश्वालाच एक ग्रंथ मांडले होते. निसर्ग व नैसर्गिक सत्याचा अभ्यास करत असताना त्यांचे विश्वधर्म विषयक विचार बनत गेले, खऱ्या अर्थाने त्यांनी 'माणसे' वाचलीत. प्रत्येक माणसाच्या मनात शिरून त्यांच्या हृदयाला स्पर्श करून आत्मतत्त्व सत्य शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. विश्वातील प्रत्येक वस्तूला स्वतंत्र अस्तित्व आहे, मूल्य आहे, तेव्हा त्याचा यथोचित आदर करून त्याची श्रेष्ठता

अंगीकारतच विश्व कुटुंब बनवायचे आहे, विश्वधर्म पाळायचा आहे. फक्त त्यासाठी गरज आहे ती माणसाच्या अंतकरणाला स्पर्श करण्याची. प्रत्येक तत्त्वाच्या खोलवर पोहोचून त्याच्या मूल स्वरूपाचे दर्शनच सर्व अनुभवाचे उगमस्थान आहे. विश्व धर्माचा पाया याच अनुभवावर आधारित आहे. हाच धागा घेऊन गुरुदेव सेवा मंडळ विविध सेवा कार्य करून विश्वधर्म मजबूत करतात.

वचन:- " या भारतात बंधुभाव नीती वसू दे – दे वरची असा दे
हे सर्व पंथ- संप्रदाय एक दिसू दे- मतभेद नसू दे" २

विश्लेषण:- 'प्रत्येक मनुष्य जर मनुष्यधर्म, कुटुंब वर्ग, समाज धर्म, देश धर्म, विश्व धर्माचे पालन करीत असेल तर तो मानव धर्माचे पालन करीत असतो. तो मानवतेचा खरा पुजारी होय. प्रत्येक व्यक्तीच्या अंत:करणात मानवतेचा झरा वाहू लागला तर विश्वधर्म स्थापन होऊन संपूर्ण विश्व हे कुटुंबच होईल हा राष्ट्रसंतांचा विचार मननीय वाटतो.

'भारतात पंथ, धर्माचे असंख्य तुकडे आहेत असे मी ऐकतो. ते खरे असेल तर त्यांच्या गोंधळामुळे भारताच्या जीवनात अंदाधुंदी माजत नाही का?' असा प्रश्न जेव्हा एका जपानी युवकाने राष्ट्रसंतांना विचारले तेव्हा 'त्याने भारताचे जीवन संकटात पडू शकत नाही. कारण ते सर्व राष्ट्रोन्नतीच्या आड न येता राष्ट्रीय कार्यासाठी उच्च राष्ट्रीय भावनेने प्रसंगी एक होतात.

"प्रत्येक राष्ट्राने स्वातंत्र्य, समता, बंधुता, या मूल्यांची अंमलबजावणी केली, परस्पर सहकार्याची भावना ठेवली, तर तिसरे महायुद्ध होण्याची शक्यता नाही," असे संत तुकडोजी ठामपणे सांगतात. सन १९४२ पर्यंत तुकडोजीनी समाज जागृतीचे अतुलनीय काम केले. आपल्या अखंड भ्रमंतीतून लोकसंग्रह केला. पारतंत्र्यात पिचत पडलेला समाजाला नवी जाग आणली, 'नवी जाणीव निर्माण केली.' स्वातंत्र्याच्या नवा आकाशाकडे बोट दाखवत तुकडोजी म्हणाले-

'चल उठ गड्या, झोप सोड आपुली ।
हे पेटले चहुकडे आग लागली ॥'

अशा आर्त किंकाळीने लोकांना जागे केले. एवढेच नव्हे तर भारताच्या उज्ज्वल परंपरेची आठवण करून लोकमत प्रबोधित केले. ते म्हणाले-

'प्यारा हिंदुस्तान है, गोपालों की शान है ।
वीरोंका मैदान है, उसमें भक्तो की भगवान है ॥

अशा शब्दातून जन-जीवनाच्या प्रदेशात स्वातंत्र्य प्राप्तीविषयीचे नवे क्षितिज निर्माण केले. इतकेच नव्हे तर जुलमी ब्रिटिश सरकार ला इशारा देताना ते म्हणाले-

झाड-झडुले शस्त्र बनेंगे । भक्त बनेगी सेना ॥
पत्थर सारे बम्ब बनेगे ॥ नाव लगेगी किनारे ॥

निष्कर्ष (Conclusion)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या काव्यातील राष्ट्रीय विचार हे केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित नव्हते, तर ते आजही तितकेच सुसंगत आहेत. त्यांनी 'भक्ती'चे रूपांतर 'देशभक्ती'त केले. त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू हा 'सामुदायिक प्रार्थना' आणि 'सामुदायिक कृती' हा होता. जेव्हा देशातील प्रत्येक गाव आत्मनिर्भर आणि प्रत्येक नागरिक चारित्र्यवान होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने तुकडोजी महाराजांचे 'सुजलाम सुफलाम' भारताचे स्वप्न पूर्ण होईल.

संदर्भ ग्रंथसूची :-

१. ग्रामगीता:- संपदक स्व.सुदाम सावरकर महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,प्रभादेवी, मुंबई आवृती २०१६, पृष्ठ क्रं २२०
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ-संपादक प्राचार्य रा.तु.भगत सहसंपादक:- डॉ.सुभाष सावरकर चैतन्य प्रकाशन,१७५८,ए वर्ड, अनिरुध्द अपार्टमेंट,सकोळी कॉर्नर,कोल्हापूर आवृती २ ऑक्टोबर २००९, पृष्ठ क्रं ६५
३. राष्ट्रसंताचे जीवनदर्शन (पूर्वार्ध) – सुदाम सावरकर, कला प्रकाशन. अमरावती,१९५४
४. राष्ट्रसंत तुकडोजी:- समग्र साहीत्य-डॉ.कुमुदींनी खोरगडे , प्रका रामचंद्र खोरगडे,बुटी प्लॉट,अमरावती
५. मानवतेचे महापुजारी:- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – प्रा. रघुनाथ कडवे, संस्कार प्रकाशन , नागपूर२००६
६. राष्ट्रसंत आणि ग्रामगीता – डॉ.सुभाष सावरकर, मराठी जनसाहीत्य प्रकाशन,अमरावती,ऑक्टोबर २०००

मराठी कादंबरीचा सांस्कृतिक पार्श्वभूमीवर अभ्यास (इस १८०० ते १९२०)

डॉ. लक्ष्मण सर्जेराव शिंदे
लोकनेते प्रा. शरद पाटील महाविद्यालय मिरज

प्रस्तावना, उद्देश,गृहितक :- मराठी कादंबरीला आजमितीला जवळपास दिडशे वर्षांची परंपरा लाभली आहे. या दिडशे वर्षांत ती बदलत गेलेल्या सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमीवर बदलत गेलेली दिसते. प्रस्तुत संशोधनाचा विषय सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमीवर मराठी कादंबरीचा अभ्यास करणे असा आहे. त्यामुळे मराठी कादंबरी उगमापासून आजपर्यंत सांस्कृतिक पर्यावरणाच्या पार्श्वभूमीवर कसकसी बदलत गेली हे अभ्यासणे महत्त्वपूर्ण वाटते. इस १८०० ते १९२० या काळातील सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमीवर मराठी कादंबरीचा अभ्यास या निबंधात केला आहे.

विषय विवेचन :- इ.स.१८१८ साली पेशवाईचा अस्त झाला.इंग्रजी अंमल सुरू झाला. या नव्या संस्कृतीचा महाराष्ट्रीय संस्कृतीशी संबंध आला. तो कादंबरीच्या सांस्कृतिक पर्यावरणातील निर्मितीच्या संबंधात अत्यंत महत्वाचा आहे.भालचंद्र नेमाडे यांनी या काळाबद्दल म्हटले आहे की, "१९ व्या शतकात अस्वस्थ प्रयत्नवादी आंग्लसंस्कृतीशी स्वस्थ चिंतनशील हिंदू संस्कृतिच्या झालेल्या संयोगातून जे महत्त्वाचे सांस्कृतिक व्यवहार निर्माण झाले.त्यापैकी गद्यवाङ्मय हा एक होय"[१] म्हणजेच नवी संस्कृती ऐहिक होती.

त्यातून येणारे नवे अनुभव अभिव्यक्त करण्यास प्राचीन वाङ्मयाचे प्रकार अपुरे पडू लागले.त्यामुळे नव्या सांस्कृतिक जीवनाची सुरवात झाली.वाङ्मयालाही अपरिहार्यपणे नवे वळण मिळाले. इंगजी राजवटीचे स्वरूप केवळ व्यापारी वा केवळ राजकीय नव्हते. तर ते सांस्कृतिकही होते. नवी शासनव्यवस्था, नवी शिक्षणव्यवस्था, मुद्रणालये, ग्रंथप्रसार, वृत्तपत्र, ख्रिस्ती धर्मप्रसार, त्यावरील इथल्या लोकांच्या प्रतिक्रिया या सर्व सांस्कृतिक वातावरणातून नवे सांस्कृतिक पर्यावरण घडत गेले. जीवनाच्या सर्व अंगांकडे लोक नव्या दृष्टीकोनातून पाहू लागले.गो.म.कलुकर्णी म्हणतात, "राजकीय क्रांतीबरोबर एक प्रचंड मानसिक क्रांती येथे घडून आली."[२] या पर्यावरणाचा वाङ्मयनिर्मितीवर परिणाम झाला. हरिश्चंद्र थोरात यांनी शिक्षण व्यवस्थेचा आणि मुद्रणव्यवस्थेचा संबंध कादंबरीच्या निर्मितीशी जोडलेला आहे.[३] म्हणजे युरोपीय लोकांच्या संपर्कातून कादंबरी हा वाङ्मयप्रकार मराठीला परिचयचा झाला असे म्हणता येते.

अर्थात युरोपीय संपर्काशिवायही कादंबरीलेखनाची पूर्वतयारी पूर्ण झाल्याने कादंबरी मराठीत निर्माण झाली असती. अशी अनेक मते मांडली गेलेली आहेत. नरहर कुरूंदकर या संदर्भात म्हणतात, "मराठी कथावाङ्मय पंचतंत्र, इसापनीती, सिंहासनबत्तीशी या अवस्थेपासून कादंबरी या अवस्थेपर्यंत येण्यास फार वर्षे लागली नाहीत.सुमारे चाळीस वर्षात हा प्रवास आटोपला आहे"[४] कुरूंदकरांचे हे मत या काळातील कादंबरीचा अभ्यास केल्यानंतर इथल्या मुळच्या कथनपरंपरेशी व सांस्कृतिक परंपरेशी कादंबरीचा थोडातरी सबंध आहे असे म्हणता येते. मराठी कादंबरीला या मुळच्या परंपरामुळे स्वत:चा चेहरा मिळाला इतकेच म्हणता येईल. परंतु मराठी कादंबरीच्या निर्मितीसाठी पाश्चात्य संपर्क हेच जनक कारण असल्याचे जवळपास मान्य झाले आहे.श्री.कृ. कोल्हटकरांनी इंग्रजी राजवट, त्या राजवटीचे इथे झालेले परिणाम,तिच्यामुळे झालेला ज्ञानप्रसार, मुद्रणव्यवस्था , इथली चळवळ, इतर भाषांतील साहित्याचे प्रभाव या सर्व बाबींचा विचार कादंबरीच्या अनुषंगाने केलेला आहे.[५] वि.सी.सरवटे यांचे मतही लक्षात घेण्यासारखे आहे ते म्हणतात, "संस्कृताशिवाय फारसी व विशेषत: इंग्रजी वाङ्मयाचे मराठी लेखकांना भांडार या काळात उपलब्ध झाले व त्यांच्या सहाय्याने व उदाहरणाने मराठीत नाटकांप्रमाणेच लहानलहान गोष्टी व कादंबऱ्यांच्या संख्येंत भर पडण्यास सूरवात झाली."[६]

काही अभ्यासक हरी केशवजी यांची 'यात्रीकक्रमण'(१८४१) ही कादंबरी मानतात. तसे मानले तर मराठीतील पहिलीच भाषांतरित कादंबरी ठरते. असे असेल तर इंग्रजी कादंबरीशी असणारे मराठी कादंबरीचे नाते स्पष्ट होते. तत्कालीन राजकीय घडामोडी आणि इंग्रजांचा संस्कृती संपर्क यामुळे मराठी कादंबरीने आपली प्राचीन परंपरा सोडून इंग्रजी वळणाची कादंबरी लिहिण्यास सुरवात केली.नेमाडेंचे याबाबतचे मत पाहण्यासारखे आहे. ते म्हणतात, "लिळाचरित्र,स्मृतिस्थळ,बखरी, महिपतीकृत चरित्रे हे रचनाप्रकार कादंबरीशी जुळणारेच आहेत,परंतु आपल्या कादंबरीकारांनी अनुकरणाने रूढ केली तीच कादंबरी असा अंधविचार पुढे येऊन तीन पिढया त्यातच गेल्या"[७] **सारांश ब्रिटीशांच्या सत्तास्थापनेनंतर इंग्रजी भाषा आणि पाश्चात्य विद्येचे अध्ययन सुरू झाले.यामुळे महाराष्ट्रीयांच्या स्वतंत्र आस्तित्वाला आणि विचाराला फारसा थारा उरला नाही. यातच इंग्रजी शिकलेल्यांची जी पिढी तयार झाली त्या**

पिढीने गद्यलेखनास प्रारंभ केला. परंतु हे लेखन इंग्रजी धर्तीचे असल्याने मराठी गद्याची परंपरा खंडीत झाली. या पिढीने एका बाजूने इंग्रजी कादंबरीचा आणि दुसऱ्या बाजूने संस्कृतचा प्रभाव स्विकारून कादंबरी लिहिली. पंडिती काव्याच्या लोकप्रियतेची भर घालण्यास हे कादंबरीकार विसरले नाहीत. आकृतीबंध मात्र इंग्रजी वळणाचे होते असे सुरवातीच्या कादंबरीबद्दल म्हणता येते.

१८०० ते १८७४ या कालखंडाला भाषांतराचा कालखंड म्हटले जाते. स्वतंत्र ग्रंथनिर्मितीपेक्षा या काळात भाषांतरे जास्त झाली. ग्रंथमुद्रण,ग्रंथप्रकाशन नियतकालिके, वर्तमानपत्रे या सारख्या माध्यमातून गद्याचे नवे नमुने पुढे येऊ लागले. वास्तवाशी संबंधीत असल्याने या नव्या नमुन्यांचा कादंबरीने उपयोग करून घेतला. तत्कालीन लोकांच्या सामाजिक जीवनातील घडामोडी या नव्या गद्यातून मांडल्या जाऊ लागल्या. या सर्वांचा प्रभाव मराठी कादंबरीवर पडलेला दिसतो. इंग्रजी शिक्षणव्यवस्थेमुळे या ज्ञानाचा वेगाने प्रसार झाला. शीकलेली ऐतद्देशियांची पहिली पिढी तयार झाली. भोवतालच्या पर्यावरणातून नवा वाचक तयार झाला. जो वाचक समुहापासून तुटलेला एकाकी व पारंपरिक विचारप्रभावातून बाहेर पडलेला होता. पहिली पिढी गद्य लिहू लागली. तेंव्हा हा नवा वाचक कादंबरी निर्मात्यांच्या दृष्टीने महत्वाचा होता. या नव्या वाचकाला कल्पना प्रिय होत्या. परंतु बदलते वास्तव त्याला या कल्पनेतून पहावसे वाटत होते. या दोन्ही बाबींचा प्रत्यय मराठीतील सुरुवातीच्या कादंबऱ्यांमध्ये येतो.

प्राचीन वाङमयामध्ये कथानकामधील घटना असंभाव्य असत. नव्याने निर्माण होत असलेल्या कादंबऱ्यांमध्ये वास्तव जीवन कथानक म्हणून कादंबरीने स्विकारले त्यामुळे तीमधील घटना वैशिष्टयपूर्ण,स्वतंत्र, कथानकाला पुढे नेणाऱ्या येऊ लागल्या.उत्सुकता ताणून धरली जाऊ लागलेली दिसते. इंग्रजी संस्कृतिच्या संपर्कामुळे कथानकाचे स्वरूप अंतर्बाह्य बदलेले दिसते.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अद्‌भुतरम्य साहित्याची निर्मीती मोठया प्रमाणावर झालेली दिसते. त्या काळातील अद्‌भुताच्या अभिरूचीची मिमांसा करताना अ.ना.देशपांडे म्हणतात, "अद्‌भुताची आवड ही त्या वेळच्या मराठी समाजाच्या सांस्कृतिक बाल्यावस्थेची दुसरी सूचक गोष्ट त्यावेळची महाराष्ट्राची एकंदर सामाजिक आणि राजकीय परिस्थीती ही अद्‌भुताच्याच अभिरूचीला अनुकूल झालेली होती.तत्कालीन मिळमिळीत जीवनात काल्पनिक कथांच्या आश्रयाने अद्‌भूताचा अंश आणू पहाणाऱ्या अद्‌भुतरम्य कादंबऱ्यांची मागणी होऊ लागली."[८] या मतावरून नव्या वाचकात अद्‌भुताची ओढ निर्माण झाली होती,असे म्हणता येते.

इंग्रजीतील ज्या कादंबऱ्यांचे अनुकरण मराठीत केले गेले, त्यांचा दर्जा सामान्य होता. लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी १८६१ मध्ये मुक्तामाला,पुढे रत्नप्रभा कादंबऱ्यांमधून मराठी लोकांची लोकप्रियता प्रमाण मानली. सुरुवातीच्या काळातही मुक्तामालाप्रवृत्ती प्रबळ दिसते.त्यामुळे वास्तववादाचा विकास झाला नाही.वास्तव जीवनाला बगल देऊन रंजनवादी कादंबऱ्या मोठया प्रमाणावर निर्माण झालेल्या दिसतात. या कादंबऱ्यांना भरपूर वाचकवर्ग मिळाला. रिसबुड,गुंजीकर, पारखी यांसारख्या लेखकांनी अशा कल्पनेवर आधारीत कादंबऱ्या लिहिल्या.

कादंबरी म्हणजे व्यक्तीप्रधान कथानक आणि तेही परदेशी मूल्यचौकटीत अशी चुकीची धारणा निर्माण झाली. त्यामुळे तत्कालीन कादंबरीकार समाजिक संदर्भ वगळून व्यक्तीभोवतीच फिरणारी कृत्रीम कथानके निर्माण करण्यात गुंतले. पलायनवाद,स्वप्नरंजन, अद्‌भुत वातावरणाची निर्मिती यातच सुरवातीची कादंबरी गुरफटली, मुक्तामाला सारख्या सुरवातीच्या कादंबऱ्यांमधून संस्कृतमधील आर्ष काव्यांच्या वर्णन शैलीचा संस्कार उचलेलला दिसतो. **एकूणच मराठीत सुरवातीला अदभुतरम्य,रंजनपर कथा म्हणजे कादंबरी असे स्वरुप असल्याचे दिसते. तत्कालीन पर्यावरणास पोषक अशी नायिकांची, प्रेम-विरहांची वर्णने या कादंबऱ्यांतून आढळतात.**

मराठी कादंबरीत सुरवातीपासून वास्तवापेक्षा कल्पिताचे पारडे जड झाले आहे. त्याला कारण नव्या इंग्रजी राजवटीतील स्वातंत्र्य, संमता, व्यक्तिविकास इ.मूल्ये हे प्रत्यक्षात फार दूर होती. तशी समाजिक, आर्थिक, परिस्थिती त्या काळात इथे नव्हती. श्री.का.बा.मराठे यांनी या प्रकारच्या कादंबऱ्यांवर १८७२ मध्ये सणसणीत टीका केली. या प्रकाराच्या कादंबरीलेखनाला 'कीड' असे संबोधले. मराठे यांनी या निबंधात वास्तववादाचा पूरस्कार करून मराठी कादंबरीकारांनी डिकन्स, स्कॉट यांचा आदर्श समोर ठेवावा असे म्हटले.[९] तत्कालीन अभिरूची संपन्न व्यक्तीची कादंबरी वाङ्मयाकडून काय अपेक्षा होती? हे यावरून स्पष्ट होते. वि.का.राजवाडेही या प्रकारच्या कांदबऱ्यांचा वाचकवर्ग बडे,सुखवस्तू पेढी, खुशालचंद आणि निष्काम लोक असतात असे म्हटले आहे. तसेच १८४० ते १८६० पर्यंतचा समाजच कींकर्तन्यमुढ असल्याने त्या काळातील कादंबरीही आत्मलीन असल्याचे निरीक्षण नोंदविले आहे. राजवाडे म्हणतात. "इंग्रजी कादंबरीतील अत्यंत रद्दड असा जो रोनोल्डस त्याच्या भिकार कादंबऱ्याचा आस्वाद घेणारे हरीचे

लाल आपल्याकडे पुष्कळ !"[१०] राजवाडे किंवा मराठेंची ही मते पहाता इथली समीक्षाही इंग्रजी कादंबरीच्या प्रभावाखालीच लिहिली जात होती, असे म्हणता येते.

इंग्रजी राजवटीच्या १८१८ ते १८७४ या काळाची चर्चा आपण करत आहोत. इंग्रजांच्या एकछत्री अंमलामुळे आणि त्यांनी घडवून आणलेल्या भौतिक सुधारणांमुळे ऐतद्देशियांतील निरनिराळे वर्ग, समूह एकत्र येऊन विचारविनिमय करू लागले. यातूनच राष्ट्रवादाची जाणीव वाढू लागली.त्यातूनच रम्य भुतकाळाकडे वळणारी प्रवृत्ती वाढू लागली.यालाच नेमाडेंनी स्वदेशीवादी प्रेरणा असे म्हटले आहे.या काळातील राष्ट्रीय भावनेच्या वातावरणाने ऐतिहासिक कादंबऱ्या निर्माण झाल्या. रा.भी.गुंजीकरांची 'मोचनगड' (१८७१) ही शिवकाळावरील कादंबरी याचेच उदाहरण होय. ऐतिहासिक वाङ्मयाची निर्मिती हे या काळातील वाङ्मयाचे वैशिष्टये होते. इतिहासाकडे पाहण्याची ही नवी जाणीव गुंजीकराप्रमाणेच हरिभाऊंनाही होती.त्यामुळे त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतून 'व्यक्ती'पेक्षा त्या ज्या कालखंडात वावरल्या त्या कालखंडाला पुनरूज्जीवीत केले गेलेले दिसते. हरिभाऊंनी १८९० ला 'उष:काल' आणि पुढे २० वर्षात 'केवळ स्वराज्यासाठी', 'गड आला पण सिंह गेला', 'मध्यान्ह' 'सुर्योदय', 'सुर्यग्रहण इ. कादंबऱ्यांतून शिवशाहीचे कथामय स्मारकच उभारले. प्राचीन भारत व राजपुत्रांच्या इतिहासावर लिहिल्या गेलेल्या हरिभाऊंच्या 'रूपनगरची राज्यकन्या', 'चंद्रगुप्ता', 'कालकुट' या कादंबऱ्या याचेच उदाहरण आहेत. ना.ह.आपटे (अजिंक्यतारा, लांच्छित, चंद्रमा, रजपुतांचा भीष्म, संधीकाल) तसेच नाथमाधव (तरूण रजपूत सरदार, सावळया तांडेल,स्वराज्यमाला)इ.मध्येही पूर्वजांच्या पराक्रमाविषयी अभिमान दिसून येतो. वि.वा.हडपांनी कादंबरीमय पेशवाई मध्ये तेव्हाच महाराष्ट्र आजच्या महाराष्ट्रापुढे आदर्श म्हणून उभा करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. **एकूणच पारतंत्र्याच्या काळात प्रिय असणारी ही भावना या ऐतिहासिक कादंबऱ्यांतून प्रकटली आहे.**

१८५१ साली 'दक्षिणा प्राईज कमिटी' मराठी ग्रथांना प्रेरणा देण्यासाठी स्थापन झाली. पुढे १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. इंग्रजी संस्कृतिच्या संपर्कामुळे नवशिक्षित हिंदू पिढीला 'स्व'समाजातील मागासलेपण दिसू लागले. ब्रम्होसमाज (१८२८), परमहंससभा (१८४९) ,प्रार्थनासमाज (१८६७) ,आर्यसमाज (१८७५) इ. विविध सुधारणावादी पंथ निर्माण झाले.जोतिबा फुले यांची स्त्रिया व शूद्रातिशूद्र यांच्यासाठीची चळवळही याच काळात सुरू होती. पहिल्या मुलींच्या शाळेबरोबरच पुढे १८७३ साली स्थापन झालेला त्यांचा 'सत्यशोधक समाज'महत्वाचा आहे. १८७८ साली फुल्यांनी मराठी ग्रंथकार सभेस त्यांची उद्दिष्टे बहुजनसमाजाशी संबंधीत नसल्याने तेथे उपस्थीत राहण्यास नकार दिला. ही एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक घटना होती

सदा कऱ्हाडे यांच्या मते या काळात भावनेपेक्षा बुध्दीवर, संश्लेषणावर आणि अध्यात्मिक चर्चेपेक्षा भौतिक घडामोडीवर भर दिला जाऊ लागला. समाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीचा विचार होऊ लागला.[११] हे प्रबोधनयुग महाराष्ट्राचे 'रेनिसान्स' म्हणून ओळखले जाते.यातून झालेली नवी मूल्यव्यवस्था इंग्रजी संस्कृतीशी आलेल्या संपर्कामुळे निर्माण झाली होती.तिचे सूत्र मानवतेशी होते. 'व्यक्तीस्वातंत्र्य' या स्वातंत्र्याला विरोध होत असेल तर विरोध करण्याची जाणीव निर्माण होऊ लागली. एकूणच समाज व व्यक्तीचे संबंध या काळात नव्या पायावर तयार होऊ लागले. कादंबरीच्या दृष्टीने हे महत्त्वाचे होते. विज्ञान व बुध्दीप्रमाण्यवाद महत्वाचा ठरू लागला. इंग्रजी राजवटीमुळे आलेल्या या व्यक्तिवादी मूल्यव्यवस्थेमुळे इथल्या लोकांची मने तळापासून ढवळून निघाली.याचा लोकांच्या मानसिकतेवर प्रभाव पडला.मराठी कादंबरी या आधुनिक मूल्यव्यस्थेचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष दर्शन घडविताना दिसते.

या संदर्भात हरीश्चंद्र थोरात म्हणतात,"प्रारंभापासून ती लौकीक विषयांकडे वळू पाहत आहे. तिच्यामधून समतेचे तत्वज्ञान मांडले जाते आहे. बदलत्या पारंपरिक आधार सुटलेल्या, आधुनिक जगातील मानवाचे आयुष्य तिच्या लेखी महत्त्वाचे ठरते आहे."[१२]

ख्रिस्ती चळवळीमुळे जुन्या शास्त्र,वचने, साहित्याचे नव्याने मंथन चालू झाले. जुन्या विचारांची चौकट मोडावीसी वाटू लागली. धर्मजिज्ञासा निर्माण झाली. लोकहीतवादी, म.गो.रानडे, जोतिबा फुले यांनी स्वतंत्र लेखन या काळात केले.वाचनाची अभिरूची निर्माण झाली. प्रचार,बोध याबरोबरच वाङ्मयाकडून रंजनही होऊ लागले. युरोपातील प्रबोधनाचा परिचय एतद्देशीय सुशिक्षीतांना झाला.त्यामुळे नवविचारचक्र सुरू झाले. सनातनी विरूध्द सुधारक, सुशिक्षित विरूध्द अशिक्षित, ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर, ख्रिस्ती-ख्रिस्तेतर, राज्यकर्ते विरूध्द प्रजा अशी द्वंद्वात्मकता सुध्दा निर्माण झाली. अर्थात काही अंतर्विरोधही निर्माण झाले.

या काळातील वाङ्मयातील वातावरणाबद्दल भालचंद्र फडके यांचे निरीक्षण महत्त्वाचे आहे. ते म्हणतात,"अव्वल इंग्रजीनंतर प्रबोधनाच्या प्रेरणेचा प्रभाव वाङ्मयाच्या सर्व क्षेत्रात दिसून यायला लागला. वाङ्मयप्रकार रंजन व बोध या दोन उद्दीष्टांचा संगम करू लागले..."[१३]

उपरोक्त सांस्कृतिक पर्यावरणात बाबा पद्मणजींची 'यमुनापर्यटन'(१८५७) ही पहिली मराठीतील स्वतंत्र कादंबरी आली. पद्मणजीनी ख्रिस्ती धर्म स्विकारला होता. हिंदू धर्मातील स्त्रियांच्या वाईट परस्थितीचे त्यांनी नि:संशय अवलोकन केले होते. कादंबरीतील कथानकावरून तत्कालीन सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण व यमुनापर्यटनची निर्मिती यातील नाते लक्षात येते. मराठीतील पहिली कादंबरी यामुळेच सामाजिक दस्ताऐवज ठरली आहे. तत्कालीन संस्कृतीतील पारंपरिक मूल्ये आणि या मुल्यांना बळी पडलेल्या विधवा स्त्रिया यांच्यातील संघर्ष हे या कादंबरीचे आशयसूत्र आहे.

या काळात विधवा विवाहांच्या प्रश्नाला जळजळीत रूप आले होते. याबाबतीत कुसुमावती देशपांडे यांचे निरीक्षण पहावयासारखे आहे.त्या म्हणतात, "पद्मणजींनी जो सामाजिक प्रश्न कादंबरीत चर्चेसाठी घेतला तो त्या काळाच्या केवळ ख्रिस्ती समाजालाच महत्वाचा वाटत होता असे नाही."[१४] पद्मणजींच्या पुढे सामाजिक कादंबरी म.वि.रहाळकर यांच्या कादंबऱ्यांच्या रुपाने धिम्या गतीने बदलते समाजवास्तव चित्रीत करीत होती. अद्भुतांच्या आकर्षणामुळे रंजनाची प्रवृत्ती बळकट बनत चालली होती. परंतु 'नारायणराव व गोदावरी' (१८७९) 'राजा मदन' (१८६५) 'शिरस्तेदार' इ. सारख्या सामाजिक सांस्कृतिक संदर्भ असणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या जात होत्या.त्या काळातील सांस्कृतिक पर्यावरणामुळे या कादंबऱ्या दुर्लक्षीत राहील्या. परंतु त्यांनी हरिभांऊच्या कादंबरीची पार्श्वभूमी तयार केली.

१८७४ साली चिपळूणकरांची निबंधमाला सुरू झाली.तिचे १८८४ पर्यंत एकूण ऐंशी अंक निघालेत. मध्यमवर्गीय सुशिक्षितांत आक्रमक राष्ट्रवाद १८८८ ते १९३५ पर्यंत अस्तीत्वात आला. यामुळे आक्रमक राष्ट्रवादाचा प्रारंभ झालेला दिसतो.चिपळूणकरांआधी एक वर्ष म्हणजे १८७३ साली जोतिबा फुल्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रारंभ केलेला दिसतो. फुल्यांचे कार्य चालू होते. आगरकरांचे बुध्दीप्रामान्यवादी विचार मांडणे चालू होते. त्यातून मध्यमवर्गाला प्रेरणा मिळाली.तत्कालीन मध्यमवर्ग आगरकरांना आपला तत्ववेत्ता मानत असे. लोकहितवादी(शतपत्रे),न्यायमुर्ती रानडे, शि.म.परांजपे यांचे प्रबोधन चालू होते.

सार्वजनिक गणपतीउत्सव व शिवजयंती उत्सव या काळात सुरू झाले. बंगालमध्ये धर्म व समाजसुधारणा चालू होत्या. भारतीय राष्ट्रवाद तीव्र होऊ लागला. भारताची राजकीय आकांक्षा व्यक्त होण्यासाठी १८८५ साली राष्ट्रीय सभेची स्थापना झाली.रानडे आगरकरांची भूमिका मध्यमवर्गीय होती.पहिले महायुध्द याच काळात घडले. बाळ गंगाधर टिळकांचे राजकीय कार्य, जहाल विचारसरणी याच काळात बहरात आली. इंग्रज सरकारने 'मोर्ली मेंटो'सारख्या काही सुधारणा दिल्या. १८८९ मध्ये पंडिता रमाबाईनी 'शारदासदन' स्थापन करून स्त्री मुक्तीचा विचार मांडला. धोंडो केशव कर्वे यांनी १८९६ मध्ये 'अनाथ बालिकाश्रम' ही विधवांसाठी संस्था स्थापली. १८७० मध्ये 'सार्वजनिक सभा' स्थापन झाली होती. 'रौलेट ॲक्ट' पास झाला. 'मॉटेंग्यू चेम्सफर्ड सुधारणा'कायदा पास झाला. परंतु सर्वत्र असंतोष होता. जालियनवाला बागेमध्ये हत्याकांड झाले. या सर्व गोष्टींच्या प्रभावातून क्रांतिकारक वाङ्मय निर्माण होणे अपेक्षित वाटते. परंतु त्या काळातील मराठी साहित्यिकांची मानसिकता क्रांतिकारी नसल्याने ते झाले नाही. अर्थात या मानसिकतेची कारणेही तत्कालीन पर्यावरणात शोधता येतात.

मुळात टिळक,अगर, चिपळूणकरांमुळे जे सांस्कृतिक परिवर्तन होत होते ते प्रामुख्याने मध्यमवर्गात झाले. पण फुले-शाहू-आंबेडकर,वि.रा.शिंदे,भालेकर,लोखंडे यांच्यामुळे होणारे बहुजन समाजात प्रबोधन घडत होते. हा फरक लक्षात घ्यावयास हवा. शाहू महाराज याच काळात गादीवर बसले व त्यांनी बहुजनांच्या बाजूचे अनेक निर्णय घेतले. १८८२ मध्ये दीनबंधू हे बहुजन समाजासाठीचे वृत्तपत्र सुरू झाले.१९०६ साली वि.रा.शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मशीन' ही संस्था स्थापून बहुजनासाठी कार्य सुरू केले.ताराबाई शिंदे यांचा 'स्त्री-पुरूष तुलना' हा लेख याच काळात प्रकाशीत झाला.एकूणच १८८५ ते १९२० या काळात मध्यमवर्ग आणि बहुजन समाज अशा दोन्ही वर्गात प्रबोधन चालू होते. मध्यमवर्गाच्या वर्चस्वामुळे बहुजन समाजात होत असलेल्या प्रबोधनाकडे दुर्लक्ष झाले. या काळात राष्ट्रीय भावना वाढत गेल्या. त्यामुळे आधी राजकीय की आधी सामाजिक हा वाद या काळात उभा राहिलेला दिसतो. अर्थात दादाभाई नौरोजीनी आर्थिक दोहनाचा सिध्दांत मांडून आर्थिक शोषण आकडेवारीनिशी सिध्द करून दाखविले. त्यावरून इंग्रजांची शोषक रूप स्पष्ट होते.

१८७४ ते १९२० हा कालखंड सामाजिक,राजकीय, सांस्कृतिक वाङ्मय इ सर्वच अंगानी महत्वाचा मानला जातो. हा कालखंड राष्ट्रवादाच्या उदयाचा आणि समाजप्रबोधनाचा म्हणून ओळखला जातो. तर न्या.रानडे,दादोबा पांडूरंग यांनी धार्मिक पुनरूज्जीवनवाद मांडण्यास सूरवात केलेली दिसते. इंग्रजानी या देशाची प्रचंड लूट केली. न्यायमूर्ती रानडेंना नौरोजींची 'जहाल' (आधी स्वराज्य) ही भूमिका मान्य नव्हती.

हा काळ मध्यमवर्गाच्या उत्कर्षाचा व वर्चस्वाचा काळ आहे. त्यामुळे या काळातील बहुतांश साहित्य हे मध्यमवर्गीय आहे. बहुजनांच्या दैन्य दरीद्र्याविषयी लिहीण्याचे धाडस या मध्यमवर्गीय लेखकांनी केले नाही. कारण या दारिद्र्याला ब्रिटीश राज्यकर्ते जबाबदार होते.शासनककर्त्यांचा रोष ओढवून घ्यायला नको म्हणून बहुजनांचा पक्ष मध्यमवर्गीय लेखकांनी फारसा घेतलाच नाही. वर उल्लेखलेली हीच ती मानसिकता होय. म्हणूनच हरिभाऊ 'काळ तर मोठा कठीण आला' एवढीच हळहळ व्यक्ती करू शकले. मध्यमवर्गीय जीवनचित्रण करणे त्यांना सोयीचे होते. अर्थात हरिभाऊंच्या सामाजिक कादंबरीला आगरकरांच्या सुधारणावादी विचारांची प्रेरणा असल्याचे दिसते. हरिभाऊनी (१८६४ ते १९१९) आपल्या काळातील विविध प्रेरणा आत्मसात केलेल्या दिसतात. त्यांचा 'गणपतराव' मिल्सच्या स्त्रीविषयक सुधारणावादाचा पूरस्कार करतो.त्यांच्या 'मी'कादंबरीत न्यायमूर्ती गोखल्यांची कल्पना मूर्त रूप घेताना दिसते. वर उल्लेखल्याप्रमाणे तो काळ समाजभिमूखतेचा,प्रगतीवरील श्रध्देचा व ध्येयदर्शीत्वाचा होता. 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीत १८९३ च्या दरम्यानची एकत्र कुटुंबपध्दती, विधवांचे दु:ख, स्त्रियांची अवहेलना, पुरूषी वर्चस्व याचे दर्शन होते.

१८८०ते १९०१ या कालखंडात शिक्षणाचे प्रमाण बरेच वाढलेले होते. मध्यमवर्गीय स्त्रीच्या जीवनात शिक्षणाद्वारे सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न कसे होते? याचे चित्रण या कादंबरीत येते. या काळाबद्दल लुलेकर, तुपे यांचे मत पाहण्यासारखे आहे. ते म्हणतात, "एकूणच एकोणिसावे शतक हे स्त्री प्रश्नासंबधी सतत चर्चेत राहिलेले दिसते.वृत्तपत्रे, नियतकालिके, सभा व्याखाने चर्चा, संस्थात्मक प्रयत्न, वैचारिक ललित साहित्य या सर्वांचे केंद्रस्थानी मराठी स्त्री असल्याचे जाणवते."[१५] अर्थात ही 'स्त्री' प्राय: उच्चवर्णीय समाजातीलच होती. फुले, विठ्ठल रामजी शिंदे, ताराबाई शिंदे यांनी ज्या कनिष्ठवर्गीय स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न चालिवेलेले होते. ती स्त्री किंवा दलित स्त्री मात्र मध्यमवर्गीय लेखकांनी चित्रीत केलेली नाही.

यशवंतराव खरे हा हरिभाऊंचा नायक तत्कालीन राजकीय सुधारणेच्या बाजूचा प्रतिनिधी असल्याचे दिसते. तत्कालीन मध्यमवर्गीय जीवनजाणिवा, मध्यमवर्गातील सुधारणावादी प्रवृत्ती आणि तिला विरोध करणारे प्रतिगामी लोक यावर त्यांनी प्रकाश टाकला. या काळाबद्दल कुसुमावती दशपांडे म्हणतात, "हरी नारायणांच्या काळी कादंबरीचा प्रवाह मध्यमवर्गीय बुध्दिवंताच्या सुधाराकांच्या वरच्या घराकडे वळला. त्यानंतर या वाचकवर्गात आणखी विविधता आली. शिक्षणाचा प्रसार झाला.समाजाच्या वृत्तीत, हौशीत, आवडीत, फुरसदीच्या व्यवसायात दिसू लागले व या सर्व मध्यमवर्गीय आणि मध्यमेतर वर्गातील लोकांचे रंजन व मन:पोषण करण्याचे कार्य मराठी कथावाङ्मयाने अंगीकारले."[१६]

नाथमाधवांच्या 'विमलेची गृहदशा' 'डॉक्टर' यासारख्या कादंबऱ्यांमध्येही स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह हे विषय होते. बा.स.गडकरी यांच्या 'सुधारणेचा मध्यकाल' या कादंबरीचा विषयही पुनर्विवाह हाच होता. विसाव्या शतकाच्या सूरवातीचे लोकजीवन ना.ह.आपटे यांनी 'न पटणारी गोष्ट' ते 'पाच ते पाच' पर्यंत अनेक सामाजिक कादंबऱ्यांतून केले आहे.स्थिर समाजजीवनाला आवश्यक त्या मूल्यांचा संस्कार करण्यासाठी त्यांनी कादंबऱ्या लिहिल्या असे म्हणता येते. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात तरूण वर्ग सुशिक्षित झाला होता.भालचंद्र फडके म्हणतात त्याप्रमाणे या कालखंडातील वाचकवर्गाला 'तत्वचर्चा' प्रिय होती.[१७] बदलत्या सुशिक्षित तरूण पिढीचे आणि त्यांच्या विचारणसरणीचे चित्रण वा.म.जोशी यांच्या रागीणी (१९१५),आश्रमहरिणी, नलिनी, सुशिलेचा देव, इंदू काळे सरला भोळे (१९३५) या कादंबऱ्यांतून आलेले दिसते. त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांतून तत्कालीन सामाजिक प्रश्न वैचारिक पध्दतीने मांडलेले दिसतात. कौटुंबिक जीवनाचे चित्र, या कांदबऱ्यांच्या कथानकातून उमटलेले दिसते. वामन मल्हारांच्या कादंबरीत स्वतंत्र व्यक्तिमत्वाची स्त्री त्यांच्या कादंबऱ्यांतून पुढे येते.हे सर्व मध्यमवर्गात बहुसंख्याच्या जीवनात घडत होते असे नाही. पण जी नवी मूल्यव्यवस्था येऊ पाहत होती. त्यामुळे मध्यमवर्गाचे वास्तव कशा तऱ्हेने बदलले याचा जणू वेध वामनराव घेत होते. नाथमाधवादी लेखकांच्या लेखनांनी सर्व साधारण वाचकवर्गाची वाचनाची

भूक भागत होती. उच्चशिक्षित व बुध्दनिष्ठ वाचकांना तोच तो सामाजिक सुधारणावादही नकोसा वाटत होता.पाश्चात्य विद्याग्रहणाने हा वर्ग डोळस बनला होता.त्याला तत्वचिंतनाची भूक लागली होती. वा.म.यांनी आपल्या कादंबऱ्यांतून त्या काळातील सांस्कृतिक पर्यावरणाने निर्माण केलेली ही भूक भागविली.

श्री.व्यं. केतकरांच्या ब्राम्हणकन्या, विचक्षमा, गोंडवनातील प्रियंवदा इ. कादंबऱ्या अनौरस संतती, विधवा विवाह, कामगारवर्गाच्या समस्या, बालजरठ विवाह इ. तत्कालीन प्रश्न प्रतिबिंबित झालेले दिसतात. तत्कालीन सामाजिक, वास्तवाचे संदर्भ लाभलेले आहेत. तत्कालीन सर्व प्रश्न त्यांच्या कादंबऱ्यांतून चित्रीत झालेले दिसतात. त्यांच्या ब्राम्हणकन्यावर त्या काळात वाढत चाललेल्या 'साम्यवादी' विचारप्रणालीचा प्रभाव दिसतो. या काळातील कादंबऱ्यांतून त्या काळातील व्यक्तिविकासासारखी मूल्ये प्रतिबिंबित झालेली दिसतात.

निष्कर्ष:-

इस १८०० ते १९२० या काळातील मराठी कादंबरी या काळातील सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमीवर बदलत गेलेली दिसते. या सांस्कृतिक पार्श्वभूमीचे चित्र या काळातील कादंबऱ्यात उमटलेले दिसते. पहिल्या तीस वर्षांतील मराठी कादंबरी इंग्रजी, फार्सी व संस्कृत या भाषातील कथासाहित्याच्या प्रभावातून निर्माण झाली. तिचा एक प्रवाह रंजनप्रधान अदभुतरम्य होता. तर दुसरा सामाजिक ध्येये दर्शविणार होता.हा दुसरा प्रवाह जीवनाचे सर्व स्तरावरील चित्रण करून परिवर्तनाची आशा धरणारा होता. १८०० ते १८७४ या कालखंडाला भाषांतराचा कालखंड म्हटले जाते.१८७४ ते १९२० हा काळ राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक ध्येयवादाच्या उदयाचा काळ आहे. त्यामुळे या कालखंडातील बहुतांशी साहित्यात प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे ध्येयवाद,आदर्शवाद, आशावाद यांचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. प्रबोधनाच्या चळवळीची महत्त्वपूर्ण प्रेरणा सुरवातीच्या काळातील कादंबरीपाठीमागे दिसते. त्यामुळे उदारमतवाद आणि मानवतावादही तत्कालीन प्रभावी सांस्कृतिक मूल्ये या काळातील कादंबरीत आढळतात. अर्थात प्रबोधनकारांच्या वर्गीय वर्णीय मर्यादांमुळे या काळातील मराठी कादंबरीही या मर्यादेत लिहिली गेलेली दिसते.

संदर्भ :-

१. नेमाडे, भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रका. औरंगाबाद, प्र.आ. १९९० पृ. १९८ १८९

२. कुलकर्णी, गो.म., महाराष्ट्र साहित्य पत्रिका, महाराष्ट्र साहित्य पत्रिका,जुलै-डिसें.१९८०, पृ.२१

३. थोरात, हरिश्चंद्र,कादंबरीविषयी, पद्मगंधा प्रका.पुणे

४. कुरूंदकर, नरहर,धार आणि काठ,देशमुख आणि कंपनी,पुणे, आवृत्ती चौथी, पृ.७

५. (संपा.)वि.स.खांडेकर, ग.त्र्यं.माडखोलकर, गं.दे.खानोलकर,समग्र कोल्हटकर खंड १ ला, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई १९७२, पृ. ३४ ते ५६

६. सरवटे, वी.सी., 'मराठी साहित्य समालोचन', मराठी कादंबरी पहिले शतक , उनि.पृ.१५ वरून उदधृत

७. नेमाडे,भालचंद्र,टीकास्वयंवर, उनि.पृ. १९६

८. देशपांडे,अ.ना.,आधु.मराठी वाङ्म.इति.भाग.१ ला १८७४ ते १९५०, व्हीनस प्रका. पुणे प्र. आ. १९५४ पुनर्मुद्रन १९७४ पृ.५९.६०

९. मराठे, का.बा,नावल आणि नाटक यांजविषयी निबंध,प्रका.मॉडर्न बूक डेपो,पुणे,१९६२

१०. (संपा.) लक्ष्मणशास्त्री जोशी,राजवाडे लेखसंग्रह, दु.आ. १९६०, पॉप्यू.प्रका.मुंबई, पृ. २७८

११. कऱ्हाडे,सदा, अर्वाचीन मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी, लोकवाङ्मय गृह मुंबई १९८१ उनि. पृ.६६

१२. थोरात,हरिश्चंद्र,कादंबरीविषयी,पद्मगंधा प्रका.पुणे द्वितीयावृत्ती,२००८, पृ. ८

१३. देशपांडे, भालचंद्र,'कादंबरी' , (संपा.) सार्व. वाचनालय नाशिक ,कॉन्टिनेन्टल प्रका.पुणे, प्रदक्षिणा-१, प्र.आ.१९४१, उनी. पृ.२१२

१४. देशपांडे, कुसुमावती,भालेराव अ.ना. मराठी कादंबरीचे पहिले शतक , प्रका.मुंबई मराठी साहित्य संघ,मुंबई.१९५३ पृ.२०.२१

१५. लुलेकर, प्रल्हाद, तुपे केशव, साहित्याचे सांस्कृतिक संचित, कैलाश पब्लि.औरगांबाद २००५ पृ.१२

१६. देशपांडे,कुसुमावती,उनी. पृ. १०८

१७. देशपांडे, भालचंद्र,'कादंबरी' , (संपा.) सार्व. वाचनालय नाशिक ,कॉन्टिनेन्टल प्रका.पुणे, प्रदक्षिणा-१, प्र.आ.१९४१,उनि. पृ.२२४

मुस्लिम मराठी साहित्यिकः कवी आणि कविता

सौ. जस्मिन रमजान शेख
शिक्षिका, 9881584475
jrshaikh79@gmail.com

प्रस्तावनाः

नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. ही आपल्यासाठी गौरवाची बाब आहे. या दृष्टीकोनातून मराठी साहित्यामधील विविध प्रवाहांचा नव्याने अभ्यास करणे गरजेचे आहे. मराठी साहित्यातील अनेक प्रवाहांपैकी एक प्रवाह म्हणजे मुस्लिम मराठी साहित्य! मराठी साहित्य परंपरेत मुस्लिम साहित्यिकांचे योगदान महत्त्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण आहे. .

नवदोत्तर साहित्यिक पर्वामध्ये दलित साहित्य, आदिवासी साहित्य, मुस्लिम मराठी साहित्य, ग्रामीण साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य असे कवितेचे नवे प्रवाह मराठीत आले. हे या पर्वाचे ऐतिहासिक योगदान आहे. या लेखनाचे मूळ आपल्याला तेराव्या शतकातील मुस्लिम संत कवी शेख मोहम्मद यांच्या कवितेत दिसते. तेराव्या आणि चौदाव्या शतकापासून मुस्लिम संतांनी मराठीतून साहित्य निर्मिती केल्याचे अनेक पुरावे आहेत. लेखक रा.ची ढेरे यांनी 'मुसलमान मराठी संत कवी' या पुस्तकात याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. तसेच लेखक व समीक्षक फक्रुद्दीन बेन्नूर यांचे "मुस्लिम मराठी साहित्यिक- एक दृष्टिक्षेप' या पुस्तकात मुस्लिम मराठी साहित्य चळवळीचा इतिहास नोंदवला आहे. 'मराठी भाषेत मुस्लिम कवी लेखकांनी मुस्लिम समाजाचे प्रभावीपणे केलेले चित्रण, लिहिलेले साहित्य म्हणजे मुस्लिम मराठी साहित्य होय. 'अशी व्याख्या ज्येष्ठ लेखक फ. म. शहाजिंदे यांनी केली आहे. समकालीन काळात मुस्लिम मराठी कवी साहित्यिकांनी आपल्या कवितातून सामाजिक वास्तव, अल्पसंख्याकाचे प्रश्न, धार्मिक सांस्कृतिक अनुभव तसेच मानवी मूल्य प्रभावीपणे मांडले आहेत.

उद्दिष्टेः

१. मुस्लिम मराठी साहित्यिकांच्या कवितांचा अभ्यास करणे .
२. समकालीन कवितांमधून समाजाचे वास्तव चित्र अभ्यासणे.
३. मुस्लिम कवींची मराठी लेखन शैली व वैशिष्ट्ये यांची माहिती घेणे.
४. मराठी लेखनातील मुस्लिम कवयित्रींच्या सहभागाबाबत माहिती घेणे.
५. मुस्लिम मराठी कविता आणि समाज यांचा परस्परावरील प्रभाव तपासणे.

संशोधन पद्धतीः

मुस्लिम साहित्यिकांच्या मराठी लेखनातून मुस्लिम समाजाचे केलेले चित्रण व त्यांची संस्कृती यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने सदर शोध निबंधात ऐतिहासिक, सामाजिक व वर्णनात्मक पद्धतींचा वापर करण्यात आला आहे.

गृहीतकेः

१. मुस्लिम मराठी साहित्यिकांच्या समकालीन कविता मध्ये सामाजिक वास्तवाचे प्रभावी प्रतिबिंब आढळते.
२. समकालीन मुस्लिम मराठी कवितेत अल्पसंख्यांक जीवन अनुभव, संघर्ष, अस्मितेचे प्रश्न ठळकपणे व्यक्त झालेले आहेत.
३. समकालीन काळातील मुस्लिम मराठी कवींची कविता ही विद्रोही, प्रश्नकर्ती आणि परिवर्तनवादी स्वरूपाची आहे.
४. मुस्लिम मराठी साहित्यिकांच्या कवितेत भाषिक साधेपणा असूनही आशयात्मक खोली आढळते.
५. स्त्री शिक्षण अन्याय धर्मनिरपेक्षता व लोकशाही मूल्ये हे विषय समकालीन मुस्लिम मराठी कवितेत वारंवार येतात.

मुस्लिम मराठी साहित्यिक इतिहास:

मराठी साहित्य निर्माण करणारे मुस्लिम साहित्यिक यांची नाळ महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांच्याशी घट्ट जुळली गेली आहे. या मातीत त्यांचा जन्म झाला. ही माती त्यांची माता आहे. तेव्हा त्यांच्या साहित्यात मायभूमीचे गुणगान दिसून येते. तसेच या साहित्यात त्यांनी मुस्लिम समाजातील जीवन चित्रण केले आहेत. त्याबरोबर त्यांच्या कविता या

सामाजिक, देशभक्तीपर आहेत. समाजातील अनेक वाईट परंपरा, घटना, चालीरिती यांच्या विरुद्ध आवाज उठवणारे आहेत. वास्तववादी आहेत. १९३६ पासून सांगलीचे सय्यद अमीन यांनी 'मुस्लिम मराठी साहित्य' हा शब्दप्रयोग केला होता. शाहीर अमर शेख, बशीर मोमीन कवठेकर यांच्यासारखे अनेक शाहीर तर फ.म.शहाजिंदे, जावेद पाशा कुरेशी, सय्यद अल्लाउद्दीन, डॉ. मिर्झा रफी अहमद बेग, अजीम नवाज राही, इलाही जमादार, डॉ.ए.के.शेख, डॉ. इकबाल मिन्ने, डॉ. आय.जे.तांबोळी, डी.के. शेख, डॉ. राजन खान असे कवी तर डॉ. फातिमा मुजावर, मलिक अमर शेख, डॉ. बशारत अहमद, डॉ. नसीमा देशमुख, नसीमा जमादार, फरजाना डांगे, अनिसा सिकंदर अशा अनेक कवयित्रींनी, मुस्लिम साहित्यिकांनी मराठी साहित्य बहारदार केले. समकालीन पर्वात अशी प्रतिभावंत लेखकांची फळी मुस्लिम मराठी साहित्यात निर्माण झाली.

प्राध्यापक फक्रुद्दीन बेन्नूर यांच्या पुढाकाराने १९८९ साली मुस्लिम मराठी साहित्य चळवळीची सुरुवात झाली. आधुनिक शिक्षण घेतलेल्या मुस्लिम बहुजन १९८० च्या दशकापासून वाङमयाची निर्मिती करत होते. डॉ.फक्रुद्दीन बेन्नूर,डॉ. फ.म. शहाजिंदे, प्राध्यापक अजित नदाफ, पत्रकार नल्लामुंदू , कवी मुबारक शेख यांनी मुस्लिम मराठी साहित्यिकांनी व्यक्त होण्यासाठी विचारमंच उपलब्ध करून दिले. त्यांनी 'मुस्लिम मराठी साहित्य सांस्कृतिक मंडळाची' स्थापना केली. या मंडळात मार्फत १९९० साली सोलापूर येथे पहिले साहित्य संमेलन भरवले गेले. त्यानंतर आजपर्यंत अनेक साहित्य संमेलने वेगवेगळ्या ठिकाणी भरवण्यात आलेली आहेत. पुणे आणि पनवेल येथे भरवण्यात आलेल्या साहित्य संमेलनामध्ये एक निमंत्रित कवयित्री म्हणून मलाही सहभागी होता आले याचा मला अभिमान आहे.

मुस्लिम मराठी कवी आणि कविताः

शाहीर बशीर मोमीन कवठेकर यांनी मराठी भाषेत लावणी, वगनाट्य, नाटक, धार्मिक भक्ती गीते, देशभक्तीपर गीते याबरोबर विविध प्रकारचे लोकगीते लिहिले आहेत. अनेक ज्वलंत विषयावर त्यांनी लेखन करीत त्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्न केले. लोककला साहित्य आणि संस्कृती या क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल महाराष्ट्र शासनाने २०१८ सालीचा 'विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. फ.म.शाहजिंदे यांच्या 'निधर्मी' (१९८०), 'शेतकरी'(१९९०), 'आदम'(१९९१), 'ग्वाही' (१९९६) यातील कविता मुस्लिम व ग्रामीण संवेदनशीलता यांचा मिश्र आविष्कार आहे. कवीचे घराणे शेतकरी आहे. दैन्य,दारिद्र्यात ही आपली नैतिक जपणाऱ्या शेतकऱ्याचे अनुभव त्यात आहेत. त्यांची शेतकरी या काव्यसंग्रहातील प्रदीर्घ कविता ग्रामीण बोलीतील लिहिलेली कविता हा एक विक्रम आहे. उर्दू मराठीची सरमिसळ आणि ग्रामीण बोलीचा थेट वापर ही त्यांच्या शैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ते आपल्या कवितेतून व्यक्त होताना म्हणतात.....

मुळ्या

सगळीकडून अशा माझ्या मुळ्या
कापल्या जात असून
उगीचच मी मराठी कविता
लिहायचा प्रयत्न करतो आहे
म्हणजेच माझ्या मुळ्या
रुजतीलच याची शाश्वती नाही
म्हणून आज मी पुन्हा माझ्या मुळ्या
कुठेतरी रुजाव्यात
यासाठी धडपडतो आहे.

गझलकार इलाही जमादार यांचे 'अनुराग', 'गुफ्तगू' 'दोहे इलाहीचे' असे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्यांनी 'जखमा अशा सुगंधी', 'महफिल ए इलाही' या नावाने मराठी उर्दू काव्यवाचनाचे जाहीर कार्यक्रम ही केले. त्यांच्या लेखणीने गझल काव्य प्रकाराला एक उत्तुंग शिखरावर नेले. त्यांची एक गझल.....

वाचलेली, ऐकलेली माणसे गेली कुठे?
पुस्तकातून पाहिलेली माणसे गेली कुठे?
रोज अत्याचार होतो आरशावरती आता

आरशाला भावलेली माणसे गोली गेली कुठे ?
आणखीन एक गझलेच्या ओळी..
जखमा कशा सुगंधी झाल्यात काळजाला
केलेत वार ज्याने तो मोगरा असावा.

जखमाला सुद्धा सुगंधी म्हणणारा असा हा हळवा मुस्लिम कवी गझलकार मराठी साहित्यातील एक हिराच आहे. आणखीन एक गझलकार ए. के.शेख म्हणतात 'गझल ही मुळात माणसाच्या अंतकरणाची बोली आहे.' ते तिसऱ्या मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या 'अमृताची पालखी' या संग्रहात गझल लेखनाबाबतची सर्व पाठ आहेत

कवी अजीम नवाज राही कवितेविषयी मत मांडताना म्हणतात, 'कवितेशी नातं जोडणं म्हणजे आग्या मोहोळाच्या पोळ्यात मुंडक खुपसणं, मधमाशांचे डंक आयुष्यभर अंगभर मायेने जोपासणे.' तसेच 'तुमची कविता सर्व स्तरातील वाचकांना, श्रोत्यांना त्यांच्या भावनाच प्रतिनिधित्व करणारी वाटली पाहिजे.' असे परखड मत कवी राही कवितेबद्दल मांडतात. ते आपल्या एका कवितेत लिहितात.....

झाडांनी उंच उंच जाताना
करावी मुळांची अधून मधून आठवण
एरवी झाडं कृतज्ञ झाल्याची
मोसमांची तक्रार आहे.

प्राचार्य डॉ. इ.जा. तांबोळी यांच्या 'जाई' (१९९५), 'लिकपिया' या काव्यसंग्रहातून त्यांचे खदखदणारे विचार प्रवाहीत झाले आहेत. त्यांच्या मनात साचलेल्या काही अव्यक्त भावनांची स्पंदने म्हणजेच त्यांच्या कविता! त्यामध्ये समाज आहे,सुख- दुःख आहे, तसेच भ्रष्ट लोकांबद्दल चीड ही आहे. मात्र शांतीची वाट त्यांना सुटत नाही कारण संस्कारच तसे झालेले आहेत. एका कवितेत ते म्हणतात

हे भांडवलवाल्यांनो
तुमच्या धमन्या
बाहेर पडल्या असत्या
मात्र .....
माझ्या मनात
बुद्ध येशू
राम पैगंबर
हे शांतिदूत
ठाण मांडून
बसलेले आहेत.

जावेद पाशा कुरेशी यांच्या 'बएत' या कवितासंग्रहातील कवितेत आजच्या मुस्लिम वास्तवाची करूण रेखटन आहे. विशेष म्हणजे त्यात मुस्लिम स्त्रियांची व्यथा आणि त्यांचे प्रश्न यांचे चित्रण आहे. तसेच संघटित चळवळी द्वारे हे वास्तव बदलण्याचा निर्धार ही या कविता मधून दिसतो. मुस्लिम अस्मिता जपून धर्मभेद व जातीभेद पार करणारा नवा समाजवादी समाज निर्माण करण्याचे स्वप्न कुरेशी यांच्या कविता मधून दिसतात. तर सय्यद अल्लाउद्दीन यांच्या 'जिंदाबाद मुर्दाबाद' (१९९९) या कवितासंग्रहातील बरीचशी कविता लोकप्रियतेकडे झुकलेली आहे. त्यात धार्मिक सामाजिक आणि राजकीय व्यंगावर उपहासात्मक टिप्पणी आहे. स्वार्थी राजकारणामुळे मुस्लिमांची किती हाल होतात हे त्यांनी कवितेतून दाखवून दिले. सर्वस्वाचा त्याग करून स्वातंत्र्यलढ्यात भाग घेणारे त्यांचे चाचा केवळ मुस्लिम आहेत म्हणून त्यांना स्वातंत्र सैनिकाची पेन्शन मिळाली नाही. कवीचा भाऊ रात्रंदिवस काबाड कष्ट करून जन्मभर दरिद्रीच राहिला. तसेच मुस्लिम समाजाचे इतर अनेक प्रश्नही त्यांनी आपल्या कवितेतून मांडले आहेत. या सर्वांसाठी ते शब्दाने महत्त्व देतात. शब्दाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना ते आपल्या एका कवितेत म्हणतात....

शब्द माझी आई। शब्द माझा भाऊ
शब्द माझा ताऊ। ऐसा शब्द
शब्द माझे हृदय । शब्द माझे मन
शब्द कणकण ।जाहलेत

शब्द माझा नाद। शब्द माझा छंद
शब्द गुलकंद। ऐसा गोड

कवि शेख शफी बोल्डेकर हे ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्थेचे संस्थापक आहेत. पूर्ण महाराष्ट्रभर या संस्थेच्या शाखा आहेत. मराठी साहित्य लिहिणाऱ्या मुस्लिम साहित्यिकांना बळ देणे, त्यांच्या साहित्याला मंच उपलब्ध करून देणे, आणि त्यांचा प्रसार करण्याची खूप मोलाचे कार्य ते व त्यांचे सहकारी करत आहेत. त्यांचे 'समिलाफ' (१९९९) 'आम्ही मराठी मुसलमान(२००१) आणि बालकाव्यसंग डिझेल गाडी असे काव्यसंग प्रकाशित आहेत. मुस्लिम मराठी साहित्य कसा ओळखावा याबाबत शफी बोल्डेकर म्हणतात, 'मराठी मुलखात जगत असताना साहित्याच्या अंगाने आपले अनुभव विश्व निर्भीडपणे मराठीतून अभिव्यक्त करणारा तोच खरा मुस्लिम मराठी साहित्य होय.'

मुस्लिम मराठी कवयित्री आणि कविताः

भिन्नभिन्न भारतीय भाषेतील कविता समजून घेताना स्त्री आणि पुरुषांच्या अभिव्यक्ती मधील फरक तीव्रपणे लक्षात येतो. जो आवाज शतकानूशतके आतल्या आत गुदमरत राहिला होता. जो केवळ लोकगीता मधून रूपकात्मक पद्धतीने व्यक्त झाला होता. ते शब्द निडर होऊन उच्चाराचे धाडस स्त्री कवितेने केले. खरे तर भारतीय स्त्री कविता ही त्या भारतीय माणसाचे प्रतिनिधित्व करते ज्यांचे माणूसपण कधीही ठळकपणे लक्षात घेतले गेले नाही. या कवितेतून निम्मा भारत बोलतो. स्त्रियांचे साहित्य लेखन हे अधोरेखित करण्यासारखी आहे. अद्याप ही मुस्लिम कवयित्रींची संख्या हाताचे बोटावर मोजण्यातली असली तरी काही हात लिहीत होते आणि अनेक कवयित्रींना लिहिण्याची प्रेरणा देत होते.

प्राचार्य फातिमा मुजावर या २०१९ साली झालेल्या अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा होत्या. यांच्या 'रोशन', 'पान मनाचे', 'आठवणी जगताना' या काव्यसंग्रहातून अनेक सामाजिक प्रश्नांना स्थान दिले आहे. त्या म्हणतात 'जीवनातील प्रश्नावर, जीवनाच्या समस्यावर आज साहित्य निर्मितीची गरज आहे जीवनातील वास्तव सामान्यांच्या व्यथा, वेदना साहित्यात आल्या पाहिजेत. साहित्य जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श करणारे असावे." अखंड मानव जातीच्या विकासासाठी त्या कवितेतून प्रार्थना करतात.....

मानवाच्या एकतेची पूर्ण संकल्पना
एकची माणुसकी हा धर्म राहो या जना
जीवनातील हा सर्व अज्ञान अंध:कारही

आणि प्रकाश दे जगला हीच माझी कामना।डॉ.कादेरा जुल्फी शेख यांनी मुंतोजी ब्राह्मणी या मुस्लिम संतावर आचार्य ही पदवी मिळवली. पुणे येथे झालेल्या चौथ्या अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांचे 'अक्षरवेध'(१९९०) 'मी कोण?' असे काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्या राजकीय, सामाजिक आणि प्रेमाविषयी अनेक प्रश्न बिनधास्तपणे आपल्या कवितेतून मांडतात. त्याचबरोबर 'स्त्रीच स्त्रीची वैरीण झाली आहे' ही सत्य परिस्थिती समाजासमोर आणण्याचे धाडस या कवयित्रीने केले आहे. स्त्री शिक्षणाबद्दल त्या अतिशय सूचक ओळीतून आपले मत व्यक्त करतात.....

मोठ्यांनी मुल्ला-मौलवींनी
आखून दिलेल्या रेषा
कधी काळीच ओलांडायचे असतात
कधी काळीच समजून बोलायचं असते.

कवयित्री मलिका अमर शेख यांनी 'वाळूचा प्रियकर' (१९७९) या संग्रहातील कवितेत स्त्रीवादी संवेदनशील, दलित संवेदनशीलता आणि महानगरी संवेदनशील यांची सरमिसळ जाणवते. तरी स्त्रीवादी जाणिवा आणि स्त्रीवादी निषेध हे या कवितेचे वेगळेपण आहे. प्रेम वाचना संभोग यांची रोमँटिक उदातीकरण करणाऱ्या सौंदर्यवादी भावकवितेच्या परंपरेला दिलेला हा महत्त्वाचा ऐतिहासिक छेद आहे. 'मला उध्वस्त व्हायचंय' या काव्यसंग्रहातील त्या एका कवितेत म्हणतात .....

माझ्या स्वप्नाचं घर शाबूत ठेवणारे
एकही झाड उरलं नाही.
किती बरंवर्ष झाली....?
माझ्या तारुण्याचं रेशमी वस्त्र चोचीत घेऊन

माझा प्रियकर केव्हाच उडून गेला.

अनिसा सिकंदर शेख या ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र राज्याचे सहसचिव पदी कार्यरत आहेत. त्यांनी अनेक मराठी सुविचारांचे हिंदीत अनुवाद केले आहे. तर विशेष म्हणजे 'मिठू' या बालकथेचे ब्रेल लिपीत त्यांनी अनुवाद केले आहे. त्यांचे 'संवाद हृदयाशी' हा काव्यसंग्रह, 'सांगाती' हा चारोळी संग्रह, 'बालतरंग' हा बालकविता संग्रह प्रकाशित आहे. काव्य लेखनाबद्दल त्यांचे असलेले आस्था आणि कवितेची व्याख्या स्पष्ट करताना त्या म्हणतात, 'कविता म्हणजे....

जन्मजात प्रतिभा
कवी हृदयातील वेदना ,
विचारांचे काहूर.....

आज महाराष्ट्रात जवळजवळ ५०० ते ६०० मुस्लिम मराठी लेखक लिहीत आहेत. या सर्व लेखकांची किमान दीड हजार पुस्तके प्रकाशित आहेत. पण अनेक कारणामुळे ही ग्रंथसंपदा वाचकांना एकत्रितपणे उपलब्ध होत नाही. २०१६ रोजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, राज्यसभा सदस्य खासदार संजय काकडे आणि मा. श्रीमंत मालोजीराजे छत्रपती यांच्या उपस्थितीत 'मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्राची' मुस्लिम बोर्डिंग च्या भव्य इमारतीत उद्घाटन करून खऱ्या अर्थाने मुस्लिम मराठी साहित्य चळवळीतील ,मैलाचा दगड उभा केला आहे. तरीही विद्यापीठ पातळीवर मुस्लिम मराठी साहित्य संशोधकांसमोर खूप मोठ्या अडचणी उभ्या राहिल्या आहेत. या सर्व दृष्टीने सर्व मराठीत लेखन करणाऱ्या मुस्लिम लेखकाच्या आणि त्याचबरोबर मुस्लिम समाजाविषयी खूप मोठ्या आस्थेने लेखन करणाऱ्या मुस्लिमेतर लेखकांच्या साहित्यकृती एकत्रित करून संशोधकांना उपलब्ध करून देण्याचा 'मुस्लिम मराठी संशोधन केंद्राचा' मुख्य उद्देश होय.

'भाषा दोन समाजाला जोडते. ही शब्दांची ताकद आहे. भाषेला धर्म नसतो. ती भावनांचे पूल बांधत मने जोडण्याचे काम करते.' असे श्रीमंत शाहू महाराजांचे उद्गार आहेत.

आज मुस्लिम मराठी साहित्य विषयी अनेकांना कुतूहल वाटत आहे. आपल्या आसपास वावरणाऱ्या मुसलमानांच्या मनातील घालमेल समजावून घेण्यासाठी त्यांचे साहित्य वाचावे लागेल. त्यांच्याविषयी आपल्या मनात असलेले गैरसमज दूर करण्यासाठी आपल्याला त्यांच्या साहित्याचा अभ्यास करावा लागेल. ही जाण आता वाढत चाललेली दिसत आहे. आणि हे बदल सहजासहजी घडत नाहीत. अनेकांच्या अथक प्रयत्नामुळे हे शक्य आहे. पनवेल येथे झालेल्या अकरावे अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आपल्या उद्घाटनिय भाषणामध्ये मुस्लिम मराठी काव्य विश्वाबद्दल आपले मत व्यक्त करताना ते म्हणतात, 'हुसेन दलवाई यांच्या कवितेतील प्रश्न मार्मिक असून संवेदनशील रसिकाला अस्वस्थ करणार आहे.

मला शिवरायांचा अभिमान
मायबोली मराठीचा अभिमान
तरीही मी अफजुल्याची संतान ...?

असे मार्मिक प्रश्न ते आपल्या कवितेतून सर्वांसमोर ठेवतात.'

महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशातून मुस्लिम कवींच्या प्रतिभांना उधाण आले आहे. जी वेदना हुसेन दलवायची आहे ती जवळजवळ सर्वांचीच आहे. कवी मुबारक शेख यांची कविता भारतीय मुस्लिम काळजाचा हुंकार काव्यात्मक करते. डॉ. शेख इकबाल मिन्ने यांचे 'रुबाईया' हे पुस्तक रुबाईया काव्यप्रकाराच्या इतिहास व शास्त्रासह प्रत्यक्ष रुबाई चे दर्शन घडवते. असे अनेक मुस्लिम साहित्यिक मराठी साहित्य समृद्ध करण्यासाठी झटत आहेत.

निष्कर्ष:

१.मुस्लिम मराठी साहित्यिकांनी लिहिलेली समकालीन कविता ही आधुनिक मराठी साहित्याच्या प्रवाहातील एक महत्त्वाची आणि वेगळी ओळख निर्माण करणारी काव्यधारा आहे.

२. या कवितांमधून मुस्लिम समाजाचे जीवनानुभव, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, सामाजिक संघर्ष, अस्मिता, वेदना, प्रश्न प्रभावीपणे व्यक्त झालेल्या दिसून येतात.

३.समकालीन वास्तवाशी प्रामाणिक राहून ही कविता समाजातील विषमता, अन्याय, धार्मिक असहिष्णुता, स्त्री-अनुभव, ओळख-संकट आणि मानवी मूल्यांचे प्रश्न ठळकपणे मांडते.

४.मुस्लिम मराठी कवी-कवयित्रींनी आपल्या कवितेतून केवळ तक्रार किंवा विद्रोह न मांडता मानवी एकात्मता, समता, बंधुता आणि सहअस्तित्व यांचा आग्रह ही प्रकर्षाने जाणवतो.

५. भाषिक प्रयोगशीलता, प्रतिमांचा प्रभावी वापर, लोकजीवनाशी नाते आणि आत्मअनुभवाची प्रामाणिक अभिव्यक्ती ही या कवितेची वैशिष्ट्ये मानता येतील.

६. मुस्लिम मराठी समकालीन कविता ही मराठी साहित्याला वैचारिक समृद्धी देणारी, सामाजिक वास्तवाचे भान जागविणारी आणि बहुसांस्कृतिक भारतीय समाजाचे खरे स्वरूप अधोरेखित करणारी आहे.

७. त्यामुळे या काव्यप्रवाहाचा स्वतंत्र व सखोल अभ्यास करणे आवश्यक असून तो मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करतो, हे या संशोधनातून स्पष्ट होते.

संदर्भ ग्रंथ सूची:

१. मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप- संकलनः प्रा. फ.म.शहाजिंदे, प्रा. फारूख तांबोळी.
२. डॉ.श्रीपाल सबनीस यांचे ११ वे अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन मधील उद्घघाटक भाषण
३. लीकपिया...प्राचार्य डॉ.इ.जा. तांबोळी
४. समकालीन मराठी कविता -एक निरीक्षण ...प्रकाश देशपांडे केजकर
५. आंतरजाळ

लोकरंगभूमीवरील पंचमी विधीनाट्य स्वरूप आणि सामाजिक आशय ,परंपरा :

प्रा. गिरी घनश्याम आनंदगिर
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज तालुका कराड ,
जि. सातारा.
मोबाईल नंबर - ९७३०६०७३४

महत्वाचे शब्द :-पंचमी विधीनाट्य, लोकरंगभूमी, सोंगे, बोहाडा, भवाडा, पोवाडा, लोकसंस्कृती, समाजदर्शन, इतिहासदर्शन, लोकजागर

प्रास्ताविक:-

महाराष्ट्राच्या लोकरंगभूमीवर पंचमी हे एक महत्त्वाचे विधीनाट्य म्हणून ओळखले जाते. धार्मिक श्रद्धा, लोकविधी, नाट्य, नृत्य, संगीत आणि सामाजिक भान यांचा संगम असलेले पंचमी हे केवळ करमणुकीचे साधन नसून लोकजीवनाच्या अनुभवांचे सशक्त माध्यम आहे. पंचमी, भवाडा आखाडी, चैत्री, बोहाडा, आदिवासी पोवाडा इत्यादी लोकनाट्यप्रकार विविध देवदेवतांच्या संघाच्या रूपाने सोंगांच्या माध्यमातून सादर केले जातात. या संशोधन-पेपरमध्ये पंचमी विधीनाट्याचे स्वरूप, त्याची रचनात्मक वैशिष्ट्ये, प्रादेशिक भेद, तसेच समाजदर्शन, इतिहासदर्शन, बिभत्सता-अश्लीलतेचे स्वरूप आणि लोकजागर यांचा अभ्यास केला आहे. पंचमी हे विधीनाट्य लोकसंस्कृतीचे सजीव प्रतिबिंब असून समकालीन सामाजिक अभ्यासासाठीही ते महत्त्वाचे ठरते.

लोकसंस्कृती ही समाजाच्या सामूहिक जीवनानुभवांची अभिव्यक्ती असते. त्या अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम म्हणजे लोकरंगभूमी. महाराष्ट्राच्या लोकरंगभूमीवर पंचमी हे एक प्राचीन व महत्त्वाचे विधीनाट्य आहे. पंचमी ही केवळ धार्मिक परंपरा नसून ती समाजजीवनातील श्रद्धा, भीती, संघर्ष, अन्याय, विनोद आणि उपरोध यांचे नाट्यात्म रूप आहे. सोंगांच्या माध्यमातून देवदेवतांचे, पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक पात्रांचे सादरीकरण करून लोकजीवनाचे वास्तव उघड केले जाते.

लोकसाहित्य म्हणजे काय:- लोकसाहित्याला हजारो वर्षाची परंपरा आहे. हे साहित्य मौखिक परंपरेने पुढे आलेली आढळते. ज्या काळात लिखित स्वरूपाची साधने उपलब्ध नव्हती. अशा काळात हे साहित्य मौखिक परंपरेने टिकून राहिलेले आढळते. लोकसाहित्य हे लोकमानसाचा आविष्कार असते. हे साहित्य कोणा एकाच्या सृजनशीतेतेन निर्माण झालेले नाही तर ते समूह मनातून निर्माण झालेले आढळते. याविषयी डॉ. प्रभाकर मांडे लिहितात, लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजे लोकसाहित्य असते लोकसाहित्य लोकांचे असते, व्यक्तींचे कधीही नसते. लोकसाहित्याची निर्मिती कशी होते त्याचा संचय कसा होतो आणि ते एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत संक्रमित कसे होते यासंबंधी विचार करताना परंपरेचे सूत्र लक्षात घ्यावे लागते." १

लोकसाहित्याला एक सामाजिक परंपरा असते हे प्रभाकर मांडे यांनी सांगितले आहे. लोकसाहित्य हे लोकमानसाचा आविष्कार असते याबद्दल डॉ.सत्येंद्र म्हणतात, लोकसाहित्यात आदिमानवाची अभिव्यक्ती असते प्रारंभीच्या अप्रगत अशा अवस्थेतून आजचा मानव समाज विकसित आणि प्रगत झाला असला तरी त्यांच्या निरनिराळ्या अभिव्यक्तीत आदिम अभिव्यक्तीचे अवशेष राहिलेले असतात. हे अवशेष म्हणजेच लोकसाहित्य(लोकवार्ता किंवा Folklore)" २

असे डॉ. सत्येंद्र यांनी म्हटल्याप्रमाणे लोकसाहित्य हे लोकमानसातून निर्माण होते. हे विधान यथार्थ आहे.

लोकसाहित्याबददल डॉ. तारा भवाळकर लिहितात, लोक जीवनातील लोक ही संज्ञा समूहवाचक संज्ञा आहे परंतु येथे लोक म्हणजे केवळ अनेक व्यक्तींचा समूह एवढाच अर्थ विपरीत नाही येथे समूह मनाचे अधिष्ठान अभिप्रेत आहे मग तो समूह केवळ ग्रामीणच असेल असे नाही या साहित्याच्या निर्मितीमागे अबोध समूह मनाच्या प्रेरणा असतात समूह मनाच्या प्रेरणेने जगते विकसित होते ते ते सर्व साहित्य म्हणजे लोकसहित्य(Folklore)होय. " ३ अशा प्रकारे समूह मनाच्या अआविष्कारातूनच लोकसाहित्य निर्माण झालेले आढळते.ही परंपरा पुढे मौखिक परंपरेने अव्याहतपणे चालू राहिलेले आढळते. या आविष्कारातून लोक आपले दुःख, आनंद, व्यथा ,वेदना इ. भावभावनांचे विरेचन करत असत. लोक जीवनातील जगण्यातील भावनांचा आविष्कार करण्याचा हा एकमेव मार्ग होता. हे पहायला मिळते.

पंचमी विधीनाट्याचे स्वरूप

पंचमी हे विधीनाट्य धार्मिक विधी आणि नाट्यरूप सादरीकरण यांचा संगम आहे. यामध्ये अभिनय, नृत्य, गायन, संवाद, वेशभूषा आणि मुखवटे (सोंगे) यांना महत्त्व आहे. पंचमी, भवाडा आखाडी, चैत्री इत्यादी लोकनाट्यप्रकार देवदेवतांच्या संघाच्या रूपाने सादर होतात. प्रत्येक सोंग हे केवळ पात्र नसून ते सामाजिक प्रतीक असते.

प्रादेशिक परंपरा आणि पंचमी

कोकणातील बोहाडा व पंचमी या परंपरांमध्ये रामायण-महाभारतकालीन तसेच स्थानिक लोकदैवतांची सोंगे आढळतात. बोहाडा अधिक पौराणिक स्वरूपाचा असला तरी पंचमीमध्ये ग्रामदैवतांबरोबरच सामाजिक व्यक्तिरेखाही दिसतात. आदिवासी समाजात पोवाडा व पंचमी यांच्या संयोगातून वीरपूजा, जमातीचा इतिहास आणि सामूहिक स्मृती जतन केल्या जातात. खानदेशातील भवाडा आणि पंचमी या प्रकारांत विनोद, उपरोध, बिभत्सता आणि उघड वास्तववादी मांडणी अधिक तीव्र स्वरूपात दिसून येते. या भिन्न प्रादेशिक परंपरांमुळे पंचमीचे स्वरूप बहुआयामी बनते.या बोहाडा विषयी द.ता.भोसले लिहितात, कोकणात जसे दशावतारी खेळ सादर केले जातात तसे महाराष्ट्राच्या पश्चिम भागात सादर केले जात नाहीत पण नाशिक धुळे आणि त्या परिसरात पोवाडा नावाचा एक मनोरंजनाचा खेळ सादर केला जातो त्याची जात कुळी थोडीफार या दशावतारी खेळासारखी म्हणावी लागेल या बोहाडयालाच काही भागात आखाडी असेही म्हणतात."४ यामधून लेखक द.त्ता. भोसले यांनी बोहाडयाचे स्वरुप आणि प्रादेशिकता व्यक्त केली आहे.

पंचमीची रचना : पूर्वरंग व उत्तररंग

पंचमी विधीनाट्याची रचना प्रामुख्याने पूर्वरंग व उत्तररंग अशा दोन भागांत विभागलेली असते. पूर्वरंगात भूमिपूजन, देवतांचे आवाहन, व्रत-विधी, मंत्रोच्चार आणि मंगलाचार होतात. हा भाग धार्मिक आणि विधीप्रधान असतो. याविषयी लोकरंगभूमी या पुस्तकात डॉ.प्रभाकर मांडे लिहितात,"पंचमीची सुरुवात सूत्रधार आणि त्याचे साथीदार यांची वेशभूषा कंगनीदार पगडी घोळदा रंगरखा अंगावर बांधलेले उपरणे धोतर कमरेला बांधलेला शेला अशी असते. पंचपदीत गणेश सरस्वती आणि इतर देवता विशेषतः ग्रामदेवता यांना आवाहन केले जाते. सूत्रधार समोर तिने बाजूने बसलेल्या प्रेक्षकांना उत्सवाचे स्वरूप सांगतो यावेळी सूत्रधार आणि गावातील उपस्थितांपैकी प्रमुख यांचा संवाद होतो संवादाचे स्वरूप ठरलेले नसले तरी गावकरी कोण कोणती सुंगे घेणार आहेत असे विचारतात आणि सूत्रधार एकूण संघासंबंधी माहिती देतो त्यानंतर गणपतीची आणि सरस्वतीचे सोंग येथे गणपतीची पूजाअर्चा त्यांचे नमन घेत चालू असतानाच विदूषकाचे आगमन घडते."०५ अशी पंचमीच्या पूर्व रंगाबद्दलबद्दल लेखक प्रभाकर मांडे यांनी माहिती घेतली सांगितले आहे. उत्तररंगात विविध सोंगांचे प्रवेश, नाट्यात्मक संवाद, नृत्य-गायन आणि विनोदी-उपरोधिक प्रसंग सादर होतात. याच भागात समाजजीवनावर थेट भाष्य केले जाते.

समाजदर्शन आणि इतिहासदर्शन

पंचमीतील सोंगांतून समाजदर्शन प्रभावीपणे घडते. जातीय विषमता, सामाजिक अन्याय, शोषण, स्त्री-पुरुष संबंध, सत्तेचा गैरवापर यांवर थेट भाष्य केले जाते. आदिवासी व ग्रामीण समाजातील इतिहास, वीरगाथा आणि

स्थानिक संघर्ष यांचे चित्रण करून इतिहासदर्शन घडवले जाते. पंचमी ही लिखित इतिहासाची पूरक परंपरा म्हणूनही महत्त्वाची ठरते. आदिवासी समाजामध्येही देवतावतरणाचा विधी केला जातो. एक सामूहिक विधी म्हणून याकडे पाहिले जाते. काही अंधश्रद्धाही यामध्ये आढळून येतात.लेखक प्रभाकर मांडे यांनी देवतावतरणाचा विधी अनुभवला. ते आपल्या लोकरंगभूमी या पुस्तकात लिहितात, नांदेड जिल्ह्याच्या किनवट तालुक्यातील जवरला , बुधवार पेठ ,कोलामपेड या गावांत प्रस्तुत लेखक दंडाराचा वैशिष्ट्यपूर्ण विधी पाहिला. गावात शिरत असताना एका झाडाखाली एक स्त्री बसलेली दिसली. कशी केल्यावर कळले की, गाव गाव बांधलेले असल्यामुळे तिला गावाबाहेर बसू लागले आहे. कारण तिचे ते दिवस मासिक पाळीचे होते. सर्वसाधारणपणे गाव बांधल्यावर परक्या माणसांना गावात येऊ देत नसत. इतकेच नव्हे तर, 'पेरसापेन या देवतेला त्याचा बळी देत. आता ही रुढी कायद्याने बंद झाली असून, आदिवासींच्या यासंबंधीच्या एकेकाळी दृढ असलेल्या समजूतीतही परिवर्तन होऊ लागले आहे.०६

अशा रीतीने या विधीतून आदिवासी समाजातील रूढी परंपरा, व अंधश्रद्धा याविषयीचा प्रत्यय येतो. हे आता थांबले आहे. आदिवासी समाजात या विधीच्या प्रसंगी, नाट्य व नृत्य इ.चे सादरीकरण केले जाते.

बिभत्सता, अश्लीलता आणि लोकजागर

पंचमीतील काही सोंगांत आढळणारी बिभत्सता व अश्लीलता ही केवळ विकृती नसून लोकनाट्याची अभिव्यक्तीपर शैली आहे. या माध्यमातून समाजातील दांभिकता, नैतिक ढोंग आणि दडपशाही उघडी केली जाते. देवतांच्या सोंगांमधून लोकांना सामाजिक मूल्यांची जाणीव करून दिली जाते आणि लोकजागर निर्माण होतो.

निष्कर्ष:-

पंचमी विधीनाट्य हे महाराष्ट्राच्या लोकरंगभूमीचे एक महत्त्वाचे अंग आहे. धार्मिक विधी, नाट्य, समाजदर्शन आणि इतिहासदर्शन यांचा संगम असलेले पंचमी हे लोकसंस्कृतीचे सजीव प्रतिबिंब आहे. समकालीन समाजाचा अभ्यास करण्यासाठी पंचमीसारख्या लोकनाट्यपरंपरांचा संशोधनात्मक अभ्यास आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथसूची:-

१)लोकसाहित्याचे स्वरूप-प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, पाचवी आवृत्ती , सप्टेंबर २००९, पृष्ठ क्रमांक १०

२)उ.नि. पृष्ठ क्रमांक २९

३) लोक परंपरा आणि स्त्री प्रतिभा: तारा भवाळकर, लोक वांड.मयगृह, मुंबई , तिसरी आवृत्ती ,जानै २००८. पृष्ठ क्रमांक ०२

४)संस्कृतीच्या पाऊलखुणा-द.ता भोसले, पदमगं प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती जून २०१३, पृष्ठ क्रमांक १३६,१३७.

५) लोकरंगभूमी परंपरा स्वरूप आणि भवितव्य डॉ .प्रभाकर मांडे, मधुराज पब्लिकेशन्स, प्रा.लि., पुणे, प्रथम आवृत्ती प्रथम आवृत्ती १५ जुलै २००७

६) उ.नि. पृष्ठ क्रमांक १२७.

मा. शं. मोरे यांनी पाली ग्रंथांच्या अनुवादासाठी दिलेले योगदान

प्रा.(डॉ.) प्रशांत बाबासो गायकवाड
मराठी विभाग
श्री. विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ वडगाव
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर. पिन ४१६११२
मो.९८२२४३८७४३ मेल- drprashantgaikwad76@gmal.com

प्रस्तावना:

तथागत गौतम बुद्धांच्यावरील मराठी साहित्य हे पाली तिकिटातून विविध भाषांतून अनुवादित झालेल्या अनेक ग्रंथांवरून आलेले आहे. मूळ पाली तिपिटकाच्या आधारे मराठी, इंग्रजी, हिंदी इत्यादी भाषांमधून बुद्धांचे व्यक्तित्व व चरित्र यांचे लेखन झालेले आढळते.

तिपिटकाचा आशय इंग्रजी, हिंदी, संस्कृत इत्यादी भाषातूनही अनेक ग्रंथकारांनी मांडला आहे. अनेकदा पाली तिपिटकाचा अनुवाद हा थेट मराठीमध्ये न होता आधी इंग्रजी, हिंदी व इतर भाषांतून झाला आहे. आणि नंतर त्या भाषांतून मराठीमध्ये अनुवादाचा प्रवास झालेला पहावयास मिळतो. पाली, संस्कृत, इंग्रजी, हिंदी यांसारख्या भाषांतून मराठीमध्ये अनुवादित साहित्य मोठ्या प्रमाणावर येत आहे. त्यामुळे मराठी वाचकांना व इतर भाषांतील साहित्य समजण्यासाठी मोठी सोय झालेली आहे. अनुवादाच्या माध्यमातून विविध भाषांचा एकमेकींशी असणारा सहसंबंध, संस्कृती, साहित्य, परंपरा, वारसा, सामाजिक चालीरीती इत्यादींचा परिचय होऊन मानवी जीवनातील समृद्धीस हातभार लागतो. विचार आणि दृष्टिकोनाच्या कक्षा रुंदावण्यास मदत होते. माणसाच्या जडणघडणीमध्ये, विचारांच्यामध्ये भाषा ही अत्यंत मोलाची कामगिरी करीत असते. जीवनातील विविधतेचे दर्शन घडवत असते. पाली वाङ्मयाने मराठी साहित्य विश्वाला अनेक विषय पुरविले आहेत. नवी दिशा दिली आहे. बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांच्या प्रेरणेने धर्मानंद कोसंबी,पी.व्ही.बापट, चिं.वै.राजवाडे, भदंत आनंद कौशल्यायन, राहुल संस्कृत्यायन, मा.शं.मोरे, भाऊ लोखंडे, इत्यादींनी देखील यासंदर्भात मोलाचे योगदान दिले आहे. येथे आपण मा. शं. मोरे यांनी पाली ग्रंथांच्या अनुवादासाठी दिलेले योगदान पाहणार आहोत.

मा. शं. मोरे यांनी पाली ग्रंथांच्या अनुवादासाठी दिलेले योगदान -

मा. शं. मोरे यांनी यांनी तिपिटकातील ग्रंथाचा मराठी मध्ये १९८७ पासून अनुवाद केला आहे. बौद्ध वाङ्मयावर आधारित त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. मोरे हे सुमारे २५ ते ३० वर्षांहून अधिक काळ पालीतील साहित्याचा मराठीत अनुवाद करण्यात व्यस्त होते. बौद्ध वाङ्मयाला त्यांनी दिलेले योगदान हे मराठी बौद्ध वाङ्मयाच्या इतिहासात अत्यंत मोलाचे असे आहे. आतापर्यंत त्यांनी इतर ग्रंथांच्या बरोबरच मज्झिम निकाय भाग १ ते ३, अंगुत्तर निकाय भाग १ ते ४, संयुक्त निकाय भाग १ ते ४, विनयपिटक भाग १ ते २ इत्यादी पाली तिपिटकातील ग्रंथांचा मराठीत अनुवाद केला आहे. पालीचा इतका प्रचंड व्यासंग करून मराठी बौद्ध साहित्यात त्यांनी जी मोलाची भर घातली आहे, त्याबद्दल कोणत्याही अभ्यासकाने त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करावी, असेच हे योगदान आहे. पाली तिपिटकाची सुत्तपिटक, विनयपिटक, अभिधम्मपिटक या तीन तिपिटकांमध्ये विभागणी केली जाते. मराठीमध्ये सुत्तपिटकाचा अनुवाद अनेक अभ्यासकांनी केलेला आहे. मा. शं. मोरे यांनी केलेल्या सुत्तपिटकाचा आपण येथे थोडक्यात परिचय करून घेणार आहोत तो पुढील प्रमाणे.

सुत्तपिटक

सुत्तपिटकांमध्ये दीघनिकाय, संयुक्तनिकाय, अंगुत्तरनिकाय, खुदकनिकाय, यांचा समावेश होतो. दीघनिकाय मध्ये मज्झिमनिकाय, महावग्ग आणि पथिकवग्ग असे तीन वग्ग ३४ सुत्त आणि ६४ भाणवार आहेत. मज्झिमनिकाय हा सुत्तपिटकाचा दुसरा निकाय आहे. त्यात एकूण १५२ सुत्ते असून त्यांची विभागणी तीन विभागात केली जाते. १.मूलपण्णासक २. मज्झिम पण्णासक आणि ३. उरिपण्णासक अशा तीन विभागात विभागणी केलेली आहे. यातील पहिल्या दोन पण्णासकांमध्ये ५० - ५० सुत्त आहेत. आणि तिसऱ्या पण्णासकात ५२ सुत्त आहेत. संयुक्त निकायांमध्ये १ सगाथ वग्ग २. निदान वग्ग ३ खंन्धवग्ग ४ सळायतन वग्ग आणि ५ महावग्ग या पाच वग्गात विभागणी केली जाते. प्रत्येक वग्गात विभिन्न संयुताचा (संयुक्तांचा) संग्रह केला गेला आहे.

अंगुत्तर निकाय हा चौथा निकाय असून यामध्ये १ एकक निपात, २. दुकनिपात ३. तिकनिपात ४. चतुक्कनिपात, ५. पंचकनिपात, ६. छक्कनिपात, ७. सत्तकनिपात, ८. अट्ठकनिपात,९. नवकनिपात, १० दसकनिपात, ११. एकादसकनिपात हे ११ निपात यांचा समावेश होतो. यातील सर्व निपात हे अनेक वग्गात विभक्त आहेत. खुद्द्कनिकाय हा सुत्तपिटकाचा पाचवा निकाय असून यामध्ये पुढील १५ ग्रंथांचा समावेश होतो.

१. खुद्दकपाठ, २. धम्मपद,३. उदान, ४. इतिवुतक, ५. सुत्तनिपात, ६. विमानवत्थु, ७. पेत वत्थु, ८. थेरगाथा, ९. थेरीगाथा, १०. जातक, ११. निद्देस, १२. पटिसम्मिद वग्ग, १३. अपदान, १४. बुद्धवंस, १५. चरियापिटक ही सुत्तपिटकाची स्थूल मांडणी केलेली आहे. यावरून सुत्तपिटकाचे विशाल रूप आपल्यासमोर येते. यामधून पालीग्रंथांचा परिचय होईल आणि खुद्दकनिकाय वगळता मा. शं.मोरे यांनी सुत्तपिटकाच्या अनुवादासाठी घेतलेले कष्ट देखील समजण्यास मदत होईल. या क्षेत्रातील त्यांचा व्यासंग आणि अधिकार लक्षात येईल.

मा.शं. मोरे यांनी सुत्तपिटकाचा मराठी अनुवाद विविध ग्रंथांच्या मांडणीतून केला असून त्यांचे या क्षेत्रातील योगदान, व्यासंग आणि त्यांनी घेतलेले कष्ट समोर यावेत या मर्यादित हेतूने आपण त्यांच्या ग्रंथातील काही उदाहरणातून आढावा घेणार आहोत. तथागत बुद्धांनी केलेला उपदेश साधारणपणे चार प्रकारात विभागला जातो.

१. **अत्थज्झासय :** म्हणजे स्वतःला वाटले म्हणून केलेला उपदेश

२. **परज्झासय :** म्हणजे दुसऱ्यांचा कल पाहून केलेला उपदेश

३. **पुच्छवासिक :** म्हणजे प्रश्नकर्त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना केलेला उपदेश आणि

४. **अट्ठपटिक** : म्हणजे विशिष्ट प्रसंग अथवा कारणांनी केलेला उपदेश, इत्यादी.

तथागतांनी केलेला उपदेश अतिशय विशाल असून त्यांचा मोठ्या प्रमाणातील उपदेश मा. शं. मोरे यांनी अभ्यासून तो मराठीत आणला आहे. हे एक मोठे कार्य होय. त्याबद्दल मा. शं. मोरे यांचे अभिनंदन केले पाहिजे, त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. तथागतांच्या उपदेशातील गांभीर्याचे भान त्यांच्याजवळ आहे, हे त्यांच्या खालील विधानावरून स्पष्ट होते. ते लिहितात,"त्रिपिटकातील पाली ही अत्यंत समृद्ध भाषा आहे. त्या मानाने मराठी भाषा अगदीच अपुरी पडते... असे असून सुद्धा सर्वसामान्य मराठी वाचकांना मराठी भाषेत बुद्ध वचनांचा परिचय करून देण्याचे कार्य मी अंगीकारले आहे. बुद्धवचनांना योग्य शब्दात सांगितले नाही, तर त्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची मला पूर्ण जाणीव आहे." [१] भाषेच्या वापराचे पक्के भान मोरे यांना असल्याचे देखील वरील विवेचनावरून स्पष्ट होते. भाषांतर करताना भाषेच्या वापरामागील नेमकी अडचण स्पष्ट करताना व या क्षेत्रातील नवीन अभ्यासकांना पुढील दिशा स्पष्ट करताना पुढे ते लिहितात,"त्रिपिटकात ठिकठिकाणी तेच तेच वाक्यसमूह किंवा परिच्छेद निरनिराळ्या संदर्भात आले आहेत. भगवान बुद्धांचा उपदेश ऐकताना श्रोतुवर्गावर त्याचा योग्य तो परिणाम होत असला पाहिजे, शिवाय भाषासौंदर्याच्या दृष्टीने ते योग्यच होते. आधुनिक काळातील सर्वसामान्य वाचकांना अशा प्रकारची पुनरावृत्ती आवडणार नाही. शिवाय पुस्तकाची किंमत कमीत कमी ठेवण्याच्या दृष्टीने अशा प्रकारची पुनरावृत्ती फक्त...*अशा खुणेने सुचित करणे सोयीस्करच वाटले.... त्रिपिटकात वापरलेल्या काही पाली शब्दांचे योग्य मराठी भाषांतर करता

येणे शक्य नाही, म्हणून प्रस्तुत अनुवादात काही महत्त्वाचे शब्द मूळ पाली शब्दच - आहेत आणि कंसात त्याचा मराठी अर्थ दिला आहे." [२] अनुवाद करताना येणाऱ्या अडचणी मोरे यांनी इतक्या प्रांजलपणे स्पष्ट करून तथागत बुद्धांचा त्यांच्यावरील प्रभाव स्पष्ट केला आहे. मा. शं. मोरे यांनी अनुवादासाठी वापरलेली भाषा साधी, सोपी, सरळ, ओघवती असून मराठी वाचकांची अभिरुची, त्यांचे पूर्वज्ञान इत्यादी गोष्टी ध्यानात घेऊन भाषा वापरलेली आहे. त्यांच्या अनुवादातील भाषेची वैशिष्ट्ये दाखविणारे काही नमुने उदाहरणादाखल पुढील प्रमाणे पाहू.

राजा पसेनदी याला जीवनातील अनित्यता स्पष्ट करताना तथागतांच्या तोंडी पुढील भाषा आलेली आहे. त्यामध्ये ते म्हणतात,"महाराज कुंभाराचे जितके घडे आहेत. कच्चेसुद्धा आणि पक्केसुद्धा _ सर्व फुटून जाणार आहेत. एक ना एक दिवशी त्यांचे फुटणे अटळ आहे. फुटण्यापासून ते कोणत्याही तऱ्हेने वाचू शकत नाहीत. महाराज, बस्स अगदी असेच. जसे सर्व जीव मरणाशील आहेत. एक ना एक दिवशी त्यांचे मरणे अटळ आहे. मरण्यापासून ते कोणत्याही तऱ्हेने वाचू शकत नाहीत." [३] यावरून त्यांच्या भाषेतील ओघवतेपणा अनुवादातून जाणवतो. भिक्खूंना पिंडपाताचे विशेष महत्त्व व त्यामागील पार्श्वभूमी सांगताना पुढीलप्रमाणे भाषा आलेली आहे."भिक्खूंनो, हे जे भिक्षाटन करून जगणे आहे ते सर्व जीविकामध्ये हीन आहे, परंतु तुम्ही आपल्या हातात पात्र घेऊन सर्व अभिमानाला सोडून भिक्षाटन करीत फिरत आहात. भिक्खूंनो, हे कुलपुत्र आपल्या कोणत्या उद्देशासाठी असे करीत असतात. ते कोणा राजा किंवा कोणा चोरापासून शिक्षा होऊन असे करीत नाहीत. कोणाच्या भीतीमुळे किंवा दुसरी जीविका न मिळाल्यामुळे असे करीत नाहीत. परंतु जन्म, जरा, मृत्यू, शोक, रडणे, ओरडणे, दुःख, दौर्मनस्य आणि उपायास यांच्यापासून मुक्त होण्यासाठीच ते असे व्रताचरण करीत असतात, की ज्यामुळे आम्हाला या विशाल दुःख राशींचा अंत मिळेल. भिक्खूंनो, कुलपुत्र अशी महत्त्वाकांक्षा घेऊन प्रव्रजित होत असतो." [४]

अनुवादातील भाषेचा एक ओघवतेपणाचा नमुना म्हणून देखील वरील तथागत व भिक्खूंमधील संवादात पाहता येईल. तसेच पिंडपातामागची तथागतांची क्रांतिकारक दृष्टी देखील समजावून घेता येईल. अनुवादकांनी केलेल्या अनुवादातून जसे त्यांच्या भाषाशैलीला समजून घेता येईल तसेच भाषेतून व्यक्त होणाऱ्या तथागतांच्या व्यक्तिमत्त्वाला देखील समजून घेता येते.

येथे आपण अनुवादाची दिशा सूचित व्हावी, या मर्यादित हेतूने मा.शं. मोरे यांनी या क्षेत्रासाठी दिलेले योगदान व त्यांनी केलेल्या ग्रंथातील अनुवादाचा थोडक्यात परामर्श घेतला आहे.

निष्कर्ष –

१.पाली भाषेचा व्यासंग करून मा.शं.मोरे यांनी मोलाची भर घातली आहे.

२.पाली भाषा ही अतिशय समृद्ध आहे. त्या तुलनेत मराठी भाषेच्या मर्यादा ध्यानात घेऊन मोरे यांनी बुद्धवचनांना योग्य शब्दात लोकांसमोर आणलेले आहे.

३.मा.शं.मोरे यांनी अनुवादासाठी वापरलेली भाषा साधी, सोपी, सरळ, ओघवती असून मराठी वाचकांची अभिरुची, त्यांचे पूर्वज्ञान इत्यादी गोष्टी ध्यानात घेऊन भाषेचा वापर केलेला आहे. तो वाखाणण्याजोगा आहे.

सदर्भसूची –

१. मोरे मा. शं. (अनुवाद), मज्जिम निकाय भाग १, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती: १ ऑगस्ट २००६, प्रस्तावना पृष्ठ क्रमांक ७
२. तैत्रेव्, प्रस्तावना पृष्ठ क्रमांक ७,८
३. मोरे मा.शं. (अनुवाद), संयुक्त निकाय, भाग १, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद द्वितीय आवृत्ती, ९मे २००९, पृष्ठ क्रमांक, ७८
४. मोरे मा. शं. (अनुवाद) कुऱ्हाडे भाऊ, संयुक्त निकाय,२ आनंद प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, ६ डिसेंबर १९९९, पृष्ठ क्रमांक, ४०१

महाराष्ट्रातील आदिवासी महादेव कोळी जमातींची बोलीभाषा

मार्गदर्शक
डॉ.प्रभाकर घोडके
एच.व्ही.देसाई कॉलेज, पुणे

संशोधक मराठी विभाग
श्रीमती. सुवर्णा भिमाची धादवड
सावित्रीबाई पुणे विद्यापीठ, पुणे

प्रस्तावना :

मराठी भाषेचा इतिहास पाहता ती अतिशय जुनी भाषा आहे.सुमारे दिड ते दोन हजार वर्ष वय असणारी ही भाषा आहे. संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम,एकनाथ, रामदास यांसारख्या संतांनी आपल्या साहित्यकृतीतून मराठी भाषेची उंची वाढवली आहे. तदनंतर स्वातंत्र्यपूर्व कालखंडात व स्वातंत्र्योत्तर काळात अनेक साहित्यिकांनी मराठी भाषेला आपल्या लेखणीतून अधिक समृद्ध करण्याचे काम केले आहे. त्यामुळे 3 ऑक्टोबर २०२४ मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणून दर्जा मिळालेला आहे.मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे.स्थानपरत्वे ती प्रत्येक भागात वेगवेगळी बोलली जाते. उत्तर पश्चिम महाराष्ट्रात अहिराणी,दक्षिण कोकणात मालवणी, विदर्भात वऱ्हाडी भाषा बोलली जाते. तसेच महाराष्ट्रामध्ये अनेक धर्माचे व जातीजमातीचे लोक राहतात. त्यांच्याही भाषा वेगवेगळ्या आहेत.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. यामध्ये महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी १५ जिल्ह्यांमध्ये ४५ आदिवासी जमातींचे वास्तव आढळून आले.त्यामध्ये गोंड, भिल्ल, महादेव कोळी,वारली, कोकणा, ठाकर,कातकरी, कोरकू, कोलाम,पारधी, इत्यादी प्रमुख जमातींचा समावेश आहे.मग हे आदिवासी म्हणजे नक्की कोण आहेत. हया संदर्भात अनेक अभ्यासकांनी वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत.

त्यातील काही महत्त्वाच्या व्याख्या -

पंडित लक्ष्मण शास्त्री जोशी " नागर संस्कृती पासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होय." १

डॉ. गोविंद गारे -भौगोलिक दृष्ट्या इतरांपासून नेहमीच दूर म्हणजेच गिरीकंदरात राहिल्यामुळे जंगलात राहणारा निसर्गाच्या सानिध्यात वाढलेला म्हणजे आदिवासी होय. "२

डॉ.रिव्हर्स - ज्या समूहातील लोक एक समान भाषा बोलतात.युद्ध वगैरे सारख्या उद्दिष्टपूर्तीकरिता एक होऊन झटतात,अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला आदिवासी समाज म्हणतात."३

गिरीन आणि गिलील-" एका विशिष्ट भू-प्रदेशावर राहणारा, समान बोली बोलणारा व समाज संस्कृती जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाच्या समुच्चयाला आदिवासी म्हणतात. "४

वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते की, आदिवासी समाज म्हणजे नागरी जीवनाशैली पासून अतिशय दुर्गमभागात, डोंगरात, जंगलात, दऱ्याखोऱ्यातील निसर्गाच्या सानिध्यात जीवन व्यतीत करणारा मानवी समूह होय.

महाराष्ट्र राज्यात आदिवासी लोक ज्या भागात राहतात त्या भागांचे भौगोलिक दृष्ट्या तीन विभाग पडतात

१.**सह्याद्री पर्वताचा विभाग** - या विभागात महादेव कोळी,वारली,कोकणा,ठाकर,कातकरी या जमाती आढळतात. या जमाती नाशिक, पुणे,अहिल्यानगर,रायगड व ठाणे या जिल्ह्यामध्ये वास्तव्य करतात

२.**सातपुडा पर्वतरांग** - या विभागात भिल्ल, कोकणा,गावित,दुबळा,कोरकू, धनका, तडवी,पावरा या जमाती आढळतात. ह्या विभागात धुळे, नंदुरबार, जळगाव,संभाजीनगर,अमरावती या जिल्ह्यांचा समावेश होतो

३.**विदर्भाचा डोंगराळ भाग** - या विभागात गोंड,माडिया, कोरकू,कोलाम,परधान, अंध आदिवासी या जमाती आढळतात. या विभागात . चंद्रपूर, भंडारा,गडचिरोली,यवतमाळ व नागपूर या जिल्ह्यांचा समावेश होतो

वरील मानवी समूहातील अनेक लोक अज्ञानी,असाक्षर आहेत.त्यामुळे त्यांच्या भाषेमध्ये अनेकदा प्रमाण भाषेचा अभाव जाणवतो.अशा जवळजवळ ७४ बोलीभाषा आदिवासी जमातीत बोलल्या जातात. उदा. भिल्ली,गोंडी,मावळी,डांगाणी, पावरी इत्यादी.

बोलीभाषा:

"बोलीभाषा म्हणजे एखाद्या भौगोलिक प्रदेशात किंवा सामाजिक गटात बोलली जाणारी व प्रमाण भाषेपेक्षा वेगळे उच्चार व वेगळा बाज असणारी भाषा म्हणजेच बोलीभाषा होय".

"विशिष्ट लोकसमूहाची मौखिक परंपरेतून विकसित झालेली भाषा म्हणजेच बोलीभाषा होय"

महादेव कोळी जमातीची बोलीभाषा:

आदिवासी जमाती मधील महादेव कोळी एक प्रमुख जमात आहे. सह्याद्रीच्या पश्चिम डोंगराळ भागात सूर्य मावळतो म्हणून त्या भागाला मावळ संबोधतात. त्या ठिकाणी राहणाऱ्या महादेव कोळी लोकांना 'मावळी' म्हणून ओळखतात.ते जी भाषा बोलतात तिला ' मावळी बोली ' म्हणतात.आजही देशावरील लोक या भागातील लोकांना मावळी लोक असेच म्हणतात. तसेच अकोला,ओतूर,डांगण, राजूर पठार या भागात राहणारे महादेव कोळी जमातीतील लोक जी भाषा बोलतात तिला ' डांगाणी बोलीभाषा ' म्हणतात.नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर परिसरात बोलल्या जाणाऱ्या भाषेला 'महालदेशी' असेही म्हणतात. महादेव कोळी जमातीच्या या बोलीवर मराठी भाषेचा ठळक प्रभाव जाणवतो. अलीकडच्या काळात मावळी बोलीचे मूळ स्वरूप बदलत आहे. अनेक लोक नोकरीनिमित्त शहराकडे येतात त्यांच्या बोलीभाषेत व सुशिक्षित तरुणवर्ग यांच्या बोलीभाषेत प्रमाण मराठी भाषेतील शब्दांचा व आजूबाजूला राहणाऱ्या परप्रांतीय लोकांच्या शब्दाचा समावेश दिसतो.

मावळी बोलीचे अभ्यासक डॉ. अमोल वाघमारे म्हणतात, "मावळी बोली ही मराठीची स्थानिक बोलीभाषा आहे. या भाषेचे संशोधन होऊन या भाषेचा शब्दकोश, व्याकरण लिहिले गेले पाहिजे. ही बोली नवीन पिढी विसरू लागली आहे.महादेव कोळी समाज व संस्कृती समजून घेण्यासाठी मावळी बोली निश्चितच उपयुक्त ठरणार आहे."५

आदिवासी मावळी व डांगाणी बोली भाषेचे महत्व:

आदिवासी बोलीभाषा म्हणजे फक्त संवादाचे साधन नाही तर त्या विशिष्ट समूहाच्या संस्कृती,परंपरा व इतिहासाचे प्रतिक आहेत. माणसांच्या विचारांना त्या आकार देतात. समाजाला संवादाद्वारे बांधून ठेऊन संस्कृती जपण्याचे महान कार्य करतात. या बोलीभाषेमुळे समाजातील व्यक्तींचे राहणीमान, वर्तणूक, सामाजिक सहसंबंध यांची माहिती मिळते. या बोलीभाषांमुळे मानवाचा भाषिक विकास होतो. सामाजिक मूल्य व संस्कृती यांना बळकटी मिळण्यास मदत होते.

आदिवासी मावळी व डांगाणी बोलीभाषेचे स्वरूप :

या बोलीभाषेत रुबाब आणि ठसका असतो
ही भाषा हेल काढून बोलली जाते
वाक्यातील शेवटच्या शब्दांचा उच्चार लांबट पद्धतीने केला जातो.
या बोलीभाषेची बोलण्यातील लकबच वेगळी आहे.

आदिवासीच्या मावळी बोली व डांगाणी बोलीतील साहित्यनिर्मिती:

आदिवासी मावळी बोली व डांगाणी बोली या दोन्ही भाषांमध्ये अनेक साहित्यिकांनी साहित्य निर्माण केलेले आहे. त्यामध्ये डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांची ' डांगाणी ' ही कादंबरी, कवी तुकाराम धांडे यांचा ' वळीव ' हा काव्यसंग्रह,डॉ.संजय लोहकरे यांचा ' डांगाणी माणसं ' हा कथासंग्रह. डॉ.मारुती आढळ यांचा ' वाघबारस ' हा कथासंग्रह याशिवाय अनेक नियतकालिकांतून आदिवासी लेखक आणि कवींनी लेखन केले आहे. त्यामध्ये हाकारा,फडकी, बडकरी, भलर यांच्यासारखी पन्नासहून अधिक नियतकालिके आदिवासी साहित्य प्रवाहासाठी

वाहिलेली आहेत.त्यामध्ये कथा, कविता,नाटक, विविध शुभ प्रसंगी, धार्मिक विधी निमित्ताने म्हटली जाणारी लोकगीते,गाणी, यांचे लेखन करून बोलीभाषेला जीवंत ठेवण्याचे काम या दिग्गज मंडळींनी केले आहे.

प्रा. यशवंत भांडकोळी म्हणतात " कोणत्याही भाषेचे वैभव त्या भाषेच्या शब्दसंग्रहावरून प्रथम दर्शनी सिद्ध होत असते मानवी जीवन जितके वैशिष्ट्यपूर्ण आणि समृद्ध असेल, त्याचप्रमाणे त्या जीवनाला व्यक्तिरूप देणाऱ्या भाषेचा शब्दसंग्रहाने समृद्ध असतो. शेवटी कोणतीही बोली तिच्या शब्दसंग्रहाने समृद्ध होते. डांगणातील आदिवासी महादेव कोळी बोली अशी समृद्ध आहे. या बोलीमध्ये म्हणी, वाक्प्रचार,सुभाषिते, आहाणी, कोहडी, कुटे, हुमणे आणि दैनंदिन वापरातील शब्द या सर्व वैशिष्ट्यपूर्णतेमुळे या बोलीतील शब्दसंग्रह वैशिष्ट्यपूर्ण आहे. म्हणूनच ही बोली आज साहित्य निर्मितीमध्ये समृद्धपणे वाटचाल करत आहेत. " ६

डांगाणी बोलीतील एका कवितेत कवयित्री सीता भोजने लिहितात
"डांगाणी मई बोली
समद्या बोलींच्या निराळी
कळसाईच्या गळयामंदी
जशी सोबती गरसोळी "७

आदिवासी बोलीतील लोकगीताबद्दल डॉ. कृष्णा भवारी म्हणतात, "आदिवासी महादेव कोळी समाजातील लोकगीताचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची लोकगीत ही उदरनिर्वाहासाठी किंवा दारोदारी भटकून गायली जात नाहीत. त्यांच्या लोकगीतांना व्यावसायिक स्वरूप येत नाही. केवळ आनंद प्राप्त करण्यासाठी आणि त्यातून लोकसंस्कृतीचे जतन करण्यासाठी ही गीत गायली जातात."८

निष्कर्ष:

प्रत्येक आदिवासीची जमातीची स्वतंत्र अशी बोलीभाषा आहे.

एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक पद्धतीने चालत आल्या आहेत.

या आदिवासी बोलीभाषांना स्वतःची अशी लिपी नाही.

मौखिक व लिखित स्वरुपात या आदिम जमातीच्या लोक संस्कृतीची, साहित्याची, समाजरचनेची माहिती मिळते.

या बोलीभाषेतून वैशिष्ट्यपूर्ण साहित्य निर्मिती होताना दिसते

आदिवासी लोकसाहित्य आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारा दर्पण आहे.

समारोप:

भाषा ही मानवी संस्कृतीचे संक्रमण करणारी एक जिवंत प्रक्रिया आहे. जगामध्ये अशा अनेक आदिवासी बोली आहेत. या बोलीभाषा मौखिक व लिखीत स्वरूपात जगापुढे आणून तिचे संवर्धन करणे गरजेचे आहे. कारण बहुतांश भाषा या संपुष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. ही आदिवासी संस्कृतीसाठी धोक्याची सूचना आहे. आदिवासी बोलीभाषांचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे. तरच आदिवासी संस्कृती टिकेल व भावी पिढीला आदिवासीच्या इतिहासातील पराक्रमाची, शौर्याची महती, यशोगाथा यांची माहिती मिळेल.

संदर्भ:

१. जोशी लक्ष्मणशास्त्री,मराठी विश्वकोश खंड पहिला, म. रा. सा. संस्कृती मंडळ,मुंबई प्र. आ. १९७६, पृ. २८
२. गारे गोविंद, भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. १९९३ पृ. क्र.. ८७
३. तुमराम विनायक, आदिवासी साहित्य:स्वरूप व समिक्षा, नागपूर, प्र. आ. १९९४ पृ क्र ७
४. तत्रैव,पृ. ७

५. डॉ.अमोल वाघमारे, मावळी बोली व महादेव कोळी समाज जीवन, प्रफुल्लता प्रकाशन, पुणे प्र.आ. २०१५,पृ. क्र. ३५

६. प्रा. यशवंत भांडकोळी, महादेव कोळी आदिवासींची डांगाणी बोली,फडकी(मासिक- संपा. डॉ.संजय लोहकरे) १५ ऑक्टोबर -नोव्हेंबर २०१७ पृष्ठ क्र. ७

७. तत्रैव, मुखपृष्ठ

८. डॉ. कृष्णा भवारी, आदिवासी लोकगीतांतील स्त्रीजाणिवा, चेतक बुक्स प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०२२ पृष्ठ क्र. १५

मराठी साहित्य आणि संस्कृती संवर्धनासाठी प्रसारमाध्यामांची गरज: एक आकलन

डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार

(सहा.प्राध्यापक)

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,कवठे महांकाळ जि.सांगली

मेल आय.डी.- saraswatighogare@gmail.com

मो.नंबर -८९९९५१५४००

प्रस्तावना :

मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा असून तिचा समृद्ध साहित्यिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा आहे. मात्र जागतिकीकरण, इंग्रजीचा वाढता प्रभाव आणि बदलती जीवनशैली यामुळे मराठी भाषेसमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. अशा परिस्थितीत मराठी भाषा टिकवून ठेवण्यासाठी आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका,अत्यंत महत्त्वाची आणि गरजेची आहे.मराठी साहित्य आणि संस्कृती ही महाराष्ट्राची ओळख आहे. संत साहित्यापासून आधुनिक काळातील कादंबरी, कविता, नाटक, लोककला, सण-उत्सव आणि जीवनमूल्ये यांमधून मराठी संस्कृती समृद्ध झाली आहे. मराठी भाषेला समृध्द करण्यासाठी प्रसारमाध्यमे मराठीचे सार्वत्रीकरण ,भाषेचा प्रचार डिजीटल युगात भाषेचे जतन आणि सांस्कृतिक अस्मिता टिकवून ठेवण्याचे काम करतात.भाषेच्या अस्तित्वासाठी अद्ययावत माहिती आणि अस्सल मराठी आशय पुरविणे ही प्रसार माध्यमांची मुख्य गरज आहे.

प्रसार माध्यमे म्हणजे वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ, चित्रपट, इंटरनेट, समाजमाध्यमे (सोशल मीडिया) इत्यादी. ही माध्यमे समाजावर खोलवर परिणाम करणारी शक्तिशाली साधने आहेत. मराठी भाषेतील वृत्तपत्रे आणि मासिकांनी भाषा समृद्ध करण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे. दर्जेदार लेखन, साहित्य समीक्षा, सांस्कृतिक विषयांवरील लेख यांमुळे वाचकांमध्ये भाषेविषयी प्रेम आणि जाणीव निर्माण होते. आजही अनेक वृत्तपत्रे मराठी भाषेची शुद्धता आणि सौंदर्य जपण्याचा प्रयत्न करीत आहेत.दूरदर्शन आणि रेडिओ ही माध्यमे ग्रामीण व शहरी भागांपर्यंत सहज पोहोचतात. मराठी मालिका, नाटके, चर्चासत्रे, लोककला कार्यक्रम, संतवाणी, कीर्तन, भारुडे यांमुळे प्रेक्षकांना आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवण्याचे कार्य होते. रेडिओवरील मराठी कार्यक्रम आजही अनेक श्रोत्यांच्या मनात खास स्थान राखून आहेत. बोलीभाषा, लोकगीतं आणि ग्रामीण जीवनाचे चित्रण यामुळे भाषेची विविध रूपे जिवंत राहतात.चित्रपट हे मराठी संस्कृतीचे प्रभावी माध्यम आहे. मराठी चित्रपटसृष्टीने सामाजिक प्रश्न, कौटुंबिक नाती, ग्रामीण संस्कृती, ऐतिहासिक विषय यांचे संवेदनशील चित्रण केले आहे. यामुळे मराठी भाषा केवळ मनोरंजनापुरती मर्यादित न राहता विचारप्रवर्तक माध्यम ठरते. दर्जेदार चित्रपटांमुळे तरुण पिढी मराठी भाषेकडे आकर्षित होत आहे, ही सकारात्मक बाब आहे.आजच्या डिजिटल युगात इंटरनेट आणि समाजमाध्यमांची भूमिका अधिक महत्त्वाची झाली आहे. मराठी ब्लॉग्स, यूट्यूब चॅनेल्स, पॉडकास्ट्स, फेसबुक व इंस्टाग्रामवरील मराठी पेजेस यांमुळे भाषा नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहे. मराठीतून आशय निर्मिती (कंटेंट) वाढल्यास भाषा अधिक सक्षम होईल. समाजमाध्यमांमुळे मराठी भाषेला जागतिक व्यासपीठ मिळाले असून परदेशात राहणारे मराठी बांधवही आपल्या संस्कृतीशी जोडले जात आहेत.

तथापि, प्रसार माध्यमांनी केवळ मनोरंजनावर भर न देता भाषेची शुद्धता, संस्कृतीची मूल्ये आणि परंपरा जपण्याची जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. अतिरेकी इंग्रजी शब्दांचा वापर, विकृत भाषाशैली यामुळे भाषेचे नुकसान होऊ शकते. म्हणूनच जबाबदार आणि संस्कृतीपूरक आशय निर्माण करणे ही काळाची गरज आहे.शेवटी असे म्हणता येईल की, मराठी भाषा व संस्कृती संवर्धनासाठी प्रसार माध्यमे ही एक प्रभावी आणि अपरिहार्य साधने आहेत. योग्य दिशेने, सकारात्मक आणि संवेदनशील वापर केल्यास ही माध्यमे मराठी भाषेला समृद्ध, जिवंत आणि टिकाऊ बनवू शकतात. मराठी भाषा टिकवणे म्हणजे आपली ओळख टिकवणे होय, आणि या कार्यात प्रसार माध्यमांची भूमिका अनन्यसाधारण आहे.

मराठी साहित्याचे महत्त्व :

साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते. समाजातील विचार, भावना, मूल्ये, परंपरा आणि परिवर्तन यांचे दर्शन साहित्याच्या माध्यमातून घडते. मराठी साहित्याला दीर्घ आणि समृद्ध परंपरा लाभली असून ते महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक जडणघडणीचा पाया ठरले आहे. म्हणूनच मराठी साहित्याचे महत्त्व केवळ कलात्मक नसून ते समाजघडणीसाठीही अत्यंत मोलाचे आहे.मराठी साहित्याची सुरुवात संत साहित्यापासून झाली. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांसारख्या संतांनी आपल्या अभंग, ओवी आणि भारुडांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. त्यांनी सामान्य माणसाच्या भाषेत अध्यात्म आणि नैतिक मूल्ये मांडली. यामुळे मराठी भाषा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली आणि सामाजिक समतेचा विचार दृढ झाला.मध्ययुगीन काळानंतर शाहिरी साहित्य, पोवाडे आणि लावणी यांद्वारे मराठी साहित्याने लोकजीवनाशी नाते घट्ट केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे वर्णन करणारे पोवाडे लोकांमध्ये स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेम जागवणारे ठरले. या साहित्यप्रकारांनी इतिहास जिवंत ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले.आधुनिक काळात मराठी साहित्य अधिक व्यापक आणि विचारप्रवर्तक झाले. कादंबरी, कथा, नाटक, कविता, ललित गद्य अशा विविध साहित्यप्रकारांतून सामाजिक प्रश्न, स्त्रीजीवन, ग्रामीण जीवन, दलित साहित्य, मानवी संघर्ष यांचे प्रभावी चित्रण झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, हरिभाऊ आपटे, पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर, बाबुराव बागूल यांसारख्या साहित्यिकांनी समाजाला विचार करण्यास प्रवृत्त केले.

मराठी साहित्य माणसाच्या भावविश्वाचा विकास करते. वाचनामुळे विचारशक्ती वाढते, संवेदनशीलता निर्माण होते आणि भाषेचे सौंदर्य अनुभवता येते. साहित्य माणसाला केवळ ज्ञान देत नाही तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टीही देते. त्यामुळे व्यक्तिमत्त्व विकासात साहित्याची भूमिका अनन्यसाधारण आहे.आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात मराठी साहित्यापुढे काही आव्हाने असली तरी डिजिटल माध्यमांमुळे त्याला नवी दिशा मिळाली आहे. ई-पुस्तके, ब्लॉग्स, साहित्य संकेतस्थळे आणि सोशल मीडियामुळे साहित्य अधिक लोकांपर्यंत पोहोचत आहे. तरीही दर्जेदार वाचनाची सवय जपणे ही काळाची गरज आहे.शेवटी असे म्हणता येईल की, मराठी साहित्य हे आपली सांस्कृतिक ओळख जपणारे अमूल्य धन आहे. समाजातील बदल नोंदवतानाच ते समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करते. मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी आणि भावी पिढ्यांपर्यंत तिची समृद्ध परंपरा पोहोचवण्यासाठी साहित्याचे जतन व संवर्धन अत्यावश्यक आहे.

साहित्य निर्मिती सांस्कृतिक पार्श्वभूमी :

साहित्याचे निर्मिती प्रेरणा आणि प्रवृत्तीचा अभ्यास करताना सांस्कृतिक पार्श्वभूमी विचारात घ्यावी लागते भारतासारख्या भिन्नभिन्न भाषिक समाज असल्याने आणि भिन्न भिन्न स्वरूपातील संस्कृती उपसंस्कृतीत हा समाज असल्याने साहित्याचेही असेच प्रधानात्मक स्वरूप अस्तित्वात आहे भारतीय साहित्य ही संकल्पना सिद्ध करण्यासाठी भारतीय विभिन्न भाषिक समाजातील विश्लेषणात्मक पद्धतीने अभ्यास करावा लागेल विभिन्न भाषिक समाजातील स्थूल मानाने असलेला समान कल्पना आणि समाज संस्कृती विशेष निश्चित करावे लागतील ऐतिहासिक परंपरेतील आणि सांस्कृतिक परंपरेतून राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रीय साहित्याचे निष्कर्ष निश्चित करावे लागतील या साऱ्या अभ्यासासाठी भिन्न भिन्न भाषिक समाजाची सांस्कृतिक पार्श्वभूमी महत्वाची ठरेल त्यात ग्रामीण आणि शहरी आदिवासी आणि श्रमजीवी उच्चवर्ग आणि मध्यमवर्ग सवर्णाने दलित शोषित आणि शोषक अशा विविध सांस्कृतिक सामाजिक आर्थिक स्थितीचा पार्श्वभूमीवर मागवा घ्यावा लागेल साहित्याचा सांस्कृतिक दृष्टिकोनातून अभ्यास अत्यंत अवघड बाब आहे रुपवा देणे सौंदर्यवादी दृष्टिकोनापेक्षा अधिक कठीण आहे म्हणून त्यांची मांडणी अधिक काळजीपूर्वक करावी लागते रुपववादी आणि सौंदर्यशास्त्री मांडणी सोपे असते असा त्यांचा अर्थ नव्हे तरीही मांडणी सीमित रूपात असते सांस्कृतिक दृष्टिकोनातील मांडणी व्यापक परिघासह बहुसंख्यांकांच्या संस्कृतीचा विचार करणारी आहे साहित्याचा सांस्कृतिक दृष्टिकोन करावयाच्या अभ्यासाच्या काही बाबी खालील स्वरूपात मांडता येतील.

संस्कृतीची सामाजिक पार्श्वभूमी :

संस्कृती ही समाजाच्या जीवनपद्धतीचे प्रतिबिंब असते. मानवाच्या दैनंदिन जीवनातील विचार, श्रद्धा, परंपरा, आचार-विचार, कला, भाषा, साहित्य, सण-उत्सव, चालीरीती यांचा एकत्रित आविष्कार म्हणजे संस्कृती होय. कोणत्याही समाजाची ओळख त्याच्या संस्कृतीवरून ठरते. संस्कृती ही एखाद्या विशिष्ट काळात, भौगोलिक परिस्थितीत आणि सामाजिक रचनेतून विकसित झालेली असते. म्हणूनच संस्कृतीची सामाजिक पार्श्वभूमी समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.प्राचीन काळापासून मानव समूहाने राहू लागल्यावर समाजनिर्मिती झाली आणि समाजातूनच

संस्कृतीचा उगम झाला. कुटुंब व्यवस्था, नातेसंबंध, सामाजिक नियम, रूढी-परंपरा या साऱ्या गोष्टी समाजाच्या गरजांमधून निर्माण झाल्या. उदाहरणार्थ, संयुक्त कुटुंब पद्धती, जातिव्यवस्था, ग्रामसंस्था यांचा भारतीय संस्कृतीवर मोठा प्रभाव पडलेला दिसतो. या सामाजिक रचनेमुळे संस्कृतीला विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले.धर्म आणि श्रद्धा हे संस्कृतीचे महत्त्वाचे घटक आहेत. समाजातील नैतिक मूल्ये, आचारसंहिता आणि जीवनदृष्टी धर्माच्या माध्यमातून घडत गेली. पूजा, सण-उत्सव, विधी, परंपरा यांमुळे समाजातील लोक एकत्र येतात आणि सामाजिक ऐक्य बळकट होते. दिवाळी, दसरा, ईद, ख्रिसमस यांसारखे सण विविध संस्कृतींच्या सहअस्तित्वाचे प्रतीक आहेत.आर्थिक आणि व्यावसायिक रचनाही संस्कृती घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. शेतीप्रधान समाजात निसर्गाशी निगडित सण, लोककला आणि परंपरा विकसित झाल्या, तर औद्योगिक समाजात जीवनशैली, विचारसरणी आणि सामाजिक नातेसंबंधांमध्ये बदल झाले. लोककला, पोशाख, खानपान या गोष्टी समाजाच्या आर्थिक परिस्थितीचे प्रतिबिंब असतात.राजकीय परिस्थिती आणि ऐतिहासिक घटना यांचाही संस्कृतीवर खोल परिणाम होतो. राजवटी, आक्रमणे, स्वातंत्र्य चळवळ, सामाजिक सुधारणा चळवळी यांमुळे समाजाच्या विचारधारेत बदल झाले. महाराष्ट्रातील संत चळवळ, समाजसुधारकांचे कार्य यांमुळे समता, बंधुता आणि मानवतावादी मूल्ये रुजली, ज्याचा प्रभाव संस्कृतीवर दिसून येतो.संस्कृती ही स्थिर नसून सतत बदलणारी प्रक्रिया आहे. समाजातील शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, जागतिकीकरण यांमुळे संस्कृतीत परिवर्तन होत असते. परंतु बदल स्वीकारताना मूलभूत सामाजिक मूल्ये जपणे गरजेचे आहे. सामाजिक सलोखा, सहिष्णुता आणि परस्पर आदर ही संस्कृतीची खरी ओळख आहे.

मानवी समाजाचे आणि समाज जीवनाचे सर्व व्यवहार आर्थिक व्यवहारावर अवलंबून असते आहेत त्यामुळे मानवी व्यवहारातील सामाजिक राजकीय धार्मिक सांस्कृतिक उपक्रम आर्थिक स्थिती गतीशी संबंधित असतात संस्कृतीची भौतिक संपदाच मुळात आर्थिक स्थित्यंतराची निगडित असते माणूस आपल्या गरजा भागविण्यासाठी परिस्थितीनुरूप विविध पद्धतीने निर्माण करतो आणि पर्यावरणातील विविध वस्तूंचा उपयोग विविध मार्ग शोधून करीत असतो अनेक पिढ्यांकडून मिळालेली संपदा त्याचा जीवन मार्ग निश्चित करत असते त्यामुळेच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाणारा सांस्कृतिक ठेवा हा सामाजिक सेवा ठरत असतो त्यातूनच जीवन जगण्याचा मार्ग किंवा जीवन जगण्याची रीत निश्चित केली जाते अशा रितीमधून मानव समाज सतत संवर्धित संक्रमण करीत असतो सततच्या संवर्धनात मानव समूहाने विविध मार्गाने प्राप्त परिस्थितीत भौतिक आणि अबौतिक विविध स्वरूपातील संपदा निर्मिती आहे यात निर्मिती सोबत पुनर्निर्मिती ही असते त्यामुळे संस्कृती या संकल्पनेत भौतिक आणि अभौतिक बाबींचा समावेश अपरिहार्य आहे मानवाने निर्माण केलेल्या भौतिक निर्मिती मागे परंपरेने मिळालेले ज्ञान कला कौशल्य कल्पना रूढी परंपरा कल्पना या अभौतिक बाबींची संपदा उभी असते हे सारे संस्कृतीच्या संपत्तीतील वैचारिक संपदा समाजाला हवी असते..

प्रसिद्ध विचारवंत डॉ. आ.ह.साळुंखे यांनी सम्यक कृती म्हणजे संस्कृती अशी व्याख्या दिली आणि त्याचे स्पष्टीकरण देताना त्यांनी म्हटले आहे की संस्कृती ही संकल्पना तशी गुंतागुंतीची आहे तिची वस्तुनिष्ठ व्याख्या करणे सोपे नाही.मानवी तर प्राण्यांप्रमाणे मानवाचे वर्तन एकाच विशिष्ट प्रकारचे असत नाही. परिस्थितीशी समन्वय साधून आपल्या गरजा भागविण्यासाठी सतत विविध पद्धती शोधण्याचे काम मानव करत असतो संस्कार पूर्ण आणि संस्कार जीवन जगण्याची पद्धतीने निर्माण करण्याचे काम यातून घडत असते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मानवाने निर्माण केलेली ज्ञान विश्वास कला कौशल्य अधिनियर नंतर संक्रमणे होतात प्रत्येक समूहाचे हे निश्चित केलेली जीवन रीत प्रवेशानुरूप निर्माण झालेली असते या जीवन पद्धतीवर भौगोलिक स्थितीचा पर्यावरणाचा निश्चित स्वरूपाचा परिणाम झालेला असतो त्यावरून संस्कृतीला वेगळे परिणाम होईल लागते त्यातून सामाजिक निर्माण होत जातात यालाच आपण आपल्या अभिमानाचा विषय बनवतो आणि संस्कृती ठेवा म्हणून जतनही करतो. भूक लागल्यावर जेवणे म्हणजे प्रकृती भूक लागल्यावर सोबत असणाऱ्यांना सोडून जेवणे म्हणजे विकृती आणि न पुरणारे अन्न सोबत असणाऱ्यांसह सर्वांनी विभागुंजवणे म्हणजे संस्कृती असे साधेपणाने आचार्य विनोबा भावे सांगत असतात प्रकृती म्हणजे निसर्ग आणि त्यावर संस्कार करणे म्हणजे संस्कृती असेच हे सूत्र आहे प्रकृतीला विकार झाला तर विकृती येते ही विकृती येऊ नये यासाठी संस्काराची गरज असते संस्कृतीचे सार्वभौमत्वही असते प्रत्येक मानव समूह वेगवेगळी संस्कृती निर्माण करतो.

साहित्य संस्कृती आणि भाषा-:

संस्कृती संवर्धनासाठी मानवी समाजाने विकसनसाठी सुसंवादासाठी विशिष्ट व्यवस्था नेमलेली असते या व्यवस्थेचे संक्रमण समष्टीकडून व्यक्तीकडे होते ही व्यवस्था सर्वमान्य असते या व्यवस्थेत चिन्हांचा आणि प्रतिकांचा

वापर सर्व संस्कृतीने भिन्नभिन्न स्वरूपात केला आहे या चिन्ह आणि प्रतिका द्वारा व्यक्ती व्यक्तीमध्ये समूहासमूहामध्ये संस्कृती संस्कृतीमध्ये सुसंवाद साधला जातो. सामाजिक आणि व्यक्तिगत जीवन यामुळे सुसंवादी सुरक्षित बनते त्यातूनच अधिक विकसित जीवनाची वाटचाल शक्य असते अशा चिन्ह आणि प्रतिकार मधूनच समाजासाठी भाषा ही संस्कृतीचे महत्त्वाचे निर्माण आहे भाषा हा सुद्धा संस्कृतीचा महत्त्वाचा अनुयार्थक घटक आहे संस्कृतीत समाविष्ट असणाऱ्या साहित्याचा घटक आणि माध्यम म्हणून विचार अपरिहार ठरतो मानवाने काही ध्वनी संकेतापासून भाषा सिद्ध केली आहे भाषेतून साहित्याने ललित कला अविष्कार झाल्या या आविष्करणाला पार्श्वभूमी लाभते ती संस्कृतीची हे येथे ध्यानी घ्यावे लागते सहकार्यशील समोर मनाची पूर्वतयारी भाषेच्या माध्यमाने झालेली आहे या भाषेच्या माध्यमाने समूहजीवन आणि समूह जीवनातील ज्ञानसाधना ज्ञान संघटनेतून मानवी संस्कृती साखर झाली या मानवी संस्कृतीचे अनुभव विश्व अनुभव विश्वाणे घडविलेले विचार विचाराने निर्मिलेले कल्पना विश्व कल्पना विश्वातून साकारलेले भाव विश्व म्हणजेच भाषिक प्रारूपातील साहित्य आणि अन्य कला आहेत आपल्या जीवनानुभूतीतील प्रत्येक भाषेने शक्य झाला आहे संस्कृतीने प्रदान केलेले सारे ज्ञान भाषेत आहे. भाषणे मनुष्य निर्माण केला आणि मनुष्याने भाषा निर्माण केली या कृपा कुलकर्णी यांच्या भाषा महात्म्यांमध्ये संस्कृती आणि भाषा यांचा अनुयायार्थ आहे भाषा आणि संस्कृती भाषा आणि साहित्य आणि संस्कृती यांचा परस्पर अनुबंध अविभाज्य असतो.

मराठी भाषा आणि समाज माध्यमे:

मराठी भाषा प्रसार आणि संवर्धनात समाज माध्यमे एक महत्त्वाची भूमिका बजावत आहे तर मराठी भाषिक लेखक कवी कलावंत आणि विचारवंत यांना आपले साहित्य कला आणि विचार जगभरातील मराठी भाषकांपर्यंत प्रसारित करण्यासाठी प्रत्येकांपर्यंत पोहोचण्यासाठी समाज माध्यमे एक अत्यंत महत्त्वाचे व्यासपीठ ठरले आहे मराठी कविता छोट्या लघुकथा तसेच विनोदी स्क्रिप्ट आणि ऐतिहासिक शैक्षणिक कंटेंट आता समाज माध्यमांमुळे वेगाने समाजात लोकांपर्यंत पोहोचत आहे खलबत्ता सारखे इंस्टाग्राम पेज मराठी शब्द वाक्प्रचार आणि सांस्कृतिक वाक्य शिकवण्यासाठी एक अनोखा आणि रचनात्मक दृष्टिकोन वापरतात आणि लोकांच्या स्वतःच्या सुप्त गुणांनाही वाव मिळतो आणि यामुळे भाषेची गोडी वाढते आणि नवीन पिढीला मराठी शिकण्याची प्रेरणा मिळते यातूनच मराठी भाषा तळागाळापर्यंत पोहोचते आणि मराठी भाषा समृद्ध होण्याला चालना मिळते समाज माध्यमांमुळे प्रत्येक माणसाला अनेक नवीन गोष्टी नवीन शब्द वाक्य शिकायला मिळतात ज्यामुळे आपल्या भाषेच्या ज्ञानात भर पडते समाज माध्यम माध्यमातून जगभरातील लोकांशी आपण सेकंदात संवाद साधू शकतो. नवीन गोष्टीची विषयाची माहिती घेऊ शकतो वेगवेगळ्या ऑनलाईन समुदायांमध्ये सहभागी झाल्याने एकटेपणाची भावना कमी होते आणि नवीन सांस्कृतिक व सामाजिक कल्पना आणि विषयाबद्दल माहिती मिळते ज्या लोकांना प्रत्यक्ष संवाद साधायला संकोच वाटतो त्या लोकांसाठी समाज माध्यमे हा अत्यंत महत्त्वाचे व्यासपीठ ठरते समाज माध्यमांमुळे नवनवीन भाषा शिकण्यासाठी आणि भाषिक कौशल्य सुधारण्यासाठी अत्यंत उपयुक्त साधन आहे समाज माध्यमांवर मराठी भाषेत अनेक नवीन भाषेबद्दल आणि प्रवृत्ती दिसून येत आहेत मराठी भाषेत इंग्रजी शब्दांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे ज्याला कोड मिक्सिंग असे म्हणतात तसेच संक्षिप्त रूपांचा आणि इमोजींचा प्रभावी वापर केला जातो भविष्यात मराठी बोलीभाषा आणि स्थानिक शब्दांचा वापर सोशल मीडियावर अधिक वाढण्याची शक्यता आहे कारण आपले विचार आपण म्हणणे आपले म्हणणे समोरच्याला आपल्या भावना लवकर समजण्यासाठी या शॉर्टकट चा वापर केला जातो याबरोबरच मराठी व्याकरण आणि शुद्धलेखनाच्या पारंपारिक नियमांमध्ये काही प्रमाणात लवचिकता येण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण समाज माध्यमावर अनोपचारिक आणि जलद संवादाला अधिक महत्त्व दिले जाते आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञान आणि मराठी भाषिक कौशल्य यांचा एकत्रित अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे तसेच समाज माध्यमांचा वापर जबाबदारीने आणि विचारपूर्वक करणे गरजेचे आहे आपल्या भाषेला समृद्ध करण्यासाठी भाषा साहित्य समाज संस्कृती चा अभ्यास करणे गरजेचे आहे याचा योग्य प्रसार आणि प्रचार या समाज माध्यमांच्या माध्यमातून करावे माध्यमांचा वापर सकारात्मक आणि ज्ञानवर्धक कामांसाठी करावा गैर माहिती यावर बुलिंग इतर नकारात्मक गोष्टीपासून दूर राहणे गरजेचे आणि महत्त्वाचे आहे ऑनलाइन संवाद साधताना भाषेचा वापर योग्य करावा व इतरांच्या आदर करावा तसेच भाषा नव्याने शिकण्यासाठी व शिकविण्यासाठी अनेक शैक्षणिक साधने उपलब्ध आहेत विद्यार्थ्यांमध्ये लेखन वाचन आणि संवाद कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी समाज माध्यमांचा योग्य वापर करता येतो अशा प्रकारे मराठी भाषेतील समृद्ध साहित्याने संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी समाज माध्यमे एक उत्तम साधन आहे समाज माध्यमे केवळ तंत्रज्ञानाचे माध्यम नसून ती आपल्या भाषिक कौशल्यावर भाषिक विकासावर महत्त्वपूर्ण परिणाम करतात म्हणूनच या माध्यमांचा वापर करून भाषा साहित्य अधिक समृद्ध करता येतो.मराठी भाषा टिकवून ठेवण्यासाठी,संवर्धित करण्यासाठी आणि डिजिटल युगात टीचर अस्तित्व सक्षम करण्यासाठी वृत्तपत्रे,दूरचित्रवाणी ,रेडीओ,सोशलमिडिया ही माध्यमे अत्यंत महत्वाची आहेत.

मराठी भाषा, साहित्य व संस्कृती संवर्धनासाठी वर्तमानपत्रांची गरज:

मराठी भाषा ही महाराष्ट्राची अस्मिता असून तिच्या माध्यमातून समृद्ध साहित्य आणि संस्कृती विकसित झाली आहे. संत साहित्य, लोकसाहित्य, आधुनिक वाङ्मय अशा विविध प्रवाहांनी मराठी भाषेला वैभव प्राप्त झाले आहे. या भाषेचे, साहित्याचे आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामध्ये वर्तमानपत्रे हे प्रभावी आणि विश्वासार्ह प्रसारमाध्यम मानले जाते.वर्तमानपत्र हे समाजाचा आरसा असतो . ती केवळ बातम्यांचे माध्यम नसून विचारांची देवाणघेवाण करणारे, समाजजागृती घडवणारे आणि साहित्यिक संस्कृती घडवणारे साधन आहे. मराठी वर्तमानपत्रांनी सुरुवातीपासूनच साहित्याला महत्त्वाचे स्थान दिले आहे. कथा, कविता, लेख, ललित लेखन, समीक्षा अशा विविध साहित्यप्रकारांचे नियमित प्रकाशन वर्तमानपत्रांमधून केले जाते.मराठी साहित्याच्या संवर्धनात वर्तमानपत्रांचा मोठा वाटा आहे. अनेक नामवंत साहित्यिकांची लेखनकारकीर्द वर्तमानपत्रांतील लेखनातूनच घडली आहे. नवोदित लेखक-कवींना आपली प्रतिभा व्यक्त करण्यासाठी वर्तमानपत्रे एक व्यासपीठ उपलब्ध करून देतात. त्यामुळे साहित्याची परंपरा अखंड सुरू राहते.संस्कृतीच्या दृष्टीनेही वर्तमानपत्रांचे योगदान महत्त्वाचे आहे. मराठी सण-उत्सव, लोकपरंपरा, सामाजिक चळवळी, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे वार्तांकन व लेखन वर्तमानपत्रांमधून केले जाते. यामुळे वाचकांमध्ये आपल्या संस्कृतीबद्दल जागरूकता आणि अभिमान निर्माण होतो.वर्तमानपत्रांमधील दिवाळी अंक हे मराठी साहित्याचे खास वैशिष्ट्य आहे. या अंकांमधून दर्जेदार आणि सर्जनशील साहित्य प्रकाशित होऊन मराठी वाङ्मय अधिक समृद्ध होते. तसेच साहित्यिक चर्चा, ग्रंथपरीक्षणे आणि मुलाखती यांमुळे वाचकांचा साहित्याशी घनिष्ठ संबंध निर्माण होतो.आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगातही वर्तमानपत्रांचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट डिजिटल वर्तमानपत्रांच्या माध्यमातून मराठी भाषा आणि साहित्य अधिक व्यापक वाचकांपर्यंत पोहोचत आहे.अशा प्रकारे, मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी वर्तमानपत्रे ही अत्यंत आवश्यक आणि प्रभावी प्रसारमाध्यमे आहेत. मराठी भाषेची ओळख, अस्मिता आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी वर्तमानपत्रांची भूमिका भविष्यातही तितकीच महत्त्वाची राहणार आहे.

मराठी भाषा, साहित्य व संस्कृती संवर्धनासाठी आकाशवाणीची गरज :

मराठी भाषा ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख असून तिच्या माध्यमातून समृद्ध साहित्य आणि परंपरा विकसित झाल्या आहेत. या भाषा, साहित्य व संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी विविध प्रसार माध्यमांची आवश्यकता आहे. त्यामध्ये आकाशवाणी (रेडिओ) हे एक प्रभावी, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख प्रसारमाध्यम आहे.आकाशवाणीने मराठी भाषेच्या प्रसारात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. रेडिओ हे श्राव्य माध्यम असल्यामुळे वाचनाची सवय नसलेल्या लोकांपर्यंतही भाषा व साहित्य सहज पोहोचते. कथा, कविता, कादंबरी व नाट्यांशांचे वाचन, संतवाणी, अभंग, ओव्या यांमुळे मराठी साहित्य श्रवणातून जनमानसात रुजले आहे.मराठी साहित्याच्या संवर्धनात आकाशवाणीचे कार्य उल्लेखनीय आहे. अनेक साहित्यिक, कवी आणि लेखकांना आकाशवाणीच्या कार्यक्रमांमधून आपले साहित्य सादर करण्याची संधी मिळाली. कवीसंमेलने, साहित्यिक मुलाखती, ग्रंथपरिचय, चर्चा कार्यक्रम यांमुळे साहित्यिक चळवळ अधिक गतिमान झाली.संस्कृतीच्या दृष्टीने आकाशवाणीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकसंगीत, लोकनाट्य, भारुडे, कीर्तन, भजन, पोवाडे यांसारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे मराठी लोकपरंपरांचे जतन झाले आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या श्रोत्यांसाठी आकाशवाणी हे संस्कृतीचे प्रभावी माध्यम ठरले आहे.आकाशवाणी ही समाजप्रबोधनाचेही प्रभावी साधन आहे. शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विषयांवरील कार्यक्रमांमधून मराठी भाषेचा शुद्ध आणि प्रभावी वापर केला जातो. त्यामुळे भाषेची समृद्धी आणि श्रोत्यांची भाषिक जाणीव वाढते.आजच्या डिजिटल युगातही आकाशवाणीचे महत्त्व कमी झालेले नाही. एफ.एम. रेडिओ आणि ऑनलाईन प्रसारणाच्या माध्यमातून आकाशवाणी नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहे.अशा प्रकारे, मराठी भाषा, साहित्य व संस्कृती संवर्धनासाठी आकाशवाणीची गरज अत्यंत महत्त्वाची आहे. मराठी भाषेची ओळख टिकवून ठेवण्यासाठी आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आकाशवाणीचे योगदान अमूल्य आहे.

मराठी भाषा, साहित्य व संस्कृती संवर्धनासाठी आंतरजाल (इंटरनेट) याची गरज :

मराठी भाषा ही महाराष्ट्राची ओळख असून तिच्या माध्यमातून समृद्ध साहित्य आणि संस्कृती विकसित झाली आहे. आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी आधुनिक प्रसारमाध्यमांची आवश्यकता आहे. त्यामध्ये आंतरजाल (इंटरनेट) हे एक अत्यंत प्रभावी, वेगवान आणि व्यापक प्रसारमाध्यम ठरले आहे.आंतरजालामुळे मराठी भाषेला जागतिक व्यासपीठ मिळाले आहे. संकेतस्थळे, ब्लॉग, ई-मासिके, सोशल मीडिया यांमधून मराठी कथा, कविता, लेख, ललित साहित्य मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होत आहे. यामुळे मराठी साहित्य देश-विदेशातील वाचकांपर्यंत सहज पोहोचत आहे.मराठी साहित्याच्या संवर्धनात आंतरजालाची भूमिका महत्त्वाची आहे. अनेक नवोदित लेखक व कवी आपल्या साहित्याचे सादरीकरण इंटरनेटच्या माध्यमातून करीत आहेत. ई-पुस्तके, ऑनलाइन ग्रंथालये, साहित्यिक मंच यांमुळे वाचनाची सवय वाढीस लागली आहे. तसेच जुन्या व दुर्मिळ ग्रंथांचे डिजिटल स्वरूपात जतन होणे शक्य झाले आहे.संस्कृतीच्या दृष्टीनेही आंतरजालाचे योगदान लक्षणीय आहे. मराठी सण-उत्सव, लोककला, लोकसंगीत, नृत्य, परंपरा यांची माहिती व्हिडीओ, लेख व छायाचित्रांच्या माध्यमातून इंटरनेटवर उपलब्ध आहे. यामुळे नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख निर्माण होते.आंतरजाल हे समाजप्रबोधनाचेही प्रभावी साधन आहे. शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विषयांवरील माहिती मराठी भाषेत उपलब्ध होत असल्याने भाषेचा वापर वाढतो आणि भाषेची समृद्धी साधली जाते. ऑनलाईन चर्चा, वेबिनार, साहित्यिक कार्यक्रम यांमुळे विचारांची देवाणघेवाण सुलभ झाली आहे.आजच्या डिजिटल युगात तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर इंटरनेटचा वापर करत आहे. त्यामुळे मराठी भाषा, साहित्य व संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी आंतरजालाचा सकारात्मक व सर्जनशील वापर करणे अत्यावश्यक आहे.अशा प्रकारे, मराठी भाषा, साहित्य व संस्कृती संवर्धनासाठी आंतरजाल (इंटरनेट) हे एक अपरिहार्य आणि प्रभावी प्रसारमाध्यम आहे. योग्य वापर केल्यास मराठी भाषेचा विकास होऊन तिचा सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचू शकतो.

मराठी भाषा, साहित्य व संस्कृती संवर्धनासाठी दूरदर्शनची गरज :

मराठी भाषा ही महाराष्ट्राची ओळख असून तिच्या माध्यमातून समृद्ध साहित्य व संस्कृती विकसित झाली आहे. या भाषा, साहित्य व संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी विविध प्रसारमाध्यमांची आवश्यकता आहे. त्यामध्ये दूरदर्शन हे एक प्रभावी आणि लोकांपर्यंत सहज पोहोचणारे प्रसारमाध्यम आहे.दूरदर्शन हे दृक्-श्राव्य माध्यम असल्यामुळे त्याचा प्रभाव अधिक व्यापक आहे. चित्र आणि आवाज यांच्या साहाय्याने मराठी भाषा अधिक प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचते. मराठी भाषेतील नाटके, मालिका, चित्रपट, काव्यवाचन आणि कथाकथन कार्यक्रमांमुळे मराठी साहित्य घराघरांत पोहोचले आहे.मराठी साहित्याच्या संवर्धनात दूरदर्शनचे योगदान महत्त्वाचे आहे. अनेक साहित्यकृतींवर आधारित मालिका व चित्रपट तयार झाले असून त्यामुळे साहित्य अधिक लोकप्रिय झाले आहे. लेखक-कवींच्या मुलाखती, साहित्यिक चर्चासत्रे, ग्रंथपरिचय कार्यक्रम यांमुळे प्रेक्षकांना मराठी साहित्याशी जवळीक निर्माण होते.संस्कृतीच्या दृष्टीने दूरदर्शनचे योगदान लक्षणीय आहे. मराठी सण-उत्सव, लोककला, लोकनृत्य, भारुडे, पोवाडे, कीर्तन, भजन यांचे प्रसारण दूरदर्शनच्या माध्यमातून केले जाते. यामुळे मराठी संस्कृतीचे जतन होते आणि नव्या पिढीला आपल्या परंपरांची ओळख मिळते.दूरदर्शन हे समाजप्रबोधनाचेही प्रभावी साधन आहे. शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विषयांवरील कार्यक्रमांमधून मराठी भाषेचा शुद्ध व प्रभावी वापर होतो. त्यामुळे भाषेची समृद्धी वाढते आणि प्रेक्षकांमध्ये भाषिक जाणीव निर्माण होते.आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगातही दूरदर्शनचे महत्त्व कायम आहे. डिजिटल वाहिन्या आणि उपग्रह वाहिन्यांच्या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचा प्रसार अधिक व्यापक प्रमाणात होत आहे. अशा प्रकारे, मराठी भाषा, साहित्य व संस्कृती संवर्धनासाठी दूरदर्शनची गरज अत्यंत महत्त्वाची आहे. मराठी भाषेची ओळख टिकवून ठेवण्यासाठी आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी दूरदर्शनचे योगदान अमूल्य आहे.

निष्कर्ष:

१. प्रसार माध्यमांनी भाषेची समृद्धी आणि प्रमाणात टिकवण्यासाठी अधिक जागरूक राहणे गरजेचे आहे.
२. प्रसार माध्यमे ही केवळ बातमी देण्याची साधन नसून ती मराठी संस्कृती आणि अस्मितेचे वाहक आहेत.

३. मराठी साहित्य नाटके आणि मालिकांच्या माध्यमातून भाषेला लोकप्रिय ठेवण्यात टीव्ही वाहिन्यांचे मोठे योगदान आहे.

४. सोशल मीडियामुळे आज मराठी जगभरात पोहोचली आहे म्हणून भाषेचा दर्जा राखणे हे एक मोठे आपल्या समोरील आव्हान आहे.

मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत मोलाची आहे. प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून मराठी साहित्यिक विचार, काव्य, कथा, नाट्य, लोककला व परंपरा व्यापक समाजापर्यंत पोहोचतात. दूरदर्शन, रेडिओ, वृत्तपत्रे, चित्रपट तसेच डिजिटल माध्यमे मराठी भाषेला आधुनिक काळाशी जोडून ठेवतात.प्रसारमाध्यमे मराठी संस्कृतीचा वारसा जतन करताना नव्या पिढीमध्ये त्याबद्दल अभिमान व आपुलकी निर्माण करतात. त्यामुळे मराठी भाषा व साहित्य जिवंत, समृद्ध आणि कालसुसंगत ठेवण्यासाठी प्रसारमाध्यमांची गरज अत्यावश्यक आहे, असा निष्कर्ष निःसंशयपणे नोंदवता येतो.

संदर्भ:

१. कुलकर्णी रा.ग. - भारतीय भाषांची परंपरा
२. देशमुख स.र. - संस्कृती आणि आधुनिकता
३. भारत सरकार - अभिजात भाषा धोरण
४. साहित्याचे सांस्कृतिक संचित - डॉ.प्रल्हाद जी. लुलेकर ,डॉ. केशव तुपे, कैलाश पब्लिकेशन, औरंगपुरा,औरंगाबाद प्रथम आवृत्ती नोव्हेंबर २००५
५. भारतीय संस्कृती- साने गुरुजी,सकाळ प्रकाशन, प्रथम आवृत्ती फेब्रुवारी २०१८
६. रा.श्री. जोग - मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ ते ४
७. जोशी भालचंद्र-नभोवाणी,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, फेब्रुवारी २०००
८. देशपांडे पु.ल.- रेडिओवरील भाषणे आणि श्रुतिका भाग २ , मौज प्रकाशन ५०३

अभिजात भाषा आणि साहित्य :भूत, वर्तमान आणि भविष्य

संशोधकाचे नाव :
सहा. प्रा. उज्वला उत्तम अहिरे
विषय : मराठी
विद्यापीठ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
महाविद्यालय : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय (स्वायत्त), मालेगाव कॅम्प, ता. मालेगाव, जि. नाशिक
मो. नं. : 7498416095
ई-मेल : ujwalaahire24@gmail.com

संदर्भ :-

समकालीन मराठी कथा -संपादक- डॉ शिरीष लांडगे डॉ दिलीप पवार डॉ संदीप सांगळे गीतमाला - संपादक- डॉ संदीप सांगळे, डॉ सुधाकर शेलार, डॉ प्रमोद आंबेकर संतसाहित्य
पाठ्यपुस्तके

प्रमुख शब्द –

बीजशब्द भाषा अभिजात, अभिजात भा साहित्य, मराठी भाषा, मराठी साहित्य, साहित्य प्रकार.भुतकाळ , वर्तमान आणि भविष्य

प्रस्तावना –

मराठी भाषा आणि साहित्य हे उच्च दर्जाचे, संस्कारीत , संस्कृती असलेले असेच आहे.महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे.संताची परंपरा या महाराष्ट्र राज्यास आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना ही छत्रपती शिवाजी महाराज यांनी केली असून या महाराष्ट्र राज्याचा इतिहास हा थोर स्वरुपाचा आहे . महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत पांडुरंगाच्या नामस्मरणात भक्तीत तल्लीन अशा या राज्याची भाषा देखील उच्चत्वास पोहोचली आहे. मराठी मायबोली तून निर्माण होणारे साहित्य हे देखील अत्यंत आदरणीय असे आहे. ' अभिजात भाषा आणि भुत वर्तमान , आणि भविष्य 'या शोधनिबंधात आपण मराठीची आणि मराठीतील सखोलता समजून घेणार आहोत.

" माझा मराठीची बोलूं कवतिके
परि अमृतातेही पैजा जिंके
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन."

माऊली संत ज्ञानेश्वर महाराज यांनी वरील ओवीत मराठी भाषेचे महात्म्य सांगितले आहे. माऊली या ओवीत म्हणतात की, अमृता सोबत देखील पैज जिंकेल अशी माझी मराठी ,तिचे शब्द आहेत. आणि मी ते बोलेल. अमृताहून गोड अशी अक्षरे मी लिहून दाखवीन.असे माऊली सांगतात आणि खरोखरच ज्ञानराजांची भाषा , शब्दरचना, लय , सौंदर्य, ओवी रचनेतला सहजपणा पणा , आनंद, गोडवा आहे.

माझ्या मराठीचे वैभव हे खूप व्यापक अथांग, अभिजात असे आहे.माऊलींनी अत्यंत संवेदनशील,सर्वोच्च विचार हा आपल्या मायबोलीतून आपणास दिला आहे. अवघड ज्ञान, तत्वज्ञान,सार सांगण्याचे काम माझी मराठी करु शकते, असे माऊली सांगतात.

माऊली म्हणतात,

" एके ज्या प्राणियांचा, ठायी इया ज्ञानाची आवडी नाही
तयाचे जियाले म्हणे,काही वरी मरण चांग."
ज्ञानाची आवड ज्यांना नाही त्यांच्या जगण्यास काय म्हणावे. त्यापेक्षा मरण चांगले.
माऊली म्हणतात,
" शून्य जैसे गृह का चैतन्य कोण देह
तैसे जीवित ते संमोहन ज्ञानहीन "
जसे ओसाड घर किंवा जसा प्राण नसलेला देह व्यर्थ आहे.
तसेच ज्ञानाशिवाय जीवन जगणे म्हणजे शून्य आहे

माऊली म्हणतात की, ज्ञान , तत्वज्ञान मिळवा.श्री विठ्ठल भक्ती करा.नामस्मरण करा. ज्ञानाशिवाय जीवन नाही.त्याला महत्त्व नाही. आनंद नाही.

माऊली संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची स्थापना केली. त्यांचे पुढील कार्य हे संत नामदेव महाराज यांनी संप्रदाय प्रसार केला ज्ञान जनमानसात पोहोचवले. संत एकनाथ महाराज यांनी या कार्यास एक अजून आधार देत कार्य केले., संत तुकाराम महाराज यांनी या मंदिराचा कळस सुंदर बनवत ते जणू या वारकरी संप्रदायाचे कळस बनले. आणि या कार्याची महानता सर्व दूर नेण्यासाठी प्रयत्न हे संत बहिणाबाई यांनी केले आहे.

संतकृपा झाली
संत बहिणाबाई
संतकृपा झाली इमारत फळा आली
ज्ञानदेवे रचिला पाया उभारिले देवालया
नामदेव तयाचा किंकर , तेणें रचिले ते आवार
जनार्दन एकनाथ,खांब दिला भागवत
तुका झालासे कळस, भजन करा सावकाश
बहिणी म्हणे फडकती ध्वजा निरुपण बोजा
वारकरी संप्रदायाचा इतिहास हा संत बहिणाबाई मांडतात.
माऊली संत ज्ञानेश्वर महाराजांच्या लिखाणातून मानव समाज सुसंस्कृत झाला.

ज्ञानेश्वरी ही महाराष्ट्रातीलच नव्हे तर अखंड मानव समुदायाची ती जीवनपद्धती जीवनप्रवास,सोबत, संस्कृती आहे.असेच कार्य सर्व संतांचे आहे. वारकरी संप्रदायाचे लिखाण हे अभंग, ओवी अशा महनीय स्वरूपात आहे.

पांडुरंगाची भक्ती मांडणारी अभंग, ओवीचे लिखाण माऊली संत ज्ञानेश्वरांनी केले आहे. या मराठी भाषेतून निर्माण झालेले साहित्य एक उत्कृष्ट संकल्पना , कलाकृती आहे. एक आकलन, एक भाव आहे. समाज, भाषा, संस्कृती या गोष्टी मानवाशी निगडित असून त्यांचा संबंध अतुट आहे.मानव आणि भाषा यांचे अतुट नाते आहे. मानव समुह करून राहतात.

या मानव समुहात राहणारी व्यक्ती हीच लेखक कवी असतात. ते समाजात राहतो असताना जे पाहतात , अनुभवतात तेच अप्रत्यक्षपणे साहित्यात मांडतात. आपले मराठी साहित्यातील संतसाहित्य , महानुभवीय साहित्य, तसेच कथा , कविता , कादंबरी , नाटक चरित्र, आत्मचरित्र निबंधलेखन, प्रवासवर्णन इ. सर्व भाऊ हे मानवी जीवनाला सुंदर आकार देण्यासाठी उपयुक्त आहे.मराठी साहित्यात असलेली कविवर्य कुसुमाग्रज यांची नटसम्राट हे नाटक , त्यावर आधारित चित्रपट या कलाकृती मानवी जीवनाचा चित्रपट आहे . आणि हा चित्रपट सतत आपल्या सोबत घडत आहे. एक सर्वोच्च स्थान या कलाकृतीचे असून आपल्या जीवनात आप्पासाहेब बेलवलकर , कावेरी ही दोन्ही देवस्थानी

आहेत.संवेदनशील , संयमी , भावनिक नटसम्राट आणि त्यांच्या पत्नी कावेरी यांचे चित्र हे आपल्या मनावर ठसा उमटवित अनंत काळ , नेहमीच मनात घर करून राहणार आहे.

कविवर्य कुसुमाग्रज यांचे नटसम्राट हे नाटक मराठी साहित्य सृष्टीतील एक अनमोल दागिना असून असेच साहित्य ही अभिजात मराठीची निर्मिती आहे. महाराष्ट्राची राजभाषा मराठीने मानवी मनाची पूजा केली आहे. तिच्यातील साहित्याने देखील हा वारसा अविरत चालू ठेवला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP नुसार भाषेचे महत्त्व हे विद्यार्थ्यांना अजून सखोल सांगायचे हा उद्देश जपणे कडे एक लक्ष आहे. यादृष्टीने मायबोली , स्थानिक भाषा यांना अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले. भाषेचा अभ्यासक्रमात समावेश हे आपले पुर्वा पार चालत आलेले कार्य अखंडपणे ऊ ठेवून मराठी साहित्यात असलेल्या सुंदर कलाकृतींचा समावेश हा पाठ्यपुस्तकात केला आहे.

कला शाखेच्या पहिल्या वर्षात अभ्यासक्रमात ' गीतमाला 'हे क्रमिक पुस्तक ठेवले आहे. या पुस्तकात असलेल्या मराठी गीतांचा विचार करता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास , त्यांच्या नैतिक मूल्ये आत्मसात करण्यासाठी ची पायाभरणी ही होत आहे.

आभाळाची आम्ही लेकरे
वसंत बापट

आभाळाची आम्ही लेकरे,
काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही.
माणुसकीचे अभंग नाते
आम्हीच असुचे भाग्यविधाते
पंथ वेगळा नाही आम्हा संत वेगळा नाही.

या गीताला पाहता मानवी जीवनात सर्व मानवजात ही एकच आहे. ती मानवता .एकच धर्म तो म्हणजे प्रेम. सर्व जात , धर्म समभाव या नात्याने एकमेकांना समजून आनंदी जीवन जगणे हे मानवी मूल्य आभाळाची आम्ही लेकरे या गीतात वी , गीतकार वसंत बापट यांनी सांगितले आहे.

करा तो एकची धर्म - सानेगुरुजी
खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे
असे जे आपणापाशी असे,
जे वित्त वा विद्या
सदा ते देतची जावे, जगाला प्रेम अर्पावे.

' खरा तो एकची धर्म ' या गीतात कवी , गीतकार सानेगुरुजी मी म्हणतात की, या जगात एकच महत्त्वाचा तधर्म आहे.तो म्हणजे सतत दुसऱ्यास आनंद द्यायचा, प्रेम द्यायचे. कुणाला दुःखी करू नका.कुणाचे मन दुखावेल असे वर्तन करु नका. तुमच्याकडे गरजूंना मदत करण्याची आवड असू द्या. धन, विद्या हे शक्य होईल तेवढे गरजूस द्या. अशी एक नैतिक समज सानेगुरूजींनी आपल्या या ओळींत दिली आहे.

मानवी जीवन हे क्षणभंगुर आहे. ते आनंदी पणाने आणि दुसऱ्यास आनंद देत प्रेमळपणे जगावे असे सांगणारे गीत पुढीलप्रमाणे.त्याच्यातील काही ओळी

' हीच असुची प्रार्थना '
समीर सामंत

लाभले आयुष्य जितके ते जगावे चांगले
पाऊले चालो पुढे जे थांबले ते संपले

घेतला जो श्वास आता तो पून्हा ना लाभणे
माणसाने माणसाशी माणसांसह वागणे...
माणसाने माणसाशी मानसासम वागणे
हीच अमुची प्रार्थना .
जे का रंजले गांजले
त्यांसी म्हणे जो आपुले
तोची साधू ओळखावा
देव तेथीची जाणावा.
संत तुकाराम महाराज

' मायबोली '
सुरेश भट
लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म पंथ जात एक जाणतो मराठी

अशी माझी मराठी , मराठी साहित्य हे अभिजात आहे . सुंदर , संस्कारी, मानवी मूल्यांची खाण आहे. मराठी, मराठी साहित्य ही मूल्यांची खाण सतत तेवत राहील.

दलित कादंबरीतील मूल्यविचार

डॉ. सुमित बबन साळुंखे
संशोधक (PDF)
मेल- sumitsalunkhe87@gmail.com
मो. ७५८८५०५८९४

मूल्य संकल्पना

मूल्य ही व्यापक संकल्पना आहे. मानवी जीवन व्यवहारात मानवी मूल्यांसोबत संविधानिक मूल्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, ही अधिक महत्त्वाची आहेत. मानवी जीवन व्यवहारात मूल्यांना महत्त्व आहे. माणसाचे स्वातंत्र्य जपण्यासाठी समता, बंधुता आणि न्याय ही खऱ्याअर्थाने उपयुक्त ठरतात. मूल्य म्हणजे किंमत या अर्थाने विचार ना करता संविधानिक मूल्याचा विचार केला आहे. मूल्य संकल्पने संदर्भात 'मूल्य संकल्पना आणि साहित्यविचार' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत प्रकाश मेदककर म्हणतात, " 'मूल्य' ही तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील संकल्पना आहे. तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र, या ज्ञानशाखांमध्ये प्राचीन काळापासून मूल्यविचारांची विस्तृत व सांगोपांग चर्चा करण्यात आली आहे"[१] पुढे त्यांनी गो. वि. करंदीकर यांच्या विधानाचा संदर्भ दिला आहे. 'A critique of litearary values' ग्रंथात मूल्य या संकल्पनेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केले आहे. "मानवी अनुभव विश्वाच्या काही वस्तुनिष्ठ विशेषांना प्रतिबिंबित करणारा आणि सर्वसाधारनपणे कमी-अधिक प्रमाणात मानवी मनाच्या तत्संबद्ध पैलूंकडून स्वीकारला जाणारा उत्कृष्टतेचा निकष"[२] साहित्याच्या संदर्भात सर्वउत्कृष्ट कलाकृती म्हणजे उत्कृष्ट निकष लाऊन तिला तपासले जाते. तिचे साहित्यिक मूल्य ठरवले जाते. साहित्य मूल्य वेगळी ठरतात तर सामाजिक आणि संविधानिक मूल्य वेगळी ठरत असतात. या ठिकाणी कादंबरीने जपलेली संविधानिक मूल्यांचा विचार करणारा आहोत. साहित्य मूल्याचा विचार करत असताना. विविध मूल्यांच्या अंगानी आपण साहित्याकृतीकडे पाहत असतो. त्यामुळे मूल्य ही संकल्पना व्यापक आहे. ही केवळ लोकशाही मूल्ये व्यवस्था नसून मानवतावादी तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान असणारी आदर्शवादी तत्त्वे आहेत. ही मुल्ये आधुनिक व्यवस्थेला मिळालेली फार मोठी देणगी आहे. याच्या आधारे मूल्य म्हणजे नेमके काय पहाताना शब्दकोशातील अर्थ मूल्य हा मुळात संस्कृत शब्द जसेच्या तसे मराठीत आला आहे. त्याचा अर्थ किंमत किंवा मोल असा होतो. मूल्य या शब्दाला इंग्रजीत 'Value' हा पर्यायवाची शब्द आहे. ऑक्सफर्ड इंग्लिश शब्दकोशानुसार 'Value' हा शब्द 'Valere' या लॅटिन शब्दापासून तयार झाला. 'Valere' याचा अर्थ किमतीचा असणे असा होतो. या शब्दाचा अर्थ दर्जा किंमत लायकी पात्रता असा होतो, यावरून समजते की चांगली गोष्ट, उपयुक्तता, गुणात्मकता, पात्रता, इत्यादीवरून वस्तूची व्यक्तीची किंमत ठरते. याचाच अर्थ चांगल्या गुणांचा उपयुक्ततेचा समुच्चय म्हणजे मूल्य होय असे म्हणता येईल. आपण या ठिकाणी संविधानिक मूल्यांच्या व तत्त्वाच्या संदर्भात विचार करणार आहोत. मूल्यांची परिभाषा सांगताना नागतोडे म्हणतात, "मूल्य म्हणजे ज्या तत्यांमुळे गुणांमुळे, व्यक्ती समाज आणि विश्व यांच्यामध्ये परस्पर सुसंवाद साधून सर्वांचा विकास होतो ती तत्वे म्हणजे मूल्य होय" पुढे हेनरी ज्युल्स म्हणतात, "मूल्य म्हणजे ज्याला आपण चांगले समजतो असे काहीतरी उदाहरणार्थ प्रेम दयाळूपणा साधेपणा इत्यादी" मूल्याच्या संदर्भात एस के पाटील म्हणतात, "व्यक्तीच्या ज्या विचारांचा गुणांचा व वर्तनाचा समाज हितासाठी उपयोग होतो तो विचारून आणि वर्तन म्हणजे मूल्य होय"[३] मनावी जीवन व्यवहारात सत्याच्या बाजूने उभा राहणारी संविधानिक चौकट जी तत्त्वाच्या अंगानी विचार करण्यास व्यवस्थेला भाग पाडेल आणि मानवतावादी समाजरचना उभे करणारे लोकशाहीचे महत्त्वाचे साधन म्हणजे ही मूल्य होय. मूल्य संदर्भात निशिकांत ठकार म्हणतात, "साहित्य व्यवहारात मूल्यविचार टाळता येणार नाही. जे टाळतील त्यांना मूल्य असणारा नाही किंवा मूल्य उरणार नाही. मान्यता, तत्त्व, सारांश, सिद्धांत, आदर्श अशा अनेक अर्थच्छटा ' मूल्य' या पदाला प्राप्त होतात."[४] मूल्य ही व्यक्तिगत आणि सामाजिक असतात. साहित्य व्यवहारात मूल्यांना महत्त्व असते.

संविधानिक अंगाने आपण विचार करतो. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय मूल्य संकल्पने संदर्भात विवेचन करताना या मूल्यांचा विचार केला आहे. बौद्धिक स्वातंत्र्य, धार्मिक उदारता व सहिष्णूवृत्ती ही भारतीय संविधानातून प्रतिबिंबित झालेली मानवी मूल्ये बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानातून आकारास आलेली आहेत. वैयक्तिक स्वातंत्र्याला प्रोत्साहन देऊन बौद्धिक व आध्यात्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केल्यामुळे तत्त्वासिन धर्म व समाजातील रूढी परंपरा

आणि अंधश्रद्धेची बंधने गळून पडली. दुसऱ्या बाजूने बौद्ध संघानेदेखील धार्मिक उदारता आणि सहिष्णूता या तत्त्वांची कास धरल्यामुळे समाजात नैतिक आदर्शाची पायाभरणी होण्यास सुरुवात झाली होती. तसेचे महानुभाव पंथ , वारकरी पंथाने समतेचा आग्रह धरलेला आहे . त्याचबरोबर स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मानवी मूल्ये केवळ पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाची देणगी नसून बौद्ध परंपरेतून या मूल्यांचा प्रभाव आपल्या व्यवस्थेवर पडलेला आहे. पुढे १२ व्या शतकात युरोप खंडात जी व्यक्ती स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली, त्यातून या लोकशाही मूल्यांचा विकास होत गेला आहे. उदा. १२१५ मध्ये ब्रिटन देशात मॅग्नाकार्टा ही मानवी हक्काची सनद मंजूर झाली व त्यातून जगात व्यक्ती स्वातंत्र्याचा पहिला जाहीरनामा प्रसिद्ध झाला. पुढील कालखंडात युरोप खंडात प्रदीर्घ काळ स्वातंत्र्य समतेच्या चळवळी सुरू राहिल्या. या सर्व चळवळीचा परिणाम म्हणून इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या देशात राज्यक्रांत्या झाल्या. प्रामुख्याने १७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता, बंधुता अशी घोषणा करून जुलमी राजेशाहीचा शेवट घडवून आणला व जगात ही मानवी मूल्ये प्रस्थापित झाली. या मूल्यांच्या विकासाबाबत चर्चा करताना आणखी एका पैलूची चर्चा करणे अभिप्रेत आहे, तो म्हणजे, पाश्चात्त्य राजकीय तत्त्ववेत्त्यांनी केलेले लिखाण हा आहे. जे. जे. रुसो, एडमंड बर्क, जे. एस. मील या राजकीय विचारवंतांनी राजेशाहीला नकार देत लोकशाहीचा आग्रह धरणारे विचार मांडले. जे. एस. मीलने ऑन लिबर्टी हा ग्रंथ लिहून व्यक्तीस्वातंत्र्याचा आग्रह धरला तर रुसोने 'सामाजिक करार' या ग्रंथातून जनतेच्या सार्वभौमत्वाचा विचार मांडून स्वातंत्र्य, समतेचे विचार मांडले. भारतातदेखील राजाराम मोहन रॉय पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत मानवतावादी तत्त्वज्ञानाची मांडणी करून समता, स्वातंत्र्याची जोरकसपणे समर्थन केले. त्याचबरोबर महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, वि. श. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेचे तत्त्वज्ञान केंद्रस्थानी ठेवून विचार आणि कार्य अशा दोन्ही आघाड्यांवर सामाजिक विषमतेवर प्रहार करत समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांचा आग्रह धरला. आणि भारतीय राज्य घटनेने ही मूल्य स्वीकारली, मूल्यांच्या बाबतीत विचार करता स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांवर कादंबरी प्रकाश टाकते.

दलित कादंबरीतील मूल्याविचार :

मूल्यांच्या संदर्भात विचार करता स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये संविधानिक आहेत. त्यांचा प्रभाव दलित कादंबरीत कशा पद्धतीने जाणवतो. आणि ती मूल्ये दलित कादंबरी कशा पद्धतीने मांडते अथवा अधोरेखित करते हे पाहणे महत्त्वाचे आहे. गौतम बुद्ध पासूनचे समतेचे तत्त्व व तीच विचारधारा पुढे महत्मा फुले , वि.रा. शिंदे , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालवली आहे. त्या विचारधारेतून दलित लेखक लेखन करू लागला. आपल्या साहित्यातून समतेचा स्वातंत्र्याचा विचार मांडू लागला.दलित कादंबरी च्यासंदर्भात विचार करता.

राघववेळ - नामदेव. चं. कांबळे राघववेळ ही नामदेव कांबळे यांची दलित कादंबरीमध्ये महत्त्वाची आहे. १९९५ ला साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ही कादंबरी गावगाड्यातील मातंग समाजाचे चित्रण करणारी आहे. गावगाड्यात होणारी मांग समाजाची फरफट कशा पद्धतीचे असते हे कादंबरीकारांनी मांडले आहे. मातंग समाजाचे दुःख व वेदना व्यक्त करणारी ही कादंबरी आहे. वालंबीचा मुलगा रघु हा शिक्षण घेत असतो. तो आईला म्हणतो, मी मोठं झाल्यावर ही गावकीची कामे करणार नाही. हा त्याचा विचार स्वातंत्र, समता आणि न्याय जाणीव करून देणारा आहे. त्यामुळे दलित तरुण वर्ग शिक्षण घेऊ लागला प्रभावित होऊन आंबेडकरी विचार आत्मसात करू लागला. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्य कादंबरी अधोरेखित करते.

रघु वर्गातील मंगला जोशीला विचारतो बोंड सरांचा तास होणार नाही का? जोशीला एवढे विचारले म्हणून मुलीशी सलगी वाढवतो म्हणून रघुला बकाल सर खूप मारतात. मुख्याध्यापक बकालांना खवळतात. रघुनाथ जाधवचे बोलणे ऐकल्यावर बकालांनी मात्र मान खाली घातली. मुख्याध्यापक व बकाल आपल्याशी असे का वागले याचा विचार रघु करू लागला. वर्गात आपल्याला बकालांनी उभे केल्यावर बोंडसे सरांनी साधी चौकशी केली नाही. असे का म्हणून तो विचार करू लागला. "मुलींशी फक्त बोललो तर शिक्षा? मग हीच मंगला, विद्या, सुनंदा कानेडच्या घरी जातात. तोही त्यांच्या घरी जातो. त्यांची कशी नाही तक्रार करत कोणी? आपल्यालाच शिक्षा का म्हणून? असे तर नसेल, आपण मांग, मंगला ब्राह्मण, आपण तिच्याशी बोललो. तीच आपली चूक. का असे? असे का?" (पृष्ठ.१९६) असे हजारो प्रश्न रघुच्या मनात घर करत होते. शाळेत सुद्धा जातीवरून शिक्षा केली जाते. दलित अस्पृश्य यांनी उच्चभ्रू

वर्गातील मुलींशी साधा संवाद करणे सुद्धा गुन्हा ठरते. मांग समाजातील जीवन जगत असताना रघूच्या जगण्यातील दुःख, दारिद्र्य खऱ्या अर्थाने विचार करायला लावणारे आहे. मातंग समाजात आपण जन्म घेतल्यामुळे आपल्याला शाळेत सुद्धा हीन वागणूक दिली जाते. त्याचे जिवंत उदाहरण लेखकाने मांडले आहे. शाळेतील हुशार विद्यार्थी म्हणून रघुनाथ जाधवला निरोप समारंभा दिवशी बोलण्यासाठी नाव पुकारले जाते. परंतु तो म्हणतो, "सर माझ्या भावना त्या दिवशीच हेडमास्तरांच्या ऑफिसात मेल्या आता कुठल्या भावना व्यक्त करू मी" (पृष्ट १९७)

असा मार्मिक टोला रघुनी शाळेत दिला. त्यामुळे शाळेतील शिक्षकांन बरोबर विद्यार्थीही अस्वस्थ झाले. गावगाड्यातील मातंगाचे समाज वास्तव कांबळे यांनी अधोरेखित केले आहे. मातंग समाजाला जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष. व त्या संघर्षाची ज्वलंत आणि जीवंत असणारे चित्रण आले आहे. स्वातंत्र्य समते साठी आज ही दलित समाजाला संघर्ष करावा लागतो आहे याचे चित्रण कादंबरीत आले आहे

आघात - विलास अंभोरे यांनी १९९३ साली ही लिहिली आहे. गावगाड्यातील दलित समाजाची होणारी आर्थिक कुचंबनी तसेच पैशासाठी दलितांना करावा लागणारा संघर्ष, कामासाठी सवर्णाकडून होणारा त्रास, दलितांनी आपल्या शेतात राबावे कष्ट करावे, त्यांनी शिक्षण घेऊ नये अशी अपेक्षा करणारे सवर्ण पाटील कादंबरीकाराने रेखाटले आहेत. राहुल हा कादंबरीचा नायक आहे. तो औरंगाबाद मधील मिलिंद महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहे. त्याच्या जगण्याची तत्वे आंबेडकरवादी जाणिवा स्पष्ट करताना दिसत आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यांच्यासाठी लढणारा राहुल कादंबरीत नायक म्हणून आहे. ' शिका संघटित व्हा व संघर्ष करा' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान तो स्वीकारतो तसेच जुन्या परंपरा केवळ आंबेडकरी विचाराने मोडता येणार आहेत याची जानीव होते. गावातील पाटील राहुलला वडिलांनी उसने जादा पैसे गेतले म्हणून फसवण्याचे षडयंत्र रचतो तेंव्हा प्राध्यापक जोशी बोलतात, आपल्या बोलण्यातून समाजाचे मत परिवर्तन करतात. "सर्वांनी शिक्षण घेतलं पाहिजे! सर्वांनी भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, संत गाडगेबाबा तसेच इतरही बुद्धिवंताचे विचार वाचायला हवे! पर्यायानं देश विकास होईल! झालाच पाहिजे! मात्र जातीचं मढ जाळल्याशिवाय मानवता जगणे शक्य नाही! मित्रहो न्याय, बंधुता, समता ह्या बाबींचे रक्षण करायला आपण कटिबद्ध असायला पाहिजे!" (पृष्ठ. ७९) असा संदेश प्राध्यापक जोशी समाजाला देत आहेत. समाज परिवर्तन करण्याचारा विचार जोशी यांनी गावाला दिला आहे. जोशींच्या या म्हणण्यावर गाव विश्वास ठेवते आहे. पाटलाच्या बाजूने बोलण्यास कोणीच तयार झाले नाही. पुढे जोशी म्हणतात, "बिचारे गोरगरीब कसातरी जगण्याचा प्रयत्न करतात. त्याच्यावर आपण का अन्याय करावा? आणि त्यांनीही तो का सोसावा? माझा प्रश्न आहे. शिवाय राहुलच्या उध्वस्तपणाला पाटील कारणीभूत आहे. तरी त्यांनी सहनच करावे का? नाही जगण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे! कुणीही कुणावर अन्याय करावा, हे जमणार नाही! आणि ते कुणीच खपवूनही घेणार नाये." (पृष्ठ. ८०) असा मोलाचा सल्ला जोशींनी गावाला दिला. स्वातंत्र्य , समता, बंधुता आणि न्याय ही मूल्य रुजवण्याचा प्रयत्न कादंबरीकार विलास अंभोरे यांनी केला आहे. कादंबरीचा नायक राहुल हा खरच परिवर्तनवादी विचारसरणीचा तरुण आहे. आपल्या आईला सांगतो तुझी होणारी सून येणार आहे. आई म्हणते,

"कुठली हाय रे पोरगी?"

"औरंगाबादलाच राहते."

"आपल्या जातीची हाय न ?"

"नाही ती कैकाड्याची !" (पृ.१३०) समता ह्या मूल्याचा विचार मांडणारा नायक आहे.

श्राद्ध - उत्तम कांबळे यांची श्राद्ध ही कादंबरी गावगाड्यातील दलितांवर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण करते आहे. आबा कांबळे हा कादंबरीचा नायक आहे. शरणगुप्पी या गावातील सामाजिक, राजकीय, आर्थिक दृष्टीने दलितांचे होणारे शोषण हे सवर्ण वर्गाकडून कशा पद्धतीने होते. याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत आले आहे. समता प्रस्तापित करण्याच्या दृष्टीने नायक आबा कांबळे प्रयत्न करता. आबा सोसायटी सगळ्यांची आहे. सांगतात. कोणत्याही प्रकारचा

जाती-धर्माचे बंधन आबा सोसायटीला लावत नाही. आबा म्हणतात, " हे बघ भुपा सोसायटी फक्त महारांचीच आहे असं कोणी सांगितलं तुला? सगळ्याची आहे ती! महार, मांग, चांभार सर्वांसाठीच आहे ती सोसायटी तुलासुद्धा सभासद होता येईल." (पृष्ठ ३१) , चंदू आबाला म्हणतो, " मी म्हणतो आंबेडकर म्हाराचा का नाय? म्हाजी तुमच्या जातीत जलमला व्हता का नाय?" "चंदू आरं तुला हे बोलायला सुचतय कसं? आर आंबेडकर सगळ्या दुनियेचा. आयुष्यभर त्या माणसानं तुमच्या-आमच्यासाठी झगडा केला." (पृ. ६८) आबा त्या चांभाराच्या चंदूला देखील पटवून देतात की, आंबेडकर हे तुम्हा आम्हा सगळ्यांचे आहे. महार, मांग, चांभार यांच्यातील बिघडलेले संबंध पुन्हा नव्याने आबा एकत्र आणतात. समतेचे मूल्य जपताना कादंबरी आहे.

'हिंदू'- शरणकुमार लिंबाळ हिंदू शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीचे सामाजिक आशयसूत्र पाहताना. गावगाड्यातील जात वास्तव व राजकारण कशा पद्धतीने चालते याचे चित्रण आले आहे. समाजाचा दलितांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे हे दाखवण्याचा प्रयत्न कादंबरीकाराने केला आहे. तसेच दलित चळवळीचे काम कसे चालू आहे. याच्यावरही प्रकाश टाकला गेला आहे. कसबे गुरुजींनी कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यात रमा बाबर आणि नायक मिलिंद कांबळे एकत्र होते. शिवजयंती आणि भीमजयंती एकत्र करण्याविषयी हा कार्यक्रम होता. " शिवजयंती आणि भिमजयंती एकत्र साजरी झाली पाहिजे; ही काळाची गरज आहे. शिवाजी महाराजांनी यवनी सत्तेविरुद्ध लढा दिला, तर बाबासाहेबांनी जातिव्यवस्थेचे विरुद्ध. शिवाजी महाराजांनी मावळ्यांना गुलामाविरुद्ध उभं केलं, तर बाबासाहेबांनी दलितांना. शिवाजी महाराज स्वभाषा, स्वधर्म आणि स्वराज्यासाठी लढले, तर बाबासाहेब समता, स्वातंत्र्य आणि न्यायासाठी. या दोन महापुरुषांच्या कार्याच्या तुलनेत आजच्या चळवळीला दिशा सापडू शकेल." (पृ १०) अशा पद्धतीने शिवजयंती व भीमजयंती एकत्र करण्याच्या निमित्ताने हे समाज बांधव एकत्र आले होते. यातून कादंबरी समतेचे मूल्य जपते.

पन्नास टक्क्यांची ठसठस - उत्तम कांबळे पन्नास टक्क्यांची ठसठस ही उत्तम कांबळे यांची कादंबरी मुळात ग्रामीण भागातील गावगाड्याचे चित्रण करणारी आहे. महिलांना पन्नास टक्के आरक्षण मिळाल्यामुळे दलित महिला गावातील सरपंच होणार असते. त्यामुळे गावातील राजकीय वातावरण ढवळून निघते. परंपरेने सत्ता हातात आलेल्या गावातील उच्चवर्गीय मंडळींना या गोष्टीचा प्रचंड त्रास होतो. गावाचा कारभार दलित महिला चालवणार म्हटल्यानंतर लोकांच्या मनात वेगळ्याच चर्चा सुरू झाल्या. आरक्षण बदलून आणण्याचा प्रयत्न झाला. परंतु कोणत्याच प्रयत्नाला यश मिळाले नाही. त्यामुळे शेवटी दलित महिला सरपंच होते. गावातील पाटील दलित महिलेच्या जागी काळुबाईला उभे करतो व निवडून आणतो. सरपंचही बनवतो. ती फक्त नामधारी सरपंच राहते, कारभार मात्र पाटील चालवत असतो. ग्रामपंचायतीमध्ये घोटाळे करतो. त्या भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली काळूबाईला अटक करायचे ठरवले जाते. तेव्हा काळुबाई पाटलाचा खून करते व त्याचा शेवट करते. आन्याया विरोधात अडाणी असूनही काळुबाई आवज उठवते. ही न्यायाची भूमिका म्हत्त्वाची आहे.

निवडणुका गावामध्ये लागल्या जातात. काळूबाईची आई चंपाबाई निवडणुकीसाठी उभी राहते. ती निवडणुकीमध्ये निवडून येऊन पुन्हा ती सरपंच होते. मुलीला आलेल्या वाईट अनुभवाचा तिला अनुभव असतोच. ग्रामपंचायतीमध्ये झाडू मारणारी चंपाबाई आज ग्रामपंचायतीची सरपंच पदाची उमेदवारी ठरते. ठोसपणे गावाचा कारभार चालवत असते. चंपाबाई त्या दिवसापासून सरपंचाच्या खुर्चीत बसतात." ह्यो बघा गण्याभाऊ सव्वीस जानेवारीला झेंड्याची दोरी मी वाढणार. मी रोज ज्या खुर्चीत बसून गावाची सेवा करणार आजपासून" (पृष्ठ १४०) तिची मुलगी काळुबाईला आलेला वाईट अनुभव पाहून चंपाबाई आता हुशार झाली होती. अन्याय विरुद्ध आवाज उठवणारी चंपाबाई न्याय मूल्यसाठी लढते आहे.

भारत सेल होताना - सिद्धार्थ रामटेके ही कादंबरी सिद्धार्थ रामटेके यांची आहे. जागतिकीकरणाच्या प्रश्नासोबत सामाजिक, राजकीय, आर्थिक गोष्टींचा जागतिकीकरणात नव्या दृष्टीने विचार करणारी कादंबरी आहे.

मूल्य विचाराच्या दृष्टीने या कादंबरीचा विचार करताना स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यसाठी झगडणारा नायक कादंबरीमध्ये आला आहे. जागतिकीकरणाच्या काळात आपल्याला नव्या संकटांना सामोरे जावे लागणार आहे. याची तो जाणीव करून देतो आहे. कादंबरीचा नायक राजा मुळातच आंबेडकरवादी तत्त्वज्ञानाने जगतो आहे. "आम्ही आंबेडकरवाद वाचला, मार्क्स वाचला. कामगार सत्ता येण्यासाठी मार्क्सने हिंसा सांगितली पण हिंसा करणारीच सत्ताधारी होतात. टोटल शून्य आणि आंबेडकर वादाचा कॅनवास खूप मोठा आहे. आंबेडकरवाद हिंसेला परवानगी देत नाही. आंबेडकरवादाला सहनशीलता अपेक्षित आहे." (पृष्ठ. 229) आंबेडकरवाद हा सहनशीलतेची अपेक्षा धरतो आहे. हिंसा ही आंबेडकरवादाला मान्य नाही. जागतिकीकरणामुळे स्वीकारलेल्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या धोरणाचे परिणाम लेखकाने मांडले आहेत. जागतिकीकरणाचा या धावपळीत अमेरिका आर्थिक वर्चस्व राखण्याचा प्रयत्न करत आहे. अमेरिकेच्या आर्थिक धोरणाचा परिणाम भारतीय समाज जीवनावर कशा पद्धतीने पडतो आहे याचीही मांडणी लेखकाने केली आहे. "भांडवल अमेरिकन आणि राजा लोकशाही पण असणार आहे, निवडणुका होतील, लोक स्वातंत्र्य भोगतील. पण अंतिम इच्छा मात्र अमेरिकन असणार आहे!" (पृष्ठ.८३- ८४) खरी सत्ता ही अमेरिकन असणार आहे. आपले स्वातंत्र्य, लोकशाही ही फक्त नावापुरती उरणार आहे, असेच चित्र एकंदरीत दिसून येते. समतेचे मूल्य सांगणारी ही कादंबरी आहे.

एकूणच दलित कादंबरी ही संविधानिक मूल्य मांडते. व ती मूल्य मिळवण्यासाठीचा अधिकार, हक्क कादंबरीच्या आशयाच्या माध्यमातून लेखक मांडत आहेत. मानसच्या जगण्याच्या प्रश्नाच्यासोबत जगण्तातील संघर्ष या मूल्याच्या आधारे दलित कादंबरी साकारत आहे. स्वातंत्र्य , समता, बंधुता आणि न्याय ही मूल्य जपण्याचा प्रयत्न दलित कादंबरी करते आहे. संविधानिक मूल्याचे जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने दलित कादंबरी महत्त्वाची भूमिका बजावते.

संदर्भ सूची

१ मेदककर प्रकाश (संपा) 'मूल्यसंकल्पना व साहित्यविचार' (प्रा. बाळकृष्ण कवठेकर गौरव ग्रंथ) , कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ.७
२ तत्रैव., पृ ८
३ नागतोडे किरण, 'नैतिकमूल्य शिक्षण', विद्या प्रकाशन, नागपूर, प्र.आ २००६.
४ मेदककर प्रकाश (संपा), उनि., पृ. ३२ .

साधन सूची

१ . कांबळे नामदेव चं, 'राघववेळ', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथम आवृत्ती -१९९५
२.अंभोरे विलास, 'आघात', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती – १९९३
३. कांबळे उत्तम, 'श्राद्ध', मनोविकास प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती -२०१०
४. लिंबळे शरणकुमार, 'हिंदू', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती -२००३
५. कांबळे उत्तम, 'पन्नास टक्क्याची ठसठस', लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, प्रथामावृत्ती -२०१४
६. रामटेके सिद्धार्थ, 'भारत सेल होताना', कोमल प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती -२००१

चंदगड आणि कर्नाटक सीमावर्ती भागातील लोकगीतांचा अभ्यास

संशोधक विद्यार्थी
स्मिता दिलीप शेटकर
चांदमल ताराचंद बोरा कॉलेज शिरूर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे
mail id :- shetkarsmita88@gmail.com Mobile No. :- 8412062544

प्रस्तावना :-

माहिती तंत्रज्ञान आणि इंटरनेटच्या जगात समाजजीवन अत्यंत झपाट्याने गतिमान होत आहे. आज लोक साहित्याचा शोध घेणे, अभ्यास करणे ही बाब जरी सोपी वाटत असली तरी त्याविषयीची महत्त्वाची माहिती गोळा करण्याची जबाबदारी वाढली आहे. काही गोष्टी काळाच्या ओघात नष्ट होत आहेत. टीव्ही, चित्रपट, वृत्तपत्रे, मोबाईल यामुळे काही गोष्टी बदलल्या आहेत. लोकसाहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोनही आज बदलत चाललेला आहे. भौतिक आणि ऐहिक सुखाच्या मागे लागलेला माणूस आज लोकसमुदायाच्या मुख्य प्रवाहापासून दूर जाऊ लागला आहे. नवीन विज्ञान तंत्रज्ञान यामुळे त्यांची ज्ञानसंवर्धन वृत्ती वाढू लागली आहे, पण सुशिक्षित आणि अंधश्रद्धा न मानणारा माणूस काही सामाजिक रूढी आणि विधी संकेतापासून दूर जाऊ लागला आहे. आपल्या गावापासून दूर नागरी वस्तीत राहणाऱ्या या माणसाला आपल्या आदिम जाणीवा व संवेदना दुरावण्याचे दुःख निश्चितच वाटत आहे. तो आपली लोकसंस्कृती टिकवण्यासाठी एका बाजूने धडपडत आहे, मात्र दुसऱ्या बाजूने सामाजिक परिवर्तन नवविज्ञानवाद यामुळे त्यांच्या मानसिकतेमध्ये द्विधा अवस्था निर्माण झाली आहे. मराठी लोकगीताला अनेक शतकाची परंपरा आहे. इतर साहित्य प्रकारापेक्षा लोकगीते हा साहित्य प्रकार आपल्या सांस्कृतिक जीवनाला पुरातन काळापासून व्यापलेला आहे. या शोधनिबंधात चंदगड आणि कर्नाटक सीमावर्ती भागातील लोकगीतांचा शोध घेणार आहोत. चंदगड आणि कर्नाटक भागातील या लोकगीतांचा विशेष म्हणजे ग्रामीण आणि वास्तव जीवन यांचा अभ्यास आहे. या सर्व लोकगीतांचा अभ्यास केला तर साहित्य आणि समाजाचा अतूट संबंध दिसून येतो. या लोकगीतातून समाजदर्शन समाजातील विविध समस्यांचा आणि सामाजिक प्रश्नांचा विचार करता येतो. शहरापासून दूर एखाद्या खेड्यात वस्ती केली तर पहाटेच्या वेळी जात्यावर आळविल्या जाणाऱ्या मंजुळ ओवी गीतानी आपल्याला जाग येते. कधी कधी त्या गीतातील गोडवा मला क्षणभर आनंदीत करतो, तर कधी कधी त्यात व्यक्त झालेली हुरहुर आपल्याही हृदयाला क्षणभर बेचैन करून टाकते. कोणत्याही देशाच्या, प्रदेशाच्या लोकसंस्कृतीचे ज्ञान मिळवायचे असेल तर तेथील लोकजीवनाच्या माध्यमातून ते शक्य होते आणि लोकजीवन समजून घ्यायचे असेल तर त्या प्रदेशातील लोक साहित्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. कारण परंपरेने चालत आलेली लोकजीवन पद्धती हेच लोकसाहित्य असते. लोकसाहित्यातून लोकजीवनाला आकार येत असतो. लोकसंस्कृतीचे वाहक म्हणून साहित्याकडे पाहिले जाते. संपूर्ण लोकजीवनाला व्यापणाऱ्या या लोकसाहित्याच्या अभ्यासाची आजही समाजाला नितांत गरज वाटते. त्या दृष्टीनेच आपण लोक साहित्याकडे पाहिले पाहिजे.

उद्दिष्टे :-

१. चंदगडाने कर्नाटक सीमावर्ती भागातील लोकगीतांचा शोध घेणे, संकलन करणे व वर्गीकरण करणे.
२. स्त्रियांनी म्हटलेल्या विविध प्रकारच्या गीतांचा चिकित्सक अभ्यास करणे.
३. चंदगड आणि कर्नाटक सीमावर्ती भागातील लोकगीतांचे लोकसाहित्याच्या आधारे विश्लेषण करणे.

संशोधन पद्धती :-

चंदगड आणि कर्नाटक सीमावर्ती भागातील लोकगीतांमधून व्यक्त होणारे समाजजीवन तसेच सामाजिक प्रश्न या दृष्टीने शोधनिबंधात सामाजिक वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

गृहितके :-

१.चंदगड आणि कर्नाटक सीमावर्ती भागातील लोकसाहित्य मध्ये संवेदनशीलता दिसून येते.

२. चंदगड आणि कर्नाटक सीमावर्ती भागातील लोकगीतातून स्त्री जीवनाचा साक्षात्कार होतो.

३. चंदगड आणि कर्नाटक सीमा वरती भागातील लोकगीतातून ग्रामीण समाजजीवनाचे दर्शन होते.

चंदगड कर्नाटक सीमावर्ती भागातील लोकगीते :-

सीमावर्ती भागातील लोकगीतांचे संकलन, वर्गीकरण व अभ्यास विवेचन करताना गावरहाटीचा वेध घ्यावा लागतो. इथल्या स्त्रियांच्या जगण्याचे लोकजीवनाचे संदर्भ तपासून पहावे लागतात. येथील माणूस मुळातच डोंगरदऱ्यात राहणारा आहे. येथील घरे डोंगरदऱ्यात काहीशी एकमेकांपासून दूर दूर आहेत. मात्र इथला समाज, गाव एक आहे येथील गावरहाटी, देवदेवस्की, भुताटकी आणि अंधश्रद्धेचे समज-गैरसमज काही लोकरूढींना धरून आहेत. वाडवडिलांनी घालून दिलेले देवकार्य, कुणाच्या, नवससायास, जत्रा, लग्नविधी, बारसे, मर्तिककार्य यांचा समाजाशी असणारा परंपरागत आदिबंध याचा शोध घ्यावा लागतो. जरी पूर्वपरंपरा मानणारी ही लोकसंस्कृती असली तरी येथील माणूस निसर्गाप्रमाणे मनमोकळा आखीव रेखीव जीवन जगणारा काहीसा लहरी आणि सडेतोडही आहे. त्यांच्या मनातील भावभावनांचा सहज सुंदर अविष्कार येथील लोकगीतातून दिसून येतो.

स्त्रीगीते :

पूर्वी स्त्रिया कोंबड्याच्या आरवण्याबरोबर उठून दळण घेऊन जात्यावर बसत असत. परंतु पारोशा तोंडाने कुमकुम लावता जातावर बसू नये असा संकेत होता. आजही हा संकेत ग्रामीण स्त्रियांमध्ये असलेला दिसतो. दळण होताच झाडलोट, सडा सारवण करून स्त्री चुलीकडे वळते. घर आणि गोठा या दोन्हीची जबाबदारी असणारी स्त्री चुलीवर भात, डाळ ठेवून गोठ्यात शेण काढण्यासाठी जात असे. घरातील काम आटोपून ती शेतात घडी माणसांचे जेवण घेऊन जात असे. पावसाळ्यात मात्र पाठीवर पोत्याची खोळ, डोईवर भाकरीची बुट्टी, त्यावर गोराब घेऊन ती आपले कर्तव्य बजावत असे. ऊन, वारा पावसातही तिच्या कामात खंड पडत नसे. जेवण झाल्यानंतर तेच गोराब पाठीवर घेऊन दिवसभर शेतात काम करायचं आणि पक्षी परतू लागले की, दिवस मावळून अंधार पडू लागला की, घरी परतायचं. घरी पोहोचतात पुन्हा तिच्या घर कामाला सुरुवात होत असे. दिवसभर राबुन घरी परतणाऱ्या गडी माणसांना हातपाय धुवायला गरम पाणी हव म्हणून डेऱ्याखाली जाळ घालायचा. तसा प्रत्येक घरात हूलगा पेटलेला असायचाच. दिवसभर घर आणि शेतात राबणाऱ्या स्त्रीला मात्र सर्वांची जेवण अंथरुण आटोपल्यानंतरच पहाटेचा कोंबडा आरवेपर्यंत उसंत मिळत असे. ही गृहिणी दिवसभरात सर्वांची सेवा बिनतक्रार करत असे. तिची कधी त्याबद्दल आदळ आपट नव्हती, आरडाओरडा नव्हता, खायला मिळाल तरी. नाही मिळाला तरी. शिजवायला घरी काहीच नाही असे अनेक दिवस येत. कर्तव्यदक्ष, सोशिक, मायाळू अशा गृहिणीने भोपळ्याची, चिन्याची पानं, रताळी शिजवून वाढली. नाचणीची, मक्याची आंबील करून तीनं मुलांना वाढवलं. अशी स्त्री वादळ वाऱ्यात कोकणातल्या माडासारखी उभी राहिली म्हणून तिचा संसार उभा राहिला.

भोंडल्याची गाणी :-

भाद्रपदात गौरी-गणपती झाले की, मुलींना वेध लागतात ते 'भुलाबाई' किंवा भोंडल्याचे. त्या अगदी वाटच बघत असतात. लहानपणी भातुकली खेळायचा जसा तिचा हक्कच असतो, तसाच हा 'भोंडला' किंवा 'हादगा' आणि 'भुलाबाई उत्सव' तिचा हक्काचा असतो. मनोरंजनाबरोबरच त्यातून तिला शिक्षण पण मिळत असतं. असे शिक्षण देण्याची सुरुवातीला आपली मौखिक परंपरा होती. जात्यावरच्या ओव्या, दळणकांडण करताना म्हणायची गाणी. लग्नकार्यातली

किंवा शुभप्रसंगी म्हणायची मंगलगाणी, शेतातली कामे उरकताना म्हणायची गाणी, डोहाळजेवण, बारसे, पाळणा, विहीण म्हणणे, असे अनेक प्रसंग गीतातून वर्णन करून साजरे केले जायचे. पणजी, आजी यांच्याकडून नातीपर्यंत सर्व जण ही मौखिक परंपरा सांभाळायच्या. यातून मंगलमय वातावरण तयार व्हायचे, उत्साह वाढायचा आणि जीवन जगण्याची ओढ निर्माण व्हायची. कारण, जगण्यात आनंद असला तर जीवन सुसह्य होत जाते. म्हणूनच, उत्सवप्रियता आपल्या सर्वांना जास्त प्रिय होती आणि आहे. साने गुरुजींनी म्हणूनच म्हटलं आहे की, "नित्य क्रमाचे जेव्हा उत्सव होतात, तेव्हा आयुष्य ही एक आनंदयात्रा होते."भारतीय लोकसाहित्यात अशा लोकगीतांची परंपरा समृद्ध आहे. प्राचीन वैदिक वाङ्मयात त्याची मुळे आढळतात. अगदी जन्मापासून अंत्यविधीपर्यंत जे धार्मिक विधी असतात, त्याची त्या-त्या प्रसंगाची गीते प्रत्येक भाषेत दिसतात. मग त्या त्या प्रांतातल्या ज्या परंपरा आहेत, व्रतवैकल्ये आहेत, चालीरीती आहेत, त्याचे वर्णन अशा लोकगीतातून आपल्याला घडत असते.अशा साहित्यात मुख्यत: शिव-पार्वती, राधा-कृष्ण आणि राम-सीता हा विषय समान धागा म्हणून सर्व प्रांतात दिसतो. यात प्रेम भावना, आदर्श नाते संबंध, निष्कलंक चारित्र्य, आदर्श पती किंवा कुटुंब प्रमुख, विवाहसंस्था, प्रतिष्ठा असे अनेक विषय यातून प्रसृत होत असतात.

२.जात्यावरील ओव्या :-

पूर्वीच्या काळी पहाटेच्या निरव शांत वातावरणात जात्याची घरघर सुरू असायचे. स्त्रिया सुरात ओव्या म्हणत असत. सासर माहेरच्या आठवणींना ओवीतून मूर्तरूप येत असे. जाते ओढताना श्रमाचा, कष्टाचा विसर व्हावा या दृष्टीने ओवी गायन उपयुक्त ठरते. ओवी म्हणजे आपल्या मनातील भावभावनांचे गुंफण करणे, मनातल्या भावना शब्दांच्या लयीतओवणे. कधी कधी स्त्रीच्या मनातील करूण भाव, दु:ख, वेदना त्यातून स्पष्ट होतात. आज गावोगावी पिठाच्या गिरण्या आल्या आणि घरातील जाती गेली. त्यात नव्याने भर पडत आहे. घरघंटीची. त्यामुळे स्त्रीच्या अंतर्मनाचा श्वास तिची भावुकता आज दबलेली आहे की काय अशी शंका मनाला हुरहुर लावून जाते. ओवी म्हणजे स्त्रीच्या मनातला आतला आवाज. येथील लोकजीवनातील स्त्री मनाचे अनेक धुमारे, भाव स्पंदने संसाराविषयीच्या जाणिवा सासरमधील अनेक सुखदु:खाचे प्रसंग माहेरकडच्या आठवणी मुलाविषयीचे प्रेम , पतीविषयीची प्रेम भावना आणि देवाधर्माविषयीच्या तिच्या श्रद्धा या ओवीतून सहजपणे प्रकट झालेल्या दिसतात

बहिणी आता माहेरी पाठवा
भावाची बहिण लाडकी
निघाली माहेरी
पती देवांची स्वारी, अंगणी फेऱ्या घाली

पाळणागीते व अंगाईगीते :-

स्त्रीच्या जीवनात मातृत्व ही एक अत्यंत महत्त्वाची बाब मानली जाते. मातृत्वामुळे स्त्रीला पूर्णत्व येते. स्त्रीचे लग्न, तिचे गरोदरपण व मातृत्व या गोष्टी तिच्या जीवनात अत्यंत महत्त्वाच्या असतात. बाळ जन्माला आल्याने जशी पुरुषाला त्याच्या अस्तित्वाची जाणीव होते तसेच स्त्रीला तिथे आईपण, वात्सल्य, ममत्व जाणवते. आई होणे हे स्त्रीचे भाग्य मानले जाते. त्यामुळे तिला सासर व माहेर दोन्हीकडून सुख प्राप्त होते. तिला स्त्री जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटते. यामध्ये स्त्री-पुरुषाची कौटुंबिक, सामाजिक बांधिलकी जन्माला येते.

तिचे स्त्री म्हणून समाजात अस्तित्व निर्माण होते. बाळाला जन्म दिल्यानंतर तिच्या हृदयामध्ये वात्सल्याची भावना निर्माण होते. अपत्य प्राप्तीचा हा आनंद सोहळा जगातल्या विविध समाजात साजरा केला जातो. बाळ जन्माला आल्यानंतर बाराव्या दिवशी त्याला पाळण्यात घालून नामकरण विधी केला जातो. या कार्यक्रमाला बारसे असे म्हणतात. त्या दिवसापासून बाळ दोन-तीन वर्षाचे होईपर्यंत पाळणा हाच त्याचाबिछाना असतो. खेडेगावात घरातली आजी, आई बाळाला गोधडी शिवतात. विविध कपडे आणि लुगड्याचा भाग एकत्र करून गोधडी बनवली जाते. आईचे लक्ष सतत पाळण्याकडे असते. बाळ झोपणे, जागे होणे, हालचाल करणे, रडणे या साऱ्या गोष्टी आईला कळत असतात.

आईच्या गोड गळयातून निघणाऱ्या गोड ओव्या ऐकून बाळ तल्लीन होते आणि लवकर झोपी जाते. ही अंगाईगीते पाळणागीते म्हणजे झोपेचे संगीत आहे. बाळाला पाण्यात घालताना, त्याचे बारसे करताना पाळणा फुगे, फुले, विविध रंगीत पताकानी आणि खेळण्याने सजवतात. आजूबाजूला साऱ्या स्त्रिया मग बाळाच्या आईची ओटी भरतात. यावेळी बाळालाआंगडी,टोपडे घालून सजवले जाते व पाळण्यात घातले जाते. कुणी गोविंद घ्या कुणी गोपाल घ्या असे म्हटले जाते. बाळाला पाळण्यात घातले व त्याच्या कानात कुर्रर्र असे करून नाव ठेवले जाते. त्यानंतर नारळ, खोबरे, साखर, पेढे, घुगऱ्या, लाडू वाटले जातात. आईचे प्रेम आईचे ममता, पाळणा आणि अंगाई गीत यातून दिसून येते. बाळाला झोपवण्यासाठी अंगाई गीत व पाळणे म्हटले जातात. हा स्त्री मनाचा सहस सुंदर भावाविष्कार आहे .

बाळा जो जो रे
पापणीच्या पंखात झोपू दे
डोळयाची पाखरे बाळा जो जो रे ॥ धृ ॥
पुरे खेळणे आता बाळा
थांबव चाळा थांबवबाळा
बाळाजो जो रे ॥ १ ॥
शब्द ऐकता झोपेमधुनी
जागा तो लडिवाळा बाळा जो जो रे ॥२॥

विवाहाची गाणी /व्हवये :-

मानवी जीवनात लग्नकार्याला खूप महत्त्व आहे. स्त्री-पुरुष नात्याला संसाररूप प्रेमसंबंध निर्माण करण्यासाठी एकत्र जोडणारा एक विवाहपूर्ण सोहळा म्हणजे लग्न. लग्न कार्यातील लग्नविधींना खूप महत्त्व आले आहे. लग्न होऊन मुलगी नवऱ्याच्या घरी सासरी येते व कायमची त्यांची सहचारिणी पत्नी बनुन राहते. यामध्ये दोन घराणी म्हणजे दोन कुळे एकत्र बांधली जातात. विवाहपूर्वी मुलगी बापाच्या मर्जीत राहते. विवाहानंतर ती नवऱ्याच्या मर्जीत राहते. नवरारुपी तिचा हा पुरुष तिच्या कुंकवाचा धनी आणि साताजन्मीचा सोबती असतो. प्रपंचाच्या सुखदु:खात ती त्याला साथ करते. त्याच्या नावाचे मंगळसूत्र गळयात घालते. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन अशा अनेक धर्मामध्ये लग्नकार्य विधीयुक्त पार पडते. लग्नाचा सोहळा अनेक विधींनी भरलेला असतो.

गुंडान बांधलं तळा रकेन खातलं आळ
उदुकाच्या बाळावयन कोंब येल
एक पान नागेली दोन पानं झाली
तीनुपाना नागेली बी खवली
तिनु पानं नागेली चार पानं झाली
पाच पानं नागेली डाळब्या फुटली
पाच पानं नागेली सहा पान झाली
सात पानं नागेली तुरकाट्या येडेली
सात पानं नागेली आठ पानं झाली
नऊ पान नागेली मांडव चढली
दहा पानं झाली अकरा पानं नागेली फुलं पडली

लोकगीतातून सामाजिक जीवन वर्णन :-

खेड्यातील बहुतेक लोक शेतकरी आहेत. त्यांची राहणी साधी आहे. येथील लोक सण उत्सव यात्रा लग्न समारंभ मोठ्या उत्साहात साजरे करतात. या उत्सवात सर्व धर्माचे लोक सहभागी होताना दिसतात. खेड्यातील व शहरातील लोकांच्या राहणीमानात फरक असला तरी खेड्यातील लोकांमध्ये आपुलकीची भावना अधिक प्रमाणात दिसून येते.

येथील स्त्री जीवन अत्यंत खडतर असते. शेती हाच मुख्य व्यवसाय असल्यामुळे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शेतात काम करावे लागते. सकाळी घरकाम उरकून त्यांना पुरुषांबरोबर कामात सहभागी व्हावे लागते. येथील स्त्रियांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या धार्मिक वृत्तीच्या दिसून येतात.उपवास करणे, कीर्तन भजन ऐकणे हे त्यांना पुण्याचे काम वाटते. आपल्या श्रद्धा भावभावना हारोळी परंपरा जपताना दिसून येतात.

स्त्री लोकगीतातून व्यक्त होणारे सामाजिक संदर्भ :-

माहेरवाशीणीच्या गीतामधून तिच्या मनातील भावभावना यांचे वर्णन दिसून येते सासु सुनेची भांडणे बहिणीला भावाने साडी चोळी घेण्याची प्रथा इत्यादी चा उल्लेख दिसून येतो. लग्न प्रसंगी म्हटलेल्या गीतामधून कुंकू तीळ सुपारी सोन्याची सरी इत्यादी नावे येतात. देव देवतांच्या गीतामधून विविध देवांची वर्णने त्यांचे कार्य याचे वर्णन आढळते.

लोकगीतातून व्यक्त होणाऱ्या लोक समजुती :-

लोकगीतातून विविध स्वरूपाच्या लोकसमजुती दिसून येतात. नवरदेव निघाल्यावर त्याच्यावरून लिंबू उतरवून टाकल्यामुळे काहीही बाधा होत नाही. मांजर आडवी गेली की आपले काम होत नाही. मुलगा हा वंशाचा दिवा असतो आणि तो आपला वंश वाढवतो. पडक्या विहिरीपाशी भूत असते. देव नैवेद्य खाऊन जातो अंगात देव येतो आणि बोलतो अशा विविध प्रकारच्या समजू लोक गीतातून दिसून येतात.

लोकगीतातून व्यक्त होणारे स्त्रीमन :-

लोकसाहित्याचा बराच भाग स्त्रीलोकगीतांनी व्यापला आहे. पहाटेच्या प्रसंगी जात्याच्या घरघरितून निघणाऱ्या ओव्यांचाउत्कट सहज सुंदर आवाज असो किंवा फुगडी गीतातील तिच्या मनातील अल्लड भाव असो, पोरकटपणातील संवाद असो, तिचे भावजीवनसहजपणेयातूनव्यक्त होते. ती आपल्या लोकगीतातून सहजपणे बोलते. भारतीय संस्कृती मुळातच पुरुषप्रधान आहे. तसेच ती कृषी जीवनावर आधारलेली आहे. समाजात स्त्रीचे स्थान दुय्यम आणि दुर्बलही आहे असाही युक्तिवाद समाज करत आला आहे. पतिव्रता आणि तिचा देवावरचा दृढ विश्वास यात ती गुरफटलेली आहे. कौटुंबिक नाते संबंधातून ती अधिक भावूक आणि मनोनिग्रहीबनली आहे. स्त्रीचा जन्म परक्या घरासाठी असतो असे सतत तिच्या मनावर बिंबवले जाते. त्यामुळेचती पराधीन असते. इथल्या मुलखातील स्त्री लोकगीतात देवधर्म, कृषीजीवन, सासर, माहेर अशा विविधांगी घटना प्रसंगाचे वर्णन येते. स्त्रीच्या मनातील भावतरंग, विविध भावछटा, तिच्या जगण्यातले अनेक संदर्भ, सुखदुःखाचे प्रसंग या गीतातून येतात त्यामुळेच हे लोक गीते लोकसंस्कृतीचाअमूल्य ठेवा आहे असे म्हणावेसे वाटते. स्त्रियांनी म्हटलेल्या अंगाई गीते, झोपाळा गीते, फुगडी गीते यातून त्यांचे विविध भाव प्रकट होतात. शिक्षणामुळे आज स्त्री ही बदलते आहे. चूलआणिमूल यापासून बाहेर पडून नोकरी व्यवसाय करु पाहत आहे. तरीही खेड्यापाड्यातील ग्रामीण निरक्षर स्त्री अजूनही आपल्या देवधर्म, रितीरीवाज आणि व्रतवैकल्यात अडकलेली आहे. लोकसंस्कृतीचे नानाविध रंग अजूनही तिच्या जीवनरहाटाला बांधलेले आहे. तिचे समर्पण, त्याग आणि सेवा यातूनती सतीसावित्रीचाच वारसा पुढे चालवत आहे. यमाच्यापाशातून नवऱ्याचे प्राण परत आणणारी सावित्री अजूनही वडाला फेऱ्या मारत आहे. नवऱ्यासाठी उपासतपास, देवाला साकडे घालत आहे. स्त्री स्वतःचा संसार समर्थपणे उभी करत आहे.तिचीही भाववृत्तीव अंतरिक उर्मी अनेक लोकगीतांतून प्रकट झाली आहे. संसार सुखासाठी आसुसलेली ही स्त्री अधिक भावूक, उत्कट होऊन आपली मनोकामना अनेक कवितातून व्यक्त करताना दिसते. या लोकगीतातील रचनेची विविधता, आशय, अभिव्यक्ती यातून स्त्रीच्या स्वाभाविक जीवनाचे प्रत्ययकारी वर्णन आलेले आहे.

लोकगीतातून स्त्री मनाचा शोध घेतला असतातिचे विविध पैलू आपल्या दृष्टीस पडतात स्त्री ही धार्मिक श्रद्धाळू असल्यामुळे देव देवतांचे पूजा करण्यात त्यांचे गुणगान गाण्यात तिचे मन गुंतलेले दिसते गणपती तुळस ज्ञानोबा तुकाराम विठ्ठल रुक्मिणी शंकर पार्वती यांना ती आपल्या दैनंदिन जीवनात महत्त्व देताना आढळते ही स्त्री कष्टकरी आहे आपल्या कुटुंबासाठी ती रात्रंदिवस राखताना दिसते असे असले तरीसुद्धा तिला परमेश्वराचे विस्मरण होत नाही आपल्या आई वडील भाऊ बहीण मुले यांना तिथेच प्रेमाने जवळ करते आपले माहेर व सासर यांच्या विषयी तिच्या मनात आदर आहे असताना तिला काही प्रमाणात त्रास सहन करावा लागतो अनेक गोष्टी तिच्या मनाविरुद्ध होत

असल्या तरी त्या तिला स्वीकाराव्या लागतात त्यामुळे माहेर विषयी असलेली स्त्रीची अत्यंत ओढ लोकगीतातून दिसून येते स्त्री लोकगीतातून श्री मनाचे विविध रूपे माहिती असली तरी ती सोशिक , धार्मिक, परंपरागत जीवन जगणारी दिसून येते लग्नप्रसंगी म्हटला जाणारा उखाणा पाहिला असता येथे स्त्रीचे कौशल्य व चातुर्य प्रकट होते विविध सण उत्सव प्रसंगी विविध खेळ खेळले जातात त्यामध्ये स्त्री मनोभावे सहभागी होऊन आनंद व्यक्त करते नागपंचमी सणानिमित्त खेळल्या जाणाऱ्या फेर फुगडी मध्ये तिची खिलाडू वृत्ती व मोठेपणा दिसून येतो

निष्कर्ष :-

१. लोकगीतात समाजातील विविध प्रकारच्या लोकवर्तनाचे दर्शन होते.

२. ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांचे जीवन आणि त्यांच्या समस्या या लोकगीतातून प्रभावीपणे मांडल्या आहेत.

३. या लोकगीतांची भाषा साधी पण थेट काळजाला भिडणारी आहे.

४. या लोकगीतातून सामाजिक वास्तवाचे विशेषता ग्रामीण भागातील जीवनाचे प्रखर दर्शन घडते.

५.या लोकगीतातून स्त्री जीवनाचे वास्तव दर्शन घडते.

संदर्भ ग्रंथ :-

१.बाबर सरोजनी.१९७३ ,महाराष्ट्र शासन ,मुंबई संचालक प्रसिध्दी संचालनालय ,मराठीतील स्त्रीधन ,

२.भवाळकर तारा (.डॉ), लोकसंचित.१९८९ ,पुणे ,राजहंस प्रकाशन ,

३.भवाळकर तारा (.डॉ), मराठी लोकसाहित्यातील स्त्री.१९९० ,पुणे ,सुगावा प्रकाशन ,प्रतिमा-

४. गोपाळ गावडे , बाई शेवंती फुललेयी चंदगड परिसरातील लोकगीते , मनोकामना प्रकाशन , सांगली ,२०१५

राजकीय दृष्टिकोनातून अभिजात भाषा आणि साहित्य

डॉ. वंदना अरुण सातपुते
राज्यशास्त्र विभाग भारती विद्यापीठाचे,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली.
Email: vandanasatpute15@gmail.com Cell No: 9960382362

प्रस्तावना:

भाषा आणि साहित्य हे केवळ संवादाचे माध्यम किंवा कलात्मक अभिव्यक्तीचे साधन नसून सामाजिक–राजकीय जीवनाची ताकद आणि प्रभावशाली भूमिका बजावणारे सांस्कृतिक घटक आहेत. विशेषतः अभिजात भाषा आणि साहित्य हे राजकीय शक्ती, राजकीय विचार, सत्ता-रचना आणि सामाजिक न्याय यांच्याशी असलेले घनिष्ठ नाते समजून घेणे हे कोणत्याही समाजशास्त्रीय व राजकीय विश्लेषणाचे मूलभूत आधार आहेत.

या शोध निबंधात आपण "अभिजात भाषा आणि साहित्य" हे संकल्पना क्षेत्र, त्याचे राजकीय अर्थ, सत्ता निकषात भाषेची भूमिका, साहित्याच्या माध्यमातून राजकीय संदेश आणि विविध सामाजिक- राजकीय चळवळींमध्ये भाषेचा वापर इत्यादी मुद्दे विस्तृतपणे समजावून घेऊ. हे विश्लेषण केवळ सैद्धांतिक स्वरूपात नाही तर ऐतिहासिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनातूनही विस्तृत आहे.

उद्दिष्टे:

प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत-

1. अभिजात भाषा आणि साहित्य या संकल्पनांचा सैद्धांतिक अर्थ स्पष्ट करणे.
2. भाषा आणि सत्ता यांच्यातील परस्परसंबंधाचे विश्लेषण करणे.
3. राजकीय दृष्टिकोनातून साहित्याची भूमिका अभ्यासणे.
4. भारतीय संदर्भात अभिजात भाषा आणि साहित्य यांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोध निबंधासाठी पुढील संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात आलेला आहे - वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, ऐतिहासिक, तुलनात्मक व ग्रंथालयीन संशोधन पद्धती चा वापर करण्यात आलेला असून या संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम स्रोतांचा (Secondary Sources) वापर करण्यात आला आहे.

१. अभिजात भाषा: अर्थ, व्याख्या आणि वैशिष्ट्ये-

"अभिजात भाषा" म्हणजे उच्चबद्ध, सुसंस्कृत आणि सामाजिक दृष्ट्या प्रतिष्ठित असे भाषेचे रूप. ही भाषा केवळ शब्दसंपदा, व्याकरणाची शुद्धता किंवा शैलीशौर्यापुरते मर्यादित नसून ती एक सामाजिक प्रतीक म्हणून कार्य करते. अभिजात भाषेला त्याचे सामाजिक राजधानी, प्रतिष्ठा आणि सामाजिक–सांस्कृतिक मान्यता दिली जाते.

अ) अभिजात भाषेची व्याख्या:

अभिजात भाषा ही समाजाच्या उच्चवर्गीय, साक्षर किंवा प्रतिष्ठित गटांनी वापरली जाणारी भाषा आहे, जी लिखित, शैक्षणिक, प्रशासनिक आणि राजकीय व्यवहारात प्राधान्य प्राप्त करते.या भाषेला संप्रेषणातील शुद्धता, व्याकरणाची काटेकोर अंमलबजावणी आणि परिष्कृत शैली यामुळे उच्च दर्जा प्राप्त होतो.

ब)अभिजात भाषेची वैशिष्ट्ये:

- व्याकरणिक शुद्धता.
- शब्दभांडाराची समृद्धी.
- लिखित आणि तात्काळ संवादात सुसंगतता.
- राजकीय व प्रशासकीय. व्यवहारात स्वीकार्यता.
- शैक्षणिक आणि साहित्यिक परंपरेतील स्थान.

या वैशिष्ट्यांमुळे अभिजात भाषा सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठा दर्शवते. परंतु, ही भाषा केवळ संवादाचे माध्यम नसून सत्ता निर्माण, सामाजिक सत्ता-व्यवस्था व राजकीय प्रभाव विस्तारण्याचे साधन म्हणूनही वापरली जाते.

२. भाषा, सत्ता आणि सामाजिक दर्जा:

भाषा आणि सत्ता यांच्यातील नाते अगदी प्राचीन आहे. राजकीय सत्ता हे भाषेच्या वापरावर आधारित असते; भाषा ही सत्ता निर्माण करणारी शक्ति आहे.

अ)भाषा आणि सामाजिक प्रतिष्ठा-

भाषा ही समाजातील विविध गटांमधील फरक ओळखण्याचे प्रमुख साधन आहे. विशिष्ट प्रकारची भाषा अधिक प्रतिष्ठित मानली जाते आणि तीच भाषा सामाजिक श्रेष्ठतेचे प्रतीक बनते.

- भाषा-आधारित सामाजिक विभाजन अनेक परिणाम घडवते.
- शैक्षणिक संधींमध्ये भेद
- राजकीय प्रभावात भेद
- नोकरी व प्रशासनातील श्रेणीभेद

उदा.- इंग्रजी भाषेला भारतातील उच्चशिक्षण, प्रशासकीय कामकाज व राजकीय निवेदनार्थ अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे.

ब)सत्ता-निर्माण आणि भाषा-

भाषा केवळ संवादाचे साधन नसून ती लोकांचे विचार, भावना, विश्वास आणि राजकीय संकल्पना बांधण्याचे माध्यम आहे. सत्ता–संरचना तयार करण्यासाठी भाषा अत्यंत महत्त्वाची असते. मात्र, अभिजात भाषा ही संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करत नाही; ती बहुतेक प्राधान्य गटांचे हित साधणारी असते.

उदाहरणार्थ- राजकीय भाषणे, न्यायालयीन निर्णय, सरकारी धोरणे

ही सर्व अभिजात भाषेमध्ये सादर केल्या जातात आणि त्यातून सत्ता निश्चित होते की कोणत्या गटांचे हित वाधले जाईल व कोणत्या गटांचे दुर्लक्षित राहतील.

३) साहित्य आणि राजकीय संदेश:

साहित्य हे समाजाचे दर्पण आहे. काव्य, कथा, नाटक, निबंध — हे राजकीय विचारांचे प्रतिबिंब असतात. साहित्यकार सामान्यतः आपल्या लेखनातून सामाजिक बंधने, राजकीय अनुचितता व सत्ता विरोधी संदेश प्रसारित करतात.

अ)राजकीय साहित्याची व्याख्या-

राजकीय साहित्य म्हणजे असे साहित्यिक उत्पादन जे सत्ता, सामाजिक न्याय, लोकशाही तत्त्वे, समानता आणि परिवर्तन यावर भाष्य करते आणि वाचकांमध्ये राजकीय विचारांची जागरूकता निर्मिती करते.

ब)साहित्यातील सामाजिक–राजकीय चेतना-

भारतीय व विदेशातील अनेक साहित्यकारांनी आपल्या लेखनातून राजकीय आणि सामाजिक अशा विषयांवर विचार मांडले आहेत:

- मुंशी प्रेमचंद (भारतीय समाजातील अन्यायावर तिखट भाष्य)
- राजेन्द्र विश्वनाथ पणसेकर (भाषा–संस्कृती व सामाजिक बदल)
- जॉर्ज ऑरवेल (राज्याशक्तीवरील तंटे)
- वोल्टेअर (राजकीय तत्त्वज्ञान)

या साहित्यकारांनी त्यांच्या लेखनातून सामाजिक समस्या पुढे आणल्या आणि त्या वाचकांसमोर विचार करण्यास लावल्या.

४. अभिजात भाषा आणि राजकीय साहित्य: भारतातील परिप्रेक्ष्य-

भारत हे बहुभाषिक व विविध सांस्कृतिक समूहांचे देश आहे. येथे भाषा–राजकारण हे एक अत्यंत संवेदनशील विषय आहे. अभिजात भाषा म्हणून हिंदी, इंग्रजी आणि काही प्रादेशिक भाषांना वेगळे स्थान दिले जाते.

अ)राजकीय अभिजात भाषा:

हिंदी आणि इंग्रजी- स्वातंत्र्यानंतर हिंदीला राजकीय दृष्टीकोनातून राष्ट्रीय भाषा म्हणून स्थान देण्याचा प्रयत्न झाला. परंतु, संविधानाने कोणतीही भाषा राष्ट्रीय भाषा म्हणून अधोरेखित केले नाही. इंग्रजी हे शिक्षण, न्यायालयीन विषय आणि आंतरराष्ट्रीय संवाद यासाठी प्राधान्याने वापरले जाते.

- ही भाषा–राजकीय प्रतिष्ठा खालीलप्रमाणे दिसून येते:
- राजकीय निवेदने
- सरकारी आदेश

शासकीय व्यावहारिक व्यवहार
यामुळे बहुभाषिक समाजात राजकीय व सामाजिक संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे.

ब)साहित्य आणि भाषा–राजकारण-

भारतीय साहित्य हे राजकीय चेतनेचे सर्वात महत्त्वाचे साधन आहे. लोकशाही, समानता, दलित–आंदोलन, महिला–आंदोलन, पर्यावरणवादी साहित्य — हे सर्व राजकीय चेतनेचे प्रतिनिधित्व करतात.

उदाहरणार्थ:

- दुर्गा बागवारे (पर्यावरणीय राजकारण)
- अण्णा हजारे आंदोलन अथवा किसान आंदोलन संबंधी साहित्य
- दलित साहित्य आणि भाषिक बदल

या साहित्यांनी राजकीय विचारांना बळ दिले आहे.

५. अभिजात भाषा आणि सामाजिक अन्याय:

भाषा हे केवळ अभिजाततेचे प्रतीक नाही; अनेकदा ती सामाजिक भेदभाव आणि वंचित समूहांच्या आवाजाला दडपणारा माध्यमही बनते.

अ)भाषा आणि वर्गभेद-

अभिजात भाषेचा वापर केवळ उच्चभ्रू गटांपुरता मर्यादित केल्यास सर्वसामान्य, शोषित व वंचित गटांचे आवाज दडपले जातात. हे सामाजिक–राजकीय न्यायाच्या विरोधात जाते.

- भाषेचे हे रूप सामाजिक विभाजन
- शिक्षणातील असमानता
- आर्थिक विभाजन
- राजकीय व सामाजिक प्रतिष्ठेतील भेद

यामुळे समाजातील विविध गटांमध्ये संघर्ष वाढतो.

ब) भाषेविरोधी आंदोलनाची बाब-

भाषा विरोधी आंदोलनात स्थानिक आणि आदिवासी भाषांच्या हक्कासाठी संघर्ष होते. हे आंदोलन राज्य सत्ता व अभिजात भाषेच्या विरोधात उभे राहतात. उदाहरणार्थ महाराष्ट्रात मराठी भाषेच्या संरक्षणासाठी, दक्षिण भारतात स्थानिक भाषांचा वापर वाढवण्यासाठी आंदोलन.

या आंदोलनांनी स्पष्ट केले की अभिजात भाषेचा वापर जर सर्वसमावेशक न होऊ शकला तर तो राजकीय व सामाजिक असमानता वाढवणारा ठरतो.

६. अभिजात भाषा आणि ज्ञान–सत्ता:

भाषा आणि ज्ञान हे एकमेकांना पूरक आहेत. परंतु ज्ञानावर नियंत्रण म्हणजे सत्ता मिळवणे. अभिजात भाषा हे ज्ञानाचे प्रमुख वाहक झाले आहे. त्यामुळे भाषेवर आधारीत सत्ता–ज्ञान संबंध समजणे अत्यंत गरजेचे आहे.

अ)भाषा आणि ज्ञानात्मक वर्चस्व- विश्वविद्यालय, शाळा, शासकीय परीक्षा — हे सर्व अभिजात भाषेच्या ज्ञानाला प्रोत्साहन देतात. त्यामुळे:

- उच्चशिक्षणात अभिजात भाषा वापरली जाते.
- ज्ञानात्मक वर्चस्व निर्माण होते.
- समाजातील उच्चवर्गीय घटकांना भरपूर संधी प्राप्त.

या प्रक्रियेत भाषा केवळ साधन नसून सामाजिक प्रतिष्ठेचा स्रोत बनते.

ब) भाषिक वर्चस्व आणि ज्ञानाचे संरचना- भाषा जेव्हा ज्ञानाच्या संरचनेचा भाग बनते, तेव्हा ती सत्ता–ज्ञान नेटवर्क तयार करते. ज्ञानावर नियंत्रण असलेली भाषा राजकीय निर्णयांवर प्रभाव टाकू शकते. उदाहरणार्थ:

- शाळा-पाठ्यपुस्तकांमध्ये अभिजात भाषेचे प्रभुत्व
- विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र यांसारख्या क्षेत्रांमध्ये अभिजात भाषेचा वापर

या सर्वांनी समाजातील विविध गटांच्यात ज्ञानात्मक न्याय प्रश्न निर्माण झाला.

७. राजकीय प्रभाव आणि अभिजात भाषेचे भविष्य:

भाषा आणि साहित्य अजूनही राजकीय संघर्ष आणि सामाजिक बदलाचे अत्यंत शक्तिशाली माध्यम आहेत. आधुनिक काळात मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि जागतिकीकरण यामुळे भाषेचे स्वरूप बदलत आहे. परंतु अभिजात भाषेचे राजकीय प्रभाव कायम राहाणार आहे.

- डिजिटल युगातील भाषा- इंटरनेट, सोशल मीडिया आणि डिजिटल संवादाचे वाढते प्रभावामुळे भाषा विविध स्वरूपात प्रसारित होते. परंतु राजकीय गट आणि सत्ता-नियमन करणारे संस्थान हे डिजिटल माध्यमांवर भाषेचा वापर करून राजकीय प्रभाव वाढवतात.
- अभिजात भाषा आणि सामाजिक समावेश- भाषेचा वापर सर्व समाजातील गटांमध्ये समावेशी बनावा, ही एक गरज आहे. अभिजात भाषा आणि साहित्य हे समाजातील सर्व स्तरांवर पोहोचणे आवश्यक आहे. यासाठी:
- बहुभाषिक शिक्षण
- स्थानिक भाषांचा वापर
- साहित्याच्या माध्यमातून संवाद

हे उपाय आवश्यक ठरतात.

निष्कर्ष:

भाषा आणि साहित्य हे राजकीय संकल्पना, सत्ता आणि सामाजिक न्याय यांच्यातील नाते स्पष्ट करणारे अत्यंत प्रभावशाली साधन आहेत. अभिजात भाषा केवळ संवादाचे तसेच सत्ता–निर्माणाचे माध्यम आहे. साहित्य माध्यमातून राजकीय व सामाजिक विचारांचे प्रसारण होते. तथापि, अभिजात भाषा केवळ एक गटाचे साधन न राहता सर्व समाजाला समाविष्ट करणारी व समतेची भाषा बनली तरच ती वास्तव अर्थाने समाज-राजनीतीचा भाग ठरेल.

भाषा आणि साहित्यावर राजकीय दृष्टिकोनातून केलेले हे विश्लेषण दर्शवते की भाषा आणि सत्ता हे अविभाज्य आहेत. भाषा हे केवळ शब्दांचा संच नसून सामाजिक विचारांचे, राजकीय इच्छांचे आणि सत्तेच्या मनोरथांचे प्रतिबिंब आहे.

संदर्भ ग्रंथ:

1) डॉ.सुशील जोशी- 'भाषा आणि सत्ता'
2) प्रो.आशिष देसाई- 'भाषा, समाज आणि राजकारण'
3) डॉ.रवींद्र पाटील- 'राजकीय साहित्याचे तत्त्वज्ञान'
4) डॉ.मीना शंकर- 'संवाद व सत्ता'
5) डॉ. अजय कुलकर्णी- 'भारतीय भाषांचे राजकीय इतिहास'
6) James W. Tollefson- 'Globalization and Language Politics'
7) Norman Furlough- 'Language and Power'
8) Terry Eagleton- 'Literature and Politics'

अभिजात भाषा: ग्रंथपालांची भूमिका

प्रा. जयश्री धोंडीराम हाटकर
ग्रंथपाल,
भारती विद्यापीठाचे,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली (महाराष्ट्र) – ४१६ ४१६.
E-mail ID: jayashri.hatkar@bharatividyapeeth.edu
मो. नं. ९९६०५४९५३०.

सार:
अभिजात भाषा (elite / classical language) ही समाजातील सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि शैक्षणिक वारसा सांगणारी भाषा असते. ग्रंथालये आणि ग्रंथपाल या भाषेच्या संवर्धनात, प्रसारात आणि योग्य व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावतात. हा लेख अभिजात भाषेच्या वैशिष्ट्यांचा आढावा घेऊन ग्रंथपालांनी कोणते उपाययोजना कराव्यात, कोणत्या धोरणांचा अवलंब करावा आणि परंपरागत तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने अभिजात भाषेला कसे टिकवून ठेवता येईल याचा सैद्धान्तिक व व्यावहारिक अभ्यास करतो. लेखामध्ये शैक्षणिक संदर्भ, ग्रंथालयीन सेवा, डिजिटल संग्रहण, समुदायांकन आणि नैतिक/धोरणात्मक आव्हान यांचा समावेश आहे.

संकेतशब्द: अभिजात भाषा, ग्रंथालय सेवा, ग्रंथपालांची भूमिका, डिजिटल आर्कायव्हिंग, भाषा संवर्धन, साङ्गोपाङ्गो (community engagement), सांस्कृतिक वारसा, शैक्षणिक संसाधने, बहुभाषिक ग्रंथालये, नीतिगत धोरणे

1. परिचय

भाषा ही समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचा आणि ऐतिहासिक स्मृतीचा मूलाधार मानली जाते; विशेषतः अभिजात किंवा शास्त्रीय परंपरेशी निगडित भाषा समाजाच्या ज्ञानवारशाचे वहन करते (UNESCO, 2003). अशा भाषांचे संवर्धन व प्रसार हे केवळ भाषाप्रेमी व्यक्तींचे कार्य नसून शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पायाभूत रचनेशी संबंधित व्यापक जबाबदारी आहे (Bawden & Robinson, 2020). ग्रंथालये ज्ञानसंग्रहाची केंद्रे म्हणून कार्य करतात, आणि ग्रंथपाल हे त्या ज्ञानसंपदेचे व्यवस्थापक, मार्गदर्शक व संरक्षक असतात (Ranganathan, 1931). ग्रंथपालांकडे व्यवस्थापनकौशल्यासोबत भाषिक संवेदनशीलता, संग्रहविज्ञानातील तांत्रिक समज आणि समाजाशी परिणामकारक संवाद साधण्याची क्षमता असणे आवश्यक आहे (Franks, 2018). प्रस्तुत लेखाचा उद्देश अभिजात भाषांच्या संदर्भात ग्रंथपालांची भूमिका विशद करणे आणि त्यासाठी उपयुक्त व्यावहारिक शिफारसी मांडणे हा आहे.

2. अभिजात भाषेची ओळख आणि वैशिष्ट्ये

अभिजात भाषा ही अशी भाषा मानली जाते की ज्यामध्ये दीर्घ ऐतिहासिक परंपरा, समृद्ध साहित्यसंपदा, शास्त्रीय लेखनशैली आणि महत्त्वपूर्ण सांस्कृतिक दस्तऐवज जतन झालेले असतात (Chowdhury, 2010). अशा भाषांमधील साहित्य केवळ भाषिक अभिव्यक्ती नसून समाजाच्या ज्ञानपरंपरेचे आणि विचारविश्वाचे दस्तऐवजीकरण असते (UNESCO, 2011).

या भाषेची काही लक्षणीय वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिसून येतात:

- **ऐतिहासिक सातत्य:** अनेक शतकांपासून किंवा सहस्रावर्षांपासून उपलब्ध असलेले लिखित वाङ्मय.
- **साहित्यिक परंपरा:** काव्य, निबंध, तत्त्वज्ञान, धर्मग्रंथ आणि शास्त्रीय लेखनाचा ठेवा.

- **शैक्षणिक उपयुक्तता:** उच्च शिक्षण, संशोधन आणि तात्त्विक चर्चेसाठी वापर.
- **मर्यादित व्यवहार्य वापर:** दैनंदिन संभाषणात कमी प्रमाणात वापर; मात्र शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात विशेष महत्त्व.

अशा भाषांचा वारसा जतन करण्यासाठी ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते, कारण ग्रंथालये दस्तऐवजांचे संरक्षण, सूचीकरण आणि अभ्यासकांना सुलभ उपलब्धता सुनिश्चित करतात (Gilliland, 2014). तसेच, ग्रंथालये समुदायाला या भाषिक साहित्याशी जोडून ठेवण्याचे कार्यही करतात (ALA, 2019).

3. ग्रंथपालांची पारंपरिक भूमिका

ग्रंथपालांची पारंपरिक जबाबदारी ही मुद्रित व कागदोपत्री साधनसामग्रीचे दीर्घकालीन संरक्षण, योग्य वर्गीकरण, अचूक सूचीकरण आणि वापरकर्त्यांना सुलभ उपलब्धता सुनिश्चित करण्याशी संबंधित असते (Bawden & Robinson, 2020). ग्रंथालय विज्ञानातील मूलभूत तत्त्वे आणि संग्रहधारणेचे नियम हे या कार्याला शास्त्रीय आधार देतात. अभिजात भाषेच्या संदर्भात हीच तत्त्वे अधिक संवेदनशीलतेने लागू करावी लागतात, कारण अशा साहित्यामध्ये भाषिक सूक्ष्मता, ऐतिहासिक संदर्भ आणि सांस्कृतिक मूल्ये दडलेली असतात (Gilliland, 2014).

या संदर्भात S. R. Ranganathan यांनी मांडलेले ग्रंथालय विज्ञानाचे तत्त्वज्ञान विशेष मार्गदर्शक ठरते. वाचन प्रसार, ज्ञानाची उपलब्धता आणि वापरकर्तांकेंद्रित सेवा यांवर त्यांनी दिलेला भर अभिजात भाषेच्या साहित्याच्या जतन व प्रसारासाठीही तितकाच उपयुक्त आहे (Ranganathan, 1931). तसेच, नोंदी व्यवस्थापन व माहितीचे सुयोग्य नियोजन हे अभिजात भाषेतील संग्रह हाताळताना अत्यावश्यक ठरते (Franks, 2018).

4. आधुनिक संदर्भात ग्रंथपालांची विस्तारित भूमिका

तंत्रज्ञानातील झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे आणि माहितीच्या डिजिटायझेशनमुळे ग्रंथपालांची भूमिका केवळ संग्रह साठवण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही; ती माहिती व्यवस्थापन, डिजिटल प्रवेश आणि ज्ञान प्रसाराच्या नव्या आयामांपर्यंत विस्तारली आहे (Marcum, 2014; Bawden & Robinson, 2020). अभिजात भाषांच्या संदर्भात ही विस्तारित भूमिका अधिक महत्त्वाची ठरते.

- **डिजिटल आर्कायव्हिंग व मर्यादारहित प्रवेश**

अभिजात भाषेतील हस्तलिखिते, पांडुलिपी आणि जुनी प्रकाशने उच्च गुणवत्तेत डिजिटाईज करून डिजिटल संग्रह तयार करणे आवश्यक आहे. समृद्ध मेटाडेटासह संरचित डिजिटल आर्काइव्हमुळे संशोधकांना जलद शोध, सोयीस्कर प्रवेश आणि मूळ दस्तऐवजांचे संरक्षण साध्य होते (IFLA, 2012; UNESCO, 2003).

- **बहुभाषिक सूचीकरण व मेटाडेटा (Metadata & Cataloguing)**

बहुभाषिक मेटाडेटा मॉडेलमध्ये स्थानिक शीर्षक, रोमनायझेशन, इंग्रजी शीर्षक आणि विषय-टॅग समाविष्ट केल्यास आंतरराष्ट्रीय स्तरावर शोधसुलभता वाढते. मानकीकृत सूचीकरण माहिती पुनर्प्राप्ती अधिक परिणामकारक बनवते (Chowdhury, 2010).

- **भाषा शिक्षण आणि समुदाय सहभाग (Community Outreach)**

वाचनवर्ग, कार्यशाळा आणि संवाद सत्रांद्वारे अभिजात भाषेचा प्रसार करता येतो. शाळा, विद्यापीठे आणि सांस्कृतिक संस्थांशी भागीदारी केल्यास समुदायाचा सक्रिय सहभाग वाढतो (IFLA, 2015; ALA, 2019).

- **डिजिटल हेरिटेज आणि डिजिटल ह्युमॅनिटीज साधने**

टेक्स्ट मायनिंग, कॉर्पस-आधारित विश्लेषण आणि भाषिक डेटासेट तयार करण्यासाठी ग्रंथालये तांत्रिक सहयोग देऊ शकतात. या साधनांमुळे शब्दवापर, शैली आणि कालानुक्रमिक बदलांचा सखोल अभ्यास शक्य होतो (Gilliland, 2014).

- **संरक्षकत्व (Conservation) आणि पुनर्प्रकाशन**

भौतिक संरक्षणासाठी योग्य तापमान-आर्द्रता नियंत्रण, नाजूक दस्तऐवजांची दुरुस्ती आणि सुरक्षित हाताळणी आवश्यक असते. तसेच, पुरातन साहित्याचे समकालीन भाषेत पुनर्प्रकाशन केल्यास वाचनीयता आणि वापर वाढतो (Digital Preservation Coalition, 2015; Franks, 2018).

5. आव्हाने व अडथळे

अभिजात भाषेच्या संरक्षणात ग्रंथालयांना पुढील प्रमुख अडचणींचा सामना करावा लागतो:

- **वित्तीय स्रोतांची कमतरता:** डिजिटायझेशन, संरक्षण आणि साठवणूक यासाठी आवश्यक निधी मिळवणे कठीण ठरते, विशेषतः लहान ग्रंथालयांसाठी (Marcum, 2014; Digital Preservation Coalition, 2015).
- **तांत्रिक ज्ञान व पायाभूत सुविधांचा अभाव:** आधुनिक डिजिटल साधने हाताळण्यासाठी आवश्यक कौशल्य सर्वत्र उपलब्ध नसते (Bawden & Robinson, 2020).
- **भाषिक तज्ज्ञांची अनुपलब्धता:** पांडुलिपी व शास्त्रीय साहित्य समजून घेण्यासाठी तज्ज्ञांची आवश्यकता असते (Gilliland, 2014).
- **कॉपीराईट व कायदेशीर अडथळे:** काही दस्तऐवजांवरील कायदेशीर निर्बंध डिजिटल प्रकाशन प्रक्रियेला गुंतागुंतीचे बनवतात (Franks, 2018).
- **समुदायिक उदासीनता:** अभिजात भाषेबद्दल कमी जागरूकता व मर्यादित वाचकवर्ग यामुळे संवर्धनाच्या प्रयत्नांना मर्यादा येतात (ALA, 2019; IFLA, 2015).

6. धोरणात्मक उपाय व शिफारसी

ग्रंथपाल आणि ग्रंथालये अभिजात भाषेच्या संवर्धनासाठी पुढील धोरणात्मक उपाय अवलंबू शकतात:

- **सामरिक संघटना व निधी नियोजन:** स्थानिक शासन, सांस्कृतिक संस्था आणि शैक्षणिक भागीदार यांच्याशी सहयोग करून अनुदान, प्रायोजकता आणि प्रकल्पाधारित निधी उभारणे उपयुक्त ठरते (Marcum, 2014).
- **क्षमता विकास (Capacity Building):** ग्रंथपालांना डिजिटायझेशन, मेटाडेटा मानके, डिजिटल आर्कायव्हिंग आणि माहिती व्यवस्थापन यांबाबत नियमित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे (Bawden & Robinson, 2020; Franks, 2018).
- **समूह-आधारित प्रकल्प (Community-driven projects):** स्वयंसेवक, भाषा तज्ज्ञ आणि विद्यार्थी यांना स्कॅनिंग, ट्रान्सलिटरेशन आणि अनुवाद कार्यात सहभागी करून समुदाय सहभाग वाढवता येतो (IFLA, 2015).
- **ओपन ॲक्सेस धोरण:** कॉपीराईट नियमांचे पालन करत मौल्यवान शैक्षणिक साहित्य मुक्त प्रवेशात उपलब्ध केल्यास संशोधनाला चालना मिळते (UNESCO, 2003).
- **नैतिक मार्गदर्शक तत्त्वे:** भाषिक समुदायाच्या संवेदनशीलतेचा आदर राखत दस्तऐवजांचे डिजिटल प्रदर्शन आणि शेअरिंग ठरवणे आवश्यक आहे (ALA, 2019).
- **इनोवेशन व तंत्रज्ञानाचा वापर:** स्थानिक भाषांसाठी अनुकूल OCR विकसित करणे आणि NLP साधनांचा वापर करून शोध, विश्लेषण आणि अभ्यास अधिक सुलभ करणे शक्य होते (Chowdhury, 2010; Gilliland, 2014).

7. व्यवहारिक उपक्रम — एक परिणामकारक मॉडेल (प्रस्ताव)

अभिजात भाषेच्या संवर्धनासाठी ग्रंथालयांनी पुढील व्यवहारिक उपक्रम राबविल्यास परिणामकारक मॉडेल उभे राहू शकते:

- **संग्रह मूल्यांकन:** अभिजात भाषेतील दस्तऐवजांचे ऐतिहासिक, भाषिक आणि सामाजिक महत्त्व लक्षात घेऊन प्राधान्यक्रम ठरवून मूल्यांकन करणे आवश्यक आहे (Gilliland, 2014).
- **हायब्रिड आर्काइव्ह तयार करणे:** मूळ दस्तऐवजांचे संरक्षण राखत उच्च-रिझोल्यूशन डिजिटल स्कॅन्स तयार करणे आणि त्यांना समृद्ध मेटाडेटासह संरचीत करणे उपयुक्त ठरते (IFLA, 2012; UNESCO, 2011).
- **शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन:** महाविद्यालये, विद्यापीठे आणि स्थानिक संस्थांशी सहयोग करून कार्यशाळा व अभ्यासक्रम राबविल्यास भाषा अध्यापन आणि संशोधनाला चालना मिळते (IFLA, 2015).
- **डिजिटल पोर्टल व शोध संरचना:** बहुभाषिक शोधपरिणाम देणारे सुलभ सर्च इंटरफेस विकसित केल्यास वापरकर्त्यांना माहिती सहज मिळते (Chowdhury, 2010).
- **परफॉर्मन्स मापन:** वापरकर्त्यांचा वापर डेटा, डाउनलोड्स आणि संदर्भ संख्येच्या आधारे प्रकल्पांचे मूल्यांकन केल्यास सुधारणा करणे सुलभ होते (Marcum, 2014; Bawden & Robinson, 2020).

8. नैतिकता व सांस्कृतिक संवेदनशीलता

भाषिक व सांस्कृतिक दस्तऐवज हाताळताना ग्रंथपालांनी समुदायाच्या संवैधानिक अधिकारांचा, सांस्कृतिक हक्कांचा आणि परंपरागत ज्ञानव्यवस्थेचा आदर राखणे अत्यावश्यक आहे (UNESCO, 2011). काही अभिजात भाषेतील दस्तऐवज विशिष्ट समुदायांसाठी पवित्र किंवा अत्यंत संवेदनशील स्वरूपाचे असू शकतात; अशा प्रसंगी दस्तऐवजांचे जतन, डिजिटायझेशन किंवा सार्वजनिक प्रदर्शन यासंबंधी निर्णय समुदायाच्या सल्ल्याने आणि सहभागाने घेणे उचित ठरते (ALA, 2019; IFLA, 2015). नैतिक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्यास ज्ञानप्रवेश आणि सांस्कृतिक सन्मान यामध्ये समतोल राखता येतो (Gilliland, 2014).

9. निष्कर्ष

अभिजात भाषांचे जतन आणि संवर्धन हे केवळ भाषिक किंवा साहित्यिक हेतूपुरते मर्यादित नसून ते समाजाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक वारशाच्या सातत्याशी निगडित आहे (UNESCO, 2003). या प्रक्रियेत ग्रंथपालांनी पारंपरिक संग्रहसंवर्धनाच्या तत्त्वांना बळकट ठेवत आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल प्रवेश आणि समुदाय सहभाग यांचा समन्वय साधणे आवश्यक आहे (Ranganathan, 1931; Bawden & Robinson, 2020). योग्य निधीव्यवस्था, कौशल्यविकास आणि नीतिगत पाठबळ उपलब्ध झाल्यास ग्रंथालये अभिजात भाषांचे दीर्घकालीन संरक्षक म्हणून प्रभावी भूमिका बजावू शकतात (Marcum, 2014).

पुढील संशोधनासाठी अभिजात भाषांच्या डिजिटायझेशनमध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाचा, स्थानिक गरजांनुसार विकसित मॉडेल्सचा आणि बहुभाषिक मेटाडेटा मानकांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे (Chowdhury, 2010; Gilliland, 2014).

संदर्भ

1. S. R. Ranganathan. (1931). The five laws of library science. Asia Publishing House.
2. UNESCO. (2003). Charter on the preservation of digital heritage. UNESCO.
3. UNESCO. (2011). Memory of the world: General guidelines to safeguard documentary heritage. UNESCO.
4. David Bawden., & Lyn Robinson. (2020). Introduction to information science. Facet Publishing.

5. Patricia C. Franks. (2018). Records and information management. ALA Neal-Schuman.
6. G. G. Chowdhury. (2010). Introduction to modern information retrieval (3rd ed.). Facet Publishing.
7. Anne J. Gilliland. (2014). Conceptualizing 21st-century archives. Society of American Archivists.
8. Deanna B. Marcum. (2014). The digital library: Challenges and opportunities. Library of Congress.
9. International Federation of Library Associations and Institutions. (2012). IFLA guidelines for digitization projects for collections and holdings in the public domain. IFLA.
10. IFLA. (2015). Multicultural communities: Guidelines for library services. IFLA.
11. American Library Association. (2019). Core values of librarianship. ALA.
12. Digital Preservation Coalition. (2015). Digital preservation handbook. DPC.

संत जनाबाईचे काव्य अस्सल अभिजात भाषेचा एक अविष्कार

प्रा.डॉ.सुचिता सुभाष औंधकर
सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड
Ssuchita226837@rediffmail.com
मोब.९८२३३३०८२२

प्रस्तावना :-

अभिजात भाषा ही कोणत्याही साहित्यातील भाषेचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. तिच्यातील अभिजातपणामुळे, त्या भाषेतील सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक वैभव टिकवून ठेवले जाते. तसेच भाषेचे प्राचीनत्व ही यातून स्पष्ट होते. भाषा जितकी जुनी, तितकी त्या भाषेची संस्कृती, समाज ही जुना. यादवकालीन मराठी भाषा ही, अभिजात भाषेचा एक उत्कट आविष्कार आहे. या काळातली सर्वच रचना अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहेत. संतकवयित्री जनाबाईचे काव्य म्हणजे भावकवितेला लाभलेले एक अपूर्व लेणी आहे. भावकवितेच्या प्रारंभीच्या काळात इतकी सोपी, सुलभ रचना करणारी जनाबाई ही उच्चप्रतिभा संपन्न कवयित्री होती. यासंदर्भात डॉ. हिरालाल मिश्राम लिहितात की, "स्त्री उत्थान अशा कितीतरी घटनांचा, तसेच ग्रामजीवनाचा अन्वयार्थ व व्यक्ती व्यवहार कुशलतेने उल्लेख केले आहेत म्हणूनच संतकवयित्री जनाबाई पहिली भाष्यकार आणि कवयित्री ठरते आहे."१

संत जनाबाईच्या काव्यात जो भावाविष्कार आहे, तो उत्कट स्वरूपाचा आहे. यादवकालीन अस्सल ग्रामीण लोकभाषेचा दमदार आविष्कार हा आपणाला जनाबाईच्या काव्यात दिसून येतो. "काव्य म्हणजे उत्कट भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार होय". असा उत्कट व उत्स्फूर्त आविष्कार संत जनाबाईच्या काव्यात आपणाला दिसून येतो. यातील भाषेला रचनेच्या व आशयाच्या अनुषंगाने अर्थाचे अनेक वलय आहेत. अस्सल ग्रामीण भाषेचा अविष्कार करणारी संतकवयित्री म्हणून जनाबाईचे असणारे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रस्तुत शोधननिबंधाचे उद्दिष्टे संत जनाबाईच्या अभंगातील भाषेचे अभिजातपण अभ्यासणे हे आहे.

संत जनाबाईच्या काव्यातील भाषेचे अभिजातपण

संत जनाबाई ही एक सामान्य दासी. स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेले कष्ट, उपेक्षा असाहाय्य वेदना, निराशा इ. साऱ्याचे प्रतिबिंब तिच्या काव्यात पडले होते. स्त्री म्हणून तिच्या वाट्याला जे जीवन आले, ते तिने जसेच्या तसे शब्दबद्ध केले. समकालीन संत कवियत्रींच्या काव्यापेक्षा जनाबाईच्या काव्यात जो उत्कट प्रेमाचा, जीवनाचा आविष्कार येतो, त्यासंदर्भात अतिशय वैशिष्ट्यपूर्ण अभिप्राय देताना डॉ. भिंगारकर लिहितात की, "जनाबाईच्या समकालीन संतकवयित्री महानुभाव पंथाची महदंबा, नातपंथीय ज्ञानदेवांची धाकटी बहीण मुक्ताबाई, वारकरी पंथातील चोख्यामेळयाची पत्नी सोयराबाई व त्यांची बहीण निर्मलाबाई इत्यादी होत. या सर्व कवयित्रींमध्ये जनाबाईची कविता आपल्याला वैशिष्ट्यने उठून दिसते."२ जनाबाईने आपल्या सगळ्या नात्यात विठ्ठलाला मध्यवर्ती ठेवले आहे. आई, सखी, प्रेयसी, दासी व कन्या इ. अनेक नाती ती विठ्ठलाच्या पायावर समर्पित करते. आणि याच भूमिकेतून या नात्यांना आपल्या काव्यातून अभिव्यक्त करते. हे करताना ज्या समाजाचा, संस्कृतीचा ती घटक आहे, त्या घटकाची भाषा ती जशीच्या तशी वापरते.

स्त्री जीवनातील सर्वोच्च नाते म्हणजे मातृत्वाचे. हे नाते स्त्रीजीवनाला अमृतसंजीवन प्रदान करते. स्त्रीपणासोबत मिळालेली आईपणाची देणगी अपूर्व आहे. लौकिक जीवनात कुमारिकेचे जीवन वाट्याला आलेल्या जनाबाईने हे नाते विठ्ठलाची जोडले.

"ये ग ये ग विठाबाई | माझे पंढरीचे आई ||" (अ.क्र.३०)

अशी अर्थसाद घालताना 'आई' या शब्दातून ती आत्मीयता प्रकट करते. हा शब्द कुठल्याही वाक्यात, रचनेत असो त्याचे अमूर्त रूपातील अस्तित्व अबाधीत असते. ती अमूर्तता आपणाला जनाबाईच्या भाषेत दिसून येते. विठ्ठलाला तिने माऊली, आई, विठाई, विठू, इत्यादी जी शब्दांची रूपे वापरली आहेत, त्यात प्रेम, सुखानुभूती प्रतीत होते. ती विठ्ठलाला कधी आई मानते, तर कधी विठ्ठलाची आई होते, भाषेच्या माध्यमातून आई व मूल अशा दुहेरी भूमिका ती शब्दबद्ध करते. श्रीकृष्ण हा जनाबाईच्या भावविश्वाचा एक अविभाज्य पैलू. श्रीकृष्ण व त्याच्या बालकिडेचे वर्णन अनेक अभंगातून करताना, जो तिचा वासल्यभाव प्रकटतो तो अतिशय भावनिक आहे.

संत जनाबाई ज्याप्रमाणे मानवी जीवनातील मातृत्व शब्दबद्ध करते, त्याप्रमाणे प्राणी, पशु, पक्षी यांच्याही नात्यात असणारा वात्सल्यभाव प्रकट करते ती असा,

"पक्षी जाई दिगंतरा | बालकांची आणि चारा | |
घार हिंडते आकाशी | झाप घाली पिल्लांपाशीं | |" (अ.क्र.६८)

या अभंगात जो मायलेकरांचा संबंध भाषेच्या माध्यमातून व्यक्त केला आहे, तो अतिशय भावपूर्ण आहे. हा संबंध स्पष्ट करण्यासाठी पक्षी, घार, वानर या प्रतिमा वापरलेल्या आहेत. त्यातून आपला व विठ्ठलाचा असणारा मायलेकरांचा संबंध तिने अचूकपणे, सोप्या शब्दात व्यक्त केलेला आहे. तिच्या शब्दांना एक ओघवतेपणा आहे. मातृत्वपर तिचे सर्वच अभंग वासल्यतेच्या प्रेमाने ओलेचिंब झाले आहेत.

जनाबाई ग्रामीण पारंपरिक स्त्रीजीवनाचा अविष्कार करताना पारंपरिक स्त्रीजीवन लोकभाषेच्या माध्यमातून जसेच्या तसे उभे करते. यादवकालीन महाराष्ट्रीयन ग्रामीण स्त्रीजीवन या स्त्रीजीवनात अलंकार, सण, समारंभ, संस्कृती, यांना असणारे महत्त्व ती काव्यातून सहजपणे सांगून जाते. यासंदर्भात डॉ. हिरालाल मेश्राम यांचा अभिप्राय असा आहे की, "जनाबाई आपल्या ग्रामीण जीवनातील लोकभाषेचा खेडूतपणा हेतुपुरस्सर स्वीकारला असून, यादवकाळात जीवनातील धीटपणा एका स्त्रीने व्यक्त केल्याचेही दिसून येते. ओघवत्या ग्राम्य शब्दातून संवेदनशीलता आणि उत्कटाच जनाबाईने व्यक्त केलेली आहे."[3] ग्रामीण स्त्रीजीवन हे जात्याशिवाय अपूर्ण असते. जनाबाईच्या भावविश्वाशी जात समरसून गेले आहे. जात हा तिच्या जगण्याचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. तिने आपल्या काव्यात जात्याला जिवंत केले होते. तिच्या जीवनात विठ्ठल व जात यांच एकरूपत्त्व दिसून येतं. जात्याचं भावविश्व उलगडताना स्त्रीमनातील जात उलगडत जात. जात्याच्या अनेक प्रतिमा, प्रतीके, रूपके, शब्द तिच्या काव्यात विखुरलेले आहेत. 'जातं', 'उर्वळ', 'खुंटा', 'दळण', 'कांड', 'पीठ', 'अंधन', 'रांधण', 'वैरण', 'कण्या' 'उष्टावळी', 'वंदन' अशी शब्दयोजना तिच्या काव्यात सातत्याने दिसते. तिचे भावविश्व मर्यादित असल्यामुळे त्याच-त्याच प्रतिमा, प्रतीके, रूपके, दृष्टांत, उपमा, पुन्हा पुन्हा येतात. पुनरावृत्ती हे तिच्या भाषेचे एक वैशिष्ट्य आहे.

ग्रामीण भाषेतील साधा सरळ आविष्कार ती सहजपणे करते. लोकजीवन, लोकसंस्कृती, कृषीजीवन, जीवनचिंतन, जीवनाची आसारता सांगताना तिने नकळतपणे वाक्यप्रचारांचाही वापर केलेला आहे. तो असा. 'सडासारवण', 'नहाने-धुणे', इत्यादी. मांगल्य, पतीव्रता, श्रद्धा, शील, या ग्रामीण जीवनमूल्यांचा तिच्या काव्यात वावर आहे. ग्रामीण भाषेतून सोपा भक्तिमार्ग अध्यात्मविचार तिने घराघरात पोहोचवला. म्हणूनच तिच्या भाषेला लोकभाषेचे वलय प्राप्त झाले आहे. यासंदर्भात डॉ. सुहासिनी इर्लेकर म्हणतात की, "जनाबाईच्या अभंगांची भाषा ही अशी अस्सल स्त्री मनाची भाषा आहे जनाबाईच्या अभंगातून प्रकटणारे मन हे मूलतः एका स्त्री मनाची आहे".[४] ग्रामीण जीवन हे समूह जीवनाचा अविष्कार करते म्हणूनच जनाबाईची भाषा ही समूहमनाची भाषा आहे.

आख्यानकाव्याची भाषा

संत जनाबाईने तीन आख्यानकाव्य लिहिली. 'हरिश्चंद्राख्यान', 'द्रौपदीवस्त्राहरण', 'थालीपाक' अशी ही आख्यान काव्य आहेत. ही आख्यानकाव्य पौराणिक महाकाव्यावर आधारलेली आहेत आणि म्हणूनच पौराणिक कथाकाव्याला

अनुसरून यातील भाषाविष्कार येतो. पौराणिक कथेला शब्दबद्ध करताना तो कालखंड प्रत्यक्ष डोळ्यासमोर उभा करताना, तिथली स्थलवर्णने, अलंकार, व्यक्तिदर्शने जनाबाईने अत्यंत सहजपणे शब्दबद्ध केली आहेत. यासंदर्भात डॉ. हिरालाल मेश्राम लिहितात की, "पुराणातील आदर्श बाळगून सत्वशील वृत्तीने जगणारी स्त्री आजही घराघरात पहावयास मिळते. त्या स्त्रीचे मन जनाबाईंना गवसले होते. म्हणून आख्यानपर काव्यातून स्त्री सुलभवृत्तीचा सहज अविष्कार संत जनाबाई ने केला आहे. एवढेच नव्हे तर लोकभाषेतून विठ्ठलाची भक्ती केली."५

जनाबाईच्या आख्यानाची भाषा अतिशय काव्यमय व ओघवत्या स्वरूपाची आहे. या काव्याची भाषा इतकी प्रासादिक आहे की, उत्तरकालीन कवी मुक्तेश्वरावर या अख्यानकव्याचा खोलवर ठसा उमटलेला आहे. आणि यातील अनेक घटना-प्रसंग, वर्णने, म्हणी, उपहास, विनोद, आर्तता, शब्दांचा उपयोग जसाच्या तसा त्याने आपल्या काव्यात केलेला आहे. तिच्या काव्याची भाषा ही प्रेमळ व जिव्हाळ्याची आहे. या संदर्भात डॉ.दा.बा.भिंगारकर लिहितात की, "आख्यानकाव्य रचणाऱ्या कवीला आपली भाषा प्रसन्न ओघवती, वर्णनानुकूल अशी योजावी लागते. अशी प्रवाही भाषा ही आख्यानकाव्याच्या यशाची गुरुकिल्ली असते."६ असे प्रवाही पण 'द्रौपदीवस्त्राहरण' या काव्यातील भाषेतून दिसून येते. या काव्यात यादवकालीन ग्रामीण स्त्रीजीवनाचे चित्रण भाषेच्या माध्यमातून जनाबाईने अतिशय सुंदरपणे शब्दबद्ध केले आहे. ते असे

"करचरण प्रक्षाळुनी | उभी ठेली वृंदावनीं | |
जोडोनियां करकमळां | म्हणे धांव रे गोपाळा" | |(अ.क्र.१३५)

वृंदावनाजवळ हात जोडून उभी असणारी द्रौपदी ही महाराष्ट्रीयन स्त्रीजीवनाचे रूप आहे. तिन्ही काव्यातील व्यक्तीचित्रने भाषेच्या माध्यमातून जिवंतपणे प्रत्ययकारी आलेली आहेत. यातून जनाबाईचा शैलीपूर्ण अविष्कार प्रत्ययाला येतो.

संत जनाबाईची अभंगवाणी यादवकालीन महाराष्ट्रीयन ग्रामीण जीवनाचा अस्सल आविष्कार करते. तिच्या भाषेत कमालीची लवचिकता आहे. भक्तीचा सुगम मार्ग सांगताना जशी ती लौकिक जीवनातील प्रतिकांचा, रूपकांचा, अचूक वापर करते, तसे योगानुभूती व्यक्त करताना उच्च पारमार्थिक प्रतीचा अनुभव शब्दबद्ध करताना पारंपरिक शब्द योजनेचा वापर करते. तिच्या भाषेला अर्थाचे अनेक पदर आहेत. एकाच वेळी तिची भाषा काळ, प्रदेश, समाज, संस्कृती, ग्रामजीवन, श्रमसंस्कृती, भक्ती, परमार्थिकमुक्ती, दास्यसंस्कृती, उपदेश इत्यादी अनेक घटकांना आपल्या सामावून घेते. जनसामान्यांच्या भाषेचा वापर हे तिच्या भाषेचे विशेष आहे. आणि त्यामुळेच तिचे अभंग लोकाभिमुख झाले. नारायण सुर्वे आपल्या 'चार शब्द' या कवितेत म्हणतात

"जसा जगत आहे तसा मी शब्दात आहे"

याप्रमाणे जनाबाई जे जीवन जगले, ते तिने जसेच्या तसे कोणताही आड पडदा न ठेवता सच्चेपणाने शब्दबद्ध केले. ग्रामसंस्कृती, शेती संस्कृती ,आचार-विचार, प्रवृत्ती, भावना, बोलीभाषा या सर्वांचा एकत्रितपणे अविष्कार संत जनाबाईचे काव्य करते. म्हणजेच मराठी मनाचे, भाव-भावनांचे, विचारांचे, प्रतिनिधित्व तिचे काव्य करते. मातीच्या भाषेचा हा गंध अस्सल आहे.

समारोप:-

जनाबाईच्या अभंगात व आख्यानकाव्यात जे अभिजातपण आहे, हे अभिजातपण अस्सल मराठी ग्रामीण शेती संस्कृतीचा व त्या भाषेचा उत्कट आविष्कार आहे. तिच्या भाषेत असणारे हे अभिजातपण यादवकालीन स्त्री जीवनाच्या भाषेला वैशिष्ट्यपूर्णता प्रदान करते. आणि म्हणूनच जनाबाईच्या अभंगाची भाषा ही मराठी भाषेमध्ये अभिजातपण असणारी एक महत्त्वपूर्ण भाषा आहे. तिचे अभंग हे मंदिरातील अखंड नंदादीपाप्रमाणे सात्विक मांगल्य व तेजोमय आहेत.

संदर्भसूची

1) संत जनाबाईची भावकविता,डॉ.हिरालाल मेश्राम, देवयानी प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २२ मार्च २०१०, पृष्ठ, १३९

२)संत कवयित्री जनाबाई चरित्र काव्य आणि कामगिरी, डॉ.द.भा. भिंगारकर, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८९ पृष्ठ, १२५

३)संत जनाबाईची भावकविता,डॉ.हिरालाल मेश्राम, उणी, पृष्ठ, १९८

४) प्राचीन मराठी संत कवयित्रींचे कार्य, डॉ.सुहासिनी इर्लेकर, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८०,

५) संत जनाबाईची भावकविता,डॉ.हिरालाल मेश्राम, उणी, पृष्ठ, २००

६) संत कवयित्री जनाबाई चरित्र काव्य आणि कामगिरी, डॉ.द.भा. भिंगारकर, उणी, पृष्ठ, १६८

बनगरवाडीतील : अभिजात मराठी भाषा

प्रा.डॉ.निकम प्राजक्ता प्रल्हादराव
सहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,कराड
ईमेल – nikamprajakta80@gmail.com
मोबाईल -९१५८१३०५४२

प्रस्तावना - अभिजात मराठी साहित्य ही संकल्पना केवळ प्राचीनतेशी संबंधित नसून, जीवनाचा खोल, कलात्मक आणि सार्वकालिक अनुभव देणाऱ्या साहित्याशी निगडित आहे. संतसाहित्य, पंडिती काव्य, तसेच आधुनिक काळातील काही निवडक साहित्यकृतींनी मराठीला अभिजाततेचा दर्जा प्राप्त करून दिला आहे. आधुनिक काळात ग्रामीण जीवनाचे वास्तववादी दर्शन घडवणारी बनगरवाडी ही कादंबरी या अभिजात परंपरेत महत्त्वाचे स्थान मिळवते.

मराठी साहित्याला हजारो वर्षांची समृद्ध आणि वैविध्यपूर्ण परंपरा लाभलेली आहे. संतसाहित्य, पंडिती काव्य, शाहिरी व लोकसाहित्य तसेच आधुनिक काळातील काव्य, कथा आणि कादंबरी या सर्व प्रवाहांनी मराठी साहित्याची अभिजात ओळख घडवली आहे. अभिजात साहित्य ही संकल्पना केवळ प्राचीनतेपुरती मर्यादित नसून, मानवी जीवनाच्या मूलभूत अनुभवांचे सखोल, कलात्मक आणि सार्वकालिक दर्शन घडवणाऱ्या साहित्याशी निगडित आहे. म्हणूनच आधुनिक काळातील काही साहित्यकृतींनाही त्यांच्या आशयगर्भतेमुळे व कलात्मकतेमुळे अभिजाततेचा दर्जा प्राप्त होतो.या संदर्भात व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' ही कादंबरी मराठी साहित्यात विशेष महत्त्वाची मानली जाते. स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण महाराष्ट्राचे वास्तव या कादंबरीत अत्यंत प्रामाणिकपणे चित्रित झाले आहे. ग्रामीण समाजरचना, शेतीप्रधान जीवन, दुष्काळाचे चक्र, गरिबी, स्थलांतर, माणसांतील संबंध तसेच निसर्गाशी असलेले अविभाज्य नातेहे सर्व घटक कादंबरीत सहजतेने उलगडतात. कोणत्याही कृत्रिम नाट्यमयतेशिवाय ग्रामीण माणसाच्या जीवनसंघर्षाचे दर्शन घडवणे हे या कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांची ' बनगरवाडी' ही मराठी साहित्यातील एक महत्त्वाची ग्रामीण कादंबरी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील खेड्याचे वास्तव, ग्रामीण माणसाचे जीवन, निसर्गाशी असलेली नाळ आणि मानवी भावविश्व यांचे अत्यंत वास्तववादी व कलात्मक चित्रण या कादंबरीत आढळते. अभिजात मराठी साहित्याच्या परंपरेत बनगरवाडीचे वेगळेपण तिच्या साध्या शैलीतून व्यक्त होणाऱ्या खोल जीवनदृष्टीत, ग्रामीण भाषेच्या नैसर्गिक वापरात आणि मानवी अनुभवांच्या सार्वत्रिक मांडणीत दिसून येते. बनगरवाडी ही केवळ ग्रामीण जीवनाचे वर्णन करणारी कादंबरी नसून, ती मानवी जीवनाच्या व्यापक अनुभवांचे प्रतिनिधित्व करते.

संशोधनाची उद्दिष्टे

१. बनगरवाडी कादंबरीचा आशय व जीवनदृष्टी यांचा सखोल अभ्यास करणे.
२. बनगरवाडी कादंबरीतील ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण अभिजात मराठी साहित्याच्या संदर्भात तपासणे.
३. कादंबरीतील भाषाशैली, बोलीभाषेचा वापर व त्यातील अभिजातता स्पष्ट करणे.
४. निसर्ग आणि मानवी जीवन यांचे परस्पर नाते कादंबरीत कसे उलगडले आहे, याचा अभ्यास करणे.
५. बनगरवाडी कादंबरीचे अभिजात मराठी साहित्यातील वेगळेपण अधोरेखित करणे.

साधी, संयमित भाषा, भावनांचा सूचक आविष्कार आणि निसर्गाच्या भूमिकेचे प्रभावी चित्रण यांमुळे ही कादंबरी अभिजात मराठी साहित्यात वेगळे स्थान प्राप्त करते. त्यामुळे बनगरवाडी कादंबरीचे अभिजात मराठी साहित्यातील वेगळेपण अभ्यासणे हे प्रस्तुत शोधनिबंधाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

संशोधनाची गृहितके

१. बनगरवाडी ही केवळ ग्रामीण कादंबरी नसून, मानवी जीवनाच्या सार्वकालिक अनुभवांची अभिजात मांडणी आहे.

२. कादंबरीतील वास्तववादी आशय व संयमित भावाविष्कार यांमुळे ती अभिजात मराठी साहित्याच्या निकषांशी सुसंगत ठरते.

३. ग्रामीण बोलीभाषेचा नैसर्गिक व कलात्मक वापर ही बनगरवाडी कादंबरीची अभिजात वैशिष्ट्ये आहेत.

४. निसर्गाला स्वतंत्र घटक म्हणून दिलेले स्थान कादंबरीच्या अभिजाततेला अधोरेखित करते.

५. सामूहिक जीवनदृष्टी ही बनगरवाडी कादंबरीच्या अभिजात साहित्यिक मूल्यांची प्रमुख खूण आहे.

'बनगरवाडी' कादंबरीचा आशय

' बनगरवाडी' ही कादंबरी एका लहानशा खेड्याच्या जीवनाभोवती फिरते. दुष्काळ, गरिबी, स्थलांतर, पशुधन, शेती, माणसांतील संबंध आणि निसर्गाची कठोर पण मातृत्वाची भूमिका—हे सर्व घटक कादंबरीच्या केंद्रस्थानी आहेत. कादंबरीत ठरावीक नायक-नायिका नसून संपूर्ण गाव हेच नायकस्वरूप आहे. ही सामूहिक जीवनदृष्टी अभिजात साहित्याचे महत्त्वाचे लक्षण मानले जाते. व्यंकटेश माडगूळकरांची "बनगरवाडी" ही १९५५ ची कादंबरी मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण करणारी अभिजात कृती आहे. ती पारंपरिक कथानकाच्या बाहेर पडून गावालाच नायकत्व देते, जे मराठी अभिजात साहित्यातील एक फार वेगळे वैशिष्ट्य आहे. 'बनगरवाडी'तून व्यंकटेश माडगूळकरांची प्रयोगशीलता प्रत्ययास येते. रुढ अर्थाने ह्या कादंबरीला कथानक नाही. बनगरवाडी नावाच्या ह्या लहानशा गावातील सामूहिक जीवनाचे विविधांगी चित्रण केलेले आहे. तेथील उजाड व निष्पर्ण सृष्टी, तेथील कंगालपणा, दुष्काळ, तेथील सण, उत्सव, रूढी, परंपरा, श्रद्धा, संकेत, तेथील रहिवाशांच्या जीवनांतील चढउतार ह्यांना जिवंत शब्दरूप लाभले आहे. येथे कोणी विशिष्ट व्यक्ती नायक वा नयिका नाही. बनगरवाडी ह्या गावालाच नायकत्व देण्यात आलेले आहे.बनगरवाडीच्या परीसरात पडणारा दुष्काळच या कादंबरीतला नायक आहे. कारण या दुष्काळाभोवतीच बनगरवाडीचे कथानक फिरताना दिसते.

कादंबरीचे नायक राजाराम विठ्ठल सौदनीकर यांची बनगरवाडीला शाळा मास्तर म्हणून नेमणूक झालेली असते. ते अंधाऱ्या रात्री गाडीवाटेने पायपीट करीत बनगरवाडीला जात आहेत इथून या कथेला सुरुवात होते. चालत असताना गाव कसे असेल, तिथली माणसे कशी असतील, तिथे गेल्यावर रहायचे कुठे असे विचार त्यांच्या मनामध्ये येतात. थोडंसं उजाडल्यानंतर व दिसू लागल्यानंतर त्यांना वाटेत लागणारी शेते, माळरानं, झाडेझुडपे, प्राणी, पक्षी, छोटे छोटे कीटक, मुंग्या, टोळ ई. चे सुरेख वर्णन केलेले आहे.

बनगरवाडीतील लोकांचे जीवन, त्यांची उदरनिर्वाहाची व्यवस्था, शेतकरी, मेंढ्या व त्यांना चरायला घेऊन जाणारे मेंढके, घरी राहून लोकरीचे सुत काढणाऱ्या स्त्रिया व त्यांची मुलेबाळे यांच्या दिनक्रमाबद्दल लेखक सांगतात. शेतात घेतली जाणारी वेगवेगळी पिके, त्यांची पेरणी, वाढ व सुगीचा काळ याबद्दल सुद्धा माहिती मिळते.बनगरवाडी ही तीस- पस्तीस घरांची छोटीशी वस्ती असते. गावातील जवळजवळ सगळे लोक मेंढपाळ. मास्तरांची ही पहिलीच नोकरी असते, तीपण अश्या दुर्गम, दुष्काळी भागात. तिथल्या अशिक्षित व जुनाट लोकांबरोबर मास्तर कसतरी जुळवून घेतो. गावातील सगळ्या मेंढपाळांची मुलं मेंढ्या चरायला घेऊन जायची त्यामुळे काम सोडून त्यांना शाळेत पाठवायला कोणीच तयार होत नाही. मास्तर व गावातील प्रमुख व्यक्ती असलेले कारभारी कशीतरी लोकांची समजूत काढतात व एकदाची शाळा सुरू होते. काही काळानंतर मास्तर तिथल्या लोकांमध्ये मिसळून जातो. मास्तर सर्वांच्या उपयोगी पडतो,गावातील लोकांची पत्रे लिहून देणे,मनीऑर्डर करणे, गावातील तंटे सोडवणे अशी सगळी कामे मास्तर कोणत्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न ठेवता करत असतो. त्या नादात एका शेतकऱ्याचे रानीछाप रुपयांचे

चिल्लर आणायचे काम घेऊन ते पैसे हरवल्यामुळे मनस्ताप पण सहन करतो. एकदा गावात तालीम काढायचा विचार मास्तरांच्या मनात येतो. सुरुवातीला गावातील लोकांचा या गोष्टीला विरोध होतो. त्यावेळी मास्तर इमारतीच्या उद्घाटनासाठी पंत सरकार म्हणजे राजाला गावात आणू असं आमिष लोकांना दाखवतात. त्यामुळे लोकांना हुरूप येतो. लोकवर्गणी व संस्थांनाकडून मदत घेऊन ही तालीम पुरी करायचं ठरतं. ज्यांना पैसे देणे शक्य नाही आश्यांनी श्रम, गाडीबैले, शेतातील झाडे द्यावीत असं ठरवतात. तालीम बांधताना अनेक संकटे,अडचणींना सामोरे जावे लागते, बांधावरील झाडं देण्याच्या कारणांवरून शेतकऱ्यांसोबत भांडणे होतात. पण या सगळ्यातून मार्ग काढून ईमारत पुरी होते व तिचं उद्घाटन करायला राजा पहिल्यांदा या ३०-३५ घरांची वस्ती असणाऱ्या गावात येतो. गावात उत्सव साजरा केला जातो, लोक आनंदित होतात. राजा मास्तरांच्या पाठीवर शाबासकीची थाप टाकतो. पुढे अनेक दिवस लोक पारावर, चावडीत बसून याविषयी चर्चा करतात. कादंबरीच्या शेवटी माणदेशात दुष्काळ पडतो तेव्हा माणसांचे व जनावरांचे खाण्या पिण्याचे कसे हाल होतात, गावातील सगळीच माणसं गाव सोडून गेल्यानंतर वाडी, वस्ती ओस पडते या सगळ्याचे वर्णन लेखकाने केले आहे.

बनगरवाडी माणदेशातल्या 'लेंगरवाडी' नावाच्या वाडीवर बेतलेली आणि लेखक व्यंकटेश माडगूळकर यांना आलेल्या अनुभवावर आधारीत असलेली कादंबरी आहे. ही १९५५ साली प्रकाशित होऊन आतापर्यंत बारा भाषेत अनुवादित झालेली आहे. बनगरवाडी कथानकावर एक मराठी चित्रपटही १९९५ साली प्रदर्शित झालेला आहे. कादंबरी मराठी साहित्यातील एक मैलाचा दगड मानली जाते. एका तरुण शिक्षकाच्या नजरेतून मांडलेली ही धनगर समाजाची व्यथा-कथा आहे. या कादंबरीने मराठी भाषेला पुस्तकी चौकटीतून बाहेर काढून तिला मातीचा गंध दिला. अभिजातता म्हणजे केवळ संस्कृतप्रचुरता नव्हे, तर लोकभाषेचा ताजेपणा आणि तिची शाश्वत टिकून राहणारी ताकद होय. मराठी साहित्यात १९५० नंतरच्या कालखंडात 'प्रादेशिक कादंबरी'ने एक नवे वळण घेतले. व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' (१९५४) ही या प्रवाहातील शिरोमणी मानली जाते. या कादंबरीने केवळ आशयाचंच नव्हे, तर भाषेचेही एक नवे 'अभिजात' रूप जगासमोर मांडले. कोरडा दुष्काळ, मेंढपाळ समाज आणि तिथल्या मातीतील संघर्षाची ही गाथा अत्यंत संयमित भाषेत व्यक्त झाली आहे. मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ रोजी भारत सरकारने अभिजात भाषेचा दर्जा प्रदान केला, ज्यामुळे तिचे प्राचीन वैशिष्ट्यजसे की १२-१३व्या शतकातील 'लीळाचरित्र' आणि 'ज्ञानेश्वरी'मान्यता मिळाली. हा दर्जा प्राचीन साहित्य, स्वतंत्र अस्तित्व आणि आधुनिक रूपाशी सातत्य यांसारख्या निकषांवर आधारित आहे, 'बनगरवाडी'मध्ये ग्रामीण बोलीचा धनगरी उपयोग साहित्याला श्रीमंत करतो, ज्यामुळे प्रमाण मराठी बोलींनी समृद्ध होते. कादंबरीतील रांगडी गावरान भाषा वाचकाला ग्रामीण संघर्ष आणि सांस्कृतिक वास्तवात बुडवते, ही भाषिक शैली मराठीच्या अभिजात दर्ज्याला पूरक ठरते, कारण बोली-प्रमाण यांचा समन्वय भाषेच्या वैविध्यपूर्ण इतिहास दर्शवतो.

अभिजात मराठी साहित्यातील वेगळेपण

वास्तववादी ग्रामीण जीवनाचे चित्रण - दुष्काळ हा मुख्य नायक असून, गावकऱ्यांचे रोजचे जीवन, सण-उत्सव, समस्या यांचे विविधांगी चित्रण होते.बनगरवाडी मधील ग्रामीण जीवन आदर्शवादी किंवा भावनात्मक न करता अत्यंत वास्तववादी पद्धतीने मांडले आहे. ग्रामीण माणसाचे दुःख, संघर्ष आणि स्वीकारशीलता हे कोणतीही कृत्रिम नाट्यमयता न आणता सहजपणे उलगडले जाते. ही वास्तवाशी प्रामाणिक भूमिका अभिजात साहित्याच्या तत्त्वाशी सुसंगत आहे.

भाषेचे अभिजात रूप/ भाषा व प्रादेशिकता - कादंबरीमध्ये माणदेशातील धनगरी बोलीचा संवादासाठी तर प्रमाणभाषेचा निवेदनासाठी वापर केला आहे. म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा, प्रतिके, श्रद्धा-अंधश्रद्धा, लकबी, शैली, उच्चारण्याची पद्धत हे बोलीचे सौंदर्य असल्यामुळे आणि कादंबरीत तिचा प्रभावीपणे वापर केल्यामुळे कादंबरी अधिकच वास्तवाच्या पातळीवर पोहोचते. कादंबरीची भाषा धनगराच्या जीवन पद्धतीप्रमाणे सरळ आहे. घटना, प्रसंग आणि व्यक्तिरेखा यांना बोलीमुळे सामर्थ्य प्राप्त होते. लेखकाने बोलीच्या साह्याने माणदेशातील प्रदेश जिवंत केला आहे. लेखक

व्यंकटेश माडगूळकर यांनी या कादंबरीच्या माध्यमातून १९५०-६० च्या दशकातील माणदेशातील एका वाडीचे चित्र डोळ्यासमोर उभे केले आहे. वाचकालाही आज नष्ट होत चाललेल्या खेड्याचे, तेथील चालीरीती, रूढी, परंपरा, संस्कृती याचे दर्शन घडते. ही कादंबरी ग्रामीण-प्रादेशिक साहित्याच्या वाटचालीतील अतिशय महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. साहित्य विश्वात मैलाचा दगड ठरलेली कादंबरी आहे. वाचकालाही ग्रामीण प्रदेश, निसर्ग, शेती, पिके, खेड्यातील माणूस, त्यांच्या रूढी, परंपरा, बोली समजून घेण्यासाठी ही कादंबरी उपयुक्त ठरेल.

प्रमाण मराठी आणि लोकबोली यांचा सुरेख संगम या कादंबरीत आढळतो. 'बनगरवाडी'तील बोली केवळ संवादात येत नाही, तर ती निवेदनाचाही भाग बनते. माडगूळकरांची शैली 'मितभाषी' आहे. कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय व्यक्त करणे हे अभिजात साहित्याचे लक्षण त्यांच्या भाषेत दिसते.कृषी आणि पशुपालन संस्कृतीतील शब्दसंग्रह यात येतात. मेंढपाळ समाजातील विशिष्ट संज्ञा, हवामानाचे अंदाज, आणि दुष्काळाचे वर्णन करण्यासाठी वापरलेले अस्सल गावरान शब्द भाषेला समृद्ध करतात. माणदेशातील धनगरी बोलीचा संवादासाठी व प्रमाणभाषेचा निवेदनासाठी वापर, म्हणी-वाक्प्रचार, निसर्ग-शेतीचे सजीव वर्णन यामुळे कादंबरी वास्तवाच्या पातळीवर पोहोचते. हे बोलीचे सौंदर्य अभिजात मराठी साहित्यात दुर्मीळ आहे.कादंबरीतील भाषा ही ग्रामीण, बोलीप्रधान असली तरी ती सुसंस्कृत, प्रवाही आणि आशयघन आहे. अलंकारिक भाषेपेक्षा अनुभवप्रधान भाषा वापरून लेखकाने अभिजाततेचा वेगळा मार्ग दाखवला आहे. ही भाषा केवळ संवादाचे साधन न राहता जीवनानुभवांचे दर्शन घडवते.सामाजिक चित्रण व प्रभाव दुष्काळामुळे गावाची विखुरपट होणे, कारभारीचे निधन यांसारख्या घटना वाचकाला अस्वस्थ करतात व अंतर्मुख करतात. ७० वर्षांनंतरही लोकप्रिय असलेली ही कादंबरी इंग्रजी-डॅनिशमध्ये अनुवादित झाली.

अभिजात साहित्यामध्ये निसर्ग हा स्वतंत्र घटक म्हणून महत्त्वाचा असतो. बनगरवाडीत निसर्ग माणसाचा शत्रूही आहे आणि आधारही. पाऊस, दुष्काळ, जमीन, जनावरे—हे सर्व कथानकाला दिशा देतात. निसर्ग आणि मानवी जीवन यांचे हे परस्परसंबंध अभिजात साहित्याची आठवण करून देतात.भावनांचा संयमित आविष्कार यामध्ये दिसून येतो. बनगरवाडीची भाषा केवळ माहिती देत नाही, तर ती एक मूल्यव्यवस्था मांडते.धनगर समाजाचे साधेपण, त्यांचा प्रामाणिकपणा आणि निसर्गाशी असलेले त्यांचे नाते भाषेतील विशिष्ट वाक्प्रचारांतून स्पष्ट होते."माणूस सुखात असला की त्याला देवाचं नाव आठवत नाही," अशा साध्या पण तत्वज्ञानात्मक ओळींमधून भाषेची खोली जाणवते.कादंबरीत दुःख, वेदना आणि संघर्ष असूनही अती भावुकता नाही. भावना संयमित, मितभाषी आणि सूचक पद्धतीने व्यक्त केल्या आहेत. हा संयम अभिजात साहित्याचा मूलभूत गुणधर्म आहे.

बनगरवाडी आणि अभिजात परंपरा

जरी बनगरवाडी आधुनिक काळातील कादंबरी असली तरी तिची जीवनदृष्टी, मानवी अनुभवांचे सार्वत्रिकीकरण आणि कलात्मक साधेपणा यामुळे ती अभिजात मराठी परंपरेशी नाते सांगते. संतसाहित्याप्रमाणेच येथेही जीवन स्वीकारण्याची तत्त्वज्ञानात्मक भूमिका दिसून येते.अभिजात मराठी साहित्यात या कादंबरीचे योगदान तिच्या 'शैली'मुळे मोठे आहे.माडगूळकरांची लेखणी मितभाषी संयत आहे. कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय व्यक्त करण्याचे कसब येथे दिसते.पांढरपेशा मराठी भाषेऐवजी, त्या मातीतील रांगडी आणि जिवंत बोलीभाषा वापरून लेखकाने त्या परिसराचा 'सांस्कृतिक सुगंध' जपला आहे.

निष्कर्ष -

१. 'बनगरवाडी' ही कादंबरी मराठी ग्रामीण साहित्याचा एक महत्त्वाचा टप्पा मानली जात असली तरी तिचे साहित्यिक मूल्य केवळ ग्रामीणतेपुरते मर्यादित नाही. या कादंबरीतून व्यंकटेश माडगूळकर यांनी ग्रामीण माणसाच्या जीवनातील दुःख, संघर्ष, स्वीकारशीलता आणि जगण्याची जिद्द अत्यंत संयमित व वास्तववादी पद्धतीने मांडली आहे.

कोणताही ठरावीक नायक किंवा नायिका नसून संपूर्ण गाव हेच कथानकाचे केंद्र बनवणे ही मांडणी अभिजात साहित्याच्या सामूहिक जीवनदृष्टीशी सुसंगत आहे.

२. 'बनगरवाडी' कादंबरीतील मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम राहिलेली नाही, तर ती तिथल्या माणसांच्या अस्तित्वाचा भाग झाली आहे. भाषेचा हा अकृत्रिमपणा आणि साधेपणा हीच मराठीची खरी अभिजातता आहे

३. कादंबरीतील भाषा ही ग्रामीण बोलीवर आधारलेली असली तरी ती सुसंस्कृत, प्रवाही आणि आशयघन आहे. अलंकारिकतेपेक्षा अनुभवप्रधानतेवर भर देणारी ही भाषा अभिजात मराठी साहित्यातील शैलीवैशिष्ट्ये अधोरेखित करते. ग्रामीण भागातील बोलीला साहित्यात प्रतिष्ठा मिळवून देण्यात या भाषेचा मोठा वाटा आहे. भाषेचा हाच साधेपणा, प्रामाणिकपणा आणि वास्तववाद तिला 'अभिजात' दर्जा मिळवून देतो. तसेच निसर्ग आणि मानवी जीवन यांचे परस्परावलंबी नाते दाखवताना लेखकाने निसर्गाला स्वतंत्र आणि प्रभावी स्थान दिले आहे, जे अभिजात साहित्याच्या परंपरेशी नाते सांगते. बनगरवाडी' ही कादंबरी मराठी साहित्यातील एक मैलाचा दगड आहे कारण ती मानवी जिद्द आणि निसर्गाची क्रूरता यांचा संघर्ष अत्यंत प्रामाणिकपणे मांडते. गावाचा नाश होऊन लोक स्थलांतरित होतात, हे या कादंबरीचे शेवटचे दृश्य वाचकाला सुन्न करते, जे वास्तववादाचे सर्वोच्च शिखर आहे.

४. भावनांचा अतिरेक न करता, दुःख व वेदनांचा संयमित आणि सूचक आविष्कार करणे ही बनगरवाडीची महत्त्वाची ताकद आहे. ही संयमशीलता आणि जीवनाकडे पाहण्याची तत्त्वज्ञानात्मक भूमिका कादंबरीला अभिजाततेच्या पातळीवर नेऊन ठेवते. म्हणूनच बनगरवाडी ही केवळ एका खेड्याची कथा न राहता, मानवी जीवनाच्या सार्वकालिक सत्यांचे प्रभावी आणि अभिजात रूपांतर ठरते.

अशा प्रकारे, आशय, शैली, भाषा आणि जीवनदृष्टी या सर्व अंगांनी बनगरवाडी कादंबरी अभिजात मराठी साहित्यात आपले स्वतंत्र व वेगळे स्थान निर्माण करते, हे या अभ्यासातून स्पष्ट होते. बनगरवाडी ही कादंबरी ग्रामीण साहित्य म्हणून ओळखली जात असली तरी तिचे महत्त्व त्यापलीकडे आहे. वास्तववादी जीवनचित्रण, भाषेची सहज अभिजातता, निसर्गाशी असलेली नाळ आणि संयमित भावाविष्कार यांमुळे ती अभिजात मराठी साहित्यात वेगळे व मानाचे स्थान प्राप्त करते. त्यामुळे बनगरवाडी ही केवळ एका गावाची कथा न राहता मानवी जीवनाच्या सार्वकालिक सत्यांची अभिजात मांडणी ठरते. प्रादेशिकता असूनही त्यात वैश्विक मानवी भावभावनांचे दर्शन घडते, म्हणूनच ही भाषा आणि ही कादंबरी 'अभिजात' दर्जाची ठरते.

संदर्भसूची

१. माडगूळकर, व्यंकटेश. बनगरवाडी. मौज प्रकाशन,पुणे

आदिवासी कथा: स्वरूप आणि आशयसूत्रे

डॉ. अशोक खंडू मोरमारे
सहयोगी प्राध्यापक,
शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी.एस. कदम विज्ञान महाविद्यालय,
गडहिंग्लज.
Mobile No.9421383610 E mail : akmormare74@gmail,com

1. प्रस्तावना

१८१८ मध्ये इंग्रजी सत्ता भारतामध्ये प्रस्थापित झाली. त्यामुळे आधुनिक विचारधारा रुजायला सुरुवात झाली. आपल्या सोयीसाठी इंग्रजांनी कुशल कामगार निर्माण करण्यासाठी शिक्षणाची सोय केली. हजारो वर्षांपासून एकवटलेली शिक्षण व्यवस्था बहुजनापर्यंत पोहोचायला लागली. शिक्षण इंग्रजांच्या कामासाठी जरी दिले जात असले, तरी त्यांच्या माध्यमातून आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराची जाणीव सर्वसामान्य माणसाला होवू लागली. शिक्षणाने माणूस अधिक विचारी होऊ लागला. आजपर्यंत स्वकीयांकडून, परकीयांकडून होणारा अन्याय त्याला एक माणूस म्हणून समजू लागला. आजपर्यंत आपण जो आजवर अन्याय अत्याचार सहन केला ते आमचे कर्तव्य नव्हते, तर आमच्यावर लादलेला तो अन्यायच होता. हे समजायला लागले. हा अन्याय आपण सहन करणे म्हणजे आपल्यातील माणूस मारण्यासारखे आहे. हे हळूहळू भारतीय माणसाला समजायला लागले. त्यातूनच पुढे तो या अनुभवाला, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करू लागला. हळूहळू सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक परिवर्तनवादी विचारांची मांडणी तो करू लागला. यातून साहित्य निर्मिती होऊन ग्रामीण भागातील संस्कृती, ग्रामीण भागातील माणूस, सामाजिक वैविध्यता, वैचारिक जाणिवांची कथा, प्रबोधनात्मक कथा लिहिली जाऊ लागली. स. ज. छत्रे यांनी लिहिलेल्या 'बाळमित्र' या पुस्तकमालेतून बोधकथा व नीतिकथा प्रसिद्ध झाल्या. याच काळात कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी अरबी भाषेतील गोष्टी प्रसिद्ध केल्या. पुढे कलात्मक कथेचा विचार रुजला. या मनोरंजक काळात स्त्री विषयक दृष्टीकोन व्यापक व उदात्त होवू लागला. यामध्ये हरिभाऊ आपटे यांनी करमणूक नियतकालिकातून कथा प्रसिद्ध केल्या. यानंतर व्ही सी गुर्जर ('पुरुषांची जात') ह. ना. आपटे ('जग हे असे आहे', ' लक्षात कोण घेतो') यांनी कथेत कलात्मकता आणून कथा अधिक लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला. याच कालखंडात काशीबाई कानिटकर ('शेवट तर गोड झाला') आनंदीबाई शिर्के ('माझ्या आवडत्या गोष्टी' 'गुलाबजाम') यांनी बोधप्रधान व कलात्मक कथालेखन केले. या कालखंडात कथेतील कालात्मक जाणिवा अधिक प्रगल्भ होत गेल्या. श्री. कृ. कोल्हटकर (मोत्याचा पापा) न. चि. केळकर (' चार प्रहर', 'आजोबांचे काम') वामन जोशी ('नवपुष्प, 'करंडा') दिवाकर कृष्ण 'किशोरीचे , हृदय', 'विद्या आणि वारुणी') यांची कथा कलात्मक जाणिवेतून व्यक्तीदर्शन घडवीत जाते. यातूनच आधुनिक वळणाची कथा मराठी साहित्यात रुजायला लागली. त्यातून व्यक्तिदर्शनाला अधिक महत्त्व मिळू लागले. पुढे ना. सि. फडके ('अमृताने पैजासि जिंके', 'बहार,' 'स्वप्नांचे सेतू', 'बासरी') यांनी कलावादाचा पुरस्कार करून कथालेखन केले. तर वि. स. खांडेकर ('समाधीवरली फुले', 'पाकळ्या', 'नव मल्लिका') हे जीवनवादी व ध्येयवादी जाणिवेतून कथालेखन करतात. श्री. म. माटे ('उपेक्षितांचे अंतरंग') कथा लेखनातून माणुसकीचे दर्शन घडवितात. प्रभाकर पाध्ये ('अंधारातील सावल्या', 'अर्धवर्तुळे', 'डोंबाऱ्याचा खेळ',) कोकणातील वातावरण व माणूस कथेतून व्यक्त करतात. र. वा. दिघे ('घरकुल', 'लक्ष्मी',) कल्पनारम्य वातावरण व अद्‌भुत घटनांचा मेळ कथांमधून घालतात. तर ग.ल. ठोकळ 'कडू साखर', 'गोफणगुंडा', 'मोत्याचा चारा') ग्रामीण जीवनातील दुःखे, दैन्य, दारिद्र्य आणि अज्ञान यांचे चित्रण

करतात. विभावरी शिरूरकर ('कळयांचे नि:श्वास') स्त्री जीवनाचे करूण चित्र रंगवितात. चि. वि. जोशी ('चिमणरावांचे चऱ्हाट') विनोदी कथा लेखन करताना अतिशयोक्तीवर भर देऊन मानवी स्वभावातील हास्यास्पदता नजरेत आणतात. याच कालखंडात प्रादेशिक कथा निर्मितीला प्रारंभ झाला. यामध्ये वि. सी. सुकटणकरांनी ('सह्याद्रीच्या पायथ्याशी') आजचे व कालचे गोमंतक याचे चित्रण केले.

१९४२ नंतर कथा वाङ्मयाचे आयाम बदलत गेलेले दिसतात. दुसऱ्या महायुद्धाची झळ संपूर्ण जगाला बसली. भारताला प्रत्यक्ष झळ न बसता अप्रत्यक्ष परिणाम त्याला सहन करावा लागला. या महायुद्धात मानव समाजाचा व त्याच्या संपत्तीचा प्रचंड विध्वंस झाला. मानवी मनाचा व मूल्यांचा, श्रद्धांचा चुराडा झाला. जग म्हणजे स्वार्थाचा एक बाजार झाला. जीवनाचा विचार विविध घटकांच्या दृष्टिकोनातून होऊ लागला. यातून अतिवास्तवादाचा उदय झाला. त्यातूनच अतिवास्तववादी व मानवतेच्या विटंबनेचे चित्रण करणारी बीभत्स वृत्तीचे दर्शन घडविणारी कथा लिहिली जाऊ लागली. यामध्ये गंगाधर गाडगीळ ('मानसचित्रे', 'कडू आणि गोड') मानवाच्या बाह्य आणि अंतर्गत भाव विश्वाचे चित्रण करणारी कथा घेऊन येतात. माणसाच्या दारिद्र्य आणि ताणतणावाचे सूक्ष्मसूचक दर्शन ते घडवितात. तर पु. भा. भावे ('ठरीव ठशाची गोष्ट', 'पहिला पाऊस', 'फुलवा') कथेत परंपरागत मूल्यांचा आदर राखतात. प्रणय भावनेच्या विविध छटा ते रंगवितात. व्यंकटेश माडगूळकर ('हस्ताचा पाऊस', 'काळी आई', 'बाजार', 'माणदेशी माणसे') मानगंगेच्या परिसरातील लोकांचे दारिद्र्य, अडाणीपणा, कणखर वृत्ती इत्यादींचे दर्शन कथेतून घडवितात. त्याचबरोबर दि. बा. मोकाशी, वामन चोरघडे, सदानंद रेगे, ग. दि. माडगूळकर ग्रामीण भागातील व्यक्तिचित्रे कथेतून मांडतात व माणसाच्या वृत्तीप्रवृत्तीचे दर्शन घडवितात. द. मा. मिरासदार कथेत विनोदाला महत्त्वाचे स्थान देतात. त्यासाठी इरसाल, कावेबाज, बढाईखोर माणसे ते कथेमध्ये एकत्र घेऊन येतात. शंकर पाटील ग्रामीण माणसाच्या मनाचे व जगण्याचे दर्शन कथेत घडवितात. शंकर खरात दलित समाजाचे अंतर्बाह्य जीवन कथेतून मांडतात. तर अण्णाभाऊ साठे कथेतून माणूसपण शोधतात. माणसे जगली पाहिजेत ही जाणीव घेऊन अण्णाभाऊ साठेंची कथा येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' या प्रेरणादायी वैचारिक जाणिवेने दलित लेखक कथा लेखनाकडे वळतात. याचप्रमाणे जंगल, डोंगर, दऱ्या-खोऱ्यामध्ये जीवन जगणाऱ्या आदिवासी लेखकांना प्रेरणा मिळाली. भारतीय स्वातंत्र्यानंतर आदिवासी समाजाच्या जीवनामध्ये खऱ्या अर्थाने परिवर्तनाचा सूर्य तळपू लागला. ग्रामीण विकासाचा आणि शैक्षणिक विकासाचा विचार दलित आदिवासींच्या परिवर्तनाचा एक मूलमंत्र ठरला. प्रारंभी थोड्याफार प्रमाणात दळवणाच्या सोयी झाल्याने शिक्षणाची गंगा आदिवासी समाजाच्या दारापर्यंत पोहोचायला लागली. शिक्षणाचे महत्त्व पटले. त्यातून आपल्या संस्कृतीविषयी, आपल्या जगण्याविषयीचे, आपल्या समाजाविषयीचे, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचे भान त्यांना येत गेले. त्यातून तो लिहिता झाला. खऱ्या अर्थाने १९६० नंतरच्या काळात महाराष्ट्रामध्ये शैक्षणिक व औद्योगिक क्रांती झाली नवनवीन जाणिवा समाजामध्ये रुजू लागल्या. तरुण शिकू लागले. त्यातूनच आपल्या व्यथा, वेदना व आपल्यावरील होणाऱ्या अन्यायाला तरुण कथा, कविता, कादंबरी लेखनाच्या माध्यमातून मांडू लागले. यातूनच आदिवासी साहित्य लेखन फुलत गेले.

२. आदिवासी कथेचे स्वरूप:

दलित समाज हा गाव कुसाबाहेरचे जीवन जगला त्यामुळे त्यांच्या वेदना वेगळ्या स्वरूपाच्या होत्या. आदिवासी समाज हा जंगल, डोंगर, दऱ्या-खोऱ्यामध्ये राहणार होता. दळणवळणाच्या सेवा सुविधांपासून तो दूर होता. त्यातच मोलमजुरी करून तो जीवन जगत होता. तसा शेती करणे हा त्याचा प्रमुख व्यवसाय होता. परंतु शेतात जास्त फायदा होत नाही म्हणून त्याला मोलमजुरीची कामे करावी लागत. गावातील सावकार, जमीनदारांच्या शेतात त्यांना कमी मोबदल्यात राबावे लागे. कधी घरातील एखादी व्यक्ती आजारी पडलीच, तर तिच्या दवाखान्याच्या खर्चासाठी जमीनदाराकडून उधार पैशाची मागणी केली असता, त्याच्याकडील जमीन बळकावण्याचा प्रयत्न सावकार करायचा. त्याचबरोबर या आदिवासींच्या लाचारपणाचा फायदा घेऊन आदिवासी तरुण मुलींचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न या

सावकार जमीनदारांकडून होई. त्यामुळे आदिवासी गरिबी, वेठबिगारी, अन्याय, अत्याचार अशा छळांना बळी पडत होता. म्हणजे त्याचे दुःख वेगळ्या स्वरूपाचे होते. या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम आदिवासी कथा करताना दिसते. आदिवासी समाज आपल्या संस्कृतीला जपतो. त्याची लोकसंस्कृती हा त्याच्या जीवन जगण्याचा भाग आहे. त्यामुळे त्याची लोकसंस्कृती त्याच्या लेखनातून प्रतिबिंबित होत जाते. याबाबत शरदचंद्र गोखले म्हणतात, 'दलित व आदिवासींच्या भोवतालची सांस्कृतिक चौकट व वातावरण वेगळे आहे. आदिवासींच्या संस्कृतीला मातीचा सुगंध आहे'.[१] आदिवासी कथा या सांस्कृतिक व नैसर्गिक जाणिवांना घेऊन पुढे येते. डॉ. विनायक तुमराम याबाबत आपले मत व्यक्त करताना म्हणतात,' 'आदिवासी साहित्य रानावनातील वंचितांचे साहित्य आहे. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत. अशा दुर्लक्षितांचे हे साहित्य आहे'.[२] आदिवासींचे जगणे हे खूप हलाखीचे आहे. काबाड कष्ट करणे, मोल मजुरी करणे अशी कष्टाची कामे करून उपजीविका करणारा हा समाज आहे. यातूनही त्यांच्या दोन वेळेच्या जेवणाचा प्रश्न पूर्णपणे सुटत नाही. या प्रश्नांना मांडण्याचे व त्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडविण्याचे काम आदिवासी कथा करताना दिसते.

३. आदिवासी कथेची आशयसूत्रे:

आदिवासी कथा ही १९६० नंतरच्या काळात लिहिल्या जाऊ लागली. मुळात शैक्षणिक चळवळ महाराष्ट्राच्या जंगल, दऱ्या-खोऱ्यात जाऊन पोहोचली. त्यातूनच खऱ्या अर्थाने आदिवासी लेखक लेखनाकडे वळला. आपल्या समाजाचे जीवन, त्याची संस्कृती, त्याचे राहणीमान, जंगल, दऱ्या-खोऱ्यात, नद्या, नाले यांच्याशी त्याचे असलेले नाते, समाजातील सावकार, जमीनदार यांच्याकडून त्याच्यावर होणारा अत्याचार तो आपल्या लेखणीतून मांडू लागला. या सर्व जाणिवातून आदिवासी कथा फुलत गेले. आदिवासी कथा जरी आदिवासी जीवनदर्शन घडवीत असली, तरी आदिवासी कथा दलित व ग्रामीण कथेसारखे विस्तृत रूप अजून घेऊ शकली नाही. परंतु आदिवासी कथा विशिष्ट आशयसूत्रे लक्षात घेऊन लिहिली गेली आहे. हे ही तितकेच खरे आहे.

३.१ आदिवासी कथेतून आदिवासींचे जीवनदर्शन घडते:

महाराष्ट्रामध्ये ४५ आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. या जमातीतील लोकांचा जंगल, दऱ्या-खोऱ्याशी, डोंगराशी अत्यंत जवळचा संबंध आहे. या जंगलावरच त्यांची बऱ्यापैकी गुजरान होत असते. जंगलात भटकंती करून जंगलातील फळे, पाने, फुले वेचून त्यांची विक्री करून ते आपले गुजरान करतात. त्यांचं जगणं या जंगलावरच अवलंबून असते. जंगलामध्ये अशी पाने, फुले, रानभाज्या गोळा करताना जंगलातील हिंस्र प्राण्यांचा, साप, विंचवाचा त्रास त्यांना सहन करावा लागतो. हे आदिवासी समाजाच्या जगण्याचे वास्तव आदिवासी कथेमधून येते. त्याचप्रमाणे शेतमजुरी व वीटभट्ट्यांवर काम करून ते आपली गुजरान करतात. हे मजुरीचे काम करताना त्यांना अनेक यातनांना सामोरे जावे लागते. तसेच निसर्गाच्या लहरीपणाचा फटका त्यांच्या शेतीला बसतो. मजुरी करावी तर मजुरीचे पैसे मालक वेळेवर देत नाही. त्यामुळे उपासमारीची वेळही आदिवासी लोकांवर येते. याचा परिणाम त्यांच्या मनावर खोलवर होत जातो. परिणामी आत्महत्येचा विचारही त्यांच्या मनात येऊ लागतो. याचे चित्र बाबाराव मडावी आपल्या 'पोरा गळफास काढून टाक' या कथेत करताना दिसतात. कथेचा नायक महादू कष्ट करतो पण निसर्ग साथ देत नाही. घरातील माणसांना उपाशी झोपावे लागते. दहा एकराचा तुकडा जवळ असतानाही त्याला आपल्या कुटुंबाचे पोट भरता येत नाही. सावकार या जमिनीला गिळण्याची धमकी देतो. त्यामुळे तो हताश होऊन जीवन संपवण्याचा विचार करतो.[३] आदिवासी समाजाचे असे खडतर जीवन आदिवासी कथेतून असे व्यक्त होत जाते.

आदिवासी समजाचे जीवन जल, जंगल आणि जमीन या तीन घटकांशी अधिक एकरूप असलेले पाहावयास मिळते. त्यांचे जीवन हे निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे दारिद्र्य हे त्यांच्या पाचवीला पूजलेले असते. यातही ते आपल्या संस्कृतीला धरून सामाजिक रूढी, परंपरांना, प्रथांना जपत असतात. हे सर्व जगताना त्यांना आनंद मिळतो.

पण पोटाची खळगी भरण्यासाठी मोलमजुरीची कामे करावीच लागतात. ही कामे करताना त्यांच्या अज्ञानाचा, गरिबीचा फायदा घेऊन सावकार त्यांच्यावर अत्याचार, जुलूम, वेठबिगारी लादत असतात. या अन्याय, अत्याचाराचे दर्शन आदिवासी कथेमधून घडत जाते. उषाकिरण आत्राम यांच्या 'अहेर' कथासंग्रहातील 'बाजा' या कथेत याचे दर्शन घडते. बाजावर सावकाराने वेठबिगारी लादून त्याच्यावर अत्याचार केल्याचे कथेतून व्यक्त होत जाते. बाज्या म्हणतो, 'आपल्याबरोबर आपल्या पोराचेही जीवन वेठीचे ओझे वाहण्यात जाईल काय? पाथीचा बैल जसा मेडाच्या भोवती गोल गोलच फिरत राहतो तसेच हे वेठबिगारीचे चाक असेच फिरत राहील का? आमच्या पिढ्या पिढ्यांच्या जीवावर'.[४]

याचा अर्थ आदिवासी समाजाच्या जीवनामध्ये पोटाची खळगी भरण्यासाठी पिढ्यांपिढ्या वेठबिगारी लादलेली होती. आदिवासी समाजाच्या या हालाखीच्या व कष्टमय जीवनाचे दर्शन आदिवासी कथेतून घडत जाते.

आदिवासी समाजाच्या जीवनामध्ये अठराविश्व दारिद्र्य भरलेले आहे. त्यामुळे आपल्या पोटाचा खळगा भरण्यासाठी त्यांना सदैव धडपड करावी लागते. याचे दर्शन माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' कथेत घडत जाते. काही कामधंदा मिळत नाही म्हणून आदिवासींना जमीनदारांच्या शेतातील सर्वा गोळा करण्याची वेळ येते. हा सर्वा म्हणजे मालकाने धान मळून नेल्यानंतर फेकून दिलेल्या कचऱ्यामध्ये काही प्रमाणात धान्य उरते ते. हे धान कथेची नायिका सटवीला देशमुखाचा गडी घेऊ देत नाही. पण मुंग्या मात्र यातील धानाचे तुकडे बिनधास्त घेऊन जाताना ती पाहते. यावेळी तिला मुंग्यांचा हेवा वाटतो. आपण माणूस असतानाही ही माणसे टाकून दिलेले धान्य आपणास येऊ देत नाही याचा तिला संताप येतो. त्यामुळे ती म्हणते, 'माणसापेक्षा जनावरांच्या पोटी जन्म झाला असता, तर बरे झाले असते. निदान पोटापाण्याचा प्रश्न तरी राहिला नसता."[५]

याचा अर्थ आदिवासींचे जीवन जनावरांपेक्षाही भयानक आहे. याची जाणीव या कथेतून येते. त्यांना जगण्यासाठी सतत झगडावे लागते. आदिवासी समाजाच्या अशा खडतर जीवनाचे दर्शन या कथेतून घडत जाते.

आदिवासी समाजाला चांगले जीवन जगायचे असेल तर प्रत्येक व्यक्तीने प्रामाणिकपणे कष्ट करणे आवश्यक आहे. कारण कष्ट केल्यानेच आपली गरिबी हटणार आहे. हा विश्वास लेखक माधव सरकुंडे 'झड' या कथेतून देतात. या कथेचा नायक पांडू आपल्या चार एकराच्या रानात राबून पै-पै गाठीला बांधून गरिबीवर मात करतो. याबाबत तो म्हणतो,' माणूस गरीब असणे हा त्याचा अपराध नसतो. पण जो गरिबीवर मात करत नाही. जो गरीबीशी झगडत नाही, तो खरा अपराधी असतो'.[६]

एकूणच 'जो कष्ट करेल तो पोट भरेल' हा मूलमंत्र आदिवासी बांधवांना माधव सरकुंडे देतात. आपण गरिबी गरिबी म्हणत राहिलो, तर आपल्या जीवनामध्ये कधीच बदल होणार नाही. आपण गरिबीपासून दूर जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याशिवाय आदिवासींच्या जीवनात चैतन्य येणार नाही. हा विचार माधव सरकुंडे कथेतून व्यक्त करतात.

अंधश्रद्धा आणि आदिवासी समाज यांचा अगदी जवळचा संबंध आहे. त्याचा चमत्कार, भूत, दैववाद यावर अधिक भरवसा आहे. या सर्व गोष्टी त्याच्या जीवनाचा एक भाग आहेत. त्यांच्या जीवनात घडणाऱ्या गोष्टी या दैववादातून अथवा भूत, चेडा यांच्या कोपातून घडत असतात. असा त्यांचा विश्वास आहे. यावर उपाय म्हणून ते भगताकडून कौल मागतात. परंतु यामध्ये भूत लागलेल्या व्यक्तीचा मृत्यू होतो. त्या व्यक्तीच्या मृत्यू बरोबर भूत ही मरण पावले असा विचार हे आदिवासी करतात. कर्म कांडामध्ये आपल्या माणसाचा मृत्यू झाला आहे. याचे भान कोणास ही येत नाही. यावरून आदिवासी समाजात अंधश्रद्धा किती खोलवर रुजली आहे याचे दर्शन लेखक माधव सरकुंडे 'बरड' या कथेत घडवितात.

३.२ आदिवासी कथेतून संस्कृती दर्शन

आदिवासी समाज आणि त्यांची संस्कृती यांचा जवळचा संबंध आहे. संस्कृती आदिवासी समाजाचा जगण्याचा एक भाग आहे. आदिवासींच्या जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या संस्कृतीमधून उमटताना दिसते. याचे दर्शन आदिवासी

कथांमधून घडत जाते. गोटूल आदिवासी गोंड जमातीतील युवा केंद्र होय. येथे गोंड जमातीतील तरुण-तरुणी एकत्र येऊन गीत गायन व नृत्य करतात. यामध्ये आपला जोडीदारही ते येथेच निवडतात. गोंडामधील लग्न ठरवण्याची व लग्न करण्याची ही आगळीवेगळी संस्कृती "अहेर' या कथेतून व्यक्त होते. त्याचबरोबर आदिवासी संस्कृतीचा एक महत्त्वाची रीत ती म्हणजे लग्नात अहेर देणे होय. या रितीच्या माध्यमातून लग्नासारख्या खर्चीक कार्याला जमातीच्या लोकांकडून हातभार लावण्याची ही एक रीत जमातीत जपली जाते. याचे दर्शन या कथेतून घडते .

३.३ आदिवासी कथेतील स्त्रीदर्शन:

आदिवासी कथा आदिवासी समाजाचे जीवनदर्शन घडवितानाच आदिवासींवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचे दर्शन घडवले होते आदिवासी संस्कृती आणि आदिवासी जीवनाचा सहसंबंध व्यक्त करत जाते. यातून आदिवासी स्त्रीची प्रतिमा उमटत जाते. आदिवासी स्त्री कष्टकरी आहे. आपल्या कुटुंबाची जबाबदारी पेलणारी आहे. त्याचबरोबर ती प्रस्थापितांच्या अत्याचाराला बळी पडलेली आहे. असे जरी असले तरी ती तिच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बंड करून उठणारी आहे. अशा विविध आयामांच्या माध्यमातून जीवन जगणाऱ्या आदिवासी स्त्रीचे आदिवासी कथेतून दर्शन घडत जाते. 'अहेर' कथेत उषाकिरण आत्राम संस्कृतीच्या व प्रथेच्या नावाखाली दडपलेली आदिवासी स्त्री मांडतात. ती जमातीत स्वातंत्र्याचे जीवन जगते. पण गावात मात्र तिला जमीनदारांच्या गुलामीत जीवन जगावे लागते. अहेराच्या नावाखाली नवऱ्याअगोदर जमीनदाराच्या घरी जावे लागते. अशी प्रथेच्या गुलामीत जीवन जगणारी आदिवासी स्त्री उषाकिरण आत्राम कथेतून मांडतात. तिला तिच्या इच्छेविरुद्ध जमीनदाराशी जवळीक साधावी लागते. असे जरी असले, तरी या अन्यायाला ती वाचा फोडते. अशा क्रांतिकारी आदिवासी स्त्रीचे या कथेतून दर्शन घडते.

एकूणच पुरुषांच्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान दिले गेले आहे. ती केवळ पुरुषांची हवस पुरविणारी आहे. त्यामुळे तिच्याकडे उपभोगाच्या दृष्टीने पाहिले जाते. ती एक माणूस आहे. तिला भावना आहेत. वेदना आहेत. याचा विचार केला जात नाही. त्यामुळे ती आपला जन्म यासाठीच आहे, अशा भावनेत जगते. आणि आयुष्यभर अत्याचार सहन करत राहते. 'जनी' कथेत घरातील सर्वच पुरुष जनीवर अत्याचार करतात. तेव्हा तिच्या उद्ध्वस्त अवस्थेकडे पाहून तिची मोठी जाऊ म्हणते, 'या घरात बायका कोणीच कुणाच्या नात्याने बांधलेल्या नाहीत. इथे सर्व बायका फक्त मादी आहेत. पुरुष नराला भोग देण्यासाठी, प्रत्येकाच्या इच्छापूर्तीसाठी इथं बायका आणल्या जातात'.[७] स्त्री जर सौभाग्यवती असेल तर समाज तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहत नाही. परंतु ती जर विधवा असेल तर तिला समाज सतत दुषणे देत राहतो. तिचा गैरफायदा अधिक घेतला जातो. 'संघर्ष' या कथेत विधवा स्त्रीच्या जीवनात आलेल्या यातनांचे आणि संघर्षाचे चित्रण येते. म्हणजेच निराधार स्त्रीला समाज मानाने जगू देत नाही. हे वास्तव कथेतून समोर येते.

आदिवासी स्त्री साधी, अशिक्षित, संस्कृतीला अधिक जपणारी व कष्टाळू आहे. तसेच ती खूप धाडसी आहे. आलेल्या संकटाशी सामना करणारी आहे. ती कोणत्याही परिस्थितीत न डगमगणारी आहे. याचे दर्शन माधव सरकुंडे 'काटा' या कथेतून घडवितात. या कथेची नायिका राजी जंगलात काम करताना नवऱ्याला पायाला काटा लागल्याने झालेल्या जखमेतून पू वाहू लागला, म्हणून त्याला दवाखान्यात घेऊन जाते. त्यावेळी डॉक्टर तिच्या पतीचा घोट्यापासून पाय काढतो. यामुळे समोर आलेल्या संकटांना ती मोठ्या हिमतीने सामोरे जाते. आलेल्या दुःखाला नजरेसमोर घेऊन ती म्हणते, 'अरे दुःखहो, तुम्ही मला काय हरवता. तुम्ही मव्ह सौसार एका पायाने लंगडा केला तं मी काय खचून जाणार हाय का? अरे छे! दुःखाच्या राशी तुडवून मी पलीकडे जाईन पण हार मानणार नायी. दुःखाला मायी हिम्मत फायाची असंन तं अजून येवावं त्यायनं. फावू कोण हारत्ये ते'.[८]

आदिवासी स्त्री गरीब आहे. पण आलेल्या संकटांना ती मोठे हिमतीने सामोरे जाणारी स्त्री आहे. संकटे, यातना हिनावणी तिच्या पाचवीला पुजलेली आहे. पण या सर्वांशी ती मोठ्या धैर्याने लढते. परिस्थितीचा ती नेटाने सामना

करते. आणि आपला संसार सावरण्याचा प्रयत्न करते. अशी कोणत्याही संकटात मागे न हटणाऱ्या हिम्मतवान स्त्रीचे दर्शन आदिवासी कथेतून घडते.

३.४ आदिवासींकडे पाहण्याची दृष्टी लक्षात घेणे

आदिवासी समाज हा कष्टकरी समाज आहे. आयुष्यभर तो इतरांच्या शेतामध्ये मजुरी करत असतो. या परिस्थितीत बदल घडवा म्हणून आपल्या मुलांना शिकवण्याचा प्रयत्न करतो. यामध्ये त्याला पैशाची अडचण येते. तेव्हा जमीनदार आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी विरोध करताना दिसतात. कारण आदिवासी मुले- मुली शिकले तर आम्हाला मजूर कुठून मिळणार. याची काळजी त्यांना वाटत असते. 'माय' या कथेत आपल्या मुलाला शिक्षण घेण्यासाठी पाटलाकडे कथेची नायिका पुंजा आगाऊ पैशांची मागणी करते तेव्हा पाटील पोराला शाळेतून काढून सालगडी म्हणून ठेवण्याचा सल्ला देतो. तरीही पुंजा मुलाला शाळेत पाठविते. तेव्हा गावातील पाटलाची, वाणी, ब्राह्मणांची मुले त्याची टवाळी करताना म्हणतात, 'ह्यो नं राज्या कायला पाहिजे आदिवासीला शिक्षण? सरकारला या लोकांचा लय पुळका आलाय. या लोकायसाठी सवलती काढल्या म्हणं.म्हणून हे लोक असं सैताडले... प्रत्येकाने आपल्या पायरीनं राहिलं पाहिजे'.[९]

म्हणजेच सरकारने आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिक्षणासाठी व नोकरीसाठी सवलती दिल्या. परंतु या सवलती प्रस्थापित लोकांच्या डोळ्यात खुपायला लागल्या आहेत. याबद्दल ते आदिवासी समाजाला हिनवताना दिसतात. मुळात आदिवासी समाजाची दैन्य अवस्थाच या लोकांना हवी आहे. कारण कमी मजुरी मध्ये त्यांना आदिवासींना राबवून घेता येते. आदिवासी याबद्दल तोंडातून ब्र काढताना दिसत नाहीत. याचे दर्शन माधव सरकुंडे यांच्या 'माय' कथेतून घडते.

३.५ आदिवासी कथेतील विद्रोहाचे दर्शन

आदिवासी समाज जंगल, डोंगर दऱ्या खोऱ्यामध्ये वास्तव्य करणारा समाज आहे. जंगलातील फुले, फळे, पाने, कंदमुळे गोळा करून जीवन जगणारा समाज आहे. बऱ्याचदा ते मोलमजुरी करून जीवन जगत असतात. त्यांच्या जगण्यामध्ये फार मोठ्या अपेक्षा आहेत असे पाहावयास मिळत नाही. कदाचित यामध्ये त्यांच्या मध्ये असणारा शिक्षणाचा अभाव कारणीभूत असावा. त्यांच्या या अडाणीपणाचा व कष्टाळूपणाचा आधार घेऊन इतर समाज त्यांच्यावर अन्याय अत्याचार करताना दिसतो. हा अन्याय, अत्याचार बऱ्याचदा ते सहन करीत राहतात. परंतु अलीकडे शिक्षणाच्या प्रसारामुळे आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची अत्याचाराची आदिवासींना जाणीव होऊ लागले आहे. त्यातूनच तो आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बोलू लागला आहे. अत्याचाराला प्रतिकार करताना तो दिसतो आहे. याचे दर्शन आदिवासी कथांमधून घडताना दिसते.

'अहेर' कथेत गोंड आदिवासींमध्ये लग्न झाल्यानंतर अहेर घेण्यासाठी जमीनदाराच्या वाड्यावर जाण्याची प्रथा परंपरेने रूजली आहे. या प्रथेतून आदिवासी नवधूंना हे जमीनदार तिच्या नवऱ्याच्या अगोदर भोगत असतो. या अमानुष प्रथेविरुद्ध कथेची नायिका रमी विद्रोह करते. कमरेला लपवून ठेवलेल्या कोयत्याने पेशव्यावर वार करते. आणि पिढ्यांपिढ्या चालत आलेल्या या अमानुष अहेर प्रथेला संपून टाकते. एका अर्थाने आजवर जमीनदाराच्या अन्यायाला बळी पडलेल्या आपल्या सर्व बहिणींचा बदला रमी घेते.

"बाजा' कथेत बाजाचा मुलगा पेंटर सावकाराने आपल्या बापाला वेठबिगार बनवून मारून टाकले. म्हणून जमातीतील तरुणांना एकत्र करून सावकाराविरोधात पोलिसात तक्रार देण्याचे धाडस करून सावकारशाहीला आळा घालण्याचे काम करतो. 'भाकर' कथेत कथेचा नायक बाजा आपल्या शेतात राबवून आपल्या कुटुंबाचे पोट भरत होता. यावर्षी नापिकी आल्यामुळे शेतात काहीच पिकलं नाही. तसेच बायकोच्या बाळंतपणासाठी दवाखान्यात घेऊन जाण्यासाठी हातात पैसा नाही, म्हणून सावकाराकडून पाचशे रुपये आणतो. यासाठी सावकार त्याचे वावर लिहून घेतो. कालांतराने सावकार पोलिस, वकील घेऊन जमीन ५० हजाराला विकली आहे. असे सांगून जमिनीचा ताबा घेण्याचा

प्रयत्न करतो. तेव्हा बाज्याचा राग अनावर होतो. सावकाराने फसवून बाजाची जमीन हडप केली होती. याचा राग मनात घेऊन बाज्याने एक भला मोठा दगड दोन्ही हाताने उचलून सावकाराच्या डोक्यावर टाकून सावकाराचा जीव घेतला. सावकाराने आपल्या गरिबीचा फायदा घेऊन आपली जमीन लाटली याचा बदला तो घेतो. आपल्यावर झालेल्या अन्याय तो सहन करत नाही. याचा राग व्यक्त करताना बाज्या म्हणतो, 'मायी जन्माची भाकर छीनतं मुर्दाडा!'[१०]

आदिवासी समाजाच्या अज्ञानाचा आणि गरिबीचा फायदा घेऊन त्यांना सावकार, जमीनदारांनी आजवर लुबाडण्याचा अधिक प्रयत्न केला. परंतु अलीकडे आदिवासी तरुणांना आपल्यावर होणारी अन्यायाची जाणीव होऊ लागले आहे. त्या अन्यायला ते काही प्रमाणात प्रतिकार करू लागले आहेत. प्रस्थापितांना विरोध करू लागले आहेत. याचे दर्शन आदिवासी कथांमधून घडताना दिसते.

4. निष्कर्ष :

1. आदिवासी कथा सामाजिक स्वातंत्र्याचा व स्त्री स्वातंत्र्याचा विचार मांडते.
2. आदिवासी कथा सांस्कृतिक जाणिवा जपताना दिसते.
3. प्रथेच्या नावाखाली अन्याय सहन करण्याची वृत्ती आदिवासी कथा नाकारताना दिसते.
4. अन्यायाविरुद्ध आदिवासी कथा विद्रोह करताना दिसते.
5. आदिवासी समाजाकडे इतरांची पाहण्याची दृष्टी कशी आहे? याकडे आदिवासी कथा लक्ष वेधते.
6. आदिवासी कथा मानवतावादाचा पुरस्कार करताना दिसते.

5. संदर्भ :

1. लिंबाळे, शरणकुमार (संपा.) 'मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह', मधुराजा पब्लिकेशन, पुणे. प्र. आ. १९९३. पृ. क्र. १४५.
2. तुमराम, विनायक 'आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा', नागपूर, प्र. आ. १९९४ पृ. क्र. ५३
3. मडावी, बाबाराव 'भाकर', सुधीर प्रकाशन, वर्धा, द्वि. आ. २०२२ पृ. क्र. ५८.
4. आत्राम, उषाकिरण, 'अहेर' अखिल गोंडवाना गोंडी साहित्य परिषद प्रकाशन, नागपूर प्र आ सप्टेंबर १९९३ पृष्ठ क्रमांक २६.
5. सरकुंडे, माधव, 'सर्वा', देवयानी प्रकाशन, यवतमाळ. प्र. आ. एप्रिल २०००, पृ. क्र. ११.
6. तत्रैव, पृ. क्र. ७४.
7. आत्राम, उषाकिरण, 'अहेर' अखिल गोंडवाना गोंडी साहित्य परिषद प्रकाशन नागपूर प्र आ सप्टेंबर १९९३. पृ. क्र. ५०.
8. सरकुंडे, माधव 'ताडमं' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१. पृ. क्र. ६७.
9. तत्रैव, पृ. क्र. २९.
10. मडावी, बाबाराव 'भाकर' सुधीर प्रकाशन, वर्धा. द्वि. आ. जानेवारी २०२२. पृ. क्र. २६

वसुनंदी श्रावकाचारामध्ये वर्णिलेल्या सप्त व्यसन त्यागाची वर्तमानकालीन आवश्यकता

आरती अजित होनोले
9823540555
रिसर्च स्कॉलर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रस्तावना -

मनातील विचारांची सशक्त अभिव्यक्ती करण्यासाठी मानवाने भाषेचा आधार घेतला यामुळे जगभरात हजारो भाषांची निर्मिती झाली आहे. मानवाच्या भौतिक, सांस्कृतिक प्रगतीसोबत भाषा सतत संबंधित राहिलेली आहे.जगभरात बोलल्या गेलेल्या भाषांचे वर्गीकरण प्रमुख चार खंडांमध्ये केले आहे.आफ्रिका खंड,युरेशिया खंड,प्रशांत महासागरीय खंड आणि अमेरिका खंड. तसे पाहिले तर विश्वामध्ये 200-250 भाषा परिवार विद्यमान आहेत, पण प्राकृत भाषेच्या स्थान निर्धारणासाठी युरेशिया खंडातील भारोपिय (भारत+युरोपीय) भाषा परिवार अधिक महत्त्वपूर्ण आहे. हा परिवार आठ उपभाषा परिवारामध्ये विभक्त केला आहे. यापैकी भारत इराणी अथवा आर्य परिवाराच्या तीन प्रमुख भाषा आहेत. 1)इराण 2) दरद 3) भारतीय आर्य भाषा.

भारतीय आर्यभाषेमध्ये संस्कृत,प्राकृत व पाली या भाषांचा समावेश होतो. 'प्राचीन भारतीय भाषा आणि आधुनिक भारतीय आर्यभाषा या दोघांच्या मधील भाषाविषयक ऐतिहासिक भूमिकेला आपण प्राकृत असे म्हणू शकतो. प्राकृत भाषा ही पूर्व कालापासून आर्यांची एक बोली भाषा म्हणून सुद्धा ओळखली जाते. अर्थात प्राकृत म्हणजे नक्की कोणती भाषा असावी, अथवा कोणत्या भाषेला प्राकृत भाषा म्हणावे याविषयी व्याकरणकारात तथा विद्वानांच्यामध्ये मतभेद आहेत.'[1] भारतीय आर्यभाषेचे विभाजन प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन अशा तीन भागात केले आहे. यातील मध्ययुगाचे प्रतिनिधित्व प्राकृत भाषेला देण्यात येते. प्राचीनतम वेदभाषाआणि वर्तमान नवीन आर्यभाषा या दोहोंच्या मधील भाषा इतिहासाची अवस्था प्राकृत होय. प्राकृत भाषा ही एक लोकभाषा होती. साहित्यिक आणि शिष्ट भाषांपासून वेगळी होती.

1.प्राकृत साहित्याचा परिचय -

प्राकृत भाषा ही पुढील तीन काळामध्ये वेगवेगळ्या रूपात अस्तित्वात होती .प्राचीन भारतीय आर्यभाषा काळ- इ.स.पू.1600 ते इ.स.पू. 600, मध्ययुगीन भारतीय आर्यभाषा काळ- इ.स.पू. 600 ते इ.स.पू. 1000, आधुनिक आर्यभाषा काळ- इ.स.पू. 1000 ते वर्तमान काळ. प्राकृत भाषेचा काळ हा जरी मध्ययुगीन भारतीय आर्यभाषेचा काळ असला तरी प्राचीन आर्यभाषा काळापासून प्राकृतचे अस्तित्व जाणवते .वैदिक भाषा (छांदस) ही प्राचीन भारतीय आर्यभाषा आहे.त्याचा विकास तत्कालीन लोकभाषेतून झाला आहे प्राकृत भाषेचा वैदिक भाषेशी जवळचा संबंध आहे . प्राकृत भाषा आणि वैदिक भाषेतील ध्वनी,तत्त्व तसेच विकास प्रक्रियेतखूप प्रमाणात समानता जाणवते .प्राकृत भाषेच्या दृष्टिकोनातून इ.स.पू. 600 ते इ.स.1200 या कालखंडातील मध्ययुगीन भारतीय आर्यभाषेचे विभाजन प्रथम युगीन प्राकृत (आदि युग), द्वितीय युगीन प्राकृत (मध्य युग), तृतीय युगीन प्राकृत (अपभ्रंश युग) तीन भागात करता येते.

प्रथम युगीन प्राकृतमध्ये आगम ग्रंथातील आर्ष प्राकृत, सम्राट अशोकाचे शिलालेख, चीन आणि तुर्कस्थान यादेशातील निया प्रांतातीलप्राकृत लेख, धम्मपद, अश्वघोषाचे नाटक याचा समावेश होतो. मध्ययुग हा प्राकृत भाषेचा हा सुवर्णकाळ आहे. संस्कृत नाटककार भास, कालिदास, शूद्रक यांनी त्यांच्या नाटकामध्ये प्राकृत भाषेचा मुक्त वापर केला आहे. या काळात अनेक महाकाव्यांची रचना महाराष्ट्री प्राकृतमध्ये झाली. यापैकी सेतुबंध, गऊडवहो, लीलावई, पऊम चरिय, कुमारपाल चारिय इ. महाकाव्ये आज उपलब्ध आहेत. जैन आचार्यांनी प्राकृतच्या मध्ययुगामध्ये धर्मप्रसारासाठी श्रेष्ठ ग्रंथरचना केल्या. या काळात व्याकरणकारांनी महाराष्ट्र प्राकृतच्या नियमांचे लेखन

केले. यामुळे प्राकृत भाषेला नियमबद्धता आणि स्थिरता प्राप्त झाली. साहित्यिक रूपामुळे सामान्य जनांपासून प्राकृत भाषा दूर होत गेली. तेव्हा पुन्हा जनभाषेच्या रूपात प्राकृतचे नवीन रूप निर्माण झाले, ते अपभ्रंशयुग होय.

इ.स.पू. 6 व्या शतकात गौतम बुद्ध आणि भ. महावीर यांनी त्यांचा उपदेश देण्यासाठी प्राकृत भाषेचा वापर केला. प्राकृत ही जनसामान्यांची भाषा असल्यामुळे धर्मोपदेशासाठी ती उपयुक्त बनली. प्राकृत भाषेच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे सम्राट अशोकाने राजभाषा म्हणून तिला घोषित केले. प्राकृत भाषेचा हा सुवर्णकाळ होता. पुढे या भाषेत समृद्ध साहित्य निर्माण झाले. आजही अनेक भारतीय भाषांची जननी या नात्याने प्राकृत भाषा विद्यमान आहे. थोडक्यात वैदिक युगातील प्राचीन भाषा, महावीर युगातील धर्मभाषा, मौर्यकाळातील राजभाषा, साहित्यिक भाषा ते आधुनिक भाषांची जननी असा प्राकृत भाषेचा दीर्घ प्रवास आहे.

2.आचार्य वसुनंदी आणि त्यांचा उपासकाध्ययन ग्रंथ -

आ. वसुनंदी हे जैन सिद्धांत, नीतीशास्त्र आणि भाषाशास्त्राचे विद्वान होते. त्यांनी मुलाचार या ग्रंथाची टीका संस्कृतमध्ये लिहिली तर उपासकाध्ययन नामक श्रावकाचार ग्रंथ प्राकृत भाषेमध्ये लिहिला आहे. यावरून हे सिद्ध होते की ते संस्कृत आणि प्राकृत दोन्ही भाषेचे ज्ञाता होते. आ. वसुनंदींच्या काळाबाबत केवळ अनुमान लावता येते. 'आ. वसुनंदींनी आ. नयनंदींना आपल्या दादा गुरूंच्या रूपामध्ये स्मरण केले आहे. नयनंदी रचित अपभ्रंश भाषामधील दोन ग्रंथ सुदर्शन चरित आणि सकल विधिविधान आमेर मधील शास्त्र भंडारामध्ये उपलब्ध आहेत. यापैकी सुदर्शन चरितच्या शेवटी जी प्रशस्ती उपलब्ध होते त्याद्वारे हे लक्षात येते की नयनंदिनी या ग्रंथाची रचना वि.सं.1100 मध्ये धारा नरेश महाराजा भोज देवाच्या काळामध्ये पूर्ण केलेली आहे..... वसुनंदींनी ज्या शब्दांमध्ये आपल्या दादा गुरूंचा प्रशंसापूर्वक उल्लेख केला आहे त्याच्यावरून हे अवश्य लक्षात येते की, त्यांच्यासमोर ते विद्यमान असावेत. जर हा अनुमान ठीक असेल तर वसुनंदींचा काळ 12 व्या शताब्दीचे प्रथम चरण मानता येऊ शकतो आणि जर ते त्यांच्या समोर विद्यमान नसतील तर प्रशिष्य या नात्याने वसुनंदींचा काळ 12 व्या शताब्दीचा पूर्वार्ध होऊ शकतो.'[2]

शौरसेनी प्राकृत भाषेमध्ये लिहिलेल्या या ग्रंथाला आ. वसुनंदीनी स्वतः उपासकाध्ययन असे नाव दिले आहे. तथापि आज हा ग्रंथ 'वसुनंदी श्रावकाचार' या नावाने ओळखला जातो. आ. वसुनंदी प्रस्तुत ग्रंथांच्या प्रशस्तीमध्ये गाथा प्रमाण 650 सुचित करतात तथापि कोणत्याही प्रतीच्या आधाराने पाहिले तर हे गाथा प्रमाण 650 सिद्ध होत नाही. 'विद्वानांच्या मतानुसार संभवत: एका गाथेला सव्वा श्लोक प्रमाण मानून ग्रंथकार समग्र ग्रंथाचे परिणाम 650 श्लोक प्रमाण म्हणतात.'[3]

प्रस्तुत ग्रंथामध्ये प्रारंभी जीव आजीवादी सप्त तत्त्व वर्णन, सम्यग्दर्शन वर्णन केले आहे. वसुनंदींच्या समोर रत्नकरंड श्रावकाचार ग्रंथ असतानाही त्याचे अनुकरण न करता त्यांनी प्राचीन परंपरेनुसार 11 प्रतिमेच्या आधारे श्रावकाचार कथन केला आहे. द्वितीय व्रत प्रतिमांतर्गत 12 व्रतांचे विस्ताराने वर्णन केले आहे. अतिथि संविभाग व्रतामध्ये दानाचे वर्णन विस्तृतपणे केले आहे. याबरोबरच विनय, वैयावृत्य, कायक्लेश आणि पूजनविधानाचे श्रावक कर्तव्य या स्वरूपात वर्णन आहे. प्रस्तुत ग्रंथाची ही सर्वात मोठी विशेषता आहे की, गा.नं. 59 ते गा.नं. 204 अंतर्गत 146 गाथांमध्ये सप्त व्यसनाचे अत्यंत विस्ताराने वर्णन आहे. तत्कालीन सप्त व्यसनांची वाढती प्रवृत्ती लक्षात घेऊन आचार्य व्यसन त्यागाचे विस्ताराने वर्णन तर करतातच शिवाय कोणतेही व्रत धारण करण्यापूर्वी श्रावकाने व्यसनत्याग अवश्य करावा असे सांगतात.

3.सप्त व्यसन त्याग वर्णन -

व्यसन हा शब्द वि उपसर्गपूर्वक अस् धातूला ल्युट प्रत्ययाने बनला आहे. ज्याचा अर्थ भ्रष्ट होणे अथवा पडणे असा आहे. व्यसन ही एक अशी वाईट सवय आहे, जी पटकन लागते पण सुटत मात्र लवकर नाही. मनुस्मृति मध्ये म्हटले आहे की, 'व्यसनस्य च मृत्योश्च व्यसनं कष्टमुच्यते।' अर्थात, व्यसन हे मृत्यूपेक्षा सुद्धा अधिक कष्टदायक आहे.[4] व्यसन

मनुष्याच्या आध्यात्मिक आणि व्यावहारिक जीवनाचा घात करते. आत्म्याचा घात करणारे काम, क्रोध, लोभादी जे अंतरिक शत्रु आहेत त्या सर्वांना जागृत करण्याचे काम व्यसन करते. धर्म मार्गावरून कुमार्गावर नेऊन ठेवते. सद्गुरु, सद्गुणी व्यक्तींचा सहवास होऊ देत नाही. दान पूजनादि धर्मकार्य, तीर्थवंदना या सर्वापासून व्यसनी व्यक्ती दूर जाते व तन मन आणि धनाचा नाश करून घेते.

वसुनंदी श्रावकाचारामध्ये या व्यसनांचे, त्याच्या दुःखाचे व परभवात प्राप्त होणाऱ्या दुर्गतीचे विस्ताराने वर्णन केले आहे.

जूयं मज्जं मंसं वेसा-पारद्धि-चोर-परयारं । दुग्गइ-गमणस्सेणादि हेउभूदाणि पावाणि ॥ 59 ॥

अर्थात, 'द्युत, मद्य, मांस, वेश्या, शिकार, चोरी आणि परस्त्री सेवन हे सर्व दुर्गतीला कारणभूत पाप आहेत.'[5]

दुःखदायी व्यसने अनेक प्रकारची आहेत. आचार्यांनी सप्त व्यसनाचा उल्लेख केला असला तरी इतर उपव्यसने त्यात अंतर्भूत आहेत. व्यसन नरक गतीला कारण आहे. याचबरोबर ते इहलोकात सुद्धा नरकगती प्रमाणेच दुःख देते. व्यसनी व्यक्तीला सतत अपयश, अपमान, अविश्वास, निर्धनता, रोगावस्था, शिक्षा तसेच स्त्री, पुत्र, मित्र यांच्यापासून दूर एकाकीपणा सहन करावा लागतो. व्यसनी मनुष्य सुखाने भोजन, निद्रा घेऊ शकत नाही. क्षणिक सुखासाठी केले जाणारे कोणतेही व्यसन दीर्घ काळाच्या दुःखालाच कारण आहे. आचार्य अत्यंत करुणा बुद्धीने प्रत्येक श्रावकाने व्यसनाचा त्याग करावा असा उपदेश करतात.

1. द्यूत क्रीडा- द्यूत, लॉटरी, सट्टा, जुगार खेळणारा मनुष्य सतत भयंकर क्रोध, मान, माया व लोभ या कषायांनी लिप्त राहतो. या कषायांच्या वशीभूत तो मन वचन आणि कायेच्या हिंसक प्रवृत्ती करतो. ज्यायोगे तो पापकर्माचाच बंध करीत राहतो.

2. मद्य सेवन - मद्यपानामध्ये सर्व मादक पदार्थांचा जसे की तंबाखू, भांग, गांजा, बिडी, सिगारेट इ. समावेश होतो. आचार्य मद्य त्यागामध्ये मध त्यागाचा उपदेश करतात. मद्यपानामुळे मनामध्ये आणि शरीरामध्ये एक उन्माद निर्माण होतो. जो मनुष्याला विवेकहीन बनवतो. मद्यपी मनुष्य द्युत, वेश्या गमन, चोरी अशा व्यसनांच्या पटकन आहारी जातो. विवेकहीन मद्यपी मनुष्य धर्मपालनाचा विचारही करू शकत नाही.

3 .मांस भक्षण –

मंसं अमेज्झ सरिसं किमिकुलभरियं दुगंधबीभच्छं । पाएण छिवेउं जं ण तीरए तं कहं भोत्तुं ॥ 85 ॥

'कृमीच्या समूहाने भरलेले मांस विष्ठेसमान दुर्गंधीयुक्त आणि बीभत्स आहे. ते पायाने स्पर्श करण्यायोग्य नाही तर त्याला खाणे कसे शक्य आहे.'[6] मांस, मासे, अंडी, मांसजन्य पदार्थ हा सर्व मांसाहार आहे. सप्तधातूपासून बनलेल्या मांसात प्रत्येक क्षणी अनेक निगोदी जीव तयार होत असतात. मांसाहार करणारी व्यक्ती दयारूपी अहिंसा धर्माचाच नाश करते. जेथे अहिंसा धर्माचा नाश होतो तेथे इतर व्रतपालन अशक्य बनते. मांसाहारी व्यक्ती मदांध बनते व सम्यग्दर्शनापासून च्युत्त होते.

4. वेश्या गमन - पैशासाठी शरीर विक्रय करणाऱ्या स्त्रीकडे जाणे, तिच्यासोबत रमणे वेश्या गमन आहे. स्त्री-पुरुष संबंधांमध्ये लाखो सूक्ष्मजीवांची हिंसा होते. या हिंसेपासून वाचण्यासाठी स्वदार संतोष व्रताचे पालन करणाऱ्या श्रावकाला सुद्धा पर्वकाळात ब्रह्मचर्य व्रताचे पालन करण्याचा उपदेश आहे. अहिंसेची इतकी सूक्ष्मता असताना वेश्यागमन अथवा परस्त्री सेवन घोर हिंसेचा पाप बंध आहे.

5. शिकार - सम्यक्त्वाचा प्रधान गुण अनुकंपा आहे. प्राण्यांची हत्या करणे, पकडणे, जखडणे, प्राण्यांची शर्यत लावणे, त्यांच्या अवयवांचा औषध, सौंदर्यप्रसाधने बनवण्यासाठी उपयोग करणे ही सर्व शिकारच आहे. या हिंसक क्रियात मनुष्यातील दया, अनुकंपा या गुणांचा नाश होतो.

6. चोरी –

लज्जा तहाभिमाणं जस-सीलविणासमादणासं च । परलोय भयं चोरो अगणंतो साहसं कुणइ ॥ 105 ॥

'परद्रव्याचे हरण करणे चोरी आहे. चोर लज्जा, अभिमान, यश आणि शील याचा विनाश करतो. अपमान, निंदेला सहन करतो. पर लोकातील भयाची चिंता न करता चोरीसारखे कुत्सित कृत्य करून संसार समुद्रात डुबतो.'[7] जैन तत्वज्ञानात धनाला बहिरंग प्राण मानले आहे. हा बहिरंग प्राण लुटून नेणे म्हणजे हिंसाच करणे आहे.

7. परस्त्री सेवन - स्वतःच्या विवाहित स्त्री अगर पुरुषाशिवाय इतर स्त्रिया अगर पुरुषांसोबत रमण करणे परस्त्री सेवन आहे. अन्य स्त्रियांशी एकांतात बोलणे, त्यांच्याकडे वाईट नजरेने पाहणे, वाईट हेतूने तिच्यासोबत जाण्या येण्याचा व्यवहार करणे हे सर्व पाप आहे.

सप्त व्यसनाने भ्रष्ट झालेल्या व्यक्तींची नावे जैन आगमामध्ये प्रसिद्ध आहेत. अनुक्रमे युधिष्ठिर, यादव कुल, राजा बक, चारुदत्त, ब्रह्मदत्त, श्रीभूती व लंकाधिपती रावण अपकीर्तीला प्राप्त झाले आहेत. एका व्यसनाने त्यांचे इतर सर्व सद्गुण लोप पावले आहेत. धर्माचरण करू इच्छिणाऱ्या श्रावकाने व्यसनाचा त्याग केला पाहिजे.

सप्तैव नरकाणि स्युस्तैरेकैकं निरूपितम् । आकर्षयन्नृणामेतद् व्यसनं स्वसमृद्धये ॥12

'नरक सात आहेत व व्यसनही सात आहेत जणू नरकाने स्वतःच्या समृद्धीसाठी लोकांना आकर्षित करण्यासाठी व्यसनाची योजना केली आहे.'[8]

4.वर्तमानकाळामधील वाढती व्यसनाधीनता -

आ. वसुनंदी सप्त व्यसनाचे वर्णन करताना ते दुर्गतीला, नरक गतीला कारण आहे हे जाणून त्यांचा त्याग करावा असे पुन्हा पुन्हा सांगतात. व्यसनांमुळे दुर्लभ मनुष्य भावाचा सुद्धा कसा नाश होतो हे सांगतात. तथापि वर्तमान काळामध्ये व्यसनाधीनता प्रचंड प्रमाणात आणि मोठ्या वेगाने वाढत आहे. परभवातील दुर्गतीचे भय आज विज्ञान युगातील मनुष्याला वाटत नसले तरी प्राप्त मानवी जीवनात किमान स्वास्थ्य असणे गरजेचे आहे. मानवी जीवनामध्ये सर्वात बहुमूल्य गोष्ट कोणती असेल तर ती स्वास्थ्य आहे. स्वास्थ्य असेल तर भूतलावरच जणू स्वर्ग आहे. स्वास्थ्य हा शब्द केवळ शरीरापुरता मर्यादित नाही तर मानसिक, सामाजिक, आर्थिक या सर्वाच्या संतुलनाशी निगडित आहे. स्वस्थ या शब्दाचा शाब्दिक अर्थ आहे, स्व + स्थ म्हणजेच स्वतःमध्ये स्थित असणे. स्थिर असणे.

W.H.O. ने स्वास्थ या शब्दाची व्याख्या करताना म्हटले आहे की Health is a state of complete physical, mental and social well being and not merely an absence of disease or infirmity. अर्थात, पूर्ण शारीरिक, मानसिक तसेच सामाजिक संतुलनाची अवस्था म्हणजे स्वास्थ्य केवळ रोग अथवा अपंगत्व याचा अभाव नव्हे. सर्वच सात व्यसनांचा सरळ सरळ संबंध मानसिक आणि आर्थिक अस्वास्थ्याशी आहे. मद्यपान, मांसाहार, परस्त्री सेवन, वेश्यागमन शारीरिक अस्वास्थ्य निर्माण करतात. मद्यपान, मांसाहार, शिकार यामुळे पर्यावरणाचा नाश होतो. एकंदरच या सर्व घातक परिणामांपासून वाचण्यासाठी व्यसनत्याग आवश्यक आहे.

4,1 व्यसन त्याग व मन स्वास्थ्य –

सर्वसामान्यपणे व्यसन केवळ शारीरिक नुकसान करते असे सर्वांना वाटते, तथापि मनाचा आणि शरीराचा अत्यंत जवळचा संबंध आहे. चरक संहितेमध्ये म्हटले आहे की, 'सत्वं चनुविधेयते शरीरं हि अपि शरीरं च सत्वं' अर्थात, शरीर सदैव मनाचे अनुसरण करते आणि मन शरीराचे अनुसरण करते. मानसिक आणि शारीरिक ऊर्जा परस्परावर प्रभाव टाकतात. मांसाहारी, मद्यपी व्यक्ती अहिंसक विचार करू शकत नाही. म्हटलेच आहे.'जैसा खावे अन्न वैसा होवे मन'

आजच्या काळातील जुगार, सट्टा बाजार, लॉटरी हे द्यूतप्रमाणेच आहेत. त्यामध्ये व्यक्तीला सतत पैसे जिंकण्याची, हरण्याची चिंता राहते. चोरी, शिकार, परस्त्रीसेवन, वेश्यागमन या अवैध गोष्टी करताना व्यसनी व्यक्तीला सतत आपण पकडले जाऊ, आपणाला शिक्षा होईल, समाजात निंदा होईल याची भीती राहते. या भीतीने व्यसनी

व्यक्तीचे मन सतत अस्थिर राहते. या सर्वाचा परिणाम शारीरिक स्वास्थ्यावर होतो. चिंता, ताण, तणाव, नैराश्य अनेक आजाराला आमंत्रण देतात. आज तरुण वयात हृदयरोग, उच्च रक्तदाब, मधुमेह याचे जे प्रमाण वाढत चालले आहे त्याचे कारण मानसिक अस्वस्थताच आहे. 'आपले शरीर हा आपल्या मनस्थितीचा, अंतर्यामीच्या विचारांचा, विश्वासांचा, समजूतीचा आरसा असतो. आपल्या शरीरातील प्रत्येक आजार आपणच निर्माण करतो कारण आपल्या शरीराची पेशीन्पेशी ही तुमच्या प्रत्येक विचाराला अगदी बोललेल्या प्रत्येक शब्दाला (मनातल्या मनात देखील) प्रतिक्रिया दर्शवत असते. 90 ते 95% प्रसंगी तर विशिष्ट आजारामागे विशिष्ट मनस्थिती असल्याचा पडताळा येतो.'[9] या मानसिक अस्वस्थतेचा अतिरेक झाला की आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले जाते. आज भारतामध्ये तरुण मुलांच्या आत्महत्येचे प्रमाण वेगाने वाढत आहे. N.C.R.B. च्या अहवालानुसार 2022 मध्ये भारतात 1.71 लाख लोकांनी आत्महत्या केल्या, आत्महत्येचे हे प्रमाण वाढून प्रति 1,00,000 लोकांना मागे 12.4 झाले आहे.

अती मद्यपानामुळे, द्यूतात हरल्यामुळे, चोरी पकडली गेल्यामुळे अथवा परस्त्री वश न झाल्यामुळे आणि अशा अनेक कारणामुळे व्यसनी व्यक्ती सतत क्रोध, मान, माया, लोभ यांनी लिप्त राहते. त्यामुळे ती मनाचा समतोल हरवते. हे चार कषाय शारीरिक व मानसिक विकार निर्माण करतात. कषायामध्ये सर्वात प्रधान क्रोध आहे, जो मान, माया, लोभ या सर्वाला जणू आमंत्रित करतो. गीतेत म्हटले आहे,

'क्रोधाभ्दवती सम्मोहः सम्मोहात्स्मृतिविभ्रमः। स्मृतिभ्रंशाद् बुध्दिनाशो बुध्दिनाशात्प्रणश्यति।। 63।।

अर्थात, 'क्रोधामुळे व्यक्तीचा विवेक सुटतो, तो सुटल्यामुळे स्मृतिदोष जडतो. स्मृतीदोषामुळे बुद्धीनाश होतो व त्यामुळे व्यक्तीचा विनाश होतो.'[10] क्रोध शरीरामध्ये उच्च रक्तदाब, हृदयरोग, लकवा निर्माण करतो. वारंवार क्रोध केल्याने शरीराची संतुलित व्यवस्था बिघडते. मानसिक विकार निर्माण होतात. क्रोधी व्यक्ती विवेकहीन बनते. कोणत्याही परिस्थितीमध्ये शांत राहणारी व्यक्ती प्राण ऊर्जा वाचवते आणि वाढवते. 'भगवती आराधने मध्ये म्हटले आहे की क्रोध शत्रूचा उपकार करते आणि आपले परिवारजन, मित्र आणि स्वतःसाठी समस्यांचे कारण बनते.'[11]

4.2 व्यसन त्याग व शरीर स्वास्थ्य –

आज व्यसनाला जणू समाज मान्यता प्राप्त झाली आहे. मद्यपान, मांसाहार, परस्त्री सेवन, वेश्यागमन याबाबतच्या नैतिक अनैतिकतेच्या सीमारेषा धूसर बनल्या आहेत. ग्रामीण, शहरी, सुशिक्षित, अशिक्षित, गरीब, श्रीमंत अशा सर्वच स्तरांवर अगदी लहान वयापासून अशा प्रकारची व्यसने चालत आहेत. खेदाची गोष्ट म्हणजे वर्तमानकाळात महिलांमध्ये सुद्धा अशा प्रकारच्या व्यसनांचे प्रमाण वाढत आहे. त्याचे अतिशय गंभीर परिणाम शरीर स्वास्थ्यावर होत आहेत. दारूच्या व्यसनाने शरीरावर साठ प्रकारचे दुष्परिणाम होतात असे वैद्यक शास्त्र सांगते.आज जगातील 5 ते 10% व भारतातील 20 ते 30 % लोकसंख्या दारूच्या आहारी आहे. 'द लन्सेट मिंटमध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार प्रत्येक व्यक्तीचे 2005 मध्ये मदयपानाचे प्रमाण 2.4 लिटर, 2010 मध्ये 4.3 लिटर तर 2016 मध्ये 9.7 लिटर इतके वाढले आहे.'[12] W.H.O. नुसार दरवर्षी जगातील 3.3 लाख लोकांचा मृत्यू फक्त मद्यपानामुळे होतो. दारू शारीरिक नुकसान तर करतेच पण इतर अनेक गुन्ह्यात दारू हे महत्त्वाचे कारण आहे. दारूच्या व्यसनामुळे चोरी, बलात्कार, खून, लुटमार, हत्या इ. अनेक अपराध होतात. एकूण रस्ते अपघातामध्ये 20% अपघात दारू पिऊन गाडी चालवल्यामुळे होतात. ड्रग एब्युज इन इंडिया या कमिटीने भांग, गांजा, चरस, मार्फिन, हेरॉईन, कोकीन या सर्वांचा मादक पदार्थामध्ये समावेश केला आहे. या सर्वात धूम्रपानाचे व्यसन दारूइतकेच सार्वत्रिक आहे. धूम्रपान करणाऱ्यांमध्ये श्वासनलिकेचे तर मावा, गुटखा, तंबाखू खाणाऱ्यामध्ये तोंडाच्या कॅन्सरचे प्रमाण सर्वाधिक आहे.

आज मांसाहाराचे प्रमाण वाढले आहे. मांसाहारानेच मानवी शरीराचे योग्य पोषण होते. मांसाहारामुळे हाडे व मांसपेशी बळकट होतात. शरीरात शक्ती व ऊर्जा निर्माण होते. शाकाहारांमध्ये ती क्षमता नाही हा गैरसमज निर्माण होत आहे. मांसाहारात प्रोटीनचे प्रमाण जास्त असते मात्र शाकाहारातून

प्रोटीन मिळतच नाही हे कुठलेच डॉक्टर किंवा डायटीशियन मान्य करत नाहीत.

शाकाहार व मांसाहारात असणारे प्रोटीनचे प्रमाण –

पदार्थ	**प्रोटीन (100 ग्रॅम प्रति पदार्थ)**
दूध	4 ग्रॅम
पनीर	15 ग्रॅम
चीज	24 ग्रॅम
सोयाबीन	43 ग्रॅम
डाळी, शेंगदाणे	18 ते 24 ग्रॅम
अंडे (मध्यम आकाराचे)	6 ते 7 ग्रॅम
मांस	18 ते 20 ग्रॅम

मानवी शरीराला जरी प्रथिनांची गरज असली तरी ही गरज लिंग, वय, कामाचा प्रकार यानुसार वेगवेगळी आहे. शुद्ध, ताजा आणि सात्विक शाकाहार ही गरज भागवण्यासाठी परिपूर्ण आहे. मांसाहारातून शरीराला मिळणारी प्रथिने गरजेपेक्षा अधिक प्रमाणात असतात. ती चरबी वाढवतात शिवाय मांसाहारात सॅच्युरेटेड मेदाम्ले अधिक असतात. त्यातील कोलेस्ट्रॉलमुळे हृदयरोगाचा धोका वाढतो. अंड्यामध्ये प्रथिनेचे जैव मूल्य सर्वाधिकअसते तथापि त्यातील पिवळ्या भागात कोलेस्ट्रॉलचे जे अधिक प्रमाण असते ते हृदय रोगाचा धोका निर्माण करते. मांसाहारात फायबरचे प्रमाण नगन्य असते, त्यामुळे पचन, मलविसर्जन यामध्ये अडथळा येतो. बद्धकोष्ठतेचा धोका वाढतो.

'National Crime Record Buro (NCRB) Report 2024 नुसार महिलांच्या संदर्भात होणाऱ्या बलात्कार, विनयभंग, लैंगिक शोषण यासारख्या अपराधामध्ये या वर्षात 4 % वृद्धी झाली आहे.'[13] वेश्यागमन, परस्त्री सेवन या प्रकारच्या व्यसनामुळे निर्माण होणारे असुरक्षित स्त्री पुरुष संबंध शरीर स्वास्थ्यावर घातक परिणाम करतात. संयमाने आणि शास्त्रीय मर्यादेने कामसेवन केल्यास शरीरामध्ये स्थित असणाऱ्या सप्तधातूंची रक्षा होते आणि मनुष्याला दीर्घायु प्राप्त होते असे आयुर्वेद सांगते.

4.3 व्यसन त्याग व आर्थिक स्वास्थ्य –

जैन आगमामध्ये अर्थ मानवी जीवनामध्ये उपयुक्त आहे हे मान्य केले आहे. 'पउम चरियंमध्ये धनाचे महत्त्व सांगताना म्हटले आहे की, जस्सऽत्थो तस्स सुहं, जस्सऽत्थो पण्डिओ य सो लोए । जस्सऽत्थो सो गुरुओ, अत्थविहूणो य लहुओ उ । तस्स महत्थो य जसो, धम्मो वि य तस्स होइ साहीणो । धम्मो वि सो समत्थो, जस्स अहिसा समुदिट्ठा ।। अर्थात, 'ज्याच्याजवळ धन आहे तो सुखी आहे. तो पंडित आहे. तो यशस्वी आहे. तो महान आहे. धर्म सुद्धा त्याच्या अधीन आहे. अहिंसा उपदेशक धर्माच्या पालनामध्ये सुद्धा धनवानच समर्थ होऊ शकतो.'[14] असे असले तरीजैन अर्थशास्त्रामध्ये श्रावकाने न्यायपूर्वक धनाचे अर्जन करावे आणि अहिंसा पूर्वक विवेकाने त्याचा उपयोग करावा अशी सर्वोत्तम आचारसंहिता सांगितली आहे.

अर्था नाम य एते प्राणा एते बहिश्चराः पुंसाम् । हरति स तस्य प्राणान् यो यस्य जनो हरत्यर्थान् ।।103।।

अर्थात, 'द्रव्य हा माणसाचा जणू बहिरंग प्राणच आहे. द्रव्य हरण केल्याने परजीवाचा बहिरंग प्राण घात होतो म्हणून चोरी केल्याने हिंसेचा बंध होतो.'[15]

जुगार,चोरी,आधुनिक काळातील सायबर गुन्हे याद्वारे अधिक धनाची प्राप्ती होऊ शकते पण हे अन्यायी मार्गाने मिळवलेले धन कधीच स्थायी राहत नाही. द्यूत खेळून किंवा चोरी करून व्यक्ती धनवान झाली आहे आणि या धनाला

अखंडपणे उपभोगत आहे असे उदाहरण पहावयास मिळत नाही. थोडक्यात व्यसनातून प्राप्त झालेले धन कुमार्गाने येते आणि कुमार्गाला जाते. द्यूत,चोरीद्वारे अचानक मिळालेला पैसा मद्यपान, वेश्यागमन यासारख्या दुसऱ्या व्यसनामध्ये खर्च होऊन जातो. त्यामुळे व्यसनी व्यक्ती नेहमी निर्धनच राहते. आर्थिक अस्थिरतेमुळे व्यसनी व्यक्ती मानसिक दृष्ट्या सुद्धा नेहमी अस्थिरच राहते.

4.4 व्यसन त्याग व पर्यावरण स्वास्थ्य –

'परितः आवृणोतीति पर्यावरणम्' अर्थात,आपल्या चारी बाजूने वेढलेले आहे ते पर्यावरण होय. सर्व सजीव व त्यांच्या भोवतीचे पर्यावरण एकात्मपणे परस्पराश्रयी असतात. सर्व जैविक आणि अजैविक घटकांच्या चक्रांनी मिळून पर्यावरण बनलेले आहे. 'अब्राहम लिंकननं लोकशाही हे लोकांचं लोकांसाठी आणि लोकांकरवी चालणार राज्य आहे असं म्हटलं आहे. त्याचप्रमाणे पर्यावरण ही सर्वांची सर्वांसाठी आणि सर्वांकरवी चालणारी व्यवस्था आहे. तिला केंद्रबिंदू नाही. तिच्यात सर्वात महत्त्वाची अशी कोणतीही जागा नाही.'[16] काहीतरी घ्यावे आणि काहीतरी द्यावे या परस्पर संबंध आणि परस्परावलंबन या तत्त्वावर निसर्गाचे कार्य चालते. मानवाचा अपवाद वगळता सर्व जैविक घटक हे तत्त्व पालन करतात. आज वाढते औद्योगीकरण, शहरीकरण यामुळे माणसाचा भौतिक विकास जरूर झाला तथापि पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. पर्यावरणाचा नाश होत असताना मानवाचा विकास होतो आहे असे म्हणणे अत्यंत गैर आहे.

अनेक कारणांपैकी वाढती व्यसनाधीनता, वाढती लोकसंख्या हे पर्यावरण प्रदूषणाचे कारण आहे. जितकी लोकसंख्या वाढेल तितका नैसर्गिक संसाधनाचा वापर वाढतो. जैन धर्माने हजारो वर्षांपूर्वी श्रावकाने विवाहाच्या पवित्र बंधनामध्ये राहून स्वदार संतोष व्रताचे पालन करावे असा उपदेश केला आहे. ज्याद्वारे अनैतिक यौन संबंधावर संयम राहतो. परस्त्रीगमन, वेश्यागमन या व्यसन त्यागाच्या माध्यमातून जनसंख्या वृद्धी रोखता येते.

व्यसनी व्यक्ती कोणताही विधीनिषेध न बाळगता निसर्गाचे शोषण करते. त्याचा नाश करते. दारूसारखे मादक पदार्थ बनवण्यासाठी निसर्गाची अनेक संसाधने वापरली जातात, ज्याचा केवळ दुरुपयोग होतो. आज मांसाहाराची वाढती प्रवृत्ती जैविक साखळी धोक्यात आणत आहे. एक किलो अन्नधान्य उत्पादनाच्या तुलनेत एक किलो मांसाचे उत्पादन करण्यासाठी अधिक पाणी, अधिक नैसर्गिक साधने वापरावी लागतात जी पर्यावरणाचे अधिक शोषण करतात. याचबरोबर कत्तलखान्यातून वाहणारे दूषित रक्त, नको असलेले मांसाचे, हाडाचे भाग जल प्रदूषण, वायु प्रदूषण वाढवतात. मृत्यूच्या भीतीने मूक पशुंमध्ये निर्माण झालेल्या कंपनांचा कत्तलखान्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होतो. सतत प्राण्यांची हत्या केल्याने त्यांच्या मनात क्रूर, हिंसक भाव वाढत जातात जे सामाजिक स्वास्थ्यासाठी बाधा निर्माण करतात.

मानवाने मनोरंजनासाठी, आहारासाठी प्राण्यांची शिकार केली. हे प्रमाण इतके वाढत गेले की, चित्ता, दोन शिंगी गेंडा, गुलाबी डोक्याचे बदक व हिमालयीन लावा या चार प्रजाती नष्ट झाल्या तर बंगाली वाघ, आशियाई सिंह, माळढोक, लाल पांडा, काळवीट आणि स्नो लेपर्ड यासारख्या प्राण्यांच्या प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. शिकारीमुळे वन्य जीवांच्या प्रजाती नष्ट होण्याची प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाल्यानंतर भारतामध्ये कायद्याने शिकार बंदी केली आहे. जगा व जगू द्या या तत्त्वावर पर्यावरणाचे कार्य चालत असल्याने निसर्गातील प्रत्येक छोटा मोठा घटक महत्त्वाचा आहे. अहिंसा तत्त्वाच्या पालनासाठी जरी श्रावकाला शिकार त्याग सांगितला असला तरी त्यातून पर्यावरणाचे रक्षण आपोआपच होत आले आहे.

5. उपसंहार –

जैन तत्वज्ञान हे आत्मवादी दर्शन आहे. आत्म्याला जन्म मरणाच्या चक्रातून मुक्त करून मोक्षप्राप्ती करणे हे जैन तत्त्वज्ञानाचे अंतिम व महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी अहिंसा हे केंद्रीभूत तत्त्व आहे. या दृष्टिकोनातूनच

जैनाचारातील सर्व व्रत, नियमांची संहिता तयार झाली आहे. श्रावकाचारांमध्ये श्रावकाने कोणतेही व्रत अथवा प्रतिमा स्वीकारण्यापूर्वी त्याची एक अहिंसक भूमिका बनवली गेली आहे. त्यासाठी अनेक सामान्य नियमांचा निर्देश केला आहे. अष्टमूलगुण पालन आणि सप्त व्यसन त्याग यामध्ये महत्त्वाचे आहेत. श्रावक जेव्हा सात प्रकारच्या व्यसनांचा त्याग करतो तेव्हा तो मन, वचन आणि कायेने प्रारंभिक अवस्थेतच अहिंसावादी बनतो. तो चार प्रकारच्या कषायांपासून अलिप्त राहतो. असा श्रावकच पुढे जाऊन व्रत धारण करण्यासाठी पात्र बनत असतो. श्रावकाचारांमध्ये सप्त व्यसन त्यागामागे अध्यात्मिकता असली तरी त्याचे व्यावहारिक महत्त्व देखील तितकेच आहे. आ. वसुनंदी बाराव्या शतकामध्ये म्हणजे जवळजवळ 800 वर्षांपूर्वी व्यसनामुळे होणाऱ्या दुःखाचे वर्णन करून ते त्यागण्याचा उपदेश करतात.

वर्तमान काळामध्ये मात्र अशी विपरीत परिस्थिती निर्माण झाली आहे की लहान वयापासूनच व्यसनाधीनता वाढत चालली आहे. आज चोरी करणे, शिकार करणे, जुगार खेळणे, महिलांसोबत छेडछाड करणे याला कायद्याने गुन्हा मानले आहे व त्यासाठी शिक्षेची तरतूद केली आहे. आज मद्यपान, धूम्रपान याला कायद्याने बंदी नसली तरी ही व्यसने आरोग्यासाठी धोकादायक आहेत असे वैधानिक इशारे त्यावर छापले आहेत. आज लहान वयात हृदयरोगाचे, रक्तदाबाचे तसेच आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे अशा वेळी व्यसनाधीनतेवर नव्याने विचार होत आहेत.

भारतात सन 1986 मध्ये पर्यावरण संरक्षण अधिनियम कायदा करण्यात आला. 'भारतीय संविधान भाग 4 क मध्ये नागरिकाच्या मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला आहे. यामध्ये 51 क मधील छ नुसार अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी या नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबाबत दयाबुद्धी बाळगणे. या पर्यावरण रक्षणाच्या कर्तव्याचा समावेश केला आहे.'[17] यामध्ये पर्यावरणाचे प्रदूषण नियंत्रण आणि निवारण करण्यासाठी राष्ट्रव्यापी कार्यक्रम बनवण्यात आले आहेत. अनेक महत्वाचे कायदे बनवण्यात आले आहेत. या कायद्यांच्या माध्यमातून पर्यावरणाचे संवर्धन चालू आहे.

आजच्या काळातील ही जागरूकता आपणाला निश्चितच कौतुकास्पद वाटते पण आश्चर्याची गोष्ट ही आहे की या सर्व धोक्यांना जाणून भगवान महावीरांनी हजारो वर्षांपूर्वीच व्यसनत्यागाचा उपदेश केला आहे. आ. वसुनंदिनी आपल्या ग्रंथातून श्रावकांना व्यसन त्याग करण्यासाठी पुन्हा पुन्हा प्रेरित केले आहे.

कोणताही कायदा, गुन्हा घडल्यानंतर त्यावर विचारविमर्श करून शिक्षा सुनावतो. तथापि जैन तत्त्वज्ञानाची ही विशेषता आहे की, यामध्ये कोणत्याही व्यक्तीकडून, कोणत्याही प्रकारचा गुन्हा घडूच नये यासाठी प्रारंभापासूनच काळजी घेतली गेली आहे. जैन तत्त्वज्ञान अहिंसेच्या माध्यमातून आत्मोन्नती साधते. हा आत्मकल्याणाचा मार्ग इतका सूक्ष्म आणि वैज्ञानिक आहे की, या मार्गावरून चालणाऱ्या श्रावकाचे आध्यात्मिक कल्याणाबरोबरच व्यवहारिक कल्याण आपोआपच घडत जाते. याच कारणामुळे जैन धर्म हा वैज्ञानिक आणि काल सुसंगत आहे असे ठामपणे म्हणता येते.

संदर्भ सूची:-

1. पुर्णार्घ्य पृ.273
2. वसुनन्दि श्रावकाचार प्रस्तावना पृ .19
3. वसुनन्दि श्रावकाचार व्याख्याकार आ.सुनील सागर पृ.583
4. मनुस्मृति 7.53 पृ 215
5. वसुनन्दि श्रावकाचार गा.नं.59 पृ.80
6. वसुनन्दि श्रावकाचार गा.नं.85 पृ.83
7. वसुनन्दि श्रावकाचार गा.नं.105 पृ.85
8. पद्मनंदी पंचविंशतिका श्लो.12 श्रा.सं.भा.3 पृ.427
9. मनगंगेच्या काठावरती पृ.3
10. भगवद् गीता जशी आहे तशी2.63 पृ.112

11.भगवती आराधना गा.नं.1365

12.https://tinyurl.com/44759xac

13.https://tinyurl.com/32fvhzhw

14. पउमचरियं 35.66\67पृ.280

15. पुरुषार्थसिद्ध्युपाय गा.नं.103 पृ.168

16. निसर्गायन पृ.8

17. भारताचे संविधान पृ.229

संदर्भ ग्रंथ सूची :-

1. निसर्गायन : दिलीप कुलकर्णी राजहंस प्रकाशन प्रा. लिमिटेड दहावी आवृत्ती 2012
2. पउमचरियं: विमलसुरि, संपा. डॉ. हर्मन जेकोबी, हिंदी अनु. शांतीलाल वोरा, प्राकृत ग्रंथ परिषद, वाराणसी, १९६२
3. पुरुषार्थसिद्ध्युपाय : आ.अमृतचन्द ,मंगला टीका एवं दोहानुवाद मुनि प्रणम्यसागर, संपा. डॉ.चेतन प्रकाश पाटनी, जोधपुर,अमर ग्रन्थालय,इन्दौर (म. प्र.) प्रथमावृत्ती २००९
4. पूर्णार्घ्य जैन ज्ञानकोश : संपा. पं. सुमतीबाई शहा, पूर्णार्घ्य प्रकाशन, सोलापूर,प्रथम आवृत्ती वीर निर्वाण संवत २५०४
5. भगवद् गीता जशी आहे तशी : भक्तीवेदांत स्वामी प्रभुपाद, भक्ती वेदांत बुक ट्रस्ट, 23 वी आवृत्ती २०१२
6. भगवती आराधना :आ.शिवार्य,विजयोदया टीका, संपा.वअनु.पं. कैलासचन्द्र शास्त्री, जैन संस्कृति संरक्षक संघ, (जीवराज जैनग्रंथमाला), सोलापूर, चतुर्थ आवृत्ती २००७
7. भारताचे संविधान :डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सं. प्रदीप गायकवाड,समता प्रकाशन, दीक्षाभूमी संदेश, नागपूर, 29 वी आवृत्ती 2016.
8. मनगंगेच्या काठावरती :डॉ. रमा मराठे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती २००९
9. मनुस्मृति अनु. पं. गिरिजा प्रसाद वेदी प्रकाशक मुन्शी नवलकिशोर प्रथम आवृत्ती 1917
10.वसुनंदी श्रावकाचार : आ. वसुनंदी, संपा.पं.हिरालाल जैन, भारतीय ज्ञानपीठ, काशी, प्रथम आवृत्ती १९५२
11. वसुनंदी श्रावकाचार : आ. वसुनंदी, व्याख्याकार आ. सुनीलसागरजी, संपा.भागचंद्र जैन, हिंदी ग्रंथ कार्यालय मुंबई, प्रथमावृत्ती २००६
12.श्रावकाचार संग्रह भाग 3 : संपा. व अनु. पं. हिरालालजी शास्त्री, श्री जैन संस्कृती संरक्षक संघ, सोलापूर, चतुर्थ आवृत्ती २००६

WEBLOGRAPHY

https://tinyurl.com/44759xac

https://tinyurl.com/32fvhzhw

अभिजात भाषा व साधन सूचित्व : संकल्पना, आवश्यकता, आणि आधुनिक माहिती तंत्रज्ञानाची भूमिका

प्रा. मंदा देवराव वरघट
मो.8830548044
Email:rachanawarghat790@gmail.com

Abstract

भाषा ही मानवी सभ्यतेच्या बौद्धिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक विकासाची मूलभूत आधाररचना आहे. मानवाच्या ज्ञानपरंपरेचे संवहन, दस्तऐवजीकरण आणि प्रसारण या सर्व प्रक्रिया भाषेमार्फतच साध्य होतात. विशिष्ट प्राचीनता, स्वतंत्र व्याकरणरचना, विपुल साहित्यसंपदा आणि अखंड सांस्कृतिक सातत्य या वैशिष्ट्यांमुळे काही भाषांना अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होतो. अशा भाषांमधील हस्तलिखिते, ताडपत्रे, शिलालेख, दुर्मिळ ग्रंथ आणि प्राचीन अभिलेख हे मानवजातीच्या ज्ञानाचा अमूल्य ठेवा आहेत. या ज्ञानसंपदेचे जतन, संवर्धन आणि प्रभावी वापर सुनिश्चित करण्यासाठी साधन सूचित्व (Resource Organization) ही ग्रंथालय व माहितीशास्त्रातील प्रक्रिया अत्यंत आवश्यक ठरते.

या संशोधनात्मक लेखामध्ये अभिजात भाषांची संकल्पना, त्यांचे ऐतिहासिक व शैक्षणिक महत्त्व, साधन सूचित्वाचे तत्त्वज्ञान, ग्रंथालयांची भूमिका, डिजिटायझेशन, मेटाडेटा व्यवस्थापन, OCR, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल संग्रह प्रणालींचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच विद्यमान आव्हाने, धोरणात्मक उपाययोजना आणि भविष्यातील दिशा यांचे विश्लेषण करून ज्ञानसंवर्धनासाठी एक समन्वित मॉडेल सुचविण्यात आले आहे.

Keywords: अभिजात भाषा, साधन सूचित्व, ग्रंथालयशास्त्र, डिजिटल संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती व्यवस्थापन

1. Introduction (प्रस्तावना)

मानवाच्या सामाजिक आणि बौद्धिक उत्क्रांतीमध्ये भाषेची भूमिका अनन्यसाधारण आहे. भाषा ही विचारांचे प्रकटीकरण, ज्ञानाचे संकलन आणि संस्कृतीचे संवर्धन करणारी प्रमुख प्रणाली आहे. कोणत्याही समाजाची ओळख, इतिहास आणि मूल्यव्यवस्था त्या समाजाच्या भाषेमध्ये प्रतिबिंबित होते. त्यामुळे भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाच्या सामूहिक स्मृतीची वाहक आहे.

काळाच्या ओघात अनेक भाषा नष्ट झाल्या; परंतु काही भाषा त्यांच्या समृद्ध साहित्यिक आणि सांस्कृतिक वारशामुळे आजही प्रभावीपणे अस्तित्वात आहेत. या भाषांनी मानवी विचारसरणी, तत्त्वज्ञान, विज्ञान आणि कला यांच्या विकासामध्ये मोठे योगदान दिले आहे. अशा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात येतो.

अभिजात भाषांमधील ज्ञानसंपदा प्रचंड प्रमाणात असून तिचे वैज्ञानिक व्यवस्थापन न झाल्यास ती लोप पावण्याचा धोका निर्माण होतो. म्हणूनच ग्रंथालयशास्त्रातील साधन सूचित्वाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

अभिजात भाषेची संकल्पना व स्वरूप

अभिजात भाषा म्हणजे अशी भाषा जी अत्यंत प्राचीन असून तिच्याकडे समृद्ध साहित्यपरंपरा, स्वतंत्र व्याकरण आणि ऐतिहासिक सातत्य असते. या भाषांमध्ये ज्ञानाचा मोठा साठा उपलब्ध असतो. त्या भाषा आधुनिक समाजाच्या बौद्धिक विकासावर परिणाम घडवतात.

भारतात अभिजात भाषांचा दर्जा Ministry of Culture द्वारे प्रदान केला जातो. संस्कृत, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम आणि ओडिया या भाषांना हा सन्मान मिळाला आहे. या भाषांमध्ये धार्मिक ग्रंथ, काव्यसाहित्य, शास्त्रीय

लेखन, नाटके, शिलालेख आणि ऐतिहासिक कागदपत्रे विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे त्या केवळ भाषिक साधने नसून सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहेत.

अभिजात भाषा म्हणजे अत्यंत प्राचीन, स्वतंत्र व्याकरण आणि विपुल साहित्य असलेली भाषा. भारतात पुढील भाषा अभिजात म्हणून ओळखल्या जातात:

- संस्कृत
- तमिळ
- तेलुगू
- कन्नड
- मल्याळम
- ओडिया

या भाषांमध्ये धार्मिक, तत्त्वज्ञानात्मक, साहित्यिक आणि वैज्ञानिक ग्रंथ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. त्यामुळे त्या मानवाच्या बौद्धिक इतिहासाचे महत्त्वपूर्ण स्रोत आहेत.

साधन सूचित्व : अर्थ, व्याप्ती व तत्त्वे

साधन सूचित्व म्हणजे माहितीचे नियोजनबद्ध, शास्त्रीय आणि प्रणालीबद्ध व्यवस्थापन होय. मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या साहित्याचा उपयोग करण्यासाठी त्याचे वर्गीकरण, सूचीकरण आणि अनुक्रमणिका तयार करणे आवश्यक असते. अन्यथा माहिती शोधणे कठीण होते.

ग्रंथालयशास्त्रात S. R. Ranganathan यांनी मांडलेल्या तत्त्वांनुसार प्रत्येक माहिती स्रोत योग्य वापरकर्त्यापर्यंत पोहोचला पाहिजे. अभिजात भाषांच्या संदर्भात ही संकल्पना अधिक महत्त्वाची ठरते कारण या साहित्याचा उपयोग प्रामुख्याने संशोधक आणि अभ्यासक करतात

3. Literature Review (साहित्य समीक्षा)

ग्रंथालय व माहितीशास्त्रात ज्ञानाच्या व्यवस्थापनाबाबत अनेक विद्वानांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. **S. R. Ranganathan** यांनी मांडलेल्या पाच तत्त्वांमुळे ग्रंथालय सेवा लोकाभिमुख झाल्या. त्यांच्या Colon Classification पद्धतीमुळे विषयानुसार माहिती व्यवस्थापन सुलभ झाले.

डिजिटल युगात Borgman (2000), Chowdhury (2010) आणि Smith (2016) यांनी डिजिटल लायब्ररी, माहिती जतन आणि मेटाडेटा व्यवस्थापन यावर संशोधन केले आहे. या अभ्यासांमधून स्पष्ट होते की डिजिटायझेशन आणि माहिती संघटन ही सांस्कृतिक वारसा जतनाची प्रमुख साधने आहेत.

तथापि, अभिजात भाषांच्या संदर्भात विशेष संशोधन मर्यादित प्रमाणात आढळते. त्यामुळे या क्षेत्रात अधिक शास्त्रीय अभ्यासाची आवश्यकता आहे.

4. Objectives of the Study (अभ्यासाची उद्दिष्टे)

1. अभिजात भाषांची संकल्पना स्पष्ट करणे
2. साधन सूचित्वाची तत्त्वे विशद करणे
3. ग्रंथालयांची भूमिका अभ्यासणे
4. डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग विश्लेषित करणे
5. आव्हाने व उपाय सुचविणे

5. Methodology (संशोधन पद्धती)

या लेखासाठी गुणात्मक (Qualitative) संशोधन पद्धती अवलंबली आहे.

- साहित्य समीक्षा
- ग्रंथालय प्रथांचा अभ्यास
- डिजिटल संग्रह प्रणालींचे विश्लेषण

- तुलनात्मक अभ्यास

Secondary sources जसे की पुस्तके, संशोधन लेख, सरकारी अहवाल आणि डिजिटल डेटाबेस यांचा उपयोग करण्यात आला.

6. Resource Organization: Meaning and Scope (साधन सूचित्व)

साधन सूचित्व म्हणजे माहितीचे वर्गीकरण, सूचीकरण, अनुक्रमणिका तयार करणे, मेटाडेटा व्यवस्थापन आणि डिजिटल जतन.

मुख्य प्रक्रिया:

- Classification
- Cataloguing
- Indexing
- Bibliography
- Metadata
- Archiving

या प्रक्रियांमुळे माहिती सहज शोधता येते व उपयोगिता वाढते.

7. अभिजात भाषा आणि साधन सूचित्व यांचा परस्परसंबंध

अभिजात भाषांचे साहित्य विशाल, प्राचीन आणि विविध स्वरूपाचे असल्याने त्याचे व्यवस्थापन करणे आव्हानात्मक असते. अनेक हस्तलिखिते नाजूक अवस्थेत असतात. हवामान, कीड, अज्ञान आणि दुर्लक्ष यांमुळे त्यांचे नुकसान होऊ शकते. योग्य साधन सूचित्वामुळे या साहित्याचे दीर्घकालीन संरक्षण शक्य होते.

साधन सूचित्वामुळे:

- माहितीचे सुरक्षित जतन होते
- संशोधन सुलभ होते
- वेळ आणि श्रमाची बचत होते
- दुर्मिळ साहित्य सर्वांसाठी उपलब्ध होते
- सांस्कृतिक वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचतो

8. Role of Modern Information Technology (आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका)

आज डिजिटल युगामुळे माहिती व्यवस्थापनाच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. OCR तंत्रज्ञानामुळे जुना मजकूर डिजिटल स्वरूपात रूपांतरित करता येतो. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शोध प्रणालीमुळे माहिती जलद मिळते. क्लाउड स्टोरेजमुळे मोठ्या प्रमाणात डेटा सुरक्षित ठेवता येतो. मेटाडेटा व्यवस्थापनामुळे माहितीचे सुसूत्र सादरीकरण होते.

डिजिटल लायब्ररी आणि ऑनलाइन डेटाबेसमुळे संशोधकांना जगभरातून माहिती मिळू शकते. त्यामुळे ज्ञानाचा प्रसार अधिक व्यापक झाला आहे.

- OCR तंत्रज्ञान
- कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शोध
- मशीन ट्रान्सलेशन
- क्लाउड स्टोरेज
- डिजिटल लायब्ररी

AI आधारित प्रणाली मजकूर विश्लेषण, स्वयंचलित वर्गीकरण आणि भाषांतर सुलभ करतात.

9. Educational and Research Significance (शैक्षणिक व संशोधनात्मक महत्त्व)

अभिजात भाषांचा अभ्यास केल्यास इतिहास, संस्कृती आणि समाजजीवनाची सखोल माहिती मिळते. विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जागरूकता वाढते. भाषाविज्ञान, साहित्य, पुरातत्त्वशास्त्र आणि तत्त्वज्ञान या क्षेत्रांमध्ये संशोधनासाठी नवीन दिशा उपलब्ध होतात. त्यामुळे अभिजात भाषा या ज्ञाननिर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

अभिजात भाषांच्या अभ्यासामुळे:

- सांस्कृतिक जागरूकता वाढते
- ऐतिहासिक संशोधन सुलभ होते
- भाषावैज्ञानिक अभ्यासाला चालना मिळते
- नव्या संशोधन संधी उपलब्ध होतात

10. Challenges (आव्हाने)

या क्षेत्रात अनेक अडचणी आहेत. निधीची कमतरता, तज्ज्ञ मनुष्यबळाचा अभाव, तांत्रिक मर्यादा, प्राचीन लिपींचे वाचन कठीण असणे आणि जागरूकतेचा अभाव या प्रमुख समस्या आहेत. योग्य नियोजनाशिवाय या समस्या सोडविणे कठीण आहे.

- निधीचा अभाव
- तज्ज्ञ मनुष्यबळाची कमतरता
- तांत्रिक अडचणी
- प्राचीन लिपींची गुंतागुंत
- जागरूकतेचा अभाव

11. Findings and Discussion (निष्कर्ष व चर्चा)

अभिजात भाषा या आपल्या सांस्कृतिक आणि बौद्धिक वारशाचा अमूल्य ठेवा आहेत. साधन सूचित्वामुळे या भाषांमधील ज्ञानाचे शास्त्रीय व्यवस्थापन करता येते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अभिजात भाषांचे संरक्षण अधिक सुरक्षित आणि सुलभ झाले आहे. म्हणून अभिजात भाषा व साधन सूचित्व यांचा समन्वय हा ज्ञानसंवर्धनासाठी अत्यावश्यक आहे. प्रत्येक ग्रंथालय, संशोधक आणि माहिती तज्ज्ञाने या कार्यात सक्रिय सहभाग घेणे ही काळाची गरज आहे.

12. भविष्यातील दिशा

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित स्वयंचलित वर्गीकरण, बहुभाषिक शोध प्रणाली, ओपन ॲक्सेस रिपॉझिटरी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांसारख्या उपक्रमांमुळे अभिजात भाषांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे करता येईल. या माध्यमातून ज्ञान सर्वांसाठी खुलं होईल.

13. Conclusion

अभिजात भाषा या मानवाच्या सांस्कृतिक व बौद्धिक वारशाचे अनमोल भांडार आहेत. साधन सूचित्व आणि आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने या ज्ञानसंपदेचे संरक्षण, संवर्धन आणि प्रसार अधिक प्रभावीपणे करता येतो. ग्रंथालये, संशोधक आणि माहिती तज्ज्ञ यांचे संयुक्त प्रयत्न या प्रक्रियेसाठी अत्यावश्यक आहेत.

References

Borgman, C. (2000). *From Gutenberg to the global information infrastructure*. MIT Press.

Chowdhury, G. (2010). *Introduction to modern information retrieval*. Facet Publishing.

Ranganathan, S. R. (1963). *The five laws of library science*. Asia Publishing House.

Smith, A. (2016). Digital preservation strategies for cultural heritage. *Journal of Library Science, 45*(2), 120–135.

Government of India. (Ministry of Culture). Classical Languages Policy Documents.

मध्ययुगीन मराठी भाषा व साहित्य

संशोधक विद्यार्थी
माधुरी सुरेश बागडे
मार्गदर्शक : डॉ. नीतिन दत्तात्रेय आरेकर, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती सी. एच्. एम्. महाविद्यालय, उल्हासनगर, ठाणे
संशोधन केंद्र : मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, कालिना, सांताक्रूझ (पूर्व)

कि वर्ड : मध्ययुगीन काळ आणि मराठी भाषा

प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक अशा तीन कालखंडात विस्तारलेला भाषिक इतिहास अभिजात मराठीच्या समृध्द व विशाल परंपरेची साक्ष देतो. मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयी अनेक मतमतांतरे असली तरीही संस्कृत हीच मराठीची जननी मानली जाते. सातवाहन राजवटीत महाराष्ट्री प्राकृत भाषेत मोठया प्रमाणात वाड.मय लिहिले गेले. 'अध्यात्मविद्या विद्यानाम्' हे प्राचीन काळातील साहित्याचेच नव्हे तर जीवनाचे सूत्र होते. (मराठी वाड.मयाचा इतिहास, खंड तिसरा, पृष्ठ १४) सामान्य जनतेच्या आध्यात्मिक मुक्तीसाठी लिहिण्यात आलेल्या मराठी साहित्याचे गारुड आजही मराठी जनमनावर बिंबलेले आहे. मध्ययुगीन काळातील साहित्याने मराठी भाषेवर स्वत:चा एक वेगळा ठसा उमटवलेला आहे. वैविध्यपूर्ण, छंदोबध्द व वृत्तबध्द लिखाणामुळे बाराव्या ते सतराव्या शतकातील कालखंडास मराठीच्या साहित्यिक व सांस्कृतिक इतिहासातील 'सुवर्णयुग' म्हणून देखील संबोधले जाते. संस्कृत – प्राकृत – अपभ्रंश असे भाषिक परिवर्तन याच काळात घडून आले आहे. नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त आणि समर्थ परंपरेप्रमाणेच शैव, वैष्णव, शाक्त, गाणपत्य, चैतन्य, आनंद, नागेश, वटेश्वर या सर्व संप्रदायांनी मराठी भाषेला सौंदर्यपूर्ण व रसाळ शब्दांचे भांडार खुले करून दिले.

मध्ययुगीन कालखंडात यादवकालीन राजवट, समाजातील चातुर्वण्यव्यवस्था, धार्मिक श्रद्धा, रूढी व परंपरेचे अवडंबर, बलुतेदारी पद्धती, पाटील-कुलकर्णीसारख्या स्थानिक प्रशासकांचे वर्चस्व, व शेतीसोबतच परंपरागत जातीनिष्ठ व्यवसाय असे सामाजिक, सांस्कृतिक जीवन अस्तित्वात होते. वेदान्त व आधात्म्याचे सर्व ज्ञान केवळ संस्कृत भाषेत असल्याने पंडित किंवा मोजक्या संस्कृत तज्ज्ञांशिवाय सामान्य जनता आध्यात्मज्ञानापासून वंचित होती. सर्वसामान्यांसाठी प्राकृतात ग्रंथरचना करणे ही काळाची गरज ओळखून कवी मुकुंदराज यांनी ग्रांथिक ओवी स्वरूपात 'विवेकसिंधू' या ग्रंथाची निर्मिती केली. १६९८ ओव्यांमध्ये रचलेला हा ग्रंथ म्हणजे जाणीवपूर्वक मराठी भाषेच्या पुरस्काराचा यशस्वी प्रयत्न होय. गुरुशिष्यसंवादरुपी निवेदनाच्या माध्यमातून ब्रम्हविद्येचे ज्ञान देणाऱ्या या ग्रंथाचा ठसा समकालीन व उत्तरकालीन अनेक ग्रंथांवर उमटलेला दिसतो. समर्पक उपमा, दृष्टांत , आलंकारिकता, तर्कबध्द लेखनशैली व तत्वज्ञानाची यथोचित मांडणी करून सामाजिक प्रबोधनाचा श्रीगणेशा केला. मुकुंदराज यांनी 'परमामृत' हा ग्रंथ ३२३ ओव्यांमध्ये मांडला आहे. याच काळात हेमाडपंडित व कवी बोपदेव यांनी व्याकरण, ज्योतिष व साहित्यशास्त्र या विषयांवर ग्रंथलेखन केले.

मध्ययुगीन मराठी साहित्यात महानुभाव पंथीय गद्यास खूपच महत्वाचे स्थान आहे. चक्रधर स्वामी यांच्या जीवनावर कवी म्हाईभट यांनी विविध प्रकारच्या लीळा रचल्या. "लीळाचरित्राची निर्मिती झाली नसती तर

मध्ययुगीन साहित्यात मोठीच पोकळी निर्माण झाली असती." (डॉ. यु. म. पठाण : मध्ययुगीन मराठी साहित्य आणि काही मानदंड , पृष्ठ १०) सिद्धांतसूत्रपाठ, दृष्टांतपाठ, रत्नमालास्तोत्र, स्मृतीस्थळ इत्यादी गद्य ग्रंथांच्या निर्मितीने मराठी गद्य साहित्याची सुरवात झाली. केसिराज बास यांनी चक्रधर स्वामींचे वर्णन असणारा 'मूर्तीप्रकाश' हा ग्रंथ ३०५१ ओव्यांमध्ये रचला. आद्य मराठी कवयित्री महदंबा हिने लग्नप्रसंगी गायले जाणारा 'धवळे' नामक काव्यप्रकार मराठीत रूढ केला. महदंबेचे 'धवळे' व 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' ही मराठीतच नव्हे तर पूर्ण भारतीय भाषांतील श्रीकृष्ण चरित्रातील पहिली रचना मानली जाते. ओवी व आरती स्वरूपात महदंबेने केलेल्या लिखाणाला महानुभाव संप्रदायात खूपच महत्वपूर्ण स्थान आहे. संस्कृत महाकाव्यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून श्रीकृष्णावर ओवीबध्द रुपात रचलेल्या 'सातीग्रंथाना' महानुभाव पंथीय साहित्यात विशेष महत्व आहे. भाषेची प्रासादिकता, सौंदर्यपूर्ण वर्णन, सकळ व सुंदर लिपीचा वापर आणि मराठी ललित गद्याची मुहूर्तमेढ महानुभाव पंथियांनी केल्याचे आढळून येते.

तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झालेल्या वारकरी संप्रदायाचे गारुड आजही प्रत्येक मराठी माणसावर टिकून आहे. पंढरपूर येथील विठ्ठलास देवस्थानी ठेवून निर्माण झालेल्या वारकरी संप्रदायाने मराठी भाषेला दिलेले शब्दांचे धन मौलिक आहे. अभिजात भाषेचा दर्जा मराठीस प्राप्त होण्यासाठी संतसाहित्याने दिलेले योगदान आमुलाग्र आहे. 'महाराष्ट्राची कवचकुंडले' असा देखील उल्लेख संतसाहित्याचा केला जातो. प्रासादिक रचना, रसाळ शब्दांचे भांडार, सर्वसामान्यांना सहज समजेल असे तत्वज्ञान, शब्दांची नादानुकुल व लयबध्द मांडणी, भक्तीरसातील भावपूर्ण लेखन, चपखल उपमा, दृष्टांत व सुयोग्य अलंकारांचा वापर इत्यादी गुणवैशिष्टयांनी युक्त असलेले संतसाहित्य आज एकविसाव्या शतकातही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गायले जाते. अनेक शतके उलटूनही यत्किंचितही महत्व कमी न झालेल्या संतकवी परंपरेत संत ज्ञानेश्वरानी लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरीस' मोलाचे स्थान आहे. हिंदू धर्मग्रंथ भगवद्गीतेतील ७०० श्लोकांवर ९०००ओव्यांमध्ये प्राकृत भाषेत इसवी सन १२९० मध्ये ज्ञानेश्वरी या ग्रंथामध्ये भाष्य केलेले आहे. शांत, भक्ती व वत्सल रसातील ज्ञानेश्वरी या देशीकार लेण्याचे महत्त्व संत वांग्मय परंपरेत अगाध आहे. तत्त्वज्ञानाचे निरूपण करताना आपोआपच खुलणाऱ्या काव्यामुळे ज्ञानेश्वरीत सौंदर्यपूर्ण भाषेची परमोच्च पातळी गाठली गेली आहे. ज्ञानेश्वर लिखित 'अमृतानुभव' (५ श्लोक, ८०४ओव्या), चांगदेव पासष्टी, बालक्रिडेचे, हरीपाठाचे अभंग इत्यादी साहित्य प्रकारांमधून संत ज्ञानेश्वरांनी 'साहित्य सोनियाचिया खाणी' उघडलेल्या आहेत. भागवत धर्माचे पहिले प्रसारक संत नामदेव यांनी अभंग स्वरूपात केलेले लिखाण आजही प्रबोधनपर मानले जाते. काव्याच्या माध्यमातून पहिले चरित्र संत नामदेवांनी लिहिले आहे. महाराष्ट्रातील चिघळत जाणाऱ्या राजकीय परिस्थितीत सामान्य लोकांचे भावनिक बळ टिकवून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संत नामदेवांनी कीर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून केले. मराठी सोबतच हिंदी भाषेतही नामदेवांना अग्रक्रमाचे स्थान आहे. शिखांच्या 'गुरुबानी' मध्ये नामदेवांची पदे आढळतात. संत ज्ञानेश्वर व नामदेवांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीला प्रारंभ केला व पुढे संत मेळयातील अनेक महत्त्वपूर्ण संत कवींनी ही ध्वजपताका नेटाने फडकवत ठेवली. संत गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा, कर्ममेळा, सेना महाराज इत्यादी कवींसोबतच मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई या संत कवयित्रींनी तत्त्वज्ञानपर काव्यरूपी लेखनातून मोलाचे साहित्यिक योगदान दिले आहे.

संत नामदेव ते संत एकनाथ यांच्या कालखंडात १८३ वर्षांचे अंतर आहे. या कालखंडात वांग्मय लेखन खूपच अल्प प्रमाणात झाल्याचे आढळून येते. महानुभाव, वारकरी व दत्त संप्रदायातील काही कवींनी या काळात केलेले लिखाण मात्र अजरामर ठरले आहे. चोंभा कवीचे 'उखाहरण' (२३११ ओव्या) हा संस्कृतातील गद्य प्रणयकथा लोकजीवन व लोकभाषेच्या माध्यमातून सांगणारा पहिला जानपद ओवींचा काव्यग्रंथ मानला जातो. बहिरा जातवेद यांनी 'भैरवी टीका'(२५७५१ ओव्या) हा ग्रंथ लिहून भक्तीची परंपरा निरंतर सुरू ठेवली. अभंगाच्या माध्यमातून संत कवयित्री कान्होपात्राने वारकरी संप्रदायाची ध्वजपताका फडकविण्याचे कार्य केले. या कालखंडात दत्त संप्रदायाने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली. सरस्वती गंगाधर यांचे शुद्ध मराठीत असलेले 'गुरुचरित्र' आजही पाचवा वेद

म्हणून प्रमाण मानले जाते. कवी दासोपंत यांनी केलेले विपुल लेखन निश्चितच वाखाणण्याजोगे आहे. ब्रह्मगुणदास, गुणकीर्ती, रामचंद्र फाग इत्यादी जैन धर्मीय कवींनी देखील चौदाव्या शतकानंतर ओवी, अभंग, गीते, फाग, पाळणा, चरित्र इत्यादी स्वरूपात मराठीत लेखन केलेले आहे.

बहामनी कालखंडात संत एकनाथांनी केलेले वांग्मयीन कार्य अद्वितीय आहे. अभंग, भारुड, पदे, गौळणी इत्यादी माध्यमातून त्यांनी जनजागृती केली. चतुःश्लोकी भागवत, एकनाथी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, भावार्थरामायण अशा पाऊन लाख कविता एकनाथांनी रचल्या आहेत. तत्कालीन सांस्कृतिक व सामाजिक चित्र अतिशय भयानक व विदारक स्वरूपाचे होते. अशा कठीण प्रसंगात खंबीरपणे उभे राहून भागवत धर्माचा भरभक्कम खांब त्यांनी रोवला. संत ज्ञानेश्वरानंतर महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनाला योग्य दिशा व गती देण्याचे मोलाचे कार्य एकनाथांनी पूर्ण केले. एकनाथ, दासोपंत, रामा जनार्दन, जनि जनार्दन, विठा रेणुकानंदन या एकनाथ पंचकाने विपुल प्रमाणात पद्य स्वरूपात ग्रंथ निर्मिती केली. बहामनी कालखंडात शांतलिंग स्वामी, मन्मथस्वामी, बसवलिंग इत्यादी वीरशैव संप्रदायाच्या संत कवींनी ग्रंथलेखन करून खंडित परंपरा पुन्हा प्रवाहित केली. ख्रिस्त धर्मीय कवींनी याच काळात मराठी लेखनास सुरुवात केली. फादर स्टीफन्स या कवीने दहा हजाराहून अधिक ओव्या असलेला ख्रिस्त पुराण हा ग्रंथ रचला. मुस्लिम मराठी संत कवींच्या रचना देखील या काळात उदयास आल्या. शेख महमंद, हुसेन अंबरखान यांनी वारकरी संप्रदायाशी एकरूप होऊन वांग्मयनिर्मिती केली.

'संत ज्ञानेश्वरांनी रचलेल्या भागवत संप्रदायाच्या इमारतीचा कळस म्हणजे संत तुकाराम' असे गौरवाने म्हटले जाते. संसार आणि परमार्थ या दोहोमध्ये तावूनसुलाखून निघालेले प्रतिभासंपन्न संत कवी तुकारामांना जगद्गुरु का संबोधले जाते याची प्रचिती आपणास त्यांची रसाळ ग्रंथसंपदा वाचून येते. केवळ वारकरीच नव्हे तर समाजातील सर्व रंजल्या गाजल्या जनतेला नैतिकतेची शिकवण देणाऱ्या व भक्तीच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणाऱ्या तुकारामांनी शब्दची आमुच्या जीवाचे जीवन | शब्दे वाटू धन जनलोका | |अशाप्रकारे जीवन व्यतीत केले. तुकारामांच्या ग्रंथसंपदेतील प्रत्येक अभंगातून मानवी जगण्याचे मर्म उलगडते. तुकारामांच्या शिष्या बहिणाबाई यांनी त्यांच्या ५२ अभंगांमधून आत्मचरित्र मांडलेले आहे. यामुळे पहिल्या स्त्री आत्मचरित्रकाराचा मान मध्ययुगीन कालखंडाकडे जातो. अभंगाच्या माध्यमातून प्रबोधन व भक्ती प्रसाराचे अलौकिक कार्य बहिणाबाईंनी केले. संतपरंपरेतील समर्थ संप्रदायाने जनमानसात प्रयत्नवादाची रुजवात करून प्रपंच विज्ञान सांगितले. भुजंगप्रयात अक्षर गणवृत्तातील मनाचे श्लोक,मालिनी वृत्तातील करुणाष्टके, प्रमाणिका छंदातील लघुरामायण, भुजंगप्रयात वृत्तातील दीर्घरामायण, ओवी स्वरूपातील दासबोध, आरती लेखन इत्यादी विपुल ग्रंथसंपदा मराठी साहित्याला रामदासी परंपरेने दिली. संत काव्याने मराठी भाषेला दिलेले हे अमाप शब्दांचे भांडार काळाच्या कसोटीवर चिरंतन ठरले आहे.

संत काव्यानंतर उदयास आलेल्या पंडिती काव्याने मराठी वाड.मय निर्मितीची परंपरा पुढे सुरु ठेवली. कथाकाव्य, आख्यानकाव्य, कुटकाव्य, चंपूकाव्य, स्वयंवर काव्य या प्रकारातील पंडिती काव्य मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झालेरामायण ., महाभारतातील व भागवतातील कथा रसाळपणे रंगवून सांगण्याचे कार्य या काव्याने केले. पंडिती काव्य परंपरेत कवी मुक्तेश्वर यांचे संचित रामायण, १४ हजार ओवी संख्या असलेली महाभारताची पाच पर्वे, गजेंद्र मोक्ष, हरिश्चंद्राख्यान व शुकरंभासंवाद हे महत्वाचे ग्रंथ निर्माण झाले संत एकनाथांचा नातू कवी मुक्तेश्वर यांना .'पंडिती काव्याचा मुकुटमणी' असे संबोधले जाते . 'भगवद्गीता', 'मूर्ख लक्षणे', 'गजेंद्र मोक्', 'विश्वामित्र भोजन', 'एकनाथ चरित्र' इत्यादी ग्रंथ, आरत्या, भुपाळ्या अशी विपुल प्रमाणात ग्रंथरचना त्यांनी केली आहेविविध अलं .कारांचा उत्कृष्ट वापर, प्रासादिक व ओजस्वी लेखनशैली, प्रसंगांचे सूक्ष्मपणे चित्रण व परिणामकारक अर्थबोध असणारी रचना हे त्यांच्या

काव्याचे वैशिष्ट्य आढळून येते कवी दासोपंत यांनी .'गीतार्णव', 'गीतार्थ बोधचंद्रिका' हे टीका ग्रंथ लिहिले .'पंचीकरण', 'ग्रंथराज' हे ग्रंथही त्यांचे प्रसिद्ध आहेत.

सतराव्या शतकात वामन पंडितांपासून पंडिती काव्याचा स्वतंत्र प्रवाह निर्माण झालाकवी वामन . पंडितांची श्लोक रचना इतकी प्रसिद्ध झाली की .पंडित हे पंडितकाव्य परंपरेतील अतिशय महत्त्वाचे कवी ठरले, ओवी ज्ञानेशाची | अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची || सुश्लोक वामनाचा | तशीच आर्या मयूर पंतांची || असे गौरवाने म्हटले जाते . बावीस हजाराहून अधिक ओवी संख्या असलेली 'यथार्थदिपिका' ही गीतेवरील टीका व 'निगमसागर' नावाचा वेदांवरील ग्रंथ त्यांनी लिहिलेला आहेरसाळ लेखणीमुळे त्यांच् .या आख्यान कविता खूपच प्रसिद्ध झाल्याकवितेपेक्षा . सामराज पांडित्याचे अधिक वर्णन करणारे कवी, कवी विठ्ठल यांनी देखील या परंपरेत भर घातली कवी सामराजाने . 'मृदगलाख्यान' व 'रुक्मिणी हरण' हे महाकाव्य रचून पंडित काव्य परंपरा सुरू ठेवली कवी रघुनाथ पंडित हे पंडिती . परंपरेतील एक महत्त्वपूर्ण कवी होय .'रामदास वर्णन', 'गजेंद्र मोक्ष', 'दमयंती स्वयंवर' ही त्यांची ग्रंथरचना खूपच प्रसिद्ध झालीशिखरिणी ., मालिनी, वसंततिलका व शार्दुल विक्रीडीत या वृत्तांमधील प्रासादिक काव्य असलेले 'दमयंती स्वयंवर' हे आख्यान पंडिती संप्रदायातील महत्त्वाचा टप्पा ठरला.

'हरिविजय', 'रामविजय, 'पांडव प्रताप', 'शिवलीलामृत' नावाचे भक्तीमय ग्रंथ लिहून मराठी काव्यात मोलाची कामगिरी करणारे कवी श्रीधर हे कीर्तनकार देखील होतेरामायण व महाभारतातील कथांचे निवेदन कवी . श्रीधर यांनी सहज सुलभतेने केलेले आहे .'पंढरी माहात्म्य', 'ज्ञानेश्वर चरित्र', 'मल्हारी विजय' हे ग्रंथ देखील त्यांनी लिहिलेले आहेतश्रीधरांच्या स्फुट व दीर्घरचना लोकप्रिय ठरल्या आहेत .. पंडिती काव्यपरंपरेतील शेवटचे व अतिशय महत्त्वपूर्ण कवी मोरोपंत 'केकावली' या अप्रतिम काव्यासाठी विशेष प्रसिद्ध आहेतविपुल ग्रंथसंपदा ., रचनेतील विविधता, वृत्तांचे अनेक प्रयोग व प्रभावी भाषाशैली हे मोरोपंतांचे वैशिष्ट्य नोंदवता येईलमोरोपंतांच्या विपुल . आर्या या मात्रा वृत्ताचा कुशलतेने वापर त्यांनी .ग्रंथांचे चार खंडात विभाजन करण्यात येतेकेलामोरोपंत हे संस्कृतचे . परंपरेत मानाचे स्थान पटकावलेवर्षे अव्याहत काव्यलेखन करून त्यांनी पंडिती काव्य ४१ .गाढे पंडित होते. पंडिती काव्य परंपरेतील सर्व कवी समाजातील उच्चभ्रू वर्गातून आलेले होतेसंस्कृत साहित्यशास्त्राच्या व्यासंगातून ., अभ्यासातून त्यांनी काव्य लेखनाची प्रेरणा घेतली.पंडित काव्यपरंपरेने मराठी साहित्याला दिलेले योगदान मोलाचे आहे .

तंतुवाद्याच्या आधारे सादर केलेल्या काव्याला 'तंतकाव्य' किंवा 'शाहिरी काव्य' या नावाने ओळखले जातेशाहिरी काव्यपरंपरेने मराठी साहित्याला योग्य दि .शा मिळालीसंत काव्य व पंडिती काव्यापेक्षा शाहिरी काव्य . वीर रसातील पोवाडे .अनेकार्थाने भिन्न असल्याचे निदर्शनास येते, शृंगार प्रधान व अध्यात्मिक लावण्या यामध्ये समाविष्ट होतातभक्ती ., कर्मकांड, पुराण कथा, कीर्तने इत्यादींना छेद देत सामान्य व्यक्तींवर असलेली कवने शाहिरी परंपरेची वैशिष्ट्ये आहेत .'मराठी कवितेची प्रभात' असे या काव्याला श्री कोल्हटकर यांनी म्हटलेले आहेमानवी . सुखदुःख, भावना या परंपरेत प्रकट होऊ लागल्या मराठमोळे शब्द व्यक्त होऊ लागल्याने मराठी .नवकाव्याची बीजे शाहिरी काव्य परंपरेत आढळून येतात.

उर्दू फारसी भाषेतील 'शायर' म्हणजे कवी या शब्दापासून 'शाहीर' शब्द तयार झाला आहेवाडा व पो . .लावणी मिळून शाहिरी वाङ्मयप्रकार आस्तित्वात आलेला आहे'संतकाव्य महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचे प्रतिबिंब असले तरी शाहिरी काव्य महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आहे'. 'शाहिरी काव्य म्हणजे मराठ्यांची खरी गाणी' असे मत मसादरीकरण हे .त यांनी मांडलेले आहेअदवं .ना . शाहिरी काव्याचे मूळ समजले जातेपोवाडा व लावणी हे दोन्ही आविष्कार जनमानसां .पर्यंत पोहोचवण्याचे काम ढोलकी, तुणतुणे, बाजाची पेटी, मंजिरी या वाद्यांच्या साथीने केले गेले.विष्कार आहेतश्रोत्यांना अथवा रसिकांना स्फुरण यावे अशा प्रकारे हे आ .

प्राचीन मराठी साहित्यात 'बखर' हा गद्यात्मक वाङ्मयप्रकार उदयास आलेला असला तरीही बखरलेखनाची परंपरा मात्र शिवकालात प्रवाही होऊन पेशवाईच्या अखेरच्या काळानंतर खंडित झाल्याचे निदर्शनास येते. १४४८ मधील 'महाकावतीच्या बखरीनंतर' १५६६ ची 'तालिकोटची बखर' व १६९७ मधील सभासदाची बखर

आढळते. शूरवीरांची चरित्रे, वंशावळ, युद्धवर्णने, कैफियत, आत्मवृत्त इत्यादींचा समावेश बखर या प्रकारात करण्यात येतो. चरित्रात्मक, युद्ध कथात्मक, स्फुट कथात्मक व दौलतीच्या कथात्मक बखरी असे स्थूलमानाने बखरींचे वर्गीकरण करण्यात येते. इतिहास संशोधनाच्या दृष्टीने बखर या प्रकारास विशेष महत्व आहे. शिवपूर्वकालापेक्षा शिवकाळात सर्वाधिक बखरींचे लेखन झाले असून त्यातील बहुतांश बखरी शिवचरित्रवर्णनपर आहेत. केवळ 'सभासदाची बखर' शिवरायांच्या समकालीन आहे. मराठी गद्यलेखन परंपरेत बखर या साहित्यप्रकाराने मोलाची कामगिरी बजावली आहे. राक्षसतागडीची बखर, शालिवाहनाची बखर, सभासदाची बखर, शिवदिग्विजय, पेशवेकालीन बखरी, पानीपतकालीन बखर या सर्वाना ऐतिहासिकदृष्ट्या विशेष महत्व प्राप्त झाले आहे. ओघवती निवेदनशैली, अलंकारिक शब्दांचा वापर, उत्कृष्ट कल्पकता व भाषाप्रभुत्वामुळे बखर हा गद्यप्रकार मध्ययुगीन काळात विशेष महत्वाचा ठरतो.

बखरीसोबतच आज्ञापत्र व मराठेशाहीतील पत्रवाङ्मय अभिजात मराठी भाषावैभवाचे आविष्कार आहेत. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वैभवाची साक्ष यातून मिळते. संस्कृत सुभाषिते, मराठी म्हणी, वाक्प्रचार, सौंदर्यपूर्ण आशययोजना या वैशिष्ट्यांमुळे मध्ययुगीन साहित्यावर पत्रांची विशेष छाप पडते.

तंजावरचे मराठी साहित्य, जलमराठी जैन साहित्य, वीरशैव संप्रदायाचे साहित्य व मुस्लिम संतसाहित्याने देखील मध्ययुगीन कालखंडावर स्वत:ची मोहोर उमटवलेली आहे. कालखंडानुसार, तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीनुसार मराठी साहित्यात आंतरबाह्य अनेक प्रकारची स्थित्यंतरे झाल्याचे निदर्शनास येते. मध्ययुगीन काळातील संत, पंत व तंतकवींचे लिखाण अजरामर ठरले असल्याने 'मराठी भाषेच्या इतिहासात मध्ययुगीन काळाचे योगदान भरीव आहे' असे ठामपणे मांडता येते.

निष्कर्ष:

- मध्ययुगीन कालखंडात विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती झाली आहे.
- मध्ययुगीन कालखंडाने मराठी साहित्याला दिलेले योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे.
- प्रस्तुत काळात पद्य रुपात साहित्यनिर्मितीकडे कल असल्याचे निदर्शनास येते.
- लेखन करताना ओवी, अभंग, पदे , विराणी, गवळण, भारुड , पोवाडा, लावणी इत्यादी काव्यप्रकारांचा वापर केल्याचे निदर्शनास येते.
- भक्तीच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन या एकमेव उद्देशाने संत, पंत व तंतकवींनी कार्य केले आहे.
- सदर काळातील बहुतांश लेखन मौखिक परंपरेने पुढे आले आहे.
- मानवी जीवनातील तत्वज्ञान, संसारी माणसाचे नैतिक वर्तन, महाकाव्यातील विषय, आख्याने व देवादिकांवर काव्य करण्याची या काळात पद्धत असल्याचे लक्षाट येते.
- ग्रंथ लेखनाच्या माध्यमातून मराठी भाषा समृध्द व वैभवशाली करण्यात मध्ययुगीन काळाने महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.
- तत्कालीन सामाजिक, राजकीय वेबंदशाहीच्या काळातील सामान्य माणसाला धार्मिकतेच्या आधारे सन्मार्गावर आणण्याचे यशस्वी प्रयत्न संतकवींनी केल्याचे आढळून येते.
- समाजात समता, नैतिकता व सांस्कृतिक एकात्मता निर्माण करण्यास मध्ययुगीन साहित्याने हातभार लावला.
- शिवकालातील पराक्रम व युध्दाचे वर्णन बखरीच्या माध्यमातून करून इतिहास जिवंत ठेवण्याचे मोलाचे कार्य बखरकारांनी केले आहे.
- आध्यात्मज्ञानासाठी करण्यात आलेले मध्ययुगीन काळातील लेखन आजच्या काळातही प्रमाण मानले जाते. ही ठळक बाब अधोरेखित करण्यासारखी आहे.

संदर्भ साधने:

1) डहाके वसंत आबाजी, २००५, पहिली आवृत्ती, मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
2) जोग रा.श्री. १९७३, मराठी वाड.मयाचा इतिहास, खंड तिसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
3) नसिराबादकर ल. रा. २०२३ प्रथम आवृत्ती, मध्ययुगीन मराठी वाड.मयाचा इतिहास, भाषा विकास संशोधन संस्था, कोल्हापूर
4) पटवर्धन माधव त्रिम्बक, १९३७ : छंदोरचना, कर्नाटक पब्लिशिंग हाउस
5) पटवर्धन माधव त्रिम्बक, १९३८ : पद्यप्रकाश, कर्नाटक पब्लिशिंग हाउस
6) प्रदक्षिणा खंड प :हिला (आवृत्ती तेरावी) २०१९, कॉन्टिनेन्टल प्रकाशन

संतसाहित्य : मराठी भाषेच्या अभिजाततेचा मूलाधार

डॉ. विजया प्रशांत पवार
आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज कडेपूर
मो. नं. – ९३७०७०१४६०

प्रस्तावना

मराठी भाषेला हजारो वर्षाची समृद्ध परंपरा लाभली आहे. भाषेच्या प्राचीनत्वामुळे आणि त्यातील साहित्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेची ओळख प्राप्त झाली. मराठी भाषेत नैतिक जीवनमूल्यांची शिकवण देण्याबरोबरच भाषेला वैचारिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक उंची प्राप्त करून देण्यामध्ये संतसाहित्याचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. संतांनी सामान्य माणसाच्या भाषेतून उच्च तत्त्वज्ञान मांडून भाषेच्या अभिव्यक्तीक्षमतेचा नवा स्तर निर्माण केला. त्यामुळे मराठी भाषा केवळ संवादाचे माध्यम न राहता मराठी संस्कृतीचा एक महत्वाचा दस्तावेज बनला आहे.

मध्ययुगीन काळात संतांनी लोकभाषेतून सामाजिक समता, मानवी मूल्ये, नीतिमूल्ये, अध्यात्म, वेदांत यांची प्रभावीपणे मांडणी केली. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आदी संतांनी निर्माण केलेल्या वाङ्.मयामुळे मराठी भाषा केवळ व्यवहाराची भाषा न राहता चिंतनशील, तत्त्वज्ञानात्मक आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीची भाषा बनली. प्रस्तुत संशोधन लेखात अभिजात भाषेची संकल्पना, संतसाहित्याची मौलिकता आणि मराठी भाषेच्या अभिजाततेवर झालेला त्याचा प्रभाव यांचा अभ्यास करण्यात आला आहे. मध्ययुगीन काळात संतांनी लोकभाषेतून जे साहित्य निर्माण केले, त्यामुळे संतसाहित्य हे मराठी भाषेच्या अभिजाततेचे मूलाधार कसे ठरते, हे स्पष्ट करणे हा या लेखाचा मुख्य उद्देश आहे.

अभिजात मराठी भाषा : संकल्पना आणि निकष

मराठी भाषेच्या अभिजाततेचा विचार करताना भाषेची प्राचीनता, संस्कृती, समृद्ध साहित्यपरंपरा, भाषिक क्षमता, भाषेचे व्याकरण, तत्त्वज्ञान व्यक्त करण्याचे सामर्थ्य आणि ज्ञानपरंपरा लक्षात घेता मराठी भाषेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. मराठी भाषेत तत्त्वज्ञान व चिंतन व्यक्त करण्याची क्षमता आहे. त्यामुळे मराठी भाषा ही केवळ व्यवहाराची भाषा नसून तत्त्वज्ञान व्यक्त करण्यास समर्थ भाषा आहे, हे सिद्ध झाले. या भाषेत एक प्रकारची भाषिक शिस्त व सौंदर्य आहे. मराठी भाषेत समृद्ध ग्रंथसंपदा आहे. या सर्व निकषांवरच मराठी भाषा अभिजात ठरली आणि या अभिजाततेचा मुख्य आधार संतसाहित्य आहे, हे लक्षात येते.

संतांचे साहित्यिक योगदान :

प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्याचा विचार करताना त्यामध्ये संतसाहित्य हे मध्यवर्ती आणि महत्वपूर्ण आहे. संत साहित्य हा मराठी भाषेचा आणि मराठी संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. त्या काळातील समाज जातिभेद, कर्मकांड व सामाजिक विषमतेने ग्रस्त होता. संतांनी या अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवून ईश्वरभक्तीबरोबरच समतेचा संदेश दिला. त्यांनी संस्कृत किंवा उच्चभ्रू भाषेऐवजी मराठी लोकभाषेचा स्वीकार केला. त्यामुळे संतसाहित्याने मराठी भाषेला व्यापक सामाजिक स्वीकार्हता आणि साहित्यिक प्रतिष्ठा मिळवून दिली. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, समर्थ रामदास, चोखामेळा, मुक्ताबाई, बहिणाबाई, सावता माळी अशा अनेक संतांनी आपल्या अभंग, ओव्या आणि आपली ग्रंथसंपदा यांच्या माध्यमातून मराठी साहित्यात मोलाची भर घातलीच आहे, पण त्याबरोबर आपल्या साहित्यातील वैश्विक मूल्यांमुळे मराठी भाषेलाही समृद्धता प्राप्त करून दिली आहे. साध्या, सरळ

व्यावहारिक भाषेतून त्यांनी मराठीला ज्ञानभाषा बनविले. वारकरी पंथाच्या माध्यमातून त्यांनी समता, बंधुता, सदाचार, अनिष्ठ प्रथा आणि विषमता यांविषयी भाष्य करीत मराठी साहित्यात मोलाची भर घातली.

संत साहित्याचे अभ्यासक रामचंद्र देखणे म्हणतात, "सामाजिक विषमतेने व्यथित झालेल्या करुण्याचा पहिला उद्गार संत ज्ञानदेवांच्या रूपात प्रकटला. नाथांच्या रूपांत त्याचा प्रतिध्वनि उमटला. तुकोबारायांच्या रूपात सामाजिक विकृतींना फटका देत मानवी मनात आणि समाजजीवनात आत्मविश्वास आकाराला. संतांची वाङ्मयरचना ही मराठी सारस्वतचे एक अनमोल लोकधन आहे." संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी (भावार्थदीपिका), अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठ. संत नामदेवांची गाथा, कीर्तनाद्वारे अभंगरचना, संत एकनाथांचे एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, भारुडे, अभंग, संत तुकारामांची गाथा, समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक, दासबोध, संत जनाबाई यांचे अभंग, मुक्ताबाईंचे ताटीचे अभंग या आणि आशा सर्व संत साहित्याने मराठी भाषेची ऊंची वाढविली आहे. संतांच्या ओव्या आणि अभंग हे मराठी भाषेचे पहिले अभिजात साहित्य मानले जाते. संत साहित्यातून भावसंपन्नता, आध्यात्मिकता आणि सामाजिक परिवर्तनाची तत्त्वे प्रकट झाली. पुढे शाहिरी काव्य, बखर आणि नाट्यसाहित्याच्या माध्यमातून मराठी भाषेचा प्रवास अधिक विस्तृत झाला.

संतांची मराठी भाषेची अभिव्यक्ती -

संतांची मराठी भाषेची अभिव्यक्ती मोठी आहे. मराठी भाषेच्या विकासमध्ये संतांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे असे म्हणता येईल. "माझा मराठाचि बोलु कौतुकें| परि अमृतातेहि पैजा जिंके|" असे म्हणून मराठी भाषेविषयी गौरवोद्धार काढणारे ज्ञानेश्वर; "संस्कृत वाणी देवे केली| प्राकृत काय चोरांपासोनि झाली?" असा प्रश्न करणारे संत एकनाथ; "बुडती हे जन न देखवे डोळा| म्हणवून कळवळा येत असे||" असे म्हणणारे तुकाराम; कळवळयापोटी समाजाला उद्धाराचा मार्ग दाखवून जीवनाच्या वाटा उजळाचा प्रयत्न करणारे संत हे मराठीचे मोठे वैभव आहे. संतांनी मराठी भाषेचा वापर करून वेदांत, आत्मज्ञान, भक्ती आणि सामाजिक तत्त्वज्ञान यांसारखे गहन विषय मांडले. यामुळे मराठी भाषा ही केवळ व्यवहारापुरती मर्यादित नसून तत्त्वज्ञान व्यक्त करण्यास समर्थ भाषा आहे, हे सिद्ध झाले. संतवाड्.मयामुळे मराठी भाषेची शब्दसंपदा समृद्ध झाली आणि तिच्या अभिव्यक्तीच्या शक्यता वाढल्या. ज्ञानेश्वरीमुळे तर मराठी भाषेला शास्त्रीय व तत्त्वज्ञानात्मक अभिव्यक्तीची पात्रता प्राप्त झाली.

लोकभाषेतून अभिजातता हे संतसाहित्याचे एक वैशिष्ट्य म्हणता येईल. संतांनी आपल्या साहित्यात बोलीभाषेचाच वापर केला आहे. सर्वसामान्य लोकांना समजेल अशी साधी, सरळ आणि लोकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित भाषा वापरली. मराठी काव्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अल्पाक्षरत्व आणि विपुल अर्थ होय. संतांच्या काव्यातही हा साधेपणा दिसतो. त्याचबरोबर अर्थाची गहनता दडलेली आहे. ओवी, अभंग, भारुड यांसारख्या काव्यप्रकारांतून संतांनी अभिजात विचार मांडले. यामुळे लोकभाषेतूनही अभिजात साहित्यनिर्मिती शक्य आहे, हे स्पष्ट झाले.

संत साहित्यात एक प्रकारचे भाषिक सौंदर्य व शिस्त असलेली दिसते. संतसाहित्यामध्ये असलेल्या ओवी, अभंगा सारखे छंद मुळात साहित्याचे अत्यंत प्रभावी माध्यम आहेत. त्यात त्यांचे भाषिक सौंदर्य अप्रतिम आहे. भाषा ही रूपक, उपमा, प्रतीकांचा वापर, लयबद्धता व सहजता यांचा अंतर्भाव संतसाहित्यात असल्यामुळे त्यांची मराठी भाषा अधिक सकस व परिणामकारक झाली आहे. सर्वच संतांनी भाषेची शिस्त आणि सौंदर्य टिकवून ठेवत सहज व प्रभावी अभिव्यक्ती साधली. यामुळे मराठी भाषेला काव्यात्मक आणि सौंदर्यपूर्ण अधिष्ठान मिळाले. यामुळे लोकभाषेतूनही अभिजात साहित्य निर्माण होऊ शकते, हे स्पष्ट झाले. संतसाहित्यामुळे मराठी भाषेची लेखनपरंपरा अखंड राहिली. या परंपरेतून पुढील काळातील साहित्यप्रवाह जसे की आधुनिक काव्य, कथा, कादंबरी विकसित झाले. त्यामुळे संतसाहित्य हे आधुनिक मराठी साहित्याचेही मूलभूत अधिष्ठान ठरते.

संतांचे भाषिक योगदान

संतांनी मराठी भाषेचा वापर करून वेदांत, भक्ती, आत्मज्ञान, सामाजिक तत्त्वज्ञान समाजासमोर मांडले. संतांनी आपल्या साहित्यातून भाषेचा दर्जा उंच करून मराठी भाषेचे भाषिक संवर्धन ही केले आहे. मराठी भाषा संस्कृत पेक्षा कमी नाही हेही त्यांनी सिद्ध केले. त्यांनी लोकांच्या भाषेत साहित्यनिर्मिती करून भाषेला लोकसंस्कृतीचे वाहक बनविले. या संतांची मराठी भाषेच्या समृद्धतेसाठी आपल्या साहित्यातून महत्वपूर्ण योगदान दिले.

संत ज्ञानेश्वर

वारकरी संप्रदायाचा पाया घालणाऱ्या ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' द्वारे गीतेचे मराठी रूपांतर केले. सर्वसामान्यांसाठी संस्कृत मधील तत्त्वज्ञान मराठीत आणले.ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचा गौरव अतिशय प्रभावी पणे केला आहे. ते म्हणतात, "माझा मराठाचि बोलु कौतुकें| परि अमृतातेहि पैजा जिंके||" म्हणजेच माझी मराठी भाषा अमृतापेक्षाही गोड आहेम, आणि ती अमृताशी पैज जिंकू शकते इतके सामर्थ्य मराठीचे आहे. हे सांगताना ते मराठी भाषेविषयीचा अभिमान व्यक्त करतात. भगवद्गीतेवर मराठीत लिहिलेली ही जगातील सर्वात श्रेष्ठ टीका मानली जाते. अमृतानुभव मधून त्यांनी तत्त्वज्ञान मांडले. चांगदेव पासष्टी व हरिपाठामधील संदेश आजही तितकाच महत्वपूर्ण आहे. त्यांचे 'पसायदान' हे तर जागतिक शांतता आणि बंधुभावाचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

संत नामदेव –

संत नामदेव म्हणजे नामविद्येचे आद्य प्रणेते असलेले महाराष्ट्रातील एक थोर संत कवी .संत नामदेव म्हणजे नाममहिमा व्यक्त करत समाजाला आत्मोद्धाराची जाणीव करून देणारे महत्वाचे संत, अशी त्यांची ख्याती होती . विसोबा खेचर हे त्यांचे गुरु होत. संत नामदेवांनी तर आपल्या अभंगातून सोपी, सरळ पण प्रभावी भाषा वापरत सामाजिक समतेचा संदेश दिला. नामदेवांच्या अभंगांमुळे मराठी भाषेचा लोकसंपर्क वाढला आणि ती अधिक व्यापक समाजापर्यंत पोहोचली. "नाचू कीर्तनाच्या रंगी| ज्ञानदीप लावू जगी||" हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते .संत नामदेवांनी भागवत संप्रदाय पंजाब प्रांतापर्यंत नेण्याचे काम केले आहे .

संत एकनाथ –

संत एकनाथांनी एकनाथी भागवत आणि भावार्थ रामायण यांसारख्या ग्रंथांद्वारे संस्कृत ग्रंथांचे मराठीत भाषांतर केले. त्यांच्या लेखनामुळे मराठी भाषेला ग्रंथात्मक स्थैर्य, शिस्त आणि वैचारिक स्पष्टता प्राप्त झाली.

संत तुकाराम-

संत तुकाराम हे मराठी संतसाहित्याचे सर्वोच्च शिखर मानले जातात. तुकाराम गाथा हा मराठी भाषेचा अमूल्य ठेवा आहे. साधी भाषा, आत्मसंवाद आणि सामाजिक वास्तव यांचे विलक्षण मिश्रण तुकारामांच्या अभंगांत आढळते. त्यांनी मराठी भाषेची भावनिक व वैचारिक अभिव्यक्तीची क्षमता सिद्ध केली. तुकाराम महाराजांच्या कवितेचे महत्त्व सांगताना सयाजीराव गायकवाड महाराज २७ डिसेंबर १९३२ रोजी कोल्हापूर येथील सतराव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात संत तुकाराम महाराजांच्या अभंगाविषयी म्हणाले, 'तुकारामबुवांची कविता, भावनाप्रधान, स्वतंत्र विचार प्रदर्शित करणारी, अनुभवाचे बोल काढणारी, लोकस्वभावास पक्की निरखणारी व लोकांच्या साध्या प्रचलित भाषेमध्ये जिव्हाळ्याने लिहिली असल्यामुळे मनास पटणारी अशी आहे' .Spontaneous overflow of powerful feeling.' प्रबळ भावनांचा सहाजोद्गार, ही वर्डसवर्थची कवितेची व्याख्या तुकोबांच्या कवितेस तंतोतंत लागू पडते '.ही कविता केवळ साहित्य बनून राहत नाही तर ती समस्त समाजासाठी प्रेरणा होते. संतांनी डोळसपणे आपल्या लेखणी व वाणीचा उपयोग समाजयाच हितासाठी केला .शब्दांचे सामर्थ्य संतांना ज्ञात होते . शब्द हेच आपले धन, शस्त्र आणि देवही आहे, आपल्या जीवनाचे सारसर्वस्व तेच आहे असे संत म्हणतात .संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ आदी संतांनी लोकभाषेतून अभंग, भारूड, ओव्यांद्वारे सामान्य माणसाला अध्यात्म आणि

प्रबोधन उपलब्ध करून दिले, जे आजही आदर्श आहे. संतांनी शब्दांच्या माध्यमातून त्यांनी मराठीमधील उत्तम साहित्यनिर्मिती केली ज्यामुळे आज मराठीला अभिजात भाषेच एक मौलिक ठेवा बनले आहे.

समारोप -

मराठी भाषेच्या अभिजाततेच्या संकल्पनेत संतसाहित्याचे स्थान महत्वाचे आहे. भाषेची प्राचीनता, विपुल ग्रंथसंपदा, तत्त्वज्ञानात्मक साहित्यनिर्मिती, वैश्विक मूल्यांचे चिंतन आणि पर्यावरणीय जाणीव या अभिजात मूल्यांचा परिपोष संत साहित्यात आहे. त्यामुळेच संत साहित्य मराठी अभिजात भाषेचा मूलाधार ठरते असे म्हणता येईल. संतानी जी शिकवण दिली, मराठी भाषेचे जे महत्व सांगितले, त्यांच्या या साऱ्या विचारांचा आजचा संदर्भ अतिशय महत्त्वाचा आहे. आज संतसाहित्यातील ज्ञानाची, तत्वज्ञानाची, वैश्विक विचारांची नितांत गरज आहे .आजही बऱ्याच अभ्यासक्रमात संतसाहित्य समाविष्ट केले जाते, ते त्यातील शाश्वत विचारांमुळेच. तसेच आज संशोधनामध्ये संत साहित्याला अनन्यसाधारण महत्व आहे. आज डिजिटल माध्यमातूनही ही संतवाणी नव्या पिढीला सुसंस्कृत करत मराठी भाषेची अभिजात परंपरा पुढे चालू ठेवत आहे.

निष्कर्ष -

१) संतसाहित्याने मराठी भाषेला केवळ साहित्यिक वैभव दिले नाही, तर तिला अभिजाततेचे अधिष्ठान दिले.

२) मराठी भाषा ही केवळ व्यवहाराची भाषा नसून तत्त्वज्ञान व्यक्त करण्यास समर्थ भाषा आहे हे संत साहित्याने सिद्ध केले.

३) संतांनी मानवतावाद, विश्वबंधुत्व आणि सामाजिक समतेचा, बंधुतेचा संदेश देत समाजाला दिशा दिली.

३) संत साहित्य हा मराठी भाषेच्या अभिजाततेचा आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचा मूलाधार आहे.

५) संत साहित्य हे केवळ भक्तीपर नसून ते मराठी समाजाच्या मूल्यदृष्टीचे, विचारांचे आणि भाषिक संस्कृतीचे जिवंत केंद्र आहे.

६) संत साहित्यातील शाश्वत विचारांमुळेच ते मराठी भाषेच्या अभिजाततेसाठी मौल्यवान आहे.

संदर्भ ग्रंथ –

1) देशमुख उषा, 'संतकाव्य संचित', माया प्रकाशन, प्रथमावृत्ती २००० पृ.१३
2) गवळी अनिल, 'मराठी भाषा : आज आणि उद्या', दर्या प्रकाशन, पुणे.
3) शहा रमणलाल, 'आम्ही जिंकीला संसार', संस्कृती प्रकाशन, पुणे.
4) काळे कल्याण, नगरकर रा. शं.(संपा.), 'संत साहित्य : अभ्यासाच्या काही दिशा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९२.

अभिजात भाषा आणि साहित्य एक नवा अभ्यास

कु. साजिदा सरदार आरवाडे
श्रीमती सी.बी. शाह महिला महाविद्यालय,सांगली
मोबाईल नं. ८८०५६९१७७१

भाषा ही मानवी संस्कृतीची मूलभूत ओळख आहेअनुभवांची आणि -भावना ,मानवाच्या विचारांची . दाचे साधन नसून ती समाजाच्या भाषा ही केवळ संवा .सामाजिक जाणीवांची अभिव्यक्ती भाषा या माध्यमातून घडते इतिहास आणि सामूहिक स्मृ ,मूल्यव्यवस्था ,सांस्कृतिक परंपराती यांचे संवाहक माध्यम आहेम्हणूनच भाषेच्या . या .उत्क्रांतीबरोबर साहित्यनिर्मिती झाली आणि त्यातून मानवी सभ्यतेचा बौद्धिक इतिहास आकाराला आला .ही संकल्पना उदयास आली 'साहित्य अभिजात भाषा आणि' प्रक्रियेतूनच

'अभिजात' हा शब्द केवळ प्राचीन किंवा उच्चवर्गीय अशा अर्थाने मर्यादित न राहता, दीर्घकालीन परंपरा, कलेची श्रेष्ठता, गांभीर्य आणि कलात्मक मूल्ये यांचा आहे. अभिजात भाषा या त्या भाषा आहेत ज्या इतिहाच्या कसोटीवर टिकल्या आणि त्यांनी एक समृद्ध साहित्यपरंपरा निर्माण केली आहे. आणि याच माध्यमातून समाजाचा सांस्कृतिक,धार्मिक, नैतिक व तात्विक विकास झाला आहे.संस्कृत,तमिळ,मराठी यासारख्या भाषांमधून लॅटिन, ग्रीक यांसारख्या पाश्यात्य भाषांपर्यंत अभिजात भाषांनी मानवी संस्कृतीच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावली आहे.

भूतकाळात अभिजात भाषा आणि साहित्य हे प्रामुख्याने धर्मराजसत्ता आणि उच्चवर्गीय , ,तथापि .त्यामुळे त्यांचा उपयोग आणि प्रभाव मर्यादित सामाजिक स्तरांपुरता राहिला .शिक्षणव्यवस्थेशी निगडित होते क .मानवी मूल्ये आणि तत्त्वज्ञान हे सार्वकालिक स्वरूपाचे होते ,मध्ये मांडलेले जीवनदर्शनया साहित्याालांतराने लोकभाषांचा उदयसामाजिक परिवर्तन आणि लोकशाही मूल्यांमुळे अभिजात आणि लोकसाहित्य ,भक्ती चळवळ , .यांच्यातील दरी कमी होत गेली

